शिष्य वेदोक्ताला अनुकूल व दुसरा प्रतिकूल म्हणून भेद पडला आणि हें वेदोक्ताचें प्रकरण चांगलेंच गाजलें.

या वेदोक्त प्रकरणांतून ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद निर्माण झाला (१९१०). सत्यशोधकसमाज जरी १८७३ सालीं स्थापन झाला होता तरी जोतिबा फुल्यांच्या नंतर तो नामशेषावस्थेतच होता. यांच्यासारखीं थोर घराण्यांतील माणसें तिकडे लक्ष देऊं लागतांच तो पुनः एकदां लोकांत गाजूं लागला. पुरोहितांचें काम कोणींहि करावें, त्याकरितां ब्राह्मणच पाहिजे असें नाहीं असें यांचें म्हणणें होतें. पण ब्राह्मणांचा पौराहित्याचा अधिकार तर कायदेशीर मानला गेला होता. अशा या लढ्यांत १९११ सालीं कोल्हापूर येथें सत्यशोधकसमाजाचें पुनरुज्जीवन करण्यांत आलें आणि ब्राह्मणांच्या विरुद्ध उघड मोहीम सुरू झाली. शंकराचार्यांच्या नेतृत्वाखालीं ब्राह्मणांनीं जोराचा विरोध आरंभिला. यांनीं उघडपणें सत्यशोधक समाजाला मदत करण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम कांहीं लोकांच्या उत्साहातिरेकांत झाला. १९१४ सालीं एडवर्ड बादशहाच्या पुतळ्यास डांबर फासलें गेलें आणि त्याचा संबंध सत्यशोधक चळवळीशीं जोडला गेला. त्यामुळें सत्यशोधक समाजाचें यांचें संस्थानांतील कार्य स्थगित झालें.

अशा स्थितींत त्यापेक्षां जास्त व्यापक विचारावर उभारलेल्या प्रार्थनासमाज व थिऑसाफिकल सोसायटी यांची मदत घेण्याचा यांनीं प्रयत्न केला. पण वेदावर विश्वास ठेवणारा आणि जातिभेद न मानणारा आर्यसमाजाचा लढाऊ कार्यक्रम यांना जास्त पसंत पडला व त्याला आश्रय देण्यांत आला. मागसलेल्या समाजांत चैतन्य उत्पन्न करण्याच्या स्थूल दृष्टीनेंच हे कोणत्याहि चळवळीकडे पाहत, सूक्ष्म तपशीलाकडे यांचें लक्ष नसे.

अस्पृश्यांची अस्पृश्यता नष्ट करून सर्व प्रकारें त्यांना आपल्या बरोबरीस आणून बसविण्याचा यांचा प्रयत्न असे. महारांना दिलेलीं वतनें त्यांच्या पोटापुरतीं नाहींत, म्हणून त्यांना बलुतें मागून लाचारीनें राहावें लागतें; सबब त्यांची लाचारी नष्ट करून त्यांनीं आत्मविश्वासानें व मानानें राहावें म्हणून यांनीं बलुते पद्धति हुकमानें बंद केली (१९१८). पण तो हुकूम बदलून सक्तीनें काम घेऊं नये असें यांना पुढें जाहीर करावें लागलें. यांनीं त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करून त्यांना नोकऱ्या दिल्या. पुढें तर हे त्यांच्याबरोबर जाहीरपणें भोजनें देखील करूं लागले.

समतावादी समाजसुधारक ही यांची मुख्य भूमिका होती. सनातन धर्माविरुद्ध इतका जबाबदार, कर्तृत्वशाली आणि निर्भय पुढारी अद्यापि उत्पन्न झाला नव्हता. तात्त्विक प्रतिपादनापेक्षां आचारावर यांचा भर असे. त्यामुळें यांच्या चळवळीस तात्काळ प्रतिक्रिया सुरू होई.

छत्रपति, राजाराम महाराज—(जन्म स. १८९७–मृत्यु स. १९४०, कारकीर्द स. १९२२-१९४०) कोल्हापूरराज्याचे छत्रपति. यांच्या शिक्षणाकरितां मिसेस आयर्विन नांवाच्या स्कॉच अमेरिकन बाईची योजना झाली होती. पांचगणी, बेंगळूर येथील शिक्षणानें समाधान होईना तेव्हां यांना इंग्लंडला रवाना करण्यांत आलें (१९१२ मे). तिकडील शिक्षण घेऊन हे अमेरिकामार्गे परत आले (१९१५ जुलै).

यांचा विवाह बडोद्याचे युवराज फत्तेसिंगराव गायकवाडांची कन्या इंदुमती राजे यांच्याशीं बडोदें येथें झाला (१९१८ एप्रिल १). या लग्नांत गायकवाडांनीं यांना सहा लक्ष सत्तर हजार रुपये हुंडा दिला. लग्नानंतर त्यांचें नांव ताराबाई ठेवण्यांत आलें. यांच्या दुसऱ्या पत्नी विजयमालाबाई होत.

यांना तीन गोलमेजपरिषदांपैकीं दोहोंचें प्रतिनिधित्व मिळालें होतें. यांना शिकारीचा व घोड्यांच्या शर्यतीचा बराच नाद असे. यांनीं आपल्या कारकीर्दीत सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्याचा योग्य मार्गानें प्रयत्न केला.

यांच्या वेळीं औद्योगिक दृष्ट्या संस्थानची प्रगति झाली. यांनीं श्रीछत्रपति शाहू स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल, शुगर मिल व बँक ऑफ कोल्हापूर या संस्था स्थापन केल्या. संस्थानच्या मालकीची रेल्वे असून यांनीं सिनेमाच्या धंद्यांतहि बरेंच लक्ष घातलें होतें.

यांच्या राज्यांत शिक्षणाची सोय उत्तम असून ती अधिक उपयुक्त व कार्यक्षम करण्याचा यांनीं प्रयत्न केला. मागासलेल्या जाती व स्त्रिया यांना शिक्षणांत अधिक सवलती देण्याचा परिपाठ यांनीं पुढें चालविला.

यांच्या मागें ताराबाई महाराणीसाहेबांच्या मांडीवर भोसले घराण्यापैकीं एका शाखेतील मुलगा दत्तक घेऊन त्यांच्या अज्ञान अवस्थेंत महाराणीसाहेबांच्या अध्यक्षतेखालीं रीजन्सी कौन्सिल नेमून राज्यकारभार चालू झाला.

छत्रे, विनायक ऊर्फ केरो लक्ष्मण—(जन्म स. १८२४–मृत्यु स. १८८४) गणितशास्त्र व सृष्टिशास्त्र यांचे अभ्यासक व तज्ज्ञ. हे प्रत्यक्ष वेधहि घेत.

हे अष्टागरांतील नागांवीं जन्मलेले चित्पावन ब्राह्मण. यांचें शिक्षण मुंबई येथें एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनमध्यें झालें. प्रो. अर्लिबार साहेबांचे हे प्रिय शिष्य होते. स. १८४० मध्यें मुंबई येथें कुलाबादांडीवर अन्तरिक्ष चमत्कार व लोहचुंबक यांचे अनुभव घेण्याकरितां वेधशाळा झाली. तिची सुरुवात अर्लिबारसाहेबांनीं केली. तेथें यांची असिस्टंटच्या जागीं नेमणूक करण्यांत आली. स. १८५१ जूनच्या ७ तारखेस पुणें संस्कृत पाठशाळेच्या जागीं 'पूना कॉलेज' झालें. त्यानंतर कांहीं महिन्यांनीं त्या संस्थेच्या नॉर्मल स्कूलमध्यें सृष्टिशास्त्र व गणित शिकविण्याकरितां असिस्टंट प्रोफेसरच्या जागीं यांची नेमणूक झाली. त्या कॉलेजांत मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांत हे शिकवीत असत. पुढें त्या कॉलेजचा नॉर्मल स्कूल हा भाग वेगळा झाला त्यांत हे अध्यापक होते व पुढें कांहीं वर्षे त्याचे मुख्य सुपरिंटेंडेंटहि होते. त्या वेळेस त्या विद्यालयास व्हर्नाक्युलर कॉलेज असेंहि म्हणत. हल्लीं त्यास ट्रेनिंग कॉलेज म्हणतात. या वेळीं कांहीं दिवस हे एंजिनिअरिंग कॉलेजांतहि सृष्टिशास्त्रावर व्याख्यानें देत. मध्यें कांहीं दिवस हे अहमदनगर इंग्लिशस्कूलचे हेडमास्तर होते. स. १८६५ मध्यें यांस पूना कॉलेजांत गणित व सृष्टिशास्त्र यांचे प्रोफेसर नेमले. तेथें हे विषय हे इंग्रजींत शिकवीत. त्या कॉलेजास पुढें डेक्कन कॉलेज म्हणण्यांत येऊं लागलें. स. १८७९ मध्यें यांनीं पेन्शन घेतलें. नेटिव्ह लोकांस मिळणारें अति मोठें पेन्शन पांच हजार रुपये साल यांस मिळालें. स. १८७७ सालीं दिल्लीदरबारच्या वेळीं रावबहादूर असा किताबहि यांना मिळाला. यांच्या अंगच्या अनेक सद्गुणांत सतत विद्याव्यासंग व सौजन्य हे गुण विशेष होते.

यांच्याविषयीं सरकारच्याहि मनांत आदर असे. निगर्वी वृत्ति असल्यामुळें विद्यार्थी वर्गांशीं हे खेळीमेळीनें वागत असून त्यांच्या अडचणींचें निरसन करण्यासाठीं हे केव्हांहि तयार असत. मृत्यूनंतर सरकारनें यांच्या कुटुंबासाठीं द. म. १०० चें पेन्शन दिलें. यांच्या स्मारकासाठीं त्या वेळच्या परिस्थितींतहि ११००० रु. च्यावर निधि जमला यावरून यांच्या लोकप्रियतेची कल्पना सहज होते.

सूर्यावरील डाग व पर्जन्यवृष्टि यांमध्यें कांहीं परस्पर संबंध आहे असें यांचें मत होतें.

ग्रहसाधनाचीं कोष्टकें हा आपला ग्रंथ यांनीं R.S 'Vince च्या ग्रंथांच्या आधारें केला (१८६०). या ग्रंथांत वर्षमान सूर्यसिद्धान्तांतील घेतलें आहे व ग्रहगतिस्थिति सायन घेतल्या आहेत. यामुळें या ग्रंथावरून ग्रह सायन येतात. रेवतीयोगतारा झिटापिशियम मानली आहे. ती शके ५७४ मध्यें मेषसंपाती होती. त्या वर्षी अयनांश शून्य मानावें आणि अयनगति वर्षाची ५०. १ विकला घेऊन त्याप्रमाणें अयनांशसंस्कार सायन ग्रहास करून निरयन ग्रह करावे असें यांचें म्हणणें आहे. यांत निरयन वर्षमान शुद्ध म्हणजे ३६५।१५।२३ घेतल्यासारखें होतें. हें वर्षमान व ५०. २ अयनगति घेऊन यांनीं स. १८६५ पासून नॉटिकल आल्मनाकवरून निराळें पंचाग सुरू केलें. कै. बाबासाहेब पटवर्धनांचें यांना मोठें साहाय्य होतें. त्या पंचागास यांनीं पटवर्धनी पंचांग असें नांव दिलें आहे. यांच्या ग्रंथावरून ग्रहस्थिति पुष्कळ शुद्ध येते. परंतु तो ग्रंथ आणि पटवर्धनी पंचाग सध्यां प्रचारांत नाहींत.

तिथिसाधनाचा तिथिचिंतामणीसारखा ग्रंथ यांनीं केला व तो काशीला छापला. हल्लीं तो ग्रंथ व ग्रहसाधनाचीं कोष्टकें हे दोन्ही ग्रंथ मिळत नाहींत. निरयन पंचांग करण्यास प्रत्यक्ष तो ग्रंथ उपयोगी नाहीं. शिवाय त्यांत लॉगॅरिथम आणि त्रिकोणमिति यांचें साह्य लागतें. यामुळें जुन्या जोशांस त्यावरून गणित करतां येत नाहीं. यांनीं मराठी शाळांस उपयोगी अशीं पदार्थविज्ञानशास्त्र आणि अंकगणित हीं दोन पुस्तकें केलीं आहेत.

छत्रे, विष्णुपंत मोरोपंत—(जन्म स. १८४०–मृत्यु स. १९०६) हिंदुस्थानांतील पहिले सुप्रसिद्ध सर्कसवाले व गायनशास्त्रज्ञ.

यांचा जन्म कृष्णाकांठीं असणाऱ्या अकलखोपास झाला. हे पटवर्धनांचे आश्रित. पण जमखिंडीकर १८५७ च्या बंडामुळें संकटांत आल्यानें हे रामदुर्गकर भाव्यांच्याकडे चाबुकस्वाराच्या जागेवर नोकरीस राहिले (१८५८). तेथें यांनीं तीन वर्षे नोकरी केली. पुढें नोकरी सोडून ग्वाल्हेरास जाऊन गेल्या शतकांतील सुप्रसिद्ध अश्वहृदयज्ञ बाबासाहेब आपटे यांच्याकडे अश्वविद्या व रहिमतखांचे वडील हद्दूखां यांचेजवळ गायनविद्या शिकण्यास यांनीं सुरुवात केली व दोन्ही विद्यांत यांनीं चांगलीच प्रगति संपादन केली. गायनाच्या प्रकारांत हे 'धृपदे' म्हणून प्रसिद्ध होते.

परत आल्यावर हे श्रीमंत रघुनाथराव विंचुरकर यांचेकडे विंचुरास नोकरीस राहिले (१८७०). तेव्हां हे घोड्यावर बसून चोहोंकडे हिंडत. या वेळीं यांच्या अश्वशिक्षणपटुत्वाची सर्वत्र ख्याति झाली. अनेक राजेमहाराजांना यांच्या या विद्येबद्दल आदर असे.

याच सुमारास मुंबईस चेअर्नी विल्सन या युरोपियन गृहस्थाची सर्कस आली. त्यांतील घोड्यांचे खेळ पाहून लोक फारच खूष झाले. त्यावरून प्रेरणा घेऊन यांनीं सर्कस काढली; तिच्या तालमी घेतल्या व खेळ करीत हे निघाले. यांचे मित्र नारायण परशुराम टिल्लू व अनेक राजेमहाराजे यांचें यांना साहाय्य असे. यांनीं मुंबईस येईपर्यंत घोडीं वगैरे स्वतःच्या मालकीचीं घेतलीं. हे मुंबईस आले तेव्हां विल्सनची सर्कस यांच्या शेजारीच तंबू ठोकून खेळ करीत होती. पण यांच्या सर्कसचे खेळ सुरू होतांच त्यांचा खर्च भागेना म्हणून त्याला आपले खेळ बंद करावे लागले (१८८३). दुसऱ्या वर्षी तर त्याचा तंबू व इतर सामान यांनीं विकत घेतलें. त्याच्या सर्कशींतील दोन इंग्लिश स्त्रिया व चार काम करणारे युरोपियन आपल्याकडे नोकर ठेवले. अशा तऱ्हेने यांनीं आपली ' ग्रँड इंडियन सर्कस ' सर्व हिंदुस्थानभर फिरविण्यास सुरुवात केली. विल्सनच्या सर्कशीपेक्षां यांच्या सर्कशींतील जनावरांचे खेळ सफाईदार व उत्तम होत. नंतर नंतर तर यांनीं हिंदुस्थानच्या बाहेरील चीन, जपान, ब्रम्हदेश वगैरे देशांत यशस्वी दौरे करण्यास सुरुवात केली.

अशा तऱ्हेनें ऐन भराभराटींत यांनीं आपली सर्कस आपले कनिष्ठ बंधु काशिनाथपंत यांच्या स्वाधीन केली. त्यांनीं तर यांच्याहि पुढें जाऊन यांची सर्कस आशियाच्या बाहेर अमेरिकेंतील सॅनफ्रान्सिस्कोपर्यंत फिरविली. ते १९२४ डिसेंबर ११ रोजीं वारले. यांच्या सर्कशींत कामें करून तयार झालेल्या देवलबंधूंनीं स्वतंत्र सर्कस काढून आशिया, अमेरिका, युरोप व आफ्रिका या चारहि खंडांत यशस्वी दौरे करून यांची परंपरा चालू ठेवली.

यांचा दुसरा गुण गाण्याचा. यांची सर्कस काशीस असतां (१८९२) तेथें यांचे गुरु हद्दुखा यांचे पुत्र रहिमतखा अत्यंत करुणास्पद स्थितींत आढळले. ताबडतोब यांनीं त्यांना आपल्या जवळ ठेवून त्यांची जन्मभर व्यवस्था केली.

आयुष्याच्या शेवटलीं सात आठ वर्षें यांनीं केवळ रहिमतखांच्या व आपल्या ' गुणीजन ' आवडाजी यांच्या संगतींत घालविलीं.

छत्रे, सदाशिव काशीनाथ—(जन्म स.१७८८-मृत्यु स. १८३०) मराठींतील आद्य गद्य ग्रंथकार.

त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें यांचें संस्कृतभाषेचें शिक्षण झालें होतें. यांचा मराठी काव्यांचा चांगला अभ्यास होता. त्या अभ्यासाच्या जोरावर मराठीचे तज्ज्ञ अशी ख्याति यांनीं मिळविली. १८०८ सालीं हे उद्योगानिमित्त मुंबईस आले. तेव्हां पेशवाईचा अंमल असल्यानें इंग्रजी शाळा नव्हत्या. तरी हे एका मिशनऱ्यापाशीं इंग्रजी शिकले. पेशवाईनंतर इंग्रजांचें लक्ष विद्याप्रसाराकडे लागलें. त्या वेळीं समाजांतील वजनदार व इंग्रजी जाणणारा यांच्यासारखा गृहस्थ त्यांना मिळाला आणि यांना शाळांचे तपासनीस म्हणून मोठ्या पगाराची व मानाची जागा देण्यांत आली. १८१४ पासून अखेरपर्यंत हे त्या कामावर होते. या नात्यानें यांनीं अनेकांना उत्तेजन देऊन नांवारूपास आणलें. त्यांपैकीं बाळशास्त्री जांभेकर व वृत्तपत्रकार भाऊ महाजन हे प्रमुख होत. यांची भाषा सरळ सुबोध व सुरम्य म्हणून प्रसिद्ध असे.

यांचे ग्रंथ—१ बालमित्र, २ वेताळपंचविशी (१८५२), ३ सिंहासन बत्तिशी (१८५४), ४ इसापनीति (१८६१). यांपैकीं पहिलीं दोन विल्ड्रन्स फ्रेंड्स् व इसॉप्स फेबल्स यांचीं अनुक्रमें भाषान्तरें आहेत.

छोटूराम, सर—(जन्म स. १८८२–मृत्यु स. १९४५) पंजाबमधील सुप्रसिद्ध राजकारणी व जाट लोकांचे पुढारी.

रामरिचपाल हें यांचें खरें नांव. परंतु सर्व भावंडांत धाकटा म्हणून छोटूराम हेंच टोपण नांव घेऊन हे प्रसिद्धीला आले.

दिल्लीपासून अठ्ठावीस मैलांवर असणारें घारीसांपला हें गांव यांचें जन्मस्थान. बी. ए. झाल्यावर १९११ त हे आपल्या गांवीं वकिली करूं लागले. याच वेळीं जाट समाजाची अज्ञान, निर्धनता वगैरेमुळें होत असणारी दुर्दशा यांच्या ध्यानांत आली. त्या मागासलेल्या जातीला थोडें तरी राजकीय शिक्षण देण्याचे हेतूनें यांनीं ' जाट गॅझेट ' नांवाचें साप्ताहिक सुरू केलें (१९१६-२४). याच सुमारास हे कॉंग्रेसचे एकनिष्ठ कार्यकर्ते बनले.

सुशिक्षित जाटांना जरी कॉंग्रेसमध्यें सामील होण्याचा हे उपदेश करीत तरी इतरांनीं कॉंग्रेसमध्यें सामील

आपल्या संस्थांना आर्थिक मदत करणें, 'कौटुंबिक उपासना मंडळ' चालवून धार्मिक शिक्षण व समतेचा प्रचार करणें, बालवीर चळवळींत जिल्हा स्काउट कमिशनर म्हणून व अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे व डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनचे चिटणीस वगैरे यांनीं केलेली कामगिरी निःसंशय नमुनेदार आहे.

याशिवाय साक्षरताप्रसारक-मंडळाचे, पुणें नगरपालिकेचे सभासद, तेथें स्कूलबोर्डाचे ३ वर्षें व जिल्हा स्कूलबोर्डाचे ७ वर्षें कार्याध्यक्ष होते. महाराष्ट्र युनिव्हर्सिटी कमेटीचे व खेर मंत्रिमंडळानें नेमलेल्या प्रायमरी एज्युकेशन बोर्डाचे हे सभासद होते व पुनःहि निवडून आले.

हे सेवानिवृत्त होऊन कोल्हापूर राज्यांत शिक्षणाधिकारी म्हणून गेले. पण श्रीशिवाजी मराठा सोसायटींत यांची आवश्यकता वाटूं लागली म्हणून यांना बोलविण्यांत आलें आणि हेहि पण तेथील फायदेशीर असणारी जागा सोडून सोसायटीच्या सेवेला हजर झाले (१९४५).

हे आदर्श शिक्षक व समाजसेवक आहेत. शिक्षकाच्या पेशाबद्दल यांना अभिमान वाटतो. शिक्षकाला आवश्यक असणाऱ्या रुबाबदार शरीरयष्टि, स्पष्ट व खणखणीत वाणी, नियमितपणा, कष्टाळू स्वभाव, अभ्यासू वृत्ति, चारित्र्य, सौंदर्यदृष्टि व तळमळ इत्यादि गुणांचा मेळ यांच्यांत उत्तम झालेला आढळतो.

यांचें वाङ्मयः—१ मन्वतर वाचनमाला-शालेय, २ माझी शाळा (१९३६), ३ अध्यापनाचा परिचय (१९३६), ४ शाळा कशी चालवावी (१९३९), ५ मराठा समाजांतील शिक्षण-संस्था (१९३९), ६ टॉलस्टायच्या ८ गोष्टी, ७ शिशुसंगोपन (१९४०).

जगन्नाथदास पुरुषोत्तमदास 'रत्नाकर'—(जन्म स. १८६६–मृत्यु स. १९३२) व्रज भाषेंतील सुप्रसिद्ध कवि.

यांचा जन्म काशीस झाला. यांचे पूर्वज पानिपतचे राहणारे असून ते मोगल बादशहाच्या दरबारीं मोठे मोठे अधिकारी होते. यांचे पणजोबा एकदां जहांदरशाहाबरोबर काशीला आले व तेव्हांपासून ते तेथेंच राहूं लागले. हे आग्रवाल वैश्य होत.

यांचे वडील फारसीचे उत्तम ज्ञाते होते. त्यांचाच गुण यांचे अंगीं उतरून यांना कवितेची रुची उत्पन्न झाली. यांचे वडिलांचा भारतेन्दूंशीं स्नेह असल्यामुळें त्यांच्या सत्संगतीचाहि यांच्यावर परिणाम झाला.

हे स. १८९१ त काशी येथें फारसी घेऊन बी. ए. झाले. पुढें एम्. ए. लाहि यांनीं हाच विषय घेतला. यांचें शिक्षण काशींतच झालें. बी. ए. होण्यापूर्वीपासूनच हे उर्दू काव्यरचना करीत असत. परंतु नंतर हिन्दी भाषेबद्दल हळूंहळूं यांना आत्मीयता वाटूं लागून हे लवकरच हिन्दी साहित्याचार्य व व्रजभाषेंतील सर्वश्रेष्ठ कवि बनले. स. १९००–१९०२ पर्यंत हे अवागढ संस्थानांत व अयोध्यानरेश कै. सर प्रतापनारायणसिंह बहादुर यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी होते. स. १९०६ त महाराजांच्या मृत्यूनंतर यांच्या कार्यदक्षतेवर प्रसन्न होऊन अयोध्येच्या राणीसाहेबांनीं यांना आपले प्रायव्हेट सेक्रेटरी केलें.

यांच्या कविता सरस व भावपूर्ण असतात. आजपर्यंत त्यांनीं 'हिन्डोला,' 'समालोचनादर्श,' 'साहित्यरत्नाकर,' 'घनाक्षरी-नियम-रत्नाकर,' 'हरिश्चन्द्र,' 'गंगावतरण,' 'कलकाशी,' 'अष्टकरत्नाकर,' 'ऊधवशतक' इत्यादि काव्यग्रंथांची रचना केली. स. १९२८ त बिहारी-सतसईवर यांनीं एक मोठी ललित टीका लिहिली आहे. 'हमीर हठ' (चंद्रशेखर), 'हितकारिणी' (कृपाराम) व 'कंठाभरण' (दूलह) वगैरे कवींचीं काव्यें यांच्याच संपादकत्वाखालीं होत. "साहित्यसुधानिधि" नांवाचें मासिक हे पुष्कळ वर्षेपर्यंत काढीत. त्यांत यांचें कांहीं काव्य व दोहे प्रसिद्ध झाले आहेत.

यांच्या या वाङ्मयीन कार्याचा गौरव करण्यासाठी कलकत्त्याच्या हिंदी साहित्यसंमेलनाचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें (१९२३).

जगन्नाथप्रसाद 'भानु'—(जन्म स. १८५९–मृत्यु स. १९४५) हिन्दी व उर्दू भाषांतील सुप्रसिद्ध कवि, ग्रंथकार व साहित्यभक्त.

यांच्या पित्याचें नांव बख्शीराम. ते उत्तम कवि होते. त्यांनीं केलेलें हनुमाननाटक हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. मध्यप्रदेशांत त्यांच्याबद्दल चांगला आदर आहे.

इंग्रजी व हिन्दी भाषांचें साधारण ज्ञान संपादन करून हे शिक्षणखात्यांत दरमहा १५ रुपयांवर नोकरीस लागले व आपल्या हुषारीनें एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर व नंतर असिस्टंट सेटलमेंट ऑफिसच्या हुद्यावर पोंचले. कांहीं दिवस हे सेटलमेंट ऑफिसरहि होते. ही जागा फक्त आय्. सी. एस्. अधिकाऱ्यांना देण्याचा रिवाज होता. पण हे

तसे नसतांना यांना ती जागा देण्यांत आली. ३४ वर्षे नोकरी करून हे सेवानिवृत्त झाले व बिलासपूर (मध्य-प्रान्त) येथें राहूं लागले.

नोकरींत असतां यांनीं लोकोपयोगी पुष्कळ कामें केलीं. खांडवा जिल्ह्यांत पन्नास नवीं गांवें रयतवारी पद्धतीनें बसवून त्यांचा चांगला बंदोबस्त केला. ह्मेग, पटकी व दुष्काळ अशा प्रकारच्या संकटांत यांनीं लोकांना उत्तम साहाय्य केलें, त्यामुळें लोक यांच्या नांवाचीं भजनें कृतज्ञतेनें तिकडे गातात.

यांचें हिन्दीवर अत्यंत प्रेम असून तिच्या सेवेकडे यांचें सतत लक्ष असे. साहित्य आणि काव्यशास्त्र यांचें यांना उत्तम ज्ञान असून यांचा वेळ प्रायः त्या कामीं लागे.

यांचे छन्दःप्रभाकर व काव्यप्रभाकर हे ग्रंथ यांच्या काव्यशास्त्रांतील पांडित्याचा चांगला परिचय देतात. हिन्दी भाषेंत या ग्रंथांना चांगला मान आहे. यांच्या अनेक वर्षांच्या सखोल अभ्यासाचा हा परिपाक आहे. यांनीं अभ्यासाबरोबर त्याकरितां पैसाहि पुष्कळ खर्च केला. छन्दःप्रभाकराच्या लोकप्रियतेची कल्पना त्याच्या प्रसिद्ध झालेल्या अनेक आवृत्त्यांवरून सहज येते.

हे उर्दूतहि उत्तम कविता करीत. उर्दू कविता प्रसिद्ध करतांना हे 'फैज' हें टोपण नांव घेत. बिलासपूरला यांचा स्वतःचा एक 'जगन्नाथ प्रेस' आहे.

यांनीं अनेक विद्वानांच्या समोर काशी येथें छंदःशास्त्र-विषयक अनेक चमत्कार करून दाखविले. तेव्हां लोक यांना साक्षात् पिङ्गलाचार्य म्हणूं लागले व कवींचे 'भानु' असा यांचा गौरव झाला. जबलपुर, सागर, खांडवा, बैतुल, नरसिंहपुर वगैरे शहरांत यांच्या नांवें 'भानु कविसमाज' स्थापन झाले. तेथें वर्गणी नसते पण हे मात्र त्या समाजांना साहाय्य करून उत्साह देतात. यांनीं एक काव्यविषयक मासिकहि चालविलें होतें.

ब्रिटिश सरकार व देशी राज्यें यांत यांच्याविषयीं चांगला आदर आहे. यांना दिल्ली दरबारपदक, रायसाहेब व रावबहादूर या पदव्या मिळाल्या. हे फर्स्ट क्लास ऑनररी मॅजिस्ट्रेट होते. हे अखिल भारतीय कविसंमेलनाचे अध्यक्ष झाले होते (१९२५). हैदराबादचे माजी निजाम यांचा फार आदर करीत. एका राजांनीं यांना साहित्याचार्य ही पदवी दिली.

यांना हिन्दीशिवाय उर्दू, मराठी व उडिया या भाषा चांगल्या येत. शिवाय यांचा संस्कृत व इंग्रजी भाषांचा अभ्यास वाखाणण्यासारखा होता.

यांचे हिन्दी ग्रंथ—

१ काव्यप्रभाकर, २ छन्दःप्रभाकर, ३ नवपंचामृत रामायण, ४ काव्यकुसुमाञ्जलि, ५ छन्दःसारावली, ६ हिन्दीकाव्यालंकार, ७ अलंकार-प्रश्नोत्तरी, ८ रस-रत्नाकर, ९ काव्यप्रबंध, १० नायिकाभेद, ११ शंकावली, १२ अंकविलास, १३ कालप्रबोध, इत्यादि. उर्दू— १ गुलजारे सखून, २ गुलजारे फैज, इत्यादि.

जगन्नाथ शंकरशेट ऊर्फ **नाना शंकरशेट**— (जन्म स. १८०३ फेब्रु. १०—मृत्यु स. १८६५ जुलै ३१) मुंबई शहरांतील सुप्रसिद्ध धनिक, अव्वल इंग्रजींतील सार्वजनिक कार्यकर्ते व थोर दानशूर नागरिक.

हे मुंबईचे दैवज्ञ ब्राह्मण (सोनार). यांचे पूर्वज मुरबाड (कल्याण भिवंडीजवळ जि. ठाणें) येथील राहणारे. यांचें उपनांव मुर्कुटे. यांचें घराणें अनेक पिढ्या व्यापार करणारें. त्यांपैकीं यांचे अजोबा बाबुलशेट यांनीं मुरबाड सोडून घोडबंदरावर वसाहत केली. वडील शंकरशेट प्रथम मुंबईत येऊन स्थायिक झाले. म्हैसूरच्या लढाईत टिपू ठार होऊन इंग्रजांचा जय झाला तेव्हां शंकरशेटांना कल्पनेबाहेर नफा होऊन त्यांच्याजवळ सोळा लक्ष रुपये रोख व एक लक्षाचें जवाहीर जमलें (१७९९ मे).

यांची माता भवानीबाई यांच्या जन्मानंतर थोड्याच वर्षांत वारली. तिच्या स्मरणार्थ गवालीया टँकजवळ भवानीशंकराचें देवालय व धर्मशाळा बांधण्यांत आली. पुढें यांच्या अठराव्या वर्षी वडिलांनीं देह ठेवला (१९२२) आणि घरगुती व व्यापारधंद्याची प्रचंड जबाबदारी यांच्यावर येऊन पडली.

मुंबईस प्रथम ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या साहाय्यानें शिक्षण-प्रसाराचें काम सुरू झालें. पण त्यांना फारसें यश आलें नाहीं. तेव्हां लोकांनीं आपल्या संस्था काढण्यास सुरुवात केली. यांपैकीं सुरवातीच्या बहुतेक संस्थांचें धुरीणत्व यांचेकडे असे. कांहीं प्रमुख संस्थाः—१ बॉंबे नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी (स्थापना १८२२ आगष्ट २१), एतद्देशीय लोकांत शिक्षणप्रसार करण्याकरितां निघालेली ही पहिली संस्था होय. याबाबत सदाशिव काशिनाथ छत्रे यांचें यांना साहाय्य होतें. २ बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी. वरील सोसायटीचें रूपान्तर या संस्थेत झालें (१९२४). या संस्थेची भरभराट मुंबई इला-

ख्यांत झालेली दिसतांच अशा शिक्षण देणाऱ्या संस्था जागोजाग निघूं लागल्या. ३ एल्फिन्स्टन फंड (१८२७). माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनीं राजिनामा दिला तेव्हां मुंबईत उच्च शिक्षणाची सोय करण्याकरितां फंड ऊभारण्याचें ठरून चार लक्ष त्रेचाळीस हजार नऊशें एक रुपयांचा फंड जमला. त्या फंडाचे शेवटपर्यंत हे ट्रस्टी होते. ४ बोर्ड ऑफ एज्युकेशन (१८४१). एल्फिन्स्टन फंडाच्या मार्फत उच्च शिक्षणाकरितां एल्फिन्स्टन कॉलेजची स्थापना होतांच (१८३७), बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचा त्या कॉलेजबरोबर मिलाफ करून सोसायटीचें नांव एल्फिन्स्टन इन्स्टिट्युट असें बदलण्यांत आलें. पुढें तीन वर्षांनीं बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना झाली. या बोर्डांत तीन नेटिव्ह सभासद वार्षिक निवडणुकीनें येत. त्यांत हे सतत सोळा वर्षे म्हणजे बोर्डाचें अस्तित्व होतें तोंपर्यंत निवडून येत. ५ स्टुडन्टस लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी (१८४५). ६ जगन्नाथ शंकरशेट मुलींची शाळा (१८४८). ही शाळा त्या वेळीं यांनीं आपल्या स्वतःच्या वाड्यांत सुरू केली व लोकविरोधाला तोंड दिलें. ७ धि जगन्नाथ शंकरशेट फर्स्ट ग्रेड अँग्लो-व्हर्नाक्युलर स्कूल (१८५७ एप्रिल २५) इत्यादि.

तसेंच खुनासारख्या मोठ्या खटल्यांचा निर्णय देण्याकरितां बसणाऱ्या 'ग्रँड ज्यूरी' मध्यें एतद्देशीयांचा समावेश होण्याचा हक्क मिळविणें (१८२९), सती जाण्यास प्रतिबंधक कायदा करण्याच्या कामीं साहाय्य करणें (१९३०), जस्टिस ऑफ दि पीस होण्याचा अधिकार एतद्देशीयांना देणें (१८३७), इत्यादि गोष्टींनीं यांच्या सार्वजनिक आयुष्याला उजाळा मिळाला आहे. मुंबई शहराची आरोग्यकारक व्यवस्था करण्याबाबत म्युनिसिपल कमिशनर या नात्यानें यांनीं केलेली कामगिरीहि अशीच महत्त्वाची आहे.

धि बॉम्बे असोसिएशन (१८५२) ही राजकीय काम करणारी संस्था स्थापण्यांत हे प्रमुख होतें. धि बॉम्बे ब्रँच ऑफ धि रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेला यांनीं पांच हजार रुपये दिल्यानें तेथें नॅचरल हिस्टरीचे मौल्यवान् ग्रंथ घेऊन 'जगन्नाथ शंकरशेट लायब्ररी' या नांवानें एक स्वतंत्र विभागच त्या संस्थेला जोडण्यांत आला आहे (१८६५).

ॲग्रिहॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया आणि जिऑग्रफिकल सोसायटी या दोन्ही सोसायटीच्या उत्पादकांत हे प्रमुख असून हे दोन्हींचे अध्यक्षहि होते. तसेंच व्हिक्टोरिया अँड अलबर्ट म्युझियम अथवा सर्वपदार्थसंग्रहालयाला यांनीं पांच हजार रुपये दिले आणि त्या संस्थेची पहिली सभा (१८५८ डिसें.) व कोनशिलासमारंभ यांच्याच अध्यक्षतेखालीं साजरा झाला (१८६२).

मुंबई कायदेकौन्सिलच्या पहिल्या सभासदांत हे प्रमुख होते (२२ जाने. १८६१). तथापि त्यापूर्वीहि मुंबईच्या गव्हर्नरकडून यांचा हरएक बाबतींत सल्ला घेतला जाई. त्याला महत्त्वहि तसेंच दिलें जाई.

मुंबईच्या राणीच्या बागेंत यांचा पुतळा उभारण्याकरितां मुंबईत पंचवीस हजार रुपये जमा करण्यांत आले होते.

मुंबई विश्वविद्यालयांत मॅट्रिक परीक्षेंत संस्कृत घेऊन पहिला व दुसरा क्रमांक येणाऱ्या विद्यार्थ्यास जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति मिळत असते. ती यांच्या स्मरणार्थ यांचे पुत्र विनायकराव यांनीं केलेल्या व्यवस्थेप्रमाणें मिळते. यांचा संस्कृत भाषेचा अभिमान व सतत बेचाळीस वर्षे केलेले विद्यावृद्धीचे प्रयत्न ध्यानांत घेऊन त्यांनीं मुंबई विश्वविद्यालयाच्या ताब्यांत कांहीं रक्कम दिली. तिच्या व्याजांतून २५-२५ रुपयांची एक शिष्यवृत्ति तीन वर्षे व २०-२० रुपयांची एक, जे मॅट्रिकमध्यें पास होऊन संस्कृत भाषेंत पहिले व दुसरे येतील त्यांना देण्याची व्यवस्था केली. पण पुढें कांहीं काळानें व्याजाचा दर कमी झाल्यावर तीनच्या दोन, पंचवीसच्या अठरा व वीस रुपयांची बारा रुपये करून तीन वर्षांच्या ऐवजी दोन वर्षे चालतील अशी व्यवस्था करण्यांत आली.

जमशेदजी जिजिभाई, सर—(जन्म स. १७८३–मृत्यु स. १८५९) सुप्रसिद्ध व्यापारी व दानशूर पारशी गृहस्थ.

जन्मस्थान मुंबई. मूळ स्थान नवसरी. लहानपणींच आईबाप वारले. यांचें पालनपोषण फ्रेमजी नसरवानजी यांनीं केलें. कारण त्यांनीं लहानपणींच आपल्या मुलीशीं यांचा वाग्निश्चय केला होता. यांना गुजराथी व त्याबरोबरच थोडें इंग्रजीचें शिक्षण देण्यांत आलें.

फ्रेमजी यांचा रिकाम्या बाटल्यांचा व्यापार होता. त्यामुळें हेहि याच व्यापारांत पडले व बाटलीवाला या नांवानें प्रसिद्ध झाले.

१७९९ सालीं आपले नातेवाईक मेरवानजी माणिकजी यांच्याबरोबर कारकून म्हणून हे चीनला गेले. चीनमध्यें असतां यांनीं व्यापाराची चांगलीच माहिती करून घेतली.

हे मुंबईस आल्यावर यांच्या प्रामाणिक व मेहनती स्वभावामुळें यांना पंचवीस हजार रुपये कर्ज सहज उभारतां आलें. तें उभारून यांनीं चीनशीं व्यापार सुरू केला व स्वतः चार वेळां चीनला जाऊन आले. चवथ्या खेपेस परत येतांना मात्र यांचें जहाज फ्रेंचांनीं पकडलें. त्या वेळीं यांचा माल तर गेलाच, शिवाय कैदी म्हणून केप ऑफ गुड होपला यांना आणण्यांत आलें. तेथें डचांचा अंमल होता. पण इंग्रज वकिलाच्या दयाळुपणामुळें यांना मोकळे करून कलकत्त्यास आणून सोडण्यांत आलें. तेथून हे मुंबईस भणंग स्थितींत आले. यांच्या या निराशाजनक स्थितींत यांच्या सहकाऱ्यांनीं यांना मदत करून उत्साह दिला. १८०७ मध्यें शेवटची चीनची सफर करून हे मुंबईस स्थायिक झाले.

मुंबईस राहिल्यावर यांनीं जैन, पारशी व मुसलमान भागीदार घेऊन अफू व कापूस यांचा व्यापार सुरू केला. या धंद्यांत हे जातीनें सर्वत्र लक्ष ठेवीत. १८२२ मध्यें या धंद्यामुळें यांचें भांडवल दोन कोटी रुपये झालें व हे मुंबईस पहिल्या प्रतीचे व्यापारी ठरले. याच सालापासून यांनीं आपला धर्मादाय सुरू केला.

यांचा व्यवहार प्रचंड प्रमाणांत सर्व प्रकारच्या लोकांशीं होता तरी यांचा कोर्टकचेऱ्यांशीं कधींहि संबंध आला नाहीं. उलट हे आपसांतील भांडणें आपणच मिटविण्याचा सल्ला देत.

यांनीं बेनिव्होलन्ट इन्स्टिट्यूट काढून त्यातर्फे मुलांची एक व मुलींच्या तीन शाळा काढल्या. मुलींच्या शाळेमध्यें मुली येईनात. तेव्हां एक युरोपियन शिक्षकीण ठेवून यांनीं आपल्या मुलीस शिक्षण दिलें. अशा प्रकारें यांनीं स्त्रीशिक्षणाचा प्रचार केला.

यांच्या दानधर्माची कल्पना खालील यादीवरून येईल. १ स. १८२२ सालीं तीन हजार रुपये भरून पैशाकरितां तुरुंगांत पडलेल्यांना यांनीं सोडविलें. २ स. १८२४ मध्यें सुरत येथील जळालेली अग्यारी पुनः बांधून दिली. ३ स. १८३५ मध्यें सुरतेस २० हजार घरें जळालीं तेव्हां यांनीं ३५ हजार रुपये व तांदूळ पाठविले. ४ साष्टी व मुंबई यांच्यामधील सामुद्रधुनीवर सरकारच्या साहाय्यानें, पूल बांधला. एकूण खर्च एक कोट ऐंशी हजार. ५ पूना वॉटर वर्क्सकरितां एक लक्ष ऐंशी हजार खर्च. ६ स. १८८३ सालीं मुंबईच्या जमशेदजी जिजिभाई हॉस्पिटलकरितां एक लक्ष रुपये दिले. त्या हॉस्पिटलजवळ २३ हजार रुपये खर्चून एक तळें बांधलें. ८ सुरतेच्या धर्मशाळेकरितां एक लक्ष पंचवीस हजार व नवसरीच्या धर्मशाळेकरितां ६२ हजार. ९ मुंबईच्या जमशेदजी जिजिभाई आर्ट स्कूलकरितां १ लक्ष रु. १० अग्यारी पुणेंकरितां ४५ हजार रुपये. ११ मुंबई, लाइसरोड धर्मशाळा १ लक्ष पन्नास हजार. १२ सर जमशेदजी जिजिभाई बेनिव्होलंट ट्रान्सलेशन फंड, १ लक्ष ५० हजार. अशा प्रकारें पंचवीस कोटींपेक्षां अधिक दानधर्म करून यांनीं आपलें नांव चिरकालीन केलें.

या यांच्या परोपकारी कृत्यांमुळें सरकारनें यांना सर ही बहुमानाची पदवी दिली (१८४२). टाउन हॉलमध्यें यांचा पुतळा उभारण्यांत आला (१८५६) व महाराणी व्हिक्टोरिया यांनीं यांना मानाचें रत्नजडित पदक दिलें (१८५८).

यांच्या या विशेष प्रसिद्धीमुळें जमशेदजी जिजिभाई दुसरे, तिसरे व चवथे अशा नांवांचे पुढील पुरुष प्रसिद्ध झाले.

जयकर, नामदार डॉ. मुकुंदराव रामराव— (जन्म स. १८८० सुमार) हिंदुस्थानांतील विख्यात कायदेपंडित, राज्यघटनाशास्त्रज्ञ, प्रिव्ही कौन्सिलचे न्यायमूर्ति, इंग्रजी भाषेंतील जगप्रसिद्ध वक्ते व अष्टपैलू विधायक मुत्सद्दी.

ह्यांचे वडील बालवयांतच वारल्यामुळें, आजोबा कै. रा. ब. वासुदेव जगन्नाथ कीर्तीकर, सरकारी वकील, आणि नंतर मुंबई हायकोर्टाचे प्यूनी जज्ज, यांनीं यांचें संगोपन-संवर्धन केलें.

यांचें इंग्रजी शिक्षण एलफिन्स्टन हायस्कुलांत झालें आणि कॉलेज शिक्षण झेवियर कॉलेजांत होऊन तेथून हे बी. ए. झाले. यांनीं गव्हर्नमेंट लॉस्कूलमधून एलएल. बी. च्या टर्म्स भरल्या व त्या वेळीं एलफिन्स्टन कॉलेजमध्यें संस्कृत व इंग्रजी हे मुख्य विषय घेऊन हे एकदम एम्. ए., एलएल. बी. झाले.

१९०५ सालीं हे हायकोर्टांत प्रॅक्टिस करूं लागले. पुढें १९३७ सालीं फेडरल कोर्ट ऑफ इंडियाचे एक जज्ज म्हणून हिंदुस्थान सरकारनें यांची नेमणूक केली. त्यानंतर लंडन येथील ज्यूडीशियल कमिटीचे एक मेंबर म्हणून सरकारनें यांची नेमणूक केली. १९४२ सालीं यांनीं या सरकारी उच्च जागेचा राजीनामा दिला.

तरुणपणापासूनच विद्याव्यासंग आणि शिक्षण,

अध्ययन व अध्यापन यांची यांना भारी हौस. आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलचे हे संस्थापक व कांहीं वेळपर्यंत प्रिन्सिपल होते. गव्हर्नमेंट लॉ स्कूलचे हे पार्ट-टाइम प्रोफेसर होते. १९०७ ते १९१२ पर्यंत लॉ स्कूलमध्यें प्रोफेसर म्हणून काम केल्यावर यांना डावलून एका कमी दर्जाच्या युरोपियन प्राध्यापकाला यांच्यावरचा दर्जा देण्यांत आल्यामुळें, सरकारच्या या कृत्याचा तीव्र निषेध करून यांनीं स्वाभिमानपूर्वक आपल्या त्या जागेचा राजीनामा सरकारकडे पाठविला!

यांचा कॉलेजशिक्षणापासून संस्कृतचा व्यासंग दांडगा आहे. मरहूम राइट ऑनरेबल सर डी. एफ्. मुल्ला यांचा हिंदु लॉवरील ग्रंथ, 'स्त्रीधन' आणि 'विधवांचा वारसा' हे दोन भाग यांनीं लिहून दिल्यावांचून पुरा होऊं शकला नाहीं!

१९४२ सालीं इंदूर येथील शैक्षणिक परिषदेचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें. त्याचप्रमाणें त्याच सालीं अमरावतीस भरलेल्या महाविदर्भ परिषदेचेहि हे अध्यक्ष झाले. या दोनहि ठिकाणीं यांनीं केलेलीं भाषणें यांच्या विद्वत्तेची प्रगट साक्ष पटविणारीं आहेत. फर्ग्युसन कॉलेजमध्यें 'प्लेस ऑफ इंग्लिश लिटरेचर' (इंग्लिश वाङ्मयाचें स्थान) या विषयावर यांनीं केलेलें भाषण हें शिक्षण विषयावरील भाषणाचा एक उत्कृष्ट नमुनाच असून, मुंबई युनिव्हर्सिटीच्या इंटरच्या परीक्षेकरतां तें टेक्स्ट म्हणून लावण्याइतक्या योग्यतेचें आहे.

यांचे आजोबा कै. रा. ब. वासुवेद जगन्नाथ कीर्तीकर यांनीं लिहिलेल्या 'स्टडीज इन् वेदान्त,' या पुस्तकाचें संपादन-प्रकाशन १९२४ सालीं यांनीं केलें. यांनीं आपली दीड एक लाख रुपये किंमतीची उत्तम लॉ-लायब्ररी आजोबांच्या स्मरणार्थ 'कीर्तीकर लॉ लायब्ररी' म्हणून येथील ॲडव्होकेट्स् ॲसोसिएशनला दिली. ती तिच्या संभारव्यवस्थेसह तर दिलीच, पण सालोसाल तिची व्यवस्था ठाकठीक राखण्यासाठीं वर २५ हजार रुपयांची रोख देणगीहि दिली.

शिक्षण क्षेत्रांत यांचें नांव कोणालाहि विसरतां येणार नाहीं, इतकी यांची या क्षेत्रांतील कामगिरी मोठी व मोलाची आहे. मुंबई युनिव्हर्सिटीनें १९२४-२५ सालीं एक 'रिफॉर्म्स कमिटी' युनिव्हर्सिटीच्या शिक्षणक्रमांत सुधारणा सुचविण्यासाठीं नेमली होती तिचे हे एक सदस्य होते. या कमिटीपुढें यांनीं एक निश्चित असा शिक्षणक्रम-सुधारणेचा कार्यक्रम ठेविला होता. भाषावार विभाग-युनिव्हर्सिट्या सुरू करण्याची या कमिटीपुढील सूचना परिणत स्वरूप पावली. नंतर डेक्कन कॉलेजचा प्रश्न नेटाला लागला. सरकारनें हें कॉलेज रद्द करावयाचें ठरविल्यामुळें, त्याविरुद्ध हे निकरानें झगडले, ते इतके कीं यांचा तो झगडा मुंबई युनिव्हर्सिटीच्या इतिहासांत चिरस्मरणीय झाला, आणि त्यांतून आज होऊं घातलेल्या 'महाराष्ट्र युनिव्हर्सिटीच्या' कल्पनेचें बीज अंकुरित झालें.

१९४१ सालीं महाराष्ट्र युनिव्हर्सिटीच्या संघटनेची शिफारस करण्यासाठीं एक कमिटी यांच्याच अध्यक्षतेखालीं नेमण्यांत आली, आणि या जयकर-कमिटीचा अहवाल १९४२ सालीं प्रसिद्ध झाला. या महाराष्ट्र विद्यापीठाच्या संकल्पपूर्तीला अवास्तव विलंब लागला असल्यास, त्याबद्दलची योग्य ती मजबूत आणि त्वरेची संघटना न केल्याबद्दल महाराष्ट्रीयांनीं इतरांना किंवा सरकारला दोष न देतां, तो स्वतःचाच दोष असल्याची प्रांजल कबूली दिली पाहिजे. मुसलमानांनीं आपल्या युनिव्हर्सिटीची आपल्याला पाहिजे तशी संघटना त्वरेनें केली तशी ती महाराष्ट्रीयांना कां करितां येऊं नये? तरी पण यांच्या प्रयत्नांना आतां मूर्त स्वरूप येऊन लवकरच महाराष्ट्र युनिव्हर्सिटीची स्थापना होईल अशी आशा वाटूं लागली आहे.

साहित्याप्रमाणें कला व संगीत यांचाहि यांना लहानपणापासून अतिशय नाद आहे. अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीनें कला व संगीत यांचा अभ्यास करण्यासाठीं नियमितपणें खूप वेळ यांनीं खर्ची घातला आहे. पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांच्या गांधर्व महाविद्यालयातर्फे भरलेल्या एका संगीत परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें यांनीं केलेलें भाषण हा आधुनिक संगीत वाङ्मयांतील एक अविस्मरणीय आणि अमर असा भाग ठरेल. पुणें शहरीं भरलेल्या एका नाट्य परिषदेचे अध्यक्ष म्हणून यांनीं १९१८ सालीं केलेलें भाषणहि अत्यंत मनोवेधक तसेंच उद्बोधक आहे. मुंबईस स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे अध्यक्षतेखालीं भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष या नात्यानें १९३७-३८ सालीं यांनीं केलेलें मार्मिक भाषणहि याच सदरांत घालतां येईल.

मुंबईच्या आर्ट स्कूलमधील फ्रीहँड ड्रॉइंगच्या शिक्षणक्रमाबद्दल यांनीं केलेलें मार्मिक भाषण आणि नव्या दिल्लीतील सरकारी इमारतीवर कलाकुसरीचीं कामें हिंदी कलाकारांनाच देण्याबाबत यांनीं मध्यवर्ती असेंब्लीत केलेले

सतत प्रयत्न, यांच्या कलेविषयींच्या अभिजात हौसेची उत्कृष्ट साक्ष तर पुरवितातच, पण याहि क्षेत्रांत किती उत्तम प्रकारचा अभ्यास करून किती उच्च दर्जाचें ज्ञान यांनीं संपादन केलें आहे यावरहि प्रकाश टाकणारा आहे.

बालवयापासूनच राष्ट्रीय विचारांकडे ओढ असून चारित्र्य व शिस्त यांवर यांचा विशेष कटाक्ष आहे. बालवयांत यांनीं लिहिलेलीं पत्रें आणि केलेलीं भाषणें यांतून राष्ट्राभिमानी बाणा व्यक्त झालेला दिसतो. 'लाइफ ऑफ ॲन एनशंट ब्रह्मचारी' अगर 'एका प्राचीन ब्रह्मचाऱ्याचें जीवन' या विषयावर यांनीं १८९५ सालींच एक निबंध वाचला. त्यांत यांची चारित्र्य व शिस्त यांची आवड ठळक रीतीनें प्रतीत होते.

हिंदुधर्म आणि जगांतील तत्सदृश इतर धर्म यांचा यांनीं तरुणपणींच सखोल अभ्यास केला. १९०१ ते १९०३ पर्यंत सरस्वती मंदिरमध्यें यांनीं जे लेख मराठींतून प्रकाशित केले, त्यांतून यांचीं धर्मविषयक तुलनात्मक आणि खात्री व विश्वास पटविणारीं मतें स्पष्ट रीतीनें व्यक्त झालीं. विलायतेस वारंवार जाऊन आले तरी, यांच्या धार्मिक विचारांत फरक झाला नाहीं आणि यांचे विचार व आचार यांत सुसंगतीच राहिली.

राष्ट्रीय विचारांत देखील शिक्षणप्रचार आणि अध्ययन अध्यापनाची आवड यांमुळें तरुण-वरुणश्रेणींत यांनीं धडाडीची कामगिरी केल्याचे अनेक दाखले सांपडतात.

या क्षेत्रांत पुढें पुढें मिरविण्याचा यांचा स्वभाव नसला तरी, यांनीं बजावलेली भरीव कामगिरी उल्लेखण्यासारखी आहे. 'भांडारकर रिसर्च इन्स्टिट्यूट' या महत्त्वाच्या संस्थेला वेळोवेळीं मिळालेल्या उदार व भरीव मदतीच्या अनेक देणग्यांचे मागें यांचे प्रयत्न आहेत. तसेंच 'महाभारत'–संशोधनाचा ग्रंथ प्रकाशित करण्यासाठीं सरकारी देणग्या मिळविण्यांतहि यांचा बराचसा हात आहे. महाराष्ट्रांतील शिक्षण व संशोधन यांचा भावी इतिहास यांच्या उल्लेखावांचून पुराच होणार नाहीं.

शिक्षण-तज्ज्ञ म्हणून यांना तरुण वयापासूनच सर्वत्र मान्यता मिळाली. नागपूर, लखनौ, पाटणा, अन्नामलाई इत्यादि केंद्रीय युनिव्हर्सिटयांकडून पदवीदानसमारंभाचीं मुख्य भाषणें करण्याचीं निमंत्रणें यांना आलीं आणि यांनीं त्या त्या ठिकाणीं जीं भाषणें केलीं तीं शिक्षणक्षेत्रांत विद्यार्थी व प्राध्यापक या उभयतांनाहि महत्त्वाचें मार्ग-दर्शन करण्याइतकीं चिरस्थायी स्वरूपाचीं आहेत.

शिवाय अनेक कॉलेजांतून अनेक महत्त्वाच्या विषयांवर यांचीं विचार-प्रवर्तक भाषणें विद्यार्थ्यांकरितां झालीं आहेत. अनेक राजकीय परिषदांचे अध्यक्ष व मुख्य वक्ते म्हणूनहि यांनीं भाषणें केलीं आहेत. एका संस्थानी परिषदेचे व पोस्टमनांच्याहि परिषदेचे अध्यक्ष म्हणून यांनीं काम केलें आहे. या भाषणांतून यांचा सखोल अभ्यास व निरीक्षण यांचा प्रत्यय येतो. पोस्टल खात्यांतील कमी पगाराच्या नोकरांचे पगार वाढविण्याचे पुरस्कारासाठीं यांनीं आपल्या भाषणांत जो समर्पक व सखोल युक्तिवाद मांडला तो केवळ बिनतोड आहे.

विद्यार्थ्यांत यांनीं केलेलें कार्य विशेष उल्लेखनीय असून शिक्षकांपेक्षां विद्यार्थिवर्गानेंच यांना जास्त जवळ केल्याचे दाखले फार सांपडतात. विद्यार्थ्यांच्या अनेक सभांपुढें यांनीं भाषणें केलीं व विद्यार्थ्यांच्या अनेक परिषदांच्या अध्यक्षस्थानीं यांची योजना झाली. हैद्राबाद–सिंधमधील विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष म्हणून यांनीं केलेल्या कामगिरीचा या बाबतींत ठळक उल्लेख होण्यासारखा आहे.

१५ मे १९१७ रोजीं नाशिक येथील सामाजिक परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें ह्यांनीं आपलें पहिलें सार्वजनिक जाहीर भाषण केलें. त्या भाषणांत यांनीं व्यक्त केलेल्या कल्पना, प्रतिपादिलेले विचार आणि सुचविलेली संघटना, श्रोत्यांना फारच आवडली आणि त्याबद्दल यांचें सर्वत्र अभिनंदन झालें.

२६ जानेवारी १९१८ रोजीं लोणावळा येथें पुणें जिल्हा परिषदेचे अध्यक्षस्थानावरून यांनीं पहिलें राजकीय भाषण केलें. त्या वेळीं लो. टिळक यांनीं यांच्या कर्तबगारीची व गुणांची प्रशंसा केली.

१९१७ डिसेंबरमधील कलकत्त्याच्या काँग्रेसमध्यें यांनीं 'स्वराज्य' या विषयावर भाषण केलें. नंतर १९१८ सप्टेंबरमध्यें मुंबई शहरीं भरलेल्या काँग्रेसच्या खास अधिवेशनांतहि याच विषयाचा पुरस्कार यांनीं केला. १९२० च्या सप्टेंबरांत कलकत्त्यास भरलेल्या काँग्रेसच्या खास अधिवेशनांत, म. गांधींच्या असहकारितेच्या ठरावावरील एका उपसूचनेंतहि यांनीं स्वराज्याच्या याच उदात्त कल्पनेचा पुरस्कार केला. १९२५ च्या कानपूर काँग्रेसमध्यें हे 'प्रतियोगी सहकार' व 'बंगालच्या राजकीय कार्यकर्त्यांचा बंदिवास' या विषयांवर बोलले.

हे तरुणपणापासून कट्टे राष्ट्रवादी असून 'अत्यंत

निर्भय व स्पष्ट वक्ते मुत्सद्दी' अशी यांची ख्याति आहे. सुरवातीला असहकारितेच्या चळवळींत हे सामील झाले. पण नंतर असहकारितेच्या चळवळीवरील चौकशी कमिटीच्या रिपोर्टानंतर यांनीं आपला कायद्याचा व्यवसाय फिरून सुरू केला. १९२० सालीं गांधीजींनीं सुरू केलेल्या टिळक स्वराज्य फंडाला यांनीं पंचवीस हजार रु.ची देणगी दिली.

मुंबईच्या कायदे-मंडळांत हे स्वराज्य पक्षाचे पुढारी होते. त्या वेळीं यांनीं कायदे-मंडळांतील आपलीं पहिलीं अव्वल दर्जाचीं भाषणें केलीं. त्यांत 'सरकारवरील निंदाव्यंजक ठराव', 'अंदाजपत्रकी धोरण', 'लॉर्ड ऑलिव्हर यांची घोषणा' व 'मद्यपान बंदीचें सरकारी धोरण' या विषयांवरील यांचीं भाषणें उल्लेख करण्याइतकीं महत्त्वाचीं आहेत. माहिती, आंकडे व तपशील यांनीं खच्चून भरलेलीं, परंतु अत्यंत विचारप्रवर्तक अशीं अस्सल पार्लमेंट-पटु वक्त्याला शोभेशीं, हीं भाषणें झाल्याबद्दल यांचा सर्वत्र गौरव झाला. यांचीं भाषणें ऐकणें म्हणजे श्रोत्यांना एक वक्तृत्वाची मेजवानीच वाटे! (१९२५)

यानंतर यांनीं 'प्रतिसहकार पक्षाची' संघटना केली आणि मध्यवर्ती कायदे-मंडळांत हे निवडून आले. तेथें हे नॅशनॅलिस्ट पक्षाचे डेप्युटी लीडर म्हणून चमकले. सिमल्याच्या बैठकींत तर विरोधी पक्षाचे पुढारी म्हणूनहि हे गाजले. मध्यवर्ती कायदे-मंडळांतहि ह्यांनीं अनेक महत्त्वाच्या विषयांवर संस्मरणीय अशीं भाषणें केलीं. त्यांत 'आय. एम. एस. नोकऱ्यांचें हिंदीकरण', 'कार्यकारी मंडळावरील नामदार', 'सरकारच्या हिंदुस्थानविषयक धोरणांच्या घोषणेची मागणी', 'लाला लजपतराय यांच्या मृत्यूबाबतचा ठराव' इतक्या विषयांवरील भाषणें उल्लेखनीय आहेतच. पण त्याहिपेक्षां 'क्रिमिनल लॉ अमेंडमेंट', 'सुवर्ण परिमाण', 'अल्पवयी विवाहाबाबतचें शारदा बिल', हिंदुस्थानकरितां खास प्रिव्ही कौन्सिल, व 'ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी' या विषयांवरील यांचीं भाषणें फारच मुद्देसूद आणि प्रभावी होतीं. 'गेन्स ऑफ लर्निंग', 'ॲडॉप्शन व्हॅलिडेटिंग', 'अमेंडमेंट ऑफ स्पेशल मॅरेज ॲक्ट' इतक्या उत्कृष्ट कायद्यांची घडण घडविण्यांत यांचा मुख्य हात होता. याखेरीज 'अस्पृश्यता-निवारण' व 'देवदासी बिल' या दोन समाजोपकारी बिलांचा प्रस्तावहि यांनींच मध्यवर्ती कायदे-मंडळांत केला.

वरील मुदतींतच यांनीं राजकीय विषयांवर अन्यत्र केलेलीं भाषणेंहि अत्यंत मनोवेधक आहेत. त्यांतील मुद्दाम नमूद करण्यासारखीं भाषणें म्हणजे 'अकोला परिषदेच्या' अध्यक्षस्थानावरून केलेलें आणि ठाणा जिल्ह्यांतील शहापूर येथें केलेलें भाषण हीं होत. प्रतियोगी सहकार-पक्षाची संघटना व प्रचार करतांना कलकत्ता शहरीं १९२६ सालीं केलेलीं दोन भाषणें आणि पुण्यांतील किर्लोस्कर थिएटरमध्यें केलेलें भाषणहि संस्मरणीय आहे.

'शांतिदूत' म्हणून यांनीं आपल्या आयुष्यांत बजावलेली कामगिरीहि फार महत्त्वाची व सुदीर्घ परंपरेची आहे. साबरमतीचा करार आणि बारडोली सत्याग्रहाची तडजोड ह्यांनीं जमवून आणिली (१९२५–२६). अनेक संस्थासमारंभांचें अध्यक्षस्थान स्वीकारून अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर यांनीं एक हजारांवर भाषणें केलीं आहेत. समाजसेवेचीं मोठमोठीं कामें त्यांच्या प्रेरणेनें व सहकार्यानें झालीं असून हिंदी स्त्रियांच्या उन्नतीकरितां यांनीं केलेले कळकळीचे प्रयत्न तर सर्व-विश्रुत आहेत.

अनेक ब्रिटिश मुत्सद्यांशीं यांची दाट मैत्री आहे. पण कोणाहि ब्रिटिश मुत्सद्याचे आहारीं न जातां हे सर्वांवर वजन ठेवून आहेत. सर्व राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांना हे प्रिय असून मित्र व शत्रू अशा दोघांनाहि यांच्याविषयीं आदरभाव वाटतो.

तिन्हीहि 'गोलमेज परिषदांना' सदस्य या नात्यानें हे हजर होते. या परिषदांच्या एकंदर नऊ कमिट्यांपैकीं पांच कमिट्यांवर यांनीं काम केलें आहे. 'जॉइंट सिलेक्ट कमिटी'वरील सदस्य म्हणून हिंदी हितसंबंधांकरितां यांनीं आपल्या प्रयत्नाची पराकाष्ठा केली.

गांधी–आयर्विन करार घडवून आणण्याच्या दोन प्रस्थात शांतिदूतांत हे सर तेज बहादूर सप्रू यांच्या जोडीला होते. दुसऱ्या गोलमेज परिषदेला महात्मा गांधी गेले त्या वेळींहि यांनीं योग्य ते प्रयत्न केले. मरहूम मि. रॅम्से मॅकडोनाल्ड यांनीं कॉम्युनल ॲवार्डचा निर्णय दिला त्या वेळीं गांधीजींच्या संस्मरणीय उपोषणानंतर जो पुणें-करार झाला, त्यासाठींहि यांनीं महत्त्वाची खटपट केली.

सर्वांवर सारखें वजन ठेवून सर्वांच्या आदरास पात्र होणारे जे कांहीं हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच पुढारी देशांत आहेत अशा पुढाऱ्यांत यांना मानाचें स्थान आहे. यांच्यावर सर्वांचा सारखा विश्वासहि असल्यामुळें आजच्या आणीबाणीच्या काळांत देखील सर्व

पक्षांना एकत्र आणण्याच्या कामीं वापरतां येण्याजोगी एक शक्ति या नात्यानें ह्यांचा उपयोग होऊं शकेल.

यांचें असामान्य व्यक्तिमत्त्व आणि व्यापक वजन यांचें रहस्य यांच्या विशिष्ट निस्पृही वृत्तींत आहे. सरकारनें आतांपर्यंत यांना मोठमोठ्या हुद्याच्या जागा आणि K. C. S. I. सारख्या पदव्या देऊं केल्या, पण यांनीं साधा 'मिस्टर'च राहणें पत्करलें. यांच्या ह्या त्यागी वृत्तीचीं कारणेंहि उघड आहेत. संस्कृत व विद्याभ्यास यांची यांना बालवयापासून आवड. हिंदु संस्कृतीचे हे एक आदर्श प्रतीक आहेत. देशसेवेकरितां यांनीं आपला वेळ व शक्ति खर्ची घातल्याच, पण सल्लामसलत देऊन, द्रव्याची मदत करून आणि अनेक मार्गांनीं यांनीं अनेक होतकरू व्यक्तींना व उपयुक्त संस्थांना मोलाची मदत केली आहे. अशांपैकीं रामकृष्ण आश्रम, खार; नॅशनल मेडिकल कॉलेज, अनाथ महिलाश्रम-माटुंगा, आर्यन एज्युकेशन सोसायटी व मराठी ग्रंथ-संग्रहालय यांचा प्रामुख्यानें उल्लेख करितां येईल. आपल्या पाठारे प्रभु जातीच्याहि अनेक संस्थांना यांनीं उदार हस्तें मदत केली आहे. परंतु दाता या दृष्टीनें आकुंचित जातीय वृत्ति सोडून यांनीं सदैव सत्पात्रींच दान करण्यावर कटाक्ष ठेविला. अशा रीतीनें यांनीं दिलेल्या देणग्यांचा आंकडा सहज दोन लाख रुपयांवर जाईल !

१९१९ सालीं जालियनवाला बागेच्या अत्याचाराची चौकशी करणाऱ्या पंजाब कमिटीवरील आपल्या उत्कृष्ट कामगिरीनें हे फारच प्रकाशांत आले. यांनीं या अत्याचारांबाबत प्रसिद्ध केलेला अहवाल इतिहासांत अमरस्थान पटकावीलच. इंग्लंडांत १९४० सालीं ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीनें यांना D. C. L. ही उच्च पदवी देऊन यांच्या विद्वत्तेच्या लौकिकावर योग्य कळस चढविला आहे.

मागें म्हटल्याप्रमाणें बालवयापासूनच हे कट्टे राष्ट्रवादी आहेत. प्रथम हे 'होमरूलर' होते. नंतर काँग्रेसचे सदस्य असतांना काँग्रेस पक्षांतील स्वराज्य पक्षांत हे दाखल झाले. त्याचेंच कालमानाप्रमाणें रूपांतर प्रतिसहकार पक्षांत झालें. तरीहि हे कित्येक वर्षे काँग्रेसचे सभासद राहिले. नंतर स्वराज्य पक्षांतील बहुतेकांनीं नॅशनॅलिस्ट पक्ष काढला, त्यांत इतर सर्व पक्ष व नेमस्त यांचाहि अंतर्भाव करण्यांत आला होता. परंतु अखेर हे विलायतेस गोलमेज परिषदेंत काम करीत असतांना यांच्या मित्रांनीं यांना लोकशाही स्वराज्य पक्ष वेगळा काढून सोडलें व हे एकांडे शिलेदारच राहिले. देशहिताचा लढा लढण्यासाठीं मजबूत पक्ष-संघटना करण्याचे प्रयत्न यांनीं वारंवार केले, परंतु ते व्यर्थ गेले. ज्यांच्या ज्यांच्याविषयीं यांनीं मनांत आशेचे मनोरे बांधले असे यांचे बरेच मित्र व सहकारी यांचेपासून दूर झाले. याचीं कारणें त्यांचीं त्यांनाच माहीत. अखेर हे पक्षविरहित झाले. हे हिंदुमहासभावादी आहेत आणि त्या वेळीं पर्सिव्हल कमिटीपुढें यांनीं जी तडफदार साक्ष दिली तीमुळें मुसलमान व सरकार या दोघांनाहि जबर आश्चर्याचे धक्के बसले ! आज हे कोणत्याहि विशिष्ट पक्षांत नसले तरी वर एकदां म्हटल्याप्रमाणें सर्व पक्षांना हे आवडतात, सर्व पक्षांतील लोक यांना मान देतात, आणि सर्वांना यांचा दरारा हि वाटतो.

पक्ष-प्रचारासाठीं हे बाहेर पडत त्या वेळीं ज्या ज्या ठिकाणीं हे गेले तेथील लोकांनीं यांना डझनावारी मानपत्रें दिलीं आहेत. हे अत्यंत निर्भय स्पष्टवक्ते असले तरी प्रतिपक्षीय व त्यांचीं तत्त्वें यांविषयीं आदर ठेवून आणि सहिष्णुता वृत्तीनेंच यांचीं भाषणें होतात. खाजगी व राजकीय बाबींत योग्य तारतम्य राखण्याचें कौशल्य व सांस्कृतिक सौजन्य यांचे ठिकाणीं आहे. आणि यांतच लहानापासून मोठ्यापर्यंत, तसेंच शत्रुमित्रांतहि यांना आदराचें स्थान हें यांचें रहस्य आहे.

यांच्या निर्भय वृत्तीचें एकच उदाहरण नमूद करणें पुरेसें होईल. स्वराज्य पक्ष स्थापन झाला त्या वेळीं, महात्माजींच्याबरोबर हेच झगडले. आणि स्वराज्यपक्षांतून प्रतियोगी सहकार पक्ष निघाला, त्या वेळींहि यांना पं. मोतीलाल नेहरू यांचेशीं निकरानें झगडावें लागलें व त्यांतहि हे यशस्वी ठरले. मित्रांप्रमाणें शत्रूंना देखील यांचा सल्ला उपयोगी पडतो.

अनेक राजकीय परिषदा यशस्वी करण्यास यांचें सहकार्य कारणीभूत झालें आहे. देशांतील सर्व पक्षांची एकजूट करण्यावर यांचा नेहमीं कटाक्ष असतो. म. गांधींनीं उपवास केला तेव्हां त्यापासून त्यांना परावृत्त करण्यासाठीं किंवा त्यांचे हेतु साध्य व्हावे म्हणून, अनेकांना एकत्र जमवून परिषद भरविण्याचे कामीं यांचाच पुढाकार उपयोगी ठरला आहे.

हिंदु-मुसलमानांच्या ऐक्यासाठीं देखील यांनीं थोडे थोडके प्रयत्न केले नाहींत. पण बॅ. जिना व त्यांचे अनुयायी यांच्या दुराग्रही हटवादामुळें यांना त्यांत यश आलें नाहीं. या मुस्लीमलीगवाल्यांच्या दुराग्रही हटवादाला ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचीच कशी फूस

होती, हें पुढें इतिहासांत नमूद होईलच. गोल-मेज परिषदेंत आणि हिंदुस्थानांतील अनेक परिषदांत यांनीं याच दृष्टीनें पुष्कळ प्रयत्न केले. पण तेहि वरील कारणांमुळेंच व्यर्थ गेले. अनेक अपक्ष परिषदा व कमिट्यांच्या सभा भरविण्यामागें यांचा हात असून व्हाइसरॉयच्या कौन्सिलची हिंदीकरणाच्या दृष्टीनें दोनदां वाढ करविण्याचें बरेंचसें श्रेय यांनाच आहे. सरकारनें या बाबतींत यांच्या सर्व शिफारसी अंमलांत आणल्याच नाहींत, 'पण दोन्हींहि प्रसंगीं लोकपक्षानेंहि दिलें तें पदरांत पाडून घेण्याची तत्परता दाखविली असती तर, सध्यांपेक्षां हिंदी जनतेचा खचित जास्त फायदा झाला असता.' असें कांहीं तज्ज्ञांचें मत आहे.

देशाच्या औद्योगिक प्रगतीसाठींहि यांनीं कळकळीचे व महत्त्वाचे अनेक प्रयत्न केले आहेत. दिल्लीतील एक व पुण्यांतील एक अशा दोन्हीहि औद्योगिक प्रदर्शनांचें उद्घाटन यांचे हातूनच झालें. गोलमेज परिषदांतून हिंदुस्थानच्या व्यापारधंद्यासंबंधीं यांनीं केलेलीं भाषणें यांच्या देशी उद्योग-धंद्यांतील प्रगतीविषयींच्या कळकळीचे अमर असे पुरावेच होत. हिंदुस्थानांतील आणि विशेषतः महाराष्ट्रांतील औद्योगिक प्रगतीच्या अनेक प्रयत्नांना यांनीं आस्थेवाईकपणानें हातभार लावला. अनेक व्यक्तींना व संस्थांना प्रत्यक्ष भांडवलाची व अन्य स्वरूपाची मदत यांनीं देशी धंद्यांकरितां केली आहे. १९३५ सालीं यांनीं साताऱ्यास वेस्टर्न इंडिया लाइफ इ. कं. ची इमारत व श्री. चिरमुले यांच्या तसबिरीचा अनावरण-समारंभ केला त्या वेळीं व्यापार-धंद्यांतील मागासलेपणा बद्दल आपल्या भाषणांत यांनीं महाराष्ट्रीयांना दोष दिला; आणि त्या वेळींच १९२० सालीं म. गांधींनीं काढलेल्या टिळकस्वराज्य-फंडाच्या अव्यवस्थेवर टीका केली. त्या रकमेचा विधायक व प्रचारकार्यासाठीं व्हावा तसा उपयोग न होतां, निष्फळ उधळपट्टी झाली, असा यांच्या टीकेचा रोख होता.

बारकाईनें यांच्या जीवन-चरित्राचें निरीक्षण केल्यास हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या चळवळी व संघटना यांच्यामागें यांच्याच आत्मिक प्रेरणांचें सूत्र असल्याचें आढळून येतें. स्त्रियांचे कौटुंबिक व सामाजिक हक्क यांना हिंदुकायद्यांत योग्य स्थान प्राप्त करून देण्यासाठीं हे सतत झटले. नाशिक, मुंबई व कलकत्ता इत्यादि प्रमुख शहरांत यांनीं त्यासंबंधीं दिलेल्या व्याख्यानांमुळें स्त्रियांचे ठिकाणीं स्वतःच्या उन्नतीची जाणीव व जागृति फैलावली. स्त्रियांच्या उन्नतीचे प्रयत्नासाठीं मिळालेली एकहि संधि यांनीं वाया घालविली नाहीं. अस्पृशोद्धारासाठीं यांनीं केलेले प्रयत्नहि असेच कळकळीचे आहेत. दोन्हीहि क्षेत्रांत यांनीं केलेलें कार्य विस्मयजनक व कौतुकास्पद आहे.

सर्व कार्यांत यांचा भर स्वावलंबी प्रयत्नावर असतो. स्वाभिमानाला मारक असें कोणतेंहि कार्य हातीं घेऊं नये यावरहि यांचा तितकाच कटाक्ष आहे. या दृष्टीनें मद्रासेंतील एरोडें येथील यांचें भाषण मोठें मनोवेधक आणि मार्गदर्शक ठरेल. शारीरिक तंदुरुस्तीवरहि यांचा कटाक्ष असून, १९४३ सालीं जळगांव येथील शारीरिक शिक्षण-परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें यांनीं केलेलें भाषण यांच्या शारीरिक शिक्षणाच्या आवडीचें, सखोल विचारांचें आणि अभ्यासाचें द्योतक आहे.

अनेक लहानमोठ्या कमिट्यांचे हे सदस्य होते. तरी प्रत्येक सार्वजनिक कामांत यांना प्रसिद्धीचा स्वाभाविक तिटकारा आहे. अगदीं ताजें उदाहरण म्हणजे सप्रू कमिटीचा अहवाल होय. यांच्या बौद्धिक शक्तीचें तें एक अमर स्मारकच ठरणार आहे. हा एकच ग्रंथ आमूलाग्र काळजीपूर्वक कोणींहि अभ्यासिला तरी हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकारचें राज्य स्थापन झाल्यापासून आजतागायत घडलेल्या सर्व ऐतिहासिक व राजकीय घटनांचें ज्ञान त्याच्या पदरांत पडल्यावांचून राहणार नाहीं.

सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक कार्य करणाऱ्या शेंकडों संस्थांशीं, केवळ सदस्य म्हणून नव्हे तर, सल्लागार आणि द्रव्याच्या व इतर दृष्टीनें मदत देणारा जिव्हाळ्याचा मदतगार म्हणून यांचे संबंध आलेले आहेत. या सर्व विविध स्वरूपाच्या उपयुक्त संस्थांना हे उपकारक असें स्फूर्तिस्थान ठरले आहेत.

१९३७ ते १९४१ चे दरम्यान अत्यंत वरच्या श्रेणींतील न्यायाधिकाराच्या जागा यांना सरकारनें दिल्या व त्यांवरील आपले अधिकारहि यांनीं चालविले तरी त्याबद्दलच्या अहंकाराचा लवलेशहि यांचे ठिकाणीं नाहीं. देशोद्धार, हिंदु संस्कृतीच्या प्रचाराची कळकळ आणि इतरांच्या सद्गुणांविषयीं व सन्मताविषयींचा आदर या सर्व सद्गुणांसह लोकसेवा करण्याची हौस यांच्यांत अद्यापहि तरुणाप्रमाणें आहे. असा सर्वगुणसंपन्न अष्टपैलू हिरा हिंदुसमाजाला केवळ भाग्यानेंच लाभला आहे.

१९१७ सालापासून हिंदुस्थानांत अशी एकहि राजकीय चळवळ नसेल कीं, जिच्याशीं यांचा प्रत्यक्ष संबंध आला नाहीं. या कालापासून हे स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते

आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकर आणि मौ. हजरत मोहानी यांची बिनशर्त मुक्तता करण्यासंबंधींचा जो ठराव मुंबईला कायदेकौन्सिलच्यापुढें आला होता त्या ठरावाला मुख्य पाठिंबा यांचा होता. १९३७ सालीं वीर सावरकरांची सुटका झाली त्याचें श्रेय श्री. जम्नादास मेहेता यांना कांहीं लोक देतात व तेहि घेतात. पण यासंबंधींचा खरा इतिहास प्रसिद्ध झाला तर दिसेल कीं, या घटनेचें बरेंच श्रेय यांनाच आहे.

अनेक सामाजिक, राजकीय व अन्य क्षेत्रांत यांनीं जी विविध स्वरूपाची भरीव कामगिरी बजाविली तिच्या उल्लेखावांचून हिन्दुस्थानच्या आधुनिक इतिहासाची पूर्तताच होणार नाहीं. अशा पूर्ततेची भूमिका तयार करण्यासाठीं यांचीं भाषणें, लेख व पत्रव्यवहार यांचा जो अफाट संग्रह शेंकडों फायलींतून त्यांच्या कपाटांतून पडून आहे तो छापून प्रसिद्ध करण्याचा आग्रही लकडा जनतेनें यांच्या मागें लावला पाहिजे. कारण त्याच्या प्रकाशनामुळें केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर, हिन्दुस्थानच्या व्यापक अशा समकालीन राजकीय इतिहासावर, प्रकाश पडण्यासारखा आहे. शिवाय त्यामुळें ह्यांच्या यथार्थ जीवनकार्याचीहि ओळख जनतेला होईल. आणि यांचें जीवनकार्य व त्यांतील थोरवी यांविषयीं योग्य आदर बाळगण्यास जनता समर्थ होईल.

आजच्या तरुण पिढीला हे दुरावलेले वाटत असले तरी, सांस्कृतिक, लष्करी संघटनात्मक, शैक्षणिक व कायद्यासंबंधींच्या अनेक आधुनिक घटनांना यांची स्फूर्ति व प्रेरणा आजहि कारणीभूत झाली आहे. दक्षिणी संस्थानच्या समाईक हायकोर्टाचा प्रश्न हें या बाबतचें ताजें उदाहरण होय.

यांच्यासंबंधींचें हें प्रकाशन प्रसिद्ध होणें कां आवश्यक आहे, याचें आणखीहि एक महत्त्वाचें कारण आहे. ज्यांच्याशीं यांचे दाट संबंध आले आणि ज्यांच्याशीं यांनीं सहकार्य केलें, अशी जुनी पिढी आणि मधली पिढी आज दृष्टीआड होत असून अनेक कारणांमुळें आजच्या नव्या पिढीला यांची यथार्थ योग्यता आकलन झालेली नाहीं. याला जीं अनेक कारणें आहेत त्यांत निंदेची चिखलफेक हें एक प्रमुख कारण होय! आजची तरुण पिढी यांची योग्य कदर करीत नसली तरी यांचें ऋण देशावर आहे तसेंच देशाचें ऋण यांचेवरहि आहे. आणि तें ऋण फेडण्याचा प्रभावी आणि अखेरच्या मोलाचा मार्ग म्हणजे यांनीं स्वतःच्या संग्रहांतील हा आत्मचरित्रपर माहितीचा सागर जनतेला प्रकाशित करून उपलब्ध करून देणें होय.

यांच्या चरित्राचें खरें रहस्य थोडक्यांत सांगावयाचें झालें तर असें म्हणतां येईल कीं, आरंभीं लोकांस अप्रिय असणारीं कार्यें बुद्धिपुरस्सर हातांत घ्यावयाचीं व दीर्घ प्रयत्न करून आपल्या वक्तृत्वानें व अहर्निश प्रयत्नानें त्यांना लोकप्रिय करून दाखवायचें, व तसें झालें म्हणजे मग आपल्या सहकाऱ्यास प्रोत्साहन देऊन पुढें करावयाचें व आपण स्वतः गाजावाजा न करतां नम्रतेनें मागें राहावयाचें, हें यांचें स्वभाववैशिष्ट्य होय. आर्यन एज्युकेशन सोसायटीची शाळा, स्वराज्यपक्ष, प्रतिसहकारपक्ष, कायदेकौन्सिलांतील यांचें नेतृत्व, यांचें शांतिदूतत्व, गोल-मेजपरिषदेंतील प्रभावी कार्य, तसेंच अपक्षपरिषदेंतील कामगिरी, सप्रु कमिटीचा अहवाल व अगदीं अलिकडील कामगिरी म्हणजे महाराष्ट्र-विद्यापीठ ह्या सर्व गोष्टी ह्याच स्वभाववैशिष्ट्याची साक्ष देतील. हें यांचें रहस्य यांच्या अतिजवळच्या प्रेमळ स्नेह्यांसच माहीत असेल.

जयकर, रामचंद्र बाळकृष्ण—(जन्म स. १८२५-मृत्यु स. १८६६ जुलै ३१) प्रसिद्ध समाजसुधारक, मुंबईच्या परमहंस सभेचे पहिले व शेवटले अध्यक्ष.

ही परमहंस सभा रा. ब. दादोबा पांडुरंग यांनीं स्थापिली. या परमहंस सभेंत दादोबांनीं लिहिलेल्या प्रार्थना वाचण्यांत येत. परंतु दादोबा व 'प्रभाकर' पत्राचे चालक भाऊ महाजन हे सभेमध्यें प्रसिद्धपणें भाग घेत नसत, तर हे उघडपणें पुढाकार घेत असत, म्हणून यांची योजना अध्यक्षपदीं झाली असावी.

हे एकेश्वर मताचे असून जातिभेदाचे कट्टे दुष्मन होते. आपल्या आचरणांत देखील यांनीं कोणत्याहि प्रकारचे जातिनिर्बंध पाळले नाहींत व आपल्या मतांच्या प्रसारार्थ शक्य तितका प्रयत्न करण्यांत केव्हांहि कसूर केली नाहीं. स्त्रीशिक्षणाच्या बाबतींतहि यांचे विचार उदार व क्रियाशाली होते.

परमहंसमंडळ केवळ मुंबईपुरतेंच नव्हतें. त्याच्या शाखा पुणें, अहमदनगर, सातारा, बेळगांव, रत्नागिरी इत्यादि स्थळीं होत्या. एकंदर सभासद एक हजारपर्यंत असावेत असें स. १८८५ सालीं 'पोलिटिकल ऋषि' अशी सही करणारांनीं जाहीर केलें होतें. लोकांत या संस्थेची चर्चा बरीच चालू होती.

परमहंसमंडळांत सभासद करून घेतेवेळीं प्रत्येकास

प्रथम एक प्रार्थना वाचावयास सांगत, नंतर जातिभेद न मानण्याची तयारी झाली आहे असें पटवून देण्यासाठीं किरिस्तावानें तयार केलेला पावाचा एक तुकडा खावयास देत असत. वर्षांतून कांहीं वेळां सहभोजन होत असे. हें सर्व गुप्तपणें होत असे. नांवें उघडकीस येण्याबद्दल प्रत्येकजण भीत असे. नॉर्मल क्लासचे विद्यार्थी फणसवाडींत दुमेळ्याच्या चाळींत दुसऱ्या मजल्यावर राहत असत. हेच विद्यार्थी परीक्षा पास झाले म्हणजे शिक्षक म्हणून बाहेरगांवीं जात व तेथें या संस्थेच्या मताचा प्रचार-प्रसार करीत असत. उच्चनीच भेदामुळें आपलें कसें नुकसान होत आहे व जातिभेद घालविल्याशिवाय राष्ट्राची खरी उन्नति होणें अशक्य आहे, हें सर्वांना पटवून देण्यांत येई. स. १८६० पर्यंत ही मंडळी चालू होती. नंतर कोणी तरी सभासदांच्या नांवांचेंच पुस्तक लांबविलें व त्यामुळें सर्वांचें धाबें दणाणलें. आपआपल्या जातीकडून आपल्याला त्रास होणार असें ज्याला त्याला वाटूं लागलें. अशा प्रकारें ही संस्था मोडली.

यांपैकीं बाबा पदमनजी, कासमभाई ढालवाणी, शाहूराव कुकडे इत्यादि पुढें ख्रिस्ती झाले.

भिकोबादादा चव्हाण, त्यांचे बंधु सखाराम लक्ष्मण, लक्ष्मणशास्त्री हळबे, सखारामशास्त्री, बाळ भास्कर शिंत्रे, हे परमहंस मंडळींचे आस्थेवाईक प्रचारक असत. यांपैकीं शास्त्रीमंडळीखेरीज बाकीच्यांचा उत्साह शेवटपर्यंत कायम होता.

जयचंद्र, विद्यालंकार—(जन्म स. १८९८) हिंदुस्थानांतील प्रमुख इतिहासशास्त्रज्ञ, अभ्यासक व लेखक. यांचा राजकारण, समाजशास्त्र, पुरातत्त्व व भूगोल यांचा अभ्यास चांगला आहे.

हे गुरुकुल विश्वविद्यालय कांगडी (हरिद्वार) येथील विद्यालंकार आहेत. यांचा 'भारतीय इतिहास की रूपरेखा' या ग्रंथास हिंदीसाहित्यसंमेलनानें 'मंगलाप्रसादपारितोषिक' (रु. १२००) दिलें. यांच्या दुसऱ्या ग्रंथाचा नागरी प्रचारिणीसभेकडून गौरव झाला. यांनीं अनेक विद्यापीठांत इतिहासाचे प्राध्यापक म्हणून काम केलें. यांनीं 'भारतीय इतिहासपरिषद' स्थापण्यांत पुढाकार घेतला. या संस्थेतर्फे भारताचा इतिहास हिन्दी व इंग्रजी भाषांत वीस खंडांत लिहिला जात आहे. त्याचे दोन खंड प्रसिद्ध झाले आहेत. त्याच्या संपादकांत सर यदुनाथ सरकार, नीळकंठशास्त्री, प्रबोधचंद्र बागची, डॉ. राजेन्द्रप्रसाद, रा. ब. गो. स. सरदेसाई वगैरे लोक आहेत.

यांचे ग्रंथः—१ भारतीय इतिहास की रूपरेखा (२ खंड), २ भारतभूमि और उसके निवासी, ३ भारतीय वाङ्मय के अमरत्व, ४ इतिहासप्रवेश (भारतीय इतिहास का दिग्दर्शन), ५ जातीय शिक्षा.

जयतिलक, सर डॉन बॅरन—(जन्म स. १८६८-मृत्यु स. १९४२) सिलोनमधील सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते, ग्रंथकार व मंत्री.

विद्यालंकार ओरिएंटल कॉलेज केलनिया, वेस्ली कॉलेज कोलंबो व जीझस कॉलेज ऑक्सफर्ड, येथें आपलें विश्वविद्यालयीन शिक्षण संपवून हे बॅरिस्टर झाले.

१९२४ पासूनच सिलोन लेजिस्लेटिव्ह कौन्सिल व स्टेट कौन्सिलशीं यांचा घनिष्ठ संबंध असे. नंतर गृहमंत्री व स्टेट कौन्सिलचे पुढारी म्हणून यांची निवड झाली (१९३१). १९३८ सालीं रॉयल एशिअॅटिक सोसायटीचे अध्यक्ष म्हणून यांची जी निवड झाली, ती शेवटपर्यंत कायम होती.

'शरणंकर संघराज'चें यांनीं लिहिलेलें चरित्र सुप्रसिद्ध आहे. याचेचबरोबर सिंहली भाषेंत यांनीं संपादन केलेल्या अनेक ग्रंथांत सिंहली भाषेच्या शब्दकोशास विशेष महत्त्व आहे.

जयदेव शर्मा, विद्यालंकार—(जन्म स. १८९२ ऑगस्ट १८) चतुर्वेदांचें हिन्दींत भाषांतर करणारे आर्यसमाजी पंडित. हे वैदिक साहित्य, इतिहास, संस्कृत साहित्य, समाजशास्त्र, ज्योतिष, कर्मकाण्ड, प्राचीन समाज वगैरेचे अभ्यासक आहेत.

हे गुरुकुल विश्वविद्यालय कांगडी (हरिद्वार) चे विद्यालंकार आहेत. शिवाय हे मीमांसातीर्थ आहेत. यांनीं अनेक ठिकाणीं राहून ग्रंथांचें संशोधन व संपादन केलें. हे साधुवृत्तीचे, विद्याप्रेमी व चारित्र्यसंपन्न गृहस्थ आहेत.

यांचे ग्रंथ—१ चतुर्वेदांचें हिन्दी भाषांतर, २ जायसवाल जातिका इतिहास, ३ पुराणमतपर्यालोचन, ४ विधवाविवाह (बंगाली ईश्वरचंद्र विद्यासागरांच्या पुस्तकाचें हिंदी भाषान्तर), ५ मुद्राराक्षससमीक्षा (संस्कृत), ६ ईशोपनिषद (हिन्दी), ७ वात्स्यायन कामसूत्राविष्कार (हिन्दी) इत्यादि.

जयप्रकाश नारायण—(जन्म स. १९०३ सुमार) काँग्रेस सोशॅलिस्ट पक्षाचे सुप्रसिद्ध पुढारी व क्रांतिकारक राजकीय कार्यकर्ते.

बिहारमधील सरण तालुक्यांतील सिताब्दियारा हें गांव यांचें जन्मस्थान. लहानपणापासून उच्च शिक्षणाविषयीं मनांतून आकर्षण असल्यामुळें वयाच्या एकोणिसाव्या वर्षी हे अनेक प्रयत्नांनीं अमेरिकेला पोंचले (१९२२). सुट्टीच्या दिवशीं बारा बारा तास शेतांत काम करून पैसे मिळवून त्याचे आधारावर यांनीं आपलें शिक्षण पुरें केलें. याच वेळीं यांना आर्थिक विषमतेचे भयंकर परिणाम दृष्टीस पडले व शास्त्रीय विषयांवरील यांचें लक्ष उडून मार्क्सचे ग्रंथ वाचण्यांत यांनीं आपला सर्व काळ घालविण्यास सुरुवात केली. अशा तऱ्हेनें हे हिंदुस्थानांत समाजवादी विचारसरणी घेऊन परत आले (१९२९). यांनीं आल्याबरोबर अलाहाबादच्या स्वराज्यभवनांत पं. जवाहरलाल नेहरू यांची गांठ घेतली. त्यांनीं यांची ताबडतोब शेतकरी संघटनेच्या कार्यासाठीं नेमणूक केली. १९३० च्या कायदेभंगाच्या वेळीं काँग्रेसच्या चिटणिसांच्या गैरहजेरींत हे कांहीं काळ चिटणीसहि होते. परंतु सर्व जनतेनें एकदम उठाव केल्याशिवाय देशाला स्वातंत्र्य मिळणें अशक्य आहे, ही यांची समाजवादी विचारसरणी सारखी वाढत होती आणि यांच्या या विचारसरणीचें दृश्य फल म्हणजे नाशिक तुरुंगांत काँग्रेस सोशॅलिस्ट पक्षाच्या स्थापनेचें यांनीं केलेलें सूतोवाच (१९३२-३३) व पुढें त्या पक्षाची करण्यांत आलेली स्थापना होय. पुढें बनारस विद्यापीठाचे आचार्य नरेंद्रदेव यांच्या अध्यक्षतेखालीं पाटणा येथें काँग्रेस सोशॅलिस्ट पक्षाचें पहिलें अधिवेशन भरविण्यांत आलें.

यांच्या या संघटनेच्या प्रभावी कार्याची कल्पना दृश्य स्वरूपांत १९४२ च्या 'चलेजाव' चळवळीचे वेळीं यांच्या भूमिगत चळवळीमुळें पाहावयास मिळाली. सुरुवातीलाच सर्व पुढारी तुरुंगांत गेले असतां या चळवळीचें कार्य या पक्षामुळेंच कांहीं काळ पुढें चालू राहिलें.

अतिशय प्रसिद्धिपराङ्मुख अशी यांची ख्याति असल्यानें कोणास माहीतहि नसलेलें यांचें नांव देवळी तुरुंगांत पत्नीची भेट घेत असतां एक राजकीय पत्र देण्याच्या यांनीं केलेल्या प्रयत्नाच्या सरकारी पत्रकामुळें सर्वप्रसिद्ध झालें. आणि हजारीबाग तुरुंगांतून गुप्त होऊन ४२ च्या चळवळींत आघाडीवर चमकल्यानें तर यांचें नांव सर्वतोमुखीं झालें. नंतर यांना मोठ्या प्रयत्नानें पकडून लाहोरच्या किल्ल्यांत स्थानबद्ध करण्यांत आलें. यांच्या चळवळीची माहिती प्रथम १९४२ च्या चळवळीबद्दल सरकारनें काढलेल्या पत्रकावरून लोकांच्यापुढें आली.

'समाजवादच कां' हा यांचा समाजवादावरील ग्रंथ प्रसिद्ध आहे. 'मतांमध्यें जमीन-अस्मानाइतकें अंतर असूनहि यांनीं दाखविलेली धडाडी व यांची पक्षसंघटना यांमुळें मला यांचेबद्दल कौतुक वाटतें' हे गांधींनीं यांच्याबद्दल काढलेले उद्गार यांच्या कार्यपद्धतीची श्रेष्ठता पटवून देण्यास पुरेसे आहेत.

जयशंकरप्रसाद देवीप्रसाद—(जन्म स. १८८९–मृत्यु स. १९३७) हिन्दी भाषेंतील सुप्रसिद्ध कवि, नाटककार, कादंबरीकार, लघुकथालेखक व टीकाकार. हे 'प्रसाद' या नांवानें विशेष प्रसिद्ध आहेत.

यांचा जन्म काशी येथें 'सुंघनीसाहु' नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या प्रतिष्ठित, धनिक व उदार घराण्यांत झाला. यांच्या संस्कृत व हिन्दी शिक्षणाला घरींच सुरुवात झाली. नंतर आठव्या इयत्तेपर्यंत शिक्षण शाळेंत झालें. याच सुमारास यांचे वडील वारल्यामुळें यांचे वडील बंधु शंभुरत्नजी यांनीं यांचा इंग्रजी, उर्दू, फारशी वगैरेचा अभ्यास पुढें चालविला. पण तेहि वारल्यानें घरची जमिनदारी, कारखाने वगैरेंचा भार यांच्यावर पडला. तथापि कविता करण्याचा नाद यांना वयाच्या पंधराव्या वर्षापासून होता.

सोळाव्या वर्षी 'भारतेन्दु'मध्यें यांची कविता प्रथम प्रसिद्ध झाली. पुढें यांच्या प्रेरणेनें निघालेल्या 'इन्दु' मासिकांत यांचें काव्य, नाटक, लघुकथा, निबंध वगैरे वाङ्मय प्रसिद्ध होऊं लागलें.

यांना नवीन युगाचे प्रवर्तक व सर्वश्रेष्ठ कवि मानतात. यांनीं हिन्दींत भिन्नतुकान्त Blank Verse म्हणजे नियमक कविता करण्यास प्रथमच सुरुवात केली. तसेंच आधुनिक हिन्दींत छायावादाचें जनकत्व यांच्याकडे जातें. यांच्या कवितेंत भावनेस प्राधान्य असे. तसेंच हे हिन्दी भाषेंतील सर्वश्रेष्ठ नाटककार समजले जात. कथालेखनांतहि यांनीं नवीन पद्धति स्वीकारली. शिवाय यांचें संशोधनात्मक लिखाणहि महत्त्वाचें आहे. अशा यांच्या विविध क्षेत्रांतील महत्त्वपूर्ण कामगिरीमुळें हिन्दी

'रवीन्द्रनाथ' असा यांना गौरव प्राप्त झाला. यांच्या प्रभावी कार्यामुळें यांची परंपरा निर्माण झाली असून त्या परंपरेचे हे आचार्य आहेत.

यांचीं नाटकें:—१ स्कन्दगुप्त, २ अजातशत्रु, ३ चन्द्रगुप्त, ४ ध्रुवस्वामिनी, ५ विशाख, ६ कामना, ७ जनमेजयका नागयज्ञ, ८ राज्यश्री, ९ एकघूँट; उपन्यास: १० कंकाल, ११ तितली, १२ इरावती; कविता: १३ कामायनी, १४ आंसू, १५ लहर, १६ झरना, १७ महाराणा का महत्त्व, १८ प्रेमपथिक, १९ करुणालय, २० काननकुसुम; कहानीसंग्रह: २१ आकाशदीप, २२ इन्द्रजाल, २३ प्रतिध्वनि, २४ आंधी, २५ छाया; विविधविषय: २६ काव्य और कला तथा अन्य निबंध, २७ चित्राधार इ. (क. कौ. २. ५०६-८ व यांच्या आंसू काव्याच्या प्रस्तावनेवरून).

जव्हेरी, दिवाणबहादूर कृष्णलाल मोहनलाल—(जन्म स. १८६८) गुजराथी साहित्यभक्त, गुजराथी साहित्याचा इंग्रजींत इतिहास लिहिणारे, संशोधक, सार्वजनिक कार्यकर्ते व मुंबई हायकोर्टातील न्यायमूर्ति.

हे भडोचचे मोढवाणी. सुरत येथें गुजराथीचें शिक्षण झाल्यावर थोडे दिवस भडोच येथें व पुढें भावनगरच्या हायस्कुलांत शिक्षण झालें. तेथें यांचे वडील बंधु मोतीलाल शिक्षक होते. तेथें हे बी. ए. झाले (१८८८). भावनगरच्या सामलदास कॉलेजमध्यें एम्. ए. चे वर्ग नसल्यानें हे त्याकरितां मुंबईस आले व एल्फिन्स्टन कॉलेजांतून एम्. ए. झाले. तेथें फारसीचे अध्यापक म्हणून यांनीं काम केलें व हे एल्एल्. बी. झाले.

१८९३-१९०५ पर्यंत यांनीं हायकोर्टांत वकिली केली. नंतर स्मॉलकॉज जज्ज व पुढें हायकोर्ट जज झाले. तेथून हे १९२८ सालीं निवृत्त झाले. त्याच सालीं यांना दिवाणबहादूर पदवी मिळाली.

गुजराथमधील शिक्षणाशीं यांच्या घराण्याचा यांचे आजे रणछोडदास यांच्यापासून संबंध होता. त्यांना तिकडे 'शिक्षणाचे जनक' असें लोक संबोधीत. यांचे वडील मोहनलाल 'होप वाचनमाला कमेटी'चे सभासद होते. ते डेप्युटी असल्यानें सुरत जिल्ह्यांतील खेड्यांत आजहि शाळा तपासावयाला येणाऱ्या डेप्युटीला 'मोहनलाल' म्हणून संबोधितात. यांनींहि ती परंपरा पुढें चालविली.

१८९३-१९०५ पर्यंत हे मुंबई विश्वविद्यालयांत फारसीचे परीक्षक होते. मुंबई विश्वविद्यालयांत परीक्षक, सभासद वगैरे अनेक नात्यांनीं यांचा १९२४ पर्यंत सतत संबंध असे. शाळाखात्याच्या बुकमेटीवर हे असत. 'मॉडर्न रिव्ह्यू'तील गुजराथी पुस्तकांचें समालोचन यांचें असे. तसेंच मुंबईस भरलेल्या गुजराथी साहित्यपरिषदेचे स्वागताध्यक्ष हे होते (१९२६).

याशिवाय अनेक संस्थांशीं यांचा निकटचा संबंध असे. यांना फारसी, उर्दू, बंगाली व मराठी याहि भाषा चांगल्या येत.

जुन्या फारसी सनदा व हस्तलिखितें शोधण्याचा व वाचण्याचा यांना नाद असे. त्यावर यांनीं अनेक लेख लिहिले आहेत. वैष्णवसंप्रदायांतील श्रीनाथजीमहाराजांना अकबर व शहाजहान बादशहांकडून मिळालेल्या सनदांचें गुजराथी व इंग्रजी भाषान्तर करून पुस्तकरूपानें यांनीं प्रसिद्ध केलें. फोर्ब्स गुजराथी सभेच्या त्रैमासिक व इतर अनेक नियतकालिकांनीं यांच्या पंचाहत्तरीनिमित्त विशेष अंक काढले होते.

यांचे ग्रंथ—गुजराथी-१ हैदरअली अने टिपु सुलतान (१८९४), २ दयाराम अने हाफेझ (१८९५), ३ औरंगजेब अने रजपूतो (१८९६), ४ मोहसीनीना नीतिवचनो (१८९७), ५ कृष्णचरित्र (१९०८), ६ गुजराथी साहित्यना मार्गसूचक स्तंभो (भाग १-२, १९२७-३०).

फारसी-इंग्रजी:—(1) Persian Prosody with Figures of Speech (1890), इंग्रजी—(2) Translation into English of Saadis Tayyabat, (3) Outlines of Essays for Higher Standards of High Schools (1892), (4) Translation into English of the Gazals of Hafez (1892), (5) Introduction to the Anware Sohaili (1892), (6) Notes on the Akhlake Mohasini, (7) Shivaji or the Dawn of Maratha Empire (1898), (8) Further Milestones in Gujerathi Literature (1924), (9) Imperial Farmans (1929).

जहांगिर, सर कांवसजी—(जन्म स. १८७९) पारशी समाजांतील सुप्रसिद्ध कार्यकर्ते व व्यापारी.

मुंबईचें सेंट झेवियर कॉलेज व केम्ब्रिजच्या सेंट जॉन्स कॉलेजमध्यें शिक्षण संपवून यांनीं व्यापारांत लक्ष

घातलें. कांवसजी जहांगिर अँड को. लि. या सुप्रसिद्ध व्यापारी संस्थेचे हे प्रमुख संस्थापक आहेत.

परंतु यापेक्षांहि सार्वजनिक कार्यकर्ते या नात्यानें मुंबई कॉर्पोरेशन (सभासद १९०४-२१, अध्यक्ष १९१९-२०), लेजिस्लेटिव्ह असेंब्ली (सभासद १९३३, एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सभासद १९२१-२२, १९२३-२८) वगैरे ठिकाणीं यांचे संबंध अतिशय दृढ आहेत.

राउंड टेबल कॉन्फरन्स (१९३०, ३१, ३२), लंडन मॉनेटरी अँड इकॉनॉमिक कॉन्फरन्स (१९३३), एम्पायर पार्लमेंटरी कॉन्फरन्स, लंडन (१९३५), कॉरोनेशन, लंडन (१९३७) वगैरे अधिवेशनांना हे हिन्दी व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून हजर होते.

जाधव, नामदेवराव—(जन्म स. १९२१) व्हिक्टोरिया-क्रॉस मिळविणारे सुप्रसिद्ध शिपाई.

हे नगर जिल्ह्यांतील निमज गांवीं गरीब कुटुंबांत जन्मास आले. यांच्या वडील भावामुळें हे पक्के हरिभक्त होते. भरलेल्या नदींतून पोहून जाऊनहि हे आपल्या देवाची पूजा करीत. शेजारच्या साखरेच्या कारखान्यांत नोकरी करीत असतां हे आपल्या सहकाऱ्याच्या सल्ल्यानें ५ व्या मराठा लघु पायदळांत सामील झाले. शिक्षण घेतांना हे संकेतविभागांत विशेष निष्णात ठरले. पुढें यांनीं प्रत्यक्ष रणक्षेत्रांत जाण्याच्या इच्छेनें इटलीकडे जाणाऱ्या सैन्यांत आपलें नांव नोंदविलें. इटलीच्या रणांगणावर सेनियो नदी ओलांडण्याच्या प्रसंगीं यांनीं 'न भूतो' शौर्य दाखविल्याबद्दल यांस सध्यांच्या काळांत सर्वश्रेष्ठ असणारा मान—व्हिक्टोरिया-क्रॉस देण्यांत आला.

जाधव, भास्करराव विठोजीराव—(जन्म स. १८६७ जून १७) ब्राह्मणेतर समाजाचे सुप्रसिद्ध पुढारी व विचारांना चालना देणारे समाजसुधारक.

यांचा जन्म नागांव (ता. अलिबाग, जि. कुलाबा) येथें झाला. प्राथमिक शिक्षण महाड येथें व इंग्रजी शिक्षण मुंबईस एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें झालें. मॅट्रिकमध्यें मुंबई युनिव्हर्सिटींत यांचा पहिला नंबर आला (१८८८). विल्सन व एल्फिन्स्टन कॉलेजांतून हे बी. ए. (फर्स्टक्लास १८९२), एम्. ए. (१८९५). व एल्एल्. बी. झाले (१८९७).

कोल्हापूर दरबारांत यांनीं सर्व खात्यांत व स्पेशल ड्युटीचीं कामें केलीं. निवृत्त होतांना हे सरसुभे पदावर होते (जून १८९५–जाने. १९२२).

नोकरी करीत असतां कै. श्री. शाहूछत्रपतींच्या कृपेनें सर्व प्रकारच्या शिक्षणविषयक, सामाजिक व धार्मिक चळवळींत भाग घेण्याची संधि यांना मिळाली. कोल्हापूरची वेदोक्त चळवळ, मराठा शिक्षणपरिषदेची स्थापना, सत्यशोधक चळवळीचें पुनरुज्जीवन व परिषदा भरविणें यांत यांनीं भाग घेतला. स. १९१७ पासून ब्राह्मणेतर चळवळीस प्रारंभ झाला, तींत यांनीं आघाडीस काम केलें. स. १९१९ सालीं इंग्लंडला जाऊन इंडिया बिलावरील सिलेक्ट कमिटीपुढें साक्ष देऊन यांनीं मराठ्यांकरितां राखीव जागा मागितल्या.

स. १९२२ चे सुरुवातीस पेन्शन घेतल्यावर मुंबई-सरकारनें यांना कायदेकौन्सिलचे मेंबर नेमलें. साताऱ्यास राहून सातारा जिल्ह्यातर्फे यांची मुंबईच्या कायदे-कौन्सिलांत निवडणूक झाली (१९२३). तेव्हांच तेथें ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना होऊन यांना त्या पक्षाचें पुढारी-पण मिळालें. त्याच वर्षाचे अखेरीस शिक्षण, मेडिकल व रिलीफ वगैरे खात्यांचे हे मिनिस्टर झाले. स. १९२६ सालच्या निवडणुकींत यश मिळालें, पण पक्षांत फूट पडल्यानें यांना मिनिस्टरी मिळाली नाहीं. स. १९२८ ऑक्टोबरमध्यें शेतकी खात्याचे हे मिनिस्टर झाले.

इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या स्थापनेंत यांनीं भाग घेतला. १९४० च्या कौन्सिलच्या निवडणुकीस उभें न राहतां सेंट्रल लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत निवडून आले. सदर सालीं राउंड टेबल कॉन्फरन्सवर हजर राहण्याचें निमंत्रण यांनीं स्वीकारलें. १९३१ सालींहि हे त्या कॉन्फरन्सला गेले. तेथें मिलिटरी कमेटीवर यांनीं काम केलें. १९३४ पर्यंत असेंब्लींत काम करीत असतां यांना अनेक कमिट्यांवर नेमणूक होऊन काम करण्याची संधि मिळाली. १९३५ च्या कायद्या-प्रमाणें अस्तित्वांत आलेल्या पण बहुमताचा पाठिंबा नसलेल्या कूपर मंत्रिमंडळांत हे होते.

यानंतर यांनीं व्यापारांत लक्ष घातलें. वॉर्डन इन्शु-रन्स कंपनीच्या स्थापनेंत भाग घेऊन त्या कंपनींत चेअर-मनचें काम यांनीं केलें. रिझर्व बँकेच्या मुंबई शाखेवर डायरेक्टर म्हणून यांची नेमणूक झाली. इंटरनॅशनल बँक स्थापन झाली तेव्हां आरंभीं तिच्या चेअरमनचें काम यांनीं केलें. बाँबे प्रॉव्हिन्शिअल बँकेच्या डायरेक्टरचें कामहि यांनीं सतत १० वर्षे केलें. बाँबे को ऑपरेटिव्ह

इन्शुरन्स कंपनीच्या डायरेक्टरचें कामहि पांच वर्षे केलें. १९४५ च्या जानेवारीपासून कोल्हापूर येथील रीजन्सी कौन्सिलमध्यें रेव्हेन्यु मिनिस्टरचें कामहि हे करीत आहेत.

बाँबे प्रॉव्हिन्शिअल बॉर कमेटी, प्रॉव्हिन्शिअल रूरल डेव्हलपमेंट बोर्ड व प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह सुपरव्हिजन बोर्डाचें काम यांनीं केलें आहे.

यांनीं मराठींतून धार्मिक, सामाजिक वगैरे विषयांवर अनेक चर्चात्मक व संशोधनात्मक लेख लिहिले आहेत. विशेषतः प्रचलित रूढ विचारांना धक्के देऊन विचारप्रवृत्त करण्याकडे यांच्या लेखन-भाषणाचा विशेष कल असतो.

यांचा ग्रंथ-मराठे व त्यांची भाषा.

जायसवाल, डॉ. काशीप्रसाद—(जन्म स. १८७१–मृत्यु स. १९३१) बिहार प्रांतांतील सुप्रसिद्ध प्राच्यविद्यासंशोधक.

बिहार प्रांतांतील झालडा हें गांव यांचें जन्मस्थान. अलाहाबाद युनिव्हर्सिटींतून एम्. ए. डिग्री घेऊन हे उच्च शिक्षणाकरितां ऑक्सफर्डला रवाना झाले (१९०६). तेथें यांनीं जीझस कॉलेजमध्यें आपलें नांव दाखल केलें व इतिहास हा ऐच्छिक विषय घेऊन हे एम्. ए. झाले (१९०९). त्याच्या आधींच्या वर्षी चिनी भाषेवरील यांच्या प्रभुत्वाबद्दल यांना डेव्हीस शिष्यवृत्तीचा लाभ झाला होता. यानंतर लिंकन्स इन्मधून बॅरिस्टर होऊन हे हिंदुस्थानला परतले.

युरोपमध्यें लाला हरदयाळ वगैरे लोकांमधील यांच्या मैत्रीमुळें अलाहाबाद हायकोर्टानें यांना वकिलीची सनद देण्याचें नाकारलें. तेव्हां यांनीं कलकत्ता येथें वकिली करण्यास सुरुवात केली. १९१६ त पाटणा येथें हायकोर्टाची स्थापना झाल्यानंतर यांनीं आपला मुक्काम पाटण्याला हलविला व अखेरपर्यंत हे तेथेंच असत.

कलकत्ता व पाटणा या दोन्ही ठिकाणीं इन्कमटॅक्स व हिंदु लॉवरील यांची प्रॅक्टिस जरी पुष्कळ असे तरी प्राचीन इतिहास व राज्यघटना यांचे संशोधनांतच हे आपला बराचसा वेळ खर्च करीत.

यांच्या सर्व ग्रंथांपैकीं 'Hindu Polity' (१९२४) हा प्राचीन हिंदुस्थानच्या राज्यघटनेचा इतिहास सर्वांत महत्त्वाचा आहे. बुद्धधर्मोपदेशक-संघटनेच्या यांच्या ज्ञानामुळें 'राजकीय संघ' वगैरे शब्दांचा जास्त मुद्देसूद अर्थ लावणें यांना शक्य झालें. गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचे सभासद असतांना शंकरन् नायर यांनीं एक टिप्पणी प्रसिद्ध केली. हिंदुस्थानच्या लांबलचक इतिहासांत फ्री गव्हर्नमेंटची पद्धत कोठेंच आढळत नाहीं आणि त्यामुळें अशा तऱ्हेच्या कारभारासंबंधीं हिंदी लोक पूर्वी व सध्यांसुद्धां लायक नाहींत, ह्या सरकारी मुद्याचें खंडन करणें हा त्या टिप्पणीचा प्रमुख हेतु होता. या मुद्द्यांना योग्य आधार त्यांना पुरवितांनाच यांना या पुस्तकाची कल्पना सुचली व पुढें Hindu Polity नांवानें तें यांनीं प्रसिद्धहि केलें. या पुस्तकांत बिहारमध्यें भरभराटीस आलेल्या ऐतिहासिक लोकशाह्यांची माहितीहि देण्यांत आली. अशा तऱ्हेनें तत्कालीन राजकीय व कायमचें ऐतिहासिक महत्त्व आसणारा यांचा हा ग्रंथ आहे.

यांच्या या इतिहासाच्या राजकारणीकरणाच आणखी एक प्रमुख उदाहरण म्हणजे चंदेश्वराच्या राजनीतिरत्नाकराची (C. A. D. १३००-२५) यांनीं प्रसिद्ध केलेली मूळ प्रत होय. परकीयांना नागरिकांचे हक्क देऊं करण्याचे बाबतींत हिंदुस्थानचे राजेच पुढें होते असा सिद्धान्त यांनीं वरच्या व या ग्रंथांत सिद्ध केला.

प्राचीन हिंदु कायद्याचा इतिहास व त्याचा मोठेपणा हाच यांच्या टागोर लॉ-लेक्चर्सचा प्रमुख विषय होता (१९१७). परंतु यापेक्षां प्राचीन हिंदी इतिहासावरील यांचें कार्य अधिक महत्त्वाचें आहे. History of India (स. १५०–३५०) व An Imperial History of India हे यांचे प्राचीन इतिहासावरील प्रमुख ग्रंथ होत.

पहिल्या ग्रंथांत व्हिन्सेंट स्मिथनें अज्ञात म्हणून ठरविलेल्या कालाचा संगतवार इतिहास यांनीं प्रथमच सप्रमाण पुढें मांडला आहे. तर दुसरा ग्रंथ हा हिंदी इतिहासावरील बुद्धधर्मीय संस्कृत ग्रंथांवरील यांची टीका आहे. हा संस्कृतग्रंथहि अकराव्या शतकांत करण्यांत आलेल्या त्याच्या तिबेटीयन भाषांतरांशीं ताडून यांनीं प्रसिद्ध केला.

परंतु यापेक्षांहि ओरिसामधील भुवनेश्वराजवळील हाथीगुंफेचे लांबलचक शिलालेख वाचण्यांत यांचें कौशल्य व्यक्त झालें. अशोकाच्या सुप्रसिद्ध शिलालेखांच्या खालोखाल या शिलालेखाचें महत्त्व आहे. ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकांतील इतिहासावर एक मोठा प्रकाश-झोत टाकण्याचें सामर्थ्य या लेखांत आहे.

अशा तऱ्हेनें महत्त्वपूर्ण काम केल्यानंतर मानसन्मानांचा वर्षाव यांचेवर झाला असल्यास नवल नाहीं. लंडनच्या रॉयल एशियॅटिक सोसायटीनें यांना मौर्यांच्या नाण्यावर व्याख्यान देण्यास बोलाविलें; बडोद्याच्या ऑल इंडिया

ओरिएन्टल कॉन्फरन्सनें यांना आपले अध्यक्ष केलें (१९३३). गायकवाड सुवर्ण-महोत्सवाचीं व्याख्यानें देण्याची संधिहि यांना देण्यांत आली.

हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत काम करणारे संशोधक आतांपर्यंत कांहीं थोडे झालेले नाहींत. परंतु एक स्वतंत्र राष्ट्रीय दृष्टि पुढें ठेवून तिचे अनुरोधानें काम करणारे यांच्यासारखे इतिहाससंशोधक खरोखरच फार थोडे आहेत.

जालवणकर, श्रीनारायणमहाराज— (जन्म स. १८०६-वैकुण्ठवास स. १८६८) एक महाराष्ट्रीय सत्पुरुष. देशस्थ ब्राह्मण. यांचे वडील नामांकित पुराणिक होते. त्यांना तात्या म्हणत. यांचा अल्पवयांत विवाह झाला. तेव्हां हे पळून मथुरेस गेले व तेथें गोवर्धनबाबा नांवाच्या हटयोग्याजवळ राहिले. तेथून ग्रामस्थांबरोबर परत आले. तेव्हां यांचा एक पुत्र व पत्नी लवकरच निवर्तली. पुढें हे गिरनारपर्वतावर दत्ताची आराधना करण्याकरितां गेले व तेथें चवदा दिवस उपवास केला. पुढें वैराग्यानें कडेलोट करून घेतला तेव्हां श्रीदत्तानें मलंगवेषांत येऊन यांचें संरक्षण केलें. रत्नागिरीकडे नारायणभट देवरुखे यांस यांनीं दीक्षा दिली. नारायणभट-राधाकृष्ण तोरणे-शंकर व्यंकटेश टाकी-रामचंद्र शंकर अशी यांची शिष्य परंपरा आहे.

यांच्या ग्रंथांचा प्रचार बराच झालेला आहे आणि ते सर्व छापलेले आहेत. तसेंच त्यांचा संचारहि भरतखंडभर असे. सद्भक्ति-प्रकाश मासिकांत यांचीं अठ्ठावीस पत्रें छापलेलीं आहेत. यांशिवाय यांचीं शेंकडों पत्रें असावींत. पण पुढें यांनीं पत्रें लिहिणें सोडलेलें दिसतें.

हजारों लोकांना यांनीं मंत्रानुग्रहादि देऊन पावन केलें. हें करतांना यांनीं ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्त्रीपुरुष, श्रीमंतगरीब वगैरे भेद केला नाहीं. भाविक दिसला कीं, त्याला यांनीं आश्रय दिलाच म्हणून समजावें. अध्यात्म रामायण, भागवत, गीता वगैरे ग्रंथांवर हे पुराणें सांगत आणि तीं वक्तृत्वपूर्ण असत. हीं निरूपणें ऐकून पुष्कळ लोक यांना शरण येत. अशा लोकांस हे बोधसागरादि ग्रंथ समजावून देत. यांच्या शिष्यांत रघुनाथ भाऊ दिघे, बाळभंट डेकणे व गं. भा. नानीबाई असे कांहीं परमकृतार्थ शिष्य झाले. व्यासाचार्य प्रभृति कांहीं पुरुष स्वयंकृतार्थ झाले. यांना प्रवचनाधिकारहि मिळाले होते. पण केवळ प्रवचननैपुण्यानें परंपरा चालवितां येत नाहीं, म्हणून शेवटीं यांना निराश होऊन स्वस्थ बसावें लागलें.

यांचे ग्रंथः—१ बोधसागर, २ कैवल्यसागर (स. १८९८), ३ ज्ञानसागर (स. १८८५), ४ विज्ञानसागर ५ आनंदसागर, ६ शांतिसागर (स. १८९०), ७ करुणासागर (पूर्वार्ध व उत्तरार्ध), ८ समाधितत्त्वोपदेश (प्रकरणें तीन), शिवाय किरकोळ पदें, धांवे, अभंग, बोधाष्टक, चिद्रत्नमाला, विचारमाला वगैरे.

जांभेकर, बाळ (शास्त्री) गंगाधर—(जन्म स. १८१०-मृत्यु स. १८४६) मराठींतील पहिले वर्तमानपत्रकार, अनेक भाषाभिज्ञ, अभ्यासक, लेखक, समाजसुधारक व संशोधक.

यांचा जन्म राजापूर तालुक्यांत पोंबर्ले या गांवीं झाला. यांचे वडील चांगले व्युत्पन्न भिक्षुक असत. त्यांनीं यांना चांगली काव्यव्युत्पत्ति करून दिली. हे बापू छत्रे यांचे तालमींत तयार झाले. दुपारीं इंग्रजी शिकून संध्याकाळीं बापुशास्त्री शुक्ल यांचेपाशीं कौमुदी शिकत.

यांनीं दोन गोऱ्यांची रस्त्यांतील मारामारी एकदां पाहिली. त्याकरितां कोर्टांत यांना साक्षीस बोलाविलें असतां इंग्रजी येत नसतांहि यांनीं त्यांचा इंग्रजी संवाद बरोबर सांगितला, अशी यांच्या बुद्धिमत्तेची गोष्ट दादोबा पांडुरंग आपल्या आत्मचरित्रांत देतात.

हे प्रो. अर्लिबार यांचेपाशीं गणित शिकले. स. १८२८ मध्यें यांचा विद्याभ्यास पुरा झाला व हे एल्फिन्स्टन विद्यालयांत अर्लिबार यांचे असिस्टंट म्हणून गणित शिकविण्याचें काम करूं लागले. पुढें हे १८३२ च्या सुमारास अक्कलकोटच्या दोघा धाकट्या राजांस इंग्रजी शिकविण्यास १॥ वर्षें होते. एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्यें आध्यापक (१८३४), एज्युकेशनल इन्स्पेक्टर (१८४२-४४) व नॉर्मल स्कूल इत्यादि ठिकाणींहि यांनीं कामें केलीं. विद्यार्थ्यांना हे तारे व त्यांचें अंतर समजावून देत. एकदां हे प्राचीन शिला-लेखाचा शोध लावण्याकरितां कनकेश्वरीं गेले असतां उष्णता लागून ताप आला व त्या दुखण्यांत यांचा अन्त झाला.

यांनीं भाऊ महाजनांच्या सहकार्यानें 'दर्पण' नांवाचें इंग्रजी-मराठी साप्ताहिक वर्तमानपत्र काढलें (१८३२). त्यांत हे इंग्रजी विभागांत लिहीत. त्यामुळें यांना जे. पी. करण्यांत आलें.

'दिग्दर्शन' नांवाचें एक भारदस्त व प्रौढ मासिकहि यांनीं चालविलें होतें (प्रारंभ १८४०). त्यांत यांचा शास्त्रीय लेख लिहिण्यावर भर होता. पण हें लोकाश्रयाच्या अभावीं कांहीं वर्षांनीं बंद करावें लागलें.

ग्रहणाविषयीं खरी वस्तुस्थिति व्याख्यानांत वर्णन केल्यानें आणि श्रीपाद शेषाद्रि नांवाचे ख्रिस्ती झालेल्या ब्राह्मणास शुद्ध करून घेतल्यानें यांना वाळीत पडावें लागलें.

यांचें वाङ्मय–१ विद्येचे उद्देश, लाभ व संतोष (भाषान्तर), २ बालव्याकरण, ३ नीतिकथा, ४ सार-संग्रह (भाषान्तर), ५ हिंदुस्थानचा इतिहास, पहिली आवृत्ति (१८४२), ६ रॉयल एशियाटिक सोसायटी व जिऑग्राफिकल सोसायटीपुढें वाचलेले इंग्रजी निबंध (शिलालेख व ताम्रपत्र यांवर), ७ उपदेशचंद्रिका मासिकांतील लेख (१८४४ सुमार), ८ संध्येचें भाषान्तर, ९ इंग्लंडचा इतिहास (गोल्डस्मिथच्या इंग्रजी ग्रंथाचें भाषान्तर), १० हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याचा इतिहास, ११ शून्यलब्धि गणित, १२ हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास (मुसलमानी अंमल).

जिनराजदास सी.—(जन्म स. १८७५) थिऑसॉफिकल सोसायटीचे जगप्रसिद्ध बौद्धधर्मीय कार्यकर्ते, अध्यक्ष, ग्रंथकार व वक्ते.

यांचा जन्म सिलोनमध्यें झाला. कर्नल ऑल्कॉट यांनीं सीलोनमध्यें शाळा काढून त्याचे इन्स्पेक्टर म्हणून मि. लेडबीटर यांना सीलोनला पाठविलें. ब्राझीलमध्यें स्थानिक लोकांकडून मारला गेलेला आपला धाकटा भाऊ जिराल्ड याचा सीलोनमध्यें पुनर्जन्म झाला आहे असा आदेश त्यांना मिळाला असल्यानें सीलोनमध्यें भेटणाऱ्या कोणत्याहि मुलाकडे हे त्या दृष्टीनेंच पाहण्याचा प्रयत्न करीत. यांची अध्यात्मप्रवण वृत्ति व कार्य करण्याची हौस पाहून आपला मृत भाऊ तो हाच अशी खुणगांठ मनाशीं बांधून यांनीं त्यांच्या आई-वडिलांची समजूत घालून यांना इंग्लंडला नेलें व तेथें यांच्या शिक्षणाची सर्व सोय केली (१८८९).

हे केम्ब्रिज विद्यालयांतून संस्कृत व भाषाशास्त्र घेऊन एम्. ए. झाले (१९००) व पुढें कायद्याचाहि अभ्यास यांनीं केला. यानंतर इटलींतील पेन्हियाचे विद्यापीठांत वाङ्मय व भौतिकशास्त्र घेऊन यांनीं आपल्या कलापूर्ण पण शास्त्रीय ग्रंथरचनाकौशल्याचा पाया घातला.

स्वदेशीं परत येऊन कोलंबो येथील आनंद कॉलेजमध्यें व्हा. प्रिंसिपल म्हणून यांनीं काम करण्यास सुरुवात केली. १९०४ सालीं थि. सो. चे आन्तरराष्ट्रीय व्याख्याते म्हणून यांची अमेरिकेंत नेमणूक झाली व तेव्हांपासून स. १९११ पर्यंत तेथेंच यांनीं हें कार्य केलें. या सालाचे अखेरीस हे हिंदुस्थानांत आले व तेव्हांपासून जाऊन येऊन हिंदुस्थान हेंच यांचें मुख्य वसतिस्थान बनलें आहे. मध्यंतरीं इंग्लंडमध्यें श्री. कृष्णमूर्तीचे संस्कृताचे शिक्षक म्हणून हे राहिले (१९१२–१३). बेझंटबाईंच्या होमरूलच्या चळवळीचें कार्यहि यांनीं इंग्लंड व हिंदुस्थान या ठिकाणीं केलें. स. १९२१–२८ पर्यंत हे थिऑसॉफिकल सोसायटीचे आन्तर-राष्ट्रीय उपाध्यक्ष होते. बेझंटबाई आजारी असतांना तात्पुरते अध्यक्ष, लेडबीटर यांचे मृत्यूनंतर सोसायटीच्या अन्तःशाखेचे प्रमुख व ॲरंडेल यांचे मृत्यूनंतर हे अध्यक्ष बनले (१९४५).

स. १९१६ सालीं तिकडील स्त्रियांचे चळवळींत काम केलेल्या मिस डॉरेथी मार्गारेट ब्रॅहेम यांच्याशीं यांचा इंग्लंडमध्यें विवाह झाला. स. १९३०–३१ सालापर्यंत दोघेहि एके ठिकाणीं असत. पण १९२७ सालापासून कृष्णमूर्तीचे तत्त्वज्ञानाचे मांडणीसंबंधीं दोघांचें भिन्न मत होऊन हे उभयतां वेगळे राहूं लागले. हल्लीं त्या इंग्लंडमध्यें राहतात.

यांची बुद्धि कलात्मक व रहस्यग्राही असून यांची दृष्टि जागतिक व आन्तर अनुभवामुळें सखोल बनली आहे. हे प्लेटो व उपनिषदें यांचे तत्त्वज्ञानाशीं विशेष समरस होतात. अड्यार लायब्ररीचे डायरेक्टर म्हणून यांनीं अनेक वर्षें काम केलेलें आहे. यांची ग्रंथ-संपत्ति फार विपुल आहे. यांनीं लहानमोठे सत्तावन ग्रंथ लिहिले आहेत. यांच्या लिहिण्यांत कलात्मक, शास्त्रीय व तत्त्वज्ञानपूर्ण अशा तीनहि बाजू दिसून येतात. यांना इंग्रजी, फ्रेंच, इटालियन, स्पॅनिश व पोर्तुगीज या भाषा उत्तम अवगत असून त्यांत हे जरूरीप्रमाणें व्याख्यानें देतात. विशेषतः स्पॅनिश व पोर्तुगीज भाषा जाणणारे यांच्यासारखे दुर्लभ वक्ते सोसायटीमध्यें असल्यानें द. अमेरिकेंत थि. सो. चे प्रचारार्थ यांनाच जावें लागतें. तेथें जाऊन यांनीं तिकडील पांच-सात देशांमधून उत्तम प्रकारें व यशस्वी रीतीनें प्रसार केला आहे. यांच्या कांहीं ग्रंथांचीं भाषान्तरें अनेक युरोपियन व चिनी भाषेंत झालेलीं आहेत. यांनीं कांहीं लहान परंतु काव्यमय पुस्तकें बौद्ध ग्रंथ-संग्रहांतून लिहिलीं असून, तीं लहान मुलांना व तरुणांना अत्यंत मनोरंजक व स्फूर्तिप्रद झालीं आहेत. या पुस्तकांच्या

भाषेचें सहज व सुलभ स्वरूप पाहून अनेकांना कौतुक वाटतें. इतर पुस्तकांतील शास्त्रीय व अध्यात्मिक भाषा यांतील सारख्याच नैपुण्यामुळें हे सर्वत्र लोकप्रिय झाले आहेत. हिंदी कला व संस्कृति यांचे हे मोठे मार्मिक निरीक्षक व भोक्ते आहेत. या दोहींचीहि ओळख हे परदेशांत आज अनेक वर्षें करून देत आहेत.

यांचे ग्रंथ—(1) First Principles of Theosophy, (2) Occult Chemistry, (3) Golden Book of Theosophical Society, (4) Theosophy and Modern Thought, (5) Occult Investigations, (6) Abul Fazl and Akbar, (7) Art and Emotions, (8) Art as Will and Idea, (9) Nature of Mysticism, (10) Christ and Buddha, (11) Wonder Child, (12) Flowers and Gardens इत्यादि.

जिनविजयजी मुनि—(जन्म स. १८८६) सुप्रसिद्ध जैन साधु व संस्कृत, प्राकृत, पाली वगैरे भाषांचे अभ्यासक.

यांचा जन्म परमारवंशांतील रजपूत घराण्यांत झाला. यांचें मूळ नांव किसनसिंह. बापाचें नांव वृद्धिसिंह. आईचें नांव राजकुंवर. जन्मस्थान–मेवाडांतील उदेपूर राज्यांत रुपाहेली. हे अविवाहित असून यांचा सर्व अभ्यास खाजगी रीतीनें झाला.

हे जैन साधूंच्या सहवासानें दीक्षा घेऊन जैन संन्यासी बनले. पण जैन साधूंचा कडक आचार आणि प्रतिबंधक राहणी यांना पटेना. शेवटीं यांनीं वेष बदलून एक अध्यापक व साहित्यसेवक म्हणून जीवन व्यतीत करण्यास सुरुवात केली. अध्ययन–अध्यापन व ग्रंथलेखन–संपादन या कार्यांत यांचें सर्व आयुष्य व्यतीत होत असतें. हे उदार व सुधारक विचाराचे असल्यानें इंग्लंड, जर्मनी वगैरे देशांत अभ्यासाकरितां जाऊन हे कित्येक वर्षें राहून आले आहेत.

म. गांधींच्या प्रेरणेनें हे गुजराथ विद्यापीठांत आले आणि तेथील कार्यानें पुरातत्त्वविद्येचे एक गाढे अभ्यासक व विद्वान् लेखन म्हणून यांनीं कीर्ति संपादन केली. 'जैनतत्त्वसार' आणि 'विज्ञप्तित्रिवेणी' हे यांचे येथील आगमनानंतरचे पहिले ग्रंथ होत. त्यानंतर पद्धतशीर अभ्यास करून प्राचीन साहित्य, इतिहास, धर्मग्रंथ वगैरेंवर व्याख्यानें, लेख व ग्रंथ वगैरे द्वारा यांनीं उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

गुजाराथ पुरातत्त्व मंदिराचें काम यांच्या देखरेखीखालीं उत्तम चाललें होतें. पण तें कार्य सत्याग्रहाच्या चळवळींत बंद पडलें. तथापि प्रबंधचिन्तामणि संपादित करून यांनीं तें कार्य पुढें चालविलें. यांच्या अशा व्यासंगामुळेंच मुंबई युनिव्हर्सिटीनें यांना वसनजी माधवजी व्याख्यानमाला गुंफण्याकरितां बोलाविलें. यांनीं त्या वेळीं दिलेल्या व्याख्यानांच्या प्रसिद्धीनंतर सोलंकीच्या इतिहासावर विशेष प्रकाश पडलेला आढळेल. डॉ. रवींद्रनाथ टागोरांच्या शान्तिनिकेतनांत जैन साहित्याच्या इतिहासाचे अध्यापक म्हणून यांनीं अनेक वर्षें काम केलें आहे.

यांनीं प्रसिद्ध केलेले प्राचीन जैन लेखसंग्रहाचे दोन्ही खंड महत्त्वाचे आहेत. पहिल्या भागांत राजा खारवेलाचा लेख असून दुसऱ्या भागांत गुजराथ, काठेवाड, राजपुताना वगैरे भागांत मिळालेले ५५७ लेखांचा संग्रह आहे.

यांचें वाङ्मय–१ जैनतत्त्वसार (१९१३), २ विज्ञप्तित्रिवेणी (१९१४), ३ शत्रुंजय तीर्थोद्धार-प्रबंध (१९१४), ४ कृपारस कोश (१९१५), ५ प्राचीन जैनलेखसंग्रह (भाग १, १९१६, भाग २, १९२०), ६ द्रौपदीस्वयंवर नाटक (संस्कृत, १९२५), ७ हरिभद्राचार्यस्य समयनिर्णयः (संस्कृत १९२९), ८ कुमारपाल प्रतिबोध (प्राकृत, १९२८), ९ पुरातत्त्व संशोधननो इतिहास (१९२९), १० पालि पाठावलि (१९२९), ११ प्राकृत कथासंग्रह, १२ अभिधान दीपिका-पालीभाषा शब्दकोश (१९२२), १३ जैन ऐतिहाहिक गुर्जर काव्यसंचय (१९२४), १४ जीतकल्पसूत्र (प्राकृत, १९२५), १५ विजयदेव माहात्म्य (संस्कृत १९२६), १६ प्राचीन गुजराथी गद्यसंदर्भ (१९२८), १७ खरतरगच्छपट्टावलिसंग्रह, १८ प्रबंधचिन्तामणि (संस्कृत), १९ पुरातनप्रबन्धसंग्रह (संस्कृत), २० विविधतीर्थकल्प (संस्कृत-प्राकृत), २१ प्रबन्धकोश (संस्कृत) इत्यादि.

जिना, बॅ. मुहंमदअली—(जन्म स. १८७६ डिसें. २५) हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध मुसलमान पुढारी, विख्यात राजकारणी मुत्सद्दी, नामांकित कायदेपंडित व वक्ते.

कराचीच्या सुप्रसिद्ध व्यापारी खोजा कुटुंबांत यांचा जन्म झाला. कराचीला मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण संपविल्यानंतर हे इंग्लंडला गेले व बॅरिस्टर होऊन आले (१८९२-९६).

इंग्लंडमध्यें असतांनाच दादाभाई नवरोजींच्या सहवासाचा लाभ यांना मिळाला. तिकडे जाण्यापूर्वीच गोखल्यांच्या व्यक्तिमत्वानें हे भारले गेले होते. राजकारणांतील गोखले–नवरोजी यांचें ऋण यांनीं अनेक वेळेला बोलून दाखविलें आहे.

हिंदुस्थानांत परत आल्यानंतर यांनीं मुंबईच्या हायकोर्टांत आपलें नांव दाखल केलें (१९०६). त्या वेळचे ॲडव्होकेट–जनरल मि. मॅकफर्सन यांच्या चेंबरमध्यें काम करण्यास सुरुवात करून यांनीं आपली वकिली आरंभिली. थोड्याच दिवसांत आपली बाजू तडफदारपणें पटवून देणारे कायदेपंडित अशी यांची प्रसिद्धि झाली.

वकिलींतील यांच्या यशाची खरी सुरुवात 'कॉक्स' खटल्याच्या वेळीं झाली. सुरवातीपासूनच मेहतांच्या अनुयायांत हे मोडत. त्यामुळें कॉक्स प्रकरणीं आपलें वकीलपण मेहतांनीं यांचेकडेच दिलें. हा खटला स्मॉल कॉज कोर्टांत सतत चाळीस दिवस चालला. यामुळें लोकांच्या एकदम डोळ्यांसमोर तर हे आलेच; पण यांचा जाहीर सत्कारहि करण्यांत आला (१९०७).

याच सुमारास दादाभाई नवरोजींनीं यांना आपले प्रायव्हेट सेक्रेटरी नेमल्यानें हे राजकारणांत ओढले गेले. या वेळच्या काँग्रेसच्या बहुतेक अधिवेशनांनाहि हे हजर असत. १९०६ च्या कलकत्ता अधिवेशनांत मौलवी मुहंमद युसुफ यांच्या वक्फ-अल–औलदविषयींच्या ठरावावर यांनीं पहिलें जाहीर भाषण केलें. १९१० सालीं विल्यम वेडर्बर्न यांचे अध्यक्षतेखालीं अलहाबाद येथें ऐक्याचा मार्ग काढण्याकरितां भरलेल्या हिंदुमुसलमान पुढाऱ्यांच्या अधिवेशनांसहि हे हजर राहिले.

१९१० सालीं मुंबई इलाख्याच्या मुसलमानांतर्फे हे मध्यवर्ति कौन्सिलमध्यें निवडून आले. गोखल्यांचा प्राथमिक शिक्षणाचा कायदा व बसूंचें स्पेशल मॅरेज बिल पास करण्यांत यांनीं त्या वेळीं बरेच परिश्रम घेतले. परंतु वक्फ व्हॉलिडेटिंग बिलाची अंमलबजावणी करण्यांत यांनीं सर्वांत मोठें कौशल्य प्रगट केलें. प्रिव्ही कौन्सिलमधील मुस्लिम कायद्याचा चुकीचा अर्थ लावण्याच्या पद्धतीमुळें पास झालेल्या ठरावाला विरोध करणें हें या बिलाचें प्रमुख कर्तव्य होतें. लॉर्ड हार्डिंज यांनीं या बिलाची कायद्यांत अंमलबजावणी करण्यासाठीं यांची मुद्दाम स्वतंत्र नेमणूक केली. या कार्यानें असेंब्लीतील आपल्या सहकारी वर्गाचा तर यांनीं विश्वास संपादन केलाच पण त्याबरोबरच यांच्या कर्तृत्वाकडे तटस्थपणें पाहणाऱ्या सनातनी मुसलमानांचीं मनेंहि यांनीं जिंकलीं व ते यांच्याकडे नेतृत्वाचे दृष्टीनें पाहूं लागले.

परंतु यांचे असेंब्लींतील या कार्याला यानंतर तीन वर्षें खळ पडला. १९१३ सालीं हे प्रथम इंग्लंडला गेले व लंडन येथें यांनीं 'लंडन इंडियन असोसिएशन' या विद्यार्थी संघटना करणाऱ्या संस्थेची स्थापना केली. तिच्या खटपटीमुळें शैक्षणिक केंद्रांत हिंदी विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवण्याबाबतींत जी तसदी सोसावी लागत असे तिची चौकशी करण्यासाठीं इंडिया ऑफिसनें कमेटी नेमली.

यानंतर हे हिंदुस्थानांत परत आले व पुनः इंडिया कौन्सिलच्या भावी स्वरूपासंबंधीचा हिंदी दृष्टिकोन समजावून देण्याचे हेतूनें काँग्रेसच्या शिष्टमंडळाचे सभासद म्हणून हे परत इंग्लंडला गेले (१९१४). या विषयावर कांहीं महिन्यांपूर्वी कराचीच्या काँग्रेसमध्यें व आग्राच्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनांत यांनीं जे ठराव मांडले होते त्यांचाच पुनरुच्चार यांनीं इंग्लंडमध्यें केला.

१९१६ च्या निवडणुकींत व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्यें हे निवडून आले. फिरोजशहा मेहता यांचे मृत्यूनंतर असेंब्लींतील पक्षोपपक्षांचें राजकारण जरी यांनीं सोडून दिलें तरी होमरूल-लीग, काँग्रेस स्वतंत्रपक्ष, स्वराज्यपक्ष, नॅशनॅलिस्ट पार्टी इत्यादि पक्षांच्या राजकारणाचा यांनीं त्या त्या वेळीं असेंब्लींत पुरस्कार केला. गयाकाँग्रेसनंतर कायदेमंडळांत सरकारला संघटित विरोध करण्यासाठीं निघालेल्या स्वराज्यपक्षानें ज्या वेळीं इतर पक्षांचे लोक घ्यावयाचें ठरविल त्या वेळीं यांचेच मदतीनें दासबाबूंनीं नॅशनॅलिस्ट पक्षाची स्थापना केली (१९२६).

यांनीं पुढें स्वतंत्र मतदारसंघाचा पुरस्कार केल्यानें यांना जात्यंध ठरविण्याचा घाट स्वराज्य पक्षानें घातला. त्या वेळीं नॅशनॅलिस्ट पक्षांतील लोकांना जातीय धोरणावर स्वातंत्र्य देऊन असेंब्लींत यांनीं स्वतंत्र पक्ष स्थापन केला व मुसलमान सभासदांप्रमाणेंच सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास व हरिसर्वोत्तमराव या दोन हिंदु सभासदांचा आपल्या पक्षांत समावेश करून घेऊन यांनीं प्रतिपक्षांस चीत केलें.

यांच्या या असेंब्लींतील विजयाच्या-विशेषतः तेथील

यांच्या स्थानाच्या मुळाशी यांचें वादविवादपटुत्व तर आहेच; पण त्याबरोबरच यांचा स्वार्थनिरपेक्षपणा व प्रामाणिक वृत्ति या गोष्टींना विशेष महत्त्व आहे. सरकारचा कोणत्याहि बाबतींत मिंधेपणा स्वीकारावयाचा नाहीं या यांच्या ठराविक धोरणामुळें कोणत्याहि गोष्टीचा खोल विचार करून आपलें मत निर्भीडपणें मांडणें यांना शक्य होतें. लोकांचें कल्याण ही एकच वृत्ति असेंब्लींतील कोणत्याहि ठरावासंबंधीं विचार करतांना हे कायम ठेवत असल्यानें एक यशस्वी कायदेकौन्सिलर हें यांचें स्थान विशेष महत्त्वाचें ठरलें आहे. यांच्या इतर कार्यासंबंधीं मतभेद व्यक्त करणाऱ्या लोकांचेंसुद्धां यांच्या या धोरणाबद्दल एकमत आहे. शेरियट बिलाचें कायद्यांत रूपांतर करण्यासाठीं यांनीं घेतलेले श्रम यांच्या या वृत्तीचे द्योतक आहेत.

यांच्या सार्वजनिक आयुष्याचे ठळक दोन भाग पडतात. त्यांत खिलापत चळवळ फिसकटेपर्यंतचा पहिला भाग असून त्या वेळेपासून आजतागायतचा इतिहास दुसऱ्या भागांत मोडतो. 'हिंदु मुस्लिम ऐक्याचे वकील' ही पदवी यांना यांच्या पहिल्या भागांतील कार्यानें मिळवून दिली तर सरकारच्या साहाय्यानें मुसलमानांचें एक स्वतंत्र नवें राष्ट्र निर्माण करणारे मुत्सद्दी हें यांच्या दुसऱ्या भागांतील चळवळीचें स्वरूप आहे.

राष्ट्रीय सभेतील यांचे आगमनाचे वेळेपासूनच यांनीं मुस्लिम-लीग व तिच्या चळवळी यांचेकडे जातीय म्हणून दुर्लक्ष केलें. १९०६ सालीं जातीय मतदार-संघाची मागणी लॉर्ड मिंटोकडे करण्यास गेलेल्या आगाखान शिष्ट-मंडळांत सामील होण्यास यांनीं दिलेला नकार, अलाहाबादच्या काँग्रेसमध्यें जातीय प्रतिनिधित्वाचा निषेध करणारा यांचा ठराव (१९१०) व मुस्लिम-लीग व काँग्रेस यांना एका पातळीवर आणून राष्ट्रीय चळवळी संयुक्तपणें करण्याच्या योजनेस यांनीं दिलेला पाठिंबा (कराची १९१३) या गोष्टी यांच्या तत्कालीन वृत्तीच्या द्योतक आहेत. परंतु या सर्व गोष्टींचा कळस १९१५ सालीं मुंबई येथें भरलेल्या काँग्रेस व मुस्लिम-लीग यांचे अधिवेशनाचे वेळीं झाला. लखनौ कराराची प्रस्तावना करणारा ठराव पास होण्यास पठाण गुंडांचा विरोध दिसतांच स्थलांतर करून ताजमहाल हॉटेलमध्यें यांनीं तो ठराव रात्रीं पास करून घेतला. १९१६ सालीं लखनौ करारामुळें संस्मरणीय झालेल्या काँग्रेसमध्येंहि यांनीं मनापासून भाग घेतला. मुसलमानांचे लोकसंख्येच्या प्रमाणावर कायदेमंडळांतील जागांची विभागणी या करारांत करण्यांत आली असून पंजाब ५० टक्के, बंगाल ३० टक्के, बिहार २५ टक्के, मध्यप्रांत व मद्रास १५ टक्के जागा देण्याचें वचन संयुक्त मतदारसंघाचे अटीवर या करारानें दिलें.

यांच्या या राष्ट्रीय भूमिकेवर, टिळक व हॉर्निमन या दोन राष्ट्रीय महत्त्व पावलेल्या व्यक्तींचे खटले अत्यंत जोरदारपणें चालविणाऱ्या यांच्या वकिली कौशल्यानें कळस चढला. याच वेळीं ॲनि बेझंट यांच्या तुरुंगवासामुळें होमरूल लीगच्या चळवळीकडे यांचें लक्ष वेधलें व हे मुंबईच्या होमरूल लीगचे अध्यक्ष बनले. यानंतर खिलापतीची चळवळ सुरू झाली व काँग्रेसनें मुसलमानांना खिलापत प्रकरणीं मनापासून मदत केली. याचे उलट मुसलमानहि असहकारितेच्या चळवळींत काँग्रेसच्या खांद्याला खांदा लाऊन लढत असल्याचीं दृश्यें दिसलीं.

परंतु खिलापत प्रकरणाचा निकाल मुसलमानांच्या मनाविरुद्ध लागल्यानें ते सवत्या सुभ्याच्या मागें लागले. असहकारितेच्या चळवळींत दिसून आलेली जागृति हें हिंदूंच्या संघटनेचें एक स्वरूप आहे, अशी कल्पना करून घेऊन न्यूनगंडाची कल्पना त्यांना सारखी डाचूं लागली व त्याचें पर्यवसान जातीय दंग्यांत झालें.

या मुसलमानांच्या वृत्तीवर तोडगा म्हणून काँग्रेसनें संयुक्त मतदार-संघाचा प्रचार सुरू केला. परंतु संयुक्त मतदार-संघ हा मुसलमानांवर वरचष्मा ठेवण्याचा काँग्रेसचा म्हणजे पर्यायानें हिंदूंचा डाव आहे, या कल्पनेनें पछाडल्यानें १९२४ पासून पुढें मुस्लिम-लीगनें आपला स्वतंत्र मतदार-संघाचा आग्रह तसाच चालू ठेवला.

अशा तऱ्हेनें हिंदु-मुस्लिम एकीच्या नादांत हिंदु लोकच अधिक प्रबळ होत आहेत अशी यांच्या मनाची समजूत होत गेली व अखेर १९२६ सालीं यांनीं आपला जातीय दृष्टिकोन बदलल्याचें जाहीर केलें.

सायमन कमिशनच्या वेळीं हिंदु-मुसलमानांमधील विरोध प्रथम उघड झाला. मुस्लिम-लीगच्या १९२४-२६ अधिवेशनांनीं मान्यता दिलेल्या चवदा मागण्या यांनीं सायमन कमिशनपुढें ठेवल्या (१९२७). अल्पसंख्याकांना परिणामकारक प्रतिनिधित्व; स्वतंत्र मतदार-संघ; पंजाब, बंगाल इत्यादि प्रांतांतील मुसलमानी मताधिक्य कायम व धार्मिक स्वातंत्र्यासाठीं सरकारी संरक्षण हे त्यांतील प्रमुख मुद्दे होते.

परंतु स्वतंत्र मतदार-संघांत अभिप्रेत होणारा परस्पर

अविश्वासाचा आविष्कार काँग्रेसच्या त्या वेळच्या धोरणास मानवण्यासारखा नव्हता. मुसलमानांच्या हितरक्षणासाठीं कांहीं राखीव जागा काँग्रेसनें देऊं केल्या व स्वतंत्र मतदार-संघ मागें घेण्याची सूचना यांना केली. दिल्ली येथें मुसलमानांची एक बैठक भरवून यांनीं सरहद्दप्रांत व बलुचिस्थान यांना इतर प्रांतांचे हक्क द्यावेत व सिंध प्रांत मुंबई इलाख्यापासून वेगळा करावा, या अटीवर संयुक्त मतदार-संघास मान्यता दिली. मुस्लिम लीगच्या वर्चस्वाखालीं दोन मुसलमानप्रधान प्रांत आणण्याचा यांचा हेतु होता. काँग्रेसनें यांच्या या सूचनेस मान्यता दिली व दिल्लीच्या कन्व्हेन्शनला हजर राहण्याचें आमंत्रण दिलें.

याच वेळीं प्रसिद्ध झालेल्या नेहरू रिपोर्टांत संयुक्त मतदार-संघांत मुसलमानांनीं यावें या हेतूनें कांहीं जागा मुसलमानांसाठीं राखून ठेवल्या होत्या व इतर जागा लढविण्यास मान्यता दिली होती. असें असतांना यांनीं काँग्रेसवर वचनभंगाचा आरोप ठेवला व ऐक्याची आशा फिसकटून टाकली.

राउंड टेबल कॉन्फरन्सच्या वेळींहि यांनीं आपल्या चवदा मुद्द्यांच्या पलिकडे सरण्यास नकार दिला. या वेळीं गांधींनीं दिलेला कोरा चेकहि 'हा आम्हांस हिंदुकडेच वटवावा लागणार' या मुद्द्यावर यांनीं नाकारिला.

१९३२ सालीं मॅक्डोनाल्ड यांनीं दिलेल्या जातिनिर्णयांतहि पुन्हां एकदां स्वतंत्र मतदार-संघास मान्यता देण्यांत आली. त्याबरोबरच मंत्रिमंडळांत व सरकारी नोकऱ्यांत मुसलमानांना एकतृतीयांश जागा देऊं केल्या. परंतु यांनीं या गोष्टीस नकार दिला व एकद्वितीयांश जागांची मागणी केली.

१९३५ च्या कायद्याप्रमाणें १९३७ सालीं प्रांतिक स्वराज्याची स्थापना झाली. एकपक्षीय मंत्रिमंडळाची पद्धत जरी या कायद्यानें स्वीकारली असली तरी अल्पसंख्याक जातीचे मंत्री मंत्रिमंडळांत घेण्याची सूचना या कायद्यानें केली आहे. त्याप्रमाणें सर्व मंत्रिमंडळांत मुसलमान सभासद काँग्रेसनें घेतले. परंतु धोरणांतील भिन्नतेमुळें यांच्या पक्षांतील सभासदांऐवजीं राष्ट्रीय मुसलमानांना घेण्यांत आले. त्यामुळें यांनीं आपला बोलण्याचा सूर बदलला व 'मुस्लिम राष्ट्र हें स्वतंत्र राष्ट्र आहे, त्यांत बहुमत असलेल्या पक्षांचे सभासद कायदेमंडळांत घेतलेच पाहिजेत' असें म्हणण्यास सुरुवात केली.

मुस्लिम-लीगचे १९४० च्या लाहोरच्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थानावरून यांनीं पाकिस्तानची अधिकृत रीतीनें मागणी केली. हिंदुस्थानांत भौगोलिक दृष्ट्या जवळ जवळ असलेले मुस्लिम-प्रधान प्रांत स्वतंत्र व्हावेत, त्यांचें एक संघराज्य स्थापन व्हावें व बलुचिस्थान, सीमाप्रांत, सिंध, बंगाल हे प्रांत व भोपाळ, हैदराबाद व काश्मीर संस्थानांतील कांहीं भाग यांत सामील करावे, असा ठराव या अधिवेशनानें पास केला. यांत पुढें आसाम व पंजाब यांचा समावेश करून हिंदुस्थानच्या अकरा प्रान्तांपैकीं सहा प्रान्त पाकिस्थानांत आणण्याबद्दल बोलण्यांत येऊं लागलें.

कधींहि न पुरवतां येण्याजोगी अशा प्रकारची मागणी मागण्यांत यांनीं कौशल्य प्रगट केलें आहे. 'हिंदु व मुसलमान हीं दोन राष्ट्रें आहेत' असें म्हटल्यानें अल्पसंख्य असणाऱ्या मुसलमानांना बहुसंख्य हिंदूंच्या बरोबरीचे हक्क प्राप्त होतात, ही यांची पाकिस्तानच्या मागण्यांतील प्रमुख गोम आहे.

मुसलमानांच्या हक्कांचें संरक्षण हिंदु मंत्रिमंडळें कधींहि करूं शकणार नाहींत, हें यांनीं आपल्या पाकिस्तान योजनेचें प्रमुख कारण सांगितलें. काँग्रेस मंत्रिमंडळांनीं मुसलमानांचा छळ केला, या यांच्या मोघम विधानाचा खरेपणा सिद्ध करण्याचें आव्हान काँग्रेसमंत्र्यांनी देतांच 'ती चौकशी रॉयल कमिशन नेमून करा' असें यांनीं उत्तर दिलें. काँग्रेस कारभाराबरोबर सरकारी कारभाराचें परीक्षण रॉयल कमिशनकडून होणार असल्यानें सरकार या कमिशनला संमति देणार नाहीं, असा राजकारणी कावा यांच्या या उत्तरांत आहे. यानंतर आलेल्या क्रिप्स योजनेनें प्रांतिक स्वयंनिर्णयास पाठिंबा देऊन यांच्या या वक्तव्यास दुजोराच दिला.

परंतु यापेक्षांहि हातातोंडाशीं आलेली 'वेव्हेल योजना' फिसकटून टाकण्यांत यांनीं आणखी एक पाऊल पुढें टाकलें. काँग्रेसला स्पृश्य हिंदूंची प्रतिनिधि ठरवून मुसलमानांचे सर्व प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार लीगला देण्याविषयींचा आग्रह यांनीं धरला व ही योजना फेटाळली गेली. परंतु काँग्रेसच्या केवळ हिंदूंच्या प्रतिनिधित्वाची सत्यता यांनीं १९४५ च्या मध्यवर्ति निवडणुकीचे वेळीं प्रत्ययास आणून दिली. यांचेसुद्धां मुस्लिम-लीगचे सर्व उमेदवार राष्ट्रीय मुसलमानांचा पराभव करून निवडून आले आहेत.

यावरून ध्यानांत येईल कीं, 'आपल्याशिवाय राष्ट्रांतील कोणतीहि महत्त्वाची राजकीय घडामोड

होऊं नये' ही आपली महत्त्वाकांक्षा यांनीं मोठ्या कसोशीनें सिद्धीस नेली आहे. लखनौ कराराचे वेळीं लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधित्व टिळकांनीं मुसलमानांना देऊं करतांच जरूरीपेक्षां जास्त सौजन्य दाखविलें म्हणून सर्व काँग्रेसभर त्यांचेवर टीका झाली. परंतु तीच काँग्रेस आज मध्यवर्ती कायदेमंडळांत व मंत्रिमंडळांत हरिजनेतर हिंदु व मुसलमान यांना सारख्या जागा देण्यास तयार झाली आहे.

लॉर्ड डफरिन यांनीं हिंदु व मुसलमान हीं स्वतंत्र राष्ट्रें आहेत, असा पुकारा केल्यापासून दोघांत दुहीला सुरुवात झाली आणि सरकारी धोरणानें यांचा पाठपुरावा केला. पण त्यांतूनहि स्वतःचें वैशिष्ट्य राखून जातीचा अनपेक्षित लाभ घडवून आणण्याचें श्रेय यांच्या राजकारणी बुद्धीस दिलें पाहिजे. वकिली कौशल्य आणि दमदार इंग्रजी वक्तृत्व हीं यांचीं दोन प्रमुख आयुधें आहेत.

बहुमतावर चालणाऱ्या लोकशाहीच्या सध्यांच्या कालांत कांहीं प्रभावी अल्पमतवाले गट कसें राजकारण खेळतात याचा नमुना यांच्या राजकारणांत मिळतो. कांहीं प्रान्तांत आपणांस बहुमताच्या जोरावर सत्ता चालविण्यास मिळणार पण मध्यवर्ति सत्तेंत मुसलमान अल्पमतवाले म्हणून कायमचे निर्माल्य ठरणार असें पाहतांच या महत्त्वाकांक्षी पुरुषाच्या तल्लख बुद्धीनें फेडरेशनला विरोध करून हिंदुस्थानांत दोन राष्ट्रें निर्माण करण्याची कल्पना जोरानें पुरस्कारली, 'पाकिस्तान नाहीं तर सर्व ठिकाणीं पन्नास टक्के प्रतिनिधित्व' हा पवित्रा उभा केला आणि त्याला तात्त्विक मान्यता मिळविण्यापर्यंत मजल आणली. राजकारणी पुरुषाला अशक्य कांहींच नसतें, ही गोष्ट यांनीं चवदा मागण्या मान्य करून घेऊन आणि पाकिस्तान किंवा पन्नास टक्के ही मागणी दृष्टीच्या टप्प्यांत आणून 'राजकारणांतील प्रतिसृष्टि निर्माण करणारा मुत्सद्दी' असा लौकिक संपादन केला. खरोखर जगांतील थोर राजकारणी मुत्सद्यांत यांची गणना करावी लागेल.

जिन्सीवाले, प्रा. श्रीधर गणेश—(जन्म स. १८५२–मृत्यु स. १९०३) सुप्रसिद्ध पंडित, नामांकित वक्ते व कर्मनिष्ठ प्राध्यापक.

यांचें घराणें मूळचें नगर जिल्ह्यांतील सांकूर गांवचें. ग्वाल्हेरीस शिंद्यांचे सैन्यांत या घराण्यांत जिनसीचें म्हणजे तोफखान्याचें काम होतें, त्यावरून या घराण्यास जिन्सीवाले हें नांव मिळालें. पुढें यांच्या वडिलांस योग्य वांटा न मिळाल्यानें त्यांनीं आपल्या भावावर नऊ लाखांचा दावा नादारी कोर्टांत दाखल केला, पण शेवटीं नव्वद हजारांची तडजोड व दावा हीं अपेशी होऊन यांना अक्षरशः मधुकरी मागून आपला अभ्यास पार पाडावा लागला.

हे पांच इयत्ता झाल्यावर पुण्यास आले व त्याच सालीं मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले (१८६८). चांगल्या प्रकारें उत्तीर्ण झाल्यानें अनेक शिष्यवृत्त्या मिळून यांना खर्चाची चिन्ता राहिली नाहीं. हे डेक्कन कॉलेजांतून बी. ए. (१८७३) व एम्. ए. (१८७६) झाले. पुणें हायस्कुलांत दीड वर्ष शिक्षकाचें काम केल्यावर मुंबईच्या विल्सन कॉलेजांत प्राध्यापक म्हणून यांची नेमणूक झाली. तेथून स्त्रीशिक्षणविषयक केलेल्या कांहीं विधानांबद्दल यांच्यावर माफी मागण्याचा प्रसंग आला असतां यांनीं माफी मागण्यापेक्षां राजीनामा देण्याचा स्वाभिमानी मार्ग पत्करिला आणि हे नोकरींतून मुक्त झाले (१८९०). येथून पुढें यांनीं कोठेंच नोकरी केली नाहीं.

नोकरी व पत्नी यांचा वियोग घडल्यानंतर यांचें आयुष्य विद्याव्यासंगांतच गेलें.

करारीपणा, सत्यप्रीति, स्वाभिमान, स्वकुल, धर्म, देश यांबद्दल प्रीति, अल्पसंतोष आणि मानधनता हे यांचे विशेष गुण होत. इतिहासाची गोडी, विस्तृत वाचन व थोडीशी विचक्षणता हे गुण यांना इंग्रजी शिक्षणानें प्राप्त झाले होते. तथापि हे कर्मठ सनातनी होते. याला अपवाद फक्त यांच्या 'वेद पौरुषेय आहेत' या मताचा. स्वस्थितीविषयीं अत्यंत निरुत्साही जनमनास यांच्या भाषणानें फिरून उत्साह प्राप्त होत असे. यांनीं जवळजवळ एक तप लोकांस आपल्या धर्मशास्त्र व इतिहास या विषयाचें ज्ञान व्याख्यानद्वारा देण्यांत खर्चिलें. 'आपलें राष्ट्र, भरतखंड, महाराष्ट्र व आपण मराठे हे कायमचेच अवनत झालों, आतां फिरून आपणांस वर येण्याची आशा नाहीं, आपल्यांत कांहीं चिवटपणाच नाहीं,' हा समज चुकीचा आहे हें सिद्ध करण्याची व 'आपल्या राष्ट्राच्या पिंडांत असा कांहीं जोम आहे कीं, आज जरी तें रोग्यासारखें भासत आहे तरी कालान्तरानें रोग नाहींसा होऊन फिरून आपणास स्वतंत्र कर्तृत्वाचे दिवस येतीलच येतील' अशी श्रोत्यांची खात्री पटवून त्यांच्यांत नवीन उमेद उत्पन्न करण्याची यांची हातोटी वाखाणण्यासारखी असे. निबंधमालेच्या

द्वारें जें स्वाभिमान व आत्मविश्वास उत्पन्न करण्याचें काम विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं केलें तेंच काम यांनीं व्याख्यानद्वारा केलें. यांचें व्याख्यान म्हणजे विविध ज्ञानानें भरलेल्या एखाद्या ग्रंथसंग्रहासारखें असे.

जीवराम, कालिदासशास्त्री— (जन्म स. १८८१) गोंडलचे सुप्रसिद्ध राजवैद्य.

लहानपणीं मधुकरी मागून यांनीं शास्त्री ही पदवी संपादन केली. पुढें मुंबईस येऊन वेंकटेश्वर प्रेसमध्यें द. म. १२ रुपयांवर हे लागले. पण गिरनारला जाण्याची यांना बुद्धि झाली आणि तेथें यांना अच्युतानंद ब्रह्मचारी भेटले. त्यांचेजवळ संस्कृत, आयुर्वेद, मंत्रशास्त्र, योगशास्त्र व रसशास्त्र या विद्या शिकून रसशास्त्रावरचीं बरींच हस्तलिखितें घेऊन हे मुंबईस आले; तेथेंहि रसवैद्य बालशंकरभाईजवळ आयुर्वेदाचा आणखी अभ्यास करून यांनीं दवाखाना काढला. रसरत्नसमुच्चयाच्या भाषान्तराचें काम यांनीं या वेळींच सुरू केलें.

प्रथमतः फक्त ४० रु. च्या भांडवलावर यांनीं मुंबईस औषधींचा कारखाना सुरू केला. पण पुढें अच्युतानंदांच्या आज्ञेवरून गोंडल येथेंच यांनीं विधिपूर्वक कारखाना सुरू केला. तेथील नरेशांचेंहि यांना पुष्कळ साहाय्य झालें. कारखाना झपाट्यानें वाढूं लागला व त्याची देशभर ख्याति झाली.

स. १९१५ मध्यें हे गोंडलनरेशांचे राजवैद्य झाले. स्वतः गोंडलनरेश वैद्यपंचानन असून एम्. डी. आहेत. त्यांनीं राजवैद्य या मानावर चढविलेल्या या गृहस्थांची योग्यता किती मोठी असावी याची कल्पना यावरून येते.

कारखान्यांत केवळ शास्त्रशुद्ध औषधेंच बनवून हे स्वस्थ बसले नाहींत, तर जुनीं हस्तलिखितें जमा करून त्यांच्या प्रकाशनाचेंहि फार मोठें काम यांनीं केलें. आजवर यांनीं (१) रसमंजरी, (२) रसरत्नसमुच्चय, (३) रसोद्धारतंत्र, (४) रसेन्द्रमंगल, (५) रसकामधेनू, (६) रसप्रकाशसुधाकर, (७) राजमार्तंड, (८) मंत्रखंड, (९) ऋद्धिखंड, (१०) व्याधिनिग्रह, (११) प्रशस्तौषधसंग्रह इ. वैद्यक व इतर बरेंच ग्रंथ प्रसिद्ध केले. त्यांतील ' रसोद्धारतंत्र ' या ग्रंथाच्या, आजवर अठरा आवृत्त्या निघाल्या. ' आयुर्वेदरहस्यार्क ' व ' पारद ' या दोन मासिकांतून यांनीं फुटकळ लेखनहि बरेंच केलें आहे.

यांच्या रसशाळेचा युरोप व अमेरिकेंतहि बोलबाला झाला आहे. इटलीचे आयुर्वेदज्ञ प्रो. ए. जी. कारपानी यांनीं एक आयुर्वेदीय मासिक सुरू केलें असून ' राजवैद्य जीवराम कालिदासशास्त्री ' नांवाची एक लायब्ररीहि स्थापन केली आहे.

यांनीं लक्षावधि रुपये मिळविले. स्वतः लक्षाधिकांचा संचय केला, पण लक्षावधि आर्तांना औषधें, अन्न, वस्त्र इ. साठीं मुक्तहस्तानें यांनीं साहाय्य केलें. गेल्या बत्तीस वर्षांत यांच्या रसशाळेनें साडेतीन लाख रुपये धर्मार्थ खर्च केले आहेत.

यांची बाहेरगांवीं जाण्याची एका दिवसाची फी, हजार रुपये असल्याचें ऐकण्यांत आहे. स. १९४२ च्या ' नि. भा. आयुर्वेद-महासंमेलन लाहोर'चे हे अध्यक्ष होते. तेथील यांचें भाषणहि यांच्या लौकिकाला साजेल असेंच झालें (आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे).

जुम्मामिया—(जन्म स. १७९४–मृत्यु स. १९०४) बडोद्याचे सुप्रसिद्ध व्यायामप्रवीण सीद्दी पहिलवान.

हे व यांचे बंधु यांना पेंढाऱ्यांनीं पकडून नेलें असतां यांनीं सुटका करून घेऊन बडोदें गांठलें व तेथें यांनीं आपला पहिलवानांत प्रवेश करून घेतला. या वेळीं सयाजीराव गोविंदराव गादीवर होते. पुढें श्रीमंत खंडेरावमहाराज गादीवर आल्यानंतर तर बडोद्यास मल्लविद्या कळसास पोंचली. तेव्हां यांची योग्यता लक्षांत घेऊन यांना सर्वत्र मोठेपणा देण्यांत आला.

यांचा पोषाख पोटऱ्यापर्यंत विजार, अंगांत एक सदरा व डोकीस सफेत कानटोपी असा असे. कानटोपीचा एक कान वर मुरडलेला असे. हे सर्व कपडे खादीचे असून स्वतः शिवलेले असत. हे रस्त्यानें जातांना नेहमीं खाऊकरितां मुलांचा तांडा यांच्याबरोबर असे. आणि हेहि मुलांशीं अत्यंत ममतेनें वागून त्यांना खाऊ देत.

हे बालब्रह्मचारी होते. तसेंच नेहमीं आनंदी असत. हे मुलास ' बाबा ' व मुलीस ' माई ' असें संबोधीत.

मरणापूर्वी सुमारें तीन वर्षेंच यांनीं कुस्ती सोडली होती. या वयांतसुद्धां यांचें शरीर अत्यंत प्रेक्षणीय असे. यांचें उघडें शरीर पाहिलें असतां उत्कृष्ट शिल्पशास्त्राचा कोरीव नमुनाच आपल्यापुढें उभा असल्याचा भास होई.

यांचा निमगोरा वर्ण, करडी दाढी आणि भव्य शरीरयष्टि यांबरोबरच वृत्ति मात्र शांत व दयाळु असे. मुसलमान

होते तरी कोणताहि तामस आहार हे सेवीत नसत. रोज दोनतीन स्नानें व पांच वेळां निमाज पढत असत. मुलें किंवा फकीर यांच्या मेळ्यांत हे सदोदित राहत. निरिच्छ व निस्पृह अशी यांची वृत्ति होती. यांची व्यायामशाळा एका झोपडींत असे. मात्र तेथें मोठ्या लोकांची रहदारी असे.

यांना अस्थिसंधीची विद्या उत्कृष्टपणें येत असे. यांच्यापासूनच प्रो. माणिकराव यांनीं अस्थिसंधानविद्या संपादन केली. याशिवाय पोहणें, घोड्यावर बसणें वगैरे विद्यांत हे निष्णात होते.

गोरगरिबांना अन्नदान करणें हें यांचें मुख्य व्रत असे. त्यामुळें फकीर नेहमीं यांच्याकडे येत. कित्येक वेळां तर मिठाई मागवून हे वांटीत. शेवटीं सर्व वांटून शिल्लक न उरल्यानें उपाशीं राहण्याचाहि प्रसंग यांच्यावर येई. विद्यार्थी अतिथि वगैरेंबद्दल अशा औदार्याच्या यांच्या गोष्टी पुष्कळ आहेत. खंडेरावमहाराजांच्या पश्चात् यांनीं सरकारी नोकरी सोडली व अस्थिसंधानविद्येवर हे उपजीविका करूं लागले. पुढें प्रो. माणिकराव तयार झाल्यानंतर यांनीं तेंहि करणें सोडलें. यांनीं अनेक गुरूंपासून कुस्ती बिनोट, लकडी, कटयार, मल्लखांब वगैरे विद्या संपादन केल्या होत्या. यांचें घर व आई जामनगरास होतीं. पुढें आई वारल्यावर घर यांनीं आप्तांना देऊन टाकलें. शेवटीं यांनीं आपल्या अनेक शिष्यांपैकीं माणिकराव यांना आपली तलवार, नमिदातुरी व एक ताईत देऊन आपली व्यायामसंस्था चालविण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें जुम्मादादा व्यायाममंदिर सध्यां ते चालवीत आहेत. अस्थिसंधानाचें कामहि ते चांगल्या प्रकारें करतात (वि. स. वाकसकर).

जेधे, केशवराव मारुतराव—(जन्म स. १८९६) सुप्रसिद्ध राष्ट्रसभा-कार्यकर्ते व मराठा समाजाचे पुढारी.

हे पुणें येथील राहणारे असून यांचें शिक्षण पुणें हायस्कूल व फर्ग्युसन कॉलेज, पुणें, येथें झालें. हे जातीनें मराठा असून विद्यार्थी असतांनाच यांनीं ब्राह्मणेतर पक्षाच्या कामांत पुढाकार घेण्यास सुरवात केली (१९१८). लो. टिळक इंग्लंडहून परत आले तेव्हां यांनीं त्यांच्या स्वागताला व मानपत्राला ते सुधारणाविरोधी म्हणून विरोध केला (१९२०). प्रिन्स ऑफ वेल्सच्या स्वागताकरितां स्वयंसेवकांची उभारणी केली (१९२१), पुण्याचें शिवस्मारक केवळ मराठ्यांचेंच असावें म्हणून यांनीं ' शिवस्मारक ' नांवाचें साप्ताहिक पत्र काढलें (१८२३) व शेवटीं दैनिक ' मजूर ' पत्र काढून ब्राह्मणजातीवर कडक टीका करण्यास यांनीं सुरवात केली (१९२४). पुणें नगरपालिकेंत सभासद म्हणून निवडून आले असतां यांनीं नगरपालिकेतर्फे सुप्रसिद्ध समाजसुधारक व ब्राह्मणविरोधक म. जोतिराव फुले यांचा पुतळा उभारण्याची चळवळ सुरू केली. कै. दिनकरराव जवळकर यांच्या सहकार्यानें ' कैवारी ' नांवाचें मराठी साप्ताहिकहि यांनीं मुंबईस सुरू केलें होतें (१९२७). मुंबईप्रान्त शेतकरी-परिषदेचे हे जनरल सेक्रेटरी असतां त्या परिषदेतर्फे स्मॉल-होल्डिंग बिलाला यांनीं विरोध केला (१९२८).

' देशाचे दुष्मन ' नांवाचें जातीजातींत वैमनस्य उत्पन्न करणारें पुस्तक लिहिल्याबद्दल यांना जवळकरांच्यासह सहा महिन्यांची शिक्षा झाली होती. पण अपिलांत हे निर्दोषी म्हणून सुटले. अस्पृश्यांच्या पर्वती-सत्याग्रहांतहि यांनीं पुढाकार घेतला होता. येथून पुढें मात्र जातिविषयक चळवळी सोडून राष्ट्रीय सभेच्या कायदेभंगाच्या चळवळींत यांनीं भाग घेण्यास सुरवात केली (१९३०-३२). यांना त्याबद्दल तुरुंगवासहि भोगावा लागला.

दिल्लीच्या कायदेमंडळांत महाराष्ट्र मध्यविभागाचे राष्ट्रसभेचे प्रतिनिधि म्हणून श्री. न. वि. गाडगीळ, यांचेबरोबर यांची प्रचंड बहुमतानें निवडणूक झाली (१९३५). तेथील यांचें कामहि तडफदार झालें. यानंतर म. प्रां. कॉं. कमिटीचेहि हे अध्यक्ष होते (१९३८). ऑगस्ट १९४२ च्या ' चलेजाव ' चळवळींत यांना दोन वर्षें तुरुंगांत विनाचौकशी ठेवण्यांत आलें.

प्रथम ब्राह्मणेतर चळवळींत झालेल्या अतिरेकानें ब्राह्मणेतरांचें हित होणें अशक्य अशी खात्री झाल्यानंतर राष्ट्रसभेच्या व्यापक व विधायक कार्यांत यांनीं भाग घेण्यास सुरवात केली व ब्राह्मणेतर समाजाला विधायक कार्याचें उत्तम वळण दिलें. कोणतेंहि काम मनापासून व तडफदारपणें करण्याबद्दल यांची प्रसिद्धि आहे.

सखारामपंत, बाबुराव व हे असे तिघे भाऊ आहेत. सखारामपंत वडिलार्जित समयांचा कारखाना, भांड्यांचें दुकान व दोन लाख भांडवलाचा ' मेटल शीट वर्क्स ' नांवाचा मोठा कारखाना चालवितात. बाबुराव श्रीशिवाजी मराठा सोसायटी, मराठा फ्री बोर्डिंग वगैरे संस्थांचे आधारस्तंभ आहेत. या दोघां बंधूंच्या सहकार्यामुळेंच यांना आपला आवडता सार्वजनिक चळवळीचा व्याप चालविणें शक्य झालें आहे.

जोग, विष्णुबुवा—(जन्म स. १८६४–मृत्यु स. १९२०) सुप्रसिद्ध मल्लविद्याविशारद, भागवतधर्म-प्रचारक व ग्रंथकार.

यांचें घराणें पुणें येथें प्रसिद्ध होतें. यांचे बंधु पिलोबा, गुण्याबाबा व पांडोबा तालीमबाज मल्ल आणि पट्टीचे पोहणारे म्हणून प्रसिद्ध होते. पांडोबा हे नगरकरांच्या तालमींचे वस्ताद होत. कै. वासुदेवराव देशमुख, भाऊ-साहेब गोखले, महाराज वामनराव लिमये ही मंडळी त्यांच्या परंपरेंतील होत. मल्लविद्येबरोबरच वारकरी संप्रदायाचे ते अनुयायी होते. तेच सर्व संस्कार यांच्यांत-हि असत. यांचें शालेय शिक्षण मराठी लिहितां वाचतां येण्याइतपत होतें. यांनीं विवाह न करितां नैष्ठिक ब्रह्मचर्य पत्करिलें.

तरुणपणींच यांनीं अमृतानुभव व ज्ञानेश्वरी या ग्रंथांचें अध्ययन कै. नानामहाराज साखरे यांच्यापाशीं केलें. त्यांच्याचपाशीं 'वासुदेवमनन' या ग्रंथाचेंहि यांनीं मनन केलें. केशवानंद उदासी यांचें 'शारीरशास्त्र' यांनीं साद्यन्त श्रवण केलें. पण यांच्या मनाला शांति मिळेना. तेव्हां हे काशीच्या श्रीकृष्णानंदस्वामींकडे गेले. तेथें स्वामींच्या जवळ यांनीं भाष्य ऐकलें. नंतर आळंदीस श्रीज्ञानेश्वरमहाराजांजवळ अनुष्ठान केलें तेव्हां यांना शांति प्राप्त झाली.

ज्ञानेश्वरीवर यांची अलोट श्रद्धा होती. ज्ञानेश्वरीच्या प्रचारार्थ आपला जन्म आहे असें यांना वाटे. यांचें जीवितध्येय ज्ञानेश्वरी व अमृतानुभव यांची चर्चा, निरूपण व पारमार्थिक ग्रंथलेखन हें ठरलें. यांनीं वारकरी संप्रदायाचें पद्धतशीर शिक्षण देण्याचें कार्यहि जन्मभर केलें. शिवाय तसें शिक्षण देणारी 'वारकरी शिक्षणसंस्था' काढून तिच्याकरितां स्वतःचे पंचवीस हजार रुपये खर्च केले. भव्य शरीरयष्टि, निरभिलाष वृत्ति, सरळ व सडेतोड प्रतिपादन यांमुळें यांची लोकांवर छाप असे.

कै. बंकटस्वामी, कै. मारुतिबुवा गुरव आळंदी, सर परशुरामभाऊ कॉलेजचे प्रिंसिपल शं. वा. दांडेकर व लक्ष्मणबुवा इगतपुरीकर वगैरे यांचे प्रमुख शिष्य होत. यांचे अनुयायी मराठी बोलणाऱ्या सर्व महाराष्ट्रभर पसरलेले आहेत.

यांचें वाङ्मय—१ महीपतीनें निवडलेले ज्ञानेश्वरींतील वेंचे (सार्थ), २ तुकारामाच्या अभंगाचा गाथा (सार्थ), ३ चांगदेव पासष्टी (सार्थ), ४ हरिपाठ (सार्थ), ५ अनुभवामृत (सार्थ), ६ वेदान्तविचार (सार्थ).

जोशी, डॉ. आनंदीबाई—(जन्म स. १८६५–मृत्यु स. १८८७ फेब्रु. २७) परदेशीं जाऊन शिक्षण घेतलेली पहिली महाराष्ट्रीय महिला.

यांचा जन्म पुणें येथें झाला. यांचे वडील गणपत-राव केतकर हे कल्याणचे इनामदार होते. यांचा विवाह ठाण्याचे त्या वेळचे पोष्टमास्तर गोपाळ विनायक जोशी यांच्याशीं वयाच्या दहाव्या वर्षी झाला. हेच गोपाळराव पंचहौदमिशन प्रकरणाचे उत्पादक व महाराष्ट्रांतील विचित्र व्यक्ति म्हणून पुढें प्रसिद्धीस आले. त्यांनीं आपल्या ह्या द्वितीय पत्नीच्या विद्याभ्यासाकडे निर-निराळ्या गैरसोयी सहन करून प्रथमपासूनच चांगलें लक्ष ठेविलें व नंतर डॉक्टरच्या परीक्षेसाठीं यांना अमेरिकेंत पाठविलें.

ह्या निसर्गतः बुद्धिमान् होत्या. एक महाराष्ट्रीय तरुण ब्राह्मण स्त्री एकटीच परदेशीं जाणार हें ऐकून लोकांत अनेक शंका कुशंका निघूं लागल्या. परंतु श्रीरामपूरच्या कॉलेजांतील आपल्या व्याख्यानांत यांनीं अमेरिकेला आपल्या एकटेपणानें जाण्याची मीमांसा व अमेरिकेसारख्या सुधारक देशांतून आपण हिंदु आणि ब्राह्मण या स्थितींत परत येणें संभाव्य आहे वगैरे मुद्यावर उत्तररूप असें उत्कृष्ट व्याख्यान दिलें.

स. १८८३ च्या एप्रिलमध्यें या कलकत्त्याहून अमेरि-केस गेल्या. तेथें यांचा मुक्काम रोझेल येथें कार्पेंटर नामक कुटुंबांत होता. मिसेस कार्पेंटर यांनीं यांची सर्व व्यवस्था लावून देऊन फिलाडेल्फिया येथील स्त्रियांच्या वैद्यकीय पाठशाळेंत यांच्या शिकण्याची योजना केली. यांच्या हुशारीमुळें तेथील युनिव्हर्सिटीनें यांना यांच्या निर्वाहापुरती स्कॉलर्शिप दिली. तीन वर्षांचा नियमित अभ्यास पूर्ण होऊन या डॉक्टरीची शेवटची एम्. डी. ची परीक्षा पास झाल्या. पदवीदान प्रसंगीं 'वुइमेन्स फिलाडेल्फिया कॉलेज'च्या चॅन्सेलरनें यांच्या विद्वत्तेची बरीच प्रशंसा केली. यांच्या यशाची बातमी हिंदुस्थानांत पोहोंचतांच कोल्हापुरास आबासाहेब कागलकरांनीं स्त्रियांकरितां एक इस्पितळ बांधण्याचें ठरवून त्यावर यांची द. म. ३५० रु. वर नेमणूक केली. पण त्या कामावर रुजू होण्यापूर्वीच, मुंबईस क्षयानें या मृत्यु पावल्या.

जोशी, गणेश कृष्ण—(जन्म स. १८६७–मृत्यु स. १९२२) अभिनयप्रधान गद्य नाटकांचे प्रवर्तक व अभिनयकुशल नट.

यांचें घराणें मूळचें आडिवरें (जि. रत्नागिरी) येथील. घरची स्थिति गरिबीची. वडील लहानपणींच वारल्यानें दहाव्या वर्षीच मधुकरीला कंटाळून हे कार्लेकर नाटक मंडळींत पळून गेले. यांनीं आपल्या काम करण्याच्या कौशल्यानें तेथें बरीच प्रसिद्धि मिळविली. १८८१ मध्यें ती मंडळी बंद पडली. त्याच सुमारास रा. कृ. ब. जोशी यांनीं ठाणें येथें शाहूनगरवासी नाटक मंडळी काढली; तींत हे गेले. ही मंडळी पहिलीं ७।८ वर्षें पौराणिक नाटकें करीत असे. नंतर बदलत्या अभिरुचीस अनुसरून त्या मंडळीनें गद्य नाटकें करण्यास सुरुवात केली. याच सुमारास महाराष्ट्र रंगभूमीची सजावट, पडदे, सीनसिनरी वगैरेंनीं सुधारणा होऊं लागली होती. नवीन सजावटीनें या मंडळीनें बरेच खेळ बसविले; पण आर्थिक स्थिति सुधारेना. मंडळीचा मुक्काम पुण्यास होता (१८९१). तेथें प्रो. वासुदेव बाळकृष्ण केळकर यांनीं ही मंडळी हातासीं धरली. आणि यांच्या अंगच्या अभिनयाचा व विशेष प्रकारच्या अवाजाचा उपयोग होऊन यांचा व मंडळीचा लौकिक वाढत चालला.

या वेळेपर्यंत या मंडळीनें शेक्सपियरचीं झुंझारराव, हॅम्लेट, तारा व मंजुघोषा, मोचनगड, वीरकान्त-वीरसेन वगैरे इतर नाटकें रंगभूमीवर आणलीं. १८९२ सालीं त्या संस्थेनें ऐतिहासिक नाटकें बसविण्यास सुरुवात केली व त्या प्रयत्नांत चांगलेंच यश लाभलें. राणा भीमदेव या नाटकांत हे भीमदेवाची भूमिका करीत. त्यांतील आवाज, अभिनय व तद्रूपता यांमुळें प्रेक्षक भारले जात. यांच्या कामांतील सहजपणानें अभिनय म्हणजे काय हें लोकांना समजूं लागलें. याच सुमारास श्री. वासुदेव रंगनाथ शिरवळकरकृत तुकाराम या धार्मिक नाटकाचा प्रयोग करण्यांत आला. या नाटकांतील तुकारामाची भूमिका हे इतक्या हळुवारपणें करीत कीं, या विसाव्या शतकांतील तुकारामाच्या दर्शनार्थ भाविक प्रेक्षकांच्या उड्या पडत. प्रसंगानुसार उच्चार व अभिनय करण्याच्या कामांत यांचा त्या वेळीं अत्यंत लौकिक झाला. या नाटकाप्रमाणेंच त्राटिका, फाल्गुनराव व मानाजीराव (मॅक्बेथ) या नाटकांतील कामें करून सहज व सूक्ष्म भावना व्यक्त करणारा अभिनय करण्याच्या बाबत यांनीं रसिकांकडून धन्यवाद मिळविले.

यांचें शरीर साधारण बाळसेदार असे. पण आवाजाची देणगी यांना अपूर्व होती. त्यांत एक प्रकारची लहर असून कोणताहि भाव व्यक्त करण्याचें कसब त्यांत व्यक्त होई. हॅम्लेटसारख्या नाटकांत यांचें अभिनयकौशल्य आणि आवाजांतील फेरबदल करण्याचें कसब चांगलें व्यक्त होई. आईची निर्भर्त्सना करतांना यांच्या चेहऱ्याचा व आवाजाचा चढउतार असा कांहीं ठसकेबाज होत जाई कीं आईच्या विरुद्ध बोलतांना हा गृहस्थ अगदीं निरुपाय होऊन मोठ्या खेदानें बोलत आहे असा भास सर्वांना होई. मल्लिकेशीं बोलत असतां नर्म हास्यविनोद करण्यांत पटाईत असणाऱ्या माणसाचा आभास हे उत्पन्न करीत; तसेंच स्मशानांत खांचा खणणारांशीं बोलतांना असें खेळीमेळीचें वातावरण हे निर्माण करीत कीं जणूं कांहीं हे एक त्यांच्यापैकींच आहेत असें वाटे. प्रत्येक वाक्याचा उच्चार करतांना मनोविकाराचें प्रतिबिंब त्यांत हे असें उतरवीत कीं ऐकणारा या माणसाच्या कौशल्यानें दिपून जाई. मराठी रंगभूमीवर यांच्यासारखा नट अद्यापि झाला नाहीं. प्रथम यांच्या जोडीला बाळाभाऊ जोगांसारखे कुशल, स्त्रियांची भूमिका करणारे गृहस्थ होते. पण पुढें प्रायः यांच्या एकट्याच्या जिवावरच मंडळी चालत असे.

जोशी, गणेश वासुदेव—(जन्म स. १८२८ एप्रिल–मृत्यु स. १८८० जुलै २५) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते व वकील. हे 'सार्वजनिक काका' या नांवानें सुप्रसिद्ध होते.

यांचें घराणें मूळचें रत्नागिरीचें. यांचा जन्म सातारच्यास झाला. यांचे वडील वासुदेव शिवराम हे १८३० सालीं 'सदर अमीन'च्या जागेवर असतां मृत्यु पावले. तेव्हां त्यांच्या तीन मुलांस वयांत येईपर्यंत दरमहा सोळा रुपये व पत्नीस हयातीपर्यंत साडे-सदतीस रुपये पेन्शन चालू होतें. यांनीं सातारच्यास मराठी शिक्षण झाल्यावर पुण्याच्या नाझर कचेरींत नोकरी पत्करली (१८४८). पण सात आठ वर्षांनीं ती नोकरी गेली आणि यांनीं वकिलीची परीक्षा दिली (१८६५).

पुढें यांनीं थोडा इंग्रजीचाहि अभ्यास केला. वकिलीच्या धंद्यांतहि यांचा लवकरच चांगला बस बसला. आपल्या मातेच्या सांगण्यावरून यांनीं पुण्यास विष्णु मंदिर व हौद बांधला (१८६८). तें 'नव्या विष्णूचें मंदिर' म्हणून प्रसिद्ध आहे.

पुण्याची सुप्रसिद्ध 'सार्वजनिक सभा' यांनीं पुढाकार घेऊन स्थापिली (२ एप्रिल १८७०, वर्षप्रतिपदा). तात्कालिक निमित्त पुण्याच्या पर्वती संस्थानांतील अव्यवस्था दूर करणें हें असलें तरी दुसरींहि लोको-

पयोगी कामें करण्याचा उद्देश पुढें ठेवण्यांत आला. प्रथम समेत राजेमहाराजे, इनामदार, जहागीरदार वगैरेंचाहि समावेश असे. पण पुढें १८९६-९७ सालीं लो. टिळकांनीं सभा आपल्या मताच्या लोकांच्या हातीं घेतली आणि एकसंबेकर नांवाच्या सभेच्या प्रचारकानें काढलेल्या हस्तपत्रकामुळें सरकारनें सभेची राजमान्यता काढून घेतली. तेव्हांपासून तिच्यांत सरकारशीं संबंध असलेले लोक भाग घेत नाहींत.

मुंबईस 'बॉंबे असोसिएशन', कलकत्त्यास 'ब्रिटिश इंडियन असोसिएशन' तशी पुण्यांत 'सार्वजनिक सभा' होती. पर्वती संस्थानचें प्रकरण संपल्यावर पुणें शहर सुधारणा, कायद्याचे मसुदे देशी भाषेंत प्रसिद्ध व्हावेत म्हणून खटपट, मुंबई हायकोर्टांत एतद्देशीय न्यायाधीश नेमण्याची खटपट व त्याप्रमाणें नानाभाई हरिदास यांची हायकोर्ट जज म्हणून नेमणूक, ज्यूरीचे हक्क, रेल्वे-उताऱ्यांच्या तक्रारी, नगरपालिकेंत लोकनियुक्त सभासदांच्या नेमणुका, संस्थानिक व सरकार यांच्या परस्पर संबंधाविषयीं सरकारास सूचना करणें, सरकारनें नेमलेल्या चौकशीकमिशनपुढें साक्ष देण्यास प्रतिनिधि पाठविणें, महाराष्ट्रांतील सर्व जिल्ह्यांची सांपत्तिक पाहणी करून वृत्तान्त प्रसिद्ध करणें (१८७२), हिंदुस्थानचा प्रतिनिधि कॉमन्स सभेंत घेण्याविषयीं मागणी करणें (१८७४), दुष्काळकमेट्या नेमणें, मदतीकरितां निधि गोळा करणें, दुष्काळाकडे लक्ष वेधण्याकरितां देशी-परदेशी पत्रांत लेख लिहिणें वगैरे कामें करण्यांत हे पुढाकार घेत. माधवराव रानडे यांना सर्व प्रकारें सहाय्य करीत, पण सरकारी नोकर असल्यानें ते आपलें नांव कोठें येऊं देत नसत.

देशाच्या वाढत्या दारिद्र्यावर स्वदेशी वस्तूंच्या प्रचारासारखा दुसरा उपाय नाहीं असें ठरतांच यांनीं 'देशी व्यापारोत्तेजक मंडळ' नांवाची संस्था काढली, तिच्यामार्फत जागोजाग देशी मालाचीं दुकानें उघडलीं व स. १८७२ जानेवारी १२ रोजीं देशी कापड वापरण्याची शपथ घेऊन आपल्या जुन्या पोषाखास रजा देऊन खादीचीं दाभणकाठी धोतरें, कंदी पागोटें व खादीचा अंगरखा हा जाडाभरडा पोशाख घालून यांनीं स्वदेशीचें व्रत जन्मभर निष्ठेनें चालविलें. यांच्या स्वदेशीची व्याख्या सूक्ष्म असल्यानें स्वतः सूत काढून घरच्या मागावर विणलेला कपडा हे वापरीत असत. स्वदेशी छत्र्या, काड्याच्या पेट्या व देशी माग यांचा कारखाना आपल्या घरीं काढून यांनीं बरीच झीज सोसली.

बडोद्याचे महाराज मल्हारराव गायकवाड यांची कर्नल फेअरवर विषप्रयोग केल्याबद्दल कमिशनपुढें चौकशी चालली असतां दोन लक्षांपेक्षां अधिक खर्च संस्थानच्या तिजोरींतून होणार नाहीं असा हुकूम निघाला. तेव्हां यांनीं एक लक्ष रुपये एका पेढीवर ठेवून लोकांतर्फे जरूर तो खर्च करण्याचें आश्वासन दिलें व कमिशनमध्यें देशी लोक असावेत असा सभेतर्फे अर्जहि व्हाइसरॉयला केला.

यापुढें सावकार व कुळें यांच्यांत बेबनाव होऊन त्याचें पर्यवसान दंग्यांत झालें. ऋणमुक्त होण्याच्या हेतूनें सावकारांजवळील कागद-पत्रें जाळणें, त्यांचे नाक-कान कापणें व लूट करणें हें या दंग्याचें सामान्य स्वरूप असे. या दंग्याला प्रथम सुरुवात पुणें जिल्ह्यांतील सुप्यास झाली व पुढें हे दंगे इतर जिल्ह्यांत पसरले. या दंग्याची सार्वजनिक सभेमार्फत यांनीं चौकशी करून दंग्याचीं कारणें व त्यांवरील उपाय सुचविले. त्याला अनुसरून 'दक्षिणेतील शेतकऱ्यांचा कायदा' पास करण्यांत आला.

लवादकोर्टाची स्थापना, कलकत्त्यास व मुंबईस वर्तमानपत्रकारांची परिषद भरविणें (१८७८ जाने. व मार्च), शेतकी कमिशनच्या वेळीं शेतकऱ्यांची बाजू योग्य तऱ्हेनें मांडणें, बंडवाले वासुदेव बळवंत फडके यांचें वकीलपत्र घेण्यास कोणी धजत नसतां त्यांचें वकीलपत्र घेऊन काम चालविणें, जळालेला विश्रामबाग वाडा बांधण्याकरितां निधि उभारणें वगैरे अनेक कार्यें करीत यांनीं आपला देह सार्वजनिक कार्याकरितां चंदनाप्रमाणें झिजविला. अफगाणिस्थानच्या अमीराकडे जाऊन रदबदली करण्याचीहि तयारी यांनीं सरकारला कळविली होती. सुरतेच्या दंग्यामुळें तेथील वकीलांवर संकट आलें असतां हे त्यांच्या मदतीकरितां गेले होते.

यांच्या स्मारकाकरितां सहा हजार रुपये वर्गणी जमली. त्यांत नऊ हजार रुपये घालून 'सार्वजनिक सभेचा दिवाणखाना' खरेदी करण्यांत आला. सार्वजनिक सभा, तिचा दिवाणखाना व दिवाणखान्याशेजारील जोशी हॉल हीं यांचीं स्मारकें होत.

जोशी, गणेश व्यंकटेश—(जन्म स. १८५१ जून ८–मृत्यु स. १९११ मे २०) महाराष्ट्रीय अर्थशास्त्रज्ञ व राजकारणी पुरुष.

यांचा जन्म मिरजेस झाला. यांचे वडील मिरज संस्थानचे पोतनीस होते. यांचे आजोबा स. १८१८ त

मिरजकरांच्यातर्फे पेशव्यांकडे वकील असून त्या वेळच्या इंग्रजांबरोबर झालेल्या अखेरच्या चकमकींत सामील होते. हे बी. ए.च्या परीक्षेंत तर्कशास्त्रामध्ये पहिले आले. विद्याभ्यास संपल्यावर यांनीं शाळाखात्यांत नोकरी धरली (१८७३). या वेळेपासूनच यांनीं लोकोपयोगी कामास प्रारंभ केला. हे उत्तम शिक्षक म्हणूनहि प्रख्यात होते. नाशिक, रत्नागिरी, मुंबई, सोलापूर, सातारा, पुणें वगैरे ठिकाणीं यांनीं नोकरी केली. हे १९०७ सालीं सेवानिवृत्त झाले. यांची राहणी अगदीं साधी होती. हे अत्यंत विनयशील पण धर्मनिष्ठ गाणपत्य व नियमित वागणारे होते. यांचा आवडता विषय आंकडेशास्त्राचा. सरकारी अहवालांतील आंकडे घेऊन त्यांची तुलना परराष्ट्रांतील जमाखर्चाशीं करून हिंदुस्थानची दारिद्र्यावस्था यांनीं सिद्ध केली. यांचें कोणतेंहि विधान निराधार नसे, त्यामुळें सरकारास तें मान्य करावें लागे. टाइम्स ऑफ इंडियांत यांचे लेख 'J' अशा इंग्रजी सहीनें येत. यांचें अध्ययन व विद्वत्ता इतकी मोठी असे कीं, न्या. म. गो. रानडे हेहि यांची सल्ला घेत. ना. गो. कृ. गोखल्यांनीं वेल्बी कमिशनपुढें जी साक्ष दिली तिची सर्व तयारी यांनींच करून दिली. तसेंच सुरेंद्रनाथ बानर्जी, ना. सयानी, रमेशचंद्र दत्त यांनाहि वेळोवेळीं यांची मदत होत होती. सार्वजनिक सभा त्रैमासिक, इंडियन रिव्ह्यू, मराठा वगैरे नियतकालिकांत यांचे लेख आलेले आहेत.

मुंबईच्या कायदे-कौन्सिलचे हे सभासद होते. हे १९०८ सालीं धुळें येथें भरलेल्या मुंबई प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष होते. यांचीं भाषणें माहितीनें भरलेलीं असत. महाराष्ट्रांतील सर्व राजकीय पुढारी यांना मान देत. शिक्षण सार्वत्रिक व मोफत करावें अशी यांची इच्छा होती. यांचा अंत अंतर्गळाच्या विकारानें झाला. शेवटपर्यंत यांचें अध्ययन सुरू होतें. यांच्या बहुतेक लेखांचें व भाषणांचें एक पुस्तक यांच्या चिरंजिवांनीं १९१२ सालीं प्रसिद्ध केलें.

जोशी, गंगाधरशास्त्री—(जन्म स. १८७३–मृत्यु स. १९३६) पुण्यांतील व्यासंगी वैद्य व चिकित्सक शास्त्रज्ञ.

यांचा जन्म व शिक्षण पुणें येथें झालें. यांनीं कै. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या हाताखालीं पुष्कळ वर्षें काम केलें (१९००–१९१६). यांचा वनस्पतींचा अभ्यास चांगला होता म्हणून त्यांच्या प्रदर्शनाचा भाग यांच्याकडे सोपविण्यांत आला (१९१७). हे आयुर्वेद महाविद्यालय, पुणें येथें डॉ. गणनाथ सेन यांचें 'प्रत्यक्ष शारीर' शिकवींत असतां त्यांतील 'शारीरे सुश्रुतो नष्टः' हा शेरा, व रोहिणी (Artery), नीला (Vein), धमनी वगैरे शब्द चुकीच्या अर्थानें वापरल्याचें यांनीं दाखविलें. त्याकरितां सुश्रुताचें इंग्रजी भाषान्तर करून यांनीं तें प्रसिद्ध केलें. पुढें डॉ. गणनाथ सेनांनीं 'संज्ञापंचकविमर्शः' हा निबंध प्रसिद्ध करून आपलेंच म्हणणें बरोबर असल्याचें लिहिलें. तथापि यांचा दोन हृदयांचा (छाती व मस्तक 4th Ventricle) सिद्धान्त मात्र त्यांनीं म्हैसूर संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांत मान्य केला. यांनीं कै. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या स्मारकार्थ आठ हजार रुपये जमवून त्याच्या व्याजांतून 'आयुर्वेद पारंगत' होणाराला शिष्यवृत्ति देण्याची व्यवस्था केली आहे.

जोशी, गोविंद महादेव—(जन्म स. १८९५ मार्च २४) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध अभ्यासक, नवविचारप्रवर्तक, वक्ते आणि ग्रंथलेखक.

बी. ए. झाल्यानंतर यांनीं शिक्षकाचा व्यवसाय पत्करला. संस्कृत, इंग्रजी, गणित, समाजशास्त्र, धर्मशास्त्र व ज्योतिष या विषयांचा यांचा व्यासंग मूलग्राही पद्धतीचा आणि नवा दृष्टिकोन व्यक्त करणारा आहे. हे पूर्ण आधुनिक जगांत वावरत असूनहि सनातन वैदिक धर्माच्या मूल तत्त्वांचें स्पष्टीकरण हे आधुनिक समाजशास्त्रज्ञांच्या ग्रंथाधारें उत्कृष्ट व निरुत्तर करण्याच्या पद्धतीनें करतात. बहुजनसमाजाच्या विचारप्रवाहाविरुद्ध प्रतिपादन करून लोकांना विचार करावयास भाग पाडण्याची शक्ति यांच्या प्रतिपादनांत आहे.

समाजजीवन मासिक (१९३९–४२) व इतर नियतकालिकें यांमधून समाजशास्त्रावर हे सतत लिहीत असतात.

यांचे ग्रंथ—१ हिंदूंचें समाजरचनाशास्त्र. याचें गुजराथी भाषान्तर श्री. लीलाधर जीवनराव यादव, बी. एससी. सी.ई. यांनीं करून प्रसिद्ध केलें, २ धर्मशास्त्रविचार परीक्षण (१९३३), ३ हिंदूंचें अर्थशास्त्र (भाग पहिला १९३७), ४ सनातन धर्माचें स्वरूप (१९४०).

जोशी, रावबहादूर नरहर सदाशिव—(जन्म स. १८९३) सुप्रसिद्ध स्थापत्यविशारद व बॉंबे सेंटर ऑफ दि इन्स्टिट्यूशन ऑफ एंजिनिअर्स (इंडिया), येथील १९४५ सालचे अध्यक्ष.

यांचें शिक्षण पुणें येथें नूतन मराठी विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज व कॉलेज ऑफ एंजिनिअरिंग या संस्थांत होऊन हे बी. ई. झाले. मेंबर ऑफ दि इन्स्टिट्यूट ऑफ एंजिनिअर्स, इंडिया व मेंबर ऑफ दि रॉयल सॅनिटरी इन्स्टिट्यूट लंडन, होण्याचा मानहि यांना मिळला आहे. सध्यां हे नीरा कॅनल डिव्हिजन, पुणें या विभागांत एक्झिक्युटिव्ह एंजिनिअर आहेत. बॉंबे एंजिनिअरिंग कॉंग्रेसचे १८ वर्षे व इन्स्टिट्यूट ऑफ एंजिनिअर्सचे १७ वर्षे ते सभासद असून दोन्ही संस्थांच्या वार्षिक अधिवेशनांत यांनीं अनेक निबंध वाचले. याबद्दल बॉंबे एंजिनिअरिंग कॉंग्रेसकडून पदक व इन्स्टिट्यूशन ऑफ एंजिनिअर्स व्हाइसरॉय पारितोषिक यांना देण्यांत आलें.

पाणी सांठविण्याचीं धरणें व पाटबंधारे या विषयाचे हे विशेष अभ्यासक असून बृहन्महाराष्ट्रांतील शेती व पाणीपुरवठा या विषयाचा यांचा सूक्ष्म अभ्यास आहे. दक्षिण हिंदुस्थानांतील भूगर्भभागाचा (ट्रॅप रॉक्) यांनीं विशेष अभ्यास केलेला असून भूगर्भांतून उसळून आलेल्या लाव्हापासून हा खडक कसा तयार झाला ह्यासंबंधीं यांनीं अगदीं नवी उपपत्ति बसविली आहे. यांनीं प्रचलित लिपींचा तुलनात्मक अभ्यासहि केला असून लिपि ध्वनिशुद्ध करण्याकरितां एक अगदीं नवी पद्धति यांनीं बसविली. ह्या ध्वनिशुद्ध पद्धतीनें तारा देण्याकरितां मॉर्सकोड्ऐवजीं यांनीं ध्वनिशुद्ध लिपिहि तयार केली असून ती व्यवहारांत आणिली गेली आहे. या नव्या पद्धतीनें हिंदुस्थानांतील सर्व भाषांतील तारा बिनचूक देतां येतात.

परंतु सरकारी नोकरींत असतांनाहि बदलत्या राजकीय परिस्थितीपासून यांनीं आपल्या विचारांना कधींहि दूर जाऊं दिलें नाहीं. त्याप्रमाणें हक्कांकरितां वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं झगडण्याचा प्रसंग आला असतां हे मागें सरकले नाहींत. इतकें असूनहि यांच्या कार्यांतील सफाईमुळें यांना रावबहादूर ही पदवी देणें सरकाला भाग पडलें.

यांनीं आजपर्यंत एकविसांपेक्षां अधिक निबंध इंग्रजींत लिहिले असून त्यांत कालवे, भूपृष्ठाखालील पाणी, बांधकामाच्या सामानाचें आकुंचन-विकास, या विषयांबरोबरच हिंदुस्थानांतील भाषांना योग्य (ध्वनिशुद्ध) तारलिपि, महाराष्ट्रांतील काळा खडक कसा बनला, वगैरे अगदीं भिन्न क्षेत्रांतील विषय आहेत. त्यांच्या प्रसिद्धीचीं ठिकाणें इन्स्टिट्यूशन ऑफ एंजिनियर्स (इंडिया), बॉंबे एंजिनियरिंग कॉंग्रेस, म्हैसूर एंजिनियर्स असोसिएशन, इंडियन सायन्स कॉंग्रेस हीं आहेत.

जोशी, नारायण मल्हार—(जन्म स. १८७९) कामगारांचे सुप्रसिद्ध पुढारी, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे माजी सभासद व त्यागी सार्वजनिक कार्यकर्ते.

प्राथमिक शिक्षण सहा इयत्तांपर्यंत झाल्यावर यांना शाळेंतून काढून जोसपणाची वृत्ति संभाळण्याकरितां तीन वर्षेपर्यंत संहितेपर्यंतचें वैदिक शिक्षण देण्यांत आलें. यांचे बंधु महादेवराव यांना तें न पटून यांना पुण्यांत करंदीकर-लवाटे वगैरे मित्रांनीं चालविलेल्या न्यू प्रिपरेटरी क्लासेसमध्यें घालून वर्ष दीड-वर्षांत इंग्रजी चार इयत्तांचें शिक्षण देण्यांत आलें. नंतर न्यू इंग्लिश स्कूलमधून हे मॅट्रिक व डेक्कन कॉलेजांतून बी. ए. झाले. पुढें नगर व पुणें येथें खाजगी शाळांत, तसेंच मुंबई व रत्नागिरी येथें सरकारी शाळांत नोकरी करून यांनीं शिक्षकाचाच पेशा पत्करून हे एस. टी. सी. झाले. पण नामदार गो. कृ. गोखले यांनीं काढलेल्या भारत सेवक समाजास हे येऊन मिळाले (१९०९) व यांनीं आपणास मजूर संघटनेस वाहून घेतलें.

स. १९१६ सालीं लढाईचे दिवसांत ज्ञानप्रकाशचे प्रतिनिधि म्हणून हे मेसापोटेमियांत जाऊन आले. सेंट्रल लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे हे आज चोवीस वर्षे सभासद असून ज्येष्ठत्वाच्या नात्यानें 'फादर ऑफ दि असेंब्ली' या मानाच्या पदवीस पात्र झाले आहेत. राउंड टेबल कॉन्फरन्स, मजूर परिषद् वगैरे निरनिराळ्या निमित्तांनीं हे सुमारें सोळा वेळां युरोपला व एक वेळ अमेरिकेला जाऊन आले आहेत.

हिन्दी मजुरांची व कामगारांची दुःस्थिति तिकडील पुढाऱ्यांपुढें मांडून, प्रसंगीं त्यांच्याशीं भांडून यांनीं त्यांना बरीचशी सुस्थिति प्राप्त करून दिली. या यांच्या कामगिरीमुळें हे केवळ हिंदुस्थानांतच नव्हे तर सबंध जगांत प्रसिद्धि पावले आहेत. हे हल्लीं भारतसेवक समाजांतून निवृत्त झाले असले तरी यांचीं पूर्वीचीं सर्व कामें पूर्वीच्याच जोमानें चालू आहेत.

कोणतेंहि काम असो, तें हातीं घेतलें कीं त्याचा पिच्छा पुरवावयाचा, त्यांतल्या तपशीलाच्या गोष्टींकडे बारकाईनें लक्ष पुरवावयाचें असें यांचें धोरण असल्यानें यांनीं काम करतांना जिवाकडे केव्हांहि पाहिलें नाहीं. यांची चिकाटी दांडगी असून पद्धतशीर काम करण्याच्या

संवयीमुळें यांच्या हातून इतकी भरीव कामगिरी होऊं शकली. वक्तृत्व, भाषेचा शृंगार किंवा कल्पनेची भरारी नसूनहि यांचें भाषण किंवा लेखन परिणामकारक झाल्याशिवाय राहत नाहीं. याचें कारण प्रतिपाद्य विषयाची भरपूर माहिती व सयुक्तिक कोटिक्रम हें होय. सर्व पक्षांतील लोकांना यांच्याविषयीं आदर वाटतो व सर्वांना यांच्या मताचा विचार करावा लागतो, याचेंहि कारण हेंच होय.

जोशी, नारायण विष्णु—(जन्म स. १८८५) सुप्रसिद्ध सूक्ष्म जंतुशास्त्रज्ञ व संशोधक.

रत्नागिरी जिल्ह्यांतील बास्नी गांवीं यांचा जन्म व प्राथमिक शिक्षण झालें. पुढील शिक्षण मुंबईस होऊन १९०४ सालीं हे बी. ए. झाले. बी. ए.करितां वास्तव व रसायन हे यांचे विशेष विषय होते. १९०७ सालीं शेतकी कॉलेजांतून बाहेर पडलेल्या सुरवातीच्या पदवीधरांपैकीं हे एक होत. १९०८ सालीं यांनीं पूना अग्रिकल्चरल कॉलेजांत प्रवेश करून रसायनशास्त्रांत विशेष प्राविण्य दाखविलें. त्यामुळें दोन वर्षांत इंपिरियल अग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट पुसा (बिहार) या मध्यवर्ति संस्थेंत जंतुशास्त्राच्या संशोधनाची शाखा प्रथमच उघडण्याकरितां यांची नेमणूक झाली. याप्रमाणें संशोधन शाखेंतील प्रमुख संशोधकाच्या जागेवर यांची नेमणूक झाली. यांनीं लावलेंल्या शोधांपैकीं पुढील महत्त्वाचे आहेत.

१ शेतीला हिरव्या पाल्याचें खत लावण्याचें यांचें संशोधन तागाच्या सालीचा धागा व पानाचें खत अशा दुहरी तन्हेनें यशस्वी ठरलें.

२ यांनीं तीन सूक्ष्म जंतूंच्या जाती शोधून काढल्या. दुधाचें दहीं करणारे, वनस्पतींतील सेल्युलोजची विघटना करणारे व नैट्राइट हें रासायनिक द्रव्य सिद्ध करणारे जंतु. यांच्या या संशोधनास फारच महत्त्व आहे.

३ सशृंग शेंगेच्या मूळावर असलेल्या गांठीमधील हवेंतील नैट्रोजन शोषून घेणाऱ्या जंतूंच्या शोधाबद्दल यांना एम्. एससी. ही पदवी मिळाली.

४ यांनीं शेणासंबंधीं केलेलें नवीन संशोधनहि असेंच महत्त्वाचें आहे. शेणांत बराच भाग सेल्युलोजचा व थोडा नैट्रोजनचा असतो. आजपर्यंत या दोहोंपैकीं एका कार्यासाठीं शेणाचा उपयोग करतांना दुसऱ्या तत्त्वाचा नाश पत्करावा लागत असे. यांनीं तयार केलेल्या भट्टींत शेणांतील तान्तव द्रव्याचा वायु बनून त्याचा जळणासारखा उपयोग होतो व खताला उपयोगी पडणारा नत्रभागहि सुरक्षित राहतो. याप्रमाणें गुरांच्या शेणापासून विजेचे दिवे, पंखे, रेडिओ वगैरे चालविता येतात. या तन्हेची भट्टी औंधच्या राजेसाहेबांनीं आपल्या वाड्यामध्यें व वालचंद नगरांत बसविली आहे. आतां लहानमोठ्या भट्ट्या सर्वत्र मिळतील अशी योजना करण्याच्या प्रयत्नांत हे आहेत.

जोशी, पुरुषोत्तम बाळकृष्ण—(जन्म स. १८५६–मृत्यु स. १९३०) मराठी भाषेंतील कवि, इतिहाससंशोधक व सार्वजनिक कार्यकर्ते.

यांचा जन्म मुंबईस झाला. पुढील शिक्षण विल्सन कॉलेजांत झालें. मराठींत कविता करणें, ऐतिहासिक संशोधन करणें आणि मराठी व इंग्रजी भाषेंत लिहिण्याचा यांना नाद होता. सर जेम्स कॅंबेल यांना मुंबई इलाख्याचें गॅझेट तयार करण्याच्या कामीं यांची फार मदत झाली. तसेंच जॉर्ज फारेस्ट, मि. एडवर्डस्, मि. एन्थाव्हेन इत्यादि विद्वान् लेखकांना यांचें साहाय्य असे. यांच्या संशोधनात्मक कार्याबद्दल ' कॅम्बेल मेडल ' देऊन मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीनें यांचा गौरव केला.

यांचें वाङ्मय–१ काव्यरत्न १ लें, २ पद्यसुधा, ३ मुक्तावली (१८७४), ४ समाधिशतावलि (१८८५), ५ शिवदुःखाश्रुमार्जन (१८८६), ६ युवराजनिधन (१९०९), ७ आधुनिक कविताप्राप्ति (१९१२), ८ उत्तर कोंकणचा प्राचीन इतिहास.

जोशी, पूरनचन्द्र—(जन्म स.१९०७ फेब्रु. १४) समाजसत्तावादी कार्यकर्ते. पी. सी. जोशी या नांवानें हे सर्वत्र प्रसिद्ध आहेत. पिता-पं. हरनन्दन जोशी. माता-मालती. गांव-अल्मोडा.

हे एम्. ए. एल्एल्. बी. आहेत. मिरत केसमध्यें यांना पकडलें तेव्हांच यांचा एल्एल्. बी. चा निकाल यांच्या हातांत आला (स. १९२९). तो सुप्रसिद्ध खटला स. १९३३ पर्यंत चालला व यांना भोगलेली शिक्षा पुरी समजून सोडण्यांत आलें. अल्पवयी परंतु हे येवढ्या अवधींत अनेक दृष्टीनीं प्रभावी व अनुभवी ठरून बाहेर आले. आल्यानंतर यांनीं आपलें कार्यक्षेत्र कानपूर ठरविलें. तेथें यांचें काम प्रभावी ठरून यांना पकडून दीड वर्षाची शिक्षा देण्यांत आली (१९३५ फेब्रु.). शिक्षा भोगून सुटतांच हे अन्तर्धान पावले ते

काँग्रेसप्रधानांनीं यांचेवरील वारंट रद्द केलें तेव्हां प्रगट झाले. स. १९३६ सालीं हे अखिल भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जनरल सेक्रेटरी निवडले गेले. तेव्हां पासून पक्षाच्या उत्कर्षांत यांचा फार मोठा हिस्सा आहे.

संघटनकर्ता, पथदर्शक आणि स्नेही या दृष्टीनीं यांची योग्यता मोठी मानली जाते. हिंदुस्थानांतल्या सर्व प्रान्तांतील स्थितीचें यांना सहज आकलन होतें व त्याप्रमाणें अचूक उपाययोजना करण्यांत हे मोठे कुशल आहेत. यांची पत्नी कल्पनादत्त.

जोशी, महादेव मल्हार—(जन्म स. १८७४–मृत्यु स. १९२८) संस्कृत भाषेचे, तत्त्वज्ञानाचे अभ्यासक व वक्ते.

हे लहानपणापासूनच हुषार आणि तरतरीत होते. प्राथमिक शिक्षण गोरेगांव येथें, नंतर इंग्रजी शिक्षण रोहें येथें व इंग्रजी पांचवीपासूनचें शिक्षण पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें झालें. हे रोह्याहून पळून पुण्यास आले व वार लावून शिकत असत. मॅट्रिकमध्यें पहिली जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप यांना मिळाली. याप्रमाणें एम्.ए. पर्यंत संस्कृतमधील सर्व बक्षिसें यांनीं मिळविलीं. सरकारी नोकरी मिळण्याचा संभव असतांहि यांनीं राष्ट्रीय वृत्तीमुळें खासगी नोकरी पत्करली व नगर सोसायटीच्या हायस्कुलांत हेडमास्तर म्हणून काम केलें (१८९८–१९०२). तेथून हे जुनागडला गेले (१९०२) व तेथील बहुद्दीन कॉलेजमध्यें संस्कृतचे प्रोफेसर म्हणून काम करूं लागले. तेथें यांनीं उत्तम लौकिक संपादन केला. पंचवीस वर्षें नोकरी केल्यानंतर यांनीं पेन्शन घेतली. पण तिचा उपभोग घेण्यास हे जगले नाहींत. यांची लेखक व वक्ते म्हणूनहि प्रसिद्धी होती.

यांना घरांत ' अण्णा ' असें म्हणत. ' भव्य देहयष्टि, पोषाखाची जुनी पुणेरी पद्धत, किंचित् किंचाळणारा पण कानांत घुमणारा आवाज, साध्याहि बोलण्यांत दिसून येणारा आवेश, ओबडधोबड चेहऱ्यावरील भेदक दृष्टि,' इत्यादि गोष्टी पाहणाऱ्याच्या मनावर कायमची छाप पाडीत. तरल बुद्धिमत्ता, गाढी विद्वत्ता, सखोल व मार्मिक अभ्यास, जुन्या परंपरेचा जाज्वल्य अभिमान, डोळस देशप्रेम, झळ सोसून केलेला त्याग, विचारांची तेजस्विता वगैरे गुण यांच्यांत होते.

यांचे ग्रंथ—१ आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त. वामन मल्हारांनीं आपल्या शंकांची व मतभेदाची पुस्ती याला जोडली आहे. तत्त्वज्ञानाची इतक्या उच्च भूमिकेवरून केलेली मनोरंजक चर्चा अन्यत्र क्वचितच पाहावयास सांपडेल; असें काका कालेलकरांनीं या पुस्तकासंबंधीं लिहिलें आहे. २ सच्चिदानंद बाबांचीं पत्रें.

जोशी, सर मोरोपंत विश्वनाथ—(जन्म स. १८६१) उमरावतीचे सुप्रसिद्ध वकील, मध्यप्रान्ताचे माजी गृहमंत्री व प्रागतिक पक्षाचे सार्वजनिक कार्यकर्ते.

यांचें शिक्षण पुण्याच्या डेक्कन कॉलेजांतून व मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजांतून झालें. बी. ए., एल्एल्. बी. झाल्यावर वऱ्हाडांतील ज्युडिशिअल कमिशनरच्या कोर्टामध्यें ॲडव्होकेट म्हणून यांनीं वकीली केली (१८८४–१९२०). पुढें हे मध्यप्रान्त सरकारचे गृहमंत्री होते (१९२०–१९२५). १९२५ सालीं अखिल भारतीय प्रागतिक परिषदेचें अध्यक्षस्थान देऊन यांच्या कार्याचा गौरव करण्यांत आला. हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या ' एज ऑफ कन्सेंट ' कमेटीचे हे अध्यक्ष होते (१९२८–२९). हे ज्युडिशिअल कमिशनर्स कोर्ट, मध्यप्रान्त यांचे ॲडव्होकेट व सांगली संस्थानचे कांहीं काळ सर्वाधिकारी दिवाण होते. हिंदुस्थान सरकारनें यांना अनेक पदव्या देऊन यांचा गौरव केला आहे.

जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री बाळाजी—(जन्म स. १९०२) धर्मकोशाचे संपादक, नवविचाराचे प्रचारक व सार्वजनिक कार्य करणारे पंडित.

वाईच्या प्राज्ञपाठशाळेंत नारायणशास्त्री मराठे यांचेपाशीं यांनीं संस्कृत साहित्य व तर्कवेदान्तादि दर्शनांचें अध्ययन केलें आणि कलकत्ता संस्कृत असोसिएशनचे ' तर्कतीर्थ ' झाले. यांना ' न्यायमार्तंड ' हीहि उपाधि आहे (१९२४). प्राज्ञपाठशाळेचे हे आजीवसेवक असून त्या संस्थेचे हे अध्यक्ष आहेत. धर्मकोशाच्या संपादनाचें काम सध्यां यांच्या नेतृत्वाखालीं चालू आहे.

धार्मिक व सामाजिक बाबतींत नवेनवे विचार आत्मसात् करून तडफेनें मांडण्याची यांची वृत्ति आहे. हे धर्मदृष्ट्या जडवादी व राजकारणांत रॉयिस्ट आहेत. यांनीं राजकारणांत अनेक वेळां कारावास भोगला आहे.

यांचे ग्रंथ—संस्कृत : १ शुद्धिसर्वस्वम्, मराठी : १ आनंदमीमांसा, २ हिंदु धर्माची समीक्षा, ३ अनीश्वरवाद, इत्यादि.

जोशी, वामन मल्हार—(जन्म स. १८८२–मृत्यु स. १९४३) मराठी भाषेंतील पहिल्या दर्जाचे लेखक, समाजसुधारक आणि त्यागी पुरुष.

यांचे पूर्वज पुणें जिल्ह्यांतील रायरी गांवीं राहत असून तेथें भिक्षुकी करीत म्हणून यांचें घराणें रायरीकर-जोशी अशा जोडनांवानें ओळखलें जातें. यांचे खापर-पणजे कोंकणांतील गोरेगांवास आले व तेथें स्थायिक झाले. यांचे अजोबा बाळ (बळाळ) व वडील मल्हार (नथु) हे ज्योतिषांत निष्णात असत. यांचा जन्म तळें येथें अजोळीं झाला.

यांना सावत्र बंधु वासुदेव, सख्खे बंधु महादेव, नारायण हे होत. यांपैकीं दुसरे व तिसरे प्रसिद्ध असून त्यांचीं स्वतंत्र चरित्रें दिलीं आहेत.

यांचें मराठी पांच इयत्तांचें शिक्षण गोरेगांवीं, व इंग्रजी सात इयत्तांचें शिक्षण सदाशिव श्रीधर करंदीकर यांनीं काढलेल्या न्यू प्रिपरेटरी क्लासेसमध्यें झालें. तेथेंच शंकरराव लवाटे व लक्ष्मणराव पांगारकर वगैरेंचा शिक्षक म्हणून सहवास यांना लाभला. पुढें नगर हायस्कुलमधून हे मॅट्रिक झाले (१९००). वर नंबर व शिष्यवृत्ति मिळाल्यानें बी. ए. (१९०४) तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान घेऊन एम्. ए. झाले (१९०६).

खासगी संस्थांतील प्राध्यापक किंवा सरकारी नोकरी यांच्या लोभांत न पडतां, कलकत्ता काँग्रेसहून येतांच हे समर्थ विद्यालयास आजीवसेवक म्हणून मिळाले, व कोल्हापुरास जाऊन समर्थ विद्यालयांत व प्रो. विजापूरकरांच्या 'विश्ववृत्त' मासिकाच्या संपादनाचें काम करूं लागले. त्यांत पं. श्री. दा. सातवळेकर यांचा 'वैदिक धर्माची तेजस्विता' हा लेख छापण्यांत आला. तो लेख राजद्रोही म्हणून मुद्रक विनायकराव जोशीराव व जोडसंपादक प्रो. वि. गो. विजापूरकर व हे यांना कैदेच्या शिक्षा देण्यांत आल्या. त्यांत यांना ३ वर्षांची सक्तमजूरी अशी कठोर शिक्षा झाली. स. १९११ च्या ऑक्टोबरांत यांची मुक्तता झाली.

हे सुटून आले तेव्हां समर्थ विद्यालय व विश्ववृत्त बंद पडल्याचें यांना आढळलें. तेव्हां उपजीविकेकरितां यांना जुळेल तेथें व मिळेल तो व्यवसाय करावा लागला. कांहीं दिवस आर्यभूषणमध्यें इंग्रजी-मराठी कोश, दोन वर्षें 'मराठा' या इंग्रजी साप्ताहिकाच्या संपादकीय कामांत व नंतर मुंबईस अच्युतराव कोल्हटकरांच्या 'मेसेज' या इंग्रजी दैनिकांत यांनीं काम केलें. पण या धंद्यांत आवश्यक असणारा पक्षाभिनिवेश यांच्यांत पुरेशा प्रमाणांत नसल्यानें तो धंदा यांना जुळण्यासारखा नव्हता. शिवाय पैशाची हलाखीहि कमी होईना. म्हणून शेवटीं आयुष्यांत स्थिर व्हावयाचें या इच्छेनें यांनीं हिंगणें येथील प्रो. कर्वे यांच्या अनाथबालिकाश्रम संस्थेस मिळण्याचें ठरविलें, व स. १९१८ च्या जूनमध्यें हे तेथील महिलापाठशाळेंत प्राध्यापक म्हणून रुजू झाले.

यांच्या आयुष्याचीं हीं सहासात वर्षें नोकरीच्या दृष्टीनें अस्थिरतेंत गेलीं असलीं तरी यांचें महत्त्वाचें लेखनकार्य याच काळांत झालें. नीतिशास्त्रप्रवेशाचीं कांहीं प्रकरणें, सॉक्रेटिसाचे संवाद, नवपुष्पकरंडक, विचार-विलास, रागिणी, आश्रमहरिणी, नलिनी वगैरे लहानमोठीं पुस्तकें यांनीं याच काळांत लिहिलीं.

नोकरीच्या शाश्वतीच्या दृष्टीनें हिंगणें येथील पुढचें आयुष्य एकंदरीनें स्थिरतेचें गेलें असलें तरी तें निर्भेळ सुखाचें मात्र जावयाचें नव्हतें. हिंगण्यास येऊन राहिल्यास थोडे दिवस झाले नाहींत तोंच यांची पत्नी निवर्तली आणि चारहि लहान मुलांच्या संगोपनाचा भार यांचेवर पडला. त्याच वर्षी हे संस्थेचे आजन्मसेवक झाले. महिलाश्रम हायस्कूलचे मुख्याध्यापक मोडक सोलापुरीं गेले, तेव्हां यांना ती जागा मिळाली (स. १९२७). वडील बंधु महादेव मल्हारांच्या मृत्यूनें कौटुंबिक दुःखाचा आणखी एक तडाखा बसला (१९२८).

यांनीं 'सुशीलेचा देव' ही कादंबरी लिहिली (१९३०), त्याच वर्षी मडगांवच्या महाराष्ट्र साहित्य-संमेलनाचें अध्यक्षपद यांना देण्यांत आलें व साहित्यिक म्हणून हे मान्यता पावले. पुढें 'इंदु काळे व सरला भोळे' ही पत्रात्मक कादंबरी यांनीं प्रसिद्ध केली व महिलाश्रम हायस्कूलच्या मुख्याध्यापकाच्या कामांतून हे मुक्त झाले. तेथें यांनीं सर्व आधुनिक साधनांचा उपयोग करून शाळेची उन्नति केली व विद्यार्थिनींची संख्या वाढविली (१९३४).

नंतर हे डेक्कन जिमखान्यावर राहण्यास आले. घरगुती समाधान यांना फारच थोडें असे. तथापि हे आनंदी व समाधानी वृत्तीनें राहत. पुढें एरंडवणा महिलाविद्यालयाचे यांना प्रिन्सिपल नेमण्यांत आलें (१९४१) व हे पुनः एरंडवण्यास राहण्यास गेले. पण संस्थेंतील अन्तर्गत लाथाळ्यानें या सत्त्वस्थ माणसास कधींच समाधान न लाभावें असा योग होता. यांचे एकसष्टीचे समारंभ मात्र मोठ्या थाटाचे होऊन लोकांनीं एकमुखानें यांचा

गौरव केला. पण मूळव्याध, रक्तक्षय व जन्मभर भोगलेल्या आधींव्याधींनीं जर्जर झालेलें यांचें शरीर फार दिवस तग धरूं शकलें नाहीं.

यांचें वाङ्मय—तत्त्वज्ञान–१ साक्रेटिसाचे संवाद, २ नीतिशास्त्रप्रवेश; लेखसंग्रह–३ विचारविहार, ४ विचारविलास, ५ विचारसौंदर्य; आत्मचरित्रपर–६ स्मृतिलहरी; नाटक–७ विस्तवाशीं खेळ; कादंबरी–८रागिणी, ९आश्रमहारिणी, १० नलिनी, ११ सुशीलेचा देव, १२ इंदू काळे व सरला भोळे; गोष्टी–१३ नवपुष्पकरंडक; शालेय–१४ वाङ्मयमाला (ना. म. पटवर्धनांच्या सहकार्यानें).

यांचें सर्व लेखन विचार-प्रधान आहे. विचार मांडतांना हे कोणाच्याहि आहारीं जात नसत. हे व्यवहारांत अत्यंत भिडस्त असले, तसेंच तुटकपणापेक्षां स्वतःच्या प्रामाणिक मतांना मुरड घालीत असतांना हे दिसत असले तरी लेखनांत किंवा विचार व्यक्त करतांना हे वाटणारें सत्य स्पष्टपणें केव्हांहि प्रगट केल्याशिवाय राहत नसत. मात्र स्पष्टपणाला फटकळपणाचें रूप देऊन हे इतरांच्या विचारांबद्दल तुच्छता कधींच दाखवीत नसत. आपण प्रदर्शित करीत असलेल्या मताला कदाचित् दुसरी सयुक्तिक बाजू असणें शक्य आहे, अशी जाणीव ठेवून हे संयमानें विरोधी पक्ष मांडीत. तेव्हां यांना ' मंत्रचळे ' किंवा ' संशयात्मा ' असें लोक हिणवीत. पण 'मला एका प्रश्नाच्या अनेक बाजू दिसतात, त्यामुळें एकच तऱ्हेचा विचार आग्रहानें बोलतां येत नाहीं ' असें यांनीं त्याचें उत्तर दिलें आहे. जुन्या आणि नव्या विचारांच्या मागील पार्श्वभूमि आकलन करण्याची आणि ते सहानुभूतिपूर्वक मांडण्याची यांच्यांत शक्ति होती. म्हणून यांना 'घरचे तत्त्वज्ञानी', 'पुण्याचे ठेंटो' अशा गौरवाच्या पदव्या बहाल करण्यांत आल्या. यांनीं करमणूक करण्यापेक्षां विचारावर उभें राहण्याची लोकांना सवय लावली.

जोशी, वीर वामन गोपाळ—(जन्म स. १८८१) उत्तम शिक्षक, आजन्म राष्ट्रसभा-सेवक, प्रभावी वक्ते व मराठींतील प्रभावी नाटककार.

हे वऱ्हाडांतील राष्ट्रसभा पक्षाचे पुढारी आहेत. १८९९ सालीं हे मॅट्रिक झाले. १९०८ सालीं नागपूर येथें यांच्यावर पहिला राजकीय खटला झाला. यानंतर मुंबईच्या ' राष्ट्रमत ' या दैनिकांत दे. भ. गंगाधरराव देशपांडे यांचे ते प्रमुख सहकारी बनले (१९०९). १९२१ सालीं अकोला येथें १२४ अ कलमाखालीं यांच्यावर राजद्रोहाचा खटला झाला व यांना सरकारकडून दीड वर्ष सक्तमजुरीची शिक्षा व लोकांकडून ' वीर ' अशी पदवी मिळाली. उमरावतीच्या ' स्वतंत्र हिंदुस्थान ' साप्ताहिकाचे हे संस्थापक व नंतर सात वर्षें संपादकहि होते. १९३० पासून वऱ्हाड प्रां. काँ. कमिटीचे अध्यक्ष आहेत. त्याच सालीं मे महिन्यांत खटला झाला व यांना कायदेभंगाच्या धामधुमींत दोन वर्षांची शिक्षा झाली. पण दिल्लीकरारान्वयें नऊ महिन्यांत यांची मुक्तता झाली. यांनीं आतांपर्यंत, राक्षसी महत्त्वाकांक्षा, रणदुंदुभि, धर्मसिंहासन व झोटिंगपाच्छाई हीं नाटकें लिहिलीं आहेत. यांचीं नाटकें त्यांतील वीररस व तेजाळ भावना यांमुळें सर्वत्र लोकप्रिय ठरलीं आहेत.

जोशी, वासुदेव गणेश तथा वासुकाका—(जन्म १८५६–मृत्यु स. १९४४ जानें. १२) पुण्याच्या सुप्रसिद्ध चित्रशाळा छापखान्याचे मालक, लोकमान्य टिळकांचे निकटचे सहकारी व महाराष्ट्राच्या धकाधकीच्या सार्वजनिक जीवनांत ठळकपणें दृष्टीपुढें राहणारे कार्यकर्ते.

यांचा जन्म वाईनजीक कृष्णेच्या कांठीं असलेल्या धोम येथें झाला. तेथें यांचें घराणें जोसपण, सावकारी व शेती करून राही. हे चवदाव्या वर्षी पुणें येथें आले व इंग्रजी पांचसहा इयत्ता झाल्यावर एंजिनियरिंग कॉलेजांतील ॲग्रिकल्चरल क्लासांत यांनीं एक वर्ष काढलें. नंतर विष्णुशास्त्री चिपळूणकरांची व यांची ओळख होऊन हे त्यांच्या निबंधमालेचे व्यवस्थापक बनले. पुढें तर चित्रशाळा यांच्याकडे सोंपविण्यांत आली. आणि यांनीं आपल्या व्यापक योजकतेनें चित्रशाळेला भरभराट प्राप्त करून दिली.

विष्णुशास्त्री वारल्यानंतर हे लोकमान्य टिळकांचे सहकारी व जबाबदार सल्लागार बनले. पंचहौद चहा प्रकरणांत हे होते, पण यांनीं चहाच घेतला नाहीं. संमतिविलाच्या क्रीडाभुवनांतील सभेंत यांना अटक झाली, पण हे पांच दिवसांनीं सुटले. टिळकांच्या सर्व प्रकरणांत हे प्रामुख्यानें असत.

चित्रशाळेचा प्रथम जम बसेना, पण भिवा सुताराच्या रामपंचायतनाला लोकप्रियता लाभली आणि चित्रशाळेचा बस बसला (१८८२). पुढें मोडी पुस्तकांचा मक्ता यांस मिळाला. पुढें यांचे पुतणे शंकर नरहर जोशी (स. १८७५–१९४४) चित्रशाळेला येऊन मिळाले (१८९६) आणि चित्रशाळेची अनेक शाखांत वाढ

झाली. तीन भाषांत निघणारें चित्रमय जगत् (सुरुवात १९१०), शालापत्रक, स्फूर्ति, महाराष्ट्र कृषीवल व ध्रुव अशीं मासिकें निघून तीं चाललीं आहेत.

१९०३ सालीं ताईमहाराज प्रकरणांत लो. टिळकांना शिक्षा झाली तेव्हां हे सर्कसवाले विष्णुपंत छत्रे यांच्या निमंत्रणावरून सर्कशीबरोबर चीन-जपानकडे गेले. परक्या देशांत सर्कशीची आगाऊ व्यवस्था करण्याचें काम यांनीं आपणाकडे घेतलें होतें. तिकडे सर्कशीला खूप पैसा मिळाला. चीनची डॉवेजर राणी झुशी हिनें खूष होऊन सर्कशीला तीस हजार रुपये बक्षीस दिले. तेव्हां यांनीं सर्कशींतला एक हत्ती माहुतासह राणीला नजर केला.

जपानमध्यें सर्कस आली असतां यांची व स्वामी रामतीर्थांची गांठ पडली. यांची ओळख म्हणजे स्वामींना मोठा अनुग्रह वाटला व त्यांनीं यांना आपले गुरु मानावयास सुरुवात केली. स्वामी जपानांतून अमेरिकेस गेल्यावर तेथें त्यांचीं ठिकठिकाणीं व्याख्यानें झालीं. त्यांपैकीं सहा व्याख्यानें यांनीं पुस्तकरूपानें अमेरिकेंत प्रसिद्ध केली आहेत. अमेरिकेंत असतां यांनीं तेथील शेतीची पाहणी केली. त्याशिवाय हिन्दी तरुणांनीं अमेरिकन लष्करांत शिरावें अशीहि यांनीं खटपट केली. तेथून आल्यावर हे आणि कृ. प्र. खाडिलकर असे दोघे कांहीं दिवस नेपाळांत जाऊन राहिले होते. यांचा शेवटचा मोठा प्रवास म्हणजे लो. टिळकांच्याबरोबर केलेली इंग्लंडची सफर होय (१९१९). शिवाय राष्ट्रसभेच्या निमित्तानें हे हिंदुस्थानचा कोपरान् कोपरा हिंडले होते.

यांनीं राष्ट्रसभेच्या राजकारणांत मनःपूर्वक भाग घेतला. मुळशी-सत्याग्रहांत व १९३२ च्या कायदेभंगांत यांना १५ दिवस व सहा महिने शिक्षा झाल्या होत्या.

हे प्रथम दहशतवादी राजकारणी होते असें म्हणतात. पण हे नेहमीं अग्रेसर असणाऱ्या जहाल राजकारणांत भाग घेत. यांची सार्वजनिक चळवळींत पुढें होऊन भाग घेण्यापेक्षां अन्तस्थ हालचाली अचूकपणें करण्याविषयीं प्रसिद्धि होती. यांचा विश्वासूक म्हणून सर्व पक्षांत प्रवेश असे आणि जगांत व हिंदुस्थानांत यांचा सर्व प्रांतांत मित्रपरिवार असे.

पहांटे तीन वाजतां उठून लांब फिरावयास जाणें, दूध, भाज्या व फळें यांवर राहणें आणि कमालीचा प्रयत्नवाद यांमुळें यांच्या दीर्घायुष्याला नमुनेदारपणा आला होता.

जोशी, शंकर पुरुषोत्तम—(जन्म स. १८९२–मृत्यु स. १९४३) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें उत्तर भारतांत शोधणारे संशोधक.

यांचा जन्म दे. कृ. ब्राह्मणाच्या घरीं पाली येथें झाला. वडिलांकडून ऋग्वेद वगैरेचें शिक्षण घेतल्यावर हे मॅट्रिक झाले. यांना सप्लाय खात्यांत नोकरी मिळाल्यावर फ्रान्समध्यें मार्सेलस येथें पाठविण्यांत आलें. नंतर हे मेसापोटेमियांत काम करून आले. राजपुतान्यांत जयपूर वगैरे ठिकाणीं यांनीं नोकरी केली. तिकडच्या भाषांचें ज्ञान संपादन केल्यावर इतिहाससंशोधनाकडे यांचें लक्ष वेधलें (१९३०). उत्तर भारतांतील महाराष्ट्राच्या इतिहासाचे संशोधक म्हणून हे प्रथम लोकांच्यापुढें आले. मराठ्यांच्या इतिहासाबाबत एक नवी दृष्टि स्वीकारून परप्रांतांतील राजस्थानी वगैरे भाषा शिकून यांनीं लोककथा प्रसिद्ध करण्याची खटपट केली.

यांचें वाङ्मयः—१ भाऊंच्या वीरकथा (१९३३), २ शिखांचा स्फूर्तिदायक इतिहास, ३ मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार, ४ पंजाबांतील नामदेव, ५ भक्त नामदेवजी, ६ राजस्थान संघर्ष.

जोशी, श्रीधर सर्वोत्तम—(जन्म स. १८९८) सुप्रसिद्ध संशोधक व रसायनशास्त्रज्ञ.

यांचे वडील यांच्या वयाच्या चवथ्या वर्षीच (१९०१) सालीं वारले. यांचें बालवयांतील संगोपन व संवर्धन यांचे मामा वा. ल. चिपळूणकर यांचे घरींच झालें. अकोला हायस्कुलांतून १९१७ सालीं मॅट्रिक झाल्यावर पुणें येथें फर्ग्युसन कॉलेजमध्यें १९२१ सालीं हे रसायनशास्त्र घेऊन बी. एससी. झाले. पुढें बनारस, हिंदु विश्वविद्यालयांत जाऊन हल्लींचे सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ सर डॉ. शांतिस्वरूप भाटनागर यांचे हाताखालीं संशोधनकार्य करून यांनीं एम्.एससी. ही पदवी मिळविली. पुढें १९२४ सालीं विलायतेस जाऊन लंडन युनिव्हर्सिटीमधील डी. एससी. ही पदवी घेऊन १९२८ सालीं हे परत हिंदुस्थानांत आले. रसायनशास्त्रांत लंडन, डी. एससी. मिळविणारे हे पहिलेच गृहस्थ होत.

प्रो. डोनन यांच्या नेतृत्वाखालीं " स्तब्ध विद्युत् निसर्गाचा रासायनिक प्रक्रियांवर परिणाम " या संबंधांत संशोधन करून हिंदुस्थानांत परत आल्यावर पं. म. मो. मालवीय यांनीं यांना हिंदुविश्वविद्यालयांत भौतिक

रसायनाच्या आचार्यांची जागा दिली. तेव्हांपासून यांचें कलिल रसायनांतील संशोधन अव्याहत चालू आहे. त्यांत श्री. जोगाराव, टी. एम्. मेनन, के. एस. विश्वनाथन् इत्यादि विद्यार्थी यांस मदत करीत आहेत. यांनीं एक नवीन तऱ्हेची विद्युत्-भट्टी तयार केली असून ती प्रचलित भट्ट्यांच्यापेक्षां कमी खर्चाची व अधिक उष्णता देणारी आहे. यांनीं प्रकाशाचा पदार्थांच्या अणुमात्रावर होणाऱ्या क्रियेसंबंधीचा नवीन शोध (न्यू लाइट इफेक्ट) लावला (१९४०). यांच्या हाताखालीं शिष्यवृत्तीनें संशोधन करणारे कोल्हापूरचे श्री. सोळंकी यांचा प्रबंध यांनीं परीक्षणाकरितां अमेरिकेंतील न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीकडे धाडला (१९४३). तो प्रबंध परीक्षकांना इतका आवडला कीं, तो तपासून श्री. सोळंकी यांना डी. एस्सी. ही पदवी तर मिळालीच, पण त्याबरोबरच आदर्श प्रबंध म्हणून तो प्रबंध युनिव्हर्सिटीनें आपल्याकडे ठेवून घेतला व त्याबद्दल यांना पारितोषिक म्हणून दर वर्षी यांनीं पुरस्कृत केलेल्या दोन विद्यार्थ्यांस फी-माफी व शिष्यवृत्ति देण्यास मान्यता दिली.

ज़ौक़—(जन्म स. १७८९–मृत्यु स. १८५३) सुप्रसिद्ध उर्दू कवि.

यांचें नांव शेख मुहम्मद इब्राहीम. बापाचें नांव शेख मुहम्मद रमजान. उपनाम खाकानि, स्थळ दिल्ली. यांचे वडील शिपाई होते. त्यांनीं यांना शिकण्याकरितां गुलाम रसूल शौक यांच्याकडे पाठविलें. ते कवि होते. त्यांनीं यांना धार्मिक शिक्षणाबरोबरच फारशी भाषा व साहित्य यांचें ज्ञान दिलें. त्यांच्या सहवासानें हेहि कविता करूं लागले. त्यांनीं यांना उत्तेजन दिलें. पुढें हे शहा नसीरचे शिष्य झाले. येथून पुढें हे ज़ौक़ नांवानें प्रसिद्ध झाले. हे गज्जले करून कविसंमेलनांत गाऊं लागले व यांची वाहवा पण होऊं लागली.

दिल्लीस बादशाहा अकबरशहाचे पुत्र बहादूरशहा हे कवितेचे शोकी होते. ते कविता करीत व 'जफर' या नांवानें त्या कविता म्हणत. पुढें त्यांच्या कविता दुरुस्त करणारे सर्व लोक कांहीं कारणांनीं दूर गेले. तेव्हां हे त्यांचे काव्यगुरु बनले. तसेंच दिल्लीचे नबाब इलाहि बख्श 'मारूफ़' या जमीनदारांचेहि गुरु बनले. यांच्या उत्तम कवितांमुळें यांना 'खाकनि ए हिन्दी' ही अत्यंत बहुमानाची पदवी मिळाली. पांच रुपये मासिक वेतनापासून चढत हे शंभर रुपये दरमहा पगार मिळवूं लागले.

यांनीं पुष्कळ कविता लिहिली, पण त्यांपैकीं चांगली कविता पाहिली कीं, बादशहा ती आपल्या नांवावर घेई. त्यामुळें बरीच उत्तम कविता यांनीं राखून बाजूला ठेविली होती; पण ती नष्ट झाली.

यांची कविता उच्च विचारांनीं भरलेली आहे. यांचें भाषाप्रभुत्वहि चांगलें असे. प्रेमरहस्याचें वर्णन, तसेंच वेदान्त व ईश्वरपरायणता यांचें वर्णनहि यांच्या कवितांत आढळतें.

यांच्या शिष्यांपैकीं प्रसिद्ध उर्दू–अरबी–फारसीचे विद्वान् शम्सुलउल्मा मौलवी मुहम्मद हुसेन 'आजाद', प्रोफेसर-गव्हर्नमेंट कॉलेज व दारा हे सुप्रसिद्ध कवि होत.

झ

झकीर हुसेन—(जन्म स. १८९० सुमार) सुप्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, जामिया मिलिया इस्लामिया, जामियानगर या शिक्षणसंस्थेचे प्रमुख व वर्धाशिक्षण-योजना कमेटीचे अध्यक्ष.

हे एम्. ए., पीएच. डी. आहेत. १९२० सालीं असहकारितेच्या कालांत मुसलमान विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षण देण्याकरितां यांनीं न्यू दिल्ली येथें 'जामिया मिलिया इस्लामिया' ही संस्था काढली आणि शिक्षणाच्या अनेक अंगांची यांनीं तेथें पद्धतशीर वाढ केली. सुमारें वीस वर्षे या संस्थेचें काम न्यू दिल्ली येथें चाललें. पण त्यानंतर सुप्रसिद्ध डॉ. अन्सारी यांनीं दिलेल्या ओखला गांवानजीकच्या पन्नास एकर जमिनींत या संस्थेचा पसारा वाढला आणि त्या वसाहतीला 'जामियानगर' हें नांव देण्यांत आलें.

या संस्थेतर्फे प्राथमिक शाळा, दुय्यम शाळा, कॉलेज, तीन लाखांचा छापखाना व ५०० पुस्तकें प्रसिद्ध केलेलें प्रकाशनखातें हीं कार्यें मोठ्या प्रमाणांत चालू आहेत. १९३८ पासून बेसिक टीचर्स ट्रेनिंग कॉलेजहि तेथें सुरू करण्यांत आलें आहे.

राष्ट्रसभेनें नेमलेल्या हिंदुस्तानी तालिमी संघाचे हे अध्यक्ष आहेत. वर्धा शिक्षण-योजना यांच्याच नेतृत्वाखालीं तयार झाली. म. गांधींच्या सर्वांगीण तत्त्वज्ञानाचा यांच्यावर विशेष पगडा बसला आहे. हे अत्यंत संघटना-चतुर असून यांची राहणी अगदी साधी आहे. गेल्या पंचवीस वर्षांत यांना एकहि सहकारी गमावण्याचा प्रसंग आला नाहीं.

ऑक्टो. २९ ते नवं. १. १९३९ या दिवशीं पुण्यास अखिल भारतीय वर्धा राष्ट्रीय शिक्षण परिषदेचें पहिलें अधिवेशन झालें. वर्धा शिक्षण-योजना या नांवानें सध्यां प्रसिद्ध असणारी योजना हरिजन पत्रांतून म. गांधी यांनीं प्रथम राष्ट्रापुढें मांडली (जुलै १९३७). त्या वेळीं राष्ट्रसभेनें मंत्रिपदाचा स्वीकार केला होता. त्याच वर्षीच्या ऑक्टोबर महिन्यांत वर्धा येथें गांधीजींच्या अध्यक्षतेखालीं या योजनेचा विचार करण्याकरितां शिक्षणशास्त्री आणि शिक्षणमंत्री यांची परिषद भरून या योजनेचा सविस्तर अभ्यासक्रम तयार करण्यासाठीं यांच्या अध्यक्षतेखालीं कमिटी नेमली गेली. राष्ट्रसभेच्या १९३८ च्या हरिपुरा अधिवेशनांत या योजनेला मान्यता मिळाली आणि तिच्या ठरावाप्रमाणें एप्रिल १९३८ मध्यें 'हिंदुस्तानी तालिमी संघ' निर्माण झाला व वर्धा येथील विद्यामंदिर ट्रेनिंगस्कूलमध्यें नव्या योजनेच्या प्रयोगाला प्रारंभ झाला. आज दोन हजारांवर वर्धा-पद्धतीच्या शाळा हिंदुस्तानांत निर्माण करण्यांत आल्या असून कोणत्या तरी उत्पादक धंद्याच्या द्वारा बालकांना शिक्षण देण्याचा प्रयोग चालला आहे. या शाळांना शिक्षक पुरविण्यासाठीं एकूण १४ अध्यापककेन्द्रें देशांत काम करीत आहेत. मुंबई प्रान्तांतहि वर्धा-शाळा व अध्यापनकेन्द्रें चालू आहेत. हिंदुस्थान सरकारच्या मध्यवर्ति शिक्षण-समितीनें वर्धा-योजनेचा स्वीकार केला आहे.

हिंदुस्थानी तालिमी संघातर्फे पहिली परिषद् पुण्यास भरली. तेथें वेगवेगळ्या प्रान्तांतून ११० प्रतिनिधि आले होते. अध्यक्षस्थान काश्मीरचे शिक्षणाधिकारी आणि वरील संघाचे सभासद प्रो. ख्वाजा गुलाम सय्यदैन यांनीं स्वीकारलें होतें.

केवळ पुस्तकी ज्ञान किंवा केवळ उद्योगाचें शिक्षण न देतां एखादा उद्योग शिक्षणाचें द्वार म्हणून स्वीकारावयाचा आणि त्याद्वारा ज्ञान, उपजीविका आणि शिक्षणाचा खर्च हे तीनहि हेतु सिद्धीस न्यावयाचे, हा वर्धा शिक्षण-योजनेचा पाया आहे.

हे अनेक वेळां युरोपांत जाऊन आले. यांचीं पुस्तकें फार प्रसिद्ध आहेत.

झळकीकर, महामहोपाध्याय भीमाचार्य—(मृत्यु स. १९०६ मे १०) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध संस्कृत पंडित.

हे पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत व मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजांत संस्कृत शिकवीत. संमतिवयाच्या बिलाला यांनीं विरोध केला. पंचहौद चहा प्रकरणांतील ग्राम-ण्याच्या वेळीं ब्राह्मणेतरांच्या हातचें अन्नपाणी घेणारास लागू पडणारीं प्रायश्चित्तांचीं वचनें यांनीं केसरींत प्रसिद्ध केलीं. त्यांत पेज, दूध, चणे, चुरमुरे वगैरे भट्टींत भाजलेले पदार्थ शूद्राच्याहि हातचे चालतात, असें यांनीं स्पष्ट केलें होतें.

यांचे ग्रंथ—१ न्यायकोश: (संस्कृत), २ न्याय-मुक्तावलीचें मराठी भाषान्तर.

झंडूभट्ट शंकरप्रसाद—(जन्म स. १८६२–मृत्यु स. १९४०) मुंबईतील देशी औषधांचे पहिल्या प्रतीचे कारखानदार व वैद्य.

मुंबईच्या एल्फिन्स्टनरोडवरील झंडू फार्म्यास्यूटिकल वर्क्स लि.चा प्रचंड कारखाना आणि जामनगरचा व्याप पाहिल्यानंतर यांच्या कर्तृत्वाची कल्पना येते. वडिलांच्या वेळीं कर्जात असणारा व्यवसाय कर्जमुक्त करून पांचहि भावांना सारखे हिस्से देणाऱ्या या माणसांत कर्तृत्वा-बरोबर औदार्याचाहि भाग स्पष्ट दिसतो. कारखान्याचे कामाव्यतिरिक्त यांनीं साठ वर्षें वैद्यकी केली; पण वैद्यकीच्या निमित्तानें कोणाकडून एक पैसाहि घेतला नाहीं हें विशेष आहे. पैसे न घेणाऱ्या यांना रात्रीं-अपरात्रीं बोलावण्यास संकोच मानणाऱ्या रोग्याकडे हे आपणहूनच जात आणि उपचार करीत.

झा, डॉ. गंगानाथ—(जन्म स. १८७१–मृत्यु स. १९४१) बिहार प्रांतांतील सुप्रसिद्ध प्राच्यविद्या-शास्त्रज्ञ व अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे माजी उपकुलगुरु.

बनारसच्या क्वीन्स कॉलेजमधून एम्. ए. झाल्यानंतर

दरभंगा संस्थानच्या लायब्ररीचे व्यवस्थापक म्हणून यांची नेमणूक झाली (१८९३). हिंदुस्थानांतील नामांकित ग्रंथसंग्रह अशी प्रसिद्धि त्या लायब्ररीला मिळवून दिल्यानंतर हे अलाहाबादच्या सेंट मूर कॉलेजमध्यें संस्कृतचे प्रोफेसर म्हणून दाखल झाले (१९०२). त्या कॉलेजचे त्या वेळचे प्रिन्सिपल डॉ. थिबो यांच्या प्रेरणेनें यांचा तेथें सारखा उत्कर्ष होत गेला व हे प्रॉव्हिन्शियल एज्युकेशनल सर्व्हिसमध्यें शिरले. याच सुमारास अलाहाबाद युनिव्हर्सिटीशी यांचा संबंध आला व हे त्या संस्थेचे फेलो (१९०५), सिंडिकेटचे सभासद (१९१०) व शेवटीं व्हाइस-चॅन्सेलर (१९२३-३२) बनले. मध्यंतरीं कांहीं दिवस बनारसच्या संस्कृत कॉलेजचे प्रिन्सिपल म्हणून यांची नेमणूक झाली होती (१९१८).

संस्कृत भाषा, हिंदु कायदा व तत्त्वज्ञान यांचे पंडित म्हणून यांची सर्वत्र प्रसिद्धि असे. दरभंगा लायब्ररीचे व्यवस्थापक असतांनाच हिंदु कायदा व तत्त्वज्ञान यांचा खोल अभ्यास करण्याची संधि यांना मिळाली व त्या विषयांवरील कांहीं ग्रंथांचें इंग्रजी भाषांतरहि यांनीं केलें. परंतु यांचें ग्रंथकार म्हणून नांव 'Philosophical Discipline' या कलकत्त्याला दिलेल्या 'कमला लेक्चर्स'च्या प्रसिद्धीनें लोकांच्या डोळ्यांसमोर आलें (१९२६) व त्यानंतर यांच्या मीमांसासूत्रांच्या भाषांतराला तर मुंबई युनिव्हर्सिटीनें कॅम्बेल सुवर्णपदक दिलें. बडोद्याला Shankaracharya and His Work for the Uplift of the Country या विषयावर व दरभंग्याला 'Vedant Philosophy' वर यांनीं दिलेल्या व्याख्यानांचाहि असाच गौरव झाला असून तीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत. याशिवाय Hindu Law in its Sources, Shankara Vedanta in its Sources व Purva-Mimamsa in its Sources हे यांचे ग्रंथहि असेच प्रसिद्ध आहेत.

या टीकात्मक वाङ्मयाबरोबरच यांचें भाषांतरित वाङ्मयहि असेंच प्रसिद्ध आहे. एस्. सीतारामशास्त्री यांच्या सहकार्यानें यांनीं अनुवादिलेल्या ईश, केन, कठ वगैरे आठ उपनिषदांचें व त्यावरील शांकरभाष्याचें भाषांतर पांच भागांत मद्रासच्या नटेसन कंपनीनें, प्रसिद्ध केलें आहे. यांच्या या भाषांतराइतकीच त्यांच्या छपाईतील सुबकपणाची त्या वेळीं प्रशंसा झाली होती.

वर उल्लेखलेलें भाषांतरित व टीकात्मक वाङ्मयच यांनीं इतक्या सफाईनें उत्पन्न केलें कीं, यांच्या स्वतंत्र वाङ्मयाचा अभाव लक्षांत न घेतां लोकांनीं व सरकारनें यांच्यावर पदव्यांचा वर्षाव केला. हे रॉयल एशियॅटिक सोसायटी लंडन व ब्रिटिश ॲकेडमीचे सभासद होते. सरकारनें यांना महामहोपाध्याय व सर (१९४१) या पदव्या देऊन गौरविलें होतें.

यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीनिमित्त यांचे शिष्य व चहाते यांनीं यांना एक गौरवग्रंथ सादर केला. प्राच्यविद्याविषयक निबंधांचा हा संग्रह असून डॉ. कीथ, डॉ. विंटरनिट्झ, डॉ. नौ, डॉ. ऑटो स्ट्रॉस वगैरे अनेक पाश्चिमात्य अभ्यासकांनीं यांत लेख लिहिले होते.

यांच्या मृत्यूनंतर यांचें स्मारक म्हणून 'डॉ. गंगानाथ झा रिसर्च इन्स्टिट्यूट'चें उद्घाटन पंडित मदनमोहन मालवीय यांच्या हस्तें करण्यांत आलें. ५००० पुस्तकें असणारी एक मोठी लायब्ररी या संस्थेच्या मालकीची असून या संस्थेनें The Journal of the Ganganath Jha Research Institute सुरू केलें आहे (१९४३).

अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे उपकुलगुरु व सुप्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञ अमरनाथ झा हे यांचे चिरंजीव होत.

ट

टक्कन, प्रा. मोहनलाल—(जन्म स. १८८५) हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध अर्थशास्त्रविशारद.

इंग्लंडहून बॅरिस्टर होऊन परत आल्यानंतर हे मुंबईच्या सिडनहॅम कॉलेजमध्यें प्रथम बँकिंगचे प्राध्यापक व नंतर त्या कॉलेजचे प्रिन्सिपल झाले (१९२०-३७). त्यानंतर कांहीं दिवस हे लाहोरच्या पंजाब नॅशनल बँकेचे व्यवस्थापक होते.

० इंडियन एज्युकेशनल सर्व्हिसमधील गृहस्थाची गव्हर्मेंट

कॉलेजमध्यें नेमणूक होणें ज्या काळीं अतिशय कठीण गोष्ट समजली जाई त्या काळीं हे सिडनहॅम कॉलेजचे प्रिन्सिपल नेमले गेले. अगदीं अलीकडेपर्यंत व्यापार व अर्थशास्त्राचें शिक्षण देणारें असें हिंदुस्थांतील तें एकमेव कॉलेज होतें. त्यामुळें हिंदुस्थानांतील व्यापारी शिक्षण-क्षेत्रांत त्या कॉलेजास व जवळजवळ दीड तप मुदतीपर्यंत यशस्वी रीतीनें तें चालविणाऱ्या यांना विशेष महत्त्व आहे.

इंडियन अकाउंटन्सी बोर्डाचे सेक्रेटरी व कॉमर्स डिपार्टमेंटचे अंडर-सेक्रेटरी या नात्यांनीं हे हिंदुस्थान-सरकारच्या व्यापारी खात्याचे शिष्टमंडळावर होते (१९३२-३५). हॅम्बुर्ग (जर्मनी) ला भरलेल्या इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह कॉन्फरन्सलाहि हे हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून हजर होते.

या यांच्या अर्थशास्त्रांतील कामगिरीचा गौरव करण्या-साठीं कलकत्त्याला भरलेल्या इंडियन इकॉनमिक कॉन्फ-रन्सचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें (१९२७). इंडियन एक्श्चेंज अँड बँकिंग हा यांच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय होता.

'Banking Law and Practice in India', 'Indian Currency and Banking Problems', 'Indian Currency and War', 'Banking Needs of India', 'Regulation of Banks in India', इत्यादि यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

टर्नर, जॉर्ज—(जन्म स. १७९९-मृत्यु स. १८४३) सिलोनमधील सुप्रसिद्ध प्राच्यविद्यासंशोधक व पाली भाषेचे पंडित.

यांचा जन्म जरी सिलोनमध्यें झाला असला तरी यांचें सर्व शिक्षण इंग्लंडमध्यें पार पडलें. यानंतर हे सिलोनमध्यें आले व यांनीं सिव्हिल सर्व्हिसमध्यें काम करण्यास सुरुवात केली. अधिकारी या नात्यानें जनतेशीं तादात्म्य पावावयाचें असेल तर त्यांच्या भाषेशीं आपण एकरूप झालें पाहिजे या श्रद्धेनें यांनीं सिंहली व नंतर पाली भाषा यांचें अध्ययन करण्यास सुरुवात केली व एका नव्या जगांत शिरल्याचा भास यांना होऊं लागला.

विशेषतः पाली भाषेंतील 'महावंश' या पद्यमय इतिहास ग्रंथाचें अध्ययन करीत असतां इसवी सनाच्या पूर्वीच्या सिलोनच्या व तदनुषंगिक हिंदुस्थानच्या इति-हासासंबंधीं त्या ग्रंथांतील उल्लेख पाहून इंग्रजींत त्याचा अनुवाद करण्याची कल्पना यांना सुचली. याच सुमारास यांना या ग्रंथावरील एक जुनी टीका मिळाल्यानें यांचें काम विशेष सुलभ झालें व १८३७ त पहिल्या सदतीस प्रकरणांचा (इ. स. पू. ५४३-इ. स. ३०४) अनुवाद यांनीं प्रसिद्ध केला.

यांच्या अपेक्षेप्रमाणें खरोखरच या ग्रंथाचे प्रसिद्धीनें सर्व पाश्चात्य अभ्यासकांत खळबळ उडवून दिली. चंद्रगुप्त मौर्य व महावंशांतील संद्रकोट्टस यांमध्यें अतिशय साम्य असल्याचें पुढें उघडकीस आलें व चंद्रगुप्तासंबंधीं इतके दिवस बसवलेलीं प्रमेयें खोटीं ठरण्याची वेळ आली. त्याप्रमाणेंच बौद्ध राजा अशोक हाच अशोकांच्या शिलालेखांचा उत्पादक आहे ही गोष्टहि या अनुवादानें सिद्ध करून दिली. पुढें पुढें तर या मूळ ग्रंथाबद्दलची अभ्यासकांची उत्सुकता इतकी पराकोटिला गेली कीं रोमन लिपींत तो ग्रंथ यांना प्रसिद्ध करणें भाग पडलें. तिबेट व नेपाळ येथें बौद्ध ग्रंथाचें संशोधन करणाऱ्या लोकांनीं या ग्रंथाची मदत घेतल्यानें तर यांच्या या संशोधनाचें महत्त्व फारच वाढलें.

परंतु याबरोबरच सिलोनच्या इतिहासांतील राजांच्या कारकीर्दी व महत्त्वाचे सन संशोधण्याची जरूरी यांना भासूं लागली व त्यासाठीं यांनीं आपला An Epitome of the History of Ceylon हा ग्रंथ प्रसिद्ध केला. आज शंभर वर्षांच्या कालावधीनंतरहि त्यांत प्रस्थापित केलेले सिद्धान्त कोणाला खोडून काढतां आले नाहींत ही एकच गोष्ट यांच्या बिनचूकपणाची साक्ष देण्यास समर्थ आहे. बौद्ध इतिहास व हिंदी कालगणना या विषयांवर जर्नल ऑफ दि बंगाल रॉयल एशियॅटिक सोसायटींत यांनीं केलेलें स्फुट लिखाणहि असेंच महत्त्वाचें आहे.

हिंदुस्थानचें सांस्कृतिक मूल्य कमी ठरविण्याचे हेतूनें संस्कृत व पाली भाषेंतील ग्रंथांना भाकडकथांपेक्षां अधिक किंमत नाहीं असें ठरविण्याचा घाट पाश्चात्य विद्वानांनीं एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीला घातला. अशा वेळीं अनेक दोषारोप पत्करूनहि या सिद्धान्ताचा फोलपणा पटवून देण्यांत यांनीं दाखविलेली ज्ञाना-विषयींची कळकळ निश्चित स्पृहणीय आहे.

टंडन, पुरुषोत्तमदास—(जन्म स. १८८५ सुमार) राष्ट्रीय सभेचे संयुक्त प्रांतांतील सुप्रसिद्ध पुढारी, हिंदी भाषेचे एकनिष्ठ पुरस्कर्ते व स्वतंत्र बुद्धीचे कार्यकर्ते.

राष्ट्रसभेच्या प्रमुख कार्यकर्त्यांत अग्रभागी राहूनहि ज्यांनीं आपलें व्यक्तित्व अबाधित राखलें आहे अशा पुढाऱ्यांत या वयोवृद्ध गृहस्थाची गणना होते. १९२१ सालापासून जातीय प्रश्नाच्या बाबत म. गांधींच्या नेतृत्वाखालीं राष्ट्रसभेनें स्वीकारलेलें शरणागतीचें धोरण पसंत नसल्याचें यांनीं व्यक्त केलें आहे. राजाजीकरार, भुलाभाई–लियाकत–योजना यांना पाठिंबा देण्यांत म. गांधींनीं मोठी चूक केल्याचें यांनीं जाहीर केलें. तसेंच 'वर्किंग कमेटी तुरुंगांत असतांना राष्ट्रसभेच्या नांवावर लीगशीं वाटाघाटी करण्यांत आल्या याची आपल्याला शरम वाटते,' 'जिनांच्या घरीं जाऊन वाटाघाटी करण्यांत राष्ट्रसभेचा अपमान झाला आहे' असेहि यांनीं उद्गार काढले.

हिंदी भाषेचे ज्वलत् अभिमानी अशी यांची सुरुवातीपासूनच ख्याति आहे. १९२५ सालच्या कानपूरच्या राष्ट्रसभेंत यांनीं राष्ट्रसभेचें काम हिंदींत चालावें असा ठराव मान्य करून घेतला. तेव्हांपासून आजतागायत यांनीं या कार्यास आपलें तन, मन, धन, अर्पण केलें आहे. हिंदी ही राष्ट्रभाषा व देवनागरी ही राष्ट्रलिपि हा प्रचार हेंच यांच्या आयुष्याचें ध्येय बनलें आहे. या बाबतींत म. गांधींना विरोध करण्यांतहि हे मागें हटले नाहींत. हिंदी साहित्य संमेलनांत राष्ट्रभाषेच्या नांवावर उर्दुभाषा व फारसी लिपि यांबाबत गांधीजींचा पक्षपात दिसून येतांच यांनीं त्यास कडक विरोध केला व म. गांधींना हिंदी साहित्यसंमेलनांतून बाहेर पडावें लागलें.

१९३० सालीं हे अलाहाबाद जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष होते. त्या वेळीं दुःखानें गांजलेल्या शेतकऱ्यांना यांनीं सारा न देण्याचा सल्ला दिला. त्या वेळेपासून संयुक्त प्रांतांतील पुढारी म्हणून हे सर्वत्र प्रसिद्ध झाले व १९३९ च्या काँग्रेस मंत्रिमंडळाचे वेळीं तर यांना संयुक्त प्रांत असेंब्लीचे अध्यक्ष नेमण्यांत आलें.

अध्यक्ष पक्षातीत असावा असा संकेत असल्यामुळें यांनीं राष्ट्रीय सभेचा राजीनामा द्यावा किंवा अध्यक्षपदाचा तरी राजीनामा द्यावा असा प्रश्न उपस्थित झाला असतां यांनीं अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचें ठरविलें; पण राष्ट्रीय सभेकडून या नियमास यांचा अपवाद करण्यांत आला व यांना दोन्हींकडे राहण्याची परवानगी देण्यांत आली. यापूर्वी विठ्ठलभाई पटेल यांनीं दिल्ली कौन्सिलाच्या अध्यक्षपदाकरितां राष्ट्रीय सभेचा राजीनामा दिला होता.

टागोर, अवनींद्रनाथ— (जन्म स. १८७१) सुप्रसिद्ध बंगाली चित्रकार. जगप्रसिद्ध बंगाली कवि रवींद्रनाथ टागोर यांचे हे चुलते. त्यांच्याप्रमाणेंच हे अभिजात चित्रकार आहेत. यांनीं कॉलेजमध्यें वगैरे कोठेंहि चित्रकलेचें शिक्षण घेतलेलें नाहीं.

संगीत, लेखन आणि चित्रकला हे यांचे आवडीचे विषय. वयाच्या एकोणतिसाव्या वर्षापर्यंत यांनीं केवळ संगीताचें शिक्षण घेतलें. नंतर पाश्चिमात्य शिक्षणकलेच्या अभ्यासास यांनीं सुरुवात केली. तें शिक्षण घेत असतां यांनीं अन्तःस्फूर्तीनें आपल्या कल्पनेला जमेल अशा पौर्वात्य चित्रकलेकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. याबाबत विचार व अभ्यास करण्यास यांना प्रि. हॅवेल यांचेंच विशेष साहाय्य झालें. तथापि हे मि. पामर व इटालियन चित्रकार सिनॉर गिलार्डी यांना आपल्या चित्रकलेचे गुरु मानतात. त्यांचेकडून यांनीं पाश्चिमात्य चित्रकलेचीं तत्त्वें समजून घेतलीं पण स्वत्व राखिलें. यांचें म्हणणें असें आहे कीं, जेवढें चर्मचक्षूंस दिसतें तेवढेंच चितारणें ही कला नसून त्यांतील रहस्य विशद करणें ही कला आहे. येवढ्याकरितां चित्रकाराला दिव्य दृष्टि असावी लागते.

प्रथम यांची दृष्टि मोंगल चित्रकलेकडे वळली. स. १९०१ सालीं दिल्लीच्या चित्रकला प्रदर्शनांत रौप्यपदक मिळालेलें यांचें चित्र 'ताजमहाल' हें सर्व जगांत वाखाणलें गेलें. तें चित्र पाहून प्रेक्षक शोकाकुल होतो, हें त्या चित्राचें वैशिष्ट्य आहे. पण पुढें यांनीं मोगली वळण सोडून स्वतंत्र रीतीनें अनेक चित्रें काढलीं. त्यांत बुद्ध चरित्रावरील कांहीं चित्रें फारच सुंदर वठलेलीं आहेत. 'महाभिनिष्क्रमण' व 'सागरकन्यका' हीं तेव्हांचीं यांचीं चित्रें फार प्रसिद्धी पावलीं.

यानंतर अजिण्ठा व रजपूत चित्रकलेची छाप यांच्यावर बसली. परंतु ओकाकुरांसारखे जपानी चित्रकार यांच्याकडे येऊन वारंवार पाहुणे म्हणून राहूं लागतांच यांच्या चित्रावर जपानी छाया पडूं लागली. 'चांदण्यांतील वाद्यवादन' व 'राणी' हीं यांचीं चित्रें या दृष्टीनें पाहण्यासारखीं आहेत. यांचे प्रसिद्ध शिष्य पुढील होत.

१ सुरेंद्रनाथ गांगुली, २ नंदलाल बोस, ३ असितकुमार हलधर, ४ समरेंद्रनाथ गुप्त, ५ के. वेंकटप्पा, ६ हकीम अहमदखान, ७ ईश्वरीप्रसाद वर्मा (साहाय्यक).

बनारस घाट, जगन्नाथपुरीच्या देवालयांत हीं व इतर अनेक सुंदर निसर्गरमणीय दृश्यें रेखाटणारे गगनेंद्रनाथ टागोर हे यांचे थोरले बंधु होत.

टागोर, महर्षि देवेन्द्रनाथ—(जन्म स. १८१७-मृत्यु स. १९०५) आदिब्रह्मो समाजांतील राममोहन राय यांचेनंतरचे एक प्रमुख आदर्श, सदाचारी, नीतिमत्तेचे पुरस्कर्ते, बंगाली भाषेंतील सुप्रसिद्ध कवि व लेखक. यांच्या पित्याचें नांव द्वारकानाथ.

या ब्राह्मण जातींतील कोट्यधिशाच्या मुलाचें बालपण आपल्या धार्मिक प्रवृत्तीच्या आजीच्या सहवासांत गेलें. सिद्धेश्वरी कालीमातेचें दर्शन घेण्याचा यांचा नेम तेव्हां कधींच चुकत नसे. यांचें शिक्षण हिंदु कॉलेजांत झालें. त्या ठिकाणीं अज्ञेयवादाचा पगडा यांच्यावर बसला. या सुमारास यांच्या आजीनें गंगेच्या किनारीं हरिस्मरण करीत देह ठेवला. तेव्हां तर यांच्या जिज्ञासेला चालनाच मिळाली. ज्ञानाशिवाय सर्व व्यर्थ आहे असें यांना वाटून हे अगदी अस्वस्थ बनले. आणि आपले आश्रित पंडित श्यामचरण यांच्याकडून यांनीं उपनिषदादि संस्कृत ग्रंथांचें अध्ययन केलें. ब्राह्मधर्माचें विधिविधान व स्तोत्रपाठहि यांनीं याच वेळीं ठरवून घेतले.

यांनीं आपल्या इष्टमित्रांच्या सहकार्यानें 'तत्त्वरंजिनी सभा' स्थापन केली (१८३९). तिचेंच नांव पुढें तत्त्वबोधिनी असें करण्यांत आलें. उपनिषदांतील ज्ञानाचा प्रसार व धर्मजिज्ञासा वाढवावी अशा हेतूनें तेथें मासिक व साप्ताहिक सभा भरत. तेथें पंडित रामचंद्र विद्यावागीश यांचीं प्रवचनें होत. स्थापन झाल्यापासून दोन वर्षांच्या आंत त्या संस्थेकडे सर्वांचें लक्ष वेधून पांचशेंपेक्षां अधिक मोठमोठाले लोक तिचे सभासद झाले. याशिवाय यांनीं वेदपाठशाळा सुरू केली. पुढें यांनीं ब्राह्मो समाजाच्या कामांत लक्ष घालण्याचें ठरवून हे त्याचे सभासद झाले (स. १८४३).

या वेळीं ब्राह्मो समाजांत विशेष शिस्त नव्हती. अवतार मानणें, शूद्रांच्यासमोर वेदपाठ करण्यास ब्राह्मसंदिरांत मनाई असणें, मूर्तिपूजा वगैरे प्रकार चालत. यांनीं 'मी रोज भोजनापूर्वी गायत्री मंत्रानें ब्रह्मोपासना करीन, मूर्तिपूजा करणार नाहीं, समाजास वर्गणी देईन, आणि राजा राममोहन राय यांनीं उपदेशिलेल्या तत्त्वांप्रमाणें धर्माचरण करीन' अशा प्रतिज्ञालेखावर आचार्यासमोर सही करून दीक्षा घेण्याचा विधि सुरू केला. या वेळीं तरी शिखासूत्राचा त्याग करावा लागे. गायत्रीमंत्राबद्दल पुढें दुसरे मंत्र घेण्यांत आले. प्रतिवर्षी घरांत होणाऱ्या दुर्गापूजेच्या वेळीं यांनीं बाहेर प्रवासाला जावयाचा परिपाठ ठेवला आणि घरच्या लोकांना न दुखवितां दुर्गापूजेंत भाग घेण्याचें टाळलें.

ब्राह्मसमाजाच्या शाखा काढण्याचा यांचेमुळें प्रयत्न होऊं लागला. नियमित ईश्वरोपासना, दीक्षाविधि व ब्राह्मधर्मग्रंथ या तीन महत्त्वाच्या सुधारणा राममोहनांच्या नंतर यांनीं घडवून आणल्या (१८५०).

स. १८४५ च्या उन्हाळ्यांत मिशनऱ्यांचे पुढारी अलेक्झांडर डफ यांनीं सुरू केलेल्या वाटवाबाटवीच्या प्रकाराची झळ यांच्या घराला लागली. डफना राममोहन राय यांनीं उत्तेजन देऊन मदत केली होती; पण त्यांनीं आपलें कार्य प्रत्यक्ष सुरू करतांच यांच्यासारख्या साधुवृत्तीच्या व उदार गृहस्थासहि त्वेष आला. ब्राह्म व सनातनी हे सर्वच एक होऊन असा प्रकार पुनः होऊं नये म्हणून खळबळ होऊन उपाय योजण्यांत आले. बरीच मोठी रक्कम गोळा करून हिंदुहितार्थविद्यालय नांवाची संस्था स्थापण्यांत आली.

या वेळीं परस्परांवर जी टीकेची झोड उठली तींत मिशनरींकडून वेदांची निंदा होतांच वेदांची तरफदारी करण्याचें काम यांच्यातर्फे राजनारायण बोस हे तत्त्वबोधिनी पत्रिकेंतून करीत होते. पण वेदांच्या त्रिकालाबाधित्वावर आपसांत यांच्यांतच मतभेद सुरू झाला. तेव्हां यांनीं चार विद्यार्थी काशीस वेद शिकण्यास पाठविले व स्वतःहि एकदां काशीस त्याच्या निर्णयार्थ गेले. पण वेद हे अपौरुषेय व प्रमादातीत असल्याचें ठरेना (१८४७). उपनिषदांतील अद्वैतवादहि यांच्या पूज्यपूजक भावास विरोधक ठरल्यानें हे आत्मप्रचीतीच्या शुद्ध बुद्धिवादी सिद्धान्तावर आले. तथापि यांचा ओढा वेदादि ग्रंथांकडेच असे.

यांचे वडील उदार व खर्चिक असल्यानें त्यांना एक कोट रुपये कर्ज होतें. त्या कर्जाचा त्रास मुलांना होऊं नये म्हणून त्यांनीं आपली मिळकत मुलांचे नांवें ट्रस्ट करून सावकाराच्या तगाद्यापासून निर्बंध करून ठेवली होती. पण सावकारास अशा प्रकारें बुडविणें यांना पसंत नव्हतें. यांनीं आपल्या मिळकतीची यादी करून तिचा लिलांव करून कर्जफेडीकरितां कोर्टांत दाखल केली. चुलता महाराजा रामनाथ व घरची मंडळी यांच्या विरोध व आकांतामुळें हे या निश्चयापासून ढळले नाहींत.

कोणाच्या धनाचा अपहार करूं नये या ईशोपनिषदांतील शिकवणीचा यांच्यावर इतका परिणाम झाला होता. शेवटीं सावकारांनींच या शीलसंपन्न घराण्याची मिळकत न विकतां हप्तेबंदीनें आपल्या रकमा परत घेतल्या. यांनीं मात्र आपल्या वडिलांचेंच कर्ज काय, पण धर्मार्थ कबूल केलेल्या देणग्याहि दिल्या. कांहीं देणग्यांची रक्कम देण्यास उशीर झाला तेव्हां यांनीं त्या व्याजासुद्धां दिल्या.

वडिलांचें वर्षश्राद्ध करतांना ब्राह्मधर्माविरुद्ध शालिग्रामाची पूजा वगैरे करावी लागेल म्हणून लोकांचा बहिष्कार पत्करून तें कृत्य करण्याचें काम यांनीं आपला धाकटा बंधु गिरीन्द्र यावर सोंपविलें. अशा प्रकारें प्रत्येक परीक्षेच्या वेळीं आपल्या निष्ठेला धक्का न लावतां हे उत्तीर्ण होत गेले आणि आपणाकडे अनुयायांचें व इतरांचें लक्ष यांनीं वेधून घेतले.

ब्राह्मधर्माची व्यवस्थित मांडणी करण्याची कामगिरी यांच्याकडे आली. उपनिषदादि ग्रंथ यांच्या तत्त्वज्ञानाला पूर्णपणें पटण्यासारखे नव्हते म्हणून यांनीं ईश्वरी कृपेनें स्फुरलेलीं उपनिषदांतील कांहीं वाक्यें ब्राह्मधर्म म्हणून तीन तासांत सांगून लिहविलीं (१८४८). ही ईश्वरी प्रेरणा होती असें हे मानीत. अद्वैत, अवतार व माया यांना ब्राह्मधर्मांत स्थान नव्हतें. मनुस्मृति वगैरे ग्रंथांच्या आधारें यांनीं नीतिधर्माचाहि एक भाग त्यास जोडला. पण अशा प्रकारें तपशीलाच्या बाबतींत हे निश्चिती करूं लागतांच यांचें तत्त्वज्ञान व आचार अशा दोन्हीला विरोधहि भरपूर होऊं लागला. परधर्मीय व स्वकीय यांच्या जोरकस हल्ल्यास उत्तर देण्याच्या बाबत यांचें थोर व्यक्तिमत्त्वच यांना फार उपयोगी पडलें. यांच्यानंतर केशवचंद्र सेन हे उदयास आले.

यांच्या आयुष्याचा पूर्वार्ध उलटल्यावर वानप्रस्थाश्रमाकरितां हे जागा शोधीत असतां कलकत्त्याच्या उत्तरेस बोलपूर नांवाच्या खेड्याजवळच सप्तपर्णीचीं दोनच झाडें असलेला एक उंचवटा यांना आढळला. तेथें ध्यानस्थ बसले असतां यांना शांति लाभली, म्हणून त्या जागेला शांतिनिकेतन असें नांव यांनीं दिलें. तेथें यांनीं आपल्या आयुष्याचा उत्तरार्ध म्हणजे सुमारें चाळीस वर्षें काढलीं.

आज शांतिनिकेतनामध्यें यांचें स्वतंत्र स्मारक म्हणून कांहीं उभारलेलें नसलें तरी एक संगमरवरी चबुतरा बांधला असून त्याच्यामागें 'तिनि आमार प्राणेर आराम, मनेर आराम, आत्मार शान्ति' वगैरे यांचीं आवडतीं वचनें कोरलीं आहेत. तसेंच एका फांदीवर 'करतार नामगान' अशीं अक्षरें खोदलीं आहेत.

यांचे थोरले चिरंजीव द्विजेंद्रनाथ हे बंगाली भाषेंतील सुप्रसिद्ध कवि असून स्वप्नप्रयाण, ब्राह्मधर्म (यांच्या ग्रंथांचा पद्यमय अनुवाद), मेघदूत व गुम्फआक्रमण इत्यादि त्यांचे काव्यग्रंथ प्रसिद्ध आहेत. यांचे दुसरे चिरंजीव सत्येंद्रनाथ हे आय. सी. एस. असून त्यांनीं बंगालीमध्यें तुकारामाचा गाथा, यांच्या आत्मचरित्राचें भाषांतर व ब्राह्मगीतें प्रसिद्ध केलीं आहेत. यांचे तृतीय चिरंजीव रवींद्रनाथ.

यांचें वाङ्मय—१ ब्राह्मधर्म (पूर्वार्ध-ईश्वरगुणवर्णन, उत्तरार्ध-नैतिक तत्त्वें १८७०), २ ब्राह्मकरार, ३ आत्मचरित्र, ४ मासिक-तत्त्वबोधिनीपत्रिका.

टागोर, रवींद्रनाथ— (जन्म स. १८६१ मे ६-मृत्यु स. १९४१ ऑगस्ट ७) जगप्रसिद्ध हिंदी कवि आणि एका अभिनव तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते. आधुनिक कालांत जागतिक प्रसिद्धि मिळविणाऱ्या भारतीय व्यक्तींत यांच्याबरोबर फक्त म. गांधींचें नांव सांगतां येईल. प्राचीन ऋषींची उज्ज्वल परंपरा आणि आधुनिक जगांतील नावीन्य यांचा मनोहर संगम यांच्यांत आढळे.

यांचें घराणें मूळ वंद्योपाध्याय नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या बंगाली ब्राह्मणाचें. हेंच नांव इंग्रजी उच्चारामुळें बानर्जी या नांवानें सध्यां प्रसिद्ध आहे. हें बंगाल्यांतील फार जुनें घराणें असून इसवी सनाच्या आठव्या शतकांत यांचें पश्चिम बंगाल्यांत वास्तव्य झालें. ठाकूर या नांवानें हें सतराव्या शतकांत ओळखलें जाऊं लागलें. ऐतिहासिक कालांत यांचें घराणें मुसलमानांबरोबर जेवलें म्हणून तें इतर ब्राह्मणांनीं बहिष्कृत केलें. तेव्हांपासून यांचें घराणें 'पिरिलिज' (Pirilis) या हीनतादर्शक नांवानें संबोधिलें जाऊं लागलें. यांचे अजोबा द्वारकानाथ यांनींहि समुद्रगमन करून जुन्या कर्मठपणाला धक्का दिला. पण ते सौम्य प्रवृत्तीचे व आदर्श चारित्र्याचे असल्यानें त्यांना महर्षि अशा शब्दानें गौरविलें जाई. यांचे वडील देवेन्द्रनाथ व बन्धु द्विजेन्द्रनाथ, ज्योतिरिन्द्र व सत्येन्द्रनाथ हे सर्वच विद्या, कला व आचार या दृष्टीनें विशेष प्रकारचे लोक होते. वडील आणि अजोबा हे राजा राममोहन राय यांनीं स्थापन केलेल्या ब्राह्मोसमाजाचे पुरस्कर्ते होते.

यांचा जन्म कलकत्त्याच्या जोड़ासाँको विभागांत झाला. आईचा वियोग लहानपणींच झाला आणि वडिलांचीहि यांच्यावर देखरेख नव्हती. यांचें बालपण नोकरांच्या व्यवस्थेंतच पार पडलें. शाळेविषयीं यांना पहिल्यापासून तिटकारा होता, त्यामुळें यांचें शिक्षण घरींच झालें.

यांच्या वडिलांना प्रवासाचा नाद होता. ते यांना प्रवासांत बरोबर घेत. त्यांच्याबरोबर १८७७ सालीं प्रथम हे इंग्लंडला गेले. तेथें ब्राइटन स्कूलमध्यें कांहीं दिवस व लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमध्यें अभ्यास केल्यावर हे हिंदुस्थानांत परत आले. १८९० सालीं कायद्याचा अभ्यास करण्याकरितां हे इंग्लंडला गेले होते. पण कायद्यांत यांचें मन रमलें नाहीं.

हे चालूं आणि लिहूं बरोबरच लागले. वयाच्या पंधराव्या वर्षापासून यांच्या कविता छापून प्रसिद्ध होऊं लागल्या. १७ व्या वर्षापर्यंत सात हजार ओळी कविता व तसेंच गद्यलेखन यांनीं प्रसिद्ध केलें.

यांना यांच्या २० व्या वर्षाच्या आंतच एका गूढ व दिव्य प्रकाशाचा साक्षात्कार झाल्याचें हे सांगत. असा साक्षात्कार यांना अनेक वेळां झाला. हे लिहितात– 'एका सकाळीं उगवत्या सूर्याकडे पाहत असतां माझ्या डोळ्यांवरून एक आच्छादन दूर झालें. एकावर एक येणाऱ्या प्रकाशकिरणांच्या लाटांनीं जग भरून गेलें. त्यामुळें माझ्या मनांतील उद्विग्नता व निराशा यांचा नाश झाला, आणि मला जग पूर्ववत् दिसूं लागलें.'

याच सुमारास यांचा व बंकिमचंद्र चतर्जीचा परिचय झाला; पण यांच्या सुधारक मतांमुळें तो टिकूं शकला नाहीं. यांच्या वडील बंधूंच्या पत्नीच्या मृत्यूमुळें यांच्या काव्यांत मरणविषयक कल्पना येऊं लागल्या. शाझीपूरला 'मानसी' लिहून हे शिलिडला गेले व आपल्या जमिनदारीची व्यवस्था पाहूं लागले. तेथें यांचा निसर्गाशीं निकट संबंध येऊन यांच्या प्रतिभेचा विकास झाला. त्या वेळचें यांचें गद्य व पद्य 'साधना' या नियतकालिकांत प्रसिद्ध होत असे (१८८७). १८९६ सालीं 'साधना' बरींच वर्षें चालून बंद पडली.

१९१२ सालीं हे इंग्लंडमध्यें पोंचले, तेव्हां यीट्स, स्टॅफोर्ड ब्रुक, नेव्हिन्सन यांच्यासारख्यांशीं यांचा परिचय झाला. यांच्या इंग्रजींत भाषान्तर केलेल्या बंगाली कविता वाचून यांच्या कवितांतील महान् सौंदर्याची त्यांना कल्पना आली. याच वेळीं यांच्या कवितांना इंग्लिश प्रकाशक भेटला. पूर्वी बंगालींत 'गीताञ्जलि' प्रसिद्ध झाली होती. त्या वेळीं तिच्याकडे कोणाचें फारसें लक्ष वेधलें नव्हतें. पण आतां तिची एक सुधारलेली आवृत्ति इंग्रजी वाचकांकरितां मुद्दाम काढण्यांत आली. तिला सुप्रसिद्ध आयरिश महाकवि यीट्स यांची गुणग्रहणपर प्रस्तावना जोडण्यांत आली. बंगालींतील गीताञ्जलीस दुसऱ्या आवृत्तीचाहि योग आला नव्हता तेव्हां इंग्रजी प्रतीच्या डझनावारी आवृत्त्या निघाल्या. सदासर्वकाळ असमाधानाच्या आणि अपूर्णतेच्या मृगजलामागें धांवणाऱ्या पाश्चात्यांना गीताञ्जलींतील समाधान आणि शान्ति यांच्या मधुर संदेशानें वेडें केलें. बसल्याजागीं समाधान आणि तृप्ति देणारा भक्तिमार्ग रणकुंडांत होरपळणाऱ्यांना ईश्वरी देणगी वाटला, आणि गीताञ्जलीवर पाश्चात्य वाचकांच्या उड्या पडल्या. फिट्झजिराल्डच्या उमर खय्यामनंतर पौर्वात्य कवींच्या ग्रंथाला इतकी प्रचंड मागणी पुनः याच वेळीं आली. तेथून अमेरिकाला जाऊन हे हिंदुस्थानांत पोंचले तेव्हां यांना वरील काव्याबद्दल १९१३ सालचें वाङ्मय विभागाचें 'नोबेल प्राइझ' दिल्याचें जाहीर झालें आणि यांच्याकडे जगप्रसिद्ध महाकवि म्हणून लोक पाहूं लागले. कलकत्ता विश्वविद्यालयानेंहि यांचा गौरव करण्याची संधि साधली. ब्रिटिश सरकारनें यांना 'सर' पदवी देऊन गौरविलें (१९१४). याच वेळीं यांची 'गार्डनर,' 'दि क्रेसेन्ट मून', 'दि सायकल ऑफ स्प्रिंग', 'दि होम ॲन्ड दि वर्ल्ड', 'बालक' हीं मोठमोठीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आणि यांचा कीर्तिसूर्य आपला प्रभाव जगभर गाजवूं लागला.

१९१६ सालीं अमेरिकेंत नॅशनॅलिझम (राष्ट्रवाद) व पर्सनॅलिटी (व्यक्तिमत्त्व) यांवर यांचीं व्याख्यानें झालीं. सगळ्या जगांतील विश्वविद्यालयांतून यांना निमंत्रणें येऊं लागलीं. १९२०–३० या काळांत युरोप, अमेरिका व आशियांतील देश यांत यांनीं सात दौरे काढले. या दौऱ्यांत नोबेल प्राइझ मिळाल्यापेक्षांहि यांचा अधिक गौरव झाला.

या प्रवासांत यांची भूमिका नवा संदेश देणाऱ्या प्रेषिताची होती. युरोप हा केवळ जगाला नव्या ज्ञानाचा संदेश देणारा नसून जगाकडूनहि युरोपला पुष्कळ शिकण्यासारखें आहे. पूर्व आणि पश्चिम सांस्कृतिक दृष्ट्या एक झाल्यासच खऱ्या संस्कृतीचा उदय होईल, तोंपर्यंत युरोपीय संस्कृति अपूर्ण राहील अशा आत्मविश्वासपूर्ण प्रचारानें यांची युरोपयात्रा अत्यंत प्रभावशाली आणि नवा प्रकाश देणारी झाली. यांनीं आपल्या अनुकरणा-

पासून पूर्ण अलिप्त असणाऱ्या पोषाख, भाषा, तत्त्वज्ञान वगैरेंनीं सर्वांचें लक्ष आपणाकडे वेधून घेतलें. रशियांत 'मनुष्यधर्म' या विषयावर व्याख्यानें झाल्यावर हे हिंदुस्थानाकडे परत वळले.

यानंतर यांचा सत्तरावा वाढदिवस मोठ्या समारंभानें साजरा झाला. कलकत्त्याच्या टाउन हॉलमध्यें सर्व प्रतिष्ठित व्यक्ति एकत्र झाल्या. प्रथम यांना चांदीच्या पात्रांत अर्घ्य, नंतर गळ्यांत सोन्याची साखळी व हार अर्पण करण्यांत आला. तसेंच सोन्याच्या ताटांत एक मूल्यवान् सुवर्णकमल नि हत्तीच्या दांतावर लिहिलेलें अभिनंदनपत्र आणि जगांतील विख्यात लेखक आइन्स्टिन, हिन्रिच मॅन, बर्ट्रान्ड रसेल वगैरेंनीं लेख लिहिलेला Golden Book of Tagore हा ग्रंथ अर्पण करण्यांत आला.

बोलपूरपासून दोन मैलांवर असणारें 'शांतिनिकेतन' हा यांच्या कल्पनेचा रांच्या काव्यवाङ्मयापेक्षांहि मनोहर असा विलास आहे. या संस्थेचें हें नांव किंवा जागा जरी यांच्या वडिलांनीं शोधली (१८५५) असली तरी प्राचीन हिंदुस्थानांतील आश्रमांतील गांभीर्याच्या साहाय्यानें तत्रस्थ तरुणांची वृत्ति सौंदर्य व देव यांविषयीं जागृत करण्याची कल्पना यांची आहे (१९०१). म्हणूनच या संस्थेंत धर्मशिक्षणावर यांनीं जोर न देतां शुद्ध व उदात्त वातावरणावर विशेष भर दिला. प्रवेश परीक्षेपर्यंतच्या सर्वसाधारण अभ्यासक्रमाला सकाळ-संध्याकाळ प्रार्थना, गुरुवारीं प्रवचन व सुट्टीच्या दिवशीं मुकुट, वसंतोत्सव, फाल्गुनी यांसारख्या यांनींच लिहिलेल्या नाटिकांचा प्रयोग असा कार्यक्रम यांनीं आंखला व तो विद्यार्थी वर्गांत इतका लोकप्रिय झाला कीं केवळ पांच विद्यार्थ्यांपासून सुरुवात झालेल्या या आश्रमांत पुढें दोनशें विद्यार्थी शिकूं लागले. आश्रमांतील सुरुवातीचे शिक्षक ब्रह्मबांधव व रेवाचंद होते. परंतु त्यांचेबरोबरच यांचे परदेशी मित्र सी. एफ. अँड्रूज व डब्ल्यू. डब्ल्यू. पीअर्सन हेहि शिक्षकाचें काम करीत.

परंतु शांतिनिकेतनाची कल्पना कितीहि आकर्षक असली तरी तिची सर्व सिद्धता, तेथील सर्व खर्च चालविण्याची यांची तयारी, यांनीं दिलेल्या नोबेल प्राइझचे सव्वा लक्ष रुपये, यांची जागतिक प्रसिद्धि व विशेषतः गुरुदेव या यांच्या तेथील पदवीला साजेशा व्यक्तिमत्त्वामुळेंच होऊं शकली. साधेपणा, सौंदर्यदृष्टि व विशेषपणा यांच्या बोलण्याचालण्यांतच काय पण साध्या पोषाखांतहि दिसून येई. लांब केश, विशाल पांढरी दाढी, कफनी, खडावा इत्यादि बाह्य गोष्टींबरोबरच एकान्तवास, सृष्टि-सौंदर्याची आवड, ईश्वरनिष्ठा, सदाचार व गूढसंशोधन या यांच्या गुणांमुळेंच यांची आश्रमाची कल्पना यशस्वी होऊं शकली व विश्वभारती विश्वविद्यालयाच्या स्थापनेनें तर यांच्या यशस्विततेनें अत्युच्च शिखर गांठलें. शांतिनिकेतनाच्या आवारांतील 'उत्तरायण' या वसतिस्थानांत हे व वेणुकुंजांत सी. एफ. अँड्रूज हे राहत.

पहिल्या महायुद्धाच्या वेळीं भौगोलिक अडथळे दूर करून मनुष्य प्राणी एकत्र आला तरी त्यांचे धार्मिक, सामाजिक व राजकीय भेद दूर न करतां आल्यानें वैरभाव कमी न होतां अधिकच वाढला. तो भेदभाव कमी करून मायभूमीचा उद्धार करावा म्हणून यांनीं या संस्थेची उभारणी केली. पौर्वात्य संस्कृतीच्या अध्ययनाचें केन्द्र निर्माण करावें आणि पूर्वीच्या कालीं भिन्न संस्कृतींच्या लोकांचा समन्वय करण्याचें काम जसें भारतीय संस्कृतीनें केलें तसें आजहि करावें, राजकीय उलाढालीपेक्षां समन्वयवादी नानक, कबीर वगैरेंना जन्म देणारी भारतभूच या कामाला अधिक योग्य असल्यानें पूर्व-पश्चिम-संयोग साधावा या हेतूनें यांनीं या विद्यापीठाची उभारणी केली (१९२१). याचे मुख्य उद्देश—१ सृष्टीच्या अवलोकनानें सत्याचा शोध करावा, २ जगांत विश्वबंधुत्वाची भावना वाढवावी, ३ पौर्वात्य व पाश्चात्य संस्कृतीचा सुंदर मिलाफ व्हावा, ४ जगांत शांतता राहील अशी समाजरचना करावी. या विद्यापीठाचें पथभवन, शिक्षाभवन, विद्याभवन व विश्वभारती संमिलनी अशा एकीपेक्षां एक श्रेष्ठ पांच शाखा आहेत. या संस्थेचे अध्यक्ष हे होते. येथें प्रत्येक धर्माच्या अनुयायांचा मठ स्थापण्यांत आला असून त्या त्या धर्माच्या वाङ्मयाचीं पुस्तकें मिळण्याचीहि सोय करण्यांत आली आहे. तेथें ग्रंथ मूळ भाषेंतून वाचण्यावर कटाक्ष असतो.

येथील अभ्यासक्रमांत— १ खेड्यांची पुनर्घटना, २ संस्कृत वाङ्मय, ३ बौद्ध तत्त्वज्ञान, ४ हिंदुस्थानांतील प्रमुख भाषा, ५ कला व संगीत, ६ आंग्ल वाङ्मय व युरोपिय संस्कृति अशा विषयांचा समावेश असून संशोधनकार्यासहि उत्तेजन मिळतें. या संस्थेंत नारीविभाग म्हणून स्त्रीशिक्षणाची स्वतंत्र शाखा व सुरूल येथें श्रीनिकेतन नामक शेतकीच्या प्रयोगाची व शिक्षणाची एक संस्था आहे. या सर्व संस्थांचा समावेश आतां

विश्वभारती या विराट संस्थेंत होतो व तेथें आतांपर्यंत या कार्यासाठीं लक्षावधि रुपये खर्च झाले आहेत.

या विद्यापीठाचा लाभ घेण्यासाठीं पाश्चात्य देशांतील अनेक विद्वान् लोक येत. प्राग विद्यापीठाचे संस्कृत पंडित विंटरनिट्झ, पॅरिसचे डॉ. सिल्वन लेव्ही, व्हिएन्ना विद्यापीठाचे डॉ. जीजर तसेंच चीन तिबेटमधील कांहीं पंडित येथें येऊन गेले व त्यांच्या विचार-विनिमयाचा फायदा येथील प्रौढ विद्यार्थ्यांना झाला.

सुमारें ३००० कविता, ५० कलात्मक वाङ्मयीन व धार्मिक निबंधसंग्रह, ३८ नाटकें, ३५ राजकीय पुस्तकें, १९ कथासंग्रह व कादंबऱ्या इतकें विपुल व विविध वाङ्मय यांनीं बंगाली भाषेंत निर्माण केलें आहे. यांपैकीं बहुतेक सर्व पुस्तकांचीं भाषांतरें इंग्लिश भाषेंत झालेलीं आहेत. यांच्या गीताञ्जलीचा तर इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, हिब्रु, स्वीडिश, डॅनिश, डच, इटालियन, झेक, स्पॅनिश, जुगोस्लाव्ह, लॅटव्हियन, इस्टोव्हियन, रशियन या पाश्चात्य व हिंदी, मराठी, तामीळ, कानडी इत्यादि देशी भाषांत अनुवाद झाला आहे. इतकी लोकप्रियता जगांतील कोणाहि ग्रंथकाराला सध्याच्या कालांत लाभलेली नाहीं.

यांच्या गीताञ्जलिप्रमाणेंच यांचीं शिशुगीतें व लघुकथा स्वभावांतील सूक्ष्म छटा व्यक्त करण्याच्या दृष्टीनें उत्कृष्ट समजण्यांत येतात. यांनीं बंगाली भाषेला सोपें व घरगुती वळण दिलें असलें तरी लौकिक घरगुती भाषा ग्रंथांत वापरण्याची यांची लकब नापसंत असणाराहि फार मोठा वर्ग आहे.

यांच्या या साहित्यिक पर्वतापुढें यांच्या इतर चळवळी रजःकणाप्रमाणें वाटण्याचा संभव आहे. परंतु गायक, अभिनयपटु, स्वररचनाकार, शिक्षक, वक्ते, सौंदर्योपासक व मुख्यतः चित्रकार हे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी कांहीं महत्त्वाचे पैलू आहेत. चित्रकलेच्या बाबतींत तर यांनीं वयाच्या अडुसष्टाव्या वर्षी सुरुवात केली व मॉस्को, बर्लिन, म्युनिक, पॅरिस, बर्मिंगहॅम, न्यूयॉर्क यांसारख्या मोठमोठ्या शहरीं आपल्या चित्रांचीं प्रदर्शनें भरवून जगाच्या सर्व भागांतून वाहवा मिळवली.

यांचा भर मानसिक क्रान्तीवर होता तरी यांच्या चारित्र्यांत राजकारणालाहि महत्त्वाचें स्थान आहे. ज्या ज्या वेळीं देशांत राजकीय चळवळीला महत्त्व आलें तेव्हां तेव्हां यांना तींत भाग घेतल्याशिवाय दूर राहतां आलेलें नाहीं. बंगालच्या फाळणीमुळें उत्पन्न झालेल्या खळबळींत यांनीं महत्त्वाचा भाग घेतला, असंख्य लेख लिहिले, व्याख्यानें दिलीं, राष्ट्रीय शाळांना उत्तेजन दिलें व खेडेगांवांत समित्या स्थापन केल्या. यांनीं केलेलीं पदें त्या वेळीं सर्वत्र गायलीं जाऊं लागलीं. पण हे जों जों अशा चळवळींत गुरफटूं लागले तों तों यांना राजकारणी लोकांच्या क्षुल्लक मानगडींचा वीट येऊं लागला व यांनीं त्या चळवळींतून आपलें अंग काढून घेतलें आणि हे पुनः शान्तिनिकेतनांत येऊन आपलें एकान्तवासांतील आयुष्य कंठूं लागले. चळवळींत पडल्यानें तेथें यांच्यावर पोलिसांची देखरेख होतीच. शिवाय देशभक्तांच्या शिव्याशापांची लाखोली यांना सोसावी लागली ती निराळीच. १९११ सालीं ब्राह्मसमाजाच्या अनेक शाखांत एकीकरण करण्याचा यांनीं प्रयत्न केला तोहि असाच वाया गेला.

पण पुढें जालियनवाला बागेंत झालेल्या कत्तलीनें अस्वस्थ होऊन यांनीं आपली 'सर' ही पदवी परत केली. अशा तऱ्हेनें इच्छा नसतांना हे परत राजकारणाकडे ओढले गेलें. त्या वेळच्या असहकाराच्या जमान्यांतील चरखा, खादी वगैरे गोष्टींविरुद्ध यांनीं मॉडर्न रिव्ह्यूंत लेख लिहिले. परंतु म. गांधींचें जीवित विभक्त मतदारसंघांमुळें धोक्यांत आलेलें पाहतांच हा वृद्ध महाकवि येरवड्याच्या तुरुंगांत दाखल झाला व यांनीं म्हटलेल्या गीतांजलीच्या प्रार्थनेंतच गांधीजींचा उपास सुटला.

यांच्या काव्यांत व्यावहारिक स्वरूपांतील वर्णन चालू असतां आध्यात्मिक किंवा रहस्ययुक्त अशा अज्ञात तत्त्वांकडे लक्ष खेचलें जातें. यांचा हेतु त्याच अज्ञात असणाऱ्या सौंदर्यमय व रहस्ययुक्त शक्तीकडे लक्ष खेचण्याचा असतो. फक्त त्याला साधन म्हणून हे व्यवहाराचा आश्रय करतात. सर्व सृष्टींत यांना एका विशिष्ट शक्तीच्या छायेचा आभास होत असतो आणि तो व्यक्त करण्याकरितां हे लिहिण्यास आरंभ करतात. त्या गूढ असणाऱ्या अज्ञात वस्तूला छाया, रहस्य किंवा अध्यात्म यांपैकीं कोणत्याहि शब्दानें संबोधितां येईल. तथापि या प्रत्येक वादांतील गूढतेंत अधिक स्पष्टता येत जाते. यांच्या काव्यांत तिन्ही प्रकार आढळतात. यांच्या काव्यांत सौंदर्यमय मधुर तत्त्वाचा आभास नेहमींच होतो, पण ईश्वरविषयक स्पष्ट भावनाहि पुष्कळ ठिकाणीं व्यक्त केली जाते. पूर्वीचे ज्ञानदास व कबीर हे दोन कवि अशा प्रकारचे होऊन गेले. त्यांपैकीं व्यावहारिक काव्य करून ईश्वराकडे संकेत करणाऱ्या

कबीरापासून आपणास स्फूर्ति मिळाल्याचें यांनीं कबूलच केलें आहे.

परंतु यापेक्षांहि श्रेष्ठ अशा एका नव्या जागतिक समाजरचनेचा पाया घालणारे म्हणून यांच्या कार्याकडे पाहिलें पाहिजे. यांना स्फूर्ति रामायण, महाभारत रचणारे वाल्मीकि, व्यास हे संस्कृत भाषेंतील महाकवि, मध्ययुगांतील वैष्णव साधुकवि, विश्वकुटुंबवादी नानक-कबीर वगैरे तत्त्वज्ञानी यांच्यापासून मिळाली. बहुजन-समाजाला भारून टाकणारी धार्मिक उत्कटता यांच्यापाशीं आहे, तसेंच उपनिषदांतील साध्या व सुटसुटीत तत्त्वज्ञानाचा व जीवनाचा आदर्श यांच्यापुढें आहे. सध्यांच्या कालांतील महापुरुष होण्यापेक्षां भविष्य-कालाचे युगप्रवर्तक होण्याची महत्त्वाकांक्षा यांच्यांत स्पष्ट दिसते. यांचें तत्त्वज्ञानहि स्वतंत्र व नवें आहे.

यांच्या बंगाली भाषेंतील राष्ट्रगीताचीं कांहीं कडवीं पुढें नमुन्यादाखल दिलीं आहेत.

जन–गण–मन–अधिनायक
जय हे भारत भाग्यविधाता
पंजाब सिंध गुजरात
मराठा द्राविड उत्कल वंग
विन्ध्य हिमाचल यमुना गंगा
उच्छल जलधि तरंग
तव शुभनामे जागे
तव शुभ आशिष मागे
गाये तव जयगाथा
जनगण मंगलदायक जय हे
भारत भाग्यविधाता
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय जय हे ॥
पतन अभ्युदय बंधुर पंथा,
युग युग धावित यात्री,
हे चिरसारथी, तव रथचक्रे
मुखरित पथ दिन रात्री
दारुण विप्लव माझे
तव शंखध्वनि वाजे
भव संकट दुखत्राता
जनगण पथ–परिचायक
जय हे भारत भाग्यविधाता.

यांचें इंग्रजी भाषेंतील स्वतंत्र व अनुवादलेलें वाङ्मय–

काव्यें : (1) Morning Songs, (2) The Love of Rahu, in Pictures and Songs, (3) Manasi, (4) Sonar Tari, (5) Sharps and Flats, (6) Naivedya, (7) Balak, (8) Gitanjali, (9) Gardener (1913), (10) Fruit Gathering, (11) The Crescent Moon, (12) The Fugitive इत्यादि.

नाटकें : (1) Nature's Revenge, (2) Sācrifice, (3) Autumn Festival, (4) The King of the Dark Chamber, (5) The Post Office, (6) Red Oleanders, (7) Sannyasi, (8) Chitra (1913) इत्यादि.

व्याख्यानें : (1) Nationalism (जपान १९१६), (2) Personality (अमेरिका १९१६), (3) Talks in China (1924), (4) The Religion of Man (हिबर्ट लेक्चर्स, रशिया १९३१) इत्यादि.

कादंबऱ्या : (1) The Home and the World, (१९१९), (2) The Wreck (नौका डुबी १९२१), (3) Gora (1924) इत्यादि.

गोष्टी : (1) Hungry Stones and Other Stories (1915), (2) Mashi and Other Stories (1918), (3) Stories from Tagore (1918), (4) Glimpses of Bengal (1921) इत्यादि.

इतर : (1) My Reminiscenes (1917), (2) Creative Unity (1922), (3) Letters from Abroad (1923), (4) Letters to a Friend (1929), (5) Thoughts from Tagore (1929) इत्यादि.

टाटा, जमशेदजी नसरवानजी—(जन्म स. १८३९–मृत्यु स. १९०४ मे १०; नौहियम, जर्मनी) जगप्रसिद्ध हिन्दी व्यापारी, कारखानदार, दानशूर व देशभक्त.

यांचा जन्म नवसरी येथें एका मध्यम स्थितीच्या पारशी कुलीन घराण्यांत झाला. तेथें शिक्षणाची विशेष सोय नसल्यानें यांना तेराव्या वर्षी मुंबईस पाठविण्यांत आलें. तेथें यांनीं १८५८ पर्यंत 'एलिफन्स्टन इन्स्टि-ट्यूशन 'मध्यें शिक्षण घेतलें.

हिंदुस्थानांत ब्रिटिशांचा प्रथम विशेष संबंध पारशी

लोकांशीं आला. त्यांनीं त्याचा फायदा चांगला घेतला. यांच्या वडिलांची मुंबईस व्यापारी पेढी होती. तिच्याशीं प्रेमचंद रायचंद यांचा विशेष संबंध होता. त्यांनीं पर्शियन वॉरमध्यें बुशायरमधील सैन्यास मालाचा पुरवठा करून चांगला पैसा कमाविला.

यांचे वडील चीनशीं अफूचा व्यापार करीत होते. त्यांना त्यांत चांगला फायदा मिळून घरची सांपत्तिक स्थिति सुधारली. हे आपल्या बापाच्या धंद्यांत लक्ष घालून व्यापाराचें शिक्षण घेत होते. तेथून एकदां संधि येतांच हे शांघाय हाँगकाँगकडे गेले आणि चीनशीं व्यापार करण्याकरितां आवश्यक असणारें ज्ञान यांनीं संपादन केलें. तेथेंच यांनीं जमशेदजी अरदेसर अँड को. या व्यापारी संस्थेची स्थापना केली (१८६१).

तेथून हे परत आले तेव्हां अमेरिकेंत लोकयुद्ध (सिव्हिल वॉर) सुरू झालें. या वेळीं हिंदुस्थानांतील कापसास अफाट भाव आला. लढाई संपतांच ही स्थिति पालटली आणि यांची आर्थिक स्थिति खालावली. इंग्लंडच्या जामिनकीच्या बाबतींत यांना अत्यंत वाईट अनुभव आले आणि सुस्थिर आर्थिक स्थितीचें महत्त्व यांच्या चांगलें ध्यानीं आलें.

नंतर झालेल्या ॲबिसिनियन वॉरमध्यें मालपुरवठा करण्याच्या कॉंट्रॅक्टमध्यें यांना पुनः चांगला पैसा मिळाला. तेव्हां हे यंत्रकलेचें ज्ञान मिळविण्याकरितां इंग्लंडांत मँचेस्टर येथें गेले (१८६५) व परत हिंदुस्थानांत आले. येथें आल्यावर मुंबईस गिरणी न काढतां अनेक मित्रांचा विरोध पत्करूनहि नागपूर येथें यांनीं 'एम्प्रेस मिल' काढली (१८७७) आणि ती कल्पना इतकी यशस्वी झाली कीं, शंभर टक्के नफा वांटण्याच्या यांच्या स्वप्नानें शेंकडा ३२० पर्यंत नफा भागीदारांना देण्यापर्यंत मजल गांठली (१९२०). कुर्ला व अहमदाबाद येथील जुन्या गिरण्या नव्या करण्याचे नादानें यांचे पुष्कळ श्रम वायां गेले. जुन्या गिरण्यांचा जम बसविण्यापेक्षां नवीन गिरणी काढणें श्रेयस्कर असतें हें तत्त्व यांना पुढें अनुभवानें कळून आलें. पुढें 'स्वदेशी मिल' ही नवी गिरणी सुरू करून आणि 'धरमसी मिल' विकत घेऊन यांनीं या धंद्यांत सारखी प्रगति चालू ठेवली. कापूस कातण्याच्या व विणण्याच्या यंत्रांमधील नवीन नवीन शोधांकडे लक्ष ठेवून यांनीं आपल्या गिरण्यांत सतत सुधारणा केली. येथील कापसाच्या लागवडींत लक्ष घालून लांब धाग्याचा कापूस निर्माण करण्याचा प्रयत्न केला. बाजारपेठांत इतरांपेक्षां आपलें कापड स्वस्त कसें विकतां येईल इकडेहि यांचें लक्ष असे. १८९५ साल हें यांच्या वाढत्या उद्योगधंद्यांत व व्यापारांत अतिशय भरभराटीचें गेलें.

यांची खरी कर्तबगारी मुंबईला हल्लीचें रूप देण्यांत आहे. पूर्वी मुंबई ही अनेक बेटांत विभागली होती. शिवाय सर्वत्र दलदल असे. अशा वेळीं तेथील जमीन कोण विकत घेणार ? पण हे बिनधोकपणें पुढें येत आणि तेथील जमिनी खरेदी करून त्यांवर इमारती उठवीत. मुंबईच्या उज्वल भविष्यकाळाची यांना कल्पना आलेली असल्यानें यांनीं आजच्या भव्य मुंबईचा पाया घातला आणि कोट्यवधी रुपये कमाविले. मुंबईच्या प्रत्येक भागांत आज यांनीं बांधलेल्या इमारती यांच्या व्यापक दृष्टिकोनाची कल्पना देण्यास समर्थ आहेत.

परंतु या गोष्टी यांच्या चिरंजीवाच्या हातून पुढें घडून आलेल्या महान् उद्योगांचीं केवळ पूर्वचिन्हें होतीं. यांच्या योजकतेमुळें बंगलोरची संस्था, जमशेदपूर येथील लोखंडाचा कारखाना व इलेक्ट्रिक वर्क्स हे महान् उद्योग निर्माण झाले.

हिंदुस्थानांतील कारकुनी व नोकरी पेशाचें शिक्षण यांना प्रथमपासूनच नापसंत होतें. त्यांतच 'जर हिंदी विश्वविद्यालयें हीं केवळ परीक्षा घेणारीं यंत्रें बनतील तर उच्च शिक्षणाची वाढ हिंदुस्थानांत होणें अशक्य आहे' या लॉर्ड रे यांच्या कुत्सित उद्गारांची भर पडली व या आक्षेपाला उत्तर म्हणून यांनीं Indian Institute of Science काढण्याचें ठरविलें. यासाठीं संशोधनात्मक व शास्त्रीय दृष्टि यावी म्हणून प्रो. बी. जे. पादशहा यांना बाल्टिमोर येथील जॉन्स हॉपकिन्स इन्स्टिट्यूटमध्यें यांनीं पाठविलें व हिंदुस्थानांतील शास्त्रीय शिक्षणाच्या उन्नतीसाठीं ३० लाख रुपये काढून ठेवले. परंतु हें कार्य यांच्या हयातींत सिद्धीस गेलें नाहीं. यांच्या मृत्यूनंतर यांच्या मुलानें ही रक्कम त्याच कार्यार्थ देण्याचें ठरविलें. सरकारनें त्यांत भर घातली व म्हैसूरच्या महाराजांनीं त्यांत आणखी द्रव्याची भर घालून आपल्या संस्थानांत जागा दिली. सन १९११ मध्यें बंगलोर स्टेशनजवळ या कार्याच्या इमारतीचा पाया घालण्यांत आला व या संस्थेंत जनरल ॲन्ड अप्लाइड केमिस्ट्री, इलेक्ट्रो-टेक्नॉलजी व ऑरगॅनिक केमिस्ट्रीकरितां विद्यार्थी घेण्यांत येऊं लागले. Indian

Institute of Science ही संस्था आतां जगाच्या पूर्वभागांतील अग्रेसर संस्था ठरली आहे.

यांचा दुसरा उद्योग लोखंडी कारखान्याचा होय. अर्थशास्त्रीय चक्र चालू राहण्यांत या धंद्याची असणारी आवश्यकता यांच्या बरेच दिवसांपासून ध्यानांत आली होती. त्यामुळें या दृष्टीनें होणाऱ्या प्रत्येक हालचालीकडे यांचें लक्ष असे. यांच्या आधी बरेच दिवस कुलटीला लोखंड तयार होत असे. पण पोलाद करण्यांत कोणालाहि कधींच यश आलें नाहीं. त्याकरितां परदेशी वस्तु आणणें अपरिहार्य असें. याच सुमारास कोसिपूरच्या मेजर महोन नांवाच्या सरकारी अधिकाऱ्यानें एक रिपोर्ट प्रसिद्ध केला. त्यांत बंगालमध्यें लोखंड व पोलाद यांच्या निर्मितीकरितां मोठ्या प्रमाणावर व आधुनिक पद्धत्यनुसार कारखान्यांची शक्यता प्रतिपादिली. तदनुसार यांनीं शास्त्रीय ज्ञान संपादन करवून संशोधन करविलें व अखेर दोराब टाटा यांनीं आपले प्रस्तरशास्त्रज्ञ प्रमथनाथ बोस यांचे साहाय्यानें बंगालमध्यें लोखंडाच्या टेंकड्यांचा शोध लावला. यासाठीं यांनीं स्वतःचें व लोकांचें असें १,६३०,००० पौंड भांडवल त्यांत गुंतविलें. पुढें तें कमी पडूं लागतांच आणखी ४००,००० पौंड ग्वाल्हेरच्या महाराजांनीं दिले व या प्रचंड कामास सुरुवात झाली. एंजिनियर प्रथम प्रथम तेथें गेले तेव्हां तेथें काड्यांचीं व झुडपांचीं जंगलें होतीं. पण आज त्या ठिकाणीं टाटा आयर्न अँड स्टील वर्क्स लि. या कारखान्याचा अवाढव्य पसारा उभा आहे.

पूर्वी साक्ची या नांवानें प्रसिद्ध असणारें खेडें आज जमशेदपूर हें दीड लक्ष वस्तीचें शहर बनलें आहे. येथें मजुरांकरितां यांनीं आठ हजार राहण्याच्या जागा बांधल्या आहेत आणि तीन कोटि सत्तावीस लक्ष रुपये हें शहर बसविण्यांत खर्च झाले आहेत. दर वर्षी बावन लक्ष रुपयांचा खर्च या शहराकरितां होतो. या कंपनीच्या मालकीच्या कोळशाच्या खाणी व कोळसे वाहणारीं जहाजें आहेत.

या कारखान्यांत धातुशास्त्रांतील निरनिराळे शोध लावण्यासाठीं 'रिसर्च लॅबोरेटरी' असून जमशेदपूर येथें १०० मैल लांबीची यांनीं स्वतःची रेल्वे बांधली आहे.

आजसुद्धां टाटांच्या सर्वांत मोठ्या उद्योगांत या कारखान्याची गणना होते. अमेरिका व युरोप या देशांशिवाय इतका मोठा व स्वतंत्र कारखाना जगांत दुसरा नाहीं. अगदीं खनिज लोखंडापासून उत्तम पोलादापर्यंतची सर्व रूपान्तरें या कारखान्यांत पार पाडलीं जातात. पत्रे, गज, रेल्वेचे रूळ, स्लीपर्स, फिशप्लेटस्, शेतकामांचीं हत्यारें, रेल्वेचे आस इत्यादि वस्तु येथें निर्माण होतात. डांबर, अमोनियम सल्फेट, बेन्झाल, टो ल्यूल, झिंक ड्रॉस, रेड ऑक्साइड, फेरोसल्फेट हे पदार्थ यांबरोबरच तयार केले जातात. याशिवाय किरकोळ कितीतरी वस्तु येथें निर्माण होतात.

यांच्या सर्व उद्योगधंद्यांत व त्याबरोबरच हिंदुस्थानच्या इतर औद्योगिक क्षेत्रांत हा कारखाना अत्यंत फायदेशीर चालला आहे. याचें गमक म्हणजे या कारखान्याच्या ३० रुपयांच्या एका शेअरची किंमत युद्धकालांत २२०० रुपयांपर्यंत चढली. हिंदुस्थानांत सर्वत्र या धंद्यावर फार मोठ्या प्रमाणांत सट्टेबाजी चालू असते.

गेल्या महायुद्धांत उत्पन्न झालेल्या सरकारी अडचणी विचारांत घ्यावयाच्या यांच्या पद्धतीमुळें युद्धकालांत यांच्या या धंद्याला फारच मोठा उठाव मिळाला. युद्धापूर्वी या कारखान्यांत उत्पन्न होणाऱ्या मालाचें क्षेत्र घरगुती भांडींकुंडीं व रेल्वेचे रूळ यांना लागणाऱ्या साध्या पोलादापुरतीच मर्यादित असे. यंत्राला वापरण्याजोगें पोलाद उत्पन्न करण्यास हिंदुस्थानांतील कोणताच लोखंडी मालाचा कारखाना या वेळीं धजत नसे. हें क्षेत्र विस्तृत करण्याची पहिली संधि अलीकडेच बांधण्यांत आलेल्या हावरा पुलामुळें यांना मिळाली. पुलासारख्या कामाला लागणारें कमींत कमी मेसळ असलेलें चिवट पोलाद तयार करण्यांत यांच्या कारखान्याला यश लाभलें व या पुलाच्या कामासाठीं 'टिस्कोम' या नांवानें १७००० टन पोलाद यांनीं पुरविलें. याच संशोधनांतून पुढें 'टिस्कॉर' नांवाचें गंजण्याचे व टिकाऊपणाचे बाबतींत अधिक परिणामकारक ठरलेलें पोलाद निघालें. रेल्वेचीं एंजिन्स व डबे बांधण्यांत तें अतिशय उपयोगी असल्याचे प्रयोगान्तीं ठरलें.

अशा प्रकारच्या पोलादाच्या निरनिराळ्या स्वरूपांची उत्पत्ति मोठ्या प्रमाणावर करण्याची संधि 'आर्मर प्लेट्स' करण्याच्या सरकारी मागणीनें यांना मिळाली (१९४०).

तोफखान्यासाठीं लागणारें टिकाऊ पोलाद तयार

करण्याचा हा अनुभव यांचा पहिलाच असल्यानें आमूलाग्र संशोधन करून अखेर यांनीं 'बुलेट-प्रुफ' 'आर्मर प्लेट्स' करण्यांत यश मिळविलें. इतर देशांत तयार होणाऱ्या आर्मर प्लेट्सच्या दर्जाचा माल आतां कारखान्यांत तयार होत असून टाटा प्लेट्सनी संरक्षिलेल्या आठव्या फौजेंतील चिलखती गाड्यांनीं उत्तर आफ्रिकेंतील युद्धांत स्पृहणीय यश संपादन केलें आहे.

या लष्करी साहाय्याप्रमाणेंच देशांतल्या देशांत उत्पन्न होणाऱ्या सरकारी अडचणींतहि यांच्या कारखान्यानें साहाय्य केलें. युद्धकालांत चिल्लर नाण्यासाठीं लागणाऱ्या धातूंची कमतरता दिसून येतांच यांनीं ताबडतोब 'स्टील-डाइज' तयार करून सरकारची नड भागवली. त्याचप्रमाणें टेलिफोन व तारखातें यांना लागणारें लोहचुंबक परदेशांतून येण्याचें बंद होतांच यांच्या कारखान्यानें पोलादापासून लोहचुंबक तयार करून हीं बंद पडण्याच्या बेतांत आलेलीं खातीं यांनीं पुन्हां सुरू केलीं. वैद्यकीय उपकरणांना लागणारें स्टेनलेस स्टील व बंदुकांना लागणारें स्पीड स्टील तयार करण्यांतहि आतां यांच्या कारखान्यास यश मिळालें आहे.

परदेशांतून येणारी यंत्रसामुग्री बंद पडतांच सरकार व जनता हिंदी कारखान्यांकडे, विशेषतः यांच्या लोखंडी मालाचे कारखान्याकडे विशेष अपेक्षेनें पाहूं लागली. ती अपेक्षा यांनीं किती कसोशीनें पुरी केली आहे, तें यांच्या या हालचाली दाखविण्यास समर्थ आहेत. हिंदी उद्योगधंदे-विशेषतः यांचा हा कारखाना यांचा तेजस्वी भविष्यकाळ यांनीं निश्चित केला आहे.

मुंबईच्या यांच्या गिरण्यांत जसजशी वाढ होत चालली तसतसें यांना बाराशें मैल अंतर तोडून बंगालमधून कोळसा आणणें कठीण वाटूं लागलें. याच सुमारास सह्याद्रीच्या घाटांतील सतत तीनशें इंच पाऊस पडणारीं कांहीं ठिकाणें यांच्या ध्यानांत आलीं. आणि मुंबईपासून केवळ साठ मैलांचें अंतर तोडून हवी तितकी हायड्रो-इलेक्ट्रिक पॉवर उत्पन्न करण्याची कल्पना यांचे मनांत डेव्हिड गॉसलिंग यांनीं भरवून दिली (१८९७). ती मूर्त स्वरूपांत येण्याचा योग मात्र अलिकडेच आला (१९१०). 'टाटा हायड्रो-इलेक्ट्रिक वर्क्स' ही आतां टाटा उद्योगधंद्याची एक प्रमुख शाखा बनली आहे.

१ टाटा हायड्रो-इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी लि. (१९१०), २ दि आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी लि. (१९१६), ३ टाटा पॉवर कंपनी लि. (१९१९), ४ दि युनायटेड पॉवर लि. (१९३७) या चार संस्था वरील संस्थेमार्फत चालविण्यांत येतात. कांहीं अमेरिकन व्यापाऱ्यांच्या आर्थिक सहकार्यानें ही संस्था चालविण्यांत येते. लोणावळा, वळवण, शिरोटा, ठोकरवाडी आणि मुळशी या पांच ठिकाणच्या धरणांच्या पाण्याचा उपयोग करून खोपोली, भिवपुरी आणि भिरा या ठिकाणीं हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या विजेपैकीं चाळीस टक्के वीज उत्पन्न होते. मुंबई शहरांतील दिवे, ट्राम, गिरण्या व रेल्वे (पुणें, इगतपुरी व बोरिवलीपर्यंत) या विजेवर चालतात. घरामध्यें एकापेक्षां जास्त दिवा न वापरूं शकणाऱ्या लहान लहान घरांतहि बॉम्बे इलेक्ट्रिकल अँड ट्रामवे कंपनीनें आपलें जाळें पसरलेलें आहे.

या संस्थेची काम करण्याची पद्धत मात्र जरा गुंतागुंतीची आहे. लोणावळा व वळवण येथें पावसाचें पाणी साठविण्याचे उथळ तलाव असून शिरोटा येथें असणाऱ्या तलावाचें पाणी एका कालव्याच्या साहाय्यानें वळवणच्या तलावांत आणून सोडलें जातें. पुढें आंध्र खोऱ्यांत व निरा-मुळा नदीवर प्रत्येकीं एकएक तळें बांधून टेंकडीच्या पायथ्याशीं असणाऱ्या पाणचक्क्यांपाशीं आणण्याची सोय करण्यांत आली आहे.

हिंदुस्थानांतील एका नव्या औद्योगिक परंपरेचें जनकत्व यांच्याकडे जातें. यांनीं उपयोगांत आणलेल्या यंत्रांमुळें, बंद पडलेल्या उद्योगधंद्यांनीं चिडलेल्या शेतकरी वर्गाचे शिव्याशाप खात यांना आपल्या सुरुवातीच्या कांहीं कारखान्यांची उभारणी करावी लागली. 'इतर पुढारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीनें जर हिंदुस्थानला जावयाचें असेल तर त्याचें औद्योगिक कार्यक्षेत्र विस्तृत झालें पाहिजे, हिंदुस्थानची भौतिक किंवा आधिभौतिक उन्नति होण्याचा शक्य कोटींत असणारा मार्ग हाच आहे' ही यांची श्रद्धाच लोकांचे हे आघात प्रत्याघात सहन करण्याच्या मुळाशीं होती.

व्यवहारी दृष्टीबरोबरच व्यापक कल्पना, क्षुल्लक संधीहि न सोडण्याच्या कटाक्षाबरोबरच जीवावरील धाडस करण्याची तयारी आणि कलादृष्टीबरोबरच व्यापारी नजर या यांच्या अजोड गुणसंमिश्रणामुळेंच बुद्धि, कल्पना किंवा धाडस या बाबतींत आपल्या तोडीचें सामर्थ्य असणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांच्यापुढें हे गेले. मिळालेला बारीक सारीक अनुभवहि अत्यंत दक्षतेनें टिपून

घेऊन त्याचा विचार पुढील धोरणाच्या प्रत्येक पदक्षेपाबरोबर करावयाचा ही यांची कार्यपद्धति. याबरोबरच रूढ झालेल्या धंद्यापेक्षां नवें औद्योगिक क्षेत्र शोधण्यावरील यांच्या कटाक्षामुळें हे जेथें गेले तेथें यशस्वी झाले. जो धंदा करावयाच्या तो नाविन्यपूर्ण, सफाईदार व पहिल्या दर्जाचा करण्याचा यांच्या 'टाटा टच'मुळें बाजारांत यांच्या नांवाला एक विशिष्ट किंमत उत्पन्न झाली. हलक्यांत हलकें सूत व कापड तयार करून तें चीनच्या गळ्यांत मारण्याबाबत ज्या वेळीं मुंबईच्या गिरणीवाल्यांत चढाओढ लागली होती त्याच वेळीं यांची एम्प्रेस मिल हिंदुस्थानांत पहिल्या दर्जाचें कापड तयार करण्याचा प्रयत्न करीत होती. तीच गोष्ट यांच्या बंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सची सांगतां येईल. अभिजातपणा हा यांच्या या प्रत्येक कृतीचा आत्मा होता.

परंतु एकमार्गीपणानें आपला धंदा चालू ठेवतांना आपल्या देशाच्या गरजांचा यांनीं आपणास कधींच विसर पडूं दिला नाहीं. आपल्या स्वतःच्या हिताच्या बरोबरीनें देशाच्या आवश्यकतांचा हे विचार करीत, हें यांच्या लोखंडी मालाचा कारखाना किंवा हायड्रो-इलेक्ट्रिक वर्क्सच्या योजना पटवून देण्यास समर्थ आहेत.

या आपल्या सर्व कल्पना पुढें व्यवस्थित चालविल्या जाव्यात या हेतूनें यांनीं आपल्या सर्व संस्थांच्या कारभाराची जी योजना ठरवून दिली आहे तींहि अशीच महत्त्वाची आहे. टाटा सन्स लि. ही यांनीं स्थापन केलेली संस्था सर्व इतर टाटा संस्थांची व्यवस्थापक आहे. या संस्थेचें पंच्याऐंशी टक्के भांडवल टाटा कुटुंबांतील मंडळींनीं उभारलेल्या धर्मादाय ट्रस्ट्सच्या मालकीचें असल्यानें या निरनिराळ्या संस्थांना होणारा फायदा ट्रस्ट्सकडे म्हणजे पर्यायानें जनतेकडे पोंचविला जातो. अशा तऱ्हेनें येणारा पैसा परत त्याच्या योग्य स्थानीं पोंचविण्याची ही योजना आहे. मात्र टाटा उद्योगधंद्यांपैकीं प्रत्येक ठिकाणच्या कार्यकारी मंडळांत तज्ज्ञ माणसाचेबरोबर टाटा कुटुंबांतील कांहीं प्रातिनिधिक माणसें असावींत अशी यांची योजना आहे.

टाटा सन्स लि.चें सध्यांचें कार्यकारी मंडळः—

जे. आर. डी. टाटा (चेअरमन), लेडी रतन टाटा, सर सोराब सकलातवाला, सर होमी मोदी, एन्. एच्. टाटा, ए. डी. श्रॉफ, डॉ. जॉन मॅथाय, जे. डी. चॉक्सी.

यांच्या अशा योजनाबद्ध वागणुकीमुळें व व्यापक दृष्टिकोनामुळें टाटा हें नांव आज हिंदी बाजारपेठांत हुकमी एक्क्याचें स्थान पटकावून बसलें आहे.

टाटा उद्योगधंद्यांची रूपरेषाः—

कमर्शिअल प्रेस (स्थापना स.१८६३)—टाटा उद्योगधंद्यांची छपाई.

टाटा सन्स लि. (स. १८८७)—२१ हजार रु. सुरुवातीचें भांडवल; ७२ कोटि सध्यांचें भांडवल; अकरा लक्ष कामगार व सत्तावीस कोट रु. चें उत्पादन. इतर सर्व टाटा उद्योगधंद्यांची व्यवस्था.

टाटा टेक्स्टाइल ग्रुपः—

सेंट्रल इंडिया स्पिनिंग, वीविंहग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लि. (१८७४, नागपूर), दि स्वदेशी मिल्स कं. लि. (१८८६, मुंबई), दि अहमदाबाद अॅडव्हान्स मिल्स लि. (१९०३, अहमदाबाद), दि टाटा मिल्स लि. (१९१३, मुंबई)—साडे सहा कोटि भांडवल, एकोणतीस हजार कामगार व २८६,००० चात्या व ७१०० माग यांच्या साहाय्यानें सुमारें साडे अकरा कोट रु. चें उत्पादन.

टाटा हायड्रो-इलेक्ट्रिक कंपनीज (१८९७)—साडे पंधरा कोटि रु. भांडवल, अडीच लक्ष अश्वशक्तींची उत्पत्ति.

इंडियन हॉटेल्स कंपनी लि. (१९०४):—ताजमहाल हॉटेल (त्याला जोडून असणाऱ्या ग्रीन्स हॉटेल व रेस्टॉरंटसह)— ३० लक्ष रु. सुरुवातीचें भांडवल, हॉटेलची सुरुवातीची किंमत बेचाळीस लक्ष रु. व आतां एक कोटीपेक्षां जास्त.

टाटा आयर्न अँड स्टील वर्क्स लि. (१९११)—साडे दहा कोटि रु. भांडवल, ६७००० कामगार व ११ लक्ष टन पिग आयर्न, १० लक्ष टन पोलादी पत्रे व पावणे आठ लक्ष टन इतर पोलादी मालाची उत्पत्ती.

टाटा ऑइल मिल्स कंपनी लि. (१९१८), टाटापुरम् (कोचीन) व शिवरी (मुंबई)–पंचाहत्तर लक्ष रु. भांडवल, १९४३-४४ ची विक्री दोन कोटि रु.; कोकोजेम आणि ५०१ व हमाम या साबणांचें उत्पादन.

टाटा एअर लाइन्स (१९३२)—या संस्थेच्या विमानांनीं ८ कोटि ९५ लक्ष मैलांचा प्रवास करून दीड कोटि प्रवासी व वीस लक्ष पौंड

टपालाची ने-आण केली (१९४४). १४ विमानें असून पांच हजार मैलांचे रूट आंखले आहेत.

टाटा केमिकल्स लि. (१९३९, मिठापूर, बडोदें)— समुद्रापासून रासायनिक क्षार काढून हिंदुस्थानांतील कारखान्यांना ते पुरविणें. भांडवल पांच लक्ष रु.

टाटा ट्रस्टसः—

जे. एन्. टाटा एन्डौमेंट फॉर हायर एज्युकेशन (१८९५ सुमार)— हिंदी विद्यार्थ्यांना इंग्लंडमधील परीक्षा-विशेषतः आय. सी. एस. होण्यासाठीं पाठविणें, हा या ट्रस्टचा प्राथमिक हेतु होता. परंतु सध्यां शास्त्रीय शिक्षणावर या ट्रस्टचा विशेष रोख आहे.

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, बंगलोर, म्हैसूर (१९११)— सुरवातीच्या एकतीस लक्षांच्या व आतांच्या नव्वद लक्षांच्या किंमतीच्या या संस्थेंत यांचा वांटा फार मोठा आहे. ही संस्था प्रामुख्यानें रसायन व इलेक्ट्रो-टेक्नॉलजीमधील संशोधन करते.

सर रतन टाटा चॅरिटीज (१९१९)—बासष्ट लाख रु.चा दानधर्म. गरिबी, औषधोपचार, शिक्षण इत्यादि दयायोग्य गोष्टींस मदत.

लेडी टाटा मेमोरियल ट्रस्ट (१९३२)— यांपैकीं एक पंचमांश हिंदी विद्यार्थ्यांनीं केलेल्या संशोधनास द्यावयाचा असून बाकीचा हिस्सा रक्ताच्या Leucaemia या रोगावरील संशोधनास.

सर दोराब टाटा ट्रस्ट (१९३२)— नैसर्गिक आपत्तींपासून बचाव, औषधी व शास्त्रीय शाखेंत संशोधन व शैक्षणिक संस्था व विद्यार्थी यांना जात, धर्म, प्रांतनिरपेक्ष मदत करणें. आठ लक्ष रु. चा दानधर्म. या ट्रस्टतर्फे चालविण्यांत येणाऱ्या कांहीं संस्थाः—

टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस (१९३२)— सामाजिक प्रश्नांचा उलगडा.

टाटा मेमोरियल हॉस्पिटल (१९४१)— कॅन्सर हॉस्पिटल.

टाटा इन्स्टिटयूट ऑफ फन्डॅमेंटल रिसर्च—विज्ञान, गणित इत्यादींत संशोधन.

स्वतः जमशेटजी टाटा व नंतर त्यांच्या पावलांवर पाऊल टाकून त्यांच्या मुलांनीं उभारलेल्या या ट्रस्टसमध्यें एक ठरीव धोरण आहे. गरीब किंवा खालच्या दर्जाच्या लाखों लोकांपेक्षां साधारण सुशिक्षित व उच्च दर्जाच्या थोड्या लोकांची सोय यांचे हे निधी करतात. थोडी हालचाल करणाऱ्या हिंदी घटकांना मदत करूनच हिंदुस्थानचें पुनरुज्जीवन करणें शक्य आहे, बाकीच्या लोकांनीं आपलें पाहून घ्यावें, हें अनेक वेळां प्रतिपादन केलेलें आपलें मत यांनीं या निधींच्या योजनांचे वेळीं उपयोगिलें आहे.

टाटा, सर दोराबजी जमशेदजी—(जन्म स. १८५९ ऑगष्ट २७–मृत्यु स. १९३२ जून ३) मुंबईचे जगप्रसिद्ध व्यापारी, कारखानदार व दानशूर गृहस्थ. हे जमशेदजी टाटा यांचे चिरंजीव.

वयाच्या १६ व्या वर्षीच शिक्षणाकरितां हे युरोपांत गेले. चार वर्षे तिकडे राहून परत आल्यावर मुंबईच्या सेंट झेवियर कॉलेजांतून बी. ए. झाले (१८८२). लहानपणीं खेळाकडे यांचा विशेष ओढा होता. क्रिकटचें तर यांना फारच वेड होतें. यांच्या मर्दानी खेळाच्या आवडीमुळें मुंबईंत बऱ्याच व्यायामसंस्था जन्मास आल्या.

वडिलांनीं आरंभलेल्या कापसाच्या प्रचंड धंद्यांत तर यांनीं यश मिळविलेंच. शिवाय त्यांच्या उद्योग-धंद्यांतील प्रतिष्ठेमुळें यांचा अनेक कंपन्यांशीं निकटचा संबंध आला. हळुहळू यांच्या धंद्याचा पसारा इतका वाढला कीं, उभ्या हिंदुस्थानांत यांची पेढी मोठी ठरली. इतकेंच नव्हे तर तिच्या शाखा लंडन, पॅरिस, न्यूयॉर्क, शांघाय इत्यादि जगांतील प्रमुख ठिकाणीं काढणें आवश्यक झालें. पण यांचें नांव अखंडपणें लोकांच्या पुढें ठेवणाऱ्या संस्था व कारखाने निराळेच आहेत. टाटा आयर्न ॲन्ड स्टील वर्क्स लि., जयशेदपूर हा प्रचंड कारखाना व बंगलोरचें रिसर्च इन्स्टिटयूट यांनीं वडिलांच्या पश्चात् दहा वर्षांच्या आंत काढलें. तिसरी एक प्रचंड संस्था 'टाटा हायड्रो-इलेक्ट्रिक कंपनीज, लोणावळा' ही होय.

व्यापारसंशोधन आणि भूतदया यांबाबत प्रचंड धडाडी दाखवून आणि द्रव्यसाहाय्य करून यांनीं आपली मार्मिकता व्यक्त केली आहे. स्त्रीशिक्षणाकरितांहि यांनीं द्रव्यसाहाय्य केलें आहे. फार काय यांच्याकडून साक्षात् किंवा परंपरेनें साहाय्य झालें नाहीं अशी उपयुक्त संस्था क्वचित्च आढळेल.

यांच्या यशाची गुरुकिल्ली पाहावयाची तर ती यांच्या एकमार्गी व एकनिष्ठ आचरणांतच सांपडेल. यांना राज-

कारणांत पडण्याचा मोह कधींच झाला नाहीं. कदाचित् त्यांत क्षणिक लोकप्रियता यांना अधिक लाभली असती. पण यांनीं आपलें पाऊल आपल्या उद्योगक्षेत्राच्या बाहेर कधींच टाकलें नाहीं. एकाच कार्यांत आपलें प्रचंड कर्तृत्व यांनीं वडिलांच्या पाऊलावर पाऊल टाकून वेचल्यानें हे उद्योगसम्राट् बनले. १९१० सालीं हे सर या पदवीनें गौरविले गेले.

टाटा, सर रतन जमशेदजी— (जन्म स. १८७१–मृत्यु स. १९१८) जगप्रसिद्ध हिन्दी व्यापारी, कारखानदार व दानशूर. जमशेदजी टाटा यांचे हे पुत्र. त्यांची सर्व बाबतींत परंपरा यांनीं पुढें चालविली.

स. १९१२ सालीं साक्ची येथें 'टाटा आयर्न ॲन्ड स्टील वर्क्स लि., जमशेटपूर' हा कारखाना यांनीं काढला.

पश्चिम घाटांतील पाण्याच्या जोरावर वीज निर्माण करून तिच्या साहाय्यानें मुंबईस जी औद्योगिक उन्नति झाली तिचें सारें श्रेय यांनाच द्यावें लागेल.

स. १९१२ मध्यें लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स-मध्यें समाजशास्त्र व आधिभौतिकशास्त्र यांच्या शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था यांनीं केली. त्या वेळींच गरिबांच्या स्थितींत सुधारणा करण्याकरितां यांनीं 'रतन टाटा फंड' उभारला.

स. १९१६ सालीं यांना सर ही पदवी मिळाली. पुढें कॉर्नवाल येथें यांचा शेवट झाला.

टॉड, कर्नल जेम्स—(जन्म स. १७८२–मृत्यु स. १८३५) सुप्रसिद्ध इतिहास लेखक व संशोधक.

वयाच्या सत्राव्या वर्षी हे हिंदुस्थानांत आले (स. १७९९). देशी पायदळ सेनेंत लेफ्टनंटच्या हुद्यावर हे प्रथम लागले व चार वर्षांत दौलतराव शिंद्यांच्या दरबारांतील रेसिडेंट ग्रीम मर्सरच्या जवळ असणाऱ्या सैनिक तुकडीचे मुख्य हे बनले. याच वेळीं प्रवासांत यांनीं आपलें संशोधनाचें काम सुरू केलें आणि राजपुतान्याचा पहिला नकाशा तयार केला. पुढें इंग्रजांचा राजपुतान्यांतील राजाशीं तह झाला त्या वेळीं यांना तेथील पोलिटिकल एजंट नेमण्यांत आलें (स. १८१८–१८२२). यानंतर हे स्वदेशीं परत गेले.

वीर जातीच्या इतिहासाची यांना फार आवड होती. म्हणून यांनीं उदेपूर, जोधपुर, कोटा, बुंदी व सिरोही राज्यांत हिंडून अनेक शिलालेख, दानपत्र, नाणीं वगैरेंचा फार मोठा संग्रह केला. इतर ठिकाणचीहि माहिती यांनीं हरप्रयत्नानें एकत्र केली. जातांनाहि हे अनेक स्थलें पाहत मुंबईहून इंग्लंडला गेले. हे राजपुतान्यांत असतांना सरकारी शिपायांचे मुख्य कॅप्टन वाघ उत्तम चित्रकार होते. त्यांनीं यांच्याबरोबर प्राचीन मंदिरें, मूर्ति वगैरेंचीं चित्रें यांच्याकरितां तयार केलीं. तसेंच आरंभापासून शेवटपर्यंत ज्ञानचंद्र यति यांच्याबरोबर होते. त्यांना हे गुरु मानीत. त्यांच्याकडून यांनीं पृथ्वीराज रासो वगैरे ग्रंथ समजावून घेतले. यांनीं संस्कृत व इतर भाषांतील अनेक ग्रंथ, वीस हजार प्राचीन नाणीं, कित्येक शिलालेख व इतर इतिहास सामग्री इंग्लंडला आपल्याबरोबर नेली. लंडनला गेल्यावर राजपुतान्याचा कीर्तिस्तंभरूप 'ॲनल्स ॲंड ॲंटिक्विटीज ऑफ राजस्थान' हा ग्रंथ प्रसिद्ध केला (पहिला भाग स. १८२९ व दुसरा भाग–स. १८३२). यांत प्रथमच युरोपियन लोकांना रजपुतांची माहिती मिळाली. नंतर उदेपूर ते मुंबईपर्यंतच्या आपल्या प्रवासाचें वृत्त यांनीं 'ट्रॅव्हल्स इन वेस्टर्न इंडिया' या ग्रंथांत केलें. तो ग्रंथ यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाला (१८३९).

सध्यांच्या कालांतील राजपुतान्याचा इतिहास लिहिणारे हे पहिले गृहस्थ होत. यांनीं अनेक ग्रंथ, ख्यात व फरिश्ता वगैरेंच्या अनेक तवारिखा यांच्या आधारानें राजपुतान्याचा इतिहास लिहिला. यांच्या वेळीं राजपुतान्यांत रेल्वे, तार, सडक व पत्रव्यवहार इत्यादि सध्यांचीं साधनें नव्हतीं. यांनीं उंट, हत्ती व घोडे यांच्या साहाय्यानें हजारों मैलांचा प्रवास करून माहिती मिळवली व साधनें तपासलीं. सध्यांचीं उपलब्ध साधनें तेव्हां नसतांना यांनीं केलेले प्रयत्न यांच्या अचाट बुद्धीची व परिश्रमाची साक्ष देतात. यांचा ग्रंथ सध्यांच्या शोधांमुळें कांहीं ठिकाणीं संशोधनार्ह असला तरी त्यामुळें यांच्या प्रयत्नाचा व ग्रंथाचा थोरपणा मान्य केल्याशिवाय राहतां येणार नाहीं.

टिकेकर, रामचन्द्र विनायक— (जन्म स. १८६२–मृत्यु स. १९०७) मराठींतील सुप्रसिद्ध लेखक.

ह्यांचा जन्म धारवाड येथें झाला. यांचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील टिकें हें होय. मराठी पांच व इंग्रजी सहा इयत्ता एवढें यांचें शिक्षण झालें होतें. धारवाडास शाळेंत असतांनाच भाषा व इतिहास या विषयांचें त्यांनीं विस्तृत वाचन केलें होतें.

परंतु घरच्या गरिबीमुळें मध्येंच शाळा सोडून व आपला आवडता लेखनव्यवसाय सुरूं करण्यापूर्वीच यांना 'सदर्न मराठा रेल्वे'च्या धारवाडच्या अकाउंट ऑफिसांत नोकरी करावी लागली. पुढें कांहीं आकस्मिक कारणावरून यांनीं नोकरी सोडून आपल्या आवडत्या लेखनकलेचें चीज करावयाचें ठरविलें. प्रथम प्रथम 'किरात' या टोपण नांवानें हे लेख लिहीत असत. पण नंतर यांनीं केसरींतून 'धनुर्धारी' या नांवानें लेख लिहिण्यास आरंभ केला. आजसुद्धां मराठी वाचक यांना याच नांवानें ओळखतात.

'वाग्बाण' व 'तूणीर भारती' ह्या सदरांखालीं स. १८८९ त हे लेख प्रसिद्ध करीत असत. सामाजिक, औद्योगिक, राजकीय, नैतिक वगैरे अनेक विषयांवर ह्यांची लेखणी कुशलतेनें चालत असे. 'इन्दुप्रकाश', 'ज्ञानप्रकाश' व 'जगद्धितेच्छु' ह्या पत्रांतहि राजकारण, व्यापार, शेतकी, अर्थशास्त्र, वीणकाम वगैरेवर ह्यांचे लेख येत असत. 'शेत, शेतकी आणि शेतकरी' या नांवाचीं कानडी व मराठी पाक्षिकें व 'व्यापार-उदीम' हें मराठी मासिक हे काढीत असत. बडोद्याच्या 'सयाजी ज्ञानमंजूषा' मालेपैकीं 'हिंदुस्थानचा व्यापारी भूगोल' व 'इन्दूर प्रकरणाची दुसरी आणि खरी बाजू' हीं पुस्तकें यांनीं लिहिलीं. 'स्वधर्मज्ञानप्रसार पुस्तकमाले'चीं १८ व 'लहान मुलांचें चिमकुलें वाचनालय' याचीं १५ इतकीं पुस्तकें यांनीं प्रसिद्ध केलीं आहेत. ह्यांतील 'पिराजी पाटील' व 'पश्चात्ताप्यांचा पांजरपोळ' हीं विशेष महत्त्वाचीं होत. 'वाईकर भटजी' (गोल्डस्मिथच्या व्हिकार ऑफ वेकफील्डचें रूपांतर) ही कादंबरी उत्कृष्ट वाङ्मयांत गणली जाते. ह्यांची भाषा शुद्ध, अभिमानोत्तेजक व आपुलकी दाखवणारी असे.

टिळक, रे. नारायण वामन— (जन्म स. १८६२–मृत्यु स. १९१९) मराठींतील सुप्रसिद्ध कवि.

यांचा जन्म रत्नागिरी जि. ता. दापोलीमधील करञ्जगांवीं झाला. यांचीं पहिलीं सात वर्षें त्याच गांवीं गेलीं. यांचे अजोबा विरक्त वृत्तीचे धार्मिक गृहस्थ होते. वडिलांची बदली मोरवाडयास झाल्यावर हे कल्याणला येऊन राहिले (१८६९–७३). आईची उत्तरक्रिया करण्यास हे त्र्यंबकेश्वरला गेले त तिकडेच नाशिकास राहिले व तेथें गणेशशास्त्री लेले यांच्यापाशीं चार वर्षेपर्यंत जुन्या शास्त्रीय पद्धतीनें यांनीं संस्कृतचें शिक्षण घेतलें. १८७७ च्या सुमारास यांनीं इंग्रजी शिक्षणास सुरुवात करून दोन वर्षांत पांच इयत्तांचा अभ्यास केला. पण यांच्याकडे थाकटीं चार भावंडें शिक्षणास येऊन राहिल्यानें यांना शाळा सोडून नोकरी पत्करावी लागली.

यानंतर यांनीं अकरा वर्षें महाराष्ट्रभर भटकण्यांत घालविलीं. पुराणिक, कीर्तनकार, कंपॉझिटर, शिक्षक वगैरे अनेक व्यवसाय केले. देशाची कळकळ व ईश्वराचा ध्यास अशीं यांचीं दोन सूत्रें होतीं. धर्मसंस्थापक होण्याची ऊर्मिहि यांना वरचेवर येई. शेवटीं १८९१ सालीं श्री. अण्णासाहेब बुटी यांच्याकडे नागपूर येथें संस्कृत ग्रंथांचें संशोधन व भाषान्तर करण्याच्या कामावर हे राहिले. तेथें धर्मचर्चेला वाहिलेलें 'ऋषि' नांवाचें मासिक यांनीं काढलें. पण यांच्या मतामुळें लवकरच तेथील यांचें आसन ढळलें. तेथून हे राजनंदगांवीं नोकरीवर गेले व तेथें १८९५ च्या फेब्रुवारींत यांनीं बाप्तिस्मा घेतला. १८९५–१९१७ पर्यंत अहमदनगर व १९१७–१९ पर्यंतचा अखेरचा काळ यांनीं साताऱ्यास काढला. नगरच्या मिशनमध्यें राहण्यास सुरुवात केल्यावर यांच्या मानसिक चलबिचलीचा काळ संपला. आणि शेवटपर्यंत हे ख्रिस्ताचे परमभक्त म्हणून राहिले. मात्र यांना आपल्या मराठी भाषेचा व संस्कृतीचा विसर कधीं पडला नाहीं हें यांचें वैशिष्ट्य आहे.

यांचें वाङ्मयः—१ टिळकांची कविता-संग्राहक व प्रकाशक–उजगरे, २ अभंगाञ्जलि, ३ ब्रिटानिया, ४ माझा ओसाड पडलेला गांव, ५ बापाचे अश्रु, ६ वनवासी फूल, ७ आनंदीबाई, ८ आमच्या विधवा, ९ ख्रिस्तजयंती, १० पवित्र कुसाचा राजमार्ग, ११ भजनसंग्रह, १२ बोध आणि रंजन, १३ शीलं परं भूषणम्–नाटिका, १४ यशवंतराव महाराजांचें वर्णन, १५ ख्रिस्तायन (अपूर्ण).

यांची कविता अनुकरणात्मक असली तरी साधी व प्रासादिक आहे. सरळ पण मधुर भाषा लिहिणारा यांच्यासारखा कवि विरळा. अलंकारांच्या उपयोगाच्या बाबत यांचें कौशल्य श्रेष्ठ प्रतीचें ठरेल. समर्पक व बेताचे अलंकार, प्रसाद, तळमळ व विस्तार यांमुळें यांचें स्थान मराठी कवींत अग्रभागीं आहे. यांच्या पत्नी लक्ष्मीबाई टिळक यांनीं लिहिलेल्या आत्मचरित्रानें यांच्या स्वभावविशेषाची चांगली कल्पना येते. यांच्या काव्यापेक्षांहि त्या आत्मचरित्रानें यांचा परिचय दीर्घकाळ स्मरणांत राहील.

टिळक, लक्ष्मीबाई—(जन्म स. १८७३–मृत्यु स. १९३६) कवयित्री व व्यक्तिस्मृति-लेखिका.

कवि नारायण वामन टिळक यांच्या या पत्नी. टिळकांच्या सहवासामुळें कांहीं फुटकळ काव्यरचना यांचेकडून घडली. पतीचें अपूर्ण राहिलेलें 'ख्रिस्तायन' नांवाचें दर्घिकाव्य अनेक वर्षें खर्चून ओघ बिघडूं न देतां यांनीं पूर्ण केलें. पण चार खंडात्मक असणारीं यांचीं 'स्मृति-चित्रें' मराठी वाङ्मयांत स्वतःप्रमाणें यांचें नांवहि अमर करणारा ग्रंथ होत. या स्मृति-चित्रांत भाषेचा साधेपणा आणि विचारांचा प्रांजलपणा हे अत्युत्कट गुण आहेत. हुबेहूब स्वभाववर्णनाला सत्याची उत्कृष्ट बैठक दिली आहे; लेखनकलेचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे. या ग्रंथाच्या वाचनानें तत्कालीन लोकस्थितीच्या ज्ञानाबरोबर उत्कृष्ट करमणूकहि होते. हा ग्रंथ यांनीं १९३४ ते १९३६ पर्यंत पूर्ण केला.

टिळक, लोकमान्य-बाळ गंगाधर—(जन्म स. १८५६ जुलै २३–मृत्यु स. १९२० ऑगस्ट १) हिंदुस्थानांतील राजकीय असंतोषाचे जनक, थोर राजकारणी मुत्सद्दी, वृत्तपत्रकार, वेदादि प्राचीन वाङ्मयाचें अभ्यासक व संशोधक, आणि 'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे' या मंत्राचे द्रष्टे.

यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांत चिखली गांवीं झाला. यांचें दुय्यम व उच्च शिक्षण पुणें येथें झालें. हे पुणें डेक्कन कॉलेजांतून बी. ए. (१८७७) व पुढें एल्एल. बी. (१८७९) झाले. यांनीं १८८० सालीं पदवी घेऊन सनदहि काढली होती. पण कॉलेजांत असल्यापासूनच कांहीं सार्वजनिक कार्य करण्याचा यांचा व गोपाळराव आगरकरांचा संकल्प ठरला होता. त्याप्रमाणें हे १ जानेवारी १८८० रोजीं विष्णुशास्त्री चिपळुणकरांच्या नेतृत्वानें सुरू झालेल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक म्हणून दाखल झाले. शाळा सुरू झाल्यानंतर एक वर्षानें केसरी व मराठा हीं मराठी व इंग्रजी साप्ताहिकें सुरू करण्यांत आलीं. यांच्याकडे 'मराठ्या'चें संपादकत्व आलें. हे केसरींतहि मधूनमधून कायदा व धर्मशास्त्र यांसंबंधीं लिहीत असत.

कोल्हापूरच्या छत्रपति शिवाजीमहाराजांना अत्यंत वाईट रीतीनें वागविलें जातें म्हणून त्यांचे कारभारी रा. ब. महादेव वासुदेव बर्वे यांच्या विरुद्ध कडक आरोप करणारा पत्रव्यवहार यांनीं प्रसिद्ध केला. त्यामुळें यांच्यावर त्यांनीं बेअब्रूची फिर्याद केली. पण पत्र व्यवहारांतील आरोप सिद्ध न करतां आल्यानें यांनीं माफी मागितली; तरी यांना चार महिन्यांची साध्या कैदेची शिक्षा झाली. या यांच्या शिक्षेमुळें लोकांतच नव्हे तर राजामहाराजांत सुद्धां संकटकालीं उपयोगी पडणारे म्हणून यांचा सर्वत्र बोलबाला झाला आणि यांच्याकडे लोक अगदीं वेगळ्या दृष्टीनें पाहूं लागले (१८८२).

यांच्या शाळेचें आकर्षण पहिल्या दिवसापासूनच लोकांत विशेष होतें. पुढें विष्णुशास्त्री वारले तरी तें काम इतर मंडळींनीं धडाडीनें पुढें चालविण्याचें ठरविलें. १८८४ सालीं 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' अस्तित्वांत आली व तिच्यातर्फे 'न्यू इंग्लिश स्कूल' चालविण्याचें व एक स्वतंत्र कॉलेज स्थापण्याचें निश्चित करण्यांत आलें. २ जाने. १८८५ रोजीं 'फर्ग्युसन कॉलेज' उघडण्यांत आलें. तेथें गणित व संस्कृत हे विषय हे शिकवीत. 'मेघदूत' व भर्तृहरीचें 'नीतिशतक' शिकविण्यांत यांचा हातखंडा असे. पण पुढें सोसायटीचें धोरण व कारभार यांबाबत मतभेद होऊन यांनीं तिचा राजीनामा दिला व केसरी व मराठा हीं पत्रें आपल्या ताब्यांत घेऊन स्वतंत्र आयुष्यक्रमास सुरुवात केली (१८९०). हीं पत्रें ताब्यांत घेतांना यांना यांवर असलेला सात हजारांचा कर्जाचा बोजाहि स्वीकारावा लागला. हें कर्ज फिटण्यास दहा वर्षें लागलीं. शिवाय हीं पत्रें चालवून उपजीविकेचा प्रश्न सुटत नव्हताच. उपजीविकेकरितां यांना कायदे-शिक्षणाचा वर्ग चालवावा लागला. त्यामुळें यांचें कायद्याचें ज्ञान उत्कृष्ट असे. विशेषतः हिंदु कायद्यावरील यांचीं व्याख्यानें फारच उत्कृष्ट होत. यासंबंधींच्या यांच्या अनेक योजनांना कच्च्या टाचणापलीकडे ग्रंथरूपानें परिणत होण्याचा योग आला नाहीं. हे कायद्याचे वर्ग ब्रेगमुळें पुढें बंद पडले (१८९७).

डेक्कन एज्युकेशन सोसायटींतून निवृत्त झाल्यावर, लोकांचें लक्ष आपल्याकडे ओढून घेणारी यांची पहिली कामगिरी 'क्रॉफर्ड प्रकरण' होय (१८८८-८९). क्रॉफर्ड नांवाच्या गोऱ्या अधिकाऱ्यानें लोकांकडून पैशाचा अपहार केला. त्यांत मामलेदार वगैरे हाताखालच्या अधिकाऱ्यांमार्फतहि पुष्कळ व्यवहार झाले. त्यांत साहेबमजकूर दोषी असतां शिक्षेवांचून सुटले आणि बिचाऱ्या मामलेदारांना माफीचें आश्वासन असूनहि बडतर्फ होण्याची वेळ आली. हा अन्याय सहन न होऊन यांनीं मामलेदारांची बाजू घेतली. आणि अर्ज लिहून, सभा भरवून त्यांची बाजू पार्लमेंटपर्यंत मांडली व मुंबई सरकारकडून 'मामलेदार्स इंडेम्निटी' ॲक्ट पास करवून घेतला. त्यामुळें मामले-

दारांना न्यायाच्या कामीं सरकारला मदत केल्याबद्दल जन्मभर ठराविक पगार मिळाला व त्यांच्यावरील दोष दूर झाला. तेव्हां कोणतीहि बाजू धैर्यानें घेऊन सरकारशींसुद्धां कायदेशीर लढा देणारे म्हणून यांचें नांव सर्वतोमुखीं झालें.

यानंतरची यांची मोठी चळवळ संमति बिलाच्या वेळची होय (१८९१). हा प्रश्न सामाजिक व धार्मिक असल्यानें समाजांतील नव्या जुन्या मतांच्या लोकांत या वेळीं मतभेद उत्पन्न झाला. परस्परांच्या संमतीचें वय वाढविण्यास तात्त्विकदृष्ट्या यांची मान्यता होती. पण हे व सुधारक यांच्यांतील वादाचा मुख्य मुद्दा सरकारनें धार्मिक विषयांत हात घालूं नये, सुधारणा इष्ट असली तरी ती लोकमतानें घडवून आणावी एवढाच होता. या वादामुळेंच यांचें नांव मुंबई प्रान्ताबाहेरहि प्रथम प्रसिद्धीस आलें. याच वेळीं यांच्या सर न्या. रानडे व डॉ. भांडारकरांच्यासारख्यांशीं वादाच्या चकमकी झडल्या. त्यांत यांची कुशाग्र बुद्धि, संस्कृत ग्रंथांचें नि धर्मशास्त्राचें परिशीलन आणि वाद-विवादाची उत्कृष्ट हातोटी निदर्शनास आली, आणि बहुजन समाजाला हे आपले प्रतिनिधि असा साक्षात्कार होऊं लागला.

१८९२-९४ सालीं हिंदु-मुसलमान लोकांमधील तंटे विकोपास गेले. अशा प्रसंगीं सरकारचें धोरण पक्षपाती असतें, ही गोष्ट यांनीं पुराव्यानें मांडण्याचा तडफदार प्रयत्न केला. हिंदूंचा स्वाभिमान जागृत करून त्यांच्यांत जूट निर्माण करण्याकरितां शिवाजी उत्सव सुरू करण्याची आणि गणेशोत्सवाला सार्वजनिक रूप देण्याची यांना आवश्यकता वाटली.

१८९४ सालीं बडोद्याचे वासुदेव सदाशिव बापट सेटलमेंट कमिशनरचे मदतनीस यांच्या चौकशीकरितां ब्रि. सरकारकडून कमिशन नेमण्यांत आलें. त्या वेळीं संकटांत पडलेले बापट व पर्यायानें बडोदेंसरकार यांच्यावरचा आरोप धुऊन टाकण्याकरितां यांनीं मित्र-कार्य म्हणून बापटांच्यातर्फे खटपट केली. या प्रकरणांत फारच मोठमोठीं माणसें होतीं. प्रथम बापटांना जरी सहा महिन्यांची शिक्षा व दहा हजार रुपये दंड झाला तरी पुढें महाराज विलायतेहून आल्यावर हें प्रकरण त्यांनीं शिक्षा माफ करून संपवून टाकलें.

याच सुमारास सर्व हिंदुस्थानांत पसरलेल्या दुष्काळामुळें व त्याचे पाठोपाठ महाराष्ट्रांत प्रवेश करणाऱ्या प्लेगमुळें सरकारविरुद्ध लोकांत जागृति करण्याची संधि यांना मिळाली. दुष्काळ कमी करण्याचे बाबतींत सरकार तर केव्हांच अपेशी ठरलें होतें. त्यांतच पुण्याच्या सार्वजनिक सभेशीं सहकार करण्यास नकार देऊन हिंदु प्लेग हॉस्पिटल सुरू केल्यानें लोकांना सरकारबद्दल अविश्वास वाटूं लागला आणि हॉस्पिटलमधील वागवणुकीनें लोक खडबडून जागे झाले. या वेळीं सरकारच्या या दुष्कृत्यांचा पाढा केसरींतून वाचण्याचें यांचें कार्य सतत चालू होतें. त्यामुळें सरकारविरुद्ध त्वेषाचें वातावरण सर्वत्र उत्पन्न झालें. त्याचा स्फोट गणेशखिंड रस्त्यावर मि. रँड व ले. आयर्स्ट यांना गोळी घालून ठार मारण्यानें झाला. त्याबद्दल दामोदर हरि चापेकर व त्याचा भाऊ बाळकृष्ण यांना फांशीं देण्यांत आलें व सरदार नातू बंधु यांना विनाचौकशी अटकेंत ठेवण्यांत आलें. जहालपक्षाचा जन्म येथूनच झाला असें डॉ. बेझंट यांचें म्हणणें होतें. पण या घटनेमुळें एका नव्या दृष्टिकोनांतून सरकार यांचेकडे पाहूं लागलें आणि शिवाजी उत्सवांत शिवाजी-महाराजांचा काल्पनिक संदेश म्हणून कांहीं कविता वाचून दाखविल्याबद्दल व उत्सवांतील भाषणाचा वृत्तान्त प्रसिद्ध केल्याबद्दल यांचेवर खटला होऊन यांना अठरा महिन्यांची शिक्षा देण्यांत आली (१८९७ सप्टें. १४). पण प्रो. मॅक्समुलर, सर विल्यम हंटर, सर रिचर्ड गार्थ, मि. विल्यम केन वगैरेंनीं केलेल्या विनंतिअर्जावरून यांना बारा महिन्यांनीं सोडून देण्यांत आलें.

हिंदुस्थानांतील अशा स्वरूपाचा हा पहिला राजद्रोहाचा खटला होता. यामुळें यांच्याबद्दल हिंदुस्थानभर सहानुभूति उत्पन्न झाली. खर्चाकरितां परस्पर निधि जमा झाले, यांना व्यापारी जामीन राहिले, कलकत्त्यास जमलेल्या वर्गणीच्या मदतीनें कोर्टांत दाखल झालेल्या बॅरिस्टरानें कोर्टांत यांचा बचाव केला, सरकारला राजद्रोहाच्या कायद्याची भाषा दुरुस्त करावी लागली आणि सरकारबद्दल खरोखरच लोकांत अनादर वाढून यांचें पुढारीपण अधिक प्रभावशाली होत चाललें.

१८९९ च्या राष्ट्रसभेंत मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सँडर्स्ट यांच्या निषेधाचा ठराव मांडावयास हे निघतांच यांच्याविरुद्ध काहूर उठलें. नाताळच्या सुट्टींत अर्ज विनंत्यांचें राजकारण करणाऱ्यांना यांच्या या सरकार-विरोधाचा प्रकार अगदी नवीन वाटला. सरकारी दुष्कृत्यांचा पाढा वाचून अतिशयोक्ति असल्यास दाखवा

अशी यांनीं पृच्छा करतांच रमेशचंद्र दत्त या सेवानिवृत्त अधिकाऱ्यानें अध्यक्षपद सोडण्याची धमकी दिली.

लॉर्ड सँडर्स्ट जाऊन त्यांचे जागीं लॉर्ड नॉर्थकोट हे गव्हर्नर म्हणून मुंबईस येण्याच्या वेळीं इंग्लंडमधल्या 'ग्लोब' पत्रानें त्यांना 'टिळकांच्या तंत्रानें चालणाऱ्या खुनाच्या मोहिमेवर नजर ठेवण्याचा' उपदेश केला (१८९९ ऑक्टो. २८). मुंबईच्या टाइम्सनें त्याचा उतारा घेतला. तेव्हां यांनीं बेअब्रूचे खटले भरून दोन्ही पत्रांच्या संपादकांना माफी मागण्यास भाग पाडलें (१९०० नवं. २४).

पुढें यांचे मित्र बाबा महाराजांच्या विधवा तरुण पत्नी ताईमहाराज यांनी प्रथम जगन्नाथ महाराजांना दत्तक घेतलें आणि नंतर कोल्हापूरचे बाळा महाराज यांना दत्तक घेतलें. तेव्हां दोन पक्ष पडून यांच्यावर खोटी साक्ष देणें, बनावट कागद करणें वगैरे आरोप येऊन यांना अठरा महिने सक्तमजुरी व हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली (१९०३ ऑगस्ट २४). पण पुढें हे अपिलांत निर्दोषी सुटले (३ मार्च १९०४). तथापि त्यासंबंधीं दिवाणी प्रकरण यांना मृत्यूपर्यंत पुरलें.

यांचें राजकारणांतील स्पष्ट व सडेतोड बोलण्याचें धोरण आणि बहुजन समाजाला प्रत्यक्ष कार्याभिमुख करण्याची वृत्ति सरकारला व जुन्या पुढाऱ्यांना रुचेनाशी झाली. यांनीं विधायक कार्यांत स्वदेशीचा समावेश केला आणि बंगालच्या फाळणीनंतर ब्रिटिश मालावर संपूर्ण बहिष्काराचें कलमहि यांनीं त्याला जोडलें. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतुःसूत्रीनें कलकत्त्याच्या राष्ट्रीयसभेंत यांच्या कार्यक्रमाची स्पष्टता झाली (१९०६). पण या ठरावामुळें मवाळजहालांतील तेढ विकोपास गेली. सुरतेस डॉ. राशबिहारी घोष यांचें नांव राष्ट्रसभेच्या अध्यक्षपदाकरितां सुचविलें असतां हे तहकुबीची सूचना मांडण्याकरितां पुढें आले तेव्हां सभेंत दंगल झाली आणि सभा मोडली. पुढें नेमस्तांनीं स्वतंत्र घटना करून यांच्या मताच्या लोकांना राष्ट्रसभेंत येतां येऊं नये अशी व्यवस्था केली. पण इकडे यांनीं राष्ट्रसभेनें कलकत्त्यास मान्य केलेल्या चतुःसूत्रीचा अत्यंत तडफेनें पुरस्कार करून राष्ट्रांत नवचैतन्य उत्पन्न केलें. पुढें स्वातंत्र्याभिमुख तरुणांकडून बंगाल्यांत अत्याचार घडले आणि यांना राजद्रोहाच्या आरोपावरून सहा वर्षांची शिक्षा देण्यांत येऊन मंडाल्याच्या किल्ल्यांत ठेवण्यांत आलें (१९०८).

तेथें यांनीं आपला 'गीतारहस्य' हा अमूल्य मराठी ग्रंथ लिहिला. १९१४ सालीं यांची सुटका झाली. सुटका होतांच यांनीं आपल्या पक्षाची पुनर्घटना केली. स्वराज्याची मागणी नेटानें करण्याकरितां 'होमरूल-लीग' ही स्वतंत्र संस्था काढली (१९१६ एप्रिल २३). यांच्या वयाला साठ वर्षे झालीं म्हणून उत्सव होऊन एक लाख रुपयांचा निधि यांना अर्पण करण्यांत आला, तो यांनीं राष्ट्रकार्यार्थ परत केला. राष्ट्रसभेंत पुनः प्रवेश करून महायुद्धामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीचा फायदा घेण्याकरितां हिंदुमुसलमान ऐक्याचा लखनौ-करार यांनीं घडवून आणला (१९१६ डिसें.).

१९१८ सालीं सर व्हॅलेन्टाइन चिरोल यांनीं लिहिलेल्या Unrest in India या ग्रंथांत यांना राजद्रोही म्हटलें म्हणून यांनीं त्यांच्यावर इंग्लंडमध्यें बेअब्रूची फिर्याद केली. पण ती अंगावर येऊन यांना खर्चाचा भूर्दंड भरावा लागला. त्या वेळीं इंग्लंडमध्यें असतां लेबरपार्टीला विश्वासांत घेऊन यांनीं तिला तीन हजार पौंड दिले. यांच्या पूर्वीच्या राजकीय पक्षाचा तेथील लिबरल पार्टीवर विश्वास होता.

याच सुमारास मॉंटफर्ड रिपोर्ट प्रसिद्ध झाला. तो निराशाजनक असल्याचा शेरा अमृतसर राष्ट्रसभेनें मारला (१९१९). यांनीं आपण प्रतियोगी सहकारितावादी असल्याचें जाहीर केलें. चालू असलेल्या असहकारितेच्या चर्चेंत यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला नाहीं. उलट नवीन सुधारणांचा फायदा घेण्याच्या दृष्टीनें 'काँग्रेस डेमोक्रॅटिक पक्षा'ची स्थापना करून निवडणुकी लढविण्याचा कार्यक्रम आंखला (१९२०). पण थोड्या दिवसांच्या आजारानें हे मुंबईत सरदारगृहांत दिवंगत झाले.

यांच्या बुद्धींत विलक्षण निर्णय असे. चलबिचल किंवा अर्धवटपणा यांना ठाऊक नव्हता. वादविवाद किंवा सरकारविरोध यांत यांच्या बुद्धीला तेज चढे. हे निर्भय लढाऊ वृत्तीचे होते.

त्याग व दुःख या दोन्ही बाबतींत हे पूर्ण बेफिकीर असत. गरीब नि हीनदीन यांच्या भावनांशीं हे समरस होत व त्यांशीं परिचय करून घेत. जनतेला परमप्रिय असणाऱ्या भावनांचें सुसंगत व सडेतोड समर्थन करण्याच्या यांच्या हातोटीमुळें लोकांना हे आपले प्रतिनिधि वाटत. हिंदुस्थानांतील राजकारणाला चढाईचें स्वरूप देऊन त्याला बहुजनापर्यंत पोचविण्याचें व त्याकरितां

आयुष्य वेचणारे कार्यकर्ते निर्माण करण्याचें कार्य यांनींच प्रथम केलें.

यांचे महत्त्वाचे ग्रंथ हे ऐन राजकारणाच्या दंगलींत किंवा तुरुंगांत असतां उत्पन्न झालेले आहेत, यावरूनहि यांच्या वृत्तीची कल्पना येईल. यांच्या राजकारणानें यांना कांहीं काल हिंदुस्थानांत अनभिषिक्त राजाचा मान प्राप्त झाला, आणि यांनीं लिहिलेल्या संशोधनात्मक शास्त्रीय ग्रंथानीं तर यांचें नांव जगांत अजरामर करून टाकलें.

आपल्या ओरायन ऊर्फ मृगशीर्ष या ग्रंथांत संपात बिंदु एक नक्षत्र मागें जाण्यास लागणारा ९६० वर्षे हा काल लक्षांत घेऊन उत्तरा-भाद्रपदा, रेवती, अश्विनी, भरणी, कृत्तिका, रोहिणी व मृग अशा क्रमानें तो मृगशीर्षावर सुमारें पांच हजार वर्षांपूर्वी असला पाहिजे; व ऋग्वेदांत मृगशीर्षावर संपात असल्याचें स्पष्ट विधान असल्यानें ऋग्वेदाचा तो काळ ठरतो असें यांनीं प्रथमच सिद्ध केलें आणि ऋग्वेदाच्या कालाचा प्रश्न सोडविला.

तसेंच मनुष्यांच्या उत्तर ध्रुवावरील मूळ स्थानाची कल्पना प्रथम डॉ. वॉरेन यांनीं 'पॅराडाइज फाउंड' या ग्रंथांत मांडली होती. तीं आर्यांपुरती मर्यादित स्वरूपांत 'आर्क्टिक होम इन दि वेदाज्' या ग्रंथांत यांनीं वेद व अवेस्ता यांतील बलवत्तर प्रमाणांचे साहाय्यानें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला.

यांचा मराठींतील 'गीतारहस्य' हा ग्रंथ अनेक दृष्टींनीं अपूर्व आहे. त्यांतील लोकसंग्रहार्थ ज्ञानोत्तर कर्मच करीत राहण्याचा सिद्धान्त नवीन आहे. शंकराचार्यांचा मायावाद, अद्वैत वगैरे सर्व मान्य करून यांनीं हा सिद्धान्त मांडण्याचा प्रयत्न केला हें विशेष होय. मात्र यांत शास्त्रीय संशोधनाबरोबरच लोकांना कार्यप्रवृत्त करण्याचाहि हेतु स्पष्ट दिसतो.

यांनीं ईश्वरकृष्णाची लुप्त झालेली एक कारिका शोधून काढली ईश्वरकृष्णाच्या कारिकांवर गौडपादांचें भाष्य आहे. त्यांतील ६१ व्या कारिकेवरील भाष्य एका कारिकेवरील नसून दोन कारिकांवरील आहे असें त्यांतील प्रतीकावरून ठरतें. पण तशी कारिका मात्र मुळांत उपलब्ध नाहीं. यांनीं भाष्यांतील प्रतीक शब्द घेऊन पुढीलप्रमाणें आर्या तयार केली.

कारणमीश्वरमेके ब्रुवते कालं परे स्वभावं वा ।
प्रजाः कथं निर्गुणतो व्यक्तः कालः स्वभावश्च ॥

आणि ती कमी पडणाऱ्या कारिकेऐवजीं सुचविली. ईश्वरकृष्ण हा निरीश्वरवादी असल्यामुळें कोणा तरी ईश्वरवाद्यानें ही कारिका काढून टाकली असावी, पण त्या कारिकेवरचें भाष्य मात्र काढून टाकण्याचें राहून गेल्यामुळें ती कारिका आपणास बसवितां आली, असें यांनीं म्हटलें आहे.

यांचें मराठी वाङ्मयः—

१ वेदकालनिर्णय १९०८, २ आर्य लोकांचें मूलस्थान १९१०, ३ गीतारहस्य १९१५ जून, ४ केसरीतील लेख-खंड १-४, ५ मद्रास, सिलोन व ब्रह्मदेश येथील प्रवास १९००, ६ स्वराज्यावरील मोर्हाम-व्याख्यानें भाग १-४, ८ हिंदुधर्माचें स्वरूप-लक्षण.

यांपैकीं पहिले दोन ग्रंथ यांच्या इंग्रजी पुस्तकांची श्री. के. ल. ओगले यांनीं केलेलीं भाषान्तरें होत. याशिवाय यांच्या आठवणी व सूक्ति यांचे अनेक संग्रह श्री. स. वि. बापट-यांनीं प्रसिद्ध केले आहेत.

इंग्रजीः—(1) The Orion or Researches into the Antiquity of the Vedas (1893), (2) The Arctic Home in the Vedas (1903), (3) Chaldian Vedas (1918), (4) Missing Karika in Sankhyas, (5) Vedanga-Jyotish. इ.

टेकाडे, आनंदराव कृष्णाजी—(जन्म स.१८९०) सुप्रसिद्ध मराठी कवि.

हे नागपूरचे राहणारे. काण्व ब्राह्मण. यांचें शिक्षण बेताचें झालें असलें तरी यांना मराठींत कविता करण्याचा नाद लहानपणापासून आहे. 'आनंदगीत' नांवानें यांच्या कवितांचे अनेक संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. प्रसाद हा यांच्या काव्याचा विशेष आहे. जिव्हाळा व साधी भाषा यांमुळें यांची कविता लोकांना फार आवडते. विश्वविद्यालयानें यांच्या कविता-संग्रहास परीक्षेकरितां नेमून यांचा गौरव केला. आपल्या कविता साध्या व रसाळ पद्धतीनें जाहीर प्रसंगीं म्हणून आधुनिक कविता-गायनाचा कार्यक्रम लोकप्रिय करण्याची प्रथा यांनींच प्रथम सुरू केली. मधुरमीलन व मथुरा हीं यांचीं दोन नाटकें प्रसिद्ध आहेत.

टेसिटोरी, डॉक्टर—(मृत्यु स. १९१८) राजस्थानी व डिंगल भाषांत गोडी वाटणारे इटालियन गृहस्थ.

बंगाल एशियाटिक सोसायटीनें यांना राजस्थानी व डिंगल भाषेतील ग्रंथ शोधण्याकरितां नेमलें होतें. यांनीं जोधपुर व बिकानेर राज्यांत राहून डिंगल भाषेतील ग्रंथांची तीन विभागांत सूचि तयार केली व ती बंगाल एशियाटिक सोसायटीनें प्रसिद्ध केली. याशिवाय डिंगल भाषेतील खडिया जगाकृत 'रतनसिंह री वचनिका', बिकानेरचे राठोड पृथ्वीराजकृत 'वेलि क्रिसन रुक्मणि री' व बिठूसूजाकृत 'राव जयतसी रो छंद' हे तीन ग्रंथ यांनीं संपादित करून प्रसिद्ध केले. यांशिवाय आपल्या दौऱ्याचे वार्षिक वृत्तान्त, राजपुतान्यांतील कांहीं स्थलांचें वर्णन व शिलालेखहि यांनीं प्रकाशित केले.

टॅबे, गोविंद सदाशिव—(जन्म स. १८८१) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध पेटीवादनपटु व अष्टपैलु रसिक.

महाराष्ट्राच्या कलाजीवनांत यांचा प्रथम प्रवेश पेटीवादनांतील कौशल्यामुळें झाला, कै. भास्करबुवा बखल्यांचें शिष्यत्व व बालगंधर्वांचा स्नेह यांचे साह्याने नवेनवे स्वर (शास्त्रीय गायकी) प्रगट करून श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेण्याची यांची कला रसिकांच्या निदर्शनास आली. पेटीवादनाच्या बाबत यांचे सुरुवातीचे आदर्श श्री. भाचुभाई भंडारे हे होत. कै. बखल्यांच्याप्रमाणें यांच्या सहवासामुळें बालगंधर्वांच्या गाण्याला आधुनिक नवें वळण मिळालें. मौजुद्दीनखांची ठुंबरीहि यांच्या पेटींतून बखलेबुवांनीं संग्रहित केली.

मानापमान नाटकानें मराठी रंगभूमीवर संगीताचें अगदीं नवें युग सुरू केलें. त्या नाटकाकरितां आपल्याजवळच्या उत्कृष्ट चाली यांनीं पुरविल्या होत्या. तें नाटक रंगभूमीवर आलें आणि त्यांतील धैर्यधराची भूमिका करणारे गायक नट नारायण दत्तात्रय जोगळेकर हे वारले (१५ नवं. १९११). त्यांचीं कामें करण्याकरितां किर्लोस्कर मंडळींत यांची योजना झाली. यांनींहि त्यांचीं सर्वच कामें नीटनेटकीं केलीं. रूप व बुद्धीबरोबरच नाटकांत कसें गावें हेंहि यांना समजत होतें. फक्त मधुर आवाजाची कमतरता होती. तथापि किर्लोस्करांतून गंधर्व मंडळी निघाली तेव्हां हे नट व मालक अशा दोन्ही नात्यांनीं तीमध्यें समाविष्ट झाले. पुढें यांनीं गंधर्व मंडळींचा संबंध सोडला.

पण हे कर्तबगार असल्यानें लौकरच यांनीं 'शिवराज मंडळी'ची उभारणी केली, आणि शंकरराव सरनाईकांसारख्यांचा त्या मंडळींत समावेश केला. त्याबाबत यांना इतकें यश लाभलें कीं, गंधर्वांचें 'स्वयंवर' ज्या वेळीं यशस्वी झालें, त्याच वेळीं शेजारच्या रंग मंदिरांत 'चित्रवंचना' नाटकाचे प्रयोग यांनीं यशस्वी केले. परंतु पुढें सरनाईक यांच्या संस्थेंतून फुटून होळकरांच्या यशवंत मंडळींत सामील झाल्यानंतरहि यांनीं मुंबईचे सुप्रसिद्ध गुर्जर कवि मणिशंकर त्रिवेदी (पागल) यांच्याकडून 'सिद्ध-संसार' हें हिन्दी नाटक महाराष्ट्रीय साच्यांत लिहून घेतलें, आणि त्याचे ओळीनें पाऊणशें प्रयोग इंदुरांत झाले. त्यांतील मच्छिंद्राची यांची भूमिका चांगली होत असे. पण तो गुर्जर कविसुद्धां यशवंत मंडळीला मिळाला आणि यांच्या नाटकी जीवनावर पडदा पडला.

यांचें 'पट-वर्धन' नाटक (१९२०) व गडकऱ्यांच्या कल्पनेवरील 'तुलसीदास' (१९२८) हीं नाटकें यशवंत कंपनीनें प्रथम रंगभूमीवर आणलीं. पुढें रघुवीर सावकारांनीं यांचें रूपान्तरित 'वरवंचना' बसविलें. नंतर 'गंभीर घटना' हें रूपान्तरित विनोदी नाटक समर्थ मंडळीनें पुढें आणलें (१९२१). सदरच्या कालांत यांनीं आपला बराच काल म्हैसूरच्या युवराजांच्या नोकरींत घालविला.

स. १९३५ मध्यें पुणें येथें झालेल्या नाट्यसंमेलनाचे हे अध्यक्ष होते. तेथील यांचें भाषण रंगभूमीच्या दृष्टीनें महत्त्वाचें झालें.

यांचें गद्यलेखन पुष्कळ आहे. त्यांत यांच्या सरस मांडणीचें चांगलें प्रत्यन्तर येतें. विषयाचा सर्व बाजूंनीं सखोल अभ्यास, प्रतिपाद्य विषयाची उत्कृष्ट तरफदारी आणि समर्पक भाषा यांमुळें यांचें लेखन नेहमीं आकर्षक आणि टिकाऊ वाटतें. यांचे टीकालेख नाट्य व संगीत यांच्या अभ्यासक्रमांत पाठ्य पुस्तकें म्हणून दाखल करण्यासारखे आहेत.

यांचीं नाटकेंहि चांगल्या दर्जाचीं असून त्यांत यांचा गुण व्यक्त होतो. व्यंग्योक्ति, संवाद, खटके आणि कथानकाला कलाटणी देण्याचा नाट्यानुकूल गुण त्यांत भरपूर आढळतो. विशेषतः यांचें पट-वर्धन नाटक उत्कृष्ट समजण्यांत येतें.

यांच्या गद्यलेखनापेक्षांहि यांची पद्यरचना अधिक सरस आहे. काव्यगुण, शब्दसौष्ठव, प्रासादिकपणा आणि नादमाधुरी या दृष्टीनें यांचीं पद्यें बिनखोड आहेत. जुन्या चिजांप्रमाणेंच यांनीं स्वतंत्र स्वररचनाहि पुष्कळ

केली आहे. मानापमान व अनेक चित्रपटांतील संगीत यांच्या स्वररचनेंतून बाहेर पडलें असून त्याचें वैशिष्ट्य सर्वतोमुखीं झालेलें आहे. म्हणूनच 'आधुनिक आकर्षक संगीताचे प्रणेते' असा सार्थ गौरव यांना प्राप्त झाला आहे.

ललित व शास्त्रीय असे यांनीं संगीताचे दोन प्रकार केले आहेत. ललित संगीताचा उपयोग नाटकांत करावयाचा असून शास्त्रीय संगीताचा नाटक हा प्रान्त नव्हे. ललित संगीत स्वरलेखनांत बसवितां येईल, पण शास्त्रीय संगीत त्या चौकटींत बसविण्याचा प्रयत्न केल्यास तें निःसत्त्व होईल असें यांचें म्हणणें आहे.

यांची 'प्रतिभा' चित्रपटांतील नृत्यांगना कविता—

कनक कमलावरी, मोतियांच्या सरी।
झरति रव तेवि करि, चरणि नृत्यांगना ॥ १ ॥
मलय वातें गमति, रंभोरु थरथरति।
परि अचल कटिवरती, राहि नृत्यांगना ॥ २ ॥
घुंगुरे छुमछमन, लय तोल सांवरून।
मंजुरव घुमघुमुन, सोडि नृत्यांगना ॥ ३ ॥
लव एक दूर उभी, झणिं निकट ये, न भी।
वीज चमके नभिं, तेवि नृत्यांगना ॥ ४ ॥
रुचिर बाहू हलति, संकेत चतुर अति।
कीं कुणा खुणवि ती, गमत नृत्यांगना ॥ ५ ॥
भ्रुकुटि धनु नाचवुनि, नयनशर सोडुनी।
रसिक जीवा हरुनि, नेई नृत्यांगना ॥ ६ ॥
जरि भाव सुविलास, वेधिती हृदयास।
परि दुरुनि नमनास, योग्य नृत्यांगना ॥ ७ ॥

यांचें वाङ्मयः—नाटकें-१ पटवर्धन (१९२४), २ तुलसीदास, ३ वत्सलाहरण, ४ ब्रह्मलिखित, ५ वरवंचना (शेरिडन ड्यूएनच्या इंग्रजी नाटकाचें रूपान्तर) व ६ गंभीर घटना (ऑस्कर वाइल्डच्या इंग्रजी नाटकाचें रूपान्तर). यांपैकीं तुलसीदास हें सुप्रसिद्ध मराठी नाटककार राम गणेश गडकरी यांच्या कल्पनेवर उभारलेलें आहे. तसेंच वत्सलाहरण हें मुलांच्याकरितां लिहिलेलें आहे.

टीकालेख—१ क्रिया व रंगभूमि, २ चांगले नट कसे निर्माण होतील?, ३ महाराष्ट्र रंगभूमीची सद्यःस्थिति, ४ संगीताचें मराठीकरण, ५ कै. भास्करबुवा बखले, ६ गोहरजान.

ग्रंथ—माझा संगीत व्यासंग (१९३९).

संगीत दिग्दर्शन व संवादलेखन—१ मायामच्छिंद्र, २ अग्निकंकण.

संगीत दिग्दर्शन—१ अयोध्येचा राजा (१९३१), २ उषा, ३ प्रतिभा, ४ सावकारी पाश, ५ राजमुकुट (१९३४) वगैरे.

टेंबे, डॉ. भास्कर महादेव—(जन्म स. १८७०–मृत्यु स. १९४४ जुलै) वऱ्हाडांतील सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते व ग्रंथलेखक.

१८९७ सालीं मॅट्रिक झाल्यावर मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजांत हे दाखल झाले. पण तेथें शेवटच्या परीक्षेंत अपयश आल्यानें हे कर्ज काढून इंग्लंडला गेले आणि तेथें यांनीं एडिंबरो विश्वविद्यालयाची एल्. आर. सी. पी. अँड एस्. ही पदवी संपादन केली. इंदूरच्या महाराजांचें यांच्यावर विद्यार्थिदशेपासून प्रेम असल्यानें त्यांनीं यांना एका मोठ्या हॉस्पिटलवर नेमिलें आणि नंतर आपल्या खासगी नोकरींत घेतलें.

पण १९२२ सालीं यांना इंदूर सोडून यवतमाळास येऊन राहावें लागलें. थोड्याच दिवसांत यांनीं लोकांचीं मनें आपणांकडे खेचून घेतलीं आणि तेथें बापूजी अणे यांचे हे उजवे हात समजले जाऊं लागले.

१९३० चा जंगल सत्याग्रह यांनीं आपल्या नेतृत्वाखालीं अत्यंत चातुर्यानें चालविला आणि तीन महिन्यांनंतर शेवटीं स्वतः कारावास पत्करिला. अकोल्याच्या तुरुंगांत वऱ्हाडच्या चारहि जिल्ह्यांतील पुढारी व कार्यकर्ते होते. या वेळेपासून हे वऱ्हाडचे पुढारी बनले आणि तुरुंगांतील सर्व सत्याग्रह्यांना यांच्याकडे औषधाकरितां पाठविण्यास सुरुवात झाली. तुरुंगांतून सुटतांच यांनीं 'नारिंगी स्वस्तिक' नांवाची संस्था काढून गोरगरिबांना मोफत औषधोपचार करण्यास सुरुवात केली आणि तें काम आमरण चालविलें. तेथील 'रायफल क्लब' काढण्यांत यांचाच पुढाकार होता.

डॉक्टरीचा व्यवसाय संभाळून यांनीं सार्वजनिक कामाचा आणि इतर व्याप बराच वाढविला होता. त्यांत यांच्या व्यासंगीपणाला पहिलें स्थान दिलें पाहिजे. प्रचलित विषयांचा सांगोपांग अभ्यास करून हे फळा व नकाशा यांच्या साहाय्यानें तपशीलवार व्याख्यानें देत आणि तीं लोकांना फार आवडत. अशीं विचारप्रवर्तक व्याख्यानें देण्याकरितां यांचें वाचन चांगलें

असे. त्याकरितां यांचा वेंचक व मूल्यवान् ग्रंथांचा संग्रहहि नमुनेदार असे.

यांच्या घरांतील राहणी अगदीं नमुनेदार असे. भारत, भागवत, हरिवंश, एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथ यांच्या नित्य वाचनांत असत. ब्रह्मीभूत टेंबेस्वामींच्या कुलांतील असल्याबद्दल यांना भूषण वाटे. मारवाडी, कच्छी, भाटिये, मुसलमान वगैरे समाजांत यांच्याइतकी मान्यता इतरांना क्वचितच आढळते. आपल्या औदार्यपूर्ण व परोपकारी वागणुकीमुळें आपल्या मागें मुलाबाळांना आपला लौकिक व ग्रंथ यांशिवाय यांना कांहीं ठेवतां आलें नसलें, तरी आपलें चारित्र्य व त्याग यांमुळें समाजाला धडा घालून देणारे असे पुरुषच राष्ट्राची खरी संपत्ति होत.

यांचे ग्रंथः—

१ विद्यार्थ्यांचें आरोग्य, २ शिशुसंगोपन, ३ चाळीस वर्षें उलटल्यावर, ४ हिंदुस्थाना, तूं कोठें ? ५ हिंदुस्थानचें आरमारी सामर्थ्य.

टेंबेस्वामी, वासुदेवानंद सरस्वती—(जन्म स. १८५४–समाधि स. १९१४) एक महान् आचारनिष्ठ सत्पुरुष व ग्रंथकार.

सावंतवाडी संस्थानांत निर्मला नदीच्या तीरीं माणगांवीं यांचा जन्म झाला. व तेथून जवळच असलेल्या सिद्धपर्वतावरील गुहा यांची तपोभूमि बनली.

यांनीं बाळपणीं वेदाध्ययन केलें आणि शेवटपर्यंत यांचें वेदाचें नित्यपठण चालू होतें. यांचें नरसोबाच्या वाडीस नेहमीं जाणें असे व तेथेंच यांना श्रीदत्तदर्शन प्रथम झालें. यांनीं माणगांवीं एक सुंदर दत्तमंदिर बांधलें. तें बांधण्यापूर्वी एक वर्ष आश्विन मासांत यांनीं चांद्रायण व्रत केलें (१८८२).

यांचे नरसोबाचीवाडी, नरसी, बढवाई, गरुडेश्वर इत्यादि ठिकाणचे चातुर्मास खूप गाजले. यांच्यासारखा महात्मा आपल्या आचारनिष्ठ वर्तनानें धर्मप्रसाराचें जेवढें काम करी तेवढें हजारों लेखकांस व वक्त्यांसहि करतां येणें अशक्य होतें.

यांचे ग्रंथः— १ श्रीगुरुचरित्र (संस्कृत, सटीक), २ श्रीदत्तलीलामृताब्धिसार (प्राकृत ओंवीबद्ध), ३ सप्तशती गुरुचरित्र (प्राकृत), ४ माघमाहात्म्य (प्राकृत) नर्मदास्तोत्रासह, ५ वेदवादस्तुति (संस्कृत-सटीक), ६ कुमार शिक्षा (संस्कृत-सटीक), ७ पदसमूह, ८ स्त्रीशिक्षा (गद्य) प्राकृत, ९ समश्लोकी-श्रीगुरुचरित्र, श्रीगुरुसंहितासचूर्णिक, १० श्रीदत्तमाहात्म्य (प्राकृत ओंवीबद्ध), ११ श्रीदत्तपुराण (संस्कृत सटीक), १२ दत्तचंपू सटीक (संस्कृत), १३ श्रीकृष्णालहरी सटीक, १४ षट्पंचाशिका (संस्कृत), १५ एकावन्न श्लोकी गुरुचरित्र, १६ करुणात्रिपदी-पंचपदी भजन, १७ नर्मदालहरी, १८ दत्तात्रेय आख्यान बोध श्लोक, १९ श्रीदत्तभावसुधारस, २० आत्मानात्मविचार, २१ प्राकृत मननसार, २२ श्रीगुरुस्तुति संस्कृत-प्राकृत टीकेसह इत्यादि.

टोपे, रघुनाथ पांडुरंग ऊर्फ तात्या—(जन्म स. १८१४–फांशी स. १८५९ एप्रिल १८) सत्तावन सालच्या युद्धांतील मराठ्यांचे कुशल सेनापति.

हे मूळचे नाशिक जिल्ह्यांतील येवल्याचे राहणारे. यांचें देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणाचें घराणें येवलेकर या नांवानें प्रसिद्ध होतें. पण एकदां निफाडचे त्रिंबकजी डेंगळे यांच्या मध्यस्थीनें यांना दरबारांत पांच रत्नांची टोपी मिळाल्यानें हे टोपे नांवानें प्रसिद्ध झाले असें म्हणतात. पांडुरंगपंतांचा शेवटल्या बाजीराव पेशव्यांशीं संबंध आला व तेथें त्यांना धर्मादाय खात्याचे मुख्य नेमण्यांत आलें. बाजीराव आठ लक्षांचें पेन्शन घेऊन ब्रह्मावर्तास गेले, या वेळीं यांचेंहि कुटुंब त्यांचेबरोबर गेलें. त्या वेळीं यांचें वय चार वर्षांचें होतें.

डलहौसीच्या वेळेपासून असंतोष वाढत जाऊन गोसावी-बैरागी व मुल्लामौलवी यांच्या मार्फत सैन्यांत बेदिली निर्माण करण्यांत आली. आणि तिचा स्फोट काडतुसाच्या निमित्तानें शिपायांच्या बंडांत झाला. शिपायांच्या पुढाऱ्यांनीं राजकीय वारसा असलेलीं पण इंग्रजांनीं दुखावलेलीं राजघराणीं आपल्यांत सामील करून घेण्याचा प्रयत्न केला. नानासाहेब पेशवे, लक्ष्मीबाई झांशीवाली व दिल्लीचे बादशहा हे त्यांत त्यांच्या नेमणुका ब्रि. सरकारनें बंद केल्यामुळें सामील झाले. नानासाहेबांच्या दरबारांतील अजीमुल्ला वगैरे मुसलमान वकिलामुळें यांना या कटाचा सुगावा आधींच लागला होता.

१८५७ सालच्या बंडांत दिल्लीचें युद्ध (१८५७ मे ११–१८५७ सप्टें. २०), लखनौचें युद्ध (१८५७ मे ३०–१८५८ मार्च २१), जगदीशपूरचें युद्ध (१८५७ जुलै २७–१८५८ जुलै १३) व कानपूरचें युद्ध (१८५७ जून ४–१८५९ एप्रिल ७) हे जे चार प्रमुख

उठाव झाले, त्यांत अत्यंत पद्धतशीरपणें चालविण्यांत आलेल्या कानपूरच्या दीर्घकालीन उठावणीचे प्रमुख हे होते.

४ जूनच्या मध्यरात्रीं कानपुरांत गडबड सुरू झाली. प्रथम घोडदळानें बंड पुकारलें. ते नानासाहेबांच्या गोटाकडे आले, तेथील खजिना ताब्यांत घेऊन नानासाहेबांस त्यांनीं आपले प्रमुख केलें व ६ जूनला कानपूरच्या वेढ्यास सुरुवात झाली.

शेवटीं २५ जूनला इंग्रजांनीं तहाचें निशाण उभारलें. शस्त्रें खालीं ठेवावींत व सर्वांना गंगापार प्रयागास सुखरूप पोंचवावें असें ठरलें. त्याप्रमाणें सकाळीं नऊ वाजतां इंग्रजांच्या नावा चालू झाल्या. पण अजीमुल्ला वगैरे लोक अधिकाऱ्यांच्या ताब्यांत न राहिल्यानें इंग्रजांची अमानुष कत्तल झाली. त्याची सर्व नैतिक जबाबदारी इंग्रजांनीं नानासाहेब व हे यांवर ठेवली. नंतर १ जुलैला विठुर येथें नानासाहेबांना राज्याभिषेक करण्यांत आला. यानंतरच्या दोनचार चकमकींत टीकासिंग, ज्वालाप्रसाद वगैरे सैनिकांचे पुढारी नामोहरम झाल्यावर बंडवाल्यांची पांगापांग झाली. नानासाहेबांवर अधिक जबाबदारी पडली व त्यांनीं यांना सेनापति नेमून सैन्य जमा करण्याचा हुकूम दिला (२५ जुलै १८५७).

बंडांत सामील झालेली ४२ वी पलटण यांनीं शिवराजपूरला जाऊन आपल्या ताब्यांत घेतली व लखनौला निघालेल्या सेनापति हॅवलॉकच्या सैन्याला सतावण्यास सुरुवात केली. काल्पी जिंकून तेथें लष्करी साहित्याचा व दारूगोळ्याचा कारखाना सुरू करून ग्वाल्हेरच्या शिंद्यांशीं आपला संबंध यांनीं अबाधित केला व कानपूरवर चालून जाऊन विंडहॅमचा पराजय करून कानपूर पुनः ताब्यांत घेतलें. या चढाईंत यांना पुष्कळ लूट मिळाली. १७ जुलैला हातांतून गेलेलें कानपूर २७ नवंबरला पुनः यांच्या ताब्यांत आलें. या वेळीं यांच्या ताब्यांत एकंदर ५६ लक्षांचा मुलूख आला. यांच्या उत्कर्षाचा परमोच्च बिंदु हा होय.

पण ६ डिसेंबरला कॉलिन्सनें यांचा पराजय करून यांना कानपूर सोडावयास लावलें. तेव्हां हे काल्पीस येऊन राहिले. झांशी, बांदा, जगदीशपूर व लखनौ या सर्वांशीं संबंध ठेवण्यास हें केंद्र यांना वर्षभर उपयोगी पडलें. जाने. १८५८ ते जून १८५८ पर्यंत यांनीं काल्पी लढवली. व जून १८५८ ते एप्रिल १८५९ पर्यंत ग्वाल्हेरच्या आश्रयानें यांनीं आपली पराकाष्ठा केली.

हे वरचेवर दारूगोळा व खंडणी मिळवून युद्धाचा गाडा रेटण्याचा प्रयत्न करीत. पण बंडखोरांत शिस्त नसल्यानें जागोजाग यांच्या वांट्याला पराजयच येत. काल्पी सुटल्यावर ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत यांनीं विजयोत्सवाचा सर्व समारंभ करून बाजू सावरण्याचा प्रयत्न केला. पण अशा गोष्टींनें सावरण्याची ती वेळ नव्हती. सर्व आगाऊ आश्वासनें फोल ठरलीं. नानासाहेब वगैरे मंडळी उत्तरेकडे व नर्मदेच्या बाजूला हे व रावसाहेब पेशवे वगैरे लोक राहिले. इंग्रजांनीं या दोघांचा संबंध तोडला. नर्मदा ओलांडून नानासाहेबांना मिळण्यासाठीं मोठ्या चपळाईनें जात असतां मानसिंहाच्या विश्वासघातानें हे रात्रीं घरोणच्या जंगलांत रिचर्ड मीडकडून पकडले गेले (७ एप्रिल १८५९).

या वेळीं यांचेजवळ एक तरवार, एक कुकरी व ११८ मोहोरा असलेली पिशवी सांपडली. यांना पकडलें तेव्हां यांचें वय सुमारें पंचेचाळीस होतें. पांच फूट उंची, धनुष्याकृति भुंवया, काळेभोर डोळे, रेखीव नजर व दाढी, मिशा व कल्ले असलेल्या चेहऱ्यामुळें यांची चर्या भव्य व रुबाबदार भासे. बुद्धिमत्तेची झांक व अंगांतील कर्तृत्वशक्ति यांचे तोंडावर उघड दिसण्याइतपत स्पष्ट असे. हे तुटक मोजकें पण स्पष्ट बोलत. जबानींत जास्त चौकस अगर फाजील प्रश्न विचारला म्हणजे 'मालूम नहि' अशा दोनच शब्दांनीं हे आपला नकार दर्शवीत.

शिप्री येथें झालेल्या आपल्या तीन दिवसांचे चौकशींत यांनीं आपली विस्तृत लेखी जबानी दिली. 'मी इंग्रजी राज्यांत जन्माला आलों नाहीं. तसेंच इंग्रजांचा केव्हांहि प्रजाजन नव्हतों. मग राजद्रोहाचा आरोप मजवर कसा लागू पडतो? हातीं उघडपणें शस्त्र घेऊन युद्धांत मीं हत्या केली असेल, पण खून, दरवडे, बायका मुलांची हत्या हे प्रकार मीं केले नाहींत.' अशी विचारसरणी यांनीं आपला बचाव करतांना मांडली. शेवटीं यांना फांशीं देण्यांत आलें. फांसांत मान यांनीं आपणहून घातली. पण कानपूरची किंवा बिबी घरांतील कत्तलीशीं यांचा संबंध असल्याचें चौकशींत सिद्ध झालें नाहीं, असें मॅलेसन या इतिहासकारानें म्हटलें आहे.

पारतंत्र्यापासून बचाव करण्यासाठीं हिंदुस्थानांतील लोकांनीं जे कांहीं शेवटचे प्रयत्न केले त्यांमध्यें १८५७ सालच्या बंडाला व त्यांतहि यांच्या कामगिरीला विशेष महत्त्व आहे. झांशीच्या लक्ष्मीबाई पडल्यामुळें या स्वातंत्र्य युद्धांतील यशाची आशा संपली आणि सर्व ठिकाणीं बंडवाल्यांविरुद्ध प्रतिकूल वारे वाहूं लागले. ज्या संस्थानिकांच्या हक्कांसाठीं हा सर्व उठाव योजण्यांत आला होता, त्यांनींच बंडवाल्यांना आश्रय देण्याचें नाकारलें, तेथें इतर लोकाश्रयाची आशा करणें व्यर्थ होतें. अशा परिस्थितींत मागें निराशा व पुढें मृत्यु स्पष्टपणें दिसत असतां यांनीं इंग्रजांच्या सहा फौजा अंगावर घेऊन सतत दहा महिनेपर्यंत जो गनिमी लढा खेळला, तो केवळ अविस्मरणीय आहे. युद्धशास्त्राच्या दृष्टीनेंसुद्धां त्याला महत्त्व देण्यांत येतें.

ठ

ठकार, शंकर विनायक—(जन्म स. १८९३) भिल्लादि आदिवासी लोकांत राष्ट्रीय दृष्टीनें कार्य करणारे समाजसेवक.

यांचा जन्म धारवाड येथें झाला. मूळ गांव सिंहगडाच्या पायथ्याशीं असणारें कोंढणपूर. वडील सदर्न मराठा रेल्वेंत नोकर असल्यानें यांचें बाळपण धारवाड, मद्रास व हुबळी येथें गेलें.

लहानपणींच ग्रामसेवा करण्याची इच्छा होऊन हे कॉलेज सोडणार होते. पण कांहीं थोर लोकांच्या सल्ल्यामुळें कॉलेज न सोडतां हे बी. ए. झाले.

अहमदनगरच्या अनाथविद्यार्थिगृहांत व नूतन मराठी विद्यालयांत चार वर्षें काम केल्यावर असहकारितेची चळवळ सुरू झाली. सरकारी मदतीचा पैसा म्हणजे विटाळलेला पैसा अशी म. गांधींची विचारसरणी विद्यार्थ्यांना पटवून देतांना कोणत्याहि लोभास बळी न पडतां यांनीं नोकरीचा राजीनामा दिला. पुढें दोन वर्षें अमळनेरच्या राष्ट्रीय हायस्कुलांत घालविलीं. पण तेथील चालकांनीं पुनः सरकारी ग्रॅन्ट घेण्याचें ठरविलें तेव्हां यांनीं तेथेंहि राजीनामा दिला.

यानंतर यांना महाराष्ट्र प्रान्तिक खादी मंडळानें बोलावून चिटणीस केलें. हिशेबी काम करणारा या नात्यानें महाराष्ट्रांतील सर्व भागांत हिंडून तेथील परिस्थिति पाहण्याची व अनेक सुखदुःखाचे प्रसंग प्रत्यक्ष अनुभविण्याची संधि यांना मिळाली. पण प्रत्यक्ष लोकसेवेपुढें कारकुनी कामाचा यांना कंटाळा येऊन तीन वर्षांनीं यांनीं राजीनामा दिला.

पुढें 'पश्चिम खानदेश जिल्हा मंडळ' नांवाच्या संस्थेनें प्रत्यक्ष ग्रामसेवेची संधि यांना दिली. सर्व संसार बरोबर बाळगून जिल्ह्यांतल्या प्रत्येक गांवीं हिंडत हें काम यांनीं तीन चार वर्षें केलें. म. गांधींच्या सूचनेस अनुसरून अशा कामास आवश्यक असणारी व्यापक व मूलगामी दृष्टि येण्याकरितां यांनीं हिंदुस्थानभर प्रवास केला व 'सवाई मुकटी' या गांवीं कांहीं दिवस खास वास्तव्य केलें. तेथें ग्रामसुधारणेचें काम करीत असतां पश्चिम खानदेश जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्ष व ऑ. इं. कॉं. क.चे सभासद होते. १९३०, ३२, ३४ व ४२ सालांतील तुरुंगवास ओघानेंच लाभला. पण १९३५च्या कायद्यानुसार देशावर लादलेल्या घटनेंत संपूर्ण वगळलेले व अंशतः वगळलेले असे देशाचे विभाग पाडण्यांत आले होते. देशाचें अखंडत्व व ऐक्य या दृष्टीनें यांना असें करणें राजकीय कावा वाटला आणि यांनीं आपल्या कार्याची दिशा लागलीच बदलून भिल्लसमाजाची सेवा करण्याचा निर्णय घेतला (१९३७). १९३८ सालीं यांनीं 'पश्चिम खानदेश भिल्लसेवा मंडळ, नंदुरबार' काढलें.पश्चिम खानदेशांत भिल्लादि आदिवासींची संख्या ३।। लाख म्हणजे तेथील लोकसंख्येच्या एक-तृतीयांशापेक्षां अधिक आहे. जिल्ह्यांतील आठ तालुक्यांपैकी चार तालुके 'अंशतः वगळलेल्या' विभागांपैकीं आहेत. मुंबई इलाख्यांतील अन्य कोणत्याहि जिल्ह्यांत आदिवासी लोकांची इतकी मोठी संख्या नाहीं. तेथें शाळा, छात्रालयें, धान्यकोठारें, दारूबंदी प्रचार, अन्याय परिमार्जन इत्यादि विविध प्रकारें कार्य करण्यांत यांचा सर्व वेळ जाऊं लागला. भिल्ल साधु गुलामहाराज यांच्या

प्रभावानें हे भारून गेले व यांनीं त्यांचें चरित्र लिहून प्रसिद्ध केलें.

सरकारकडून भिल्लांच्या उत्कर्षाकरितां प्रयत्न चालू आहेत. पण ते राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांना पसंत पडण्यासारखे नाहींत. कायद्यानें त्यांना अलग करून संस्कृतीनेंहि त्यांना अलग करण्याचें सरकारी धोरण त्यांत दिसतें. "भिल्लादि लोक हे हिंदुसंस्कृतीचे लोक नसून ते अगदीं निराळ्या संस्कृतीचे लोक आहेत, त्यांना पूर्वस्थितींत ठेवूनच त्यांच्या चालीरीती, आचार, दारूपान वगैरेंचें संरक्षण केलें पाहिजे," असले कांहीं ग्रह उत्पन्न करण्यांत येत आहेत. याचाच पाठपुरावा मानववंशशास्त्राच्या अभ्यासाच्या निमित्तानें चालू आहे. भिल्लादिकांच्या नाक, कान, डोळे, वगैरेंच्या मापांवरून व त्यांच्या रक्तावरून त्यांचा वंश अलग ठरविण्याचेहि प्रयत्न चालू आहेत. वास्तविक हीं शास्त्रें अद्यापि अपूर्ण आहेत, व सिद्धान्त काढण्याइतपत विस्तृत अभ्यासहि त्यांचा झालेला नाहीं. अशा स्थितींत एका कुटुंबांतील माणसाप्रमाणें राहणी, शिक्षण, व्यवहार, पोषाख वगैरे बाबींत सर्व जग समान होत असतां यांनाच जगापासून अलग ठेवण्याचे असे प्रयत्न होणें अनिष्ट आहे असें यांचें मत आहे. या एका विशिष्ट दृष्टीनें काम करणारे यांच्यासारखे लोकच सध्यांच्या काळांतील खरे राष्ट्रीय मिशनरी होत.

ठक्कर, अमृतलाल विठ्ठलदास—(जन्म स. १८६९) रानटी लोक, अस्पृश्य व आपद्ग्रस्त यांचेसाठीं आत्मसमर्पण करणारे सुप्रसिद्ध भारतसेवक.

काठेवाडांतील भावनगर हें यांचें जन्मस्थान. यांची जात लोहाणा व यांच्या आईचें नांव मुळीबाई. पुण्याच्या एंजिनियरिंग कॉलेजमधून एल्. सी. ई. झाल्यानंतर (१८९०) यांनीं वढवाण व पोरबंदर संस्थान (१८९१-९९), पूर्व आफ्रिकेंतील युगांडा रेल्वे (१८९९-१९०२), सांगली संस्थान (१९०४-०५) इत्यादि ठिकाणीं कामें केलीं. यानंतर यांनीं मुंबई कार्पोरेशनमध्यें नोकरी पत्करली. तेथें यांची नेमणूक चेंबूर येथील कचरा पट्टीच्या लाइट रेल्वेवरील सुपरवायझरचे जागीं झाली. यांच्या हाताखालीं महारमांगांचें मोठें सैन्यच होतें. कंगाल, कर्जबाजारी आणि व्यसनी अशा त्या लोकांची हलाखीची स्थिति पाहून नोकरीशिवायच्या वेळांत हे त्यांच्या उद्धाराची खटपट करूं लागले. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्याकडून योजनाबद्ध आणि पद्धतशीर कामाचा व गो. कृ. देवधरांकडून अविश्रांतपणें गाजावाजा न करितां काम करण्याचा धडा यांनीं या वेळीं उचलला. देवधरांच्या सहवासानें यांना भारतसेवक होण्याची इच्छा झाली. धों. के. कर्वे यांच्या विधवा व पतिता स्त्रियांच्या सेवाकार्याचाहि परिणाम यांच्यावर फार झाला. यांनीं आपणास समाजसेवेस वाहून घेण्याचा निश्चय केला. पण वडिलांच्या मृत्यूनंतरच यांना आपला हा हेतु पूर्ण करितां आला. १९१४ सालीं मुंबई कॉर्पोरेशनमधील नोकरी सोडून हे भारतसेवक समाजाचे आजीव सभासद झाले व त्याच सालच्या फेब्रुवारी महिन्यांत संयुक्त प्रांतांतील दुष्काळ निवारणाच्या कार्याकरितां रवाना झाले.

संयुक्त प्रांतांतून दुष्काळ निवारणाचें कार्य करून आल्यानंतर गुजराथेंत मोफत व सक्तीचें शिक्षण सुरू करण्याकरितां माहिती गोळा करण्याचें काम विठ्ठलभाई पटेलांनीं यांच्याकडे सोंपविलें. तें करून यांनीं निरलस कार्यकर्ता असा लौकिक मिळविला.

१९१८ सालीं जमशेदपूर येथील टाटांच्या कारखान्यांतील गरीब मजुरांसाठीं स्वस्त धान्याच्या दुकानाची व्यवस्था पाहण्याचें काम व पुढें ओरिसांतील दुष्काळनिवारणाचें कार्यहि यांच्याकडे आलें (१९१९-२०). हें काम करीत असतांच जलप्रलयानें होणाऱ्या रेल्वे व सडका यांच्या नासधुसीचा अभ्यास करून यांनीं सरकारकडे अहवाल पाठविला. शिवाय उडिया स्वयंसेवकांचीं पथकें उभारून गांवोगांवीं अन्न पोंचविण्याचें यांचें काम चालू होतेंच. असेंच दुष्काळनिवारणाचें कार्य करण्याकरितां हे पंचमहाल जिल्ह्यांत आले असतां यांचें भिल्लांच्या स्थितीकडे लक्ष गेलें. यांनीं त्यांच्या घरोघर जाऊन त्यांना अन्नवस्त्र, शिक्षण व वैद्यकीय मदत देण्यास सुरवात केली. पंचमहाल जिल्ह्यांत भिल्लसेवामंडळ व अन्त्यजसेवामंडळें स्थापिलीं (१९२३-२५). अस्पृश्यांसाठीं विहिरी, झालोट म्युनिसिपल भंग्यांसाठीं धर्मशाळा वगैरे बांधण्याकडे यांनीं विशेष लक्ष पुरविलें. दारू दुकानावर निरोधन केल्यामुळें यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली; पण दोन महिन्यांतच यांची सुटका करण्यांत आली (१९३०).

हे म. गांधींच्या सत्याग्रहांत नसतांनाहि यांना १९३० सालच्या चळवळींत अटक होऊन शिक्षा झाली. पुढें हे अपिलांत सुटले (१९३०). जातीय निवाड्यांतील अस्पृश्यांचे स्वतंत्र मतदारसंघ रद्द व्हावे म्हणून

म. गांधींनीं केलेल्या उपवासांत यांच्यावर सर्वांत अधिक भार पडला. अस्पृश्यांना द्यावयाच्या जागांसंबंधीं वाटाघाट करतांना यांनीं मिळविलेली आंकडेवार माहिती फार महत्त्वाची ठरली. हरिजनसेवासंघाची स्थापना होऊन त्याच्या मुख्य कार्यवाहाची जबाबदारी यांच्यावर टाकण्यांत आली. यांनीं दिल्ली येथें त्या संस्थेचें मुख्य केन्द्र स्थापून २६ प्रान्तिक केन्द्रें उभारलीं आणि २०० जिल्हा शाखा स्थापन केल्या. कोणतेंहि काम पद्धतशीरपणें आणि मोठ्या प्रमाणांत करण्याची यांची या वेळीं कसोटी लागली. या कामाकरितां हिंदुस्थानाच्या कानाकोपऱ्यांत मिळेल त्या वाहनांतून हिंडत असतां हिंदुस्थानांतील अडीच कोटि आदिवासींची हीन स्थिति यांच्या नजरेस आली. त्या प्रश्नाचा अभ्यास करतां ख्रिस्ती मिशनऱ्यांशिवाय त्याकडे अद्याप कोणाचें लक्ष गेलें नाहीं, असें यांच्या ध्यानांत आलें. तेव्हां सरकार व हिंदुस्थानांतील उच्च वर्णीयांनीं उपेक्षिलेल्या आदिवासी लोकांच्या सेवेचें काम आदिवासी सेवामंडळ स्थापून यांनीं सुरू केलें.

आजपर्यंत आदिवासी लोकांसाठीं भिल्ल सेवासंघ दाहोद, नंदुरबार वगैरे कितीतरी संस्था अगदीं स्वतंत्रपणें काम करीत होत्या. कांहींची तर नांवें एक असून सुद्धां त्यांच्यांत कांहीं संबंध नव्हता. आतां यांनीं अशा संस्थांना एकसूत्रांत आणून सर्वांची एक मध्यवर्ति संस्था स्थापन केली आहे.

थोड्याशा कामामुळेंहि भरपूर प्रसिद्धि मिळत असल्यामुळें लोकसेवक आपल्या सामर्थ्याच्या भलत्याच भ्रामक कल्पना करतात. पण हे असल्या भ्रमाच्या आहारीं कधींहि गेलेले नाहींत. हे अत्यंत प्रसिद्धिविन्मुख असून ईश्वरावरील श्रद्धा व कार्यावरील निष्ठा या यांच्या प्रेरक शक्ति आहेत.

विलक्षण त्यागामुळें लोकांपेक्षां आपण निराळे आहोंत अशी भावना यांच्यांत उत्पन्न झालेली नाहीं. हे जितके कर्तव्यनिष्ठुर आहेत तितकेच दयापूर्ण आहेत. जेथें कोणीहि जाण्यास धजत नाहीं तेथें हे निर्भयपणें जातात व आपल्या अनुयायांना जाण्यास भाग पाडतात.

अंगावर गोणपाटासारखे जाड़ कपडे, कोठेंहि चार घास खाण्याची तयारी आणि सदोदित आनंदी असणारा हा पुरुष वयाला पंचाहत्तर वर्षें होऊन गेलीं तरी नवीं-नवीं कार्यें उत्पन्न करून तीं केवळ सेवावृत्तीनें पार पाडण्याची पराकाष्ठा करीत आहे.

ठाकरसी, विठ्ठलदास दामोदर—(जन्म स. १८७३ नवंबर ३०–मृत्यु स. १९२१ ऑगस्ट १२) मुंबईचे जगप्रसिद्ध व्यापारी, नाणकशास्त्रज्ञ, सनातन वैदिक धर्माचे अभिमानी आणि स्त्रियांच्या शिक्षणाकरितां अनेक लाखांचीं देणगी देणारे दानशूर गृहस्थ.

हे जातीनें मोढवाणी भाटिया वैश्य. काठेवाडांतील जामनगर संस्थानांत खंबाळया नांवाचें एक लहानसें गांव आहे, तें यांचें मूळ ठिकाण. ठाकरसी हें यांच्या आज्याचें नांव. प ण प्रथम त्यांनीं मुंबईस येऊन ८०० रुपयांच्या भांडवलावर सुरुवात करून व्यापारांत जम बसविला म्हणून ठाकरसी हें या घराण्याचें उपनांव झालें. आडत दयाल-मूळजी-ठाकरसी असा यांचा वंश आहे. आडत दयाळच्या पूर्वीचे पुरुष आपल्या गांवीं शेती करून राहत. ठाकरसींनीं मुंबईस आपला चांगला जम बसल्यावर आपल्या वडिलांच्या नांवें मुंबईचें 'मूळजी जेठा मार्केट' भागांत उघडलें (१८८६). त्यांचे पुत्र दामोदर शेठ यांचाहि व्यापारांत चांगलाच जैम बसून त्यांनीं 'हिंदुस्थान मिल' उघडली व बोलतां बोलतां चार गिरण्यांचे ते मालक झाले. वडील शेहेचाळिसाव्या वर्षीच वारल्यानंतर यांच्यावर त्यांच्या उद्योगधंद्यांचा सर्व भार पडला.

यांचें प्राथमिक शिक्षण खंबाळया येथें व हायस्कूल शिक्षण मुंबईस झालें. हे कांहीं महिने कॉलेजांत गेले. पण पुढें कॉलेज सोडून व्यापारांत पडणें यांना व यांच्या वडिलांना इष्ट वाटलें.

व्यापारांत शिरतांच यांची सारखी भरभराटच होत गेली. त्याबरोबर अनेक मानाचीं व जबाबदारीचीं कामें यांच्याकडे येऊं लागलीं. हे मुंबई कॉर्पोरेशनच्या स्टँडिंग कमेटीचे चेअरमन व कॉर्पोरेशनचे अध्यक्ष झाले (१९०७). मुंबई कायदे मंडळाचे (१९०५-१९०८) व इंपीरियल कौन्सिलचेहि (१९१०-१२) हे सभासद होते. तसेंच हे मुंबईच्या औद्योगिक प्रदर्शनाचे कार्याध्यक्ष (१९०४) व कलकत्ता औद्योगिक परिषदेचे अध्यक्ष (१९०६) होते. अनेक जॉइंट स्टॉक कंपन्यांचे डायरेक्टर व बॉंबे इम्प्रुव्हमेंट ट्रस्टचे यांना ट्रस्टी नेमण्यांत आलें होतें. ना. लल्लुभाई सामळदास यांच्या साहाय्यानें यांनीं सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक स्थापिली. स्पेसी बँकेचेहि हे

कार्याध्यक्ष होते. पुढें तर श्री. सयाजीराव गायकवाडांच्या देखरेखीखालीं बडोदा बँक यांनीं सुरू केली. क्राउन मिल, सरदार कारबॉनिक गॅस कंपनी, जामनगर द्वारका रेल्वे, द्वारका सिमेंट कंपनी व ॲग्रिकल्चरल इंप्रिमेंट कंपनी इत्यादि संस्थांच्या स्थापनेंतहि हे प्रमुख होते.

यांच्या मातोश्री नाथीबाई वयाच्या साठाव्या वर्षी महाबळेश्वर रस्त्यावर वडिलांच्या स्मरणार्थ त्यांनीं बांधलेल्या दामोदराश्रमांत परलोकवासी झाल्या (१९०६). हे पृथ्वीपर्यटण करून आल्यावर, युरोप व जपान वगैरे देशांतील धर्तीवर इकडे स्त्रीशिक्षणसंस्था असाव्यात म्हणून प्रो. धों. कृ. कर्वे यांनीं सुरू केलेल्या स्त्रियांच्या विश्वविद्यालयास पंधरा लक्ष रुपये आपल्या मातेच्या स्मरणार्थ देऊन यांनीं त्याचें ' नाथीबाई युनिव्हर्सिटी ' असें नांव ठेवलें (१९१९).

तसेंच पुणे सेवासदनास यांनी निरनिराळ्या रूपांनीं सुमारें एक लक्ष रुपये दिले. त्यांतून नाथीबाई हॉल, ममुताई हॉस्टेल व लेडी ठाकरसी सेवासदन ब्रँच सातारा व बारामती हीं यांच्या आप्तांचीं स्मारकें उभारण्यांत आलीं. ममुताई ही यांच्या वडील बहिणीची मुलगी होय. मुंबईच्या वनिताविश्रामालाहि यांनी एक लक्षाची देणगी दिली. समाजसेवासंघाच्या परळ येथील गृहास पंचवीस हजार रुपये देऊन त्याला ' दामोदर ठाकरसी मूळजी हॉल ' हें नांव देवविलें. तसेंच ' सर विठ्ठलदास दामोदर ठाकरसी फ्री पुस्तकालय, चांदोद ' हें यांच्या बीस हजार रुपयांच्या देणगीवर यांच्या मृत्यूनंतर उभारलें गेले (१९२३).

पहांटे पांच वाजतां उठून गीतेंतील ' कार्पण्यदोषोपहतस्वभावः ' (गीता २·७) हा श्लोक, ' स्थाने हृषीकेष ' (गीता. ११·३६-४६) इत्यादि दहा श्लोक व कांहीं ईशस्तुतिपर भूपाळ्या म्हणणें, घोड्यांवर पत्नीबरोबर फिरणें, स्नानपूजा, शंकरदर्शन, गीतादि ग्रंथाचें वाचन, गायनश्रवण व आपला मोठा व्यवसाय संभाळणें असा यांचा नित्य क्रम असे. यांनीं दोन वेळ जगाचा प्रवास केला होता.

उद्योगधंद्यांतील यांच्या कौशल्यानें यांना सर्व आयुष्यभर यश मिळवून दिलें आणि यांनीं दिलेल्या देणग्यांमुळें यांच्या मृत्यूनंतरहि तें चिरंतन बनलें.

ठाकुरदत्तशर्मा—(जन्म स. १८८० सुमार) हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध वैद्य व ' अमृतधारा ' या औषधाचे उत्पादक.

घरांतून पळून जाऊन यांनीं इंग्रजी शिक्षण घेतलें व कॉलेजपर्यंत मजल मारली. याच वेळीं शेजारीं राहत असलेल्या वैद्याकडून यांनीं वैद्यकीचें शिक्षण घेतलें. १९०० सालीं ५ रु. भाड्याची जागा घेऊन यांनीं आपलें ' देशोपकारक औषधालय ' उघडलें. दिवसभर १५ रु. द. म. ची रेल्वेंत नोकरी करावयाची व रात्रीं औषधें कुटण्याघोटण्याचें काम स्वतःच पार पाडावयाचें असा यांचा व्यवसाय सुरू झाला. पुढें १९०४ सालीं ' देशोपकारक ' हें हिंदी व उर्दू या दोन्ही भाषांतील वर्तमानपत्र यांनीं सुरू केलें आणि तें १९३२ पर्यंत चालविलें.

यांनीं अत्यंत मेहेनतीनें प्रयोग करून अनेक रोगांवर चालणारें ' अमृतधारा ' नांवाचें औषध तयार केलें. त्याचा खप एवढा वाढला कीं याकरितां लाहोर येथें यांना स्वतंत्र कारखाना, अमृतधारा स्ट्रीट, अमृतधारा पोष्ट असे स्वतंत्र विभाग निर्माण करणें भाग पडलें. १९१० सालीं यांनीं चीफ जस्टिस सर अतुलचंद चतर्जीच्या हस्तें स्वतंत्र अमृतधारा-भवनाचा उद्घाटन समारंभ केला व १९१४ सालीं दुसरें भवन उघडलें. याबरोबर स्वतःचा मोठा छापखानाहि हे चालवीत (१९१६), हे सिंध हैद्राबाद प्रान्तिक वैद्यक संमेलन (१९२८), पंजाब प्रान्तीय वैद्यक संमेलन, रावळपिंडी (१९२९) व दिल्ली अखिल भारतीय ब्राह्मण संमेलनाचे अध्यक्ष होते (१९४३).

ठोंबरे, त्र्यंबक बापूजी—(स. १८९०-१९१८) मराठींतील सुप्रसिद्ध कवि. हे बालकवि या नांवानें विशेष प्रसिद्ध आहेत.

यांचा जन्म खानदेशांत झाला. यांचें शालेय शिक्षण व्यवस्थित झालें नाहीं. वयाच्या सत्राव्या वर्षी जळगांवीं भरलेल्या कविसंमेलनांत अध्यक्ष कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांच्या हस्तें यांचा बालकवि म्हणून सन्मान झाला (स. १९०७). पोटासाठीं यांनीं पंडितगिरी म्हणजे गोऱ्या मिशनऱ्यांची मराठी शिकवणी मधूनमधून केली. प्रपंचांत ओढाताण व गृहसौख्याचा अभाव सर्व आयुष्यभर यांच्या वांट्यास आला. कविवर्य केशव महादेव सोनाळकर, नारायण वामन टिळक व गोविंदाग्रज यांच्या सहवासांत यांना पुष्कळ स्नेहसौख्य मिळालें. यांचें एका स्त्रीवर अलोट प्रेम होतें. पण तीहि स्खलनशील मानवी व्यक्तीच होती हें ध्यानांत आल्यानें प्राणान्तिक व्यथा होण्याच्या पूर्वीच हे अपघातांत सांपडून मृत्यु पावले.

हे निसर्गाचें वर्णन करणारे कवि असून यांच्या, आनंदी आनंद गडे, अरुण व फुलराणी या कविता उत्कृष्ट वाङ्मयांत मोडतात.

यांचें काव्यवाङ्मयः बालकवींची कविता (१९२३, ए. या. निफाडकर; १९२५, गो. गो. अधिकारी; १९३९, पाटणकर).

ड

डफरिन, लॉर्ड—(जन्म स. १८२६–मृत्यु स. १९०२–कारकीर्द स. १८८४–१८८८) हिंदुस्थानचे व्हाइसरॉय. लॉर्ड रिपननंतर हे व्हाइसरॉय म्हणून हिंदुस्थानांत आले.

यांचें शिक्षण ऑक्सफर्डला झालें. हे लॉर्ड झाल्यानंतर अमेरिका, व्हिएन्ना वगैरे ठिकाणीं कामें केल्यावर यांना हिंदुस्थानचे अंडर-सेकेटरी नेमण्यांत आलें (१८६४–६६). यानंतर इजिप्त वगैरे देशांत कामें केल्यानंतर यांना हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय नेमण्यांत आलें. इल्बर्ट-बिलामुळें उत्पन्न झालेली वर्णभेदाची तेढ यांनीं आपल्या व्यक्तिमत्त्वानें नाहींशी करण्याचा प्रयत्न केला. रशिया व अफगाणिस्थान यांची तेढ टळली, तेव्हां यांनीं रावळपिंडी येथें अमीर अबदुल रहमान यांची भेट घेऊन सलोखा स्थापन गेला (१८८५). ब्रह्मदेशचा राजा थिबा यानें इंग्रजांशीं विरोधाचें धोरण स्वीकारतांच यांनीं त्याला पराजित करून ब्रह्मदेश हिंदुस्थानला जोडून घेतला व राजा थिबा यास रत्नागिरी येथें कैदेंत ठेविलें. तेथेंच तो पुढें वारला (१९२६). व्हिक्टोरिया राणीच्या राज्याचा पन्नास वर्षांचा सुवर्णमहोत्सव यांच्या वेळीं साजरा झाला (१८८७). ग्वाल्हेरचा किल्ला यांनीं शिंद्यांना परत देविला व मुदत संपल्यावर रेल्वे कंपन्यांकडून रेल्वेची मालकी सरकारकडे यावी असें ठरविलें. बंगाल, अयोध्या व पंजाब प्रान्तांत यांनीं कुळसंरक्षण कायदा केला.

इंडियन नॅशनल काँग्रेसनें सामाजिक प्रश्नांचा विचार करावा, राजकीय प्रश्नांचा विचार प्रांतांतल्या राजकीय संस्थांनीं करावा, प्रांतांनीं या कामीं भरविलेल्या परिषदेचें अध्यक्षस्थान त्यांच्या प्रांताच्या गव्हर्नरांना द्यावें आणि यायोगें अधिकारीवर्ग व बिनसरकारी राजकीय पुढारी यांच्यांत परस्पर आदर व प्रेम वाढवावें या कल्पनेनें भारून जाऊन मि. ह्यूम यांनीं स. १८८५ च्या प्रारंभीं सिमला येथें यांची मुलाखत घेतली. ही योजना यांना फारशी उपयुक्त वाटली नाहीं. इंग्लंडप्रमाणें सरकारविरोधी पक्ष येथें नाहीं, वर्तमानपत्राच्या टीकेवरहि विश्वास ठेवतां येत नसल्यानें लोकांचें मत सरकारला समजत नाहीं. म्हणून हिंदी राजकारणाचा विचार करणाऱ्या हिंदी गृहस्थांनीं वर्षांतून एकदां एकत्र जमावें व प्रचलित राजकारणांतील दोष दाखवून ते सुधारण्याचे उपाय सुचवावेत. मात्र गव्हर्नरच्यासमोर आपले विचार मोकळेपणानें लोकांना मांडतां येणार नाहींत म्हणून अध्यक्ष गव्हर्नर असूं नये. अशी योजना यांनीं ह्यूम यांना सुचविली. ही कल्पना आपण सुचविल्याचें कारकीर्द संपेतोंपर्यंत गुप्त राखण्याचें यांनीं सांगितलें होतें (राष्ट्रीय सभेचा इतिहास, पा. १२). परंतु यांची ही योजना पुढें कल्पनेंतच राहून ती संस्था चळवळ करणारी होऊं लागली आणि तिच्यांत वजनदार पुढारी सामील होऊं लागले असें पाहतांच यांचें तीबद्दलचें धोरण बदलूं लागलें. यांनीं मुसलमानांना त्या संस्थेंतून वेगळे काढून तिला केवळ हिंदूंची सभा ठरविण्याचा घाट घातला. हिंदुस्थानांत हिंदु व मुसलमान अशीं दोन राष्ट्रें नांदत आहेत ही कल्पना प्रथम यांच्या डोक्यांतून निघालेली आहे.

धर्म, संस्कृति, समाजघटना, स्वभाव आणि इतिहासपरंपरा या सर्व दृष्टींनीं परस्परविरुद्ध असे हिंदु व मुसलमान लोक असल्यानें त्यांचें एक राष्ट्र कधीं होणार नाहीं असें यांनीं काँग्रेसच्या स्थापनेनंतर स्पष्टपणें बोलून दाखविलें. त्या द्विराष्ट्र वादाचा विषवृक्ष पुढें फोफावला आहे आणि त्याचीं फळेंहि पण पारतंत्र्याच्या रूपानें भारतास अनुभवण्यास मिळत आहेत.

यांचे ग्रंथः—(1) Letters from High Latitude, (2) Speeches in India (1890).

डॉयसेन, पॉल—(जन्म स. १८४५–मृत्यु स. ?) हिंदी तत्त्वज्ञानाचे जर्मन अभ्यासक व अभिमानी.

कॉब्लेंझ जवळील ऑबेरड्रीस हें गांव यांचें जन्मस्थान. ॲडाम डॉयसन यांचे हे चिरंजीव. बॉन व बर्लिन युनिव्हर्सिटींत आपलें शिक्षण संपविल्यानंतर यांनीं प्रा. लासेन यांचेजवळ संस्कृतचें अध्ययन केलें. जिनेव्हा युनिव्हर्सिटींत संस्कृत व तत्त्वज्ञान या विषयांच्या अध्यापकाचें काम करीत असतांच यांनीं हिंदी तत्त्वज्ञानाचे अध्ययनार्थ आपलें आयुष्य व्यतीत करण्याचें ठरविलें (१८७३) व त्याप्रमाणें आयुष्याच्या अखेरीपर्यंत यांचें सर्व लक्ष ज्ञानाच्या या शाखेवरच केंद्रित झालेलें होतें. यांनीं पन्नास उपनिषदांचें जर्मनमध्यें भाषान्तर करून त्यांची अनेक दृष्टींनीं चिकित्सा केली आहे.

हिंदुस्थानांतील यांच्या आगमनाच्या पूर्वीपासूनच प्लेटो, ॲरिस्टॉटल व कॅन्ट यांच्या तत्त्वज्ञानाशीं हे पूर्णपणें समरस झालेले होते. हिंदुस्थानांत आल्यानंतर हिंदी तत्त्वज्ञान–विशेषतः अद्वैत वेदान्ताचें अध्ययन केल्यानंतर कॅन्टचें तत्त्वज्ञान व अद्वैत वेदांत यांमध्यें असणारें साम्य यांच्या लक्षांत आलें. आणि थोड्याच दिवसांत उपनिषदांतील अध्यात्मवादाला कॅन्टचें तत्त्वज्ञान शास्त्रीय पार्श्वभूमि आहे असें यांचें मत बनूं लागलें. स्पायनोझाचें तत्त्वज्ञान व वेदान्त यांमध्यें असेंच साम्य आहे. परंतु दोन्ही तत्त्वज्ञानें गूढ असल्यानें शास्त्रीय जगांत त्यास विशेष किंमत नाहीं. परंतु कॅन्टची गोष्ट तशी नाहीं. गणिती व वैज्ञानिक शास्त्रांत लक्ष घालणाऱ्या कॅन्टचें तत्त्वज्ञान त्या शास्त्रांना अनुसरून लिहिलें असल्यानें अत्यंत महत्त्वाचें आहे. आणि अशा तत्त्वज्ञानाशीं वेदान्ताचें असणारें साम्य जर दाखवितां आलें तर इतके दिवस गूढ स्वप्न या नांवाखालीं झिडकारण्यांत आलेल्या उपनिषदांतील तत्त्वज्ञानाला एकदम उजाळा येईल असें यांना वाटलें व झालेंहि तसेंच.

श्रीशंकराचार्यांच्या अद्वैतवेदान्तानुसार दृश्य जग स्वप्नासारखें केवळ भासणारें आहे, त्यांत सत्यता नाहीं, दृश्याच्या पलीकडे असणारें ब्रह्म तेवढें सत्य आहे. प्रत्येक व्यक्तीला जगाचा अनुभव येतो याचें कारण अज्ञान किंवा माया. अज्ञानांत गुरफटलेला प्राणी आपल्या पूर्वकर्मानुसार जगाकडे पाहतो आणि त्याचा अनुभव घेतो. मृगजल, रज्जुसर्प व शुक्तिकारजत हीं त्याचीं उदाहरणें होत.

कॅन्ट या सुप्रसिद्ध जर्मन शास्त्रज्ञाचें म्हणणें असेंच आहे. वैज्ञानिक दृष्ट्या पाहतां जगाचें वास्तविक स्वरूप आपणास दिसतच नाहीं. जग पाहणाराला अनेक कारणांनीं तें विकृतच दिसतें. तें मूळ स्वरूपांत पाहावयाचें असल्यास आपल्या इंद्रियांचा कांहीं उपयोग नाहीं. रंगीत कांचेप्रमाणें असणारें आपलें मन, स्वभाव व इंद्रियें यांना मध्यें न घालतां आपण जगाकडे पाहिलें तर जगाच्या मुळाशीं असणारी एक शुद्ध वस्तु आपणास आढळेल.

व्यवहारदृष्ट्या दिसणारें जग जसें दिसतें तसें आहे असें मानून आपण व्यवहार करीत असलों, तरी जगाचें वास्तविक स्वरूप इंद्रियातीत एकजिनसी आहे असा दोघांच्याहि म्हणण्याचा निष्कर्ष आहे. एकजण युक्तिवाद व उपनिषदांतील वाक्यें यांवरून आपलें म्हणणें सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो आणि दुसरा आधुनिक विज्ञानशास्त्रावरून आपलें म्हणणें मांडतो. त्यामुळें दोन्ही मार्ग एकाच ठिकाणीं पोंचल्यासारखे दिसतात.

कॅन्ट व शंकराचार्य यांच्या विचारसरणींतील साम्य यांनीं अचूक उचललें आणि अद्वैत वेदान्ताची आधिभौतिक विज्ञानशास्त्राशीं सांगड घातली.

हिंदी तत्त्वज्ञानाच्या यथार्थतेबद्दल ज्या वेळीं संभ्रम उत्पन्न झाला होता त्या वेळीं कॅन्टसारखा तत्त्वज्ञ उत्पन्न झाला आणि त्याच्या शोधपूर्वक ठरविलेल्या मताचें आणि शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाचें विलक्षण साम्य दाखविण्याचें कार्य यांच्यासारख्या अभ्यासकांनीं केलें. त्यामुळें आधुनिक शास्त्रामुळें डळमळीत झालेलें औपनिषद तत्त्वज्ञानाचें स्थान कांहीं काळ तरी स्थिर झालें यांत शंका नाहीं.

यांचे ग्रंथः—

(1) Das System des Vedanta (1883), (2) Die Sutras des Vedanta (1887), (3) On the Philosophy of the Vedanta in its relations to Occidental Metaphysics (1893), (4) Sechzig Upanishads des Veda (1897), (5) Geschichte der Philosophie (५ भाग), (6) Outlines of Indian Philosophy (1902).

डार्लिंग, सर माल्कम लॉयल—(जन्म स. १८८०) सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ.

ईटन व केंब्रिजच्या क्वीन्स कॉलेजमध्यें आपलें शिक्षण संपवून हे इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें दाखल झाले (१९०४). पंजाब सरकारचे 'अंडर-सेक्रेटरी' म्हणून कांहीं दिवस काम केल्यानंतर हे पंजाबचे इन्कम टॅक्स कमिशनर बनले. परंतु यानंतर थोड्याच दिवसांनीं यांची को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे रजिस्ट्रार म्हणून नेमणूक झाली. यांचे कारकीर्दीत यांना पंजाबी शेतकरी वर्गाची, त्यांच्या अडचणींची व त्यांच्या पुढें असणाऱ्या प्रश्नांची उत्कृष्ट व सूक्ष्म छाननी करण्याची संधि मिळाली. सहकारी पतपेढ्यांच्या स्थापनेची शक्याशक्यता हा आपला मूळ मुद्दा मात्र या अध्ययनांत यांनीं कधींच दूर होऊं दिला नाहीं. सरकारच्या आर्थिक विभागांतील अधिकारी व पंजाबचे फायनेन्शियल कमिशनर या नात्यानें यांनीं केलेली कामगिरीहि बहुमोल आहे. इंडियन इकॉनमिक असोसिएशनच्या कार्यास सक्रिय साहाय्य करणारे एक सनदी नोकर हा यांचा विशेष आहे.

पंजाब बँकिंग इन्कायरी कमिटी (१९३०) व पंजाब लँड रेव्हेन्यु असेसमेंट कमिटी (१९३८) या दोन मोठ्या चौकशी मंडळांचें अध्यक्षस्थान यांनाच देण्यांत आलें होतें. पंजाब युनिव्हर्सिटीचे हे कांहीं दिवस उपकुलगुरु होते.

उत्कृष्ट शास्त्रीय ग्रंथांचे लेखन हा यांच्या आयुष्याचा आणखी एक विशेष आहे. Some Aspects of Co-Operation in Germany and Italy (1922), The Punjab Peasant in Prosperity and Debt (1925), Rusticus Loquitur Or the Old Light and the New in Punjab Village (1930), Wisdom and Waste in Punjab Village (1934) इत्यादि यांचे ग्रंथ विद्वन्मान्य आहेत.

इंडियन इकॉनमिक कॉन्फरन्सच्या लखनौ येथें भरलेल्या अकराव्या अधिवेशनाचे हे अध्यक्ष होते. Religion and Economics हा यांच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय होता (१९२८).

डावरे, गोविंदराव नारायणराव— (जन्म स. १८३६–मृत्यु स. १८७९) अत्यंत धाडसी आणि क्रांतिकारक गृहस्थ.

हे शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे कौशिक गोत्री ब्राह्मण. मूळ घराणें नगर जिल्ह्यांतील. शामराव धोंडो नाईक डावरे हे प्रथम पेशवाईत पुण्यास आले. केशव–धोंडो–शामराव–बल्लाळ–नारायण असा यांचा वंशवेल आहे. नारायणरावांना तीन पुत्रः गोविंदराव, माधवराव व बळवंतराव.

इंग्रजांच्या कारकीर्दीत यांचें शेटेपणाचें वतन गेलें व तें परत मिळेना तेव्हांपासून हें घराणें इंग्रजांचें द्वेष्टें बनलें. स. १८५७ च्या क्रान्तियुद्धानंतर महाराष्ट्रांत वासुदेव बळवंत फडके यांच्या नेतृत्वाखालीं बंडाची उठावणी झाली, त्यांत या डावरे बंधूंचा संबंध होता.

यांच्यावर वेगळाल्या आरोपांखालीं त्या वेळीं अनेक खटले भरण्यांत आले. त्यांपैकीं बहुतेक सर्व खटल्यांतून हे निर्दोषी म्हणून सुटले. यावरून यांच्या बुद्धिमत्तेची व कारस्थानीपणाची कल्पना येते.

स. १८६७ मध्यें यांच्यावर 'पूना बँक फोर्जरी केस' नांवानें गाजलेला खटला भरण्यांत आला. तो पुणें येथील से. जज्ज एफ्. लॉइड यांचे पुढें १६ सप्टें. ते २३ ऑक्टो. १८६७ पर्यंत चालला. त्यांत यांच्यासुद्धां चवदा आरोपी होते. याशिवाय पेस्तमजी फर्दुनजी व बाळा मांडे या दोन आरोपींस सरकारतर्फे माफीचे साक्षीदार करण्यांत आलें होतें.

आरोपींस ज्यूरर मिळाले होते. त्यांचे फोरमन पुण्यांतील प्रसिद्ध कृष्णशास्त्री चिपळुणकर होते. हा खटला चालू असतां पुणें शहरीं अत्यंत खळबळ उडाली होती.

आरोपीतर्फे प्रख्यात बॅरिस्टर ब्रॅन्सन हे काम पाहत होते. या खटल्याचें समग्र जजमेंट चार्लस वुड्ल्यम अलेन यांनीं डेक्कन हेरल्ड प्रेसमध्यें छापून प्रसिद्ध केलें.

या खटल्याच्या चौकशीकडे सर्व महाराष्ट्राचें लक्ष वेधलें होतें. ज्युरींनीं एकमतानें सर्व आरोपी निर्दोषी आहेत असा दिलेला निर्णय मान्य करून सेशन्स जज्ज यांनीं सर्व आरोपींना सोडून दिलें. शहरांत सर्वत्र पेढे वांटण्यांत व उधळण्यांत आले. हा खटला बहुधा यांच्यावरील चवथा असावा.

मध्यंतरीं अशाच कांहीं कारणांनीं यांच्या माधवराव व बळवंतराव या दोघा बंधूंना जन्मठेप काळे पाण्याची शिक्षा देण्यांत आली (१८७३, १८७४). नंतर यांनाहि पकडून कच्च्या कैदेंत ठेवण्यांत आलें (८-११-७९).

व तेथेंच यांना भाजण्यांत आलें व त्यामुळें हे मृत्यु पावले असें म्हणतात (१३-१२-१८७९).

अशा प्रकारें यांचा कैदेंत हृदयद्रावक अंत झाला. यांना कशाकरितां पकडलें होतें हें समजण्यास साधन नाहीं. पण याच सालांत यापूर्वी सरकारी महत्त्वाचे कागदपत्र असलेले बुधवारवाडा व विश्रामबागवाडा हे जाळण्यांत आले होते. लोक त्याशीं यांच्या मृत्यूचा संबंध जोडीत.

मूळ तहनामे नाहींसे करून बनावट तहनामे तयार करून मूळ ठिकाणीं ठेवणें, नोटा करणें, बनावट कागद करणें, दुसऱ्याच्या सह्या करणें, चेक तयार करून कोणाच्याहि खात्यांतून पैसे काढणें, अशक्य वाटणारी गोष्ट हमखास घडवून आणणें वगैरे गोष्टींत हे अत्यंत निष्णात होते. याबाबतींत पुण्यांत यांच्यासंबंधीं अनेक आख्यायिका प्रसिद्ध होत्या. अशा कृत्यांविषयीं डावरे-गिरी हा शब्द तर पुण्यांत म्हणीसारखा रूढ आहे.

डावरे, धर्मवीर-विश्वासराव बळवंतराव— (जन्म स. १८८८ नवं. ७, पोर्ट ब्लेअर-अंदमान) सुप्रसिद्ध धाडसी, कायदेबाज व सरकारविरुद्ध चळवळ करणारे गृहस्थ.

यांच्या वडिलांना व चुलत्यांना काळेपाण्याच्या शिक्षा झाल्यानंतर दहा वर्षांनीं अंदमानांत हजेरी देऊन कुटुंबासह स्वतंत्र राहण्याची परवानगी मिळाली (१८८४). तेव्हां यांची माता गीताबाई तिकडे गेल्या व तेथें यांचा जन्म झाला. शिक्षेची मुदत संपून ही सर्व मंडळी पुण्यास आली (१८९३). पुढें बळवंतराव ट्रेगनें वारले (१९०२) आणि यांच्यावर लहानपणींच संसाराचा बोजा पडला. कांहीं वर्षें नोकरी केल्यावर यांनीं प्रत्यक्ष व्यापारांत लक्ष घातलें. पण यांना जॅक्सन खून प्रकरणांत पिस्तुल जवळ बाळगणारे म्हणून तीन वर्षांची शिक्षा झाली. सुटून परत आल्यावर यांनीं धंद्यांत चांगले पैसे कमावले. पण स्वभाव चळवळ्या असल्यानें प्रत्येक चळवळींत हे भाग घेत आणि वैशिष्ट्यानें बिनीवर चमकत. धाडसाबरोबर कायद्यांतील सूक्ष्मता यांच्या जलद ध्यानांत येते. १ तळेगांव येथील मशिदीपुढील वाद्यबंदी, २ नाशिक रामरथ, ३ सोन्या मारुति-पूजा वगैरे प्रकरणें यांनीं हायकोर्टापर्यंत लढवून यशस्वी करून दाखविलीं. महाराष्ट्र प्रान्तिक वर्णाश्रम स्वराज्य संघाचे हे अनेक वर्षें अध्यक्ष होते. पुण्यांतील अनेक संस्थांत कार्यवाह, अध्यक्ष व उत्पादक म्हणून यांनीं काम केलें आहे. यांच्या धाडसाच्या गोष्टी नमूद करण्याचा काळ मात्र अजून आलेला नाहीं.

डांगे, श्रीपाद अमृत—(जन्म स. १९०० सुमार) सुप्रसिद्ध कम्युनिस्ट तत्त्वप्रतिपादक, संघटक व निर्भय कार्यकर्ते.

यांचा जन्म नाशिक येथें डांगेआळींत झाला. यांचे वडील दलालीचा धंदा करीत. हे मुंबईच्या विल्सन कॉलेजांत शिक्षण घेत असतां बेझंटबाईंचीं व्याख्यानें होत. तेव्हां विद्यार्थी या नात्यानें प्रश्न विचारून लोकांच्या मनांत त्यांच्या विचारसरणीबद्दल संशय उत्पन्न करण्याचें काम हे करीत. इंटरच्या वर्गांत असतां बायबलचें शिक्षण सक्तीचें नको म्हणून यांनीं विद्यार्थी वर्गांत चळवळ करून त्या वेळीं संप घडवून आणला. त्या वेळेपासून इंग्रजी भाषेंत लिहिण्याचा, बोलण्याचा व कविता करण्याचाहि यांना नाद लागला. गडकऱ्यांच्या 'वाग्वैजयन्ती'चें यांनीं इंग्रजींत भाषान्तर केलें. त्या वेळीं 'यंग कॉलेजिएट' या नियतकालिकांत त्यांतील कांहीं उतारे प्रसिद्ध होत असत. ज्युनियर बी. ए. च्या वर्गांत असतां यांनीं असहकारितेच्या चळवळींत आपल्या शिक्षणाला कायमचा रामराम ठोकला. पण म. गांधींच्या राजकारणांत यांच्या तर्ककर्कश बुद्धीला योग्य विचार-सरणीचा व कार्यक्रमाचा अभाव दिसून आला. तेव्हां त्यांच्याशीं वादविवादाचे दोन हात करून यांनीं गांधीवादाला सोडचिठ्ठी दिली.

१९२२ सालीं यांनीं 'सोशॅलिस्ट' नांवाचें इंग्रजी साप्ताहिक काढलें आणि त्यांतून समाजवादी विचार-सरणी यांनीं लोकांसमोर मांडण्यास सुरुवात केली. टाइम्सकारांनीं 'बोल्शेव्हिक पेपर ऑफ बॉंबे' अशी यांच्या पत्राची बोळवण केली. त्या वेळीं रशियांत वास्तव्य करून असलेल्या मानवेन्द्रनाथ रॉय यांच्याशीं यांचा पत्रव्यवहार होता. यांचें धोरण अर्धवट नव्हतें. हे आपल्या लेखांत सोशॅलिझमचा पुरस्कार निःसंदिग्धपणें व निर्भयपणें करीत. कामगारांचें तात्पुरतें ध्येय पगारवाढ हें असलें तरी सर्व उत्पादनाचीं साधनें ताब्यांत घेऊन तीं पूर्णपणें सार्वजनिक मालकीचीं झाल्याशिवाय त्यांचें कार्य पूर्ण होणार नाहीं, हीं साधनें कामगारांच्याच श्रमांनीं उभारलीं गेलीं असल्यामुळें त्यांवर कामगारांचा हक्क आहे असा यांच्या प्रतिपादनाचा रोख असे.

१९२४ सालीं कानपुरास यांच्यावर खटला होऊन यांना चार वर्षांची शिक्षा झाली. त्यांत सरकारी

वकिलानें असें सांगितलें, 'कम्युनिझमचीं तत्त्वें प्रतिपादण्यास अगर त्यांचा प्रचार करण्यास आमचा विरोध नाहीं. पण हे लोक शेतकरी व कामगार यांना चिथावणी देऊन बंडास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करतात. शिवाय यांना ब्रिटिश हुकमत नष्ट करावयाची आहे. म्हणून यांना कोर्टात खेचणें भाग पडतें.' कामगारांचा पुढारी म्हणून शिक्षा झालेला हा हिंदुस्थानांतील पहिला खटला होय.

सरकारची ही वृत्ति पाहून यांनीं आपल्या साह्यकर्त्या लोकांच्या मदतीनें कानपूर येथें कम्युनिस्ट पार्टीची रीतसर स्थापना केली (१९२५) व तिलाच पुढें भारतीय स्वरूप देऊन शेतकरी-कामकरी पक्ष निर्माण केला (१९२७). या वेळेपासून यांच्या प्रतिपादनाचा आणि संघटनेचा प्रभाव सरकारला व लोकांनाहि जाणवूं लागला. हिंदुस्थानची राज्यघटना ठरविण्याकरितां 'सायमन कमिशन' आलें. त्यावर यांनीं बहिष्काराचा परिणामकारक मोहिम केली. तसेंच संपाची वावटळ उत्पन्न करून मजुरांची पगारकपात थांबांवली. याच सालीं हिंदुमुसलमानांचा परळ येथें होऊं घातलेला दंगा केवळ यांनीं स्वतःचे वजनानें थांबविल्याची नोंद सरकारी दप्तरांत आहे. यामुळें सरकार अस्वस्थ झालें आणि सुप्रसिद्ध 'मीरतकेस' निर्माण करण्यांत येऊन त्यांत यांना गोंवण्यांत आलें (१९२९). हिंदुस्थानांतील सर्व प्रान्तांतील आरोपी या खटल्यांत असले तरी महाराष्ट्रांतील आरोपींची संख्या व प्रभाव विशेष होता. हा खटला चार वर्षे चालला. त्यांत यांनीं ७०० पानी जबाब दिला. यांना बारा वर्षांची शिक्षा झाली. पण ती अपिलांत तीन वर्षांची होऊन हे १९३५ सालीं सुटले. हा खटला, त्यांतील आरोपी, त्यांना मिळालेल्या सवलती व खटल्यांतून निघालेला निष्कर्ष हें सर्वच अगदीं अपूर्व असून एका नव्या राजकीय युगाचें निदर्शक होतें.

सुटल्यानंतर यांनीं 'क्रान्ति' हें मराठी व 'नॅशनल फ्रंट' हें इंग्रजी साप्ताहिक काढलें. याच वेळीं ७ महिने 'ब्रिटिया' मिलचा संप चालवून यांनीं तो यशस्वी केला. राष्ट्रसभा-मंत्रिमंडळानें यांच्यावर भाषणबंदीचा हुकूम बजवल्यानें दुसरें महायुद्ध सुरू झाल्यावर यांचें तोंड बंद झालें. १९३९ सालीं मुंबईस महागाईभत्त्याचा ८० हजार कामगारांचा संप यांनीं सुरू केला. पण यांना अटक करून तुरुंगांत घालण्यांत आलें. कम्युनिस्टांच्या युद्धानुकूल धोरणामुळें यांची पुढें सुटका झाली. नंतर हे युरोपमध्यें गेले व दीड वर्षानें युद्ध संपल्याचें जाहीर झाल्यावर हिंदुस्थानांत परत आले (१२ डिसें. १९४५).

लंडन येथें जागतिक कामगारपरिषदेला हे हिन्दी ट्रेड युनियन काँग्रेसचे प्रतिनिधि म्हणून हजर होते. तेथें यांनीं हिन्दी कामगारांचा प्रश्न मांडला आणि त्यांच्यासंबंधीं ब्रिटिश जनतेंत असलेले गैरसमज दूर केले. यांनीं हिन्दी मजुरांच्या दैन्यावस्थेचें वर्णन स्पष्टपणें करून ब्लॅकपूल येथें भरलेल्या सत्तर लाख मजुरांचे प्रतिनिधि असलेल्या सभेंत हिन्दी स्वातंत्र्याचा ठराव निःसंदिग्ध भाषेंत पास करून घेतला. जागतिक कामगारसंघ स्थापन झाल्यावर पॅरिसच्या परिषदेंत हे सर्व वसाहतींचे पुढारी बनले. आणि वसाहतींच्या स्वातंत्र्याला यांनीं त्या संघटनची मान्यता मिळविली.

स्वातंत्र्ययुद्धाकरितां क्रान्तिकारक लढाऊ वर्ग तयार करणें, शेतकरी-कामकऱ्यांच्या बळकट संघटनेनें स्वातंत्र्ययुद्धाला तीव्रता आणणें, लढ्याचें नेतृत्व भांडवलदारांकडून काढून श्रमजीवी लोकांकडे आणणें, याकरितां कम्युनिझमच्या तत्त्वाचा प्रचार करणें, सत्तेचीं सर्व केन्द्रें श्रमजीवी लोकांनीं काबीज करण्याच्या दृष्टीनें व्यापणें आणि पिळवणुकीचा नाश करणें असा यांचा स्पष्ट कार्यक्रम आहे. दिवाणगिऱ्या व अधिकाराच्या जागा यांचा स्वीकार करणें म्हणजे फक्त जनताबळ व राष्ट्रीय भावना तीव्रतर करण्याचा मार्ग आहे, शेवटीं स्वातंत्र्य लढ्यानेंच मिळवावें लागेल, लढ्याला भांडवलवाले कधींच उपयोगी पडणार नाहींत, तो भार श्रमजीवी बहुजन समाजावरच पडावयाचा, अशा सिद्धान्तानुसार यांचें कार्य चालू असतें.

यांचा व्यासंग बहुविध व सूक्ष्म आहे. आपलें तत्त्वज्ञान निर्भयपणें मांडण्याची शक्ति यांच्यांत आहे. तसेंच तें व्यवहारांत उतरवून यांनीं लोकांना व सरकारला अनेक वेळां अस्वस्थ करून सोडलें आहे. त्यामुळें सर्व राजकीय कार्यकर्त्यांत यांच्या चळवळीला व यांना विशेष प्रकारचें स्थान आहे. यांच्या पुनर्विवाहित पत्नी उषाबाई यांच्या या कार्यांत नेहमीं सहभागी असतात. यांचें वाङ्मय—१ लेनिन व गांधी, २ हेल फाउंड, ३ वैदिक कालाचा इतिहास.

डेव्हिड्स, टी. डब्ल्यू. रहीस—(जन्म स. १८४३– मृत्यु १९२२) पाली भाषेचे सुप्रसिद्ध अभ्यासक, संशोधक व पंडित.

ब्राइटन स्कूल व ब्रेसनोज युनिव्हर्सिटींत आपलें शिक्षण संपवून हे सिलोन सिव्हिल सर्व्हिसमध्यें शिरले (१८६६). सुरुवातीपासूनच संस्कृतचे पंडित म्हणून यांची सर्वत्र ख्याति असून सिलोनमध्यें आल्यानंतर थोड्याच दिवसांत यांनीं सिंहली व तामीळ भाषा आत्मसात् केल्या. पुढें एका ग्रामीण खटल्याची तपासणी करीत असतां पाली भाषेच्या ज्ञानाची आवश्यकता यांना भासली व थोड्याच दिवसांत सिलोनमधील बौद्धधर्मीय इतिहासांत हे रमूं लागले. पुढें इंग्लंडमध्यें बॅरिस्टर झाल्यानंतरहि यांनीं आपली ही ज्ञानोपासना तशीच पुढें चालू ठेवली.

'नॉन-ख्रिश्चन रिलिजन्स' या सुप्रसिद्ध ग्रंथमालेंत Buddhism हा ग्रंथ लिहून यांनीं आपल्या या नव्या आयुष्यास सुरुवात केली (१८७८) आणि याचा हा ग्रंथ इतका लोकप्रिय झाला कीं अगदीं थोड्या अवधींत त्याच्या डझनावारी आवृत्त्या निघाल्या. 'निर्वाण' या शब्दांत त्या वेळीं सर्वत्र ध्वनित केला जाणारा 'पूर्ण नाश' हा त्याचा खरा अर्थ नाहीं, या जगांतच गांठणें शक्य असणारी उच्च अवस्था म्हणजे 'निर्वाण' हा सिद्धान्त यांनीं या ग्रंथांत प्रथम साधार सिद्ध केला व पुढें अनेक विद्वानांना त्याची री ओढणें भाग पडलें.

परंतु 'पाली टेक्स्ट सोसायटी'ची स्थापना हें यांचें प्रमुख जीवितकार्य होय. १८८१ सालीं दिलेल्या हिबर्ट लेक्चर्समध्यें यांनीं प्रथम Early English Text Society च्या धर्तीवर पाली भाषेंतील ग्रंथ प्रसिद्ध करणाऱ्या संस्थेची कल्पना मांडली व त्याच वर्षीं त्या संस्थेची यांनीं स्थापना केली. विस्कळितपणें पसरलेले बौद्ध ग्रंथ एकत्र आणावयाचे, व्यवस्थितपणें संपादित करून ते रोमन लिपींत प्रसिद्ध करावयाचे, त्यांचीं भाषान्तरें करावयाचीं व शेवटीं त्यांवर स्वतंत्र ग्रंथ लिहावयाचे, अशा क्रमानें यांच्या या कार्याबद्दलच्या कल्पनांचा विकास होत गेला. 'धर्म, भाषा व कथा यांचा सुसंगत इतिहास या दृष्टीनें या ग्रंथांना विशेष महत्त्व आहे. यांतील बहुतेक ग्रंथ बुद्धकालीन असून केवळ लिहिण्याचे अज्ञानामुळें त्यांचें लेखन दोन शतकें पुढें ढकललें गेलें. कोणत्याहि प्रकारचा धक्का आजपर्यंत या ग्रंथांना लागला नसल्यानें आपल्या धर्माचा खात्रीलायक इतिहास आपणांस मिळून ख्रिश्चन धर्माच्या प्रारंभींच्या इतिहासासंबंधीं आपणांस कांहीं नवीं प्रमेयें बसवण्यास मदत होईल,' अशा हेतूंनीं यांनीं या कार्यास सुरुवात केली व ही कल्पना पुढें फारच यशस्वी झाली. वैदिक संस्कृत व संस्कृत वाङ्मय यांमधील अनुपलब्ध दुवा शोधून काढण्यास या ग्रंथांचे संशोधनानें मदत केल्यानें तर यांची सर्वत्र फारच वाहवा झाली व वेदांच्या संशोधनाइतकें महत्त्व लोक या संशोधनशास्त्रास देऊं लागले.

संस्थेच्या स्थापनेच्या वेळेपासून आपल्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत सतत चाळीस वर्षे यांनीं हें कार्य तनमनधन अर्पून चालविलें. २६००० पृष्ठें असलेल्या ६४ मूळ पाली ग्रंथांच्या रोमन लिपींतील आवृत्त्या यांनीं ९४ खंडांत प्रसिद्ध केल्या. लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमधील पालीचे प्राध्यापक व रॉयल एशियॅटिक सोसायटीचे सेक्रेटरी या जागा (१८८५-१९०४) यांना देण्यांत आल्यामुळें तर यांचें हें कार्य अधिक सुलभ झालें.

यांचे ग्रंथ—(1) Buddhism (1878), (2) Buddhism, its History and Literature (1899), (3) Buddhist India (1902), (4) Early Buddhism (1908), (5) An Early History of Buddhists (Cambridge History of India-तील एक प्रकरण), (6) पाली-इंग्लिश डिक्शनरी (डब्ल्यू. स्टीड यांचे सहकार्यानें) व इतर अनेक संपादित ग्रंथ.

डेव्हिड्स, मिसेस् सी. ए. एफ. रहीस—(जन्म. स. १८५७–मृत्यु स. १९४२) पाली भाषेच्या सुप्रसिद्ध अभ्यासिका.

टी. डब्ल्यू. रहीस डेव्हिड्स यांच्या या पत्नी. प्रथम सहकारी म्हणून यांचा त्यांच्याशीं संबंध आला व १८९४ मध्यें या त्यांच्याशीं विवाहबद्ध झाल्या. पाली टेक्स्ट सोसायटीनें प्रसिद्ध केलेल्या बहुतेक सर्व ग्रंथांचें संपादन यांनीं केलें आहे. वास्तविक रहीस-डेव्हिड्स असें यांचें नांव आहे.

यांचे ग्रंथ—(1) Goatama the Man, (2) Sakya or Buddhist Origins, (3) Buddhism, (4) Buddhist Psychology, (5) Old Creeds and New Creeds, (6) Wayfarer's Words इत्यादि.

डोंगरे, अनंतपद्मनाभ परमेश्वर—(मृत्यु स. १८७८) एक माध्व सांप्रदायी कर्मठ शास्त्री व स्त्रियांना संस्कृत शिक्षण देण्याचे पुरस्कर्ते.

हे दक्षिण कानडा जिल्ह्यांतील मल्हेरबी गांवाहून पुण्यास आले. पुण्यास दुसरे बाजीराव पेशवे यांची भार्या सौ. वाराणशीबाई यांना हे संस्कृत

शिकवीत. पुढें पेशवे ब्रह्मावर्तास गेल्यानें हे परत कानडा जिल्ह्यांत मंगळूरला गेले. कांहीं वर्षें म्हैसूर व नेपाळच्या महाराजांचे हे आश्रित होते. यांनीं आपल्या दुसऱ्या पत्नीस संस्कृत वगैरे शिकवून शास्त्रपारंगत केलें होतें. पण तशा शिक्षणास लोकमत विरुद्ध असल्यानें यांना शास्त्री-पंडितांशीं वादविवाद करावे लागले. त्यांत त्यांच्या पहिल्या मुलीचा विवाह अयशस्वी झाला म्हणून यांनीं आपल्या दुसऱ्या मुलीचा विवाह लांबणीवर टाकला. तरुण अविवाहित मुलगी रमाबाई बरोबर आणि धंदा पुराण सांगण्याचा. त्यामुळें लोक यांना आश्रय देईनात. त्यांतच मद्रासकडे दुष्काळांत सांपडले (१८७६-७७). अशा स्थितींत अन्नान्नदशा होऊन यांनीं आतुरसंन्यास घेऊन अरण्यांत देह ठेवला.

डोंगरे, पंडिता रमाबाई—(जन्म स. १८५८ एप्रिल-मृत्यु स. १९२२ एप्रिल) संस्कृत भाषेंतील पंडिता व ख्रिश्चन मिशनरी.

यांच जन्म म्हैसूर जिल्ह्यांतील उत्तर घाटावरील एका गांवीं झाला. वयाच्या बाराव्या वर्षी संस्कृतमधील हजारों श्लोक यांना पाठ होते. याशिवाय कानडी, मराठी, बंगाली व हिंदी या भाषा यांना चांगल्या येत.

वडील वारल्यावर अत्यंत हाल सोशीत या कलकत्त्यास पोंचल्या (१८७८). तेथें यांनीं बालविवाह व विधवांना होणारा त्रास या विषयांवर व्याख्यानें देण्यास सुरुवात केली. यांचीं व्याख्यानें संस्कृत आधारांनीं भरलेलीं असल्यानें सर्वत्र खळबळ माजे. यांचा चहाता वर्गहि उत्पन्न झाला आणि यांना ' सरस्वती ' पदवी बहाल करण्यांत आली. त्या वेळीं यांचें वय बावीस वर्षांचें होतें.

यानंतर यांनीं विपिनबिहारी मेधावी, सिल्चर (आसाम) या शूद्र जातीच्या पदवीधर वकिलाशीं विवाह केला. तेव्हां यांना ' मनोरमा ' नांवाची मुलगी झाली. पण लग्न झाल्यापासून १९ महिन्यांनीं हे गृहस्थ कॉलऱ्याला बळी पडले आणि या पुनः एकदां पोरक्या झाल्या. तेव्हां या पुण्यास आल्या आणि रानडे-भांडारकरांना भेटून यांनीं आपल्या स्त्रीशिक्षणाच्या कार्यास त्यांचा पाठिंबा मिळविला. थोड्याच दिवसांत यांनीं 'आर्य महिलासमाज ' नांवाची संस्था काढला आणि 'हंटर एज्युकेशन कमिशन' पुढें स्त्रीशिक्षणाची तरफदारी करणारी उत्कृष्ट साक्ष देऊन आपल्याकडे सर्वांचें लक्ष वेधून घेतलें.

लवकरच या इंग्लंडला गेल्या (१८८३). तिकडे वॉंटेजच्या सेन्ट मेरी होममध्यें या राहिल्या व तेथेंच या ख्रिस्ती झाल्या. चेल्टनहॅमच्या लेडीज कॉलेजमध्यें दोन वर्षें संस्कृतच्या प्राध्यापकाचें काम केल्यावर या अमेरिकेस गेल्या. तेथें यांनीं किंडरगार्टन पद्धतीचें शिक्षण घेतलें. या पद्धतीवर यांनीं एक पुस्तकमाला मराठींत काढली आहे. याच वेळीं High Caste Hindu Woman हें पुस्तक यांनीं प्रसिद्ध केलें (१८८७).

हिंदुस्थानांत विधवांकरितां स्त्रीशिक्षणसंस्था काढण्याच्या यांच्या कल्पनेस अमेरिकेंत चांगला पाठिंबा मिळाला. यांच्या संस्थेचीं दहा वर्षें आर्थिक जबाबदारी पत्करणारी ' रमाबाई असोसिएशन ' नांवाची संस्था स्थापन झाली. या हिंदुस्थानांत परत आल्या आणि यांनीं मुंबई येथें ' शारदासदन ' नांवाची संस्था काढली (१८८९ मार्च ११). पण मुलींना बाटविण्यासंबंधीं यांचा उद्देश असल्याबद्दल अधिकाधिक परिस्फोट झाला आणि आर्थिक मदतहि बाहेरची असल्यानें रानडे-भांडारकर वगैरेनीं यांच्या संस्थेशीं असलेला संबंध सोडला आणि या केडगांवीं ' मुक्तिसदन ' काढून आपलें ख्रिस्तीधर्मप्रसाराचें कार्य उघड रीतीनें करूं लागल्या. तेथें १८९७ च्या दुष्काळापासून यांनीं गांवोगांवीं हिंडून शेंकडों स्त्रिया व मुली यांना मृत्यूच्या दाढेंतून सोडवून आश्रय दिला. आणि त्यांच्याकरितां अनेक उद्योग सुरू केले. पहिलीं दहा वर्षें संपल्यावर या पुनः अमेरिकेस गेल्या आणि यांनीं तिकडून पुनः मदत आणली. अमेरिकेतून आलेल्या तिघा मिशनऱ्यांच्या साहाय्यानें संकटग्रस्तांकरितां ' कृपासदन ' नांवाचें अनाथालय यांनीं उघडलें. मुलगी मनोरमा अमेरिकेहून शिकून आल्यावर ती शारदासदन हायस्कुलची प्रिन्सिपल झाली. १९०३ मध्यें ' मुक्ति प्रेयर बेल ' नांवाचें मासिक सुरू झालें. आणखींहि प्रचंड उद्योगाच्या योजना यांनीं आखल्या. त्यांत बायबलचें संस्कृत भाषान्तर करण्याचांहि एक योजना होती. पण यांची मुलगी मनोरमा वारल्यानें यांना धक्का बसला आणि नंतर लवकरच या वारल्या.

यांचें वाङ्मय-मराठी-१ स्वधर्मनीति, २ विलायत व अमेरिका प्रवासवर्णन, इंग्रजी-३ A Testimony, ४ High Caste Hindu Woman, संस्कृत-५ बायबलचें संस्कृत भाषान्तर (अपूर्ण).

ढ

ढेकणे, प्रि. बापुजी नारायण—(जन्म स. १८६२–मृत्यु स. १९११) ग्वाहेर संस्थानांतील पाश्चात्य व स्त्रीशिक्षण, यांचे जनक व शिक्षणतज्ज्ञ.

यांचें जन्मस्थान पुणें. हे पुणें न्यू इंग्लिशस्कूलमधून मॅट्रिक (१८८२), व क्रमानें अनेक शिष्यवृत्त्या मिळवून एम्. ए. झाले (१८८६). सरकारी शाळाखात्यांत प्रवेश केल्यावर रत्नागिरी हायस्कूल, गुजराथ कॉलेज वगैरे ठिकाणीं काम केल्यावर उज्जयनीच्या माधव कॉलेजचे प्रिन्सिपल म्हणून यांची नेमणूक झाली. नवीन शिक्षणसंस्था व प्रतिकूल लोकमत असतां यांनीं तिकडे धोरणी स्वभावानें लोकमत अनुकूल करून घेतलें. कॉलेजच्या स्थैर्याबरोबरच यांनें तेथें पहिली मुलींची शाळा उघडली (१८९८). यांनीं रेव्हेन्यु खात्यासंबंधीं एक पुस्तक लिहिलें आहे. उज्जयनीच्या माधव कॉलेजांत यांचे तैलचित्राचे अनावरणाचे वेळीं महाराज माधवराव शिंदे यांनीं यांच्या शिक्षणविषयक कामगिरीचा अत्यंत गौरवपूर्वक उल्लेख केला.

त

तय्यबजी, बद्रुद्दिन—(जन्म स. १८५४–मृत्यु स. १९०६) मुंबईचे नामांकित कायदेपंडित, हायकोर्टांतील न्यायमूर्ति व राष्ट्रसभेचे मुसलमान कार्यकर्ते.

सुप्रसिद्ध अरब व्यापारी तय्यबजीभाई मियासाहेब यांचे हे चिरंजीव. यांचे डोळे लहानपणासून अधू होते. त्यामुळें युनिव्हर्सिटींतील विशेष शिक्षण न घेतां हे इंग्लंडहून बॅरिस्टर होऊन परत आले आणि थोड्याच दिवसांत नामांकित कायदेपंडित म्हणून यांची प्रसिद्धि झाली. पुढें मुंबई हायकोर्टांत न्यायाधीश म्हणून यांची नेमणूक झाल्यावर निर्भय व स्वतंत्र वृत्तीबद्दल यांची ख्याति असे.

यापेक्षांहि सार्वजनिक आयुष्यांत यांनीं स्वीकारलेल्या व्यापक दृष्टीला आणि तिला अनुसरून मुसलमान व देश यांसाठीं यांनीं केलेल्या कामगिरीला विशेष महत्त्व आहे. अन्जुमान इ-इस्लामचे प्रथम सेक्रेटरी व नंतर अध्यक्ष, महॉमेडन एज्युकेशन कॉन्फरन्स, मुंबईचे अध्यक्ष (१९०३) व अलीगड कॉलेज असोसिएशनचे सभासद यांसारख्या जबाबदारीच्या जागा यांनीं स्वीकारल्या. या सर्वांत मुसलमान समाजांतील सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक अज्ञान दूर करण्याचें एकच ध्येय यांनीं आपल्या डोळ्यांपुढें ठेविलें. स्त्रीशिक्षण, पडद्याची अनवश्यकता व अलीगड कॉलेजचें युनिव्हर्सिटींत रूपान्तर यांसारख्या आवश्यक गोष्टींचा हे सतत पुरस्कार करीत.

आपल्या समाजाच्या उत्कर्षाबरोबर राष्ट्राचा उत्कर्ष झाला पाहिजे म्हणून यांनीं इंडियन नॅशनल काँग्रेसच्या स्थापनेंत व तिच्या कार्याच्या वाढींत मनापासून भाग घेतला. मद्रासच्या काँग्रेसचें अध्यक्षपद यांना देऊन यांच्या या कार्याचा गौरव करण्यांत आला (१८८७). 'देशांतील बुद्धिमान् वर्गाचा विश्वास नष्ट करणारीं कृत्यें ब्रिटिश साम्राज्यशाहीनें केलीं आहेत. आपल्या इतर देशबांधवांच्या खांद्याला खांदा लावून लढण्यांतच मुसलमानांचें हित आहे' अशी विचारसणी यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत मांडली.

तर्खडकर, दादोबा पांडुरंग—(जन्म स. १८१४-मृत्यु स. १८८२) मराठी भाषेचे व्याकरणकार, कवि, ग्रंथलखक, समाजसुधारक व लेखक.

यांचा जन्म मुंबईस झाला. जात वैश्य. मूळचें वसतिस्थान वसईजवळचें तर्खड. यांचे वडील भाविक वारकरी असल्यानें यांना मराठी काव्याची गोडी त्यांच्यामुळें लागली. यांचें इंग्रजी शिक्षण 'बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या शाळेंत झालें.

शिक्षण संपल्यानंतर जावरा संस्थानचे नबाब यांचे व

एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट या ठिकाणीं शिक्षक म्हणून काम केल्यावर डेप्युटी कलेक्टरच्या जागेवरून हे सेवानिवृत्त झाले (१८६२). हे नगर येथें डेप्युटी कलेक्टर असतां यांनीं १८५७ सालीं झालेलें भिल्लांचें बंड मोडलें म्हणून यांना रावबहादूर करण्यांत आलें. पण पुढेंहि यांनीं एज्युकेशनल ट्रॅन्सलेटरच्या जागेवर काम केलें. हे कांहीं काळ बडोदें संस्थानच्या दिवाणाचे मदतनीस होते.

मराठींतील पद्धतशीर व्याकरण ग्रंथ लिहिण्याचा पहिला प्रयत्न यांचा होय. व्याकरणाखेरीज यांचें प्रसिद्ध पुस्तक 'केकावली'वरील स्वतःच्या आईबापांच्या नांवानें केलेली 'यशोदा-पांडुरंगी' ही गद्य टीका होय. अशा पद्धतीची टीका मराठीमध्यें अपूर्व आहे. हे कवितादेखील करीत. पुढें प्रार्थनासमाजांत परिणत झालेली परमहंस सभा काढणारांत हे होते. मराठींत एम्. ए. परीक्षेंत पहिला येणारास यांच्या नांवें तर्खडकर पारितोषिक ठेविलें आहे.

यांचें वाङ्मय—१ मराठी भाषेचें व्याकरण, २ लघुव्याकरण, ३ विधवाश्रुमार्जन १८५७, ४ इंग्लिश व्याकरणाची मूळ पीठिका १८६३, ५ केकावली-यशोदा-पांडुरंगी टीका १८६५, १९३१, ६ महाराष्ट्र भाषेच्या व्याकरणाची पूरणिका १८८१, ७ परमहंसिक ब्रह्मधर्म १८८१, ८ शिशुबोध १८८४, ९ धर्मविवेचन, १० आत्मचरित्र.

तर्खडकर, द्वारकानाथ राघोबा—(जन्म स. १८४६-मृत्यु स. १९०४) मराठी व इंग्रजी भाषान्तर पाठमालांचे कर्ते.

हे जातीनें वैश्य. जन्म मुंबईस व प्राथमिक शिक्षण पुण्यास झालें. कॉलेज शिक्षणानंतर यांची सरकारकडून लॅटिन शिक्षक म्हणून नेमणूक झाली. पुष्कळ ठिकाणीं हेडमास्तर म्हणून काम केल्यावर स. १८९९ मध्यें हे सेवानिवृत्त झाले. नाशिक येथें यांनीं गंगाबाई देवालय बांधलें. यांच्या भाषान्तरपाठमाला विशेष प्रसिद्ध आहेत.

तळेकर, श्रीकृष्णशास्त्री रघुनाथशास्त्री—(जन्म स. १८२६-मृत्यु स. १८८०) मराठीतील कोशकार व व्याकरणकार.

यांनीं पुण्याच्या संस्कृत पाठशाळेंत अलंकारशास्त्राचा अभ्यास करून 'दक्षिणा' मिळविली. पुढें इंग्रजीचा अभ्यास करीत असतां यांचे वडील वारले. त्यामुळें घरप्रपंचासाठीं यांना कारकुनी करावी लागली. ह्या वेळीं मोल्सवर्थ साहेबास मराठी-इंग्रजी कोश तयार करण्याच्या कामीं यांनीं चांगली मदत केली. पुढें कित्येक दिवस हे इंग्लिश लोकांना मराठी शिकवीत असत. नंतर बेळगांव हायस्कूलमध्यें संस्कृताध्यापकाचे जागीं यांची नेमणूक झाली. ह्याच वेळीं यांनीं संस्कृत भाषेचें व्याकरण मराठींत लिहिलें व त्याबद्दल यांना ५०० रु. बक्षीस मिळालें. बेळगांवहून यांची बदली कँडीसाहेबांच्या हाताखालीं ट्रान्सलेशन एक्झिबिशनरच्या जागीं झाली. ह्या जागेवर असतां मराठी क्रमिक पुस्तकें तयार करण्यांत यांनीं बरीच मदत केली. पुढें नागपुर प्रांतांत हे डे. एज्युकॅशनल इन्स्पेक्टर झाले. ह्याच जागेवर अहमदनगर येथेंहि ह्यांनीं सुमारें ४॥। वर्षें काम केलें. कँडीसाहेबानंतर १८७७ सालीं हे मराठी ट्रान्सलेटर झाले.

यांचे ग्रंथ—१ इंग्लिश-मराठी कोश १८६१, २ संस्कृत भाषेचें व्याकरण १८६६.

ताम्हणे, रावबहादूर-विनायक आत्माराम—(जन्म स. १८८४) सुप्रसिद्ध रसायनशास्त्रीय कृषितज्ज्ञ.

हे १९०५ सालीं एल्. एजी. ही परीक्षा उत्तीर्ण झाले व स. १९०६ सालीं शेतकी खात्यांत पूना ॲग्रिकल्चरल कॉलेजमध्यें रसायन खात्यांत दाखल झाले.

पुढें यांना मंगळदास नथुभाई स्कॉलरशिप मिळून हे इंग्लंडला गेले व रोथमस्टेड एक्सपेरिमेंटल स्टेशन येथें सर एडवर्ड रसेल व डॉ. कीन यांच्या मार्गदर्शनाखालीं यांनीं रसायनशास्त्राचा अभ्यास केला. १९२० सालीं हे हिंदुस्थानांत परत आले व यांना सॉइल फिजिसिस्ट टू गव्हर्नमेंट ऑफ बॉंबे नेमण्यांत आलें. १९२१ सालीं यांना दुर्जलकृषाविषयीं संशोधन करण्याच्या कामावर नेमण्यांत आलें. पुढें लगेच सिंधमध्यें सक्कर बराज धरणाखालीं भिजणाऱ्या जमिनींच्या व तींत होऊं शकणाऱ्या पिकांच्या अभ्यासाची योजना पार पाडण्याकरितां यांना सिंधमध्यें ॲग्रिकल्चरल केमिस्ट आणि सॉइल फिजिसिस्ट नेमण्यांत आलें आणि सक्कर येथील प्रयोगक्षेत्राचे हे मुख्य बनले. तेथें यांनीं केलेलें काम फार महत्त्वाचें असून त्यावर तदनन्तर सिंधमध्यें होत असलेल्या शास्त्रीय शोधाची इमारत उभारलेली आहे. सिंधमध्यें शेवटीं यांना चीफ ॲग्रिकल्चरल ऑफिसर नेमण्यांत आलें व मुंबई इलाख्यापासून सिंध वेगळा होईपर्यंत हे त्या हुद्यावर होते. १९३६ सालीं यांनीं केलेल्या कामाच्या गौरवार्थ यांना रा. ब. ही पदवी देण्यांत आली. सिंधहून परत आल्यानंतर यांना कांहीं काळ पुणें शेतकी कॉलेजचे प्रिन्सि.

पलचे जागेवर काम करण्याची संधि मिळाली. आणि अखेर मुंबईप्रान्त मध्यविभागाचे डे. डायरेक्टर या जागेवरून १९४० सालीं हे सेवानिवृत्त झाले.

वास्तविक पाहतां यांच्या उच्च बुद्धिमत्तेचा आणि संघटना-क्षमतेचा जितका फायदा मुंबई शेतकी खात्याला मिळावा तितका मिळाला नाहीं. याचें कारण सरकारी नोकरीचे विशेष प्रकारचे नियम होत.

सरकारी सेवेंतून निवृत्त झाल्यानंतर ह्यांना अजमीर येथें सरकारी ॲग्रिकल्चर खातें स्थापन करण्याकरतां गव्हर्मेंट ऑफ इंडियानें नेमलें. प्लॅन्ट इंडस्ट्री इन्स्टिटयूट इंदोर या संस्थेचे डायरेक्टर या नात्यानें यांनीं काम केलें. यांनीं संशोधनात्मक अनेक निबंध लिहिले आहेत. दक्षिणेंतील खाऱ्या जमिनी, सिंधमधील भिजत्या जमिनी व दुर्जलकृषि यांसंबंधीं यांचे निबंध महत्त्वाचे आहेत.

तांबे, बाळकृष्ण विष्णु ऊर्फ काका—(जन्म स.१८९३ एप्रिल १२) बी. तांबे लि., मुंबई, या कंपनीचे चालक, कल्पक व सार्वजनिक कार्यकर्ते.

बी. एससी. पर्यंत शिक्षण झाल्यावर तळेगांवच्या नवीन समर्थ विद्यालयांत शिक्षक म्हणून काम केलें. नंतर साखरपें व रत्नागिरी येथें राष्ट्रीय शाळा चालविली. नंतर अंधेरीस साधकाश्रमांत काम केल्यावर, मुंबईस तांबे आरोग्य भुवन नांवाचें उपाहारगृह चालविलें. चहापानाला आळा घालावा या हेतूनें यांनीं मुख्यतः ताक, तसेंच पन्हें, सरबत वगैरे घरगुती पदार्थ उपाहारगृहांत देण्याची व्यवस्था करून त्यांना सार्वजनिक केलें. पाकशास्त्राचें विद्यालय काढण्याचा यांचा प्रयत्न आहे.

तांबे, भास्कर रामचंद्र—(जन्म स. १८७४–मृत्यु स. १९४१) उत्तर हिंदुस्थानांतील देशी राज्यांत दिवाण वगैरे जबाबदारीचीं कामें केलेले गृहस्थ व मराठी भाषेंतील सुप्रसिद्ध रसाळ कवि.

अलाहाबाद विश्वविद्यालयाची प्रवेशपरीक्षा दिल्यानंतर (१८९३) यांनीं इंदूरच्या होळकर कॉलेजांत कांहीं काळ शिक्षण घेतलें. तीन-चार महिने देवास, व्हिक्टोरिया हायस्कूलमध्यें यांनीं नोकरी केली. नंतर हे देवासच्या महाराजांचे शिक्षक होते (१८९३-१९०३). पुढें यांना इंदूर येथील देवास दरबारचे रेसिडेन्सी वकील नेमण्यांत आलें (१९०३-१९०८). नंतर हे गुदरखडा इस्टेटीचे सुपरिंटेंडेंट बनले (१९०८-११). यानंतर पिपलोदा संस्थानचे दिवाण (१९११-१४), राजपुतान्यांतील प्रतापगड संस्थानचे पोलिस सुपरिंटेंडेंट व नंतर सदर कोर्ट जज्ज (१९१४-१९२०), मेयो कॉलेज अजमीर येथें ग्वाल्हेर संस्थानच्या सरदारांचे ट्यूटर व गार्डियन (१९२१-२३), शोपूर-बडोद (ग्वाल्हेर रिसायत) संस्थानचे सुपरिंटेंडेंट (१९२३-२५), नंतर रजिस्ट्रार एक्झॅमिनेशन्स वगैरे निरनिराळ्या ठिकाणीं जबाबदारीचीं कामें यांनीं यशस्वी रीतीनें पार पाडलीं.

पण यापेक्षां यांची वाङ्मयात्मक कामगिरी अधिक महत्त्वाची आणि यांचें नांव दीर्घकाल टिकविणारी आहे. 'तांबे यांची कविता' भाग पहिला प्रो. मायदेव यांनीं १९२०, १९४४ सालीं व भाग २ रा दि. गं. केळकर यांनीं १९२७ सालीं प्रसिद्ध केला.

वरील दोन भागांत प्रसिद्ध झालेली यांची समग्र कविता व 'तांबे, व्यक्ति आणि कला' या दोन ग्रंथांतून तांबे संपूर्णतया आपणांपुढें आहेत. यांचीं साहित्यविषयक व काव्यकलेबद्दल सर्व तत्त्वें यांनीं स्पष्टपणें १९२५ सालीं मालव कवि-संमेलनांत व कोल्हापूर महाराष्ट्र साहित्य-संमेलनांत मांडलीं. यांनीं काव्य केलें व त्यावर टीकारूप व्याख्यानें दिलीं. अशा तऱ्हेनें यांचें गद्य व पद्य एकमेकांना पूरक आहे.

'कविता ही परमोत्कर्षास गेलेल्या भावनांचा उद्गार होय; केवळ संसारांतील चित्रें काढणें किंवा सृष्टीचा फोटोग्राफ उतरणें हें कांहीं खरें काव्य नव्हे. भावनांचा धुमाकूळ आणि खळबळ कवितेंत असल्यास हीं बाह्य वस्तूंचीं चित्रेंहि मोहक होतील; पण तीं चिरस्थायी व्हावयास त्यांत उच्च व उदात्त भावना असाव्या लागतात' (गद्यलेख, खंड २, पान ३०), ही यांची कवितेविषयींची कल्पना लक्षांत घेण्यासारखी आहे.

यांची कविता यांच्या जीवनाशीं संलग्न आहे. शरीर आणि मन यांची ती ती अवस्था यांच्या कवितेंत प्रतिबिंबित झाली. यांच्या कवितेचे शिशुगीतें, प्रणयगीतें, महाप्रस्थानगीतें व नाट्यगीतें असे चार भाग पडतात. तथापि यांनीं प्रेमगीतें पुष्कळ काळ लिहिलीं आणि त्यामुळेंच हे विशेष लोकप्रिय आहेत.

'डोळे हे जुलमी गडे रोखुनि मज पाहुं नका ॥ खळबळ किती होय मनीं । हंसतील मज सर्वजणां ॥ येतील त्या संधि बघुनि आग उगा लावुं नका' या स्वरूपाच्या प्रणयगीतांनीं यांची कविता घरोघर पोंचली.

हे सौंदर्यप्रधान दृष्टीचें गूढगुंजन करणारे पण उघड आस्तिक आहेत.

तांबे, श्रीपाद बळवंत— (जन्म स. १८७५) नागपूरचे सुप्रसिद्ध वकील, कॉंग्रेसचे कार्यकर्ते व मध्यप्रान्ताचे माजी हंगामी गव्हर्नर.

यांचें शिक्षण जबलपूर, अमरावती, मुंबई या ठिकाणीं झालें. प्रथम अमरावती येथें हे वकिली करीत. तेथें हे म्युनिसिपालिटीचे उपाध्यक्ष व प्रान्तिक काँग्रेस कमेटाचे अध्यक्ष होते. मध्यप्रान्त कायदेमंडळाचे सभासद (१९१७-२०, १९२४) व त्या मंडळाचे अध्यक्षहि होते (१९२५). १९२९ सालीं यांना मध्यप्रान्ताचे हंगामी गव्हर्नर नेमण्यांत आलें. पुढें हे गोलमेज परिषदेचे सभासद म्हणून विलायतेस गेले होते.

तिवारी, दुर्गाप्रसाद आसाराम—(जन्म स. १८८७-मृत्यु स. १९३९) मराठी भाषेंतील सुप्रसिद्ध कवि.

हे जातीनें कान्यकुब्ज ब्राह्मण. यांचे आजे उत्तर हिंदुस्थानांतून इकडे आले. हे जळगांवास राहत. यांनीं इंग्लिश, गुजराथी, हिन्दी व मराठी भाषेचा अभ्यास केला. यांचीं 'मराठ्यांचीं संग्रामगीतें' अत्यंत लोकप्रिय असून शालेय पुस्तकांत व घरोघर पोंचलीं आहेत.

यांनीं लहानमोठीं अठरा पुस्तकें प्रसिद्ध केलीं. त्यांपैकीं प्रमुख—१ संग्रामगीतें (भाग १-२), २ मथुरा काव्य, ३ काव्यकुसुमाञ्जलि, ४ काव्यरत्नमाला इत्यादि.

तेरसी, लक्ष्मीदास रावजी—(जन्म स.१८७५-मृत्यु स. १९३९ ऑगस्ट ३१) अनेक चळवळींत धडाडीनें भाग घेणारे मुंबईचे सुप्रसिद्ध व्यापारी.

यांचा जन्म मुंबईस भाटिया जातींत झाला. तेथेंच सेंट झेवियर कॉलेजमधून हे बी. ए. झाले. एम्. ए.चा अभ्यास प्रकृतीकरितां सोडावा लागला आणि यांनीं व्यापारांत लक्ष घातलें. 'हिज मास्टर्स व्हॉइस'च्या रेकार्ड्सची सोल एजन्सी यांनीं घेतली होती.

बंगाल फाळणीनंतर स्वदेशी, होमरूल, कामगार वगैरे चळवळींत हे प्रामुख्यानें भाग घेत. कांहीं संपांत यांनीं पुढाकार घेऊन ते यशस्वी केले. मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशनचे सभासद, हिन्दु पोर्ट स्टटचे पंच, पी. जे. हिन्दु जिमखान्याचे, इन्डियन मर्चेन्ट्स चेम्बरचे अध्यक्ष, मुंबई विधिमंडळाचे सभासद वगैरे अनेक नात्यांनीं यांनीं जबाबदारीचीं कामें केलीं.

समाजोद्धाराच्या विविध अंगांशीं यांचा निकटचा संबंध येऊं लागला. तेव्हां यांच्यांतील स्पष्टवक्तेपणा व प्रतिस्पर्ध्यास भडकावयास लावण्याचा स्वभाव व्यक्त होऊं लागला आणि यांना अनेक शत्रु निर्माण झाले. धर्मभोळा भाटिया समाज व काँग्रेस यांमधील खटके या स्वरूपाचे होत. आपल्या कांहीं मित्रांच्या साहाय्यानें नवीन भाटिया समाज सुरू करून त्या समाजांतील कांहीं अप्रिय गोष्टी यांनीं चव्हाट्यावर आणल्या. मृत्यूपूर्वी १० वर्षे हे काँग्रेसचे एक कट्टर टीकाकार बनले होते. हे बहुजन समाजाच्या हिताच्या दृष्टीनें महत्त्वाचे वाटणाऱ्या कोणत्याहि कामांत हिरीरीनें पडत आणि शेवट कसाहि झाला तरी माघार घेत नसत. या यांच्या जबरदस्त लढाऊ वृत्तीनें यांचे मित्र शत्रु बनल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत.

तेलंग, काशीनाथ त्र्यंबक—(जन्म स.१८५०-मृत्यु स. १८९३) हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध कायदेपंडित, मुंबई हायकोर्टातील न्यायमूर्ति, प्राच्यविद्यापंडित व काँग्रेसचे संस्थापक.

एकोणिसाव्या शतकाच्या सुमारास जीं बारा सारस्वत ब्राह्मणांचीं घराणीं गोव्यांतून मुंबईस आलीं, त्यांत यांचें घराणें प्रमुख होतें. शाळा व कॉलेजमध्यें अत्यंत हुषार विद्यार्थी म्हणून यांची प्रसिद्धि होती. हे एम्.ए., एल्एल्. बी. झाले व यांनीं वकीली करण्यास सुरुवात केली. संस्कृत भाषेवरील प्रभुत्व व अस्खलित वक्तृत्व यांमुळें यशस्वी कायदेपंडित म्हणून यांची लवकर सर्वत्र ख्याति झाली. पुढें यांना हायकोर्ट जज्जाची जागा मिळाली आणि हिंदु कायद्यांत सुधारणा करण्याच्या यांच्या प्रयत्नांमुळें तर हे लोकांच्या विशेष लक्षांत आले.

मात्र सुरुवातीपासूनच यांचा स्वाभाविक कल वाङ्मय आणि संशोधन या विषयांकडे असे. वकीली करीत असतां यांचा लेखनव्यवसाय तर चालू होताच पण न्यायमूर्तीची जागा स्वीकारण्यांतहि लेखनादिकाला अधिक शांतता मिळावी अशी यांची योजना होती. यांनीं वाङ्मय, समाज, संशोधन व राजकारण या सर्व क्षेत्रांत महत्त्वाची कामगिरी केली.

हे इंडियन नॅशनल काँग्रेसच्या संस्थापकांपैकीं एक असून कांहीं दिवस हे तिचे सेक्रेटरीहि होते (१८८५-८९). तिच्या अन्तर्गत योजनेंत यांचा महत्त्वाचा हात असे. पहिल्या अधिवेशनापासून यांनीं महत्त्वाच्या ठरावांवर भाषणें केलीं. सर ऑकल कॉल्विन व लॉर्ड डफरिन यांनीं काँग्रेसवर केलेल्या टीकेस यांनीं झणझणीत उत्तरें दिलीं.

'शास्त्र व रूढि यांच्या बलाबलांविषयीं विचार' (१८८६) व 'सामाजिक विषयांसंबंधीं तडजोड' हे यांचे मराठींतील दोन निबंध यांच्या प्रगमनशील विचाराचे द्योतक आहेत. 'कालमानानुसार धर्मांत बदल

करण्याची योजना आपल्या इतिहासानें आपणांस शिकविली आहे. तिला आपण सोडल्यास आपल्या धर्मांतील जिवंतपणा नाहींसा होईल' असे विचार यांनीं पहिल्या निबंधांत मांडले असून दुसऱ्या निबंधांत विचारस्वातंत्र्याचें महत्त्व यांनीं दाखविलें आहे.

अशा धडाडीनें यांनीं राजेन्द्रलाल मित्र यांच्या इंडियन अँन्टीक्वेरींतील लेखाला उत्तर दिलें. पूर्वीच्या काळीं हिंदुस्थानांतील लोक गोमांस भक्षण करीत असले तरी तें पुढें येथील लोकांनीं विचारपूर्वक सोडलें आहे, म्हणून त्याचा आतां विचार करण्याची आवश्यकता नाहीं, असा मुद्दा यांनीं मित्रांचे विरुद्ध मांडला आहे.

पण यापेक्षांहि डॉ. वेबरच्या रामायणविषयक लेखाच्या रे. बॉइड यांनीं केलेल्या अनुवादाला यांनीं दिलेलें उत्तर विशेष गाजलें. हिंदुस्थानांतील प्राचीन समजल्या जाणाऱ्या ग्रंथांचा काल ख्रि. पू. तीनचार शतकांच्या मागें जात नाहीं व होमरच्या इलियडची दाट छाया रामायणावर पडली, असे वेबरचे दोन प्रमुख मुद्दे होते.

या लेखाला यांनीं Was Ramayan Copied from Homaer या शीर्षकाखालीं उत्तर दिलें. यांनीं त्या दोन ग्रंथांतील फरक व्यक्त करून वेबरनें ठरविलेल्या रामायणकालाचें खंडन करण्यासाठीं वेबरनें दिलेल्या आधारांचा फोलपणा स्पष्ट केला. आणि रामायणाचा काळ ख्रि. पू. अनेक शतकें असल्याचा सिद्धान्त लोकांपुढें मांडला. पुढील संशोधकांनीहि यांच्या या सिद्धान्ताला दुजोराच दिला आहे.

भगवद्गीता ही बायबलवरून केली आहे या लेरिंगेरच्या विधानालाहि यांनीं मुद्देसूद उत्तर दिलें. भगवद्गीता हा स्वतंत्र ग्रंथ असून तो बायबलवरून केलेला नाहीं हें यांनीं साधार सिद्ध करून दाखविलें.

शंकराचार्य हे पश्चिम मगधचा राजा पूर्णवर्मा राज्य करीत असतां उदयास आले हा यांचा स्वतःचा असा महत्त्वाचा सिद्धान्त यांनीं सिद्ध करून दाखविला. स. ५९० हा त्यांचा काळ यांनीं ठरविला.

हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या गोष्टींसंबंधीं प्रतिपादन करतांना पाश्चात्यांकडून अनेक ठिकाणीं कळत न कळत अपसिद्धान्त प्रतिपादले जात. त्याला त्यांच्याच भाषेंत, त्यांच्याच पद्धतीनें आणि त्यांच्याइतका सखोल अभ्यास करून सडेतोडपणें उत्तर देणाऱ्या यांच्यासारख्या पंडितांची त्या वेळीं फार जरूर होती. यांनीं तें कार्य उत्कृष्टपणें पार पाडल्यानें जगभर अभ्यासकांत यांची ख्याति झाली.

यांचे ग्रंथ—संपादित–१ भर्तृहरीचें नीति व वैराग्यशतक, २ मुद्राराक्षस.

भाषान्तरित—इंग्रजी–१ भगवद्गीता-पद्यमय अनुवाद (डॉ. लेरिंगेरला दिलेल्या उत्तरासह), २ भगवद्गीता-गद्यमय-अनुवाद, ३ जर्नल ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी व इंडियन अँटिक्वेरी या नियतकालिकांत लिहिलेले निबंध.

मराठी—१ शहाणा नाथन (Nathan the Wise चें भाषान्तर), २ स्थानिक स्वराज्य व्यवस्था (भाषान्तर इंग्रजीवरून मराठी १८८६), ३ शास्त्र व रूढि यांच्या बलाबलाचा विचार (व्याख्यान १८८६), ४ सामाजिक विषयांसंबंधीं तडजोड.

यांचे पुत्र पंढरीनाथ हे इतिहासाचे अभ्यासक व बझंटबाईंचे निःसीम चाहते होते.

तेलंग, महामहोपाध्याय गंगाधरशास्त्री—(मृत्यु स. १९१३) काशींतील विख्यात पंडित व संस्कृत कवि.

हे बालसरस्वती बाळशास्त्री रानडे या काशीमधील विख्यात पंडितांचे शिष्य. हे साहित्यशास्त्रांत विशेष निष्णात होते. यांची शिष्यपरंपरा फार मोठी आहे. यांना महामहोपाध्याय, सी. आय. ई. अशा पदव्या देऊन सरकारनें यांचा गौरव केला.

यांचे ग्रंथ—१ अलिविलाससंलापम्, २ शाश्वत धर्मदीपिका (मनु व महाभारत यांतील वेंचे).

त्रिपाठी, विजयानन्द महादेवदत्त—(जन्म स. १८५६–मृत्यु स. १९२६) हिन्दी भाषेंतील प्रसिद्ध लेखक व कवि.

जन्मस्थान बेलौटी (जि. आरा). घरीं व काशीच्या क्वीन्स कॉलेजांत संस्कृतचें ज्ञान संपादन केल्यावर बडहरच्या महाराणाच्या काशी येथील दरबारांत दानाध्यक्षाच्या जागीं यांची नेमणूक झाली (१८७९). नंतर यांनीं बाबू रामकृष्ण वर्मा यांना 'भारतजीवन' हें साप्ताहिक हिन्दी पत्र व हिन्दी काव्यें प्रकाशित करण्यास प्रवृत्त केलें. हे अनेक नियतकालिकांत सतत लिहीत. पुढें हे बांकीपूरच्या कॉलेजांत प्राध्यापक व

स्कूलचे हेडमास्तर म्हणूनहि काम करीत. यांचें लेखन व वक्तृत्व परिणामकारक असे. यांचें कवितेंतील उपनांव 'श्रीकवि.'

यांचें वाङ्मयः—१ महामोहविद्रावण (संस्कृतचें हिन्दी), २ सच्चा सपना (बंगालीचें हिन्दी), ३ महा-अन्धेर नगरी (प्रहसन), ४ अन्योक्ति-मुक्तावलि (काव्य-संग्रह), ५ रणधीर प्रेममोहिनी (लाला श्रीनिवास-दासांच्या नाटकाचें संस्कृत भाषान्तर), ६ भारतीय इतिहास पंजिका (स्वतंत्र पुस्तक), शिवाय अनेक संस्कृत नाटकें व काव्यें यांचीं भाषान्तरें.

त्रिपाठी, सूर्यकान्त रामसहाय 'निराला'— (जन्म स. १८९९) हिन्दी भाषेंतील एका नव्या युगाचे प्रवर्तक कवि व लेखक.

यांचा जन्म महिषादल (मेदिनीपूर-बंगाल) राज्यांत झाला. यांचे वडील संयुक्तप्रान्तांतील उन्नाव जिल्ह्यांतील गढाकोला गांवाहून तिकडे नोकरीच्या निमित्तानें गेले. बंगालमध्यें राजाश्रयानें व राजाच्या सहवासांत यांचें शिक्षण झाल्यानें यांच्यांत प्रथमपासून स्वतंत्र वृत्ति उत्पन्न झाली. प्रथम हे बंगालींत कविता करीत. पण पुढें यांना हिन्दीची आवड उत्पन्न होऊन हे खडी बोलींत कविता करूं लागले.

कल्पनाप्रधान रहस्यवादी कवींत यांचें स्थान श्रेष्ठ आहे. यांनीं कांहीं छंद स्वतः निर्माण केले आहेत. यांना हिन्दींतील मुक्तक काव्याचे जनक मानण्यांत येतें. बंगालींतील मुक्तक कवितेप्रमाणें यांच्या मुक्तक काव्यांत ताल व लय यांकडे लक्ष दिलेलें असतें.

यांच्या मुक्तक काव्यांत ज्या एका विशेष आनंदाचा अनुभव येतो तसा दुसऱ्या हिन्दी कवींच्या काव्यांत क्वचितच येतो. यांनीं अनेक लहानमोठीं सरस काव्यें लिहिलीं आहेत. सांगोपांग रूपक व निसर्गाचें यथार्थ चित्रण हे यांच्या काव्यांतील आणखी विशेष होत. तसेंच भावमय उच्च कल्पना हाहि यांचा विशेष मान-ण्यांत येतो. सरस रहस्यवाद, मधुर प्रेम, ओजस्वी देशभक्ति व अदम्य उत्साह या गुणांनीं यांचें काव्य नटलेलें असतें.

यांचें गद्य लिखाणहि बरेंच असून तेंहि यांच्या स्वतंत्र वृत्तीचें द्योतक आहे. आचार, विचार, मांडणी वगैरे सर्वच बाबतींत हे अगदीं क्रान्तिकारक व स्वतंत्र वृत्तीचे असल्यानें यांनीं आपणास घेतलेलें 'निराला' हें टोपण नांव सार्थ आहे.

यांचें प्रसिद्ध वाङ्मयः—१ अनामिका (निर्यमक, मुक्तक काव्य), २ परिमल (कविता-संग्रह), ३ गीतिका (गीतसंग्रह), ४ तुलसीदास (काव्य), ५ बादल-राग.

त्रिलोकेकर, सोकर बापूजी— (जन्म स. १८३६–मृत्यु १९०८ ऑक्टो. ३०) मराठींतील पहिले संगीत नाटककार.

मुंबई येथें यांचा जन्म झाला. तत्कालीन परिस्थिति-नुरूप थोडेसें मराठी शिक्षण झाल्यावर हे एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्यें इंग्रजी शिकूं लागले. तेथील परीक्षेंत उत्तम तऱ्हेनें पास होऊन हे तेथील नार्मल स्कॉलर झाले. त्यामुळें अर्थातच यांना थोडा पगार मिळून शिक्षकाचें काम शिकण्यास मिळूं लागलें. या अभ्या-सांतहि यांनीं आपली चांगली प्रगति दाखविली. तदनंतर 'प्रभु सेमिनरी' व 'एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट' ह्या शाळांतून यांनीं शिक्षकाचें काम केलें. स. १८५७ पासून १८६४ पर्यंत हे एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्यें होते. परंतु पुढें यांना हायकोर्टांत ट्रान्सलेटरचा जागा मिळाली. यांना मराठी, इंग्रजी, गुजराथी वगैरे भाषा चांगल्या यत. ही नोकरी १८९७ पर्यंत करून हे सेवानिवृत्त झाले.

यांना गाण्याची विशेष आवड असल्यामुळें गायन-शास्त्राचा शास्त्रोक्त अभ्यास करून यांनीं संगीत नाटकें तयार करण्यास सुरुवात केली.

मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं स. १८७१ त संस्कृत गद्यपद्यात्मक "शाकुंतल" नाटकाचा जो संगीत प्रयोग करून दाखविला तो पाहून मराठींतहि ही प्रथा सुरू करण्याचें यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें यांनीं स. १८७९ त प्रसिद्ध केलेल्या 'नलदमयन्ती' या नाटकाचे प्रयोग उत्कृष्ट वठले. यावरून मराठींच्या आद्य संगीत नाटकाचार्यांचा मान यांना द्यावा लागेल. नलदमयन्ती या नाटकाशिवाय 'हरिश्चन्द्र' (स. १८८०) व 'सावित्री' (स. १८९२) इत्यादि गद्यपद्यात्मक नाटकें यांनीं लिहिलीं.

अण्णासाहेब किर्लोस्करांच्या पूर्वी यांनीं संगीत नाटक तयार केलें व पदें त्या त्या पात्राकडून म्हणविण्याची पद्धत सुरू केली. यांच्या नाटकांत आर्या, दिंड्या, श्लोक व क्वचित जुन्या चालींवर पदें आहेत. यांचीं नाटकें 'हिंदु सन्मार्ग बोधक मंडळी' नांवाची हौशी मंडळी करीत असे.

त्रिवेदी, प्रो. जे. पी.—(जन्म स. १८८६–मृत्यु स. १९४१) पाटबंधारा खात्यांतील सल्लागार व सार्वजनिक कार्यकर्ते.

हे गुर्जरप्रान्तीय गृहस्थ सुसंस्कृत कुळांत जन्मले. यांची विद्यार्थी-अवस्थेंतील प्रगति फार चांगली असे. हे एल्. सी. ई. होते. हे स. १८९९ सालीं पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटमध्यें दाखल झाले. गोदा व निरा यांच्या पाटबंधाऱ्यांवर यांनीं १९१९ पर्यंत नौकरी केली. परंतु यांना नुसत्या नौकरींत राहून पैसा मिळविण्यापेक्षां विद्येची अभिरुचि विशेष असल्यामुळें यांनीं १९१९ सालीं आपली बदली शेतकीखात्यांत करून घेतली व शेतकी कॉलेजांत हे कृषिस्थापत्य या शास्त्रांच्या प्राध्यापकाचें काम १९४० पर्यंत करीत होते. या अवधींत यांनीं बॉयस्काउट चळवळींत शिरून हे पुष्कळ वर्षेपर्यंत मध्यविभागाचे स्काउट कमिशनरहि होते. यांनीं शेतकी कॉलेजामध्यें रोहर स्काउट ट्रुप्सची एक शाखा काढली होती.

स. १९४० सालीं गुजराथेंत आनंद येथें 'इन्स्टिट्यूट ऑफ ॲनिमल हस्बंड्री अँड ॲग्रिकल्चर' या संस्थेचे यांना सेक्रेटरी नेमण्यांत आलें. गुजराथमध्यें ही संस्था तेथील शेतीविषयक संशोधनपूर्वक सुधारणा आणि विशेषतः तेथील दुधाळ जनावरांच्या सुधारणेसंबंधीं संशोधन करण्याच्या हेतूनें काढलेली आहे. अशा तऱ्हेची ही संस्था हिंदुस्थानांत पहिलीच व अद्याप अद्वितीयच आहे. या संस्थेपाशीं सुमारें एक हजार एकर जमीन आहे. आणि तेथील कार्याचा व्याप एखादें शेतकी कॉलेज येथें निघेल इतका सर्व दृष्टीनें व्यापक आहे. अशा प्रचंड संस्थेला नांवारूपास आणण्याकरितां यांनीं अत्यंत मेहनत केली. त्या कामाच्या बोजाचा यांच्या प्रकृतीवर ताण पडून यांना अकालीं मृत्यु आला.

त्रिवेदी, सर चंदूलाल माधवलाल—(जन्म स. १८९३) आय्. सी. एस्. अधिकारी व ओरिसाचे गव्हर्नर.

हे जातीनें गुजराथेंतील मोढ ब्राह्मण आहेत. मुंबई व ऑक्सफर्ड येथें शिक्षण घेऊन हे आय्. सी. एस. झाले (१९१७). मध्यप्रान्तांत असिस्टंट कमिशनर (१९२१ पर्यंत), व्हाइसरॉयच्या होम डिपार्टमेंटचे डे. सेक्रेटरी (१९३२–३५), वऱ्हाडचे कमिशनर (१९३६), मध्यप्रान्त व वऱ्हाडच्या गव्हर्नरचे सेक्रेटरी (१९३७), इत्यादि कामें केल्यावर ओरिसाचे हंगामी गव्हर्नर म्हणून यांची नेमणूक झाली (१९४५ ऑक्टो). यापूर्वी लॉर्ड सत्येन्द्रप्रसन्न सिंह, बिहार, ना. श्रीपाद बळवंत ताबे, मध्यप्रान्त, प. वा. सर सिकंदर हयातखान, पंजाब, राघवेन्द्र राव, मध्यप्रान्त, व सर महंमद ऊस्मान, मद्रास, या हिन्दी माणसांना गव्हर्नर नेमण्यांत आलें. यांपैकीं ताबे वगैरे हंगामी होते व सिंहांनीं राजीनामा दिला.

थ

थत्ते, मल्हार नारायणशास्त्री—(जन्म स. १८४०–मृत्यु स. १९१५) ज्योतिषी व संशोधक.

यांचें वेदाध्ययन व शास्त्राध्ययन ग्वाल्हेरीस झालें. पुढें हे काशीस गेल. तेथें प्रसिद्ध बापुशास्त्री यांजपाशीं गणिताचा व थोडा इंग्रजीचा अभ्यास केला. स. १८६३ मध्यें ग्वाल्हेरीस नोकरी धरली. श्रीमंत जयाजीराव शिंदे यांची भेट होऊन मिलिटरी ऑफिसांत ६० रु. पगारावर नेमणूक झाली. यांना चांदमारीच्या कामांत ५० रु. इनाम मिळालें. सरदार बाबासाहेब आपटे यांच्या मदतीनें घोडयावर बसण्यास शिकले. निशाणावर अचूक गोळी मारण्यसंबंधींचा 'गोलगतिप्रकाश' नांवाचा स्वकृत हस्तलिखित ग्रंथ यांनीं मिलिटरी खात्याकडे दिला. यांच्या 'करणग्रंथाची' हस्तलिखित प्रत बापुदेवशास्त्रींनीं पाहिली होती. ज्ञानप्रकाश (५–८–१८६७) व इंदुप्रकाश (३०–३–१८६८) या पत्रांत यांच्या 'ग्रहप्रकाश' व 'नवीन पंचांग' या ग्रंथांवर चर्चा झाली आहे. इंदुप्रकाश (४–९–१८७१) मध्यें पुण्याच्या विद्वत्परिषदेनें या ग्रंथाचा गौरव केल्याचा मजकूर आहे. यानंतर शिंदे सरकारकडून यांना रु. ५०० इनाम मिळालें. युद्धविषयक हालचाली निशाणांनीं सूचित

करण्यासंबंधींचा 'फ्लॅग सिग्नल' नांवाचा ग्रंथ यांनीं लिहिला व त्याप्रमाणें काम करणारी शिपायांची पलटण तयार केली. या कामगिरीबद्दल श्रीमंतांकडून एक हजार रुपये यांना बक्षीस मिळाले. १८७८ मध्यें देवास व इंदूर येथील महाराजांनीं बहुमानाचीं वस्त्रें देऊन यांचा गौरव केला. पुष्कर-यात्रेहून परत येत असतां जयपुरास मुक्काम केला, तेव्हां तेथील महाराजांनीं यांचा बहुमान केला. स. १८८० मध्यें यांची विद्वत्ता पाहून शिंदे सरकारकडून यांना सालीना नऊशें रुपये उत्पन्नाची जमीन मिळाली व ५०० रुपये रोख मिळाले. यांनीं आरशांतून सूर्यप्रकाशाचे कवडासे पाडून विशिष्ट संकेत व्यक्त करणारें 'हेलिओग्राफ' यंत्र तयार केलें. दिसणारे दूरचे पदार्थ नक्की किती अंतरावर आहेत हें दाखविणारें 'वंडरफुल रेंजफाईंडर' यंत्र यांनीं तयार केलें. यासंबंधींचें पुस्तक व हें यंत्र शिंदेसरकारनीं कमांडर-इन्-चीफ यांस दाखविलें व त्यामध्यें दुरुस्त्या करून स. १९१० मध्यें शिंदेसरकारमार्फत बादशहा पंचम जॉर्ज यांस तें नजर केलें. ता. ४-११-१८९७ च्या चंद्रग्रहणासंबंधींच्या नॉटिकल अल्मनाकमधील चुका यांच्या म्हणण्याप्रमाणें दुरुस्त करण्यांत आल्या. स. १९१२ सालच्या ग्वाल्हेरच्या दरबारांत यांना 'विद्यासागर' ही बहुमानाची पदवी मिळाली. यांचा शेवटचा अप्रकाशित ग्रंथ 'दृग्-ज्ञानानंद' होय. हे अत्यंत सात्त्विक, प्रेमळ व रामभक्त होते.

थापा, सुभेदार लालबहादुर—(जन्म स. १९२० सुमार) दुसऱ्या महायुद्धांत व्हिक्टोरिया क्रॉस मिळवणारे शूर गुरखा सैनिक.

पूर्व आफ्रिकेंत रोमेलविरुद्ध चाललेल्या लढ्यांत यांनीं दाखविलेल्या शौर्याबद्दल खुद्द बादशहा सहावे जॉर्ज यांच्या हस्तें यांना 'व्हिक्टोरिया क्रॉस' बहाल करण्यांत आला.

फतनासा टेंकडीवरील चढाईंत आपल्या इतर सहकाऱ्यांपासून एकाकी पडले असतां यांनीं आपल्या दोन सेक्शन्समधील शिपायांचे साहाय्यानें ती टेंकडी काबाज केली. त्या टेंकडीवरील संरक्षक चौकींतील शत्रुपक्षीय सैनिकांशीं यांनीं केवळ कुकरी व रिव्हाल्व्हर यांच्या साहाय्यानें सामना दिला. या लढ्यांतून स्वतः हे व यांचे दोन साहाय्यक हे तिघेजणच परत जिवंत येऊं शकले.

थिबो, जॉर्ज फ्रेडरिक वुइल्यम—(जन्म स. १८४८-मृत्यु स. ?) संस्कृत पंडित, संशोधक व अभ्यासक.

जर्मनींतील हैडलबर्ग हें यांचें जन्मस्थान. जर्मनींत शिक्षण संपवून हे इंग्लंडमध्यें आले (स. १८७१). तेथें बरींच वर्षें मॅक्स-मूलर यांचे सहकारी म्हणून यांनीं काम केलें. पुढें बनारसच्या संस्कृत कॉलेजचे प्रोफेसर म्हणून यांची नेमणूक झाली (स. १८७५). हे इंग्लिश व संस्कृत विषयाचे प्रोफेसर होते. नंतर त्या कॉलेजचे हे प्रिन्सिपलहि झाले (स. १८७९-८८). पुढें अलाहाबादच्या मूर सेन्ट्रल कॉलेजमध्यें प्रथम प्रोफेसर व नंतर प्रिन्सिपल म्हणून यांनीं काम केलें (स. १८८८-९५).

यांचे बहुतेक ग्रंथ हिंदी तत्त्वज्ञान, ज्योतिष व गणित या विषयांवर आहेत. यांचे महत्त्वाचे ग्रंथः—१ ऑन दि शुल्बसूत्राज (१८७५). २ दि शुल्बसूत्र ऑफ बौधायन With translation (१८७५). ३ अर्थसंग्रह, (भाषान्तरासह मीमांसाशास्त्रावरील ग्रंथ १८८२). ४ पञ्चसिद्धान्तिका (वराहमिहिरकृत ज्योतिःशास्त्रावरील ग्रंथ-पं. सुधाकर द्विवेदी यांच्या सत्कारार्थ प्रसिद्ध केलेला-इंग्रजी भाषान्तरासह स. १८८९). ५ वेदान्तसूत्रें (श्रीशंकराचार्यांच्या भाष्यासह इंग्रजींत भाषान्तर करून सेक्रेड बुक्स ऑफ दि ईस्ट या ग्रंथमालेच्या ३४ व ३८ या क्रमांकांत प्रसिद्ध झालेला ग्रंथ). ६ ज्योतिष, गणित आणि फलज्योति प्रकरणें (बुल्हेरकृत एन्सायक्लोपाडिया ऑफ इंडियन रिसर्च या ग्रंथांत प्रसिद्ध झालेलीं प्रकरणें १८९९). ७ वेदान्तसूत्रें (रामानुजाच्या भाष्याच्या इंग्रजी भाषान्तरासहित १९०४, सेक्रेड बुक्स् ऑफ दि ईस्टचें ४८ वें पुष्प). आर. ग्रिफिथ यांच्या साहाय्यानें यांनीं बनारस संस्कृत सीरीज ही ग्रंथमाला चालविली होती. तींत शंभरावर पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत.

द

दत्त, कन्हयालाल—(फांशी स. १९०९ नवं.) बंगाली क्रान्तिकारक.

हे माणिकतोळा बाग बाँबच्या म्हणजे अलीपूर कटांत पकडले जाऊन तुरुंगांत असतां यांनीं जेलच्या इस्पितळांत असलेला माफीचा साक्षीदार नरेन्द्र गोस्वामी याचा खून केला. त्याकरितां यांना फांशीची शिक्षा झाली.

दत्त, कल्पना—(जन्म स. १९१४) क्रान्तिकारक व समाजसत्तावादी कार्यकर्त्या.

पूर्व बंगाल्यांतील चट्टगांवजवळील श्रीपुर हें यांचें मूळ गांव. या मॅट्रिक झाल्यावर कलकत्त्याच्या सायन्स कॉलेजमध्यें गेल्या; पण हरताळ वगैरेंत भाग घेतल्यानें यांना परत यावें लागलें. चट्टगांव शस्त्रागारावरील हल्ल्याचा खटला तुरुंगांत चालू असतां इंडियन रिपब्लिक आर्मीचा अध्यक्ष सूर्यसेन यांनीं यांच्या साहाय्यानें डायनामाइटनें तुरुंग फोडण्याचें ठरविलें. पण पोलिसांना पत्ता लागून या पकडल्या गेल्या. पण जामीनावर सुटल्या. पुनः एकाला पुरुष वेषानें भेटण्यास जात असतां पकडल्या गेल्या; नंतर पुराव्याच्या अभावीं सुटल्या. पण घरावर असणाऱ्या पाहऱ्यांतून या कांहीं महत्त्वाच्या कामाकरितां बाहेर पडल्या, पण पाठलागांत गोळ्या संपल्यानें यांना पोलीसाच्या स्वाधीन व्हावें लागलें. तेव्हां यांना जन्मठेपेची शिक्षा झाली (१९३३ ऑगस्ट). पण म. गांधींच्या मध्यस्थीनें क्रान्तिवादावर विश्वास नाहीं असें सांगितल्यानें यांची सुटका झाली (१९३९). पुढें या कम्युनिस्ट झाल्या आणि यांचा विवाह पूरणचंद जोशी यांच्याशीं झाला.

दत्त, तोरु—(जन्म स. १८५६–मृत्यु स. १८७७) इंग्रजी भाषेंतील लिहिणाऱ्या बंगाली कवयित्री.

ज्या काळीं इंग्रजी भाषेंत लिहिण्यास मोठमोठे लोकहि चांचरत त्या काळीं यांनीं आपलें काव्य वाङ्मय प्रसिद्ध केलें. यांचे वडील गोविंदचंद्र. त्यांच्याबरोबर यांनींहि बरींच वर्षे इंग्लंड व फ्रान्समध्यें घालविल्यानें इंग्रजी व फ्रेंच या दोन्ही भाषांवरील असाधारण प्रभुत्वाचा लाभ यांना लहानपणींच झाला.

हिंदुस्थानांत परत आल्याबरोबर यांनीं आपला A Sheaf Gleaned in French Fields हा काव्यग्रंथ प्रसिद्ध केला. फ्रेंच भाषेंतील कवितांचा अनुवाद इंग्रजी भाषेंत एकवीस वर्षांची एक हिंदी मुलगी करते, याबद्दल यांचें सर्वत्र कौतुक सुरू झालें.

याच वेळीं यांनीं सीता, सावित्रीसारख्या पौराणिक स्त्रियांचीं पद्यमय चरित्रें लिहिण्यास सुरुवात केली. परंतु यांच्या अकालीं निधनामुळें अपूर्ण राहिलेला तो ग्रंथ त्या स्वरूपांतच यांच्या वडिलांनीं यांच्या मृत्यूनंतर पांच वर्षांनीं Ancient Ballads and Legends of Hindustan या नांवानें प्रसिद्ध केला.

दत्त, मायकेल मधुसूदन—(जन्म स. १८२७–मृत्यु स. १८७३) बंगाली भाषेंतील श्रेष्ठ कवि.

यांच्या पित्याचें नांव राजनारायण दत्त. हे मूळचे यशोहर जिल्ह्यांतील राहणारे. कलकत्त्यांत हिंदु-कॉलेजमध्यें शिकत असतांच इंग्रजीशिवाय ग्राक व लॅटिन या भाषांचाहि यांनीं अभ्यास केला. स. १८४३ मध्यें हिंदुधर्म सोडून ख्रिश्चन धर्म यांनीं स्वीकारला.

पुढें हे मद्रासला गेले आणि तेथें वर्तमानपत्रांत लिहूं लागले (स. १८४८). यांनीं 'संयोगिता' कथेवर इंग्रजी काव्य लिहिलें त्यामुळें यांची अति प्रसिद्धि झाली. याच वेळीं मद्रास कॉलेजच्या प्रिंसिपलच्या मुलीशीं यांनीं लग्न केलें. परंतु तिला सोडून दुसऱ्या 'हेनरिए' नांवाच्या मुलीशीं यांनीं पुढें लग्न केलें. पुनः हे कलकत्त्यास आले आणि पोलीस कोर्टांत दुभाष्याचें काम करूं लागले. पुढें हे बॅरिस्टर होऊन आले. नंतर यांनीं रत्नावलीचें इंग्रजींत भाषान्तर केलें. येथून पुढें मात्र हे बंगालींत लिहूं लागले. यांचीं अनेक नाटकें व काव्यें प्रसिद्ध आहेत. बंगालीसाहित्यांतील अमर साहित्य सेवकांपैकीं हे एक आहेत. बंगाली भाषेंत वीररसात्मक काव्य करितां येतें हें यांनींच प्रथम सिद्ध केलें.

यांचें बंगाली वाङ्मय—नाटकें–(१) शर्मिष्ठा, (२) पद्मावती, (३) कृष्णाकुमारी, (४) अकी एके बले सभ्यता, (५) बुरा सरीकेर घरे रो.

काव्य–(१) मेघनादवध, (२) वीराङ्गना, (३) वज्राङ्गना, (४) चतुर्दशपदी, (५) तिलोत्तमा.

यांचें इंग्रजी वाङ्मय—काव्य-(1) The Captive Ladie (1849), (2) Visions of the Past, (3) Meghanad wadh.

नाटक–Is This Called Civilization ?

दत्त, रमेशचंद्र—(जन्म स. १८४८ ऑगस्ट-मृत्यु स. १९०९ नवं. ३०) बंगालमधील प्रारंभीचे आय्. सी. एस्. अधिकारी, थोर अभ्यासक, राष्ट्रसभेचे अध्यक्ष, बडोद्याचे दिवाण, हिंदुसंस्कृतीचे अभिमानी व ग्रंथकार.

जन्मस्थान कलकत्ता. यांच्या डेप्युटी कलेक्टर असणाऱ्या वडिलांचें नांव इसनचंद्र. ते बुडून वारले (१८६१). तेव्हां हे कलकत्ता येथें हायस्कूलमध्यें शिकत होते. तेव्हां यांचें पालनपोषण सुशीलचंद्र काकांनीं केलें. हे मॅट्रिक होऊन तीन वर्षे प्रेसिडेन्सी कॉलेजांत शिकले आणि आय्. सी. एस्. होण्याकरितां इंग्लंडला गेले (१८६८). १८५४ पासून या वेळेपर्यंत या परीक्षेंत फक्त एकच हिंदी विद्यार्थी पास झाला होता. यांचेबरोबर यांचे मित्र सुरेन्द्रनाथ बानर्जी व बिहारीलाल गुप्त हे होते. तेथें हे त्या परीक्षेंत तिसरे आले (१८६९). पुढें दोन वर्षे तिकडे हिंडून हे हिंदुस्थानांत आले (१८७१). लागलीच 'Three Years in England' हें इंग्रजी पुस्तक यांनीं प्रसिद्ध केलें.

प्रथम कांहीं दिवस अनुभव मिळावा म्हणून दुष्काळ व वादळांत झालेलें नुकसान यासंबंधीं काम करीत असतां ले. गव्हर्नरच्या जागेवरून निवृत्त होणाऱ्या सर ॲशले ईडन यांच्या कारकीर्दीचें चित्रण करणारा निर्भीड लेख स्टेट्समनमध्यें यांनीं लिहिला आणि शेतकरी-जीवन सुधारण्याकरितां उपाय सुचविणारें पुस्तकहि प्रसिद्ध केलें. त्याचेंच फळ बंगाल टेनन्सी ॲक्ट होय. यांच्यासारख्या निर्भीड व स्वतंत्र वृत्तीच्या अधिकाऱ्यांच्यामुळें गोऱ्या लोकांची चौकशी काळ्या लोकांपुढें होऊं नये असें प्रतिपादन करणारें 'इल्बर्ट बिल' पुढें आलें (१८८३). यांच्या टेनन्सी लेजिस्लेशन रिपोर्टाची सर्वत्र अत्यंत वाहवा झाली. मैमनसिंग, बरद्वान वगैरे जिल्ह्यांत मुख्य म्हणून यांनीं काम करीत असतां लॉर्ड रिपनच्या वेळीं लोकांना थोडी तरी स्वायत्तता देणारी ग्रामपंचायतीची सूचना यांनीं मांडून मान्य करून घेतली व ती पुढें सर्व प्रान्तांत सुरू झाली. ओरिसाचे कमिशनर व पोलिटिकल एजंट वगैरे महत्त्वाचीं कामें केल्यावर हे मुदत संपण्यापूर्वीच राजीनामा देऊन सेवानिवृत्त झाले (१८९७).

सनदी नोकरींतून सुटल्यावर जवळजवळ सात वर्षे लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजांत हे हिंदुस्थानच्या इतिहासाचे लेक्चरर होते. तेथें असतां रामायण व महाभारत या ग्रंथांतील निवडक भागाचा इंग्रजींत पद्यमय अनुवाद करण्याचें यांचें काम चालू होतें. शिवाय हिंदुस्थानची माहिती ब्रिटिश लोकांना करून देऊन त्यांची सहानुभूति मिळविण्याचें कार्यहि यांनीं केलें. शेतसारा, राजद्रोह, राज्यसुधारणा, नाणकव्यवहार वगैरे बाबतीतहि यांनीं कार्य केलें. अशा प्रकारच्या क्रळकळीच्या व मूलगामी कार्यामुळेंच यांना लखनौ येथें भरलेल्या राष्ट्रसभेचें अध्यक्षस्थान देण्यांत आलें (१८९९).

पुढें हे १९०४ सालीं हिंदुस्थानांत आले तेव्हां यांना बडोदा राज्यांत प्रथम शेतकीखात्याचे व नंतर मुख्य दिवाण नेमण्यांत आलें. आपल्या राज्यांत सुधारणा करण्याची सयाजीराव गायकवाडांची तीव्र इच्छा व जन्मभरच्या अनुभवांनीं ठरलेले ठोकताळे वापरण्याची यांची हौस या दोहोंचें व्यक्त स्वरूप म्हणजे यांच्या सुधारणा होत.

१९०७ मध्यें नेमलेल्या रॉयल कमिशनमध्यें हे एकटेच हिन्दी सभासद होते. तेथें १९०८ अखेर राहून आपल्या सूचना व मतें लॉर्ड मोर्ले यांच्या पुढें मांडून हे परत आले व लवकरच परलोकवासी झाले.

यांच्या वरील कार्यापेक्षांहि यांनीं इंग्रजी व बंगाली भाषेंत लिहिलेलें विपुल वाङ्मय अत्यंत चिरस्थायी स्वरूपाचें आहे. प्रथम हे इंग्रजींत लिहीत; पण बंकीमचंद्रांच्या सांगण्यावरून हे पुढें बंगालींत लिहूं लागले. यांनीं चार ऐतिहासिक व दोन सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. ऐतिहासिक कादंबऱ्यांत यांची 'शिवाजी' कादंबरी उत्कृष्ट समजली जाते. यांच्या सामाजिक कादंबऱ्यांत खेडेगांवांतील परिस्थितीचें चित्र यथार्थपणें उठविण्याचा यांचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. यांच्या बहुतेक ग्रंथांचें इंग्रजींत व देशी भाषांत भाषान्तर झालें आहे. श्री. वि. सी. गुर्जर यांनीं यांच्या कांहीं कादंबऱ्या मराठींतहि आणल्या आहेत.

यांचे ग्रंथ:—इतिहास-(1) A History of Civilization in Ancient India (1890 तीन खंड), (2) Later Hindu Civilization (1890), (3) Economic History of British India (1902), (4) Indians in the Victorian Age

(1904), (5) A History of the Literature of Bengal.

काव्यः—The Mahabharat and the Ramayana (Everyman's Series), (2) Lays of Ancient India (1894), (3) Great Epics of Ancient India.

कादंबऱ्याः—(1) Shivaji (इंग्रजी व बंगाली), (2) The Lake of Palms (1902), (3) The Slave Girl of Agra (1909).

इतरः—(1) Three Years in England (1871), (2) The Peasantry of Bengal (1875), (3) ऋग्वेदाचें बंगाली भाषांतर (1886), (4) England and India (1897) इत्यादि.

दप्तरदार, विठोबा अण्णा—(जन्म स. १८१३–मृत्यु स. १८७३) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध कवि, प्रवचनकार व ग्रंथकार.

हे मोगलाईंतील गुलबर्ग्याजवळच्या बेदरचे राहणारे म्हणून हे आपलें उपनांव बेदरे लावीत. यांचे आजे बाळाजीपंत यांना दप्तरदारीची सनद मिळाली व मग यांचें आडनांव दप्तरदार झालें. गुंडाचार्य घळसासी व नारायणाचार्य गजेंद्रगडकर हे यांचे गुरु होत.

यांनीं मराठीपेक्षां संस्कृतमध्येंच जास्त ग्रन्थ केलेले आहेत. मोरोपंतांच्या नंतर जुन्या पद्धतीनें कविता करणाऱ्यांत यांचाच क्रमांक वर लागेल. यांच्या 'सुश्लोक लाघवा'तील श्लोकाच्या साहाय्यानें हरदास लोक कीर्तनाला कसा रंग आणतात हें सर्वश्रुत आहे. संस्कृताप्रमाणें मराठींत यांनीं जरी मोठें काव्य लिहिलें नाहीं तरी यांच्या उपलब्ध मराठी कवितांच्या अवलोकनावरून मराठी कवि या नात्यानें यांची योग्यता श्रेष्ठ आहे. यांच्या कवितेंत विद्वत्ता, रसिकता, प्रेम, भक्ति, कोटिबाजपणा वगैरे गुण असल्यामुळें ती वाचतांना रसिकाच्या चित्तवृत्ति आकर्षिल्याखेरीज राहत नाहींत.

'विधवाविवाह सशास्त्र कीं अशास्त्र' या स. १८६८ त शंकराचार्यांच्या पुढें झालेल्या वादांत यांनीं प्रामुख्यानें भाग घेऊन त्याकरितां श्रुतिस्मृतींतील वचनांनीं युक्त असा 'विवाहतत्त्व' नांवाचा ग्रन्थ तयार केला. 'पदसंग्रह' हाहि यांनीं प्रसिद्ध केलेल्या ग्रन्थांपैकींच एक ग्रन्थ आहे.

यांचे संस्कृत ग्रंथः—१ शिवस्तुति, २ गजेन्द्र चंपू, ३ सुश्लोकलाघव, ४ हेतुरामायण, ५ प्रबोधोत्सवलाघव, ६ प्रयोगलाघव, ७ नित्यक्रमलाघव, ८ संकल्प, ९ रामतापिनी, १० साधुपार्षदलाघवम्, ११ एकादशीविचार, १२ विवाहतत्त्व.

दप्तरी, डॉ. केशव लक्ष्मण—(जन्म स. १८८० नवं. २२) विख्यात गणितज्ञ, लेखक, संशोधक आणि बुद्धिप्रामाण्यवादी ग्रंथकार.

नागपूरचे हे त्यागी गृहस्थ बी. ए., एल्एल. बी. आहेत. धंदा होमिओपाथी वैद्यकाचा करितात. ह्यांनीं संशोधनपूर्ण ज्ञानांत भर घालणारे पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत. ते "भारतीय युद्धकालनिर्णय" "वैदिक कालगणनापद्धति व रामचंद्रकालनिर्णय", "भारतीय ज्योतिःशास्त्रनिरीक्षण", "धर्मरहस्य", "धर्मविवादस्वरूप", "जैमिन्यर्थदीपिका", "तात्त्विकमीमांसापद्धति", "सचिकित्साप्रकाशिका", "कैसवधकालनिर्णय" "प्राचीन भारतीय इतिहासाचीं साधनें", "राजतरंगिणीनिरीक्षण", "भारतीयांचा मौर्यपूर्व इतिहास", "विक्रमादित्यांच्या घोंटाळ्यांचा उलगडा", "चिकित्सापरीक्षण", "The Astronomical Method and its Application to the Chronology of Ancient India", "The Bodily Reaction and Examination of the Systems of Medicine" आणि "The Social Institutions of Ancient India". हे आहेत. ह्यांशिवाय सांप्रत उपनिषदांचा अभ्यास करून, यांनीं उपनिषदांवर आणि व्याससूत्रावर टीका लिहिली आहे व उपनिषदांवर एक निबंध लिहून त्याचें इंग्रजींत भाषांतर "The Rationalistic and Realistic Interpretation of the Upanishods" ह्या नांवाचें केलें आहे. ह्यांपैकीं बरेच ग्रंथ अप्रकाशित आहेत व प्रकाशित झालेल्या कांहींच्या प्रति शिल्लक नाहींत. सूक्ष्म गणितांत यांची गति अकुंठित चालते आणि संशोधनात्मक लिहिण्यानें यांनीं आपल्याकडे सर्वांचें लक्ष खेंचून घेतलें आहे. यांचा 'भारतीय युद्धकालनिर्णय' हा प्रबंध स. १९१८ सालीं विविधज्ञानविस्तारांतून प्रसिद्ध झाला आणि यांच्याकडे लोकमान्य टिळक व श्री. कृ. कोल्हटकर यांच्या सारख्यांचें लक्ष वेधलें. लो. टिळकांना आपल्या शुद्ध पंचागाकरितां 'करणकल्पलता' नांवाचा संस्कृत ग्रंथ करण्याकरितां यांच्याकडे जावें लागलें (१९२०). तो ग्रंथ पुढें दिवंगत

झालेल्या लो. टिळकांना यांनीं अर्पण केला आहे. तो ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर नागपूरच्या 'महाराष्ट्रा'नें यांचा 'अभिनव केशवदैवज्ञ' असा गौरव केला.

शं. बा. दीक्षित यांच्या 'भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास' या महत्त्वाच्या ग्रंथांत कालनिर्णयाच्या दृष्टीनें अनेक हस्तलिखित ग्रंथांची पाहणी केलेली असली तरी त्यांतील ज्योतिर्गणिताचें सांगोपांग विवेचन त्यांत केलेलें नाहीं. तें काम 'भारतीय ज्योतिःशास्त्र निरीक्षण' या आपल्या ग्रंथांत यांनीं केलें. या ग्रंथांत भारतीय ज्योतिर्गणिताचा अभ्यास कसा करावा याचा नमुनाच यांनीं सोदाहरण अभ्यासकांपुढें ठेवला आहे. यांच्या ग्रंथांत दीक्षितांच्या ग्रंथांतील उणिवांचें व चुकांचें आविष्करण केलें असल्यामुळें त्या ग्रंथास परीक्षण असें नांव देणें योग्य झालें असतें असें प्रस्तावनाकार श्री. कृ. कोल्हटकर यांनीं म्हटलें आहे. स. १९२९ सालीं झालेल्या या निबंधांत यांनीं दीक्षितांनीं दिलेले कांहीं काळ चुकांचे ठरविले आहेत.

'भारतीयांनीं ज्योतिःशास्त्र ग्रीकांपासून घेतलें कीं काय? या प्रश्नाचा निर्णय करणें, कलियुगारंभीं ग्रह एकत्र होते ही गोष्ट कल्पित नसून प्रत्यक्ष पाहिलेली आपल्या ज्योतिषांस परंपरेनें माहीत होती, आणि शुद्ध मध्यमगति, मंदशीघ्रपरिधि व उच्चे पाश्चात्यांची घेणें व स्पष्टगति प्रमेयांत युरोपिय ज्योतिषशास्त्रानुसार बदल करणें हीं भारतीय ज्योतिषांचीं कर्तव्यें आहेत' या मुद्यांचें विवेचन करणें हा यांच्या ग्रंथाचा हेतु आहे. म्हणजे एकीकडून युरोपियनांच्या आक्षेपास उत्तर देणें व दुसरीकडून आजचे पाश्चात्यांचे शुद्ध आंकडे व त्यांचीं प्रमेयें आमच्या लोकांनीं घेतलीं पाहिजेत हें सांगणें याप्रीत्यर्थ आमच्या ज्योतिष ग्रंथांतील मूलकांची तपासणी या यांच्या ग्रंथांत आहे. ह्यांचे इतर विषयांवरील ग्रंथहि असेच नावीन्यपूर्ण व बुद्धीस पटतील असे व लोकोपकारक आहेत.

हे पूर्ण बुद्धिवादी असल्यानें तडजोडवादी सुधारकांशीं यांचें जमण्यासारखें नाहीं. वेद, ईश्वर, धर्म वगैरेसंबंधीं यांचीं मतें झेपण्यासारखीं नसूनहि हे केवळ आपलीं मतें जुन्या वेदशास्त्रादि ग्रंथांतून सिद्ध करून देत असल्यामुळें ग्रंथप्रामाण्यवादी अर्धवट सुधारक यांना आपल्यापेक्षां समजण्याचा प्रयत्न करितात.

यांच्या विद्वत्तेचा गौरव नागपूर युनिव्हर्सिटीनें यांना एल्एल्. डी. पदवी देऊन केला (१९४१).

यांचे ग्रंथ व त्यांतील विचारसरणीचा परिचय आमच्या प्राचीन-चरित्रकोशाच्या प्रस्तावनेंत दिला आहे. शिवाय यांनीं केलेले बहुतेक कालनिर्णय आम्ही त्याच ग्रंथाच्या कालनिर्णय परिशिष्टांत दिले आहेत.

दबीर—(जन्म स. १८०१–मृत्यु स. १८७४) सुप्रसिद्ध उर्दू कवि.

यांचें नांव मिर्झा सनामत अलीखान, पिता–मिर्झा गुलाम हुसेन. जन्मस्थान लखनौ. यांचें शिक्षण लखनौंत झालें. बाराव्या वर्षीं हे कविता करूं लागले.

हे मीर ज़मीरचे शागीर्द. यांच्या कवितांची छाप लवकरच कविमंडळावर पडली. यांची विशेष ख्याति 'मरसिया' म्हणणारे म्हणून झाली. त्यामुळें यांचे अनेक मोठमोठे लोक शिष्य झाले. हे चाळीसाव्या सुमारास असतां लखनौला मीर अनीस हे फैजाबादेहून आले. तेव्हां तेथें कविमंडळांत दोघांच्या अनुयायांच्या दोन फळ्या पडल्या. पुढें यांचे डोळे गेले. लखनौचे इतिहासप्रसिद्ध नबाब वाजीदअलीशाह कलकत्त्यास नजरकैदेंत होते. त्यांनीं एका जर्मन डॉक्टरकडून आपले डोळे दुरुस्त करून घेतले तेव्हां त्यांनीं यांचेहि डोळे दुरुस्त करविले.

दयानंद सरस्वती स्वामी—(जन्म स. १८२४–समाधि स.१८८३ आश्विन वद्य ३०) आर्यसमाजाचे सुप्रसिद्ध संस्थापक, आक्रमक नि निर्भय धर्मसुधारक, कुशल संघटक आणि हिन्दी भाषेचें राष्ट्रीय स्वरूप ओळखणारे महर्षि.

काठेवाडांतील मोरवी संस्थानांत अंबाशंकर नांवाच्या औदिच्य ब्राह्मणाचे हे पुत्र. यांचें मूळ नांव मूळशंकर. संन्यास घेतल्यावर दयानंदसरस्वती असें नांव यांनीं घेतलें. वडील जमीनदार. धंदा सावकारीचा. शिवाची कडक उपासना. आठव्या वर्षीं मुंज झाल्यानंतर कुलाचाराप्रमाणें शैव पंथाची दीक्षा यांना देण्यांत आली. हे नित्य पार्थिव पूजाहि करूं लागले. यांचें घराणें सामवेदी होतें तरी यांच्याकडून शुक्ल यजुर्वेदसंहिता पाठ करून घेण्यांत आली.

शिवरात्रीचे दिवशीं मध्यरात्रीं मंदिरांत शिवपूजा चालू होती. सर्वत्र शांतता असल्यानें निःस्तब्ध होतें. हे मात्र निष्ठेनें देवाकडे टक लावून बसले होते. इतक्यांत भोंवतालच्या बिळांतून उंदीर बाहेर आला आणि तो देवावर बसून अक्षता वगैरे खाऊं लागला.

यांनीं तें दृश्य पाहिलें आणि यांच्या मनांतील मूर्तीवरील श्रद्धा नाहींशी झाली. ज्याला आपण सर्वशक्तिमान् मानतों त्याला आपल्या अंगावर बसलेला उंदीरसुद्धां हाकालतां येऊं नये, ही कल्पनासुद्धां यांना असह्य होऊन हे मूर्तिपूजेच्या पूर्ण विरुद्ध झाले. वडिलांना विचारतां तेहि रागावले. घरांतील बहीण व चुलता यांच्या मृत्यूनें उदासीनता वाढली. वेदाध्ययनाकडे लक्ष होतें; पण वडिलांनीं लग्नाची गोष्ट काढतांच यांनीं तेथून पलायन केलें आणि पायींच मार्ग आक्रमण करीत सोमाली गांवीं येऊन ब्रह्मचारी व्रताची दीक्षा घेतली, 'शुद्धचैतन्य' असें नांव स्वीकारलें आणि योगाभ्यासाला सुरुवात केली. वडील शोधास आले असतां त्यांना चुकवून अहमदाबादेहून बडोद्यास आले व तेथें ब्रह्मानंद नांवाच्या संन्याशाजवळ अद्वैत वेदान्ताच्या अभ्यासाला यांनीं सुरुवात केली. पुढें नर्मदातीरीं सच्चिदानंदस्वामींपाशीं अध्ययन केल्यावर महाराष्ट्रीय स्वामी पूर्णानंदांपासून संन्यासदीक्षा घेऊन 'दयानंद सरस्वती' या नांवानें फिरत राहून शक्य असेल तेथें ज्ञानाचा संग्रह हे करीत राहिले. योगानंदांपासून व कृष्णशास्त्र्यांपासून व्याकरण शिकत असतां, शाक्तादि पंथ व सामुद्रिकादि शास्त्रांचें मिथ्यात्व यांच्या ध्यानांत आलें. आपलें वैराग्य व जिज्ञासा यांच्या जोरावर हिंवाळ्यांत हिंडत असतां अनेक मोहांतून बचावून मथुरेस जन्मांध व अत्यंत कडक स्वभावाच्या स्वामी विरजानंदांकडे येऊन पोंचले. हेच बहुतांशीं यांच्या भावी कार्याचे मार्गदर्शक होत. त्यांनीं प्रथमच सत्यासत्याची खरी चिकित्सा करण्याकरितां महाभारतापूर्वीच्या ऋषिमुनींच्या वाङ्मयाचा अभ्यास करण्याचा आदेश यांना दिला. यांनीं त्यांच्यापाशीं अडीच वर्षेपर्यंत अध्ययन केलें व शेवटीं गुरुदक्षिणा म्हणूस सत्यज्ञान जगाला देण्याचा आदेश घेऊन तें सत्यज्ञान वेदांत असल्यानें वैदिक धर्माचा प्रसार करण्याकरितां हे बाहेर पडले आणि त्याकरितां आर्य समाजाची स्थापना केली (स. १८७५ एप्रिल १०, मुंबई).

वेदांतील तत्त्वज्ञानाचें यथार्थ ज्ञान व्हावें म्हणून यांनीं 'सत्यार्थप्रकाश' नांवाचा ग्रंथ संस्कृत व हिन्दी भाषेंत लिहिला. सत्यार्थप्रकाशांत वैदिक धर्माचें यथार्थ स्वरूप प्रतिपादन करतांना इतर मतपंथांचें खंडनहि यांना करावें लागलें. त्यांतील चढाईच्या, सडेतोड, फटकळ, बिनतोड आणि घणाघाती कोटिक्रमानें या ग्रंथाकडे सर्वांचें लक्ष वेधलें आणि अनेक भाषांत त्याचें भाषान्तर करण्यांत आलें. त्यांतील इस्लाम धर्माचें खंडन करणारा अकरावा भाग जप्त करावा, अशी मागणी मुसलमानांनीं केली आणि सिंधप्रांतांत त्या भागाच्या मुद्रणास व प्रकाशनास बंदी करण्यांत आली. या प्रचारात्मक ग्रंथानंतर वेदाचा यथार्थ अर्थ समजण्याकरितां, यांनीं 'वेदभाष्य' लिहिण्यास सुरुवात केली; पण तो ग्रंथ अपुराच राहिला. यानंतर 'संस्कारविधि' हा ग्रंथ लिहून सोळा संस्कारांचें वर्णन व प्रयोग यांनीं दिले. 'पंचमहायज्ञविधि' या लहानशा ग्रंथांत नित्य करावयाच्या यज्ञांचें यांनीं विवेचन केलें. 'गोकरुणानिधि' या ग्रंथांत यांच्या अन्तःकरणाचें प्रतिबिंब पाहावयास मिळतें. यांत शाकाहाराचें समर्थन, मांसाहाराचें खंडन, प्राण्यांच्या प्राणरक्षणार्थ शास्त्रीय माहिती वगैरे विषय आहेत.

प्रथम आर्यसमाजाच्या तत्त्वांचा प्रचार अहमदाबाद, बडोदें, पुणें, मुंबई या ठिकाणीं केल्यावर हे दिल्ली येथें भरणाऱ्या दरबारासाठीं गेले. तेथून चंदापूर येथें भरलेल्या मेळ्यांत गेले. तेथें सर्व धर्मांचे प्रतिनिधि बोलाविलेले होते व चर्चेसाठीं पांच प्रश्न ठेविले होते. यांनीं त्या प्रश्नांचीं यथायोग्य उत्तरें दिल्यामुळें उत्तर हिंदुस्थानांत व विशेषतः पंजाबांत यांच्या मताचा चांगलाच बोलबाला झाला. शैक्षणिक संस्था, गुरुकुलें व अनाथालयें निघून होमहवनादि वैदिक पद्धतीचे कार्यक्रम तिकडे होऊं लागले.

अलीकडच्या काळांत अनेक धर्मसुधारक व संस्थासंस्थापक निर्माण झाले, पण यांच्या आर्यसमाजाइतका संघटित, कार्यक्षम, लढाऊ व आक्रमक असा समाज एकहि दाखवितां येणार नाहीं. यांच्याइतपत मतप्रतिपादनांतील कणखरपणा आणि तडफ इतरत्र आढळत नाहीं. शिवाय यांनीं हिंदुधर्माला प्राणभूत असणारे वेद प्रमाण मानून पूर्व परंपरेचा धागा तुटूं दिला नाहीं आणि बुद्धिप्रामाण्य वाद्यांच्या लहरीला आपला समाज बळि न पडेल अशी व्यवस्था केली.

यांचें शारीरिक, मानसिक व वाचिक सामर्थ्य अलौकिक होतें. दोन घोड्यांची भरधांव गाडी हे एक हातानें सहज थांबवून धरीत. एकदां तलवार घेऊन अंगावर धांवण्याऱ्याची तलवार हिसकावून घेऊन तिचे यांनीं तुकडे केले. अत्यंत विरुद्ध वातावरणांत यांनीं आपलीं मतें मांडण्यास कधींहि माघार घेतली नाहीं. खुद्द काशीसारख्या क्षेत्रांत जाऊन 'मूर्तिपूजा सिद्ध करा, नाहीं तर काशीविश्वेश्वर फोडून टाका' असें आव्हान देऊन हे वादास उभे राहत. अभेद्य छाती, दणकट मनगट आणि खणखणीत आवाज यांमुळें यांच्याबद्दल सर्वत्र आदर उत्पन्न होत असे. बोल-

ण्यांत चतुर, वादांत हजरजबाबी आणि शास्त्राधार देण्यांत हे कुशल होते. बिनतोड व फटकळ कोटिक्रमानें हे सहज सभा जिंकीत आणि आपल्या निस्वार्थ कळकळीच्या उपदेशानें लोकांना आपल्या भजनीं लावीत. अवघ्या पांच वर्षांत यांनीं उत्तर हिंदुस्थानचा धार्मिक बाबतींत कायापालट केला. सत्यार्थप्रकाशासारखे प्रचाराला उपयुक्त असणारे ग्रंथ तयार करून शेंकडो निर्भय अनुयायी तयार केले. अशा उग्र प्रचाराला प्राणघातक हल्ले व विषप्रयोग वगैरेंनीं उत्तर देण्याचा प्रयत्न झाला. पण यांचा प्रभाव वाढतच गेला. १८५९ नवंबरांत काशीस तीनशें पंडितांशीं झालेल्या वादानें यांची कीर्ति दिगंत झाली. हे नुसते उत्तर हिंदुस्थानांत प्रचार करून थांबले नाहींत तर यांनीं नियमबद्ध संस्था निर्माण करून अनुयायांना निश्चित आचार व विचार यांचा पुरवठा केला. आणि आपल्या त्यागाच्या खंबीर अधिष्ठानावर ध्येयवादी संस्थेची उभारणी केली. आणि हिंदुधर्माला लढाऊ धर्माचें स्वरूप देण्याचा प्रयत्न केला.

शेवटीं जोधपूर येथें यांना विषप्रयोग होऊन यांचा अन्त झाला (शके १८०५ अश्विन अमावास्या, स. १८८३).

हे उदेपूर येथें असतां तेथील राजा राणा सज्जनसिंह यांच्या सहानुभूतीनें यांनीं 'परोपकारिणी सभा' स्थापिली. तिला न्या. म. गो. रानडे उपस्थित होते. यांनीं आपल्या मृत्युपत्रांत सभेकडे पुढील तीन महत्त्वाचीं कामें सोपविलीं–१ वेद व वैदिक वाङ्मय छापून तें अल्प किंमतींत प्रसृत करणें, २ जगाच्या वेगळाल्या भागांत वैदिक धर्मप्रचारक पाठवून आर्यधर्माचा प्रसार करणें. ३ भारतीय अनाथांचें पालनपोषण करून त्यांना विद्यादान देणें. या यांच्या इच्छेप्रमाणें आर्यसमाजाकडून हें काम अव्याहत चालू आहे.

दयाराम— (जन्म स. १७६७–मृत्यु स. १८५२) सुप्रसिद्ध गुजराथी सन्त कवि.

जन्मस्थान कंदोद (नर्मदातीर), जात साठोदर नागर ब्राह्मण. लहानपणीं आई वारल्यानें यांचा संभाळ यांच्या चुलतीनें केला. हे एकदां घरांतून पळून गेले आणि तेथें केशवानंदांचे शिष्य झाले. यांनीं सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला. यांना हिन्दी, व्रज व संस्कृत या भाषा चांगल्या येऊं लागल्या. यांचें मन वैष्णव होण्याकडे झुकूं लागलें आणि यांनीं आपलें नांव दयाशंकर होतें, तें बदलून दयाराम असें घेतलें. नंतर यांनीं वैष्णवांचें दैवत नाथाजीचें दर्शन घेतलें.

यांची भजनें गाण्याची पद्धति भावनापूर्ण असल्यानें लोकप्रिय असे. यांची अमर्याद विष्णुभक्ति पाहून लोक यांना भक्त मानूं लागले व यांची शिष्यशाखा वाढूं लागली. कृष्ण व गोपी यांच्यावर यांनीं केलेली पद्यरचना अत्यंत सरस आहे.

यांचें रतनबाई नांवाच्या सोनार जातीच्या विधवा स्त्रीवर प्रेम होतें. तिच्याबरोबर यांनीं ३० वर्षें संसार केला. हे आपण गतजन्मीं पतिपत्नी होतों असें सांगत.

दवे, नर्मदाशंकर लालशंकर— (जन्म स. १८३३–मृत्यु स. १८८९) गुजराथी भाषेतील गद्याला आपल्या शैलीनें नवें आकर्षक रूप देणारे सुप्रसिद्ध लेखक व कवि.

जन्मस्थान सुरत. जात वडनगरा नागर ब्राह्मण. पित्याचें नांव लालशंकर पुरुषोत्तम. धंदा कारकुनीचा. सुरत येथें प्राथमिक व मुंबई येथें एल्फिन्स्टन इस्टिट्यूटमध्यें माध्यमिक शिक्षण झालें. शिक्षक म्हणून कांहीं दिवस काम केल्यावर हे पुनः मुंबईला आले आणि यांनीं 'बुद्धिवर्धक सभा' स्थापिली. तेथील यांच्या विविध विषयांवरील प्रोत्साहक भाषणांनीं यांच्याकडे सर्वांचें लक्ष गेलें. शेवटीं पंचविसाव्या वर्षी यांनीं ग्रंथकार होण्याचें निश्चित केलें. 'नर्म कविता' नांवानें यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध होऊं लागले. त्यामुळें उत्कृष्ट कवि म्हणून यांचें नांव सर्वत्र झालें. तसेंच 'नर्म गद्य' या यांच्या लेखसंग्रहानें यांच्या गद्याचेंहि आकर्षण लोकांवर पडलें.

त्यानंतर 'नर्मकोश' या ग्रंथानें यांची कीर्ति अमर झाली. सरस्वतीनें यांच्यावर कृपा केली पण लक्ष्मी दूरच राहिली. पैशांकरितां यांनीं नाट्यलेखनहि केलें पण त्याचाहि उपयोग झाला नाहीं. शेवटीं 'गोकुळदास तेजपाळ दानखाता' मध्यें यांनीं नोकरी पत्करिली. पुढें यांच्या विचारांत क्रांति झाल्याचा सूचक असा यांचा 'धर्मविचार' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला.

यांना गुजराथी वाङ्मयांतील युगप्रवर्तक लेखक मानतात. यांची लेखणी सफाईदारपणें अनेक विषयांत वावरे. आधुनिक गुजराथी गद्याचे जनक असा यांचा

सर्वत्र गौरव केला जातो. 'ग्रंथ अज्ञे ग्रंथकार' मालेंत (भाग ५ पान २१५) यांच्या नांवावर पंचाहत्तर कृति दिल्या आहेत. त्यावरून यांच्या प्रचंड लेखनाची कल्पना येईल. गुजराथींत भावगीतें लिहिण्यास यांनींच प्रथम सुरुवात केली असें म्हणतात. नर्मद या नांवानेंहि यांची कविता प्रसिद्ध आहे.

दलाल, सर अर्देसर—(जन्म स. १८८४) मुंबईचे सुप्रसिद्ध व्यापारी व 'टाटा सन्स लि.'चे माजी डायरेक्टर.

यांचें शिक्षण मुंबई व केम्ब्रिज येथें झालें. हे एम्. ए., आय्. सी. एस. आहेत. हे सेवानिवृत्त असून मुंबई व हिंदुस्थान सरकारच्या बऱ्याच जबाबदारीच्या जागांवर यांनीं कामें केलीं आहेत.

हे व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिक कौन्सिलमध्यें युद्धोत्तर योजनेच्या कार्यावर होते. पण यांनीं १९४६ च्या जानेवारींत राजीनामा दिला व नंतर यांचें काम रामस्वामी मुदलियार हे पाहूं लागले. यांच्या हातांतील खात्यांत वरिष्ठ अधिकारी ढवळाढवळ करूं लागले असें राजीनाम्याचें कारण बोलतात.

दाग—(जन्म स. १८३१– मृत्यु स. १९०५) सुप्रसिद्ध उर्दू महाकवि.

यांचें नांव नबाब मिर्झाखाँ; स्थळ दिल्ली. यांचें घराणें दिल्लींत अत्यंत प्रतिष्ठित समजलें जाई. सात वर्षांचे असतां यांचें शिक्षण सुरू झालें. ग़यासुल्लोग़ातचे कर्ते मौलवी गयासुद्दीन यांच्यापासून यांनीं प्रथम फारशी शिकण्यास सुरुवात केली. नंतर मीर कवीचे शिष्य मौलवी सैयद अहमद हुसेन हे यांचे शिक्षक झाले. नंतर किल्ल्यांत बादशहाच्या परिवारांत यांना जाण्याची संधि मिळाली. तेथें यांना घोड्यावर बसणें, बंदूक व तीर मारणें वगैरेंचें शिक्षण मिळालें. तेथें प्रसिद्ध जौक़ कवि राजगुरु होते. त्यांचे हे शिष्य बनले. यांचे गज्जल सुधारतांना जौक़ कवीची यांच्या कवित्वशक्तीबद्दल खात्री पटली. बादशहाच्या कवित्सभेंत यांच्या गज्जलांनीं यांची उत्तम छाप बसली. कवि म्हणून हे सर्वांच्या नजरेंत भरले असतांच सत्तावन सालच्या बंडामुळें हे रामपूरला पळाले आणि तेथें नबाब युसुफ अलीखाँचे आश्रित बनले. तेथें यांच्याकडे आलेली नोकरी यांनीं चोवीस वर्षे बजावली. तेथें कवींचा चांगलाच संच असून त्यांत यांचा जम उत्तम असे. नबाबाच्याबरोबर यांनीं हाजची यात्रा केली. त्याबद्दल कृतज्ञतां प्रगट करण्याकरितां यांनीं एक कविता लिहिली आहे. पण तेथील नबाब व त्यांचे पुत्र कलबे अलीखाँ परलोकवासी झाल्यानें यांना पुनः दिल्ली गांठावी लागली. पुढें हे प्रमुख शहरीं फिरले. तेथें यांचें उत्तम स्वागत झालें. कारण हे जाण्यापूर्वीच तेथें यांचीं गज़लें पोंचलीं होतीं व तीं अत्यंत लोकप्रिय झालीं होतीं. त्यामुळें अशीं गज़लें करणाराला पाहण्याविषयीं लोकांत उत्कंठा होती. हे फिरत हैदराबादला आले. त्या वेळीं निजामसाहेबांची व यांची भेट झाली नाहीं. पण यांनीं एक कविता लिहून त्यांच्याकडे पाठविली व हे दिल्लीला निघून गेले. निजामसाहेबांनीं यांना बोलावून घेतलें आणि द. म. पंधराशें रुपयांवर काव्यगुरु म्हणून यांची नेमणूक केली. शिवाय यांची गाडी, घर, नोकर वगैरे उत्तम सरबराई असे. वेळोवेळीं यांना मिळालेल्या भेटी सव्वीस हजारांच्या होत्या. यांच्यावर पद्व्यांचा तर नुसता पाऊस पडला. याच वेळीं रामपुरमध्यें यांचे प्रतिस्पर्धी असलेले 'अमीर' कवि हैदराबादेस आले. तेथें यांनीं त्यांचा उत्तम सत्कार केला. पुढें 'अमीर'च्या अकस्मात मृत्यूनें यांना फार खेद झाला. अमीरच्या मृत्यूनंतर पांच वर्षांनीं यांचा देहान्त झाला. दोघे एका वेळचे; अमीर लखनौचे तर हे दिल्लीचे महाकवि होते. शेवटलीं अठरा वर्षे यांनीं हैदराबादेंत आनंदांत काढलीं. हैदराबादेंत शरीफसाहेबांच्या दरग्यांत यांचें दफन झालें. तेथेंच अमीर कवींचेंहि दफन झालें.

यांच्या कवितासंग्रहाचीं पुष्कळ पुस्तकें छापलेलीं आहेत. एक मसनवी पण आहे. मसनवींतील कथानक यांचें स्वतःचें आहे. मनीबाई नामक वेश्येवर यांचें मन जडल्याचें कथानक त्यांत मोठें सरस आहे.

यांचें वैशिष्ट्य साध्या, सफाईदार व चटकदार भाषेंत आहे. अशी भाषा उर्दू कवींत क्वचित् आढळते. थोडी अश्लीलताहि पण यांच्या काव्यांत आहे.

यांची शिष्यशाखा दीड हजारपेक्षां जास्त आहे. त्यांतील प्रमुख–इकबाल, बेखुद, सायल, आगा, हसन, बेबाक, हैरत, आजाद, रसा वगैरे (क. कौ. ४.४७१).

दातार, गंगाधरशास्त्री—(जन्म स. १८२२– मृत्यु स. १८८८) पुण्यांतील प्रसिद्ध शास्त्री व संस्कृत ग्रंथकार.

हे पांचवडच्या मणिरामभटांचे ज्येष्ठ चिरंजीव. वेदाध्ययन वडिलांच्यापाशीं व शास्त्राध्ययन पंडित

त्र्यंबकशास्त्री शाळिग्राम यांचेपाशीं केलें. शिवाय श्रौती म्हणून यांची प्रसिद्धि होती. यांच्याकडे धर्मशास्त्रविषयक पृच्छा अनेक ठिकाणांवरून होई. धार्मिक कृत्यें सूत्रोक्त करण्याकडे यांचा कल असे. यांनीं संशोधून प्रस्तावना लिहिलेले अनेक ग्रंथ रावजी श्रीधर गोंधळेकर यांनीं छापून प्रसिद्ध केले. यांचा 'मुहूर्तसिंधु' हा संस्कृत-मराठी ग्रंथ (शके १८०५) प्रसिद्ध आहे. यांचा 'निबंधसार' नांवाचा धर्मशास्त्रविषयक संस्कृत ग्रंथ अद्यापि अप्रकाशित आहे. यांनीं शेवटीं आतुरसंन्यास घेतला.

दाते, यशवंत रामकृष्ण—(जन्म स. १८९१ एप्रिल १७) महाराष्ट्र शब्दकोशाचे संपादक, साहित्य, शिक्षण व समाजविषयक कार्य करणारे गृहस्थ.

यांचें मूळ गांव किन्हळ (जि. रत्नागिरी). यांचें शिक्षण धुळें, पुणें व नागपूर येथें झालें. हे बी. ए. एलएल्. बी. आहेत. नंतर डॉ. श्री. व्यं. केतकर यांनीं काढलेल्या ज्ञानकोशमंडळांत कामास लागले व त्या कामाकरितांच पुण्यास आले (१९१९). १९२३ सालीं ज्ञानकोशमंडळाच्या विद्यासेवक मासिकाचे संपादक झाले. १९२८ सालीं ज्ञानकोशमंडळाचें काम संपल्यावर यांनीं श्री. चिं. ग. कर्वे, आबा चांदोरकर व चिंतामण-शास्त्री दातार या जुन्या सहकाऱ्यांसह महाराष्ट्रकोश-मंडळ लि. या संस्थेची स्थापना केली व 'महाराष्ट्र-शब्दकोश' हा ग्रंथ पुरा केला. त्यानंतर महाराष्ट्र वाक्संप्रदायकोश व शास्त्रीयपरिभाषाकोश यांचीं कामें यांनीं चिं. ग. कर्वे यांच्या सहकार्यानें केलीं.

याशिवाय ज्ञानकोशांतील सहकाऱ्यांच्यासह सरस्वती-मंदिर संस्थेची स्थापना करून पूना नाइट हायस्कूल वगैरे संस्था चालविल्या. वैदिकसंशोधन मंडळ, मॉडेल व हरिजन हाउसिंग सोसायटीची स्थापना करून अनेक साहित्य व सहकारी सोसायट्यांत अधिकाराचीं कामें केलीं. सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करून अनेक विवाहांत पौरोहित्य केलें. हे सोलापूरच्या मुद्रकसंमेलनाचे अध्यक्ष (१९४१) होते. वरील ग्रंथांशिवाय पितापुत्रसंबंध वगैरे पुस्तकें यांनीं लिहिलीं आहेत.

दाते, शंकर गणेश—(जन्म स. १९०५) मराठीतील लोककथासंग्राहक, मराठी-ग्रंथ-सूचिकार व संशोधक.

यांचें जन्मस्थान रत्नागिरी. शिक्षण मुंबई येथें बी. ए. पर्यंत. मराठींत लोककथा, लोकगीतें, लोकभ्रम, म्हणी, बाळखेळ इत्यादि लोकवाङ्मय शास्त्रीय पद्धतीनें संपादून पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यास यांनींच प्रथम सुरुवात केली व त्याचे दोन स्वतंत्र भाग प्रसिद्ध केले (१९२९-३०).

यानंतर यांनीं मराठी ग्रंथ-सूचि तयार करण्यास सुरुवात केली. यांच्यापूर्वी 'महाराष्ट्रीय वाङ्मयसूचि' य. रा. दाते व रा. व्यं. देशमुख यांच्याकडून करवून डॉ. श्री. व्यं. केतकर यांनीं महाराष्ट्रीय ज्ञानकोशमंडळ लि. तर्फे प्रसिद्ध केली होती (१९१९). त्यानंतर १९४४ सालीं यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. यांच्या ग्रंथांत स. १८००-१९३७ मध्यें प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचा समावेश आहे. या सूचीच्या प्रथम खंडांत दशांश वर्गीकरण पद्धतीनें ग्रंथ विषयवार लावून प्रत्येक पुस्तकाची माहिती, ग्रंथकार, ग्रंथनाम, आवृत्ति, प्रकाशनस्थल, प्रकाशक, मुद्रणालय, मुद्रणस्थळ, प्रकाशनकाल, पृष्ठें, आकार, चित्रें, मालाक्रमाङ्क, मूल्य व टिप्पणी या क्रमानें दिली आहे. द्वितीय खंडांत ग्रंथकार, ग्रंथनामें, विषय, अप्रत्यक्ष संदर्भ हे सर्व वर्णानुक्रमानें दिले असून ग्रंथकारांच्या नांवांपुढें जन्म-मृत्यूचें सालहि नोंदण्याचा प्रयत्न केला असून त्यांच्यासंबंधीचें एकंदर मुद्रित वाङ्मय एकत्र दिसेल असें दर्शित केलें आहे.

यांच्या या ग्रंथानें मराठी वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्यांची उत्कृष्ट सोय झाली आहे. १९३७ सालापर्यंत मराठींत कोणत्याहि विषयावर काय वाङ्मय प्रसिद्ध झालें आहे याची यांच्या ग्रंथावरून तपशीलवार माहिती मिळते. आणि अभ्यासकाला झालेलें कार्य लक्षांत घेऊन त्यापुढें कार्य करण्याची सूचना मिळते. यांच्यांत संशोधनाची दृष्टि उपजत असून रेखीव काम करण्याकडे यांचा कल आहे.

दाते, शंकर रामचंद्र—(जन्म स. १८९८) मोनोटाइप यंत्रापर देवनागरी लिपि बसविणारे, मराठी टाइपांत सुधारणा करणारे, सार्वजनिक कार्यकर्ते व दैनिक काळचे संपादक.

जन्मस्थान अश्वी (जि. अहमदनगर). बी.ए. झाल्यावर लोकसंग्रह छापखाना चालविला. तो अनाथ विद्यार्थि-गृह पुणें या संस्थेस विकून हे त्या संस्थेचे आजीव सभासद झाले. हे मोनोटाइप यंत्रावर देवनागरी लिपी बसविण्याकरितां इंग्लंडला गेले आणि ती गोष्ट यांनीं सिद्ध केली. त्या यंत्राचें पेटन्ट मोनोटाइप कॉर्पोरेशन, लंडन या कंपनी-

कडे असून तीं यंत्रें मुंबई, कलकत्ता, दिल्ली, अलाहाबाद, बनारस, पुणें वगैरे ठिकाणीं चालू आहेत.

मराठी टाइप सुधारण्याच्या बाबतींत राणू रावजी आरू, लो. टिळक, कृ. के. गोखले, श्री. विजापुरे व हे यांचे आजपर्यंत विशेष प्रयत्न झाले आहेत.

याशिवाय पुणें, महाराष्ट्र हिंदुसभेंत यांनीं अधिकाराच्या जागेवर अनेक वर्षे कामें केलीं.

दादाभाई नवरोजी—(जन्म स. १८२५–मृत्यु स. १९१७ जून ३०) राष्ट्रसभेच्या आद्य संस्थापकांपैकीं प्रमुख, तिचे तीन वेळचे अध्यक्ष, स्वराज्य या राजकीय ध्येयाचे जनक आणि अर्थशास्त्राच्या साहाय्यानें सरकार-विरुद्ध लढणारे पहिले जहाल टीकाकार.

यांच्या वडिलांचें समग्र नांव नवरोजी पालनजी दोर्दी. जन्मस्थान मुंबई. शिक्षण एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशन मध्यें होऊन तेथें शिक्षक व प्राध्यापक म्हणून यांनीं काम केलें. यांनीं मुंबईत स्टूडन्टस् लिटररी ॲन्ड सायन्टिफिक सोसायटी स्थापून तिच्या गुजराथी व मराठी शाखा काढल्या. मराठी व पारशी मुलींच्या शाळा मुंबईत प्रथम यांनींच काढल्या. १८५१ मध्यें यांनीं ' रास्त गोफ्तार ' (खरें सांगणारा) हें गुजराथी साप्ताहिक काढलें.

१८५५ सालीं यांनीं लंडनच्या कामा ॲन्ड कंपनींत मॅनेजरची नोकरी पत्करिली आणि तेथें जाऊन यांनीं कंपनीच्या कामाबरोबर आपल्या राजकीय कार्यासहि सुरुवात केली. यांनीं ईस्ट इंडियन असोसिएशन स्थापन करून (१८६७) तिच्यातर्फे हिंदुस्थानविषयक निबंध वाचणें व व्याख्यानें देणें वगैरे कामें सुरू केलीं. याबरोबरच लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमध्यें हे गुजराथीचें प्राध्यापन करीत. स. १८६९ सालीं हे हिंदुस्थानांत आले असतां यांच्या इंग्लंडमधील कार्याबद्दल मानपत्र व तीस हजार रुपयांची थैली देऊन यांचा गौरव करण्यांत आला. यांनीं इंग्लंडमध्यें असतां फॉसेट कमेटीपुढें साक्ष देऊन हिंदुस्थानांत माणशीं वार्षिक उत्पन्न वीस रुपये पडतें असें सिद्ध करून दाखविलें होतें. तीच साक्ष यांनीं ' पॉव्हर्टी इन इंडिया ' या नांवानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली (१८७३). नंतर सात वर्षांनीं यांनीं त्याच पुस्तकाची ' कन्डिशन ऑफ इंडिया ' या नांवानें सुधारलेली आवृत्ति काढली.

बडोद्याचे महाराज मल्हारराव यांच्या कारभारांत गोंधळ असल्यानें यांची तेथें दिवाण म्हणून नेमणूक झाली (१८७४). यांनीं तेथील कारभाराची व्यवस्था लावून दिवाणपदाचा राजीनामा दिला. नंतर मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड रे यांच्या कायदेकौन्सिलांत सभासद म्हणून काम करून हे इंग्लंडला गेले. तेथें पार्लमेन्टच्या निवडणुकीस हे चार वेळ उभे राहिले, पण यांना एकदां यश आलें (१८९२). आय्. सी. एस्. ची परीक्षा दोन्ही देशांत एकच वेळीं घेण्यांत यावी हा ठराव यांच्या प्रयत्नानें तेथें मान्य झाला. पुढें हे रॉयल कमिशनचे सभासद होते (१८९६). हिंदुस्थानांतून प्रतिवर्षी ३ कोट पौंड इंग्लंडला जात असल्यानें हिंदुस्थान दिवसेंदिवस दरिद्री होत आहे हें दाखविण्यासाठीं यांनीं 'पॉव्हर्टी ॲन्ड अन्-ब्रिटिश रूल इन इंडिया' (१९०२) हें पुस्तक प्रसिद्ध केलें. ॲमस्टरडॅम येथील सोशल डेमोक्रेटांच्या इंटरनॅशनल काँग्रेसमध्येंहि यांनीं येथील ब्रिटिश राज्यपद्धतीचा निषेध केला.

राज्यकारभारांतील दोष मांडण्यापासून तें स्वराज्य हें ध्येय जाहीर करून त्याकरितां प्रयत्न करणारी प्रमुख संस्था असें स्वरूप देण्यापर्यंतच्या काँग्रेसमधील प्रत्येक स्थित्यन्तरांत यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला. १८८६ कलकत्ता, १८९३ लाहोर व १९०६ कलकत्ता या तीन अधिवेशनांचे यांना अध्यक्ष निवडण्यांत आलें. १८८५ पासून लोकसंख्या फक्त शें. १८ नीं वाढली असतां राज्यकारभाराचा खर्च मात्र शें. ७० नीं वाढला; केवळ लष्करी खर्चांतच १७ कोटींपासून ३९ कोटींपर्यंत वाढ झाली; यांपैकीं ७ कोटी तर केवळ इंग्लंडमध्येंच खर्च होतात; हें यांनीं आपल्या तिसऱ्या अध्यक्षीय भाषणांत दाखविलें. राष्ट्राच्या जीवनांत इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां आर्थिक व शैक्षणिक बाबींना अत्यंत महत्त्व असतें, ही गोष्ट यांनीं लोकांपुढें प्रथम स्पष्टपणें मांडली. १९०५ सालीं ना. गोखले यांनीं स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतुःसूत्रीचा आपल्या भाषणांत प्रथम निर्देश केला. स्वदेशी वगैरेंचा पुरस्कार करण्यांतील मुख्य हेतु आर्थिक शोषण थांबवून शिक्षणानें राष्ट्र समर्थ बनवावयाचें आहे आणि त्याकरितां आम्हांला स्वराज्य पाहिजे आहे, ही यांनीं तिच्या अर्थाची मूलगामी पद्धतीनें केलेली स्पष्टता सर्वांना अगदीं नवीन वाटली.

' पॉव्हर्टी ॲन्ड अन-ब्रिटिश रूल इन इंडिया ' हा यांचा सर्वांत महत्त्वाचा अर्थशास्त्रीय ग्रंथ होय. सध्यांची ब्रिटिश राज्यपद्धति ' जेवढें उकळतां येईल तेवढें उकळून

ध्या ' अशा लुटारू स्वरूपाची आहे, हिंदुस्थानाप्रमाणें इंग्लंडलाहि ती घातक आहे, सध्यांच्या हिंदुस्थानच्या विपन्न स्थितींत एक पैचाहि फायदा हिंदुस्थानच्या पदरांत पडूं न देतां लक्षावधि रुपयांचे मालाच्या रूपानें शोषण चाललेलें आहे हें यांनीं आंकड्यांनीं मांडून दाखविलें आणि त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचवून मालक-गुलाम या नात्यापेक्षां सहकार्याच्या भावनेनें हिंदुस्थानकडे पाहण्याची यांनीं सरकारला विनंति केली आहे.

यांचे ग्रंथ—(1) Poverty and Un-British Rule in India (1901), (2) England's Duties to India, (3) Financial Administration of India, इत्यादि.

दामले, मोरो केशव—(जन्म स. १८६८–मृत्यु स. १९१३) मराठीचे व्याकरणकार.

हे कवि केशवसुतांचे बंधु. स. १८९३ सालीं इतिहास व तत्त्वज्ञान हे विषय घेऊन मुंबई विद्यापीठाचे एम्. ए. झाले. पुढें १८९४ ते १९०७ पर्यंत उज्जैनच्या माधव कॉलेजांत लॉजिक व फिलॉसॅफी या विषयांचे हे प्राध्यापक होते. पुढें तें कॉलेज बंद पडल्यामुळें नागपूरच्या सरकारी सिटी हायस्कूलवर यांची नेमणूक झाली. परंतु स. १९१३ च्या मे महिन्यांत नागपूरहून पुण्यास येत असतां रेल्वेअपघातानें यांचा अन्त झाला.

यांनीं ' शास्त्रीय मराठी व्याकरण ' हा अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथ स. १९११ त लिहिला. हा ग्रन्थ ९९० पानांचा असून मराठी व्याकरणाची शास्त्रीय पद्धतीनें रचना होण्याच्या उद्देशानें लिहिला आहे. पूर्ववैय्याकरणांच्या कृतींचें यांत परीक्षण केलेलें आहे. इतिहाससंशोधक वि. का. राजवाडे यांनीं या पुस्तकावर परीक्षणात्मक, सूचनात्मक व संशोधनात्मक असा एक निबंध लिहिला आहे.

' बर्ककृत आधुनिक असंतोष ', ' विचारपरिभ्रमण ', ' शुद्धलेखन व सुधारणा ' हे यांचे तीन निबंध ग्रन्थमाला मासिकांतून प्रसिद्ध झाले. न्यायशास्त्रावरहि यांनीं एक पुस्तक लिहिलें असून तें गायकवाड सरकारनें दोन भागांत प्रसिद्ध केलें.

दामले, सीताराम केशव—(जन्म स. १८७८–मृत्यु स. १९२७) मराठींतील वृत्तपत्रकार व चतुरस्र लेखक.

कवि केशवसुत व मोरो केशव दामले यांचे हे बंधू. जन्मस्थान रत्नागिरी जिल्ह्यांतील खेड हें गांव. मुंबईच्या विल्सन कॉलेजांतून बी. ए. झाल्यावर तेथील फेलोशिप संभाळून हे एलएल्. बी. झाले. कांहीं काळपर्यंत पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांत प्राध्यापक होते. ज्ञानप्रकाशच्या संपादक वर्गांतहि हे कांहीं दिवस राहिले. परंतु पुढें लवकरच हे राष्ट्रीय पक्षास मिळाले व यांची लिहिण्याची हौस व उत्साह वगैरे गुणांमुळें त्या वेळच्या राष्ट्रीय जागृतीस कायम राखण्यासाठीं लो. टिळकांनीं मुंबईस जें स. १९०८ मध्यें ' राष्ट्रमत ' हें दैनिक सुरू केलें त्याची जबाबदारी यांचेवर सोंपवली. दुर्दैवानें सरकारी दडपशाहीमुळें तें दैनिक दोन वर्षांतच बंद झालें. तरी या अल्पकाळांतहि यांनीं आपली कामगिरी योग्य तऱ्हेनें बजावून आपल्यावर टाकलेल्या राष्ट्रीय पक्षाच्या विश्वासाचें चीज करून दाखविलें. ' राष्ट्रमत ' बंद झाल्यावर हे पुण्यास वकिली करूं लागले. हे कांहीं दिवस ' राष्ट्रोदय ' नांवाचें मासिकहि काढीत असत. यांचें बरेंचसें वाङ्मय ' चित्रमय जगत् ' मासिकमधून प्रसिद्ध होत असे. " महायुद्धाचीं स्थित्यंतरें " ह्या सदरामध्यें चित्रमयजगतमध्यें येणारे यांचे माहितीपूर्ण लेख त्या वेळीं फारच लोकप्रिय झाले होते. ' जग हें त्रिविध आहे ' व ' न्याय कीं अन्याय ' ह्या दोन सामाजिक आणि ' वसईचा रणसंग्राम ' व ' दोनशें वर्षांपूर्वी ' ह्या दोन ऐतिहासिक अशा चार कादंबऱ्या यांनीं लिहिल्या आहेत. राजकारण आणि वाङ्मय हे दोन यांचे आवडते विषय होते. तथापि काव्यदेवीची यांची उपासनाहि कौतुकास्पद आहे. ' वाचाळरावांचे विचित्र अनुभव ' या पुस्तकांत यांची विनोदी वृत्ति दृष्टीस पडते. स. १९१८ त ' राजकारण ' हें साप्ताहिक यांनीं पुण्यास सुरू केलें. ह्या साप्ताहिकानें असहकारितेच्या चळवळींत चांगलीच कामगिरी बजाविली. पुढें मुळशी सत्याग्रहांत यांना तुरुंगवास भोगावा लागून हें साप्ताहिक बंद पडलें. त्यानंतर पंडुरोगानें पुण्यास हे निवर्तले.

दालमिया, रामकृष्णशेट—पाहा **रामकृष्णशेट दालमिया.**

दास गणू—(जन्म स. १८६३ ?) मराठी भाषेंतील रसाळ संतकवि, ग्रंथकार व निरूपणकर्ते.

यांचें समग्र नांव गणेश दत्तात्रेय सहस्रबुद्धे. हे शांडिल्य-गोत्री चित्पावन ब्राह्मण. पंढरपुरी विठ्ठलचरणीं देह अर्पण केल्यापासून हे आपणास दास गणू किंवा गणू

असें म्हणवून घेतात. पंढपूरजवळील करकंब हें यांचें मूळ गांव. हे वामनशास्त्री इस्लामपूरकरांना गुरु मानतात. यांचे पारमार्थिक गुरु साईनाथ शिर्डीकर होत. जन्मस्थल–अकोळनेर (जि. नगर). यांचे विशेष शिक्षण न झाल्यानें प्रथम हे पोलिसखात्यांत १३ रु. दरमहावर नोकरीस लागले. नानासाहेब चांदोरकर या वरिष्ठ अंमलदाराच्या संगतीनें यांना लावण्या करण्याचा नाद लागला. यांच्या लावण्यांच्या नादानें एका शाळा मास्तरास दंड झाल्याचें ऐकल्यावर यांना उपरति झाली व यांनीं आपलें लावणी-वाङ्मय फाडून टाकलें. पुढें शिर्डीच्या साईनाथांच्यावर यांची श्रद्धा बसली. त्यांच्या आज्ञेनें यांनीं नोकरी सोडली. तसेंच लावण्या, पोवाडे वगैरे तऱ्हेचें कवित्व करण्याचें सोडून यांनीं कीर्तन व भक्तिपर वाङ्मय करण्यास सुरुवात केली. यांच्या अंगीं सरस कवित्वशक्ति असल्यानें यांचीं कीर्तनें प्रेमळ व नावीन्यपूर्ण होतात. खेड्यांतून यांच्या बालबोध विचारसरणीनें व लावणीच्या थाटावर केलेल्या कवनांनीं हे लोकप्रिय होतात, तर शहरांतून यांच्या प्रतिभेवर लोक खूष असतात. कीर्तनाची बिदागी हे कधींहि घेत नाहींत. संतचरित्रें लिहिण्याच्या हौसेमुळें यांना लोक आधुनिक महीपति म्हणतात. महीपतींच्या नंतर झालेल्या संतांचीं चरित्रें यांनीं लिहिलीं आहेत. यांचें वाङ्मय लिहिण्याचें व यांचें कवित्व कीर्तनांत म्हणण्याचें काम दामोदर वामन आठवले हे मोठ्या ठसक्यानें करीत. पण ते शके १८४६ (स. १९२४) त वारल्यानें यांचा उजवा हातच गळून पडला. यांच्या कवितांची संख्या लाखापेक्षां अधिक आहे. अजूनहि ग्रंथरचना चालू आहे. इतकी प्रचंड रचना करणारा कवि अलीकडच्या काळांत क्वचित्च असेल. अलीकडच्या काळांतील साधुसंतांचा इतिहास स्वतः मिळवून व ग्रंथ वगैरे वाचून यांनीं संतचरित्रें लिहिलीं असल्यामुळें यांच्या संतचरित्राला ऐतिहासिक महत्त्व आहे. तसेंच यांचें वाङ्मयहि समाजाचें सूक्ष्म अवलोकन करून लिहिलें असल्यानें महत्त्वाचें आहे.

यांचें वाङ्मय—१ भक्तलीलामृत, २ संतकथामृत, ३ भक्तिसारामृत, ४ अमृतानुभव, ५ भावार्थमंजिरी, ६ गोदामाहात्म्य, ७ विष्णुसहस्रनामबोधिनी, ८ पासष्टी-भावार्थदीपिका, ९ मनाचे श्लोक, १० सुभाषितशतक, ११ ईशावास्यभावार्थबोधिनी, १२ शिष्यबोध, १३ स्फुट-पदें, १४ पोवाडे–टिळक (जप्त), रंगपंचमी, मीठ, ऊंस वगैरे, १५ स्तोत्रें सात, १६ अष्टकें अठरा, १७ कीर्तनो-पयोगी ४६ आख्यानें, १८ एकनाथचरित्र इत्यादि.

दास, चित्तरंजन—(जन्म स. १८७०–मृत्यु स. १९२५ जून ६) बंगाल्यांतील सुप्रसिद्ध वकील, कवि, वर्तमानपत्रकार व राजकारणी पुढारी.

यांचा जन्म कलकत्ता येथें वैद्य नांवाच्या ज्ञातींत झाला. यांच्या पित्याचें नांव भुवनमोहन व मातेचें नांव विस्तारिणी. यांचे वडील धंद्यानें सॉलिसिटर होते व त्यांना बंगालींत कविता करण्याचा नाद होता. हें कुटुंब मोठें सुसंस्कृत व ब्राह्मसमाजी होतें.

हे कलकत्ता येथें शिक्षण घेऊन बी. ए. झाले (१८९०). नंतर आय्. सी. एस्. होण्याकरितां इंग्लंडला गेले आणि बॅरिस्टर होऊन परत आले (१८९२). तेथील यांच्या वास्तव्यांत दादाभाई नवरोजी यांच्या हाउस ऑफ कॉमन्समधील उमेदवारीस पाठिंबा देण्याकरितां यांनीं अनेक राजकीय व्याख्यानें दिलीं.

परत आल्यावर यांनीं कलकत्ता हायकोर्टांत बॅरिस्टरी करण्याला आरंभ केला (१८९३), प्रथम यांचा धंदा जमला नाहीं. वडलांची प्रकृतिहि बरी नव्हती. अशा स्थितींत यांना नादार होण्याचा प्रसंग आला. पण पुढें चांगली स्थिति येतांच मुदतीबाहेर गेलेलेंहि सावकाराचें कर्ज यांनीं फेडून टाकलें.

हे राजकारणी म्हणून हिंदुस्थानांत विख्यात असले तरी बंगालमध्यें बंगाली भाषेतील उत्कृष्ट कवि म्हणूनच लोक यांना विशेष ओळखतात. बंगालमधील वाङ्मयीन चळवळींत यांचा प्रमुख भाग असे. हे विलायतेस निघाले तेव्हां समुद्रावर असतां मनांत आलेले विचार 'सागर संगीत' या नांवानें कविताबद्ध करून यांनीं प्रसिद्ध केले. त्यांचेंच पुढें हे व अरविंद घोष या दोघांनीं इंग्रजी भाषान्तर करून 'सॉंग्ज् ऑफ दि सी' या नांवानें प्रसिद्ध केलें. तेव्हांपासून 'किशोर-किशोरी' 'अन्तर्यामी' हे यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. शिवाय 'नारायण' नांवाचें बंगाली मासिक किती तरी वर्षें हे सतत चालवीत. त्यांत साहित्य व वैष्णव वाङ्मय यांसंबंधीं विशेष चर्चा असे. अशा विशेष प्रकारच्या कामगिरीमुळें १९१५ च्या बंगाली साहित्यसंमेलनाचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें होतें. त्या वेळीं यांच्या भाषणाचा विषय 'बंगाली गेय काव्य' हा होता. यांची कविताहि बंगाली भाषेंत विशेष प्रकारची समजली जाते.

यांचें वर्तमानपत्रांकडेहि सतत लक्ष असे. १९०६ सालीं सुरू झालेल्या 'वंदे मातरम्' या इंग्रजी पत्राचे

एक संस्थापक व संपादक मंडळांपैकीं हे एक होते. पण 'फॉर्वर्ड' हें बंगाल स्वराज्यपक्षाचें पत्र तर सर्वस्वीं यांच्याच जबाबदारीवर निघालें व चाललें.

'वंदे मातरम्'चे संपादक बाबू अरविंद घोष यांच्यावरील राजद्रोहाच्या खटल्यांत यांच्या वकिली कौशल्याचा लोकांना प्रथम प्रत्यय आला. माणिकतोळा बाग कटाच्या खटल्यांत तर यांच्या काम करण्याच्या धडाडीच्या पद्धतीनें हे राष्ट्रीय वकील म्हणून हिंदुस्थानभर प्रसिद्ध झाले. अशा खटल्यांत हे अविश्रांत खटपट करीत आणि पैसाहि घेत नसत. पुढें पुढें यांची वकिलीची प्राप्ति वार्षिक साडेसात लाखांपर्यंत चढली होती. यांचें कौशल्य फौजदारी खटल्यांत आणि विशेषतः उलटतपासणींत दिसे. अनेक दिवाणी दावेहि यांनीं कौशल्यानें चालविले.

हे प्रथम राष्ट्रसभेंत १९०६ सालीं आले तरी १९१७ सालीं बंगाल प्रांतिक राजकीय परिषदेचे अध्यक्ष होण्यापूर्वी हे राजकारणांत फारसे पडत नसत. पण हे एकदां राजकारणांत पडल्यावर तेथेंहि यांची धडाडी आणि आवेश व्यक्त होऊं लागला. त्याच सालच्या कलकत्ता काँग्रेसच्या अध्यक्षपदीं ॲनी बेझंट यांना अध्यक्षस्थान देण्यांत यांनीं पुढाकार घेतला. त्या वेळीं यांचें तडफदार धोरण न पेलणारे सुरेन्द्रनाथ बानर्जी प्रभृति लोक राष्ट्रसभेंतून बाहेर पडले आणि त्यांनीं आपली प्रागतिक परिषद स्वतंत्र भरविण्यास सुरुवात केली. १९१८ च्या दिल्ली काँग्रेसमध्यें ॲनी बेझंट यांच्या विरोधास न जुमानतां ताबडतोब प्रान्तिक स्वायत्ततेचा ठराव यांनीं मान्य करून घेतला आणि होणाऱ्या रौलट कायद्याला यांनीं प्रचंड प्रमाणांत विरोध केला. पंजाब प्रकरणाच्या चौकशीकरितां नेमलेल्या कमेटींतहि यांनीं महत्त्वाची कामगिरी केली. म. गांधींच्या सत्याग्रहाला पाठिंबा दिला आणि स्वराज्याकरितां अडवणुकीचा मार्ग सुचविला. कलकत्त्याच्या जादा अधिवेशनांत म. गांधींच्या असहकारितेच्या ठरावास यांनीं मर्यादित विरोध केला पण नागपूरच्या अधिवेशनांत यांनीं ३६००० रु. खर्चून २५० प्रतिनिधींची तुकडी विरोधाकरितां आणली,पण शेवटीं असहकारितेचा ठरावच यांनीं मांडला. असहकारितेच्या जाहीरनाम्याप्रमाणें आपल्या मोठ्या प्राप्तीच्या वकिलीचा त्याग केला आणि आपली सर्व संपत्ति मेडिकल कॉलेज व स्त्रियांचा दवाखाना यांकरितां देऊन टाकिली. याच वेळीं लोक यांना 'देशबंधु' या गौरवदर्शक नांवानें संबोधूं लागले.

शाळा-कॉलेजें सोडलेल्या विद्यार्थ्यांकरितां यांनीं ढाक्का येथें 'राष्ट्रीय विद्यापीठ' स्थापन केलें. आसाममधील चहाच्या मळ्यांतील मजुरांच्या तक्रारीनें यांचें लक्ष कांहीं काल वेधून घेतलें होतें. १९२१ सालीं असहकारितेच्या चळवळीकरितां राष्ट्रसभेनें दहा लक्ष व्हालंटियर्स मागितले होते, त्याप्रमाणें यांनीं लोक जमा करून राष्ट्रसभेचा खादीविक्री वगैरे कार्यक्रम पार पाडण्यास सुरुवात केली. पण चळवळीची ही वाढ सरकारनें बेकायदेशीर ठरविली. शेवटीं यांना सहकुटुंब पकडण्यांत येऊन सहा महिन्यांची शिक्षा देण्यांत आली. अहमदाबाद राष्ट्रसभेचें अध्यक्षपद यांना देण्यांत आलें पण हे तुरुंगांत असल्यानें यांच्याकरितां हकीम अजमलखान यांनीं अध्यक्षाचें काम केलें (१९२१). सरोजिनी नायडू यांनीं यांचें अध्यक्षीय भाषण वाचून दाखविलें. हे सुटून आले तेव्हां चळवळ संपुष्टांत आली होती. तेव्हां यांनीं कौन्सिलांत शिरून अडवणूक करण्याची व तेथील काम बंद करण्याची घोषणा केली. गयेच्या राष्ट्रसभेंत हें अध्यक्ष असतांहि यांच्या कौन्सिलप्रवेशास मान्यता मिळेना तेव्हां यांनीं अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन स्वराज्यपक्षाची स्थापना करून आपलें धोरण राष्ट्रसभेला मान्य करण्यास भाग पाडलें आणि दिल्लीच्या जादा अधिवेशनांत तसा ठराव झाला (१९२३ सप्टें.).

यांनीं आपला पक्ष बंगाल कौन्सिलमध्यें बिनविरोध निवडून आणला, मंत्रिमंडळ स्थापण्यास नकार दिला आणि मंत्र्याच्या पगारांना मान्यता देण्याचें नाकारून मॉंटफर्ड सुधारणांचा बोजवारा उडविला.

याच वेळीं यांनीं कलकत्ता कार्पोरेशनमध्यें आपल्या पक्षाचे बहुसंख्य लोक निवडून आणले. हे स्वतः तेथें मेयर झाले (१९२४-२५), तसेंच तारकेश्वर देवस्थानांतील सदोष कारभार नष्ट करण्याकरितां यांनीं तेथें मोर्चा नेला (१९२४).

या वेळीं यांचा स्वराज्यपक्षच काँग्रेस बनला होता आणि हे त्याचे सर्वाधिकारी होते. पाटणाच्या अधिवेशनांत तर खादीचें महत्त्व कमी करण्यांत आलेंव सूतसभासदत्वाची अटहि वैकल्पिक करण्यांत आली. पण याच सुमारास गोपीनाथ साह नांवाच्या एका बंगाली माणसानें एका इंग्लिश गृहस्थाचा खून केला आणि सरकार व यांचा पक्ष यांच्यांत झगडा सुरू झाला. सरकारनें एक

जाहीरनामा काढला व ८० लोकांना संशयावरून पकडलें. कलकत्ता कार्पोरेशननेंहि सरकारच्या या धोरणाचा निषेध केला.

१९२४ च्या दिनाजपूरच्या बंगाल प्रान्तिक परिषदेनें गोपीनाथ साहच्या त्यागाबद्दल अभिनंदनाचा ठराव पास केला व यांनीं त्याला मान्यता दिली. मात्र यांच्या या धोरणाचा येथें व इंग्लंडांत विपर्यास करण्यांत आला.

१९२५ मध्यें त्या जाहीरनाम्यांतील प्रमुख कलमें बंगाल क्रिमिनल लॉ अमेन्डमेंट बिलाला जोडण्यांत आलीं. स्वराज्यपक्षानें तें बिल नापास केलें, पण सरकारनें तें खास अधिकारांत पास करून घेतलें.

तेव्हां यांनीं राजकीय शस्त्र या नात्यानें हिंसा करण्यावर कडक टीका करणारीं दोन पत्रकें प्रसिद्ध केलीं. याच वेळीं यांनीं सरकारकडेहि आपलें म्हणणें कळविणारें पत्रक धाडलें. ही सरकारला सहकार्याची पहिलीं पायरी वाटली. १९२५ च्या मे महिन्यांत बंगाल प्रान्तिक परिषदेच्या वेळीं यांनीं योग्य मुद्यावर सरकारशीं तह करण्याची आपली इच्छा प्रगट केली. पण उभयपक्षांत बोलणीं होण्यापूर्वीच ६ जूनला हे मृत्यु पावले.

राजकीय पुढाऱ्यांत आवश्यक असणारी लढाऊ वृत्ति यांच्यांत भरपूर होती. यांच्याइतका परमावधीचा त्याग आणि असाधारण लोकप्रियता इतरत्र क्वचितच आढळते. कवीचें हृदय आणि सत्पुरुषांची उदारता यांच्यांत एकवटली होती. हे एखाद्या राजासारखा दानधर्म करीत. शत्रुपक्षाचीं मर्मस्थानें शोधून काढण्याची अचूक बुद्धि यांच्यांत होती. एकदां एखादी योजना निश्चित केल्यानंतर तिचा चिकाटीनें पाठपुरावा करण्याचा यांचा स्वभाव होता. यांच्या मृत्यूनें शत्रुपक्षसुद्धां हळहळला. म. गांधींनी यांच्या स्मारकाकरितां दहा लक्ष रुपये जमविले आणि बेळगांव राष्ट्रसभेचे वेळीं व्यक्त केलेल्या यांच्या इच्छेप्रमाणें कलकत्ता येथील १४८ रूसा रोडवरील यांच्या वाड्याचें स्त्रिया व मुलें यांच्याकरितां हॉस्पिटलमध्यें रूपान्तर केलें. यांच्या पत्नी वासन्तीदेवी व पुत्र चिररंजन.

दास जतींद्रनाथ—(जन्म स. १९०४–मृत्यु स. १९२९ सप्टेंबर १३) सुप्रसिद्ध अन्नसत्याग्रही.

यांच्या वडिलांचें नांव बंकीमबिहारी दास. १९२० मध्यें मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर यांनीं देशभक्तीनें प्रेरित होऊन कॉलेज सोडलें. काँग्रेसचे सभासद वाढवणें हें यांचें प्राथमिक कार्य होतें. १९२२ मध्यें हे तीन महिन्यांची शिक्षा होऊन तुरुंगांत गेले. तुरुंगांतील अधिकाऱ्यांस त्यानें केलेल्या जाचाबद्दल थप्पड मारून यांनीं त्यास क्षमा मागण्यास भाग पाडलें होतें.

१९२४ सालीं 'साउथ कलकत्ता डिस्ट्रिक्ट काँग्रेस कमेटी'चे हे दुय्यम मंत्री बनले. याच वर्षी यांनीं "साऊथ कलकत्ता तरुण कमेटी"ची स्थापना केली. अनाथ लोकांना, भिक्षा मागून साहाय्य करणें हा या संस्थेचा उद्देश होता.

१९२५ मध्यें बंगाल ऑर्डिनन्सखालीं संशयामुळें यांना अटक झाली. मैमनसिंग येथील तुरुंगांतील कैद्यांस अधिकारी नीट वागवीत नाहींत म्हणून यांनीं २३ दिवस उपास केला होता. पुढें बहिणीच्या आजारीपणाकरितां यांची पंजाबच्या एका दूरच्या तुरुंगांतून मुक्तता करण्यांत आली.

पुढें हे लाहोरच्या तुरुंगांत असतां युरोपीय व हिंदी लोकांना देण्यांत येणाऱ्या भिन्न वागणुकीचा निषेध करण्याकरितां यांनीं अन्न-सत्याग्रह सुरू केला व चौसष्टाव्या दिवशीं लखनौ येथील पंजाब तुरुंगांत यांचा अंत झाला. यांच्या मृत्यूनें स्वदेशांतच काय परंतु परदेशांतहि खळबळ उडाली. अशाच प्रकारानें देह ठेवणाऱ्या आयरिश पुढाऱ्याच्या-टेरेन्स मॅक्स्विनीच्या पत्नीनें यांस संदेश पाठविला होता.

देशाच्या साठीं सतीचें वाण घेऊन प्राणावर पाणी सोडण्यास सज्ज असणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांना खुनी दरवडेखोरांप्रमाणें न वागवतां सन्मानानें वागविलें पाहिजे, या तत्त्वासाठीं जो आमरण झगडा भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनीं सुरू केला होता त्याची अत्यंत उज्वल परंपरा पुढें चालविण्याचें काम यांनीं केलें.

दिनकर, गणेश बळवंत—(जन्म स. १८८३–मृत्यु स. १९४४) महाराष्ट्रांतील माध्यंदिन शाखेच्या शुक्लयजुर्वेदी ब्राह्मणांची संघटना करणारे कार्यकर्ते व वकील.

हे बी. ए., एल्एल्. बी. होते. पहिलीं सात वर्षे कुरुंदवाड व रामदुर्ग संस्थानांत मामलेदार, न्यायाधीश

व कारभारी अशीं कामें केल्यावर शेवटपर्यंत पुणें येथें हे वकिली करीत. 'श्रीशुक्ल यजुःशाखीय माध्यंदिन महाराष्ट्र ब्राह्मणसभा' इत्यादि संस्था व वरील संस्थेची 'याज्ञवल्क्याश्रम पुणें' ही इमारत उभारून स्वशाखेची यांनीं संघटना केली.

व्यापक स्वरूपाचें समाजकार्य करणारांप्रमाणेंच पोटजातीला शिक्षण व विचार द्वारा उच्च पातळीवर आणण्याचा प्रयत्न करणारे यांच्या सारख्यांचें विधायक कार्यहि महत्त्वाचें असतें.

दिवाकर, रंगराव रामराव—(जन्म स. १८९४) कर्नाटकांतील राजकीय, सांस्कृतिक व भाषिक चळवळीचे सूत्रधार नि कानडींतील उत्कृष्ट लेखक.

हे हुबळीचे माध्व वैष्णव ब्राह्मण. बी. ए. झाल्यावर कांहीं दिवस हे हुबळीच्या कर्नाटक एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलमध्यें शिक्षक होते. एम्.ए. झाल्यानंतर हे कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत व नंतर क. ए. सो. च्या कॉलेजांत इंग्रजीचे प्राध्यापक झाले. एल्एल्. बी. होते तरी यांनीं वकिली कधींच केली नाहीं. असहकारितेच्या चळवळींत तर हे सुरुवातीपासूनच पुढें असत. यासाठीं १९२१ सालीं यांना पहिली शिक्षा झाली. त्यानंतरहि या कार्यासाठीं अनेक वेळां तुरुंगांत गेले. यांची अत्यंत साधी राहणी, संग्राहक वृत्ति आणि कष्टाळु स्वभाव यांमुळें यांना 'कर्नाटक गांधी' असें लोक म्हणतात.

कानडी, इंग्रजी, हिंदी व मराठी या भाषा यांना चांगल्या येतात. तथापि आपल्या कानडी भाषेचे हे सेवक आहेत. 'संयुक्त कर्नाटक' या दैनिक पत्राच्या संस्थेची संस्थापना करून आतां तिचे हे विश्वस्त झाले आहेत. त्या संस्थेतर्फे 'कर्मवीर' हें कानडी साप्ताहिकहि निघत असतें. यांचें कानडी भाषेंतील लेखन अत्यंत लोकप्रिय आहे. राष्ट्रीय वृत्ति आणि भक्तिमार्गी आध्यात्मिकता या गोष्टींच्या यांच्या ग्रंथांतील सुंदर मिलाफामुळें सर्व समाजाला हे आपलेसे वाटतात. छोटीं वाक्यें आणि ठसठसीत प्रतिपादन हा यांच्या लेखनाचा मुख्य धर्म आहे. कानडी भाषेच्या विशेष सेवेमुळें यांना बल्लारी कर्नाटक साहित्य परिषदेचें अध्यक्षस्थान देण्यांत आलें होतें. हे कर्नाटक-एकीकरण चळवळीचेहि फार मोठे पुरस्कर्ते आहेत.

यांचे कानडी ग्रंथ—१ हरिभक्तिसुधे, २ उपनिषद्रहस्य, ३ कर्मयोग, ४ उपनिषद्कथावली, ५ उपनिषद् प्रकाश, ६ अन्तरात्मनिगे, ७ गीतेय गुट्टु (गीतेचें मर्म), ८ भक्तिसूत्रगळु (नारद व शांडिल्य या सूत्रांवरील टीका), ९ सत्याग्रह (इतिहास मत्तु तंत्र), १० राष्ट्रीय शिक्षण (वर्धायोजना मत्तु प्रौढर शिक्षण), ११ वचनशास्त्र (लिंगायत धर्मग्रंथावर).

दिवेकरशास्त्री, महादेव वासुदेव—(जन्म स. १८८८) मराठींतील प्रसिद्ध लेखक, प्रवचनकार व सामाजिक कार्यकर्ते.

यांचा जन्म उगारखुर्द येथें झाला. शालेय शिक्षण संपविल्यानंतर विष्णुबुवा जोगांच्याकडे ज्ञानेश्वरीचें व नारायणशास्त्री मराठे यांचेकडे संस्कृतचें शिक्षण यांनीं घेतलें.

सार्वजनिक कामाची आवड असल्यानें प्राज्ञपाठशाळेचा प्रचार करून यांनीं पाऊण लाख रुपये मिळवून दिले. महाराष्ट्र हिंदुधर्म परिषद्, ब्राह्मण्यसंरक्षक परिषद्, हिंदुसभा वगैरेंत भाग घेऊन सामाजिक प्रश्नांना चालना दिली. धर्मनिर्णयमंडळाचे संस्थापनेंत भाग घेतला. ब्राह्मणांतील पोटजातींच्या एकीकरणाचा प्रयत्न केला व बुवाशाही-विध्वंसक संघ काढला.

यांचें वाङ्मय—१ हिंदुसमाज समर्थ कसा होईल ? २ आर्यसंस्कृति, ३ ब्राह्मणांतील भिन्नशाखीय विवाह, ४ धर्मशास्त्रमंथन, ५ नवा हिंदुधर्म, ६ विद्यार्थी धर्म, ७ गीताप्रदीप, इत्यादि.

दीपनारायणसिंग—(जन्म स. १८७५–मृत्यु स. १९३५) बिहारमधील राजकीय कार्यकर्ते व धनिक.

यांचें जन्मस्थान भागलपूर. पिता–तेजनारायणसिंग. हे इंग्लंडला जाऊन बॅरिस्टर होऊन आले पण यांनीं वकिली कधींच केली नाहीं. बंगाल कायदेमंडळांत हे निवडून आले होते (१९१०). असहकारितेच्या चळवळींत यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला. हे नाफेरवादी होते. १९३० च्या बिहारमधील चळवळीचे हे प्रमुख बनले व यांना चार महिन्यांची शिक्षा झाली. यांच्या वडिलांनीं स्थापलेलें भागलपूर कॉलेज यांनीं पुनरुज्जीवित केलें आणि आपली अनेक लक्षांची मिळकत औद्योगिक कार्याकरितां प्रान्ताला देऊन टाकिली. हे त्या वेळच्या उत्तम पोषाख करण्याऱ्या पांच गृहस्थांपैकीं एक होते. असहकारितेपूर्वी यांचे कपडे लंडनमधील पहिल्या दर्जाच्या शिंप्याकडून शिवून येत.

दीक्षित, शंकर बाळकृष्ण—(जन्म स. १८५३ जुलै २४–मृत्यु स. १८९८ एप्रिल २७) पाश्चिमात्य व पौर्वात्य गणितज्योतिषाचे सुप्रसिद्ध अभ्यासक व ग्रंथलेखक.

यांचा जन्म दापोली तालुक्यांतील मुरुड गांवीं झाला व तेथेंच प्राथमिक मराठी शिक्षण झालें. त्या वेळीं संस्कृत व वेद यांचेंहि बेताचें शिक्षण यांनीं घेतलें. पुढें दोन वर्षे दापोली कोर्टात उमेदवारी करण्यांत व इंग्रजी शिकण्यांत गेलीं. स. १८७० पासून तीन वर्षे हे पुणें ट्रेनिंग कॉलेजांत होते. पुढें हे मॅट्रिक झाले (१८७४). नंतर रेवदंडा, ठाणें, बार्शी, धुळें येथें शाळेंत व ट्रेनिंग कॉलेजमध्यें काम केल्यावर शेवटचीं चार वर्षें यांनीं पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजमध्यें काढलीं.

यांना गणित विषयाचा नाद पहिल्यापासून होता. परंतु ज्योतिषाचा नाद लागण्यास वर्तमानपत्रांतील लेखांचें वाचन कारणीभूत झालें. रेवदंड्यास असतां कै. विसाजी कृष्ण लेले यांचे ' स्फुट वक्ता अभियोगी ' या सहीनें सायनवादावर वर्तमानपत्रांत लेख येत असत. ते वाचून यांचें लक्ष ज्योतिषाकडे वेधलें. पुढें ठाण्यास जनार्दन बाळाजी मोडक यांच्याशीं स्नेह झाल्यानें यांचा ज्योतिषाचा अभ्यास वाढला. शेवटीं तर मोडक यांना हे आपले गुरु मानूं लागले. लेल्यांप्रमाणें हे सायनवादी बनून या तिघांनीं सायनपंचांग प्रसिद्ध करण्याचा उपक्रम केला तो यांनीं १०।१२ वर्षे चालविला; पण तो यांच्या मागें बंद पडला.

डॉ. फ्लीट यांनीं आपल्या ' गुप्तइनस्क्रिप्शन्स् ' या ग्रंथांत ' यांची मदत नसती तर मला गुप्तांचा शककाल निश्चित करतां आलाच नसता ' अशी स्पष्ट कबुली दिली आहे. त्याचप्रमाणें ' इंडियन कॅलेंडर ' या ग्रंथाची योजना ठरवून त्याचें गणित देखील पुरें करण्यापर्यंत सुएलनें मजल गाठली असतां त्यांची व यांची भेट झाली. त्याबरोबर मेष संक्रांतीचे व इतर कांहीं आंकडे देऊन सदर ग्रंथाची उपयुक्तता पुष्कळच वाढविण्याची युक्ति यांनीं दाखविली व ती सुएललाहि इतकी महत्त्वाची वाटली कीं ' तो भाग दीक्षितांनीं तयार करावा व ग्रंथ दोघांच्याहि नांवांनें प्रकाशित व्हावा ' असें ठरलें. तथापि या ग्रंथाच्या प्रास्ताविक भागांत बहुतेक टीपा S. B. D. या यांच्या सहीच्या आहेत. त्यांतील कांहीं माहिती अगदीं नवी व प्रचलित विचारांना धक्का देणारी होती. तशी ती माहिती यांनीं निर्भयपणें नमूद केली आहे.

' भारतीय ज्योतिषशास्त्र ' या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत हे लिहितात— ' आमच्यांतील कांहीं कांहीं विद्वानांस देखील युरोपियनांचें वाक्य म्हटलें कीं, तें कसेंहि असलें तरी वेदवाक्य वाटतें. ही गोष्ट स्वतःचे योग्यतेचा भरंवसा व विद्वत्तेची खात्री नाहीं, असें दाखविणारी आहे. '

' भारतीय ज्योतिषशास्त्र ' हा यांचा ग्रंथ मराठी भाषेंत अत्यंत उच्च दर्जाचा ग्रंथ आहे वैदिक कालापासून यांच्या वेळेपर्यंतच्या अनेक भारतीय ग्रंथांतून आढळणारी ज्योतिषविषयक माहिती एकत्र करून तिच्यावरून निघणारीं अनुमानें ऐतिहासिक पद्धतीनें अत्यंत थोडक्यांत या ग्रंथांत मांडलेलीं आढळतात. याकरितां यांनीं पांचशेंपेक्षां अधिक संस्कृत ग्रंथांचें बारकाईनें वाचन केलें. शेंकडों दुर्बोध स्थळें सुबोध केलीं. आर्यभट, वराहमिहिर, ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य वगैरे ग्रंथकारांचा परिचय करून घेण्याचें सुलभ साधन मराठींत निर्माण केलें. पंचांगशोधनविषयक माहिती व पक्षोपपक्षांचे मुद्दे या ग्रंथांत संग्रहित केले. तसें करतांना १ सायन पंचांगाची ग्राह्यता, २ वेदांचें प्राचीनत्व, ३ ज्योतिषशास्त्रांतील गणित भागाचें भारतीयत्व इत्यादि आपलीं मतेंहि नमूद केलीं. यांपैकीं दुसऱ्या व तिसऱ्या विषयांचें प्रतिपादन करतांना यांना युरोपियनांचे सिद्धान्तवत् मानलेले अभिप्राय कसे चुकीचे आहेत हें दाखवावें लागलें आणि ' कृत्तिका पूर्व दिशेस उगवतात, तेथून त्या चळत नाहींत' या अर्थाच्या शतपथ ब्राह्मणांतील उताऱ्यावरून इ. स. पूर्वी दोन हजार वर्षे हा जो त्या ग्रंथाचा काल यांनीं ठरविला तो कसा खोडावा हें युरोपियनांना कोडें पडलें. तसेंच ' ग्रीक ज्योतिषांचीं मूळतत्त्वें हिंदुस्थानांत आलीं ' या थिबोच्या मताचें, त्यांत कोठेंहि साम्य नसल्याचें दाखवून यांनीं खंडन केलें (भा. ज्यो. पा. ५१३). ' टॉलेमीपासून हिंदूंस ज्योतिषाचें सर्वस्व मिळालें ' या बर्जेसच्या प्रतिपादनाचें ' टॉलेमीपूर्वीच्या वासिष्ठ सिद्धान्तांत अंशांचे साठ भाग ' सांपडतात हें दाखवून दिवसाचे ६० विभाग ही कल्पना टॉलेमीनें आमच्यापासून घेतल्याचें यांनीं दाखवून दिलें.

ज्योतिषविषयक प्रश्नांच्या वादांत हे अधिकारयुक्त वाणीनें बोलूं शकत. कारण यांनीं पाश्चात्य व पौर्वात्य दोन्ही ग्रंथांचें परिशीलन व मनन करून तो अधिकार

संपादन केला होता. हें सव्यसाचित्व यांच्या विद्वत्तेचें विशेष अंग होतें.

सायन-निरयन वादावरून यांचें लक्ष ज्योतिषाकडे गेल्यावर ज्योतिषाचा प्राचीन काळापासून शोध करण्यास यांनीं आरंभ केला. इतक्यांत ज्योतिषाच्या इतिहासावर ग्रंथ लिहिण्यास बक्षिस ठेवून 'दक्षिणा प्राइज कमेटी'नें जाहिरात दिली. त्यामुळें यांनीं ग्रंथ लिहिण्यास सुरुवात केली. याच सुमारास अशाच प्रकारच्या ग्रंथास गायकवाड सरकारनें बक्षिस लावलें. गायकवाड सरकारास हिंदु पंचांगवर्णनाचें पुस्तक पाहिजे होतें. यासंबंधींची माहितीहि या पुस्तकांत समाविष्ट केली असल्यामुळें यांना हीं दोन्ही बक्षिसें मिळालीं.

यांच्या या ग्रंथाची योग्यता फार मोठी आहे. ज्याच्या वाचनाकरितां अन्य देशांतील लोकांस देखील मराठी भाषेचें ज्ञान मिळविण्याची स्फूर्ति उत्पन्न व्हावी अशा योग्यतेचा यांचा हा ग्रंथ आहे. वैदिक वाङ्मयाच्या समालोचनाची परिपूर्णता, वेदाङ्गकालीन ज्योतिषाचें विवेचन व अर्थनिष्कासन व इतर विद्वानांना कुंठित करणाऱ्या अनेक गोष्टींचा उलगडा, यांमुळें यांच्या या ग्रंथास कायमची मान्यता मिळाली आहे. परिपूर्णता आणि निश्चितता हा यांच्या ग्रंथांचा विशेष आहे.

पाश्चात्य व पौर्वात्य या ज्ञानाचे दोन्ही शाखांत यांनीं मिळवलेल्या प्रावीण्यामुळें यांच्या बारीकसारीक मतालाहि एक प्रकारचें वजन प्राप्त होई.

यांचे ग्रंथ—ज्योतिषशास्त्र-१ ज्योतिर्विलास अथवा रात्रीच्या दोन घटका मौज; २ हिंदुपंचांग (रॉबर्टसुएल व दीक्षित), ३ भारतीय ज्योतिःशास्त्र अथवा भारतीय ज्योतिषाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास (पहिली आवृत्ति स. १८९६, दुसरी आवृत्ति स.१९३१). धर्म-४ धर्ममीमांसा (१-२ भाग, १८९५ मॅक्स मूलरच्या पुस्तकाचें भाषान्तर). भूगोल-५ भारतभूवर्णन (भाषान्तर १८९९), ६ विद्यार्थिबुद्धिवर्धिनी (शालेय), ७ सृष्टचमत्कार (शालेय), ८ सोपपत्तिक अंकगणित (शालेय).

देव, बाळकृष्ण नारायण—(जन्म स. १८५८-मृत्यु स. १९३०) मराठींतील सुप्रसिद्ध टीकाकार, निबंधलेखक व चरित्रकार.

यांचा जन्म धुळें येथें व शिक्षण इन्दुरास झालें. विनायकराव कीर्तने यांच्या सहवासाचा आणि ग्रंथसंग्रहाचा यांनीं चांगला फायदा घेतला. विद्यार्थिदशेंत असतां यांना लेखनाची स्फूर्ति निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळुणकरांच्या लेखांनीं मिळाली. यांनीं डॉ. जॉन्सनच्या चरित्रासंबंधीं कांहीं विधायक सूचना पाठविल्या, त्या निबंधमालेच्या ७५ व्या अंकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. यांचे निबंध प्रायः विविधज्ञानविस्तार व ग्रन्थमाला या मासिकांत प्रसिद्ध होत. विष्णुशास्त्री चिपळुणकर यांच्या चरित्रावरील ग्रंथमालेंत आलेला यांचा निबंध बराच गाजला. यांचे सडेतोड विचार न पटल्यानें वासुदेवराव मुंडले यांनीं त्याला उत्तर देण्याचा प्रयत्न केला. त्याप्रमाणें यांच्या नाना फडणिसांवरील निबंधाची स्थिति आहे. नाना फडणिसाचा उत्सव करण्याची प्रथा १९०० सालीं सुरू झाली आणि यांचा निबंध १९०३ सालीं विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झाला. यांनीं नानांच्या चरित्राची ऐतिहासिक साधनांच्या आधारें चिकित्सा करून नाना हा असामान्य कोटींत बसण्यासारखा नव्हता, हें दाखवून दिलें. त्यामुळें वादाची बरीच रणधुमाळी माजली. यांच्या लेखनांत अभ्यास, चिकित्सक दृष्टि आणि मांडणी यांचा सुंदर संयोग आढळतो.

यांचे ग्रंथ—१ बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांचें चरित्र (१८९२), २ रामशास्त्री प्रभुणे, १८९२, २ चिपळुणकर यांचे चरित्रावर टीका, १९०१, ४ नाना फडणीस १९०४, ५ रा. ब. वि. ज. कीर्तने यांचें चरित्र १९०९, ७ काव्यकोश, ८ देवांचे स्वभाव व सामर्थ्य. याशिवाय यांनीं अनेक ग्रंथांचीं परीक्षणें व २४ निबंध लिहिले.

देव, शंकर दत्तात्रेय—(जन्म १८९४ जाने. ४) महात्मा गांधींचे अनुयायी, राष्ट्रसभेचे ध्येयवादी निष्ठावन्त कार्यकर्ते व परिणामकारक वक्ते.

हे बी. ए. झाल्यानंतर यांनीं राष्ट्रीय कार्यांत भाग घेण्यास सुरुवात केली. प्रथम बिहारमधील चंपारण्यांत म. गांधींना मदत करण्याकरितां स्वयंसेवक म्हणून हे गेले. तेव्हांपासून म. गांधींच्या प्रतिपादनाचा पुरस्कार करण्याचें काम यांनीं अखंड चालविलें आहे. महाराष्ट्रांत म. गांधींच्या असहकारितेच्या कार्यक्रमाला जुन्या पुढाऱ्यांचा सर्वस्वीं विरोध असतांना आणि नवी पिढी त्या कार्यक्रमाबद्दल साशंक असतांना यांनीं त्याचा मोठ्या तडफदारपणें आणि युक्तिवादपूर्वक पुरस्कार केला.

यांना संघटित आणि समर्थ विरोधांतून मार्ग काढावा लागला. सत्याग्रहाचे १९३० व १९३२ चे लढे झाल्यानंतर १९३४ सालीं महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमेटीच्या अध्यक्षपदावर यांची निवडणूक झाली. पूर्ण त्याग, कमालीची निष्ठा आणि संघटना-सामर्थ्य यांच्या जोरावर यांनीं पक्षसंघटना करून खानदेशांत फैजपूर येथें राष्ट्रसभेचें पहिलें ग्रामीण अधिवेशन यशस्वीपणें भरविलें. तेथें हे स्वागताध्यक्ष होते (१९३६). हे तेव्हांपासून राष्ट्रसभेच्या कार्यकरिणीच्या पंधरा सभासदांपैकीं एक आहेत. यांनीं अनेक वेळां तुरुंगवास भोगला असून मुळशी सत्याग्रहाचे तुरुंगवासांत फटक्यांची शिक्षाहि भोगिली आहे.

हे देव, वासुदेव विनायक दास्ताने, भुसावळ, देवकीनंदन नारायण, जळगांव, गोपाळ अबाजी ऊर्फ तात्या देशपांडे, पुणें व यांच्यांत मागाहून दाखल झालेले त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर, या पंच'दे'कारांच्या कार्यात्मक चरित्राचा महत्त्वाचा भाग कु. प्रेमाबाई कंटक यानीं आपल्या 'सत्याग्रही महाराष्ट्र' या ग्रंथांत रेखाटला आहे.

यांचीं पुस्तकें:—१ उपनिषदांतील दहा गोष्टी (तृतीय आवृत्ति १९४४). या पुस्तकाचें हिन्दींत भाषान्तर झालें आहे. २ असहकारयोग. स्वराज्य व सत्याग्रही या साप्ताहिकाचे हे संपादक होते.

देव, शंकर श्रीकृष्ण— (जन्म स. १८७१) रामदासी वाङ्मयाचे महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध अभ्यासक, संशोधक व संग्राहक वृत्तीनें सतत काम करणारे गृहस्थ.

हे बी. ए., एल्एल्. बी. आहेत. परंतु बी. ए. झाल्यानंतर ताबडतोब यांनीं सत्कार्योत्तेजक सभेची स्थापना केली (१८९३). एकवीस हजार पृष्ठांच्या ७५ ग्रंथांचें व 'इतिहास व ऐतिहासिक' आणि 'रामदास व रामदासी' या मासिकांचें प्रकाशन, इतकें कार्य करून या संस्थेच्या सुवर्ण–महोत्सवाचे वेळीं यांनीं तिला विश्वस्तांचे ताब्यांत दिली (१९४३).

संशोधन आणि प्रकाशन या कार्यांबरोबरच जांब, चाफळ, सज्जनगड, मसूर, शहापूर, शिवतर इत्यादि ठिकाणीं जीर्णोद्धाराचीं कामें यांनीं केलीं. पण सगळ्यांत महत्त्वाचें जीर्णोद्धाराचें कार्य म्हणजे जांबेचें श्रीसमर्थमंदिर होय. निजाम इलाख्यांत जांब येथें श्रीसमर्थांच्या जन्मस्थानीं स. १९३२ सालीं सभेनें एक टोलेजंग आणि सुंदर श्रीसमर्थमंदिर बांधलें. श्रीसमर्थांच्या नयनमनोहर मूर्तीची प्राणप्रतिष्ठा या मंदिरांत शके १८५४ चैत्र शु. ९ स करण्यांत आली. या मंदिराच्या बांधकामाकरितां ४०।५० हजार रुपये लागले. हा सारा पैसा रामेश्वर ते क्वेटा व कलकत्ता ते अहमदाबाद असे दौरे काढून व स्वयंसेवकांमार्फत यांनीं जमा केला. आतांपर्यंत मंदिराच्या योगक्षेमासाठीं १५।२० हजार रुपये खर्च झाले आहेत. या ६०-७० हजारांशिवाय १००।२०० बिघे शेतीहि मंदिरास इनाम मिळाली आहे. ५०००० रु. चा कायम निधि जमा होत आहे. आतां नोंदलेल्या विश्वस्तपत्रानें या मंदिराचा ताबा व सर्व व्यवस्था सभेनें विश्वस्तमंडळाकडे सोंपविली आहे. या विश्वस्तांत निजाम इलाख्यांतील ४० आणि महाराष्ट्रांतील १५ असे ५५ सभासद आहेत. हैद्राबादचे बॅ. श्रीधरपंत नाईक, अध्यक्ष व औरंगाबादचे वकील श्री हनुमंतराव वैष्णव हे विश्वस्तमंडळाचे कार्यवाह आहेत.

सत्कार्योत्तेजक सभेच्या संशोधनाचें फळ म्हणजे यांनीं केलेल्या सुमारें तीन हजार हस्तलिखित बाडांचा आणि तितक्याच ऐतिहासिक कागदपत्रांचा संग्रह होय. अशा या अमोल संग्रहाचें संरक्षण व्हावें आणि तो पूर्णपणें जनतेच्या मालकीचा व्हावा म्हणून स. १९३५ सालीं 'श्रीसमर्थवारदेवता मंदिर' म्हणून धुळें येथें जनतेनें दिलेल्या १५ हजारांची एक अदाह्य इमारत बांधून ती इमारत व वरील संग्रह विश्वस्तपत्रानें विश्वस्तांच्या हवालीं करण्यांत आला. जात-धर्म-पंथनिरपेक्ष कोणालाहि या संग्रहाचा उपयोग करितां येतो. मात्र कोणतेंहि हस्तलिखित कोणालाहि मंदिराच्या बाहेर नेतां येत नाहीं. मंदिराचा वार्षिक खर्च देणग्यांनीं व मुंबई सरकारच्या मदतींतून चालतो. मंदिरांतील संग्रहाची वर्णनात्मक यादी देणारे अकराशें पानांचे दोन खंड प्रसिद्ध झाले आहेत.

यांनीं श्रीसमर्थांच्या तत्त्वाचा विचार, आचार आणि प्रचार करण्याच्या उद्देशानें 'श्रीसमर्थसंघ' नांवाची संस्था काढली (शक १८६१ ज्येष्ठ शु. १४). तिची मुख्य शाखा धुळें येथें असून तंजावरपासून काशीपर्यंत ४८ शाखा आहेत. मुख्य शाखेचे अध्यक्ष अहमदाबादचे नामदार मावळणकर व चिटणीस हे आहेत.

हा सर्व संस्थांचा व्याप संभाळतांना देशांत होणाऱ्या राजकीय चळवळींत भाग घेण्याचें यांचें काम अव्याहत चालू असतें आणि प्रत्येक चळवळींत हे आपल्या वैशिष्ट्यानें चमकल्याशिवाय राहत नाहींत. टिळक व गांधी युगांत यांचें स्थान अग्रभागींच आहे.

आस्थेवाईक व चिरस्थायी वाङ्मयेतिहास-संशोधकांत यांचें नांव कोणालाहि नमूद करावें लागेल. यांची त्यागी वृत्ति आणि जन्मभर एका दिशेनें परिश्रम करून मिळविलेलें साहित्य लोकांपुढें व्यवस्थितपणानें ठेवण्यांतील यांची योजकता ध्यानांत घेण्यासारखी आहे. सार्वजनिक कार्यांतील यांची सचोटी, व्यवस्थितपणा आणि प्राञ्जळपणा यांमुळें यांनीं मागतांच लोकांनीं यांना हजारों रुपये आणि आपल्या संग्रहांतील अमूल्य बाडें व हस्तलिखित ग्रंथ दिले. ती सर्व ठेव समजून यांनीं अधिक व्यवस्थेनें लोकांना पुनः परत दिली आहे. असें करतांना यांना कितीतरी प्रकारची झीज सोसावी लागली. पण कर्तव्यबुद्धीनें हें सर्व केलें असल्यानें त्याचें मूल्य करणें अशक्य आहे. अशा निष्ठा, चिकाटी, परिश्रम, कर्तृत्व, उरक, तडफ व निर्व्यसनीपणा वगैरेंना इतरत्र तोड सांपडणें अशक्य आहे.

रुंद, पसरट चेहरा, गौरवर्ण, सक्कस व उंच शरीरयष्टि, जुन्या थाटाचा खादीचा अंगरखा, पांढरा लहानसा रुमाल वगैरे यांच्या बाह्य गोष्टींचा अनुकूल परिणाम पाहणारावर होतो आणि यांच्या अकृत्रिम वक्तृत्वानें तर मनुष्य भारला जातो. रामदासी व इतर कार्यासाठीं चाललेल्या तपश्चर्येमुळेंहि कित्येक गुण यांच्यांत उतरले आहेत.

यांचें वाङ्मय—१ रामदास आणि रामदासी मासिक पहिला अंक १८३७ (स. १९१५), २ इतिहास व ऐतिहासिक मासिक, पहिला अंक १८३८ (१९१०).

स्वतंत्र ग्रंथ—३ जपानची मर्दुमकी, ४ श्रीसमर्थहृदय (समर्थ चरित्राचा दुसरा खंड), ५ श्रीसमर्थ संप्रदाय (समर्थ चरित्राचा तिसरा खंड) इत्यादि.

देवधर, गोपाळ कृष्ण—(जन्म स. १८४९–मृत्यु स. १९३५) पुण्यांतील स्त्रियांची सेवासदन संस्था आणि सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी या दोन प्रमुख संस्थांचे उत्पादक आणि मिशनरी पद्धतीनें कार्य करणारे समाजसेवक.

यांचा जन्म गरीब घराण्यांत झाला. वडील संन्यास घेऊन काशीस जाऊन राहिले होते. त्यामुळें दुय्यम शिक्षणापासून यांना स्वावलंबी वृत्ति पत्करावी लागली. हे कांहीं दिवस मधुकरीहि मागत.

न्यू इंग्लिश स्कूल पुणें येथें नादारी मिळवून प्रिंसिपल वामन शिवराम आपटे यांच्या देखरेखीखालीं अभ्यास करून संस्कृतची जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ति मिळविण्याचा यांचा प्रयत्न दीड मार्कानें फसला.

हे स्वावलंबनानें एम्. ए. झाले (१९०४). मुंबई विद्यापीठांत मराठी घेऊन एम्. ए. झालेले हे पहिलेच विद्यार्थी होत. पुढें तर हे एम्. ए.ला मराठीचे परीक्षकहि असत.

बी. ए. झाल्यावर आलेल्या चांगल्या पगाराच्या नोकऱ्या सोडून यांनीं मुंबईच्या आर्यन एज्युकेशन सोसायटींत अध्यापनाचें कार्य पत्करलें, पुढें तेथें हे मुख्याध्यापकहि झाले.

ना. गोखले यांनीं संन्याशी वृत्तीनें काम करणाऱ्या भारतसेवक समाजाची कल्पना यांच्यापुढें मांडतांच हे ताबडतोब आकर्षिले गेले आणि आरंभीच्या सभासदांत दाखल झाले (१९०५). पाश्चात्य मिशनऱ्यांवर दुःखनिवारणार्थ हिंदी जनतेनें अवलंबून राहणें यांना पसंत नसल्यानें यांनीं विशेषतः स्त्रियांच्याकरितां सेवासदन नांवाची संस्था प. वा. रमाबाई रानडे यांच्या नेतृत्वानें सुरू केली. तेथें समाजसेवेच्या अनेक योजना मूर्त स्वरूपांत आणल्या आणि स्त्रीविषय व्यापक कार्याचा नमुना समाजापुढें ठेवला. प्रथम १०-१२ स्त्रियांच्या सहकार्यानें सुरू केलेली ही संस्था आतां हजारों स्त्रियांनीं, विविध शाखांनीं आणि वेगळाल्या कल्पनांनीं कार्य करीत आहे. स्त्रीशिक्षणास विरोध होता अशा वेळीं यांनीं ही कामगिरी केलेली आहे. सामाजिक सुधारणेचें कार्य समाजसेवेची जोड देऊन केलें असतां विरोधक कसे हतप्रभ होतात हे यांच्या कार्यावरून दिसून येतें. उक्तीला कृतीची जोड देण्यावर यांचा कटाक्ष असे.

होलिकासंमेलनें भरवून लोकजागृति करणें वगैरे अनेक कार्यें यांचीं सतत चालू असत. मुंबईच्या समाजसंघाचा जन्म यांच्या या अशा कार्यांतूनच झाला. कार्य करण्याच्या तळमळीबरोबरच सर्वांत मिसळून प्रत्यक्ष काम करण्यावर यांचा कटाक्ष असे. कोठेंहि दुष्काळ, पूर, आग, भूकंप वगैरे आपत्ति आली कीं हे तेथें हजर राहून कामाला लागल्याशिवाय कधींहि राहावयाचे नाहींत. जात, धर्म, किंवा प्रान्त या सर्वांच्या पलीकडे राहून केवळ सेवावृत्तीनें काम करण्याची यांची वृत्ति सर्वत्र आढळून येई.

अशा व्यापक व सतत केलेल्या समाजसेवेमुळें १९२७ च्या जूनमध्यें यांना एकमतानें सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे अध्यक्ष निवडण्यांत आलें. यांच्यापूर्वी ना. श्रीनिवासशास्त्री हे अध्यक्ष होते. यांच्यानंतर पं. हृदयनाथ कुंझरू हे अध्यक्ष झाले.

देवधर, प्रो. दिनकर बळवंत—(जन्म स. १८९१) सुप्रसिद्ध क्रिकेटपटु.

जन्मस्थान पुणें. एम्. ए. झाल्यावर हे पुण्याच्या सर परशुराम भाऊ कॉलेजमध्यें संस्कृतचे प्राध्यापक बनले (१९१७).

क्रिकेटसारख्या लहरी खेळांतहि ज्यांचें बॅटिंग हटकून रंगतें अशा थोड्या हिंदी क्रिकेटपटूंत यांचा समावेश होतो. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनला सर्व हिंदुस्थानांत सतत दोन वर्षें अजिंक्यपद मिळवून देण्यांत यांनीं लावलेल्या हातभारामुळें हे प्रथम लोकांचे डोळ्यांसमोर आले. व एम्. सी. सी. विरुद्ध झालेल्या मॅचमध्यें निसटून चाललेली विजयश्री हिंदी लोकांना मिळवून देऊन हे सर्वत्र परिचित बनले. तेव्हांपासून क्रिकेटमध्यें यांनीं स्वतःचे असे अनेक विक्रम प्रास्थापित केले आहेत.

रणजी ट्रॉफीतील यांचीं प्रसिद्ध शतकें: १५७ (१९३९-४०), २४६ (१९४०-४१), १६४ (१९४०-४१), १९६ (१९४०--४१).

पंचरंगी सामन्यांतील यांचा १९४५ पर्यंतचा खेळः ५१ इनिंग्ज, १५३६ धावा, १३५ जस्तींतजास्त धांवा.

देवधर, बाळंभटदादा जनार्दनबाबा—(जन्म १७८० सुमार–मृत्यु स. १८५२ सुमार) सुप्रसिद्ध मल्लविद्याविशारद, कुस्तीगीर व मल्लखांबाच्या व्यायामाचे उत्पादक.

यांचें घराणें नाशिक जिल्ह्यांतील निफाड तालुक्यांतील कोठुरें गांवीं बरव्यांच्या आश्रयानें असे. बरवे हे पेशव्यांचे आप्त असल्यानें हे पेशवाईच्या अखेरच्या कालांत वडिलांच्या बरोबर पुण्यास आले (१७९६ सुमार). त्या वेळीं यांचें वेदाध्ययन झालेलें होतें. पुण्यास हे राघोबा वस्तादाच्या तालमींत जात. पेशव्यांच्या आश्रित बावन पहिलवानांत राघोबा वस्ताद प्रमुख होता. त्याचा चेला सदू तेली यानें दुसऱ्या पक्षास मिळून राघोबासच कुस्तीस आव्हान दिलें. राघोबा थकलेला असल्यानें त्यानें यांना त्याच्याशीं कुस्ती खेळण्यास तयार केलें. आणि यांनीं ती कुस्ती जिंकली. तेव्हां यांचें नांव विख्यात झालें आणि यांना पहिलवान म्हणून राजाश्रय मिळाला.

पुढें अली व गुलाब नांवांचे निजामाचा आश्रय असणारे दोघे पहिलवान अजिंक्यपत्रें घेत पुण्यास आले. त्यांनीं पेशव्यांच्या दरबारांत कुस्ती किंवा अजिंक्यपत्र मागितलें. तेव्हां पेशव्यांनीं यांना सहा महिन्यांची मुदत देऊन कुस्तीकरितां तयार करविलें. यांनाहि सप्तशृंगीचा व मारुतीरायाचा अनुग्रह मिळाला आणि यांनीं कुस्तीच्या वेळीं गळखोड्याचा डाव करून अलीस चीत केलें. अलीची स्थिति पाहून गुलाबनें कुस्ती खेळण्याचेंच नाकारलें. या अजिंक्य ठरलेल्या पहिलवानाशीं झालेल्या यशस्वी कुस्तीनें यांचें नांव सर्वत्र विख्यात झालें.

हिंदु-मुसलमान अशा दोन्ही जातींच्या यांच्या शिष्यशाखा आजहि सर्वत्र वावरत आहेत. त्यांत काशीचे कोंडभट गोडबोले, अच्युतानंद स्वामी व त्यांचे चिरंजीव नारायण गुरु ही व टक्के जमाल व त्यांचे शिष्य जुम्मादादा ही परंपरा प्रमुख आहे.

सुप्रसिद्ध मल्लविद्याविशारद व प्रचारक नारायणगुरु देवधर हे यांचे चिरंजीव होत.

देवराज लाला—(जन्म स. १८६० मार्च ३–मृत्यु स. १९३५ एप्रिल १७) पंजाबांतील स्त्रीशिक्षणाचे थोर पुरस्कर्ते, सुधारक, समाजसेवक, शिक्षणशास्त्री व देशभक्त.

यांनीं जालंदर येथें आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें कन्या महाविद्यालय स्थापन केलें (१८८६). याकरितां यांनीं आपलें सर्व सामर्थ्य खर्ची घातलें आणि त्या विद्यालयाचा उत्कर्ष साधला. यांनीं पंचविसांपेक्षां अधिक पाठ्य पुस्तकें हिन्दींत या विद्यालयाकरितां लिहिलीं. हे अत्यंत चारित्र्यशील म्हणून यांची पंजाबमध्यें ख्याति होती.

देवल, गोविंद बल्लाळ—(जन्म स. १८५४–मृत्यु स. १९१६) मराठींतील सुप्रसिद्ध नाटककार व नाट्यशिक्षक.

यांचा जन्म कोंकणांत, बाळपण सांगलीनजीक हरिपुर येथें आणि दुय्यम शिक्षण बेळगांवच्या सरदार हायस्कूलमध्यें झालें. तेथें कांहीं दिवस नोकरी केल्यावर यांनीं पुण्याच्या शेतकी शाळेंत दाखल होऊन तेथील परीक्षा दिली (१८८४).

शाळेंत असल्यापासून यांना कविता व नाटकें यांचा नाद होता. तेथें अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे शिक्षक होतें. पुण्यास यांनीं श्री. भि. सरदेसाई यांच्या सहकार्यानें 'कादम्बरीकलाप' नांवाचें मासिक काढलें (१८८५).

यांनीं लिहिलेलीं मराठी नाटकें–संस्कृतवरून–१ मृच्छकटिक, २ विक्रमोर्वशीय, ३ शापसंभ्रम (बाणभट्टाच्या कादम्बरीवरून). इंग्रजीवरून–४ दुर्गा (१८८०), ५ झुंझारराव (अथेल्लो), ६ गद्य–फाल्गुनराव, पद्य–संशयकल्लोळ, (१९१६) स्वतंत्र–७ शारदा (१८९९).

लोकांना सहज समजेल अशी घरगुती सुंदर भाषा लिहिणारा यांच्यासारखा मराठी नाटककार अद्यापि झाला नाहीं. यांची पद्यरचनासुद्धां गद्याप्रमाणें सुबोध असते. भाषेप्रमाणेंच लोकव्यवहाराचें यथार्थ चित्रण आणि जिवन्त स्वभावरेखन यांमुळें यांचीं नाटकें सदोदित टवटवीत फुलांसारखीं आकर्षक वाटतात. यांना विनोदाकरितां स्वतंत्र पात्रें निर्माण करावीं लागलीं नाहींत. यांचें संशयकल्लोळ हें नाटक स्वभाविक भाषा व विनोद यांमुळें मराठींतील उत्कृष्ट यशस्वी नाटकांत मोडतें. यांच्या शारदा नाटकानेंहि मराठी रंगभूमि दीर्घकाल गाजविली.

चतुर अभिनयशिक्षक म्हणूनहि यांची विशेष ख्याति होती. रंगभूमीवर करावयाचा अभिनय नटाच्या हाडींमांसीं खिळला पाहिजे यावर यांचा कटाक्ष असे. स्त्रीभूमिका व पुरुष-भूमिका शिकविण्यांत हे सारखेच तरबेज असत. बारीकसारीक गोष्टींतसुद्धां अभिनय कसा करावा इकडे यांचें लक्ष असे. नमस्कार करतांना बायका गुडघ्यांत वांकत नाहींत ही गोष्ट यांनीं आपल्याला शिकविल्याचें बालगंधर्व सांगतात.

देवल, व्यंकटराव तथा बाबासाहेब—(मृत्यु स. १९२१ आगस्ट ८) ग्रेट इंडियन सर्कसचे सुप्रसिद्ध चालक.

हे मूळ विष्णुपंत छत्रे यांच्या सर्कशींत होते. १८९५ सालीं दसऱ्याच्या मुहूर्तावर यांनीं आपली स्वतंत्र सर्कस काढली व चारहि खंडांत प्रवास करून पैसा व कीर्ति संपादन केली. यांच्या मागें मुलांनीं यांची सर्कस उत्तम प्रकारें चालवून तिला पन्नास वर्षें पूर्ण झाल्याचा समारंभ हुबळी येथें साजरा केला. शारीरिक कामाप्रमाणेंच पशुवशीकरणाबद्दल यांची ख्याति होती.

देशपांडे, अबाजी श्रीपत—(जन्म स. १८६४ मार्च २३) यशस्वी शिक्षक व संशोधक.

जन्मस्थान–मायणी, ता. खटाव, जि.सातारा. हे अत्यंत गरीबींतून स्वकष्टानें मार्ग काढीत 'थर्ड इयर ट्रेंड' झाले. शिक्षकाच्या व्यवसायांत यांनीं दक्ष, प्रेमळ, अभ्यासी व चारित्र्यसंपन्न म्हणून नांव कमाविलें. नोकरीच्या अखेरीस असिस्टंट डेप्युटी होते. इंग्रजीचा व मोठ्या प्रयोगशाळेचाहि अभाव असतांना यांनीं ग्रहांच्या गति दाखविणाऱ्या व ज्योतिषशास्त्राचे कांहीं सिद्धान्त सुलभतेनें समजावून देणाऱ्या 'ग्रहभ्रमण' यंत्राचा शोध लावला. त्याचबरोबर मुलांना बाराखड्या शिकविण्यासाठीं बाराखड्यापेटी तयार केली. सेवानिवृत्त झाल्यानंतर 'एरंडावरील रेशमाचा' फार मोठा प्रयोग धडाडीनें व चिकटीनें केला. रेशीम कातण्याचें एक यंत्र यांनीं तयार केलें. या रेशमाच्या कार्याला अनेक प्रदर्शनांतून पदकें मिळालीं आहेत. सतत उद्योग, साधी राहणी व उदात्त विचार हा यांचा स्वभावविशेष होय. महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध काँग्रेस कार्यकर्ते गो. अ. देशपांडे हे यांचे द्वितीय चिरंजीव होत.

देशपांडे, आत्माराम रावजी 'अनिल'—(जन्म स. १९०१) मराठी भाषेंतील सुप्रसिद्ध कवि, मुक्तछंद काव्याचे प्रवर्तक व अभ्यासक.

यांचा जन्म वऱ्हाडांत मूर्तिजापूर येथें झाला. उमरावतीस कांहीं दिवस वकिली केल्यानंतर (१९२५-२९) हे सबजज्ज झाले. हे अनिल नांवानें प्रसिद्ध आहेत.

मुक्तछंद हा शब्द व हा छंदःप्रकार प्रवर्तन करणारा पहिला लेख यांनीं नागपूरच्या वागीश्वरी मासिकांत लिहिला (१९३१). तेव्हांपासून त्यासंबंधीं चर्चा होऊन आतां तो काव्यप्रकार सर्वमान्य झाला आहे. आज प्रचलित असलेला ५ व ६ अक्षरी चरणकांचा मुक्तछंद पहिल्यानें 'प्रेम आणि जीवन' हें १९३५ सालीं प्रसिद्ध झालेलें खंडकाव्य लिहीत असतांना यांना सुचला. हें काव्य 'प्रतिभा' या पाक्षिकांत प्रसिद्ध झालें.

याशिवाय परंपरा व प्रयोग (सहविचार १९३८), काव्य आणि क्रांति (१९४४) इत्यादि यांचे लेख प्रसिद्ध आहेत.

यांचे काव्यग्रंथः—(१) फुलवात (१९३२), (२) भग्नमूर्ति (१९४०), (३) निर्वासित चिनी मुलांस (१९४२), (४) पेर्तेव्हा (१९४६) इत्यादि.

मराठींतील सुप्रसिद्ध कवयित्री प्रा. कुसुमावती देशपांडे या यांच्या पत्नी होत.

देशपांडे, केशवराव गणेश—(जन्म स. १८६९ जाने.–मृत्यु स. १९३९ एप्रिल) बडोदा येथील सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते व बॅरिस्टर.

कोल्हापूर येथें शिक्षण झाल्यावर मुंबईस बी. ए. परीक्षेंत सरकारी शिष्यवृत्ति मिळवून हे इंग्लंडला गेले आणि तेथें पुनः बी. ए. होऊन बॅरिस्टर झाले. तेथें यांचा बाबू अरविंद घोष यांच्याशीं संबंध आला व तो बडोद्याच्या नोकरींत दृढ झाला. १८९३ सालानंतर कांहीं दिवस हे इंदुप्रकाश दैनिकाच्या इंग्रजी विभागाचे संपादक होते. यांचा जहालपक्षाशीं निकटचा संबंध होता. यांच्या ' काली मठ ' वगैरे संस्था प्रत्यक्षांत आल्या नाहींत, तरी यांचें बडोदें येथील 'गंगानाथ' भारतीय विद्यालय लोकांना राष्ट्रीय शिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न करत असे. तेथें काका कालेलकर व चिंतामणशास्त्री जोशी वगैरे निःस्वार्थी माणसें होतीं. हे त्या संस्थेचा बराच खर्च स्वतः चालवीत. पण १९१२ सालीं दिल्ली दरबारच्या प्रसंगानंतर महाराज सयाजीराव गायकवाडांवर आलेल्या प्रसंगांत यांना संस्था बंद करून बडोदें सोडावें लागलें. प्रत्यक्ष खेड्यांतील जनतेच्या मनोवृत्तींत आमूलाग्र बदल झाल्याशिवाय राष्ट्रीय चळवळ प्रभावी होणार नाहीं हे ओळखून यांनीं कामास सुरवात केली. अंधेरीचा ' साधकाश्रम ' अशा कामाकरितां निर्माण करून त्याचे हे प्रमुख झाले. म. गांधींच्या चळवळींतहि हे मनोभावें भाग घेत.

देशपांडे, गंगाधरराव बाळकृष्ण—(जन्म स. १८७० एप्रिल १२) बेळगांवचे सुप्रसिद्ध राजकीय कार्यकर्ते आणि वक्ते.

हे बी. ए. एलएल्. बी. आहेत. हे लोकमान्य टिळकांच्या बरोबर काम करणाऱ्या सार्वजनिक कार्यकर्त्यांपैकीं एक होत. मुंबईस राष्ट्रमत नांवाचें मराठी दैनिक काढण्यांत आलें (१९०७), त्याच्या संपादक मंडळांत हे होते. हे लिहितात थोडेंच पण तें फार परिणामकारक असतें. वक्तृत्वाबद्दल यांची विशेष प्रसिद्धि आहे. श्रोत्यांना थरारून सोडण्याबरोबरच हे त्यांस विचार करण्यास भाग पाडतात. यांची माहिती व आठवण अचूक असते. भाषा व विचाराची मांडणी सुंदर असते. बेळगांवच्या राष्ट्रसभेचे हे स्वागताध्यक्ष होते (१९२४) व त्या वेळेपासून अनेक वर्षे हे राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीचे सभासद होते. असहकाराच्या चळवळींत कांहीं काळ कॉंग्रेसचे हे हंगामी अध्यक्ष होते (१९३२ मे–ऑगस्ट). यांनीं अनेक वेळां तुरुंगवास सोसला आहे. राष्ट्राच्या बंगभंग, दहशतवाद, होमरूल लीग व गांधीवाद या प्रत्येक स्थित्यन्तराच्या वेळीं हे आघाडीचे वीर होते.

यांच्या धडाडीच्या कार्यपद्धतीमुळें व तडफदार वक्तृत्त्वामुळें हे ' कर्नाटकचे सिंह ' म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहेत.

देशपांडे, रावसाहेब–गंगाधर केशव उर्फ बाबासाहेब—(जन्म स. १८६९ जुलै ८) कडे पोलिस अधिकारी व सार्वजनिक कार्यकर्ते.

हे पुणें, न्यू इंग्लिश स्कूलमधून मॅट्रिक झाले आणि यांनीं मराठा लाइट इन्फन्ट्रीमध्यें नोकरी पत्करिली (१८८७). क्रमानें फौजदार, इन्स्पेक्टर व डेप्युटी सुपरिंटेंडेंट होऊन सेवानिवृत्त झाले (१९२१). नंतर पुण्यांतील विविध संस्थांतून यांनीं सार्वजनिक कार्य केलें. हिंदु संस्कृति व मराठ्यांचा इतिहास यांबद्दल यांना अभिमान असून त्याबद्दलचा यांचा अभ्यास चांगला आहे. शेवटीं यांनीं आपलें आयुष्य समर्थ रामदासांच्या सेवेला अर्पण करण्याचें ठरविलें आहे. कोणतेंहि हातीं घेतलेलें काम मनःपूर्वक करण्याचा यांचा स्वभाव आहे.

यांचे इंग्रजी ग्रंथः—1 The Deliverance or the Escape of Shivaji from Agra. इत्यादि.

देशपांडे, गुणवन्त हणमन्त—(जन्म स. १८९७) मराठींतील सुप्रसिद्ध कवि.

वाटखेड, जि. यवतमाळ (वऱ्हाड) येथील हे वतनदार देशपांडे. व्यवसाय शेतीचा.

गूढगुंजनात्मक लिहिण्याकडे यांची विशेष प्रवृत्ति आहे. ' गोंधळ ' आणि ' कोणता मानूं चंद्रमा ' या यांच्या कविता रेकार्डस्मुळें घरोघर पोंचून अत्यंत लोकप्रिय झाल्या आहेत. यांच्या कवितेला जी माधुरी आणि उदात्तता आली आहे ती तींतील आध्यात्मिक गूढगुंजनामुळेंच मुख्यतः होय. त्याचा उत्कृष्ट नमुना यांच्या ' वाऱ्याचे भारे ' या कवितेंत पाहावयास

मिळतो. 'वायूच्या वाड्यामध्यें, लाविल्या लक्ष वाती। विझणाऱ्या उजेडांत, अंधारा आली भरती ।।। निर्वात आवारांत, एकला दिवा जळे। नित्याच्या प्रकाशांत, आंधारें केलें काळें ।।।

यांतील गूढतेपेक्षां नर्मशृंगाराची पार्श्वभूमी असलेले पुढील चरण लोकांस विशेष आवडल्यास आश्चर्य नाहीं.

कोणता मानूं चंद्रमा ?—भूवरीचा कीं नभींचा ?। एक फुलवितो कमलविशेषा, दुजा फुलवी मम मानसकोशा। एक करितसे कीं तमनाशा, नाशी दुसरा मम विरहतमा ॥

यांचा 'निवेदन' नांवाचा कवितासंग्रह नागपूर व बनारस विश्वविद्यालयानें बी. ए. च्या परीक्षेला नेमला आहे. तसेंच यांना त्याबद्दल अनेक पारितोषिकें मिळालीं आहेत.

यांचे काव्यसंग्रहः—१ निवेदन, २ तिलांजलि, ३ घटप्रभा.

देशपांडे, पुरुषोत्तम यशवंत—(जन्म स. १८९९) सुप्रसिद्ध पुरोगामी लेखक, साम्यवादी नि गांधीवादी तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते, भाष्यकार व वक्ते.

हे वऱ्हाडांतील अंजनसिंगी येथील वतनदार देशपांडे घराण्यापैकीं असून एम्. ए., एल्एल्. बी. आहेत. कांहीं दिवस सबजज व नंतर नागपूरच्या लॉ कॉलेजांत प्राध्यापक होते. पुढें १९३२-४४ च्या चळवळींत सामील होऊन यांनीं तुरुंगवास पत्करला व नंतर 'भवितव्य' नांवाचें साप्ताहिक चालू केलें (१९४१). शिवाय नागपूर येथें वकिलीचाहि व्यवसाय हे करतात.

बडोदा, उज्जयिनी, हैदराबाद, मुंबई वगैरे ठिकाणचीं वाङ्मयमंडळें व साहित्यसंमेलनें यांनीं यांना अध्यक्षस्थान देऊन यांच्या लेखन व प्रतिपादनाचा गौरव केला आहे.

यांचें वाङ्मयः—कादंबऱ्या–१ बंधनाच्या पलीकडे, २ सुकलेलें फूल, ३ सदाफुली, ४ विशालजीवन, ५ नवें जग, ६ काळी राणी; कवितासंग्रह–७ निर्माल्यमाला-टीकालेख, ८ नवीं मूल्यें, ९ सोव्हिएट रशिया, १० गांधीजीच कां ? इत्यादि.

देशपांडे, डॉ. यशवंत खुशाल—(जन्म स. १८८४ जुलै १४) वऱ्हाडांतील सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक, अभ्यासक, लेखक आणि सार्वजनिक कार्यकर्ते.

जन्मस्थान–पापळ, जि. उमरावती, वऱ्हाड. यांचें शिक्षण उमरावती, मुंबई वगैरे ठिकाणीं झालें. हे एम्. ए., एल्एल्. बी., डी. लिट्., एम्. आर. ए. एस्. आहेत. यांनीं १९०८-१९४० पर्यंत यवतमाळ येथें वकिलीचा धंदा केला.

हे कॉलेजमध्यें असतांनाच कै. वि. का. राजवाडे यांचे लेख वाचून यांना इतिहास-संशोधनाची आवड उत्पन्न झाली. १९४३ सालीं विदर्भ साहित्यसंघाची स्थापना झाल्यावर यांचें या कार्याकडे विशेष लक्ष वेधलें. महानुभावपंथाचें वाङ्मय शोधण्याकरितां यांनीं त्यांच्या लिपींचा अभ्यास केला व ग्रंथसंशोधनार्थ पंथाचा प्रचार असलेल्या पंजाबांतील शहरीं प्रवास केला. मिळविलेल्या साधनांवरून यांनीं तयार केलेले व संशोधिलेले ग्रंथ विश्वविद्यालयांत नेमले गेले. यवतमाळ येथें शारदाश्रम ही संस्था काढून संशोधन, संग्रह, अभ्यास व प्रकाशन वगैरेची व्यवस्था यांनीं केली (१९२५). यांच्या वयाला साठ वर्षें झालीं तेव्हां न्या. नियोगी यांच्या अध्यक्षतेखालीं यांचा सत्कार करण्यांत आला व यांना एक ग्रंथ अर्पण करण्यांत आला.

इंडियन हिस्टॉरिकल रेकार्डस् कमिशन, रॉयल एशियाटिक सोसायटी लंडन, जागतिक इतिहास परिषद् झुरिक, प्राच्यविद्या परिषद ब्रुसेल्स (बेल्जम) वगैरे ठिकाणीं सभासदत्व, विदर्भ साहित्य संघ, अकोट, महाविदर्भ इतिहास परिषद, दारव्हा वगैरे ठिकाणीं अध्यक्षस्थान वगैरे मान यांना मिळाले आहेत. नागपूर विद्यापीठाशीं यांचा अनेक नात्यांनीं संबंध आहे. तेथें अभ्यासाकरितां हस्तलिखित ग्रंथसंग्रहालय यांच्या प्रयत्नानें निर्माण झालें. यांना त्या विद्यापीठानें डॉक्टर ऑफ लेटर्स ही पदवी दिली असून ऑल इंडिया हिस्टरी कॉंग्रेसनें आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासांत नागपूरकर भोसल्यांचा इंग्रजांशीं संबंध दाखविणारा भाग लिहिण्याचें काम यांच्याकडे सोंपविलें आहे. यांचें मराठी व इंग्रजी लेखन अनेक नियतकालिकांत विखुरलेलें आहे.

यांचे ग्रंथः—१ महानुभावीय मराठी वाङ्मय इ.

देशपांडे, रघुनाथ श्रीपाद—(जन्म स. १८८९ फेब्रु. २८) सुप्रसिद्ध स्थापत्यविशारद व मराठींतील ग्रंथलेखक.

हे बी. ई. झाल्यानंतर यांनीं आपली नोकरी संभाळून अनेक उपयुक्त पुस्तकें मराठींत लिहिलीं आहेत. त्यामुळें

मराठी भाषेचा तर फायदा झाला आहेच, शिवाय वास्तुविषयक ज्ञानाबाबत परावलंबीपणा नष्ट होऊन आधुनिक सुधारणांचा प्रत्यक्ष परिचय करून घेण्याची शक्यता उत्पन्न झाली. प्रत्येक शास्त्रांत नव्या शोधानें क्रान्ति होत आहे. तीच स्थिति गृहरचनेच्या बाबतहि आहे. त्यांतील बारीक सारीक गोष्टींची अद्ययावत् माहिती देणारीं यांचीं पुस्तकें मोठीं उपकारक आहेत.

यांचें मराठी वाङ्मय १–कॉंक्रीट–साधें व रिइन्फोर्स्ड, २ मैला व मैलापाणी यांची व्यवस्था, ३ सुलभ वास्तुशास्त्र अर्थात् आधुनिक पद्धतीनें घरें कशीं बांधावीं ? ४ मोटार कशी हांकावी. ६ मोटार कशी चालते.

देशपांडे, वाग्भट नारायण—(जन्म स. १८९२ –मृत्यु स. १९३६) मराठींतील कथालेखक व कादंबरीसमीक्षक.

हे शिरवळकर देशपांड्यांपैकीं होत. यांचे दत्तक वडील सांगलीस ॲड्मिनिस्ट्रेटर होते. तसेंच जनक वडील कुशाभाऊ साताऱ्यास डॉक्टर होते. हे बी. ए., एल्एल्. बी. होते. साताऱ्यास हे वकिली करीत. हे प्रागतिक होते, पण असहकारितेच्या चळवळीपासून यांच्या मतांत चलबिचल झाली. साताऱ्यास 'ऐक्यमंडळ' काढून यांनीं 'ऐक्य' नियतकालिक सुरू केलें. पुण्याच्या वसंतव्याख्यानमालेंत यांनीं हिन्दी संस्थानांत द्विदल राज्यपद्धति या विषयावर व्याख्यान दिलें व यांची औंध संस्थानच्या दिवाणपदावर नेमणूक झाली. विधिमंडळांतील लोकनियुक्त सभासदाला राखीव खात्याचे दिवाण नेमल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. पण यानंतर सहा महिन्यांतच यांचा मोटारच्या अपघातानें मृत्यु झाला.

यांचें टीकावाङ्मय मान्यता पावलें असून मुंबई विद्यापीठानें उच्च परीक्षांच्या अभ्यासक्रमांत त्यास स्थान दिलें आहे.

यांचें वाङ्मय–कथासंग्रह–१ सुखस्वप्नें, २ दीपावली, टीका–३ हरिभाऊ आपटे यांच्या आठवणी व सामाजिक कांदबऱ्या इत्यादि.

देशपांडे, वामन नारायण—(जन्म स. १९०३ जून १७) मराठी भाषेंतील कवि, टीकाकार, संशोधक व पत्रपंडित.

यांचा जन्म यवतमाळचा. इंटरपर्यंत शिक्षण झाल्यावर प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें यांना शिक्षण सोडावें लागलें. हे यवतमाळच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें मिडलस्कूलचे मुख्य आहेत.

नाट्यकाव्य, संवादकाव्य व मुक्तछंद काव्य हीं यांचीं वैशिष्ट्यें होत. यांपैकीं नाट्यकाव्याची प्रथा तर सर्वस्वीं यांचीच आहे. मराठींत लघुतमकथेचें दिग्दर्शन प्रथम यांनींच केलें. टीकाक्षेत्रांत अतिशय निःस्पृह टीकाकार म्हणून प्रसिद्धी मिळवून 'रामशास्त्री' हें आपलें टोपण नांव यांनीं सार्थ केलें आहे. नागपूर विद्यापीठानें यांच्या 'आराधना' काव्यसंग्रहास सुवर्णपदक व १०१ रु.चें कमला नारायण बेहेरे पारितोषिक दिलें. यांचीं बहुतेक पुस्तकें नागपूर, आग्रा व मुंबई विद्यापीठाकडून अभ्यासक्रमांत लाविलीं आहेत.

यांचें वाङ्मय–१ आराधना (कवितासंग्रह), २ आद्य मराठी कवयित्री (संशोधित), ३ स्मृतिस्थळ (संशोधित), ४ विचारसमीक्षा (टीकालेख), ५ रामशास्त्री (टीकालेख) इत्यादि.

देशपांडे, सर्वोत्तम वासुदेव—(मृत्यु स. १९२५) महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचे एक संपादक, अभ्यासी व त्यागी गृहस्थ.

हे बी. ए. होते. ज्ञानकोशांतील हिन्दुइतिहासावरील बरेच लेख, ज्योतिःशास्त्राच्या इतिहासांतील बराच भाग, रसायनशास्त्रांतील पुष्कळशा संज्ञांची मांडणी वैगेरे लिखाण यांनीं केलें. हे अत्यंत निष्ठावान्, निरलस आणि कर्तव्य बुद्धीनें काम करणारे गृहस्थ होते. कोणतेंहि काम मन लावून सुबक करण्याबद्दल यांची प्रसिद्धि होती. कोणत्याहि संस्थेंत अशीं कांहीं माणसें असतात कीं, त्यांच्यामुळें कार्यांत विशेष प्रकारचे गुण उत्पन्न होतात, पण त्यांची माहिती मात्र कोणास नसते. अशांपैकीं हे एक होते. हे अकाली क्षयानें वारले. डॉ. केतकरांना यांच्या मृत्यूनें न भरून येणारी हानि झाली असें वाटलें.

देशपांडे, सूर्याजी आनंदराव—(जन्म स. १८२८–मृत्यु स. १८८८) सुप्रसिद्ध मराठी–पोर्तुगीज कोशकार व व्याकरणकार.

गोमान्तकांत मंगेशक्षेत्रीं यांचे अजोबा राहत. वडील १० व्या वर्षीं वारल्यानें सरकारी दुभाषे सखारामपंत वाघ यांचेकडे हे राहिले व त्यांच्यापाशीं यांना अनेक भाषा शिकतां आल्या. यांनीं लिसेवांत मराठी भाषेचे शिक्षक म्हणून काम केलें (१८४७-१८५४). या काळांत यांनीं

मराठी दोन शालोपयोगी क्रमिक पुस्तकें लिहिलीं व तीं गोवासरकारनें प्रसिद्ध केलीं. वाघांच्या मृत्यूनंतर हे मराठीचे मुख्य शिक्षक व सरकारी दुभाषे नेमले गेले. नंतर यांनीं मराठी-पोर्तुगीज भाषा सुलभतेनें याव्यात म्हणून एक व्याकरण ग्रंथ व मराठी-पोर्तुगीज कोश तयार केला. त्यामुळें विद्वान् लोकांत व सरकारांत यांची अत्यंत वाहवा झाली आणि यांना लिसेवाचे मुख्याध्यापक नेमण्यांत आलें.

देशमुख, सरदार-गोपाळ हरि-लोकहितवादी—(जन्म स. १८२३ फेब्रु. १८–मृत्यु स. १८९२ आक्टो.) महाराष्ट्रांतील सर्वांगीण सुधारणांचे आद्य प्रवर्तक, नव्या मूलग्राही विचारांचे प्रतिपादक, ज्ञानसंग्राहक, लोकसेवक आणि जबरे लेखक.

यांचे वडील हरिपंत पेशव्यांचे धारतीर्थी देह ठेवणारे सेनापति बापु गोखले यांचे फडणीस होते आणि त्यांना एल्फिन्स्टनसाहेबांनीं बोलावलें असतां भेटीस गेले नाहींत म्हणून त्यांची जहागीर जप्त झाली होती. त्यांच्या मृत्यूनंतर बऱ्याच खटपटीनें यांना नोकरी लागेपर्यंत दोनशें रुपयांची वार्षिक तैनात मिळाली (१८३६). कोर्टांत उमेदवारी करून इंग्रजी शिक्षण घेतल्यावर सरदार एजंट कचेरींत यांना नोकरी मिळाली (१८४४). काम संभाळून यांनीं मुन्सफीची परीक्षा दिली. १८५२ मध्यें मुन्सफ म्हणून वाई येथें प्रथम यांची नेमणूक झाली.

१८५६-६१ पर्यंत हे इनाम कमिशनरांपैकीं दुय्यम कमिशनर म्हणून काम करीत. १८६२ मध्ये असिस्टंट जज्ज म्हणून यांची अहमदाबादला नेमणूक झाली; पण मुंबई सरकारची गुणग्राहकता इतर गोऱ्या अधिकाऱ्यांच्या तक्रारीमुळें स्टेट सेक्रेटरीला मंजूर करितां आली नाहीं. तेव्हां यांची नाशिक व पुढें अहमदाबाद येथें स्मॉल कॉज जज्ज म्हणून नेमणूक झाली. अहमदाबाद येथें यांचा दहा वर्षे मुक्काम होता (१८६७-७६). १८७६ च्या दिल्ली दरबारांत यांना रावबहादूर ही पदवी मिळाली. पुढें नाशिक येथें काम केल्यावर जे. पी. व मुंबई विश्वविद्यालयाचे फेलो झाले आणि हे सेवानिवृत्त झाले (१८७८). १८८० मध्यें यांना गव्हर्नरच्या कौन्सिलचे सभासद निवडण्यांत आलें आणि त्याच्या पुढच्या वर्षी यांना फर्स्ट क्लास सरदार करण्यांत आलें. १८८४ मध्यें हे एक वर्ष रतलाम संस्थानचे दिवाण होते. १८८५ मध्यें यांची पत्नी वारली. वयाच्या सातव्या वर्षी यांचा विवाह झाला होता, तेव्हां यांच्या पत्नीचें वय चार वर्षांचें होतें.

यांना लेखनाचा अत्यंत हव्यास होता. यांच्या लेखनांत ज्ञानसंग्रह आणि लोकांना उपदेश करण्याची तळमळ स्पष्ट दिसते. हे जुन्या ब्राह्मणी परंपरेंत वाढले होते, तरी नवे सहज न पटणारे विचार पुढें मांडण्यांत आणि तत्कालीन ब्राह्मणी संस्कृतीचें सदोष अंतरंग सडेतोडपणें स्पष्ट करण्यांत हे निर्भीडपणें पुढें येत.

सामाजिक सुधारणेसंबंधीं यांनीं अत्यंत तळमळीनें लिहिलें आहे. स्वातंत्र्य, उच्चनीचता, लोकसत्तावाद, दारिद्र्यनाश, गरिबांचा कैवार यांबद्दलचे यांचे विचार आजहि पुरोगामी वाटतात. यांनीं अनेक संस्था सुरू केल्या. दयानंदसरस्वतींनीं आपल्या आर्य समाजाच्या विश्वस्तमंडळांत यांस घेतलें होतें. थिऑसॉफिकल सोसायटीशींहि यांचा संबंध होता. अहमदाबादच्या प्रार्थनासमाजांत यांचीं नेहमीं व्याख्यानें होत. तथापि यांच्या तिखट विचारसरणीस विधायकतेची, सहानुभूतीची व कृतीची जोड नसल्यानें यांची समाजावर छाप पडूं शकली नाहीं. पुनर्विवाहाच्या निमंत्रणपत्रिकेवर सही करून हे प्रत्यक्ष समारंभास हजर राहिले नाहींत. तसेंच विलायतेंत पार्लमेंटरी फायनॅन्स कमेटीपुढें साक्षीस बोलावलें असतां 'धर्माच्या अडचणीमुळें मला विलायतेस जातां येत नाहीं' असें यांनीं उत्तर दिलें.

यांचें वाङ्मय—राजकारण व अर्थशास्त्र–१ लक्ष्मीज्ञान (भाषान्तर, १८४९), २ हिंदुस्थानास दारिद्र्य येण्याचीं कारणें आणि त्याचा परिहार व व्यापाराविषयीं विचार (दादाभाई नवरोजी यांच्या 'पॉव्हर्टी इन इंडिया' या ग्रंथाधारें १८७६), ३ स्थानिक स्वराज्य व्यवस्था (१८८३), ४ ग्रामरचना, त्यांतील व्यवस्था व त्यांची हल्लींची स्थिति (१८८३), ५ स्वदेशीय राज्यें व संस्थानें. इतिहास–६ भरतखंडपर्व–हिंदुस्थानचा इतिहास (१८५१), ७ पाणिपतची लढाई (काशीराज पंडिताच्या फार्शी ग्रंथाच्या इंग्रजी भाषान्तराचा तर्जुमा, १८७७), ८ ऐतिहासिक गोष्टी (भाग १–३), ९ हिंदुस्थानचा इतिहास (ग्लीगचें भाषान्तर १८७८), १० गुजराथ देशाचा इतिहास (१८८५), ११ लंकेचा इतिहास (१८८८), १२ सुराष्ट्र देशाचा ससाक्ष इतिहास (भाषान्तर १८९१), १३ उदेपूरचा इतिहास (भाषान्तर, १८९२), चरित्रें–१४ पृथ्वीराज चौहानाचा इतिहास (१८८३), १५ स्वामी श्रीमदयानन्द, धर्म व

नीति–१६ खोटी साक्ष व खोटी शपथ यांचा निषेध (१८५१), १७ गीतातत्त्व (वामनाच्या समश्लोकींतील सारभूतश्लोक मूळ वचनांसह--१८७८), १८ सुभाषित व सुबोधवचनें (१८७८), १९ स्वाध्याय, २० आश्वलायन गृह्यसूत्र (भाषान्तर), २१ आगम–प्रकाश, (१८८४). समाजकारण–२२ जातिभेद, २३ भिक्षुक (१८७७), २४ प्राचीन आर्यविद्या व रीति (१८७७), २५ महाराष्ट्रांतील कामगारांशीं संभाषण (१८४८), २६ यंत्रज्ञान (१८५०), २७ शतपत्रें (१८६६, १९४०), २८ निबंधसंग्रह, नियतकालिकें–लोकहितवादी (मासिक १८८२ त्रैमासिक १८८३) इत्यादि.

देशमुख, चिंतामण द्वारकानाथ—(जन्म स. १८९६) 'रिझर्व बँक ऑफ इंडिया'चे पहिले हिंदी गव्हर्नर व सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ.

यांचा जन्म रायगडाजवळ नातें या गांवीं कायस्थ प्रभु घराण्यांत झाला. मॅट्रिकच्या परीक्षेंत यांचा क्रमांक पहिला येऊन यांना संस्कृतची पहिली जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति व इतर अनेक शिष्यवृत्त्या मिळाल्या (१९१२). इंटरची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर हे इंग्लंडला गेले. तिकडे गेल्यावर हे प्रथम बी. ए. व नंतर आय्. सी. एस. च्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले (१९१८). याच वेळीं मिस् रोझिना सिलकॉक्स या आंग्ल स्त्रीशीं यांचा विवाह झाला. यांना प्रिमरोझ नांवाची एक मुलगी असून ती इंग्लंडमध्यें असते.

प्रथम मध्यप्रान्तांत यांची नेमणूक झाली. नंतर हिंदुस्थान सरकारनें यांना आपणाकडे घेतलें. प्रथम रिझर्व बँकेचे सेक्रेटरी, नंतर डेप्युटी गव्हर्नर व नंतर गव्हर्नर म्हणून यांनीं काम केलें.

नोकरीवर असतांच संस्कृत, मराठी, हिन्दी व बंगाली भाषांचा यांचा व्यासंग सतत चालू असतो; यांनीं मेघदूताचें श्लोकबद्ध मराठी भाषान्तरहि केलेलें आहे.

देशमुख, बॅ. रामराव माधवराव—(जन्म स. १८९२) वऱ्हाडांतील सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते, मध्यप्रान्ताचे माजी दिवाण व आफ्रिकेचे हायकमिशनर.

हे बी. ए., एलएल्. बी., बार–ॲट-लॉ आहेत. यांनीं उमरावती व नागपूर येथें वकिली केली. हे ऑल इंडिया काँग्रेस कमेटीचे सभासद होते. १९२१ मध्यें मध्यप्रान्ताच्या कायदेमंडळाचे सभासद होते. महाराष्ट्र कॉन्फरन्स, सातारा येथें अध्यक्ष व उमरावती जिल्हा कौन्सिलचे कार्याध्यक्ष होते (१९२५). १९२७ पासून मध्यप्रान्त सरकारचे हे मंत्री होते. १९२९ सालीं यांनीं त्या जागेचा राजीनामा दिला तरी यांची पुनः नेमणूक झाली. १९३० सालीं यांनीं त्या जागेचा पुनः राजीनामा दिला. बेळगांव येथें ऑल-इंडिया मराठा कॉन्फरन्सचे हे अध्यक्ष होते.

हे मध्यन्तरीं ग्वाल्हेरदरबारचे आर्थिक सल्लागार होते. त्यानंतर आफ्रिकेचे हायकमिशनर म्हणून यांची नेमणूक झाली.

देशमुख, व्यंकटराव हनुमन्तराव ऊर्फ बाबासाहेब—(जन्म. स. १८६९—मृत्यु स. १९३१) वऱ्हाडांतील सुप्रसिद्ध यशस्वी कारखानदार.

यांचा जन्म वऱ्हाडांतील वधोना गांवच्या सुखवस्तु जहागिरदार घराण्यांत झाला. मॅट्रिक होण्यापूर्वीच हे घरचा व्यवहार पाहूं लागले. यांचे आतेबंधु यशवंत गोविंद देशपांडे अंजनसिंगीकर यांच्या राष्ट्रीय शिक्षणाकरितां काढलेल्या दौऱ्यांत यांनीं केलेल्या मदतीचे वेळीं यांच्या घराची एकदां झडती झाली व यांना ऑनररी मॅजिस्ट्रेटचें काम सोडावें लागलें. तेव्हां यांची वृत्ति व्यापाराकडे वळली.

स. १९०० सालीं यांनीं एलिचपूर येथें पहिलो जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी काढली. वऱ्हाड हा कापूस पिकविणारा प्रान्त, पण तेथें एकहि कापडाची गिरणी नाहीं असें पाहून यांनीं कापडाची गिरणी १९ मार्च १९२३ रोजीं काढली. तिचेंच परिणत स्वरूप 'दि विदर्भ मिल्स, बेरार लि.' या प्रचंड स्वरूपांत आज आपणास दिसत आहे.

एकदीड वर्षांत अठरा लक्षांचे भाग खपून या गिरणीचें काम सुरू झालें. प्रथम सूत व नंतर वीणकाम सुरू करण्यांत आलें. आरंभी १०६८४ चात्या व २७२ माग होते. त्यांत सारखी वाढ होत आहे. मजूर व कारकून यांच्याकरितां स्वतंत्र चाळी यांनीं बांधल्या आहेत. आतां मॅनेजिंग डायरेक्टर नानासाहेब देशमुख व मॅनेजर रामभाऊ देशमूख या गिरणीची सर्व व्यवस्था पाहतात. मिलमधील ऑफिसच्या समोर यांचा अर्धपुतळा लो. बापूजी अणे यांच्या हस्तें अनावृत करण्यांत आला (२३ एप्रिल १९४४).

देसाई, कनु हकुमतराय—(जन्म स. १९०७ मार्च १२) गुजराथमधील नामांकित चित्रकार व कलाप्रवीण.

यांचें जन्मस्थान अहमदाबाद. अहमदाबादचे प्रसिद्ध वकील जयंतिलाल नरभेराम ठाकोर हे यांचे मामा. गुजराथ विद्यापीठांत तीन वर्षे व कुमार कार्यालयांत दोन वर्षे चित्रकलेचें शिक्षण घेतल्यानंतर हे गुजराथ विद्यापीठाची शिष्यवृत्ती घेऊन रवींद्रनाथांच्या शांतिनिकेतनांत चित्रकलेचा अधिक अभ्यास करण्यासाठीं गेले. तेथील कलाभवनांत नंदलाल बोस यांच्या हाताखालीं शिक्षण घेतल्यानंतर यांनीं स्वतंत्रपणें चित्रें काढण्यास सुरुवात केली नृत्यकलेचाहि यांनीं अभ्यास केला आहे.

हिंदुस्थानांतील प्रमुख चित्रकारांत या तरुण कलावंताची गणना होते. म. गांधीच्या जीवनावरील वॉटरकलरमध्यें किंवा पेन्सिलनें काढलेलीं यांचीं चित्रें उत्कृष्ट समजण्यांत येतात. या संग्रहाची प्रस्तावना फादर एल्विन यांनीं लिहिली असून त्याची परदेशी आवृत्तीहि इंग्लंडमधील एका प्रकाशन संस्थेनें काढली आहे. या चित्रांचें मुद्रण मात्र अहमदाबादच्या कुमार प्रिन्टिंग प्रेसमध्यें झालें आहे. यांच्या बुद्ध का प्रत्यागमनसारख्या चित्रांना अशीच आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळाली असून त्यांतील भव्यता व कलात्मकतेबद्दल तीं जेथें गेलीं तेथें त्यांची वाहवाच झाली आहे.

मुंबईच्या प्रकाश कंपनीनें तयार केलेल्या भरतभेट, रामराज्य, विक्रमादित्य वगैरे चित्रपटांचें कलादिग्दर्शन यांनीं केले. रामराज्य चित्रपटांतील यांच्या 'विचारक्रांत राम' या सेटिंगची त्या वेळीं सर्वत्र वाहवा झाली.

यांचे चित्रसंग्रहः—(१) सत्तर छायाचित्रें, (२) भारतपुण्य प्रवास, (३) म. गांधी, (४) नृत्यलेखा, (५) मंगलशतक, (६) लग्नोत्सव, (७) रूपरेखा, (८) श्रीरेखा, (९) मिराबाई, (१०) इंडियन लॅन्डस्केप्स, (११) पेन्टिंग्ज इन वॉटर कलर्स इत्यादि.

देसाई, भुलाभाई जीवनजी—(जन्म स. १८७७ ऑक्टो. १३) हिंदुस्थानांतील नामांकित कायदेपंडित, वादविवादपटु मुत्सद्दी व राष्ट्रसभा-कार्यकर्ते.

सुरत जिल्ह्यांतील बलसर हें गांव यांचें जन्मस्थान. हे जातीनें अनाविल ब्राह्मण असून यांचे वडील सरकारी वकील होते. मुंबईच्या एल्फिन्स्टन व गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्यें आपलें शिक्षण संपविल्यानंतर मुंबई हायकोर्टाच्या 'ओरिजिनल साइड'ला यांनीं वकील म्हणून नांव दाखल केलें. याचे आधीं कांहीं दिवस अहमदाबादच्या गुजराथ कॉलेजमध्यें इतिहास व अर्थशास्त्र यांचे प्राध्यापक म्हणूनहि यांनीं काम केलें होतें.

अशा तऱ्हेनें वकिलीच्या यशांतील यांचें पाऊल पुढें पडत असतांनाच यांनीं राजकारणांत भाग घेण्यास सुरुवात केली. प्रथम प्रागतिक, नंतर होमरूल लीगचे कार्यकर्ते अशीं अनेक स्थित्यंतरें पावत हे अखेर गांधीवादी बनले व त्यांच्याच प्रेरणेनें गुजराथी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वकिली साहाय्य देण्यास यांनीं सुरुवात केली. बार्डोलीच्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांना तोंड फोडून त्यांच्या अडचणी मिटवण्यास कारणीभूत झालेला सुप्रसिद्ध ब्रुमफील्ड रिपोर्ट हा यांच्या या कार्याचें दृश्य फळ होय. यासाठीं बार्डोलीच्या शेतकऱ्यांच्या वतीनें यांनीं दोन स्पेशल कमिशन्सपुढें साक्षीहि दिल्या होत्या (१९२८, २९).

१९३० सालच्या अनत्याचाराच्या चळवळींत यांना एक वर्षाची शिक्षा व १०००० रु. दंड झाला. तेव्हांपासून काँग्रेसच्या प्रत्येक चळवळींशीं यांचा कोणत्या ना कोणत्या तरी नात्यानें संबंध आलेला आहे. परंतु यापेक्षांहि मध्यवर्ति असेंब्लींतील काँग्रेसपक्षाचे पुढारी या नात्यानें यांनीं बजावलेली कामगिरी अधिक महत्त्वाची आहे. पं. मोतीलाल नेहरू यांच्यानंतर असेंब्लींत यांच्याइतकीं उठावदार व परिणामकारक भाषणें करणें आतांपर्यंत कोणासहि शक्य झालें नाहीं. महत्त्वाच्या बिलांच्या वेळीं प्रसंगीं लीगशींहि सहकार्य करून सरकारचा पराभव करण्यांत यांनीं दाखविलेल्या धोरणीपणाची आजपर्यंत अनेक वेळां तारीफ झालेली आहे. अलंकार व विवाद यांचा अत्यंत संयमानें उपयोग करण्याच्या यांच्या शैलीमुळें हे वादविवादपटु म्हणून यशस्वी होऊं शकले.

असेंब्लींतील यांच्या यशस्वीपणाच्या मुळाशीं यांच्या इतर सर्व गुणांत यांच्या वकिलीकौशल्याला सर्वांत मोठें स्थान आहे. रासबिहारी घोष किंवा सर दिनशा मुल्ला यांच्या तोडीची विद्वत्ता, धडाडी किंवा लढाऊपणा नसूनहि पक्षसमर्थनाच्या आपल्या स्वतंत्र धाटणीमुळें हे यशस्वी झाले. उपलब्ध पुरावा योग्य ठिकाणीं मांडावयाचा, ज्या ठिकाणीं जोर देणें आवश्यक असेल तेथेंच

जोर द्यावयाचा आणि त्याला अनुरूप अशा कायदेशीर आधारांत तो झटदिशीं बसवून टाकावयचा,हें यांचें नेहमींचें वकिली तंत्र आहे. आरडाओरडा, पुनरुक्ति या सामान्य वकिलांकडून वापरल्या जाणाऱ्या अस्त्रांचा उपयोग करण्याची जरूरीच त्यामुळें यांना कधीं वाटत नाहीं. सर्व काम करण्याची यांची शैलीच इतकी गंभीर व रुबाबदार असते कीं, कांहीं पोरकट प्रश्न उपस्थित करण्याचें धाडस प्रतिपक्षाला करवतच नाहीं. आणि जर तें त्यानें केलें, तर यांच्या वक्तव्यांत कोणत्याहि प्रकारें अडथळा आणणें अशक्य होऊन बसतें.

देसाई-लियाकत कराराला काँग्रेस व मुस्लिम लीग यांमधील एकीचा शेवटचा प्रयत्न या दृष्टीनें विशेष महत्त्व आहे. सरसेनापति, अल्पसंख्याक, काँग्रेस व मुस्लिम लीग यांनीं एक संयुक्त मध्यवर्ति सरकार स्थापावें, त्यांत स्पृश्य हिंदु व मुसलमान यांना समान जागा असाव्यात व यासाठीं व्हाइसरॉयला जिना व हे यांना बोलावणें भाग पाडावें, असा या कराराचा आशय होता. परंतु पुढें जिनांच्या सर्व मुसलमान प्रतिनिधि, आपण म्हणजे लीगनें निवडण्याच्या आग्रहामुळें यांचा हा करार वायां गेला.

अझाद हिंद सेनेचे सेनापति शहानवाझ, धीलन व सैगल यांचेवर राजद्रोहाचे आरोपाखालीं हिंदुस्थान सरकारच्या वरिष्ठ कोर्टानें खटला भरला असतां यांनीं आरोपींतर्फे 'स्वातंत्र्याकरितां युद्ध करणारे किंवा दुसऱ्या राष्ट्राची मदत मागणारे गुन्हेगार ठरूं लागले तर परतंत्र राष्ट्रांना स्वातंत्र्याची केव्हांच आशा नको' असा बचाव केला. देशप्रेमाचे भावनेनें आरोपींनीं 'गुन्हा' केला असें जरी कोर्टानें ठरविलें तरी सरसेनापति अचिन्लेक यांनीं त्यांना स्वतःचे अधिकारांत सोडून दिलें (१९४६).

ग्रंथः—Speeches (जी. ए. नटेसन अँड को., १९३८).

देसाई, महादेव हरीभाई—(जन्म स. १८९२-मृत्यु स. १९४३) महात्मा गांधींचे सुप्रसिद्ध मदतनीस व गुजराथी लेखक.

हे जातीनें अनाविल ब्राह्मण; गांव दिहण, ता. ओलपाड. यांच्या वडिलांचें पूर्ण नांव हरिभाई सुरभाई देसाई; आईचें नांव जमनाबहेन. वडील महालक्ष्मी येथील स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजचे हेडमास्तर होते.

माध्यमिक शिक्षण सुरत व कॉलेज-शिक्षण एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई, येथें संपवून हे बी. ए. एल्एल्. बी. झाले व अहमदाबादेस वकिली करूं लागले. पण पुढें सहकारी खात्यांत नोकरीस असतां यांची वृत्ति साहित्याकडे वळली. यांनीं रवीन्द्रनाथ टागोरांच्या 'चित्रांगदा' या बंगाली नाटकाचें गुजराथी भाषान्तर केलें. यांना बंगाली भाषा सुद्धां गुजराथीप्रमाणें उत्तम येत असे.

यांच्या भाषेंत रस आणि माधुर्य यांचा उत्तम संगम आढळे. अर्थवाहक शब्दयोजना करून हे वाचकांच्या मनावर आपल्या प्रतिपादनाचा ठसा उमटवीत. 'नवजीवन' या गुजराथी पत्रांतील यांचें लिखाण याबाबत प्रमाण म्हणून दाखवितां येईल. यांचें लेखन जीवनांत नवचैतन्य उत्पन्न करणारें असल्यामुळेंच यांचा व म. गांधींचा अत्यंत लोभ जडला. हे त्यांचे अनन्य शिष्य होते. म. गांधींचेंहि यांच्यावर असाधारण प्रेम होतें. हे दोघे परस्परांना पूरक होते. यांनीं देशाकरितां सर्वस्वाचा त्याग केला होता. ८ ऑगस्ट १९४२ च्या चळवळींत हे अटकेंत असतां पुणें येथील आगाखान बंगल्यांत यांचा एकाएकी देहान्त झाला. म. गांधींनीं यांच्याकरितां २५ लाखांचा निधि उभारण्याचा संकल्प केला. आतां तर आगाखान यांनीं दहा हजार रुपये खर्च करून यांच्या ब कस्तुरबांच्या समाध्या आपल्या पॅलेसमध्यें बांधल्या आहेत.

यांचें गुजराथी वाङ्मय—१ चित्रांगदा नाटक (नरहरी परीखांच्या सहकार्यानें १९१४, १९२५), २ विदाय अभिशाप (१९१४), ३ प्राचीन साहित्य (१९१४), ४ अर्जुनवाणी (संग्रहकार म. दे.), ५ गोखलेना व्याख्यानों (१९१९), ६ एक धर्मयुद्ध (१९१७), ७ सत्याग्रहनी मर्यादा, लॉर्ड मोर्लेच्या ऑन कांप्रमाइजचें भाषांतर (१९२४) ८ विराजबहु, शरच्चंद्र चतर्जीचें भाषान्तर १९२३, ९ त्रण वार्ताओं (१९१४, १९२३), १० गांधीजीनी आत्म कथानो इंग्रजी अनुवाद (दि स्टोरी ऑफ माय एक्स्पेरिमेंटस् वुइथ ट्रुथ १९२५), ११ वुइथ गांधीजी इन् इंडियन व्हिलेज १९२५, १२ वुइथ गांधीजी इन् सिलोन १९२७, १३ दि स्टोरी ऑफ बारडोली १९२९, १४ बारडोली सत्यग्रहनों इतिहास १९२९, १५ वीर वल्लभभाई १९२९, १६ संत फ्रॅसिस १९३३.

देसाई, रमणलाल वसंतलाल—(जन्म स. १८९२) गुजराथी भाषेंतील सुप्रसिद्ध ललित-लेखक.

हे एम्. ए. झाल्यानंतर बडोदें संस्थानांत नोकरीस लागले. विद्यार्थिदशेंत लिहिण्यास सुरुवात केली असली तरी नोकरीच्या कालांतच यांचें बहुतेक सर्व लेखन झालेलें आहे.

यांनीं संयुक्ता व शंकितहृदय हीं नाटकें प्रथम लिहिलीं असलीं तरी 'दिव्यचक्षु' या कादंबरीनें यांचें नांव सर्वश्रुत झालें (१९३१). तिचें मराठी भाषान्तर रत्नप्रभा रणदिवे यांनीं केलें आहे. यांनीं सत्तावन सालच्या बंडावर 'भारेलो अग्नि' ही कादंबरी लिहिली. ही यांची अत्यंत आवडती कादंबरी होय. यांचें लेखन ठराविक ठशाचें नसतें. मध्यमवर्गीय गुजराथी समाजाचें चित्र रेखाटण्यांत हे सिद्धहस्त आहेत. यांच्या लेखनांत विविधता असून प्रगतिशील तरुण पिढीशीं समरस होण्याचा गुण आहे.

यांचें वाङ्मय—कादंबऱ्या–१ जयंत (१९२५), २ शिरीष (१९२७), ३ कोकिला (१९२८), ४ हृदयनाथ (१९३०), ५ दिव्यचक्षु (१९३१), ६ स्नेहयज्ञ (१९३१), ७ बंसरी (१९३२), ८ ग्रामलक्ष्मी, ९ पूर्णिमा, १० पत्रलालसा, ११ भारेलो अग्नि.' नाटकें—१ संयुक्त (१९२०), २ शंकितहृदय (१९२५), काव्यसंग्रह–निहारिका. लेखसंग्रह–जीवन-साहित्य. चित्रपट–कोकिला, पौर्णिमा.

देसाई, डॉ. वामन गणेश—(जन्म स. १८७४–मृत्यु स. १९२७) महाराष्ट्रांतील आयुर्वेदीय संशोधक व ग्रंथलेखक.

यांचा जन्म व शिक्षण पुणें येथें झालें. नंतर मुंबई ग्रँट मेडिकल कॉलेजमधून हे एल्. एम्. अँड एस्. मध्यें पहिले आले (१८९९). यांच्या या परीक्षेंतील गुणांची बेरीज यांच्या वेळेपर्यंत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांपेक्षां जास्त होती. तेव्हां यांना तीन शिष्य-वृत्त्या व अनेक पारितोषिकें मिळालीं. हे पुढें पहिल्या-प्रतीचे सूतिका व स्त्रीरोग यांत तज्ज्ञ म्हणून विख्यात झाले. कांहीं वर्षे वांद्रास धंदा केल्यावर हे इंग्लंडला गेले आणि लंडन विश्वविद्यालयाचे बी. एस्सी. व एम्. बी. बी. एस. होऊन स्वदेशीं परत आले (१९०९).

यानंतर यांनीं केवळ गरिबांकरितां स्वतंत्र शुश्रूषालय काढून गरीब स्त्रियांना विनामूल्य औषध देण्याची व्यवस्था केली. पण १९१५ मध्यें औषधांच्या किंमती वाढून यांना तें बंद करावें लागलें. पण याचा परिणाम असा झाला कीं, यांचें लक्ष आयुर्वेदीय व युनानी औषधांकडे वळलें. त्या दोहींचा गाढ अभ्यास करून यांनीं वनस्पतिशास्त्र व रसायनशास्त्र हे दोन ग्रंथ तयार केले. वनस्पतिशास्त्राच्या प्रयोगासाठीं यांनीं आपल्या बंगल्याच्या आवारांत वनस्पतीची बाग तयार केली होती.

देसाई, शान्ताराम अनंत—(जन्म स. १८६७-मृत्यु स. १९१४) मराठी व इंग्रजी भाषेंतील लेखक.

यांचा जन्म कुंभवडें (रत्नागिरी जिल्हा) येथें झाला. मुंबई विद्यालयाचे हे एम्. ए. असून कायद्याची परीक्षा उत्तीर्ण झाले होते. युरोपियन व हिन्दी तत्त्वज्ञानाशीं यांचा गाढ परिचय होता. इंदूरच्या 'होळकर कॉलेजांत हे २० वर्षे प्राध्यापक होते.

(१) युरोपीय नीतिमीमांसेचा इतिहास, भाग १–यांत ग्रीक नीतिमीमांसा; (२) 'गहन विषयावर अल्प विचार,' भाग १–यांत प्राच्य व पाश्चात्य ज्ञानमार्ग, पदार्थविज्ञान विरुद्ध ख्रिस्तीधर्म हे दोन विषय आहेत; (३) तुकारामाच्या अभंगरत्नांचे हार–यांत तुकाराम व इंग्रजी तत्त्वज्ञ कवि ब्राउनिंग यांच्या कृतींची तुलना करून त्यांतील विशेष व्यक्त केले आहेत व समर्थनपर उतारे दिले आहेत; (४) वैदिक तत्त्व-मीमांसा; (५) सृष्टीची यान्त्रिक उत्पत्ति; (६) वैदिक धर्माचें परम रहस्य; (७) उपनिषदांतील वचनांचा संग्रह वगैरे ग्रंथ यांनीं लिहिलेले आहेत. यांशिवाय 'A Study of Indian Philosophy' व 'Vedant of Shankaracharya Expounded and Vindicated' हे दोन इंग्रजी ग्रंथहि यांनीं लिहिले आहेत. स. १९०७ सालीं धर्म व तत्त्वज्ञान या विषयासाठीं यांनीं 'विद्यार्थी' हें त्रैमासिक सुरू करून तें ६-७ वर्षे चालविलें. यांचे बरेच निबंध 'विविध-ज्ञानविस्तारांत' प्रसिद्ध होत असत.

दहलवी, सर–अलीखान—(जन्म स. १८७५) सिंध प्रांतांतील सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते व शैक्षणिक सुधारक.

मुंबई व लंडन येथें शिक्षण घेऊन हे बॅरिस्टर होऊन हिंदुस्थानला परत आले. प्रथम गुजराथमध्यें कांहीं दिवस वकिली केल्यानंतर हे सिंधमध्यें स्थिर झाले. सिंध प्रांतांतील जमिनदारांच्या हक्कांचें संरक्षण करणारें

'अल्-हक्' हें पहिलें अँग्लो-सिंधी पत्रहि यांनीं सुरू केलें.

परंतु पुढें हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या मुख्य अडचणी शैक्षणिक असल्याचें यांचे ध्यानांत आलें. इतर सुधारणा पचविण्याची ताकद येण्यासाठीं प्रथम प्रत्येकानें सुशिक्षित व्हावयास पाहिजे अशा कल्पनेनें यांनीं सिंध हैदराबाद येथें मुस्लिम एज्युकेशनल कॉन्फरन्सचें पहिलें अधिवेशन भरविलें (१९०२) व पुढें कराचीच्या अधिवेशनाचे हे सेक्रेटरी होते. याचेच पुढें पुणें येथें भरलेल्या प्रेसिडेन्सी मुस्लिम एज्युकेशनल कॉन्फरन्सच्या दहाव्या अधिवेशनाचें व रत्नागिरी येथें भरलेल्या पहिल्या मॉहॅमेडन एज्युकेशनल कॉन्फरन्स (१९२६)चें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें. त्याचप्रमाणें सिंध प्रांतांतील शिक्षणासंबंधीं पहिला अनधिकृत रिपोर्ट लिहिण्याचा मान यांनीं मिळविला.

मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे हे कित्येक दिवस अध्यक्ष व मुंबई प्रांतांतील शेतकी खात्याचे हे प्रधान (१९२४-२७) होते.

यांचे ग्रंथ—History and Origin of Polo (पुस्तिका), (2) Mendicancy in India इत्यादि.

द्रविड बंधु—(खून ८ फेब्रु.१८९९) रँड व आयर्स्ट-साहेबांचा खून करणाऱ्या चापेकरबंधूंना पकडून देणारे.

चापेकरबंधूंनीं यांना तुम्हांला ब्रुइनसाहेब बोलावीत आहेत म्हणून घराच्या बाहेर काढलें व पुणें येथें खुन्या मुरलीधराच्या कोंपऱ्यावर ठार केलें. खुनाचा मारेकरी पकडून देणारास वीस हजारांचें बक्षीस सरकारनें ठेविलें होतें, त्यापैकीं दहा हजार यांना देण्यांत आलें.

द्रविड, रा. ब. भिकाजी व्यंकटेश—(जन्म स. १८५०–मृत्यु स. १९४०) सुप्रसिद्ध कॉंट्रॅक्टर व दानशूर गृहस्थ.

यांचें घराणें मद्रासकडून येऊन वाईस स्थायिक झालें. यांचे बंधु गणपतराव रेल्वेंत टाइमकीपरच्या जागेवरून असि. एंजिनियरच्या जागेपर्यंत चढले व हेहि कंत्राटें घेऊन संपन्न बनले. यांच्या देणगीमुळें वाईस द्रविड हायस्कूल व त्याची इमारत झाली व तें डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें चालविण्यास घेतलें. १८९९ सालीं यांनीं कंत्राटांचा धंदा सोडला व पुण्याहून यवतमाळला जाऊन जिनिंग फॅक्टऱ्या काढल्या. तेथें यांना यांचे जांवई नटेश अप्पाजी द्रविड हे कांहीं काळ व्यवस्थापक लाभले होते. ते पुढें फर्ग्युसन कॉलेजांत व सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटींत दाखल झाले.

द्रविड, लक्ष्मणशास्त्री—(मृत्यु स. १९३१) भारतवर्षीय कीर्तीचे काशी येथें राहणारे सुप्रसिद्ध संस्कृत पंडित.

यांनीं कलकत्त्यास विश्वविद्यालयांत नोकरी केल्यावर शेवटीं हे काशीस राहिले. अलीकडच्या काळांत सनातनी विचारसरणीचा पुरस्कार करून धर्मसुधारकांशीं दोन हात करण्याचें काम यांनीं अत्यंत यशस्वीपणें केलें. अखिल भारतीय वर्णाश्रम स्वराज्यसंघाची स्थापना करून यांनीं सनातनी पक्षाला संघटित केलें, आणि अखिल भारतीय ब्राह्मण संमेलन काशीस भरवून सनातनी विचारसरणीवर हल्ला करणारांस आव्हानपूर्वक अंगावर घेऊन सनातनी विचारसरणी कशी कणखर पायावर उभारलेली आहे हें लोकांच्या निदर्शनास आणलें. विवाह-वयोमर्यादनियंत्रण कायद्याच्या निषेधार्थ यांनीं नोकरी व पदवी यांचा त्याग केला होता. यांचे चिरंजीव राजेश्वरशास्त्री.

द्रविड, राजेश्वरशास्त्री—(जन्म स. १९००) भारतवर्षीय कीर्तीचे सुप्रसिद्ध काशीकर पंडित.

यांनीं आपले वडील लक्ष्मणशास्त्री द्रविड यांचें कार्य पुढें चालविलें आहे. न्यायवेदान्तादि शास्त्रांचें अध्ययन करून यांनीं काशींतील विख्यात पंडित अशी कीर्ति मिळविली आहे. तेथील साङ्गवेद विद्यालयाचे हे प्रमुख आहेत. वादविवादांत हे अत्यंत निष्णात आहेत. सनातनी विचारसरणी कशी खंबीर व तर्कशुद्ध पायावर उभारली आहे हें प्रतिपादण्यांत यांचा हातखंडा आहे. हिंदुस्थानच्या सर्व प्रान्तांत भरलेल्या विद्वत्परिषदांत यांना सखोल ज्ञानानें, तर्कशुद्ध प्रतिपादनानें आणि शुद्ध आचरणानें अग्रमान मिळालेला आहे. सनातनी विचारसरणी सध्यांच्या लोकशाहीच्या व समतेच्या काळांत टिकत नाहीं असें वाटत असलें तरी ती भरभक्कम पायावर उभारलेली आहे याबद्दल यांच्या सारख्यांच्या प्रतिपादनानें खात्री पटल्याशिवाय राहत नाहीं. कारण कोणतीहि समाजरचना किंवा धर्मशास्त्र विचाराच्या भरभक्कमपणापेक्षां राजसत्तेच्या पाठिंब्यावर अवलंबून असते. यांनीं त्या दृष्टीनें ग्रंथलेखनहि केलें आहे.

द्विवेदी, मन्नन मातादीन—(जन्म स. १८८५–मृत्यु स. १९२१) सुप्रसिद्ध हिन्दी कवि.

गजपुर (जि. गोरखपूर) येथील प्रसिद्ध कवि मातादीन यांचे हे ज्येष्ठ पुत्र. हे बनारस गव्हर्नमेंट कॉलेजमधून बी. ए. झाले. हे बाल्यावस्थेपासून हिन्दींत गद्य व पद्य लिहीत.

यांचे ग्रंथ—१ बन्धुविनय (पद्य), २ धनुषभंग (पद्य), ३ रणजितसिंहका जीवनचरित, ४ आर्य ललना, ५ गोरखपुर विभागके कवि, ६ भारतवर्षके प्रसिद्ध पुरुष, ७ प्रेम, ८ रामलाल (कादंबरी), ९ मुसलमानी राजका इतिहास (२ भाग).

द्विवेदी, महावीरप्रसाद—(जन्म स. १८६४–मृत्यु स. १९३८) सुप्रसिद्ध हिन्दी संपादक, कवि व हिन्दी भाषेला नवें भारदस्त रूप देणारे लेखक.

यांचा जन्म अवध प्रान्तांत दौलतपूर गांवीं (जि. रायबरेली) कान्यकुब्ज ब्राह्मणाच्या कुलांत झाला. घरच्या गरिबीमुळें हायस्कूलमधील शिक्षण पुरें न करितांच यांना रेल्वेंत नोकरी पत्करावी लागली. तारेचें काम हे शिकले व टेलिग्राफ इन्स्पेक्टरहि झाले होते. पण वरच्या अधिकाऱ्याशीं न जमल्यानें यांना ती नोकरी सोडावी लागली.

यांनीं स्वतःच्या परिश्रमानें चांगली विद्वत्ता संपादन केली होती. गद्य व पद्य हे सफाईदार लिहीत. भाषान्तर, रूपान्तर व स्वतंत्र अशीं यांनीं पुस्तकें लिहिलीं. हिंदीच्या खडी बोलींत साफ लिहिण्याकडे लोकांचें लक्ष वेधणें आणि नवशिक्षितांमध्यें हिन्दी भाषेंत लिहिण्याविषयीं आदर उत्पन्न करणें हें यांचें महत्त्वाचें जीवितकार्य होय.

यांनीं २० वर्षेपर्यंत सरस्वती मासिकाचें संपादन करून हिन्दी प्रान्तांत नवें द्विवेदीयुग निर्माण केलें. या यांच्या सेवेचा गौरव करण्याकरितां बनारसच्या नागरी प्रचारिणीसभेनें द्विवेदी गौरव ग्रंथ प्रसिद्ध करून यांना अर्पण केला (१९३२).

यांचे ग्रंथ—गद्य अनुवाद–१ कुमारसंभवसार (पहिले पांच सर्ग), २ रघुवंश, ३ किरातार्जुनीय, ४ मेघदूत, ५ हिन्दीमहाभारत (बंगालीवरून), ६ बेकन विचाररत्नावली, ७ स्पेन्सरची ज्ञेय व अज्ञेयमीमांसा, ८ स्वाधीनता, ९ संपत्तिशास्त्र; काव्य–१० कविताकलाप, काव्यमञ्जूषा, सुमन; समालोचना–११ हिन्दी भाषाकी उत्पत्ति, १२ कालिदासकी निरंकुशता, १३ मिश्रबंधुका हिन्दी नवरत्न, १४ लो. टिळकका गीताभाष्य इत्यादि.

द्विवेदी, महामहोपाध्याय-सुधाकर कृपालदत्त—(जन्म स. १८६०–मृत्यु स. १९१० नवं. २८) सुप्रसिद्ध गणित-ज्योतिषी व हिन्दी भाषेंतील कवि.

जात–शरयुपारीण ब्राह्मण. यांचे पूर्वज काशीस आले. तेथेंच यांचा जन्म, बाळपण व शिक्षण झालें. बापुदेवशास्त्री सेवानिवृत्त झाल्यावर यांची बनारस संस्कृत कॉलेजांत गणित व ज्योतिष विषयाचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. पूर्वी हे तेथें पुस्तकालयाचे अध्यक्ष होते.

हे गणितज्योतिषाप्रमाणें हिन्दी भाषेचे व्यासंगी होते. तुलसीदास, सूरदास, कबीर व अन्य हिंदी कवींच्या काव्यांत यांची चांगली प्रगति असे. यामुळें काशी नागरी प्रचारिणी सभेचे हे अनेक वर्षें अध्यक्ष होते. यांनीं हिन्दी भाषेंत सतरा पुस्तकें लिहिलीं आहेत. 'मै समझता हूं संस्कृत काव्यसे बढकर हिंदी काव्यमें आनंद मिलता है' हें यांचें हिन्दी काव्यासंबंधी मत आहे. भारतेन्दु हरिश्चन्द्रांचे हे मित्र होते.

यांनीं केलेले संस्कृत ग्रंथः—(१) दीर्घवृत्तलक्षण, स. १८७८, यांत दीर्घवर्तुलाचे धर्म सविस्तर व सोपपत्तिक सांगितले आहेत. (२) विचित्रप्रश्न, सभंग, स. १८७९, यांत गणिताचे कठीण २० प्रश्न सोत्तर आहेत. (३) वास्तव चंद्रशृंगोन्नति साधन, स. १८८० यांत लल्ल, भास्कर, ज्ञानराज, गणेश, कमळाकर, बापुदेव यांच्या शृंगोन्नतिसाधनांतले दोष दाखवून युरोपीय ज्योतिःशास्त्रास अनुसरून वास्तव शृंगोन्नति साधन सूक्ष्म सांगितलें आहे. याचीं ९२ पद्यें आहेत. (४) द्युचरचार, स. १८८२, यांत ग्रहकथामार्गाचें विवेचन युरोपीय आधुनिक ज्योतिःशास्त्रास अनुसरून आहे. (५) पिंड प्रभाकर, स. १८८५, हा ग्रंथ वास्तुप्रकरणीं आहे. (६) भाभ्रमरेखानिरूपण, यांत छायेस अनुसरून सूचीछेदविचार आहे. (७) धराभ्रम, यांत पृथ्वीच्या दैनंदिन भ्रमणाचा विचार आहे. (८) ग्रहणकरण, यांत ग्रहणाचें गणित करण्याची रीति आहे. (९) गोलीय रेखागणित. (१०) युक्लिडच्या ६, ११, १२ ह्या पुस्तकांचा संस्कृत श्लोकबद्ध अनुवाद. (११) गणकतरंगिणी स. १८९०, यांत भारतीय गणकांचा इतिहास आहे. प्रथम तो पंडित नामक काशींतील मासिकांत छापला होता, नंतर तो निराळा छापला.

यांचे संस्कृत टीकाग्रंथ–(१२) यंत्रराज ग्रंथावर प्रतिमाबोधक, (१३) करणकुतूहलावर वासनाविभूषण.

(१४) वराहमिहिराच्या पंचसिद्धान्तिकेवर 'पंचसिद्धान्तिका प्रकाश' नांवाची टीका, इत्यादि.

यांशिवाय यांनीं कृष्णकृत छादकनिर्णय, कमलाकरकृत सिद्धान्ततत्त्वविवेक, लल्लकृत धीवृद्धितंत्र, उत्पलटीकेसह बृहत्संहिता छापविली आहे. यांनीं भाषाबोधक नांवाचा संस्कृत ग्रंथ भाषेविषयीं केला आहे. हिंदी भाषेंत गणिताचींच चलनवलन नांवाचीं दोन पुस्तकें केलीं आहेत आणि हिंदीचें व्याकरण रचलें आहे. यांचा गणकतरंगिणी ग्रंथ एकंदरींत उपयुक्त आहे. त्यावरून यांचें देशीपरदेशी गणितज्योतिषज्ञान उत्कृष्ट दिसून येतें. तरी गणकतरंगिणींत 'आर्यभटानें कोणा परदेशीय यवनपंडितास देवता मानून त्याच्या कृपालवानें संपादलेल्या भगणादिकांच्या संख्या गुप्त ठेवाव्या अशा बुद्धीनें नवीन संकेतानें सांगितल्या' (गणकतरंगिणी पृ. ३५), 'भास्कराचार्यानें ग्रंथसमाप्तीनंतर ज्योत्पत्ति उपपत्तीवांचून वर्णिली. यावरून परदेशांतून आलेल्या कोणा यवनापासून तो त्यासंबंधीं रीति मात्र शिकला, उपपत्ति शिकला नाहीं असें अनुमान होतें' (गणकतरंग. ३७), अशा तऱ्हेचे निराधार कल्पनातरंग कोठें कोठें आढळतात (भा. ज्यो. इ. पा. ३०७-९).

ध

धनवटे, दत्ताजी रामजी ऊर्फ दादासाहेब—(जन्म स. १८८७) नागपूरच्या शिवराज फाइन आर्ट लिथो वर्क्स छापखान्याचे मालक व चित्रकार.

यांचा जन्म क्षत्रिय घराण्यांत झाला. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्यें चित्रकला व माझगांवच्या रात्रींच्या शाळेंत इंग्रजी असा अभ्यास करीत दोन वर्षें गेलीं. नंतर पुण्याच्या चित्रशाळेंत तेरा रुपयांवर नोकरीस राहून नंतर मुंबईस 'बोल्टन फाइन आर्टस्'मध्यें नऊ वर्षें काम केलें. या अवधींत लिथोग्राफीचीं शेंकडो कामें यांच्या हातांतून गेलीं.

टाटा गिरणीचें 'दरजी छाप' ट्रेडमार्कचें चित्र यांच्या हातचें असून तें चढाओढींत पसंत करण्यांत आलें. १९२० च्या सुमारास यांनीं भागींत लिथोप्रेस काढला. पुढें मतभेद झाल्यावर यांनींच सर्व जबाबदारी घेतली. १९३७ सालीं नवीन भव्य इमारत बांधली. आणि आवश्यक असणारीं अनेक खातीं उघडलीं.

धर, नीलरतन—(जन्म स. १८९६) सुप्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ आणि संशोधक.

यांचा जन्म बंगाल्यांतला. त्याचप्रमाणें यांचें शिक्षणहि प्रफुल्लचंद्र रे व सर जगदीशचंद्र बोस यांच्या देखरेखीखालीं कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें झालें. तेथें एम्. एस्सी.ची परीक्षा पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाल्यावर प्रफुल्लचंद रे यांच्याबरोबर यांनीं अमोनियम नत्रिताच्या बाष्पघनत्वावर संशोधन केलें (१९१२). पुढें सरकारी शिष्यवृत्ति मिळाल्यामुळें हे विलायतेस गेले. स. १९१६ सालीं पॅरिस येथील सारबोन विश्वविद्यालयांतून व लंडन येथील विश्वविद्यालयांतून आचार्यांची पदवी मिळाल्यावर यांची अलाहाबाद येथील मूर सेंट्रल कॉलेजांत प्रोफेसराच्या जागीं नेमणूक झाली. तेव्हांपासून हे तेथेंच असून यांनीं आजपर्यंत तीनशेंच्यावर संशोधनलेख लिहिले आहेत. स. १९३३-३४ सालीं हे 'इंडियन केमिकल सोसायटी'चे अध्यक्ष होते.

'प्रकाशाचा रासायनिक परिणाम' हा यांच्या आवडीचा विषय होय. प्रकाश-रासायनिक क्रियांचा तापगुणक कमी असतो हें यांनींच प्रथम दाखविलें. प्रकाशाची तीव्रता व रासायनिक क्रियेची गति यांचा परस्परसंबंध स्थिर नाहीं, हें यांनीं सिद्ध केलें. हें संशोधन यांनीं डॉ. बी. के. मुकर्जी, डॉ. ए. के. भट्टाचार्य, वा. वि. भागवत इत्यादिकांबरोबर केलें. प्रकाश-संश्लेषण कार्यांत आत्माराम हे यांचे सहकारी होते. यांनीं सूर्यप्रकाशामुळें क्लोरोफिलच्या अस्तित्वांत व ह्याशिवाय पाणी व अर्वाद्विउर्वपासून फार्मलडिहाइड बनतें असें दाखविलें. तसेंच प्रकाशाची तीव्रता वाढल्यास फार्मलडिहाइडचें विघटन होतें असें यांस आढळलें. जमिनींत तयार होणाऱ्या नत्रितांचा बराच अंश सूक्ष्म जंतूंशिवाय सूर्यप्रकाशानें तयार होतो असा अनुभव यांस आला.

सूर्यप्रकाशामुळें शेतकऱ्यास किती फायदा होतो याची जाणीव या शोधामुळें होते. सूर्यप्रकाश व ओजोद्रव्य यांसंबंधींचे प्रयोगहि यांनीं कबूतरावर केले. व सूर्यप्रकाशामुळें खाद्य पदार्थांचें उर्वीकरण सुलभतेनें होतें हें यांनीं पालितबरोबर कार्य करून दाखविलें.

कलिलरसायनांतील यांचें संशोधनहि महत्त्वाचें आहे. कलिलांच्या गुणधर्माचा अभ्यास यांनीं डॉ. के. सी. सेन, डॉ. एस्. घोष व चक्रवर्ती यांजबरोबर केला. 'जेली 'वरील कार्यांत यांस डॉ. सत्यप्रकाशांनीं मदत केली. लिसिंग चक्रावरील यांचें संशोधन, विशेषतः या चक्राच्या अस्तित्वाचें स्पष्टीकरण एक वेळ सर्वमान्य होतें; पण आतां ह्यासंबंधींचें संपूर्ण स्पष्टीकरण कोणत्याहि एका सिद्धान्तानें करितां येणें शक्य नाहीं असें सिद्ध झालें आहे. या शास्त्रज्ञांच्या गेल्या तेवीस वर्षांच्या सतत कार्यामुळें वास्तव रसायनांत बरीच भर पडली असून हिंदुस्थानाचा शास्त्रीय दर्जा जगांत बराच वाढला आहे.

हिंदुस्थानांतील वास्तव रसायनाच्या व प्रकाशरसायनाच्या जनकत्वाचा मान यांचा आहे. प्रफुल्लचंद्र रे यांच्याप्रमाणें यांनींसुद्धां आपली शिष्यपरंपरा निर्माण केली असून केवळ यांच्यामुळेंच आज अलाहाबाद हें वास्तवरसायनाचें प्रमुख केंद्र मानलें जातें.

धर्मपाल, देवमित्र—(जन्म स. १८६४–मृत्यु स. १९३३) बिहार प्रान्तांतील सिलोनी बुद्धधर्मप्रचारक.

यांचें मूळ नांव डॉन डेव्हीड. हे ज्या वेळीं सिलोनमध्यें कोलंबो येथें जन्मले, त्या वेळीं ख्रिस्ती धर्माचा पगडा तेथें किती होता हें यांच्या नांवावरून दिसून येतें. हे धर्मानें सिंहली बौद्ध असतांनासुद्धां यांचें नांव डॉन डेव्हिड असें ठेवलें. यांच्या वडिलांचें फर्निचरचें दुकान होतें व ते चांगले श्रीमंत होते. तरी अगदीं तरुण वयांतच बौद्ध भिक्षु होण्याकरितां यांनीं घर सोडलें व सुमारें ५० वर्षें हिंदुस्थान, युरोप व अमेरिका यांत पर्यटन केलें. हिंदुस्थानांत बौद्धधर्माचें पुनरुज्जीवन करणें हें यांचें मुख्य उद्दिष्ट होतें. हे 'अनगारिक धर्मपाल' या नांवानेंहि ओळखले जात.

सव्विसावे वर्षी हे हिंदुस्थानांत आले. तेव्हांच यांची बौद्धधर्मप्रचारक व समाजसुधारक म्हणून ख्याति सिलोनमध्यें झालेली होती. या वेळींच लौकिक ध्येयांचा यांनीं त्याग केला होता. बुद्धगयेचें मंदिर हिंदु महन्ताच्या ताब्यांत असून त्याची अत्यन्त निकृष्ट स्थिति असल्याचें यांच्या ध्यानांत आलें. वास्तविक तें मंदिर बौद्ध लोकांच्या ताब्यांत असावयास पाहिजे. तसें व्हावें म्हणून यांनीं महाबोधि सोसायटीची स्थापना केली (१८९१). महन्त आणि हे यांच्यांत अनेक दिवाणी व फौजदारी दावे झाले. पण शेवटीं देवळाचा ताबा यांना केव्हांच मिळाला नाहीं. तें देऊळ आजहि हिंदु महन्ताच्या ताब्यांत असून गौतम बुद्धाच्या पुतळ्याची विष्णु म्हणून तेथें पूजा चालू आहे.

यांनीं स. १८९३ सालीं जागतिक बौद्ध सभा गयेला भरविली होती. आधींच चिकागो येथें भरलेल्या पहिल्या जागतिक धर्मपरिषदेंत यांनीं बौद्धधर्मावर दिलेल्या व्याख्यानामुळें यांना आन्तर्राष्ट्रीय प्रसिद्धी मिळाली (१८९३). यानंतर यांनीं सर्व युरोपांत प्रवास केला आणि सर्वत्र यांच्या वक्तृत्वाची आणि व्यक्तिमत्त्वाची छाप पडली. हे हिंदुस्थानांत आल्यावर यांच्यावर सरकारची अवकृपा होऊन हे कांहीं वर्षे कलकत्त्यांत स्थानबद्ध होते (१९१४-२०). तेथून सुटतांच यांचें काम पुनः जोरानें सुरू झालें. यांनीं पांचसहा वर्तमानपत्रें सुरू केलीं, औद्योगिक शिक्षण अवश्य असल्याचें प्रतिपादन केलें आणि किती तरी तरुण धंदेशिक्षण घेण्याकरितां जपानला धाडले.

याच वेळीं सिलोनमधील यांचें कार्य चालूच होतें. तेथें विशेषतः ख्रिस्ती धर्माचें वर्चस्व नांवें, पोषाख व वागणूक यांवर व भाषेवर पडलें होतें. तें दूर करण्याचा यांनीं अत्यंत कसोशीनें प्रयत्न केला व सिंहली लोकांस स्वाभिमानानें राहण्यास शिकविलें. बायका झगे घालीत त्याऐवजीं यांनीं त्यांनीं साड्या नेसण्याबद्दल चळवळ केली. अशा प्रकारें सिंहली लोकांतील जुने आचारविचार, भाषा, पोषाख, खाणें वगैरेबद्दल जागृति करून यांनीं लोकांत स्वाभिमानाची नवी दृष्टि उत्पन्न केली.

याकरितां यांनीं पुष्कळ संस्था स्थापन केल्या. त्यांत कोलंबो येथें कॉलेज व हॉस्पिटल प्रमुख आहे. सर्व सिलोनभर यांनीं शाळा स्थापन केल्या. विणकरांची संस्था काढली. आणि शिष्यवृत्त्या देऊन अनेक सिंहली विद्यार्थी जपानला धाडले.

बनारसजवळच्या सारनाथची दुःस्थिति यांच्या ध्यानांत येतांच यांनीं त्या स्थानास पूर्वीचें वैभव प्राप्त करून देण्याची खटपट केली. तेथें 'मूलगन्धकूटी-

विहार' बांधला (१९३१). आणि तेथील भिंतीवर मि. बी. एल्. ब्राउटन यांच्या देणगीनें जपानी चित्रकार कोझेत्सु नोसु यांच्याकडून बुद्धचरित्रावर चित्रें काढवून घेण्यांत आलीं.

गयेला यांनीं एक बौद्धांकरितां वसतिगृह बांधलें. कलकत्त्याला यांनीं धर्मराजिक चैत्यविहार बांधला. सारनाथला बौद्धधर्माची दीक्षा देण्याची संस्था काढली. या संस्थेंत दीक्षा देण्याकरितां सिलोनी व जपानी लोक आले होते.

यांनीं महाबोधि सोसायटीची शाखा लंडनला उघडली. मृत्यूपूर्वी हे एकच वर्ष सर्वसंगपरित्यागी भिक्षु झाले व यांनीं सर्व चळवळी सोडल्या होत्या.

स. १८९३ सालीं चिकागो परिषदेहून परत येत असतांना हवाईच्या मिसेस् मेरी फोस्टर या उदारहृदयी अमेरिकन स्त्रीची व यांची गांठ पडली. हिनें महाबोधि सोसायटीस आठ लाख रुपये दिले. यांच्या सर्व कार्यांत यांना युरोपियन व अमेरिकन लोकांकडून पुष्कळ मदत झाली.

कलकत्त्याच्या महाबोधि सोसायटीतर्फे 'महाबोधि' नांवाचें इंग्रजी मासिक अद्यापहि चालविलें जातें.

हिंदुस्थानांत महाबोधि सोसायटीच्या द्वारां केलेल्या बौद्धधर्माच्या पुनरुज्जीवनाचें व प्रचलित बौद्धधर्मविषयक जागृतीचें सर्व श्रेय यांच्या कार्यालाच आहे. सिंहली लोकांत व सिलोनमध्यें बौद्ध संस्कृति पुनरपि खेंचून आणण्याचें काम यांच्या एकट्याच्या अर्धशतकभर चाललेल्या प्रयत्नाचें निःसंशय फळ होय.

हिंदुस्थानांतील हिंदु व बाहेरच्या प्रान्तांतील बौद्ध हे धर्मतत्त्वाच्या व संस्कृतीच्या दृष्टीनें एकच आहेत असें यांचें सारखें प्रतिपादन असे. त्याचा परिणाम म्हणून कानपूर येथें भरलेल्या अखिल-भारतीय हिंदुमहासभेचें अध्यक्षस्थान ब्रह्मदेशांतील बौद्धसंन्यासी रेव्हरंड उत्तम यांस देण्यांत आलें.

धामणस्कर, दिवाणबहदुर रामचंद्रराव विठोबा—(जन्म स. १८४८–मृत्यु स. १९०३ सुमार) बडोदें संस्थानचे दिवाण व दानशूर मराठा गृहस्थ.

यांचें जन्मस्थान–मालावली (जि. रत्नागिरी). मूळगांव धामणसें (जि. रत्नागिरी). पांडोबा–बळवंत-विठोबा असा यांचा वंश. यांचे वडील कर्डे येथें मुन्सफ असतांना वारले (१८६०). आईचे दागिने मोडून हे मॅट्रिक झाले (१८६६) व प्रथम शिक्षक व पुढें कलेक्टर कचेरींत कारकून व मामलेदार झाले. पुढें बडोदें सरकारकडून यांना सरसुभे म्हणून बडोदें राज्यांत नोकरीस घेण्यांत आलें व तेथें अनेक महत्त्वाचीं कामें करण्याची संधि यांना मिळाली. सयाजीराव महाराजांच्या बरोबर हे इंग्लंडलाहि जाऊन आले (१८८८). शेवटीं कांहीं वर्षे यांनीं तेथें मुख्य प्रधान म्हणूनहि काम केलें.

मराठ्यांची संघटना करण्याचा पहिला प्रयत्न यांनीं केला. १८९१ सालापासून दरमहा पन्नास व १९०१ पासून दरमहा तीनशें रुपये विद्यार्थ्यांसाठीं हे खर्च करीत. आपल्या द्वितीय पत्नी गंगाबाई यांच्या स्मरणार्थ मॅट्रिकमध्यें मराठा वगैरे विद्यार्थ्यांस देण्याकरितां मुंबई विश्वविद्यालयास सहा हजार रुपये यांनीं दिले. त्यांच्या मृत्यूनंतर मृत्युपत्रान्वयें यांची सत्तर हजारांची मिळकत बडोद्याच्या विद्याखात्याकडे देण्यांत आली. त्याचें व्याज २३०० रुपये दरसाल उच्च शिक्षण घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांस 'धामणस्कर–शिष्यवृत्ति' म्हणून देण्यांत येतें.

धार, पंडित बिशन नारायण—(जन्म स. १८६४–मृत्यु स. १९१६) बंगालमधील सुप्रसिद्ध कायदेपंडित, राष्ट्रसभाकार्यकर्ते व वक्ते.

इंग्लंडहून बॅरिस्टर होऊन आल्यावर यांनीं कलकत्त्यास वकिली करण्यास सुरुवात केली (१८८७) आणि तेव्हांपासून हे राष्ट्रसभेमध्यें भाग घेऊं लागले. १९११ सालच्या कलकत्ता राष्ट्रसभेचें अध्यक्षपद रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांस देण्यांत आलें होतें. पण ते ऐन वेळीं उपस्थित राहूं न शकल्यानें ती जबाबदारी यांच्यावर पडली.

धारुरकर, विठ्ठलशास्त्री दाजीशास्त्री—(मृत्यु स. १९१०) पंढरपूरचे सुप्रसिद्ध संस्कृत पंडित.

यांनीं व्याकरण, धर्म वगैरे शास्त्रांचें अध्ययन सातारचे सुप्रसिद्ध पंडित रामशास्त्री गोडबोले यांचेपाशीं केलें. हे शुक्लयजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे होत.

पंढरपूर येथें यांनीं चार वेद व शास्त्रें यांची पाठशाळा स्थापन केली (शके १८२०). ती पाठशाळा अद्यापि

चालू असून 'धारुरकर वेदशास्त्रशाळा' या नांवानें प्रसिद्ध आहे.

सुप्रसिद्ध पंडित भगवान्‌शास्त्री धारुरकर हे यांचे चिरंजीव होत.

यांचे ग्रंथ—१ उपयुक्त धर्मशास्त्रसंग्रह (संस्कृत व मराठी), २ प्रायश्चित्तव्यवहारप्रकाश (संस्कृत व मराठी), ३ श्रीपंढरीमाहात्म्य (संस्कृत, मराठी, गुजराथी), ४ पंढरीतत्त्वविवेकः (संस्कृत), ५ बाळशिक्षक (मराठी), ६ ज्योतिष रत्नभांडार (अप्रसिद्ध), ७ पंढरपूर येथें सर्वकाल विवाह करण्याचा निर्णय (संस्कृत व मराठी).

धिंग्रा, मदनलाल—(जन्म स. १८८४ सुमार. फांशीं स. १९०९ ऑगस्ट १७) हिंदुस्थानांतील प्रसिद्ध क्रांतिकारक.

यांचें हिंदुक्षत्रिय असणारें घराणें मूळ पंजाबांतील. यांचे वडील अमृतसरला सिव्हिल सर्जन होते. १९०६ सालीं वडिलांनीं परवानगी दिली नाहीं म्हणून बोटीवरील आगवाल्याचे मदतनीस म्हणून हे इंग्लंडला आले. इंग्लंडमध्यें आल्यानंतर सावरकरांचे सहवासानें यांचें मन क्रांतिवादाकडे झुकूं लागलें आणि त्याची परिणती इंडिया ऑफिसचे राजकीय ए. डी. सी. सर विल्यम कर्झन वायली यांच्या खुनांत झालें. 'नॅशनल इंडियन असोसिएशन' या संस्थेच्या वार्षिक समारंभाचे वेळीं हा प्रकार घडला. रात्रीं अकराचे सुमारास समारंभास आलेल्या पाहुण्यांची गर्दी पांगलेली पाहून हे कर्झन वायलीच्या जवळ कांहीं गुप्त बोलण्याच्या मिषानें आले व आपल्याजवळील पिस्तुलानें यांनीं त्यांना ठार मारलें. या प्रकरणांत मध्यें पडलेल्या डॉ. कांवस लालकाका यांनाहि यांनीं ठार मारलें. मात्र आत्महत्या करण्यासाठीं स्वतःवर रोखलेलें पिस्तूल सर लेस्लि प्रोबिन यांच्या प्रयत्नामुळें हे झाडूं शकले नाहींत. 'परतंत्र राष्ट्र हें नेहमीं युध्यमानच असतें, निःशस्त्र राष्ट्राला उघडपणें शत्रूवर हल्ला करतां येत नसल्यानें गुप्तपणें हल्ला करण्यात दोष नाहीं,' असा यांनीं आपला बचाव केला.

धुरंधर, रा. ब. महादेव विश्वनाथ—(जन्म स. १८७१-मृत्यु स. १९४४) मुंबईचे सुप्रसिद्ध चित्रकार.

यांचें जन्मस्थान मुंबई असलें तरी यांचें शिक्षण कोल्हापुरास झालें. जगप्रसिद्ध चित्रकार आबालाल रहिमान हे यांचे चित्रकलेंतील आद्य गुरु होत. १८९० मध्यें यांनीं कोल्हापूरच्या 'स्कूल ऑफ आर्टस्'मध्यें प्रवेश केला. अल्पावकाशांतच यांनीं आपल्या कलानैपुण्यानें मेजर ग्रिफिथ व मेजर ग्रीनवुड या प्रिन्सिपलद्वयांची मर्जी संपादन केली. इतकेंच नव्हे तर कलानिपुण विद्यार्थ्यालाच मिळणारें मेयोपदकहि यांना मिळालें. विद्यार्थिदशेंत असतांनाच बॉम्बे आर्ट सोसायटीचे प्रदर्शनांत यांच्या एका चित्राला सुवर्णपदक मिळालें. अध्यापक, इन्स्पेक्टर, व्हा. प्रिंसिपल अशा अनेक नात्यांनीं यांनीं स्कूल ऑफ आर्टस्मध्यें आपली सेवा बजावली.

सेवानिवृत्तीनंतर हिंदी मनुष्याला क्वचितच मिळणारा ऑफीशिएटिंग डायरेक्टरचा मान यांना मिळाला. पिक्चर कांपोझिशन या चित्रकलेंतील विभागावर यांचें विशेष प्रभुत्व होतें. या शाखेंतील प्रभुत्वाबद्दल यांची सर्वत्र ख्याति असे. नव्या दिल्लीतील इंपिरियल सेक्रेटरीएटच्या इमारतींतील चित्रें रंगविण्याचें बहुमानाचें काम यांना मिळालें. १९३२ सालीं लंडन येथें यांनीं आपल्या चित्रांचें प्रदर्शन भरविलें. त्यांतील एक चित्र महाराणी मेरी यांना अत्यंत पसंत पडलें. तें चित्र आज बकिंगहॅम राजवाड्यांत लटकत आहे. धार्मिक, ऐतिहासिक व सामाजिक यांपैकीं कोणत्याहि प्रसंगांतील चित्रांत यांचें स्त्री-व्यक्तिरेखन अत्यंत सुंदर असतें.

१९०३ सालीं यांना मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमचे ट्रस्टी व १९३४ सालीं नागपूर आर्ट सोसायटीच्या परीक्षकांचे प्रमुख नेमण्यांत आलें होतें. यांनीं सहकुटुंब जगांत प्रवास करून अनेक चित्रसंग्रह पाहिले होते. वेम्बले प्रदर्शनांत यांच्या चित्रांची प्रशंसा झाली होती.

यांनीं प्रकाशक व लेखक या नात्यानेंहि आपला परिचय लोकांना दिलेला आहे. किंकेडचें 'डेक्कन नर्सरी टेल्स', आटो रॉथफील्डचें 'वुमेन ऑफ इंडिया', एस्. एस्. एडवर्डचे 'बायवेज् ऑफ बॉम्बे' वगैरे पुस्तकें यांनीं प्रसिद्ध केलीं. शिवाय मराठी, गुजराथी व हिन्दी भाषांतूनहि यांनीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत.

जुन्या पिढींतील एक यशस्वी चित्रकार व नव्या पिढीकडे सहानुभूतीनें पाहून उत्तेजित करणारा कलावंत अशी यांची भूमिका असे.

धुलिपसिंह, के. एस्.—(जन्म स. १९०५) जगप्रसिद्ध हिंदवी क्रिकेटपटु.

जगप्रसिद्ध क्रिकेटपटु नवानगरचे जामसाहेब रणजितसिंह यांचे हे पुतणे. राजकुमार कॉलेजमधील आपलें शिक्षण संपविल्यानंतर हे केम्ब्रिजला गेले. त्या ठिकाणीं सी. बी. फ्राय, जी. ए. फॉल्कनर वगैरेंच्या अध्यापनानें हे उत्कृष्ट क्रिकेटपटु बनले.

ए. एच. गिलिगन, ससेक्स टीममधून निवृत्त झाल्यानंतर त्या टीमचें नेतृत्व ओघानेंच यांच्याकडे आलें. ससेक्स टीमच्या नेतृत्वाचा लाभ पटकविणारे हे दुसरे हिंदी गृहस्थ होत.

आपल्या काकांच्याप्रमाणेंच ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळलेल्या आपल्या पहिल्याच टेस्ट मॅचमध्यें यांनीं शतक काढलें. तेव्हांपासून अचूक दृष्टि व मनगटाचा लवचिकपणा यांमुळें बॅट्समन म्हणून यांची कीर्ति सारखी वाढतच गेली. नॉर्दम्पशायर परगण्याविरुद्ध एका दिवसांत यांनीं काढलेल्या ३३३ धांवा (१९३०) हा त्या वेळीं यांचा सर्वश्रेष्ठ विक्रम समजला जाई. १९२९, ३० व ३१ या काळांत हे दर वर्षी सरासरी ५१ इनिंग्ज खेळले, साडेपंचवीसशें धांवा काढल्या, त्यांतील जास्तींत जास्त आंकडा तीनशेंचा होता व त्यांत यांनीं एकुणपन्नास शतकें काढलीं. यांच्या आतांपर्यंतच्या धावांची संख्या साडे पंधरा हजारांपेक्षां जास्त आहे.

धूमकेतु—(जन्म स. १८९२ डिसें. १२) गुजराथी भाषेंतील श्रेष्ठ कादंबरीकार.

हे काठेवाडांतील गोंडल गांवचे खेडावल ब्राह्मण. यांचें समग्र नांव गौरीशंकर गोवर्धनराम जोशी. आईचें नांव गंगाबहेन. हे जुनागड कॉलेजांतून बी. ए. झाले (१९२०). हे शिक्षक असून साहित्य व इतिहास हा यांचा आवडता विषय आहे.

लघुकथा व कादंबऱ्या लिहिण्यांत यांनीं चांगलें नांव कमावलें आहे. तणखा या यांच्या लघुकथात्मक पुस्तकानें गुजराथी वाङ्मयांत यांचें नांव स्थिर झालें. यांनीं एकांकी बाल नाटकेंहि गुजराथींत लिहिलीं आहेत.

यांची लेखणी खेड्यांतील प्रसंग रंगविण्यांत विशेष रंगते. खेड्यांतील प्रसंगावर हे करुणरसाचा शिडकावा करून ते प्रसंग वाचकांना सादर करतात. तथापि यांच्या सौंदर्यदृष्टीचा खरा आविष्कार यांच्या लघुकथांत पाहावयास मिळतो.

यांना बडोदें येथें भरलेल्या गुजराथी साहित्यसंमेलन प्रसंगीं साहित्यशाखेचें अध्यक्षपद देऊन यांच्या साहित्यसेवेचा गौरव करण्यांत आला (१९४३).

कथासंग्रहः—१ तणखा (भाग १, २, ३. १९२८-३१), २ अवशेष (१९३२), ३ पडछाया.

कादंबऱ्याः—१ राजमुकुट (१९२४), २ पृथ्वीश (१९२५), ३ राजकन्या, ४ कर्णावती, ५ मशहूर गवयिआ, ६ भय्यादादा इत्यादि.

ध्यानचंद—(जन्म स. १९०५) हॉकीचा जादुगार. पंजाब राइफल्स नांवाच्या पलटणींत नाईक कार्पोरलचा हुद्देदार.

हे वयाच्या पंधराव्या वर्षापासून हॉकी खेळूं लागले. स. १९२६ सालीं हिंदुस्थानांतल्या सैन्यातर्फे एक संघ न्यूझीलंड व ऑस्ट्रेलिया येथें पाठविण्यांत आला होता, त्यांत यांस सेंटर फार्वर्ड म्हणून निवडण्यांत आलें. त्या वेळीं यांनीं अप्रतिम कामगिरी करून १२५ वर गोल केले. त्यामुळें यांस 'हॉकीचा जादुगार' अशी पदवी मिळून जगांत प्रसिद्धी मिळाली. पुढें स. १९२८ सालीं ॲम्स्टरडॅम येथें झालेल्या आन्तरराष्ट्रीय सामन्याचे वेळीं यांची हिंदुस्थानतर्फे निवड झाली. त्या वेळींहि यांनीं शंभरवर गोल्स केले. पुनः स. १९३२ सालीं लॉस ॲंजेलिस येथेंहि अशीच कामगिरी करून हिंदुस्थानला हॉकींतील अजिंक्यपद मिळवून देण्यास यांनीं मदत केली. या वेळींहि यांनीं शंभरवर गोल्स केले. १९३५ मध्यें न्यूझीलंडला गेलेल्या हॉकी टीमचे यांना कॅप्टन निवडण्यांत आलें. हे ग्वालेर संस्थानच्या लष्करांत असत.

ध्रुव, आनंदशंकर बापुभाई—(जन्म स. १८६९) हिंदुविश्वविद्यालय बनारसचे माजी कुलगुरु, विख्यात अभ्यासक व सुप्रसिद्ध गुजराथी लेखक.

जन्मस्थान अहमदाबाद. जात वडनगरा नागर ब्राह्मण. यांचे वडील दप्तरदार, बडोदा रेसिडेन्सींत वकील वगैरे कामें करणारे धार्मिक गृहस्थ होते. हे एम्.ए., एल्एल्. बी. झाले. यांचा क्रमांक नेहमींच वर असे व यांना अनेक पारितोषिकें मिळत. यांची संस्कृत भाषा आणि शास्त्रें यांत विशेष प्रगति असे. अहमदाबादेस राहणारे प्रसिद्ध बिहारी पंडित बच्चा झा यांचा यांनीं चांगला फायदा घेतला.

स. १८९३ सालीं प्रो. काथवटे यांची बदली झाली आणि त्यांचेजागीं यांना अहमदाबाद कॉलेजमध्यें संस्कृतचे प्राध्यापक नेमण्यांत आलें. तेथून हे एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई येथें गेले. नंतर यांना बनारस हिंदु विश्वविद्यालयांत प्रिन्सिपल व व्हाइस चॅन्सेलर या जागीं काम करण्याची संधि मिळाली. तेव्हांपासून यांचें नांव भारतभर विख्यात झालें.

हिंदुधर्म, नीतिशास्त्र व प्राचीन वाङ्मय इत्यादींचे हे सखोल अभ्यासक आहेत. गुजराथींत यांनीं 'वसन्त' नांवाचें मासिक उत्कृष्टपणें चालविलें (१९०२). त्याचा रजतमहोत्सवहि मोठ्या थाटानें साजरा झाला (१९२७). त्यांतील यांचीं स्फुटें, लेख व व्याख्यानें नवीन काळाकडे पाहण्याची यांची समतोल दृष्टि दर्शविणारीं असतात. यांच्या विशेष योग्यतेमुळें यांना गुजराथी साहित्य परिषदेचें व मद्रास येथें भरलेल्या चवथ्या तत्त्वज्ञान-परिषदेचेंहि अध्यक्षस्थान देण्यांत आलें होतें (१९२८). हिंदुस्थानांतील इंटर-युनिव्हर्सिटी बोर्डाचे हे अध्यक्ष होते.

यांचे ग्रंथः—१ श्रीभाष्य (१-२), २ धर्मवर्णन, ३ नीतिशिक्षण, ४ आपणो धर्म, ५ हिंदुधर्मनी बाळ पोथी, ६ हिंदुवेदधर्म इत्यादि.

ध्रुव, दिवाणबहादुर केशवलाल हर्षदराय—(जन्म स. १८५९ ऑक्टो. १७) गुजराथी वाङ्मयाचे अभ्यासक व लेखक.

जन्मस्थान बहियल (गायकवाड राज्य दहेगांव परगणा), जात साठोदरा नागर ब्राह्मण. ऋग्वेदी शांख्यायन शाखा. यांच्या घराण्यांत नागजीभाई नांवाचे एक वैष्णव साधु झाले होते.

हे बी. ए. झाले (१८८२) आणि अहमदाबादच्या मेल ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिक्षक म्हणून लागले. तेथें असतांना यांनीं इंग्रजी व गुजराथी या दोन्ही भाषांत लिहिण्यास सुरवात केली. नंतर भुज येथें हेडमास्तर, कच्छच्या महाराज कुमारांचे शिक्षक इत्यादि कामें करीत अहमदाबाद हायस्कूलच्या हेडमास्तरच्या जागेवरून सेवानिवृत्त झाले (१९१५). नोकरींत असल्यापासूनच यांचें गुजराथी व संस्कृत साहित्याकडे लेखक व अभ्यासक म्हणून लक्ष होतें. गुजराथी भाषेंत होत गेलेला फेरबदल, प्राचीन गुजराथी काव्यांचें शुद्ध व शास्त्रीय पद्धतीनें संशोधन करून मुद्रित करणें वगैरे कामामुळें यांना मुंबईच्या कविपरिषदेचे प्रमुख निवडण्यांत आलें (१९२९). यांचे निबंध व ग्रंथ पुष्कळच आहेत. त्यांपैकीं कांहींचीं नांवें पुढें दिलीं आहेत.

१ मेलनी मुद्रिका, २ विंध्यवननी कन्यका, ३ प्राचीन गुर्जर काव्य, ४ दयाराम विषे कंइक, ५ जुनी गुजराथीना नमुना, ६ प्रेमानंद वगैरे.

न

नटराजन् कामाक्षी—(जन्म स. १८६८) मुंबईच्या 'इंडियन सोशल रिफॉर्मर'चे सुप्रसिद्ध संपादक व नवमतांचे नमुनेदार पुरस्कर्ते.

यांचा जन्म तंजावर जिल्ह्यांत झाला. मद्रासच्या प्रेसिडेन्सी व लॉ कॉलेजांतून आपलें शिक्षण संपविल्यानंतर यांनीं मद्रासच्या 'हिंदू'चे संपादक गणपति सुब्रह्मण्य अय्यर यांच्या हाताखालीं काम करण्यास सुरवात केली आणि १८९० सालीं यांच्या 'रिफॉर्मर'चा पहिला अंक बाहेर पडला.

१८९० पासून १८९८ पर्यंत यांनीं आपलें हें पत्र मद्रास येथें चालविलें. पुढें मलबारी शेठच्या गैरहजेरींत सहा महिन्यांसाठीं 'स्पेक्टेटर' चालविण्यासाठीं हे जे मुंबईला आले तें मुंबईलाच स्थायिक झाले. मूलग्राही पण सभ्य व संयमानें लिहिण्याच्या यांच्या एका नव्या शैलीनें हे व यांचें पत्र यांना लवकरच मुंबईत चिरस्थायी स्वरूप प्राप्त झालें. मुंबईच्या 'टाइम्स ऑफ इंडिया'-मध्येंहि जवळ जवळ वीस वर्षे हे लिहीत असत.

समाजसुधारणा ही राष्ट्राच्या स्वातंत्र्य-प्रयत्नाचाच एक भाग आहे अशा श्रद्धेनें यांनीं आपण स्वतः व आपलें पत्र यांना त्या कार्यासाठीं वाहून घेतलें. राजकीय सुधारकांना सहज साध्य असणारी लोकप्रियता मिळविण्याच्या लोभास बळी न पडतां त्या कालांत सामाजिक सुधार-

णेच्या अप्रिय कामास यांनीं वाहून आपलें वैशिष्ट्य व्यक्त केलें. कोणत्याहि राजकीय पक्षाचीं मतें व शिस्त स्वतःवर लादून न घेतां मूलग्राही पद्धतीनें स्वतंत्र विचार प्रगट करण्याची यांची भूमिका मोठी प्रभावी ठरली. यांचा सुधारणावाद न्या. म. गो. रानडे यांच्याप्रमाणें पूर्व इतिहासाचा व संस्कृतीचा धागा शक्य तों टिकवून चालणारा आहे. मनुष्यास मनांस बळकटी आणण्यास पूर्व इतिहास व पूर्व संस्कृति यांचा उपयोग होत असल्याचें यांनीं कबूल केलें आहे. यांच्या सुधारणा शब्दाचा अर्थ फक्त स्त्रीशिक्षण, विधवाविवाह किंवा सहभोजन इत्यादींच्या भोंवतीं घोटळणारा नव्हता. समाजधारणेस आवश्यक असणाऱ्या प्रत्येक मूलभूत गोष्टीचें संरक्षण करणें हें सुधारकांचें कर्तव्य असल्याचें हे प्रतिपादीत व त्याप्रमाणें हे वर्तनहि करीत. अशा धोरणामुळें यांच्या पत्राचा खप दोन हजारांपेक्षां केव्हांहि जास्त नसला तरी त्याला विचारी लोकांत एक असामान्य स्थान प्राप्त झालें होतें.

'West of Suez' व 'Lallubhai Samaldas' या ग्रंथांचे लेखक श्री. एस्. नटराजन् हे यांचे चिरंजीव होत. यांच्या निवृत्तीनंतर 'रिफॉर्मर'चीं सूत्रें त्यांच्या ताब्यांत आहेत.

नटेसन्, जी. ए.—(जन्म स. १८७३) 'जी. ए. नटेसन् ॲन्ड को.' या मद्रासच्या सुप्रसिद्ध प्रकाशनसंस्थेचे चालक.

कुंभकोण, त्रिचनापल्ली व मद्रास येथें शिक्षण संपवून हे बी. ए. झाले, आणि यांनीं काँग्रेसच्या राजकारणांत भाग घेण्यास सुरवात केली. काँग्रेसमधील सुरवातीपासूनची यांची भूमिका मवाळाची होती. त्याप्रमाणें यांनीं मॉडरेट कॉन्फरन्स (१९१९), मद्रास लिबरल लीग, नॅशनल लिबरल फेडरेशन वगैरे ठिकाणीं मनापासून भाग घेतला. यांच्या या कार्यामुळें यांना कौन्सिल ऑफ स्टेट व टॅरिफ बोर्डाचे सभासद निवडण्यांत आलें.

परंतु यापेक्षांहि धंद्याबरोबरच राष्ट्रीय दृष्टि जागृत ठेवणारी जी. ए. नटेसन ॲन्ड को. ही प्रकाशनसंस्था व तिला संलग्न असणाऱ्या इंडियन रिव्ह्यू (१९०२) या मासिकाची स्थापना हें यांचें प्रमुख कार्य होय. हिंदुस्थानांतील प्रमुख राजकीय कार्यकर्त्यांचीं चरित्रें व व्याख्यानें यांचें फार मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धीकरण करण्याचें कार्य यांच्या या संस्थेनें केलें आहे.

२४ ऑगस्ट १९३३ ला यांचा षष्ठ्यब्दपूर्तिसमारंभ साजरा करण्यांत येऊन यांना एक सत्कार-ग्रंथ अर्पण करण्यांत आला.

यांचे ग्रंथ—(1) What India Wants, (2) Autonomy Within the Empire.

नबाब, सर मुहम्मद अहमद सय्यदखान, छत्तारी—(जन्म स. १८८८) छत्तारीचे नबाब, पंजाब व संयुक्त प्रान्त यांचे माजी गव्हर्नर, हैदराबाद राज्याच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष व सुप्रसिद्ध राजकारणी मुत्सद्दी.

बुलंद शहर जिल्ह्यांतील लालखासनीस या सुप्रसिद्ध मुसलमान झालेल्या रजपूत घराण्यांत पंजाबांतील रोहटक जिल्ह्यांतील एका खेड्यांत यांचा जन्म झाला. अलीगडच्या एम्. ए. ओ. कॉलेजमध्यें शिक्षण घेतल्यावर यांनीं सार्वजनिक कामांत भाग घेण्यास सुरवात केली (१९१०). यांचा कुराणाचा व्यासंग गाढा असून उर्दू व फारशी भाषा यांना चांगल्या परिचित आहेत.

समाज, शिक्षण व राजकारण अशा विविध क्षेत्रांत हे मनापासून भाग घेतात. पंजाबांत कालनौर येथें भरलेल्या रजपूत रिफॉर्म कॉन्फरन्सचे हे अध्यक्ष होते. बुलंद शहर मुस्लीम हायस्कूल तर केवळ यांच्या देणगीमुळें स्थापन झालें.

मॉंटफोर्ड सुधारणांमुळें अस्तित्वांत आलेल्या कायदेमंडळांत हे निवडून आले आणि मंत्रिपदावर असतांना सर अलेक्झांडर मुडिमन यांचे मृत्यूनंतर यांना पंजाब प्रान्ताचे हंगामी गव्हर्नर नेमण्यांत आलें (१९२८). व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिक कौन्सिलचेहि हे कांहीं दिवस सभासद होते. गोलमेजपरिषदेच्या पहिल्या दोन अधिवेशनांस हे हजर होते. यांना १९३३ सालीं सर माल्कम हेले यांचे जागीं संयुक्त प्रान्ताचे गव्हर्नर नेमण्यांत आलें. तेथून निवृत्त झाल्यावर यांना ऑल इंडिया मुस्लीम लीगचे अध्यक्ष निवडण्यांत आलें. त्या वेळच्या भाषणानें हिंदु-मुसलमानएकीचे पुरस्कर्ते असा यांचा लौकिक झाला. पुढें हैदराबाद राज्याच्या कार्यकारी मंडळाचें अध्यक्षपद व राजकारण, घटना व रेल्वे हीं खातीं यांच्याकडे देण्यांत आलीं. त्या राज्यांतील ग्रामपंचायतींची सुधारणा व युद्धकालीन कार्याचें श्रेय यांना आहे.

१९१५ सालीं यांना नबाब करण्यांत आलें व

१९१९ सालीं ती पदवी यांना वंशपरंपरेनें बहाल करण्यांत आली.

हैदराबाद संस्थानच्या राज्यकारभाराप्रमाणेंच हिंदुस्थानच्या राज्यकारभाराबाबत उत्पन्न होणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांतहि हे लक्ष घालीत असतात. हैदराबाद राज्याची सर्व बाजूंनीं प्रगति व्हावी व त्याला आन्तरराष्ट्रीय स्वतंत्र स्थान प्राप्त व्हावें अशी महत्त्वाकांक्षा व त्या दृष्टीनें कार्य करण्याची ध्येयनिष्ठा यांना असावी असें यांच्या व्यापक दृष्टिकोनावरून अजमावतां येतें.

नबाब, मुहम्मद हमिदुल्लाखान, भोपाळ— (कारकीर्द सुरुवात स. १९२६) भोपाळ संस्थानचे अधिपति, पोलोचे जगप्रसिद्ध खिलाडू, नरेन्द्रमंडळाचे चान्सेलर आणि प्रसिद्ध राजकारणी पुरुष.

यांची आई सुलताना जहान बेगम यांच्या मृत्यूनंतर हे गादीवर आले. त्यापूर्वी आपल्या आईचे चीफ सेक्रेटरी व भोपाळराज्याचे अर्थ, न्याय व कायदा या खात्यांचे मंत्री म्हणून यांनीं काम केलें होतें.

सात हजार चौ. मैल क्षेत्रफळ, आठ लक्ष लोकवस्ती व सुमार सात लक्ष वार्षिक उत्पन्न असलेलें यांचें राज्य आहे. तथापि कर्तृत्वामुळें यांनीं आपल्या राज्याला व स्वतःला महत्त्व प्राप्त करून घेतलें आहे. हे चेम्बर ऑफ प्रिन्सेसचे दोनदां चॅन्सेलर होते.

यांनीं आपल्या राज्यांत कायदेमंडळाप्रमाणेंच शेतकऱ्यांच्या हितसंबंधाकडे लक्ष देणारी पटेल्स असेंब्ली नांवाची संस्था स्थापन केली आहे. यांनीं कायदा व अंमलबजावणी खात्यांची फारकत केली आहे; तसेंच कायद्याची अंमलबजावणी स्वतःपासून सुरू करण्याचा क्रम सुरू केला आहे.

दुसऱ्या महायुद्धांत संस्थानच्या जमाबंदीपैकीं चाळीस टक्के यांनीं युद्धकार्याकरितां खर्च केले. शिवाय सात हजार पौंडांच्या अमेरिकन सिक्युरिटीज यांनीं सरकारला दिल्या, आणि त्याचा उपयोग भोपाळ, स्काड्नेससाठीं करण्याची यांनीं तरतूद केली. विसावी, भोपाळ फील्ड अम्ब्युलन्स, सुलताना इन्फन्ट्री, मेकॅनिकल ट्रॅन्सपोर्ट युनिट, भोपाळ, आर्मी सर्व्हिस कोअर, लेबर बटेलियन् यांसारख्या अगदीं आघाडीवर उपयोगी पडणाऱ्या साधनांनीं यांनीं युद्धकार्यास मदत केली. युद्धाच्या ऐन दंगलींत मध्यपूर्व आघाडी व वायव्य सरहद्द प्रान्त येथें यांनीं पाहणी केली. खैबर घाटांत तर यांचे हस्तें खैबर कनिंगहॅम एज्युकेशन हॉलचें उद्घाटन झालें. यांच्या राज्यांतील एक लाख तरुणांनीं या युद्धांत भाग घेतला.

निसर्गतःच भरपूर खनिज संपत्ति असलेल्या आपल्या राज्यांत यांनीं टेक्स्टाइल मिल्स, स्ट्राबोर्ड फॅक्टरी, शुगर फॅक्टरी, नर्मदा व्हॅली रिफ्रिजरेटरी प्रॉडक्ट्स् कं., सेंट्रल इंडिया केमिकल्स लि. इत्यादि संस्था निर्माण करून उद्योगधंद्यास उत्तेजन दिलें.

स. १९४६ सालीं यांच्या राज्याच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष सर मदरुल महेमान व स्टेट कॅबिनेटच्या अध्यक्ष यांची कन्या अबिदा सुलतान होत्या.

हिंदुस्थानांतील प्रमुख राजकारणी व मुत्सद्दी लोकांत यांची गणना होते. कोणत्याहि महत्त्वाच्या राजकीय घडामोडींत यांचा संबंध असतो.

नबाब, सय्यद मुहम्मद बहादूर—(जन्म स. १८६९–मृत्यु स. १९१६) हिंदु-मुसलमान ऐक्याचा पुरस्कार करणारे मद्रासचे राष्ट्रसभा-कार्यकर्ते.

मद्रास प्रांतांतील सुप्रसिद्ध जहागिरदार पीर असदुल्लाखान यांचे हे नातु. मद्रास लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत निवडून येऊन आपल्या सार्वजनिक जीवनास यांनीं सुरवात केली. ऑफिशियल सीक्रेट्स बिल, युनिव्हर्सिटी बिल वगैरे असेंब्लींत अत्यंत विवाद्य म्हणून गाजलेल्या चर्चांमध्यें यांनीं हिरीरीनें भाग घेतला. यांच्या या कार्यामुळें यांना पुढें इंपिरियल लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत निवडून देण्यांत आलें.

परंतु यापेक्षांहि काँग्रेसमध्यें यांनीं केलेली कामगिरी विशेष गाजली. १८९४ मध्यें हे प्रथमच काँग्रेसला हजर राहिले आणि हिंदु-मुसलमान ऐक्याचा पुरस्कार करण्याच्या यांच्या विशेष धोरणानें हे ताबडतोब काँग्रेसमध्यें लोकप्रिय झाले. १९०३ च्या मद्रास काँग्रेसचे स्वागताध्यक्ष, काँग्रेसची घटना ठरविणाऱ्या कमेटीचे सभासद, १९१३ च्या कराची काँग्रेसचे अध्यक्ष व १९१५-१६ च्या काँग्रेसचे चिटणीस अशा अनेक मानाच्या व जबाबदारीच्या जागांवर यांनीं कार्य केलें.

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींनीं स्वतंत्रपणें प्रगति करण्यापेक्षां एकजुटीनें प्रगति करणें चांगलें, असा यांच्या मतप्रतिपादनाचा रोख असे. त्यासाठीं 'मी प्रथम काँग्रेसभक्त व नंतर मुसलमान' असल्याची कबुली हे सर्वत्र देत.

पुढें १९१७ मध्यें झालेल्या सुप्रसिद्ध लखनौ करारांचें श्रेय यांनीं कराची कॉंग्रेसच्या (१९१३) अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणाला देण्यांत आल्यास आश्चर्य नाहीं.

नरगुंदकर भावे, भास्करराव ऊर्फ बाबासाहेब—(जन्म स. १८०५–फांशीं स. १८५८ जून १२) १८५७ सालच्या बंडांत सामील झालेले दक्षिणेंतील एक संस्थानिक.

नरगुंद व रामदुर्ग अशीं भावे घराण्याचीं दोन संस्थानें. १८४२ सालीं यांच्याकडे नरगुंद संस्थानचा कारभार आला. संतति होण्याची अशा खुंटली आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून दत्तकाची परवानगीहि मिळेना, तेव्हां हे बंडांत सामील झाले. दक्षिणी संस्थानचा रेसिडेंट कर्नल जेम्स मॅन्शन यांना सोरबिन (संस्थान रामदुर्ग) येथें माऱ्तीच्या देवळांत छापा घालून ठार करण्यांत आलें (२९ मे १८५८). त्या हल्ल्यांत भीमराव मुंडरगी हे प्रमुख होते. २ जून रोजीं माल्कम यानें नरगुंदाच्या किल्ल्यावर हल्ला करून तो सर केला; पण राजघराण्यांतील मंडळी तेथून निसटली होती. हे तोरगलच्या जंगलांत पकडले गेले व एका दिवसांत झटपट चौकशी होऊन यांना बेळगांवीं फांशीं देण्यांत आलें.

यांच्या पत्नी आणि माता या दोघी सासूसुना रात्रीं लपतछपत नरगुंदपासून बारा मैलांवरील खेड्यांत एका कुळकर्ण्याच्या घरीं उतरण्यास गेल्या. पण तेथें एका म्हातारीकडून 'आपल्या घरावर निखारे ठेवून आतां आमच्या घराला आग लावण्यास आलां होय!' असे उद्गार ऐकावयास मिळाले. तेव्हां या दोघी नदीच्या दिशेनें निघाल्या. वाटेंत एका ब्राह्मणास अंगावरील दागिने देऊन आपल्या प्रेताची व्यवस्था करण्याची विनंति केली. त्याप्रमाणें ओच्यांत दगड बांधून या दोघी नदींत शिरल्या. प्रेतें तरंगूं लागतांच ब्राह्मणांनीं त्यांना अग्नि देऊन त्यांची शेवटची व्यवस्था लावली. सरकारी हेरांचा तपास सुरू होताच, पण त्यांना यांच्या राखेशिवाय कांहीं मिळालें नाहीं.

या बंडाची झळ जमखिंडी संस्थानच्या अधिपतींना थोडी लागली. पण कांहीं दिवस अटक व राज्यांतील छोटुसिंग नांवाच्या इसमास दारूगोळा करण्याच्या आरोपावरून फांशीं एवढ्यावरच ही दक्षिणेंतील बंडाची झळ संपली.

नरसिंहाचार्य आर.—(जन्म स. ? मृत्यु स. १९३५ सुमार) कानडी भाषेंतील ग्रंथांचे सूक्ष्म अभ्यासक व ग्रंथलेखक.

यांचा 'कर्नाटक कविचरितें' हा अनेक भागांतील ग्रंथ अत्यंत प्रसिद्ध आहे. त्यांत चिकित्सक पद्धतीनें कानडी भाषेंतील कवींची प्राचीन कालापासून आतांच्या कालापर्यंत सविस्तर माहिती दिली आहे. त्यांत आजपर्यंत उपलब्ध असलेली सर्व माहिती विचारांत घेऊन व ग्रंथान्तर्गत पुराव्याची छाननी करून अनेक महत्त्वाचे निर्णय करण्यांत आले आहेत. कानडी कवींच्यासंबंधीं कानडींत हा ग्रंथ जसा झालेला आहे तसा ग्रंथ अद्यापि मराठी कवींसंबंधीं मराठींत झालेला नाहीं.

नरिमन, खुर्शेद एफ्.—(जन्म स. १८८५) मुंबई हायकोर्टांतील नामांकित कायदे पंडित, धाडसी वादविवादपटु व सार्वजनिक कार्यकर्ते.

मुंबई कॉर्पोरेशन, मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व कॉंग्रेस अशा मोक्याच्या जागी यांनीं केलेल्या धडाडीच्या कार्यामुळें मुंबई प्रांतांतील सुपरिचित माणसांत हे मोडतात. वकिली कौशल्य व बिनतोड कोटिक्रम यांच्या साहाय्यानें हे जेथें तेथें यशस्वी होतात.

१९२४ सालापासून मुंबई कॉर्पोरेशनमध्यें निवडून यावयाचें व तेंहि पहिल्या नंबरच्या मतांनीं, हा आपला क्रम यांनीं कित्येक वर्षेपर्यंत चालविला. पुढें मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत प्रवेश करून घेतल्यानंतर तेथेंहि यांनीं आपला हा खाक्या सोडला नाहीं. असेंब्लींतहि स्वराज्य पक्षाचे नेते, विरुद्ध पक्षाचे पुढारी व मुंबई शहराच्या वाढीबाबत खुद्द असेंब्लींत व तिच्या बाहेर चालणाऱ्या खटपटी लटपटी उघडकीस आणण्यांत यांनीं दाखविलेलें कौशल्य अशा अनेक कारणांनीं हे सतत लोकप्रियतेच्या शिखरावर असत. शेवटच्या प्रसंगीं डेव्हलपमेंट ऑफिसर मि. हार्वे यांनीं भरलेल्या अब्रुनुकसानीच्या फिर्यादींत यांना प्राप्त झालेल्या विजयानंतर तर यांच्या लोकप्रियतेनें उचांक गांठला.

कॉंग्रेस व त्यांतहि तिच्याशीं संलग्न चालणाऱ्या तरुणांच्या चळवळींत यांनीं सुरवातीपासून भाग घेतला. १९३० च्या कायदेभंगाच्या जमान्यांत मीठाचा कायदा मोडण्याचा पहिला मान यांनीं वरळी, मुंबई येथें मिळविला. पुढें मुंबईत सुरू झालेल्या इंडिपेन्डन्स ऑफ इंडिया लीगमध्येंहि हे प्रमुख होते.

'Whither Congress' हा यांचा ग्रंथ यांनीं कायदेभंगाच्या चळवळींतील तुरुंगवासांतून बाहेर पडतांच लिहिला. कॉंग्रेसचें मुख्य ध्येय स्वराज्य आहे, धार्मिक किंवा सांस्कृतिक मुद्यांशी त्याची गल्लत करूं नका असा सल्ला यांनीं आपल्या या पुस्तकांत दिला आहे. मुंबईच्या राष्ट्रसभेच्या अधिवेशनाचे हे स्वागताध्यक्ष होते (१९३४). पुढें निवडणुकींच्या बाबत यांच्यावर शिस्तभंगाचा आरोप येऊन यांना कॉंग्रेसमधील अधिकारावरून खालीं यावें लागलें (१९३७). तेव्हांपासून हा धडाडीचा कर्तबगार गृहस्थ निर्माल्यासारखा झाला आहे.

तरी देखील आझाद-सैनिकांच्या बचावाकरितां गेलेल्या हिंदी वकिलांचे प्रमुख म्हणून हे मलायांत गेले होते.

नरेन्द्रनाथ, राजा—(जन्म स. १८६४–मृत्यु स. १९४५ मार्च १०) पंजाबचे सुप्रसिद्ध हिंदु पुढारी व हिंदु महासभेचे अध्यक्ष.

हे एम्. ए. पर्यंत शिकले होते. उर्दू व फारशी भाषांचे हे व्यासंगी असून लिबर्टी या पुस्तकाचें यांनीं उर्दूत भाषान्तर केलें होतें.

यांचे वडील असिस्टंट कमिशनर होते. आणि हेहि १९११ मध्यें लाहोर विभागाचे कमिशनर होते. गृहमंत्री क्रॅडॉक यांनीं कमिशनराच्या जागेवर हिन्दी मनुष्य असतां उपयोगी नाहीं असें फर्मान काढलें. या अन्यायाच्या विरुद्ध तक्रार करण्याकरितां हे इंग्लंडला गेले व शेवटीं यांनीं निषेधार्थ आपल्या जागेचा राजीनामा दिला. तथापि सरकारनें 'राजा' पदवी देऊन यांचा गौरव केला. दिवाणबहादुरी तर पूर्वीच मिळाली होती.

१९२१ सालीं हे पंजाबच्या कायदेमंडळांत निवडले गेले. तेथें हे १९३८ पर्यंत होते. यांना तीनदां मंत्रिपद देण्यांत आलें पण तीनहि वेळ यांनीं तें नाकारलें. विरोधी पक्षाचे प्रमुख म्हणून यांनीं सहा वर्षें काम केलें. पहिल्या व दुसऱ्या गोलमेज परिषदेस हे गेले होते, पण तेथें हिंदुहिताला विरोधी धोरण ब्रिटिश पंतप्रधानांनीं आखलेलें पाहून यांनीं तिसऱ्या परिषदेवर बहिष्कार घातला. पंजाब प्रान्तिक हिंदुसभेचे व दिल्ली, अखिल भारतीय हिंदुमहासभेचे (१९२६) हे अध्यक्ष होते.

यांचा पंजाबमधील अनेक संस्थांशीं निकटचा संबंध होता. काश्मीरचे अकाउंटंट जनरल ब्रिजलाल नेहरू यांच्या पत्नी रामेश्वरी नेहरू या यांच्या कन्या होत. यांची स्मशानयात्रा गायत्रीमंत्र म्हणत चालली होती.

नवाथे, विष्णु गोपाळ—(जन्म स. १८६७–मृत्यु स. १९३१) सायन मताचे सुप्रसिद्ध फलज्योतिषी व ग्रंथलेखक.

जन्मस्थान—थळ (जिल्हा कुलाबा). प्राथमिक शिक्षक. यांनीं पाश्चात्य व पौर्वात्य ज्योतिषाचा अभ्यास केला होता. यांनीं लोणावळा येथें श्रीमहालक्ष्मी-ज्योतिर्विद्याश्रम नांवाची संस्था काढली होती (१९२५).

यांनीं कुंडलीविज्ञान मासिक (१९००- १९१३, १९२५-१९३१), योगमाला व जातकसंग्रह हीं नियतकालिकें चालविलीं.

यांची जातकशिरोमणि, सुलभ-जातक वगैरे अनेक पुस्तकें प्रसिद्ध आहेत.

नसीम—(जन्म स. १८११–मृत्यु स. १८४३) सुप्रसिद्ध उर्दू कवि.

यांचें नांव दयाशंकर कौल. पित्याचें नांव गंगाप्रसाद. स्थान लखनौ. यांना फारसीचें शिक्षण मिळालें व हे सरकारी सैन्यांत नोकर झाले. नोकरी करीत असतां यांनीं जुन्या कवींच्या काव्याचा चांगला अभ्यास केला. हे कविताहि उत्तम करूं लागले. हे आतिश कवीचे शिष्य. यांनीं पंचविसाव्या वर्षीं 'गुलजार नसीम' नांवाची मसनवी लिहिली. गुरूला दाखवितां ते म्हणाले, 'इतकी मोठी पोथी कोण वाचणार? छोटी कर.' यांनीं छोटी करून गुरूला दाखविली, पण यांना गुरूचा सल्ला पसंत पडला नाहीं. यांनीं मूळचाच ग्रंथ कायम ठेवला. यांच्या पूर्वी मीर हसनच्या 'सहरुल्बयान' नांवाच्या मसनवीचा बोलबाला होता. पण यांचा हा ग्रंथ त्यापेक्षांहि सरस आहे असें तज्ज्ञांचें मत आहे. यांना कमालीची लोकप्रियता मिळाली होती.

नाईक, वामन रामचंद्र—(जन्म स. १८७८–मृत्यु स. १९३६) दक्षिण हैदराबाद येथील एक जहागिरदार, उदार धनिक आणि सार्वजनिक कार्यकर्ते.

विजापूरहून यांचे पूर्वज दीडशें वर्षांपूर्वी हैदराबाद (द.) राज्यांत आले. नारायणपेठ, गदवाल, वनपर्ति व व्यापरला वगैरे ठिकाणीं यांचे पूर्वज सावकारी पेढी, दिवाण वगैरे नात्यानें वावरत. बापूजी–उमाकान्त-व्यंकोबा दुसरा–व्यंकोबा-गोविंद (मृत्यु स. १८८३ जून)–रामचंद्र मृत्यु १८८३)–वामन-श्रीधर नाईक असा यांचा वंश आहे. गदवाल, वनपर्ति व जटपोलच्या राजेसाहेबांकडून यांच्या पूर्वजांना अनेक गांवें जहागीर म्हणून

मिळालेलीं आहेत. तसेंच खुद्द निजामसाहेबांकडूनहि यांना उत्पन्न मिळालेलें आहे. यांच्या पूर्वजांनीं अनेक देवळें बांधून आणि दुष्काळ वगैरे प्रसंगीं आपल्या सर्वस्वाचा त्याग करून लोकांचे प्राण वांचविले. अशा कामांमुळें निजामसाहेबांनीं यांच्या घराण्याला तीनशें रुपये दरमहाची नेमणूक करून दिली आहे. त्या भागांत उत्तम व्यवस्थापक म्हणून राजेमहाराजांत आणि उदार दाते म्हणून सर्वसामान्य लोकांत यांच्या घराण्याचें नांव महशूर आहे.

यांचें शिक्षण मराठी, तेलगू, उर्दु व इंग्रजी कॉलेजपर्यंत झाल्यावर यांनीं आपलें लक्ष उद्योगधंद्यांत घातलें. कापसाच्या जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी, तांदूळ सडण्याच्या गिरण्या, रेल्वेचीं व अबकारी कंत्राटें वगैरे व्यवसाय हे मोठ्या प्रमाणावर करीत. निजाम राज्यांतील $\frac{1}{3}$ दारूचे गुत्ते व त्यांकरितां लागणाऱ्या दारू गाळण्याच्या भट्ट्याहि यांच्या होत्या.

हैदराबादच्या विवेकवर्धिनी नांवाच्या मुलांमुलींच्या शाळेस यांनीं सुमारें एक लाख रुपयांची देणगी दिली. शेजारीं एक पन्नास हजार रुपये खर्चून सिनेमा थिएटर बांधलें, त्याचें दरमहा पंधराशेंचें उत्पन्न संस्थेस दिलें. प्रथम तेथें १०।१५ विद्यार्थी होते. तेथें आतां तीन हजार विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. त्यांत पांचशें विद्यार्थिनी आहेत. या संस्थेचा आयव्यय वार्षिक सत्तर हजारांपर्यंत गेला आहे. हैदराबाद प्रजाशिक्षण-परिषदेचे हे अध्यक्ष व म्युनिसिपालिटींत उपाध्यक्ष होते. हे ऑल-इंडिया कॉंग्रेस कमेटीचे सभासद असून म. गांधींच्या चरखासंघ, खादी-भांडार वगैरे कार्यांत लक्ष घालीत.

वांईचा धर्मकोश, चरित्रकोश, श्रुतिबोध वगैरे ग्रंथ, जांब येथील रामदासमंदिर, संस्थानाबाहेरील भारत-इतिहास-संशोधक मंडळ वगैरे संस्थांना यांनीं मदत केली. याशिवाय स्वतःच्या खासगी मोटारीनें हिंदुस्थान-भर प्रवास करून यांनीं डोळसपणें तीर्थयात्रा केली व काश्मीरांतील श्रीशंकराचार्यांच्या मठाचा जीर्णोद्धार केला. यांचे पुत्र बॅ. श्रीधरपंत.

नाईक, प्रा. विश्वनाथ बळवंत—(जन्म स. १८८० फेब्रु. २७–मृत्यु स. १९३६ फेब्रु. २७) सुप्रसिद्ध गणित ज्योतिषज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, फर्ग्युसन कॉलेजमधील गणिताचे प्रोफेसर व शास्त्रीय विषय सुलभ करून सांगणारे वक्ते.

शिक्षण पुणें येथेंच पुणें हायस्कूल, महाराष्ट्र कॉलेज व फर्ग्युसन कॉलेज यांत झालें. नवीन मराठी शाळा, न्यू इंग्लिश स्कूल यांचे सुपरिंटेंडेंट, वाडिया लायब्ररीचे लायब्रेरियन व डेक्कन ए. सो.चे सेक्रेटरी म्हणूनहि यांनीं काम केलें (१९०९-१९३३). सार्वजनिक कामांतहि पडत. वेदशास्त्रोत्तेजक सभेचे चिटणीस व उपाध्यक्ष, पंचांग-प्रवर्तन कमिटीचे अध्यक्ष, मुंबई युनिव्हर्सिटीच्या सिनेटचे सभासद व यांशिवाय अनेक संस्थांचे सभासद असत. हे शिक्षाविचार-मंडळाचे संस्थापक व अध्यक्ष, मुंबई इलाखा शिक्षण-परिषदेचे स्वागताध्यक्ष, प्रोग्रेस ऑफ एज्युकेशन नांवाच्या इंग्रजी नियतकालिकाचे संस्थापक व संपादक, सिमल्यास भरलेल्या शिक्षण-तज्ज्ञांच्या सरकारी परिष-देचे मुंबई इलाख्याचे प्रतिनिधि (१९१९) व पुणें ज्योतिष संमेलनाचे स्वागताध्यक्ष (१९१७) होते.

यांनीं सर्वत्र बोधभाषा मराठी असावी, याचा जोरानें पुरस्कार केला. महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफिशिएटिंग पद्धतीची ताबडतोब पाहिजे या मताचे व शास्त्रीय परिभाषा मराठींत करण्याचे हे पुरस्कर्ते होते.

यांचे ग्रंथ—१ पंचांगशुद्धिरहस्य, २ सॉलिड जॉमेट्री (इंटरचे विद्यार्थ्यांकरितां), ३ आल्जिब्रा (फर्स्ट इयरच्या विद्यार्थ्यांसाठीं). यांशिवाय ना. गोखले यांचीं शालोपयोगी अंकगणितें यांनीं सुधारलीं.

नागेश्वरराव, के. पंतलु गारु—(जन्म स. १८६७–मृत्यु स. १९३८) आंध्र प्रांतांतील सुप्रसिद्ध कॉंग्रेस कार्यकर्ते व अमृतांजन या जगप्रसिद्ध औषधाचे जनक.

आंध्र प्रांतांतील एलकुरा हें गांव यांचें जन्मस्थान. गुंतुरचें ए. इ. एल्. एम्. कॉलेज व मद्रासचें ख्रिश्चन कॉलेज येथें आपलें शिक्षण संपवून हे मुंबईस आले. तेथें सुरवातीपासूनच यांचा उत्तम जम बसला व यांनीं लवकरच अमृतांजन डेपो उघडला (१८९३). तेव्हांपासून पन्नास वर्षांपेक्षां अधिक कालांत अमृतांजनच्या सार्वत्रिक व सतत यशाचें श्रेय सर्वस्वी यांच्या धंद्यांतील कौशल्याला दिलें पाहिजे. अनेक पेन-बाम आले आणि गेले, पण यांचें अमृतांजन मात्र आपलें व त्याबरोबरच यांचें यश चिरस्थायी करून बसलें आहे.

परंतु एक यशस्वी धंदेवाला हें यांच्या कर्तबगारीचें क्षेत्र केवळ यांच्या राजकीय कार्याच्या पार्श्वभूमीसारखें

आहे. आंध्र प्रांतिक काँग्रेस कमेटी, ऑल इंडिया काँग्रेस कमेटी, आंध्र महासभा यांसारख्या संस्थांत जबाबदारीनें काम करून व आंध्र-पत्रिका (प्रथम साप्ताहिक १९०८, नंतर दैनिक १९१४), भारती यांसारख्या पहिल्या दर्जाच्या तेलगु पत्रांचें संपादन करून आंध्र प्रांतांतील राजकीय चळवळीच्या जनकत्वाचा मान यांनीं प्राप्त करून घेतला होता. 'देशोद्धारक', 'विश्वदाता' या यांना लोकांनीं अर्पण केलेल्या पदव्या यांच्या निःसीम लोकप्रियतेचें प्रतीक आहेत. मध्यवर्ति कायदेमंडळांत हे निवडून आले होते.

नातू, बाळाजीपंत नारायण—(मृत्यु स. १८५०) पुण्याची पेशवाई व सातारच्या छत्रपतींची गादी केवळ स्वार्थास्तव घालवावयास कारण झालेले राजकारणी गृहस्थ.

हे वाईजवळील पांचवडचे राहणारे. प्रथम साने यांचेकडे नोकरीस होते. साने कामानिमित्त यांना खंडेराव रास्ते यांच्याकडे पाठवीत. पुढें रास्ते यांनीं यांना आपल्याकडे नोकरीस घेतलें. शेवटीं त्यांचा यांच्यावर इतका विश्वास बसला कीं, मरतेसमयीं त्यांनीं यांना सर्व मुखत्यार नेमलें. यांनीं पण क. क्लोजच्या मार्फत रास्त्यांची थोडीबहुत व्यवस्था लावून दिली. स. १८०९ सालीं हे क. क्लोजबरोबर नोकर म्हणून माळव्यांत गेले. परत आल्यावर एल्फिन्स्टनची व यांची गांठ पडली व दोघांच्या सहवासाचें मैत्रींत रूपान्तर झालें. पेशव्यांचे आप्त थत्ते यांच्या मुलास यांनीं आपली मुलगी दिली होती. हे बाजीरावाच्या कडील इत्थंभूत बातमी काढून रेसिडेन्ड एल्फिन्स्टन यांजकडे पोंचवीत असत. या कामगिरीबद्दल त्यांनीं गव्हर्नर होण्यापूर्वी यांना वतन इनाम करून दिलें होतें.

सातारा येथील रेसिडेन्सीवर ग्रँट डफची नेमणूक झाली. त्यांचे हाताखालीं द. म. पांचशें रुपयांवर यांचीं नेमणूक झाली (१८१८).

बाजीरावाच्या कारकीर्दीचा व विशेषतः शेवटचा तपशीलवार वृत्तान्त मुद्दाम ग्रँट डफच्या विनंतीवरून यांनीं लिहून दिला. त्याचा इंग्रजी तर्जुमा रिचर्ड मॉरिसनें करून डफ यास दिला. मूळ मराठी लेख यांनीं परत घेतला (मराठी रियासत-अखेर पा. ४८१).

शेवटीं बाजीरावानें यांना आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला, इंग्रजांनीं यांना नोकर ठेवूं नये असाहि प्रयत्न केला. हेहि एकंदर प्रसंग पाहून देशत्याग करून काशीस जाण्याच्या तयारींत होते. पण एल्फिन्स्टनसाहेबांनीं यांना जमीन वगैरे देऊन येथें ठेवून घेतलें. १६ नवं. १८१७ रोजीं बाजीरावसाहेब पुण्याहून पळाले तेव्हां शनवारवाड्यावर इंग्रजांचें निशाण लावण्याचें काम कांहीं सैनिक बरोबर घेऊन जाऊन यांनीं पार पाडलें. तेव्हां पुढें शहराचा बंदोबस्त यांना सांगण्यांत आला.

सातारच्या राज्याचाहि त्वरित अधःपात होण्यास हे पुष्कळ अंशीं कारण झाले. केवळ स्वार्थासाठीं पेशव्यांचीं छिद्रें इंग्रजांस दाखवून यांनीं पेशवाईचें मरण जवळ आणलें. तसेंच पेशवाई संपल्यावर सातारच्या कारभारांत यांचा प्रवेश होऊन सातारची गादी त्वरित बुडविण्याचें श्रेयहि यांनीं घेतलें. मोठ्या खुबीनें वागून व अकल्प्य खटपटी करून यांनीं मोठमोठ्या अंमलदारांस आपल्या तंत्रानें वागविलें. खऱ्याखोट्याचा विधिनिषेध यांनीं कधींच बाळगला नाहीं. यांच्यावर लांचीचे व अपहाराचे असंख्य आरोप छापलेले आढळतात. तेव्हांहि वेदाचा अधिकार, जातिविषयक उच्चनीचतेचे बखेडे उत्पन्न करून पक्षोपपक्ष निर्माण करण्याचें यांचें काम तेथें चालू होतेंच. ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचे वादाचा उगम शोधूं लागल्यास अव्वल इंग्रजींतील यांच्यासारख्या व्यक्ती मनांत आल्याशिवाय राहत नाहींत. यांचीं कृष्णकृत्यें जाहीर होऊन पेशवाई व सातारच्या छत्रपतींची गादी नष्ट करण्याचा दोष यांचे माथीं आल्यानें यांना बाहेर तोंड दाखविणेंसुद्धां पुढें अशक्य झालें. इंग्रजांनाहि यांचा विसर पडला. अशा दुःसह स्थितींत हे काशीयात्रेस निघून गेले. यांच्या पूर्वचारित्र्यामुळें यांना तेथें चतुर्थाश्रमसुद्धां कोणी देईना, असें म्हणतात. शेवटीं पश्चात्तप्त स्थितींत पापक्षालनार्थ चतुर्थाश्रम घेऊन यांनीं तेथें देह ठेवला.

यांच्या या स्वराज्यद्रोहामुळें यांच्या घराण्यांतील लोकांच्या पंक्तीला भोजनहि कांहीं स्वाभिमानी लोक करीत नसत, असें कै. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या 'अप्रबुद्ध' यांनीं लिहिलेल्या चरित्रावरून दिसतें. मात्र यांनीं या कृत्यानें पैसा मात्र अगणित मिळविला असें यांच्या प्रचंड सावकारीवरून दिसून येतें.

नाथमाधव—(जन्म स. १८८२ एप्रिल ३–मृत्यु स. १९२८) मराठींतील सुप्रसिद्ध कादंबरीकार व लेखक.

यांचें नांव द्वारकानाथ माधव पितळे.जात–दैवज्ञ ब्राह्मण.

जन्मस्थान मुंबई. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. यांनीं लष्करी खात्यांत नोकरी पत्करून हिंदुस्थानभर प्रवास केला. १९०५ च्या मे महिन्यांत सिंहगडावर वाघाची शिकार करण्याकरितां टेहळणीवर असतां शंभर फूट अणकुचीदार कड्यावरून घसरत हे खालीं पडले व त्या अपघातानें कमरेखालचा भाग लुला पडून हे कायमचे पंगू झाले. पण यांच्या या पंगूपणामुळें यांचें इंग्रजी-मराठी वाचन वाढलें आणि यांना लेखनाचा नाद लागला. मनोरंजन, वाग्विलास व केरळकोकिळ या मासिकांत हे प्रथम लिहीत. 'सायंकाळची करमणूक' हें यांचें पहिलें पुस्तक होय (१९०५). 'सावळ्या तांडेल' या कादंबरीनें यांच्याकडे सर्वांचें लक्ष वेधलें. सर डॉ. रामकृष्ण भांडारकर यांना एकदां आपल्या पुस्तकावर यांनीं अभिप्राय मागितला असतां त्यांनीं 'हें पुस्तक तूं कोणतें ध्येय पुढें ठेवून लिहिलें आहेस?' असा प्रश्न केला. तेव्हां यांना उत्तर देतां येईना. तेव्हांपासून हें ध्येयपूर्वक लिहूं लागले. यांच्या विहंगवृन्द, विमलेची ग्रहदशा व डॉक्टर या कादंबऱ्यांत सामाजिक प्रश्नांची चर्चा केलेली आढळते. 'हिन्द एजन्सी'च्या एक आणा मालेंतून यांचीं पुष्कळ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. त्या मालेची कल्पना यांचीच असून यांच्या लेखनामुळें ती अत्यंत लोकप्रिय झाली होती. पुढें 'केरळकोकिळ' व 'नवें मन्वन्तर' अशा संयुक्त नांवाचें मासिक हे व आठल्ये यांच्या संपादकत्वाखालीं निघे. त्यांत हे सन्तचरित्रमाला व स्वामि-शिष्यसंवाद हीं प्रकरणें लिहीत.

यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या अत्यंत लोकप्रिय झाल्या. त्याकरितां हे तज्ज्ञांशीं चर्चा करीत व ऐतिहासिक स्थळांचीं टिपणें उपयोगांत आणीत. मराठ्यांच्या इतिहासावर ३५ कादंबऱ्या लिहिण्याचा यांचा विचार होता, पण सात प्रसिद्ध झाल्यावर हे कालवश झाले. एक वर्षाच्या आंत या कादंबऱ्यांना द्वितीय आवृत्तीचा योग आला. यांनीं लिहिलेल्या नाटकांपैकीं कांहीं रंगभूमीवर लोकप्रिय झालीं. यांची लेखनशैली साधी, सुटसुटीत, प्रेमळ व किंचित् करुण आहे. यांच्या इतपत वैचित्र्य मराठींतील इतर लेखकांत क्वचित् आढळतें. यांचें लेखन परिणामकारक असून वाचकांच्यावर पकड बसविणारें बहुजन समाजाचें लक्ष वेधून घेणारें असे.

यांनीं ऐतिहासिक १२, सामाजिक २५ अशा ३७ कादंबऱ्या, ७ नाटकें, ३ प्रहसनें व ४ इतर पुस्तकें इतकें वाङ्मय लिहिलें.

नाथूराम, शंकर शर्मा—(जन्म स. १८५९–मृत्यु स. १९३२) उर्दू व हिंदी भाषेंतील सुप्रसिद्ध कवि व लेखक.

यांचा जन्म हरदुआगंज अलीगढ येथें झाला. यांच्या पित्याचें नांव रूपरामजी शर्मा. हे गौड ब्राह्मण आर्यसमाजी होते. यांनीं कानपूर येथें कांहीं वर्षें नोकरी केली व पुनः आपल्या जन्मस्थानीं येऊन वैद्यकी करण्यास सुरुवात केली. वैद्य म्हणून यांची उत्तम कीर्ति होती. यांना 'पीयूषपाणि' वैद्य समजत.

उत्कृष्ट समस्यापूर्ति करणारे कवि म्हणून यांची प्रथम प्रसिद्धि झाली. त्याकरितां यांना अनेक मूल्यवान् पारितोषिकें मिळालीं. हे समस्यापूर्ति व्रजभाषेंत करीत. पण पुढें हे 'खडी बोली' हिन्दींत कविता करूं लागले. आधुनिक विषय घेऊन हे उत्तम कविता करीत. यांची कविता अत्यंत सरस मानली जाते. मात्रिक छंदांतहि हे अक्षरसंख्या सारखी राखीत. यांनीं हिंदी भाषेंतील अनेक निनावी छन्दांचीं केलेलीं मिलिन्दपाद, शंकरछंद, राजगीत हीं नामकरणें आतां सर्वमान्य झालीं आहेत. 'कविराज,' 'कविशिरोमणि' वगैरे अनेक पदव्या यांना मिळाल्या. यांनीं अनेक पुस्तकें लिहिलीं. त्यांपैकीं पुढील प्रसिद्ध आहेत. १ शंकरसरोज, २ अनुरागरत्न, ३ गर्भरण्डारहस्य, ४ वायसविजय. यांचें फुटकळ गद्यलेखनहि पुष्कळ आहे.

नानल, आयुर्वेदाचार्य पुरुषोत्तमशास्त्री गणेशशास्त्री—(जन्म स. १८९४–मृत्यु स. १९४४) पुण्याचे सुप्रसिद्ध वैद्य व आयुर्वेदाच्या सृष्टींत नवयुग निर्माण करणारे कार्यकर्ते.

वडील व बाळशास्त्री लागवणकर यांचे जवळ संस्कृत व आयुर्वेद यांचें अध्ययन करून यांनीं वैद्यभूषण व आयुर्वेदाचार्य अशा पदव्या संपादन केल्या. १९१८ सालीं इन्फ्लुएन्झाच्या साथींत आयुर्वेदाच्या पद्धतीनें दवाखाना चालवून हे लोकांच्या पुढें आले. १९२० च्या राष्ट्रीय शिक्षणाच्या लाटेंत निघालेल्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचें आयुर्वेद महाविद्यालय व्यवस्थित चालवून त्याला ताराचंद रामनाथ दवाखाना व आयुर्वेद रसशाळा यांची जोड देण्यांत यांची योजकता चांगली दिसून आली. ह्या संस्थांची प्रचंड वाढ होण्यांत यांच्या अनेक गुणांचा उपयोग झालेला आहे. यांचा खासगी धंदा मोठा असून राजेरजवाड्यांत यांची मान्यता चांगली असे. आयुर्वेदाला पाश्चात्य शल्यतंत्र व शारीर यांची

जोड द्यावी अशा मताचे हे असल्यानें शुद्ध आयुर्वेदाभिमान्यांशीं यांचा मतभेद झाला. सरकारनें इंडियन मेडिकल रेजिस्ट्रेशन ॲक्ट पसार केला, नोंदणी करून वैद्यांची प्रतिष्ठा वाढविली व यांना त्या कायद्याप्रमाणें नेमलेल्या प्रान्तिक बोर्डावर सभासद म्हणून घेतलें, त्यामुळें यांचें कार्य फोंफावलें. यांनीं 'भावप्रकाशाचें मराठी भाषान्तर,' 'विषतंत्र' वगैरे पुस्तकें प्रसिद्ध केलीं.

यांनीं वैद्यसंमेलनपत्रिकेचें दोन वर्षे संपादन केलें. यांच्या स्मरणार्थ तीन लाख रुपये जमवून आयुर्वेद पद्धतीनें चालणारें 'क्षयरोग रुग्णालय' चालविण्याचें यांच्या स्मारक मंडळानें ठरविलें आहे.

नानालाल दलपतराम—(जन्म स. १८७७–मृत्यु स. १९४६ जानें. १०) आधुनिक गुजराथी वाङ्मयांतील थोर कवि.

यांचे वडील दलपतराम डाह्याभाई हेहि गुजराथी कवि होते. त्यांचे हे चवथे पुत्र. जात–श्रीमाली ब्राह्मण. यांचा जन्म अहमदाबाद येथें झाला. हे लहानपणीं अत्यंत उनाड असल्यानें यांना स्व. प्रा. काशीराम दवे यांच्याजवळ मोर्वीस ठेवण्यांत आलें होतें. हे १९०१ सालीं एम्. ए. झाले. यांनीं मुख्याध्यापक, प्राध्यापक, मुख्य न्यायाधीश, दिवाण, व्हा. प्रिन्सिपल, शिक्षणाधिकारी वगैरे कामें केलीं. या अवधींत राजकोटचे सरकार स्व. सर लाखाजी राजे यांची यांजवर अत्यंत कृपा असे. पण १९२१ च्या नवंबरांत यांनीं कलकत्त्यांतील सरकारच्या अत्याचारांना विरोध म्हणून नोकरीचा राजीनामा दिला.

यांची लेखणी सर्वगामी असली तरी हे विशेषतः कवि म्हणून ओळखले जातात. भगवद्गीतेचा अनुवाद यांनीं आपल्या वडिलांना व आपल्या काव्यांचा दुसरा भाग प्रा. दवे यांना अर्पण केला. त्या दोन्ही अर्पणपत्रिका यांच्या विशिष्ट लेखनशैलीमुळें गुजराथी वाङ्मयांत चिरंजीव झाल्या आहेत. यांचें 'वसंतोत्सव' काव्य प्रथम ज्ञानसुधेंत १८९९ सालीं प्रसिद्ध झालें. त्याचा गुजराथी साहित्यावर आश्चर्यकारक परिणाम झाला. सर्व नवे लेखक यांच्या शैलीचें अनुकरण करूं लागले. येथून पुढला काळ गुजराथी वाङ्मयांत 'नानालाल युग' या नांवानें संबोधला जाऊं लागला इतका यांच्या शैलीचा जनतेवर प्रभाव पडला. यांचीं नाटकें व गद्यलेखनहि यांच्या काव्याप्रमाणेंच यांच्या स्वतंत्र प्रतिभेचीं द्योतक आहेत. गुजराथेंत यांच्या वाङ्मयाचा थोडा तरी परिचय नाहीं असा मनुष्य क्वचितच सांपडेल. यांना कविसम्राट असें गौरवानें म्हणत.

यांच्या सुवर्ण व हीरक-महोत्सवाच्या वेळीं सबंध गुजराथमध्यें जो उत्साह दिसून आला तो यांच्या निःसीम लोकप्रियतेचा द्योतक होता. 'कुरुक्षेत्र' या यांच्या अलीकडील महाकाव्याला तर भावनगरच्या महाराजांनीं ५०० रु. बक्षिस दिलें.

यांचें वाङ्मयः—

१. कविताः—गर्बे (१-२ भाग), गज़ल, गाणीं व इतर कविता (१-२ भाग), वसंतोत्सव (१९०५), चित्रदर्शनो (१९२१), गीतमंजरी (१९२८), औजा अने आगार (१९३३). २. महाकाव्यः—१ कुरुक्षेत्र (७ भाग १९२६), २ प्रेमकुंज. ३. नाटकेः—१ इंदुकुमार (भाग १-३), २ जयाजयंत (१९१४), ३ राजर्षि भरत (१९२२), ४ विश्वगीता (१९२७), ५ जहांगीर नूरजहान (१९२८), ६ शेहानशहा अकबर (१९३०), ७ संघमित्रा (१९३१), ४. कादंबरीः—१ उषा (१९१८). ५. निबंध व व्याख्यानेः—१ साहित्यमंथन (१९२४), २ उद्बोधन (१९२७), ३ संसारमंथन (१९२७), ४ अर्धशताब्दिना बे बोलो (१९२७). ५. कवीश्वर दलपतरामचरित्र, (१९३३) इत्यादि.

नामजोशी, महादेव बल्लाळ—(जन्म स. १८५३–मृत्यु स. १८९६) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते व चतुरस्र पुरुष.

हे दोनदां मॅट्रिकच्या परीक्षेस बसले पण दोन्ही वेळां यांचें नांव उत्तीर्ण म्हणून प्रसिद्ध झालें नाहीं. पण पुढें यांना वाण्याचे दुकानीं रद्दींत मॅट्रिक परीक्षेचे तपासलेले यांचे पेपर मिळाले. त्यावरून तकार करितां यांचें नांव उत्तीर्ण म्हणून प्रसिद्ध करण्यांत आलें (१८७५).

यांचें सार्वजनिक कार्य 'किरण' नांवाच्या इंग्रजी-मराठी पत्रानें सुरू झालें (पहिला अंक १८७७, ऑगस्ट २६). त्या वेळीं रशिया-तुर्कस्थानची लढाई चालू होती. शिंदे-होळकर हे रशियाशीं कारस्थान करीत आहेत अशा प्रसिद्ध झालेल्या बातमीस यांनीं सडेतोड उत्तर दिलें. त्याशीं संबंध सोडल्यावर यांनीं 'डेक्कन स्टार' नांवाचें इंग्रजी पत्र काढलें. तें पुढें निघालेल्या 'मराठा' पत्रांत समाविष्ट करण्यांत आलें.

विष्णुशास्त्री चिपळुणकर यांनीं मोरोबादादाच्या वाड्यांत सुरू केलेल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें पहिल्या दिवसापासून हे होते. हे पदवीधर नसल्यानें यांच्याकडे शिक्षणाशिवाय जागा, द्रव्य वगैरे मिळवण्याचीं इतर बाहेरचीं कामें येत.

टिळकांप्रमाणें हे डे. ए. सोसायटींतून बाहेर पडले नाहींत तरी पुढें हे तेथें राहून बाहेरच्या चळवळींत अधिक लक्ष देत. यांनीं टिळकांशीं केलेल्या सहकार्यानें लोकांत त्या वेळीं टिळक-नामजोशी हें जोड-नांव रूढ झालें होतें.

औद्योगिक चळवळीकडे यांचें प्रथमपासून लक्ष असे. 'शिल्पकलाविज्ञान' हें मासिक सुरू करून (१८८७) यांनीं आमरण चालविलें. यांनीं औद्योगिक परिषद सुरू केली. मुंढव्याची डेक्कन पेपर मिल, पुणें म्युनिसिपालिटीचें व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल स्कूल, रे इंडस्ट्रिअल म्युझियम, भांडीं, तार, रेशीम वगैरेच्या गिरण्या यांपैकीं यांनीं सुरु केलेले कांहीं उद्योग अद्यापहि टिकून आहेत.

१८८९ मध्यें कॉंग्रेसचें अधिवेशन पुण्यास कॉलरा असल्यानें मुंबईस भरलें. टिळक व हे यांनीं त्याकरितां दहा हजार रुपये मिळवून दिले. शेअर काढून भांडवल उभारण्याची पद्धत यांनीं पुष्कळ उपयोगांत आणली. हुन्नरविषयक, वाचनपाठमाला, कोश वगैरे पुस्तकें करण्याकडेहि यांचें लक्ष असे. सार्वजनिक दृष्टि व हिकमती स्वभाव यांचा यांच्यांत चांगला मेळ असे.

नायडू, कोट्टारी कनकय्या—(जन्म स. १८९५) जगप्रसिद्ध क्रिकेटपटु.

यांचें शिक्षण हिस्लॉप कॉलेज, नागपूर येथें इंटरपर्यंत झालें. यांचें क्रिकेटचें शिक्षण श्री. राजलिंगम् व श्री. भाऊसाहेब भिडे यांच्या हाताखालीं झालें. कॉलेजमध्यें असल्यापासून क्रिकेट व हॉकी यांमध्यें यांचें विशेष नैपुण्य दिसून आलें. १९०५ सालीं मुंबई येथील क्रीडांगणावर हे प्रथम वाय्. एम्. सी. ए. स्पोर्टस् चॅंपियन आले. १९१६ सालीं मुंबईच्या चौरंगी सामन्यांत यांचा प्रवेश झाला. हिंदुस्थानांत आलेल्या एम्. सी. सी. टीमविरुद्ध हे खेळले व एका मॅचमध्यें ११ ओव्हर बाउंडरीज (सिक्सर्स) व १३ बाउंडरीज (फोर्स) मारून यांनीं १५३ धांवा काढल्या. त्या वेळीं यांच्या १ तास १३ मिनिटांमध्यें १०० धांवा पडल्या. विलायतेस गेलेल्या हिंदी टीमचे हे कप्तान होते. तिकडे यांना गौरवानें 'काळा ब्रॅडमन' म्हणत. १९१६-१९३५ पर्यंत यांनीं अगदीं तुफानी खेळ खेळून हिंदी क्रिकेटचें स्वरूप अगदीं बदलून टाकलें. यांच्या बॅटिंगची गणती–डाव ४४, नाबाद ४, जास्तींतजास्त धांवा १५५, एकूण धांवा १९३४, सरासरी ४८·३५ अशी पडते. विजय मर्चंट पहिले व हे दुसरे येत असले तरी एकूण धांवा यांच्याच अधिक आहेत.

१९३६ मधल्या युरोपांतील दौऱ्यांतहि यांनीं अकराशें दोन धांवा काढल्या. रणजी आणि धुलीपसिंग यांनंतर क्रिकेटमध्यें आन्तरराष्ट्रीय कीर्ति मिळविणारे हेच होत. हे तुफानी आक्रमक खेळ खेळतात; तसेंच संरक्षक खेळ खेळण्यांतहि हे कुशल आहेत. इंदूरच्या परदेशी संघाविरुद्ध खेळत असतां यांनीं पांच तासांत फक्त दहा धांवा काढल्या. फिल्डर्सची मांडणी व खेळाडूंच्या गुणाचें ज्ञान हे कप्तानांत अवश्य असणारे गुणहि यांच्यांत आहेत.

इंदूर संस्थानांत ए. डी. सी. व आर्मी-सेक्रेटरी म्हणून यांनीं केलेल्या कामाबद्दल इंदूर सरकारनें यांना मुन्तझीम बहादुर (१९३९), दिलेरजंग (१९४०) व वफदान-इ-दौलत इत्यादि पदव्या दिल्या आहेत.

नायडू, सरोजिनी—(जन्म स. १८७९ फेब्रु. १३) हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध राजकारणी, इंग्रजी भाषेंतील जगप्रसिद्ध कवयित्री व जगांतील पांच वक्त्यांपैकीं एक.

यांच्या पित्याचें नांव अघोरनाथ चतर्जी. १२ व्या वर्षी या मद्रास युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिक झाल्या व सोळाव्या वर्षी या इंग्लंडला गेल्या (१८९५). लंडन व केम्ब्रिज येथें शिक्षण घेतल्यावर प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें या इटलींत जाऊन परत आल्या (१८९८). इकडे आल्यानंतर यांनीं डॉ. गोविंद राजुलू नायडू यांचेबरोबर विवाह केला. हा विवाह बंगाल व मद्रास असा आन्तरप्रान्तीय व ब्राह्मणब्राह्मणेतर असा आन्तरजातीय होता.

यांच्यांत काव्यशक्ति लहानपणापासून आहे. वडिलांच्या प्रेरणेनें काव्य करण्यास यांना उत्तेजन मिळालें. यांच्या कविता इंग्लंडमध्यें अतिशय लोकप्रिय झाल्या आहेत. यांच्या पुष्कळ कवितांचें युरोपीय व देशी भाषांत भाषान्तर झालें आहे. यांच्या कवितेंत राष्ट्रीय दृष्टिकोन, स्वरमाधुर्य, क्षोभकारक विचारप्रवाह, मांडणीचा

विशेषपणा व कल्पनासौंदर्य असल्याबद्दल डब्ल्यु. बी. यीट्स, आर्थर सिमन्स वगैरेंनीं लिहिलें आहे. शुद्ध हिंदी वातावरण व भाषाप्रभुत्व यांबद्दलहि यांची प्रशंसा आहे.

जगप्रसिद्ध वक्त्यांत ज्यांची गणना होते अशांपैकीं या एक होत. इंग्रजीप्रमाणेंच यांना पुष्कळ भाषा येतात. वक्तृत्वाच्या बाबतींत यांना जादूगार समजण्यांत येतें. कल्पनेचा प्रक्षोभकपणा, स्वरमाधुर्य व भाषाप्रभुत्व यांमुळें यांचीं भाषणें अत्यंत परिणामकारक होतात. यांच्या काव्याप्रमाणेंच यांच्या वक्तृत्वाच्या सफरींनीं या युरोपभर प्रसिद्ध आहेत. या हिंदी स्त्रियांना बौद्धिक ध्येयरूप असून यांना पूर्व-पश्चिम ऐक्याची शान्तिदूती मानण्यांत येतें.

हिंदुस्थानाच्या सर्व प्रकारच्या उत्कर्षाची यांना अत्यंत उत्कंठा असून त्याकरितां या कोणताहि त्याग करण्यास तयार आहेत. या अनेक वेळां तुरुंगांत गेल्या असून पुष्कळ काळपर्यंत या काँग्रेस वर्किंग कमेटीच्या सभासद आहेत. यांना राष्ट्रसभेचें अध्यक्षस्थान देऊन यांच्या कार्याचा गौरव करण्यांत आला (१९२५ कानपूर). १९३२ सालींहि तुरुंगांत असणाऱ्या पं. मालवीयांसाठीं यांनीं दिल्लीस अध्यक्षाचें काम केलें. राउंड टेबल कॉन्फरन्सलाहि या निमंत्रित म्हणून म. गांधींबरोबर गेल्या होत्या (१९३१). हिंदुस्थान सरकारतर्फे आफ्रिकेला गेलेल्या शिष्टमंडळांत या होत्या.

समाजसुधारक म्हणून जशी यांची ख्याति आहे तसेंच स्त्रियांनीं पुरुषांच्या बरोबरीनें सर्व व्यवहारांत भाग घ्यावयास पाहिजे असेंहि यांचें म्हणणें आहे. रवीन्द्रनाथ टागोरांच्या खालोखाल जगांत प्रसिद्ध असणारी ही स्त्री हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याप्रमाणेंच पूर्व-पश्चिम ऐक्याचीहि आवश्यकता प्रतिपादणारी आहे. स्फूर्तिदानाच्या यांच्या विशेष शक्तीनें या तरुणांना तेव्हांच भारून टाकतात.

यांचें इंग्रजी काव्यवाङ्मय—(1) The Golden Threshold (1905), (2) The Broken Wing (1912), (3) The Bird of Time (1617).

यांच्या व्याख्यानांचा संग्रह मद्रासच्या नटेसन कंपनीनें प्रसिद्ध केला आहे.

नायर, सर सी. शंकरन्—(जन्म स. १८५७–मृत्यु स. १९३४) मद्रास हायकोर्टांतील न्यायमूर्ति, राष्ट्रसभेचे अध्यक्ष, हिंदुस्थान सरकारचे एक्झिक्युटिव कौन्सिलर व स्वाभिमानी गृहस्थ.

हे मद्रास युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिकच्या परीक्षेस बसले आणि नापास झाले. लागलीच परीक्षेचा नाद सोडून यांनीं पोस्ट खात्यांत कारकुनीच्या जागेकरितां अर्ज केला. त्या वेळीं मद्रासचे पोस्टमास्तर मि. पिटर यांनीं यांची समजूत घालून यांना पुनः मॅट्रिकच्या परीक्षेस बसण्यास भाग पाडलें. त्यामुळें हे पुनः परीक्षेला बसले आणि यांचा पहिला नंबर येऊन यांना अनेक पारितोषिकें मिळालीं. वकिली करावयास लागतां वकील म्हणूनहि यांची अत्यंत ख्याति झाली. हे मद्रासला हायकोर्ट वकील, सरकारी वकील, पब्लिक प्रॉसिक्यूटर, ॲडव्होकेट जनरल, हायकोर्टातील न्यायमूर्ति व कायदेमंडळांतील सभासद, व्हाइसरॉयचे एक्झिक्युटिव कौन्सिलर (१९१५-१९१९), लंडन स्टेट सेक्रेटरीच्या इंडिया कौन्सिलचे सभासद (१९१९-२१), कौन्सिल ऑफ स्टेटचे लोक-नियुक्त सभासद (१९२५) व सायमन कमिशनबरोबरच्या सेंट्रल लेजिस्लेचर कमेटीचे चेअरमन होते (१९२८).

स. १८९७ सालीं अमरावती राष्ट्रसभेचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें. यांनीं पंजाब प्रकरणाच्या निषेधार्थ व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव कौन्सिलवरच्या जागेचा राजीनामा देऊन लोकप्रियतेचें शिखर गांठलें. यांनीं 'गांधी व अराजकता' नांवाचें पुस्तक लिहिलें. त्यांत म. गांधींवर हे तुटून पडले. पंजाबचे ले. गव्हर्नर सर मायकेल ओडवायर यांनीं यांच्यावर या पुस्तकाबाबत फिर्याद केली. तेव्हां यांना खर्चाबद्दल व अब्रुनुकसानी-बद्दल तीन लाख रुपये भरावे लागले. हे कोणावर केव्हां तुटून पडतील याचा नेम नसे. वरीलप्रमाणें त्याचा परिणाम यांना कांहीं वेळां भोगावा लागे. हे मद्रास रिव्ह्यू, मद्रास लॉ जर्नल, मद्रास स्टँडर्ड यांचे जनक व कांहीं काळ संपादकहि होते.

स्वाभिमान संरक्षणाचा प्रश्न आला म्हणजे हे कोणाचाहि मुलाहिजा ठेवीत नसत. एकदां मद्रासच्या गव्हर्नरकडे खाना होता. भोजनसमयीं गप्पा मारतांना गव्हर्नर म्हणाले, " आतां हेंच पहाना, हिंदी लोकांना आमच्याकडे खाण्यासाठीं बोलावण्यांत आम्हांला कमीपणा वाटत नाहीं. हें कशाचें लक्षण ? बदलत्या परिस्थितीचेंच ना ?" यांना ही अपमानकारक भाषा सहन झाली नाहीं. हे तात्काळ म्हणाले, 'तुम्हाला काय

वाटतें, हिंदी लोकांना खान्याला बोलावून तुम्ही त्यांचा सन्मान करतां म्हणून ? नाहीं. तुमचा तो भ्रम आहे. तुमच्या पंक्तीला बसणें आम्हांला आवडत नाहीं. मी गव्हर्नरच्या पंक्तीला बसून जेवलों ही बातमी जर माझ्या आईला समजली तर एका म्लेंछाच्या पंक्तीला भोजन करून पतित झाल्याबद्दल मला गंगोदकानें प्रायश्चित्त घ्यावें लागेल.' या उत्तरानें खाना कसा तरी संपवून सर्वांना बाहेर पडावें लागलें.

पहिल्या युद्धाच्या वेळीं द्रव्यसाहाय्य मिळविण्याकरितां मद्रासच्या नागरिकांची जाहीर सभा भरविण्यांत आली. व्यासपीठाकडे जाण्यास हिंदी व युरोपियन वक्त्यांकरितां निरनिराळे रस्ते ठेविले होते. हे बोलण्याकरितां व्यासपीठाकडे जाण्यास निघतांच सार्जंटानें यांना अडविलें व हिंदी लोकांकरितां राखून ठेवलेल्या रस्त्यानें जाण्यास सांगितलें. तेव्हां हे This is disgraceful असें म्हणून व्यासपीठाकडे न जातां हे तडक बाहेर निघून गेले. गव्हर्नरसाहेबांच्या ए. डी. सी. नें यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ.

सायमन कमिशन हिंदुस्थानांत आलें असतां असाच प्रसंग पुणें स्टेशनवर घडला. कमिशनच्या निषेधाकरितां जमलेल्या काळेनिशाणवाल्यांच्या बंदोबस्ताकरितां पोलिसांनीं कडक बंदोबस्त ठेवला होता. इंडियन सेंट्रल कमेटीचे अध्यक्ष म्हणून हे कमिशनच्या स्वागताकरितां जात असतां मोटारसह पोर्चमध्यें यांना जाऊं दिलें नाहीं. तेव्हां हे तडक परत फिरले आणि यांच्याशिवाय स्वागत पार पडलें. दुसरे दिवशीं वृत्तपत्र वाचीत असतां ही माहिती सर जॉन सायमन यांना मिळाली.

यांचे ग्रंथः—Gandhi and Anarchy (1922).

नारळीकर, रँग्लर विष्णु वामन--(जन्म स. १९०८) सुप्रसिद्ध गणितशास्त्रज्ञ व जगप्रसिद्ध अभ्यासक.

हे कोल्हापूरचे राहणारे. १९२८ सालीं बी. एससी. परीक्षेंत हे पहिले आले. मंगळदास, टाटा व कोल्हापूर राज्य अशा तीन शिष्यवृत्त्या मिळवून हे विलायतेस गेले व हे बी-स्टार-रँग्लर झाले (१९३०). त्या वेळीं यांना टायसन-पदक व आकाश-ज्योतिष विषयाबद्दल बक्षिस मिळालें. शिवाय यांस जादा न्यूटन–शिष्यवृत्ति मिळून जोसेफ लार्मर यांच्या हाताखालीं विश्वरचनेचा अभ्यास करण्याकरितां देण्यांत आलें. त्याच्या पुढल्याच वर्षी न्यूटन-शिष्यवृत्ति देऊन आर्थर एडिंगटन यांचेकडे संशोधनकार्याकडे यांना घेण्यांत आलें. त्याच कालांत ग्रीनिच वेधशाळेंतहि यांना कांहीं महिने काम करण्याची संधि मिळाली. १९३२ मध्यें यांना केंम्ब्रिज युनिव्हर्सिटी रेले प्राइझ देण्यांत आलें. तें यांस विश्वरचनेवरील कांहीं विचार, गणितज्योतिषांतील गतींच्या समीकरणाची विशिष्ट मांडणी व सापेक्षताशास्त्र या तीन विषयांवर उत्कृष्ट निबंध लिहिल्याबद्दल मिळालेलें आहे. हिंदुस्थानांत परत आल्यावर पं. मालवीयांनीं यांना बनारस हिंदुविश्वविद्यालयांत बोलाविलें. तेथें क्रमानें यांच्यावर सर्व गणित विषयाची जबाबदारी सोंपविण्यांत आली.

यांनीं केलेल्या संशोधनाची माहिती द्यावयाची म्हणजे किती तरी गोष्टींचा उल्लेख करावा लागेल. विशेषतः यांचें संशोधन विश्वकल्पना, विश्वरचना, सापेक्षतासिद्धान्त व गणितज्योतिषांतील गतिविषय, ताऱ्यांच्या उत्क्रान्तीचें गणित, अभ्रिका(Nebulæ)च्या गति, गुरुत्वाकर्षण व तत्संबंधी निरनिराळे विचार, दिङ्निष्ठ संख्यागणित इत्यादि विषयांत असून यांनीं लिहिलेल्या निबंधांची संख्याच साठ आहे (१९३०-४५).

हें निबंध करंट सायन्स, नेचर, रॉयल अस्ट्रॉनॉमिकल सोसायटी, फिलॉसॉफिकल मॅगॅझिन, इत्यादि प्रसिद्ध नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले असून त्यांबद्दल यांची फारच स्तुति झाली आहे व पुढेंहि पुष्कळदां आधारार्थ उल्लेखिले जाण्याची पात्रता त्यांत आहे.

मुंबई युनिव्हर्सिटीनें १९३२ सालीं सापेक्षतासिद्धान्त व विश्वरचना, पुनः १९३८ सालीं गुरुत्वाकर्षणावर व पाटणा युनिव्हर्सिटीनें लहरींचें गतितंत्र (Wave Mechanics) या विषयांवर यांचीं व्याख्यानें करविलीं.

गेल्या २५-३० वर्षांत गणितशास्त्रांत यांच्या इतकें दूरगामी व व्यापक संशोधन भारतांत क्वचितच झालें असेल. यांनीं केलेल्या या निरनिराळ्या क्षेत्रांतील संशोधनामुळें रॉयल अस्ट्रॉनॉमिकल सोसायटी, नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सायन्सेस, नॅशनल अॅकॅडमी ऑफ सायन्सेस, इंडियन अॅकॅडमी ऑफ सायन्सेस इत्यादि सर्वमान्य संस्थांचें सभासदत्व यांना देण्यांत आलें आहे. असला हा सन्मान फारच थोड्यांना देण्यांत येतो. यांचें खाजगी आयुष्य सरळ आणि निगर्वी आहे. प्रत्येकानें आपल्या योग्यतेनुसार कार्य करीत राहावें, असें यांचें साधें तत्त्वज्ञान आहे.

नारंग, सर गोकुळचंद—(जन्म स. १८७८) पंजाबांतील सार्वजनिक कार्यकर्ते व लेखक.

यांचें शिक्षण पंजाब, कलकत्ता, बर्न इत्यादि विद्यापीठांतून झालें. हे एम्. ए., पीएच. डी., बार-ॲट-लॉ आहेत. कांहीं दिवस हे बॅरिस्टर म्हणून काम करीत. हे पंजाब सरकारचे मंत्री होते.

यांचे ग्रंथ—(1) The Message of the Vedas, (2) Tranformation of Sikhism.

नॉर्थब्रुक, थॉमस जॉर्ज बॅरिंग, फर्स्ट अर्ल ऑफ—(जन्म स. १८२६–मृत्यु स. १९०४, कारकीर्द १८७२ मे–१८७६ एप्रिल) हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय.

यांचें शिक्षण खिस्त चर्चमध्यें झालें. अनेक ठिकाणीं कामें केल्यावर हिंदुस्थानचे अंडर-सेक्रेटरी म्हणून यांची नेमणूक झाली (१८५७-५८). तेव्हांपासून हिंदुस्थानशीं यांचा संबंध आला. हे लॉर्ड मेयोनंतर गव्हर्नर-जनरल व व्हाइसरॉय म्हणून हिंदुस्थानांत आले. आर्थिक व्यवहाराकडे यांचें लक्ष असे व तो अत्यंत चोख ठेवण्याचा हे प्रयत्न करीत. १८६९ सालीं फर्डिनंड डी लेसेप्स या फ्रेंच एंजिनियरनें खोदलेला सुवेझचा कालवा खुला झाला, तेव्हां इंग्लंड-हिंदुस्थान यांचा व्यापार वाढला. मँचेस्टरवरील जकात रद्द करण्याची सूचना हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें यांनीं नाकारली. प्राप्तीवरील जकात रद्द केली. फक्त मिठावरील कर ठेवला. १८७४ च्या दुष्काळांत लोकांस मदत केली. मल्हारराव गायकवाड पदच्युत होऊन सयाजीराव गायकवाड गादीवर आले. अफगाणिस्थानचे अमीर शेरअल्लीनें रशियाविरुद्ध मदत मागतां यांनीं नाकारली, पण त्यांना सहा हजार बंदुका नजर केल्या. कापसावर बसविण्याच्या करासंबंधीं स्टेट सेक्रेटरीशीं मतभेद झाल्यानें यांनीं राजीनामा दिला.

नासिरउद्दीन, हैदर—(कारकीर्द स. १८२७–१८३७) अयोध्येचे नबाब.

गाझीउद्दीन हैदर मृत्यु पावल्यावर त्याचा मुलगा सुलेमानशहा वरील नांव धारण करून गादीवर बसला. यांच्या हातांत बापाचा दहा कोटींचा खजिना आला. बापाचा आगा मीर नांवाचा मंत्री कमी करून मेहेंदी अल्लीखान ऊर्फ हकीम मेहेंदी या जुन्या प्रधानास यांनीं पुनः कामावर घेतलें. मिस् वाल्टर्स नामक युरोपियन स्त्रीशीं यांनीं विवाह केला व तिचें नांव 'मुकंदरा औलिया' असें ठेवलें. दिल्लीच्या बादशाहजादीशीं यांनीं लग्न लाविलें व तिचें नांव ' ताजमहाल ' असें ठेवण्यांत आलें. ह्यांशिवाय अनेक स्त्रिया यांच्या रंगमहालांत अग्रगण्य होत्या. त्यांच्या खर्चाकरितां यांनीं बासष्ट लाख रुपये पांच टक्के व्याजानें ईस्ट इंडिया कंपनीकडे ठेवले होते.

यांनीं तीन लक्ष रुपये चार टक्के व्याजानें ब्रिटिश रेसिडेंटाच्या ताब्यांत देऊन त्याच्या व्याजाचा खर्च अनाथ, अंध पंगु लोकांना दानधर्म करण्याकडे करावा अशी तजवीज केली होती. तसेंच दरमहा तीन हजार रुपये लखनौच्या पाठशाळेकडे नेमून दिले होते. याशिवाय यांनीं जागोजाग दवाखाने व अन्नछत्रें उघडलीं होतीं. यांचें खासगी चरित्र वुइल्यम नाइटन नांवाच्या यांच्या पदरच्या चित्रकारानें ' प्रायव्हेट लाइफ ऑफ ईस्टर्न किंग ' या नांवानें लिहिलें आहे. त्यांत अनेक मौजेच्या गोष्टी आहेत.

यांनीं एक युरोपियन न्हावी सर्फराजखान पदवी देऊन आपल्या पदरीं बाळगला होता. न्हाव्याविरुद्ध ' आग्रा अखबार 'मध्यें विरुद्ध टीकापर लेख येत त्याला उत्तर देण्याकरितां शंभर रुपये पगाराचा इसम ठेवला होता. न्हाव्यानें यांना खूष ठेवून चोवीस लक्षांची संपत्ति मिळविली. अशा लोकांच्या संगतीनें यांनीं आपला पुत्र मुन्नाजान याचा गादीवरचा हक्क नष्ट केला. हकीम मेहेंदी दिवाण होता तोंपर्यंत कसें तरी निभलें. पण त्याला कमी करून रोबनउदौला यास दिवाण करतांच ब्रिटिश सरकार राज्य ताब्यांत घेणार अशी सर्वत्र वार्ता पसरतांच हे विषप्रयोगानें मृत्यु पावलें.

निजामुल्मुल्क, महबूबअलीखान—(जन्म स. १८६६–मृत्यु स.१९११, कारकीर्द स. १८६९–१९११) हैदराबादचे निजामसाहेब.

हे गादीवर आले तेव्हां तीन वर्षांचे होते. प्रथम रीजन्सीमार्फत काम चालून १८८४ त यांना अधिकार मिळाले. १९०१ सालीं यांनीं महाराज सर किशनप्रसाद यांस दिवाण नेमिलें.

हिंदुस्थानांतील सर्वांत विस्तारानें, संपन्नतेनें व दर्जानें श्रेष्ठ असणाऱ्या राज्याचे हे अधिपति आचारविचारानेंहि तसेच उदार होते. हे अत्यंत साधे, धर्मभीरु व हिंदु-मुसलमान लोकांच्या अत्यंत आदरास पात्र झाले होते. हे संकटग्रस्त प्रजेच्या मदतीकरितां जातीनें धांवून जात. यांच्यावर लोकांची इतकी श्रद्धा होती कीं लोक यांना नवस करीत असें म्हणतात.

निजामुल्मुल्क, सर उस्मानअलीखान— (जन्म स. १८८६, राज्यारोहण स. १९११ आगस्ट २९) हैदराबाद राज्याचे अधिपति.

या घराण्यांतील लोक हैदराबादची गादी स्थापन करणाऱ्या पुरुषास दिल्लीच्या बादशहानें दिलेली निजामुल्मुल्क ही पदवी धारण करून गादीवर बसतात. इंग्रजी राज्य झाल्यावर ५ निजामअली (१७५१-१८०३), ६ मिर्झा सिकंदरजाह (१८०३-१८२९), ७ नासिरुद्दौला (१८२९-१८५७), ८ अफझुद्दौला (१८५७-१८६९) व ९ महबूबअलीखान (१८६९-१९११) हे पुरुष गादीवर आले. त्यानंतर निजामुल्मुल्क ही पदवी धारण करून हे दहावे पुरुष गादीवर बसले.

यांचें शिक्षण खासगी रीतीनें झालें. हे गादीवर येतांच यांनीं अलीगड विद्यापीठाचे संस्थापक सर सय्यद अहमद यांचे नातू डॉ. रास मसूद यांना आणून त्यांना शिक्षण खात्याचे मुख्याधिकारी नेमिलें. तेव्हांपासून यांच्या राज्यांत जुनें समानतेचें धोरण जाऊन नवें मुसलमानी संस्कृतीच्या वर्चस्वाचें युग सुरू झालें.

एक लक्ष मैल क्षेत्रफळ, पावणेदोन कोट प्रजा, साडेसोळा कोट उत्पन्न असें विस्तारानें, लोकसंख्येनें, संपन्नतेनें आणि दर्जानेंसुद्धां यांचें राज्य हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें आहे. याचा कारभार वीस लोकांच्या कायदेमंडळाकडून चालविला जातो. प्रत्यक्ष कार्यकारी मंडळ सात-आठ लोकांचें असतें व त्याचा अध्यक्ष मुख्य प्रधान समजला जातो.

या राज्यांत स्वतंत्र चलन, पोष्ट, रेल्वे व सैन्य आहे. इतिहास व पुराणवस्तु-संशोधनाचीं खातीं आहेत. अजिंठा व वेरूळ हीं जगप्रसिद्ध कोरीव लेणीं आणि कल्याणी, मालखेड, पैठण, देवगिरी, गुलबर्गा, बिदर, वरंगळ वगैरे प्रसिद्ध ऐतिहासिक स्थळें आहेत. हैदराबादेसारखें हिंदुस्थानांत चवथ्या क्रमाचें शहर यांची राजधानी आहे.

हे गादीवर आले तेव्हां यांनीं तिसरे सर सालरजंग यांना मुख्य प्रधान नेमिलें (११ जुलै १९१४–१ डिसें. १९१४). पण पुढें यांनीं मुख्य प्रधानाचें काम स्वतःकडे घेतलें. पुढें पांच वर्षांनंतर बहुतेक सर्व कारभार एका कार्यकारी मंडळाकडे सोंपविला (१७ नवं. १९१९) आणि अधिकाराची विभागणी केली. त्या मंडळाचे अध्यक्षस्थानीं सर अली इमाम यांची नेमणूक करण्यांत आली. त्यांनीं कर्जाच्या पोटीं स. १८५३ त गेलेला वऱ्हाड प्रान्त ब्रिटिश सरकारकडून परत मिळविण्याची खटपट केली. पण त्यांना तेव्हां त्या कामीं अपेश आलें व त्यांनीं अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. पण पुढें यांच्या चिकाटीच्या प्रयत्नानें वऱ्हाडवरील यांचें स्वामित्व नाममात्र कां होईना पण ब्रिटिश सरकारनें मान्य केलें.

सर अली इमाम यांनीं राजीनामा दिल्यानंतर त्यांचे जागीं सर फरीदुनमुल्क बहादूदुर अध्यक्ष झाले. त्याच वेळीं मि. ग्लॅन्सी यांच्या जागीं मि. अकबर हैदरी हे फडणीस नेमिले गेले. ते पुढें अध्यक्ष झाले. नंतर छत्तारीचे नबाबसाहेब अध्यक्ष झाले.

यांनीं राज्यावर येतांच क्रमानें इंग्रजी व मराठी वगैरे प्रान्तिक भाषांचें महत्त्व कमी करून सरकारी कामकाजाची उर्दू ही भाषा ठरविली. राजभाषा व बोधभाषा म्हणून सर्वत्र उर्दूला स्थान देण्यांत आलें. सर अकबर हैदरी यांच्या साहाय्यानें १९१८ सालीं यांच्या नांवें उस्मानिया युनिव्हर्सिटी स्थापण्यांत आली. तिला व्यापक व भव्य रूप देण्याकरितां कोट्यवधि रुपये खर्च करण्यांत आले. तेथें उच्च शिक्षणाकरितांहि उर्दू ही भाषा माध्यम म्हणून मान्य करण्यांत आली व पांचशेंवर ग्रंथ उर्दूत तयार करण्यांत आले. परिभाषा वगैरे ठरवून ग्रंथ तयार करवून त्यांचा अभ्यासक्रमांत समावेश करण्याची आणि हा सर्व प्रयोग यशस्वी करून दाखविण्याची खटपट यांच्या या विश्वविद्यालयानें चालविली आहे.

यांनीं १९३९ सालीं नवीन सुधारणा जाहीर केल्या. त्यांत कायदेमंडळाचा विस्तार, संयुक्त मतदारांतर्फे निवडणूक, ग्रामपंचायतींची स्थापना, जिल्हापरिषद् व हिंदु-मुसलमानांना समान पन्नास टक्के प्रतिनिधित्व इत्यादि गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

दुसऱ्या महायुद्धांत यांनीं युद्ध सुरू होतांच आपले मुंबई व दिल्ली येथील राजवाडे ब्रि. सरकारला दिले, शिवाय खाजगींतून सोळा लाख, संस्थानचे बावन्न लाख देणगी म्हणून व साडे पन्नास कोटि रुपये बॉन्डच्या खरेदी रूपानें दिले. यांचा युद्धकालीन युद्धखर्च साडे-पांच कोटींपर्यंत चढला. शिवाय यांच्या सैन्याचे दोन युनिट्स् आघाडीवर लढले. इंडियन आर्मी व हवाईदल यांच्या शिक्षणाकरितां यांचें एक स्वतंत्र केन्द्र असून एलिमेन्टरी फ्लाईंग ट्रेनिंग स्कूल बांधण्यासाठीं पावणे-दोन लाख

रुपये खर्च करण्यांत आले. तसेंच आपले कारखाने रात्रंदिवस चालवून मालाचा पुरवठा केला व आपली 'फेथफुल अलाय ऑफ ब्रिटिश गव्हर्नमेंट' ही पदवी सार्थ केली.

यांचें १९४५ चें कार्यकारी मंडळ—१ छत्तारीचे नबाब (अध्यक्ष, राजकारण, राज्यघटना व रेल्वे), २ नबाब सर महदी (उपाध्यक्ष व एक्ट्राआर्डिनरी सभासद), ३ नबाब आलम (कायदा व सुधारणा), ४ नबाब झैन (पी. डब्ल्यु. डी., व्यापार व कारखाने), ५ नबाब झैर (पोस्ट व मजूर), ६ नबाब लियाकत (अर्थ), ७ सय्यद मुहम्मद अझाम (शिक्षण), ८ सी. ए. जी. सॅबिड्रे (जमीन महसूल व पोलीस), ९ दि. ब. एस. अर्वमुर्डु आयंगार (वैद्यक व आरोग्य).

यांच्या घराण्याचा संबंध बापाच्या बाजूनें पहिल्या खलीपाशीं व आईकडून खुद्द मुहम्मद पैगंबराशीं लागतो. मधल्या काळांतहि अनेक धार्मिक व शूर पुरुष यांच्या घराण्यांत झाले आहेत. त्यामुळें यांच्या घराण्याला आन्तरराष्ट्रीय धार्मिक महत्त्व आहे. हें महत्त्व तुर्कस्थानांतील खलिपाच्या मुलीशीं आपल्या युवराजाचें लग्न करून यांनी पुनः वाढविलें आहे. आपला व आपल्या राज्याचा आन्तरराष्ट्रीय राजकीय दर्जा यांच्या ध्यानांत असून तो वाढविण्याचा यांचा सतत प्रयत्न असतो. हे मुसलमानी धर्माचे विशेष अभिमानी असून कर्मठ आहेत. हे राज्यकारभारांत जातीनें लक्ष घालतात व सरकारी आवश्यक कागदपत्रांवर उर्दूत स्वतःच्या हस्ताक्षरांत हुकूम देतात. यांच्या राज्यांत शेंकडा श्यांहशी टक्के प्रजा हिंदु आहे. मराठी (४५ लक्ष), कानडी (३० लक्ष) व तेलगू (६५ लक्ष) या राज्यांतील लोकांच्या भाषा आहेत. मुसलमानांची संख्या राज्यांत शेंकडा फक्त दहा आहे.

पण राज्यांतील लोकांच्या भावना, भाषा, संख्या वगैरेकडे लक्ष देण्यांत येत नाहीं. नोकर वर्गांत मुसलमानांची प्रमाणाबाहेर भरती करण्यांत येते, त्यांतहि बाहेरच्या लोकांचा विशेष भरणा असतो, भाषा व धर्म यांबाबतहि अन्याय होतो अशा तक्रारी असून आर्यसमाज, हिंदुसभा व स्टेट काँग्रेस यांना त्याबाबत सत्याग्रह करावे लागल्याचें प्रसिद्ध आहे. यांच्या उर्दूपक्षपाताविरुद्ध मराठी वगैरे भाषा बोलणारांच्या फार तक्रारी आहेत.

यांना उर्दू भाषेंत कविता करण्याचा नाद असून यांचा एक संग्रह प्रसिद्ध झाला आहे. यांना अनेक महत्त्वाच्या पदव्या असल्या तरी 'सुलतानुन्शुरा' (कवीन्द्र) ही वाङ्मयात्मक कार्याबद्दल मिळालेली पदवी विशेष प्रिय आहे.

हे अत्यंत काटकसरी, मातृभक्त, साधे, किडकिडीत, बिनबोलके, प्रसिद्धिविन्मुख पण महत्त्वाकांक्षी, ध्येयवादी व चिकाटीचे आहेत. केवळ राजसत्तेच्या जोरावर एरवीं अशक्य असणाऱ्या गोष्टीहि अमलांत आणण्याचा कसा प्रयत्न होतो याचें यांचें राज्य हें एक उदाहरण आहे.

हे जगांतील पहिल्या प्रतीचे संपन्न असून यांच्या संग्रहांत असणाऱ्या जडजवाहिराची किंमत ३० कोटि पौंड आहे. त्याखेरीज यांच्याजवळ सोन्याचा संग्रहहि फार मोठा आहे. दीडशें माणसांची भोजनाची व्यवस्था हे एका वेळीं सुवर्णपात्रांतून करूं शकतात. संपत्तींत बडोद्याच्या गायकवाडांचा जगांत आठवा क्रम लागतो. टाटा वगैरेचा क्रम त्यानंतरचा आहे.

निरंजन, रघुनाथ—(जलसमाधि स. १८५५) सुप्रसिद्ध सिद्ध पुरुष.

यांचें मूळ नांव अवधूत श्रीधर श्रोत्री. गांव कळंब (ता. धारूर). कौशिकगोत्री आश्वलायनशाखेचे दे. ब्राह्मण. यांचे गुरु नाशिकचे रघुनाथ भटजी. त्यांनीं यांचें निरंजन असें नांव ठेवलें व यांनीं रघुनाथ हें गुरूचें नांव जोडून हे निरंजन रघुनाथ या नांवानें प्रसिद्ध झाले. यांना गिरनार पर्वतावर सगुण साक्षात्कार झाला होता. हे गृहस्थाश्रमी होते. शेवटीं यांनीं चतुर्थाश्रम घेतला व कृष्णेंत जलसमाधि घेतली. यांचे सर्व ग्रंथ कै. य. व्यं. कोल्हटकर सांगली यांनीं संशोधून प्रसिद्ध केले.

यांचे ग्रंथ—१ अनुभवामृतबोधिनी (ज्ञानेश्वरमहाराजांच्या अनुभवामृतावरील गद्य टीका), २ स्वात्मप्रचीति (आत्मचरित्रपर), ३ साक्षात्कार (आत्मचरित्रपर), ४ श्रीरघुनाथचरित्र, ५ आत्मबोध प्रकाशिनी (श्रीशंकाराचार्यांच्या आत्मबोधावरील टीका), ६ केनोपनिषद् टीका (गद्य), ७ महावाक्य, ८ केशवचैतन्यकथातरु, यांत तुकारामम्हाराजांचे गुरु केशवचैतन्य यांचें चरित्र ओंवी छंदांत आहे. ग्रंथांत 'श्रीचैतन्य विजय कल्पतरु' असें नांव आहे. कृष्णदास वैरागी यांनीं केशवचैतन्यचरित्र शके १५९६ (स. १६७४) मध्यें वर्णिलें त्याच्या आधारें यांनीं १७०९ (स. १७८७) मध्यें हें लिहिलें.

निवेदिता, भगिनी—(जन्म स. १८६७–मृत्यु स. १९११) हिंदी संस्कृतीच्या पाश्चिमात्य अभ्यासक व अभिमानी.

यांचें खरें नांव मिस् मार्गारेट नोबल. यांचे वडील रेव्ह. एस्. आर्. नोबल हे आयर्लंडमधील धर्मगुरु होते. हिंदुस्थानांत येण्याचे पूर्वीपासूनच पेस्टॉलिझ्झ व फ्रोबेल यांच्या तत्त्वांच्या अभ्यासक म्हणून यांची लंडनमध्यें प्रसिद्धि होती. विवेकानंदांची यांच्याशीं गांठ होण्याचे वेळीं लंडनमधील आपल्या शाळेंत या मुख्याध्यापिकेचें काम करीत होत्या.

इंग्लंडमधील आपल्या स्नेह्यांच्या निमंत्रणावरून स्वामी विवेकानंद इंग्लंडमध्यें आले. त्या वेळीं यांची त्यांच्याशीं पहिली भेट झाली (१८९५ सप्टें.). स्वामीजींच्या धार्मिक ज्ञानाच्या खोलीचा व त्यांच्या विचारांच्या ताजेपणाचा यांचेवर इतका परिणाम झाला कीं स्वामींच्या इंग्लंडच्या दुसऱ्या सफरींत 'हिंदुस्थानांतील आपल्या कार्याकरितां यांच्यासारख्या स्त्रियांची आवश्यकता' त्यांनीं सूचक शब्दांत बोलून दाखवितांच, या हिंदुस्थानला निघाल्या (१८९८).

यानंतर सबंध एक वर्ष, यांनीं विवेकानंदांबरोबर सर्व हिंदुस्थानचा प्रवास करण्यांत घालविलें. अशा तऱ्हेनें विवेकानंदांच्या कल्पनांशीं, भावनांशीं व विचारांशीं संपूर्णतया तादात्म्य पावल्यानंतर यांना श्री रामकृष्ण परमहंसांच्या शिष्यवर्गांत औपचारिक रीतीनें दाखल करण्यांत आलें.

हिंदी संस्कृतीशीं संपूर्णपणें तादात्म्य होण्याच्या दृष्टीनें कलकत्त्याच्या बोस पारा लेन या कर्मठ हिंदूंच्या वस्तींत यांनीं आपलें आसन ठोकलें व थोड्याच दिवसांत आपल्या सालस वागणुकीनें या लोकप्रिय झाल्या.

'आपला देश', 'आपले बंधु' अशी हिंदुस्थानसंबंधीं बोलावयाची यांची पद्धति, कोठेंहि दुष्काळ, रोगाच्या साथी येतांच धांवून जावयाची यांची वृत्ति व गोड स्वभाव यांमुळें या सर्वत्र लोकप्रिय असत.

स. १९०० त प्रसिद्ध झालेल्या 'Kali the Mother' या लहानशा पुस्तकानें यांनीं हिंदुस्थानांतील आपल्या वाङ्मयीन कार्यास सुरुवात केली. रानटी लोकांचेकडून पूजिली जाणारी रक्तपिपासू देवता ही पाश्चिमात्यांत कालीविषयीं रूढ असलेली कल्पना चुकीची आहे; देवतेला फक्त प्रेममय स्वरूपांतच पाहणें म्हणजे तिचें दुसरें भयानक स्वरूप विसरण्यासारखें आहे अशी विचारसरणी या पुस्तकांत मांडण्यांत आली आहे.

परंतु 'The Webs of Indian Life' (1904) ह्या पुस्तकांत यांचें सर्व जीवितसर्वस्व सांठविलें आहे. इंग्रजी वाङ्मयांतील 'हिंदुस्थानवरील सर्वश्रेष्ठ पुस्तक' हें त्याचें वैशिष्ट्य आज अनेक वर्षें तसेंच टिकून राहिलें आहे. 'प्रवासात्मक किंवा वर्णनात्मक सुंदर पुस्तक' असें म्हणण्यांतच या पुस्तकाचें वैशिष्ट्य संपत नाहीं. हिंदी भावनांचें सुबोध आविष्करण ही त्याच्या यशाची गुरुकिल्ली आहे. हिंदुस्थानसंबंधीं जिज्ञासा असणाऱ्या कोणत्याहि मनुष्याला एकदम हिंदुस्थानच्या हृदयाजवळ खेंचे करण्याचें अजोड सामर्थ्य या पुस्तकांत सांठविलें आहे.

हिंदी-विशेषतः बंगाली गृह व स्त्रीजीवन यांची या पुस्तकांत रेखाटण्यांत आलेलीं चित्रें यथार्थता व सौंदर्य या दोन्ही दृष्टीनीं सारखींच निर्दोष आहेत. कवीची ध्येयदृष्टि व कलावंताची सहृदयता यांचे साहाय्यानें हिंदी स्त्रीहृदयांत शिरून पौर्वात्य परंपरेचीं सजीव स्मारकें असा निष्कर्ष यांनीं हिंदी स्त्रियांबद्दल काढला आहे. गीता, हिंदी शेतकरी वगैरे प्रकरणेंहि अशींच सुंदर आहेत.

यापुढें सरकारशीं करावा लागणारा लढासुद्धां आपल्या पूर्वपरंपरेला साजेसा–जागतिक संस्कृतींत कांहीं तरी भर टाकण्याजोगा–करण्याचा संदेश शेवटीं या पुस्तकांत देण्यांत आलेला आहे.

Cradle-Tales of Hinduism (1907), An Indian Sludy of Love and Death (1909) व The Master as I Saw Him (विवेकानंदांचें व्यक्तिपरीक्षण) हे यांचे ग्रंथहि असेच महत्त्वाचे आहेत. याशिवाय निरनिराळ्या मासिकांत चालू असणाऱ्या यांच्या लेखनांत Modern Review मधील यांचीं चित्रपरीक्षणें महत्त्वाचीं आहेत.

हिंदी संस्कृतीचें श्रेष्ठत्व सर्व जगाला पटवून देणाऱ्या हिंदुस्थानच्या परदेशी मित्रांतील यांचें स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. भाषा, व्याकरण, इतिहास शिकून हिंदी संस्कृतीच्या नजीक येण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्राच्यविद्यापंडितांपेक्षां हिंदी विचारांशीं व भावनांशीं समरस होऊन हिंदी तत्त्वज्ञान समजून घेण्याचा यांचा मार्ग निःसंशय उच्च दर्जाचा ठरतो.

निवेदिता या शब्दांत ध्वनित होणारा आत्मसमर्पणपूर्वक सेवामार्गाचा आदर्श पाळण्यांत यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणखी एक महत्त्वाची बाजू प्रकाशांत येते. हिंदु धर्माचा स्वीकार करूनहि धार्मिक पुढारीपणाचा टेंभा मिरवण्याचा आग्रह यांनीं कधींच धरला नाहीं. कारण शिकवण्यापेक्षां सेवेंतच यांना जास्त गोडी वाटे. आणि म्हणूनच कार्याच्या स्वरूपापेक्षां त्यांतील भावनेकडे लक्ष देणाऱ्या प्रत्येक मनुष्याला यांचें नांव एक स्फूर्तिस्थल होऊन राहिलें आहे.

नियोगी, न्यायमूर्ति मच्छीराज भवानीशंकर—(जन्म स. १८८६) नागपूर हायकोर्टांतील न्यायमूर्ति.

यांचें मूळ गांव मच्छलीपट्टण. पण हें आंध्रब्राह्मणाचें घराणें नागपूर येथें चार पिढ्यांपासून स्थायिक झालें असून आतां पूर्ण महाराष्ट्रीय बनलें आहे. यांच्या दुसऱ्या पत्नी इंदिराबाई या एम्. बी. बी. एस्. असून प्रसिद्ध समाजसुधारक वामनराव कोल्हटकर यांच्या कन्या होत. यांचें शिक्षण काका दुर्गाशंकर यांनीं केलें. हे एम्.ए., एल्एल्.एम्. आहेत. कांहीं दिवस पटवर्धन हायस्कूलमध्यें शिक्षकाचें काम केल्यावर यांनीं वकिली करण्यास सुरुवात केली (१९१६). असहकारितेच्या चळवळींत यांनीं वकिली सोडली होती, पण पुनः करण्यास सुरुवात केली (१९२२).

प्रिव्हि कौन्सिलपर्यंत गेलेला आमगांव जमिनदारी खटला चालविण्याकरितां हे इंग्लंडला गेले होते (१९२७). ॲडिशनल ज्युडिशिअल कमिशनर (१९३०-३६) व जज (१९३६) या नात्यानें यांनीं काम केलें. तसेंच नागपूर युनिव्हर्सिटीचे हे दोनदां उपकुलगुरु होते (१९३२ ३४).

नागपूर विद्यापीठास भूषणभूत झालेल्या 'रा. ब. डी. लक्ष्मीनारायण टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट'ची नमुनेदार योजना यांच्याच हस्तें तयार झाली आहे.

यांना सार्वजनिक कार्य करण्याची हौस पहिल्यापासूनच आहे. अच्युतराव कोल्हटकरांच्या संदेशचें इंग्रजी भावंड 'मेसेज'चे संपादक म्हणून हे मुंबईस येऊन राहिले होते. असहकारितेच्या काळांत वकिली सोडून नागपूर कॉंग्रेसची दुय्यम चिटणीशी, राष्ट्रीय विद्यालयाचे मुख्याध्यापक वगैरे कामेंहि यांनीं केलीं. १९२५ सालीं हे नागपूर नगरपालिकेचे अध्यक्ष झाले. त्या वेळीं शुक्रवार तलावावर यांनीं लोकमान्यांचा पुतळा उभारण्याचें महत्त्वाचें काम केलें.

निंबाळकर, मेजर राजाबहादुर श्रीमंत सर मालोजीराव मुधोजीराव उर्फ नानासाहेब नाईक के. सी. आय्. ई.—(जन्म स. १८९६ ११ सप्टें.) फलटणचे राजेसाहेब.

जात-मराठा क्षत्रिय. शिक्षण राजकोट येथील राजकुमार कॉलेजचा डिप्लोमा. विवाह डेक्कनमधील फर्स्ट क्लास सरदार व माळेगांव बुद्रुकचे सरंजामदार कै. श्रीमंत राजे शंभुसिंहराव अमरसिंहराव जाधवराव यांच्या कन्या आबईसाहेब (आतां श्रीमंत स. सौ. लक्ष्मीदेवी) यांजबरोबर ता. १८ डिसें. १९४१ रोजीं. युवराज श्रीमंत प्रतापसिंह उर्फ बापूसाहेब (जन्म १३ जुलै १९२३). संस्थानचें क्षेत्र ३९७ चौरस मैल. लोकसंख्या ७१,४७३ (१९४१) उत्पन्न २०,३८०००/-.

परमार घराण्यांतील पहिले निंबराज यांनीं स. १२७० सालीं फलटण संस्थानची स्थापना केली. दक्षिण महाराष्ट्रांतील हें सर्वांत जुनें व ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचें असें संस्थान आहे. या घराण्यांत आतांपर्यंत एकंदर २४ राज्यकर्ते झाले असून श्रीशिवछत्रपतींचे पितामह श्री. मालोजीराजे यांचेपासून आजवर श्रीशिवछत्रपतींच्या भोसले घराण्याशीं या घराण्याचे अनेकवार विवाह संबंध झाले आहेत.हे स.१९१६ ऑक्टो.१६ रोजीं गादीवर आले.

हे अत्यंत प्रगमनशील असून प्रजेची कोणत्याहि रीतीनें मागणी नसतांना स. १९२९ पासून राजकीय सुधारणा प्रजेस देण्याचा उपक्रम यांनीं सुरू ठेवला व स. १९४२ सालीं श्रीमंतांनीं जवळ जवळ संपूर्ण जबाबदारीची राज्यव्यवस्था प्रजेस दिली. या यांच्या अत्यंत स्तुत्य व अनुकरणीय उपक्रमाबद्दल भारतांतील अनेक महनीय व्यक्तींनीं यांना धन्यवाद दिले आहेत. या राज्यघटनेअन्वयें लोकनियुक्त सभासदांचें निर्विवाद बहुमत असलेलें १८ (१२ लोकनियुक्त व ६ सरकारनियुक्त) सभासदांचे एक विधिमंडळ (Legislative Council) असावयाचे आहे. लोकनियुक्त सभासदांतून कमींत कमी दोन मंत्र्यांची मंत्रिमंडळावर श्रीमंत राजेसाहेब यांनीं निवड करण्याची असून त्यांचेकडे अन्तर्गत राज्यव्यवस्थेसंबंधींचीं बहुतेक सर्व खातीं राहावयाचीं आहेत.

प्रजेची आर्थिक व सामाजिक उन्नति करणाऱ्या प्रत्येक बाबींकडे यांचें प्रथमपासून विशेष लक्ष आहे. शिक्षणाकडे दरसाल बजेटांत फार मोठी रक्कम खर्च होत आहे.

दुय्यम शिक्षणाचा शक्य तितका अधिक प्रसार व्हावा म्हणून हायस्कूलमधील फी ब्रिटिश हद्दीतील फीच्या मानानें फार कमी ठेवली आहे. शिवाय मुलींना तसेंच हरिजनांना हायस्कुलांतील शिक्षण मोफत देण्यांत येतें. इतकें असून शिवाय हरिजन व इतर मागासलेल्या वर्गांत पुष्कळ प्रमाणांत नादाऱ्या व शिष्यवृत्त्या देऊन दुय्यम शिक्षणाच्या प्रसारास फार मोठी मदत केली आहे. प्राथमिक शिक्षण तर येथें सर्रास मोफत आहे.

यांचे जमीनसाऱ्याबाबत व शेती बाबतहि उदार धोरण आहे. यांनीं १९३७ सालीं तशी आवश्यकता नसतांहि रुपयाला तीन आणे याप्रमाणें सारा-सूट दिली आहे. ठिकठिकाणीं पाणी झिरपणारे बंधारे बांधून बागायती शेतीस मदत केली आहे. सांधिक व फड पद्धतीने शेतीस पाणी देण्याचे प्रयोग सुरू करून शेती किफायतशीर करण्यास शेतकऱ्यांना उत्तेजन देण्यांत येत आहे. यांनीं स्वतःस गादीवर येऊन पंचवीस वर्षे झालीं, त्या प्रसंगी औद्योगिक शिक्षणासाठीं एक लाख रुपयांचा निधि राखून ठेवण्याची घोषणा केली व वैद्यकीय मदतीसाठींहि तितकाच दुसरा निधि ठेवण्यांत आला आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे फलटण संस्थानच्या सर्वांगीण उन्नतीला पोषक अशा प्रत्येक बाबीकडे यांच्याकडून अत्यंत काळजीपूर्वक लक्ष दिलें जात आहे. संस्थानाप्रमाणेंच बाहेरीलहि अनेक सार्वजनिक संस्थांना यांच्या औदार्याचा फायदा मिळत आलेला आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटी, भारत इतिहास-संशोधन मंडळ, पुणें सेवासदन सोसायटी, भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी वगैरे संस्थांच्या कारभारात श्रीमंतांचा विशेष निकटचा संबंध आलेला आहे.

यांनीं फलटण शुगर वर्क्स लि., नांवाचा साखरेचा कारखाना संस्थान हद्दींत निघण्यास व चालण्यास उत्तेजन देऊन संस्थानच्या औद्योगिक प्रगतीस विशेष चालना दिली. शेतकऱ्यांस उत्तम गूळ तयार करण्यास यांत्रिक चरक वगैरे रीतीनेंहि फार मदत केली आहे.

यांच्या कार्याचा व्याप त्यांच्या संस्थानपुरताच मर्यादित नाहीं. दक्षिणी संस्थान एजन्सीमध्यें अन्तर्भूत होणाऱ्या सर्व संस्थानांचा व तेथील राज्यकर्त्यांचा दर्जा वाढावा म्हणून यांनीं गेलीं १५ वर्षे अत्यंत झटून परिश्रम केले आहेत. स. १९३१-३२ सालीं भरलेल्या दुसऱ्या व तिसऱ्या गोलमेज परिषदेला यांनीं आपले दिवाण रा. ब. के. वि. गोडबोले, बी. ए., एल्एल्. बी., यांना पाठविलें. त्यांनीं दक्षिणेंतील दहा संस्थानांचे प्रतिनिधि म्हणून १९३३ सालीं जें कार्य केलें व जॉइंट पार्लमेंटरी सिलेक्ट कमिटीपुढें जी साक्ष दिली. त्यामुळें दक्षिणेंतील संस्थानांच्या दर्जाबाबत तिकडे विशेष जाणीव उत्पन्न झाली. या वेळीं म्हणजे १९३३ सालीं यांची स्वारीहि जातीनें याच कार्याला पाठिंबा देण्यासाठीं लंडनला गेली व त्याचा साहजिकच विशेष उपयोग झाला.

प्रजेस निःपक्षपातीपणानें न्याय मिळावा म्हणून कोल्हापूरसहित सर्व दक्षिणी संस्थानचें एक संयुक्त हायकोर्ट असावें या मताचा यांनीं फार परिणामकारक रीतीनें पुरस्कार केला आहे व ती गोष्ट आतां सिद्धीसहि गेली आहे. या प्रकारें विविध क्षेत्रांत अत्यंत भरीव कामगिरी केल्यामुळें यांना दक्षिणी संस्थानांत एक विशिष्ट व महत्त्वाचें असें स्थान प्राप्त झालें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

नीळकंठ, लेडी विद्यागौरी रमणभाई— (जन्म स. १८७६) गुजराथमधील सार्वजनिक कार्यकर्त्या, शिक्षणाच्या पुरस्कर्त्या व लेखिका.

यांचें जन्मस्थान अहमदाबाद. पिता गोपीलाल मणिलाल ध्रुव. यांचे आजोबा सरदार भोलानाथ साराभाई. यांचा विवाह स. १८८९ सालीं रमणभाई महिपतराम नीळकंठ यांच्याशीं झाला. लग्नानंतर या मॅट्रिक (१८९१) व बी. ए. (१९०१) झाल्या. गुजराथी समाजांतील या पहिल्या स्त्री पदवीधर होत. यांनीं अनेक शिक्षणविषयक संस्थांत शिक्षक वगैरे नात्यांनीं कामें केलीं. तसेंच या गुजराथी भाषेंत लिहीत असल्यानें बडोदा-गुजराथी साहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद यांना देण्यांत आलें. यांना साठाव्या वर्षी एक गौरवपर लेखसंग्रह अर्पण करण्यांत आला.

नून, ऑनरेबल मलिक सर फिरोझखान— (जन्म स. १८९३) पंजाब प्रांतांतील सुप्रसिद्ध लीग-पक्षीय पुढारी व कार्यकर्ते.

लाहोरचें चीफ्स कॉलेज व ऑक्सफर्डच्या वॅड्हॅम कॉलेजमध्यें शिक्षण घेतल्यानंतर हे बॅरिस्टर होऊन हिंदुस्थानांत परत आले. आल्यानंतर लाहोर हायकोर्टामध्यें यांनीं वकिली करण्यास सुरुवात केली. याच सुमारास हे पंजाब लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें निवडून

आले (१९२१). तेव्हांपासून आजतागायत त्या मंडळांत हे सतत निवडून येत असून लोकल सेल्फ गव्हर्नमेंट (१९२७), शिक्षण (१९३०) वगैरे खात्यांचे हे प्रधानहि होते.

यानंतर यांनीं इंग्लंडमधील हिंदुस्थानचे हायकमिशनर (१९३६-४१), व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळांतील मजूर व संरक्षण खात्याचे मंत्री (१९४१-४५), इंपिरीयल वॉर कॅबिनेट व पॅसिफिक वॉर कौन्सिलमधील हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधि, सॅनफ्रॅन्सिस्को येथें भरलेल्या सर्वराष्ट्रीय परिषदेचे हिंदी प्रतिनिधी (१९४५) अशीं अनेक जबाबदारीचीं कामें केलीं.

परंतु इतकें कार्य करूनहि, 'हिंदुस्थानला स्वराज्य देण्याची जरूर नाहीं, तें त्याला कधींच मिळालें आहे'; 'आम्हांला पाकिस्तान मिळालें नाहीं तर चेंगीझखानालाहि लाजविणारीं अत्त्याचारी कृत्यें आम्ही करूं'; 'रशियाच्या मदतीनेंहि पाकिस्तान मिळविल्याशिवाय आम्ही राहणार नाहीं' अशा यांच्या असंबद्ध वक्तव्यांनीं यांना खऱ्या जनमताची पकड घेणें कधींच जमलें नाहीं.

यांचे ग्रंथ—Canada and India, Wisdom from Fools, India Illustrated, Scented Dust इत्यादि.

नूलकर, रा. ब. कृष्णाजी लक्ष्मण—(जन्म स. १८३० मे–मृत्यु स. १८९३ मार्च २८) भुज येथील कच्छच्या रावांचे दिवाण व सार्वजनिक कार्यकर्ते.

जन्मस्थान हळधाळ. यांची मुंज झाल्यानंतर वडील सावंतवाडी येथें वारले. वडील वारले तेव्हां आई अस्पृश्य होती. तेव्हां तीन दिवस वडलांचें प्रेत ब्राह्मणांच्या पाहऱ्यांत रानांत ठेवलें. नंतर माता समारंभानें सती गेली. सतीबंदीचा कायदा १८२९ सालीं झाला, पण पुढें दहाबारा वर्षे संस्थानांत लागूं झाला नव्हता.

मराठी व इंग्रजी यांचा थोडा अभ्यास झाल्यावर हे पोलिटिकल एजंट जनरल ली ग्र्यांड जेकब यांचे खासगी कारकून म्हणून कच्छभुजेस गेले (१८५२). क्रमानें हेडक्लार्क, कॉन्फिडेन्शिअल क्लार्क, कराची, सेक्रेटरी-एटवरील सुपरिंटेंडेंट, मुंबई, काठेवाडांतील असिस्टंट पोलिटिकल एजन्ट, स्मॉलकाज जज्ज, मुंबई, भुज येथें कच्छच्या रावाचे दिवाण अशीं कामें करून हे पुण्यास येऊन राहिले (१८७६ जानें.).

पुण्याच्या सार्वजनिक सभेचे हे कार्याध्यक्ष होते (१८७८-८७), फॉरेस्ट कमिशन (१८८४-८५), पब्लिक सर्व्हिस कमिशन (१८८६-८७) व मुंबई सरकारनें यांना आपले कौन्सिलर (मंत्री) नेमिलें होतें.

नेहरु, पंडित मोतीलाल—(जन्म स. १८६१ मे ६–मृत्यु स. १९३१) हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध राज्यघटनाशास्त्रज्ञ, कायदेपंडित, राजकारणी मुत्सद्दी व वादविवादपटु.

यांचें काश्मीरी ब्राह्मणाचें घराणें अनेक पिढ्यांपूर्वी अलहाबादेस येऊन स्थायिक झालें आहे. हे तीन महिन्यांचे असतां यांचे वडील वारले व यांचें संगोपन यांच्या वडील भावानें केलें. तेहि वकील होते. यांनीं हायकोर्ट वकिलीची परीक्षा देऊन सुवर्णपदकहि मिळविलें. हे वकिली करूं लागल्यानंतर यांचा चहूंकडे बोलबाला झाला.

खूप पैसा मिळवावा, अत्यंत ऐषआरामांत राहावें आणि प्रसंगीं प्रागतिकांच्या राजकारणांत भाग घ्यावा असा यांचा तेव्हां कार्यक्रम असे. पण म. गांधींच्या राजकारणानें हे भारले गेले आणि चढाईच्या राजकारणांत दाखल झाले. पंजाब प्रकरणाबाबत चौकशी करण्याकरितां राष्ट्रसभेनें नेमलेल्या कमेटीवर काम केल्यानंतर यांची अमृतसर राष्ट्रसभेचे अध्यक्ष म्हणून निवडणूक झाली (१९१९).

नंतर पुढें तर हे असहकारितेच्या चळवळींतहि सामील झाले. यांच्या घरांत प्रथम दुमत असलें तरी पुढें मात्र सर्व कुटुंबच असहकारी बनलें. पुढें असहकारितेचा पहिला पूर ओसरतांच या कायदेपंडितानें स्वराज्यपक्ष काढून कायदेमंडळाकडे तोंड फिरविलें. आयरिश पुढारी पार्नेल यांनीं तिकडे अमलांत आणलेलें अन्तर्गत अडवणुकीचें धोरण यांनीं दिल्लींत अमलांत आणण्यास सुरुवात केली. तत्त्वतः म. गांधींशीं यांचा विरोध आला तरी यांच्या प्रभावामुळें राष्ट्रसभेनें यांच्या स्वराज्यपक्षाला स्वतःच्या तत्त्वांना मुरड घालूनहि भरपूर वाव दिला.

चित्तरंजन दास व हे या दोघांनीं निवडणुकी लढवून आपल्या पक्षाचे प्रतिनिधि मध्यप्रान्त व बंगालमध्यें बहुसंख्येनें निवडून आणले आणि तेथील कारभार गव्हर्नरला हातांत घेणें भाग पाडलें. दिल्लीच्या मध्यवर्ती

कायदेमंडळांत हे पक्षाचे पुढारी म्हणून निवडले जाऊन यांच्या बुद्धिमत्तेला व ज्ञानाला योग्य स्थान मिळालें, आणि तेथें यांनीं आपल्या वादविवादकौशल्यानें सरकारला अगदीं हादरून सोडलें. यांच्या आयुष्यांतील अत्यंत उत्कर्षाचा हाच काळ होय. 'यांनीं पायांनीं घातलेली गांठ सरकारला हातानेंहि उकलूं नये.' असें केसरीनें यांच्या त्या वेळच्या कामगिरीचें वर्णन केलें. बाहेर तळमळणारा मासा पुनः पाण्यांत यावा तसें यांचें झालें व सरकारला यांनीं हैराण करून सोडलें. यांनीं बिल नापास करावें व व्हॉइसरायनें तें जादा अधिकारांत पास करून घ्यावें, असा सतत क्रम सुरू झाला. परंतु पुढें यांच्या पक्षाच्या लोकांनीं सरकारी कमेट्यांवर जागा स्वीकारण्यास सुरुवात केली आणि यांच्या पक्षाची शक्ति कमी होत गेली.

साम्राज्यान्तर्गत स्वराज्याची यांची राष्ट्रसभेनें मान्य केलेली योजना 'नेहरु रिपोर्ट' या नांवानें प्रसिद्ध आहे. पण ती १९२९ ची मुदत घातल्यानें आणि मुसलमानांनीं अमान्य केल्यानें वायां गेली आणि पुनः असहकारितेशिवाय मार्ग न राहिल्यानें हे तुरुंगांत गेले. तेथें दमा वाढून यांची सुटका झाली. पण थुंकींतून रक्त यावयास लागल्यानें हे आपला कलकत्त्याकडे जाण्याचा बेत तहकूब करून अलाहाबादेस आले आणि तेथें हे कालवश झाले.

म. गांधी आणि हे अगदीं भिन्न प्रकृतीचे लोक होत. हे त्यांना एक थोर मनुष्य म्हणून मान देत, पण महात्मा म्हणून त्यांची टरच उडवीत. ते संन्यासी संस्कृति निर्माण करणारे, तर हे विलासी प्रकृतीचे. तथापि मूलतः भेद असूनहि परस्परांचा एकमेकांवर पूर्ण विश्वास आणि दृढ प्रेम होतें. त्यामुळें म. गांधींच्या त्यागाचा व व्यक्तिमत्त्वाचा गौरवहि हे आपल्या उमद्या स्वभावानुसार मोकळेपणानें करीत. दोघांच्याहि स्वभावांतील एकमेकाला पूरक असणारा भाग दोघांनीं ओळखला होता आणि त्याचा राष्ट्राला फायदा देण्याची संग्राहक वृत्तीहि दोघांत दिसे.

'यांच्यांत एक प्रकारचें व्यक्तिमत्त्व व राजबिंडेपणा होता. कोठेंहि जातांच हे तेथील भव्य व प्रमुख व्यक्ति बनत. सौम्यता व पडतें घेणें यांच्या स्वभावांतच नव्हतें. म्युझियममध्यें दिसून येणाऱ्या रोमन बादशहाच्या पुतळ्याप्रमाणें यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा बादशाही करारीपणा दिसे.'

जाहीर व्याख्यानांपेक्षां कायद्याच्या चौकटींत बसणाऱ्या वादविवादांत यांच्या वक्तृत्वाला विशेष तेज चढे. विनोद, वक्रोक्ति, कल्पना, विचार, स्वाभिमान व देशप्रेम या मालमसाल्याबरोबर यांच्या हजरजबाबीपणानें हे आपलें वक्तृत्व अत्यंत परिणामकारक करीत. बॅ. जिनासारख्यांशीं उत्तरप्रत्युत्तराची वेळ असल्यास असेंब्लीचें रणांगण बने आणि तेथील गंभीर वातावरण अधिकच गंभीर व उत्कंठित बने. पब्लिक सेफ्टी बिल व सायमनकमिशन बहिष्कार या वेळीं यांनीं केलेले वादविवाद अविस्मरणीय आहेत.

नेहरु, पंडित जवाहरलाल—(जन्म स. १८८९ नवं. १४) हिंदुस्थानचे जगप्रसिद्ध क्रान्तिवादी पुढारी, आन्तरराष्ट्रीय राजकारणाचे सूक्ष्म अभ्यासक व इंग्रजी लेखक.

यांचा जन्म अलाहाबाद येथें झाला. हे मोतीलाल नेहरूंचे एकुलते एक पुत्र. राजेमहाराजांना हेवा वाटावा अशा ऐश्वर्यांत यांचें बालपण गेलें. अभ्यासापेक्षां यांच्या प्रकृतीकडेच लक्ष अधिक देण्याची आवश्यकता होती. तथापि यांच्या अभ्यासाची कधींच आबाळ होऊं दिली जात नव्हती. यांना घरीं शिकविण्याकरितां ठेवलेल्या इंग्रज शिक्षकांत मि. एफ्. टी. ब्रुक्स हे प्रमुख होते. १९०५ सालीं इंग्लंडमधील हॅरो या प्रसिद्ध शाळेंत यांना घातलें. तेथील शिक्षणानंतर केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजमध्यें यांनीं प्रवेश केला. १९१२ सालीं हे इनर टेंपलच्या बॅरिस्टरीच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. आणि त्याच सालीं केंब्रिज विश्वविद्यालयाच्या सृष्टिशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र या विषयांत दुसऱ्या वर्गांतील पदवी यांनीं मिळविली. पुढें लवकरच त्याच विश्वविद्यालयाचे हे एम्.ए. झाले.

इंग्लंडहून परत आल्यानंतर १९१३–२० पर्यंत यांनीं अलहाबादच्या हायकोर्टांत वकिली केली. त्यानंतर असहकारितेच्या चळवळींत यांनीं वकिली सोडली, ती कायमचीच.

१९१२ च्या बांकीपूरच्या राष्ट्रसभेस हे हजर होते. १९१४ सालीं यांनीं ना. गोखले यांना ४० हजार रुपये निधि जमवून दिला. होमरूललीगच्या चळवळींतहि हे असत. १९१९ सालीं मोतीलाल नेहरूंनीं काढलेल्या 'इंडिपेन्डन्ट' दैनिकाचे हे एक डायरेक्टर व लेखक होते. अयोध्याप्रान्तांतील शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याबाबत केलेली यांची चळवळ महत्त्वाची आहे. त्यामुळें

टेनन्सी कायद्यांत शेतकऱ्यांना फायदेशीर अशा पुष्कळ सुधारणा झाल्या. १९२० सालीं अफगाणिस्तानचे वकील तहाकरितां इकडे आले, त्यांची गांठ न घेण्याची हमी सरकारनें यांच्याकडे मागितली. आणि ती नाकरतांच यांना मसुरी येथें स्थानबद्ध करण्यांत आलें.

पण असहकारितेच्या चळवळीपासून यांचें खरें राजकीय आयुष्य सुरू झालें (१९२०) आणि यांना अनेक वेळां शिक्षा झाल्या.

१९२३ सालीं यांना राष्ट्रसभेचें चिटणीस निवडण्यांत आलें आणि तेथील यांच्या तडफदार व सतत केलेल्या कार्यानें त्या संस्थेला एक विशेष प्रकारचें वळण प्राप्त झालें. राष्ट्रसभेला आज जें विशेष प्रकारचें सतत राजकीय काम करणारी संस्था म्हणून स्वरूप प्राप्त झालें आहे त्याचें पुष्कळसें श्रेय यांच्या कर्तबगारीला दिलें पाहिजे.

येथील अनेक कामगारांच्या संस्थांचें नेतृत्वहि यांनीं पत्करून काम केलें. पुढें हे युरोपांत गेले आणि संधि घेऊन हिंदी राजकारणाचा प्रश्न तेथील जनतेपुढें मांडण्याचा यांनीं प्रयत्न केला. या प्रवासांत यांनीं अनेक देश पाहिले व शेवटीं हे रशियांत गेले. तेथील नवीन समाजरचना व राज्यघटना पाहून यांना नवी दृष्टि प्राप्त झाली ती यांनीं आपल्या 'सोव्हिएट रशिया' ग्रा ग्रंथांत मांडली आहे. तिकडून परत आल्यावर यांना लाहोरच्या राष्ट्रसभेचें अध्यक्षस्थान देण्यांत आलें (१९२९). असहकारिता आणि कौन्सिलांतील स्वराज्यपक्षाचें कार्य या दोहींमुळें उत्पन्न झालेल्या निराशाजनक परिस्थितींत या अधिवेशनांत पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव करण्यांत आला, आणि हिंदुस्थानानें स्वराज्य हा शब्द सोडून पूर्ण स्वातंत्र्याकडे आपली दृष्टि निश्चित केली.

यांचा समाजसत्तावादाकडे स्पष्ट ओढा आहे. त्यावरील यांचीं व्याख्यानें ऐकून हे एक बोलघेवडे व निष्क्रिय पुढारी आहेत असा समज होतो. पण हा गैरसमज यांनीं लहानमोठीं कार्यें अंगावर घेऊन आणि तीं पार पाडून धुऊन टाकला आहे. कोणतेंहि हातीं घेतलेलें कार्य विशिष्ट दर्जानें चालविणें आणि पार पाडणें यांत यांचा हातखंडा आहे.

बोलावें आणि त्याचा परिणाम भोगण्यास तयार असावें हा यांचा बाणा उथळपणाचा वाटला तरी परिणामीं यांच्याबद्दल आदर वाढविणारा ठरतो. परराष्ट्रीय राजकारणी लोकांशीं संबंध ठेवणें आणि जागतिक राजकारणाच्या दृष्टीनें हिंदुस्थानाकडे पाहणें हे यांचे दोन विशेष गुण आहेत. लोकप्रियतेंत हे म. गांधींच्या खालोखाल असून संयुक्त प्रान्तांतील शेतकऱ्यांचे हे राजे आहेत असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाहीं. समतावाद हा यांच्या प्रतिपादनाचा आत्मा असून नवीन समाजरचनेशिवाय तरणोपाय नाहीं असा यांचा विश्वास आहे. मात्र हिंदुस्थानांतील समाजसत्ता युरोपांतील समाजसत्तेची केवळ नक्कल असणार नाहीं असें हे मानतात. यांनीं आपलें आत्मचरित्र १९३६ च्या एप्रिलमध्यें लंडन येथें प्रसिद्ध केलें, आणि चार महिन्यांत त्याच्या आठ आवृत्त्या खपल्या. प्रथम हें पुस्तक इंग्लंडांतच फस्त होई. नंतर तितकाच त्याचा खप हिंदुस्थानांत झाला. त्यानंतरहि त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. यांच्या या आत्मचरित्रांची जगांतील उत्कृष्ट पुस्तकांत गणना होते. जें असेल तें स्पष्ट व समजेल असें बोलावें हें या ग्रंथाच्या भाषेचें वैशिष्ट्य आहे. हिन्दी लोक हे केवळ अध्यात्मवादी किंवा गूढवादी नसून ते आपल्यासारखेच स्वातंत्र्यप्रिय व विचारवान् आहेत, हें या यांच्या ग्रंथांवरून जगांतील राजकारणी लोकांच्या लक्षांत आलें.

म. गांधींच्याशीं मिळतें घेऊन हे वागत असले तरी दोघांच्या स्वभावांत मूलतः फरक आहे. उपास, अहिंसा, तपस्वी वृत्ति इत्यादि गोष्टींवर श्रद्धा ठेवण्यासारखी यांची वृत्ति नाहीं. तथापि त्यांचें चळवळीला प्रभावी स्वरूप देण्याचें कौशल्य यांना नाकारतां येत नाहीं. हिंदुस्थानांतल्या गरीबांतल्या गरीबाशीं राहणीनें तादात्म्य पावणें म्हणजेच खरी लोकशाही हा गांधींचा सिद्धान्त मात्र यांना बरोबर वाटतो.

सध्यांच्या शिक्षणानें स्वतःच्या देशांत व परदेशांतहि मनुष्य कसा तिऱ्हाइत बनतो याचें हें नमुनेदार उदाहरण आहे.

म. गांधींचा हृदयपालट होण्यावर भर, तर यांचा सामुदायिक सत्तेवर भर आहे. म. गांधींचा तडजोडीवर भर, तर यांचा विरोधावर भर. अशा या परस्पर विरुद्ध स्वभावाच्या दोन पुढाऱ्यांवर सध्यां हिंदुस्थानचें राजकारण चालू आहे. यांनीं कितीहि भराऱ्या मारल्या, प्रसंगीं राजकारण तुटेतोंपर्यंत ताणलें तरी म. गांधींचे नेतृत्वावर विश्वास ठेवून जुळतें घेण्याच्या यांच्या वृत्तीनें आतांपर्यंत अनेक प्रसंग निभावून गेले आहेत. म. गांधींनीं यांना आपलें राजकीय वारस म्हणून उद्घोषित करतांच यांनीं त्यांच्या तशा भाषेचा निषेध केला आणि राजकारणांत कोणी कोणाचा वारस नसतो असें जाहीर केलें.

१९२९ लाहोर, १९३५ लखनौ व १९३६ फैजपूर अशा तीन ठिकाणीं झालेल्या व १९४६ च्या राष्ट्रसभेचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें. काँग्रेसनें नेमलेल्या 'नॅशनल प्लॅनिंग कमिटी'चे हे अध्यक्ष आहेत.

हिंदुस्थान हा देश जगाचा एक भाग असल्यानें जगांतील घडामोडीचा त्यावर परिणाम झाल्याशिवाय केव्हांहि राहणार नाहीं अशा दृष्टीनें हे हिंदुस्थानसंबंधीं विचार प्रदर्शित करतात. त्यामुळें वक्तृत्वाचा अभाव असूनहि यांचीं भाषणें महत्त्वाचीं व लोकप्रिय होतात. पण यांचें इंग्रजी वाङ्मय लोकप्रिय होण्याचें कारण यापेक्षां निराळें आहे. उत्कृष्ट इंग्रजी व सफाईदार मांडणीबरोबरच हिंदुस्थानांतील विचारांचे अन्तःप्रवाह समजून घेण्याचें उत्कृष्ट साधन म्हणून यांच्या लेखनाकडे पाश्चिमात्यांचें लक्ष असतें.

यांचे इंग्रजी ग्रंथ—(1) Soviet Russia, (2) Letters from a father to his Daughter, (3) Glimpses of World History, (4) Autobiography, (5) Unity of India, (6) Discovery of India, इत्यादि.

नेहरु, पंडित श्रीधर—(जन्म स. १८८८) शेतीकरितां विजेचा उपयोग सप्रयोग प्रतिपादणारे शास्त्रज्ञ व ग्रंथकार.

यांचें शिक्षण आग्रा, लंडन व पॅरिस इत्यादि विश्वविद्यालयांत झालें. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं यांनीं अलहाबादेच्या एम्. सी. कॉलेजांत फिजिक्सचे प्राध्यापक व प्रयोगशाळेचे डायरेक्टर म्हणून काम केलें. तेव्हांच यांनीं वैमानिक प्रश्नांचें संशोधन केलें आणि इंग्लंड व फ्रान्सला भेट दिली. शेतीचे उद्योगधंदे व शिक्षण खात्याचे चिटणीस म्हणून यांनीं संयुक्त प्रान्तांत काम केलें. 'इंपिरियल कौन्सिल ऑफ अग्रिकल्चरल रीसर्च'चे हे सभासद होते. १९३४ सालीं मुंबईस भरलेल्या 'इंडियन सायन्स काँग्रेस'च्या शेती खात्याचे हे अध्यक्ष होते. लंडनच्या 'रॉयल सोसायटी ऑफ आर्टस्'चे हे फेलो निवडले गेले.

यांनीं विजेच्या मदतीनें शेती करण्याच्या बाबतींत निरनिराळे प्रयोग केले. आणि त्या विषयावर पुस्तकेंहि लिहिलीं. विजेच्या साहाय्यानें फळें वाढविणें व पिकविणें, या गोष्टी यांनीं व्यावहारिक दृष्ट्या सिद्ध केल्या. प्रयोग करून जांभळाचें झाड व फळ हें विजेच्या साहाय्यानें कसें वाढतें हें यांनीं दाखवून दिलें. फळ लागण्यापूर्वी फूल गळूं लागतें तें थांबण्यास उपाय सुचविणारें एक पुस्तक यांनीं लिहिलेलें आहे. पिकांवर कीड पडते ती थांबविण्याकरितां विजेचा उपयोग कसा करावा हें यांनीं एका पुस्तकांत दाखवून दिलें आहे. जनावरें, फळें व पाणी यांवरहि विजेचा उपयोग यांनीं आपल्या ग्रंथांत प्रतिपादला आहे.

यांनीं आपल्या आयुष्यांत केवळ शास्त्रज्ञ म्हणूनच ख्याति मिळविली आहे असें नव्हे, तर कायदा, साहित्य, खेड्यांची सुधारणा, खेड्यांतील शिक्षण इत्यादि बाबींवरहि अधिकारवाणीनें यांनीं पुस्तकें लिहिलीं आहेत. यांनीं हिंदी भाषेंतहि 'सचा ग्रामसुधार' व इतर अनेक पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं आहेत.

प

पटवर्धन, भाई अच्युत सीताराम—(जन्म स. १९०५ फेब्रु. ५) काँग्रेस सोशालिस्ट पक्षाचे सुप्रसिद्ध पुढारी व धाडसी कार्यकर्ते.

यांचे वडील हरि केशव पटवर्धन हे नगर येथें सुप्रसिद्ध वकील होते. हे दत्तक दिल्यानें अच्युत हरीचे अच्युत सीताराम झाले. यांचे बंधु पुरुषोत्तम हरि उर्फ रावसाहेब पटवर्धन होत. या बंधूंना म. गांधींच्या कायदेभंगाच्या चळवळीनें राजकारणांत ओढलें. काँग्रेसच्या प्रत्येक चळवळींत यांनीं धडाडीनें भाग घेतला. हे अनेक वेळा तुरुंगांत गेले. काँग्रेसमधील सोशालिस्ट पक्षांत पुढें हे सामील झाले. त्या नात्यानें काँग्रेसच्या वर्किंग कमेटीतहि हे कांहीं काळ होते. ८ ऑगष्टच्या चले जाव चळवळींत हे गुप्त झाले. पुनः मुंबई इलाख्याचीं सूत्रें खेर मंत्रिमंडळाचे ताब्यांत आल्यावर त्यांनीं यांचेवरील वारंट रद्द केल्यावर ह्यांनीं मोठ्या थाटांत मुंबईत प्रवेश केला (६ एप्रिल १९४६).

हे व भाई एस्. एम्. जोशी, ना. ग. गोरे, यांच्या तेजस्वी कार्यानें काँग्रेस सोशॅलिस्टांची एक स्वतंत्र संघटना महाराष्ट्रांत स्थापन झाली आहे. आचार्य नरेंद्रदेव, जयप्रकाश नारायण, अरुणा असफअली यांच्या पावलावर पाऊल टाकून क्रांतिकारक लोकांची ही नवी पिढी काँग्रेसच्या झेंड्याखालीं खडी झाली आहे. यांच्या कार्यांतील प्रखरपणाच इतका जबर आहे कीं, कोणीहि त्यानें सहज दिपून जावा. आठ ऑगस्ट १९४२ च्या चळवळींत झालेला हिंसात्मक कार्यक्रम राष्ट्रसभेचा असल्याबद्दल कांहींनीं मतभेद व्यक्त केलेला असला तरी यांनीं तो सर्व कार्यक्रम राष्ट्रसभेचाच असल्याबद्दल सांगितलें आणि राष्ट्रसभा बलिष्ठ करण्याविषयीं आदेश दिला.

पटवर्धन, सर परशुरामपन्त उर्फ भाऊसाहेब—(जन्म स. १८८३–मृत्यु स. १९२४ फेब्रु. २५) जमखिंडीचे राजेसाहेब.

हे चिंचणी घराण्यांतील कृष्णराव गोविंदरावांचे पुत्र. १५ डिसें. १८९६ रोजीं यांना अप्पासाहेबांनीं दत्तक घेतलें. यांचें शिक्षण राजकोटच्या राजकुमार कॉलेजांत झालें. स.१९०३ जून ४ रोजीं यांना संस्थानची मुखत्यारी मिळाली. १९१४ च्या पहिल्या महायुद्धांत हे फ्रान्सच्या रणांगणावर गेले होते. त्या वेळीं कॅप्टनचा हुद्दा व ९ तोफांच्या सलामीचा मान यांना मिळाला. यांनीं आपल्या संस्थानांत अनेक सुधारणा घडवून आणल्या. यांना मर्दानी खेळाचा अतिशय नाद होता. हे एकदां हत्तीस शिकवीत असतां त्यानें यांना ठार मारलें. यांचे चिरंजीव शंकरराव यांनीं पुण्याच्या शिक्षण-प्रसारक-मंडळीस मोठी देणगी देऊन न्यू पुना कॉलेजास, 'सर परशुरामभाऊ कॉलेज' असें यांचें नांव देऊन यांचें स्मारक केलें.

पटवर्धन, पांडुरंग नरसिंह—(जन्म स.१८८६–मृत्यु स. १९२१) इतिहाससंशोधक व सार्वजनिक कार्यकर्ते.

हे जानशीकर पटवर्धन घराण्यांतील. नगरच्या हायस्कुलांतून मॅट्रिक झाल्यावर सरकारी नोकरींत शिरले. पण वरिष्ठाशीं खटका उडून यांनीं नोकरीचा राजीनामा दिला. हे मराठी वर्तमानपत्रांना बातमी धाडणें, इतिहाससंशोधनाची आवड असल्यानें गांवोगांव हिंडून तपशीलवार माहिती व कागदपत्र मिळविणें व इतर राष्ट्रीय कामें करीत. राष्ट्रहितैषी नांवाचें भारदस्त मासिक कांहीं महिने यांनीं चालविलें होतें. राष्ट्रकूटाचा पुण्याचा ताम्रपट, चिंचवडकर देव, चांबळीकर सरनाईक, वाघालीचे रामेश्वरभट वगैरे अनेक घराण्यांतील कागदपत्रें शोधून, टाचणें लिहून यांनीं नवी माहिती उजेडांत आणली. भारत-इतिहास-संशोधकमंडळाचे हे आस्थेवायिक व मेहनती सभासद होते.

पटवर्धन, डॉ. माधव त्रिंबक—(जन्म स.१८९४ जाने. २१–मृत्यु स. १९३९ नवं. २९) मराठी भाषेंतील सुप्रसिद्ध कवि, अभ्यासक, चिकित्सक व ग्रंथकार.

यांचा जन्म बडोदें येथें आजोळीं सहस्रबुद्धे यांच्या घरीं झाला. हे वडिलांच्या इच्छेवरून फारसी भाषा घेऊन बडोदे हायस्कूलमधून मॅट्रिक (१९०९), बी. ए. (१९१६) व मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजांतून एम्. ए. होऊन (१९१८) डेक्कन एज्युकेशन सोसायटींत फारसीचे प्राध्यापक झाले (१९१८-२५). तेथून राजीनामा देऊन निघाल्यावर १९२८ पासून हे कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत फारसी व इंग्रजी या भाषांचे अखेरपर्यंत प्राध्यापक होते.

'माधव जुलियन' या नांवानें हे आपल्या कविता प्रसिद्ध करीत. प्रथम यांनीं आपल्या कवितेंत फारसी शब्दांचा सढळपणें उपयोग केला आणि नांवाप्रमाणें गंगाजमनी कविता करून आपल्याकडे सर्वांचें लक्ष वेधून घेतलें. पुढें मात्र हे भाषाशुद्धीचे कट्टे पुरस्कर्ते बनले. अशींच सामाजिक बाबतींतहि यांचीं मतान्तरें झालीं. जी गोष्ट मनांत येईल ती खुल्या दिलानें व आग्रहानें प्रतिपादावी असा यांचा स्वभाव असे. लेखन, व्याख्यान व खासगी बैठक या सर्वच ठिकाणीं यांचा हा स्वभाव प्रकर्षानें प्रगट होई. विशेषतः खासगी बैठक रंगविणारा यांच्यासारखा मनुष्य विरळा!

फारसी-मराठी-कोश व छन्दोरचना हे यांचे अत्यंत महत्त्वाचे ग्रंथ होत. छन्दोरचना या ग्रंथामुळें यांना मुंबई युनिव्हर्सिटीनें 'डॉक्टर ऑफ लेटर्स' ही पदवी दिली (१९३९). या ग्रंथांत अगदीं नवी दृष्टि स्वीकारून यांनीं पद्यांच्या चालींचें पृथक्करण करून त्यांचे वर्ग पाडले आणि त्यांना नवीं नांवें दिलीं. तीं आतां मराठींत रूढ झालीं आहेत. यांच्या या ग्रंथानें मराठी साहित्यांत यांचें नांव अमर राहील. यांना जळगांव मराठी साहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद देऊन लोकांनीं यांचा गौरव केला (१९३६).

यांच्या मृत्यूनंतर यांचे मित्र, सुप्रसिद्ध मराठी लेखक व कवि विठ्ठल दत्तात्रय घाटे व रावसाहेब रघुवीर लूकस जोशी यांच्या प्रयत्नानें वीस हजारांच्यावर रुपये वर्गणी जमून 'डॉ. माधवराव पटवर्धन स्मृतिमंदिर' हें यांचें स्मारक पुण्यास उभारण्यांत आलें. यांच्या पत्नी लीलाबाई यांनी 'आमचीं अकरा वर्षें' हा यांच्या कौटुंबिक व वाङ्मयविषयक अन्तर्मुख चरित्राचा भाग प्रसिद्ध करून यांच्या मृत्यूनंतरहि यांच्या परिचयाची व्यवस्था करून ठेविली आहे.

यांचे ग्रंथ—काव्यें–१ शलाका (१९२५), २ विरहतरंग (१९२६), ३ प्रभा (१९२७), ४ सुधारक (१९२८), ५ उमरखय्यामकृत रुबाया (१९२९), ६ द्राक्षकन्या (रुबाया १९३१), ७ गज्जलांजली, ८ मधुलहरी (१९३३), ९ स्वप्नरंजन (१९३४), १० तुटलेले दुवे (१९३८), ११ नकुलालंकार (१९३९), छंदोविषयक–१२ छंदोरचना (१९२७), भाषाशुद्धिविवेक, १४ मुलांच्याकरितां पद्यप्रकाश (१९३८).

यांच्या मायबोली कवितेंतील कांहीं चरण—

'मराठी असे आमुची मायबोली,
जरी आज ती राजभाषा नसे।
नसो आज ऐश्वर्य या माउलीला,
यशाची पुढें थोर आशा असे॥

हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडूं,
वसे आमुच्या मात्र हृन्मन्दिरीं।
जगन्मान्यता हीस अपूं प्रतापें,
हिला बैसवूं वैभवाच्या शिरीं॥'

पटवर्धन, वासुदेव बळवन्त—(जन्म स.१८७०–मृत्यु १९२१) सुप्रसिद्ध कवि व प्राध्यापक.

यांचा जन्म सातारा जिल्ह्यांत झाला. कलकत्ता विश्वविद्यालयांतून बी. ए. झाल्यानंतर प्रथम पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक (१८९३), पुढें दोन वर्षांनीं हे डे. ए. सोसायटीचे आजीव सभासद झाले. त्यानंतर यांची फर्ग्युसन कॉलेजांत इंग्रजीच्या प्राध्यापकाचे जागेवर नेमणूक झाली. शेक्सपीअर, वर्डस्वर्थ, ब्राउनिंग वगैरे कवींचीं काव्यें शिकविण्यांत हे निष्णात असत. जुन्या मराठी कवितांचा यांचा व्यासंगहि दांडगा होता. हे बुद्धिवादाचे कट्टे पुरस्कर्ते असून आगरकरांचे अनुयायी होते. आगरकरांच्या पश्चात् यांनीं कांहीं वर्षें 'सुधारक' पत्र चालविलें.

यांच्या कविता 'वसंत' या नांवानें प्रसिद्ध झालेल्या आहेत. 'केशवसुतां'चा व यांचा अत्यंत लोभ होता. यांचें 'काव्य व काव्योदय' हें काव्यचर्चात्मक पुस्तक बरेंच प्रसिद्ध आहे. वाङ्मयाभ्यासांत व तत्त्वचिन्तनांत यांनीं आपलें बहुतेक आयुष्य वेंचलें. वाङ्मयचर्चेची यांनीं दाखवून दिलेली नवीन पद्धति हीच त्यांची वाङ्मयविषयक भरीव कामगिरी होय. इंग्रजी वाङ्मयाचा यांनीं सतत ३०-३५ वर्षें अभ्यास केला होता. मराठी संतकवींत तुकाराम व नामदेव हे यांच्या आवडीचे कवि होत. डॉ. भांडारकरांच्या अध्यक्षतेखालीं जें 'तुकाराम मंडळ' स्थापन झालें होतें त्यातर्फे तुकारामाच्या प्रत्येक अभंगावर चर्चात्मक टीका होत असे व अवघड मुद्यांचा उलगडा होत असे. ह्या मंडळांत अभंगासंबंधींचीं सर्व टिपणें हे करीत असत. मनास वाटेल, पटेल तेंच तंतोतंत शब्दचित्रांत तेजस्वी भाषेंत प्रकट करावयाचें हा यांच्या भाषेचा विशेष होता. हृदयांतून उगम पावून व वाचकांच्या हृदयांत एकदम प्रवेश करून तेथेंच विलीन होणारी अशी हृदयस्पर्शी भाषा यांची असे.

यांचें वाङ्मय—१ राजनीतीचीं मूलतत्त्वें, भाग १ (१८९६), २ शिक्षण, शिक्षक व हल्लींचा अभ्यासक्रम (१९०६), ३ काव्य आणि काव्योदय (१९२१), ४ ना. गो. कृ. गोखले यांचें चरित्र (१९२५), ५ तुकारामाच्या अभंगाची चर्चा, खंड १-२ (१९२७). ६ Lectures on the Maratha Poets.

पटवर्धन, विनायक नारायण—(जन्म स. १८९८) महाराष्ट्रांतील गायनाला प्रतिष्ठित स्वरूप देणारे सुप्रसिद्ध गवई.

यांचें घराणें मिरजेचें. यांनीं लाहोरास पं. वि. दि. पलुस्कर यांचेपाशीं सात वर्षें गायनकलेचें शिक्षण घेतलें. मुंबई, लाहोर, नागपूर वगैरे ठिकाणीं गांधर्वमहाविद्यालयांत प्राध्यापकाचें काम केल्यावर हे गंधर्व मंडळींत नट म्हणून समाविष्ट झाले (१३ ऑगस्ट १९२२) पण पं. वि. दि. पलुस्कर यांच्या अखेरच्या इच्छेला अनुसरून यांनीं तो व्यवसाय सोडला आणि गायनशास्त्राच्या सेवेला आपणांस वाहून घेऊन (१९३२). पुणें येथें गांधर्वमहाविद्यालय स्थापिलें. तेथें संगीतविशारद, अलंकार व प्रवीण या परीक्षांचा अभ्यासक्रम आंखला असून तेथें शेंकडों विद्यार्थी शिकत आहेत. यांनीं संगीतविषयक बालसंगीत (३ भाग) व रागविज्ञान

(५ भाग) इत्यादि पुस्तकें लिहिलीं असून तीं अनेक ठिकाणीं अभ्यासक्रमांत दाखल झालीं आहेत. हे संगीताच्या मराठीकरणाचे पुरस्कर्ते आहेत. गोड व खणखणीत आवाज, स्पष्ट शब्दोच्चार, दाणेदार तान, सारेगम इत्यादि यांचे विशेष आहेत. तराणा म्हणण्याबद्दल यांची प्रसिद्धि आहे. प्रमुख शहरीं भरलेल्या संगीत परिषदांत यांनीं आपल्या गायनकलेच्या जोरावर चांगली कीर्ति संपादन केली.

अलिकडे गांधर्व महाविद्यालयाची सर्व व्यवस्था यांनीं भारतीय संगीत प्रसारक मंडळीच्या ताब्यांत दिली असून हे तिचे विश्वस्त बनले आहेत.

पटवर्धन, ब्रह्मर्षि-विनायक रामचंद्र तथा अण्णासाहेब—(जन्म स. १८४७ मे ४–मृत्यु स. १९१७ फेब्रु. २) पुण्यांतील राजकारणी वृत्तीचे सुप्रसिद्ध साधु पुरुष.

यांचें घराणें मूळचें कोंकणांतील आरमाराधिपति धुळप यांचे आश्रित. यांचे वडील प्रथम पुण्यास आले. ते कांहीं दिवस मुंबईस वकिली करीत. पुण्यास गुंडाच्या गणपतीच्या कृपेनें वैशाख वद्य चतुर्थीस यांचा जन्म झाला म्हणून यांचें नांव विनायक असें ठेवण्यांत आलें.

हे मॅट्रिक (१८६४) व बी. ए. झाल्यावर पुढील शिक्षणाकरितां मुंबईस गेले. तेथें हे मेडिकल कॉलेज व लॉ क्लास या दोन्ही ठिकाणीं जात व अभ्यास करीत. शिवाय एल्. सी. ई.च्या टर्महि हे भरीत. हे एल्एल्. बी. झाले, पण एकाच वेळीं एक मनुष्य दोन परीक्षांस बसणें योग्य नाहीं अशा अर्थाच्या सिंडिकेटच्या ठरावामुळें यांना डॉक्टरीची एल्. एम्. अँड एस्. ही पदवी मिळाली नाहीं. आयुर्वेदाचें यांचें ज्ञान उत्तम असे; पण वैद्यकावर मिळालेला पैसा निषिद्ध अशी यांच्या वडिलांची समजूत असल्यानें हे त्याकरितां मिळालेलें फळसुद्धां घेत नसत.

या मुंबईतल्या बारा वर्षांच्या मुक्कामांत यांनीं कांचकारखाना वगैरे अनेक औद्योगिक कामांत लक्ष घातलें. मल्हारराव गायकवाडांच्या प्रकरणांत हे विशेष लक्ष घालीत. खुद्द चौकशीच्या वेळीं हे इंदुप्रकाशचे बातमीदार म्हणून बडोद्यास हजर होते. ' किरण ' व ' डेक्कन स्टार ' हीं मराठी व इंग्रजी पत्रें महादेवराव नामजोशांना काढावयास लावण्यांत यांचा हात प्रमुख होता. पुढें, त्यांना अनेक उद्योगांत तीं पत्रें चालविणें निभेना. तेव्हां त्यांचें रूपान्तर केसरी व मराठा पत्रांत यांनीं केलें.

पण औद्योगिक व राजकीय उलाढाली मोठ्या प्रमाणांत करण्यास यांना सुस्थिर आर्थिक साहाय्याची आवश्यकता वाटूं लागली. त्याकरितां निजामच्या ताब्यांतून गेलेला वऱ्हाड हा प्रान्त फ्रेंच बँकेंतून मोठी रक्कम काढून हैदराबादचे दिवाण सर सालरजंग यांच्या सहकार्यानें विकत घेण्याचें यांनीं ठरविलें. प्रथम दोन कोट रुपये काढले, पण पुढील व्यवहार होण्याच्या पूर्वी सर सालरजंग दिवंगत झाले आणि यांना त्या रकमेचें व्याज भरावें लागून हे गोत्यांत आले. तेव्हांपासून यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली आणि आळंदीच्या नरसिंहसरस्वती स्वामींचे शिष्य होऊन हे प्रायः उदासीन स्थितींत आयुष्य कंठूं लागले.

हे नगरपालिकेंत निवडून येत, सार्वजनिक कामांत भाग घेत, कायदेशीर सल्लामसलत व फिर्यादी लिहून देत व मोफत औषधोपचारहि करीत. पण यांपैकीं कोणत्याहि कामांत यांचें लक्ष दिसत नसे. कोठल्याहि सभेला यांना वेळेवर हजर राहणें जमत नसे. लो. टिळकांच्या शब्दाकरितां हे सार्वजनिक कार्यांत दिसत. यांच्यावर विशेष प्रकारची श्रद्धा असल्यानें, यांच्या निरपेक्ष वृत्तीमुळें आणि हे कोणालाहि तोडून टाकीत नसल्यानें कायदा व वैद्यकसंबंधीं कामें यांच्या मागें लागत. कोणतेंहि काम मनापासून करण्याचा यांचा स्वभाव असे. मग त्याकरितां किती वेळ खर्ची पडतो इकडे यांचें लक्ष नसे. त्यामुळें यांचा दैनंदिन कार्यक्रम तिन्हाइताला दीर्घसूत्रीपणाचा वाटे. हे पक्के धार्मिक, आदर्श आचारशील आणि राजकीय दृष्ट्या स्वातंत्र्यवादी होते.

मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजच्या मासिकाचे व नंतर वैद्यसुधा मासिकाचे हे संपादक होते.

सुप्रसिद्ध गणिती व श्रुतिबोधांत ऋग्वेदाचें मराठी भाषान्तर करणारे रामचंद्र विनायक पटवर्धन बी. ए. एल्एल्. बी. हे यांचे चिरंजीव होत.

पटेल, सरदार-वल्लभभाई जव्हेरभाई—(जन्म स. १८७५ ऑक्टो. ३१) सुप्रसिद्ध राजकारणी मुत्सद्दी, राष्ट्रसभेंतील कार्यकर्ते आणि बार्डोलीचे सरदार.

यांचें जन्मस्थान करमसद (जि. खेडा). जात पाटीदार क्षत्रिय. यांचें शिक्षण नडियाद व बडोदा येथें होऊन हे मॅट्रिक झाले. नंतर मुखत्यार वकिलीची परीक्षा देऊन हे

गुजराथेंतील गोध्रा या जिल्ह्याच्या ठिकाणीं वकिली करूं लागले. विलायतेस जाऊन बॅरिस्टर होण्याची यांची महत्त्वाकांक्षा होती. परंतु नांवाचीं V. J. P. हीं इंग्रजी आद्याक्षरें एक असल्यानें यांच्या पासपोर्टवर प्रथम यांचे वडील बंधु विठ्ठलभाई व नंतर हे इंग्लंडला जाऊन बॅरिस्टर झाले. त्या परीक्षेंत यांनीं आपल्या हुषारीनें ५० पौंडांची शिष्यवृत्ति, चार टर्म्सची माफी आणि न्याय खात्यांत मोठी जागा मिळविण्याची शिफारस मिळविली. परत आल्यावर अहमदाबादेस आपली बॅरिस्टरी सुरू करून हे राजकारणांत लो. टिळकांच्या जहालपक्षांत सामील झाले.

१९१९ च्या अहमदाबादच्या लष्करी कायद्यांत सांपडलेल्या आरोपींचा बचाव करण्याच्या यांच्या कामगिरीमुळें हे प्रसिद्ध झाले. म. गांधी व हे यांची गुजराथ क्लबांत प्रथम भेट झाली आणि हे म. गांधींचे अनुयायी बनले. यांनीं वकिली सोडली आणि हे असहकारितेच्या चळवळींत सामील झाले.

असहकारितेचा प्रचार करीत असतां यांनीं गुजराथ विद्यापीठाकरितां दहा लाख रुपये मिळविले. जनता व धनिक यांच्यावर असणारी यांची छाप म. गांधींच्या तेव्हांच ध्यानांत आली आणि हे त्यांचे उजवे हात बनले. कायदेभंगाच्या ठरावाकरितां भरलेल्या अहमदाबाद राष्ट्रसभेचे हे स्वागताध्यक्ष होते (१९२१). तेथें झालेल्या कायदेभंगाच्या ठरावानुसार यांच्यावर विसंबून म. गांधींनीं बार्डोलीची करबंदीची चळवळ पुकारली, पण अत्याचारामुळें त्यांना ती तहकूब करावी लागली. पण तयार केलेल्या संघटनेचा उपयोग यांनीं दरवडेखोर बाबरदेवाच्या विरुद्ध सरकारनें केलेल्या दडपशाहीबाबत व १९२३ च्या नागपूर झेंडासत्याग्रहाबाबत करून यश मिळविलें.

यानंतरच्या राजकारणांत यांचे बंधु विठ्ठलभाई स्वराज्यपक्षांत गेले आणि हे गांधीपक्षांत राहिले. पुढें हे अहमदाबाद नगरपालिकेचे अध्यक्ष झाले आणि तेथें यांनीं शहर सुधारणा व व्यवस्था यांबाबत आपलें कर्तृत्व व्यक्त केलें. १९२७ च्या जुलैच्या शेवटल्या आठवड्यांत जलप्रलयांत चार हजार खेड्यांतील लाखों लोक निराश्रित झाले. तेव्हां हे गुजराथ प्रान्तिक कमेटीचेहि अध्यक्ष होते. एका रात्रींत यांनीं दोन हजार स्वयंसेवकांचें पथक उभारलें, संकटग्रस्तांना मदत करण्यास सुरवात केली व सरकारी अधिकाऱ्यांचीसुद्धां जलमय प्रदेशांतून सुटका केली. लोकांकडून तीस लक्ष रुपये व सरकारकडून दीड कोट रुपये मिळवून संकटग्रस्तांकरितां सर्व प्रकारच्या सोयींचा यांनीं लयलूट करून सोडली. स्वतःचे प्राण धोक्यांत घालून स्वतःकरितां प्राण देतील इतका यांनीं त्यांचा विश्वास संपादन केला. त्याची कसोटी १९२८ सालीं बार्डोलीस झालेल्या सारावाढीच्या लढ्याच्या वेळीं लागली.

बार्डोलीच्या तालुका रयतसभेनें सारा न देण्याचा प्रस्ताव करून यांच्याकडे त्या लढ्याचें नेतृत्व दिलें. यांनीं सारा न देण्याचा शेतकऱ्यांना सल्ला दिला आणि येईल त्या संकटांना तोंड देण्यास शेतकरी सज्ज झाले. सरकारनें हातीं असलेले सर्व उपाय योजण्याची कौन्सिलांत धमकी दिली. शेतकऱ्यांचीं गुरेंढोरें व जमिनी जप्त होऊं लागल्या. हे मोजक्या व खोचक शब्दांनीं शेतकऱ्यांचा निश्चय अढळ ठेवण्याचा प्रयत्न करीत. 'जमीन तो चालीने तमारे घेर आवशे' (जमिनी चालत तुमच्या घरीं परत येतील) असें हे छातीठोकपणें त्यांना आश्वासन देत हिंडत. सहा महिने झाले तरी चळवळ थांबेना, राज्ययंत्र मात्र बंद पडूं लागलें. तेव्हां वाढलेल्या साऱ्याची रक्कम अनामत ठेवल्यास चौकशीचें आश्वासन सरकारनें दिलें. कै. रा. म. भट यांनीं ती रक्कम दिली. ज. ब्रूमफील्ड व मॅक्सवेल यांच्या कमेटीनें ६% पेक्षां जास्त करवाढ करूं नये असें सुचविलें आणि बहुतेक मागणी मान्य झाल्यानें नरिमन यांच्या हस्तें यांना 'सरदार' ही पदवी बहाल करण्यांत आली. त्या वेळीं लिलांव केलेल्या जमिनी १९३७ सालीं राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळानें शेतकऱ्यांना परत देवविल्या. या वेळीं सरकारला तोंड देतांना वैध व अवैध अशा दोन्ही भागांत काम करण्याचें यांचें सव्यसाचित्व चांगलें प्रगट झालें.

१९३० सालीं कायदेभंगांत यांना रास गांवीं पकडण्यांत आलें, तेव्हां पाऊण लाख लोकांनीं साबरमतीच्या वाळवंटांत जमून यांच्या बरोबरीनें कायदेभंगांत भाग घेण्याची शपथ घेतली. यानंतर १९३१ च्या कराची राष्ट्रसभेचे हे अध्यक्ष झाले.

राष्ट्रसभेनें कायदेमंडळांत शिरून मंत्रिमंडळें राबविण्याचें ठरविलें तेव्हां त्या कामाकरितां यांना काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाचे अध्यक्ष निवडण्यांत आलें. यांनीं आपल्या कर्तृत्वाची चुणूक दाखवून हिंदुस्थानाच्या अकरा प्रांतांपैकीं सात प्रान्तांत बहुमत मिळवून मंत्रिमंडळें

स्थापन केली, शत्रूंनींसुद्धां वाहवा करावी असा राज्यकारभार हांकला आणि राष्ट्रसभेचा बोज वाढविला. दुसऱ्या महायुद्धानंतर झालेल्या निवडणुकींतहि मागील काम ओघानेंच यांच्याकडे आलें. यांनींहि पण सर्व प्रतिपक्षांवर मात करून मध्यवर्ति कायदेमंडळांत निर्विवाद बहुमत मिळविले आणि प्रान्तिक कायदेमंडळेंहि काबीज करून आठ प्रान्तांत राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें स्थापिलीं.

स्वतःच्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी घडवून आणणारी पाताळयंत्री बुद्धि, कठोर शिस्त आणि परिस्थितीचें विलक्षण आकलन हे राजकारणी माणसाला आवश्यक असणारे गुण यांच्यांत भरपूर आहेत. व्यक्तिगत स्वार्थाचा आरोप यांच्यावर कोणींहि करीत नाहीं. भावना किंवा अहिंसा वगैरेंच्या आहारीं न जातां बुद्धिवादी, राजकारणी मुत्सद्दी म्हणून राष्ट्रसभेंत यांचें स्थान अद्वितीय आहे. यांना म. गांधीचे अनुयायी म्हणून लोक ओळखत असले तरी सर्वच बाबतींत हे लो. टिळकांचे वारस शोभतात, जिना वगैरे राष्ट्रसभाविरोधकांच्या राजकारणांना जबरदस्त टक्कर देण्याचें श्रेय यांनाच द्यावें लागेल.

पटेल, विठ्ठलभाई जव्हेरभाई—(जन्म स. १८७१–मृत्यु स. १९३३) गुजराथमधील सुप्रसिद्ध राष्ट्रसभा-कार्यकर्ते व वादविवादपटु मुत्सद्दी.

वल्लभभाई पटेल यांचे हे थोरले बंधु. गुजराथमधील खेडा जिल्ह्यांतील करमसद हें गांव यांचें जन्मस्थान. करमसद व नाडियाद येथें आपलें शालेय शिक्षण संपविल्यानंतर हे इंग्लंडहून बॅरिस्टर होऊन आले व यांनीं वकिली करण्यास सुरवात केली. परंतु यानंतर थोड्याच दिवसांनीं यांची पत्नी वारली व यांनीं मनाच्या ह्या उदास स्थितींतच सार्वजनिक कार्यांत भाग घेण्यास सुरवात केली.

मुंबई कार्पोरेशन, मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व काँग्रेस अशा अनेक ठिकाणीं जरी यांनीं कामें केलीं तरी स्पीकर म्हणूनच हे सर्वत्र प्रसिद्ध असत. या दृष्टीनें २४ ऑगस्ट १९२५ हा दिवस यांच्या आयुष्यांत क्रांतिकारक ठरला. या दिवशीं यांना पहिल्यांदा मध्यवर्ति कायदेमंडळाचे पहिले लोकनियुक्त स्पीकर-अध्यक्ष निवडण्यांत आलें व सरोजिनी नायडूंच्या पातळाचा मुद्दाम तयार केलेला काळा झगा परिधान करून हे ह्या खुर्चीवर बसले. यांच्या स्वभावांतहि येथून क्रांति सुरू झाली. 'अति बडबड्या माणूस' अशी पदवी मॉंटेग्यूंच्या हस्तें मिळवणारे हे गृहस्थ एकदम मुके बनून असेंब्लीचें काम पाहूं लागले.

आपल्या निःपक्ष व स्वतंत्र विचारसरणीनें जुन्या स्पीकर या शब्दांत यांनीं एक नवा धाक उत्पन्न केला. असेंब्लीची इभ्रत व देशाचें वैभव यांपुढें साऱ्या जगाचें राज्य तृणवत् मानणाऱ्या अध्यक्षाचा यांनीं ठेवलेला आदर्श खरोखरच स्पृहणीय आहे.

स्वराज्य पक्षानें पं. मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालीं असेंब्लींतून केलेल्या 'वॉक आऊटच्या' वेळीं यांची विशेष शक्ति प्रथम लोकांचे निदर्शनास आली. 'असेंब्लींतील बहुमतवाला पक्ष गैरहजर असल्यानें सभेचें प्रातिनिधिक स्वरूप आतां नष्ट झालें आहे, तेव्हां कोणताहि विवादात्मक कायदा सरकारनें सभेपुढें ठेवूं नये, तसें झाल्यास माझ्या जादा अधिकारांत ही सभा मला बरखास्त करावी लागेल,' अशी सूचना यांनी ताबडतोब सभेला दिली. अशाच कौशल्यानें यांनी आपले हे शब्द दुसऱ्या दिवशीं परत घेतले. या यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठीं यांना पुढच्या वर्षी मध्यवर्ति कायदेमंडळाचे पुनः बिनविरोध अध्यक्ष निवडण्यांत आलें.

'पब्लिक सेफ्टि बिला'चे वेळीं यांनीं सरकारला मार्गदर्शन करण्याचा जो प्रयत्न केला, तोहि असाच अभिनंदनीय होता. मीरत केसमुळें तापलेल्या वातावरणांत या बिलाची चर्चा असेंब्लींत शांतपणें पार पाडणें अशक्य आहे, तेव्हां 'एकतर हें बिल पुढें ढकला किंवा मीरत केस रद्द करा,' असा सल्ला यांनीं सरकारला दिला. सरकारनें यांच्या या सूचनेची हेटाळणी करतांच यांनीं तें बिल मांडलें व यांच्या व्यक्तिगत विरुद्ध मतानें तें बिल फेटाळलें गेलें.

१९३० सालीं काँग्रेसनें असेंब्लीवर बहिष्कार टाकावयाचें ठरवितांच यांनींहि सरकारच्या 'होयबांच्या' सभेचें स्वरूप आलेल्या असेंब्लीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. 'स्वातंत्र्याच्या या लढ्यांत माझें योग्य स्थान असेंब्लीच्या खुर्चींत नाहीं, लोकांच्या खांद्याला खांदा लावून लढण्यांत आहे,' असें आपल्या या कृतीचें समर्थन यांनीं केलें.

१९३० सालीं पटेल कमेटीच्या रिपोर्टाचा विचार करण्यासाठीं दिल्ली येथें वर्किंग कमेटीची बैठक भरली असतांच काँग्रेस नियमबाह्य ठरविण्यांत आली व यांच्यासकट वर्किंग कमेटीच्या सर्व सभासदांना अटक करण्यांत आली. यांना सहा महिने सश्रम कारावासाची शिक्षा

ठोठाविण्यांत आली. परंतु प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें यांना मध्येंच सोडण्यांत आलें.

परंतु यानंतर अमेरिकेंतील दौऱ्यांत यांनीं केलेल्या अतिपरिश्रमांचा परिणाम यांच्या आधींच खंगलेल्या प्रकृतीवर झाला व जिनेव्हामधील एका रुग्णालयांत यांचा अंत झाला. मृत्यूपूर्वीच कांहीं दिवस यांनीं असहकाराच्या त्या वेळच्या दुबळ्या कार्यपद्धतीनें गांधींना आलेल्या अपयशाकडे बोट दाखवून असहकाराला जरा जास्त लढाऊ स्वरूप देण्याची विनंति केली होती.

साध्या शेतकऱ्यापासून असेंब्लीच्या अध्यक्षपदापर्यंत यांनीं चढलेल्या यशाच्या पायऱ्या यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाच्या द्योतक आहेत. आवाजाच्या नुसत्या हुंकारानें असेंब्लींत माजलेलीं वादळें शांत करण्याबद्दल यांची ख्याति असे.

नियमांच्या सूक्ष्म ज्ञानानें सरकारला पेंचांत आणण्याच्या बाबतींत यांचें कौशल्य अनेकवार व्यक्त झालें. कायद्याला धरून सरकारला पेंचांत आणण्याची यांची कला लो. टिळकांच्या परंपरेंतील होती.

असेंब्लींतील पगारापैकीं द. म. १६५६ रु. म. गांधीना देऊन दोन हजार रुपये स्वतःच्या खर्चासाठीं ठेवण्याचा यांचा क्रम असे. या ट्रस्टच्या सांठलेल्या चाळीस हजार रुपयांच्या साहाय्यानें रास (गुजराथ) येथें मुलींच्या शाळेचें उद्घाटन करण्याचा समारंभ म. गांधींच्या हस्तें साजरा करण्यांत आला (१९३५, मे ३१).

पट्टणी, सर प्रभाशंकर दलपतराम—(जन्म स. १८६२–मृत्यु स. १९३५) सुप्रसिद्ध राजकारणी, मुत्सद्दी व सार्वजनिक कार्यकर्ते.

यांचें शिक्षण मोरवी, राजकोट, मुंबई वगैरे ठिकाणीं झालें. हे मुंबई सरकारच्या कार्यकारी मंडळाचे सभासद (१९१२-१५), कायदेमंडळाचे सभासद (१९१६), इम्पिरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद (१९१७), इंडिया कौन्सिलचे सभासद (१९१७-१९१९), नंतर भावनगर संस्थानच्या कारभारी मंडळाचे अध्यक्ष झाले (१९२०). गोलमेजपरिषदेचे हे सभासद होते.

पट्टाभिसीतारामय्या, डॉ. बी.—(जन्म स. १८८० सुमार) आंध्र प्रांतांतील सुप्रसिद्ध राष्ट्रसभा कार्यकर्ते व गांधीवादाचे प्रामाणिक भाष्यकार.

बी. ए. झाल्यावर यांनीं एम्. बी. सी. एम्. होऊन मच्छलीपट्टण येथें डॉक्टरी करण्यास सुरुवात केली (१९०६). १९२० च्या असहकाराच्या चळवळींत यांनीं ती सोडून दिली व यांनीं 'जन्मभूमि' हे इंग्रजी साप्ताहिक सुरू केलें. १९३० सालच्या कायदेभंगाच्या मोहिमेंत यांना साडेतीन वर्षांची शिक्षा होईपर्यंत यांनीं तें अव्याहतपणें चालविलें होतें.

१९२१ ची असहकाराची चळवळ सुरू होतांच यांनीं तींत मनापासून भाग घेतला. या वेळचें यांचें कार्य इतकें प्रभावी ठरलें कीं, पुढें १९३०-३२ च्या कायदेभंगाच्या आंध्र प्रांतांतील चळवळीचीं सूत्रें आपोआपच यांचेकडे आलीं. याच सुमारास यांना प्रथम ए. आय. सी. सी.चे व नंतर वर्किंग कमेटीचें सभासद निवडण्यांत आलें. १९४२ च्या चळवळींतहि वर्किंग कमेटीच्या इतर सभासदांबरोबरच यांना अटक व नंतर यांची सुटका झाली.

यानंतर कांहीं दिवस आंध्र प्रांताच्या को-ऑपरेटिव्ह चळवळींत कार्य केल्यावर यांनीं आपल्या आवडत्या विमाव्यवसायांत भाग घेण्यास सुरवात केली. कलकत्त्याच्या युनिक इन्शुअरन्स कंपनींत कांहीं दिवस लोकल डायरेक्टरचें काम केल्यानंतर यांनीं आंध्र इन्शुअरन्स कंपनीची स्थापना केली (१९२५ ऑगस्ट). प्रथम डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन म्हणून कांहीं दिवस काम केल्यानंतर यांना या कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर नेमण्यांत येऊन तिचीं सर्व सूत्रें यांच्याकडे सोंपविण्यांत आलीं (१९३३). याशिवाय आंध्र बँक, भारत लक्ष्मी इन्शुअरन्स कं., हिंदुस्थान म्युच्युअल इन्शुअरन्स कं. इत्यादि विमासंस्थाची यांनीं स्थापना केली.

काँग्रेसच्या सुवर्ण महोत्सवाचे वेळीं यांनीं काँग्रेसच्या पन्नास वर्षांतील कार्याचा आढावा घेणारा Indian National Congress हा ग्रंथ लिहिला. इतिहासलेखकाला आवश्यक असणारी समतोल विचारसरणी व बिनचूक माहिती यांमुळें यांचा हा ग्रंथ अति महत्त्वाचा झाला आहे. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भाषांत याचा अनुवाद झाला असून हा ग्रंथ मराठींत आणण्याचें काम महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध समाजवादी कार्यकर्ते भाई नारायण गणेश गोरे यांनीं केलें.

गांधीवादावरील यांची श्रद्धाहि तितकीच अनन्य असून म. गांधींचा पूर्ण विश्वास संपादन करण्याचें भाग्य यांना लाभलें. १९३८ च्या काँग्रेसच्या अध्यक्षाचे

निवडणुकींत तर श्री. सुभाषचंद्र बोसांचे विरुद्ध यांना गांधीजींनीं पाठिंबा दिला.

यांचे ग्रंथ—(1) On Khaddar, (2) Indian National Congress, (3) Sixty Years of Congress, (4) Feathers and Stones, (5) National Education, (6) Indian Nationalism, (7) Redistribution of Indian Provinces on a Language Basis, (8) Gandhi and Gandhism (दोन खंड).

पतियाळाचे महाराज, भूपेन्द्रसिंह—(जन्म स. १८९१–मृत्यु स. १९३८) सुप्रसिद्ध क्रिकेटपटु.

यांचें नांव भूपेंद्रसिंह. हे पतियाळाचे महाराज असले तरी उत्कृष्ट क्रिकेटपटु व हिंदी क्रिकेटचे अभिमानी या नात्यानें हे सर्वत्र प्रसिद्ध असत.

१९११ सालीं इंग्लंडला गेलेल्या हिंदी टीमचें कप्तानपद यांना जागतिक बहुमतानें देण्यांत आलें. या टीमच्या इंग्लंडच्या प्रवासांत यांनीं दाखवलेलें क्रीडानैपुण्य, विशेषतः लिक्सस्टर परगण्यांवरील या टीमनें मिळवलेल्या विजयाबद्दल यांचें सर्वत्र कौतुक झालें. चार व सहाचे फटकारे मारण्याबद्दल यांची विशेष प्रसिद्धी असे.

हिंदुस्थानांत आल्यावर हे सुप्रसिद्ध एम्. सी. सी.चें सभासद झाले व त्या संस्थेतर्फे हे १९२६ व १९३४ च्या मॅचमध्यें खेळले. १९३२ सालीं इंग्लंडला गेलेल्या हिंदी टीममध्यें यांना घेण्यांत आलें. परंतु प्रकृती अस्वास्थ्यामुळें हे जाऊं शकले नाहींत. बोर्ड ऑफ कंट्रोल फॉर क्रिकेट इन इंडिया या संस्थेच्या संस्थापकांपैकीं हे एक असून मृत्यूपूर्वी क्रिकेट क्लब ऑफ इंडियाचें अध्यक्ष होते.

इंग्लंडमधून खेळून आल्यापासून हिंदी क्रिकेटचें जगाच्या क्रीडाक्षेत्रांतील वैभव वाढविण्याची तळमळ यांना लागली होती. फ्रँक टॅरन्ट, विल्फ्रेड व्होड्स, जॉर्ज हर्स्ट यांसारख्या पहिल्या दर्जाच्या क्रिकेटपटूंचा यांनीं स्वखर्चानें हिंदी खेळाडूंना परिचय करून दिला.

यांच्या राज्याचा परिचय यांचे चिरंजिवांचे चरित्रांत देण्यांत आला आहे.

पतियाळाचे महाराज, यादवेन्द्रसिंह—(जन्म स. १९१३) यांचे नांव यादवेंद्रसिंहजी. आपले वडील भूपेंद्रसिंह यांचेनंतर हे १९३८ सालीं पतियाळचें गादीवर बसले.

हिंदुस्थानांतील प्रमुख शीख संस्थान या दृष्टीनें पंजाबमधील यांच्या संस्थानाला विशेष महत्त्व आहे. यांच्या एकोणीस लक्ष लोकवस्तीपैकीं निम्यापेक्षां अधिक लोक शीख असल्यानें सर्व हिंदुस्थानांतील शीख लोकांना या संस्थानाबद्दल जिव्हाळा वाटतो. साहजिकच शीख लोकांच्या धार्मिक व सांस्कृतिक चळवळीचें पुढारीपण यांचेकडे ओघानेंच येतें.

हायकोर्टाच्या निकालावरील अपिलें ऐकण्यासाठीं इजलास-इ-खास या न्यायमंडळाची स्थापना, जहागिर व नझूल कायद्यांचे उच्चाटण व उद्योगखात्याची स्थापना या यांनीं गादीवर आल्यानंतर केलेल्या प्रमुख सुधारणा होत. यांच्या संस्थानांत असलेल्या सिमेंट, बिस्कीटें व स्टार्चच्या कारखान्याइतके मोठें कारखानें हिंदुस्थानांत इतरत्र कोठेंहि नाहींत.

युद्ध सुरू होतांच शीख सैनिकीकरणाला उत्तेजन देण्यासाठीं यांनीं खालसा डिफेन्स ऑफ इंडियाची स्थापना केली. सुरवातीलाच तिला ५१००० रु.ची देणगी दिली व दरवर्षी १००० रु. देण्याची व्यवस्था केली. या संस्थेनें आतांपर्यंत दोन लाख शीखांची लष्करांत भरती केली. यांपैकीं ६५००० सैनिक यांच्या संस्थानांतीलच असून फर्स्ट राजेंद्र शीख, सेकन्ड यादवेंद्र इन्फन्ट्री, फर्स्ट राजेंद्र लान्सर्स व ५६ ए. टी. कंपनी या यांच्या सैन्य-तुकड्या लढाईत आघाडीवर होत्या. यांपैकीं तीन सैनिकांनीं या युद्धांत व्हिक्टोरिया क्रॉस मिळविला. याशिवाय ७ लक्ष रु.चे व्याजरहित कर्जरोखे व ८ लक्ष रु. व्हाइसरॉय फंडाला या संस्थाननें दिले.

अशा महत्त्वपूर्ण कार्यानेंच ६ हजार मैल क्षेत्रफळ व अडीच कोटी उत्पन्न असणाऱ्या या लहानशा संस्थानाचें नांव सर्व हिंदुस्थानांत दुमदुमत आहे. १९ तोफांचीं यांना असणारी सलामी हिंदुस्थानांतील फारच थोड्या संस्थानिकांना लाभली आहे.

पदे, शंकर दाजीशास्त्री—(जन्म स. १८६७–मृत्यु स. १९१०) अखिल-भारतीय आयुर्वेद-महामंडळ, वैद्यक-महासंमेलन, आयुर्वेदविद्यापीठ या संस्थांचे संस्थापक व मराठी कादंबरीकार.

यांचे वडील मुंबईचे सुप्रसिद्ध ज्योतिषी होते. त्यामुळें यांना ज्योतिषविद्येचा लाभ घरींच झाला. पं. गट्टूलालजी-

पाशीं यांनीं अनेक शास्त्रांचें अध्ययन केलें, पण शेजारीं राहणारे भानु कुलकर्णी यांच्यामुळें हे वैद्य बनले. त्यापूर्वीच यांनी 'बालमित्र' नांवाचें मासिक काढलें आणि तें फुफकरेक्रिंटिगच्या मोबदल्यांत हे 'जगदीश्वर' प्रेसमधून छापून घेत. शिवाय विद्याप्रकाश, सयाजीविजय, नेटिव्ह ओपिनियन या मराठी नियतकालिकांतून शंकर, पिनाकी, भ्रमर इत्यादि टोपण नांवानें यांचें लेखन चालू असे. आयुर्वेदाच्या खास प्रचारासाठीं यांनीं सोळावे वर्षी 'राजवैद्य' नांवाचें मासिक काढलें (१८८३).

या मासिकांत आयुर्वेदाच्या हीनावस्थेबद्दल हे निर्भीड चर्चा करून उपाय सुचवीत. सुमारें ८०० आयुर्वेदीय ग्रंथांची यादी प्रसिद्ध करून त्यांतील कोणते छापले गेले आणि कोणते छापले जाणें जरूर आहे हें यांनीं प्रसिद्ध केलें. सहा वर्षांनंतर 'राजवैद्य' बंद करून 'आर्यभिषक्' मासिक यांनीं सुरू केलें (१८८८). तें यांनीं आपल्या अंतापर्यंत चालविलें. यांच्या मृत्यूनंतर गोविंदराव पदे यांनीं तें चालविलें; पण त्यांच्या मृत्यूनें तें कायमचें बंद पडलें. हे गुजराथींतहि 'आर्यभिषक्' मासिक चालवीत. गुजराथ व महाराष्ट्र यांच्यानंतर यांचें लक्ष हिंदुस्थानीकडे वळलें. आणि यांनीं हिंदींत 'सद्वैद्यकौस्तुभ' हें पत्र काढलें. मराठींत चरक, वाग्भट, बृहन्निघंटु व निघंटुशिरोमणि या ग्रंथांची यांचीं भाषान्तरें व वनौषधि गुणादर्शाचे सात भाग हीं यांचीं पुस्तकें लोकप्रिय आहेत. अशीच लोकप्रियता यांच्या गुजराथी व हिंदी पुस्तकांनाहि लाभली.

लेखनाबरोबर सभासंमेलनादिकांच्या द्वारांहि यांनीं कार्यास सुरुवात केली. मुंबई वैद्यक-सभा स्थापून प्रभुराम जीवराम यांच्या सहकार्यानें आयुर्वेदविद्यालय स्थापन केलें. त्यालाच पुढें 'प्रभुराम आयुर्वेद कॉलेज' असें रूप देण्यांत आलें. त्याला पाश्चात्य वैद्यकाची जोड दिल्यामुळें यानीं त्यांतून अंग काढून घेतलें. मुंबईची हवा मानवेना म्हणून हे नाशिक येथें जाऊन राहिले. तेथें यांनीं सनातनसभेचें धुरीणत्व पत्करून कार्यास सुरुवात केली. शारदापीठाच्या शंकराचार्यांनीं यांना 'आयुर्वेदमहोपाध्याय' अशी पदवी दिली.

स. १९०६ सालीं यांनीं आयुर्वेदमहामंडळाची स्थापना करून नाशिक येथें पहिलें निखिल भारतीय आयुर्वेदसंमेलन भरविलें (१९०७). तेव्हांपासून महामंडळ व संमेलन यांचा व्याप सारखा वाढत चालला आहे. हिंदुस्थानभर त्यांचा प्रसार झाला असून या संस्थांचे हजारों पदवीधर देशभर कार्य करीत असून सरकारनेंहि यांच्या परीक्षांना मान्यता दिली आहे. संमेलनाच्या अध्यक्षस्थानीं वेगळाल्या प्रान्तांतील अध्यक्ष निवडून येतात व त्यांचा आसेतुहिमाचल प्रचार चालू असतो. पण या सर्व व्यापाचे मूळ संस्थापक हे होत. दुसरें पनवेल येथें व तिसरें संमेलन काशीस भरविण्याच्या खटपटींत असतां हे मृत्यु पावले.

यांचीं पुस्तकें—कादंबरी-१ सुंदराबाई, नाटिका-२ प्रेमपरीक्षण (१८९३), आयुर्वेद-ग्रंथ-३ अश्वरोगपरिज्ञान (१८९१), ४ रसवैद्य (१८९१, १८९८), ५ वैद्यविजय अर्थात् ज्वरपराजय (१८९३), ६ हारीतसंहिता सार्थ भाग १ ला (१८९५), ७ बृहन्निघंटु (१८९७), ८ योगशतक सार्थ (१८९६), ९ निघंटशिरोमणि (१८९८) वगैरे.

पद्मसिंह शर्मा—(मृत्यु स. १९३०) हिंदी भाषेच्या प्राचीन साहित्याचे अभ्यासक व समालोचक.

यांनीं 'सत्सई संहार' नांवानें पं. ज्वालाप्रसादमिश्र यांच्या सत्सई टीकेची समालोचना लिहून संस्कृत, उर्दू, फारसी व हिंदी कवींची व त्यांच्या काव्याची तुलना करून जी समालोचना लिहिली ती हिन्दी भाषेंत अपूर्व आहे. यामुळें हिन्दी साहित्यांत यांचें नांव अमर झालें आहे.

परमानंद भाई—(जन्म स. १८७४) पंजाबमधील सुप्रसिद्ध हिंदुसभा कार्यकर्ते व पुढारी.

पंजाब युनिव्हर्सिटींतून एम्. ए. झाल्यावर आर्यसमाजांत सामील होऊन यांनीं लाहोरच्या डी. ए. व्ही. कॉलेजांत प्राध्यापकाचें काम करण्यास सुरुवात केली. याच सुमारास उत्तर व दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या विनंतीवरून म. हंसराज यांनीं यांना वैदिक धर्म व संस्कार यांच्या प्रचाराकरितां आफ्रिकेंत जावयाची आज्ञा दिली व यांच्या सार्वजनिक आयुष्यास सुरुवात झाली. भाई हें यांच्या ऐतिहासिक शीख घराण्याचें गौरवदर्शक उपपद आहे.

हे आफ्रिकेंत असतां यांच्या घरांत एस्. अजितसिंग, सुफी अंबाप्रसाद यांसारखे क्रांतिकारक लोक वास्तव्य करून होते. त्यांच्या कटाचा सुगावा पोलिसांना लागल्याचें कळतांच ते तेथून निसटले व गैरमाहितीनें तेथें येऊन राहिलेले हे मात्र पोलिसांच्या कचाट्यात सांपडले.

पोलीस लोकांच्या काळ्या यादींत यांचा येथूनच समावेश झाला.

तीन वर्षांच्या चांगल्या वर्तणुकीच्या वचनाच्या पूर्तीसाठीं हे दक्षिण अमेरिकेंत जाऊन राहिले. तेथील मॉर्तिनिक या फ्रेंच वसाहतींत यांची लाला हरदयाळ यांच्याशीं गांठ पडली व देशांत क्रांति करण्याच्या हेतूनें हिंदुस्थानांत पाठविण्यांत येणाऱ्या शीख व इतर लोकांत यांचा समावेश करण्यांत आला. याच कारणानें हिंदुस्थानांत आल्यानंतर गदर पार्टीच्या इतर सभासदांबरोबर यांना अटक करण्यांत आली. यांना राजाविरुद्ध बंड करण्याच्या आरोवरून फांशीची शिक्षा झाली; परंतु नंतर तिचें रूपान्तर जन्मठेपींत करण्यांत येऊन यांना अंदमानला रवाना करण्यांत आलें (१९१५). १९२९ पर्यंत अंदमानमध्यें शिक्षा भोगल्यानंतर तेथील जीवन असह्य होऊन यांनीं आमरण अन्नत्यागाचा आपला निश्चय जाहीर केला. परंतु सी. एफ्. ॲन्ड्रयूज यांचे रदबदलीनें वीस दिवसांच्या उपवासानंतर यांना मुक्त करण्यांत आलें.

हे तुरुंगांतून बाहेर आले तों यांना सर्वच वातावरण बदलल्याचें दिसून आलें. असहकाराच्या त्या जमान्यांत यांनीं कौमी विद्यापीठाच्या कुलगुरूचें कामहि पांच वर्षेपर्यंत केलें. परंतु या सर्व काळांत राष्ट्रीयत्वाच्या नांवाखालीं हिंदूंची चाललेली गळचेपी यांना पाहवेना. हिंदु-मुस्लिम ऐक्याचे घोषणेंत हिंदूंच्या हक्कांनाच झळ पोंचते असें यांच्या ध्यानांत आलें व यांनीं तसा प्रचार करण्यास सुरुवात केली. यांच्या या 'धाडसी' कृत्याबद्दल यांची सर्वत्र अक्षरशः छिःथूः झाली, यांचेबद्दल लोकांनीं अनेक कंड्या उठविल्या, यांना वेडे ठरविण्याचासुद्धां घाट घातला. परंतु हे एकनिष्ठपणें कार्य करीत राहिले; पं. मालवीय, लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद यांसारख्या लोकांचें सहकार्य यांना मिळालें व हिंदुसभेचें कार्य जोमानें सुरू झालें.

हिंदु-मुस्लिम प्रश्नाची भयानकता दिवसेंदिवस त्रि. सरकारच्या व मुसलमानांच्या विशेष धोरणामुळें वाढत आहे. प्रत्येक बाबतींत झळ हिंदूंना, फायदा मुसलमानांना असा एकतर्फी व्यवहार चालला आहे. मुसलमानांनीं जातिनिष्ठ संघटना करावयाची पण हिंदूंनीं ती करूं लागतांच त्यावर बुद्धिहीनतेचा आरोप ठेवायचा. हिंदूंवर झालेले सर्व अत्याचार त्यांनीं सहन करावयाचे पण मुसलमानांच्या केंसाला धक्का लागला कीं त्यानें सुरा बाहेर काढावयाचा अशी कांहीं चमत्कारिक अवस्था हिंदुस्थानच्या जातीय प्रश्नाची झाली आहे. कॉंग्रेसच्या उदार जातीय धोरणाचा जरी हा परिणाम असला तरी प्रत्यक्ष कॉंग्रेसलाच हें सहन करणें अशक्य होण्यापर्यंत ही परिस्थिति वाढत चालली आहे. अशा स्थितींत केवळ परिणामावर लक्ष ठेवून यांच्यासारख्या कणखर माणसानें केलेलें कार्य केव्हांहि महत्त्वाचेंच राहील. हे अ. भा. हिं. महासभेचे अध्यक्ष होते (१९३३, अजमेर).

यांचे ग्रंथ—(1) History of India, (2) My Life Story. पत्र—Hindu Outlook.

परांजपे, तपस्वी-नरहर शिवराम उर्फ बाबासाहेब—(जन्म स. १८७२) देशकार्याला सतत वाहिलेले व कोणतेंहि काम चिकाटीनें सतत करणारे देशभक्त.

यांचें मराठी व इंग्रजी शिक्षण यवतमाळ येथें झालें. पुढें हे उमरावती हायस्कूलमधून हैदराबादच्या मेडिकल-स्कूलमध्यें सरकारी शिष्यवृत्ति घेऊन गेले. तेथें १८९५-९७ व पुढें १९०२ पर्यंत यांनीं वऱ्हाडांत नोकरी केली. १९०९ पर्यंत यांनीं यवतमाळ येथें वैद्यकीचा खतंत्र धंदा व विद्यागृह नांवाची राष्ट्रीय शाळा तीन वर्षे चालविली. १९१० हें वर्ष यांनीं मुंबई येथील दैनिक राष्ट्रमत पत्रांत काम करण्यांत घालविलें. नंतर पुणें येथें 'मराठी वैद्यकवर्ग' ही संस्था तीन वर्षे चालविली. नंतर टिळक स्वराज्यसंघाचे चिटणीस म्हणून यांनीं काम केलें. पुढें वऱ्हाडांत बिगार-बलुत्याची चळवळ पांच वर्षे चालविली. त्यांत यांना सव्वा वर्ष कारागृहवास भोगावा लागला (१९२१). १९२५ पासून ग्रामपंचायतीच्या प्रचाराकरितां मुंबई, मद्रास, बंगाल, आसाम वगैरे प्रान्तांत हिंडून १९३० सालीं नागपूर येथें यांनीं 'ग्रामणी' संस्था स्थापन केली. प्रथम आठ महिने ग्रामणी मासिक इंग्रजींत चालवून १९३२ पासून ते मराठींत काढण्यास सुरुवात केली. कांहीं वर्षे यांनीं आपलें जीवन ग्रामणी कार्याला वाहून घेतलें होतें.

आयुर्वेदांतील शारीर व त्रिदोष यांचा विशेष अभ्यास करून त्रिदोष म्हणजे आंतड्यांत उत्पन्न होणारे तीन रस-तीन विपाक होत व तीं प्रत्यक्ष द्रव्यें आहेत असें यांचें मत झालें. त्या दृष्टीनें यांनीं नाशिकसंमेलनांत त्रिदोषावरच्या निबंधाची मागणी केली. पनवेल व काशी येथें त्रिदोषचर्चापरिषदा भरविल्या. संस्कृत व इंग्रजी

भाषांतून तशी ग्रंथरचना करविण्याचाहि यांचा प्रयत्न चालू आहे.

पूर्वी हे मिश्र वैद्यकाचे पुरस्कर्ते होते; पण आतां हे शुद्ध आयुर्वेदाचे पुरस्कर्ते झाले आहेत. कोणत्याहि मताचा पुरस्कार केल्यावर हे त्याबद्दल आग्रही होतात आसन्न स्थितींतहि आयुर्वेदाशिवाय इतर पद्धतीचें औषध घेण्याचें यांनीं टाळलें असल्यास तें अगदीं स्वाभाविक आहे. यांच्या निरपेक्ष व एकनिष्ठ कार्यपद्धतीनें यांना लोक तपस्वी असें गौरवितात.

परांजपे, महादेव रामचंद्र—(जन्म स.१८८२–मृत्यु स. १९४२) शिक्षणक्षेत्रांतील सुप्रसिद्ध पुढारी व प्रोग्रेस ऑफ एज्युकेशन या नियतकालिकाचे एक संस्थापक.

हे एम्. ए. झाल्यावर पुणें डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सभासद झाले व फर्ग्युसन कॉलेजांत प्राध्यापन करूं लागले. पण यांना ती सोसायटी राजकीय कारणामुळें सोडावी लागली व पुढें शिक्षणप्रसारक मंडळींत हे दाखल झाले. तेथें असतां हे पाटणा येथें भरलेल्या एज्युकेशन कॉन्फरन्सचे अध्यक्ष होते. यांचा शिक्षणविषयाचा व्यासंग चांगला होता.

मुंबई, विश्वविद्यालय व ऑल इंडिया टीचर्स फेडरेशन द्वारा अभ्यासक्रमांत प्रगति करण्याचे व परदेशांतील लोकांना इंग्रजींत लेख लिहून माहिती करून देण्याचें यांचें कार्य सतत चालू असे.

प्रत्येक गोष्ट नीटनेटकी, बिनचूक आणि जलद करण्याकरितां शिक्षणाची जरूर आहे. शाळेंतील शिक्षण उद्देशपूर्वक घेतलें जात नाहीं. कोणत्याहि व्यवसायांत पडल्यानंतर त्यांतील विशेष ज्ञान मिळविण्याकरितां शिक्षणाची आवश्यकता उत्पन्न होते. तसें शिक्षण लोकशाळा काढून लोकांना दिल्याशिवाय देशांत त्या त्या विषयांतील अद्ययावत् ज्ञान संपादन करून अधिक प्रगति करणारे लोक निर्माण होणार नाहींत. यांकरितां प्रौढ धंदेवाइकांना शिक्षण देणाऱ्या लोकशाळा सर्वत्र निघाल्या पाहिजेत. शिक्षक, कारकून, दलाल व व्याजबट्टा यांशिवाय राष्ट्रांत अनेक उद्योग चालू असतात. त्याकरितां देशी भाषांतून सुलभपणें सर्वांना कोणत्याहि विषयाचें ज्ञान मिळवितां आलें पाहिजे-वगैरे शिक्षणासंबंधीं महत्त्वाचे विचार यांनीं वेळोवेळीं मांडले.

मुंबईच्या रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे सुप्रसिद्ध प्रि. गो. रा. परांजपे आय्. इ. एस्. हे यांचे बंधु होत.

यांचे इंग्रजी ग्रंथ—(1) Some Experiments on the Cathode fall (1918), (2) Report on the use of Mother-tongue (1932), (3) Reliability of Examinations (1937), (4) A Source book of modern Indian Education (1938).

परांजपे, रँगलर-रघुनाथ पुरुषोत्तम—(जन्म स. १८७६ फेब्रु. १६) पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजचें माजी प्रिन्सिपल व ऑस्ट्रेलियाचे एजंट जनरल.

दापोली तालुक्यांतील मुर्डी गांवीं यांचा जन्म झाला. यांचे वडील दशग्रंथी वैदिक होते. यांचें शिक्षण मुंबई, पुणें, केम्ब्रिज, पॅरिस व गटिंगेन इत्यादि ठिकाणीं झालें. हिंदुस्थानांतील विश्वविद्यालयीन परीक्षांतून हे पहिले आले आणि सरकारी शिष्यवृत्तीनें हे इंग्लंडला गेले. १८९९ सालीं केम्ब्रिजला पहिल्या आलेल्या दोन सिनियर रँगलरपैकीं हे एक होत. त्या परीक्षेंत यांना व जॉर्ज बर्टव्हिसल यांना सारखेच गुण मिळाले व दोघेहि पहिले आल्याचें जाहीर झालें.

१९०२-२४ पर्यंत यांनीं फर्ग्युसन कॉलेजचे प्रिंसिपल व गणिताचे प्राध्यापक म्हणून काम केलें.

१९१६-२३ व १९२६ सालीं मुंबई विश्वविद्यालयातर्फे कायदेमंडळांत सभासद म्हणून हे निवडून आले. याचे आधीं १९१३ सालीं हे मुंबई, कायदेमंडळांत सरकारनियुक्त सभासद होते. त्या वेळीं हे तेथील शिक्षणमंत्री झाले (१९२१-२३, १९२६). १९२७ सालीं यांची भारतमंत्र्याच्या इंडिया कौन्सिलचे सभासद म्हणून लंडन येथें नेमणूक झाल्यानें यांनीं मंत्रिपदाचा राजीनामा दिला. १९३५ च्या फेब्रुवारींत हे हिंदुस्थानांत परत आले व पुनः फर्ग्युसन कॉलेजांत प्राध्यापनाचें काम करूं लागले. पुढें हे लखनौ युनिव्हर्सिटीचे व्हाइस चान्सेलर झाले (१९३५). आतां यांची आस्ट्रेलियामध्यें हायकमिशनर म्हणून नेमणूक झाली आहे (१९४४).

याशिवाय यांनीं रिफार्म्स इन्क्वायरी (१९२४), इंडि. टॅक्सेशन इन्क्वायरी वगैरे अनेक कमिट्यांवर कामें केलीं आहेत.

हे राजकारणांत प्रागतिक पक्षाचे असून यांना लिबरल फेडरेशनच्या अध्यक्षपदाचा मान प्राप्त झालेला आहे.

हे बुद्धिवादी समाजसुधारक असून निर्भयपणें आपल्या मतांच्या प्रतिपादनाबद्दल आणि तीं मतें व्यवहारांत आणण्याबद्दल प्रसिद्ध आहेत.

यांचे ग्रंथ—(1) Gopal Krishna Gokhale (1915), (2) The Crux of the Indian Problem (1931), (3) Religion and the Indian Problem, (4) Selected Writings and Speeches (संपादक-भा. म. गोरे), (5) Rationalism is Practice.

परांजपे, प्रा. शिवराम महादेव—(जन्म स. १८६४–मृत्यु स. १९२९) मराठींतील प्रतिभाशाली साहित्तिक-लेखक, वक्ते, वृत्तपत्रकार व ध्येयवादी राजकारणी.

यांचा जन्म महाड येथें झाला. शिक्षण महाड, रत्नागिरी व पुणें येथें झालें. मॅट्रिकच्या परीक्षेंत यांना पहिली जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति मिळाली (१८८४). डेक्कन कॉलेजांतून एम्. ए. झाले त्या वेळीं यांना 'भगवानदास पारितोषिक' व 'झाला वेदान्त प्राइझ' मिळालें (१८९२). नंतर पुण्याच्या भावे स्कूलच्या महाराष्ट्र कॉलेजांत हे संस्कृतचे प्राध्यापक झाले. पण १८९७ च्या प्रक्षुब्ध वातावरणांत तें कॉलेज सरकारनें बंद केलें. १८९८ सालीं 'काळ' नांवाचें साप्ताहिक वर्तमानपत्र काढून यांनीं राजकीय कार्यांत पदार्पण केलें, तथापि लोक यांना जन्मभर प्रोफेसर म्हणूनच ओळखत असत. काळांतील लेखांबद्दल राजद्रोही म्हणून यांना १९ महिन्यांची स. म. शिक्षा झाली. हे सुटून येईपर्यंत 'काळ' पत्र चालू होतें (१९१०). पण पुढें तें प्रेस ॲक्टला बळी पडलें. तसेंच यांच्या 'काळांतील निवडक निबंधां'चे दहा भागहि जप्त झाले. फक्त दहावा भाग प्रथम राष्ट्रसभामंत्रिमंडळानें (१९३७), व बाकीचे भाग १९४६ एप्रिलमध्यें मुक्त करण्यांत आले.

१९२० सालीं यांनीं 'स्वराज्य' साप्ताहिक काढलें व म. गांधींच्या असहकारितेचे एकनिष्ठ पुरस्कर्ते बनले. पण तेव्हां यांचें तेज विशेष पडलें नाहीं. यांचें विविध प्रकारचें लेखनकार्य आजन्म चालू होतें. पण यांच्या लेखनाचा आणि वक्तृत्वाचा परम लोकप्रियतेचा काळ म्हणजे १८९८-१९०८ हा सांगतां येईल. यांच्या वाङ्मयसेवेच्या गौरवार्थ यांना बेळगांवच्या मराठी-साहित्य-संमेलनाचें अध्यक्षस्थान देण्यांत आलें होतें (१९२८). शेवटीं यांनीं राजकारण सोडलें होतें. हे मधुमेहानें वारले.

संस्कृत भाषेंतील ललित वाङ्मय, न्याय, मीमांसा वगैरे विषयांप्रमाणेंच काव्य, कादंबरी, कथा, इतिहास-संशोधन, मराठ्यांच्या लढाया, शब्दांच्या व्युत्पत्त्या वगैरे अनेक विषयांवर यांनीं आपली लेखणी चालविली. तथापि निबंधलेखनांत यांचें अन्तरंग व्यक्त झालेलें दिसतें. असें निबंधलेखन करतांना हे नाना प्रकार उपयोगांत आणीत. संभाषण, स्वप्न, आत्मगत भाषण, कथा, रूपक इत्यादि मार्गांनीं आपलें मनोगत व्यक्त करण्याची यांची हातोटी आश्चर्यकारक सफाईदार असे. यांचा ओढा पूर्ण स्वातंत्र्याकडे असे, आणि त्याशिवाय इतर सर्व गोष्टींकडे तुच्छतेनें व उपहासानें पाहण्याची यांची वृत्ति होती. 'वंदे मातरम्' हे साधे शब्द उच्चारण्याबद्दलहि जेव्हां फटके खावे लागत त्या कालांत सडेतोड लिहिण्याची पद्धत सोडून उपरोधिक लिहिण्याकडे यांच्यासारख्यांचा कल होणें स्वाभाविक होतें. पण यांच्या उपरोधिक लिहिण्यानें सडेतोड लिहिण्यापेक्षां अधिक परिणाम होई आणि वाचक मारला जाई. यांची लेखणी एकदां सफाईदारपणें सुरू झाली कीं ती वाचकाला आपल्याबरोबर लीलेनें घेऊन जाई. यामुळेंच यांना मराठीचे गद्य कवि म्हणणें योग्य होईल. यांच्या या सर्व लेखनशक्तीची उत्कृष्ट मिळवणी 'भाषाची भवितव्यता' या निबंधांत पाहावयास मिळते.

तशीच यांच्या वक्तृत्वाची स्थिति होई. यांच्या ओघवती व ओजस्वी वाणीचा प्रवाह सुरू झाला कीं तासन् तास श्रोते मंत्रमुग्ध नागाप्रमाणें बेभान होऊन डोलूं लागत आणि खरें वक्तृत्व म्हणजे काय याचा त्यांना प्रत्यय येई. यांच्यासारखा वक्ता व मराठ्यांच्या इतिहासासारखा विषय असला कीं अंगांत वीरश्रीचा संचार होऊन श्रोत्याला आपण दोन तलवारीचे हात खेळावेत असें वाटावयास लागे.

यांचें वाङ्मय—निबंध–१ काळांतील निबंध-भाग १-१०; २ साहित्यसंग्रह भाग १-२, १९२२, १९२५; ३ स्वराज्यांतील निवडक निबंध. नाटकें–४ संगीत कादंबरी १८९७; ५ मानाजीराव १८९८,१९२८; ६ रामदेवराव, १९०६; ७ भीमराव, १९०७; ८ पहिला पांडव, १९३१; ९ मीराबाई (अपूर्ण). कादंबऱ्या–१० गोविंदाची गोष्ट १९१८, १९२५; ११ विंध्याचळ १९२४. संकीर्ण–१२ तर्कसंग्रहदीपिका १८९९, १९१०;

१३ तर्कभाषा १९०४; १४ तर्कसंग्रह १९२२; १५ रामायणाविषयीं कांहीं विचार; १६ अर्थशास्त्र; १७ सूर्याच्या गैरसोई १९२०. १८ अहल्याजारकाव्य १९२४; १९ कालिदासानें न लिहिलेलें नाटक १९२५; २० अर्थसंग्रह १९२७; २१ मराठ्यांच्या लढायांचा इतिहास १९२८, २२ शाकुन्तल नाटकांतील चौथा अंक, लोकशिक्षण, अंक ३-४, १९२९.

पलुस्कर, पंडित विष्णु दिगंबर—(जन्म स. १८७२–मृत्यु स. १९३१) सुप्रसिद्ध गायक, शास्त्रोक्त गायनाचे प्रचारक, गांधर्वमहाविद्यालयाचे संस्थापक आणि कुशल संघटक.

यांनीं बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचेपाशीं गायनशास्त्राचें अध्ययन केलें. प्रथम यांना आवाजाची तितकीशी अनुकूलता नव्हती, पण यांनीं अत्यंत मेहनतीनें आवाज कमावला. नैसर्गिक देणगी असलेल्या गायकांमध्यें सुद्धां क्वचितच आढळणारे गुण मेहनतीच्या जोरावर यांनीं संपादन केले. एक प्रकारची ज्योत यांच्या आवाजांत तेवत असल्याचा भास यांचें गाणें ऐकतांना होई. आधींच जोरदार असलेल्या यांच्या आवाजांत मेहनतीनें एक नवीनच तेज निर्माण झालें. मेघगर्जनेसारखा धीरगंभीर व कणखर असा आवाज यांच्याइतका इतरत्र क्वचितच ऐकावयास मिळे.

बराच अभ्यास झाल्यावर स्वतःच्या महत्त्वाकांक्षी स्वभावास अनुसरून यांनीं उत्तर हिंदुस्थानांत प्रयाण केलें (१२ ऑगस्ट १८९६). दिग्विजयास निघालेल्या वीराप्रमाणें हे अनेक सभा जिंकीत पुढें चालले. एका साधूच्या आदेशावरून यांनीं प्रथम लाहोर येथें गांधर्वमहाविद्यालयाची स्थापना करून आपल्या जीवितकार्यास सुरुवात केली.

यांनीं गायन व गायक यांचा समाजांतील दर्जा वाढविला, गायनाला व्यसनी व हलक्या लोकांच्यांतून काढून तें सभ्य स्त्री-पुरुषांच्या सात्त्विक करमणुकीचें उत्कृष्ट साधन असल्याचें लोकांच्या निदर्शनास आणलें. ध्येयवादी, निर्व्यसनी व शुद्ध आचाराची नमुनेदार शिष्यपरंपरा निर्माण करून समाजांत संगीताचा प्रचार केला आणि या शास्त्राची अमोल सेवा केली. यांची शिष्यशाखा फार मोठी असून हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रमुख शहरीं यांची शिष्यमंडळी संगीताचें कार्य चालवीत आहेत. कै. ना. मो. खरे, प्रा. कशाळकर, प्रा. नारायणराव व्यास, पं. वामनराव पाध्ये, पं. ओंकारनाथ ठाकूर, पं. विनायकबुवा पटवर्धन इ. अनेक नामवंत लोक यांच्या शिष्यशाखेंत मोडतात.

अश्लील अर्थाचीं पद्यें न गातां सार्थ व भक्तिपूर्ण रसाळ पद्यें भावनापूर्णतेनें गाण्यांत तर यांचा हातखंडा असे, आणि आपल्या शिष्यांनींहि गायनाचें भारदस्त व अर्थबोधक शास्त्रीय स्वरूप टिकवावें असा यांचा आदेश असे. शेवटीं हे तुळशीदास रामायणावर संगीत प्रवचनें करीत हिंदुस्थानभर हिंडत.

यांनीं संगीताचें स्वरलेखन निर्माण करून तें यशस्वी करून दाखविलें. यांनीं साठसत्तर पुस्तकें लिहिलीं आहेत.

पवार, शिवराम गणपतराव—(जन्म स. १८६६–मृत्यु स. १९३९) महाराष्ट्रांतील प्रसिद्ध ज्योतिर्गणिततज्ज्ञ.

हे राहणार सडें, ता. राहुरी, जि. नगर येथील होत. हे पुणें ट्रेनिंग कॉलेजांतून तिसऱ्या वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर यांनीं शाळा खात्यांत नोकरी धरली. तेथें हे असि. डे. एज्यु. इन्स्पेक्टरच्या जागेपर्यंत चढले. पुढें पेन्शन घेतल्यावर मूळ गांवीं खेड्यावर राहत व ज्योतिषविषयाचें चिंतन व ग्रंथलेखन करीत.

यांचें संस्कृत व इंग्रजी भाषेचें ज्ञान मर्यादित होतें तरी यांनीं स्वयंशिक्षणपद्धतीनें भारतीय व युरोपियन ज्योतिषाचें ज्ञान चांगल्या प्रकारें संपादन केलें. एवढेंच नव्हे, मराठींत अशा कठीण विषयाची माहिती यांनीं आपल्या ग्रंथांत अत्यंत सुबोध रीतीनें दिली.

यांचे कौमुदी, रेवतीयोगतारेचा शोध, लग्नसाधन, सारण्या व सूर्येन्दुस्थानमान हे ज्योतिषविषयक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. पैकीं सूर्येन्दुस्थानमान या ग्रंथाच्या प्रकाशनाला कै. सयाजीराव गायकवाड यांनीं चांगलें साहाय्य केलें आहे.

याशिवाय ग्रहगतिसिद्धान्त, ग्रहस्थविज्ञानपंचांगकल्पतरु व उपरागविज्ञान हे ग्रंथ यांनीं लिहिलेले असून व अप्रकाशित आहेत. यांपैकीं ग्रहगतिसिद्धान्त हा ग्रंथ केसरी-मराठा ट्रस्टनें छापावयास हातीं घेतला व हे वारले. रेवतीयोगतारा आरंभस्थानीं मानला पाहिजे असें यांचें मत असून टिळक पंचांगाचे हे कर्ते पुरस्कर्ते होते. इंदूरच्या संमेलनांत सूर्यसिद्धान्ताच्या आधारावरून यांनीं चित्रापक्ष खोडला.

पंडित, शंकर पांडुरंग—(जन्म स. १८४०–मृत्यु स. १८९४ मार्च १८) सुप्रसिद्ध संशोधक, अभ्यासक व लेखक.

जन्मस्थान–बांबुळी गांव (संस्थान सावंतवाडी). जात–सारस्वत ब्राह्मण. लहानपणीं तात्पुरता अभ्यास करून हे कुळकर्णीपणा करूं लागले. पण पुढें इंग्रजी शिकून हे एम्. ए. झाले (१८६५). हे एल्फिन्स्टन कॉलेजांत फेलो, दक्षिणा प्राइज कमेटीचे सेक्रेटरी व डेक्कन कॉलेजांत प्राध्यापक झाले (१८६८). नंतर डे. कलेक्टर, इन्कमटॅक्स कलेक्टर, ओरिएन्टल ट्रान्स्लेटर वगैरे कामें केल्यावर पोरबंदर संस्थानचे ॲडमिनिस्ट्रेटर होते.

सरकारनें यांना इंटर-नॅशनल कॉंग्रेसमध्यें प्रतिनिधि म्हणून पाठविलें होतें (१८७४). ऋग्वेदाचें इंग्रजी व मराठी चिकित्सक भाषान्तर करण्याचा वेदार्थयत्न नांवाचा यांचा प्रयत्न यांच्या गाढ व्यासंगाची आणि दीर्घोद्योगाची साक्ष देतो. तो प्रयत्न चार मंडळें व दोन सूक्तें झाल्यानंतर अपूर्ण राहिला. तुकारामाच्या अभंगांची गाथा व अथर्ववेदाची सभाष्य आवृत्ति हें यांच्या प्रयत्नाचें फळ होय.

पंडित, सीताराम नारायण—(जन्म स. १८४८–मृत्यु स. १९१८) प्रसिद्ध बॅरिस्टर व उदार दाते.

कुडाळ, वेंगुर्ले, रत्नागिरी वगैरे ठिकाणीं शिकून हे मॅट्रिक झाले. कॉलेजमध्यें एक वर्ष काढून हे इंग्लंडला जाऊन बॅरिस्टर होऊन आले (१८७०). हे राजकोट येथें वकिली करीत. यांनीं विपुल संपत्ति मिळविली व दानधर्मांत खर्च केली. प्रो. धों. के. कर्वे यांच्या हिंगण्याच्या संस्थेस यांनीं तेरा हजार व बनारस सेंट्रल हिंदु कॉलेजास सोळा हजार रुपये दिले. अलीगड इस्लामी कॉलेजास साडेचार हजार रुपये दिले. वाडी संस्थानांत कुडाळ गांवीं यांनीं धर्मार्थ व्हिक्टोरिया हॉस्पिटल बांधलें. शिवाय आपल्या सारस्वत ब्राह्मण ज्ञातीच्या संस्थांनाहि यांनीं मदत केली आहे (श्री. ना. कर्नाटकी–शं. पां. पंडित चरित्र-परिशिष्ट). यांचे पुत्र रणजित पंडित होत.

पंडित, बॅ. रणजित सीताराम—(जन्म स. १८८९–मृत्यु स. १९४४) सुप्रसिद्ध कायदेपंडित व अभ्यासक.

जन्मस्थान–राजकोट. यांचें घराणें महाराष्ट्रीय सारस्वत ब्राह्मण. यांचे वडील सीताराम नारायण पंडित. हे बॅरिस्टर होते.

गुजराथेंत जन्म आणि घरांत इंग्रजी पद्धतीची वागणूक, संभाळण्याकरितां ठेवलेली दाईसुद्धां इंग्रज, यामुळें महाराष्ट्रीय असूनहि यांना मराठी बोलतां येत नसे. राजकोट व मुंबई येथें शिक्षण झाल्यावर हे इंग्लंडला गेले. अनेक वर्षें तिकडे राहून हे परत आले. प्रथम राजकोटला व नंतर कलकत्ता येथें हे वकिली करीत. शेवटीं मात्र हे अलाहाबादेस स्थिर झाले. कलकत्त्यास लॉर्ड सिंह व हिंदुस्थान सरकारचे लॉ मेंबर सर बी. एल्. मित्र यांच्या हाताखालीं हे प्रॅक्टिस करीत. तेथें पं. मोतीलाल नेहरू यांची कन्या विजयालक्ष्मी यांच्याशीं यांचा विवाह झाला.

१९४२ च्या 'चलेजाव'च्या चळवळींत हे तुरुंगांत असतां यांनीं कालिदासाच्या ऋतुसंहाराचें इंग्रजी भाषान्तर 'ए पेजन्ट ऑफ दि सिझन्स' या नांवानें केलें असून सरोजिनी नायडूंची त्याला प्रस्तावना आहे. तसेंच कल्हणाच्या राजतरंगिणीचें यांनीं इंग्रजी भाषान्तर केलें आहे. त्याला जवाहरलाल नेहरूंची प्रस्तावना आहे.

पंडित, विजयालक्ष्मी—(जन्म स. १९००) राष्ट्रसभेचा परदेशांत प्रचार करणाऱ्या व हिंदुस्थानांतील पहिल्या स्त्रीमंत्री.

या पंडित जवाहरलाल नेहरूंच्या धाकट्या भगिनी होत. यांचें मूळ नांव स्वरूपकुमारी नेहरू. यांचें सर्व शिक्षण घरींच शिक्षकाकडून झालेलें आहे.

यांचें लग्न बॅ. रणजित सीताराम पंडित या महाराष्ट्रीयाबरोबर झालें (१९२१). यांना चंद्रलेखा, नयनतारा व ऋतुविलासा नांवांच्या तीन कन्या आहेत.

मोतीलाल नेहरूंची कन्या असल्यामुळें यांचा कॉंग्रेसशीं लहानपणापासून संबंध आला. यांना स. १९३२ च्या चळवळींत एक वर्षाची व ५०० रु. दंडाची शिक्षा झाली. स. १९३५ मध्यें या अलाहाबादच्या म्यु. बोर्डांत कॉंग्रेसच्या प्रतिनिधी म्हणून निवडून आल्यानंतर या तेथें शैक्षणिक समितीच्या दोन वर्षे अध्यक्ष होत्या. ८ ऑगस्ट १९४२ च्या चळवळींत या तुरुंगांत होत्या. त्यांतून या सुटल्या आणि अमेरिकेंत गेल्या. अमेरिकेंत असतां यांनीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीची वकिली तडफदार भाषेंत उत्कृष्ट केली.

सरकारला कांहीं वेळा खुलासे करावे लागले इतकी ती परिणामकारक झाली. पुनः हिंदुस्थानांत आल्यानंतर यांनीं आपलें राजकीय काम चालू ठेवलें (१९४६ जाने.). लेखन, भाषण, मुलाखती आणि ठळक प्रसिद्धीकरण यांचें चक्र सतत चालू ठेवण्याचें तंत्र यांना जवाहरलाल नेहरूंप्रमाणें उत्कृष्ट साधलें आहे.

या संयुक्त प्रान्तांतील कायदेमंडळांत १९३७ व १९४६ सालीं निवडून आल्या व पं. गोविंद वल्लभ पंत यांच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या राष्ट्रसभा मंत्रिमंडळांत यांचा पुनः समावेश झाला आहे.

यांचे ग्रंथ—(1) So I became a Minister, (2) Prison Days.

पंडित, विष्णु परशुरामशास्त्री—(जन्म स. १८२७–मृत्यु स. १८७६) प्रसिद्ध वर्तमानपत्रकार व पुनर्विवाहाचे प्रचारक.

यांचें गांव वाईजवळचें बावधन. वडील सातारकर छत्रपतींचे आश्रित. यांचें शिक्षण राघवाचार्य व वडील यांचेपाशीं झालें. १८४५ च्या सुमारास पुणें, विश्रामबाग पाठशाळेंत हे इंग्रजी शिकले. पुढें ट्रान्स्लेशन एक्झिबिशनर, शिक्षक वगैरे कामें करून हे सेवानिवृत्त झाले. नोकरीवर असतांनाच मुंबईच्या इंदुप्रकाशांत हे लिहीत (१८६४). यांनीं पुनर्विवाहोत्तेजक मंडळी काढली (१८६५). तिचे अध्यक्षादि श्रीमंत जमखिंडीकर, विंचुरकर वगैरे व हे चिटणीस असत. वेणुबाई परांजपे वय १६ यांचा पांडुरंग विनायक करमरकर यांच्याशीं पुनर्विवाह झाला. तेव्हां यांच्यावर श्रीशंकराचार्यांकडून बहिष्कार जाहीर झाला. वादाचें आव्हान सुधारकांनीं स्वीकारलें व पुढीलप्रमाणें पंच निवडले गेले.

पुनर्विवाहवादी पंच–१ कृष्णशास्त्री चिपळुणकर, २ व्यंकटशास्त्री माटे, ३ रावजीशास्त्री आगाशे, ४ रघुनाथशास्त्री शेंडे, ५ केशवशास्त्री गाडगीळ. निषेधक पंच–१ दिनकरशास्त्री खांबेटे, २ गणेशशास्त्री कोल्हटकर, ३ भिकुशास्त्री गोडबोले, ४ अप्पाशास्त्री खाडिलकर, ५ भिकाचार्य खांबेटे. सरपंच–गोपाळाचार्य कऱ्हाडकर (ग्वाल्हेरकर). वादी–विष्णुशास्त्री पंडित. प्रतिवादी–नारायणाचार्य गजेन्द्रगडकर.

कृष्णशास्त्री चिपळुणकर हे एका मिश्र उपाहारप्रसंगीं हजर होते म्हणून त्यांना पांचशें रुपये दंड व सक्षौर प्रायश्चित्त देऊन पंचांत समाविष्ट करण्यांत आलें. वादाचीं कलमें ठरून वाद कसबा पेठेंतील दीक्षितांच्या (आतां मोघ्यांच्या) वाड्यांत झाला. फाल्गुत वद्य ११ शके १७९१ ते चैत्र शु. ३ शके १७९२ पर्यंत नऊ दिवस वाद झाला. यांना वादप्रसंगीं संदर्भ ग्रंथ हाताशीं देण्यास व इतर साहाय्य करण्यास ज. वि. गाडगीळ, न्या. म. गो. रानडे, (डॉ. सर) रा. गो. भांडारकर आणि वि. रा. पटवर्धन वगैरे मंडळी होती.

कलिधर्माधिकरणान्तर्गत कलियुगास अद्यापि आरंभ झाला नसल्यानें कलियुगांत निषिद्ध मानलेला पुनर्विवाह आज निषिद्ध मानण्याचें कारण नाहीं या मुद्यास निषेधपक्षाकडून उत्तर मिळालें नाहीं म्हणून हा वाद अपूर्ण झाला, असें पुनर्विवाहवाद्यांचें म्हणणें होतें.

असेंच परदेशगमन, वपननिषेध, अनाथप्रेतदहन, शूद्रान्नसेवन, वगैरे अनेक बाबतींत यांनीं प्रचार केला. धर्मशास्त्राचा संबंध असलेल्या विषयाप्रमाणें स्वदेशी, व्यापार, ईस्ट इंडिया असोसिएशनची स्थापना वगैरे विषयांतहि हे भाग घेत. प्रथम पत्नी वारल्यावर यांनीं वामनराव आगाशे यांची विधवा कन्या कुसाबाई इच्याशीं पुनर्विवाह केला (१८७४). पण पुढें उन्मादवायूनें महाबळेश्वरीं यांनीं देह ठेवला. यांच्या मृत्यूबद्दल दुःखप्रदर्शनार्थ व स्मारक करण्याकरितां अनेक सभा झाल्या. यांच्या स्मारकार्थ जमलेले एक हजार रुपये पुढें विडो मॅरेज असोसिएशनला देण्यांत आले. लोकांचा अत्यंत विरोध असणाऱ्या कालांत यांनीं पुनर्विवाहाचा प्रचार केला.

'बृहत्पराशरस्मृति' हा ग्रंथ कृष्णशास्त्री साठे यांनीं छापविला त्यांतील चित्पावन ब्राह्मणाची प्रशंसा असलेले तीन श्लोक खोटे असल्याचें यांनीं उघडकीस आणलें (सरस्वतीमंडळ–रा. भि. गुंजीकर).

यांचे मराठी ग्रंथ—१ हिंदुस्थानचा इतिहास (मरे–तिसरा भाग), २ विधवाविवाह, ३ विधवोद्वाहविवेक, ४ ब्राह्मणकन्याविवाहविचार, ५ पुष्पमाला–काव्य, ६ स्मृतिशास्त्र, ७ शूद्रधर्म, ८ स्त्रीगायनसंग्रह, ९ स्त्रियांचे अधिकार, १० इंग्रजी मराठी कोश, ११ वेदांतील सूर्यासावित्रीविवाह, १२ व्रतदिनश्राद्धविचार.

पंत, पं. गोविंद वल्लभ—(जन्म स. १८८७) संयुक्त प्रांतांतील सुप्रसिद्ध कॉंग्रेस पुढारी व हिंदी भाषेतील प्रसिद्ध नाटककार.

अलमोरा जिल्ह्यांतील एका लहान गांवीं यांचा जन्म

झाला. यांचें घराणें मूळ महाराष्ट्र ब्राह्मण असून आतां पूर्णपणें संयुक्त प्रान्तीय बनलें आहे. यांचे वडील जमीन-महसूल खात्यांत नोकर होते. कुमाउ प्रांतांतील सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते रायबहादुर बद्रीदत्त जोशी हे यांचे अजोबा होत. अलमोरा व अलाहाबाद येथें शिक्षण संपवून हे बी. ए. व एल्एल्. बी. झाले. वकिलीच्या परीक्षेंत यांचा नंबर पहिला येऊन यांना ल्युमस्डेन सुवर्णपदक मिळालें (१९०९).

यानंतर यांनीं नैनिताल येथें वकिली करण्यास व कुमाउच्या सार्वजनिक चळवळींत भाग घेण्यास सुरुवात केली. १९१६ सालीं यांनीं पं. हरगोविंद पंत व पं. बद्रिदत्त पांडे यांच्या सहकार्यानें कुमाउ परिषदेची स्थापना केली. भिकाऱ्यांची व्यवस्था, मजुरांची जबरीनें भरती, जंगलांतील अत्याचार असे अनेक प्रश्न या संस्थेपुढें होते. त्यांतील मजुरांच्या भरतीचा प्रश्न तर केवळ यांच्या टोंचणीमुळें सरकारला हातीं घेणें भाग पडलें.

मॉंटफर्ड सुधारणांच्या वेळींहि ह्यांनीं कुमाउची बाजू लढविली. मॉंटफर्ड सुधारणांतून कुमाउ प्रांताला वगळतांच यांनीं त्याबद्दल साउथबरो कमिशनपुढें साक्ष दिली व इतर मागासलेल्या जातींच्या प्रांतांतून त्या प्रांताला वेगळें करण्यास यांनीं सरकारला भाग पाडलें.

१९०५ सालच्या बनारस कॉंग्रेसला हे प्रथम हजर राहिले. तेव्हांपासून संयुक्त प्रांतांतील प्रमुख कॉंग्रेस कार्यकर्त्यांत यांची गणना होत असून ए. आय. सी. सी.चे सभासद (१९१६), यू. पी. लेजिस्लेटिव्ह कौन्सिल-मधील कॉंग्रेस पक्षाचे पुढारी (१९२४), सेंट्रल लेजि-स्लेटिव्ह असेंब्लीतील कॉंग्रेस पक्षाचे उपनेते (१९३४). ऑल इंडिया पार्लमेंटरी बोर्डाचे सेक्रेटरी अशा अनेक पायऱ्या चढत चढत हे कॉंग्रेस वर्किंग कमेटीचे सभासद बनले. असेंब्लींत पं. मोतीलाल नेहरु यांचे स्वराज्यपक्षाचे स्थापनेंत हे प्रमुख साहाय्यक होते. सायमन कमिशनविरुद्ध निघालेल्या मिरवणुकींत यांना व पंडित जवाहरलाल नेहरु यांना पोलिसांच्या लाठी-हल्ल्यांत देहदंड सोसावा लागला.

१९३७ व १९४६ सालीं कॉंग्रेसनें संयुक्त प्रांतांत निवडणुकी लढविल्या त्या वेळीं दोन्ही वेळीं यांना त्या प्रांतांतील कॉंग्रेसपक्षाचे नेते म्हणून एकमतानें निवड-ण्यांत येऊन यांना मुख्य प्रधान करण्यांत आलें. १९३७ सालीं यांनीं अर्थ, गृह व जंगलखातें आपणां-कडे घेतलें होतें.

हिंदी भाषेंतील सुप्रसिद्ध नाटककारांत यांची गणना करण्यांत येते. वरमाला (मार्कण्डेय पुराणाधारें), राजमुगुट, अंगूर की बेटी इत्यादि यांचीं नाटकें प्रसिद्ध आहेत.

पंत, सुमित्रानन्दन गङ्गादत्त—(जन्म स. १९०० मे २४) हिन्दींतील नवयुगप्रवर्तक अर्वाचीन कवि.

जन्मस्थान–कौसानी, अल्मोडा जिल्हा. यांचे वडील कौसानी संस्थानचे खजिनदार व जमिनदार होते. १९१९ सालीं बनारसच्या जयनारायण हायस्कूलमधून हे स्कूल लीव्हिंग परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर यांनीं अलाहा-बादच्या मूर कॉलेजांत दोन वर्षे काढलीं. नंतर यांनीं शिक्षण सोडलें. यांना हिन्दी व इंग्रजीशिवाय संस्कृत व बंगाली भाषाहि चांगल्या येतात. यांना हिन्दी कविता करण्याची आवड स्वाभाविक आहे.

प्रथम रवीन्द्रनाथ टागोरांचें अनुकरण करून छाया-वादी कवि म्हणून हे पुढें आले. पण पुढें यांच्या कवितेचा विकास स्वतंत्र झालेला आहे. कोमल भावना व मधुर भाषा यांबद्दल यांची विशेष प्रसिद्धि आहे. हिन्दी भाषेंत यांच्या कविता अगदीं नवीन तऱ्हेच्या मानल्या जातात.

यांचें वाङ्मय—काव्यसंग्रह–१ वीणा, २ उच्छ्वास, ३ पल्लव, ४ ग्रंथि, ५ गुंजन, ६ युगान्त, ७ युगवाणी. कादंबरी–हार (१९१५).

पंतलु, सुब्बाराव—(जन्म स. १८५६–मृत्यु स. १९४१) आंध्र प्रांताचे जुने पुढारी व राष्ट्रीय सभेचे १९१३-१७ सालचे चिटणीस.

नामांकित वकील म्हणून यांचा लौकिक होता. राजमहेंद्रीच्या स्थानिक स्वराज्य संस्थेपासून स. १८९२ सालच्या कायद्याप्रमाणें अस्तित्वांत आलेलें मद्रास कौंसिल व स. १९०९ च्या कायद्याप्रमाणें अस्तित्वांत आलेलें इंपीरियल कौंसिल या दोन्ही कायदेमंडळांत यांनीं लोकप्रतिनिधि म्हणून जनसेवा केली. पब्लिक सर्विस कमिशन व डीसेंट्रलायझेशन कमिशन या दोन कमिशनांबाबत यांनीं प्रशंसनीय कामगिरी बजावली. पहिलें कमिशन नेमून घेण्यांत यांनीं फार परिश्रम घेतले. त्या वेळचें यांचें वरिष्ठ कौंसिलांतील भाषण

अद्यापिहि अधिकारयुक्त भाषण म्हणून वाचलें जातें. स. १८८५ सालीं काँग्रेस सुरू झाल्यापासून हे तिच्या कार्यास जुंपले गेले. सं. १८९८ सालच्या मद्रास काँग्रेसचे हे स्वागताध्यक्ष होते, व चार वर्षे तर हे काँग्रेसचे कार्यकर्ते मंत्रि होते. मंडालेहून लो. टिळक सुटून आल्यावर त्यांना काँग्रेसमध्यें येऊं द्यावें किंवा नाहीं याची चर्चा तेव्हांच्या काँग्रेसच्या सूत्रचालकांत म्हणजे नेमस्त पुढाऱ्यांत चालली होती. तेव्हां हे टिळकांना अनुकूल पक्षांत होते. हिंदु धर्माचा पुनरुद्धार व्हावा असें यांना मनापासून वाटे. एकदां यांनीं मद्रास विद्यापीठाच्या पदवीधरांस गीतेच्या प्रती वांटल्या. गीताच आपणांस सर्व संकटांतून तारील अशी यांची खात्री होती. आपल्या दीर्घकालीन लोकसेवेनें यांनीं 'आंध्रभीष्म' ही पदवी प्राप्त करून घेतली होती. मद्रासच्या हिंदु पत्राचे हे एक प्रस्थापक होते. निष्ठा, सेवातत्परता, व्यासंग व व्यवहाराचा सरळपणा हे यांचे गुण वाखाणण्यासारखे होते.

पंतसचीव, शंकरराव चिमणाजी ऊर्फ रावसाहेब—(कारकीर्द सुरू स. १८७४–मृत्यु स. १९२२ जुलै १७) भोर संस्थानचे अधिपति.

यांचे वडील वारले तेव्हां हे सतरा वर्षांचे होते. तेव्हां यांच्या मातोश्री माईसाहेब कारभार पाहत. त्या निवर्तल्यानंतर यांना मुकत्यारी मिळाली (१८७४ जुलै ६).

यांनीं राज्याची खातेवार मांडणी करून शाळा, दवाखाने, सडका वगैरेंची नवी उभारणी केली. तेव्हां यांना अकरा तोफांच्या सलामीचा मान, हिज हायनेस ही पदवी व फांशीं देण्याचा अधिकार मिळाला.

यांनीं कुलदैवत श्रीरामाच्या उत्सवाकरितां बारा हजार वसुलाचीं गांवें इनाम म्हणून दिलीं. तसेंच अंबवडें येथील श्रीशंकराजी नारायण यांच्या समाधीच्या व्यवस्थेकरितां अठरा हजार उत्पन्नाचीं गांवें इनाम दिलीं. काशीस शिवालय बांधून राहण्याकरितां इमारत बांधली. यांच्या पत्नी जीजीसाहेब या विंचुरकर घराण्यांतील होत्या. यांनीं दक्षतेनें कारभार करून राज्याची प्रगति केली व लौकिक मिळविला.

पंतसचीव, राजा सर रघुनाथराव शंकरराव ऊर्फ बाबासाहेब—(जन्म स. १८७८ सप्टें. २०) भोर संस्थानचे अधिपति.

यांचें शिक्षण इंग्रजी दुसरीपर्यंत भोरास व इंटरपर्यंत डेक्कन कॉलेज पुणें येथें झालें. नंतर शिरवळ वगैरे ठिकाणीं अधिकाराचीं कामें केल्यावर वडिलांच्या पश्चात् यांना राज्याधिकार मिळाले (१९२२जुलै१८). प्रथम दक्षिणेंतील कांहीं संस्थानांच्या गटाचे प्रतिनिधि म्हणून हे दोनदां नरेन्द्रमंडळांत गेले (१९२४-२७). पुढें १९४० मध्यें तेथें भोर संस्थानाला स्वतंत्र स्थान मिळालें. ९ तोफांच्या सलामीचा मान (१९२७), राजा ही पदवी (१९३५) व के. सी. आय. ई. (१९४१) हे बहुमान यांना प्राप्त झाले. युवराज असतां हिंदुस्थानच्या केलेल्या सफरींचीं दोन पुस्तकें आणि १९३० व १९३७ अशा दोन विलायतच्या सफरींचीं पुस्तकेंहि यांनीं प्रसिद्ध केलीं आहेत.

यांनीं राज्यांत कायदेमंडळ स्थापून (१९२८), त्यांत तेवीसांपैकीं तेरा लोकनियुक्त प्रतिनिधि घेऊन (१९४२) आणि लोकनियुक्तांपैकीं एक मंत्रि नेमून (१९४३ डिसें.) त्याकडे सोपीव खात्यांचा कारभार दिला आहे. तसेंच नगरपालिका वगैरे संस्था लोकांच्या ताब्यांत देऊन अस्पृश्य व स्त्रिया यांना सर्वत्र प्रतिनिधि दिले आहेत. यांनीं आपल्या खासगी खर्चाची रक्कम मंजुरीनें घेण्याचें ठरविलें आहे.

यांनीं राज्यांत प्राथमिक शिक्षण मोफत, राजा रघुनाथराव हायस्कूल व त्याला ब्याण्णव हजारांची इमारत, हर हायनेस जीजीसाहेब मराठी शाळेला एकोणीस हजारांची इमारत, हिज हायनेस शंकरराव मॅन्शन गेस्ट हाउसची चाळीस हजारांची इमारत, एक लक्ष शेहेचाळीस हजारांचा राणी लक्ष्मीबाई ब्रिज, श्रीमंत सौ. गंगूताईसाहेब वाचनालयाची पंचवीस हजारांची इमारत व संस्थानचे मूळ पुरुष शंकराजी नारायणांच्या समाधीची अठ्ठावीस हजारांची दगडी मेघडंबरी इत्यादि महत्त्वाचीं कामें केलीं.

याशिवाय अनेक गिरण्या व कारखाने राज्यांत काढण्यास उत्तेजन देण्यांत आलें असून मराठी साम्राज्याचा त्रिशत सांवत्सरिक उत्सव, नसरापुराजवळ चेलाडी येथें विजयस्तंभाचा पाया घालून यांच्या हस्तें करण्यांत आला.

यांच्या पहिल्या पत्नी श्रीमंत विंचुरकर घराण्यांतील होत्या. त्यांचे पुत्र युवराज श्रीमंत सदाशिवराव ऊर्फ भाऊसाहेब हे बी. ए. असून धार्मिक आहेत.

पागनीस, विष्णु दत्तात्रेय—(जन्म स.१८९२–मृत्यु स. १९४३) सुप्रसिद्ध सिनेमानट व तुकारामाच्या अभंगाचे गायक.

यांचें जन्मस्थान निपाणी. दे. कृ. ब्राह्मण. यांना मराठी लिहितां-वाचतां येण्यापलीकडे शिक्षण मिळालें नव्हतें. यांचा वयाच्या दहाव्या वर्षी कोल्हापूर येथें स्वदेशहितचिंतक-मंडळींत दरमहा तीन रुपयांवर प्रवेश झाला (१९०३). बनारसच्या राष्ट्रसभेच्या वेळीं झालेल्या संस्कृत शाकुन्तल नाटकाच्या प्रयोगांत केलेल्या अनुसूयेच्या भूमिकेबद्दल यांची विशेष वाहवा झाली (१९०५). कुंजविहारींतील राधेच्या कामामुळें हे अत्यंत लोकप्रिय झाले. १९०७ सालीं केशवराव भोसल्यांनीं ती मंडळी सोडली व त्यांचीं सर्व नायिकेचीं कामें यांच्याकडे आलीं. यांनीं जगच्चित्रदर्शन नांवाची स्वतःची नाटक मंडळी काढली होती (१९१३). पण ती चालली नाहीं. पुढें हे अनेक मंडळ्यांत हिंडले. १९१९ नंतर यांनीं रंगभूमीला कायमचा रामराम ठोकला. श्री. कुशाभाऊ पेठकर यांच्या भागींत पागनीस, पेठकर आणि मंडळी नांवाचें सोन्याचांदीचें दुकान काढलें. मुंबई म्युनिसिपालिटीच्या प्राथमिक शाळांत संगीत शिक्षकाची नोकरीहि यांनीं पुष्कळ वर्षें केली (१९२२-१९४१). परंतु हे उद्योग चालू असतां सिनेमासृष्टीशीं यांचा संबंध आला. महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या वत्सलाहरण व वरेरकरांच्या पुण्यावर हल्ला या चित्रपटांत काम केल्यावर यांना प्रभातच्या तुकाराम चित्रपटांत काम करण्याची संधि मिळाली. तुकारामाचें काम करण्यांत गणपतराव जोशी, शुक्ल वगैरेंनीं आजपर्यंत नांव कमावलें होतें. पण यांच्या सहज अभिनयानें व अभंग म्हणण्याच्या विशेष पद्धतीनें तुकारामाच्या चारित्र्याबरोबरच अभंगांतील गांभीर्य व आर्तता लोकांना नवीन लक्षांत आल्यासारखें वाटूं लागलें. यांनीं अभंग म्हणण्याची अगदीं नवी अर्थबोधक व स्पष्ट पद्धत उत्पन्न केली. या तुकारामाच्या कामामुळें या चित्रपटाचा जगांत तिसरा क्रमांक लागला. त्या कामाबद्दल म्हैसूरच्या महाराजांनीं यांना खास आमंत्रण देऊन यांचा सत्कार केला. कोणताहि संतपट काढतांना यांना नायक संताची भूमिका करण्याचें पाचारण येऊं लागलें. फार काय पण यांच्या दुकानाची विक्रीसुद्धां त्यामुळें वाढली.

पाटकर, सर सीताराम सुंदरराव—(जन्म स. १८७३–मृत्यु स. १९४६) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध समाजसेवक व निष्णात कायदेपंडित.

मुंबईच्या एल्फिन्स्टन व लॉ कॉलेजांत आपलें शिक्षण संपवून यांनीं मुंबई हायकोर्टांत वकिलीला सुरुवात केली (१८९७) व सर नारायण चंदावरकर यांच्या मार्गदर्शनाखालीं हे सरकारी वकील (१९१३), हायकोर्ट जज (१९२३) व हंगामी चीफ जस्टिस अशा पायऱ्या क्रमानें चढत गेले.

महाराष्ट्रांतील सुधारकांच्या नव्या परंपरेचे अग्रणी या नात्यानें यांनीं केलेली कामगिरीहि बरीच महत्त्वाची आहे. १९३१ सालीं यांना धों. के. कर्वे यांच्या इंडियन वुइमेन्स युनिव्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सेलर व त्याच्या पुढच्याच वर्षी चॅन्सेलर नेमण्यांत आले. विठ्ठलदास ठाकरसी यांच्या पत्नीनें देणगीची पंधरा लक्ष रु.ची रक्कम कांहीं कायदेशीर मुद्द्यावरून नाकारल्याच्या प्रसंगी केवळ यांच्या धीरगंभीर व धोरणी वागण्याच्या पद्धतीमुळें त्या युनिव्हर्सिटीचा कारभार पुन्हा मार्गावर आला. यांना बॉम्बे प्रेसिडेन्सी सोशल रिफॉर्म्स असोसिएशनचेंहि अध्यक्ष निवडण्यांत आलें होतें.

सरकारी नोकरींत असूनहि स्वत्व राखण्याचें यांचें धोरण असे. अफगाणिस्तानचे राजे अमानुल्ला यांच्या सत्काराचे प्रसंगीं साहेबी शिरस्त्राणाऐवजीं पगडी घालण्याच्या यांच्या आग्रहामुळें यांची नाइटहुड १९३९ पर्यंत लांबली, ही गोष्ट सर्वविश्रुत आहे.

पाटणकर, परशुराम नारायण—(जन्म स. १८६०–मृत्यु स. १९२९) मराठी, इंग्रजी व संस्कृत लेखक व अभ्यासक.

जन्मस्थान चास कमान, जि. पुणें. हे बी. ए. (१८८५) व एम्. ए. (१९०५) झाले. यांनीं न्यू इंग्लिश स्कूल, पुणें; होळकर कॉलेज, इंदूर; माधव कॉलेज, उज्जयनी; सेन्ट्रल हिंदु कॉलेज व हिंदु विश्वविद्यालय बनारस वगैरे ठिकाणीं काम केलें. यांचें संस्कृत, मराठी व इंग्रजी भाषांवर चांगलें प्रभुत्व असे. यांनीं धर्मसंगति नांवाचें संस्कृत मासिक कांहीं वर्षें चालविलें. यांनीं जयद्रथवधावर वीरधर्मदर्पणम् नांवाचें संस्कृत नाटक लिहिलें तें अजमेर बोर्डानें इंटरच्या परीक्षेस लावलें होतें. इंग्रजींत यांनीं हिंदुधर्मविषयक सातआठ पुस्तकें लिहिलीं. शिवाय मराठी भाषेच्या माहेराचें समालोचन, भारतीय नाट्यशास्त्रासंबंधींचे विचार, समवृत्त गीतगोविंद, ब्रह्मोद्धार गाथा इत्यादि यांचें लिखाण प्रसिद्ध आहे.

पाटणकर, माधवराव नारायण—(जन्म स. १८६२–मृत्यु स. १९१६) नट व नाटककार.

यांचा जन्म विटें (सातारा जि.) येथें झाला. इंग्रजी चवथीपर्यंतचें शिक्षण व थोडेंसें वेदाध्ययन झाल्यावर हे मुंबईस मामाकडे राहूं लागले. परंतु तेथें यांना गाणें व नाटकें यांचा नाद लागून यांनीं एक क्लबहि सुरू केला. स. १८८४ सालीं या क्लबाचें नाटक मंडळींत रूपान्तर होऊन गांवोंगांवीं खेळ होऊं लागले. परंतु स. १८९० सालीं मंडळीचा मुक्काम बेळगांवीं असतांना यांच्या एका नाटककारास योग्य वेळीं पैसे न मिळाल्यामुळें त्यानें यांना सरकारी हुकुमावरून नाटक बंद करावयास लावलें. त्यामुळें इतःपर स्वतः नाटकें लिहून तीं करण्याचें यांनीं ठरविलें. यांनीं एकूण २४ नाटकें लिहिलीं. त्यांपैकीं ' विक्रम-शशिकला ' या नाटकानें लोकांच्या अभिरुचीस नवीन वळण लागल्यानें यांना पुष्कळसा पैसा मिळून यांच्या मंडळीची दिवसेंदिवस प्रगति होऊं लागली. यांच्या नाटकांत मराठी–' सैरन्ध्री ', ' द्रौपदीवस्त्रहरण ', ' रणछोडराय ' ' सत्यविजय, ' हिन्दी व गुजराथी–' मानसन्मान ', 'तुकाराम', 'संत तुलसीदास', हिन्दी–' कनक-कान्ता' वगैरे नाटकें प्रमुख होत.

नाटकांतील स्वतः यांचें काम स्वाभाविक अभिनयानें होत असे. विशेषतः यांची रागाची भूमिका बहारीची असे. प्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा यांनीं आपलीं चित्रें प्रसिद्ध करतांना यांच्याकडून मुद्दाम पोझिशन्स घेतल्या आहेत. त्यांपैकीं ' गंगावतरण ' या चित्रांतील शङ्कराचें चित्र यांचें आहे. यांना ग्वाल्हेराधिपति माधवराव शिंदे यांनीं बरीच आर्थिक मदत दिली.

किर्लोस्करांनंतर संगीत नाटकांत यांनीं आमूलाग्र स्थित्यन्तर केलें. नाटकांतील पदें, भाषा, कथानक व चाली यांना अगदीं साधें रूप देऊन तीं अगदीं तमाशाच्या उथळ दर्जाला आणून पोंचविलीं. तीं सामान्य लोकांना कळण्याइतपत उथळ झालीं आणि त्यांतील काव्य किंवा गायन नष्ट झालें. यांचीं नाटकें संगीत नाटकाचें विडंबन होय. मात्र यांच्यासारखे अभिनयकुशल लोक त्यावर कांहीं काल जगले. पण घटकाभर करमणुकीखेरीज मनावर स्थायी परिणाम व वाङ्मयांत भर हे दोन्ही उच्च वाङ्मयाचे परिणाम यांना साधतां आले नाहींत.

पाटील, नाना—(जन्म स. १९००) सातारा जिल्ह्यांतील प्रतिसरकार किंवा ' पत्रीसरकार ' या संघराज्याचे जनक व सुप्रसिद्ध काँग्रेस कार्यकर्ते.

सातारा जिल्ह्यांतील सादेमविंद्रे जवळील येडेमविंद्रे हें गांव यांचें जन्मस्थान. यांचें घराणें वारकरी असून वडिलांचा पेशा पाटिलकीचा असे. यांच्या वडिलांचें नांव रामचंद्र. मुलकी परीक्षा पास होतांच हे तलाटी बनले. याच सुमारास (१९३०) सुरू झालेल्या काँग्रेसच्या चळवळींत हे सहजच खेंचले गेले व महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमेटींत निवडून जाऊन हे प्रत्यक्ष काँग्रेस कार्य करूं लागले.

१९४२ च्या ' चले जाव ' चळवळींत स्थानबद्ध होण्यापेक्षां बाहेर ' भूमिगत ' म्हणून राहण्याचा मार्ग यांनीं व यांच्या सहकाऱ्यांनीं स्वीकारला. सातारा जिल्ह्यांतील ' पत्रीसरकार ' ही यांच्या भूमिगत जीवनाची फलश्रुति असून त्या सर्व कार्यांत यांनीं दाखवलेलें संघटनाकौशल्य स्पृहणीय आहे.

१९४२ च्या ' चले जाव ' चळवळींत संयुक्त प्रान्त, बंगाल व बिहार या प्रान्तांत अनुक्रमें बरिया, गाझीपूर, मिदनापूर-महिषदल व वटीपेरा या जिल्ह्यांत संघराज्यें स्थापन झालीं होतीं. महाराष्ट्राच्या कर्जत खोऱ्यांतील भाई कोतवाल यांच्या नेतृत्वानें स्थापन झालेलें संघराज्यहि प्रसिद्ध आहे. या सर्वांमध्यें यांच्या नेतृत्वाखालीं झालेली सातारची उठावणी दीर्घकाल टिकली.

रूढ सरकारी राजवट बंद पाडण्यासाठीं आक्रमक चळवळी आखाव्यात, सरकारी हेरगिरी करणारास शिक्षा द्यावी व खेड्यांतील पाटीलतलाठ्यांस जबरीनें सारा वसूल न करण्याची सूचना द्यावी अशा प्रकारचा यांचा सुरवातीचा कार्यक्रम होता. यांपैकीं पहिला कार्यभाग तर इतका सुव्यवस्थितपणें पार पाडला गेला कीं कोणत्याहि खेड्यांत पोस्ट ऑफिसें व पोलिस स्टेशनें टिकून राहणें मुष्कील झालें. तालुक्याच्या गांवींसुद्धां बंदुकीशिवाय कोणताहि व्यवहार करणें सरकारला अशक्य झालें.

परंतु यापेक्षांहि हेरांना शिक्षा देण्याचा यांनीं शोधून काढलेला मार्ग अभिनव होता. तळपायाला काठीचे फटके मारण्याची यांनीं सुचवलेली कल्पना व त्यास ' पत्री ठोकणें ' हें यांनीं दिलेलें नांव इतकें प्रसिद्ध झालें कीं यांच्या संघराज्यालाहि ' पत्रीसरकार ' असेंच नांव मिळालें. बापुराव देशमूख दुधारे यांचे तर त्यांच्या दुष्कृत्याबद्दल पाय तोडण्यांत आले. मात्र या सर्व व्यवहारांत गुन्हेगाराला शिक्षा देणें यापेक्षां दुसरी भावना यांनीं कधींच ठेवली नाहीं.

परंतु ग्रामराज्याची स्थापना हें यानंतर यांनीं केलेलें

कार्य अधिक महत्त्वाचें आहे. खेड्यांतील परकी सत्ता नामशेष करून त्यांना स्वयंपूर्ण बनवावें व त्यांचा सर्व कारभार नागरिकांच्या हातीं द्यावा ही यांची ग्राम-राज्याची स्थूल कल्पना होती. लोकांनीं निवडून दिलेल्या पंचांनीं त्या त्या खेड्याचा कारभार पाहावयाचा व अगदींच नडलें तर भूमिगत लोकांनीं त्यांना मदत करावयाची अशी कार्यपद्धति यांनीं सुरू केली. कऱ्हाड, वाळवें, कान्हापूर, तासगांव इत्यादि महत्त्वाच्या ठिकाणीं अशा पंचसभा स्थापन झाल्या. कोरेगांव, पाटण व सातारा येथें गेलीं पंधरा वर्षें बेकायदेशीरपणें गाळली जाणारी दारू फक्त चार महिन्यांत यांनीं कायमची बंद केली.

क्रांतिवादाचें अगदीं आधुनिक स्वरूप या दृष्टीनें आपणांस यांच्या या कार्याकडे पाहिलें पाहिजे. कांहीं-तरी करावयाची तळमळ व लोकांची सहानुभूति यांचे जोरावर यांच्यासारख्या पैसे, विद्या, अनुभव या सर्वच दृष्टींनीं अपूर्ण असणाऱ्या माणसानें केलेलें कार्य नवी दिशा दाखवून देणारें आहे. डोक्यावर पोलिसाची टांगती तलवार व छातीवर घरभेद्यांचें पिस्तुल सदा रोखलेलें असतां केवळ सहकाऱ्यांचा विश्वास व लोकांचें प्रेम यांचे बळावर हे कार्य करूं शकले.

कॉंग्रेस मंत्रिमंडळें अधिकारारूढ झाल्यावर (१९४६) ताबडतोब यांच्यावरील वॉरंट रद्द करण्यांत आलें. परंतु आपल्या सर्व सहकाऱ्यांवरील वॉरंटें रद्द होईपर्यंत हे भूमिगत अवस्थेंतच राहिले व तो हुकूम रद्द होतांच आपल्या १४७ भूमिगत व २७ बंदिस्त सहकाऱ्यांसह मोठ्या समारंभानें कोरेगांवला प्रगट झाले.

पाटील, भाऊराव पायगौंडा—(जन्म स. १८८७) साताऱ्याच्या रयतशिक्षण संस्थेचे संस्थापक, सामाजिक समतेचे सक्रिय पुरस्कर्ते व बहुजन समाजांत आत्मविश्वास उत्पन्न करणारे महापुरुष.

यांचा जन्म कोल्हापूर संस्थानांतील कुंभोज गांवीं झाला असला तरी यांचें गांव सातारा जिल्ह्यांतील ऐतवडें बुद्रुक होय. यांचें घराणें धर्मानें जैन. कोल्हापुरच्या जैन वसतिगृहांत राहून यांनीं इंग्रजी सहावीपर्यंत शिक्षण घेतलें (१९०२-१९०८). तेथें असतां छत्रपति शाहू महाराजांशीं यांचा परिचय झाला आणि महाराजांचे मेहुणे मामासाहेब खानविलकरांचे जोडीदार म्हणून राजवाड्यांत दोन वर्षें राहण्याचा यांना योग आला. शिक्षण बंद झाल्यावर प्रथम ओगले व नंतर किर्लोस्कर यांच्या कारखान्याचे विक्रेते म्हणून यांनीं काम करण्याकरितां हिंदुस्थानभर प्रवास केला (१९१४-१९२२).

त्याच कालांत प्रथम सत्यशोधक व नंतर ब्राह्मणेतर चळवळींत पुढाकार घेऊन हे सर्वत्र परिचित झाले (१९१३-१९२३). भव्य शरीर, खणखणीत आवाज आणि निकोप युक्तिवाद यांमुळें यांचें वक्तृत्व परिणामकारक असे. पण केवळ वक्तृत्वानें खऱ्या कार्यकर्त्यांचें समाधान होत नाहीं. शिक्षण हें सर्व सुधारणांचें मूळ आहे; जोंपर्यंत आपल्या देशांतील शेंकडा ९० पेक्षां अधिक लोक खेड्यापाड्यांतून अज्ञानांत पिचत आहेत तोंपर्यंत आपल्या देशाचा खरा उद्धार होण्याची आशा नाहीं, अशी मनाची खात्री होतांच यांनीं बहुजन समाजाला शिक्षित करण्याचे प्रयत्न आरंभिले. प्रथम आपले इतर व्यवसाय संभाळून यांनीं दुधगांव शिक्षण-प्रसारक संस्था काढली (१९०९). कारखान्याशीं सहकार्य करून मदतीचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. पण शेवटीं यांनीं या कार्यास सर्वस्वीं वाहून घ्यावयाचें ठरविलें. यांनीं स. १९१९ सालीं कालें (कऱ्हाड) येथें 'रयत-शिक्षण-संस्था' स्थापन करून त्या संस्थेमार्फत सातारा येथून यांनीं आपल्या कार्यास जोरानें सुरुवात केली. एका विद्यार्थ्यापासून सुरुवात केलेल्या वसतिगृहास (१९२४) यांनीं म. गांधींच्या हस्तें 'श्रीछत्रपति शाहू बोर्डिंग हाउस' असें नांव दिलें (१९२७). यांत १९४५ च्या अखेरीस सर्व जातींचे मिळून ४२८ विद्यार्थी होते. यांतून आजपर्यंत २०० विद्यार्थी मॅट्रिक व ४४ पदवीधर झाले व त्यांपैकीं १९ या संस्थेचे आजीव सभासद होऊन या संस्थेचें काम चालवीत आहेत. येथून मॅट्रिक झालेले विद्यार्थी कॉलेज शिक्षणाकरितां पुणें येथें राहतात. त्याकरितां 'युनियन बोर्डिंग हाउस' स्थापन झालें आहे (१९३२). यानंतर प्राथमिक शिक्षक तयार करण्याकरितां 'सिल्व्हर ज्युबिली रूरल ट्रेनिंग कॉलेज' सुरू करण्यांत आलें (१९३५). त्यांत १९४५ अखेर एक हजार शिक्षक तयार करण्यांत आले. याला जोडून 'रा. ब. काळे स्मारक प्रॅक्टिसिंग स्कूल' नांवाची मोफत शिक्षण देणारी मराठी शाळा सुरू केली (१९३६). याला शेतकी शिक्षणाचीहि जोड देण्यांत आली आहे. अशा प्रकारें पाहिजे तसे शिक्षक तयार होऊं लागतांच जेथें शाळा नव्हत्या अशा खेड्यांत यांनीं प्राथमिक शाळा काढण्यास सुरुवात केली (१९३८). १९४५ अखेर अशा चारशें शाळा असून त्यांत पंधरा हजार मुलेंमुली

शिक्षण घेत आहेत. नंतर यांनीं 'सयाजीराव फ्री अँड रेसिडेन्सियल हायस्कूल' सुरू केलें (१९४०). स्टोअर, ग्रंथालय, सहकारी संस्था वगैरे आवश्यक गोष्टींची जोड देऊन मुलींच्या करितां 'जिजामाता अध्यापिका विद्यालय' व 'लक्ष्मीबाई पाटील वसतिगृह' (१९४२). उघडण्यांत आलें आणि सातारा येथें 'छत्रपति शिवाजी कॉलेज' काढण्याची परवानगी मिळवली. हें कॉलेज सायन्स शिकविणारें, मोफत व तेथें राहणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकविणारें आहे.

यांच्या संस्थांचें वार्षिक अंदाजपत्रक तीस रुपयांपासून तीन लक्षांपर्यंत गेलें आहे. संस्थेंत तयार झालेले लोकांनीं मिळेल तें वेतन व पडेल तें काम या धोरणावर संस्थेचे आजीव सभासद होऊन संस्थेचा भार स्वतःवर घेतला आहे. संस्थेंत जातिभेद, धर्मभेद वगैरे बिलकूल मानण्यांत येत नसून खानपानादि सर्व व्यवहार समानतेनें करण्यावर कटाक्ष आहे. हिंदु-मुसलमान, स्पृश्य-अस्पृश्य व श्रेष्ठ-कनिष्ठ या भेदांचा संस्थेनें नायनाट केला असून पांढरपेशांपेक्षां शेतकरी, कामकरी वर्गांतील लोकांचा भरणा संस्थेंत विशेष आहे. त्यामुळें ही संस्था बहुजन समाजांत शिक्षणप्रसाराबरोबर सर्व तऱ्हेचा आत्मविश्वास उत्पन्न करण्याचें काम उत्कृष्टपणें करीत आहे. केवळ शिक्षणप्रसारापेक्षां शिक्षण नसलेल्यांना शिक्षण देणें व तेंहि राष्ट्राची गरज लक्षांत घेऊन आवश्यक असें देण्यावर संस्थेचा कटाक्ष आहे. तसेंच केवळ शिक्षणापेक्षां वसतिगृहांची योजना करून सर्व जातीचे शिक्षक व विद्यार्थी यांना चोवीस तास एकत्र राहून सर्व व्यवहार समानतेनें करण्याची व्यवस्था केलेली आहे. त्यामुळें आपल्या कल्पना व्यवहारांत आणण्याची संधि मिळते व अनेक सामाजिक प्रश्नांचा आपोआप उलगडा होतो.

पाठक, काशीनाथ बापूजी—(जन्म स.१८५०–मृत्यु स. १९३२) जैन वाङ्मयाचे सुप्रसिद्ध संशोधक व शिलालेखज्ञ.

१८७७ त बी. ए. झाल्यानंतर हे बेळगांवच्या सरदार हायस्कुलांत शिक्षकाचें काम करूं लागले. याच सुमारास फ्लीट यांचे हिंदी शिलालेखांवरील इंडियन ॲन्टिक्वेरींतील लेख यांच्या वाचनांत आले व त्यांतील दोषस्थलें दाखवण्याच्या निमित्तानें हे संशोधनकार्यांत शिरले. इंडियन ॲन्टिक्वेरींतील यांचे सुरवातीचे लेख वाचूनच फ्लीट यांनीं यांना आपल्या सहकाऱ्याची जागा देऊं केली. परंतु यांनीं ती नाकारली व आपला शिक्षकाचा पेशा चालू ठेवला.

पुढें मिरजेच्या राजेसाहेबांच्या शिक्षकांची जागा यांना देण्यांत आली (१८८४) व त्या निमित्तानें कोल्हापूरच्या सरस्वती भांडारांतील जैन वाङ्मयाचें अध्ययन करण्याची संधि यांना मिळाली. यांचें हें अध्ययन पुढें इतकें वाढलें कीं यांना या विषयांतील तज्ज्ञ मानण्यांत येऊं लागलें.

यानंतर म्हैसूर सरकारच्या आर्किऑलॉजिकल डिपार्टमेन्टमध्यें कांहीं दिवस काम केल्यानंतर यांची पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत संस्कृतचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. या जागेवरून पुढें हे कार्यनिवृत्त झाले (१९०८).

जैन वाङ्मयांतील जुने ग्रंथ व शिलालेख यांचा यांनीं अतिशय सूक्ष्म अभ्यास केला होता. याच कारणानें या विषयावर यांनीं लिहिलेल्या ग्रंथांना व निबंधांना जगाच्या संशोधन-क्षेत्रांत मान मिळे. १८९३ सालीं लंडन येथें भरलेल्या इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑफ ओरिएन्टॅलिस्ट्सच्या नवव्या अधिवेशनांत यांनीं Position of Kumarila in Digambar Jain Literature हा निबंध पाठविला. या निबंधांतील मूलग्राही संशोधनाचे अध्यक्ष मॅक्स मूलर व फ्लीट, ल्यूमन इत्यादि पंडितांनीं मनापासून स्वागत केलें. शंकराचार्यांच्या काळासंबंधीचें यांचें संशोधनहि असेंच महत्त्वाचें आहे.

परंतु यापेक्षांहि फ्लीट यांच्या ३१९-२० या गुप्त कालाच्या संशोधनाला यांनीं जैन वाङ्मयांतील संशोधनानें पुरविलेले आधार विशेष महत्त्वाचे आहेत. स्वतः फ्लीट ह्यांनीं यांच्या या मदतीचा उल्लेख पुढें अनेक वेळां केला.

यांनीं संशोधून प्रसिद्ध केलेल्या शिलालेखांची संख्या वीस असून लिहिलेल्या निबंधांची संख्या पन्नासांपेक्षां अधिक आहे. Inscriptions in the Kanarese Districts of Bombay Presidency या विषयावर व्याख्यान देण्यासाठीं यांना मुंबई युनिव्हर्सिटीनें भगवानलाल इंद्रजी लेक्चरर निवडलें होतें (१९०८).

यांचे उणादि सूत्रें पाणिनीची असल्याबद्दलचा निबंध व तसेंच कीलहार्नच्या महाभाष्यांतील त्रुटित भागाचे संशोधन करणारे निबंधहि यांच्या सूक्ष्म बुद्धीचे द्योतक आहेत.

पुण्याच्या भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूटनें

यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त एक सत्कार ग्रंथ यांना अर्पण केला (१९३४).

यांचे ग्रंथ—(१) कालिदासाचें मेघदूत (जिनसेनाच्या परस्वाभ्युदयावरून संशोधित), (२) नृपतुंगाचा 'कविराजमार्ग' (१८९८).

पाठक, श्रीधर—(जन्म स. १८६० जाने. ११–मृत्यु स. १९२८) हिन्दी भाषेंतील उत्कृष्ट कवि.

जन्मस्थान जोन्धरी, आग्रा जिल्हा. हे मूळचे पंजाबांतील सारस्वत ब्राह्मण. यांचें घराणें शास्त्रीपंडितांचें असल्यानें हे प्रथम थोडे संस्कृत शिकले. नंतर फारसी शिकले. नंतर एंट्रन्सची परीक्षा उत्तीर्ण होऊन कलकत्ता येथें सेन्सस कचेरींत कामास लागले (१८८०). शेवटीं हिंदुस्थान सरकारच्या दप्तरांत सुपरिंटेंडेंटच्या जागेवरून सेवानिवृत्त झाले. इंग्रजी उत्तम लिहिण्याबद्दल यांची प्रसिद्धि होती. नंतर प्रयाग येथें 'पद्मकोट' नांवाचा सुंदर बंगला बांधून राहत. यांना कविता करण्याचें व्यसन होतें. व्रजभाषा व खडीबोली या हिन्दीच्या दोन्ही प्रकारांत हे कविता लिहीत. भाषेची अत्यंत सफाई व स्वतंत्रता हे यांचे विशेष गुण होत. यांना आधुनिक जयदेव म्हणत. यांनीं कांहीं नवीन छंद (वृत्त) प्रचारांत आणले. यांचें एकान्तवासी योगी हें काव्य तर लावणीच्या चालीवर आहे.

यांचे ग्रंथ—१ आराध्य शोकाञ्जलि (पितृशोक), २ श्रीगोखलेप्रशस्ति, ३ एकान्तवासी योगी, ४ ऊजडग्राम, ५ श्रान्त पथिक, ६ जगतसचाईसार, ७ काश्मीरसुषमा, ८ मनोविनोद, ९ श्रीगोखलेगुणाष्टक, १० देहरादून, ११ तिलिस्माती सुंदरी, १२ गोपिकागीत, १३ भारतगीत.

पाठक, महामहोपाध्याय-श्रीधरशास्त्री त्र्यंबक—(जन्म स. १८७७) सुप्रसिद्ध संस्कृत पंडित, लेखक व वक्ते.

हे पूर्व खानदेशांतील पारोळ्याचे राहणारे. यांचें शिक्षण इंदूर व काशी येथें झालें. हे शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे आहेत. यांचा व्याकरण, वेदान्त, धर्मशास्त्र वगैरेंचा चांगला व्यासंग आहे. हे शास्त्री म्हणून सरकारी हायस्कुलांत व कॉलेजांत काम करून सेवानिवृत्त झाले. नंतर हे धुळें येथें राहतात. यांनीं संन्यास घेऊन शंकरानंद असें नांव धारण केलें आहे.

हे धर्मपरिवर्तनवादी असून अस्पृश्यतेला शास्त्रांत आधार नाहीं म्हणून म. गांधींनीं येरवडा तुरुंगांतून काढविलेल्या पत्रकाला यांची मान्यता होती.

यांनीं वेदशास्त्रोत्तेजक सभा व भांडारकर ओरि. रिसर्च इन्स्टिट्यूट तर्फे व्याख्यानें दिलीं व १९२४ सालीं प्रयाग येथें भरलेल्या व सोनगीर येथें भरलेल्या भारतीय पंडित परिषदेस हे उपस्थित होते.

यांचे ग्रंथ—संस्कृत–१ ईश, २ केन, ३ कठ, ४ मुण्डक, यांवर बालबोधिनी टीका, ५ महाभाष्यशब्दकोशः (सहकार्यानें). मराठी–६ शुक्ल यजुर्वेदाचें मराठी भाषान्तर, ७ नित्यविधि, ८ अस्पृश्यतानिवारणाचा शास्त्रार्थ. याशिवाय यांनीं अनेक निबंध व भाषान्तरें केलीं आहेत.

पाठारे, आत्माराम मोरेश्वर—(जन्म स.१८६८ १० ऑक्टोबर–मृत्यु स. १९३१) मराठी कवि व नाटककार.

यांचा जन्म ठाण्यास झाला. यांचे आजोबा महाड येथें सब्-जज्ज होते व चुलते जगन्नाथपंतहि ठाण्यास जी. आय. पी. रेल्वे आल्यावर तेथील पहिलेच स्टेशनमास्तर झाले होते. लहानपणींच वडील व चुलते वारल्यामुळें यांची स्थिति अत्यंत हालाकीची झाली. परंतु तींतहि मामाच्या आधारामुळें यांचें थोडेंफार मराठी व इंग्रजी शिक्षण झालें. त्यानंतर चित्रकलेच्या अभ्यासासाठीं हे 'स्कूल ऑफ आर्ट'मध्यें जाऊं लागले. पण पुढें कौटुंबिक परिस्थितीमुळें हा अभ्यास अर्धवट सोडून देऊन यांना मुंबईच्या शिवाजी स्कूलमध्यें शिक्षकाची नोकरी धरावी लागली. यानंतर यांनीं नाटकेंहि लिहिण्यास प्रारंभ करून प्रथम 'मार्कंडेय' हें पौराणिक नाटक व नंतर स. १८८८ त 'सं. वसंतइंदिरा' हें अशीं दोन नाटकें लिहिलीं. यांशिवाय 'भिक्षीणी', 'महानन्दा' व 'मद्यपाननिषेध' (मुंबई मद्यपाननिषेध मण्डळानें १९०८ सालीं बक्षीस दिलेलें) अशीं तीन काव्येंहि यांनीं लिहिलीं. त्यानंतर स. १९२० मध्यें 'संगीत संभाजी' हें नाटक लिहून यांनीं फार प्रसिद्धि मिळविली. यांतील वीररस, तेजस्वी भाषा व प्रभावी विचारसरणी यांचा श्रोतृवृन्दावर बराच परिणाम होई. पण स. १९१२ त तें सरकारी रोषास पात्र होऊन जप्त झालें. या नाटकाप्रमाणेंच यांच्या 'रणसिंह बाजी' याहि प्रसिद्ध नाटकास सरकारनें मनाई केली. 'भक्त

नरहरी' या यांच्या नाटकास आगाऊ जाहीर करण्यांत आलेलें २०० रु.चें बक्षिस मिळालें होतें. तसेंच किर्लोस्कर नाटक मंडळीनें उत्तम नाटकें मागविलीं त्या वेळीं यांच्या 'नीतिसंहति' या नाटकाचा क्रमांक दुसरा लागला.

पादशहा, बी. जे.—(जन्म स. १८६४–मृत्यु स. १९४१) सुप्रसिद्ध औद्योगिक द्रष्टे व टाटा उद्योग-धंद्याच्या निर्मात्यांपैकीं एक.

एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें आपलें शिक्षण संपवून हे उच्च शिक्षणासाठीं इंग्लंडला गेले. तेथून परत आल्यानंतर यांची कराचीच्या सिंध कॉलेजमध्यें प्रथम प्राध्यापक व नंतर व्हाइस प्रिन्सिपल म्हणून नेमणूक झाली. याच वेळीं यांचा जमशेटजी नसरवानजी टाटांशीं संबंध आला. यांच्या सूचनेवरून टाटांना एक रिसर्च इन्स्टिट्यूट काढण्याची कल्पना सुचली व त्यांच्या सूचनेवरून हे या कल्पनेची शक्याशक्यता अजमावण्याच्या हेतूनें परदेशांत पाहणी करून आले. नंतर 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' ही टाटा साहसांतील महत्त्वाची संस्था उभारली गेली.

टाटा आयर्न ॲन्ड स्टील वर्क्सची संपूर्ण आंखणीहि यांचीच आहे. टाटांच्या सूचनेवरून हे बंगालमध्यें गेले, प्रमथनाथ बोस यांनीं सुचविलेल्या खाणींच्या संभाव्य जागा यांनीं तपासल्या व सर्व दृष्टींनीं सोयिस्कर वाटणारी कारखान्याची सध्यांची जागा सर दोराब टाटा यांच्या सहकार्यानें यांनीं कायम केली. टाटांच्या हायड्रो-इलेक्ट्रिक वर्क्स व ऑइल मिल्सचें प्राथमिक कार्यहि यांच्याच हस्तें पार पडलें. टाटांच्या न्यू इंडिया इन्शु-अरन्स कं.चे तर हे प्रमुख संस्थापकच होते.

परंतु यापेक्षांहि टाटांच्या कापडाच्या गिरण्यांच्या देवघेवीच्या काळांत यांची टाटांना बहुमोल मदत झाली. गिरण्या चालविणें, त्यांची खरेदी-विक्री करणें, नव्या गिरण्यांची आंखणी करणें यांतील हे दर्दी समजले जात. या विषयावर यांनीं कांहीं पुस्तिकाहि लिहिल्या आहेत.

यांना 'टाटांचे उजवे हात' असा लोक मान देत. सुशिक्षित, चार लोकांत सफाईनें व्यवहार करणाऱ्या माणसांची प्रत्येक कारखानदाराला नेहमींच जरूरी असते. टाटांच्या 'आउट-डोअर' कार्याला मिळालेल्या यांच्यासारख्या लोकांचा टाटांच्या उज्वल यशांतील वांटा निःसंशय मोठा आहे.

पारख, बळवंत खंडूजी—(जन्म स. १८५१–मृत्यु स. १९०४) मराठींतील शीघ्रकवि व ग्रंथ-संग्राहक.

यांचें जन्मस्थान ओझर (जि. नाशिक). यांचें मराठी सहावीपर्यंत शिक्षण झाल्यावर यांनीं शिक्षण व पोलीसखात्यांत नोकरी केली व अधिकाऱ्यांशीं बेबनाव झाल्यानें यांनीं राजीनामा दिला. सुभाषितें व ग्रंथ यांचा संग्रह करण्याचा यांना नाद असे. यांचा ग्रंथसंग्रह अपूर्व होता. तसेंच यांना जुन्या मराठी कवींच्या कविता प्रकरणेंच्या प्रकरणें ओळीनें म्हणण्याइतक्या पाठ येत. यांच्या व्याख्यानासहि त्यामुळें रंग चढे. हे तत्कालीन प्रचलित विषयावर कटाव, फटके, फार काय श्लोक व आर्यासुद्धां तात्काळ करीत. यांनीं आपल्या या गुणानें अनेक संस्था व राजेमहाराजे यांच्याकडून पोषाख व बक्षिसें मिळविलीं. यांचें मुद्रित वाङ्मयहि पुष्कळ आहे. ज्ञानेश्वरचरित्र, विष्णुसहस्रनाममंजिरी, जयवर्णन, वज्रेश्वरीचरित्र, दादाभाई नवरोजी, वेरूळच्या लेण्यांचें वर्णन वगैरे त्यांत प्रमुख होत.

पारसनीस, रा. ब. दत्तात्रय बळवंत—(जन्म स. १८७० नवं. २७–मृत्यु स. १९२६) प्रसिद्ध इतिहाससंशोधक, संग्राहक, लेखक व चतुरस्र कार्यकर्ते.

यांचा जन्म व मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण सातारा येथें झाले. शाळेंत असल्यापासूनच यांना लेखनवाचनाचा नाद होता व वादविवादसभेंतहि हे भाग घेत. शिक्षण सुटल्यानंतर यांचें इतिहाससंशोधनाकडे लक्ष वेधलें. १८८७ सालीं यांनीं सुरू केलेलें 'महाराष्ट्र कोकीळ' मासिक बरेंच लोकप्रिय होतें. त्यांतील लेखांवरून यांना तेव्हांपासून ऐतिहासिक माहिती व अस्सल कागदपत्रें गोळा करण्याचा नाद होता असें दिसतें. झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाई यांचे दत्तक पुत्र दामोदरपंत यांचा यांना प्रत्यक्ष सहवास लाभला. यांनीं त्यांच्याकडून माहिती मिळवून सरकारी व बिनसरकारी देशीपरदेशी माहिती एकत्र करून आपल्या इतिहाससंशोधन व लेखन या कार्यास सुरुवात केली. यांनीं लिहिलेलें लक्ष्मी-बाईचें चरित्र मराठींत अनेक दृष्टींनीं वैशिष्ट्यपूर्ण आहे. तेव्हांपासून यांनीं अस्सल कागदपत्र, वस्तु, चित्रें वगैरेंच्या संग्रहापासून संपादन, लेखन, प्रसिद्धीकरण, संकलन वगैरे अनेक दृष्टींनीं अत्यंत महत्त्वाची काम-गिरी केली.

१९०२ सालीं हे कोल्हापूरकर छत्रपतीबरोबर इंग्लंडला जाऊन आले. तिकडील अनेक संग्रहालयें व संस्था यांनीं पाहिल्या. यांच्या जवळ जमत चाललेला संग्रह अभ्यासकांच्या उपयोगाला यावा अशी यांची इच्छा होती. यांनीं त्या दृष्टीनें चांगलें ग्रंथालय व वस्तुसंग्रहालय काढण्याची खटपट सुरू केली. २९ आगस्ट १९१४ रोजीं असें संग्रहालय स्थापण्याचा मुंबई सरकारचा ठराव प्रसिद्ध झाला. पण इमारत बांधणें वगैरे काम पहिल्या महायुद्धामुळें तहकूब झालें. ३ नवं. १९२५ रोजीं मुंबईचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन यांच्या हस्तें सातारा येथें मुद्दाम बांधलेल्या नव्या इमारतींत यांच्या कागदपत्रांच्या विभागाचें उद्घाटन झालें. या पारसनीस म्युझियममध्यें तीस हजार मराठी, चार हजार इंग्रजी कागदपत्रें व तीन हजार इंग्रजी ग्रंथ होते. त्याचा मोबदला म्हणून यांना २०० रु. दरमहा नेमणूक वंशपरंपरेनें देण्यांत आली. पुढें हे लवकरच वारले आणि तो संग्रह आतां पुणें येथें डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च इन्स्टिटयूटच्या ताब्यांत देण्यांत आला आहे.

पेशवे दप्तरांतील निवडकपत्रें अलीकडे ४५ भागांत प्रसिद्ध झालीं. त्यांपैकीं पुष्कळ पत्रें आधींच यांनीं तेथें जाऊन निवडून व नकलून ठेवलेलीं होतीं. त्या वेळीं यांना तीं सर्व प्रसिद्ध करणें शक्य झालें नाहीं.

यांच्या इतिहासक्षेत्रांतील कार्यास खरे व राजवाडे यांच्यापूर्वी सुरुवात झाली. त्या क्षेत्रांतील यांची कामगिरी विविध आणि प्रचंड स्वरूपाची आहे. त्या कामीं यांचा प्रथम डेक्कन व्ह. ट्रा. सोसायटीशीं घनिष्ठ संबंध होता. मुंबईचे पुरुषोत्तम विश्राम मावजीशेठ, राजेमहाराजे व मुंबई सरकार यांचेंसुद्धां साहाय्य यांनीं संशोधन, संग्रह व प्रकाशन या कामीं मिळविलें. यांची राहणी खानदानी, बुद्धि मूलगामी, काम करण्याची पद्धत सुबक व भाषाशैली चित्तवेधक नि मनोहारी असे. इतकें प्रचंड काम करतांना उपयुक्तता व व्यावहारिक दृष्टि यांनीं कायम ठेवली. निष्कारण बडेजाव कधीं मिरवला नाहीं. संयम राखून तन्मयतेनें हातीं घेतलेलें काम पार पाडण्याचा यांचा गुण वाखाणण्यासारखा होता.

यांचें वाङ्मय—मराठी–१ कीर्तिमंदिर १८९०, २ झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांचें चरित्र १८९४, ३ मराठ्यांचे पराक्रम-बुंदेलखंड-प्रकरण १८९५, ४ अयोध्येचे नबाब १८९९, ५ मुसलमानी अमदानीतील मराठे सरदार १९००, ६ महापुरुष ब्रह्मेन्द्रस्वामी धावडशीकर यांचें चरित्र व पत्रव्यवहार १९००, ७ बायजाबाई शिंदे यांचें चरित्र १९०२, ८ दिल्ली अथवा इन्द्रप्रस्थ १९०२, ९ मराठ्यांचें आरमार १९०४, १० सवाई माधवराव पेशव्यांचा दरबार १९०५, ११ स्वल्पमूल्यचरित्रमाला; (अ) परशुरामपंत प्रतिनिधि; (आ) नाभाजी; (इ) मुधोळ संस्थानचे घोरपडे. चरित्रें–१२ पं. अयोध्यानाथ १८९२, १३ वामन शिवराम आपटे, १४ ए. ओ. ह्यूम १८९३. कविता–१५ वाक्पुष्पांजली १८८९, १६ भारतभाग्योदय. ऐतिहासिक कागदपत्रें–१७ महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें भाग १-२, कारकीर्द–अहिल्याबाई होळकर १९१०, १९११, १८ पेशवे दप्तरांतील निवडक उतारे, खंड १-२, शिवाय दिल्लीचें राजकारण वगैरे अनेक अस्सल पत्रव्यवहार यांनीं इतिहाससंग्रहांतून प्रसिद्ध केले. १९ बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, भा. १-२, २० कैफियत यादी (दक्षिणेंतील सरदारांच्या) १९०८, २१ वतनपत्रें, निवाडपत्रें १९०९, २२ सनदापत्रें १९१३, २३ तह करारमदार १९१४, (हा सर्व पेशवे दप्तरांतील भाग सरकारी नोकर रा. ब. गणेश चिमणाजी वाड यांच्या साहाय्यानें निवडून मावजी वगैरेंच्या साहाय्यानें यांनीं प्रसिद्ध करवला). ग्वाल्हेर दरबारपत्रें–२४ महादजी शिंदे यांचा अस्सल पत्रव्यवहार व राजकारण खंड १-५, (यांपैकीं पहिल्या खंडावर १९१५ हें साल असून पांचव्या खंडावर प्रायव्हेट (खासगी) असें छापलें आहे).

मासिकें—१ सुभाष्यचंद्रिका (हस्तलिखित १८८७), २ महाराष्ट्र कोकीळ (ऑक्टो. १८८७-१८९२), ३ भारतवर्ष (स. १८९६ पासून २४ अंक), ४ इतिहाससंग्रह (आगस्ट १९०८-ऑक्टोबर १९१६).

इंग्रजी ग्रंथ—1 Notes on Satara, 2 Mahabaleshwar, 3 Sangli State, 4 Panhala, 5 Poona in bygone days, 6 History of the Maharastras (किकेड व पारसनीस, दुसरा खंड १९२२).

पाल, खिस्तोदास—(जन्म स. १८३८–मृत्यु स. १८८४) बंगालमधील आरंभीचे वृत्तपत्रकार व सार्वजनिक कार्यकर्ते.

यांच्या वडिलांचें नांव ईश्वरचंद्र. जात तेली. ओरिएंटल सेमिनरी व कलकत्त्याच्या मेट्रोपॉलिटन कॉलेजमध्यें कांहीं दिवस शिक्षण घेतल्यानंतर यांची कलकत्त्याच्या ब्रिटिश इंडिया असोसिएशनचे सेक्रेटरी म्हणून

नेमणूक झाली (१८५८). थोड्याच दिवसांत यांना 'हिंदु पेट्रियट' या त्या वेळच्या प्रमुख पत्राचे संपादक करण्यांत आलें (१८६१). अनेक वर्षे हिंदु पेट्रियटची सर्व जबाबदारी यांचेकडेच असे. अभ्यासपूर्ण लेखन-पद्धतीमुळें हे जें लिहीत त्यांत नावीन्य उत्पन्न होई.

यांना बंगाल लेजिस्लेटिव्ह कौन्सिल (१८७२) व बंगाल टेनन्सी बिलावरील चर्चेसाठीं बंगाल जमिनदारांचे प्रतिनिधी म्हणून गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलमध्यें घेण्यांत आलें (१८८३).

सरकार व जनता यांमधील दुवा या नात्यानें काम करण्याच्या अजोड कसबामुळें यांनीं बंगालमधील लोकांचा अनेक दृष्टींनीं फायदा करून दिला. यांच्या मृत्यूनंतर कलकत्त्याला यांचें स्मारक म्हणून एक पुतळा उभारण्यांत आला आहे.

पाल, बिपिनचंद्र—(जन्म स. १८५८–मृत्यु स. १९३२ मे २०) बंगालमधील सुप्रसिद्ध राजकारणी पुरुष व प्रक्षोभक वक्ते.

यांचा जन्म बंगाल्यांत सिल्हट गांवीं झाला. यांचे वडील बंगाल्यांतील नामांकित वकील असून ते आपल्या हुषारीनें डिस्ट्रिक्ट मुनसफीच्या जागेपर्यंत चढले होते. हे त्यांचे एकुलते एक पुत्र.

मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर पुढील शिक्षणाकरितां हे कलकत्त्यास आले. तेथें केशवचंद्र सेनांच्या वक्तृत्वाचा परिणाम होऊन घरच्या विरोधास न जुमानतां यांनीं ब्राह्मोसमाजाचा स्वीकार केला. त्या काळीं पुराणमताभिमानी लोकांना ब्राह्मो बनणें म्हणजे ख्रिस्ती बनण्याइतकें 'अब्रह्मण्य' वाटे. वडलांनीं यांचें मुखावलोकन न करण्याचा निश्चय करून आपल्या संपत्तींतील कपर्दिकहि यांना मिळूं नये अशी मृत्युपत्रानें व्यवस्था केली. तथापि शेवटीं त्यांचें मत पालटून अन्तकाळीं त्यांनीं यांना पंचवीस हजार रुपये दिले.

कलकत्त्याच्या नगरमंदिरांत कालीचरण बानर्जीनीं ब्राह्मोसमाजाच्या मतावर हल्ला केला. तेव्हां यांनीं सहा व्याख्यानांची एक माला गुंफून त्यांना उत्तर दिलें. तसेंच पहिली पत्नी निवर्तल्यावर यांनीं सुरेन्द्रनाथ बानर्जीच्या विधवा पुतणीशीं पुनर्विवाह करून आपलें नांव कर्त्या सुधारकांत दाखल केलें.

विद्यार्जन झाल्यावर यांचीं पहिलीं दहा वर्षे शिक्षकाच्या व्यवसायांत गेलीं. कटकच्या शाळेंत हे तीन वर्षे हेडमास्तर होते. नंतर यांनीं आपल्या सिल्हट गांवीं एक विद्यालय स्थापून ५।६ वर्षे चालविलें. त्यानंतर बंगलोरच्या शाळेचे मुख्याध्यापक व कलकत्त्याच्या ग्रंथालयाचे व्यवस्थापक म्हणूनहि यांनीं काम केलें. यानंतर मात्र यांनीं राजकारणांत प्रवेश केला. यांचें पहिलें सुप्रसिद्ध भाषण न्या. बद्रुद्दीन तय्यबजी यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या मद्रासच्या राष्ट्रसभेंत हत्याराच्या कायद्यावरील होय (१८८७). यांची आवेशयुक्त व क्षोभकारक वक्तृत्वकला या देशांत व परदेशांत चांगली गाजली. १९०० सालीं हे तौलनिक तत्त्वज्ञानाचा व्यासंग करण्यासाठीं इंग्लंडला गेले. तेथील दोन वर्षांचा अभ्यासक्रम यांनीं एक वर्षांतच पुरा केला. तिकडे व्याख्यानें, लेख वगैरे द्वारा हिंदी राजकारणाचें चित्र लोकांपुढें ठेवून यांनीं स्वतःची उपजीविकाहि केली.

इंग्लंडांत यांनीं 'स्वराज्य' नांवाचें मासिक व हिंदुस्थानांत असतां 'न्यू इंडिया' नांवाचें स्वतःचें इंग्रजी साप्ताहिक चालविलें. शिवाय अरविंदांच्या 'वंदे मातरम्'शीं यांचा निकट संबंध होता. इंग्लंडमध्यें असतां 'हिंदु रिव्हयू' नांवाच्या स्वतःच्या मासिकांत बाँबच्या मीमांसेबद्दल लिहिलेल्या लेखाबद्दल यांना माफी मागावी लागली. अरविंद घोषांवर दुसरा खटला झाला तेव्हां त्यांच्याविरुद्ध साक्ष देण्यास सरकारतर्फे यांना बोलावण्यांत आलें. यांनीं कोर्टाचा हुकूम अमान्य करून साक्ष देण्याचें नाकारून सहा महिन्यांची शिक्षा पत्करली. त्या वेळीं यांचा हा बाणेदारपणा लोकांना इतका आवडला कीं सुरेन्द्रनाथ बानर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरून एक हजार रुपये जमा करून ते यांच्या पत्नीकडे पोंचते करण्यांत आले. १९११ सालीं यांना राजद्रोहाच्या आरोपाखालीं दुसरी शिक्षा झाली. येथून पुढें राजकारणी लोकांना आपत्तीचा काळ सुरू झाला. तथापि होमरूलच्या चळवळींत हे पुनः सामील झाले व शिष्टमंडळाबरोबर विलायतेसहि गेले होते. १९२८ च्या लखनौच्या सर्वपक्षीय परिषदेसहि हे हजर होते. तथापि यांच्या आयुष्यांतील माध्यान्हकाल म्हणजे लाल, पाल, बाल या त्रयीनें वंगभंग व स्वदेशी बहिष्काराच्या प्रचंड आंदोलनाच्या वेळीं केलेल्या प्रचंड कामगिरीचा काल होय. पहाडी आवाजाचे दणदणीत वक्ते अशी यांची त्या वेळीं प्रसिद्धि होती. यांनीं आपलें आत्मचरित्र लिहिलें आहे.

यांचे ग्रंथ—Indian Nationalism (1918).

पांगारकर, लक्ष्मण रामचंद्र—(जन्म स. १८७२–मृत्यु स. १९४१) मराठी भाषेंतील प्राचीन वाङ्मयाचे सुप्रसिद्ध अभ्यासक, रसाळ लेखक, वक्ते व ग्रंथकार.

यांचें घराणें पुण्याजवळील मुळशी पेट्यांतील पौडचें राहणारें. यांचें शिक्षण पुणें येथें होऊन हे बी. ए. झाले. यांनीं पुणें येथें व वऱ्हाडांत शिक्षकाची नोकरी केली. यांना मोरोपंत, एकनाथ वगैरे जुन्या काव्याची गोडी प्रथमपासूनच असे. यांना पाठान्तर विपुल असून तें साध्या पण मधुर आवाजांत म्हणून दाखविण्याची यांना हौस असे. यांचा सहवास, प्रवचन, व्याख्यान आणि लेखन यांत सर्वत्र समर्पक अवतरणाची रेलचेल आढळे. पुढें तर यांनीं शिक्षकाचा व्यवसाय सोडला आणि प्रवचन व लेखन हाच यांचा मुख्य व्यवसाय झाला. प्रथम यांनीं 'मुमुक्षु' नांवाचें साप्ताहिक वर्तमानपत्र काढलें आणि तेंच पुढें मासिक करून दीर्घकालपर्यंत चालविलें. प्रथम हे राजकारणाकडे लक्ष देत, पण पुढें हे पूर्ण भक्तिमार्गी सन्त बनले. गळ्यांत तुळशीची माळ, पंढरीची वारी आणि साधुसन्तांचा सहवास हा यांचा नित्यव्यवसाय बनला. हे सर्व कार्यक्रम चालू असतां यांची लेखणी आणि व्यासंग अखंड चालू असे. यांच्या भाषणानें भाविक वेडे होत आणि रसिक डोलूं लागत. यांच्या लेखणींतहि चिकित्सा आणि भावना यांचा संगम असे. त्यामुळें तुकारामाचें चरित्र ऐकून यांना हजारों रुपये देणारे श्रोते लाभले आणि ग्रंथ प्रकाशनहि यांना लाभदायक झालें. शिवाय यांनीं महाराष्ट्रांतील सुशिक्षितांच्या घरांत मराठी जुन्या कवींचें काव्य पोंचविलें आणि तरुण पिढीचें जुन्या कवींच्या अभ्यासाकडे लक्ष वेधलें.

मोरोपंताचें चरित्र व काव्यविवेचन या ग्रंथानें यांनीं आपल्याकडे सर्वांचें लक्ष ओढून घेतलें आणि शेवटीं मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे तीन खंड महाराष्ट्राला अर्पण केले. 'चरित्रचंद्र' लिहून आपलें अन्तर्बाह्य प्रेमळ आणि रसाळ जीवन लोकांपुढें उघड केलें (१९३८). यांनीं आपलें हें आत्मचरित्र असें मोकळेपणानें लिहिलें आहे कीं तो तो प्रसंग वाचकाच्या डोळ्यांपुढें प्रत्यक्ष उभा राहतो.

यांनीं मराठींतील बहुतेक प्रसिद्ध कवींचीं चरित्रें व काव्यविवेचन लिहिलें आहे. तसेंच मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिण्यास सुरुवात करून १ ज्ञानेश्वर-नामदेवकाळ, २ एकनाथकाळ व ३ तुकाराम-रामदासकाळ असे तीन खंड प्रसिद्ध केले. उतारे व छोटे निबंध यांनीं कितीतरी लिहिलेले आहेत. यांच्या भक्तिमार्गप्रदीप या ग्रंथाच्या जितक्या आवृत्त्या निघाल्या तितक्या आवृत्त्या निघण्याचें भाग्य अलीकडच्या कोणत्याहि पुस्तकास लाभलेलें नाहीं.

पांडेय, रूपनारायण शिवराम—(जन्म स. १८८४) हिन्दी भाषेंतील प्रमुख साहित्यसेवक, कवि व संपादक.

यांचा जन्म लखनौ येथें झाला. जात कान्यकुब्ज ब्राह्मण. यांचा विद्याभ्यास घरींच जुन्या पद्धतीनें झाला. पण सतत परिश्रमानें यांनीं बंगाली व इंग्रजी भाषा आत्मसात् केल्या. मराठी, गुजराथी व उर्दू भाषांचेंहि यांनीं ज्ञान संपादन केलें. यांना लिहिण्याचा नाद लहानपणापासून आहे. यांनीं प्रथम बंगाली कृत्तिवास रामायणाचा पद्यानुवाद केला. नागरीप्रचारक मासिक पत्र (सात वर्षे), भारतधर्ममहामंडलाची निगमागमचन्द्रिका (तीन वर्षे), इन्दु मासिक (दोन वर्षे), कान्यकुब्ज मासिक (दोन वर्षे) इत्यादि ठिकाणीं यांनीं संपादन कार्य केलें. माधुरी या सुप्रसिद्ध मासिकाचेंहि हे संपादक होते. यांची लिखित व अनुवादित ग्रंथांची संख्या मोठी आहे. त्यांत यांनीं बंगाली नाटकाचा हिन्दींत केलेला अनुवाद महत्त्वाचा मानतात.

पांडेय, लोचनप्रसाद चिंतामणि—(जन्म स. १८८६) उडिया व हिन्दी भाषेंतील सुप्रसिद्ध कवि व लेखक नि इतिहाससंशोधक.

यांचा जन्म विलासपूर जिल्ह्यांतील बालपूर गांवीं झाला. जात सरयूपारीण. यांचें घराणें मोठें प्रतिष्ठित व सच्चरित्र म्हणून प्रसिद्ध आहे. हे १९०५ सालीं मॅट्रिक झाले. पुढें यांना कॉलेज शिक्षण पुरें करितां आलें नाहीं, तथापि यांनीं उडिया, बंगाली व थोडा संस्कृत भाषेचा अभ्यास केला.

हिन्दींत गद्य व पद्य अशीं यांनीं कितीतरी पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांपैकीं खालील प्रमुख आहेत— १ दो मित्र, २ बालविनोद, ३ नीतिकविता, ४ बालिकाविनोद, ५ माधवमञ्जरी, ६ मेवाडगाथा, ७ चरितमाला, ८ रघुवंशसार, ९ पद्यपुष्पाञ्जलि, १० आनन्द की टोकनी, ११ कविताकुसुममाला इत्यादि यांचीं पुस्तकें

लोकप्रिय असून त्यांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत.

उडिया भाषेंतीलहि हे उत्कृष्ट कवि आहेत. त्या भाषेंत यांनीं पुढील काव्य ग्रंथ लिहिले आहेत— १ कविताकुसुम, २ महानदी, ३ रोगी-रोदन इत्यादि. ओरिसा प्रान्तांतील बामण्डा येथील राजांनीं यांना काव्यविनोद ही पदवी दिली आहे. यांच्या कविताकुसुम या ग्रंथाचें समालोचन करतांना सुप्रसिद्ध उत्कल साहित्य-विशारद पं. नीलमणि शर्मा यांनीं लिहिलें कीं, यांच्या नांवांतील पांडेय हें प्रान्तदर्शक नांव काढून टाकलें तर हे कवि ओरिसा प्रान्ताच्या बाहेरील आहेत हें यांच्या काव्यावरून कोणासहि कळणार नाहीं इतकें यांचें उडिया भाषेवर प्रभुत्व आहे. ग्रियर्सन या भाषाभ्यासकानेंहि यांच्या भाषाप्रभुत्वाबद्दल यांची प्रशंसा केलेली आहे.

यांना इतिहास-संशोधनाचाहि नाद आहे. यांनीं आपल्या प्रान्तांतील संस्कृत शिलालेख व ताम्रपट यांचा संग्रह कोसल-प्रशस्ति-रत्नावलि या नांवानें प्रसिद्ध केला असून त्याचे तीन भाग आहेत. त्यांत महाकोसलचे सोम, हैहय व नाग वंशांतील राजांचे शिलालेख विशेष आहेत.

तसेंच महाराज पृथ्वीदेव, रत्नदेव, प्रतापमल्लदेव (हैहय), चोडगंगदेव व योधेयगण यांच्या ताम्र व सुवर्ण मुद्रिकांचा संग्रहहि यांनीं मोठ्या परिश्रमानें केला आहे. या मुद्रिका यांना बालपूरासच मिळाल्या. त्यांपैकीं चौकोनी मुद्रा बौद्धकालीन आहेत.

हे १९२१ सालीं जबलपुर येथें भरलेल्या चतुर्थ हिन्दी साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष होते.

यांनीं आपल्या छत्तीसगढ़ प्रान्ताच्या प्राचीन साहित्य व प्राचीन गौरवगाथा शोधण्यांत फार परिश्रम केले. या प्रान्तांत पुष्कळ हिन्दी कवि होऊन गेले ही गोष्ट यांच्या शोधांनीं प्रगट झाली. मध्यप्रान्त सरकारनें ग्रियर्सन यांच्याकडून केलेल्या 'छत्तीसगढी व्याकरणा'चें संशोधन व वर्धन करण्याचें काम यांच्याकडून करून घेतलें.

यांचीं इंग्रजी पुस्तकें—(1) Well known Men, (2) Letters to my Brothers, (3) The Way to the Happy and Gay, (4) Folk Tales of Chatistgarh, (5) The National Poet of Orissa.

पिले, ना. दि. ब. लुई डॉमिनिक स्वामीकन्नु—(जन्म स. १८६५ फेब्रु. ४–मृत्यु स. १९२५ सप्टें. १०) दोन हजार वर्षांच्या पंचांगाचे कर्ते, संशोधक वृत्तीचे अभ्यासक व तामील वाङ्मयांतील पंडित.

आईबाप कॅथॉलिक ख्रिस्ती. जन्मस्थान कोइमतूर-नजीक सोमानूर. हे वयाच्या तेराव्या वर्षी मॅट्रिक झाले. हे एम्. ए. एल्एल्. बी. (लंडन), आय्. एस्. ओ., सी. आय्. ई. होते. इंग्लिशचे प्राध्यापक म्हणून सेंट जोसेफ कॉलेज, त्रिचनापल्ली येथें प्रथम नोकरीस लागले (१८८३-८७). पुढें मद्रास प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें गेले. तेथून प्राव्हिन्शियल सर्व्हिसमध्यें शिरून यांनीं डेप्युटी कलेक्टर, कर्नल, सहकारी खात्याचे रजिस्ट्रार, कलेक्टर व डि. मॅजिस्ट्रेट नेलोर, १९१९ सालीं नव्या सुधारणांचे वेळीं रिफॉर्म्स कमिशनर, सरकारचे सेक्रेटरी व शेतकी खात्याचे डायरेक्टर वगैरे महत्त्वाचीं कामें केलीं. नंतर मद्रास कायदेमंडळाचे सेक्रेटरी (१९२०-२३), त्या अवधींत पार्लमेंटरी पद्धतीचा अभ्यास करण्याकरितां सरकारतर्फे विलायतेस गमन, १९२५ सालीं तर मद्रास कायदेमंडळाचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष होण्याचा मानहि यांना मिळाला. तेथें मृत्यूनंतर सत्यमूर्तीसारख्या पुढाऱ्यांकडून प्रशंसा झाली.

दरमहा ५० रु.च्या नोकरीपासून कायदेमंडळांतील लोकनियुक्त अध्यक्ष होण्यापर्यंतचा मान, अनेक पदव्या, यापेक्षांहि यांनीं अत्यंत परिश्रमानें नोकरींत असतांना तयार केलेलें दोन हजार वर्षांचें भारतीय पंचांग यांचें नांव दीर्घकाल टिकवणारें आहे (१९११-२२). यांतील बहुतेक भाग सरकारनें अनेक खंडांत प्रसिद्ध केला आहे. बाकीचा यांनीं प्रसिद्ध करवला. या जंत्रीमुळें दोन हजार वर्षांतील सौर व चांद्र वर्ष, तिथि, ग्रहणें व ग्रहांचे उदयास्त अगदीं थोड्या श्रमांत काढण्याची सोय झाली आहे.

याशिवाय पिटमन्च्या लघुलेखन पद्धतीस सुलभता आणून ती हुषार विद्यार्थ्यांस आठ दिवसांत हस्तगत करतां येईल अशी व्यवस्था यांनीं केली व खुद्द पिटमन्-कडून शाबासकी मिळविली. याशिवाय यांचा स्मरणशक्तीवरील ग्रंथहि महत्त्वाचा आहे.

तामीळ वाङ्मयांत 'संगमकाल' हें सुवर्णयुग समजलें जातें. पण ह्या काळाचा निश्चय होत नव्हता. हे व यांची माता तामीळ वाङ्मयांतील पंडित होती. प्राचीन

तामीळ वाङ्मयांतील 'परिपाडल'मधील एका पत्रिकेवरून १७ जून ६३४ ही तारीख यांनीं निश्चित केली. तसेंच दुसरा विख्यात तामीळ ग्रंथ 'शिलप्पधिकारम्'मधील दोन तिथि अनुक्रमें १७ मे व २३ जुलै ७५६ या यांनीं निश्चित केल्या.

ख्रिस्ताचें स्वीकृत जन्मवर्ष ख्रि. पू. १ हे चूक असून ख्रि. पू. ४ असें यांनीं ठरविलें. बुद्धाच्या जन्मतिथीवरहि यांचा निबंध आहे.

यांचे ग्रंथ—पंचांग–१ इंडियन क्रॉनॉलजी, पहिली आवृत्ति १९११, दुसरी आवृत्ति १९२२; २ इंडियन एफिमेरीज स. १८००-२०००, पहिली आवृत्ति १९१५, दु. आ. १९२२; ३ इंडियन एफिमेरिज स. ७००-१८००, सहा खंड, मद्रास सरकारकडून प्रकाशित १९२२; ४ मॅक्झिमम् एज ऑफ ध्रुवनाडी १९२३; ५ कॉंप्रिहेन्सिव्ह टेबल्स फॉर इंडियन क्रॉनॉलजी १९२४; ६ पंचागाज् अँड हॉरॉस्कोप किंवा इंडियन कॅलेन्डर अँड इंडियन अस्ट्रॉलजी १९२५; फलज्योतिष–७ क्रेडिबिलिटी ऑफ इंडियन अस्ट्रॉलॉजी १९२२, या ग्रंथांत फलज्योतिषाची अविश्वसनीयता प्रतिपादिली आहे; लघुलेखन–८ फोनल, शॉर्ट हँड, १९०९; स्मरणशक्ति–९ सीक्रेट ऑफ मेमरी १९०९; टिप्पणी–१० नोटस् ऑन हिंदु अस्ट्रॉलॉजी, सर टी. माधवराव यांच्या ग्रंथावर टिप्पणी, १९२२ (द. वा. पोतदार).

पिंगळे, विष्णु गणेश—(जन्म स. १८९०–फांशी स. १९१५) लाहोर कटांत भाग घेणारे सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय क्रांतिकारक.

हे मूळचे पुणें जिल्ह्यांतील तळेगांव ढमढेरे येथील राहणारे. हे गधर पार्टीच्या इतर सभासदांबरोबर अमेरिकेहून परत आले ते बंगालमध्यें उतरले. लाला हरदयाळ यांच्या गधर पार्टीचा मुख्य उद्देश शीख लोकांना हिंदुस्थानांत क्रांतीच्या हेतूनें पाठविणें हा असे. अशा स्थितींत यांनीं पंजाबमध्यें जाऊन बंगाली लोक बॉम्ब तयार करून देण्यास तयार असल्याची माहिती त्या लोकांना पुरविली. पंजाबी लोकांना यांची ही योजना पसंत पडली व अभावितपणेंच या उठावणीचें पुढारीपण यांचेकडे आलें.

ताबडतोब बॉम्बसाठीं साहित्य जमा करण्यास सुरुवात झाली व राशबिहारी बोस यांच्या नेतृत्वाखालीं अमृतसर येथें या कार्यासाठींच घेतलेल्या घरांत त्या दृष्टीनें प्रयत्न सुरू झाले. सर्वानुमतें २१ फेब्रु. १९१५ ही तारीख उठावणीसाठीं मुक्रर करण्यांत आली. या सर्व उठावणींचें मुख्य ठिकाण लाहोर राहणार असून आगगाड्या उडविणें, सरकारी तिजोऱ्यांवर हल्ला करणें, राजबंद्यांची सुटका हे प्रमुख कार्यक्रम ठरविण्यांत आले. ठिकठिकाणच्या सैन्यांच्या उठावण्या, बॉम्ब व बंदुका यांचा संग्रह, खेडुतांची संघटना असे अनेक प्रयत्न यासाठीं योजण्यांत आले.

परंतु या उठावणीसाठीं पैशाची तरतूद करण्यासाठीं पंजाबी तरुणांनीं घातलेल्या कांहीं दरोड्यांनीं हा बार वायां गेला. दरोड्यांचा तपास चालू असतांच यांच्या या कटाचा सुगावा लागला व राशबिहारी बोस यांच्या निवासस्थानावर छापा घालून पोलिसांनीं सात सशस्त्र माणसांना अटक केली (१९ फेब्रु.). पुढें ही संख्या तेरा लोकांपर्यंत गेली. पांच बॉम्बहि पकडण्यांत आले. हे व राशबिहारी बोस मात्र निसटले.

परंतु एकच महिन्यानें मिरतच्या १२ व्या पलटणीच्या कार्टर्समध्यें यांना सशस्त्र स्थितींत पकडण्यांत आलें. लाहोर, फिरोझपूर, रावळपिंडी, बनारस, जबलपूर, ढाक्का व सिंगापूर अशा ठिकाणच्या कटांशीं यांचा संबंध असल्यानें यांना व यांच्या सहकाऱ्यांना फांशीची सजा फरमावण्यांत आली. त्यांत फांशीची शिक्षा होऊन जन्मठेपेवर सुटणारांत भाई परमानंद हे प्रमुख होते.

पीटर्सन, प्रो. पीटर—(जन्म स. १८४७–मृत्यु स. १८९९) संस्कृतचे प्रोफेसर व संशोधक.

एडिम्बरो व ऑक्सफर्ड येथें यांनीं इंग्रजीबरोबर संस्कृतचें अध्ययन केलें. यांची मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें संस्कृतचे प्रोफेसर म्हणून नेमणूक झाली (स. १८७३). मुंबईसरकारतर्फे संस्कृत व प्राकृत ग्रंथ शोधण्याकरितां यांनीं गुजराथ व राजपुतान्यामध्यें अनेक दौरे काढले. राजपुतान्यांत हिंडत असतां यांना इतिहासाला उपयुक्त अशीं पुष्कळ संस्कृत काव्यें सांपडलीं. कर्नल टॉडला न लागलेला कोटाच्या जवळील कणखाच्या मन्दिरावरील शिलालेख यांनीं बरोबर लावून शुद्धतापूर्वक संपादन केला. यांनीं पुस्तकाच्या शोधासंबंधीं सहा रिपोर्ट प्रसिद्ध केले आहेत. त्यांत अनेक महत्त्वाचे ग्रंथ आहेत. शिवाय अलवार राज्यांतील पुस्तकभांडाराचें महत्त्वपूर्ण सूचीपत्र यांनीं प्रसिद्ध केलें आहे (स. १८९२).

पुणतांबेकर, अंबादास गोपाळ ऊर्फ नथुकाका—(जन्म स. १८७०) मुंबईचा मराठी ग्रंथसंग्रहालय, महाराष्ट्र ब्राह्मण सभा वगैरे अनेक संस्थांच्या संस्थापकांपैकी एक प्रमुख व मिशनरी पद्धतीनें सतत सार्वजनिक कार्य करणारे कार्यकर्ते.

यांचें उपनांव पुणतांबेकर असलें तरी यांचा जन्म नाशकास झाला आणि आठव्या वर्षापासून हे मुंबईस वडलांच्या बरोबर राहण्यास आले. मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाल्यावर १८९५ सालीं यांनीं दरमहा वीस रुपयांत रेल्वेंत नोकरी पत्करली. नंतर मुंबई म्युनिसिपालिटींत काम करून १९३१ सालीं हे सेवानिवृत्त झाले.

यापूर्वीच बालसभा स्थापून 'ज्ञानोदय' या ख्रिश्चन साप्ताहिकांत आलेल्या कृष्णनिंदेचा निषेध, भारतसेवक समूह स्थापून 'हिंदु प्लेग हॉस्पिटल'ला प्रत्यक्ष सेवा व निधि जमा करून देणें, अशा भूतदयेच्या कामाबरोबरच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना करून (१ ऑगस्ट १८९८), छत्तीस वर्षे त्या संस्थेच्या कार्यवाहाचें काम करून व संस्था भरभराटीस आणून हे निवृत्त झाले. तेव्हां यांचा नेक ना. मु. रा. जयकर यांच्या अध्यक्षतेखालीं सत्कार होऊन यांना थैली अर्पण करण्यांत आली.

यांनीं १९१८ सालीं मुंबईची ब्राह्मणसभा काढली व तीमध्यें ब्राह्मण विद्यार्थी साहाय्यक फंड (१९०७), शंकरवाडी फंड (१९१३) व ब्राह्मण हितवर्धिनी सभा (१९१५) या यांनीं पूर्वी काढलेल्या संस्था विलीन केल्या.

प्लेग दुःखनिवारणार्थ १५-२० हजार, मराठी ग्रंथसंग्रहालय आणि ब्राह्मणसभेकरितां प्रत्येकीं ५०-६० हजार इतक्या रकमा यांनीं गोळा केल्या. याशिवाय कितीतरी लहानमोठे फंड यांनीं जमा केले. घरची स्थिति असमाधानकारक असतांहि मराठी ग्रंथसंग्रहालय आणि ब्राह्मणसभा यांच्या कार्याबद्दल यांना पांचशें व दोन हजार रुपयांच्या थैल्या अर्पण केल्या असतां यांनीं त्यांत स्वतःची भर घालून त्या परत केल्या.

या संस्थांचीं कामें करतांना सौजन्य व विनय यांबरोबर भव्य दृष्टि नि महत्त्वाकांक्षा या गुणांचाहि यांनीं आपल्या सहकाऱ्यांना परिचय आणून दिला. शंकरवाडीकरितां हमरस्त्यावर पाऊण लाखाची इमारत घ्यावयाची पण संस्थेजवळ तर फक्त अठरा हजार रुपयेच शिल्लक, अशा वेळीं सोयीस्कर व्याजानें रक्कम देणारा सावकार उभा करून यांनीं ती जागा जाऊं दिली नाहीं, आणि हिशेबी कार्यकारी मंडळास तो व्यवहार करण्यास भाग पाडलें. अगदीं हिशेबी पद्धतीनें कोणताच व्यवहार पार पडत नाहीं. संस्था निर्माण होतांना किंवा झाल्यावर मानाच्या जागा भूषित करणारांप्रमाणें संस्था निर्माण करून त्यांची अपत्यनिर्विशेष जोपासना करणारे आणि मानाच्या जागीं कधींच न दिसणारे यांच्यासारखे कार्यकर्ते पायांतील दगडांप्रमाणें संस्थांचे खरे आधारस्तंभ होत.

पुराणिक, न्या. वासुदेव रामचंद्र ऊर्फ काकासाहेब—(जन्म स.१८८६) नागपूर हायकोर्टातील सुप्रसिद्ध न्यायमूर्ति, युनिव्हर्सिटीचे उपकुलगुरु व सार्वजनिक कार्यकर्ते.

यांचे पूर्वज निमाड जिल्ह्यांतील बऱ्हाणपूर तहसिलींतील होत. यांचे आजोबा ग्वाल्हेर राज्याचे नायबसुभे होते. निमाड जिल्हा ग्वाल्हेर सरकारकडून इंग्रजांकडे आला तेव्हां यांच्या आजोबास पोलिटिकल पेन्शनहि मिळे. पण पुढें दिवस बदलून यांनीं वडील बंधूंच्या मदतीनें कसें तरी बी. ए. पर्यंत शिक्षण घेतलें. नंतर नोकरी करून हे वकील झाले. १९१० सालीं यांनीं वकिलीला सुरुवात केली आणि थोड्याच कालांत नागपुरांतील नामांकित वकील म्हणून हे प्रसिद्धीस आले.

प्रथम ॲडव्होकेट (१९२४), नंतर सरकारी वकील (१९३५), ॲडव्होकेट जनरल व पुढें नागपूर हायकोर्टातील न्यायमूर्ति म्हणून यांची कायमची नेमणूक झाली. नागपूर युनिव्हर्सिटीच्या उपकुलगुरूच्या जागीं यांची निवड झाली. शिक्षण, अर्थ, वृत्तपत्र वगैरे अनेक व्यवसायांतील संस्थांशीं यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे.

पुराणिक, विष्णु कृष्णशास्त्री—(जन्म स. १८६४–मृत्यु स. १९१४) पनवेलच्या धूतपापेश्वर आयौषधी कारखान्याचे उत्पादक व मालक.

यापूर्वी कांहीं वर्षे पनवेलचा वरील कारखाना यांचे वडील चालवीत होते; पण स. १८९३ सालीं यांनीं आपल्या जबाबदारीवर हा कारखाना चालविण्यास सुरुवात केली आणि सर्व कारखाना धूतपापेश्वराच्या नांवें करून आपण त्याचे प्रतिनिधि म्हणून काम करण्याची योजना वडिलांकडून मान्य करून घेतली. नंतर कारखान्याची आयुर्वेदशाळा उघडण्याचा समारंभ मुंबईचे डॉ. नानासाहेब देशमुख यांच्या हस्तें झाला

(स. १८९६ एप्रिल २२). यांच्याकडील औषधें अत्यंत गुणकारी व विश्वासर्ह समजलीं जातात.

धूतपापेश्वर आयौंषधि कारखान्याचे सध्याचे चालक वै. पं. नानासाहेब पुराणिक हे यांचे चिरंजीव होत.

पुरंदरे, कृष्णाजी वासुदेव—(जन्म स.१८८८) सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक, मराठ्यांच्या इतिहासांतील ऐतिहासिक पुरुषांच्या हस्ताक्षरांचे तज्ज्ञ व अभ्यासक.

यांची मराठी सातवी पास झाल्यानंतर यांनीं नोकरी करून ट्रेनिंगच्या दुसऱ्या वर्षाची परीक्षा दिली (१९०६). मराठी शाळाखात्यांत शिरून स. १९३२ सालीं हे सेवानिवृत्त झाले. यांना इतिहाससंशोधनाचा नाद स्वाभाविक आहे. ऐतिहासिक मोडी पत्रें वाचण्यांत यांची अत्यंत प्रगति झाली व हे हस्ताक्षरावरून कोणाचें पत्र आहे हें हमखास सांगू शकतात. पत्र कोणींहि लिहिलें तरी पत्राचा उपसंहार पत्र ज्याच्या नांवानें सुटतें त्यांनीं स्वतःच्या हस्ताक्षरांनीं करण्याची तेव्हां पद्धत असे, आणि सही न करितां तीच त्या माणसाची सही समजण्यांत येत असे. त्यामुळें ऐतिहासिक पत्रें लेखकाच्या हस्ताक्षराची ओळख असल्याशिवाय कोणाचीं हे ओळखणें कठीण असतें. या हस्ताक्षराच्या ओळखीच्या बाबतींत यांचा हातखंडा आहे. त्यामुळें पेशवे दप्तराच्या संशोधनाच्या वेळीं रा. ब. गो. स. सरदेसाई रियासतकार यांनीं यांना शाळाखात्यांतून मुद्दाम त्या कामाकरितां मागवून घेतलें.

यांचें ऐतिहासिक वाङ्मय—१ पुरंदरे दप्तर (खंड १-४), २ शिवचरित्र साहित्य (खंड १ व त्याच पुस्तकाच्या इतर खंडांत अनेक शिवकालीन पत्रें), ३ किल्ले पुरंदर.

यांचे नवे शोध—१ उलट्या 'न'च्या अर्थाचा शोध. (ऐतिहासिक पत्रांच्या शिक्क्यांत कांहीं ठिकाणीं 'प्रधान' शब्दांतील 'न' अक्षर उलटें असतें. ही गोष्ट राजवाडे यांनीं नोंदली होती, पण त्याचें कारण त्यांच्या ध्यानांत आलें नव्हतें. पेशव्यांचे खास व मुतालकी असे शिक्के चालू असत. त्यांपैकीं खास शिक्क्यांत प्रधान शब्दांतील न अक्षर उलटें असावयाचेंच हा शोध प्रथम यांनीं लावला, पुरंदरे दप्तर, भाग ३, ले. २०२). २ अंताजी माणकेश्वराचें घराणें. ३ शिवकालीन व पेशवेकालीन अत्रेघराणें. ४ पेशवाईतील पुरंदरे घराण्याचें राजकारणांतील स्थान. ५ सखाराम बापू बोकीलांचें राजकीय स्थान. ६ पुरंदरे रोजनिशीचें कर्तृत्व धडफळे घराण्यांतील नारो अनंत, लक्ष्मण अनंत व जगन्नाथ चिंतामण धडफळे यांच्याकडे आहे. राजवाडे खंड ६ मधील पुरंदरे रोजनिशी, पेशवे व पुरंदरे दप्तरांतील स्मरणें हीं रोजनिशीचीं टिपणें यांचें कर्तृत्व सुप्रसिद्ध धडफळे घराण्यांतील नारो अनंत, लक्ष्मण चिंतामण व जगन्नाथ अनंत यांचेकडे आहे. ही गोष्ट पुरंदरे दप्तर, पेशवे दप्तर व चिंचवड दप्तर यांच्या सूक्ष्मावलोकनानें यांच्याच प्रथम ध्यानांत आली.

पुरंदरे, डॉ. नीळकंठ अनंत—(जन्म स. १८७८) स्त्री व बाल रोगांचे चिकित्सक, परीक्षक, संशोधक, उपायसंशोधक व रुग्णालय चालक.

हे मॅट्रिक झाले (१८९६) व १९०८ सालीं यांनीं डॉक्टर ऑफ मेडिसिन म्हणजे एम्. डी. ही पदवी मिळविली. १९२६ सालीं मुंबई शहर म्युनिसिपालिटीनें किंग एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल व त्यालाच जोडून गोवर्धनदास सुंदरदास मेडिकल कॉलेज काढण्याचें ठरविलें, तेव्हां स्त्री-बालरोगांचे शिक्षक म्हणून यांना नेमण्यांत आलें. यांचें खासगी प्रॅक्टिस व बाळंतपणाचें इस्पितळ असून इतरत्रहि यांचा जेथें जेथें संबंध येतो तेथें तेथें स्त्री-बाल रोग्यांची हटकून गर्दी असावयाचीच.

बाळंतपणाच्या सर्व विभागाचें संशोधन हाच यांच्या आवडीचा एकमेव विषय आहे. यासाठींच यांनीं सोसायटी ऑफ गायनेकॉलाजी ॲन्ड ऑब्स्टेट्रिक्स ही संस्था इतर कांहीं डॉक्टरांच्या सहकार्यानें काढली व जोमानें चालविली. यांचे चिरंजीव डॉ. बी. एन्. पुरंदरे हेहि यांच्या कार्यांत मनापासून लक्ष घालतात. त्यासाठीं मुंबई विद्यापीठ व हिंदुस्थानसरकार यांच्याकडून यांना आजपर्यंत मदत झाली आहे. गर्भावस्थेंत असणाऱ्या जिवाच्या हृदयाचे ठोके या विषयावर यांनीं केलेलें संशोधन हिंदुस्थानांत व परदेशींहि विद्वन्मान्य झालेलें आहे.

यांच्या संशोधनाची रूपरेषाः—पहिल्यानें अग्रस्कंध कोठें लागतो तें काळजीनें हातांनीं पोटावर चाचपून शोधून काढावयाचें. मग त्याची पोटावरील उंची व पोटाच्या मध्यरेषेपासूनचें अंतर हें मोजावयाचें. या निरनिराळ्या मापांवरून मुलाचें डोकें नीट प्रसवमार्गांत आहे किंवा मार्गांत न उतरतां प्रवेशद्वाराच्याहि वर

राहिलेलें आहे, हें केवळ पोटावरील परीक्षेनें कळून येतें. तसेंच पुढें प्रत्यक्ष प्रसव चालू असतां या मापांनीं गर्भ-मस्तक कोठपर्यंत व कसें प्रसवमार्गांत उतरलें आहे तें सहज कळून येतें. या अग्रस्कंधाच्या मापाच्याद्वारें चिमटा लावण्याच्या शस्त्रप्रयोगाच्या वेळीं फारच महत्त्वाची माहिती मिळते. अशा रीतीनें या मापांवरून प्रसूति सुलभ होईल किंवा कष्टतर बनेल; व कष्टप्रसव झाला असतां केव्हां मदत देण्याचा काळ आला आहे तें सर्व कळून येतें. ही सर्व माहिती पोटावरून मिळविण्याचा मुख्य हेतु हा आहे कीं याच्यायोगें योनिपरीक्षा करण्याचें शक्य तितकें टाळतां येतें; कारण योनिपरीक्षा करतांना बोटांवरून बाहेरील विषजंतु योनींत शिरविले जातात व त्यायोगें बाळंतिणीला विषजंतुदोष (सेप्सिस) होण्याचा संभव उद्भवतो. असें मोठें संकट होण्याच्या कारणाला फक्त पोटावरच परीक्षा करून प्रतिबंध करितां येतो. आणखी मस्तक-कटीर संबंध ठरविण्याची दुसरी एक नवीन रीत यांनीं काढिली आहे.

यांचे ग्रंथ—प्रसूतिशास्त्र.

पुरुषोत्तमदास ठाकूरदास, सर—(जन्म स. १८७९) मुंबईचे सुप्रसिद्ध कापसाचे व्यापारी व अर्थशास्त्रज्ञ.

मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें कांहीं दिवस शिक्षण घेतल्यानंतर यांनीं कापसाच्या व्यापारांत भाग घेण्यास सुरुवात केली. ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनचे हे अध्यक्ष आहेत.

परंतु यापेक्षांहि नामांकित अर्थशास्त्रज्ञ व अनुभवी व्यवहारतज्ज्ञ अशा दुहेरी नात्यानें हिंदुस्थानांत सुरू होणाऱ्या कोणत्याहि नव्या व्यापारी साहसांत यांची आवश्यकता उत्पन्न होते. रिझर्व बँक ऑफ इंडिया, ओरिएंटल लाइफ इन्शुरन्स कं. लि., इंडियन रेडिओ ॲन्ड केबल कम्युनिकेशन्स कं. लि., असोशियेटेड सिमेंट कंपनीज लि., इत्यादि संस्थांशीं यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे.

इंडियन रिट्रेन्चमेंट कमेटी, रॉयल कमिशन ऑन इंडियन करन्सी ॲन्ड फिनान्स (१९२६), इंपीरियल इंडियन सिटिझनशिप असोसिएशन इत्यादि जबाबदारीच्या सरकारी कमेट्यांवरहि यांनीं कामें केलीं आहेत.

पेटिट, सर-दिनशा माणेकजी—(जन्म स. १८२३–मृत्यु स. १९०१) एकोणिसाव्या शतकांतील मुंबईचे सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते व कारखानदार.

यांचें घराणें प्रथम सुरत येथें राहणारें. पूर्वज नसरवानजी कांवसजी हे एकोणिसाव्या शतकाचे सुरुवातीला मुंबईत येऊन स्थायिक झाले. फ्रेंच व इंग्लिश मालाच्या एजंटाचें काम ते करीत, म्हणून यांच्या घराण्याला पेटिट हें फ्रेंच भाषेंतील 'व्यापारी' या अर्थाचें नांव मिळालें. यांच्या वडिलांचें नांव माणेकजी नसरवानजी पेटिट. मुंबईच्या साइक्स स्कूलमध्यें कांहीं दिवस शिक्षण घेतल्यानंतर यांनीं वडिलांच्या उद्योगधंद्यांत लक्ष घालण्यास सुरुवात केली.

सुरुवातीपासूनच यांचा धंदा जरी सर्वत्र परदेशी कंपन्यांच्या दलालाचा असला तरी १८६४ च्या अमेरिकन युद्धाच्या क्रांतिकारक वेळीं यांनीं अतोनात पैसा मिळविला. त्याचेच जोरावर यांनीं माणेकजी पेटिट स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग मिल्सची स्थापना करून पुढें या संस्थेची व्यवस्था पाहण्यासाठीं माणेकजी पेटिट मॅन्युफॅक्चरिंग कं.ची स्थापना केली. अशा तऱ्हेनें यांचा पसारा वाढत वाढत शेवटीं दिनशा पेटिट मिल, माझगांव मिल, फ्रेमजी पेटिट मिल, व्हिक्टोरिया मिल व गॉर्डन मिल इतक्या गिरण्या यांच्या ताब्यांत आल्या. यानंतर कांहीं दिवसांनी यांनीं जे. ऑल्स्टन व नवरोजी एन्. वाडिया यांचे सहकार्यानें यार्न डायिंग फॅक्टरीची स्थापना केली. कापडांना निरनिराळ्या तऱ्हेचे रंग देणारी ही मुंबईमधील पहिलीच संस्था होय.

याचबरोबर यांना बँक ऑफ बॉम्बेसारख्या संस्थांचे डायरेक्टर, बॉम्बे रॉयल एशियॅटिक सोसायटी व कॉर्पोरेशनचे सभासद करण्यांत आलें. हे कांहीं दिवस मुंबईचे शेरीफहि होते. १८८६ सालीं यांना मध्यवर्ति असेंब्लीचे सभासद निवडण्यांत आलें.

परंतु एक फार मोठे उदार धनिक अशी यांची अजूनहि ख्याति आहे. पारशांच्या टॉवर्स ऑफ सायलेन्स व फायर टेंपल यांना व जनावरांचें इस्पितळ, स्त्रियांचें कॉलेज, पेटिट हॉस्पिटल इत्यादि संस्थांना यांनीं दिलेल्या लहानमोठ्या देणग्यांचा एकूण आंकडा वीस लक्ष रुपयांच्या वर जातो. सध्यांच्या व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूटचा पसारा यांनीं सरकारला त्यासाठीं देणगी म्हणून दिलेल्या जागेंत वाढला आहे.

मुंबईच्या नव्या कापडधंद्याचे जनक ही यांच्या

कार्याची ढोबळ रूपरेखा आहे. कांवसजी नानाभाई दावरसारख्या लोकांनीं जरी कापडाच्या गिरण्या यांचे आधीं उत्पन्न केल्या असल्या तरी सहकारी भांडवलाबाबतची यांनीं आपल्या गिरण्यांतून स्वीकारलेली दृष्टि अगदीं नवी होती. सध्यां अतिपरिचयामुळें या कार्यपद्धतींत आपणांस कांहीं विशेष वाटत नसलें तरी सहकार्यानें केलेले धंदे यशस्वी होतात हें यांनीं आपल्या कापड गिरण्यांतून गोंवलेलें तत्त्व पुढें सर्वांना मार्गदर्शक ठरलें. यांचें हें अनुकरण इतर लोकांना इतकें फायदेशीर वाटलें कीं यांच्या देखतच गिरण्यांची संख्या ४३ वरून ८२ गेली. आपल्या गिरण्यांतील मजुरांसाठीं क्वार्टर्स बांधण्याचा त्या वेळीं नवा वाटणारा विक्रम यांनीं केला होता.

व्हिक्टोरिया टर्मिनसच्या समोर खडा असलेला यांचा भव्य पुतळा कापड गिरण्यांतील व्यावसायिकांना मार्गदर्शन करण्यासाठीं कायमचा सज्ज आहे.

पेशवे, धुंडिराज बाजीराव ऊर्फ नानासाहेब—(जन्म स. १८२४–मृत्यु स. १८५८ ऑक्टो. १०) १८५७ सालच्या बंडामागील प्रमुख सूत्रधार व कार्यकुशल सेनापति.

यांचें मूळ नांव धोंडोपंत. दुसरे बाजीराव पेशवे यांनीं यांना दत्तक घेतलें व यांचें नांव नानासाहेब ठेवण्यांत आलें. बाजीरावांचे मृत्यूनंतर (१८५२) ब्रि. सरकारनें त्यांना देण्यांत येणारें आठ लक्षांचें पेन्शन यांना देण्याचें नाकारलें व त्यांच्याशीं यांचा पहिला खटका उडाला. नंतर यांचे बंधु चिमाजी अप्पा यांच्या मुलाचा मुलगा चिमणाराम थत्ते या सतरा वर्षांच्या अज्ञान मुलाच्यातर्फे यांच्यावर वांटणीकरितां दिवाणी दावा लावला. परंतु बंडाच्या उघड सुरवातीपर्यंत ब्रि. सरकारशीं यांचे संबंध मैत्रीचे असत.

बंडाच्या सुरवातीला बहादूरशहा वगैरे लोकांप्रमाणेंच हेहि त्यापासून अलिप्त होते. परंतु पुढें त्याची व्याप्तीच इतकी वाढली कीं यांना त्यापासून दूर राहणें अशक्य होऊन बसलें आणि यांनीं उघडपणें बंडाचें पुढारीपण स्वीकारलें.

कानपूरच्या सर ह्यूज व्हिलरच्या सैन्यावर विजय मिळवून यांनीं आपली छाप आपल्या सहकाऱ्यांवर बसविली. २७ जून व १५ जुलै या दोन दिवशीं कानपूरच्या आसपास झालेल्या इंग्रज लोकांच्या कत्तलीची नैतिक जबाबदारी इंग्रजांनीं हे व तात्या टोपे यांच्यावर टाकून यांना कायमचे बदनाम करण्याचा प्रयत्न केला; परंतु सैन्यावरील यांचें प्रभुत्व शेवटपर्यंत कायम असे.

परंतु या सर्व हालचालींना बिठूरच्या लढाईत हॅवलॉकनें यांना दिलेल्या धक्क्यानें फार मोठा खो बसला; यांनीं उत्तर हिंदुस्थानांत जाऊन पुनः सैन्य वगैरे जमविण्याचें केलेले प्रयत्न निष्फळ ठरले आणि सर कॉलिन कॅम्पबेलच्या सैन्यानें यांना कायमचें नेपाळांत ढकललें (१८५८). सरकारनें यांना पकडण्यासाठीं एक लाख रुपयांचें बक्षिस लावूनहि हे कोणाला सांपडूं शकले नाहींत. नेपाळच्या जंगलांतच यांचा अंत झाला.

पेंटर, बाबुराव—(जन्म स. १८९२) हिंदी चित्रपटसृष्टींत कलापूर्ण क्रांति करणारे चित्रकार.

यांचे वडील कोल्हापूरला चित्रकार होते. मुंबईच्या अमेरिका इंडिया थिएटरमध्यें हे व यांचे आतेभाऊ आनंदराव यांनीं एक चित्रपट पाहिला. आणि यांच्या चित्रपट तयार करण्याच्या महत्त्वाकांक्षेबरोबर हिंदी चित्रपटसृष्टि एकएक पाऊल पुढें टाकूं लागली.

चित्रपट तयार करण्यासाठीं कॅमेरा तयार करावयाचा, भांडवलासाठीं चित्रपटगृह चालवावयाचें अशा अनेक प्रसंगांना तोंड देत यांनीं आनंदरावांचे सहकार्यानें महाराष्ट्र फिल्म कंपनीची स्थापना केली आणि या संस्थेच्या 'सैरन्ध्री' या पहिल्या चित्रानेंच यांना प्रचंड यश मिळवून दिलें. लो. टिळकांनीं यांना पदक देऊन यांचा गौरव केला व नव्या जोमानें यांचा धंदा सुरू झाला.

सरदार नेसरेकरांनीं दिलेल्या पंचवीस हजार रुपये भांडवलावर यांनीं बारा हजार रु.चा नवा कॅमेरा विकत आणला व वत्सलाहरण, प्रल्हाद, दामाजी वगैरे मूक चित्रपटांनीं हे यशाच्या पायऱ्या चढत गेले. मध्यन्तरीं स्टुडिओला आग लागून कॅमेऱ्याशिवाय सर्व गोष्टी आगीच्या भक्ष्यस्थानीं पडूनहि यांचा जोर कायमच राहिला व सिंहगड, कल्याण खजिना, नेताजी पालकर अशीं यशस्वी चित्रें यांनीं काढलीं. युरोपांत बेल्जे येथें भरलेल्या चित्रपट प्रदर्शनांत कल्याण खजिना, पद्मिनी व सिंहगड यांच्या चित्रांना सुवर्णपदक व यांच्या दिग्दर्शनांतील जिव्हाळ्याबद्दल प्रशस्तिपत्रक मिळालें. परंतु पुढें आपसांतील बेबनावामुळें लंकादहन या यांच्या सतराव्या

चित्रपटानें महाराष्ट्र फिल्म कं.ची इतिश्री झाली (१९३०).

पुढें बोलपटाचे जमान्यांत यांनीं कोल्हापूरच्या शालिनी सिनेटोनसाठीं सावकारी पाश, उषा व प्रतिभा हे तीन चित्रपट तयार केले. यांपैकीं सावकारी पाश-मधील कलात्मक प्रचाराबद्दल त्या वेळीं यांची सर्वत्र वाहवा झाली. अगदीं अलीकडे 'रुक्मिणी स्वयंवर' व 'रामजोशी' या दोन चित्रांचें दिग्दर्शन यांनीं केलें.

दादासाहेब फाळक्यांनीं हिंदी चित्रपटसृष्टीचा पाया घातला व त्याला कलात्मक वळण देण्याचें काम यांनीं केलें. यांचें सर्व घराणें चित्रकारांचें, यांची स्वतःची तर कलात्मक तैलचित्रें काढण्याबद्दल विशेष ख्याति. नाविन्याची नवलाई संपल्यावर हिंदी चित्रपटांना यांचें कलापूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचें ठरलें. विजेच्या प्रकाशांत छायाचित्रण करण्याच्या व जाहिरातीसाठीं बाहेर पोस्टर्स लावण्याच्या यांच्या कल्पना पुढें सर्वमान्य झाल्या. हिंदी चित्रपटधंद्यांत अगदीं सुरवातीपासून ते थेट आजतागायत महाराष्ट्राला मिळालेलें नेतृत्व तर हे व यांच्या हाताखालीं तयार झालेले व्ही. शांताराम, एस्. फत्तेलाल, विष्णुपंत दामले, बाबुराव पेंढारकर, विनायक, दादा तोरणे, सरपोतदार, केशवराव धायबर या लोकांच्या तेजस्वी कार्याची फलश्रुति आहे.

पोतदार, प्रा. दत्तो वामन—(जन्म स. १८९० ऑगस्ट ५) मराठी इतिहास संशोधन, नवविचारप्रवर्तन व सार्वजनिक कार्य यांचे प्रसिद्ध पुरस्कर्ते.

यांचा जन्म बिरवाडी (जि. कुलाबा) येथें व शिक्षण पुणें येथें होऊन हे बी. ए. झाले (१९१०). नंतर हे नूतन मराठी हायस्कूल, पुणें या संस्थेंत शिक्षक म्हणून लागल्यावर तेथें आजीव सभासद होऊन मुख्य शिक्षक व सर परशुरामभाऊ कॉलेजांत प्राध्यापक म्हणून काम केल्यावर हे सेवानिवृत्त झाले (१९३५).

कै. वि. का. राजवाडे यांच्यापासून प्रेरणा घेऊन इतिहाससंशोधन व सार्वजनिक कार्य करण्याचें व्रत घेतलेल्यांपैकीं हे एक होत. तें व्रत यांनीं अविवाहित राहून मोठ्या निष्ठेनें यशस्वीपणें चालविलें आहे. मराठ्यांच्या इतिहासाचें संशोधन, शिक्षण आणि मराठी साहित्य या ह्यांच्या कार्याच्या मुख्य शाखा आहेत. तथापि त्या विषयांखेरीज इतरहि अनेक प्रकारच्या संस्थांशीं यांचा निकटचा संबंध असतो.

पुण्याच्या भारत इ. सं. मंडळाचे पंचवीस वर्षे चिटणीस, अनेक वर्षे कार्याध्यक्ष, ऑल इंडिया ओरिएन्टल कॉन्फरन्स हैदराबाद व इंडियन हिस्टॉरिकल काँग्रेस, अलाहाबाद (१९३८) या ठिकाणीं मराठी विभागाचे व मराठी साहित्य संमेलन, अहमदनगर (१९३९) येथें हे अध्यक्ष होते.

देशाच्या उत्कर्षाला आवश्यक असणाऱ्या विविध कार्यांचें महत्त्व ओळखून त्यांत भाग घेणारा यांच्यासारखा गृहस्थ अलीकडच्या काळांत विरळा. यांच्यांत कार्यकर्त्यांना प्रेरणा देण्याचा विलक्षण गुण आहे. 'पोतदारजी सबके साथ सहयोग रखते है, लेकिन सहमत किसकेभी साथ नही है' या यांच्या काकासाहेब कालेलकरांनीं केलेल्या वर्णनांत यांच्या स्वभाववैशिष्ट्याचा चांगला परिचय मिळतो. यांचें मराठी वक्तृत्व परिणामकारक असतें.

यांचे ग्रंथ—१ मराठी गद्याचा इंग्रजी अवतार (१९२२), २ विविधदर्शन-लेखसंग्रह (१९३९), ३ महाराष्ट्र साहित्य परिषदेचा इतिहास (१९४३) इत्यादि.

पोद्दार, कन्हैयालाल जयनारायण—(जन्म स. १८७०) सुप्रसिद्ध व्यापारी व हिन्दी भाषेंतील लेखक नि कवि.

यांचें जन्मस्थान मथुरा. हे रामगढ (सीकर-जयपुर)चे प्रसिद्ध मारवाडी शेठ गुरुसहायमलजींचे पणतु आणि मथुरेच्या दानशूर जयनारायणजींचे पुत्र. यांचा मुख्य व्यवसाय व्यापार असून केवळ हौसेनें हे हिन्दी भाषेंत लिखाण करतात. यांचा अलंकारप्रकाश हा ग्रंथ विद्वानांच्या प्रशंसेस पात्र झाला असून त्यांत केवळ अलंकारांचें विवेचन होतें. पण दुसऱ्या आवृत्तीचे वेळीं त्यांत काव्यविषयक इतर अंगांची माहिती घालून त्याचें नांव काव्यकल्पद्रुम असें ठेवण्यांत आलें. तसाच हिन्दी मेघदूतविमर्श हा यांचा ग्रंथ विद्वन्मान्य आहे.

यांचे ग्रंथ—१ भर्तृहरिशतक (अनुवाद), २ अलंकारप्रकाश, ३ काव्यकल्पद्रुम, ४ पद्यगीत (भागवतांतील कांहीं अध्यायांचा समश्लोकी अनुवाद), ५ गंगालहरी (समश्लोकी), ६ हिन्दी मेघदूतविमर्श.

पोपटराम प्रभुराम—(जन्म स. १८६५-मृत्यु स. १९४४ जाने. ९) मुंबईच्या पोपट प्रभुराम आयुर्वेद

विश्वविद्यालयाचे संस्थापक, सुप्रसिद्ध डॉक्टर आणि समाजसेवक.

यांचा जन्म पोरबंदर (सुदामपुरी) येथें झाला. यांचे वडील प्रभुराम जीवनराय हे आयुर्वेदांतील निष्णात पंडित होते. त्यांच्यापाशीं यांनीं आयुर्वेदाचें शिक्षण घेतलें. मुंबई विश्वविद्यालयांतून हे एल्. एम्. अँड एस्. झाले (१८९३). तेव्हां यांना पोरबंदर राज्याचे मुख्य आरोग्याधिकारी नेमण्यांत आलें. यांनीं तेथें आयुर्वेदाच्या पद्धतीनें उपचार करणारें एक मोठें रुग्णालय स्थापन केलें.

स. १८९५ मध्यें हे मुंबईस येऊन राहिले. यांनीं मुंबईस आल्यावर वडलांच्या देखरेखीखालीं आयुर्वेदीय औषधें बनवणारा 'प्रभुराम अनंत औषधालय' नांवाचा कारखाना सुरू केला. यानंतर आयुर्वेदाचें शिक्षण देणारें 'आयुर्वेद विद्यालय' न्या. म. गो. रानडे यांच्या अध्यक्षतेखालीं समारंभपूर्वक स्थापन केलें. तेथें शिक्षण घेतलेल्या वैद्यांना 'भिषग्वर' अशी पदवी दिली जाते.

स. १८९६ सालीं मुंबईत प्लेग सुरू झाला. त्या वेळीं यांनीं लोकांची अत्यंत सेवा केली. त्यामुळें यांना सरकारनें जे. पी. केलें आणि ऑनररी मॅजिस्ट्रेटचा हुद्दा दिला. १९०२ सालीं यांचे पिताजी निवर्तले व विद्यालयाचा सर्व भार यांच्यावर येऊन पडला. यांनीं मोठ्या चिकाटीनें आणि कुशलतेनें आयुर्वेद विद्यालयाला दि प्रभुराम आयुर्वेदिक कॉलेजचें रूप दिलें. तेथें शस्त्रवैद्यक, नेत्रवैद्यक व सूतिकारोग इत्यादींचें विशेष शिक्षण देण्याची व्यवस्था केली.

आयुर्वेदाच्या उत्कर्षाकरितां यांनीं अत्यंत मेहनत घेतली. आयुर्वेदावर घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांचें खंडन केलें. यांचे पुत्र डॉ. प्रताप हेहि आयुर्वेदाचे पक्षपाती आहेत.

प्रकाशम् टी.— (जन्म स. १८७३) आंध्र प्रांतांतील सुप्रसिद्ध काँग्रेस कार्यकर्ते व पुढारी.

१९२० च्या कायदेभंगाच्या चळवळींत आपले ऐन जोमांतील धंदे सोडणारांत आंध्र प्रांतांतील हे तरुण बॅरिस्टर प्रमुख होते. हातीं घेतलेलें कोणतेंहि काम तडफेनें करण्याच्या यांच्या कार्यपद्धतीमुळें हे त्या प्रांतांतील प्रमुख कार्यकर्ते बनले. कायदेभंगाच्या त्या मोहिमेंत प्रथम तुरुंगांत जाण्याचा मान यांना मिळाला. हे तुरुंगांतून सुटून आले व यांनीं 'स्वराज्य' हें आपलें सुप्रसिद्ध पत्र सुरू केलें. हे व आंध्र प्रांत यांत एक नवें दालन या पत्रानें खुलें केलें. देशाच्या चळवळींत तरुणांना अघाडीवर येण्याच्या संदेशाचा हे पाठपुरावा करीत. देशांतील जहाल राजकारणाला पाठिंबा देण्याच्या या पत्राच्या धोरणामुळें पुढें यांना हें पत्र बंद करावें लागलें.

पुढें मिठाचा सत्याग्रह आंध्रप्रांतांत सुरू करण्याचा मान यांनीं मिळविला. आंध्र प्रांतातर्फे हे मध्यवर्ति असेंब्लींतहि निवडून आले. आंध्र प्रांतिक काँग्रेस कमेटीचे हे अध्यक्ष असून १९३८ सालच्या काँग्रेस अमदानींत हे जमीनमहसूल खात्याचे प्रधान होते.

१९४६ च्या प्रांतिक निवडणुकींनंतर श्री. राजगोपालाचारींसारख्या म. गांधी व काँग्रेस पार्लमेंटरी बोर्ड यांनीं पुरस्कृत केलेल्या पुढाऱ्याला डावलून लोकांनीं यांना मुख्य प्रधान निवडलें, ही एकच गोष्ट यांच्या प्रभावी लोकप्रियतेची द्योतक आहे.

प्रतापशेट तथा मोतीलाल माणिकचंद— (जन्म स. १८७९) महाराष्ट्रांतील प्रसिद्ध व्यापारी व दानशूर गृहस्थ.

यांचा जन्म मूनपुरा (सं. जयपूर) मारवाडमध्यें झाला. गुरांना चारणें व उंट फिरवून आणणें इत्यादि कामांत यांचीं पहिलीं नऊ वर्षें गेलीं. पुढें चोपडें (खानदेश) येथील शेट माणिकचंद यांचे मांडीवर हे दत्तक गेले. वयाच्या चवदाव्या वर्षापर्यंत यांचें सरासरी मराठी पांच इयत्ता शिक्षण झालें. सावळारामपंत नाईक यांच्या हाताखालीं पंधरा वर्षें शिक्षण घेऊन यांनीं मराठी भाषेचें अध्ययन व तत्त्वज्ञानविषयक चर्चा केली. तत्त्वज्ञान हा यांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. या विषयावर यांचे तत्त्वज्ञानमंदिरांत लेख प्रसिद्ध झाले आहेत. स. १९०५ सालीं यांनीं स्वदेशी चळवळींत चोपडें येथें स्वदेशी कापडाचें दुकान उघडलें. स. १९०६ सालीं 'प्रताप मिल्स लि.' अमळनेर येथें सुरू केली. सहासात वर्षांनंतर तेथेंच एक दुसरी गिरणी उभारली. नंतर १९२३-२४ ला धुळें येथें 'न्यू प्रताप मिल्स लि.' नांवाची आणखी एक गिरणी सुरू केली. या तीनहि गिरण्यांची व्यवस्था हे स्वतः पाहतात. यांच्याच खटपटीनें व एक लाखाच्या देणगीनें अंमळनेरचे तत्त्वज्ञानमंदिर (इंडियन इंस्टिटयूट ऑफ फिलॉसफी) स्थापन झालें. तसेंच भोसला मिलिटरी ट्रेनिंग स्कूल, नाशिक या संस्थेलाहि एक लाख रुपये देऊन यांनीं स्थैर्य आणलें.

यांशिवाय यांनीं अनेक मोठाल्या देणग्या देऊन दानशूरत्व प्रगट केलें आहे. यांना सरकारकडून कैसर-इ-हिंद पदक व सुवर्णपदक मिळालें आहे.

प्रफुल्ल घोष—(जन्म स. १८९१) बंगालमधील सुप्रसिद्ध काँग्रेस कार्यकर्ते व ग्रामसेवक.

ढाका येथें यांचा जन्म झाला. जगन्नाथ कॉलेजमधून हे शास्त्रविषय घेऊन पहिल्या वर्गात एम्. ए. झाले. नंतर दोन वर्षे ढाका कॉलेजमध्यें केमिस्ट्रीचे रिचर्स स्कॉलर म्हणून काम केल्यानंतर यांनीं कांहीं दिवस कलकत्त्याच्या प्रेसिडेंसी कॉलेजांत प्राध्यापकाचें काम केलें. त्यानंतर हे कांहीं दिवस कलकत्ता टांकसाळींत असि. ॲसे मास्टर होते. सिंटेटिक व नॅचरल डाइजवरील यांच्या संशोधनाबद्दल कलकत्ता युनिव्हर्सिटीनें यांना डॉक्टरेट दिली. याचे आधीं बरेच दिवस हे सुरेंद्रनाथ बानर्जीच्या अंतर्वर्तुलांत होते. यांना पुढें म. गांधींनीं असहकारांत भाग घेण्याचा सल्ला देतांच यांनीं टांकसाळींतील आपली नोकरी सोडली व 'अभय आश्रमा'ची स्थापना केली (१९२०). खादीप्रचार, खेड्यांची पुनर्घटना, शेतकी सुधारणा, वैद्यकीय मदत देणें इत्यादि अनेक हेतु या संस्थेचे असून यांच्या शिस्तीच्या कार्यपद्धतीमुळें या क्षेत्रांत यांच्याबरोबरीनें काम करणें इतर कोणत्याहि संस्थेला अशक्य होऊन बसलें. १९३२ च्या असहकाराच्या जमान्यांत यांची ही संस्था बेकायदा ठरविण्यांत आली.

१९२१ सालच्या कायदेभंगाच्या चळवळींत यांनीं स्वयंसेवक पथक उभारलें. १९३० सालच्या चळवळींत तर यांना सिव्हिल डिसओबीडियन्स कौन्सिलचे सेक्रेटरी नेमण्यांत आलें. यांनीं मिठाचा कायदा मोडला व यांना दोन वर्षांची शिक्षा झाली. यांना कलकत्ता काँग्रेसचे स्वागताध्यक्ष नेमण्यांत आलें. परंतु तें अधिवेशन बेकायदा ठरल्यावर यांना तुरुंगांत जावें लागलें.

१९३४ पासून पुढें मात्र यांनीं आपणांस सर्वस्वीं ग्रामसेवेला वाहून घेतलें. पूर्व बंगालमधील पुराचे वेळीं यांनीं आपल्या आश्रमवासी सहकाऱ्यांचे साहाय्यानें अतोनात कष्ट केले. या कार्यासाठीं यांनीं या वेळीं ३५००० रु. जमविले.

हिंदुस्थानांतील ग्रामसुधारणेचे सर्वश्रेष्ठ कार्यकर्ते अशी प्रसिद्धि यांना यांच्या या कार्यामुळें मिळाली आहे.

प्रज्ञानंदस्वामी, ऊर्फ कृष्ण—(जन्म स.१८५९–समाधि स. १९०४) अध्यात्मदृष्ट्या थोर अधिकाराचे पुरुष.

हे मूळ परांजपे घराण्यांतील. यांनीं वेदाध्ययन व काव्यव्याकरणादिकांचें अध्ययन करून भागवतावर परिश्रम केले. पत्नी बाल्यावस्थेंत निवर्तल्यावर हे वेदान्तशास्त्राचा अभ्यास करूं लागले. गीता व उपनिषदें मुखोद्गत करून श्रीभूमानंदस्वामींजवळ यांनीं प्रस्थानत्रयीचा अभ्यास केला. श्रीब्रह्मानंदस्वामींनीं यांना वयाचे २९ वे वर्षी दीक्षा (संन्यास) दिली. तेव्हांपासून प्रज्ञानंदस्वामी हें नांव आलें. हे मुमुक्षूंना प्रस्थानत्रयीचे पाठ सांगत. यांचे १७ वर्षे प्रस्थानत्रयीचे पाठ चालले होते. यांचीं प्रवचनें ऐकून सामान्य व्युत्पन्न माणसाचाहि आचार्यभाष्यांत चांगला प्रवेश होई. कै. भाऊशास्त्री लेले, काशीनाथशास्त्री पारकर, भास्करशास्त्री पावगी, विष्णुशास्त्री बापट इत्यादि मंडळी श्रवणास येत. हे वाईस प्लेगनें वारले. शेवटीं नारायणशास्त्री मराठे व नारायणबुवा द्रवीड या शिष्यांनीं उत्तम सेवा केली. शंभुराव करंदीकर यांनीं यांच्या समाधिस्थळीं उत्तम इमारत बांधून शिवलिंगाची स्थापना केली. त्या जागेला प्राज्ञमठ म्हणतात. या मठाचें रूपान्तर व स्थलान्तर होऊन सध्यांची प्राज्ञपाठशाळा उदयास आली. शारीरकभाष्य यांनींच सांगावें अशी त्या वेळीं काशीपर्यंत यांची प्रसिद्धी होती.

प्रेमचंद—(जन्म स. १८८० जुलै ३१–मृत्यु स. १९३६ऑगस्ट २५) हिन्दी भाषेंतील विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतील सर्वश्रेष्ठ कादंबरीकार व लघुकथालेखक.

जन्मस्थान बनारसजवळ लमही गांव. जात कायस्थ 'दुसरे श्रीवास्तव.' पिता अजायबराय. माता आनन्दीदेवी. यांचें नांव (मुन्शी) धनपतराय. प्रथम हे या नांवानेंच लिहीत. पुढें यांना सरकारी अवकृपेमुळें 'प्रेमचंद' हें टोपण नांव घ्यावें लागलें. त्या टोपण नांवानेंच आतां यांची सर्वत्र प्रसिद्धि झालेली आहे.

यांचें शिक्षण गोरखपूर, बनारस, अलाहाबाद वगैरे ठिकाणीं झालें. यांनीं एम्. ए. पर्यंत अभ्यास केला होता. शाळा खात्यांत शिक्षक, मुख्याध्यापक, डे. इन्स्पेक्टर वगैरे कामें करून असहकारितेच्या कालांत यांनीं सरकारी नोकरी सोडली (१९२०). त्यापूर्वी हे लेखक म्हणून विख्यात झाले होते.

१९०५ सालीं यांची कृष्णा ही पहिली कादंबरी प्रसिद्ध

झाली. तिचेच पाठोपाठ प्रेमा प्रसिद्ध झाली. तिचेंच नांव पुढें 'विभव' ठेवलें. याच सालीं शिवरानी या विधवा स्त्रीशीं यांचा पुनर्विवाह झाला. एक वर्षानंतर 'सोजे वतन' प्रसिद्ध होऊन जप्त झालें आणि हे टोपण नांवानें लिहूं लागले. प्रथम हे उर्दूत लिहीत पण पुढें हे हिन्दींतच लिहूं लागले.

१२ कादंबऱ्या, ३१ लघुकथासंग्रह, ३ नाटकें, ३ चरित्रें, २ चर्चात्मक व ११ संपादित अशीं बासष्ट पुस्तकें यांच्या नांवावर हिन्दींत प्रसिद्ध आहेत. यांच्या कादंबऱ्या लोकप्रिय असल्या तरी त्यापेक्षांहि यांच्या लघुकथा अधिक लोकप्रिय आहेत. यांच्या लिहिण्यांतील अत्यंत मोठा गुण हा आहे कीं त्या वाचकांच्या अन्तःकरणाचा ठाव घेऊन त्याला विचाराची नवी दिशा दाखवतात. प्रचलित प्रश्न लघुकथेच्या द्वारा मांडून त्यावर नवा प्रकाश टाकण्याची यांच्या लिहिण्यांत शक्ति आहे. जीवनांत नित्य अनुभवाला येणाऱ्या सुखदुःखादि द्वंद्वाचें यथार्थ चित्रण करणारा यांच्यासारखा लेखक विरळा. हिंदुमुसलमानांच्या झगड्याचें चित्रण करतांना यांनीं दोन्ही समाज अहिंसा, सत्य वगैरे धर्मांपासून कसे च्युत होत आहेत याचें उत्कृष्ट दिग्दर्शन केलें आहे. तसेंच यांच्या अत्यंत लोकप्रिय गोदान नांवाच्या कादंबरींत यांनीं हिंदु शेतकऱ्याची गाईबैलांसंबंधीं वृत्ति आणि खालावत चाललेलें ग्रामीण जीवन मोठ्या हळुवारपणें पण यथार्थ रंगविलें आहे. यांच्या कथांचें भाषांतर हिंदुस्थानांतील अनेक देशी भाषांत तर झालें आहेच; शिवाय जपानी, इंग्रजी वगैरे भाषांत भाषांतरित होण्याचा मान त्यांना लाभला आहे. यांच्या इतपत भाषांतरित होण्याचा मान विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतील हिंदी लेखकांपैकीं इतरांना अद्यापि लाभलेला नाहीं.

यांचें घरगुती जीवन परिचित करून देणारा ग्रंथ यांच्या पुनर्विवाहित पत्नी शिवरानीदेवी यांनीं 'प्रेमचंदः घरमें' नांवानें यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध केला आहे (१९४४). त्यावरून यांचें घरगुती जीवन कळून येतें आणि यांच्या लेखनाची पार्श्वभूमि ध्यानांत येते. सर्वसाधारण लोकांसारखें यांचें जीवन असलें तरी जीवनाचा मूलगामी पद्धतीनें विचार करण्याचा यांचा स्वभाव, तळमळ आणि निर्भयपणा मनांत भरतो आणि वाचकाच्या मनांत हे आपलेपणा कां उत्पन्न करतात याचें कारण ध्यानांत येतें.

फ

फडके, नारायण सीताराम—(जन्म स.१८९४) मराठींतील नामांकित ललित-लेखक व वक्ते.

पुण्याचें नूतन मराठी विद्यालय व फर्ग्युसन कॉलेजमध्यें आपलें शिक्षण संपवून हे एम्. ए. झाले आणि यांची न्यू पूना कॉलेजांत प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. परंतु असहकारितेच्या चळवळींत यांनीं कॉलेज सोडलें व केसरीमराठ्याच्या सहसंपादनाचें काम पत्करिलें. याच वेळीं टिळक महाविद्यालयांत शिकवण्याचें कामहि हे करीत. परंतु पुढें हे दिल्ली, हैदराबाद (सिंध), नागपूर इत्यादि ठिकाणीं हिंडून कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र यांचे प्राध्यापक म्हणून स्थिर झाले (१९२६).

ललितलेखन हा यांचा प्रमुख प्रांत असला तरी यांचे सुरवातीचे बरेच ग्रंथ शास्त्रीय या सदरांत मोडणारे आहेत. त्यांत मुंबई युनिव्हर्सिटीकडून बक्षिस मिळालेला 'दादाभाई नौरोजी' हा चरित्र ग्रंथ व शास्त्रीय तत्त्वें सुलभ करून सांगण्याच्या शैलीमुळें लोकप्रिय झालेली Sex Problem in India, मानसोपचार इत्यादि यांचीं पुस्तकें प्रमुख होत. 'प्रतिभासाधन' हा यांचा मराठींतील ग्रंथहि अनेक दृष्टींनीं नामांकित आहे.

परंतु लालित्य व सातत्य या दोन्ही दृष्टींनीं परदेशी लेखकांच्या तोडीचें वाङ्मय निर्माण करणारा यांच्यासारखा लेखक मराठी भाषेंत क्वचित्च आढळेल. एकदां यांची कादंबरी वाचावयास सुरवात केली कीं परिस्थितीशीं तिचा कोणताहि संबंध नाहीं, वर्णन केलेल्या प्रसंगांत नाविन्य नाहीं, पात्रांच्या हालचाली ठोकीव आहेत, अशा टीकाकारांच्या अनेक आक्षेपांना विसरावयास लावून यांची भाषा वाचकाला तिच्या शेवटपर्यंत

नेऊन पोंचविते. खरोखरच कथानक, पात्रें, प्रसंग यांमधील कलात्मक रेखीवपणा यांच्याइतका इतरत्र क्वचित् आढळतो.

प्रमुख ललित वाङ्मयः—दौलत, जादूगार, अखेरचें बंड, वादळ (अनुवादित) फडके यांच्या गोष्टी (दोन भाग), गुजगोष्टी इत्यादि. 'झंकार' हें मराठी साप्ताहिक यांच्या 'दिग्दर्शनाखाली' चालतें. रत्नाकर मासिकाचे हे कांहीं वर्षे संपादक होते.

फडके, वासुदेव बळवंत—(जन्म स. १८४५ नवं. ४–मृत्यु स. १८८३ फेब्रु. १७) सुप्रसिद्ध बंडखोर.

हे पुणें येथें जज्जाच्या कचेरींत कारकून होते. १८७६–७७ च्या दुष्काळामुळें लोकांचे अत्यंत हाल झालें. त्यामुळें यांच्या मनांत बंडाची कल्पना आली. तेव्हां सत्तावन सालच्या बंडांतील पुष्कळच लोक इतस्ततः पांगलेले होते. लोकांतहि याच विषयाच्या गप्पा चालत. यांनीं आसपासचे धाडसी लोक एकत्र करण्यास सुरुवात केली आणि लोकांना दांडपट्टा, घोड्यावर बसणें, तलवार चालविणें, बंदूक मारणें वगैरे शिक्षण देण्यास सुरुवात केली. बऱ्याच सुशिक्षित व अशिक्षित धाडसी तरुणांचा मेळा यांच्या भोंवतीं जमा झाला होता.

योग्य संधि येतांच कांहीं मोठ्या लोकांनींहि यांच्यांत सामील होण्याचें ठरविलें होतें. हत्यारें, अन्नखर्च वगैरेकरितां यांनीं दरोडे घालून रक्कम उभारण्यास सुरवात केली. स. १८७९ मध्यें यांच्या बंडाच्या धामधुमीनें महाराष्ट्राचा बराच भाग विशेषतः पुण्याकडील भाग–दुमदुमून गेला होता.

शेवटीं फितुरी, आजारीपण वगैरेंमुळें यांना पकडण्यांत आलें व यांना जन्मठेपेची शिक्षा देण्यांत आली. तेथून हे पळून जाण्याचा प्रयत्न करीत असतां एडन येथें हे मृत्यु पावले.

'दधीचि ऋषींनीं आपल्या अस्थीहि देवासाठीं दिल्या मग, हे हिंदवासीयांनो, मी आपला प्राण तुमच्यासाठीं कां देऊं नये,' हे यांचे उद्गार यांच्या वृत्तीवर प्रकाश पाडणारे आहेत.

यांची द्वितीय पत्नी गोपिकाबाई यांनाहि वीरोचित दांडपट्टा, तलवार, बंदूक, घोड्यावर बसण्याचें शिक्षण देण्यांत आलें होतें. (त्यांचा जन्म स. १८६२ (विजापूर), विवाह स. १८७४ (शिरढोण) व मृत्यु स. १९४० (पनवेल).) त्यांच्या आयुष्यांत फक्त लग्न झाल्यानंतर पांच वर्षे पतिसहवासाचीं लाभली होतीं.

'फडके जन्मशताब्दि मंडळ' स्थापून महाराष्ट्रांत यांच्या जन्मशताब्दीचा उत्सव साजरा करण्यांत आला.

फरुक्—(जन्म स. १९१६) पंजाबांतील जगप्रसिद्ध हिंदी मल्ल व स्थापत्यविशारद.

यांना खुशीमुहम्मद यांनीं कुस्तीचें शिक्षण दिलें. यांनीं आव्हानपूर्वक पंजाबांत कुस्त्यांत जय मिळवून हे पुढील शिक्षणाकरितां इंग्लंडला गेले (१९३३). तेथें ग्लासगो विश्वविद्यालयांत सिव्हिल एंजिनियरिंगचें शिक्षण घेत असतां तेथील एल्. एम्. एस्. रोव्हर्स क्लब या संस्थेंत नांव दाखल करून पाश्चात्य कुस्तींतील वैशिष्ट्यपूर्ण डावपेचांचें प्रायोगिक शिक्षण घेण्यास यांनीं सुरवात केली. स्कॉटलंडमधील कुस्तींतील अजिंक्यपद मिळविलेले गिब्सन यांच्याशीं एडिंबरो येथें सामना होऊन यांनीं जय मिळविला. इंग्लंडचे अद्वितीय मल्ल हरमान व मेलरोज यांनाहि यांनीं चीत केलें. नंतर हे तिकडचे बी. एससी. झाले. हे सुप्रसिद्ध थोरल्या गामानंतर जगांतील अद्वितीय मल्ल होण्याचा संभव आहे.

फलटणकर, नारायणबुवा रावजी गोगटे—(जन्म स. ? मृत्यु स. ?) सुप्रसिद्ध हरिदास व गवई.

यांच्या तोडीचा हरदास त्या वेळीं महाराष्ट्रांतच काय पण महाराष्ट्राच्या बाहेरहि दुसरा कोणी नव्हता. यांच्या कीर्तनानें त्या वेळीं आबालवृद्धांना वेड लावलें होतें. यांनींच सुभद्राहरणाचें आख्यान लावून किर्लोस्कर कंपनीचें 'सौभद्र' नाटक बंद पाडलें अशी आख्यायिका आहे. यांचे वडील रावजीबुवा उत्तम गायक असल्यानें त्यांचीं मुलें बाबुराव, नारायण, केशव व बच्चाका हीं सर्वच उत्तम गायक होतीं. इंदूरला जाण्यापूर्वी बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्याकडे शिकण्यास येत. या मुलांच्या बरोबर ते तालसुरांत बरोबर चालेनात. तेव्हां हे चिडून म्हणाले 'श्राद्धान्न झोडणाऱ्या भटाचीं पोरें गवई होऊं लागलीं तर गाढवालाहि सुरेल गंधर्व समजून त्याला मान्यस्थांच्या पंक्तीला बसवावें लागेल.' असली विषारी अपमानकारक भाषा ऐकतांच ते उत्तरले, 'येईन तर बाहेर जाऊन, विद्या शिकून गोगटे घराण्याला जिंकणारा गवई होऊनच पुनः इचलकरंजीस येईन, नाहीं तर या भूमीला आजच शेवटचा रामराम ठोकून हें काळें झालेलें तोंड लपविण्याकरितां कायमचा नाहींसा

होईन.' दोघांच्याहि स्वभावांवर प्रकाश पाडणारी ही आख्यायिका आहे.

फाजल-इ-हसन— (जन्म स. १८७७–मृत्यु स. १९३६) पंजाब प्रांतांतील सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ व सुधारक.

प्रथम पंजाब व नंतर केम्ब्रिज युनिव्हर्सिटीचे ग्रॅज्युएट झाल्यानंतर हे बॅरिस्टर झाले व यांनीं पंजाबमध्यें वकिली करण्यास सुरवात केली.

पंजाब युनिव्हर्सिटीच्या सिनेटचे व सिंडिकेटचे सभासद म्हणून हे काम करीत असतांच मॉन्टफर्ड सुधारणा जाहीर झाल्या. या सुधारणांवर सर्वत्र निराशाजनक म्हणून टीका होत असतांच त्या सुधारणांना यांनीं मनापासून पाठिंबा दिला. पंजाब युनिव्हर्सिटीतर्फे पंजाब लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत हे निवडून गेले व पंजाबचे शिक्षणमंत्री, रेव्हेन्यु मेंबर व शेवटीं हिंदुस्थान सरकारचे शिक्षणमंत्री म्हणून नव्या धर्तीची कामगिरी करून आपलें म्हणणें यांनीं खरें करून दाखविलें.

हिंदुस्थान व त्यांतहि पंजाब प्रांत शिक्षण व संस्कृति या दृष्टीनें मागासलेला आहे. अशा स्थितींत हिंदुस्थानचा उद्धार करावयाचा तर प्रथम खेड्यांतील लोकांना शिक्षण देऊन त्यांना जगाच्या पायरीवर आणून बसविलें पाहिजे अशी यांची सुधारणेची मूलभूत कल्पना होती. स्वतःचें हिताहितच ज्यांना समजत नाहीं त्यांना स्वराज्याचा अर्थ पटविण्याचा प्रयत्न करणें मुष्कील आहे, तेव्हां त्यांना प्रथम 'योग्य' शिक्षण दिलें पाहिजे, अशी मॉन्टफर्ड सुधारणांचें स्वागत करण्याचे मुळाशीं यांची कल्पना होती.

अर्थातच 'योग्य' शिक्षणाचा मुख्य रोख पुढील पिढीच्या आपसांतील शत्रुत्वापेक्षां मित्रत्वावर असला पाहिजे, फक्त अशीच विद्या विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याप्रत नेऊं शकेल अशी यांची खात्री होती. म्हणून यांनीं शिक्षणमंत्री होतांच त्या दृष्टीनें काम करण्यास सुरवात केली.

यांना सर्वांत जास्त कष्ट खेड्यांत द्यावे लागले. खेड्यांतील खाजगी शाळांतूनच जातीयतेचें बीज पेरलें जातें अशी यांची खात्री झाली. या जातीय मगरमिठ्ठींतून विद्यार्थ्यांना सोडविण्यासाठीं यांनीं सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना खुल्या असणाऱ्या सरकारी शाळा सुरू केल्या व यांच्या या कल्पनेला अपेक्षेबाहेर यश लाभलें. इतर कोणत्याहि जातीपेक्षां मुसलमान लोकांनींच या योजनेचा फायदा घेतला.

प्राथमिक शिक्षणाचा खेड्यापाड्यांतून प्रसार करण्यासाठीं यांनीं त्या वेळीं प्रत्येक गांवीं रूढ असणाऱ्या ग्रामपंचायतीच्या ताब्यांतच त्यात्या गांवच्या शाळांची व्यवस्था देऊन टाकली. पुढें यांनीं त्या ग्रामपंचायतींची पुनर्घटना करण्याचें अवघड कामहि पार पाडलें.

अँग्लो व व्हर्नाक्युलर शिक्षणक्रमांतील घोटाळे टाळण्यासाठीं यांनीं ते दोन्ही शिक्षणक्रम एक केले. या कारणानें खेड्यांची आर्थिक स्थिति सुधारून तेथील शाळांचें महत्त्व वाढेल ही यांची कल्पनाहि अनुभवान्तीं यशस्वी झाली. खेड्यांतील व्ह. फा. शाळांचा अभ्यासक्रम यासाठीं बदलण्यांत आला. शेतकाम, बागकाम अशा देशाच्या परिस्थितीशीं अनुरूप अशा विषयांची त्यांत भर घालून यांनीं त्या शिक्षणक्रमाला पूर्ण व्यवहारी बनविलें.

याशिवाय एक उत्कृष्ट पक्षसंघटक अशी यांची प्रसिद्धि असे. पक्षसंघटनेच्या कामांत हे लांबलचक व्याख्यानांच्या भरीस कधींच पडले नाहींत. प्रत्येक सभासदाची व्यक्तिशः गांठ घ्यावयाची व त्याला समजेल अशा भाषेंत आपलें म्हणणें त्यास पटवून द्यावयाचें अशा क्रमानें यांनीं आपल्या पक्षांतील लोक वाढविले. हो ला हो ठोकणाऱ्या नाममात्र सभासदांचें आपल्या हक्काबद्दल जागरूक राहणाऱ्या मतदारांत झालेल्या रूपान्तराचें श्रेय सर्वस्वीं यांना द्यावें लागेल. सर छोटूराम, सर सिकंदर हयातखान, सर फिरोझखान नून, शहाबुद्दीन ही पुढें प्रसिद्धीस आलेली सर्व मंडळी यांच्या तालमींत तयार झालेली आहेत.

मॉंटफर्ड सुधारणांनंतर उत्पन्न झालेल्या महत्त्वाच्या काळांत यांनीं केलेली कामगिरी पंजाबच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाची आहे. लोकांना उपदेश न करतां त्यांना विश्वासांत घेऊन काम करीत राहण्याची यांची कार्यपद्धति परिणामीं यशस्वी ठरली. शाळा या विद्यार्थ्यांसाठीं आहेत, विद्यार्थी शाळेसाठीं नाहींत ही आतां साधी वाटणारी गोष्ट ध्यानांत घेऊन यांनी आपला शिक्षणक्रम आंखला व विचार नि वक्तृत्व या सर्व बाबतींत तत्कालीन पुढाऱ्यांपेक्षां कमी असून हे नव्या पिढीचे द्रष्टे ठरले. खरोखरच पंजाबच्या सध्याच्या सार्वत्रिक उन्नतीचें श्रेय स्वतः विचार करण्यास शिकविणाऱ्या या महात्म्याला द्यावें लागेल.

फाळके, धुंडिराज गोविंद ऊर्फ दादासाहेब—(जन्म स. १८७०–मृत्यु स. १९४४) हिंदी चित्रपटसृष्टीचे जनक.

त्र्यंबक हें तीर्थक्षेत्र यांचें जन्मस्थान. मुंबई येथील मराठा हायस्कूलमध्यें आपलें प्राथमिक शिक्षण संपवून ह्यांनीं जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्, मुंबई व कलाभवन बडोदा येथील अभ्यासक्रम पुरा केला.

यानंतर फोटो-लिथोग्राफी, फोटो-एन्ग्रेव्हिंग व ट्रायक्रोमेटिक प्रोसेस इत्यादि विषयांचें अध्ययन करण्यासाठीं हे जर्मनीला गेले व त्या धंद्याची सामग्री घेऊन हे हिंदुस्थानला परतले. आल्यानंतर तावडतोब यांनीं सर डॉ. रा. गों. भांडारकर यांचे आर्थिक सहकार्यानें 'फाळकेज आर्ट प्रिंटिंग वर्क्स'ची स्थापना केली. या संस्थेचेंच रूपांतर पुढें 'लक्ष्मी आर्ट प्रिंटिंग वर्क्स'मध्यें करण्यांत आलें. १९१२ त यांनीं या संस्थेशीं असणारा आपला संबंध तोडला.

मध्यंतरींच मुंबईस आलेल्या ख्रिस्त चरित्रावरील चित्रपट पाहून यांना आपल्याकडेहि पौराणिक विषयांवर चित्रपट तयार करण्याची कल्पना सुचली. त्याप्रमाणें हे पुन्हां जर्मनीला गेले व तेथें चित्रपट तयार करण्यास आवश्यक असणाऱ्या ज्ञानाची व यंत्रसामग्रीची प्राप्ति करून घेऊन हे हिंदुस्थानला परत आले. आल्यानंतर यांनीं सॉलिसिटर चिटणीस यांच्या अर्थसाहाय्यानें फाळकेज फिल्मसची स्थापना केली व त्या संस्थेच्या 'राजा हरिश्चंद्र' या पहिल्या चित्राचें प्रदर्शन मुंबई व पुणें येथें उत्साहानें पार पडलें (१९१३).

या यशानें उत्तेजित होऊन यांनीं 'मोहिनी-भस्मासुर' व 'सावित्री' हे दोन चित्रपट तयार केले व आपले तीन चित्रपट बरोबर घेऊन हे युरोपला गेले (१९१५). महायुद्धामुळें यांना आपल्या चित्रांचें प्रदर्शन तेथें करणें जरी अशक्य झालें तरी अनेक तज्ज्ञांनीं त्या तीनहि चित्रांची मनापासून स्तुति केली.

याच सुमारास श्री. वा. श्री. आपटे, मायाशंकर भट व लक्ष्मणराव फाटक यांचे भांडवलावर यांनीं आपल्या फाळकेज फिल्मसचें रूपांतर हिंदुस्थान फिल्म कंपनींत केलें. लंकादहन, कालियामर्दन व श्रीकृष्णजन्म हे तीन अति प्रसिद्धी पावलेले चित्रपट तयार करून हे त्या कंपनींतून निवृत्त झाले.

१९३७ सालीं कोल्हापूरचे छत्रपति राजाराममहाराज यांचे सांगण्यावरून यांनीं तयार केलेला गंगावतरण हा यांचा पहिला व शेवटचा बोलपट होय. त्यामधील ट्रिक फोटोग्राफीबद्दल त्या वेळीं सर्वत्र यांचें कौतुक झालें.

हिंदी चित्रपटसृष्टीच्या जनकत्वाचा मान यांचेकडे जातो. खरोखरच कृतकृत्यता वाटावी इतकी प्रगति हिंदी चित्रपटांनीं यांच्यासमोर व यांच्या पश्चात् केली. अमेरिकेच्या खालोखाल कच्चा फिल्मचा विनियोग सध्यां हिंदुस्थानांत केला जातो ही एकच गोष्ट चित्रपटाच्या दूरगामी व्यापाची कल्पना आणून देईल.

आज हिंदुस्थानांत चित्रपट हा एक मोठा धंदा समजण्यांत येत असून मोठेपणाच्या दृष्टीनें त्याचा आठवा नंबर लागतो. जवळ जवळ ९,३०,००,००० फूट फिल्मची या धंद्यासाठीं आयात करण्यांत येत असून दर वर्षी सरासरी दीडशें चित्रपट तयार करण्यांत येतात. हे चित्रपट सर्व प्रांतांत पसरलेल्या सतराशें सिनेमागृहांतून दाखविले जातात. साडे आठ कोटी रु. पेक्षां जास्त भांडवल या धंद्यांत गुंतविण्यांत आलें आहे. मुंबई हें या सर्व धंद्याचें मुख्य केंद्र असून दोन तृतियांशापेक्षां जास्त चित्रपट मुंबईला तयार केले जातात.

यांच्या या महत्कार्याबद्दल १९३८ सालीं मुंबई येथें झालेल्या हिंदी चित्रपटाच्या रौप्यसमारंभाचे वेळीं यांचा जाहीर सत्कार करण्यांत आला. तसेंच हिंदुस्थानांत सर्वांत अधिक चित्रपट स्टुडिओ असणाऱ्या दादरमधील मेनरोडला 'फाळके रोड' नांव देण्याचा ठराव मुंबई कॉर्पोरेशननें केला.

फॉर्ब्स, अलेक्झांडर किंलोक—(जन्म स. १८२१–मृत्यु स. १८६४) गुजराथचे इतिहासलेखक.

राजपुतान्याचा टॉड, मराठ्यांचा डफ, त्याप्रमाणें गुजराथचा इतिहास प्रथम व्यवस्थित लिहिणारे हे होत. पाटण वगैरे ठिकाणीं गुजराथच्या इतिहासासंबंधीं प्राचीन संस्कृत ग्रंथ मिळाले तेव्हां यांनीं शोधपूर्वक 'रासमाला' नांवानें गुजराथचा मोठा विस्तृत इतिहास लिहिला. त्याकरितां हे आबूला गेले व तेथील शिलालेख व देलवाड्याच्या दोन्ही जैन मन्दिरांच्या कारागिरीच्या उत्कृष्टतेबद्दल यांनीं विस्तृत लिहिलें आहे.

फुले, महात्मा-जोतिबा गोविंद—(जन्म स. १८२७–मृत्यु स. १८९०) महाराष्ट्रांतील आद्य समाजसुधारक व स्वयंस्फूर्तीनें समतावाद प्रतिपादणारा महात्मा.

यांचें मूळ गांव सातारा जिल्ह्यांतील कटगुण. तेथून यांचे पणजे पुरंदर तालुक्यांतील खानवडीस येऊन राहिले. तेथून यांचे अजोबा शेटीबा उदरनिर्वाहास पुण्यास आले. तेथें त्यांनीं आपलीं तीनहि मुलें शेळ्या राखण्यास ठेवलीं. पुढें त्या मुलांनीं माळी कामांत कौशल्य दाखविल्यानें मूळचें गोऱ्हे नांव मागें पडून यांना फुले हें उपनांव प्राप्त झालें. हे माळी जातींतील फुलमाळी होत. यांचा पिता गोविंदराव आणि माता चिमाबाई. हे एक वर्षाचे असतांना आई वारल्यानें यांचें पालनपोषण बापानें केलें.

हे वयाच्या सातव्या वर्षी शाळेंत जाऊं लागले. मध्यें कांहीं दिवस बागकाम करीत. पुढें इंग्रजी शाळेंत नांव घालून पांचसहा वर्षे शिक्षण घेतलें. बंडखोर वा. ब. फडके यांचे मांग जातीचे गुरु लहूजीबुवा यांचेपाशीं दांडपट्टा व नेमबाजी यांचें शिक्षण यांनीं घेतलें. पण ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या कार्यपद्धतीचा यांच्यावर अत्यंत परिणाम झाला. त्यांची कार्यनिष्ठा व सेवावृत्ति यांनीं हे भारले गेले. बहुजन समाजाला साक्षर करून त्यांतील गुलामी वृत्तीचा नायनाट करून समतेचा प्रचार करण्याचें काम यांनीं मोठ्या तडफेनें करण्यास सुरुवात केली.

प्रथम यांनीं अनेक ब्राह्मण मित्रांच्या साहाय्यानें बुधवारांत चिपळुणकरांच्या वाड्यांत मुलींची शाळा सुरू केली (१८५१). त्या कामीं यांना समाज व समाजाच्या विरुद्ध जाण्यास भिणारा अधिकारी वर्ग यांचा तीव्र विरोध सहन करावा लागला. यांच्या पत्नी सावित्रीबाई यांनीं लोकांनीं केलेली विटंबना व माहेराला कायमची सोडचिठ्ठी देऊनहि यांना या कामीं अत्यंत साहाय्य केलें. लवकरच या शाळेच्या रास्ता व वेताळ पेठेंत शाखा निघून विद्यार्थिनींची संख्या दोनशें सदतीसपर्यंत गेली (१८५३). संस्थेच्या दुसऱ्या वार्षिक समारंभास तीन हजार लोक जमले होते. यांच्या या अभिनव कार्याबद्दल यांचा जाहीर सत्कार होऊन सरकारतर्फे यांना दोनशें रुपयांची शालजोडी अर्पण करण्यांत आली (१८५२).

याच सुमारास अस्पृश्यांकरितां यांनीं वेताळ पेठेंत दोन शाळा स्वखर्चानें चालविल्या (१८५२). 'महारमांग इत्यादि लोकांस विद्या शिकविण्याकरितां मंडळी' स्थापन केली (१८५३ सप्टें.). या शाळेची जागेची अडचण म्हणून रा. ब. सदाशिव बल्लाळ गोवंडे यांनीं आपली स्वतःची जागा शाळेकरितां वापरण्यास दिली. हिच्या स. १८५८ मध्यें दोनशें अठ्ठावन मुलें व तीन शाखा झाल्या. मुलांना पाणी पिण्याकरितां यांनीं तेथें स्वतंत्र हौद बांधला व आपल्या घराशेजारील हौद अस्पृश्यांना खुला केला.

ब्राह्मणादि उच्चवर्णीयांतील विधवा स्त्रियांचे हाल पाहून यांनीं विधवापुनर्विवाहाचा प्रचार केला व तसा एक विवाह घडवून आणला (१८६४). तसेंच वांकडें पाऊल पडून भ्रूणहत्येचा प्रसंग येऊं नये म्हणून यांनीं आपल्या घराशेजारीं 'बालहत्याप्रतिबंधकगृह' उघडलें (१८६४). तेथें गुप्तपणें प्रसूत होऊन जाण्याची व्यवस्था असे. तसेंच अशा स्त्रियांच्या प्रसूतीची व्यवस्था आपल्या घरीं असल्याचा यांचा जाहीरनामा होता. पंढरपूरचें बालहत्याप्रतिबंधकगृहसुद्धां यांच्या प्रचाराचें फळच होय (१८६३).

अशा प्रकारें लोकविरोधाला तोंड देत समाजसेवेचें यांचें काम सतत चालू होतें. या कार्याला तात्त्विक पायावर उभें करण्याकरितां यांनीं सत्यशोधक समाजाची स्थापना केली (१८७३ सप्टें. २४). ब्राह्मणादि लोकांच्या दास्यापासून व त्यांच्या बनावट व कार्यसाधक ग्रंथांपासून समाजाची मुक्तता करण्याकरितां हा समाज स्थापन करण्यांत आला. 'सर्वसाक्ष जगत्पती। त्याला नकोच मध्यस्ती।' हें या समाजाचें ब्रीदवाक्य होतें. तेथें दर रविवारीं प्रार्थना व महिन्यांतून दोन व्याख्यानें होत. पुरोहिताशिवाय लग्नें लावणें व मराठींत मंगलाष्टकें म्हणण्याचा उपदेश होई. लवकरच कांहीं शाखा निघून तीनशेंवर सभासद झाले. स. १८८५ सालीं या समाजाच्या झेंड्याची मोठ्या थाटानें मिरवणूक निघाली. तीमध्यें न्या. रानडे प्रभृति लोक होते.

यांच्याभोंवतीं पुढील नवे कार्यकर्ते निर्माण झाले. १ कृष्णराव पांडुरंग भालेकर, २ ग्यानोबा कृष्णाजी ससाणे, ३ नारायण मेघाजी लोखंडे, ४ गणपत सखाराम पाटील. यांपैकीं भालेकर यांनीं स्वतःच्या हिंमतीवर 'दीनबंधु' साप्ताहिक काढलें (स. १८७५). हेहि त्यांत लिहीत.

कोल्हापूर प्रकरणांत टिळक-आगरकरांवर अब्रूनुकसानीची फिर्याद झाली, त्या वेळीं यांनीं त्यांना उचलून धरलें. रामशेट उरवणे यांच्याकडून दहा हजारांचा जामीन देवविला आणि ते सुटून आल्यावर त्यांचा पुणें-मुंबई येथें जाहीर सत्कार करवला.

सार्वत्रिक सक्तीचें शिक्षण झाल्याशिवाय बहुजनसमाजाची स्थिति सुधारणार नाहीं असा यांनीं प्रचार केला व हंटरकमेटीपुढें या अर्थाची साक्ष दिली. रायगडावरील शिवाजी महाराजांच्या मोडकळीस आलेल्या समाधीचा जीर्णोद्धार करण्याचा प्रश्न यांनीं उपस्थित केला व त्याकरितां मेहनत घेतली. ड्यूक ऑफ यॉर्क पुण्यास आले तेव्हां, हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची यथार्थ स्थिति दर्शविण्याकरितां घोंगडी व पंचा या गरीब शेतकऱ्यांच्या पोषाखांत तेथें हे उपस्थित राहिले.

समाजशास्त्रज्ञांनीं अभ्यासपूर्वक जे सिद्धान्त शोधून काढले ते यांनीं स्वयंस्फूर्तीनें प्रतिपादिले. इतर सुधारकांप्रमाणें तात्त्विक प्रतिपादन व मर्यादित सुधारणांचा पुरस्कार करूनच हे थांबले नाहींत. मूळ समाजरचना बदलण्याकरितां जुन्या समाजाचा सर्वस्वीं आधार असणाऱ्या ब्राह्मण व वेदपुराणादि धर्मग्रंथांवर यांनीं अत्यंत प्रखर हल्ला केला. यांनीं खळबळ उडवणारी व मनाची सहज पकड घेणारी भाषा व प्रतिपादनशैली स्वीकारून समाजाला आमूलाग्र खवळून सोडण्याचें कार्य केलें आणि प्रत्येक सुधारणा व्यवहारांत आणण्यावर कटाक्ष ठेवला. यांनीं प्रचाराचें एक नवें तंत्र उपयोगांत आणलें. अशा माणसांची परंपरा चालविण्याची शक्ति क्वचितच आढळते. तथापि काल मात्र यांच्या प्रतिपादनाला सर्वस्वी पाठिंबा देतांना आढळतो.

यांचें वाङ्मय—१ ब्राह्मणांचें कसब (१८६९ पद्यात्मक), २ शिवाजीचा पवाडा (१८६९, ८ भाग), ३ गुलामगिरी (१८७३, दोन आवृत्त्या), ४ शेतकऱ्याचा आसूड (१८७७, भाग १-४), ५ जातिभेदविवेकसार (१८८१, एक हिंदु या टोपण नांवानें), ६ सत्कार (१८८५, अंक १-२; १ शूद्रांचीं गाऱ्हाणीं, स्त्रीजातीची उपेक्षा), ७ इशारा (१८८५, जातिभेदविरोध), ८ सार्वजनिक सत्यधर्मप्रकाश (१८९१, अखेरचे धर्मविषयक विचार), ९ एक नाटक (अप्रसिद्ध).

फ्लीट, डॉ. जॉन फेथफुल—(जन्म स.१८४७–मृत्यु स. १९१७) सुप्रसिद्ध शिलालेखज्ञ, ताम्रपटवाचक व संशोधक.

लंडनच्या मर्चन्ट्स टेलर स्कूल व युनिव्हर्सिटी कॉलेजमध्यें आपलें शिक्षण संपवून हे इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें शिरले. हिंदुस्थानांत येणाऱ्या माणसास त्या वेळीं आवश्यक समजल्या जाणाऱ्या संस्कृत भाषेचें जुजबी शिक्षण घेऊन हे हिंदुस्थानांत आले (१८६७).

मुंबई प्रांतांत आल्यावर यांनीं असि. कलेक्टर, एज्युकेशनल इन्स्पेक्टर, हिंदुस्थानसरकारच्या एपिग्राफिकल डिपार्टमेंटचे पहिले प्रमुख, कस्टम्स कमिशनर अशीं अनेक कामें केलीं. कार्यनिवृत्तीनंतर (१८९७) हे एलिंग येथील आपल्या निवासस्थानांत कार्यमग्न झाले. रॉयल एशियॅटिक सोसायटीचे हे कित्येक वर्षे सेक्रेटरी असून यांच्या संशोधनकार्याबद्दल त्या संस्थेनें यांना सुवर्णपदक दिलें (१९१२).

Pali, Sanskrit and Old Kanarese Inscriptions हा यांच्या शिलालेखसंग्रहांतील पहिला महत्त्वाचा ग्रंथ होय. दक्षिण हिंदुस्थानाचा सहाव्या शतकापासून ते सोळाव्या शतकापर्यंतचा सुसंगत इतिहास सादर करणाऱ्या शिलालेखांचा संग्रह आजपर्यंत अनेकांनीं केला होता. परंतु अद्ययावत् माहितीचा उपयोग करण्याच्या यांच्या कार्यपद्धतीमुळें यांचें हें संपादन विशेष यशस्वी ठरलें. सरकारी मदतीच्या अपूर्णतेमुळें या ग्रंथाच्या फक्त नऊच प्रति छापण्यांत आल्या.

Inscriptions of the Early Gupta Kings and their Successors ह्या आपल्या ग्रंथांत यांनीं ८१ गुप्तकालीन शिलालेख त्यांच्या इंग्रजी अनुवादासह प्रसिद्ध केले. राजपुतान्यांपैकीं गंगधार (झालवाड राज्य) येथें मिळालेला (स. ४३२) व विजयगढ येथें मिळालेला यौधेयांचा व विष्णुवर्धनाचे (३७०) या ग्रंथांत देण्यांत आलेले शिलालेख विशेष महत्त्वाचे आहेत. परंतु यापेक्षांहि गुप्तराजांची कालनिश्चिति हा या ग्रंथाचा प्रमुख विशेष होय. हिंदी व परदेशी कालगणनापद्धतींतील फरकामुळें जुन्या इतिहासांतील कालक्रम ठरविणें मुष्कील होई. त्यांतहि गुप्त घराण्यांचे इतिहासांत वीसापेक्षां अधिक कालपद्धतीच्या झालेल्या गल्लतीमुळें ते काम विशेष कठीण झालें. अशा स्थितींत, यांनीं प्रथम मन्दोसर शिलालेखावरून व नंतर केरो लक्ष्मण छत्रे यांनीं प्रसिद्ध केलेल्या दोन कालगणनापद्धतीची सांगड घालणाऱ्या टेबल्सवरून गुप्त राजांची सुरुवात ३१९-२० ठरविली. पुढें का. बा. पाठक यांनीं जैन ग्रंथांचे साहाय्यानें काढलेल्या निष्कर्षानें यांच्या या सिद्धान्ताला पुष्टिच दिली.

The Dynasties of Kanarese Districts हा यांचा आणखी एक महत्त्वाचा ग्रंथ होय. कॅम्बेलनें प्रसिद्ध केलेल्या मुंबई गॅझेटियरच्या पहिल्या खंडांतील दुसरा भाग म्हणून हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत आला.

हिंदुस्थानच्या पश्चिम भागांतील जातीपोटजातींची इतकी संगतवार माहिती पुरविणारा ग्रंथ अजून झाला नाहीं.

परंतु यापेक्षांहि इंडियन ॲन्टिक्वेरी, आर्किऑलॉजिकल रिपोर्ट्स ऑफ वेस्टर्न इंडिया व एपिग्राफिया इंडिका यांतून यांनीं केलेलें स्फुट लिखाण विशेष महत्त्वाचें आहे. १९६ पेक्षां जास्त शिलालेखांचे अनुवाद यांनीं प्रसिद्ध केले. इंडियन ॲन्टिक्वेरीमध्यें यांनीं प्रसिद्ध केलेली शिलालेखांविषयींची लेखमाला विशेष महत्त्वाची आहे. शिलालेखांवरील रंग पुसण्यापासून तें थेट त्यांचा अनुवाद करीपर्यंतची सर्व माहिती त्यांत देण्यांत आली आहे. इंडियन ॲन्टिक्वेरीचे हे सहा वर्षे संपादक होते (१८८५-९१).

दिल्ली व अलाहाबाद येथील अशोकांच्या स्तंभलेखांच्या मूळ प्रति व त्यांच्या अनुवादाचें प्रकाशन हें यांचें आणखी एक महत्त्वाचें कार्य होय. हिंदुस्थानांतील गांवांचीं नांवें व त्यांचीं पूर्वठिकाणें ही संशोधनशाखा आयुष्याचे शेवटीं यांचा विचारविषय झाली होती.

देशी व परदेशी भाषेवरील अजोड प्रभुत्व व केवळ अभ्यासकाची दृष्टि ठेवून काम करण्याची यांची पद्धत यांमुळें हिंदी शिलालेखांच्या ज्ञात्यांतील प्रमुख स्थानास हे पोचले. आयुष्याच्या अगदीं शेवटच्या कालखंडांतहि आपल्या ग्रंथांतील चुका दुरुस्त करण्यासाठीं त्यांच्या नव्या आवृत्त्या काढण्याची तळमळ यांना लागली होती.

ब

बखले, भास्करबुवा रघुनाथ—(जन्म स. १८७०–मृत्यु स. १९२२ एप्रिल ८) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध शास्त्रोक्त गायक.

हे प्रथम किर्लोस्कर नाटक मंडळींत अण्णासाहेबांच्या वेळीं स्त्रियांचीं कामें करीत. नंतर यांनीं बडोद्याचे फैज मुहंमद, कोल्हापूरचे अलादिया खां व नथ्थन खां इत्यादींपाशीं गायनाचा उत्तम अभ्यास केला. यांचें गाणें जयपूर घराण्यापैकीं मुख्यतः असलें तरी वरील घराण्यांचें मधुरमिश्रण त्यांत आढळे. फैज मुहम्मदखांचें स्वरकाम, नथ्थनखांची लयकारी व अलादियाखांची मुष्कील रागदारी मोठ्या परिश्रमानें यांनीं संपादन केली होती आणि मेहनतीनें ती विद्या राखल्यामुळें समृद्ध गायकांत यांची गणना होई. तसेंच हे शिकविण्यांतहि निरलस असत.

हे प्रथम धारवाडच्या ट्रेनिंग कॉलेजांत, नंतर मुंबईस कांहीं वर्षे काढून पुण्यास आले. यांनीं पुण्याची भारत गायन समाज ही संस्था काढली. यांच्या शिष्यांत मास्टर कृष्णराव, बापुराव केतकर, गोविंदराव टेंबे, बालगंधर्व वगैरे मंडळी प्रमुख होत.

यांच्या आधींच्या काळांत महाराष्ट्रीय संगीतज्ञांना उत्तर हिंदुस्थानांत जवळजवळ स्थान नसेच. महाराष्ट्रांतील 'पंडित' लोक मुसलमानांचें गाणें गाऊंच शकणार नाहींत असा त्या वेळीं सर्वत्र रूढ समज असे. परंतु स्वतः हे व पलुस्कर, वझे वगैरे संगीतज्ञांनीं आपल्या तपश्चर्येनें तो समज खोटा ठरविला. पुढें तर नारायणराव व्यास, विनायकबुवा पटवर्धन वगैरे लोकांनीं उत्तर हिंदुस्थानांतच राजासारखा सन्मान मिळविला.

बजाज, जमनालाल—(जन्म स. १८८९–मृत्यु स. १९४२) राष्ट्रसभेचे सुप्रसिद्ध कार्यकर्ते व खजिनदार.

जयपूर संस्थानांत यांचा जन्म झाला. १८९४ त वर्ध्याच्या शेठ बच्छराजांना दत्तक जाऊन हे वर्ध्याचे सुप्रसिद्ध व्यापारी बनले. मुख्यतः बँकर व उद्योगतज्ज्ञ म्हणून यांची प्रसिद्धि असे.

सुरवातीसुरवातीला मारवाडी शिक्षा मंडळ, ऑल इंडिया मारवाडी आगरवाल सभा वगैरे संस्थांची स्थापना करून आपल्या ज्ञातीची यांनीं सेवा केली असली तरी खऱ्या अर्थाच्या यांच्या राष्ट्रीय जीवनास आरंभ १९१९ सालीं झाला. त्या वेळच्या असहकाराच्या चळवळींत यांनीं आपली रायबहादुरी ही सरकारी पदवी व ऑनररी मॅजिस्ट्रेटची जागा सोडली व हे गांधींचे निःसीम भक्त बनले. यानंतर काँग्रेसच्या चळ-

वळींत यांनीं अनेकवार तुरुंगवास सोसला. नागपूरच्या झेंडा सत्याग्रहाचे तर हे प्रमुख होते.

१९२० पासून अखेरपर्यंत हे काँग्रेसच्या वर्किंग कमेटीचे सभासद असत. १९२१ च्या नागपूर काँग्रेसचे हे स्वागताध्यक्ष व १९३४ च्या काँग्रेसचे 'बदली' अध्यक्ष होते. याशिवाय मराठी सी. पी. प्रांतिक काँग्रेस कमेटीचेहि हे अध्यक्ष होते.

परंतु यापेक्षांहि गांधीजींचे एक विश्वासु सहकारी म्हणूनच यांची प्रसिद्धि असे. गांधीजींच्या नेतृत्वाखालीं निघालेल्या गांधी सेवा संघ, ऑल इंडिया व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशन इत्यादि संस्थांचे हे व्यवस्थापक व अर्थसाहाय्यक असत. 'खजिनदाराचें काम नुसते आलेले पैसे गोळा करण्याचें नाहीं, संस्थेला पैशाची तूट पडतांच जो स्वतःचे पैसे काढून देईल तो खरा खजिनदार' या महात्माजींच्या 'खजिनदारा'च्या व्याख्येंत पूर्णपणें बसणारे हे असल्यानें ऑल इंडिया काँग्रेस कमेटी व ए. आय्. एस्. ए.चे हे दीर्घकालीन खजिनदार होते.

काँग्रेस व्यतिरिक्त यांनीं इतर संस्थांना दिलेल्या देणग्याहि महत्त्वाच्या आहेत. वर्ध्याचें कॉमर्स कॉलेज हें त्यांतून स्थापन झालें असून तसेंच एक एंजिनियरिंग कॉलेज काढण्याची यांची कल्पना होती.

यांच्या मृत्यूनंतर यांच्या पत्नी जानकीदेवी यांनीं यांच्या नांवाचा अडीच लक्ष रु.चा ट्रस्ट उभारून त्याचा विनियोग यांच्या अंतिम इच्छेप्रमाणें आदर्श गोशाला बांधण्याकडे केला. तिचा उद्घाटन समारंभ महात्माजींच्या हस्तें करण्यांत आला.

बडोदेकर, सौ. हिराबाई—(जन्म स. १९०५) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध गायिका.

यांचे गायनाचे गुरु वहिदखां. ते अबदुल करीमखां या सुप्रसिद्ध गायकांचे भाचे. तथापि यांचें गायनाचें सर्व पूर्वशिक्षण यांचे थोरले बंधु प्रो. सुरेशबाबू यांचेजवळ झालें. यांचा महाराष्ट्रांत प्रथम परिचय हिज मास्टर्स व्हॉइसनें करून दिला (१९२२). पुण्यामुंबईपेक्षां यांच्या जलशांना वऱ्हाड, नागपूराकडे अत्यंत लोकप्रियता प्राप्त झाली (१९२३-२८). नंतर नूतन संगीत विद्यालय, नाट्यशाखा सुरू करून केवळ संशयकल्लोळ, सौभद्र व साध्वी मिराबाई या तीन नाटकांवर यांनीं मुंबईस सहा महिने मुक्काम केला. या त्यांत नायिकेचीं कामें करीत. यांशिवाय यांच्या भगिनी कमलाबाई, सरस्वतीबाई, बंधु सुरेशबाबू आणि सवाई गंधर्व असा संच असे. पुढें ही शाखा बंद पडली (१९३३). सुवर्णमंदिर बोलपटांत यांनीं काम केलें होतें.

मोहक स्वरविलास करून श्रोत्यांना मुग्ध करण्याची यांची कला अजब आहे. यांच्या स्वरविलासाप्रमाणें शालीनतेचीहि छाप प्रेक्षकांवर विशेष पडते, असें या बंगाल्यांत गेल्या असतां अमृतबझारपत्रिकेनें नमूद केलें.

ऐकलेल्या तानेची अगर हरकतीची सरगम या चटदिशीं करतात. गुणी लोकांच्या मैफली या आपल्या घरीं करवितात व त्यांतून आपल्यास पाहिजे व झेपेल तो भाग नेमका उचलतात. दुसऱ्याची केवळ नक्कल न करितां स्वतःच्या गोड जागांची भर घालून कोणतेंहि पद या स्वतंत्र रीतीनें गातात. या कारणानें शास्त्रीय व ललित या दोन्ही संगीतांत या प्रवीण झाल्या आहेत. भजन गातांना तर या विशेष तल्लीन होतात व श्रोत्यांना गहिंवर आणतात. 'या गाण्यानें आजारी माणुससुद्धां बरा होईल' हें यांच्या गाण्याचें वर्णन यांच्या गाननैपुण्याची साक्ष देण्यास पुरेसें आहे.

बर्जेस, जेम्स—(जन्म स. १८३२–मृत्यु स. १९१६ आक्टो. ३) सुप्रसिद्ध शिलालेखज्ञ.

ग्लासगो व एडिंबरो येथें आपलें शिक्षण संपवून हे हिंदुस्थानला आले व यांनीं पश्चिम हिंदुस्थानचें आर्किऑलॉजिकल सर्व्हेअर म्हणून काम करण्यास सुरवात केली. कार्यनिवृत्तीपूर्वी हे त्या खात्याचे डायरेक्टर जनरल होते (१८८९).

१८९४ सालीं जिनेव्हा येथें भरलेल्या ओरिएंटल काँग्रेसला हे हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून हजर होते. १८८९-९० या काळांत 'एपिग्राफिका इंडिका', 'आर्किऑलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट्स', 'फिलॉसफिकल मॅगझीन' इत्यादींत यांचे शास्त्रीय लेख प्रसिद्ध होत असत.

हिंदुस्थानच्या इतिहासावरील पंडितांचें संशोधन प्रसिद्ध करण्यासाठीं यांनींच प्रथम इंडियन ॲन्टिक्वेरी हें मासिक सुरू केलें (१८७२). यानंतर बरींच वर्षें हे त्या पत्राचे संपादक होते (१८७२-८४).

यांचे ग्रंथ—(1) The Rock Temples of Elephanta (1871), (2) Temples of Somnath,

Junaghar and Girnar, (3) The Rock Temples of Ajanta, (4) The Rock Temples of India (जेम्स फर्ग्युसन यांचे सहकार्याने), (5) Buddhist Art in India (1901),

बसू, भूपेन्द्रनाथ—(जन्म स. १८६९–मृत्यु स. १९२४) राष्ट्रसभेचे अध्यक्ष, वक्ते व सार्वजनिक कार्यकर्ते.

हे सॉलिसिटरचा धंदा करणारे संपन्न गृहस्थ राष्ट्रसभेच्या कार्यात आरंभापासून भाग घेत. हे कलकत्ता राष्ट्रसभेच्या स्वयंसेवकपथकाचे प्रमुख (१८८६), स्वागताध्यक्ष (१९११) व मद्रासच्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते (१९१४). हे अनेक वर्षे भारतमंत्र्याच्या सल्लागार मंडळाचे सभासद व कलकत्ता विश्वविद्यालयाचे उपकुलगुरु होते. म. गांधींच्या उदयानंतर हे राष्ट्रसभा सोडून लिबरल फेडरेशनमध्ये सामील झाले. यांची वक्तृत्वाबद्दल विशेष ख्याति होती. डोळ्यांत हुकमी अश्रु आणून हे एकदां बोलूं लागले कीं श्रोत्यांची मंत्रमुग्ध नागाप्रमाणें स्थिति होई. 'संपूर्ण स्वातंत्र्य व इंग्लंडपासून अलग होणें ही गोष्ट अव्वल देशभक्तीच्या तरुणांना आकर्षित करते. हें धोरण योग्य वाटलें तर कायद्याची भीति न बाळगतां निधड्या छातीनें मी त्याचा स्वीकार करीन. पण राष्ट्रसभेचें ध्येय संयुक्त भागीदारीचें आहे' असे उद्गार यांनी मद्रासला काढले.

बहादूरशहा—(कारकीर्द स. १८३७-१८५८–मृत्यु स. १८६२ नवं. ४ रंगून) दिल्लीचे शेवटचे मोगल बादशाह, सत्तावन सालच्या बंडांतील एक प्रमुख व प्रसिद्ध उर्दू कवि.

हे मोगलवंशांतील दुसरे बहादूरशहा होत. यांचें नांव मुहम्मद बहादूरशहा. हे शहाअलमचे पुत्र व अकबरचे भाऊ. अकबर मेल्यानंतर हे गादीवर आले. मराठ्यांच्या वेळेपासूनच बादशहाकडे दिल्लीच्या भोंवतालचा अगदीं थोडा मुलूख व खर्चासाठीं दरमहा नव्वद हजार रुपयांची नेमणूक अशी व्यवस्था चालू होती. तींच लॉर्ड लेक यांनीं मराठ्यांच्या पराभवानंतर दिल्ली व बादशाही ताब्यांत घेऊन पुढें चालू ठेवली. ज़फर या नांवानें हे उर्दूत कविता करीत. यांचे कविता-गुरु ज़ौक.

१८५७ च्या बंडाची उठावणी झाली तेव्हां यांना त्यांत सामील करून घेण्यांत आलें. हे देशभक्त असले आणि आपल्या स्थानाच्या मोठेपणाची यांना कल्पना असली तरी आपणहून बंडांत सामील होण्याचें वय व धमक यांच्यांत नव्हती. बंडवाल्यांनीं यांच्या नांवाचा व यांच्याकडून घेतलेल्या फर्मानांचा दुरुपयोग केला. शेवटीं ठार मारूं नये या अटीवर यांना इंग्रजांच्या स्वाधीन व्हावें लागलें. कर्नल डॉवेझ या लष्करी अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखालीं पांच माणसांची चौकशी कमेटी नेमण्यांत आली. ब्रिटिश बादशाहाविरुद्ध मोगल बादशाहानें बंड केलें असा यांचेवर आरोप होता. हे खुद्द साक्षीदारांची तपासणी करीत व गुलाम आबास हे यांना मदत करीत. यांचेवर पुढील चार आरोप होते–(१) हे ब्रिटिश सरकारचे पेन्शनर असून यांनीं १० मे १८५७–१ ऑक्टो. १८५७ च्या दरम्यान तोफखान्यावरील अधिकाऱ्यांस व शिपायांस ब्रिटिश सरकारविरुद्ध बंड करण्यास चिथावलें व मदत केली. (२) तसेंच आपल्या मिर्झा मोगल या पुत्रास बंडास प्रवृत्त केलें, (३) मे ११ रोजीं बादशाह म्हणून स्वतःच्या नांवाची द्वाही फिरवली, (४) १८५७ मे १६ रोजीं दिल्ली येथील राजवाड्यांत ४९ युरोपियन बायकामुलें वगैरेंची कत्तल केली. या आरोपांची चौकशी होऊन हे गुन्हेगार ठरले.

बंडवाल्या शिपायांचें सामर्थ्य मोठें असल्यानें आपणास हुकमावर सह्या करणें भाग पडत होतें. कत्तल झालेल्यांना आपण खासगी रीत्या अन्न पाठवीत होतों वगैरे यांनीं आपल्या जबानीत सांगितलें. यांना सुरवातीला फांशीची शिक्षा फरमावण्यांत आली. पण पुढें आगाऊ दिलेल्या आश्वासनांप्रमाणें यांना फांशी न देतां रंगून येथें नजरकैदेंत ठेवण्यांत आलें. तेथेंच यांचा मृत्यु झाला. बंडांत सामील झालेल्या यांच्या मुलांना व नातवाला मात्र फांशी देण्यांत आलें. आझाद हिंद सेनेचे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं यांच्या कबरीला लष्करी सलामी देऊन यांचेंच कार्य आपण पुढें चालवीत असल्याची घोषणा केली होती.

बंगाली, सोराबजी शापूरजी—(जन्म स. १८३१–मृत्यु स. १८९३) एकोणिसाव्या शतकांतील सुप्रसिद्ध लेखक व सुधारक.

ग्रॅहॅम ॲन्ड को. या परदेशी व्यापारी संस्थेचे दलाल असा यांचा मुख्य धंदा असला तरी आपल्या समाजाच्या सुधारणेकडे यांचें विशेष लक्ष असे. पारसी लॉ असोसिएशन ही यांची प्रमुख कार्यसंस्था होय. पारशी सक्सेशन ॲक्ट वगैरे कायदे या संस्थेनें पास करून घेतले.

याशिवाय मुंबई प्रांतांतील पहिलें कामा हॉस्पिटल हें स्त्रियांचें हॉस्पिटल व जमशेटजी जीजीभाई मदरसा या पारशी धर्मशिक्षक संस्थेचें जनकत्व यांचेकडे जातें. स्त्रीशिक्षणाचेहि हे मोठे पुरस्कर्ते होते.

यांचीं पत्रें—जगत्प्रेमी, जगन्मित्र, रास्तगोफ्तार.

यांचे ग्रंथ—Religion of Zoraster, Parsi Acts, Books and Languages of the Religion of Zoraster इत्यादि.

बानर्जी, प्रमथनाथ—(जन्म स. १८७७) सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ.

कलकत्ता युनिव्हर्सिटीचे एम्. ए. झाल्यानंतर हे अर्थशास्त्र हा विषय घेऊन लंडन युनिव्हर्सिटीचे डी. एस्सी. झाले. यानंतर बॅरिस्टर होऊन हे हिंदुस्थानला परत आले व यांची कलकत्ता युनिव्हर्सिटींत मिन्टो प्रोफेसर ऑफ इकॉनमिक्स म्हणून निवड झाली (१९२०-३५). याशिवाय कलकत्ता युनिव्हर्सिटींत इतरहि अनेक मानाच्या जागा यांना देण्यांत आल्या. बंगाल व इंडियन लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचेहि हे अनेक वर्षे सभासद होते.

अर्थशास्त्राइतकेंच शिक्षण व राजकारण यांमध्यें लक्ष घालणाऱ्या थोड्या हिंदी अर्थशास्त्रज्ञांत यांची गणना होते. म्हणूनच अर्थशास्त्राबरोबरच यांनीं इतर क्षेत्रांत लिहिलेले ग्रंथ प्रमाण मानण्यांत येतात.

लाहोर येथें भरलेल्या इंडियन इकॉनमिक कॉन्फरन्सच्या चवदाव्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें. The Future of Indian Finance हा यांच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय होता (१९३१), इंडियन पोलिटिकल सायन्स कॉंग्रेसचेहि हे अध्यक्ष होते (लाहोर, अधिवेशन दुसरें).

यांचे ग्रंथ—(1) A Study of Indian Economics, (2) Public Administration in Ancient India, (3) Fiscal Policy in India, (4) The Future of Indian Finance, (5) Indian Finance in the Days of the Company, (6) Provincial Finance in India, (7) A History of Indian Taxation इत्यादि.

बानर्जी, राखलदास—(जन्म स. १८८२-मृत्यु स. १९३०) सुप्रसिद्ध शिलालेखज्ञ.

आर्किऑलॉजिकल डिपार्टमेंटमध्यें प्रवेश केल्यानंतर ह्यांनीं बंगाल व ओरिसा प्रांतांत काम करण्यास सुरुवात केली. परंतु यानंतर थोड्याच दिवसांत त्या खात्याच्या वेस्टर्न सर्कलचे यांना सुपरिंटेंडन्ट निवडण्यांत आलें व अजमीर, उदेपूर, बिकानेर, भरतपूर, इन्दूर इत्यादि प्रांतांत हिंडून तेथील शिलालेखांचें अध्ययन करण्याची संधि यांना मिळाली.

इंग्रजी भाषेशिवाय संस्कृत, फारसी, हिंदी, उर्दू, मराठी, गुजराथी, अरबी अशा अनेक भाषा येत असल्यानें कोणत्याहि शिलालेखाचें वाचन हे सुलभतेनें करूं शकत. तीन हजार वर्षांपूर्वीच्या हिंदी संस्कृतीचा परिचय करून देणाऱ्या सिंधुतीरांवरील मोहनजदारोचें पूर्व संशोधन व उत्खनन यांचें सर्व श्रेय यांना द्यावयास पाहिजे. हिंदुस्थानच्या इतिहासांतील कितीतरी रूढ कल्पनांना या संशोधनानें धक्का दिला आहे.

आर्किऑलॉजिकल डिपार्टमेंट सोडल्यानंतर बनारस हिंदु विश्वविद्यालयांत भारतीय संस्कृति व इतिहास विभागाचें अध्यक्षस्थान व कलकत्त्याच्या इंडियन म्युझियमच्या पुरातत्त्वविभागाचें प्रमुखपद यांना देण्यांत आलें.

बंगाली भाषेंत लिहिलेला बंगालचा इतिहास व यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेला ओरिसाचा इतिहास हे यांचे प्रमुख ग्रंथ होत. याशिवाय 'प्राचीनमुद्रा' ह्या यांच्या बंगाली ग्रंथाचें हिंदींत भाषांतर झालें असून यांनीं बंगाली भाषेंत कांहीं कादंबऱ्याहि लिहिल्या आहेत.

बानर्जी, सर-सुरेंद्रनाथ—(जन्म स. १८४८-मृत्यु स. १९२५ ऑगस्ट ६) बंगालमधील सुप्रसिद्ध राजकारणी पुढारी व वक्ते.

हे बी. ए. होऊन आय. सी. एस. झाल्यानंतर हिंदुस्थानांत परत आले व सिल्हटचे मॅजिस्ट्रेट व कलेक्टर म्हणून यांची नेमणूक झाली (१८७१). परंतु थोड्याच दिवसांनीं वरिष्ठ अधिकाऱ्याशीं खटका उडून यांना अल्प निवृत्तिवेतन देऊन सरकारी नोकरींतून कमी करण्यांत आलें. त्यावर उपाय करण्यासाठीं हे इंग्लंडला गेले व तें पुढें न जमल्यानें यांनीं बॅरिस्टरीच्या टर्म्स भरण्यास सुरुवात केली. परंतु तेथेंहि सनदी नोकरींतून बाहेर निघालेले म्हणून यांना बॅरिस्टरीची पदवी नाकारण्यांत आली व अशा व्यग्र मनःस्थितींतच हे हिंदुस्थानाला परत आले.

जें मनाला वाटतें तें उघडपणें बोलतां येत नाहीं; अन्यायाचा प्रतिकार तर राहोच, पण त्याविरुद्ध ब्र काढण्याचेंहि धाडस होत नाहीं अशा आपल्या देशाच्या चमत्कारिक स्थितीचें यांना वैषम्य वाटूं लागलें. कलकत्त्याच्या मेट्रोलिटन इन्स्टिटयूटमध्यें इंग्लिशचे प्राध्यापक म्हणून नेमणूक होतांच यांनीं तेथील विद्यार्थ्यांसमोर आपले हे विचार मांडण्यास सुरुवात केली. याच सुमारास सर्व देशांतील लोकांना राजकीय लढ्यासाठीं एका झेंड्याखालीं आणण्याच्या हेतूनें स्थापन झालेल्या स्टूडन्ट्स असोसिएशनचे हे एक प्रमुख सभासद बनले व त्या संस्थेमार्फत यांनीं सर्व हिंदुस्थानभर एक दौरा काढला. हिंदुस्थानांतील सर्व विद्यार्थ्यांनीं आजपर्यंत राजकारणावर टाकलेला बहिष्कार टाकून देऊन त्यांत मनापासून भाग घ्यावा ही यांची सांगी सर्वत्र लोकप्रिय झाली व यांच्या म्हणण्याप्रमाणें प्रान्तोप्रान्तीं राजकीय कार्य करणाऱ्या संस्था उत्पन्न झाल्या. यानंतर लवकरच निघालेल्या राष्ट्रसभेच्या कार्याची ही प्राथमिक अवस्था होती. पुढें १८९५ च्या पुण्याच्या व १९०२ च्या अहमदाबादच्या राष्ट्रसभेचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें.

गव्हर्नरजनरलच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्यें प्रातिनिधिक लोक घेतले जावेत या मुद्दयावर व इल्बर्ट बिल, युनिव्हर्सिटीज बिल, कलकत्ता कॉर्पोरेशन बिल इत्यादि प्रसंगीं यांनीं केलेल्या प्रभावी विरोधामुळें यांची लोकप्रियता वाढतच चालली. यांच्या या लोकप्रियतेचा कळस बंगालच्या फाळणीच्या वेळीं झाला व बंगालच्या किंबहुना हिंदुस्थानच्या तरुणांचे पुढारी अशी यांची सर्वत्र प्रसिद्धि होऊं लागली. याच सुमारास हे बंगाल कायदेमंडळाचे व कलकत्ता कॉर्पोरेशनचे सभासद झाले. परंतु पुढें लॉर्ड कर्झन यांच्याशीं मतभेद होऊन यांनीं कॉर्पोरेशनमध्यें बसण्याचें नाकारलें.

परंतु हें फार दिवस टिकणें शक्य नव्हतें. बंगालमधील तरुणांचीं वाढत्या प्रमाणावरील अत्याचारी कृत्यें पाहून तरुणांचीं मनें राजकारणाकडे वळविण्यांत आपली कांहीं तरी चूक झाली आहे, असें यांना वाटूं लागलें. पिस्तूल, खून, बॉम्ब यांचा पोरखेळाप्रमाणें चाललेला सर्रास उपयोग थांबविण्यासाठीं हे नरम भाषा वापरूं लागले व शेवटीं १९०७ च्या सुरतच्या काँग्रेसमध्यें हे टिळकांच्या विरोधकांत सामील झाले.

त्या वेळीं राष्ट्रसभा मवाळांच्या ताब्यांत गेली खरी, पण टिळक सुटून आल्यावर जहालपक्षानें पुनः राष्ट्रसभेंत प्रवेश केला. मॉंटफोर्ड सुधारणांना आगाऊच मान्यता दिल्यानें नेमस्त लोक अत्यंत अप्रिय झाले व त्यांना राष्ट्रसभा व सार्वजनिक कार्यांतून बाहेर पडावें लागलें. व्हाइसरॉयच्या कायदेमंडळांत यांनीं सुधारणांना पाठिंबा देणारा ठराव पास करून घेतला तरी बाहेर म. गांधींच्या असहकारितेला सुरुवात झाली. हे १९१९ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टच्या जॉईट पार्लमेन्टरी कमेटीकरितां चार महिने इंग्लंडला जाऊन आले व 'असहकारितेचा झाला एवढा पुकारा पुरे झाला', असें यांनीं आपलें मत जाहीर केलें, पण त्याचा उपयोग झाला नाहीं. तेव्हां हे असहकाराचे घोर विरोधी बनले. सरकारनें यांना सर ही पदवी दिली (१ जाने. १९२१) व हे स्थानिक स्वराज्य व वैद्यक खात्याचे दिवाण झाले. कलकत्ता कार्पोरेशनमध्यें निवडलेल्या लोकांचें बहुमत असण्याचा यांनीं कायदा करून लॉर्ड कर्झनच्या कृत्याचा सूड उगवला. पण ती संस्था स्वराज्यपक्षाच्या ताब्यांत जाऊन यांचे तीव्र विरोधी तेथें मेयर झाले. १९२३ च्या इलेक्शनमध्यें यांचा पराजय होऊन यांच्या सार्वजनिक आयुष्याची इतिश्री झाली. याच सुमारास यांनीं आपलें आत्मचरित्र लिहून पुरें केलें.

डब्ल्यू. सी. बानर्जी यांचेनंतर त्यांचें 'बंगाली' साप्ताहिक ताब्यांत घेऊन यांनीं त्याला सतरा वर्षांनंतर दैनिक स्वरूप दिलें.

यांचें वक्तृत्व इतकें परिणामकारक व भावनामय असे कीं, एखाद्या बंडाची उठावणी किंवा उपशम करणें हा यांच्या हातचा मळ असे. 'सरेंडर नॉट' (अपराजित) या नांवानें हे आपल्या मित्रमंडळींत प्रसिद्ध असत.

यांच्या तेजस्वी भाषणाचे पडसाद सर्व जगांत उमटत. भाषेवरील प्रभुत्व, सुंदर भाषाशैली, उच्च भावनेनें युक्त असणारें कल्पनावैपुल्य व मर्दानी आवेश इत्यादि बाबींत यांची कोणीहि बरोबरी करूं शकणार नाहीं. राजनिष्ठेचें प्रतिपादन हा यांच्या भाषणांतील खमंगपणा असे. लॉर्ड मिंटो यांच्या कारकीर्दीत सभा उधळून लावतांना बारिसाल येथें यांना पोलिसाच्या लाठीचा प्रसाद मिळाला होता. एकदां लोकांनीं यांना राज्याभिषेकहि केला होता. पण पुढें जहाल क्रान्तिकारकांचें राजकारण यांना झेपेना म्हणून हे लोकांत अप्रिय होत गेले.

यांचे ग्रंथ—A Nation in the Making (1927).

बापट, श्रौताचार्य-धुंडिराज गणेश—(जन्म स. १८८२) सुप्रसिद्ध श्रौतविद्याविशारद, शुक्लयजुर्वेद-

संहिता नि ऐतरेय ब्राह्मण यांचे मराठी भाषान्तरकार व मराठी लेखक.

यांचें शिक्षण आजोबांच्यापाशीं झालें. यांच्या घराण्यांत अनेक पिढ्या अग्निहोत्र व श्रौत विद्येची परंपरा आहे. ज्ञानकोश प्रस्तावना द्वितीय खंड यांत श्रौतविषयक माहिती यांनीं लिहिली. स्वाध्यायमंदिर ही संस्था काढून त्रैवर्णिकांत वैदिक संस्कारांचा प्रचार केला. 'स्वाध्याय' मासिक कांहीं दिवस चालविलें. यांचें वक्तृत्वहि परिणामकारक आहे. यांनीं अग्निष्टोम वगैरे यज्ञ केलें.

यांचे ग्रंथ—१ ऐतरेय ब्राह्मण मराठी भाषान्तर, २ शुक्लयजुर्वेद, वाजसनेयसंहिता मराठी भाषान्तर, ३ आर्यांचे संस्कार, ४ श्रौतकोश इत्यादि.

बापट, सेनापति-पांडुरंग महादेव—(जन्म स. १८८० नवं. १२) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध क्रांतिकारक.

नगर जिल्ह्यांतील पारनेर हें गांव यांचें जन्मस्थान. १९०३ सालीं डेक्कन कॉलेजमध्यें बी. ए. झाल्यानंतर मंगळदास परदेश शिष्यवृत्ति व हिंदु एज्युकेशन फंडांतून कांहीं रक्कम मिळवून हे इंग्लंडला गेले (१९०४) व यांनीं एडिंबरो येथील मेकॅनिकल एंजिनियरिंग कॉलेजांत आपलें नांव दाखल केलें. परंतु याच सुमारास 'ब्रिटिश रूल इन् इंडिया' या यांच्या व्याख्यानाबद्दल मुंबई युनिव्हर्सिटीनें यांची शिष्यवृत्ति बंद केली व श्यामजी कृष्णवर्मा वगैरे क्रांतिकारक लोकांशीं यांचा संबंध येऊन यांच्या आयुष्यास एक नवें क्रांतिकारक वळण लागलें. बॉम्ब बनविण्याच्या कृति शिकून व नांव बदलून हे गुप्तपणें हिंदुस्थानांत आले व माणिकतोळा बॉम्ब कटानें यांचें क्रांतिमय स्वरूप प्रथम लोकांच्या लक्षांत आलें. त्या कटाच्या मुळाशीं यांनीं पॅरिसहून पाठविलेल्या बॉम्ब कृतीचे कागद असल्याचें साक्षींत प्रगट होतांच हे अन्तर्धान पावले.

या अज्ञातवासांत आचारी, शेतकरी, मॅट्रिकचा विद्यार्थी अशा अनेक भूमिका यांना पार पाडाव्या लागल्या. सदोदित स्थलान्तर व वेषान्तर करण्याची तयारी ठेवून यांनीं साडेचार वर्षें काढलीं, परंतु पुढें हे विश्वासघातानें पकडले गेले व चौकशीनंतर एक महिन्यानें यांची सुटका झाली.

सुटल्यानंतर चित्रशाळा, केसरी व ज्ञानकोश या ठिकाणीं यांनीं नोकरी केली; तरी यांच्यामधील क्रांतिकारक विचाराची ज्योत अशी सहज विझणारी नव्हती. १९२० सालच्या मुळशी सत्याग्रहाचें सेनापतिपद यांनीं स्वीकारलें. गांधींच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें प्रथम अनेक वेळीं अहिंसात्मक सत्याग्रह करूनहि परिणाम दिसेना तेव्हां यांनीं आपल्या कल्पनेप्रमाणें दुर्जनांना अल्पदंड करणारा सशस्त्र सत्याग्रह सुरू केला. टाटा कंपनीच्या नोकरांवर सशस्त्र हल्ला केल्याबद्दल यांना साडे सात वर्षांची शिक्षा फरमावण्यांत आली.

बाहेर पडल्यानंतर (१९३१) राष्ट्रांत शक्ति व आत्मप्रतिकारसामर्थ्य वाढविण्यासाठीं यांनीं कांहीं दिवस अहिंसात्मक मार्गानें जाण्याचें ठरविलें. अहिंसात्मक युद्धाची यशस्विता, आत्मक्लेश व आत्महिंसा यांवर अवलंबून असते हें जाणून यांनीं प्राण देण्यास सदोदित तयार असणाऱ्या 'प्राणयज्ञदलांची' स्थापना केली. परंतु त्यासाठीं काढलेल्या दौऱ्यांतील एका भाषणावर खुनाच्या उत्तेजनाचा आरोप ठेवण्यांत येऊन यांना सात वर्षांची शिक्षा झाली.

१९३७ सालीं सुटून आल्यानंतर यांनीं आपलें जुनें कार्यच चालू ठेवलें. संघटना नाहीं तर स्वतः तरी प्राणाहुति देऊन राष्ट्रकार्यास चेतवणी द्यावी अशा हेतूनें प्राणत्यागाचा दिवस २३ जुलै १९३९ व स्थळ संगम्, पुणें ठरविलें. पण पुढें यांनीं हा बेत स्थगित केला. पुनः अकोल्याच्या भाषणावरून यांना मिळालेली १ वर्षाची शिक्षा झाली.

क्रांतिवादाच्या खऱ्या स्वरूपाचा साक्षात्कार यांच्या या सर्व जीवनक्रमावरून मिळतो. क्रांतिवादाचे बाबतींत महाराष्ट्रानें विचाराचा धागा पुरवायचा व सर्व देशभर त्याचें अनुकरण व्हावयाचें अशी परंपरा यांच्या कार्यामुळें सुरू झाली. सर्वस्वीं प्रतिकूल परिस्थितींत आपलें अंगीकृत कार्य आजन्म निष्ठेनें चालविणारे यांच्यासारखे त्यागी विरळ असतात. यांचें इंग्रजी व मराठी वाङ्मयहि यांच्या वृत्तीवर प्रकाश पाडणारें आहे.

यांचे ग्रंथ—(१) चैतन्य गाथा, (२) सेनापति बापट वाङ्मय-समग्र ग्रंथ, (३) पद्यमय आत्मचरित्र, (४) Holy Song (उपनिषदें व भगवद्गीता यांचें इंग्रजी पद्यमय सार).

बापट, डॉ. पुरुषोत्तम विश्वनाथ—(जन्म स. १८९४) आन्तरराष्ट्रीय कीर्तीचे संशोधक व पाली भाषेचे अभ्यासक.

हे अमेरिकेंतील हारवर्ड विश्वविद्यालयाच्या निमंत्रणावरून अमेरिकेस गेले (१९२९). तेथें 'विसुद्धीमग्ग' या पाली ग्रंथाचें इंग्रजींत भाषान्तर करण्याचें काम यांच्याकडे सोंपविलें होतें. तो ग्रंथ सनाच्या पांचव्या शतकांत तयार झाला असून प्राचीन काळच्या बौद्ध धर्माचें स्वरूप त्यावरून कळून येतें. त्याकरितां हे तेथें तीन वर्षे राहत होते. तेवढ्या अवधींत यांनीं चिनी भाषेचा अभ्यास केला, आणि पी. एच्डी. ही पदवी संपादन केली. मूळ बौद्ध ग्रंथाचें ज्ञान व अध्ययन करावयाचें असल्यास चिनी भाषेचें ज्ञान आवश्यक असतें, तें मिळवून हे हिंदुस्थानांत परत आले (१९३२), बनारस येथें भरलेल्या ओरिएन्टल कॉन्फरन्सचे वेळीं हे पाली व बौद्ध विभागाचे अध्यक्ष होते (१९४३).

पुरातन पाली ग्रंथांचीं इंग्रजी व मराठी भाषेंत भाषान्तरें यांनीं बरींच केलीं आहेत. त्यांत 'विमुत्ति-मग्ग, विसुद्धि-मग्ग, सूत्तनिपातो, धम्मसंगणि व अठ्ठसालिनी' हीं पुस्तकें प्रसिद्ध आहेत. पैकीं शेवटचीं दोन पुस्तकें प्रो. र. द. वाडेकर यांच्या मदतीनें यांनीं भाषान्तरित केलीं आहेत.

मातृभाषा व इंग्रजीशिवाय संस्कृत, पाली, चिनी व तिबेटी या भाषांचें यांस चांगलें ज्ञान आहे. आवश्यक जर्मन व फ्रेंच भाषांचें ज्ञानहि यांनीं संपादन केलें.

आतां यांची शान्तिनिकेतनांत संशोधनकार्य करण्याकरितां नेमणूक झाली आहे. चिनी-बौद्ध वाङ्मयासंबंधीं संशोधन करून ग्रंथप्रकाशन करणें हें यांचें तेथील मुख्य काम आहे. हिंदुस्थानांतून नेलेले हजारों ग्रंथ ऐतिहासिक कालांत (४-११ वें शतक) चिनींत भाषान्तरित झाले. त्यांपैकीं सुमारें दोन हजार ग्रंथ १९४६ पर्यंत संशोधून प्रसिद्ध झाले आहेत.

'संघभद्र' नांवाच्या चिनी पंडितानें स. ४७० मध्यें 'समंतपासादिका' नांवाचा ग्रंथ पालींतून चिनींत भाषान्तरित केला. तो पाली ग्रंथ आतां उपलब्ध नाही. म्हणून त्या ग्रंथाचें पाली किंवा इंग्रजी भाषान्तर करण्याचें काम आतां यांच्याकडे देण्यांत आलें आहे. तें काम हे शान्तिनिकेतनांत राहून तेथील चीनभवनांतील मुख्य प्रो. तान्-यून-शान यांच्या देखरेखीखालीं करीत आहेत.

बापटशास्त्री, विष्णु वामन—(जन्म स.१८७१–मृत्यु स. १९३२) शंकराचार्यभक्त, उपनिषदादिकांचे भाषान्तरकार व गीतारहस्याचे खंडनकार.

यांचें गांव धालवल (ता. राजापूर). वडील वारल्यामुळें यांनीं रामदुर्ग व शिरोळ येथें मराठी व इंग्रजी शिक्षण घेतलें. तारेचा अभ्यास करून सदर्न मराठा रेल्वेंत नोकरीस लागले. निबंधमाला वाचून प्रेरणा मिळाली आणि संस्कृत व उपनिषदादि ग्रंथांचें वाईस प्रज्ञानंद सरस्वतीकडे अध्ययन केलें. सिंध हैदराबादेस गिडुमल पाठशाळेंत मुख्य शिक्षक म्हणून काम केलें (१९०३-१९१२). पुढें यांनीं पुण्यास येऊन ग्रंथप्रकाशनास सुरुवात करून 'आचार्य' पाक्षिक सुरू केलें. प्रकाशनाचा उद्योग अंगाशीं आला, पण सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्या आश्रयामुळें सावरले. १९१६ सालीं कोल्हापूरच्या शंकराचार्यांकडेहि हे गेले होते. पण यांना रातोरात परत यावें लागलें. आचार्यकुल काढून यांनीं कांहीं विद्यार्थ्यांची स्वतःच्या खर्चानें तेथें राहण्याची व्यवस्था केली व तें सतत चालेल अशी योजना केली.

यांचे ग्रंथ—दशोपनिषदें भाष्याच्या अर्थासह. गीताभाष्यार्थ, शारीरकभाष्यार्थ, आत्मपुराण, अनुभूतिप्रकाश, शतश्लोकी, शांकरभाष्यानुसार गीतारहस्य, वेदान्तशब्दकोश, वेदान्तपरिभाषा इत्यादि.

बापना, सर-सिरायमल—(जन्म स. १८८२) हिंदी संस्थानांतील सुप्रसिद्ध कार्यकर्ते.

उदेपूरचें महाराजा हायस्कूल, अजमेरचें गव्हर्नमेन्ट कॉलेज व अलाहाबादचें मूर सेन्ट्रल कॉलेजामध्यें आपलें शिक्षण संपवून हे बी. ए., एल्एल्. बी. झाले.

यानंतर इंदूर संस्थानांत यांची डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज म्हणून नेमणूक झाली (१९०७) व महाराजांचे कायदा-शिक्षक, महाराजांचे सेक्रेटरी, होम मेंबर (१९१५), सल्लागारमंडळाच्या अपील कमेटीचे अध्यक्ष, असे चढत चढत शेवटीं हे त्या संस्थानचे मुख्य प्रधान झाले (१९२६). यानंतर एक तपापेक्षां जास्त झालेली यांची तेजस्वी कारकीर्द यांच्या सतत कार्याचें फळ आहे (१९२६-३९).

इंदूर संस्थानांतील आपल्या कारकीर्दीनंतर यांनीं बिकानेर (१९३९-४१), रतलाम इत्यादि संस्थानांत मुख्य प्रधानाचीं कामें केलीं. हे अलवार संस्थानचे मुख्य प्रधान म्हणूनहि यशस्वी झाले आहेत.

बापुदेवशास्त्री, ऊर्फ नृसिंह-महामहोपाध्याय—(जन्म स. १९२१-मृत्यु स. १८९०) सुप्रसिद्ध गणितज्ञ, ज्योतिषी व ग्रंथकार.

ऋग्वेदी चित्पावन ब्राह्मण. अहमदनगर जिल्ह्यांतील टोके येथील राहणारे. पिता सीताराम. माता सत्यभामा. नागपूर येथें प्राथमिक शिक्षण घेऊन धुंडिराज नांवाच्या कान्यकुब्ज ब्राह्मणापाशीं भास्कराचार्यांच्या लीलावतीचें व बीजगणिताचें अध्ययन केलें. सिहूर येथें संस्कृत-पाठशाळेवर नेमणूक झाली असतां सेवाराम यांच्यापाशीं रेखागणिताचें अध्ययन केलें. पुढें काशींतील संस्कृत-पाठशाळेंत रेखागणित शिकविण्याकरितां यांची नेमणूक झाली (१९४१). तेव्हांपासून शेवटपर्यंत हे काशी येथें होते व यांची मानमान्यता व हुद्दा सारखा वाढत गेला. हे रॉयल एशियाटिक सोसायटी, ग्रेटब्रिटन व बंगालचे सन्मान्य सभासद, कलकत्ता व अलाहाबाद विश्वविद्यालयाचे फेलो, महामहोपाध्याय, सी. आय. ई. इत्यादि पदव्यांनीं विभूषित होते. एकदां चंद्रग्रहण बरोबर वर्तविल्याबद्दल जम्मूच्या राजानें यांना एक हजार रुपये बक्षीस दिलें.

यांनीं आपल्या विषयावर संस्कृत, हिंदी व इंग्रजीमध्यें अनेक ग्रंथ केले आहेत.

बाबा पदमनजी—(जन्म स. १८३१–मृत्यु स. १९०६) मराठींतील सुप्रसिद्ध लेखक, कोशकार व ख्रिस्ती धर्म-प्रसारक.

जन्मस्थान बेळगांव. जात कासार. यांचे मूळ उपनाम मुळे. पित्याचें नांव पदमनजी माणिकजी. ते सब्‌असिस्टंट सर्वेयर होते. यांचें मराठी शिक्षण बेळगांवीं व इंग्रजी शिक्षण मुंबई येथें फ्री चर्च स्कूलमध्यें झालें. यांची प्रवृत्ति ख्रिस्ती धर्माकडे होण्यास 'प्रभाकर'कर्ते भाऊ महाजन व लोकहितवादी यांचे लेखन विशेष कारण झालें. 'ब्राह्मणधर्म व ब्राह्मणांचे श्रेष्टत्व याजवरील माझा विश्वास व पूज्यबुद्धि हीं नष्ट होण्यास लोकहितवादींची प्रभाकरांतील पत्रमालिकाच कारण झाली' असें यांनीं अरुणोदय नांवाच्या आत्मचरित्रांत म्हटलें आहे. शेवटीं १८५४ मध्यें हे ख्रिस्ती झाले. त्यानंतर सोळा वर्षें पुण्याच्या 'फ्री चर्च मिशन'च्या शाळेंत शिक्षक होते. १८६० मध्यें यांनीं टामस कँडीच्या इंग्रजी-मराठी कोशाचा संक्षेप शब्दरत्नावलींत केला. त्यापूर्वी १८५७ सालीं पुण्याच्या मिशनमध्यें यांना 'पालक' दीक्षा मिळाली होती. १८७३ सालीं यांनी त्या कामाचा राजीनामा देऊन लेखनकार्य आरंभिलें. 'बायबल सोसायटी', 'ट्रक्ट सोसायटी' यांचें संपादकत्व यांच्याकडे आलें. वयाच्या ७१ व्या वर्षी हे सेवानिवृत्त झाले.

यांनीं लिहिलेलें मराठी वाङ्मय सोडल्यास मराठी ख्रिस्ती वाङ्मय असून नसल्यासारखें होईल. यांनीं शंभराचे वर लहानमोठीं पुस्तकें लिहिलेलीं आहेत. शिवाय वर्तमानपत्रांतील लिखाण वेगळेंच. यावरून यांच्या प्रचंड लेखनाची कल्पना येईल. यांचें वाङ्मय प्रतिभासंपन्न, भाषा साधी, चटकदार, शब्दयोजना वेंचक, लिखाण गंभीर व प्रौढ असे. भक्तीचा जिव्हाळा व समाजसुधारणेची तळमळ वगैरे गुण यांच्या वाङ्मयांत भरपूर आढळतात.

यांचें वाङ्मय—कोश–१ इंग्रजी-मराठी, २ मराठी-इंग्रजी, ३ संस्कृत-मराठी, आत्मचरित्र–४ अरुणोदय (स्वतःची ख्रिस्ती धर्म स्वीकारीपर्यंतची माहिती), धार्मिक–५ सटीक मराठी नवा करार, इत्यादि.

बाबा राघवदास—(जन्म स. १८९६ डिसें.१२) सुप्रसिद्ध धर्मप्रसारक, समाजसेवक व आन्तरराष्ट्रीय कीर्तीचे राष्ट्रीय कार्यकर्ते.

यांचा जन्म पुणें येथें झाला. यांचें समग्र नांव राघवेंद्र शेषो पाच्छापूरकर असून हे दे. ऋ. ब्राह्मण आहेत. शिक्षण मुंबई व कऱ्हाड येथें झालें. स्वामी रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांच्यामुळें यांना त्याग व सेवा करून राहण्याची स्फूर्ति झाली व यांनीं आजन्म ब्रह्मचर्यानें राहण्याचा निश्चय केला. नंतर योगाभ्यासाकरितां हे हिमालयांत गेले (१९१३). नंतर काशी, ज्वालापूर व गोरखपूर येथें संस्कृत व इंग्रजी यांचें अध्ययन करून १९१६ पासून गोरखपूर येथें यांनीं वास्तव्य केलें. १९२० पासून राजकारणांत पडले व अनेक वेळा तुरुंगवास घडला. भारतीय संस्कृतीचें ज्ञान लोकांत पसरावें म्हणून गीतेबरोबर यांनीं तुळसीदास रामायणाच्या प्रचारकार्यास आरंभ केला. ठिकठिकाणीं शाळा वगैरे संस्था काढून त्या उत्तम चालविल्या.

यांनीं गोरखपूर येथें गीताप्रेस (१९२३), गीता-प्रचारसमिति (१९२६), रामायणप्रचारसमिति (१९२८), आर्यधर्मप्रचारसमिति वगैरे संस्था काढण्यांत पुढाकार घेऊन गीतेच्या अनेक प्रकारच्या स्वस्त किंमतींत देतां येणाऱ्या आवृत्त्या, कल्याण मासिकासारखें आबाल-वृद्धांना प्रिय असणारें सुबक हिन्दी मासिक, गीतेच्या, तुळसीदास रामायणाच्या व जैन, बौद्ध व शीख वगैरेंच्या ग्रंथांच्या परीक्षा सुरू केल्या. त्यांचीं केन्द्रें हिंदुस्थानांत

व हिंदुस्थानच्या बाहेरच्या देशांतहि निर्माण करून दरवर्षी हजारों विद्यार्थी बसतील इतक्या त्या लोकप्रिय केल्या. याशिवाय वेदविद्यालय, संस्कृत कॉलेज, पाठशाळा व खेड्यांतून स्तरापेक्षां अधिक माध्यमिक विद्यालयें स्थापन केलीं.

पण यांपेक्षांहि बौद्ध राष्ट्रांशीं घनिष्ठ संबंध उत्पन्न करणारी यांची कामगिरी अत्यंत महत्त्वाची आहे. गोरखपूरजवळ कुशीनगर हें गांव गौतमबुद्धाचें निर्वाण-स्थान आहे. तेथें अनेक बौद्ध यात्रेकरू येतात. त्यांच्याशीं येथील हिंदूंचें गैरसमजुतीनें अत्यंत तुटक वर्तन असे. यांनीं तो तुटकपणा नाहींसा करून प्रेमाचे संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याकरितां धर्मशाळा बांधल्या (बिर्ला, जुगल किशोर पाहा). जन्म-ज्ञान-निर्वाण-दिन वैशाखी पौर्णिमा जिल्हाभर सुट्टीचा दिवस ठरवून यात्रा सुरू केली. यांच्या प्रयत्नानें चीन, सिलोन वगैरे देशांतून तेथें धर्मशाळा वगैरे सोयी करण्याकरितां लक्षावधि रुपये मंजूर झाले आहेत. बुद्धदेव हायस्कूल उघडलें असून तेथें शेंकडों परदेशी विद्यार्थी हिन्दींतून शिक्षण घेत आहेत. चिनी धर्माध्यक्ष रे. तोसू व शिक्षाध्यक्ष मा. ताऊ यांच्या पाठिंब्यानें आशियांतील निम्यापेक्षां अधिक भाग व्यापणाऱ्या बौद्ध राष्ट्रांशीं हिंदुस्थानचें दळणवळण सुरू होऊन आपलेपणाचे संबंध स्थापित होत आहेत.

दुष्काळ, पूर वगैरेमध्यें लोकांची सेवा करून, खादी, हिन्दीप्रचार, ग्रामोद्योग वगैरेमध्यें सक्रिय भाग घेऊन, जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष होऊन, संस्कृतिप्रसाराचें काम अखंड चालवून आणि आशियाटिक राष्ट्रांचा संघ निर्माण करण्याच्या दृष्टीनें बौद्ध राष्ट्रांत दळणवळण उत्पन्न करून या त्यागी संन्यस्त वृत्तीच्या माणसानें कार्याची नवी दिशा दाखवून आपल्याबद्दल लोकांत विलक्षण आदर उत्पन्न केला आहे.

बारींद्रकुमार—(जन्म स. १८८०–फांशी स. १९०९) बंगालमधील क्रांतिकारक चळवळीचे जनक व पुढारी.

अरविंद घोष यांचे हे धाकटे बंधु. यांचा जन्म जरी इंग्लंडमध्यें झाला तरी यांचें सर्व बालपण अरविंद घोष यांच्या देखरेखीखालीं बडोद्याला पार पडलें. १९०२ सालीं हे बडोद्याहून कलकत्त्याला गेले व यांच्या जीवनाचें नवें पर्व सुरू झालें.

बंगालमध्यें भद्रलोक या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या सुशिक्षित लोकांत क्रांतीची उठावणी करावयाची व त्या मार्गानें हिंदुस्थानला स्वराज्याची प्राप्ति करून द्यावयाची अशी यांची सुरवातीची कल्पना होती. परंतु केवळ राजकारणाच्या नांवावर लोकांचा पाठिंबा मिळत नाहीं असें यांच्या ध्यानांत आलें व यांनीं त्याला धार्मिक बैठक मिळवून देण्याचा प्रयत्न सुरू केला. यासाठीं यांनीं आपल्या या कल्पनेप्रमाणें विद्यार्थी तयार करण्यास सुरुवात केली व १९०८ अखेर अविनाश भट्टाचार्य व भूपेंद्रनाथ दत्त यांचे सहकार्यानें हे पंधरा कट्टे अनुयायी करण्यांत यशस्वी झाले. उल्हासकर दत्त व हेमचंद्र दास हे यांचे बॉम्ब करण्यांतील सहकारी असून अकरा पिस्तुलें, चार लहान बंदुका व एक मोठी बंदुक येवढें प्रचंड (?) साहित्य यांनीं जमा केलें.

देशांत अस्वस्थता उत्पन्न करा, लोकांच्या मनांतील अस्वस्थतेचें पर्यवसान स्वराज्याच्या इच्छेंत सहजच होईल अशी यांची सुरवातीपासूनची सांगी असे. या अस्वस्थतेचें केवळ एक साधन म्हणून बॉम्बला आपण हाताशीं धरल्याचें पुढें यांनीं आपल्या जबानींत कबूल केलें.

'युगांतर' हें बंगाली व 'संध्या' हें इंग्रजी पत्रहि यांनीं आपल्या मतप्रसारासाठीं काढलें (१९०६). युगांतर व त्यामध्यें प्रगट केले जाणारे विचार तर इतके लोकप्रिय ठरले कीं, पुढच्याच वर्षी त्याचा खप सात हजारांवर गेला. पुढें हें पत्र न्यूज पेपर्स ॲक्टनें बंद पडलें.

परंतु यामुळें यांच्या मतप्रचारांत बिलकुल खंड पडला नाहीं. भगवद्गीतेंतील 'कार्यं कुरु'चा यांनीं लावलेला नवा अर्थ, विवेकानंदांचीं व्याख्यानें व मॅझिनी गॅरिबाल्डींचीं चरित्रें तरुणपिढी श्रद्धेनें पठण करूं लागली. याशिवाय भवानीमंदिर, वर्तमान रणनीति व मुक्ती कोन पथे (युगांतरमधील लेखांचें पुनर्मुद्रण) हीं स्वतंत्र पुस्तकें यांच्या या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं लिहिलीं गेलीं.

यांच्या या सर्व प्रचाराचा परिणाम अपेक्षित तोच झाला. सर्व हिंदुस्थान-विशेषतः बंगाल यांच्या या मत-प्रणालीनें अक्षरशः वेडा झाला. कलकत्ता व ढाक्का येथें स्थापन झालेल्या अनुशीलनसमितीच्या शाखा व सभासद झपाट्यानें वाढूं लागले. ढाक्का शहरानें तर

आपल्या भोंवतालच्या खेड्यांत पांचशेंपेक्षां जास्त शाखा स्थापन केल्या.

यांच्या या सर्व हालचालींचा स्फोट मिसेस् व मिस् केनेडी यांच्या मृत्यूंत झाला. मुझफरपूर येथील चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि. किंग्जफोर्ड यांच्यासाठीं योजलेला बॉम्ब चुकून या दोन स्त्रियांवर पडला. यांचेनंतर किंग्जफोर्ड यांना पुस्तकांच्या पोकळींतून पाठविलेला बॉम्बहि पुस्तकाचें पार्सल न फोडतां तसेंच ठेवल्यानें वायां गेला. 'अलिपूर कॉन्स्पिरसी केस' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या या खटल्यांत हे व हेमचंद्र दास यांसकट पंधरा लोकांना फांशीं देऊन या कार्यास सुरवातीलाच दडपून टाकण्याचा सरकारनें प्रयत्न केला.

पण तसें झालें नाहीं. लवकरच या खटल्यांत माफीचा साक्षीदार नरेन्द्रनाथ गोस्वामी यास ठार करण्यांत आलें. त्याचेच पाठोपाठ या खटल्याचें काम चालविणारे पब्लिक प्रॉसिक्युटर व पोलीस सुपरिन्टेन्डेंट यांनाहि पिस्तुलानें ठार करण्यांत आलें.

आणि यानंतर बंगालमध्यें असें कांहीं क्रांतीचें नवें चक्र सुरू झालें कीं, त्यानें सरकार व सर्व हिंदुस्थान अक्षरशः घाबरून गेलें.

अशा तऱ्हेनें सकृद्दर्शनीं यांच्या या चळवळींना अपयश प्राप्त झालें तरी यांच्या तेजस्वी मतप्रचारामुळें बंगालमध्यें उत्पन्न झालेली क्रांतीची ज्योत अशी सहजासहजीं विझणारी नव्हती. दडपशाही, गोडीगुलाबी, दमदाटी अशा कोणत्याच साधनानें सरकारला ती नष्ट करतां आली नाहीं. हिंदुस्थानांतील ब्रि. सत्ता अनीति व अत्याचार यांच्या पायावर उभारली गेली आहे, तिचा नाश हें धर्मकृत्य आहे, धर्म, इतिहास व संस्कृति यांचा दुवा मिळवण्याचें क्रान्ति हें एक हुकमी साधन आहे, ही यांची शिकवण बंगाली लोक कधींच विसरले नाहींत.

बारुआ, आनंदराम—(जन्म स. १८५०–मृत्यु स. १८८९) आसाम प्रांतांतील सुप्रसिद्ध संस्कृत पंडित व संशोधक.

आसाम प्रांतांतील कामरूप जिल्ह्यामधील उत्तर गौहत्ती या गांवीं यांचा जन्म झाला. कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांतून एफ. वाय.ची परीक्षा पास झाल्यानंतर कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या शिष्यवृत्तीवर हे इंग्लंडला गेले व आय. सी. एस., बॅरिस्टर व बी. एस्सी. होऊन हे हिंदुस्थानला परत आले (१८७२).

हिंदुस्थानांत आल्यानंतर आसाम प्रांतांतील शिवसागर व बंगालमधील इतर जिल्ह्यांत मॅजिस्ट्रेटचीं कामें करीत असतांच यांचें ग्रंथलेखन सतत चालू असे. संस्कृत, इंग्लिश डिक्शनरी वगैरे पुस्तकांशिवाय Ancient Geography in India, Bhavbhuti and his Place in Sanskrit Literature हे यांचे स्वतंत्र ग्रंथ महत्त्वाचे आहेत.

परंतु यापेक्षांहि संस्कृत भाषेच्या व्याकरणाचें ऐतिहासिक, भाषिक वगैरे सर्व दृष्टींनीं अध्ययन करण्याच्या हेतूनें यांनीं सुरू केलेली A Comprehensive Grammar of the Sanskrit Language-Critical, Analytical and Historical, ही यांची अपुरी ग्रंथमाला विशेष महत्त्वाची आहे. प्रत्येकीं हजार पानांचे बारा भाग काढण्याची यांची कल्पना होती. परंतु यांपैकीं संस्कृत काव्यांच्या छन्दःशास्त्रावरील दहावा व नानार्थ संग्रहावरील तिसरा खंड येवढेच ग्रंथ हे प्रसिद्ध करूं शकले.

बार्डोलाय, गोपीनाथ—(जन्म स. १८९१) आसाम प्रांतांतील सुप्रसिद्ध कॉंग्रेस पुढारी व कार्यकर्ते.

कलकत्त्याच्या स्कॉटिश चर्च कॉलेजमधून एम्. ए. झाल्यानंतर हे इंग्लंडहून बॅरिस्टर होऊन परत आले (१९१६). आल्यानंतर लवकरच यांनीं वकिली करण्यास सुरुवात केली; परंतु पंजाब प्रकरणापासून ब्रिटिश राज्यावरील यांची श्रद्धा उडाली व आपली वकिली सोडून यांनीं कॉंग्रेसच्या राजकारणांत भाग घेण्यास सुरुवात केली (१९२१).

लवकरच आसाम प्रांतांतील कॉंग्रेसच्या राजकारणाला यांनीं इतकें शिस्तशीर स्वरूप आणून दिलें कीं, इतर प्रांतांच्या बरोबरीनें तो प्रांत कॉंग्रेसच्या चळवळींत भाग घेण्यास सज्ज झाला. थोड्याच दिवसांत यांना ए. आय. सी. सी.चे सभासद करण्यांत आलें. गोहत्ती कॉंग्रेसचे हे दुय्यम सेक्रेटरी होते.

गांधीवादावरील अनन्य श्रद्धेबद्दल यांची विशेष प्रसिद्धि आहे. कायदेभंगाला पूरक म्हणूनच असेंब्लींतील कार्य स्वातंत्र्याच्या चळवळींत उपयोगी पडेल या श्रद्धेनें हे दक्षिण कामरूप जिल्ह्यातर्फे आसामच्या असेंब्लींत निवडून गेले व त्या प्रांताचे मुख्य प्रधान झाले.

मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें घेतल्यानंतर थोड्याच दिव-

सांनीं त्रिमंत्री योजनेनें आसाम प्रांतांत उत्पन्न झालेल्या एका नव्या प्रश्नाला यांना तोंड द्यावें लागलें. आसाम प्रांतांत हिंदु बहुसंख्य असतांना त्या प्रांताला या योजनेनें मुसलमान बहुसंख्य असणाऱ्या बंगाल प्रांताच्या 'ब' गटांत ढकललें. तावडतोब यांनी आपल्या प्रांतांतील मुसलमानांच्या हकालपट्टीस आरंभ केला. हे लोक मूळचे आसाम प्रांतांतील नाहींतच, आम्हांस त्रास देण्यासाठीं ते येथें आले आहेत असें यांनीं आपल्या कृतीचें समर्थन केलें (१९४६).

बालगंधर्व—(जन्म स. १८८८) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध अभिनयनिपुण गायक नट.

यांचें जन्मस्थान पुणें. यांचें नांव नारायण श्रीपाद राजहंस. यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण. यांना १८९८ सालीं बालगंधर्व ही पदवी लो. टिळकांनीं दिली. १९०५ सालीं किर्लोस्कर नाटक मंडळींत यांचा प्रवेश झाला. पुढें यांनीं ती मंडळी सोडली (१९१३ मे) आणि गोविंदराव टेंबे व गणपतराव बोडस यांच्या भागींत गंधर्व नाटक मंडळी काढली (१९१३ जुलै). त्या मंडळीचे हे पुढें पूर्ण मालक झाले (१९१९). यांना नाट्य संमेलनाच्या अध्यक्षाचाहि मान देण्यांत आला (१९२९).

हे नाटकांत स्त्रियांच्या भूमिका करण्याबद्दल विख्यात आहेत. अभिनय व गायन यांबद्दल यांची ख्याति आहे. आवाज, रूप व शरीराची ठेवण या नैसर्गिक गुणांबरोबर निरलसपणें मेहनत करण्याचाहि यांच्याजवळ गुण आहे. लोकांनीं 'वन्स मोअर' देऊन यांना पुनः काम करणें भाग पाडलें तर कंटाळून न जातां हे अधिक तत्परतेनें काम करून रसिकांकडून शाबासकी मिळवीत. यांच्या शारदा, सुभद्रा, भामिनी, रुक्मिणी, द्रौपदी, सिंधु वगैरे प्रमुख भूमिका होत. यांनीं दोन तपें महाराष्ट्र रंगभूमीवर पूर्ण स्वामित्व गाजविलें. यांचीं स्त्रीवेषांतील चित्रें सौंदर्याचा आदर्श म्हणून घरोघर लावलीं गेलीं. महाराष्ट्रांतील स्त्रियांना लुगडें नेसणें, नथ घालणें व प्रसाधनें वापरण्याचा नवा प्रकार यांनीं दाखविला. अभिनय व गायकी यांबाबतसुद्धां यांनीं नवें गंधर्वयुग सुरू केलें. यांच्या अभिनयांत एक प्रकारचा लाडिकपणा व आवाजांत एक प्रकारची झार आहे. त्यामुळें यांचें गद्य भाषण सुद्धां विशेष प्रकारचें होई. आरडाओरडा किंवा कृत्रिमपणापासून हे नेहमीं दूर असत.

यांचें गायन हें अलीकडील कालांत अलौकिक मानलें जातें. असा सुरेलपणा, असा लाडिकपणा व असा तानेचा सरळ स्वच्छपणा यांच्याशिवाय इतरत्र सांपडूं शकत नाहीं. शिवाय यांच्या आवाजांत अवर्णनीय आनंद देणारें माधुर्य ओतप्रोत आढळतें. शास्त्रशुद्धतेचा अभाव व रागाची सरमेसळ असूनसुद्धां यांच्या गायनाची रसिकांवर मोहिनी पडते. शिक्षणापेक्षां ईश्वरी देणगीच शेवटीं यांचे बाबतींत श्रेष्ठ ठरते.

चांगली वेषभूषा आणि गुणी माणसांचा संग्रह करण्याचा यांना कमालीचा हव्यास असे. या लहरी व स्वतंत्र वृत्तीच्या कलावंताची जोपासना करणारे दुर्गा खोटे यांचे वडील कै. पांडुरंग शामराव लाड सॉलिसिटर-सारखीं माणसेंहि यांना आर्थिक साहाय्य करीत.

यांच्याइतपत नाटकावर पैसा कोणींहि कमावला नसेल. यांनीं दिलेल्या खेळांच्या उत्पन्नांतून लक्षाधिक रुपये महाराष्ट्रांतील संस्थांना मिळाले आहेत. यांनीं व केशवराव भोसले यांनीं केलेल्या संयुक्त मानापमान या एका खेळास पंधरा हजार तीनशें रुपये उत्पन्न झालें होतें. यांच्यावर महाराष्ट्रानें पैशाची धार धरली असतांहि हा खर्चिक भोळसर स्वभावाचा कलावंत आपल्या लहरी स्वभावानें शेवटीं अकिंचन स्थितींत कर्नाटकी गोहरच्या तंत्रानें वागून काळ कंठीत असावा यापरतें आश्चर्य कोणतें ?

बाळकृष्ण, डॉ.—(जन्म स. १८८२-मृत्यु स. १९४०) कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे माजी प्रिन्सिपल व सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक.

मुलतानच्या गव्हर्नमेंट हायस्कूल व लाहोरच्या डी. ए. व्ही. व गव्हर्नमेंट कॉलेजमध्यें आपलें शिक्षण संपविल्यानंतर हे उच्च शिक्षणासाठीं इंग्लंडला गेले. लंडनच्या स्कूल ऑफ इकॉनमिक्स अॅन्ड पॉलिटिक्स-मध्यें कांहीं दिवस शिक्षण घेऊन हे हिंदुस्थानला परत आले. हे एम्. ए., पीएच्. डी., एफ. आर. इ. एस. होते.

हिंदुस्थानांत आल्यावर हे हरिद्वारच्या गुरुकुल युनिव्हर्सिटींत इतिहास व अर्थशास्त्र यांचे प्राध्यापक म्हणून काम करूं लागले. तेथें प्राध्यापक म्हणून अकरा वर्षें, व्हाइस प्रिन्सिपल म्हणून सहा वर्षें व प्रिन्सिपल व गव्हर्नर म्हणून एक वर्ष काम केल्यानंतर हे कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे प्रिन्सिपल झाले (१९२२). अखेरपर्यंत हे तेथेंच होते. कोल्हापूर राज्यांतील अनेक लहान-

मोठ्या संस्थांशीं यांचा संबंध असून हॉलंड, जर्मनी, स्वित्झरलंड, इटाली इत्यादि देशांतून तेथील शिक्षणक्रम अभ्यासण्याच्या हेतूनें हे जाऊन आले होते.

याशिवाय एक अभ्यासी इतिहाससंशोधक म्हणून यांची प्रसिद्धि असून 'शिवाजी व शिवकाल' या विषयावरील यांना तज्ज्ञ मानण्यांत येई.

यांचे ग्रंथ—(1) Commercial Relations between India and England (1924), (2) The Industrial Decline in India, (3) Demands of Democracy, (4) Hindu Philosophers on Evolution, (5) Shivaji the Great, (6) Indian Constitution.

याशिवाय इतिहास, राजकारण, धर्मशास्त्र इत्यादि विषयांवर यांनीं हिंदींत ग्रंथ लिहिले असून हिंदुस्थानच्या इतिहासावरील यांचा मराठी ग्रंथ प्रसिद्ध आहे.

बिकानेरचे महाराज, गंगासिंहजी—(जन्म स. १८८०–मृत्यु स. १९४३) बिकानेर या राजपुतान्यांतील संस्थानचे सुप्रसिद्ध अधिपति व ब्रि.चे परममित्र.

राष्ट्रकूटाशीं संबंध जोडणाऱ्या यांच्या घराण्यांतील हे एकविसावे पुरुष होत. राव भिकाजी या घराण्याच्या मूळ पुरुषाच्या नांवावरून यांच्या संस्थानाला बिकानेर हें नांव मिळालें. वयाच्या अठराव्या वर्षी यांनीं राज्यकारभाराचीं सूत्रें ताब्यांत घेतलीं.

क्षेत्रफळाच्या दृष्टीनें हिंदुस्थानांतील संस्थानांत यांचा सातवा नंबर लागत असूनहि ब्रिटिश सरकारला यांनीं वेळोवेळीं केलेल्या लष्करी मदतीमुळें यांचें नांव हिंदुस्थानच्या पहिल्या दर्जाच्या संस्थानिकांत जाऊन बसलें. आपल्या शार्दूल लाइट इन्फन्ट्री, डुंगर लान्सर्स इत्यादि लढाऊ पथकांबरोबर यांनीं गंगा रिसाला या ४६५ उंटांच्या पथकांचे प्रमुख म्हणून यांनीं चीन युद्ध (१९००-०१), इजिप्त व पॅलेस्टाईन नि फ्रान्स (पहिलें महायुद्ध) इत्यादि आघाड्यांवर जे पराक्रम गाजविले त्यामुळें यांना आंतरराष्ट्रीय कीर्तीचा लाभ झाला.

याच कारणानें युद्धानंतर यांची इंपीरियल वॉर कॅबिनेट कॉन्फरन्सला व व्हर्सायच्या पीस कॉन्फरन्सला हिंदुस्थानांतील संस्थानिकांचे प्रतिनिधि म्हणून नेमणूक झाली. याचप्रमाणें लीग ऑफ नेशन्सच्या जिन्हेवाच्या अकराव्या अधिवेशनाला गेलेल्या हिंदी शिष्टमंडळाचें प्रमुखत्व यांचेकडे देण्यांत आलें. चेम्बर ऑफ प्रिन्सेसचेहि हे बरींच वर्षे अध्यक्ष होते (१९२०-२५).

गंगा कॅनॉल ही संस्थानांतील वीस लाखांपेक्षां जास्त किंमतीची कालव्याची योजना हें यांचें संस्थानी कारभारांतील सर्वांत मोठें घाडस होय. संस्थानच्या दक्षिण भागांतून वाहणाऱ्या सतलज नदीचें पाणी कालव्याच्या साहाय्यानें संस्थानच्या उत्तर भागांत खेळविण्यांत आलें असून त्यायोगें सहा लक्ष वीस हजारांपेक्षां जास्त एकर जमीन पेरणीच्या दृष्टीनें उपयोगण्यांत आणणें शक्य झालें आहे. यामुळें संस्थानच्या या भागांतील लोकसंख्याहि तीस हजारांवरून दीड लक्षापर्यंत गेली आहे. अशा तऱ्हेनें पांच हजार एकरांवरून पावणेचार लक्ष एकरांपर्यंत यांच्या राज्याचा पाणीपुरवठा गेला. १९३७ सालीं यांनीं आपला सुवर्ण-महोत्सव साजरा केला.

बिर्ला, जुगलकिशोर बलदेवदास—(जन्म स. १८८५) हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध व्यापारी व हिंदुसंस्कृतिप्रसारक.

यांचें जयपूर राज्यांतील पिलानी हें मूळ गांव. हे जातीनें माहेश्वरी वैश्य. बिर्ला बंधूंपैकीं हे सर्वांत वडील होत. मातृपितृभक्ति व बंधुप्रेम याबद्दल बिर्ला बंधूंची प्रसिद्धि आहे. हे व्यापक हिंदुसंस्कृतीचे सक्रिय पुरस्कर्ते आहेत. यांनीं आपल्या मारवाडांतील पिलानी गांवीं बिर्ला कॉलेज काढलें असून तेथें यांनीं अनेक शिष्यवृत्त्या ठेविल्या आहेत. दिल्लीचें लक्ष्मीनारायणमंदिर यांनीं पांच लक्ष रुपये खर्च करून बांधलें. तेथें तें बिर्लामंदिर या नांवानें ओळखलें जातें. बौद्ध यात्रेकरूंकरितां कुशीनगर, सारनाथ, मुंबई, कलकत्ता व दार्जिलिंग या ठिकाणीं यांनीं धर्मशाळा व बुद्धदेवमंदिरें, बांधिलीं आहेत. परमहंसाश्रम, बरहज (जि. गोरखपूर) येथें १९२६-१९४० पर्यंत कंबोडिया, इंडो चायना सयाम, आराकान, ब्रह्मदेश व सिलोन येथील जे बौद्ध भिक्षु हिंदी शिकत होते त्यांचा खर्च हे चालवीत. बुद्धदेव हायस्कूल, कुशीनगर याला यांनीं पंचवीस हजारांची मदत केली. दर वर्षी अशा कामांत हे वीस लक्ष रुपयेपर्यंत दान करतात असें म्हणतात.

बिर्ला, घनश्यामदास बलदेवदास—(जन्म स. १८९४) हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध कारखानदार व व्यापारी.

बिर्ला ब्रदर्स लि. या हिंदुस्थानांतील मोठ्या व्यापारी संस्थेचा आज उभा असलेला पसारा हे व यांचे बंधु रामेश्वरदास व ब्रजमोहन वगैरेंच्या योजकतेचें फळ आहे. या संस्थेचे हे बंधु मॅनेजिंग डायरेक्टर असून एक ज्यूट मिल; कलकत्ता, दिल्ली, ग्वाल्हेर, ओकारा व भिवानी येथें कापडाच्या गिरण्या, पांच साखरेच्या गिरण्या इतक्या मोठ्या प्रमाणावर या संस्थेचा व्यवहार चालविला जातो. इन्शुअरन्स कंपन्या, टेक्स्टाइल मिल्स व कलकत्ता आणि मुंबई या दोन महत्त्वाच्या ठिकाणच्या मालाची आवक-जावक ह्या गोष्टी यांच्या या धंद्याला पूरक म्हणून केल्या जातात. अलिकडे मुंबईस यांनीं स्थापन केलेला हिंद सायकल्स लि. हा हिंदुस्थानांतील पहिला सायकलींचा कारखाना होय.

हिंदुस्थानच्या व्यापारी जगांत एक वजनदार व्यापारी अशी यांची स्वतःची ख्याति असून इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स, कलकत्ता (१९२४), फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इन्डस्ट्री (१९२९) इत्यादि ठिकाणच्या यांना देण्यांत आलेल्या अध्यक्षस्थानांवरून ती स्पष्ट होते. इंडियन फिस्कल कमिशन, रॉयल कमिशन ऑन् लेबर वगैरेंचेहि यांना सभासद निवडण्यांत आलें होतें. १९२७ सालीं जिन्हेवा येथें भरलेल्या लेबर कॉन्फरन्सला हे हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून हजर राहिले असून हिंदी-इंग्रजी व्यापारीसंबंधाबाबतचे यांना कांहीं काळ सरकारी सल्लागार नेमण्यांत आलें होतें (१९३६-३७).

म. गांधींच्या अतिविश्वासांतील माणसांत यांची गणना होते. दिल्ली, मुंबईसारख्या कोणत्याहि मोठ्या शहरीं महात्माजी जावोत. त्यांचा मुक्काम 'बिर्ला-हाउस'-मध्यें असावयाचा ही गोष्ट प्रसिद्ध समजली जाते. अर्थातच अलिकडे गांधीजींनीं त्या त्या गांवच्या अस्पृश्य वस्तींत जाऊन राहावयाचें धोरण स्वीकारल्यानें या परिपाठांत खंड पडला आहे.

म. गांधींच्या व्यक्तिमत्त्वाच्या छटा स्पष्ट करणारे आपले अनुभव यांनीं 'बापू' या नांवानें हिंदी भाषेंत प्रसिद्ध केले. कै. महादेव देसाई यांनीं या ग्रंथाला प्रस्तावना लिहिली असून निकटच्या मनुष्याचे अनुभव या दृष्टीनें या ग्रंथास महत्त्व असल्याचें त्यांनीं त्यांत म्हटलें आहे. या ग्रंथाचा मराठी अनुवाद बा. म. तारकुंडे व ना. ग. जोशी यांनीं केला आहे.

यांचे इतर ग्रंथ—Indian Currency in Retrospect.

बिलग्रामी, डॉ. सय्यद हुसन—(जन्म स. १८४२–मृत्यु स. १९२६ सुमार) हैदराबाद संस्थानांतील सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते व अनेक-भाषा-पंडित.

मेसापोटिमियांतून मुहंमद घोरीबरोबर हिंदुस्थानांत आलेल्या बिलग्रामच्या सय्यद घराण्यांत यांचा जन्म झाला. लखनौच्या कॅनिंग कॉलेज व रुर्कीच्या टॉमस सिव्हिल एंजिनियर कॉलेजमध्यें आपलें शिक्षण संपवून हे उच्च शिक्षणासाठीं इंग्लंडला रवाना झाले व तेथील रॉयल स्कूल ऑफ माइन्समध्यें शिक्षण घेऊन यांनीं प्रस्तरशास्त्रांतील मुर्चिसन सुवर्णपदक मिळविलें.

हिंदुस्थानांत आल्यानंतर हे सालरजंग यांच्या सल्ल्यावरून हैदराबाद संस्थानच्या पब्लिक वर्क्स, रेल्वे व खाणींचे मुख्य अधिकारी बनले. यानंतर कांहीं दिवस त्या संस्थानच्या शिक्षणखात्याचे प्रमुख म्हणून काम केल्यानंतर हे कार्यनिवृत्त झाले (१९०१). यांची संस्थानमधील सर्वच कारकीर्द यांच्या सुधारणाप्रिय वृत्तीमुळें गाजली.

यांना अनेक भाषा येत. मद्रास युनिव्हर्सिटीचे हे कित्येक वर्षे (१८९०-२) संस्कृतचे परीक्षक, केम्ब्रिज युनिव्हर्सिटींत मराठीचे लेक्चरर अशा अनेक ठिकाणीं कामें करून आपलें बहुभाषित्व यांनीं व्यक्त केलें. अरबी भाषेंतील यांच्या प्राविण्याबद्दल यांना शम्स-अल-उल्मा अशी पदवी देण्यांत आली.

इंग्लंडमध्यें असतां दिल्ली मॅन्युस्क्रिप्ट्स या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या अरबी व पर्शियन हस्तलिखितांच्या सूचीचें काम इंडिया ऑफिसनें यांचेकडे सोंपविलें.

यांचे ग्रंथ—(1) Civilization of Arabs (डॉ. गुस्टाव ली बॉन यांच्या फ्रेंच ग्रंथाधारें), (2) A Guide to Cave Temples of Ellora, (3) The Geology and Economic Minerals of Hyderabad इत्यादि.

बीडकर, नरहर रावजी—(जन्म स. १८५८–मृत्यु स. १९३३ जुलै १४) एक दानशूर व धार्मिक गृहस्थ.

यांचे वडील पुणें येथें बेलबागेंत गवई होते. साधारण

शिक्षण झाल्यावर यांनीं रेल्वेंत मालधक्क्यावर नोकरी पत्करिली. चाळीस वर्षे नोकरी करून हे सेवानिवृत्त झाले. तेव्हां हे 'चीफ ट्रफिक कॅन्व्हासर' म्हणून काम करीत होते. यांच्या अनुभवाचा फायदा मिळावा म्हणून रेल्वेचे फाटे कोणत्या टापूंतून गेले असतां रेल्वे कंपनीस व लोकांस फायदा होईल याची तपासणी रेल्वे कंपनीनें यांच्याकडून करून घेतली. यांचा ओढा स्वधर्म व विद्यावृद्धि यांकडे असे. यांनीं पुढीलप्रमाणें देणग्या दिल्या. मुंबई विद्यापीठ, बीडकर शिष्यवृत्ति व पारितोषिक देण्याकरितां–दहा हजार; पुणें शिक्षणप्रसारक मंडळ, मीमांसाविद्यालय–सहा हजार; डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे वेदशास्त्रोत्तेजक सभा-प्रत्येकीं पांच हजार; केडगांव नारायणमहाराज–दोन हजार. या देणग्यांच्या व्याजांतून यांच्या नांवें शिष्यवृत्त्या वगैरे देण्याची व्यवस्था यांनीं केली आहे.

बूलर, डॉ. जोहान जॉर्ज—(जन्म स. १८३७–मृत्यु स. १८९८) सुप्रसिद्ध जर्मन प्राच्यविद्यापंडित व संशोधक.

हॅनोव्हरमधील बोस्टेल हें गांव यांचें जन्मस्थान. हॅनोव्हर व गोटिंगेन येथें आपलें शिक्षण संपवून हे प्राच्यविद्या व इतिहास यांचे पदवीधर झाले. यानंतर पॅरिस, लंडन व ऑक्सफर्ड येथें संस्कृत भाषेचें विशेष अध्ययन केल्यानंतर हे हिंदुस्थानला आले. हिंदुस्थानांत आल्यानंतर मुंबई सरकारच्या शिक्षणखात्यांत एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें संस्कृतचे प्राध्यापक, एज्युकेशनल इन्स्पेक्टर व पुण्याच्या संस्कृत अभ्यासक्रम कमेटीचे प्रमुख म्हणून काम केल्यानंतर हे कार्यनिवृत्त झाले (१८८०).

परदेशीं गेल्यानंतर व्हिएन्ना युनिव्हर्सिटींत यांना प्राच्यविद्या व हिंदुस्थानचा इतिहास खात्याचे प्रमुख नेमण्यांत आलें. याच सुमारास यांनीं Encyclopeadia of Indo-Aryan Philology या आपल्या आयुष्यांतील महत्त्वाच्या कार्यास सुरुवात केली. परंतु तें कार्य अपूर्ण स्थितींत असतांनाच लिन्डॉ येथील लेक कॉन्स्टन्स्-(तलावा)मध्यें बुडून हे मरण पावले.

संस्कृत भाषा व हिंदी संस्कृति यांच्या अत्यंत मेहनती अभ्यासकांत यांची गणना होते. मॅक्स मूलर यांच्या सूचनेवरून यांनीं संस्कृत भाषेंत लक्ष घातलें. यांचें या भाषेवरील प्रेम इतकें वाढलें कीं, हिंदुस्थानांतील संस्कृत भाषेच्या पंडितांना भेटण्यासाठीं हे खास हिंदुस्थानला आले. संस्कृत भाषेचा जुन्या परंपरेनें वारसा मिळालेले महाराष्ट्रांतील शास्त्री लोकांचें ज्ञान व युरोपियन लोकांची नवी संशोधक दृष्टि एकत्र करून कार्य करण्याची यांची कल्पना होती व ती अनुभवान्तीं इतकी यशस्वी ठरली कीं, सर्व हिंदुस्थानांत तिचें अनुकरण होऊं लागलें.

मुंबई प्रांतांतील नवशिक्षित पंडितांना संशोधनाची पाश्चात्य पद्धत शिकवण्याच्या हेतूनें यांनीं प्रा. कीलहॉर्न यांचे सहकार्यानें बॉम्बे संस्कृत सीरीज सुरू केली. या मालेसाठीं यांनीं स्वतः पंचतंत्रम्, दशकुमारचरितम् व विक्रमाङ्कदेवचरितम् संपादून कार्याची दिशा दाखवून दिली, व पुढें यांच्या प्रेरणेनें संशोधनक्षेत्रांत शिरलेल्या सर डॉ. रा. गो. भांडारकर, का. त्रिं. तेलंग, शं. पां. पंडित, वामन शिवराम आपटे वगैरे पहिल्या दर्जाच्या संशोधकांची एक नवीच पिढी महाराष्ट्रांत तयार झाली.

महाराष्ट्रांतील या विशिष्ट वर्गांत यांनीं मिळवलेल्या मान्यतेमुळें पुढें यांना हस्तलिखित ग्रंथ मिळवणें अतिसुलभ झालें. केवळ पहिल्या तीन वर्षांत (१८६३-६६) यांनीं दोनशें हस्तलिखितें जमविलीं. पुढें मुंबई सरकारनें यांच्या या कार्यासाठीं एक स्वतंत्र खातें उघडलें व यांना त्याचे प्रमुख करून हिंदुस्थानांतील ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या जवळजवळ सर्व ठिकाणीं यांची सोय केली. यांनींहि उपलब्ध साधनांचा जास्तींत जास्त उपयोग करण्याची शिकस्त केली. राजपुतान्यांतील जैसलमेरच्या जैन ग्रंथभांडारांतील ग्रंथ मिळविण्यासाठीं त्या रखरखीत प्रदेशांतून यांनीं उंटावरून केलेला प्रवास या दृष्टीनें नमुनेदार आहे. काश्मीरमधील 'पृथ्वीराजमहाकाव्य' या शारदा लिपींत भूर्जपत्रांवर लिहिलेल्या ग्रंथाच्या प्राप्तीसाठीं यांना असेच श्रम पडले. वेद व इतर ग्रंथांतील काश्मिरी पाठभेद व श्वेतांबर जैनांच्या प्राकृत व संस्कृत ग्रंथांचें संशोधन ही यांच्या या सर्व संशोधनाची रूपरेखा आहे.

यांपैकीं जैनधर्मासंबंधीच्या यांच्या संशोधनाला एक नव्या अध्ययनक्षेत्राच्या जनकत्वाचा मान पुढें मिळाला. जैन धर्मासंबंधीं हिंदुस्थानांत सांपडलेले पांचशें हस्तलिखित ग्रंथ यांनीं बर्लिन युनिव्हर्सिटीकडे पाठविले व तेच पुढें वेबर, ल्युमन, जॅकोबी यांच्या महत्त्वपूर्ण संशोधनास कारणीभूत झाले. यांपैकीं प्रो. जॅकोबी यांनीं तर यांच्याबरोबर जैनविहारांत प्रवास केला व नंतर आचाराङ्गसूत्रें व कल्पसूत्रें यांच्या संशोधित आवृत्त्या व अनुवाद प्रसिद्ध केला. याशिवाय यांनीं स्वतः Indian Sect of the Jainas ही मथुरा व खारवेल शिला-

लेखावर आधारलेली जर्मन पुस्तिका प्रसिद्ध केली. जैन धर्माचा काल बुद्धापूर्वी ठरविण्याचा साधार प्रयत्न यांत केला आहे.

यांच्या शिलालेखाच्या अध्ययनाला प्राचीन लिपिज्ञानाची जोड असल्यानें यांचें कार्य अधिक सुलभ होई. On Indian Brahma Alphabet व Indische Palāogrophie (1896) हे यांचे या विषयावरील प्रमुख जर्मन ग्रंथ होत. यांपैकीं दुसऱ्या ग्रंथांत प्राचीन लिपींचे नऊ नकाशे असून त्याचा इंग्रजी अनुवाद डॉ. फ्लीट यांनीं केला. परदेशी संशोधकांना हिंदी प्राचीन लिप्यांची इतकी सुबोध माहिती देणारा दुसरा ग्रंथ अजून तयार झाला नाहीं.

या सर्व संशोधनांत हिंदुस्थानची सर्व दृष्टींनी माहिती देणाऱ्या ज्ञानकोशाची यांनीं अध्याहृत धरलेली कल्पना विशेष महत्त्वाची आहे. हिंदुस्थानचा धार्मिक, राजकीय व तात्त्विक इतिहास सादर करणारे शिलालेख, ताम्रपत्रें, भूर्जपत्रें, हस्तलिखितें यांचें यांनीं या विशिष्ट दृष्टीनें परीक्षण केलें व पुरेशी सामुग्री जमतांच यांनीं व्हिएन्ना येथें Encyclopædia of Indo Aryan Philology ही प्रचंड जर्मन ग्रंथमाला सुरू केली. जगाच्या निरनिराळ्या भागांतील तीस विद्वानांच्या सहकार्यानें हें कार्य सुरू झालें. यांच्या हयातींत प्रसिद्ध होऊं शकलेले या ग्रंथाचे नऊ भागच यांच्या संकल्पित कार्याची कल्पना आणून देण्यास समर्थ आहेत. या ग्रंथाच्या पहिल्या खंडांतील Indian Paleography हा भाग यांनीं लिहिला आहे.

हिंदुस्थानचा इतिहास व संस्कृति यांच्या सतत सहवासामुळें हिंदुस्थानबद्दल एक स्वतंत्रच जिव्हाळा यांचे मनांत उत्पन्न झाला होता. जगाच्या पाठीवरील कोणत्याहि संशोधकपरिषदेच्या हिंदुस्थानशाखेचें प्रमुखपद हे मोठ्या उत्साहानें स्वीकारीत. हिंदुस्थानच्या इभ्रतीबद्दल तर हे सदाच जागरूक असत. मॅक्स मूलर यांच्याशीं संस्कृत काव्य-वाङ्मयासंबंधीं यांनीं केलेला वाद या दृष्टीनें नमुनेदार आहे. वेद व बुद्ध याशिवाय बाकीच्या संस्कृत काव्यवाङ्मयावर शकवाङ्मयाची स्पष्ट छाया आहे असें विधान एकदां मॅक्स मूलरनें केलें. ताबडतोब यांनीं Indian Inscriptions and Kavya Literature हा निबंध लिहून त्यांचें म्हणणें खोडून टाकलें. गुप्तपूर्व शिलालेखांतील संस्कृत काव्यांचे उतारे काढून दाखवून यांनीं आपलें हें म्हणणें मॅक्स मूलरना मान्य करण्यास भाग पाडलें.

यांचें इतर वाङ्मय—(1) Digest of the Hindu Law of Inheritance, Partition and Adoption; (2) Aphorisms of the Sacred Laws of the Hindus by Apastambha, (3) Glossary of the oldest Prakrit Dictionary, (4) Sacred Books of the East मधील दुसरा व चवदावा खंड, (5) Indian Antiquary मधील ८५ लेख इत्यादि.

बेझंट, डॉ. ॲनी—(जन्म स. १८४७–मृत्यु स. १९३३ सप्टें. २०) जगांतील सुप्रसिद्ध तत्त्ववेत्त्या, वक्त्या व थिऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्ष (१९०७–३३).

यांच्या वडिलांचें नांव वुइल्यम पेजवुड. आईचें नांव एमिली. यांचें शिक्षण खासगी रीतीनें इंग्लंड, जर्मनी व फ्रान्समध्यें झालें. स. १८६६ सालीं रे. फ्रँक बेझंट यांच्याशीं यांचा विवाह झाला. एका प्रसंगीं यांचीं दोन मुलें–मुलगा व मुलगी अत्यवस्थ झालीं. तेव्हां यांचा देवावरील व प्रार्थनेवरील विश्वास उडाला आणि या पतीपासून विभक्त होऊन आपल्या मातेकडे येऊन राहिल्या. यांच्या सहवासानें मुलें नास्तिक होतील म्हणून मुलांचा ताबाहि यांना मिळाला नाहीं. तेव्हांपासून यांनीं आपल्या लेखनवाचनाच्या कार्याला सुरुवात केली (१८७३).

१८७३ ते १८९३ पर्यंत यांनीं इंग्लंडांत प्रसिद्ध अज्ञेयवादी व राजकारणपटु चार्लस ब्रॉडला यांच्या साहचर्यानें काम केलें. त्यांच्या नॅशनल रिफॉर्मरच्या या सहसंपादक झाल्या. अज्ञेयवाद, राजकारण, संततिनियमन वगैरे गोष्टींचा यांनीं मोठ्या धडाडीनें प्रचार केला. अनेक विषयांचा अभ्यास करून या १८८५ सालीं समाजसत्तावादी झाल्या. त्या वेळीं फेबियम सोसायटी व मजूरपक्षाची स्थापना झाली, त्यांत यांचा भाग प्रमुख होता.

या सुमारास यांची व मॅडम ब्लॅव्हॅट्स्की यांची गांठ पडली. त्यांच्या 'सीक्रेट डॉक्ट्रिन' या ग्रंथाचें पर्यालोचन करून यांनीं आपल्या अध्ययनास अध्यात्माची जोड दिली. त्यांतील प्रमेयें वाचीत असतां यांना पूर्वस्मृती जागृत होत आहेत असें वाटूं लागलें व या थिऑसॉफिस्ट झाल्या व यांना गुरुदेवांचे साक्षात्कार होऊं लागले. यांनीं त्या ज्ञानाचा प्रचार जगभर करण्याचें ठरविलें आणि या १८९३ अखेर हिंदुस्थानांत येऊन दाखल झाल्या. पुढील वीस वर्षांत यांनीं जगांत या

कार्याकरितां सतत संचार केला. बनारस येथें सेंट्रल हिंदु कॉलेज स्थापून धर्मशिक्षणाचा प्रत्यक्ष अभ्यासक्रमांत समावेश करून तो यशस्वी करून दाखविला. गीता, उपनिषदें, रामायण, महाभारत वगैरेंवर व्याख्यानें देऊन तीं ग्रंथरूपानें प्रसिद्ध केलीं. सेंट्रल हिंदु कॉलेज मॅगेझीन मासिक चालविलें. ब्रह्मचर्याश्रमाचें पुनरुज्जीवन करून आपल्या लेखन-व्याख्यानाच्या उत्पन्नांतून पंचाहत्तर हजार रुपये वरील संस्थेस देणगी म्हणून दिले. याप्रमाणें दहा लाख रुपये किंमतीची, एक हजार विद्यार्थी असलेली ती संस्था पं. मदनमोहन मालवीय यांस त्यांच्या भावी हिंदु विश्वविद्यालयाचा पहिला घटक म्हणून त्यांना १९१५ सालीं यांनीं अर्पण केली.

१९०७ सालीं कर्नल आल्कॉट दिवंगत झाल्यावर थिऑसॉफिकल सोसायटीच्या या अध्यक्ष झाल्या. सोसायटीचें आद्यपीठ अड्यार-आश्रमाचे संवर्धनास सुरुवात करून अडीचशें एकर आश्रमाचा व्याप यांनीं वाढविला. तेथें छापखाना, ग्रंथविक्रीचें दुकान, विद्युद्दीप, वसतिगृहें वगैरेंची व्यवस्था केली. या स्थानास या गुरुदेवांचा आश्रम म्हणत. यांनीं १९०९ सालीं पृथ्वीपर्यटणास निघून जगद्गुरूंच्या आगमनाची घोषणा केली. जे. कृष्णमूर्ती व यांची भेट झाली, तेव्हां ते चवदा वर्षांचे होते.

१९१३ सालीं यांनीं हिंदी राजकारणांत प्रवेश केला. Wake up India या विषयावर मद्रास येथें व्याख्यानमाला गुंफून कॉमनवील नांवाचें एक साप्ताहिक काढलें. इंग्लंडला जाऊन हिंदी स्वराज्यावर व्याख्यानें दिलीं. १९१४ सालीं या हिंदुस्थानांत परत आल्या. मद्रास स्टँडर्ड हें दैनिक खरेदी करून त्याला न्यू इंडिया हें नवीन नामाभिधान दिलें. हिंदी स्वराज्याची घोषणा करून मवाळजहालांचा समेट घडवून आणला. ४ ऑगस्ट १९१४ ला पहिलें महायुद्ध सुरू झालें. युद्धकालांत कॉंग्रेस भरवावी किंवा नाहीं असा प्रश्न उपस्थित झाला असतां इतर वसाहतींप्रमाणें स्वराज्याची मागणी करण्याची हीच वेळ आहे असें प्रतिपादून यांनीं मद्रास कॉंग्रेसमध्यें होमरूलचा ठराव मान्य करून घेतला. सर्व हिंदुस्थानभर प्रचार करून १९१६ सालीं होमरूललीग स्थापन केली. लखनौ राष्ट्रसभेंत हिंदु-मुसलमान पुढाऱ्यांची एकमुखी मागणी करण्यांत यश मिळविलें. भारतमंत्री मॉंटेग्यु हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांना स्वराज्य शिष्टमंडळें भेटविलीं. मद्रास पार्लमेंट संस्था काढून पार्लमेंटरी पद्धतीचा लोकांना परिचय करून दिला. या यांच्या कामगिरीमुळें १९१७ च्या कलकत्ता राष्ट्रसभेचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें. येथून पुढें मात्र हिंदुस्थानानें इंग्लंडपासून अलग होण्याची भाषासुद्धां बोलूं नये असें यांचें धोरण झाल्यानें या लोकांना अप्रिय होत चालल्या. असहकारितेची व कायदेभंगाची चळवळच यांना अनिष्ट वाटली. 'कॉमनवेल्थ ऑफ इंडिया' कायदा पार्लमेंटकडून मान्य करून घेण्याचा यांनीं प्रयत्न केला. पण राष्ट्रसभेंत त्याला अनुमोदकसुद्धां मिळाला नाहीं (१९२५).

अड्यार येथें यांचें देहावसान झाल्यावर यांच्या देहाला अग्निसंस्कार देण्यांत आला. यांच्या अस्थि द्वारकानाथपंत तेलंग यांनीं काशीस नेल्या. तेथें त्यांची मिरवणूक काढून बाबू भगवानदास यांच्या हस्तें गंगेच्या मध्यांत विसर्जन करण्यांत आल्या. अड्यार आश्रमांत यांची रक्षा समुद्रकांठाजवळ 'गार्डन ऑफ रिमेम्ब्रन्स' या सप्तदलांकित पद्माकृति उद्यानांत पात्रांत भूमिगत ठेविली आहे. याच ठिकाणीं लेट्बीटर यांचीहि रक्षा ठेविली आहे. ब्लॅव्हॅट्स्की बाईंच्या पश्चात् थिऑसफीच्या अन्तःशाखेच्या या अखेरपर्यंत प्रमुख होत्या. ब्रिटिश म्युझियम लायब्ररींत यांनीं केलेल्या ३३० पुस्तकांची नोंद आहे. याशिवाय यांनीं कितीतरी नियतकालिकें चालविलीं. प्रचार आणि संघटना कशी करावी हें यांच्यापासून शिकावें.

यांनीं धर्म, समाज व तत्त्वज्ञान यांकडे पाहण्याची अगदीं नवी दृष्टि उत्पन्न केली. यांच्या आस्तिक्यबुद्धींत मूलसंशोधनाची दृष्टि असे आणि या आधुनिक शास्त्रांच्या साहाय्यानें जुन्या आचारविचारांचा जो उलगडा करीत त्यामुळें यांच्याबद्दल आधुनिक लोकांत विलक्षण आदर उत्पन्न होई. यांच्यांत विलक्षण संघटनाशक्ति होती आणि यांच्या लेखनभाषणांतील आकर्षकपणाला तोड नसे. चिकित्सा आणि भाविकता यांचा चमत्कारिक मेळ यांच्यांत आढळे. त्यामुळें यांच्या अनुयायांत जगाच्या सर्व भागांतून लोक ओढले गेले.

कार्याचा प्रचंडपणा, अलौकिकता, संघटनाचातुर्य व निग्रह वगैरेमुळें जगांतील अद्वितीय माणसांत यांची गणना होते.

बेलवलकर, रा. ब. डॉ. श्रीपाद कृष्ण— (जन्म स. १८८०) सुप्रसिद्ध संस्कृत पंडित, प्राच्यविद्यासंशोधक व महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीचे मुख्य संपादक.

यांचें शिक्षण राजाराम हायस्कूल व कॉलेज, कोल्हापूर आणि डेक्कन कॉलेज, पुणें येथें झालें. बी. ए. (१९०२); दक्षिणा फेलो १९०२ ते १९०४; एम्. ए. (१९०४; १९०५; १९१०)—भाषा, इतिहास व अर्थशास्त्र आणि तत्त्वज्ञान अशा भिन्न विषयांत मुंबई युनिव्हर्सिटीच्या एम्. ए. परीक्षेंत उत्तीर्ण होण्याचा मान यांनींच प्रथम मिळविला. अमेरिकेच्या हार्वर्ड विश्वविद्यालयांत सुप्रसिद्ध डॉ. लॅन्मन यांचेजवळ (१९१२-१४) यांनीं उच्च संशोधनाचें अध्ययन करून आपल्या उत्तररामचरितावरील प्रबंधाबद्दल पीएच्. डी. ही पदवी संपादन केली. अमेरिकेस जाण्यापूर्वी कांहीं वर्षे (१९०७-१९१२) डेक्कन कॉलेजांतील हस्तलिखित-संग्रहावर क्यूरेटर म्हणून यांनीं काम केलें, व त्याच वेळीं या संग्रहाच्या कॅटलॉगाचा प्रथम भाग यांनीं छापण्यास दिला व संस्कृत भाषेच्या निरनिराळ्या व्याकरणांवर (Systems of Sanskrit Grammar) एक निबंध लिहून मंडलिक सुवर्णपदक मिळविलें. अमेरिकेंतून परत आल्यावर डेक्कन कॉलेजांतच यांची संस्कृत प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली (१९१५), व तेव्हांपासून डेक्कन कॉलेज कांहीं सरकारी अधिकाऱ्यांच्या कारवाईनें बंद पडेपावेतों तेथेंच काम केलें. पुढें डेक्कन कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांची संघटना करून नेक नामदार बॅरिस्टर मुकुंदराव जयकर यांच्या कायदेपटुत्वाच्या जोरावर सुसरीनें गिळलेलें हें डेक्कन कॉलेजरूपी माणिक परत मिळविण्याचा विक्रम मुख्यतः यांच्याच प्रयत्नानें सिद्धीस गेला. सेवानिवृत्त होण्यापूर्वी कांहीं महिने यांना अहमदाबादच्या गुजराथ कॉलेजमध्यें प्राध्यापकाचें काम करावें लागलें आणि सेवानिवृत्तीनंतर ३ वर्षे हिंदु विश्वविद्यालय, बनारस येथेंहि यांनीं संस्कृत प्राध्यापकाचें काम केलें.

अमेरिकेहून परत आल्यावर ज्या एका महत्त्वाच्या कामाचा इतर सहव्यवसायांसमवेत यांनीं उपक्रम केला तें म्हणजे भांडारकर प्राच्य विद्यासंशोधनमंदिराची स्थापना. या संस्थेचा उद्घाटनसमारंभ ६ जुलै १९१७ रोजी गुरुवर्य डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या ८१ व्या वाढदिवशीं झाला. तत्पूर्वी २ वर्षे व नंतर ६ वर्षे यांनीं सदर संस्थेच्या ऑनररी सेक्रेटरीचें काम केलें होतें, व संस्थेच्या कार्यकारिणीवर यांची सतत नेमणूक होत आली आहे. किंबहुना या प्राच्यविद्यासंशोधनमंदिराचे हे बहिश्चर प्राण होत असें म्हणणें मुळींच अतिशयोक्तीचें होणार नाहीं. भांडारकर इन्स्टिट्यूट प्रसिद्ध करीत असलेल्या महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीशीं यांचा आरंभापासून निकट संबंध होताच, व एप्रिल १९४३ पासून त्या आवृत्तीच्या मुख्य संपादकाचें कामहि यांच्यावर पडलें आहे. पुण्यांतील–'पुणें संस्कृत कॉलेज'च्या स्थापनेशीं व कार्याशींहि यांचा घनिष्ठ संबंध आहे.

ऑल-इंडिया ओरिएंटल कॉन्फरन्सचें पहिलें अधिवेशन पुणें येथें १९१९ च्या डिसेंबरांत झालें. तेव्हांपासून कॉन्फरन्सच्या प्रत्येक अधिवेशनांत यांनीं भाग घेतला आहे. बरींच वर्षे हे या कॉन्फरन्सचे सेक्रेटरी होते व १९४३ सालच्या बनारस येथें भरलेल्या कॉन्फरन्सच्या जनरल प्रेसिडेंटचा बहुमान यांना मिळाला.

संशोधन व लेखन हाच यांचा प्रधान व्यवसाय असल्यानें यांनीं संशोधन करून इंग्रजी भाषांतर व टिप्पणीसह प्रसिद्ध केलेलें उत्तररामचरित, काव्यादर्श, वेदान्तसूत्रभाष्य, भगवद्गीता इत्यादि ग्रंथ व शाकुन्तल, मृच्छकटिक, उपनिषदें, वेद, सांख्य, भगवद्गीता इत्यादि ग्रंथांवर लिहिलेले ४०।५० निबंध यांमुळें यांचें नांव हिंदुस्थानाबाहेरील प्राच्यविद्याविशारदांमध्यें परिचित झालेलें आहे. प्रा.रामचंद्र दत्तात्रेय रानडे यांच्या सहकार्यानें 'हिस्टरी ऑफ इंडियन फिलॉसफी' ही ८ भागांत पुरी होणारी ग्रंथश्रेणी यांनीं प्रसिद्ध करण्याचा संकल्प केला असून आजवर त्यांपैकीं २ भाग प्रसिद्ध झाले आहेत. महाभारताच्या चिकित्सक आवृत्तींतील भीष्मपर्व (पृष्ठसंख्या ८०० वर) हा भाग प्रसिद्ध झाला असून त्यानंतर यांनीं तीन भागांत पुढ्या होणाऱ्या शांतिपर्वाचें संशोधन कार्य यांनीं हातीं घेतलें.

बेवूर, सर-गुरुनाथ व्यंकटेश—(जन्म स. १८८८) हिंदुस्थान सरकारच्या पोस्ट ॲन्ड टेलिग्राफ खात्याचे (माजी) प्रमुख.

हे मूळचे विजापूर जिल्ह्यांतील बागलकोटचे. पुण्याच्या डेक्कन कॉलेजांतून बी. ए. झाल्यानंतर हे उच्च शिक्षणासाठीं इंग्लंडला रवाना झाले व केम्ब्रिजच्या सिडने ससेक्स कॉलेजांत आपलें पुढील अध्ययन पुरें करून हे बी. ए., आय. सी. एस. झाले.

हिंदुस्थानांत परत आल्यानंतर यांनीं कांहीं दिवस मध्यप्रांत सरकारचे अंडर सेक्रेटरी म्हणून काम केलें.

यानंतर कांहीं दिवस चांदा व नागपूर येथें डे. कमिशनरचें काम केल्यानंतर यांची सरकारच्या पोस्ट खात्याकडे बदली झाली. प्रथम बिहार, ओरिसा, मध्यप्रांत व मुंबई या प्रांतांचे पोस्टमास्तर जनरल म्हणून काम करण्यास सुरुवात करून पोस्ट खात्याचे डायरेक्टर जनरल वगैरे अनेक जागीं यांनीं कामें केली. निवृत्तीच्या वेळीं हे हिंदुस्थान सरकारच्या पोस्ट व तारखात्याचे प्रमुख होते (१९४२-४६). सरकारी नोकरींतील आपल्या कार्यनिवृत्तीनंतर टाटा सन्स लि.नें यांना आपल्या उद्योगधंद्यांतील साहाय्यक म्हणून यांची नेमणूक केली आहे (१९४६).

हिंदुस्थानसरकारच्या पोस्ट खात्याचे प्रतिनिधि म्हणून हे एअर मेल कॉंग्रेस (१९२७, हेग); युनिव्हर्सल पोस्टल कॉंग्रेस (१९२९, लंडन) व इंपीरियल टेलिग्राफ कॉन्फरन्स(१९३७, लंडन; १९४२ कॅनबेरा)ला हजर राहिले होते.

मध्यंतरीं कांहीं दिवस संरक्षण खात्याचे ॲडिशनल सेक्रेटरी म्हणूनहि यांची नेमणूक झाली होती (१९४१-४२).

बेंडॉल, सेसिल—(जन्म स. १८५६) सुप्रसिद्ध संशोधक.

यांचें शिक्षण लंडन व केंब्रिज येथें झालें. संस्कृत-भाषेचे ज्ञाते व ब्रिटिश म्युझियमच्या प्राच्य विभागाचे हे अध्यक्ष होते. यांनीं बौद्ध धर्माच्या प्राचीन ग्रंथांच्या शोधार्थ नेपाळमध्यें प्रवास केला व तेथें अनेक अज्ञात ग्रंथांचा शोध लावला. राजपुतान्यांत जयपूर, उदेपूर, चितोड वगैरे ठिकाणीं याच उद्देशानें यांनीं प्रवास केला. यांनीं आंबेरच्या सूर्यमंदिरावरील प्राचीन शिलालेख (वि. सं. १०११) व आहाडचा शक्तिकुमारचा शिलालेख यांचा शोध लावला. शिवाय 'Journey of Literary and Archæological Research in Nepal and Northern India' (1918) हें पुस्तक चित्रासहित प्रसिद्ध केलें.

बेन्द्रे, दत्तात्रेय रामचंद्र—(जन्म स. १८९६ जाने. ३१) कानडी भाषेंतील सुप्रसिद्ध कवि व अभ्यासक.

जात चित्पावन ब्राह्मण. यांचें मूळ ठिकाण सांगली संस्थानांतील शिरहट्टी असलें तरी यांचें जन्मस्थान धारवाड. तेथें यांचें माध्यमिक शिक्षण होऊन हे पुणें येथें बी. ए. झाल्यावर धारवाडच्या व्हिक्टोरिया हायस्कुलांत आजीव शिक्षक झाले. पण असहकारितेच्या चळवळींत यांनीं राष्ट्रीय शाळा काढून तेथें शिक्षक म्हणून हे काम करूं लागले. एम्. ए. झाल्यावर प्रथम पुणें व पुढें सोलापूरला हे कानडीचे प्राध्यापक झाले.

यांनीं विसाव्या वर्षापासून कानडींत कविता करण्यास सुरुवात केली. यांचें कानडी, मराठी, संस्कृत व इंग्रजी ग्रंथांचें वाचन चांगलें आहे. यांची भाषा लालित्यपूर्ण व नादवती आहे. हे कांहीं काल 'स्वधर्म' व 'जय कर्नाटक' यांचे संपादक होते. कन्नड साहित्य-संमेलन, शिमोगा (१९४३) व कन्नड कविसंमेलन, म्हैसूर यांचे हे अध्यक्ष होते. यांच्या जीवनाचें सार–' रसवे जनन विरस मरण। समरसवे जीवन (दिव्य रसीं विरणें जीव। जीवन हें त्याचें नांव) हें आहे. यांचा गुणगौरव म्हणजे कविता देवीचा गौरव व यांचा जन्मदिनोत्सव म्हणजे नव कर्नाटकाचा जन्मदिनोत्सव होय. इतकी अनन्यश्रद्धा यांनीं आपल्या वाचकवर्गांत संपादन केली आहे.

यांच्या मनाचा कल तत्त्वज्ञानाकडे असून हे बाबू अरविंद घोष यांना गुरुमाऊली मानतात.

यांचें वाङ्मय—काव्यसंग्रह–१ कृष्णाकुमारी, २ गरी, ३ मूर्ति, ४ उय्याले, ५ सखीगीत, ६ मेघदूत, ७ गंगावतरण यांपैकीं सखीगीत तरुणांना अत्यंत प्रिय आहे. नाट्यग्रंथ–८ नगेय होगे, ९ उद्धार, १० हुव्वाड गळु, टीका–११ साहित्य मत्तु विमर्श, १२ साहित्य-संशोधन, १३ कन्नड साहित्य विराट स्वरूप, १४ विचार-मंजरी, अनुवाद–१५ उपनिषद्रहस्य (रंगराव दिवाकर व शं. वा. जोशी सहकार्य), १६ भारतीय नवजन्म.

यांची कानडी कविता (अनुवादक–पु. मं. लाड)

भृंगद बन्नेरी बंतु	भृंगपृष्ठि बसुनि येत
कल्पना विलासा।	कल्पनाविलास
मसेद गाळि पक्क	पवन पंख आदळतां
पडेयुतित्तु सहजप्रासा	उठे सहज प्रास
मिंचि मायवागु तित्तु	झळकोनी झांकोळे
ओदु मंदहासा ॥	एक मन्दहास
एनु एनु ? जेनु जेनु ?	काय वदूं ? हाच मधु ?
एने गुं गुं गाना	स्फुरे गुं गुं गान
ओंकारद शंखनादकिंत	शंखनादि ओंकारा–
किंचिदूना	हून किंचिदून
कविय एकतानकवन	एकतान कवनीं की
दंते नादलीना	कवी नादलीन

ओडल नूलिनेंद नेयुवंते कोळी कीं उदरीचे
जेउ जाला रची दोन जाळी
तन्नदैवरेषे बरे युवंते दैवाच्या रेषानीं
ताने भाला लिही विधी भाळीं

बैरामजी, जीजीभाई—(जन्म स. १८२२–मृत्यु स. १८९०) मुंबई प्रांतांतील सुप्रसिद्ध धनिक व दाते.

बॉम्बे स्टीम नॅव्हिगेशन कंपनीचे जीजीभाई दादाभाई यांचे हे चिरंजीव. लहानपणींच हे वडिलांच्या धंद्यांत पडले व लवकरच हे मुंबई इलाख्यांतील 'मर्चन्ट्स प्रिन्स' म्हणून ओळखले जाऊं लागले. मुंबईच्या पहिल्या फायर इन्शुअरन्स कंपनीच्या स्थापनेंत जे. ए. फोर्ब्स यांचे हे सहकारी होते.

मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत टॉल्स फीज ॲक्ट, कास्ट फेस्टिबल टॅक्स ॲक्टविरुद्ध यांनीं धडाडीनें प्रचार केला. जर पैसे पाहिजे असतील तर ते लोकांच्या अन्नांतून घेऊं नका, दारूवर टॅक्स बसवून मिळवा, या यांच्या रोखठोक सवालामुळें हे सर्वत्र लोकप्रिय झाले.

अहमदाबादच्या व पुण्याच्या सरकारी मेडिकल स्कूलनां यांनीं दिलेल्या देणग्यांमुळें यांचें नांव त्या संस्थांना देण्यांत आलें. आतां पुण्याच्या मेडिकल स्कूलचें कॉलेजांत रूपांतर करण्यांत आल्यानंतरहि यांचेंच नांव कायम ठेवण्यांत आलें. मृत्यूपूर्वी यांनीं करून ठेवलेल्या साडेतीन लक्ष रु.च्या ट्रस्टमधून प्रथम एक हायस्कूल व नंतर कॉमर्स कॉलेज (हिंदुस्थानांत पहिलें) काढण्यांत आलें.

बोकील, विष्णु विनायक—(जन्म स. १९०० सुमार) मराठीतील सुप्रसिद्ध लघुकथालेखक व कादंबरीकार.

हे मूळचे सासवडचे राहणारे. मुंबई युनिव्हर्सिटीचे बी. ए., बी. टी. झाल्यानंतर यांनीं पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयांत शिक्षकाची नोकरी पत्करली.

यशवंत मासिकांत प्रसिद्ध झालेल्या 'बेबी' या दीर्घकथेनें हे प्रथम वाचकांच्या डोळ्यांसमोर आले व वळवाचे पाऊस, बोकिलांच्या गोष्टी यांसारख्या लघुकथासंग्रहांनीं व झंझावात, मंगळागौरीच्या रात्री यांसारख्या कादंबऱ्यांनीं यांनीं आपलें नांव लेखक म्हणून पक्कें केलें.

मराठी भाषेंतील अगदीं नव्या पिढींतील लेखकांत यांची गणना होते. महाराष्ट्रांतील मध्यमवर्गाच्या भावनांचें सूक्ष्म विश्लेषण करण्याबद्दल यांची विशेष प्रसिद्धी आहे. याच कारणानें सूक्ष्म दृष्टि व व्यवहार्यतेपासून दूर न ढळणारी लेखणी ह्याच गोष्टी यांच्या वैशिष्ट्य झाल्या आहेत.

मुख्यतः गंभीर लेखक अशी यांची प्रसिद्धी असली तरी अलिकडे यांनीं केलेल्या लिखाणामुळें विनोद या नव्या क्षेत्राचा लाभ यांना झाला आहे. रिचमल क्रॉम्प्टनच्या 'विल्यम 'वर आधारलेली यांची 'वसंत' ग्रंथमालेची उभारणी तर संपूर्णतया विनोदावर केली आहे.

समाजांतील विशिष्ट थराचें यथार्थतेनें चित्रण करण्याच्या बाबतींत हे किंवा य. गो. जोशी, ग. ल. ठोकळ, द. र. कवठेकर, र. वा. दिघे वगैरे लोकांकडे मराठी वाचकांचें लक्ष विशेष अपेक्षेनें केंद्रित झालें आहे.

बोस, आनंदमोहन—(जन्म स. १८४६–मृत्यु स. १९०६ ऑगस्ट) राष्ट्रसभेचे अध्यक्ष व ब्राह्मसमाजांतील एक थोर पुरुष.

हे अतिशय बुद्धिमान् असल्यानें प्रेमचंद रायचंद स्कॉलर, म्हणून इंग्लंडला गेले व हिंदुस्थानांतील पहिले रँग्लर व नामांकित कायदेपंडित होऊन परत आले. यांची उत्कट देशभक्ति यांच्या व्याख्यानापेक्षां रोजनिशींत दिसून येते. सात्विक वृत्ति आणि राजकारणी वृत्ति यांचा उत्कृष्ट मेळ यांच्यांत आढळे. यांस बंगालचे म. गो. रानडे असें म्हणत. हे कलकत्त्याच्या बंगाल असोसिएशनचे पहिले सेक्रेटरी (१८७६) व मद्रासच्या राष्ट्रसभेचे अध्यक्ष होते (१८९८).

भारतवर्षीय ब्राह्मसमाजांतून साधारण ब्राह्मसमाज निघाला. तेव्हां आरंभीं हे या फुटीच्या विरुद्ध होते पण ही गोष्ट अपरिहार्य झाल्यावर हे त्याचे शेवटपर्यंत अध्यक्ष होते.

बंगालच्या फाळणीविरुद्ध असणारी बंगाली भावना व्यक्त करण्यासाठीं उभारण्यांत आलेल्या फेडरेशन हॉलचा कोनशिला समारंभ यांच्या हस्तें झाला त्या वेळीं प्रकृति अस्वास्थ्यामुळें यांना स्ट्रेचरवरून आणण्यांत आलें व त्याच ठिकाणीं अत्यवस्थ होऊन हे मृत्यूमुखीं पडले.

बोस, काली—(जन्म स. १९११) नृत्यकलाविशारद.

यांचे वडील के. एन्. बोस बंगालमध्यें मोठ्या हुद्यावर होते. कॉलेजमध्यें एक वर्ष शिक्षण घेतल्यावर बंगाल, दिल्ली व पंजाबमधील अनेकांकडून यांनीं नृत्यशिक्षण घेतलें. बंगाली जानपद व उत्तरेकडील विदग्ध (कथ्थक) हें यांचें वैशिष्ट्य आहे. त्यांत यांनीं स्वतःचें वैशिष्ट्य निर्माण केलें आहे. त्यांत अनुक्रमें यांच्या पुतणी व शिष्या निरा व हिरा बोस यांचें यांना साहाय्य असतें. महाराष्ट्रांतील औंधच्या राजकन्यांना यांनीं सहा महिने नृत्यशिक्षण दिलें. प्रभातच्या 'शेजारी' चित्रपटांतील नृत्यें यांनीं बसविलीं आहेत.

यांनीं नृत्यकलेवरील अनेक पुस्तकांचा बारकाईनें अभ्यास केलेला आहे. मद्रासला प्रसिद्ध झालेलें 'ताण्डव-लक्षणम्' हें इंग्रजी भाषान्तरासह प्रसिद्ध झालेलें पुस्तक या विषयावरील पुस्तकांत सर्वोत्कृष्ट आहे असें यांचें मत आहे. यांची पूजा, बगीचा, पुष्पवाटिका वगैरे नृत्यें वस्तूंचें यथातथ्य चित्र उभें करण्याच्या दृष्टीनें उत्कृष्ट आहेत.

बोस, खुदीराम—(जन्म स. १८९० सुमार–फांशी स. १९०८ ऑगस्ट) बंगाल्यांतील बाँब फेकून अत्याचार करणारे पहिले क्रान्तिकारक.

१९०८ एप्रिल ३० रोजीं रात्रीं ८ वाजतां यांनीं मुझफरपूरचे डि. जज्ज मि. किंग्जफोर्ड यांचे घरासमोर बाँब फेकला. मि. किंग्जफोर्ड यांच्यावर हल्ला करण्याचा मूळचा बेत. पण चुकीच्या समजुतीनें बाँब केनेडीबाईंच्या गाडीवर फेकला गेला आणि त्या बाई मुलीसह मेल्या.

याच कटाच्या खटल्यांतील पब्लिक प्रॉसिक्युटर (१९०९ फेब्रु.) व डेप्युटी सुपरिं. ऑफ पोलीस (१९१० जानें.) यांचाहि खून करण्यांत आला.

हे स्वतःच पोलिसच्या स्वाधीन झाले. पण त्याच वेळीं आणखीहि कांहीं ठिकाणीं बाँब उडाले. त्यावरून माणिकतोळा बाग बाँब व अलीपूर कटाचा सुगावा लागला. या कटाचे पुढारी अरविन्द घोषांचे बंधु बारीन्द्रकुमार होते. या कटांत नरेन्द्रनाथ गोस्वामी, सत्येन्द्रनाथ बोस, कन्हय्यालाल दत्त, नगेन्द्रनाथ सेनगुप्त, अशोक नंदी, विजयराम सेन, मोतीलाल घोष, उल्हासकर दत्त, प्रफुल्लचंद्र चक्रवर्ति वगैरे लोक होते. हेमचंद्र दास हे यांच्यापैकीं बाँब तयार करणारे होते.

बोस, सर जगदीशचंद्र—(जन्म स. १८५८ मे ३०–मृत्यु स. १९३७ नवं. २३) आंतरराष्ट्रीय कीर्तीचे हिंदी वनस्पतिशास्त्रज्ञ व जगप्रसिद्ध संशोधक.

विक्रमपूर जिल्ह्यांतील राणीखल हें गांव यांचें जन्मस्थान. यांच्या वडिलांचें नांव भगवानचंद्र. कलकत्ता सेंट झेवियर स्कूल व सेंट झेवियर कॉलेजमध्यें आपलें शिक्षण संपवून हे उच्च शिक्षणासाठीं परदेशीं रवाना झाले. हिंदुस्थानांत असतांनाच यांना फादर ई. लिफॉन्ट यांच्या प्रेरणेनें संशोधनांत गोडी लागली होती. इंग्लंडमध्यें गेल्यानंतरहि यांनीं आपली तीच अध्ययन-शाखा पुढें चालू ठेवली.

इंग्लंडमध्यें प्रथम यांचा विचार डॉक्टर होण्याचा होता. परंतु मलेरियानें आधींच क्षीण झालेल्या यांच्या प्रकृतीला तो अभ्यास झेपेना. तेव्हां हे लंडनच्या खाइस्ट चर्च कॉलेजांतून विज्ञान, रसायन व वनस्पतिशास्त्र यांची पदवी मिळवून हिंदुस्थानला परतले. हिंदुस्थानांत आल्यानंतर लॉर्ड रिपन यांच्या शिफारशीवरून यांना कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांत फिजिकल सायन्सच्या प्राध्यापकाची जागा देण्यांत आली (१८८५-१९१५). पुढें इंडियन एज्युकेशनल सर्व्हिसमध्यें कांहीं दिवस काम केल्यानंतर हे कार्यनिवृत्त झाले.

यांच्या उत्तर आयुष्यांत मुख्यतः वनस्पतिशास्त्रज्ञ म्हणून यांची प्रसिद्धि झाली असली तरी यांचें सुरवातीचें संशोधन इलेक्ट्रिसिटीमधील आहे. इलेक्ट्रो मॅग्नेटिक वेव्हजचा यांनीं शोधून काढलेला संचायक सुटसुटीतपणाबद्दल प्रसिद्ध असून पॉईंकेरच्या पाठ्य पुस्तकांत व एनसायक्लोपीडिया ब्रिटानिकांतील जे. जे. थॉम्पसनच्या लेखांत त्याचा उल्लेख करण्यांत आला आहे. नेमॅलाइटच्या मदतीनें बिनतारी संदेश पाठविण्याची यांची पद्धति व त्यावरूनच यांनीं पुढें संशोधिलेली Molecular Stress and Strain Theory हि अशीच महत्त्वाची आहे.

परंतु इंग्लंडमधील रॉयल सोसायटीच्या असहकारामुळें ही महत्त्वाची संशोधनशाखा यांना सोडावी लागली व हे वनस्पतिशास्त्राकडे वळले. रेडिओंतील ध्वनिग्राहक भांड्यांनासुद्धां दीर्घकाल वापरल्यानंतर शीण येतो व थोड्या विश्रान्तीनंतर तो जातो असें लक्षांत आल्यानंतर यांनीं अचेतन व प्राणी यांमधील साम्याचे अध्ययनास सुरवात केली. सचेतन व अचेतन अशा पदार्थांच्या जीवनांतील मूलभूत तत्त्वें एकच आहेत, या कल्पनेपासून सुरवात करून वनस्पतिजीवनांत प्राण्यामधील स्नायु, मज्जातंतु इत्यादींच्या जागीं काम करणाऱ्या पद्धती यांनीं शोधून काढल्या व पुढें आपल्या नव्यानव्या उपकरणांनीं जगाला थक्क केलें. अति-

सूक्ष्मता व अचूकता हा यांच्या या सर्व उपकरणांचा विशेष आहे.

थंडी, प्रकाश, विद्युत्, उष्णता या सर्वांचा प्राणी व वनस्पति यांवर होणारा परिणाम सारखाच असतो हें यांचें प्रमुख संशोधन आहे. यासाठीं यांनीं डायमेट्रिकल कॉन्ट्रॅक्शन ॲपेरेटस व रेझोनन्ट रेकॉर्डर हीं दोन उपकरणें तयार केलीं. यांपैकीं रेझोनन्ट रेकॉर्डर तर विशेष महत्त्वाचा असून सेकंदाच्या हजाराव्या भागाचेंसुद्धां अचूक मापन त्यामुळें शक्य होतें.

यानंतर यांनीं वनस्पतिजीवन व प्राणिजीवन यांमधील 'नाडी' व्यवस्थेंतील साम्य दाखविलें. प्राण्यांमध्यें नाडी हृदयाच्या अनुरोधानें चालते तर वनस्पतींमध्यें ती प्रकाशाच्या रोखानें चालते; प्रकाश कमीअधिक झाला तर नाडीची गतिहि कमीजास्त होते हें यांनीं ऑस्सिलेटिंग रेकॉर्डरच्या साहाय्यानें सिद्ध केलें.

परंतु यापेक्षांहि वनस्पतिजीवनांत रुधिराभिसरणाचे धर्तीवरच ही नाडीसंस्था कार्य करिते, अन्नाची नेआण व निरुपयोगी वस्तूंचा निचरा हीं सर्व कार्यें वनस्पति-जीवनांतील ही कार्यपद्धति पार पाडते हें यांचें महत्त्वाचें संशोधन होय.

आपल्या या संशोधनाचें कार्य आपल्या कल्पनेप्रमाणें पुढें चालविण्याच्या हेतूनें सरकारी नोकरींतील आपल्या कार्यनिवृत्तीनंतर यांनीं कलकत्त्याच्या अप्पर सर्क्युलर रोडवर 'बोस रिसर्च इन्स्टिटयूट'ची स्थापना केली (१९१७ नवं. ३०) व त्याच्या पुढच्याच वर्षी 'ट्रॅन्सॅक्शन्स ऑफ बोस इन्स्टिटयूट' हें पत्र सुरू करून या संस्थेच्या संशोधित कार्याला कायमपणा आणून देण्याचा प्रयत्न केला.

या संस्थेचें सभागृह, आंगण व सभोवतालची प्रयोग-शाळा यांची मांडणी प्राचीन भारतीय वास्तुशास्त्राला अनुसरून करण्यांत आली आहे. संस्थेच्या मुख्य दर-वाजावर हिंदु पद्धतीचें कोरीव काम करण्यांत आलें असून दोन दारांवर दोन लता कोरण्यांत आल्या आहेत. प्रवेशद्वारांच्या वरच्या बाजूला अशोककालीन आंमलक-फल कोरण्यांत आले आहे. सभागृहाच्या तक्तपोशीवर अजिंठा लेण्यांतील पूर्णविकसित कमलाची आकृति असून भिंतीवरील चित्रें श्री. नंदलाल बोस यांनीं काढलेलीं आहेत. सभागृहाच्या मुख्य भिंतीवर खालील शब्दांत यांनीं आपली संस्था परमेश्वरचरणीं अर्पण केली आहे:—

भारत गौरव ए जगतेर
कल्याण कामनार
देवचरणे निवेदन करिलाम
श्री जगदीश बसु
ता. ३०-११-१७, १४ आग्रहायण १३२४.

दार्जिलिंग व गंगा कांठावरील सेजबारिया येथेंहि वनस्पतीवर संशोधन करण्यासाठीं यांनीं या संस्थेच्या शाखा उघडल्या. यांपैकीं दार्जिलिंगची मायापुरी संशोधन शाळा व वच्छराज प्रयोगशाळा विशेष प्रसिद्ध आहेत.

नव्या संशोधनाला आवश्यक असणारें वातावरण देशी किंवा विदेशी युनिव्हर्सिटींत सध्यां असत नाहीं; ज्ञानाच्या उपासनेपेक्षां पदवीच्या उपासनेकडे सर्व ठिकाणीं लक्ष पुरविलें जातें; अशा स्थितींत नालन्दा, तक्षशीला, कान्जीवरम् इत्यादि प्राचीन विद्यापीठांचे धर्तीवर फक्त ज्ञानाची उपासना करण्याचे हेतूनें ही संस्था आपण काढली असे उद्गार यांनीं संस्थेच्या सुर-वातीला काढले. त्या दृष्टीनें नव्या संशोधनाची बाह्य जगाला कल्पना आणून देण्याच्या दृष्टीनें हे व यांचे विद्यार्थी वेळोवेळीं व्याख्यानें देत.

काव्य व शास्त्र यांचा कांहीं विशेष संगम यांच्यांत आढळे. हिंदुस्थानांत वनस्पतींसंबंधीं रूढ असणाऱ्या प्राचीन कल्पना व आपली शास्त्रदृष्टि यांचा सुंदर मेळ घालून यांनीं आपल्या संशोधनाचा पसारा मांडला व कवीलाहि अतर्क्य वाटणाऱ्या कल्पना व्यवहारांत उतरवून साऱ्या जगाला थक्क केलें. रात्रीं बारा वाजतां झोपीं जाऊन सकाळीं उठल्यानंतर इतर प्राण्यांप्रमाणें व्यवहार करणारें, वायुमय अन्न पचविणारें व दारू प्याल्यानंतर झिंगणारें झाड यांनीं प्रथमच जगासमोर उभें केलें व प्रा. म्युलिस्क, होरेस ब्राउन अशा शास्त्रज्ञां-बरोबरच बर्नार्ड शॉ, गॅल्सवर्दी, रोमॉरोलॉ अशा सरस प्रतिभावंतांकडून वाहवा मिळविली. इंडियन सायन्स कॉंग्रेस (१९२७) व बंगाल साहित्य परिषद, मैमन-सिंगचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें (१९११).

यांच्या या संशोधनाचे हिंदी संशोधकांवरील परि-णामहि असेच दूरगामी ठरले. यांच्यापासून स्फूर्ति घेतलेल्या तरुण संशोधकांची एक नवीनच पिढी हिंदु-स्थानांत तयार झाली व तिनें यांनीं ठोठावून उघडावयास भाग पाडलेल्या आंतरराष्ट्रीय दरवाजांतून आपल्या संशोधनास जागतिक मान्यतेचा शिक्का प्राप्त करून घेतला.

या सर्व कार्यांत यांनीं दाखवलेली राष्ट्रीय वृत्ति तर विशेष अभिनंदनीय असे. हीं सर्व यंत्रें 'हिंदुस्थानांत' तयार झाल्याचें हे परदेशांत मोठ्या अभिमानानें सांगत. आपले महत्त्वाचे ग्रंथहि यांनीं 'आपल्या देशबांधवांना' अर्पण केले, इतकेंच काय पण आपल्या मूल्यवान यंत्रांचीं पेटंटस् न घेतां तीं व आपलें बोस इन्स्टिटयूट यांनीं राष्ट्रार्पण केलें. आपल्या इन्स्टिटयूटवर दधीचि ऋषींच्या हाडांचें वज्र कोरण्यांतहि दधीचीप्रमाणें यांनीं अंगीकृत कार्यासाठीं सर्वस्वाचा त्याग करण्याचाच संदेश आपल्या विद्यार्थ्यांना दिला आहे.

यांचे ग्रंथ—(1) Response in the Living and the Non-living, (2) Plant Response (1906), (3) Electro-physiology of Plants (1907), (4) Irritability of Plants, (5) Life Movements of Plants (भाग १ व २), (6) Life Movements of Plants (भाग ३ व ४), (7) The Ascent of Sap, (8) The Physiology of Photosynthesis, (9) The Nervous Mechanism of Plants, (10) The Motor Mechanisms of Plants, (11) Plant Autographs and their Revelations, (12) Tropic Movement and Growth of Plants इत्यादि.

वनस्पती जीवनावरील यांचीं प्रमुख संशोधित उपकरणें:—(1) Resonant Recorder (1911), (2) Oscillating Recorder (1914), (3) Compound Lever Crescograph (1917), (4) Magnetic Crescograph, (5) Balancing Apparatus, (6) Bubbler or Photosynthetic Recorder (1922), (7) Dimetric Contraction Apparatus (1927).

बोस, नन्दलाल—(जन्म स. १८८३ डिसें. ३) जगप्रसिद्ध बंगाली चित्रकार.

हे अवनींद्रनाथ टागोरांचे शिष्य. हे १९१९ सालापासून रवीन्द्रनाथ टागोरांच्या विश्वभारतीच्या कलाभुवनावरील मुख्य असून नूतन कलकत्ता चित्रसंप्रदायाचे एक प्रमुख पुरस्कर्ते मानले जातात. तसेंच जगांतील उत्कृष्ट चित्रकारांत यांची गणना होते.

हे रवीन्द्रनाथ टागोरांच्या बरोबर जपानला गेले तेव्हां तेथील चित्रकलेचा यांच्यावर परिणाम झाला आहे. पण तिचा उपयोग हे क्वचित् करतात.

यांची चित्रकला ही निर्मेळ भारतीय असून यांचे ठिकाणीं प्राचीन चित्रकारांचें बुद्धिवैभव, कल्पनाचातुर्य, धर्मभावना व कलमावरील प्रभुत्व हीं पूर्णपणें दिसून येतात.

यांची शिवचरित्रावरील शिवताण्डव, शिवविलाप, शिवविषप्राशन हीं चित्रें अप्रतिम असून फार प्रसिद्ध आहेत. शिवविलाप हें चित्र तज्ज्ञांच्या मतानें जगांतील अत्युत्तम चित्रांपैकीं एक असून या तोडीचीं चित्रें जगांत फारच थोडीं आहेत.

यांचें कलम अजिंठापद्धतीचें आहे. यांच्या चित्राच्या बाह्यरेषेंत जोमदारपणा असतो. यांचा फटकारा काटेतोल व बरोबरच असणार अशी खात्री देतां येते.

बोस, प्रमथनाथ—(जन्म स. १८५५-मृत्यु स. १९३४) बिहार प्रान्तांतील भूगर्भशास्त्रज्ञ.

सायन्समध्यें अनेक पदव्या मिळविल्यावर यांनीं जिऑलाजिकल खात्यांत नोकरी पत्करली. तेव्हां यांनीं रेकार्ड ऑफ जिऑलाजिकल डिपार्टमेंट ऑफ इंडियामध्यें अतिशय मोलाची भर घातली. यांचा 'हिस्टरी ऑफ हिंदु सिविलायझेशन अंडर ब्रिटिश रूल' हा महत्त्वाचा ग्रंथ तरुण वयांतच यांनीं लिहिला. हिन्दी म्हणून कर्झनशाहीत (१९०३) बढती न मिळाल्यानें यांनीं सरकारी नोकरीचा राजिनामा दिला व रांची येथें वसति केली. म्हणून लोक यांना रांचीचे भूगर्भशास्त्रज्ञ अशा नांवानें ओळखीत. यांचें फुटकळ व अपूर्ण लिखाण बरेंच आहे.

यांच्या खऱ्या कामाला सुरुवात ओरिसांतील मयूरभंज संस्थानांत भूगर्भशास्त्रज्ञ म्हणून काम करण्यास यांनीं सुरुवात केली तेव्हां झाली. स. १९०४ मध्यें गोरुमहिसानीं या ठिकाणीं यांना लोखंडाच्या खाणींचा पत्ता लागला व तसा उल्लेख यांनीं 'रेकार्ड ऑफ जिऑलाजिकल सर्व्हे' या लिखाणांत केला (१९०४). तेथेंच टाटांनीं जमशेटपूरची स्थापना करून टाटा आयर्न वर्क्स सुरू केलें. प्रथम तो कारखाना रायपूर जिल्ह्यांत संयुक्त प्रान्तांत काढण्याचा विचार होता. पण कोळसा दूर असल्यानें तें स्थान अयोग्य ठरवून यांनीं दाखविलेलें स्थान योग्य ठरविण्यांत आलें.

कलकत्त्याची 'बेंगाल टेक्निकल इन्स्टिटयूट' स्थापण्यास यांनीं फार मदत केली होती. तिचे हे पुष्कळ दिवस रेक्टर होते. बंगालच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे हे तहाहयात सभासद होते व स. १८८४ मध्यें त्या

सोसायटीच्या शंभराव्या वाढदिवसानिमित्त प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांतील शास्त्रीय विभागाचे हे संपादक होते.

बोस, राशबिहारी—(जन्म स. १८८४–मृत्यु स. १९४५) हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध क्रान्तिकारक आणि पहिल्या स्वतंत्र हिंद सरकारचे व सैन्याचे प्रमुख.

हे डेहराडून येथें सरकारी नोकर असतां पंजाबमध्यें यांनीं क्रांतिकारकांची संघटना तयार केली. या कार्यात यांना स्वामी रामतीर्थांचे एक प्रमुख शिष्य श्री. अमीरचंद यांचें साहाय्य झालें. अमीरचंदाना स. १९१२ सालीं सरकारनें अटक केली. त्यांच्या भेटीकरितां हे दिल्लीस गेले असतां यांनाहि अटक व्हावयाची. पण अमीरचंदांच्या एका धूर्त सेवकानें यांना सूचना केली, तेव्हां हे निसटले.

तेव्हांपासून यांच्या अज्ञातवासास सुरुवात झाली. हे प्रवास करीत व काशीसारख्या शहरीं महिनेन्यामहिने राहत. पण पोलिसांना यांचा पत्ता लागला नाहीं. स. १९१२ च्या डिसेंबरांत व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज यांच्यावर बाँब पडला. त्या प्रकरणांत यांचेवर आरोप होता. क्लॉवलंडसारखे कर्तबगार अधिकारी यांच्या शोधांत होते. यांचा त्यांना शोध करितां आला नाहीं. एवढेंच नव्हे तर यांचें कार्यहि थांबवितां आलें नाहीं. त्या वेळीं सर्व वर्तमानपत्रांत यांचे फोटो प्रसिद्ध करून यांना पकडून देणारास बारा हजार रुपयांचें बक्षिस लावलें होतें.

यांनीं तळेगांवचे विष्णु गणेश पिंगळे यांच्या साहाय्यानें शीख सैन्यांत प्रवेश करून घेऊन हिंदुस्थानभर बंड घडवून आणण्याचा प्रयत्न केला. या बनारस कटाचे धागे सिंगापुरापर्यंत पसरले होते. २१ फेब्रु. १९१५ ही बंड सुरू करण्याची तारीख निश्चित झाली होती. त्या दिवशीं ठरल्याप्रमाणें सिंगापूर येथें बंड झालें. पण पंजाबांत कांहीं घोटाळा झाल्यानें बंडाचा काल चार दिवस मागे बदलला. या अवधींत कटाची सर्व वार्ता पंजाबचे गव्हर्नर सर मायकेल ओडवायर यांना लागली. त्यांनीं अकस्मात् कटवाल्यांची सार्वत्रिक धरपकड केली. या धरपकडींत हे सरकारच्या हातीं लागले नाहींत. या वेळीं सर मायकेल यांचे शरीररक्षकहि यांनीं आपल्या कटांत सामील करून घेतले होते, ही गोष्ट येथें विशेष नमूद करण्यासारखी आहे.

बंडाचा प्रयत्न फसल्यानंतरहि यांनीं मिरतच्या छावणींत पिंगळ्यांना पाठवून सैनिकांशीं संबंध जोडण्याचा पुनश्च प्रयत्न केला. पण त्या दिवशीं पिंगळ्यांचा विश्वासघात होऊन त्यांना त्यांच्या अतिभयंकर बाँबसकट अटक झाली. पिंगळ्यांना त्याबद्दल फांशीची शिक्षा झाली. याबद्दल यांना पुढें कितीतरी दिवस अत्यंत खेद वाटत असे.

पिंगळ्यांच्या अटकेनंतर यांनीं हिंदुस्थान सोडण्याचा विचार केला आणि हे येथून निसटून जपानला गेले (१९१५). तेथून यांनीं क्रांतिकारकांना शस्त्रें पुरविली. त्या वेळीं जपान जर्मनीच्या विरुद्ध इंग्रजांच्या बाजूनें लढत असल्यानें हे टोकियोला पोंचल्याची वार्ता ब्रिटिशांना लागतांच त्यांनीं जपान सरकारकडे यांना आपल्या स्वाधीन करण्याची मागणी केली आणि जपानसरकारलाहि ती मान्य करावी लागली. पण जपानांतील अतिशय वजनदार अशा ब्लॅक ड्रेगन संस्थेचे प्रमुख टोयामा यांनीं आपल्या घरीं यांना आश्रय दिला आणि यांचें संरक्षण केलें. टोयामा यांच्या घरांतून यांना काढून नेण्याचें सामर्थ्य कोणाहि जपानी अधिकाऱ्यांत नसल्यानें हे तेथें सुरक्षित राहिले. तेव्हां हे आठ वर्षें अज्ञातवासांत राहिले. 'रौलट कमेटी'च्या इतिवृत्तांत बनारस कटांतील यांना जपानकडून मागवून घेऊन यांच्यावर फौजदारी खटला भरला गेला पाहिजे असें आग्रहानें लिहिलें आहे (पान २०९, १९१८).

पुढें एका जपानी स्त्रीशीं विवाह करून हे जपानांतच कायम राहिले. तेथील भारतीय स्वातंत्र्यसंघाचे हे संस्थापक आणि अध्यक्ष होते. हिंदुमहासभेच्या तत्त्वज्ञानाचे हे कट्टे पुरस्कर्ते होते.

हे चांगल्यांपैकीं लेखक होते. चंद्रनगरच्या 'प्रवर्तक' मासिकांत यांनीं आपली आत्मकथा लिहिली आहे. कलकत्त्याच्या स्टेट्समनसारख्या अँग्लो इंडियन पत्रांत यांनीं केलेलें जपानांतील भीषण भूकंपाचें वर्णन अगत्यपूर्वक छापलें होतें.

जपानी सरकार तर 'स्वतंत्र हिंदुस्थानच्या तात्पुरत्या सरकारा'चे सल्लागार म्हणून यांना संबोधीत असे, असें लंडन टाइम्सनें यांच्या मृत्युलेखांत म्हटलें आहे.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासंबंधीं यांनीं जपानी भाषेंत पांच पुस्तकें लिहिलीं आहेत. अमेरिकेंतील डॉ. संडरलंड यांनीं लिहिलेल्या 'इंडिया इन बॉन्डेज' या इंग्रजी पुस्तकाचें जपानी भाषान्तर यांनीं केलें आहे. टोकिओंत शंकराचें मंदिर बांधण्याची यांची कल्पना असून हे त्याकरितां निधि जमवीत होते.

हे पहिल्या आझाद हिंद सेनेचे संस्थापक होत. यांनीं मोहनसिंग यांना चीफ ऑफ स्टाफ नेमून तें काम सुरू केलें. पण त्यांचें धोरण जपानविरुद्ध दिसतांच ते पकडले गेले आणि कर्नल जगन्नाथराव भोसले यांना चीफ ऑफ स्टाफ नेमलें. पुढें सुभाषचंद्र बोसांनीं आझाद सैन्याचें नेतृत्व पत्करिल्यानें तर त्याला विशेष महत्त्व आलें.

बोस, शरच्चंद्र—(जन्म स. १८८९) बंगाल-मधील सुप्रसिद्ध पुढारी व पहिल्या दर्जाचे कायदे-पंडित.

श्री. सुभाषचंद्र यांचे हे थोरले बंधु. यांना सुभाषचंद्र, सतीशचंद्र वगैरे सहा भाऊ आहेत. यांच्या आईचें नांव प्रभावती. कलकत्त्याच्या रॅव्हेनशॉ व प्रेसिडेन्सी कॉलेज-मधून हे एम्. ए., बी. एल्. (१९११) झाले. त्यानंतर हे इंग्लंडला गेले व बॅरिस्टर होऊन परत आले.

हिंदुस्थानांत आल्यानंतर यांनीं कलकत्ता येथें वकिली करण्यास सुरवात केली व थोड्याच दिवसांत कलकत्ता बारचे हे पुढारी बनले. भरभक्कम वादविवाद कौशल्यानें यांनीं भरपूर पैसे मिळविले. यांच्या आर्थिक सहकार्यानेंच आपण इतकें सार्वजनिक कार्य करूं शकत असल्याची कबुली श्री. सुभाषचंद्र बोस यांनीं दिली आहे. जवळ जवळ दहा वर्षेपर्यंत हे फॉर्वर्ड पब्लिशिंग कंपनीचे व दि लिबर्टी न्यूज पेपर्स लि.चे मॅनेजिंग डायरेक्टर होते.

असेंब्लींतसुद्धां उत्कृष्ट वादविवादपटु म्हणून यांची ख्याति आहे. इंडियन लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद म्हणून यांची १९३३ सालीं प्रथम निवड झाली. त्यानंतर बंगाल लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत कॉंग्रेस पक्षाचे नेते म्हणून काम केल्यावर (१९३७) सुभाष बोस हिंदु-स्थानांतून अन्तर्धान पावल्यावर यांना स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें होतें. त्यानंतर यांची सेंट्रल लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत कॉंग्रेस पक्षाचे नेते म्हणून निवड झाली (१९४५). कॉंग्रेस वर्किंग कमेटींत बंगालचे प्रतिनिधि म्हणून हे काम करतात.

बोस, 'नेताजी' सुभाषचंद्र—(जन्म स. १८९७ जाने.२७–मृत्यु स.१९४५ ऑगस्ट १८ ?) हिंदुस्थानच्या पूर्ण स्वातंत्र्याचे सुप्रसिद्ध उपासक, दुसऱ्या आझाद हिंद सेनेचे प्रमुख व कुशल संघटक.

यांचें जन्मस्थान कटक (उडीसा). पिता–जानकीनाथ. माता–प्रभावतीदेवी. उपनाम बसू. इंग्रजीवरून बोस असा उच्चार बंगालबाहेर लोकांत प्रसिद्ध आहे. जात बंगाली ब्राह्मण. यांचे वडील कटक येथें सुप्रसिद्ध वकील होते व यांची माता अत्यंत धार्मिक वृत्तीच्या होत्या. यांना सहा बंधु आहेत. ते डॉक्टर, आय्. सी. एस्. वगैरे आहेत. यांचे थोरले बंधु शरच्चंद्र हे तर प्रसिद्ध कायदे-पंडित व राष्ट्रसभेचे कार्यकर्ते आहेत.

हे शाळेंत शिकत असतांना श्री. रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांच्या शिकवणीचा मनावर अत्यंत परिणाम होऊन हे गंगायमुनांच्या कांठचीं पवित्र स्थानें व हिमालयाचीं गिरिकंदरें गुरूच्या शोधार्थ हिंडून आले. मॅट्रिकमध्यें यांचा दुसरा क्रमांक आला. कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांत एका इंग्रज प्राध्यापकाच्या अपमान-कारक वागणुकीनें यांनीं संप घडवून आणला आणि प्रिंसिपालवर हल्लासुद्धां केला. तेव्हां यांचें नांव कॉलेज-मधून कमी करण्यांत आलें. तेव्हां हे इंग्लंडला जाऊन बी.ए. व आय्. सी. एस्.हि झाले. पण सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन यांनीं देशकार्याला आपणास वाहून घेतलें.

हिंदुस्थानांत आल्यावर यांनीं प्रथम म. गांधी यांची भेट घेतली (१९२१ जुलै). नंतर कलकत्त्यास जाऊन चित्तरंजन दासांच्या नेतृत्वाखालीं यांनीं सार्वजनिक कार्यास सुरवात केली. त्यांनीं यांची नेमणूक नॅशनल कॉलेजच्या प्राध्यापकाच्या जागीं केली. युवराजाच्या वरील बहिष्कारांत यांना प्रथम सहा महिन्यांची शिक्षा झाली. सुटून आल्यावर फॉर्वर्ड पत्राची संपादकी यांच्याकडे आली (१९२२-२४). स्वराज्यपक्षाची उत्कृष्ट संघटना करून यांनीं कायदेमंडळ व कार्पोरेशन बहुमतानें काबीज केलें. तेव्हां यांना कलकत्ता कार्पोरेशनकडून १५०० दरमहाचे मुख्याधिकारी नेमण्यांत आलें. पण क्रान्तिकार-कांची हे संघटना करतात या आरोपावरून यांना मंडाले येथें विनाचौकशी अटकेंत ठेवलें (१९२५ जाने. २५). तेथून यांनीं सशर्त मुक्तता करून घेण्याचें नाकारलें, तेव्हां यांना मरणोन्मुख अवस्थेंत मुक्त करण्यांत आलें (१९२७ मे २६).

दास दिवंगत झाले आणि मद्रास राष्ट्रसभेपासून (१९२७) यांनीं संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास करण्याची खटपट सुरू केली, तीं १९२९ सालीं लाहोरच्या सभेंत यशस्वी झाली. मात्र यांचा प्रतिसरकार स्थापण्याचा ठराव नापास झाला. १९३३ सालीं प्रकृतीकरितां हे युरोपांत गेले. व्हिएन्नाच्या रुग्णालयांत हे व विठ्ठलभाई पटेल

या दोघांवर उपचार चालू होते. दोघांचाहि गांधींच्या कार्यक्रमावर विश्वास नव्हता. या वेळीं यांनीं ब्रिटिशांकडून होणाऱ्या हिंदविरोधी प्रचारास आळा घालण्याकरितां 'सेंट्रल इंडो-युरोपियन सोसायटी' काढली. तेथें मरणसमयीं विठ्ठलभाई पटेलांनीं एक लाख रुपयांचा निधि मनाप्रमाणें कार्य करण्याकरितां यांना दिला. पण कायदेशीर अडचणीमुळें तो यांना लाभला नाहीं. आजारी असणाऱ्या पित्याला भेटण्याकरितां हिंदुस्थानांत येण्यास सरकार यांना परवानगी देईना, तेव्हां हे परवानगीशिवाय विमानानें कराचीस येऊन उतरले.

पुनः १९३७ सालीं हे युरोपांत गेले; तेव्हां मोठमोठ्या राजकारणी लोकांशीं यांचा परिचय होऊन यांचा देशोदेशीं सत्कार झाला. यांनींहि तेथील राजकारणाचा चांगला अभ्यास केला आणि १९३८ च्या हरिपुरा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्यामुळें हे हिंदुस्थानांत आले. पुनश्च १९३९ सालीं त्रिपुरी काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं हे उभे राहिले आणि म. गांधींनीं पाठिंबा दिलेल्या पट्टाभिसीतारामय्यांपेक्षां अधिक मतें पडून हे निवडून आले. तेव्हां 'हा पट्टाभींचा पराजय नसून माझा पराजय आहे' असें म. गांधींनीं उद्गार काढले. तेथें गांधी गटाच्या असहकाराला व विरोधाला यांना तोंड द्यावें लागलें. स्वतःच्या मताचें कार्यकारीमंडळ निवडतां न आल्यानें यांना राष्ट्रसभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. नंतर राष्ट्रसभेच्या गांधीवादी कार्यकारीमंडळानें यांना बंगाल प्रान्तिक काँग्रेस कमेटीचे अध्यक्षपदास व १९३९ पासून तीन वर्षे काँग्रेस कमेटीचा सभासद होण्यास अपात्र ठरविलें. तसेंच यांचा क्रान्तिकारक चळवळीशीं संबंध आहे कीं काय हें पाहण्याकरितां म. गांधींनीं कृष्णदास नांवाच्या एका माणसाची नेमणूक केली.

यानंतर यांनीं आपल्या 'फॉर्वर्ड ब्लॉक' या सुप्रसिद्ध संस्थेची स्थापना केली. १९४० सालीं तुरुंगांत असतांच सेन्ट्रल असेंब्लीत हे निवडून गेले. यानंतर प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें यांची सुटका होऊन यांना कलकत्त्याच्या यांच्या राहत्या घरांत स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें.

दुसरें महायुद्ध चालू असतां या अपूर्व संधीचा फायदा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां घेण्याचें यांनीं ठरविलें. कलकत्त्याच्या आपल्या घरांतून २६ जाने. १९४१ रोजीं हे अदृश्य झाल्याचा पुकारा देशभर झाला. हे १८ जाने.ला घरांतून बहिऱ्या व मुक्या असणाऱ्या झियाउद्दिन पठाणाच्या वेषानें निघाले व पेशावर मार्गें काबूल येथें गेले. तेथून हे बर्लिनला गेले आणि बर्लिनहून दुसऱ्या आझाद हिंद सेनेचें नेतृत्व स्वीकारण्यास सिंगापुरास दाखल झाले. यांचें हें प्रवासवृत्त लाल उत्तमचंद मिलोतरा यांनीं 'When Bose was Ziauddin' या नांवानें प्रसिद्ध केलें.

१९४१ च्या डिसेंबरमध्यें जपाननें ब्रिटन व अमेरिका यांच्या विरुद्ध युद्ध पुकारलें. सिंगापूर येथील ब्रिटिशांचें हिंदी सैन्य जपानला शरण गेलें (१५ फेब्रु. १९४२). या हिंदी सैन्याला कैदेंत ठेवण्यापेक्षां आझाद हिंद सेनेंत दाखल होऊन ब्रिटिशांविरुद्ध लढण्यास जपाननें मान्यता दिली. पहिली आझाद हिंदसेना सप्टें. १९४२ मध्यें बनविण्यांत आली व तिचें विसर्जन डिसेंबर १९४३ मध्यें करण्यांत आलें. नंतर कांहीं दिवसांनीं यांनीं दुसऱ्या आझाद हिंदसेनेचें नेतृत्व पत्करिलें. आशियांतील निरनिराळ्या देशांतील हिंदी लोकांच्या प्रतिनिधींची एक परिषद भरून स्वतंत्र हिंदुस्थानचें तात्पुरतें सरकार स्थापन करण्याचें ठरलें. २१ ऑक्टो. १९४३ रोजीं स्वतंत्र हिंदुस्थानच्या तात्पुरत्या सरकारची घोषणा करण्यांत आली आणि यांच्या नेतृत्वाखालीं वेगवेगळ्या खात्यांच्या मंत्र्यांचा शपथविधि झाला. या सरकारनें ब्रिटन व अमेरिका यांच्याविरुद्ध युद्ध जाहीर केलें आणि दुसरी आझाद हिंदसेना या सरकारच्या आदेशानुसार काम करूं लागली. हें कार्य राष्ट्रसभेच्या तिरंगी निशाणाखालीं टिळक, गांधी, नेहरू, आझाद वगैरे नांवें पथकांना देऊन चालू होतें.

यांना अंदमान व निकोबार बेटांचा प्रदेश जपानकडून या कामाकरितां मिळाला. आसामांतील मणिपूर व विष्णुपूर यांच्या आसपासचा सुमारें दीड हजार चौरस मैलाचा प्रदेश सहा महिने या सरकारच्या ताब्यांत आला होता.

यांना बीस कोटींच्या देणग्या मिळाल्या होत्या. त्यांतून मुलकी सरकारचा व फौजेचा निर्वाह होत असे. इम्फाल येथें पाऊण व अर्धा आण्याची तिकिटें यांनीं काढलीं होतीं. त्यावर दिल्लीच्या मोगल किल्ल्याचें चित्र असून चलो दिल्ली व अर्झी हुकमत-ई-हिंद हीं अक्षरें होतीं. शिवाय यांनीं रंगून येथें बँक व नोटा वगैरे काढल्या होत्या. यांचें हें सरकार एक मुलकी व लष्करी गॅझेट काढीत असे. यांच्या सरकारला अकरा स्वतंत्र राष्ट्रांनीं मान्यता दिलेली होती.

जपानला शरणागति पत्करावी लागली तरी यांनीं शरणागति पत्करण्याचें नाकारून लढाई चालू ठेवली. पुढें सिंगापूर ब्रिटिशांच्या हातीं जाण्याची वेळ येतांच हे सिंगापुराहून १६ ऑगस्ट १९४५ रोजीं विमानानें निघाले. प्रवासांत विमानाला अपघात झाला आणि जखमी झालेल्या यांना उपचाराकरितां रुग्णालयांत नेण्यांत आलें. तेथें यांना मृत्यु आला अशी बातमी टोकियो वृत्त संस्थेनें प्रसिद्ध केली. या बातमीबद्दल अनेक जबाबदार माणसांनीं उलटसुलट मतें प्रदर्शित केलेलीं आहेत.

कोणत्याहि राष्ट्रास पूर्ण स्वातंत्र्य मिळवण्यास अन्तर्गत उठावणीप्रमाणें बाह्य राजकीय सत्तेचा आश्रय आवश्यक असतो. ब्रिटिश साम्राज्याचा इतिहास पाहतां त्यांच्याकडून पूर्ण स्वातंत्र्याची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. आयर्लंड, इजिप्त वगैरेकडे पाहतां तेथें देशविच्छेद, अल्पसंख्यांक, ब्रिटिश सैन्य वगैरेंचे प्रश्न कायम ठेवण्याचें धोरण दिसतें. हिंदुस्थानांत मुसलमान, अस्पृश्य, संस्थानिक वगैरेंच्या आश्रयानें ब्रिटिश सत्ता कायम ठेवण्याचा सतत प्रयत्न चालू आहे. अशा स्थितींत पूर्ण स्वातंत्र्याकरितां ८ ऑगस्ट १९४२ च्या काँग्रेस उठावणीस पोषक असें बाहेरून दडपण आणण्याचा प्रयत्न यांनीं केला. ८ ऑगस्टची उठावणी कांहीं न करितां तुरुंगभरती करणारी आणि ९ ऑगस्टची काँग्रेस सोशालिस्टांची उठावणी निर्नायक व असंघटित असल्यानें वाया गेली. आंतील उठावणी कच्ची असल्यानें यांच्या बाहेरच्या उठावणीचा विशेष उपयोग झाला नाहीं.

शहानवाझ, धील्लन, सहगल वगैरे आझाद सैनिकांवर बंडखोर म्हणून ब्रिटिश सरकारनें खटले भरले. त्या खटल्याच्या चौकशींत यांचे जाहीरनामे, हुकूम, भाषणें, व्यवस्था वगैरेंची माहिती पुढें आली. त्यावरून यांच्या एकंदर शिस्तीवर व रचनेवर चांगला प्रकाश पडला. यांच्या सैन्यांत हिंदु-मुसलमान वगैरे जाती एकदिलानें काम करीत असून त्यांच्यांत संगतवार कायदेशीर घटना होती. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या भावनेनें सर्व सैनिक भारलेले असून त्यांचा 'नेताजी सुभाषचंद्र बोस' यांच्यावर कमालीचा विश्वास होता. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीनें परिपूर्ण ऐक्यसाधक अशा 'जय हिंद', 'चलो दिल्ली' वगैरे घोषणा व अनेक उत्साहवर्धक नवीन युद्धगीतें आझाद सेनेंत प्रचारांत आलीं. १८५७ सालच्या स्वातंत्र्य युद्धापेक्षां बाहेरच्या अनेक राष्ट्रांचा पाठिंबा ही गोष्ट या उठावांत विशेष होती.

कलकत्ता येथील बोस बंधूंच्या वडिलोपार्जित निवासस्थानापैकीं पाऊण हिस्सा श्री. शरचंद्र बोस व त्यांचे कांहीं मित्र यांनीं सुमारें दोन लाख रुपयांला खरेदी केला असून ती इमारत राष्ट्रकार्यासाठीं अर्पण करण्यांत आली आहे. या इमारतीचें 'नेताजी भवन' असें नवें नामकरण करण्यांत आलें असून त्याचा 'ट्रस्ट' झाल्यानंतर त्या ठिकाणीं नेताजी सुभाषबाबू यांना प्रिय असलेलीं देशसेवेचीं कार्यें सुरू होणार आहेत. दरम्यान या इमारतींत आझाद फौजेंतील सैनिकांसाठीं विश्रांतिस्थान स्थापन करण्यांत आलें आहे. यापूर्वी बोस-बंधूंनीं कटक येथील आपलें वडिलोपार्जित घर उत्कल काँग्रेस कमिटीला देणगी म्हणून दिलें होतें.

यांचे ग्रंथ—(1) The Indian Struggle (1935 जप्त), (2) Through Congress Eyes (1918), (3) An Indian Pilgrim.

ब्रह्मचारी, सर-उपेंद्रनाथ—(जन्म स. १८७५–मृत्यु स. १९४६) बंगालमधील सुप्रसिद्ध डॉक्टर व संशोधक.

मौंघीर जिल्ह्यांतील जमालपूर हें गांव यांचें जन्मस्थान. यांच्या वडिलांचें नांव नीलमणी ब्रह्मचारी. हे एम्. डी. झाल्यानंतर 'Häemolysis' वरील यांच्या संशोधनाबद्दल यांना पीएच्. डी.ची पदवी मिळाली होती (१९०४).

डाक्का मेडिकल स्कूलमध्यें कांहीं दिवस अध्यापकाचें काम केल्यानंतर हे कलकत्त्याच्या कॅम्पबेल मेडिकल स्कूलमध्यें अध्यापकाचे जागीं स्थिर झाले. १९२७ सालीं कार्यनिवृत्तीच्या वेळीं बंगालच्या मेडिकल कॉलेज हॉस्पिटलचे हे फिजिशियन होते.

परंतु मुख्यतः संशोधक म्हणूनच यांची आंतरराष्ट्रीय प्रसिद्धि असे. क्वार्टन फीवर या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या बंगालमधील तापाच्या साथीवर यांनीं सुचविलेल्या उपाययोजनेनें हे प्रथम जनतेसमोर आले. 'काळा आजार' या बंगालमध्यें प्रामुख्यानें आढळणाऱ्या रोगावरील उपाययोजनेचा विचार करतांना कलोडल अँटिमनीचा शोध यांनीं लावला व त्याचा क्वार्टन फीवरवरील परिणाम जनतेच्या नजरेस आणून दिला. त्यावर अँटिमनी व सोडियम अँटिमनीचा उपयोग सुचविणारे हे पहिले संशोधक होत. याच्याच पुढें जाऊन यांनीं युरिआ-स्टिबॅमिन या नांवानें प्रसिद्ध झालेलें युरिआ-अँटिमनी कांपाउंड शोधून काढलें. हें औषध

व त्यानंतर यांनीं शोधलेल्या अँटिमनील कांपाउंड्सनीं काळ्या आजाराचे उपाययोजनेंत अक्षरशः क्रांति केली आहे. पूर्वीच्या काळीं असाध्य समजला जाणारा हा रोग आतां या औषधानें सहजसाध्य झाला असून बंगाल वगैरे प्रांतांतून तो कायमचा नाहींसा होण्याचे मार्गावर आहे. आसाम सरकारनें तर या औषधाचा उपयोग सार्वत्रिक केला व या औषधाचे संशोधनकालापासून १९३३ अखेर ३,२८,५९१ लोकांना या औषधाचा फायदा देण्यांत आला.

सालव्हरसन या उपदंशावरील जगप्रसिद्ध औषधाचा थायोसारमिन नांवाचा देशी पाठ करणारांपैकीं हे प्रमुख होत.

कलकत्त्याची ब्रह्मचारी रिसर्च लेबॉरटरीज ही संस्था यांच्या मुलांनीं यांच्या पश्चात् चालविली.

इंग्रजी ग्रंथ—(1) Studies on Haemolysis, (2) Treatise on Kala Azar, (3) Kala Azar (डॉ. कार्ल मेन्सच्या Handbuch der Tropenkrankheiten मधील एक प्रकरण).

ब्लॅव्हॅट्स्की, मॅडम हेलेना पेट्रोव्हना—(जन्म स. १८६१–मृत्यु स. १८९१ मे ८) थिऑसाफिकल सोसायटीच्या संस्थापक व परलोक विद्येच्या जगप्रसिद्ध अभ्यासक.

पिता–कर्नल पीटर हॅन. माता–हेलन फॅडिक. वडील रशियांत तोफखान्यावरील अधिकारी होते. यांनीं त्यांच्याबरोबर लंडन येथें राहून गायनवादनाचा अभ्यास केला होता. या शरीरानें स्थूल व कुरूप होत्या. वयातीत जनरल ब्लॅव्हॅट्स्कीबरोबर यांचें लग्न झालें. पण या वरातींतूनच पळाल्या, त्या सातआठ वर्षे परत आल्या नाहींत असें म्हणतात.

यांनीं इजिप्त, लॅबानॉन येथें गूढविद्येचा अभ्यास केला व या इटलींत गॅरिबाल्डीच्या स्वयंसेवकांत दाखल होऊन जखमीहि झाल्या होत्या. यांना १८५१ मध्यें लंडनच्या रस्त्यांत नेपाळांतील सिद्ध पुरुष आढळले. त्यांच्या आदेशावरून या हिंदुस्थानांत येऊन दंग्याच्या परिस्थितीमुळें परत गेल्या आणि पुनः येऊन हिमालयांत गुरुदेवाच्या सान्निध्यांत योगाभ्यास केला (१८६७-७०). १८७१ मध्यें इजिप्तांत व १८७३ सालीं या न्यू यॉर्कमध्यें फुलें करून एका यहुदी दुकानदाराजवळ राहून उदरनिर्वाह करीत.

१८७४ सालीं कर्नल ऑल्कॉट यांची गांठ पडून दोघांनीं थिऑसाफिकल सोसायटी स्थापिली. या चमत्कारहि करीत. मि. सिनेट व ए. ओ. ह्यूम यांच्या विनंतीवरून यांनीं एका सिद्धाशीं अनेक गूढ प्रश्नांबद्दल पत्रव्यवहार केला. त्या पत्रव्यवहाराचे आधारें सिनेट यांनीं आपले अनेक ग्रंथ लिहिले व त्या माहितीनें आकर्षित होऊन बेझंटबाई व लेटबीटर हे थिऑसाफीकडे वळले. तो पत्रव्यवहार मिसेस बार्कर यांनीं प्रसिद्ध केला व मूळ पत्रें ब्रि. म्युझियम लायब्ररीत ठेवलीं आहेत. तशीं सिद्धांचीं कांहीं पत्रें अड्यार येथें आहेत.

या चमत्कारांच्या खुलाशासाठीं इंग्लंडमधील 'सायकिकल रिसर्च सोसायटी 'पुढें कर्नल आल्कॉट यांनीं साक्ष दिली. त्या संस्थेनें प्रत्यक्ष चौकशीकरितां डॉ. हाग्सन यांना अड्यार येथें पाठविलें. तेव्हां या व आल्कॉट हे युरोपांत होते. तथापि त्यांनीं माहिती मिळवून रिपोर्ट केला आणि त्यावरून त्या सोसायटीचे अध्यक्ष प्रसिद्ध नीतिशास्त्रज्ञ प्रो. सिज्विक यांनीं विरुद्ध निर्णय दिला आणि 'एकोणिसाव्या शतकांतील ब्लॅव्हॅट्स्कीबाई या अत्यंत लबाड व्यक्ति आहे' असा शेरा मारला.

यामुळें सोसायटींत अत्यंत खळबळ उडून अनेक सभासदांनीं राजीनामे दिले. पण मि. सिनेट व सुब्रह्मण्य अय्यर यांनीं वरील निर्णय चुकीचा असल्याचा अहवाल प्रसिद्ध केला. तरी यांना उद्विग्नता येऊन यांनीं हिंदुस्थान सोडून या जर्मनींत जाऊन राहिल्या. तेथें यांनीं आपला दुसरा सीक्रेट डॉक्ट्रिन हा प्रचंड ग्रंथ लिहिण्यास सुरवात केली. तो इंग्लंडमध्यें बर्ट्राम व आर्चिनाल्ड कीटले यांच्याकडून तपासून घेऊन प्रसिद्ध करण्यांत आला (१८८८). या ग्रंथामुळें बेझंटबाईसारखीं माणसें सोसायटीला मिळालीं.

यांचें देहावसान झालें तो दिवस व्हाइट लोटस डे-श्वेतपद्माष्टमी म्हणून सभासद पाळतात व त्या दिवशीं लाइट ऑफ एशिया व भगवद्गीता वाचतात.

भ

भगत, प्रेमेन्द्रसिंग—(जन्म स. १९१८) दुसऱ्या महायुद्धांत व्हिक्टोरिया क्रॉस मिळवणारे पहिले हिंदी सैनिक.

यांचे वडील संयुक्त प्रांतांत एक्झिक्युटिव्ह एंजिनियर होते. प्रथम हे शिकाऊ सैनिक म्हणून सैन्यांत शिरले (१९३९) व शेवटीं हिंदी मनुष्याला लष्करांत मिळूं शकणारा सर्वश्रेष्ठ मान यांनीं मिळविला.

ॲबिसिनियाच्या युद्धांत भुईसुरुंग काढण्यांत यांनीं दाखविलेल्या धडाडीबद्दल हा मान यांना देण्यांत आला. मेतोम्माच्या पाडावानंतर गोंडर रस्त्यावर इटालियन लोकांनीं पुरून ठेवलेले भुईसुरुंग काढण्याचें काम त्या वेळीं सेकंड लेप्टनंट असणाऱ्या यांचेवर सोंपविण्यांत आलें (१९४१). यांनींहि तडफेनें सुरुवात करून अठ्ठेचाळीस तासांत सर्व सुरुंग काढून रस्ता निर्भय केला. पंचावन मैलांच्या रस्त्यावरील पंधरा सुरुंग काढण्यांत हे यशस्वी झाले. तेथील धडाक्यानें यांचे कानांचे पडदे मात्र निकामी झाले व हे बेशुद्ध पडले.

वज्रासारखें कणखर धैर्य व आत्मविश्वास असा यांच्या या बहादुरीचा उल्लेख करून दिल्ली येथें लॉर्ड लिनलिथगो यांच्या हस्तें यांना व्हिक्टोरिया क्रॉस देण्यांत आला. यांना कॅम्बर्ले येथें स्टाफ कॉलेजमध्यें आपला शिक्षणक्रम आटोपण्याची सवलतहि देण्यांत आली (१९४४).

भगतसिंग—(फांशी स. १९३१ मार्च २३ लाहोर) सुप्रसिद्ध क्रांतिकारक व क्रांतिवाद-प्रतिपादक.

असेंब्लीवर बॉम्ब टाकण्याच्या आरोपावरून हे व बटुकेश्वर दत्त यांना पकडण्यांत आलें (४ एप्रिल १९२९). पुढें राजगुरु व हे यांना सॉन्डर्सच्या खुनाबाबत उभारलेल्या लाहोरकटांत गोंवण्यांत आलें. असेंब्लींत बाँब टाकल्यावर यांना पकडले तेव्हां यांच्याजवळ असलेल्या पिस्तुलाशीं लाहोर येथें सॅन्डर्सला मारलेली गोळी जुळली व ' सॅन्डर्स मेला, लालाजींचा सूड उगवला ' या हस्तपत्रकाशीं यांचें हस्ताक्षर जमलें. लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारण झालेल्या मि. स्कॉट यांना मारण्याऐवजीं शिवराम हरि राजगुरु व हे यांच्या गोळीला चुकीनें सॅन्डर्स बळी पडला व पाठलाग करणाऱ्या चरणसिंगालाहि ठार करण्यांत आलें. यांनीं या खटल्याचे वेळीं खटला चालविण्यांत व अन्नसत्याग्रह वगैरे प्रकारांनीं चालविलेल्या कायदेशीर अडचणीस तोंड देण्याकरितां ' लाहोर कान्स्पिरसी ट्रायल आर्डिनन्स ' पास करून घेणें भाग पडलें.

खटल्याचे वेळीं यांनीं दिलेली सर्वच जबानी अति तेजस्वी होती. ' आम्ही करूं तो जुलूम प्रजा सोसते म्हणून कांहीं कर्झनछाप अधिकारी राष्ट्राचीं छकलें करण्यासाठीं पुढें धांवतात. तशा मदांध अधिकाऱ्यांच्या कानीं त्रस्त प्रजेच्या आर्त किंकाळ्या पोंचूंच शकत नाहींत. अशा बेगुमान अधिकाऱ्यांचे कान खोलण्यासाठीं व डोळे उघडण्यासाठीं आम्हांला बॉम्बचे आवाज काढावे लागतात'—हे यांचे उद्गार यांच्या वृत्तीवर प्रकाश टाकणारे आहेत.

७ आक्टो. १९३० ला हे, राजगुरु व सुखदेव यांना फांशीची शिक्षा सांगण्यांत आली. गांधी-आयर्विन-करार झाला आणि राष्ट्रानें एकमुखानें मागणी केली तरी या तिघांना लाहोर तुरुंगांत सायंकाळीं साडेसात वाजतां फांशी देण्यांत आलें व आप्तांनासुद्धां न कळवतां यांचीं प्रेतें नष्ट करण्यांत आलीं. कराचीच्या राष्ट्रसभेंत या तिघांचें शौर्य व त्याग यांबद्दल अभिनंदन करण्यांत येऊन यांना फांशी देण्यांत सरकारनें अवास्तव सुडाचें कृत्य केल्याचें नमूद करण्यांत आलें.

भगवानदास, डॉ.—(जन्म स. १८६९) संयुक्त प्रांतांतील सुप्रसिद्ध कॉंग्रेस कार्यकर्ते व थिऑसफिस्ट.

क्वीन्स स्कूल व बनारस कॉलेज येथें आपलें शिक्षण संपवून हे तत्त्वज्ञानाचे एम्. ए. होऊन सरकारी नोकरींत शिरले (१८९०) व थोड्याच दिवसांत हे डेप्युटी कलेक्टर झाले.

पुढें बेझंटबाईनीं सेंट्रल हिंदु कॉलेज काढल्यानंतर यांनीं सरकारी नोकरीचा त्याग केला व हे त्या संस्थेच्या मॅनेजिंग कमेटीचे कार्यवाह असतांच त्या कॉलेजचे हिंदु युनिव्हर्सिटींत रूपांतर झालें. पुढें १९२१ साली काशीच्या बाबु शिवप्रसाद गुप्त यांच्या दहा लाख रु.च्या देणगीनें सुरू झालेल्या काशी विद्यापीठाच्या विश्वस्त मंडळाचे यांना अध्यक्ष व कुलपति नेमण्यांत आलें.

१८८४ पासून थिऑसफिकल सोसायटीचे कार्यकर्ते असून १९१२ सालीं हे त्या संस्थेचे कार्यवाहहि होते. १९२१ सालच्या असहकाराच्या चळवळींतहि यांनीं मनापासून भाग घेतला व यांना एक वर्षाची सजा झाली. तेव्हांपासून हे संयुक्त प्रांतांतील काँग्रेस चळवळीचे प्रमुख कार्यकर्ते बनले आहेत. यू. पी. सोशल कॉन्फरन्स, यू. पी. पोलिटिकल कॉन्फरन्स, यू. पी. प्रांतिक काँग्रेस कमेटी इत्यादि संस्थांचे हे वेळोवेळीं अध्यक्ष होते.

यांचा जुनी हिंदी संस्कृति व इतिहास यांचा अभ्यास गाढा असून सध्यांच्या आर्थिक विषमतेवर समाजवादापेक्षां निराळा मार्ग यांनीं 'सोशल रिकन्स्ट्रक्शन' या ग्रंथांत सुचविला आहे. मनूचीच चातुर्वर्ण्याची योजना परंतु बुद्धिमान, अधिकारी, पैशाचा व्यवहार पाहणारे व कामगार असे समाजाचे चार वर्ग पाडण्याच्या स्वरूपांत यांनीं मांडली आहे. या सर्व समाजाला उच्च पातळींत ठेवण्याची पात्रता असणाऱ्या लोकांसाठीं योगविद्यालयें काढण्याची कल्पना यांनीं सुचविली असून थिऑसफिकल सोसायटी किंवा तिच्या पौर्वात्य विद्यालयांत अशीं योगविद्यालयें काढण्याची यांची कल्पना आहे.

मुख्य आर्थिक प्रश्नांच्या दृष्टीनें ही योजना हीणकस ठरते. सध्यांच्या काळांत ब्रह्मविद्येच्या प्रचारकांची कमतरता आहे म्हणून अव्यवस्था माजली हें यांचें म्हणणें चुकीचें असून समाजाची घडणच अशी बसली आहे कीं, त्यांतून ब्रह्मवेत्ते निर्माण होऊंच शकत नाहींत. शिवाय समाजवादाचें तत्त्वज्ञानहि अद्यापि स्थिर झालेलें नाहीं.

यांचे ग्रंथ—(1) Social Reconstruction, (2) The Purpose and Use of Philosophy, (3) Ancient Versus Modern Scientific Socialism, (4) Communalism and its Cure, (5) The Science of Emotions, (6) The Essential Unity of all Religions इत्यादि.

भगवानदीन—(जन्म स. १८६६-मृत्यु स.१९३०) हिन्दी शब्दसागर या कोशाचे एक संपादक, हिन्दी भाषेंतील लेखक, कवि व टीकाकार.

जन्मस्थान बरवड (फतहपुर जिल्हा). जात श्रीवास्तव 'दुसरे कायस्थ.' उर्दू व फारसी भाषांचें शिक्षण घेतल्यावर पित्याबरोबर हे बुन्देलखंडांत आले. प्रयाग येथें मूर सेन्ट्रल कॉलेजांत थोडे दिवस काढल्यावर यांनीं शिक्षकाचा पेशा पत्करला. छत्रपुर, काशी वगैरे ठिकाणीं शिक्षक असतांनाच यांचें लेखन कार्य चालत असे. हे हिन्दी भाषेचे मर्मज्ञ असून जुन्या कवींच्या काव्याचा यांचा अभ्यास चांगला असे. हे व्रजभाषा व खडी बोली या दोहोंत कविता करीत. खडी बोलींतील कवितांकरितां हे उर्दू छन्द विशेष पसंत करीत. हे लक्ष्मी व उपदेश लहरी यांचे संपादक होते. यांनीं कविसमाज, काव्यलता या नांवाच्या सभा व भारतीभवन नांवाचें पुस्तकालय उघडलें होतें.

यांचे ग्रंथ—कवितासंग्रह–१ नवीन बीन, २ नदीमे दीन; काव्य–३ वीर क्षत्राणी, ४ वीर बालक, ५ वीर पंचरत्न; टीका–६ रामचंद्रिका, ७ कविप्रिया, ८ दोहावली, ९ कवितावली, १० बिहारी सत्सई; अलंकार–अलंकारमंजूषा इ.

भटनागर, सर शांतिस्वरूप—(जन्म स. १८९५) आंतरराष्ट्रीय कीर्तीचे रसायनशास्त्रज्ञ.

यांच्या वडिलांचें नांव बाबू परमेश्वरीसाहाय्य. लहानपणींच वडील वारल्यानें यांचें पालन यांच्या अजोबांनीं केलें. १९११ सालीं प्रवेशपरीक्षा पास झाल्यानंतर यांनीं शिकवण्या करून व बी. एससी. झाल्यावर लाहोरच्या दयाळसिंग कॉलेजांत डेमॉन्स्ट्रेटरचें काम करून आपलें शिक्षण पुरें केलें. एम्. एससी. झाल्यानंतर हे कर्ज काढून इंग्लंडला गेले व यांनीं आपला पुढील अभ्यासक्रम चालू ठेवला. पुढें एक वर्षानंतर यांना प्रिव्ही कौन्सिलची दोनशें पन्नास पौंडांची शिष्यवृत्ति मिळाली व हे लंडन विश्वविद्यालयाची डी. एससी. ची पदवी मिळवून हिंदुस्थानला परत आले (१९२०).

हिंदुस्थानांत आल्यानंतर कांहीं दिवस बनारस हिंदु युनिव्हर्सिटींत रसायनशास्त्राच्या प्राध्यापकाचें काम केल्यानंतर यांची लाहोर युनिव्हर्सिटींत रसायनाचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. याचबरोबर युनिव्हर्सिटीच्या लेबॉरेटरीची व्यवस्थाहि यांचेकडेच सोंपविण्यांत आली. येथील दीर्घकालीन (१९२४-१९४०) कार्यानंतर हे निवृत्त झाले.

परंतु याच काळांत कलिल रसायन, प्रकाश रसायन व चुंबक रसायन विषयक यांनीं केलेल्या संशोधनानें यांना आंतरराष्ट्रीय कीर्तीचा लाभ झाला. चुंबक रसायनाचे साहाय्यानें अणूंची रचना ठरविण्यांत हे यशस्वी झाले असून Principles and Applications of Magneto-Chemistry हा यांचा या विषयावरील ग्रंथ रसायनशास्त्रांतील नवी ज्ञानशाखा उघडण्याइतका

महत्त्वाचा ठरला. कलिल रसायनांतील यांचें इमल्शन्स-संबंधींचें व प्रकाशरसायनांतील प्रकाशाच्या जंतूंवरील परिणामांचें यांचें संशोधन असेंच महत्त्वाचें आहे. कर्नल सोहनलाल भाटिया, डॉ. माताप्रसाद, डॉ. के. एन्. माथुर इत्यादि लोक यांच्या या संशोधनांतील सहकारी होते. यांच्या या संशोधनाबद्दल यांना एफ. आर. एस्. (फेलो ऑफ दि रॉयल सोसायटी) करण्यांत आलें.

परंतु हे येथेंच स्वस्थ बसले नाहींत. आपल्या संशोधनानें मिळालेल्या आपल्या आंतरराष्ट्रीय प्रसिद्धीचा उपयोग शास्त्रीय अघाडीवरील हिंदुस्थानच्या अडचणी जगाच्या नजरेस आणण्याचे कामांत हे अतियशस्वी झाले आहेत. केमिकल सोसायटी, लंडन; ब्रि. असोसिएशन फॉर दि ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्स, लिव्हरपूल; एम्पायर युनिव्हर्सिटीज काँग्रेस (१९३१-३६); इत्यादि परदेशी संस्थांतून यांनीं हिंदुस्थानची बाजू अति तडफदारपणें मांडली.

परंतु यापेक्षांहि अमेरिका व कॅनडांत इंडियन सायन्टिफिक मिशनचे सभासद या नात्यानें यांनीं केलेला प्रचार जास्त प्रभावी होता. 'औद्योगिक क्षेत्रांतील हिंदी लोकांच्या पिछेहाटीचें मूळ हिंदी लोकांचे कार्यक्षमतेच्या अभावांत नाहीं; ब्रिटिशांच्या विशिष्ट धोरणांत आहे. एक सहा महिने हिंदुस्थानांतील सर्व कारखाने आमच्या ताब्यांत द्या व मग आमच्या कार्यपद्धतीचें मोल ठरवा' असा रोखठोक सवाल यांनीं अमेरिकन लोकांना टाकला (१९४५).

यांच्या मदत करण्याच्या वृत्तीमुळें रसायनाशीं संबंध येणारी कोणतीहि सरकारी व बिनसरकारी योजना यांच्या साहाय्याशिवाय पूर्णता पावत नाहीं. पंजाब युनिव्हर्सिटी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स व इंडियन सायन्स काँग्रेसशीं यांचे विशेष घनिष्ट संबंध आहेत. इंडियन सायन्स काँग्रेसच्या रसायनशाखेचे (१९२८, ३८) व काँग्रेसचे हे अध्यक्ष होते (१९४५).

यांचे इतर ग्रंथ—इल्मुलबर्क (इलेक्ट्रिसिटीवरील उर्दू ग्रंथ).

भट्ट, मणिशंकर रतनजी—(जन्म स. १८६७–मृत्यु स. १९२३) सुप्रसिद्ध गुजराथी कवि.

हे कान्त या टोपण नांवानें लिहीत. यांच्या बहुतेक कविता 'पूर्वालाप' या नांवानें प्रसिद्ध झाल्या आहेत. यांनीं नाटकें वगैरे पुष्कळ लिखाण केलें असलें तरी यांची कविता उत्कृष्ट समजली जाते.

यांचें गुजराथी वाङ्मय—काव्य–१ वसंतविजय, २ चक्रवाकमिथुन (खंडकाव्य); कवितासंग्रह–३ पूर्वालाप; नाटकें–४ एका देवेनुन वृत्तान्तें (भाषान्तर), ५ गुरु गोविंदसिंग, ६ रोमनखराज्य.

भडकमकर, डॉ. रामकृष्ण हरि—(जन्म स. १८८४ फेब्रु. ८) महाराष्ट्रांतील विख्यात निदानकुशल डॉक्टर व सार्वजनिक कार्यकर्ते.

यांचे वडील संस्कृतचे प्राध्यापक असल्यानें लहानपणापासूनच यांना संस्कृतभाषाध्ययनाची गोडी लागली. त्यालाच पुढें सूक्ष्म शास्त्रीय दृष्टीची जोड मिळाल्यानें हे एम्. ए., एम्. डी. झाले व यांनीं प्रॅक्टिस करण्यास सुरुवात केली. प्रथम मुंबई व नंतर पुणें हें यांच्या दवाखान्याचें मुख्य केंद्र होतें. फलटणच्या व मिरजच्या राजेसाहेबांची यांचेवर विशेष श्रद्धा आहे.

काव्य व शास्त्र यांच्या विशेष प्रकारच्या मेळामुळें यांना इतक्या असामान्य लोकप्रियतेचा लाभ झाला. प्रथम अगदीं रोग्याच्या बारीकसारीक तक्रारीसुद्धां लक्षांत घ्यावयाच्या व साध्यांतसाध्या औषधयोजनेपासून सुरवात करावयाची अशी यांची कार्यपद्धति आहे. ज्ञानाचा बडेजाव नाहीं, गरीब श्रीमंत हा भेद नाहीं, अशा थाटांत हे काम करूं लागले म्हणजे औषध घेण्याच्या आधींच रोग्याला निम्मे बरें वाटतें.

याशिवाय महाराष्ट्रांतील अनेक औद्योगिक घटनांशीं यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. आयुर्वेदाचे हे अत्यंत पुरस्कर्ते आहेत.

भागवत, राजारामशास्त्री रामकृष्ण—(जन्म स. १८५१–मृत्यु स. १९०८) महाराष्ट्रांतील सुधारक व नवविचार प्रवर्तक.

जात कऱ्हाडे ब्राह्मण. जन्मस्थान कशेळी (ता. राजापूर). १८६७ सालीं यांची प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाली. तीन वर्षें मेडिकल कॉलेजांत शिक्षण घेऊन यांनीं तें सोडलें आणि हे जुन्या शास्त्र्याजवळ पांचसहा वर्षें संस्कृतचें अध्ययन केलें. नंतर मनीस्कुलांत कांहीं महिने व पुढें सेंट झेवियर कॉलेजमध्यें हे संस्कृत शिकवूं लागले (१८७७-१९०८). तेथें काम करीत असतां बाँबे हायस्कूल व पुढें मराठा हायस्कूल काढून

तेथें बावीस वर्षे अध्यापन केलें. हे जातिभेद व खाण्यापिण्याच्या निर्बंधाविरुद्ध होते. वेदोक्त धर्माकडे यांचा ओढा होता व त्यांत वरील निर्बंध नाहींत असें हे प्रतिपादीत. यांचे विचार मूलगामी व स्वतंत्र असत. ते समाजाला झेपत व कळत नसल्यानें हे विक्षिप्त ठरत. शब्दांच्या व्युत्पत्त्या व भाषाशास्त्रावरून नवे सिद्धान्त प्रतिपादण्यास मराठींत यांनीं प्रथम सुरुवात केली.

वाङ्मय—१ विधवाविवाह शास्त्र कीं अशास्त्र ?, २ मराठ्यांसंबंधीं चार उद्गार, ३ शिवछत्रपतींचें चरित्र, ४ ब्राह्मण व ब्राह्मणधर्म, ५ व्रात्यस्तोम, ६ केसरकडून सुलतानाकडे, ७ ऐतरेय व श्वेताश्वतर (मूळासह इंग्रजी व मराठी भाषान्तरें). यांशिवाय विविध विषयांवर यांचें पुष्कळ मराठी व इंग्रजी वाङ्मय प्रसिद्ध आहे.

भाटिया, कर्नल, सोहनलाल—(जन्म स. १८९१) मुंबईच्या ग्रॅन्ट मेडिकल कॉलेजचे सुप्रसिद्ध प्रिन्सिपल व संशोधक.

केम्ब्रिज युनिव्हर्सिटी व लंडनच्या सेंट टॉमस हॉस्पिटलमध्यें आपलें शिक्षण संपवून हे एम् डी., एफ. आर. सी. पी. झाले व सेंट टॉमस हॉस्पिटलमध्यें क्लिनिकल असिस्टंट, हाउस सर्जन, ऑफथॅल्मिक हाउस सर्जन अशीं अनेक कामें केल्यानंतर हे इंडियन मेडिकल सर्व्हिसमध्यें शिरले (१९१७).

पहिल्या महायुद्धांत इजिप्शियन एक्सपिडिशनरी फोर्समध्यें (१०५ वी मराठा लाइट इन्फन्ट्री) काम केल्यानंतर हे हिंदुस्थानांत आले व प्रथम फिजिऑलजीचे प्राध्यापक, नंतर डीन असे चढत चढत हे मुंबईच्या ग्रॅन्ट मेडिकल कॉलेजचे प्रिन्सिपल बनले (१९३७). तें व जे. जे. हॉस्पिटल्सच्या सुपरिंटेंडेन्टचें काम केल्यानंतर हे सरकारी नोकरींतून निवृत्त झाले (१९४१). त्यानंतर इंडियन मेडिकल सर्व्हिसचे डायरेक्टर जनरल म्हणून यांची नेमणूक झाली.

इंडियन जर्नल ऑफ मेडिकल रिसर्च व इंडियन मेडिकल गॅझेटमधून यांचे अनेक संशोधक निबंध प्रसिद्ध झाले आहेत.

भाटे, गोविंद चिमणाजी—(जन्म स. १८७० सप्टें. १९–मृत्यु स. १९४६ एप्रिल २६) सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजचे पहिले प्रिंसिपल, प्रमुख समाजसुधारक व मराठींतील प्रसिद्ध लेखक.

यांचा जन्म महाडला झाला. एम्. ए. झाल्यावर हे पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांत इंग्रजी व तत्त्वज्ञान या विषयाचे प्राध्यापक म्हणून काम करूं लागले. सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजच्या स्थापनेंत विशेष पुढाकार घेऊन सेवानिवृत्त होईपर्यंत हे तेथें प्रिंसिपल होते. महाराष्ट्रांतील आरंभींच्या कर्तृत्ववान् समाजसुधारकांत यांची गणना असे. विधवाविवाहास प्रोत्साहन मिळावें व जातिभेदाचें निर्मूलन व्हावें म्हणून यांनीं पुनर्विवाह व मिश्रविवाह केला. ऐतिहासिक दप्तरें तपासण्याकरितां यांनीं वर्षभर इंग्लंडमध्यें मुक्काम केला होता. यांचीं प्रवासावरचीं पुस्तकें तेव्हां चांगलींच लोकप्रिय होतीं. याशिवाय यांनीं अनेक विषयांवर मराठी व इंग्रजी पुस्तकें लिहिलीं आहेत.

समाजाच्या घटनेचा मूलगामी विचार न करितां एखाद्या सुधारणेनें सर्व समाजाचा उद्धार साधण्याच्या कालांत यांच्यासारखे तळमळीचे कार्यकर्ते धडाडीनें पुढें सरसावले. यांनीं पत्करलेल्या मार्गाबद्दल मतभेद झाला तरी यांची धडाडी व तळमळ यांबद्दल कोणालाहि आदरच व्यक्त करावा लागेल.

यांचे ग्रंथ—१ अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें, २ कार्लाइल, ३ हिंदु चालीरीती, ४ तीन तत्त्ववेत्ते, ५ कलाविषयक तत्त्वज्ञान, ६ प्रेम कीं लौकिक (आत्मचरित्रपर कादंबरी), ७ कँट व शंकराचार्य, ८ भाषणें व निबंध (इंग्रजी), ९ मराठी वाङ्मयाचा इतिहास (इंग्रजी) इत्यादि.

भातखंडे, विष्णु नारायण—(जन्म स.१८७५–मृत्यु स. १९३६ सप्टें.) भारतीय संगीताचे सुप्रसिद्ध अभ्यासक व संकलनकार.

जात चित्पावन ब्राह्मण. १८९० सालीं हे एल्एल्. बी. झाल्यावर मुंबईस वकिली करूं लागले. यांना लहानपणापासून गायनाचा नाद असे. यांनीं गायनाचा प्रत्यक्ष अभ्यास रावजीबुवा बीडकर, बेलबाग पुणें येथील गवई, व जयपूरचे मुहम्मद अल्लीखाँ यांजपाशीं केला. यांनीं मुहम्मद अल्लीखांच्या तीनशें चिजांचें रेकार्ड घेऊन ठेवलें आहे. यांनीं आपल्या हिंदुस्थान संगीत पद्धतीच्या संवादात्मक चार भागांत सुमारें दोनशें चिजांचें उत्कृष्ट विवरण केलें आहे. त्यांत रागांची माहिती व चिजांचें नोटेशन आढळतें. यांच्या क्रमिक पुस्तकांच्या एक ते सहा भागांत कांहीं अप्रसिद्ध रागांचा संग्रह आहे. यांनीं चतुर पंडित असें नांव घेऊन आधुनिक संगीत उदाहरण व

लक्षण अशा स्वरूपांत संस्कृतांत लक्ष्यसंगीत या ग्रंथांत ग्रथित केलें आहे (१९१०).

याशिवाय यांचा अभिनवरागमंजरी नांवाचा ग्रंथ आहे. हे सर्व ग्रंथ म्हणजे नव्याजुन्या संगीताचा ज्ञानकोशच होय. यांनीं ग्वाल्हेर व लखनौ येथें संगीत कॉलेजें काढलीं व पांच भारतीय स्वरूपाच्या संगीतपरिषदा भरविल्या.

भानू, प्रा. चिंतामण गंगाधर—(जन्म स. १८५६–मृत्यु स. १९३०) मराठींतील सुप्रसिद्ध लेखक व वक्ते.

नाना फडणीसाच्या मेणवली गांवीं यांचा जन्म झाला. सातारा येथें माध्यमिक शिक्षण संपवून व ओव्हरसीयरची परीक्षा देऊन १८८४ त हे बी. ए. झाले व फर्ग्युसन कॉलेजांत इतिहासाचे प्राध्यापक झाले. इतिहास विषय हौसेनें व मनोरंजक तऱ्हेनें शिकवण्याबद्दल यांची प्रसिद्धि असे. पुण्याचे न्यू इंग्लिश स्कूलचेहि हे कित्येक दिवस प्रमुख होते.

मराठ्यांचा इतिहास मराठ्यांनींच लिहिला पाहिजे असें यांचें ठाम मत होतें आणि त्या दृष्टीनें यांनी साधनांचा अभ्यासहि सुरू केला होता. नानासाहेब पेशवे आळशी व विलासी होते हें ग्रँट डफचें म्हणणें यांनीं खोडून काढलें (१८९३). शिवाजीनें अफजलखानाचा वध विश्वासघातानें केला नसून त्याच्या विश्वासघाताचा प्रतिकार करून आत्मसंरक्षण करण्यासाठीं शिवाजीला त्याचा वध करावा लागला हें यांनीं आपलें मत प्रथम डेक्कन कॉलेजांत प्रो. बेन यांच्या अध्यक्षतेखालीं व्याख्यान देऊन सांगितलें. याच मताचा अनुवाद पुढें शिवाजीचे उत्सवांतील व्याख्यानांत यांनीं केला आणि त्या वेळचे अध्यक्ष लो. टिळक यांनीं जें भाष्य केलें तें निमित्त मात्र घेऊन टिळकांवर पहिला राजद्रोहाचा खटला भरण्यांत आला. यांना सुद्धां आपलें प्राध्यापकाचें काम दोन वर्षेपर्यंत त्यामुळें सोडावें लागलें.

याच दोन वर्षांच्या सक्तीच्या विश्रान्तीच्या वेळीं यांनीं वेदान्ताचा अभ्यास करून 'भगवद्गीता' मासिक रूपानें वाचकांपुढें मांडण्यास सुरुवात केली आणि त्या गीतेच्या उपसंहाराचें काम यांनीं १९१० सालीं पुरें केलें. वेदान्ताबरोबर यांनीं कीर्तनकलेचाहि अभ्यास केला. न्यू इंग्लिशकरितां नानावाडा इमारत बांधण्यास निधि जमविण्याचे बाबतींत यांना व्याख्यानापेक्षां कीर्तनकलेचाच अधिक उपयोग झाला. सेवानिवृत्तीनंतर हे अमळनेरच्या तत्त्वज्ञानमंदिरांतहि पांच वर्षें होते.

इतिहास, तत्त्वज्ञान इत्यादि विषयांप्रमाणें यांना नाट्यशास्त्राचीहि आवड होती. नाट्यशास्त्रावर यांनीं अनेक लेख लिहिले, नाट्यसंमेलनाचें अध्यक्षस्थान भूषित केलें व महाराष्ट्र नाटक मंडळींतील नटास अभिनयाचें शिक्षणहि हे देत. तसेंच यांनीं दोन कादंबऱ्याहि लिहिल्या आहेत. असे हें सर्वगामी बुद्धीचे प्रचंड उद्योग करणारे स्वाभिमानी गृहस्थ होते.

भाभा, होमी जहांगिर—(जन्म स. १९०९) सुप्रसिद्ध पारशी गणिती व शास्त्रज्ञ.

कॅथेड्रल व जॉन कॅनन स्कूलमध्यें आपलें माध्यमिक व मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेज व रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथें आपलें विश्वविद्यालयीन शिक्षण संपविल्यानंतर हे गणित व विज्ञान यांचे उच्च शिक्षणाकरितां इंग्लंडला रवाना झाले. केंब्रिजच्या गॉनव्हिल व कॉयस कॉलेजमध्यें अध्ययन करून हे बी. ए. व गणिताची रौस बॉल ट्रव्हलिंग शिष्यवृत्ति मिळवून पीएच्. डी. झाले (१९३४). यानंतर यांना विज्ञानाचे विशेष अभ्यासासाठीं ऐडॅम न्यूटन शिष्यवृत्तिहि मिळत असे. १८५१ सालच्या पुरातन प्रदर्शनाचेहि हे कांहीं दिवस अभ्यासक होते (१९३६).

हिंदुस्थानांत आल्यानंतर यांची बंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्यें थिऑरिटिकल फिजिक्सचे स्पेशल रीडर म्हणून नेमणूक झाली (१९४०). यानंतर यांनीं इन्स्टिट्यूटमध्यें कॉसमिक रे रिसर्च युनिटचे प्राध्यापक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. परंतु पुढें मुंबईला टाटांनीं टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फन्डॅमेन्टल रिसर्च स्थापना करतांच यांची तेथें प्रमुख डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली (१९४५). तेथें हे थिऑरिटिकल फिजिक्सच्या प्राध्यापकांचें कामहि करतात.

हिंदुस्थानच्या शास्त्रीय अघाडीवरील अगदीं तरुण लोकांत हे प्रमुख आहेत. शास्त्रांच्या विज्ञान शाखेंतील क्वॉन्टम थिअरी, प्राथमिक वैज्ञानिक परिमाणूंचा सिद्धान्त व कॉस्मिक रेडिएशनचे यांना सर्व हिंदुस्थानांत दर्दी मानण्यांत येतें. या विषयांवर यांनीं लिहिलेल्या लेखांची सर्वत्र वाहवा झाली आहे.

पाटणा युनिव्हर्सिटीनें यांना बाहुमानिक डी. एस्सी. केलें असून इंग्लंडमधील रॉयल सोसायटीचे फेलो होण्याचा मानहि यांना मिळाला आहे.

भारती, सुब्रह्मण्य—(जन्म स. १८८२–मृत्यु स. १९२१ सप्टें.) तामीळ भाषेतील सुप्रसिद्ध राष्ट्रीय कवि, वक्ते, लेखक, वृत्तपत्रचालक, तत्त्वज्ञ व क्रान्तिकारक.

यांचे वडील एट्टायपुरम् (जि. तिनिवेल्ली) संस्थानांत नोकरीस होते. ते तामीळ पंडित असून त्यांच्यामुळें यांना तामीळमध्यें कविता करण्याचा नाद लागला आणि भारती हें गौरवदर्शक उपपद प्राप्त झालें. वडील वारल्यावर हे बनारसला गेले व तेथें यांचें प्रवेश परीक्षेपर्यंत शिक्षण झालें. मात्र पुढें यांनीं देशी व परदेशी अनेक भाषांचें ज्ञान संपादन केलें.

वयाच्या एकोणिसाव्या वर्षापासून यांना उपजीविकेकरितां नोकरी करावी लागली. प्रथम मदुरेच्या सेतुपति हायस्कूलमध्यें शिक्षक व नंतर श्री. सुब्रह्मण्य अय्यर यांच्या स्वदेशमित्रम् या पत्राचे उपसंपादक म्हणून काम केलें. पुढें यांनीं इंडिया नांवाचें तामीळ साप्ताहिक स्वतःच्या जबाबदारीवर सुरू केलें. तेव्हां यांच्या लेखणींतील राष्ट्रीय वृत्ति, प्रखरता, सूक्ष्म विनोद, मर्मच्छेद, टवाळी व व्यंगचित्रण वगैरे गुणांचा तामीळ जनतेला परिचय होऊन यांच्याकडे तरुणांचें पुढारीपण आलें. ओघानें सरकारच्या अवकृपेस पात्र होऊन यांना फ्रेंचांच्या पांदेचरीस आश्रय घ्यावा लागला. तेथील एकान्तवास यांना यमयातनेपेक्षां कष्टप्रद झाला. कालिदास व शक्तिदास या नांवांनीं हे लिहीत. पण यांना आर्थिक हलाखीनें अक्षरशः अर्धपोटी राहून दिवस कंठावे लागले. मात्र अरविंद घोषांच्या सहवासानें यांचें लक्ष तत्त्वज्ञानाकडे वेधिलें आणि जाज्वल्य राष्ट्रभावनेबरोबरच उदात्त तत्त्वज्ञानहि यांच्या काव्यादिकांतून प्रगट होऊं लागलें. या हलाखीच्या स्थितींतच यांच्या हातून यांचें नांव अमर करणाऱ्या वाङ्मय कृति निर्माण झाल्या. सुमारें दहा वर्षें तिकडे राहून हे पुनः मद्रास प्रान्तांत परत झाले (१९१८) आणि अनेक आपत्तींतून मार्ग काढीत हे पुनः 'स्वदेशमित्रम्'चे उपसंपादक झाले (१९२०). पण या क्रान्तिकारक महाकवीचा जर्जर देह लवकरच कालाधीन झाला.

यांचें लेखन सूक्ष्म, समृद्ध व तेजस्वी असून त्याचे गद्य व पद्य असे दोन विभाग आहेत. पद्यांत देश, देव व तत्त्वज्ञान असे व गद्यांत चिकित्सा, भाषान्तर, टिप्पण व सूक्ति असे भाग पडतात. त्यांत ऋग्वेदान्तर्गत कथाविषयापासून गीता, पातञ्जलसूत्रें, स्त्रीजीवन व अस्पृश्यता वगैरे अनेक विषय आले आहेत. हें सर्व लेखन तामीळ जनतेचा उत्कर्ष करण्याच्या तळमळीनें लिहिलें असल्यानें त्यांत कमालीचा जिव्हाळा आहे.

यांचा स्मृतिसप्ताह १९४६ सालीं आठवडाभर साजरा करण्यांत आला. त्याचें उद्घाटन मद्रासचे नगराध्यक्ष राधाकृष्ण पिल्ले यांनीं केलें. यांच्या स्मारकार्थ चक्रवर्ति राजगोपालाचारी प्रभृति तामीळ पुढाऱ्यांनीं निधि जमा केला. यांच्या कविता क्रमिक पुस्तकांत घालण्यास व म्हणण्यास बंदी उठविण्यासंबंधीं सर्वत्र ठराव झाले. यांच्या स्मारकाचा आराखडा मद्रासचे महाराष्ट्रीय शिल्पज्ञ चितळे यांनीं केला.

यांच्या कवितांची तुलना ॲटमबाँबशीं करण्यांत येतें. नमुन्याकरितां यांच्या सुप्रसिद्ध 'वंदे मातरं एनपों एंगळा मानिन तायै वणङ्गुतु एनपों' या तामीळ गीताचे बार्शीचे ज. गं. करंदीकरकृत भाषान्तर पुढें दिलें आहे.

तुला वंदुं माते ! तुझें गीत गाऊं,
जगीं तूं अम्हां मायभू देवता ।
अहा ! जातिपंथांचिया पार जाऊं,
निनादूं तुझी भूतलीं दिव्यता ।
असो विप्र वा अन्यवर्णीय कोणी,
तुझ्या वैभवा वानिती सर्वथा,
कधींहि न त्या अंत्यजा हीन मानूं
न साहे अता भिन्नता ही वृथा ॥१॥

जरी जन्मलों भिन्नवर्णीय आम्ही,
तरी नांदतों एकठायीं सुखें ।
कसे अंत्यजांना स्वयें दूर लोटूं ?
अम्हांला कधींहि न ते पारखे ।
नको ही परंतू परांची गुलामी
बहू जाहली जी अता तापदा ।
त्वरें एक होऊनियां सर्व वंदूं
मुदें मायभूमीचिया सत्पदा ॥२॥

किती एक ते राहुं द्या धर्म येथें,
तसे पंथ सारे सहस्रावधी ।
परी या विदेशीय सत्ताधिपांना,
रिता ठाव येथें न देऊं कधीं ।
असे हिंदभू आमची एक माता,
तिचीं सर्व आहों अम्ही लेकरें ।

किती आमुचे वाद होवोत येथें,
तरी बंधु भाईच आम्ही खरे ॥३॥
अहा ! जोंवरी ऐक्य राहील देशीं,
असे आमुच्या जीवना धन्यता ।
परी दुर्गतीच्या दरीमाजिं जाती,
मनीं भेद जे ठेविताती वृथा ।
सदा मानसीं सत्य हें जागवीतां,
असे काय विश्वांत आम्हां उणें ?
त्वरें इष्ट तें साध्य होईल सारें,
करूं आमुचें सार्थ लोकीं जिणें ॥४॥

भालेराव, श्रीधर गणेश ऊर्फ 'भारद्वाज'—(जन्म स. १८९० मे ४) तत्त्वज्ञानी, नवविचारप्रवर्तक व अभ्यासी.

जन्मस्थान वीर (जि. पुणें). हे तेथें प्राथमिक शिक्षण घेऊन पुणें येथें आले. नंतर मॅट्रिक व बी. एजी. होऊन कांहीं ठिकाणीं खासगी नोकऱ्या केल्यावर शेतकीखात्यांत नोकरी करून सेवानिवृत्त झाले (१९१९-१९४५). नोकरींत असतां यांनीं भात, बाजरी, एरंडी, तंबाखू वगैरेंच्या महत्त्वाच्या जाती शोधून काढल्या. हे विडीच्या व सिगारेटच्या तंबाखूपिकाचे तज्ज्ञ समजले जातात. या पिकांबाबत यांचें कांहीं ग्रंथलेखनहि आहे.

यापेक्षां यांचा तत्त्वज्ञानाचा अभ्यास विशेष असून यांनीं त्या दृष्टीनें केलेलें ग्रंथलेखनहि महत्त्वाचें आहे. भगवद्गीतेची मांडणी ढिली आहे असें गीतारहस्याच्या वाचनानें लक्षांत येतांच यांनीं श्रीमद्भगवद्गीतेचें रचनान्तर करून त्या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. व्यक्तीला पुनर्जन्म नसून पुनर्जनन असतें असें प्रतिपादणारा 'पुनर्जन्म विरुद्ध पुनर्जनन' हा ग्रंथ लिहिला. तात्त्विक दृष्टीनें स्थलकालाच्या स्वरूपाचा अभ्यास करण्याकरितां यांनीं आइन्स्टाइनच्या सापेक्षतासिद्धान्ताचें परिशीलन करून मराठींत 'आइन्स्टाइनप्रणीत सापेक्षदर्शन' हा अत्यंत गहन पण अद्ययावत् शास्त्रीय दृष्टीचा ग्रंथ प्रसिद्ध केला. यांनीं आजवर ४६ निबंध व ३ ग्रंथ प्रसिद्ध केले असून यांचे अशाच महत्त्वाच्या तात्त्विक विषयांवर ११ ग्रंथ लिहून तयार आहेत. यांच्या विचारांत नेहमीं कांहीं तरी नवीनपणा असतो. यांच्या तत्त्वज्ञानांतहि असाच नवीनपणा आहे. 'जग हें केवळ निर्गुण ब्रह्मरूप नसून तें तसें असतांहि ब्रह्माचें तत्कृत तदन्तर्बाह्यव्याप्त सुकृत ब्रह्मरूप आहे व वस्तु, व्यक्ति, विभूति, अवतार, ईश्वर ही ब्रह्माचीं उत्तरोत्तर श्रेष्ठ सुकृत रूपें असून या विकासाबाबतहि ब्रह्म अनन्त व पुनश्च अव्यय आहे' असा यांचा प्रमुख सिद्धान्त असून त्याला हे आपला श्रौत सुकृताद्वैत वेदान्तवाद म्हणतात (तस्मात् तत् सुकृतं उच्यते).

ही यांनीं आपल्या तत्त्वज्ञानाची मूलभूत कल्पना अनेक निबंध व सूत्रबद्ध ग्रंथांच्या द्वारां मांडली असून ते ग्रंथ प्रसिद्धीच्या मार्गावर आहेत. शास्त्रीय परिभाषा, शास्त्रीय ग्रंथनिर्मिति, सुप्रजाजनन विचार, तत्त्वज्ञान, तत्त्वाभ्यास, चरित्रकोश वगैरे अनेक मंडळें काढण्यांत यांचा प्रमुख भाग आहे व बहुतेकांत हे अधिकारी आहेत. पुणें व नडियाद येथें सप्ताहभर चर्चा करून 'वैयक्तिक अमरत्व' व 'युद्धें कां होतात व ती कशीं थांबवावींत' यांवर यांनीं अनुक्रमें एक पुस्तक व एक निबंध प्रसिद्ध केला आहे.

भावे, विनायक लक्ष्मण—(जन्म स. १८७१-मृत्यु स. १९२६) जुन्या मराठी काव्याचे अभ्यासक, इतिहाससंशोधक, ग्रंथलेखक आणि सार्वजनिक कार्यकर्ते.

यांचे वडील ठाण्यास वकिली करीत म्हणून पळस्पेहून लहानपणींच ठाण्यास आले. बी. एस्सी. झाल्यानंतर एलएल्. बी.चा अभ्यास सोडून यांना वडिलांनीं सुरू केलेल्या पण कर्जात असलेल्या मिठागराच्या धंद्यांत पडावें जागलें. हळुहळू जम बसत चालला व सामान्य स्थितींतून हे त्या धंद्यावर लक्षाधीश बनले.

यांना शाळेंत असल्यापासून मराठींतील प्राचीन कवि व त्यांची कविता यांच्या अभ्यासाचा नाद असे. हेडमास्तर जनार्दन बाळाजी मोडक यांच्या सहवासानें तो नाद वाढीस लागला. कॉलेजांत असतांच 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथाची पहिली आवृत्ति यांनीं तयार केली आणि प्रा. वि. गो. विजापूरकर यांच्या ग्रंथमालेंत ती प्रसिद्ध केली (१८९५). यांच्या हयातींतच यांनीं उपलब्ध नव्या माहितीची भर घालून त्या ग्रंथाची दुसरी आवृत्ति व तिसऱ्या आवृत्तीचा पूर्वार्ध काढला व यांच्या टिपणांवरून उत्तरार्ध यांच्या मुलांनीं प्रसिद्ध केला. यांचें 'चक्रवर्ति नेपोलियन'चें चरित्रहि अगदीं नव्या पद्धतीनें लिहिलेलें असून शिवाजीशीं केलेल्या तुलनेमुळें मराठींत त्या ग्रंथाला एक विशेष स्थान आहे (१९१७). मराठ्यांच्या इतिहासाचीं अस्सल पत्रें प्रसिद्ध करण्याकरितां यांनीं मराठी दप्तराचे रुमाल प्रसिद्ध करण्यास सुरवात केली. त्याच्या प्रस्तावनेंत प्रसिद्ध केलेल्या पत्रामुळें नवी माहिती कोणती उजेडांत

आली हें दाखविल्यानें त्या दप्तरांना महत्त्व आलें आहे. मराठी ग्रंथालय ठाणें येथें स्थापून (१८९३) यांनी मराठी ग्रंथालयें काढण्याची नवी पद्धत सुरू केली. त्यातर्फे 'महाराष्ट्र कवि' हें मासिक चालविलें (१९०३-०८). यांतून अनेक प्रकरणें स्वतंत्र पुस्तकरूपानें काढण्यासारखीं यांनीं प्रसिद्ध केलीं. यांनीं पुण्याच्या महिलाविद्यालयास पन्नास हजारांचे बाँड देऊं केले व चिरोलकेसच्या वेळीं लो. टिळकांना एक लाख रुपये उसने दिले होते. मराठी वाङ्मय व इतिहास हा यांचा छंद होता.

भावे, विनोबा नरहर—(जन्म स. १८९४) वर्ध्याच्या ग्रामसेवा मंडळाचे प्रमुख, गांधीवादाचे सुप्रसिद्ध अनुयायी, मराठींतील उत्कृष्ट लेखक व नवमार्ग-प्रदर्शक.

कोंकणांतील गागोदे हें खेडें यांचें जन्मस्थान. यांचें सर्व बालपण तेथेंच गेलें. पुढें बडोद्याहून इंटरच्या परीक्षेसाठीं हे घराबाहेर पडले व यांनीं काशी गांठली. तेथें संस्कृतचें अध्ययन करीत. म. गांधींशीं पत्रव्यवहार करून व त्यांनीं दिलेलें 'विनोबा' हे नांव स्वीकारून यांनीं साबरमतीच्या आश्रमांत प्रवेश केला. यानंतर वाईला येऊन श्री. नारायणशास्त्री मराठे यांचे जवळ ब्रह्मसूत्रावर विचारविनिमय केल्यानंतर यांनीं वर्धा येथें सत्याग्रहश्रमाचें प्रमुख म्हणून काम करण्यास सुरुवात केली.

चरखा, सत्याग्रह, ग्रामोद्योग अशा गांधीजींच्या सूत्रांचा यांनीं मोठ्या निष्ठेनें पाठपुरावा केला असून १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहांतील पहिले आदर्श सैनिक म्हणून गांधींनीं यांची निवड केली. हे झकीर हुसेन कमेटीचे सदस्य असून यांनीं वर्धाशिक्षण योजनेला पुष्कळ मदत केली. यांना अनेक भाषा येतात. यांनीं अरबींतून कुराणाचा अभ्यास केला.

वर्ध्याचा यांचा आश्रमहि गांधींजीच्या आश्रमाच्या आदर्श व्याख्येबरहुकुम चालविला जातो. यांच्या मार्गदर्शकत्वानें महारोग्यांचें रुग्णालय, चर्मालय, प्रकाशनसंस्था वगैरे चालविण्यांत येतात. या आश्रमांतून ग्रामसेवावृत्त हें मासिकहि कित्येक वर्षें चालविलें जातें. महारोग, धर्मपद, वस्त्रपूर्णा, ओटना व धुनना इत्यादि ग्रंथ या आश्रमातर्फे प्रसिद्ध झाले.

गीता, उपनिषदें, जुने अभंग यांचे भाविक अभ्यासी व मार्मिक परीक्षणकार अशी यांची प्रसिद्धि आहे. महाराष्ट्र धर्म हें मासिक यांनीं सुरू केलें व पुढें त्यांचें साप्ताहिकांत रूपान्तर केलें. या साप्ताहिकांत 'तुकारामाचे अभंग' या नांवाखालीं तुकारामाचे निवडक अभंग, त्यांवरील भाष्य व ज्ञानेश्वरींतील त्यांशीं समानार्थक ओव्या हे देत असत.

याशिवाय धुळ्याच्या तुरुंगांत असतां भगवद्गीतेचें 'गीताई' या नांवाचें समश्लोकी भाषांतर यांनीं केलें. गांभीर्य, प्रसाद या गुणांबरोबरच सोपेपणामुळें हें पुस्तक सर्वत्र अतिलोकप्रिय झालें. यांचे बंधु शिवाजी यांनीं सर्वत्र या ग्रंथाचा प्रसार केला असून आतांपर्यंत त्याच्या लक्षावधी प्रति महाराष्ट्रांत खपल्या. याशिवाय धुळ्याच्या तुरुंगांत यांनीं गीतेवर दिलेल्या प्रवचनांचा सारांश श्री. सानेगुरुजी यांनीं 'गीताहृदय' या नांवानें प्रसिद्ध केला.

न बोलतां जगाच्या कल्याणांत निमग्न असणाऱ्या प्राचीन ऋषीमुनींचा आदर्श यांचे डोळ्यांसमोर आहे. आपल्या आश्रमांतहि प्राचीन आश्रमांचें पावित्र्य व शिस्त राखण्यावर यांचा कटाक्ष असतो.

नवे विचार अत्यंत थोडक्यांत व सोप्या भाषेंत मांडण्याबद्दल यांची प्रसिद्धि आहे. कांहीं नवें सांगावयाचें असल्याशिवाय हे लिहीतच नाहींत.

यांच्या खालील काव्यपंक्ति गांधीवादाच्या प्रमुख अधिष्ठान बनल्या आहेत:—

'अहिंसा, सत्य, आस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह,
शरीरश्रम, अ-स्वाद, सर्वत्र भयवर्जन,
सर्वधर्मी समानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना
हीं एकादश सेवावी नम्रत्वें व्रतनिश्चयें'

हिंदीतील विख्यात कवि वियोगी हरी यांनीं यांच्या हिंदी लेखांचा संग्रह 'विनोबा और उनकी विचार' या नांवानें प्रसिद्ध केला.

यांचे ग्रंथ—(१) चार अंक (महाराष्ट्र धर्म मासिकाचे), (२) मधुकर, (३) मूळ उद्योग-कातणें, (४) स्वराज्यशास्त्र, (५) विचारपोथी, (६) गीताई, (७) गीताप्रवचनें, (८) जीवनदृष्टि, (९) अभंगव्रतें, (१०) विचारपोथी, (११) संतांचा प्रसाद. यांशिवाय एकनाथाचीं भजनें, ज्ञानदेवाचीं भजनें, नामदेवाचीं भजनें इत्यादि संपादित ग्रंथ.

भावे, विष्णु अमृत ऊर्फ विष्णुदास—(जन्म स. १८१८–मृत्यु स. १९०१) महाराष्ट्रांतील पौराणिक नाटकाचे आद्यप्रवर्तक.

हे सांगली संस्थानचे अधिपति श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांचे आश्रित होते. स. १८४२ सालीं सांगली येथें उत्तर कानडा प्रान्तांतील भागवत नाटक मंडळीनें कानडी खेळ करून दाखविले. त्याप्रमाणें खेळ करण्याविषयीं यांना श्रीमंतांनीं सांगतांच यांनीं स. १८४३ मध्यें मराठी पौराणिक नाटकाचा प्रयोग श्रीमंतांपुढें करून दाखविला. हे स्वभावतःच हरहुन्नरी व गुणग्राहक असल्यानें श्रीमंतांच्या साहाय्यानें स्वतः कवनें करून यांनीं नाटकाची स्वतःच्या कल्पनेनें अभिनव मांडणी केली. किरीटकुंडलें वगैरे यांनीं स्वतः तयार केलीं. सीतास्वयंवर नाटकानंतर यांनीं रामायणांतील कथाप्रसंगावर दहा नाटकें बसविलीं. तीं नाटकें पाहून श्रीमंत खूष झाले व सोंगें घेणाऱ्या लोकांस त्यांनीं बक्षिसें वांटलीं.

प्रथमतः सूत्रधारानें पडद्याबाहेर एका बाजूस उभें राहून मंगलाचरण करावयाचें, नंतर वनचराचा वेष घेऊन विदूषकानें प्रवेश करावयाचा, त्याचा नाच व विनोदपर संवाद झाल्यावर नाटक कोणतें करावयाचें हें सूत्रधारानें सांगून पात्रांची सिद्धता करावयास सांगावयाचें, नंतर गजानन व सरस्वती यांची प्रार्थना करून त्यांचा आशीर्वाद घ्यावयाचा, सूत्रधारानें प्रसंग सांगून देव, राक्षस व त्यांच्या स्त्रिया यांच्या अनुक्रमें कचेऱ्या (प्रवेश) घडवून त्यांत उलट पक्षाच्या पाडावाच्या व जय मिळविण्याच्या गोष्टी–अशा क्रमानें यांच्या नाटकाची रचना असे.

सर्व कवनें सूत्रधार म्हणे. कथाभागाला अनुसरून होणारीं भाषणें आगाऊ लिहून काढून पाठ केलेलीं नसत; प्रायः प्रासंगिक स्वयंस्फूर्तीवर भर असे. विदूषक व सूत्रधार हीं दोन पात्रें मुख्य असून त्यांना कोणत्याहि कामाकरितां आरंभापासून शेवटपर्यंत सज्ज राहावें लागे. प्रथम रामायणांतील कथाभाग घेऊनच यांनीं खेळ केल्यामुळें पुढें भारतांतील कथाभाग घेऊन यांनीं खेळ केले, तरी यांच्या खेळाला 'रामावताराचे खेळ' असेंच लोक म्हणत. स. १८५१ सालीं श्रीमंत चिंतामणराव सांगलीकर वारले. तेव्हां यांचा आश्रय तुटून यांनीं कोल्हापूर, पुणें, मुंबई वगैरे ठिकाणीं हिंडून प्रयोग करून दाखविले. चोहोंकडे यांच्या या उपक्रमाची प्रशंसा झाली. गोपाळराव मनोळीकर (सूत्रधार), रघुपति फडके (स्त्रीपात्र), बापू ताके (राक्षस) वगैरे नट यांच्या मंडळींत चांगले होते. १८६१ पर्यंत यांनीं हा धंदा केला. हरिश्चंद्र, रास वगैरे यांचे खेळ प्रेमळ होत. यांची मंडळी सांगलीकर नाटक मंडळी या नांवानें प्रसिद्ध होती.

नाटक मंडळी मोडल्यावर यांनीं कळसूत्री बाहुल्यांचा नाटकाप्रमाणें खेळ तयार केला. यांनीं लांकडी पण सुबक चित्रें सुंदर वेषासह स्वतः हातानें तयार केलीं. या चित्रांकरवीं हे रासांत गोफ विणणें, अभिनयासहित नृत्य करणें, पैलवानांकडून जोडीच्या तऱ्हेतऱ्हेच्या फेंका करविणें इत्यादि बिकट कामेंहि करवीत (१८८०). यापुढें यांनीं सांगली येथें इंजिनियर खात्यांत नोकरी पत्करिली. बांधकाम, सुतारकाम, लोहारकाम, मातकाम यांतहि हे आपला विशेषपणा व्यक्त करीत.

भांडारकर, डॉ. सर–रामकृष्ण गोपाळ— (जन्म स. १८३७–मृत्यु स. १९२५ जून १४) आंतरराष्ट्रीय कीर्तीचे महाराष्ट्रीय संस्कृत पंडित व प्राच्यविद्यासंशोधक.

यांचें सारस्वत ब्राह्मणाचें घराणें मालवणकडे पत्की या नांवानें प्रसिद्ध आहे. यांचे वडील गोपाळ लाडको भांडारकर हे मामलेदार कचेरींत कारकून होते. मालवण, राजापूर व रत्नागिरी येथें आपलें माध्यमिक शिक्षण संपवून हे मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कुलांतून मॅट्रिक व दक्षिणा फेलो झाले. या वेळीं गोविंदशास्त्री लेले, अप्पाशास्त्री खाडिलकर व अनंतशास्त्री पेंढारकर यांचेजवळ यांनीं संस्कृत भाषेचें सूक्ष्म अध्ययत केलें. पुढें मुंबई युनिव्हर्सिटीच्या स्थापनेनंतर पुन्हां मॅट्रिक एफ. वाय., बी. ए. होऊन हे एम्. ए. झाले.

१८६४ सालीं फेलोशिपचा राजीनामा देऊन हे हैदराबाद(सिंध)च्या हायस्कूलचे हेडमास्तर असतां यांनीं आपलीं संस्कृतचीं दोन पुस्तकें प्रसिद्ध केलीं. यानंतर मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजांत यांना संस्कृत भाषेच्या असि. प्रोफेसरची जागा देण्यांत आली. पुढें कॉलेजमधील संस्कृतच्या मुख्य प्राध्यापकाची जागा यांना न देतां यांचे मागाहून आलेल्या पीटर्सनला देण्यांत आली. परंतु यानंतर पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत कीलहॉर्ननंतर संस्कृतचे प्राध्यापक म्हणून यांची नेमणूक झाली व शेवटपर्यंत हे तेथेंच असत. विद्यार्थ्यांत अतिलोकप्रिय प्राध्यापक म्हणून यांची प्रसिद्धि असे.

पतंजलीच्या कालासंबंधीं इंडियन ॲन्टिक्वेरीतून यांनीं वेबरशीं केलेला वाद हें यांचें सुरुवातीचे संशोधन होय. ख्रिस्तपूर्व दुसरें शतक हा पतंजली व त्याच्या महा-

भाष्याचा काळ इतर संशोधकांना मान्य करावयास लावून यांनीं पुढें महाभाष्यांतील सात उताऱ्यांचे साहाय्यानें कृष्ण व भगवद्गीता यांचें प्राचीनत्व सिद्ध केलें. कृष्ण ही ख्रिस्ताची भ्रष्ट नक्कल आहे, भगवद्गीतेचा उगम बायबलमध्यें आहे, या परदेशी पंडितांच्या मुद्द्यांचें यांनां पातंजलमहाभाष्यांतील कृष्ण व गीता यासंबंधीचे अतिपरिचित भावना स्पष्ट करणारे उतारे दाखवून खंडन केलें.

मुंबई सरकारच्या हस्तलिखितांच्या खात्याचे संपादक या नात्यानें यांनीं केलेली कामगिरीहि अशीच महत्त्वाची आहे. बूलर यांचेनंतर त्या खात्याचे प्रमुख म्हणून कीलहॉर्न व त्यांचे सहकारी म्हणून यांची नेमणूक झाली. कीलहॉर्न यांचे निवृत्तीनंतर मात्र हे व पीटर्सन हेच त्या खात्याचे प्रमुख बनले. यांच्या स्वतःच्या संशोधनांपैकीं जैन विहारांत स्वतः जाऊन जैन वाङ्मयाच्या यांनीं केलेल्या संशोधनामुळें ही एक नवीनच अध्ययनशाखा हिंदुस्थानांत उत्पन्न झाली. याचबरोबर प्राचीन वैष्णवपंथ, चालुक्य घराणें, काश्मीरांतील शैव सांप्रदाय व रामानुजांचें तत्त्वज्ञान यासंबंधीचे यांचें विस्तृत संशोधन विशेष महत्त्वाचें मानलें जातें.

Early History of the Deccan (मुंबई गॅझेटियर १८८४) व Outlines of Vaishnavism, Shaivism and Minor Religious Sects (बूलर यांच्या एनसायक्लोपिडीया ऑफ इन्डोआर्यन रिसर्चमधील एक भाग १९१३) हे यांचे ग्रंथहि या हस्तलिखित ग्रंथांच्या यांच्या व्यासंगांतूनच उत्पन्न झाले. यांपैकीं पहिल्या ग्रंथानें यांना अखिल भारतीय व दुसऱ्यानें आंतरराष्ट्रीय कीर्तीचा लाभ करून दिला. मुंबईच्या विल्सन फायलॉलॉजिकल लेक्चर्सची पहिली व्याख्यानमाला गुंफण्याचा मानहि यांना देण्यांत आला.

शैव, वैष्णव पंथांसंबंधींच्या आपल्या ग्रंथांत यांनीं त्या त्या पंथांचे सुसंगत इतिहास देण्याचा प्रयत्न केला आहे. यांपैकीं वैष्णवपंथाचा इतिहास तर यांनीं ख्रिस्तपूर्व पांचव्या शतकापर्यंत नेऊन भिडवला आहे. 'शैव व वैष्णव या भक्तिमार्गाच्याच दोन शाखा असून दोहोंचीहि उभारणी उपनिषदांवर झाली आहे. ख्रिस्तपूर्व पांचव्या शतकांत वैष्णवपंथाचें नांव एकनाथधर्म असून त्याची उभारणी संपूर्णतया भगवद्गीतेवर करण्यांत आली होती. ख्रि. पू. चवथ्या शतकांत सात्वत क्षत्रियांनी या पंथाचा स्वीकार केला व ख्रिस्त शकाच्या सुरुवातीला हिंदुस्थानांत आलेल्या आभीर या परजातींत हा पंथ विलीन होऊन त्यांत कृष्णोपासना शिरली. पुढें आठव्या शतकाच्या सुरुवातीला शंकराचार्यांचें सुप्रसिद्ध तत्त्वज्ञान पुढें आलें व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या वैष्णवगोटांतून शंकराचार्यांचे विरोधी पंथ सुरू झाले. याला सुरुवात रामानुजाचार्यांनीं केली व निंबार्क, आनंदतीर्थ, रामानंद, कबीर, वल्लभ, चैतन्य अशा परंपरेनें या पंथाचा कळस नामदेव व तुकारामाच्या काळीं झाला. आधीं कबीर व नंतर नामदेव, तुकाराम यांनीं वैष्णव पंथाच्या भक्तिमार्गाला अंतरंगाच्या पावित्र्याची व नैतिक उन्नतीची जोड दिली व त्यांच्या प्रेमळ अभंगानीं व त्यांतील या तत्त्वज्ञानानें सर्व हिंदुस्थान अक्षरशः भारला गेला' अशी यांच्या संशोधनाची रूपरेखा आहे.

यांच्या नांवानें स्थापन झालेल्या पुण्याच्या भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूटचा उद्घाटनसमारंभ मुंबईचे त्या वेळचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांचे हस्तें ६ जुलै १९१७ ला पार पाडण्यांत आला. त्या संस्थेतर्फे सुरू करण्यांत आलेल्या ऑल-इंडिया ओरिएंटल कॉन्फरन्सनें व डॉ. सुखटणकर यांच्या नेतृत्वाखालीं सुरू झालेल्या महाभारताच्या क्रिटिकल एडिशननें त्या संस्थेचें व त्याबरोबरच यांचें नांवहि आंतरराष्ट्रीय अभ्यासवर्तुळांत पक्कें केलें. ओरिएंटल कॉन्फरन्सच्या पहिल्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें होतें.

हिंदी संस्कृत पंडितांना पाश्चात्य संशोधनपद्धति शिकवली तर सध्यांपेक्षांहि जास्त भरीव संशोधन हिंदुस्थानांतच निर्माण होईल या कल्पनेनें बूलरनीं सुरू केलेल्या बॉम्बे संस्कृत सीरीजचा फायदा घेणारे हे पहिले हिंदी गृहस्थ होत. हिंदुस्थानसंबंधींचे परदेशांत वसत असणारे गैरसमज दूर करण्याचे कामासाठीं आजपर्यंत हिंदुस्थानला पाश्चात्य पंडितांच्या सद्बुद्धीवर हवाला ठेवावा लागत असे. त्याची उणीव हे व यांच्या तालमींत तयार झालेल्या शिष्यशाखेनें भरून काढली. याच दृष्टीनें एका नव्या युगाच्या प्रवर्तनाचा मान यांना दिला जातो.

यांचे प्रमुख निबंध—(1) Age of Mahabharata, (2) Allusions to Krishna in Patanjali's Mahabhashya, (3) The Nasik Inscriptions (इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑफ ओरिएंटॅलिस्ट्स लंडन, १८७४), (4) Principal Results of My last two years' studies in Sanskrit Mss. with Particular Reference to Sacrificial, Ritual

and the Pancharatra System (काँग्रेस ऑफ ओरिएन्टॅलिस्ट्स, व्हिएन्ना १८८६) इत्यादि.

यांचे समग्र ग्रंथ व निबंध श्री. नारायण बापूजी उटगीकर यांनीं Collected Works of Prof. Bhandarkar या नांवानें चार भागांत प्रसिद्ध केले आहेत.

भांडारकर, देवदत्त रामकृष्ण—(जन्म स. १८७५) बंगालमध्यें स्थायिक झालेले सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय प्राच्यविद्यापंडित व लेखक.

सुप्रसिद्ध संशोधक रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचे हे चिरंजीव. पुण्याच्या न्यू पूना हायस्कूल व डेक्कन कॉलेजांत आपलें माध्यमिक व विश्वविद्यालयीन शिक्षण संपवून हे एम्. ए. झाले. या वेळीं यांना भगवानदास पुरुषोत्तमदास संस्कृत शिष्यवृत्तीचा लाभ झाला होता.

सुरुवातीपासूनच यांना संस्कृत भाषा व प्राचीन इतिहास यांच्या संशोधनाचा नाद असल्यानें यांनीं एम्. ए. होतांच आर्किऑलॉजिकल सर्व्हेच्या वेस्ट सर्कलच्या सुपरिंटेंडेंटचें काम पत्करलें (१९११). परंतु यानंतर कलकत्त्याच्या इंडियन म्युझियममधील प्राच्यविद्याखात्याचें यांना प्रमुख नेमण्यांत आलें व हे महाराष्ट्रांतून निघून कायमचे कलकत्त्याला स्थायिक झाले. कलकत्ता युनिव्हर्सिटीनेंहि यांना प्राचीन हिंदी इतिहास व संस्कृति यांचे प्राध्यापक नेमलें (१९१७) व यांना आपल्या संशोधनकार्यांत निमग्न होऊन राहण्याची दीर्घकालीन संधि मिळाली. कलकत्ता युनिव्हर्सिटींतील आपल्या या नोकरींतून हे १९३५ सालीं निवृत्त झाले व हे 'पूर्ण' संशोधक बनले.

यांच्या दीर्घकालीन व्यासंगाचा फायदा आपल्या विद्यार्थ्यांना देण्यासाठीं हिंदुस्थानांतील जवळजवळ सर्व विद्यापीठांनीं यांना केव्हांना केव्हां तरी निरनिराळ्या विषयांवर व्याख्यान देण्यासाठीं बोलाविलें. त्यांत यांनीं दिलेलीं मुंबई युनिव्हर्सिटींतील भगवानलाल इंद्रजी व्याख्यानें (१९०३, १७), बनारस युनिव्हर्सिटींतील महेंद्रचंद्र नंदी व्याख्यानें (१९२५) व मद्रास युनिव्हर्सिटींतील सर विल्यम मेयर व्याख्यानें (१९३८-३९) विशेष महत्त्वाचीं आहेत.

हिंदुस्थान सरकारच्या प्राच्यविद्याखात्याचे व इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्ड्स कमिशनचे हे आज बरेच दिवस पत्रव्यवहार-प्रमुख आहेत. इंडियन म्युझियम, कलकत्ता, बंगाल रॉयल एशियॅटिक सोसायटी, कलकत्ता, हिस्टॉरिकल सोसायटी, इंडियन रिसर्च इन्स्टिट्यूट इत्यादि संशोधक संस्थांशींहि यांचा घनिष्ट संबंध आहे. १९३८ सालीं अलाहाबाद येथें भरलेल्या इंडियन हिस्टॉरिकल काँग्रेसचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें.

इंडियन अँटीक्वेरीचे हे १९११-२० व १९२८-३० पर्यंत सहसंपादक असून इंडियन कल्चर या प्राच्यविद्यासंशोधनाला वाहिलेल्या इंग्रजी त्रैमासिकाचे हे संस्थापक व संपादक आहेत.

अलिकडे हे Corpus Inscriptionum Indicarum या ग्रंथाच्या तिसऱ्या भागाची (गुप्त शिलालेख) द्वितीयावृत्ति काढण्यांत गुंतले होते.

कलकत्ता युनिव्हर्सिटीनें यांना बाहुमानिक डॉक्टरेट दिली असून मुंबईच्या एशियॅटिक सोसायटीनें यांच्या ग्रंथकर्तृत्वाबद्दल कॅम्बेल सुवर्णपदक यांना अर्पण केलें.

यांचे ग्रंथ—(1) Reports of Archæological Survey, West Circle, (2) Carmaichael Lectures (1918, 21), (3) Ashok, (4) Some Aspects of Ancient Hindu Polity, (5) Some Aspects of Ancient Hindu Culture, (6) Origin of Saka Era, (7) Gurjaras, (8) Lakuliśa, (9) Guhilots, (10) Foreign Elements in the Hindu Population, (11) Annals of the American Academy च्या हिंदुस्थानवरील ग्रंथाचें संपादन.

भिडे, बाळकृष्ण अनंत—(जन्म स. १८७४-मृत्यु स. १९२९) मराठी भाषेंतील सुप्रसिद्ध लेखक, कवि व व्यासंगी गृहस्थ.

आपल्या वयाच्या चोविसाव्या वर्षीं हे मुंबईच्या विल्सन कॉलेजांतून बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाले आणि मुरुड जंजिरा हायस्कूलचे हेडमास्तर बनले.

यांचे परीक्षणात्मक लेख अत्यंत परिश्रम व अभ्यास करून लिहिलेले असत. मार्मिकपणा व विधायकपणा हे दोन्ही गुण यांच्या लेखनांत भरपूर असत. यांचें मोरोपंताच्या काव्याचें परिशीलन विशेष वाखाणण्यासारखें असे. अशा व्यासंगीपणामुळें यांच्या काव्यांत गांभीर्य व अभिजातपणा हे गुण विशेष आढळत. जुन्या कवींचें मर्म जाणणारा यांच्यासारखा व्यासंगी विरळा. मराठी भाषेंतील व्यासंगी लेखक म्हणून यांना कोणताहि

सन्मान प्राप्त झालेला नसला तरी यांच्या लेखनामुळें मात्र मराठी भाषेचा गौरव वाढावा इतक्या योग्यतेचें तें आहे.

यांचें वाङ्मय—काव्यें-१ फुलांचे झेले, २ पद्मिनी काव्य, ३ अन्योक्तिविलास, ४ शोकक्षोभ, ५ ऋतुवर्णनें, ६ सासूची जबानी, ७ चार वीर मुत्सद्दी (चरित्रें), ८ सार्थ ज्ञानेश्वरी, ९ मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास (महानुभावअखेर).

भिडे, माधव गोविंद—(जन्म स. १८८६-मृत्यु स. १९३८) सुप्रसिद्ध विवेकी व मराठींतील लेखक.

यांचा जन्म पुण्यास झाला. मॅट्रिक झाल्यावर यांनीं वेदान्ताचा अभ्यास केला. स. १९१५-१८ पर्यंत हे 'मुमुक्षु'चे संपादक होते.

यांची प्रकाशित व अप्रकाशित मिळून एकंदर कविता सुमारें एक लक्ष चरण भरेल. यांचा 'मननामोद' (३ खंड) हा ग्रंथ यांच्या सूक्ष्म मननसामर्थ्याच्या व दृष्टान्तानें विषय समजून देण्याच्या पद्धतीचा उत्कृष्ट नमुना आहे. तो ग्रंथ मराठी भाषेकरितां एम्. ए. परीक्षेस नेमिला होता.

१९२० नंतरचें आयुष्य यांनीं प्रथम तीव्र साधना व नंतर परिणतप्रज्ञ अशा अवस्थेंत घालविलें.

यांचें वाङ्मय—१ अनुक्तानुवाद, २ घुणाक्षरन्याय, ३ 'साधुश्रेष्ठ श्रीतुकाराम महाराज यांचे श्लोक-चरित्र व निवडक अभंग', ४ श्रीनारायण महाराज जालवणकरांचे 'आनंदसागर' व 'शांतिसागर' नांवाचे ग्रंथ यांच्या प्रस्तावनेसह.

भिडेशास्त्री, गीतावाचस्पति-सदाशिव गोपाळ—(जन्म स. १८७५-मृत्यु स. १९३९) सुप्रसिद्ध गीताप्रवचनकार व उपनिषदांचे मराठी भाषान्तरकार.

यांचा जन्म सांगली येथें झाला. आठव्या वर्षी देवीनें दृष्टि गेली. हरीपूर व इचलकरंजी येथें न्याय व वेदान्त यांचें शिक्षण झालें. तासगांव संस्कृत पाठशाळेवर बारा वर्षें काम केल्यावर लो. टिळकांच्या कर्मयोगाचा प्रवचनादिद्वारा यांनीं प्रचार आरंभिला व त्याकरितां गीताधर्ममंडळ ही संस्था काढली. लो. टिळक कर्मयोगाचा पुरस्कार करतांना शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाचा सर्व सांगाडा स्वीकारून फक्त संन्यासापुरतें विरुद्ध बोलत; पण हे मायावादाविरुद्धहि प्रतिपादन करीत.

यांचे ग्रंथ—१ रहस्यदीपिका, २ उपनिषद्रत्नप्रकाश (दशोपनिषदांचें मराठी विवरण).

भिसे, डॉ. शंकर आबाजी—(जन्म स. १८६७ एप्रिल २९-मृत्यु स. १९३५) आंतरराष्ट्रीय कीर्तीचे हिंदी संशोधक.

मुंबईला प्रभु जातींत यांचा जन्म झाला. यांचे वडील कोल्हापूर संस्थानांत डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट होते. धुळें हायस्कुलांत कांहीं दिवस शिक्षण घेतल्यानंतर यांनीं बॉम्बे पेपर मिलचे व्यवस्थापक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. आग्रा लेदर फॅक्टरीचे प्रमुख डायरेक्टर म्हणून कांहीं दिवस काम केल्यानंतर हे इंग्लंडला गेले (१८९७). हिंदुस्थानांत असते वेळेपासूनच यांना लहान लहान यंत्रें करण्याची आवड असून त्यासाठीं यांनीं 'विविधकलासंग्रह' या नांवाचें एक मासिकहि सुरू केलें होतें.

लंडन सोसायटी ऑफ सायन्स, लेटर्स अॅन्ड आर्ट्सच्या 'Automatic Weighing Machine'च्या चढाओढींत यांनीं मिळवलेल्या यशानें हे प्रथम इंग्लंडमध्यें प्रसिद्धीस आले. साखर, पीठ वगैरे जिन्नस आपणांस हवें तितकें वजन करून काढून देणाऱ्या या यंत्राशिवाय यांनीं पुष्कळ जाहिरातींचें एकदम प्रदर्शन करणारा दिवा, आपोआप पाण्याचा मोठा प्रवाह सोडणारें यंत्र, समुद्राच्या तळाशीं प्रकाश देणारा दिवा, सायकल थांबतांच तिला जागच्याजागीं उभी करणारें यंत्र, इत्यादि नवनवीन संशोधनांनीं साऱ्या जगाला थक्क केलें. एकाच वेळीं अनेक टाईप पाडणाऱ्या यंत्राचें संशोधनहि यांनीं केलें (१९०८). यांचे नांवावर चाळीसपेक्षां अधिक पेटन्ट्स आहेत.

परंतु अॅटोमिडीन (अॅटॉमिक आयोडाईन) ह्या यांच्या संशोधनामुळें यांची शास्त्रीय जगांतील प्रतिष्ठा विशेष वाढली. १९१० सालीं रतन टाटा यांच्या आर्थिक सहकार्यानें हे इंग्लंडला गेले व यांनीं हा शोध लावला. आयोडाईन पोटांत घेतां आल्यास त्यामुळें अनेक असाध्य रोग बरे करतां येतील हें सर्वांस माहित होतें, परंतु पाण्यांत विरघळूं शकणारें, सुरक्षितपणें पोटांत घेतां येणारें, रंग, वासरहित आयोडिनचें औषध तयार करण्यांत प्रथम हे यशस्वी झाले. याचे आधीं 'बेसलीन'चा शोध यांनीं लावला होता.

या यांच्या संशोधनानें देशीं व परदेशीं यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव झाला; लंडनच्या रॉयल सोसायटीनें यांना आपले फेलो निवडले व यांच्या साठाव्या वाढदिवसाच्या समयीं न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीनें यांना डी.एस्सी. ही पदवी दिली.

भोपटकर, लक्ष्मण बळवंत—(जन्म स.१८८०) पुण्याचे सुप्रसिद्ध वकील, व्यायामविशारद व सार्वजनिक कार्यकर्ते.

हे एम्. ए., एल्एल्. बी. झाले (१९०७) व यांनीं वकिली करण्यास सुरुवात केली. यानंतर भाला, लोकसंग्रह, लोकमान्य इत्यादि पत्रांचें संपादन, पुण्याच्या लॉ कॉलेजचें प्रथम व्हा. प्रिन्सिपल, महाराष्ट्र हिंदुसभा, महाराष्ट्रीय-व्यायाम-मंडळ, केसरी मराठा संस्था इत्यादि अनेक संस्थांशीं अध्यक्ष, विश्वस्त वगैरे नात्यांनीं यांचा संबंध आला.

मुळशी व मिठाच्या काँग्रेसच्या व भागानगरच्या हिंदुसभेच्या सत्याग्रहांतहि यांनीं भाग घेतला होता. यांना अ. भा. हिंदुमहासभेच्या हंगामी अध्यक्षपदाचा मान शामाप्रसाद मुकर्जीच्या आजारीपणांत प्राप्त झाला.

यांच्या षष्ठयब्दपूर्तीनिमित्त यांच्या चहात्यांनीं यांना पंचवीस हजार रुपये व 'फुलदाणी' हा सत्कार-ग्रंथ अर्पण केला, परंतु यांनीं ते पैसे सार्वजनिक कार्याला व महाराष्ट्र व्यायाममंडळानें जमविलेलें त्या मंडळाला दिले. सरळ वृत्तीनें त्यागपूर्वक काम करीत राहाण्याबद्दल यांची प्रसिद्धि आहे.

यांचे ग्रंथ—माझी व्यायाम पद्धति, कुस्ती, दांडपट्टा, मृत्युच्या मांडीवर, स्वराज्याची मीमांसा इत्यादि.

भोसले, केशव विठ्ठल—(जन्म स. १८९० आगस्ट ९–मृत्यु स. १९२२) मराठी रंगभूमीवरील सुप्रसिद्ध संगीत नट.

जन्मस्थान कोल्हापूर. जात मराठा. वडील वैद्यकी करीत. ते वारल्यावर वयाच्या आठव्या वर्षी यांना स्वदेशहितचिंतक मंडळींत घालण्यांत आलें. तेथें हे प्रथम बिनपगारी काम करीत. एक वर्षाचे आंत बाजीराव मस्तानी नाटकांत यांना समशेरबहादराचें काम मिळालें. बालवय, अस्खलित व स्पष्ट वाणी, तडफदार अभिनय, ठाकठीक व गोड आवाज यांमुळें लवकरच यांचें नांव संगीत नट म्हणून सर्वतोमुखीं झालें. पुढें ती मंडळी सोडून यांनीं स्वतःच्या मालकीची ललितकलादर्श संगीत नाटक मंडळी काढली (१९०८). तिलाहि यांनीं परिश्रमानें नांवारूपास आणली. यांचें गाणें गवई-थाटाचें असे.

भोसले, कर्नल-जगन्नाथराव कृष्णराव—(जन्म स. १९०६) आझाद हिंदसेनेंतील मुख्य सेनापति.

यांचा जन्म सांवतवाडीपासून १५ मैलांवर असलेल्या तिरोडे गांवीं झाला. सांवतवाडी येथें यांचें घराणें 'बंडखोर भोसले' म्हणूनच प्रसिद्ध आहे. सांवतवाडीच्या हायस्कुलांत यांचें इंग्रजी शिक्षण झालें आणि डेहराडून यथील प्रिन्स ऑफ वेल्स मिलिटरी कॉलेजकरितां यांची निवड झाली. तेथील शिक्षणानंतर १९२६ सालीं इंग्लंडमधील उच्च लष्करी शिक्षणासाठीं हे सँडर्स्ट कॉलेजांत गेले. तेथेंहि यांनीं सर्वांकडून वाहवा मिळविली. १९२८ सालीं क्वेटा येथें लँकेशायर रेजिमेंटमध्यें यांनीं एक वर्ष कामगिरी केली आणि तेथें रॉयल मराठा इन्फन्ट्रीवर यांची नेमणूक झाली.

१९३० मध्यें हे कन्नूर येथें ले. ॲडज्यूटंट असतां समुद्रांत बुडणाऱ्या दोघां युरोपियनांस स्वतःचा जीव धोक्यांत घालून यांनीं वांचविलें म्हणून यांचा बादशहांच्या हस्तें गौरव करण्यांत आला. नंतर हे कॅप्टन झाले व बादशहांच्या राज्यारोहणाच्या दरबारास उपस्थित होण्याची संधि यांना मिळाली.

तिकडून परत आल्यावर 'जनरल स्टाफ'च्या शिक्षणासाठीं यांची निवड झाली. हा शिक्षणक्रम संपल्यावर यांनीं बरेली येथें जनरल स्टाफमध्यें काम केलें व तेथून हे लेफ्टनंट कर्नल म्हणून सिंगापूरच्या जनरल स्टाफवर नेमले गेले. सिंगापूरच्या पाडावानंतर हे आझाद हिंद सैन्याचे चीफ ऑफ स्टाफ झाले. यांनीं त्या सेनेसाठीं हजारों हिंदी लष्करी अधिकारी शिकवून तयार केले. १९४५ च्या सप्टेंबरांत बँकॉक येथें यांना पकडण्यांत आलें. दिल्लीच्या लाल किल्ल्यांत कांहीं दिवस काढल्यानंतर यांची सुटका झाली.

भॉडे, गोपाळ विनायक—(जन्म स. १८८३) सुप्रसिद्ध अभिनयकुशल नकलाकार.

पुणें येथें शिक्षण घेऊन स्कूलफायनल झाल्यावर सरकारी नोकरी करून हे सेवानिवृत्त झाले (१९०३-१९३२). विद्यार्थिदशेपासून यांच्यांत दुसऱ्याचें हुबेहूब अनुकरण करण्याची लकब होती. त्याचा विकास होता

होतां शिक्षक, उपाध्ये, हरिदास, गवई, अधिकारी व मोठमोठे पुढारी इत्यादींची आवाज, भाषण, लकब, पोषाख, चाल व चर्यासुद्धां हुबेहूब करून दाखवूं लागले. लो. टिळक, शिवरामपंत व रॅ. परांपपे, पांगारकर, भोपटकरबंधु, सावरकर वगैरेंच्या नकला करून दाखवून हे रसिकांना आश्चर्यचकित करतात. यांचे तसे फोटो व प्लेटीसुद्धां घेतलेल्या आहेत. एखाद्या भागाची नक्कल करणारे पुष्कळ लोक सांपडतात, पण सर्व बाजूंनी पूर्ण नक्कल करण्याच्या यांच्या गुणाला जगांत तोड नाहीं असें तज्ज्ञांचें मत आहे.

म

मॅक्डोनेल, डॉ. आर्थर ॲन्थनी—(जन्म स. १८५४–मृत्यु स. ?) वैदिक वाङ्मयाचे जगप्रसिद्ध अभ्यासक व लेखक.

जन्मस्थान मुझफरपूर. यांचे वडील चार्लस अलेक्झांडर मॅक्डोनेल हे इंडियन आर्मीत होते. यांचें शिक्षण गोटिंगेन व ऑक्सफर्ड येथें झालें. एम्. ए. झाल्यानंतर लिपझिक युनिव्हर्सिटीकडून यांना ऋग्वेदावरील कात्यायनाच्या सर्वानुक्रमणीची शुद्ध प्रत व त्यावर लिहिलेल्या लेखाबद्दल पीएच्. डी. ही पदवी मिळाली.

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीतील बोडन प्राध्यापक म्हणून काम करीत असतां यांनीं इंडियन इन्स्टिटयूटचें संवर्धन केलें आणि आपले वैदिक वाङ्मयावरील बहुमोल ग्रंथ लिहिले. यांचें वाङ्मय वेदांचें परीक्षण करणारें नसून परिचय करून देणारें आहे; त्यामुळें यांच्या ग्रंथांचा अधिक प्रचार आहे. वैदिक ग्रामर हा महत्त्वाचा ग्रंथ लिहून संस्कृत वाङ्मयापेक्षां वेद हा एक निराळा भाग असल्याचें यांनीं निदर्शनास आणलें. 'वैदिक ग्रामर फॉर स्टूडन्टस्' अशी छोटी आवृत्तीहि यांनीं प्रसिद्ध केली आहे (१९१६). यांच्या बहुतेक ग्रंथांचें अवतरण मराठींत ज्ञानकोश प्रस्तावना खंड २-३ व प्राचीन चरित्रकोश यांत झालें आहे.

यांचे ग्रंथ—वैदिक-(1) Vedic Mythology (1897), (2) Vedic Grammar (बूलरच्या इंडो-आर्यन सीरीजमध्यें प्रसिद्धि, १९१०), (3) Vedic Index of Names and Subjects (दोन भाग, ए. बी. कीथ यांचे सहकार्यानें, १९१२), (4) A Vedic Grammar for Students (1916), (5) A Vedic Reader for Students (1917).

संस्कृत वाङ्मयावरील—(1) Sarvanukramani of the Rig-Veda (1886), (2) Sanskrit Grammar for Students (1886), (3) Sanskrit Dictionary (वैदिक शब्दांसह १८९२), (4) A History of Sanskrit Literature (मराठी भाषान्तर-सी. वा. पेंडसे, सयाजीसाहित्यमाला १९००), (5) Brihaddevata (दोन भाग हार्वर्ड सिरीज, १९०४), (6) Encyclopaedia Britannica, Journal of the Royal Asiatic Society तील लेख.

मॅथाय, डॉ. जॉन—(जन्म स. १८८६ जाने. १०) मद्रास प्रांतांतील नामांकित अर्थशास्त्रज्ञ व टाटा केमिकल्स लि.चे प्रमुख.

मद्रास ख्रिश्चन कॉलेज, लंडन स्कूल ऑफ इकॉनमिक्स व बॅलीओल कॉलेज (ऑक्सफर्ड) येथें आपलें शिक्षण संपवून हे बी. एल्., डी. लिट्, डी. एस्सी. झाले. यानंतर मद्रास हायकोर्टमध्यें कांहीं दिवस वकिली केल्यानंतर यांनीं मद्रास को-ऑपरेटिव्ह डिपार्टमेंटमध्यें व नंतर मद्रासच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांत व मद्रास युनिव्हर्सिटींत अर्थशास्त्राच्या प्राध्यापकाचें काम केलें (१९२०-२५).

इंडियन टॅरिफ बोर्डाचे हे प्रथम कांहीं दिवस सभासद व नंतर अध्यक्ष होते (१९२५-३१). परंतु पुढें हिंदुस्थानसरकारच्या कमर्शियल इंटिलीजन्स व स्टॅटिस्टिक्सच्या डायरेक्टर जनरलचें काम यांनीं केलें (१९३५-४०). पुढें हे हिंदुस्थानसरकारच्या नोकरींतून निवृत्त झाले व यांना टाटा सन्स लि.मध्यें सामील करून घेण्यांत आलें. १९३७ त आग्रा येथें भरलेल्या इंडियन इकॉनमिक कॉन्फरन्सच्या विसाव्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान

यांना देण्यांत आलें. 'Study of Economics' हा यांच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय होता.

यांचे ग्रंथ—(1) Village Government in British India, (2) Agricultural Co-operation in India, (3) Excise and Liquor Control, (4) टॅरिफ बोर्डाच्या निरनिराळ्या चौकशांचे वृत्तांत.

त्रिमंत्री योजनेनें तयार झालेल्या व्हाइसरॉयच्या हंगामी कार्यकारी मंडळांत हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांचे प्रतिनिधि म्हणून यांची निवड झाली होती.

मॅन, हॅरोल्ड हार्ट—(जन्म स. १८७२) सुप्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ, चहातज्ज्ञ व लोकोपयुक्त कार्यकर्ते.

इंग्लंडमध्यें यॉर्क शहरीं जन्मून अनेक शिष्यवृत्त्या मिळवीत यांनीं आपलें शिक्षण पुरें केलें. पॅरिस येथें पाश्चूर यांचे हाताखालीं यांनीं जन्तुशास्त्राचाहि अभ्यास केला होता. १९०० सालीं टी असोसिएशननें यांना हिंदुस्थानांत आणलें. यांनीं चहाला जिवंत पाल्याचें खत देण्याविषयीं महत्त्वाचें संशोधन करून लीड्स् विश्वविद्यालयाकडून डॉक्टर ही पदवी मिळविली. १९०७ सालीं हे, पुणें शेतकी कॉलेजचे पहिले प्रिन्सिपल झाले. कोंकणांतील भातशेतीच्या राब भाजण्याच्या पद्धतीबाबत यांनीं कांहीं कायमचे सिद्धान्त बसविले. यांनीं हिंदुस्थानांत येतांच मद्यपाननिषेधाच्या चळवळींत भाग घेण्यास सुरुवात केली. कलकत्ता, टेंपरन्स फेडरेशन काढून मद्याचें संशोधन केलें. त्यांत ओल्ड स्कॉच व्हिस्कींत खऱ्या व्हिस्कीचे कांहीं थेंब व बाकी सारें स्पिरिट आढळलें. हे दि सोसायटी ऑफ चिल्ड्रनचे सेक्रेटरी, डिप्रेस्ड क्लासेस मिशन पुणें शाखा व यंगमेन क्रिश्चन असोसिएशन यांचे अध्यक्ष होते. यांनीं पुण्यास स्थापलेली डेक्कन ॲग्रिकल्चर असोसिएशन काम करीत आहे. १९२३ सालीं हे मुंबई शेतकीखात्याचे डायरेक्टर झाले व १९२७ सालीं हे सेवानिवृत्त झाले. यांचें लेखन विपुल आहे. कमेट्यांत झालेला वादविवाद थोडक्यांत सुबक लिहून काढण्यांत हे कुशल होते.

पुण्याजवळच्या पिंपळे सौदागरच्या शेतकऱ्यांची आर्थिक पाहणी करून वैयक्तिक आयव्ययावरून यांनीं ठरविलेले निर्णय मुंबई, विश्वविद्यालयातर्फे दोन ग्रंथांत प्रसिद्ध केले आहेत. यांनीं या ग्रंथांनीं शेतकऱ्यांच्या स्थितीचा अर्थशास्त्राच्या दृष्टीनें अभ्यास करण्याचा पाया घातला. सेवानिवृत्तीनंतर निजाम राज्यांत व नंतर तुर्कस्थानांत रासायनिक वगैरे खात्यागाराच्या कामगिरीवर यांची नेमणूक झाली होती.

मनोहरलाल, सर—(जन्म स. १८७० डिसें.३१) सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ, ग्रंथकार व पंजाब प्रान्तांचे अर्थमंत्री.

हे केम्ब्रिज येथें तत्त्वज्ञान व अर्थशास्त्र हा विषय घेऊन एम्. ए. झाले व बॅरिस्टर होऊन परत आले. कपुरथळ्याच्या रणधीर कॉलेजचे प्रिन्सिपल, कलकत्ता, विश्वविद्यालयांतील 'मिंटो प्रोफेसर ऑफ इकॉनमिक्स' (१९०९), पंजाब युनिव्हर्सिटीचे फेलो, सिनेटर, कायदेमंडळाचे सभासद, शिक्षणमंत्री (१९२७-३०), अर्थमंत्री (१९३७ पासून) वगैरे कामें करून यांनीं अर्थशास्त्रावर अत्यंत महत्त्वाचे प्रबंध लिहिले. पंजाब युनिव्हर्सिटीतील अर्थशास्त्रीय अध्यापन व संशोधनाशीं यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे. यांना ऑल-इंडिया इकॉनॉमिक कॉन्फरन्स, डाका अधिवेशनाचे अध्यक्ष निवडण्यांत आलें होतें. तेथील यांच्या भाषणाचा विषय 'दि टास्क ऑफ इकॉनमिस्ट इन् इंडिया' हा होता (१९३५).

मलबारी, बेहेरामजी—(जन्म स. १८४३-मृत्यु स. १९१२ जुलै) हिंदी समाजसुधारक, वृत्तपत्रकार, गुजराथी वाङ्मयाचे अभ्यासक व लेखक.

या पारशी गृहस्थांचे वडील बडोदें राज्यांत नोकरीस होते. हे 'इंडियन स्पेक्टेटर' या इंग्रजी पत्राचे वीस वर्षें व 'ईस्ट ॲन्ड वेस्ट' या मासिकाचे संपादक होते (१९०६). आपलीं सामाजिक मतें हे निर्भीडपणें मांडीत आणि त्याला कायदेशीर रूप देण्याचा प्रयत्न करीत. महाराष्ट्रांतील संमतिवयाच्या बिलाची चळवळ यांनीं इंग्लंडमध्यें असतां पार्लमेंटमध्यें आणविलेल्या बिलामुळें उत्पन्न झाली होती.

यांचे ग्रंथ—गुजराथी-१ काव्यसंग्रह (१८७५), इंग्रजी-२ दि इंडियन म्यूज इन् इंग्लिश गार्ब (१८७७), ३ इंडियन आय ऑन इंग्लिश लाइफ, ४ गुजराथ ॲन्ड गुजराथीज्.

मशरुवाला, किशोरलाल घनश्यामलाल—(जन्म स. १८९०) जीवनाचे तात्त्विक अभ्यासक व लेखक.

जन्मस्थान मुंबई. यांचें घराणें मूळचें सुरतेचें. जात वैश्य. यांच्या पित्याचें नांव इच्छाराम रंगीलदास. हे मुंबईच्या विल्सन कॉलेजांतून बी. ए. व नंतर एल्एल्. बी. झाले. १९१७ सालापासून यांनीं वकिलीचा धंदा सोडला आणि हे म. गांधींचे अनुयायी बनले. गुजराथ विद्यापीठाचे हे पहिले महामात्र (चान्सेलर) होते.

यांच्या जीवनावर स्वामीनारायण पंथाचा आणि म. गांधींचा विशेष प्रभाव पडला. यांचें ज्ञान पांडित्यपूर्ण नाहीं पण तें चैतन्ययुक्त व विशेष प्रकारचें सुसंस्कृत आहे यांत शंका नाहीं. यांनीं शोधक व मुमुक्षु दृष्टीनें आपल्या तत्त्वज्ञानाचें अवलोकन केलें आहे. यांचे लेखनांत यांची उच्च व स्वतंत्र वृत्ति स्पष्टपणें प्रतीत होते. तसेंच हे तात्त्विक प्रश्नांचा तटस्थपणानें अभ्यास करूं शकतात. या दृष्टीनें यांचें लेखन अत्यंत महत्त्वाचें आहे.

यांचें गुजराथी वाङ्मय—१ राम अने कृष्ण (पहिली आवृत्ति १९३३, दुसरी आवृत्ति १९३०), २ बुद्ध अने महावीर (दोन आवृत्त्या), ३ ईशु ख्रिस्त, ४ सहजानंद-स्वामी, ५ केळवणीना पाया (स्वतंत्र), ६ जीवनशोधन (भाग १-२), ७ गांधीविचारदोहन.

मसानी, मिनु रुस्तुम—(जन्म स. १९०५) मुंबईचे सुप्रसिद्ध काँग्रेस कार्यकर्ते व अर्थशास्त्रीय लेखक.

मुंबईच्या न्यू हायस्कूल, एल्फिन्स्टन कॉलेज, लंडनच्या लंडन स्कूल ऑफ इकॉनमिक्स व लिंकन्स इनमध्यें आपलें शिक्षण संपविल्यानंतर हे बॅरिस्टर होऊन हिंदुस्थानला परत आले. १९२९ मध्यें मुंबईच्या हायकोर्टात यांनीं वकिली करण्यास सुरुवात केली. १९३३ व १९४३ च्या काँग्रेस चळवळींत यांना तुरुंगांत जावें लागलें. काँग्रेस सोशॅलिस्ट पक्षांच्या संस्थापकांपैकीं हे एक असून त्या संस्थेचे हे कांहीं दिवस सेक्रेटरीहि होते. मुंबईच्या कॉर्पोरेशनचेंहि हें एक वर्ष मेयर होते (१९४३-४४). १९४५ सालीं झालेल्या मध्यवर्ति असेंब्लीच्या निवडणुकींत हे व डॉ. गोपाळराव देशमुख मुंबईतर्फे निवडून गेले. शिवाय हे टाटा सन्स लि.मध्यें महत्त्वाच्या हुद्द्यावर आहेत.

अर्थशास्त्रीय माहिती सामान्य माणसालाहि समजेल इतक्या सोप्या पद्धतीनें समजावून देण्याची यांची शैली यांच्या Our India या पुस्तकानें प्रथम लोकांचे दृष्टोत्पत्तीस आली. सर्व हिंदुस्थानांत हें पुस्तक इतकें लोकप्रिय झालें कीं, हिंदुस्थानांतील जवळ जवळ सर्व भाषांत त्याचें भाषांतर करण्यांत आलें. याच धर्तीवर यांनीं प्रसिद्ध केलेलें Your Food हि असेंच लोकप्रिय झालें. our India चा मराठी अनुवाद भाई ना. ग. गोरे यांनीं व your food च्या अनुवादाचें काम चं. वि. बावडेकर यांनीं केलें.

यांचे ग्रंथ—(1) India's Constitution at Work (सी. वाय. चिंतामणी यांचे सहकार्यानें), (2) Our India, (3) Why this starvation, (4) Socialism Reconsidered, (5) Your Food, (6) Picture of the Plan.

मसानी, सर-रुस्तुम पेस्तनजी—(जन्म स. १८७६) मुंबईचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व लेखक.

मुंबईच्या अनेक सरकारी व सार्वजनिक कार्यांत भाग घेतल्यामुळें यांचें नांव मुंबई प्रांतांत सर्वपरिचित झालें. मुंबई युनिव्हर्सिटी, एल्फिन्स्टन कॉलेज अशा शैक्षणिक, इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्स, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन सेंट्रल बँकिंग इन्क्वायरी कमेटी, रिझर्व बँक ऑफ इंडिया अशा आर्थिक व बॉम्बे फूड प्राईसेस कमेटी, नॅशनल डिफेन्स कौन्सिल, बॉम्बे फूड कौन्सिल अशा सार्वजनिक कार्यांत यांनीं दाखविलेल्या अष्टपैलू तेजस्वीपणानें सरकार व जनता या दोन्ही ठिकाणीं हे लोकप्रिय झाले. पुढें तर मुंबईच्या नॅशनल वॉरफ्रंटचे यांना प्रमुख नेमण्यांत आलें.

परंतु यापेक्षांहि इंग्रजी व गुजराथी भाषांतील उत्कृष्ट लेखक या नात्यानें यांचा योग्यता विशेष मानली जाते. दादाभाई नौरोजीवरील यांचा चरित्रग्रंथ तर हिंदुस्थानांतील कांहीं उत्कृष्ट चरित्रांत सामावला जातो.

यांचे इंग्रजी ग्रंथ—(1) Child Protection, (2) Folklore of Wells, (3) The Law and Procedure of Municipal Corporation Bombay, (4) The Conference of Birds, (5) Suffi Allegory, (6) Evolution of Local Self-Government in Bombay, (7) The Religion of the good Life, (8) Zorastrianism, (9) Court-poets of Iran and India, (10) Dadabhai Naoroji.

गुजराथी—१ दौलतनो उपयोग, २ घरनी तथा

शालनी केलवनी, ३ तनसुखमाला व चंद्रचल, अभ्यासिनियानो होब्शी, बोधलु इत्यादि कादंबऱ्या.

कैसर-इ-हिंद व इंडियन स्पेक्टटर या पत्रांचे हे कांहीं दिवस संपादक होते.

महाजन, गोविंद विठ्ठल ऊर्फ भाऊ—(जन्म स. १८१५–मृत्यु स. १८९०) मराठींतील प्रसिद्ध लेखक व वर्तमानपत्रकार,

सदाशिव कार्शीनाथ ऊर्फ बापू छत्रे यांचे हे मेहुणे. उपनाम कुंटे. मुंबईस आठ वर्षांचे असतां हे आले व तेथें यांनीं आपलें शिक्षण घेतलें. यांना इंग्रजी, संस्कृत व फारशी या भाषा येत. यांनीं जांभेकरांना दर्पण पाक्षिक व दिग्दर्शन चालविण्यास मदत केल्यानंतर स्वतःच्या जबाबदारीवर प्रभाकर साप्ताहिक काढलें (१८४१). तें चांगलें लोकप्रिय झालें होतें. हे विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांच्या विक्षिप्तपणावर टीका करीत. तेव्हां त्यांच्या अनुयायांनीं भ. वि. कानविंदे यांच्या संपादकत्वाखालीं वर्तमानदीपिका पत्र काढलें. त्याला तोड म्हणून यांनीं 'धूमकेतु' काढलें (१८५३). यांचा वाद त्या वेळीं रंगे. केवळ शास्त्रीय विषयाकरितां यांनीं 'ज्ञानदर्शन' त्रैमासिक काढलें होतें (१८५४). ज्ञानदर्शनानें कुशल भाषान्तरकार म्हणून यांची ख्याति झाली. १८६० नंतर यांची कोणतीहि वाङ्मयकृति उपलब्ध नाहीं. हे गृहस्थ विद्वान् असून पहिल्या प्रतीचे मराठी लेखक होते, असें बाबा पदमनजी अरुणोदयांत म्हणतात (पान ८८).

महाजनि, गणेश सखाराम—(जन्म स. १८९८) पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपल व सार्वजनिक कार्यकर्ते.

सातारा हायस्कूल, फर्ग्युसन कॉलेज पुणें व केम्ब्रिजच्या सेंट जॉन कॉलेजमध्यें यांचें शिक्षण झालें. कॉलेजमध्यें असतांनाच अति हुशार विद्यार्थी म्हणून यांची प्रसिद्धि असे. त्यामुळेंच यांना गव्हर्नमेंट ऑफ इंडिया स्कॉलर म्हणून इंग्लंडला पाठविण्यांत आलें होतें. अणूंची विशिष्ट रचना गृहीत धरून त्याभोंवतीं विद्युत्प्रवाह फिरत आहेत अशी कल्पना केल्यास त्याच्या परिणामाचें गणित मांडण्याच्या व तो परिणाम प्रायोगिक रीतीनें निघणाऱ्या परिणामाइतकाच असल्याचे यांचे संशोधनाबद्दल यांना केम्ब्रिज युनिव्हर्सिटीनें स्मिथ प्राईझ दिलें. हे हिंदुस्थानला एम्. ए., पीएच्. डी. स्ट्रार रँगलर होऊन आले व यांना पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपल नेमण्यांत आले (१९२९). तेथील आपल्या दीर्घकालीन व उज्ज्वल कारकीर्दीनंतर हे आपल्या जागेवरून निवृत्त झाले (१९४६).

बंगलोरच्या इंडियन अॅकॅडमी ऑफ सायन्सचे व कलकत्त्याच्या नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सायन्सचे यांना फाउंडेशन फेलो निवडण्यांत आलें. कॉलेजच्या यू. टी. सी.चे हे कॅप्टन होते.

यांचे ग्रंथ—गणित-(1) Lessons in Elementary Analysis, (2) The Application of Moving Axes Methods to the Geometry of Curves and Surfaces, (3) An Introduction to Pure Solid Geometry, (4) Contribution to Theory of Ferromagnetic Crystals (Transactions of Royal Society, London मध्यें प्रकाशन).

राजकीय—(1) The Liberal outlook, (2) Liberals and the Congress, (3) The problem of the Minorities and Constitutional Democracy as its Solution, (4) Education and Democracy.

महाराष्ट्रिय, नारायण रामचंद्र पाटणकर—(जन्म स. १८८८) मराठींतील सुप्रसिद्ध ग्रंथकार व अभ्यासक.

राजापूर येथें इंग्रजी पांच इयत्तेपर्यंत शिक्षण घेतल्यावर चुलते रघुनाथशास्त्री कृष्ण पाटणकर यांचेपाशीं घरीं संस्कृत, व्याकरणशास्त्र, वेदान्त वगैरेंचा अभ्यास केला. मुख्य व्यवसाय व्यापार, परंतु सूक्ष्म अभ्यास करण्याचा नाद असल्यानें लेखनवाचन नित्य चालू असतें. यांचें लेखन विवेचक, पायाशुद्ध आणि टिकाऊ स्वरूपाचें आहे.

यांचे ग्रंथ—१ रामायण समालोचना, २ तुल्यं तु दर्शनम्, ३ आग्रहायणी, ४ चित्रावसु इत्यादि निबंध; संस्कृत–५ व्याकरणकारिका; काव्य–६ उषस्वत्तावली इत्यादि.

महेन्द्रप्रताप, राजा—(जन्म स. १८८६ डिसें. १) सुप्रसिद्ध हिन्दी क्रान्तिकारक.

यांच्या पित्याचें नांव राजा घनश्यामसिंह. हे संयुक्त

प्रान्तांतील अलिगड जिल्ह्यांतील मुरसान या लहानशा संस्थानचे राजे. हाथरसचे राजे श्री. हरनामसिंह यांनीं यास अल्पवयांतच दत्तक घेतलें. बी. ए. च्या वर्गांत असतांनाच यांचे दत्तक पिताजी वारल्यानें यांना संस्थानचा राज्यकारभार पहावा लागला. पुढें झिंद संस्थानचे राजे रणवीरसिंह यांच्या भगिनीशीं यांचें लग्न झालें. १९०७ सालीं हे जगांतील निरनिराळीं राष्ट्रें पाहण्याच्या उद्देशानें पृथ्वीपर्यटणास निघाले.

प्रवासांत असतां शिक्षणाचें महत्त्व यांना पटून स्वतःच्या व स्वतःच्या कुटुंबापुरती मिळकत शिल्लक ठेवून कायद्याच्या अडचणींतूनहि मार्ग काढून यांनीं आपल्या मिळकतीचें दानपत्र केलें व त्यांतून वृंदावन येथें असलेल्या प्रेम-महाविद्यालयाचा जन्म झाला. या विद्यालयास नमुनेदार करण्यासाठीं युरोपांतील निरनिराळ्या शिक्षणसंस्थांचा अभ्यास करण्याकरितां हे पुनः युरोपला गेले. त्या वेळीं सुरू झालेल्या बाल्कन युद्धांत तुर्कस्थानला यांनीं साहाय्य केलें व युद्ध संपल्यावर हे हिंदुस्थानांत परत आले.

तेव्हां यांनीं प्रेम-महाविद्यालयाच्या कार्याबरोबर एक हिन्दी व एक उर्दू पत्र सुरू केलें. पहिलें महायुद्ध सुरू होतांच (१९१४), युद्धपरिस्थितीचा अभ्यास करण्याकरितां हे युरोपला गेले. तेथें यांच्यांत क्रान्तिकारक बदल झाला आणि हे जर्मनपक्षांत सामील झाले. १९१५ सालीं हे तुर्कस्थान व जर्मनी यांच्या वतीनें युद्धांत सामील करून घेण्याकरितां अफगाणिस्थानाकडे शिष्टमंडळ घेऊन गेले. युद्धपरिस्थितीमुळें १९१८ पर्यंत यांना अफगाणिस्थानांतच राहावें लागलें. नंतर हे बर्लिनला परत जात असतां लेनिन-सरकारकडून यांचें भव्य स्वागत झालें. १९१९ सालीं यांनीं रशियाचा संपूर्ण प्रवास केला. याच काळांत सोव्हिएट शिष्टमंडळाबरोबर हे पुनः अफगाणिस्थानांत आले. नंतर चीनला रवाना झाले. १९२२ सालीं मेक्सिकोहून पॅसिफिकमधून हे जपानला आले. जपानसरकारनें जपान-अफगाणिस्थानचे राजकीय संबंध जोडण्याचें कार्य यांच्यावर सोंपविलें. पेकिंग, मंगोलिया, सैबेरिया, मास्को या भागांत प्रवास करीत हे अफगाणिस्थानांत आले. नंतर हे अमेरिकेस गेले. १९२५ च्या मे महिन्याच्या न्यूयॉर्क येथील 'एशिया' पत्रांत यांचें त्या वेळपर्यंतचें चरित्र प्रसिद्ध करण्यांत आलें.

अमेरिकेंतील हिन्दी नागरिकांकडून सुमारें बारा हजार डॉलर्स जमवून एका शिष्टमंडळासह हे चीन सरकारच्या परवानगीनें तिबेटांत आले व पुनः पृथ्वीपर्यटणास निघाले. १९२९ सालीं हे कित्येक महिने रशियांत होते. तेथून सप्टेंबरांत बर्लिन येथें जाऊन पुढें हे टोकिओस घर बांधून स्थायिक झाले. 'प्रेम, न्याय, सेवा व आत्मसमर्पण' या चार तत्त्वांवर सुखी जगाची स्थापना करतां येईल अशी यांची कल्पना आहे. हिंदुस्थानसरकारच्या दृष्टीनें शत्रु-राष्ट्राशीं संबंध ठेवणारे हे गुन्हेगार आहेत.

मंडलिक, विश्वनाथ नारायण—(जन्म स. १८३३ मार्च ८–मृत्यु स. १८८९ मे ९) सुप्रसिद्ध वकील व सार्वजनिक कार्यकर्ते.

जन्मस्थान मुरूड. जात चित्पावन ब्राह्मण. मुंबईच्या एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्यें चार वर्षे शिक्षण घेतल्यावर कांहीं वर्षे (१८५२-१८६३) सरकारी नोकरी करून राजीनामा दिला व पुढें वकिली करूं लागले. नेटिव्ह ओपिनियन नांवाचें इंग्रजी-मराठी साप्ताहिक सुरू करून त्याचे हे सात वर्षे संपादक होते (१८६४-१८७०).

हे अध्यक्ष, मुंबई कॉर्पोरेशन, उपाध्यक्ष रॉयल एशि. सो. मुंबई, फेलो, सिन्डिक व डीन मुंबई, युनिव्हर्सिटी, सभासद मुंबई व कलकत्ता कायदे कौन्सिल इत्यादि होते. यांचा ग्रंथसंग्रह यांच्या मृत्यूनंतर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजला देण्यांत आला (१९०७). तो मंडलिक ग्रंथसंग्रह या नांवानें तेथें ठेवला आहे.

१ बोधसार (१८५७ जुन्या कवींचे उतारे), २ सिंधी भाषेचें लघुव्याकरण, ३ यंगसाहेबांच्या बीजगणिताचें भाषान्तर, ४ लक्ष्मीशास्त्र (मार्सेरबाईच्या ग्रंथाचें भाषान्तर), ५ हिंदुस्थानचा इतिहास (भाषान्तर), ६ मराठी हिंदुधर्मशास्त्र (१८६५, १८८२), ७ तुकारामाची गाथा. यांचे व्यवहारमयूख, याज्ञवल्क्यस्मृति मिताक्षरेसहित व नऊ टीकांसह छापलेली मनुस्मृति हे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत.

माडखोलकर, गजानन त्र्यंबक—(जन्म स. १८९६) मराठींतील सुप्रसिद्ध टीकाकार, ललितलेखक व वृत्तपत्रव्यवसायी.

यांचा जन्म मुंबईला झाला. हायस्कूलमधील आपलें शिक्षण अपुरें टाकूनच यांना पुण्याच्या केसरी साप्ताहिकांत नोकरी धरावी लागली. त्यानंतर ज्ञानप्रकाश, पुणें, महाराष्ट्र, नागपूर इत्यादि पत्रांत कामें केल्यानंतर नरकेसरी (अभ्यंकर) स्मारक मंडळातर्फे चालविण्यांत

येणाऱ्या नागपूरच्या 'तरुण भारत' या दैनिकाचे प्रमुख संपादक म्हणून यांची नेमणूक झाली (१९४३).

मुख्यतः टीकाकार-वाङ्मयीन व राजकीय-म्हणून यांची प्रसिद्धि आहे. पुण्याच्या ज्ञानप्रकाशमध्यें यांनीं सुरू केलेलें 'काव्य-शास्त्र-विनोद' हें सदर त्या काळीं अतिलोकप्रिय झालें होतें.

यांचे इतर टीकालेख-परामर्ष, आधुनिक कविपंचक, माझे आवडते लेखक, इत्यादि नांवांखालीं प्रसिद्ध झाले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें श्री. ना. बनहट्टी यांचे सहकार्यानें यांनीं लिहिलेलें चरित्रहि असेंच प्रसिद्ध आहे.

मराठींतील राजकीय कादंबऱ्यांची सुरुवात यांनीं केली असें मानण्यांत येतें. स्थल, काल, व्यक्ति यांचीं अचूक वर्णनें आपल्या कादंबऱ्यांतून करण्यास यांनीं सुरुवात केली. खरे प्रकरणावर यांनीं लिहिलेली 'मुखवटे' किंवा नऊ ऑगस्ट चळवळीवर यांची 'प्रमद्वरा' कादंबरी या दृष्टीनें नमुनेदार आहे.

१९४६ च्या बेळगांव येथील महाराष्ट्र साहित्य-संमेलन तिसाव्या अधिवेशनाच्या ललित विभागाचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें.

'पैशाच्या दृष्टीनें वाङ्मयव्यवसायांतील माझा अनुभव अतिनिराशाजनक आहे; माणसानें इतर कोणताहि धंदा करावा, परंतु स्वतःच्या महत्त्वाविषयीं भलत्याच कल्पना उत्पन्न करणारा हा प्रतिष्ठित पण वांझोटा धंदा करूं नये' हा यांचा अनुभव सर्वच मराठी लेखकांच्या वृत्तीवर प्रकाश टाकणारा आहे.

आपल्या म्हणण्याच्या पुष्ठ्यर्थ यांनीं भारतसेवक समाजांत यांना मिळणारे चाळीस रु., तरुणभारतमध्यें मिळणारे द. म. शंभर रु. व कादंबरीच्या दर पानी मिळणारे साडे तीन रु. हे आंकडे पुढें केले आहेत.

माणिकप्रभु—(जन्म स. १८२१-समाधि स. १८६५) सुप्रसिद्ध सत्पुरुष.

पिता मनोहर नायक. माता बयादेवी. उपनाम हरकुडे. श्रीवत्सगोत्री दे. ऋ. ब्राह्मण. जन्मस्थान लाडवंती. यांचे पूर्वज कल्याणीस सावकारी करीत. वडील वेद-वेदान्तांत निष्णात व योगाभ्यासी होते. त्यांनीं देह ठेवल्यावर यांची मुंज झाली.

लहानपणापासून यांच्या सिद्धाईच्या गोष्टी चहूंकडे पसरूं लागल्या. हे नवसास पावत. अतिथिअभ्यागतांना यांचें घर म्हणजे स्वतःचें घर वाटे. हे भिक्षेला निघत तेव्हां यांच्या राजैश्वर्यानें भाविक दिपून जात. यांनीं अनेक चमत्कार केले. यांना हिंदु व मुसलमान सारखेच भजत. यांनीं शेवटीं हुमणाबादेजवळ मणिगिरि म्हणून निर्जन स्थान आहे तेथें वस्ती केली. त्यालाच माणिक-नगर हें नांव मिळून सध्यांचें वैभव प्राप्त झालें. यांनीं आपले धाकटे बंधु नृसिंहराव यांस ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला. तो आपल्या 'कल्पतरु' या ग्रंथांत दिला आहे. शिवाय यांचीं अनेक पदें व आरत्या वगैरे आहेत. त्या पद्यमाला नांवानें माणिकप्रभुसंस्थाननें प्रसिद्ध केल्या आहेत.

माणिकराव—(जन्म स. १८७८ डिसें. २१) सुप्रसिद्ध मल्लविद्याविशारद, मल्लविद्याप्रचारक व अस्थि-संधाननिष्णात.

यांचें समग्र नांव गजानन यशवंत ताम्हणे. जात प्रभु. हे आजन्म ब्रह्मचारी असून सुप्रसिद्ध हबशी मल्ल जुम्मा-मियांचे शिष्य. हे कांहीं काल हिंदुस्थानभर मल्लविद्या व निशाणबाजी यांचे प्रयोग करीत हिंडत. कलकत्ता येथील जागतिक सामन्यांत यांनीं अनेक खेळांत पहिला क्रमांक पटकावला. याबद्दल कलकत्त्यास यांचा जाहीर सत्कार झाला. यांनीं १९२१ सालीं बडोदें येथें व्यायाम-मंदिराची नवी उभारणी केली. सांघिक व्यायामपद्धति, देशी खेळास आधुनिक वळण देणें व हिन्दी कवायत हे सर्व प्रकार प्रथमतः यांनीं सुरू केले. कन्या आरोग्य-मंदिर (१९२५), शिवाजी मंदिर (१९२७) व अस्थि-संधानालय (१९३०) यांच्या स्वतंत्र इमारती उभारल्या. बडोद्यांतील महापुराच्या वेळीं लोकांचे जीव वांचविण्या-करितां अतिशय खटपट केली म्हणून बडोदेंसरकारनें यांना राजरत्न पदवी दिली. यांना प्राचीन शस्त्रांच्या संशोधनाचा आणि संग्रहाचा नाद आहे. त्यांत अकबर, औरंगजेब, राणा प्रताप, शिवाजीमहाराज, टिपु वगैरेंच्या तलवारी आहेत. यांच्या या संग्रहाची किंमत कित्येक लक्ष रुपये होईल.

यांनीं व्यायामावर हिन्दी, मराठी व गुजराथी भाषेंत अनेक पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत.

माधवराव, व्ही. पी.—(जन्म स. १८५० फेब्रु. १०-मृत्यु स. १९३५) म्हैसूर, त्रावणकोर व बडोदे राज्याचे सुप्रसिद्ध दिवाण.

हे मूळ महाराष्ट्रांतील दे. ऋ. ब्राह्मण. यांचा जन्म कुंभकोणम् येथें झाला. हे एकोणिसाव्या वर्षी बी. ए. झाल्यावर बंगलोरच्या मिशन स्कूलमध्यें शिक्षक म्हणून काम करूं लागले आणि उत्तम शिक्षक म्हणून म्हैसूरच्या महाराजांचे यांना शिक्षक नेमण्यांत आलें. पुढें म्हैसूर राज्यांत न्याय, वसूल, उद्योगधंदे, शेती, ग्रामसुधारणा, पोलीस वगैरे खात्यांशीं यांचा संबंध आला. यांनीं प्रत्येक ठिकाणीं आपल्या मूलगामी व लोकोपकारक कर्तृत्वानें आपली छाप बसविली आणि चहूंकडून वाहवा मिळविली. मुंबई इलाख्याची जमाबंदीची पद्धत पाहण्याकरितां दरबारनें यांना मुद्दाम धाडलें आणि यांना 'मेंबर ऑफ कौन्सिल'चे सभासद नेमून पुनः फर्स्ट रेव्हेन्यु कमिशनरची जागा दिली.

१९०४ सालीं यांना त्रावणकोर संस्थाननें आपले मुख्य प्रधान नेमलें. तेथें यांनीं दोन वर्षांत खात्यांची पुनर्घटना, दैनिक हिशेबतपासणी, सारा धान्यरूपांत न घेतां नाण्याच्या रूपानें घेणें व श्रीमूलंजनसभा स्थापून लोकप्रतिनिधींमार्फत राज्यकारभार चालविणें या महत्त्वाच्या सुधारणा केल्या.

१९०६ सालीं यांना पुनः म्हैसूरचे दिवाण नेमण्यांत आलें. तेव्हां यांनीं आरोग्य, नगररचना, गुरांचें आरोग्य, सहकारी संस्था, मोफत शिक्षण, धार्मिक शिक्षण, धंदेशिक्षण, परदेश शिष्यवृत्त्या या महत्त्वाच्या गोष्टी केल्या. तेथून हे १९०९ सालीं सेवानिवृत्त झाले.

१९१४ सालीं यांना मुद्दाम बोलावून श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनीं यांना बडोदे राज्याचे दिवाण केलें.

१९१९ सालीं जॉइंट पार्लमेंटरी कमेटीपुढें यांनीं राष्ट्रसभेतर्फे शिष्टमंडळांत इंग्लंडला जाऊन साक्ष दिली. धारवाड येथें भरलेल्या पहिल्या कर्नाटक परिषदेचे हे अध्यक्ष होते (१९२०). हे हिंदुमहासभेच्या एका अधिवेशनाचेहि अध्यक्ष होते. यांनीं आपला बराच काळ सामाजिक, आर्थिक व राजकीय सुधारणांत घालविला. हे पूर्ण राष्ट्रीय बाण्याचे, स्वतंत्र वृत्तीचे व तडफदार गृहस्थ होते. १९२९ सालीं त्रावणकोर संस्थानांत यांनींच सुरू केलेल्या श्रीमूलंजनसभेच्या रौप्यमहोत्सवप्रसंगीं अध्यक्ष होण्याचा अपूर्व मान यांना देण्यांत आला. हिंदुस्थानांतील अत्यंत कर्तबगार माणसांत यांची गणना होत असे.

माधवराव, राजा सर टी.—(जन्म स.१८२८–मृत्यु स. १८९१) सुप्रसिद्ध राजकारणी मुत्सद्दी व त्रावणकोर, बडोदे नि इंदोर राज्याचे मुख्य प्रधान.

यांचा जन्म कुंभकोणम् येथें महाराष्ट्रीय दे. ऋ. ब्राह्मणाच्या घराण्यांत झाला. यांचे आजे गुंडोपंत. वडील रंगराव व चुलते व्यंकटराव. हे त्रावणकोरचे दिवाण होते. यांचें घराणें पूर्वीपासून राजकारणांत मोठाल्या हुद्यावर वावरणारें होतें. यांनीं आपले थोरले बंधु वासुदेवराव यांच्याकडे मद्रास येथें राहून आपला इंग्रजी शिक्षणाचा सहा वर्षांचा अभ्यास पुरा केला (१८४६). कारकून, राजपुत्रांचे शिक्षक अशा क्रमानें चढत हे त्रावणकोर राज्याचे मुख्य प्रधान झाले (१८५८). तें काम यांनीं इतकें यशस्वी करून दाखविलें कीं, संस्थानांत सर्वत्र नवा मनु सुरू झाला, आर्थिक स्थिति सुधारली व सुव्यवस्था नांदूं लागली. १८६० सालीं गादीवर आलेल्या मार्तंडवर्मा यांना महाराजा ही पदवी व यांना सर ही पदवी ब्रि. सरकारकडून देण्यांत आली (१८६६). यांच्या चवदा वर्षांच्या यशस्वी कारकीर्दीच्या स्मरणार्थ त्रिवेंद्रम येथें लोकांनीं वर्गणी करून यांचा पुतळा उभारला आहे.

स. १८७३ सालीं हिंदुस्थान सरकारच्या सूचनेवरून इंदूर राज्याचे यांना दिवाण नेमण्यांत आलें. तेथें दोन वर्षे होतांच यांना बडोद्यास महाराज मल्हारराव गायकवाड यांच्या पदच्युतीनंतर दिवाण व रीजंट अशा दोन्ही अधिकारावर जावें लागलें. तेथील अंदाधुंदी नाहींशी करून यांनीं सात वर्षांत उत्तम व्यवस्था लावली आणि महाराज सयाजीराव गायकवाडांच्यासारखा राजा शिक्षण देऊन तयार केला. या यांच्या कार्याबद्दल ब्रिटिश सरकारनें यांना राजा ही पदवी दिली (१ जाने. १८७७).

शेवटीं मद्रासला राहत असतां हे आपला वेळ मराठी वाङ्मयाचा अभ्यास करण्यांत घालवीत. यांनीं मराठी कविता केल्या आहेत व त्या तिकडे लोकप्रिय आहेत. हे पक्के राष्ट्रीय वृत्तीचे होते. राष्ट्रसभेच्या अगदीं आरंभींच्या पुरस्कर्त्यांत यांचें नांव प्रमुख आहे. हे मद्रास येथें भरलेल्या तिसऱ्या राष्ट्रसभेचे स्वागताध्यक्ष होते. यांनीं लिहिलेल्या लष्करी शिस्तीच्या नियमांचें जर्मन भाषेंत भाषान्तर झालें आहे.

मार्शल, सर-जॉन ह्यूबर्ट—(जन्म स. १८७६ मार्च १९) हिंदुस्थानांतील पुराणसंशोधनखात्याचे व्यवस्थापक व सुप्रसिद्ध संशोधक.

इंग्लंडमधील चेस्टर हे यांचें जन्मस्थान. केम्ब्रिजच्या डुलविक व क्वीन्स कॉलेजमध्यें कांहीं दिवस शिक्षण घेतल्यानंतर ग्रीसमध्यें यांनीं पुरातनवस्तुसंशोधनाचे कार्यास सुरुवात केली. यानंतर हिंदुस्थानचे त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांच्या शिफारशीनें हे हिंदुस्थानला आले व दोन तपांपेक्षां अधिक काळ हिंदुस्थानांतील पुरातत्त्वखात्याच्या प्रमुखाचें काम केलें (१९०२-३१). १९०६ सालीं तें खातें यांनीं मध्यवर्ति सरकारला जोडून घेण्याची व्यवस्था केली व त्याची पुनर्रचना करून नवी दिशा दाखवून दिली.

प्राचीन इमारतींच्या संरक्षणासंबंधीचे 'Conservation Manual' प्रसिद्ध करून सर्व जुन्या इमारतींची त्या पद्धतीनें व्यवस्था ठेवण्याची पद्धति यांनीं सुरू केली. सांची येथील स्तूपाचें यांनीं केलेलें संरक्षण या दृष्टीनें नमुनेदार आहे. यानंतर चारसदा (जुनी पुष्कलावती) राजगृह, सारनाथ, कासीया वैशाली (हल्लीचे बसाढ), भिटा व तक्षशिला यांसारख्या प्राचीन बौद्ध तीर्थस्थानीं उत्खनन करून ह्यूएन्संग वगैरे चिनी प्रवाशांनीं वर्णन केलेलीं बौद्धधर्मीय क्षेत्रें व त्यांचा प्रवासमार्ग यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. यांपैकीं तक्षशिलेचें उत्खनन तर सतत वीस वर्षें चाललें व पश्चिम सीमा प्रांतांतून झालेल्या परकीय आक्रमणासंबंधीं एक नवा विचारप्रवाह त्यांतून उत्पन्न झाला. विदिशा येथील सुप्रसिद्ध ग्रीक हेलिओडोरस यांच्या गरुडस्तंभाचा शोध यांनीं लावला.

परंतु यांपैकीं सिंधमधील मोहेन-जो-दडो येथील प्राचीन हिंदी संस्कृतीचें संशोधन हें यांचें सर्वांत प्रमुख कार्य होय. १९२१ सालीं श्री. राखलदास बानर्जी यांनीं त्या ठिकाणाचा प्रथम शोध लावला. या ठिकाणचें पुष्कळसें उत्खनन सर जॉन यांनीं केलें व ते मॅके या संशोधकानें पुढें चालविलें (१९२७-३१). हिंदुस्थानचें प्राचीनत्व व जगांतील इतर पुरातन संस्कृतीशीं संबंध या दोन्ही दृष्टीनें हें संशोधन महत्त्वाचें आहे.

याशिवाय भोपाळ, काश्मीर, म्हैसूर, हैदराबाद इत्यादि ठिकाणीं पुरातत्त्वखात्यांची स्थापना व सर ऑरेल स्टाइन यांच्या मध्य आशियांतील संशोधन कार्यास उत्तेजन, हीं यांचीं इतर महत्त्वाचीं कार्यें होत.

यांचे ग्रंथ—(1) Mohenjo-Daro and the Indus Civilization (३ खंड), (2) Monuments of Sanchi (३ खंड), (3) Guides to Sanchi, Taxila, (4) Monuments of Ancient India (केम्ब्रिज हिस्टरी ऑफ इंडियाचे पहिल्या खंडांत), (5) Excavations at Taxila, (6) याशिवाय १९०९-३१ या काळांतील आर्किऑलॉजिकल रिपोर्ट्सचे संपादन (डॉ. मो. गं. दीक्षित).

मालवीय, पं. मदनमोहन व्रजनाथ—(जन्म स. १८६१ डिसें. २५) आंतरराष्ट्रीय कीर्तीचे हिंदी पुढारी, बनारसच्या हिंदु विश्वविद्यालयाचे जनक व नमुनेदार सार्वजनिक कार्यकर्ते.

अलाहाबाद हें यांचें जन्मस्थान. जुन्या कर्मठ आचारविचाराच्या ब्राह्मण घराण्यांत यांचा जन्म झाला. अलाहाबादच्या धर्मज्ञानोपदेश पाठशाळा, गव्हर्नमेंट हायस्कूल व मूर सेंट्रल कॉलेजमध्यें आपलें शिक्षण संपवून हे बी. ए. झाले. यानंतर गव्हर्नमेंट हायस्कूलमध्यें कांहीं दिवस शिक्षकाचें काम केल्यानंतर यांनीं 'हिंदुस्थान' पत्राच्या संपादनास सुरुवात केली. यानंतरहि यांनीं वेळोवेळीं इंडियन युनियन, अभ्युदय (हिंदी), लीडर, हिंदुस्थान टाईम्स इत्यादि पत्रांच्या संपादकाचीं कामें केलीं.

मध्यंतरीं मि. ह्यूम यांच्या सूचनेवरून हे वकिलीची परीक्षा पास झाले व १८८६ च्या कलकत्ता कॉंग्रेसमध्यें यांनीं आपलें पहिलें राजकीय भाषण केलें. यानंतर यांनीं ह्यूम यांचे सूचनेवरून कॉंग्रेसचा प्रचार करण्यासाठीं सरहद्द प्रांतांत दौरा काढला. कॉंग्रेसच्या अलाहाबाद (१८८८) अधिवेशनाचें सेक्रेटरीपद व लाहोर (१९०९), दिल्ली (१९१८-३२), कलकत्ता (१९३३) अधिवेशनांचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें. यांपैकीं १९३२-३३ चीं अधिवेशनें बेकायदा ठरविण्यांत येऊन यांना तेथें हजर राहण्यापूर्वीच अटक करण्यांत आली. १९३३ च्या अधिवेशनाचे वेळीं नेली सेनगुप्ता यांनीं यांचेसाठीं अध्यक्षाचें काम केलें.

१९०२ सालीं हे प्रथम प्रांतिक असेंब्लींत व १९१० सालीं हे प्रथम मध्यवर्ति असेंब्लींत निवडून गेले. आधीं अभ्यास करून विचारपूर्वक व्याख्यानें देण्याची प्रथा असेंब्लींत यांनीं सुरू केली व 'असेंब्लीडिबेट्स'चा दर्जा वाढविला. जालियनवाला बाग प्रकरणासंबंधीं हे स्वतः पंजाबांत गेले व स्वतः 'चक्षुर्वैसत्यं' पाहिलेल्या हकीगती यांनीं असेंब्लीच्या सभासदांना सादर केल्या.

'Punjab Disturbances' या नांवानें यांनी दिलेलें हें व्याख्यान किंवा Abolition of Indentured Labour' हें व्याख्यान त्या वेळीं अति गाजलें. आपल्या या मध्यवर्ति असेंब्लीच्या सभासदत्वाचा त्याग यांनीं रौलट कायद्याच्या निषेधार्थ केला (१९१९). पुन्हां १९२४ सालीं हे तेथें निवडून गेले व इंपिरीयन प्रेफरन्स पॉलिसीचा निषेध करण्यासाठीं यांनीं पुनः राजीनामा दिला (१९३०).

सार्वजनिक आयुष्याच्या सुरवातीच्या क्षणापासून हिंदुस्थानचें व हिंदूंचे पुढारी ही यांची भूमिका असे. असहकाराचे हे सुरवातीपासूनच विरोधक होते. त्याच दृष्टीनें हे स्वराज्य पक्षांत गेले व पुढें केवळ काँग्रेसच्या जातिनिर्णयविषयक धोरणाला विरोध करण्याकरितां काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन यांनीं आपल्या 'नॅशनलिस्ट' पक्षांची स्थापना केली (१९३४). सरकारविरुद्ध बोलतांना यांचा हा पक्ष स्वराज्यपार्टीशीं सहकार्य करीत असला तरी हिंदु हिताचा प्रश्न येतांच हे कोणाचाहि मिंधेपणा स्वीकारीत नसत. विवाहवयोमर्यादा निश्चित करणाऱ्या हरविलास सारडा यांच्या 'सारडा बिलास' यांनीं धर्मांत ढवळाढवळ करणारे म्हणून विरोध केला. हिंदुमहासभेच्या संस्थापकांपैकीं हे एक असून त्या संस्थेच्या (१९२३), प्रयाग (१९२४), पुणें (१९३५) अधिवेशनांचे हे अध्यक्ष होते.

जुन्या श्रुतिस्मृतिप्रणीत विचारसरणींतून अस्पृश्यतानिवारण, शुद्धि, आचारपरिवर्तन यांना आधार काढण्यासाठीं यांनीं प्रयाग वगैरे ठिकाणीं भारतीय निवडक पंडितांच्या पंडित परिषदा भरविल्या. शेवटीं स्वतःच अस्पृश्यांना 'ॐनमः शिवाय' या मंत्रानें शैव धर्माची दीक्षा देऊन शुद्ध करून घेण्याचा शास्त्रार्थ लिहिला व तो व्यवहारांत आणण्याचा प्रयत्न केला. तसेंच राउंड टेबल कॉन्फरन्ससारखा महत्त्वाचा प्रसंग येतांच आपली समुद्रागमन निषेधाची कल्पना बाजूस सारून हे म. गांधीबरोबर इंग्लंडला गेले. मात्र परत येतांच यांनीं समुद्रगमनाबद्दल प्रायश्चित्त घेतलें. तसेंच असहकाराच्या जमान्यांत असहकाराचे हे तात्त्विक विरोधक असूनहि सरकारच्या दडपशाहीचा निषेध करण्यासाठीं वर्किंग कमेटीच्या इतर सभासदांवर हें मुंबईच्या रस्त्यावर रात्रीन् रात्री तिष्ठत राहिले व नंतरहि यांनीं लागोपाठ दोनदां तुरुंगवास स्वीकारला.

यांच्या या सर्व कार्यांतून यांच्या मनांतील दोन स्वतंत्र विचारप्रवाहांचें होणारें दर्शन जुन्या गोष्टीचें महत्त्व जाणणाऱ्या परंतु भविष्यकालीन घटनांचें प्राबल्य ओळखणाऱ्या द्रष्ट्याच्या स्वरूपाची आठवण करून देतें. केवळ याच कारणासाठीं धर्माच्या बाबतींत आग्रहाची कमाल मर्यादा गांठणारे हे गृहस्थ राजकारणाचा प्रश्न येतांच सुधारकांतील सुधारक बनतात.

यांच्या या नव्याजुन्या विचारप्रवाहांचें उत्कृष्ट मीलन यांच्या हिंदु विश्वविद्यालयाच्या योजनेंत दृष्टीस पडतें. हिंदु शास्त्रें, धर्म व संस्कृत भाषांचें शिक्षण देण्याच्या प्राचीन विद्यापीठाच्या कल्पनेला देशी उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं शास्त्रीय ज्ञानाच्या अध्ययनाची यांनीं जोड दिली व आपल्या काशी येथील हिंदुविश्वविद्यालयाचा अवाढव्य पसारा उभा केला (पायाचा मुहूर्त वसंतपंचमी १९१६ फेब्रु. ४). तेथें प्रत्यक्ष काम १९१७ च्या जुलैंत सुरू झालें. त्यासाठीं यांनीं सुरवातीच्या केवळ चारपांच वर्षांत एक कोटीपेक्षां जास्त निधि जमविला व तेराशें एकरांच्या जागेंत निरनिराळ्या कार्यांसाठीं उपयोगिल्या जाणाऱ्या दीडशेंपेक्षां अधिक इमारतींतून विद्यापीठाचें काम सुरू केलें. विद्येच्या निरनिराळ्या तीस शाखांच्या अध्ययनाची येथें सोय असून इंडस्ट्रियल केमेस्ट्री, मायनिंग मेटॅलर्जी, मेकॅनिकल इलेक्ट्रिकल एंजिनियरिंग इत्यादींच्या विशेष शिक्षणाची सोय येथें करण्यांत आली. पुढें हिन्दी-भाषेंत सर्व शिक्षण देण्यावर यांचा कटाक्ष असून त्या दृष्टीनें विश्वविद्यालयीन शिक्षणाला आवश्यक असणारे ग्रंथ हिंदींत तयार करण्याचें काम घनश्यामदास बिर्ला यांनीं त्याच कामाकरितां दिलेल्या पन्नास हजाराच्या निधींतून चालू आहे. हिंदु असल्याचा अभिमान कोणाहि हिंदु माणसाच्या मनांत उत्पन्न करण्याइतपत भव्यता व पावित्र्य यांच्या या कार्यांत आहे.

या संस्थेंत हिंदुस्थानांतील पहिल्या दर्जाचे पंडित गोळा करण्याच्या दृष्टीनें यांची कारकीर्द अति यशस्वी ठरली. मध्यंतरीं एस्. राधाकृष्णन् यांना लढाईमुळें इंग्लंडला जाणे अशक्य होतांच यांनीं उपकुलगुरु म्हणून त्यांची नेमणूक केली.

स्नानसंध्या, गीताभागवतादिकांचा नित्य व्यासंग, पापभीरु व शुचिर्भूत वृत्ति, कपाळीचा चंदनाचा ठसठशीत तिलक, पांढरा स्वच्छ पोषाख आणि देश नि धर्म यांबद्दल काम करण्याची तत्परता यांमुळें यांच्याबद्दल सर्वांना विलक्षण आदर वाटतो.

यांनीं स्वतंत्र ग्रंथ केला नसला तरी यांचीं त्या त्या

वेळचीं भाषणें हीं त्या त्या विषयांतील ग्रंथाच्या तोडींचीं आहेत. थोडासा पाल्हाळ पत्करूनहि त्या त्या विषयाची पूर्वपीठिका देऊन आपला विषय अद्ययावत् आधारांनीं सजवावयाचा आणि मोठ्या गोड भाषेंत भावनेलाहि आवाहन करावयाचें अशी यांच्या वक्तृत्वाची घडण असते. यांनीं आपल्या चारित्र्याला दिलेल्या नैतिक अधिष्ठानामुळें विरोधी पक्षालासुद्धां यांच्याबद्दल आदर दाखवावाच लागतो. तसेंच विरोध करीत असतांहि नवे विचार आत्मसात् करण्याची यांची शक्तिहि शाबूत आहे. काँग्रेस, हिंदुसभा वगैरेंत यांनीं आपल्या या शक्तीचा प्रत्यय दाखविला आहे. हृदयाचे मृदु, तत्त्वाचे खंबीर, धार्मिकतेची मूर्ति अशा यांच्या व्यक्तित्वामुळें म. गांधीपेक्षांहि यांच्याबद्दल लोकांत विशेष पूज्यभाव आढळतो.

यांनीं थकलेलें शरीर समर्थ करण्याकरितां आयुर्वेदांतील 'कायाकल्प' नांवाचा प्रयोग केला, त्यामुळें यांचे केस काळे झाले, पाठीचा पोक नाहींसा झाला व शरीर लालबुंद झालें; पण तो परिणाम अल्पकालीन ठरला.

मावजी, पुरुषोत्तम विश्राम—(जन्म स.१८७८–मृत्यु स. १९२९) इतिहास व कलाविषयक वस्तूंचे संग्राहक व अभ्यासक.

यांचा जन्म काठेवाडांत द्वारकेजवळ बरवाला गांवीं सधन भाटिया जातींत झाला. यांनीं मॅट्रिक झाल्यावर मि. जेम्स मॅकडोनल्ड या इंग्रज गृहस्थाजवळ घरींच अभ्यास केला आणि त्याचा परिणाम म्हणून इतिहास-संशोधन, कलाप्रेम आणि प्राचीन वस्तुसंग्रहाचा यांना नाद लागला. यांच्यावर स्व. गोवर्धनराम माधवराम त्रिपाठी व स्व. सर विठ्ठलदास दामोदर ठाकरसी या यांच्या जिवलग मित्रांचा विशेष परिणाम असे. यांचा पेशा व्यापाऱ्याचा. कापडाच्या गिरण्यांशीं यांचा विशेष संबंध असे. द्वारका सिमेंट फॅक्टरीचे हे मूळ संयोजक व संस्थापक. परदेशाशींहि व्यापारविषयक यांचा मोठा संबंध होता.

इतिहास, राजकारण, साहित्य, कला, पुराणवस्तु (Antiquities) व शिल्प हे यांचे आवडते विषय होते. त्यांत यांचें ज्ञानहि असाधारण असे. मुंबई रॉयल एशियाटिक सोसायटीचे हे एक प्रमुख सभासद होते. महाराष्ट्राच्या इतिहासाचे हे विशेष ज्ञाते होते. ऐतिहासिक लेख, वस्तुचित्रें वगैरे साहित्याचा यांचा संग्रह विपुल खर्च करून जमविलेला होता. अशा प्रकारचा संग्रह करणाऱ्या व्यक्तींत यांच्याइतपत भव्य, विपुल आणि गुणग्राहक दृष्टीनें संग्रह करणारा क्वचित्च आढळेल. त्यामुळें तो पाहण्यासहि पुष्कळच देशीपरदेशी लोक येत असत. या संग्रहाचा एक महत्त्वाचा भाग मुंबई, प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्यें ठेवला आहे व दुसरा भाग यांच्या मुलापाशीं आहे. याच कलाप्रेमामुळें मुंबईस यांनीं 'लक्ष्मी आर्ट प्रिंटिंग प्रेस' काढला आणि त्याद्वारा चित्रकलेच्या प्रसाराची व्यवस्था केली. या इलाख्यांत 'सुवर्णमाला' नांवाचें चित्राचें नियतकालिक यांनींच काढलें व सचित्र पुस्तकें काढण्याची प्रथाहि यांच्यामुळेंच सुरू झाली. गुजराथी साहित्यपरिषदेंत यांनीं अनेक ऐतिहासिक साहित्याच्या स्वरूपाविषयीं लेख वाचले. अहमदाबादच्या सहाव्या गुजराथी साहित्य संमेलनाच्या वेळीं कलाप्रदर्शनाचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें होतें. यांच्या या औदार्यपूर्ण सेवेबद्दल बडोदेसरकारनें यांना 'राजरत्न' ही पदवी दिली होती.

यांचे ग्रंथ—१ रजपुतानांना देशी राज्यो, २ रणवीरसिंह, ३ प्रबोधभारत, १-२ भाग, ४ सुरसागरनी सुंदरी, ५ शिवाजीनो वाघनख, ६ मानवधर्ममाला, ७ संध्या अने मराठाराज्यनो सूर्यास्त, ८ रणयज्ञ याने पचीस वर्षनुं युद्ध, ९ नीतिवचन, १० वज्राघात अने विजयनगरनो विनाशकाल, ११ चार संन्यासी, १२ वतनपत्रें, निवाडपत्रें (मराठी), १३ कैफियत यादी, १४ नेटिव अडमिनिस्ट्रेटिव जीनियस ऑफ नाईन्टीथ सेन्चरी (इंग्रजी), १५ व्हॉट लिटरेचर डू वुइ वॉन्ट (इंग्रजी), १६ शिवाजीनुं स्वराज्य, १७ धी इंडियन स्ट्रे थॉट्स सीरीज १, २, ३ (इंग्रजी).

मावळंकर, गणेश वासुदेव—(जन्म स.१८७७ नवं. २६) राष्ट्रसभेचे सुप्रसिद्ध कार्यकर्ते व मध्यवर्ति कायदेमंडळाचे अध्यक्ष.

यांचें घराणें सुमारें दोनशें वर्षांपूर्वी गुजराथेंत आलें. मूळचे हे रत्नागिरी जिल्ह्यांतील मावळंगे येथील. यांचा जन्म बडोद्यास अजोळीं झाला. यांचे वडील मुन्सफ म्हणून कोंकणांत असल्यानें यांचें इंग्रजी पांच इयत्तेपर्यंत शिक्षण तिकडेच झालें. पुढें यांनीं बी. ए., एलएल. बी. होऊन अहमदाबाद येथें वकिलीस आरंभ केला (१९१३). मध्यंतरीं असहकाराचे चळवळींत १९२२-२३ मध्यें व १९२७ चे अतिवृष्टीचे वेळीं यांनीं वकिली सोडली

असली तरी १९३० पासून कमी करीत १९३७ सालीं यांनीं ती पूर्ण सोडली.

वकिलीबरोबरच सार्वजनिक संस्थांतहि यांनीं प्रवेश केला. अहमदाबादेंत अशी संस्था अगर चळवळ नाहीं कीं जिच्याशीं यांचा संबंध आलेला नाहीं. १९२१ च्या अहमदाबाद राष्ट्रसभेच्या मुख्य कार्यवाहाचें काम तर यांनीं चोख केलेंच, पण बैठक संपल्यावर चोवीस तासांचे आंत खजिनदारास हिशेबाचा ताळेबंद देऊन व सर्व हिशेब लवकरच प्रसिद्ध करून यांनीं मोठेंच उदाहरण घालून दिलें. अशा तत्पर व चोख व्यवहारामुळें अनेक संस्थांचे निधि यांच्याकडे सोंपविले जातात. अहमदाबादची नगरपालिका, मुंबई (१९३७) व दिल्ली कायदेमंडळ (१९४६) यांचें अध्यक्षपदहि बिनविरोध यांच्याकडे येण्याचें कारणसुद्धां यांचा चोख पण सर्वसंग्राहक व्यवहारच होय.

यांना राजकीय कारणांकरितां अनेक वेळां तुरुंगवास भोगावा लागला. यांनीं हिंदुस्थानांत व युरोपांत प्रवास केला आहे.

चारित्र्य हा सर्वांचा पाया आहे अशी यांची समजूत असून महाराष्ट्र व मराठी भाषा यांचा यांना अभिमान आहे. गुजराथी भाषेसंबंधीं अनेक संस्थांचे हे अध्यक्ष आहेत. त्याप्रमाणें धुळें सत्कार्योत्तजक सभा, जांब समर्थ मंदिर वगैरेचे हे विश्वस्त आहेत. बृहन्महाराष्ट्रविषयक चळवळीचे हे पुरस्कर्ते आहेत.

ग्रंथ—गुजराथी–१ अहमदाबाद नगरपालिकेचें राष्ट्रीय जीवनांतील कार्य.

मास्ति, वेंकटेश आयंगार—(जन्म स. १८९२ सुमार) कानडी भाषेचे सुप्रसिद्ध लेखक, कानडी भाषेंतील लघुकथालेखनाचे प्रवर्तक आणि कर्नाटक संस्कृतीचे जबरदस्त पुरस्कर्ते.

मास्ति हें यांच्या गांवाचें नांव आहे. तेंच यांचें उपनांव बनलें. हे रामानुजपंथाचे वैष्णव आहेत, हें आयंगार या उपपदावरून ध्यानांत येतें. एम्. ए. झाल्यानंतर म्हैसूर सिव्हिल सर्व्हिसमध्यें हे शिरले. आपल्या कर्तबगारीनें हे एक्साइज कमिशनरच्या हुद्यापर्यंत चढले आणि सेवानिवृत्त झाले.

कर्नाटकांतील संस्कृति, भाषा, आचार व साहित्य यांचे हे कळकळीचे पुरस्कर्ते आहेत. ज्या वेळीं देशी भाषांत बोलणें व लिहिणें कमीपणाचें समजत होतें तेव्हां यांनीं कानडींत लिहिण्याविषयीं लोकांत अभिमान व विश्वास उत्पन्न केला. यांनीं विविध प्रकारचें लेखन केलें आहे. कानडीत लघुकथा लिहिण्याची प्रथा यांनीं सुरू केली असें मानतात. अनेक कानडी लेखकांना यांनीं आर्थिक साहाय्य केलें आहे. हिंदुस्थानाचा उत्कर्ष व्हावयाचा असल्यास हिंदुस्थानांतील प्रत्येक भाषेला पुढें आलें पाहिजे अशी यांची व्यापक दृष्टि आहे. श्रीकंठय्यांच्या नंतर कर्नाटक साहित्यपरिषदेचे हे उपाध्यक्ष आहेत.

यांचे कानडी ग्रंथ—१ लघुकथा १-६ भाग. त्यांत यांची सुब्बण्णा ही गोष्ट फारच लोकप्रिय व नमुनेदार समजण्यांत येते. नाटकें–२ शान्ता, ३ शिवछत्रपति वगैरे, टीकात्मक–४ विमर्श १-४ भाग, चरित्रें–५ वाल्मीकि, ६ रामकृष्ण परमहंस; सांस्कृतिक–७ कर्नाटकद जनतेय संस्कृति, इंग्रजी ग्रंथ–८ पाप्युलर कल्चर इन कर्नाटक, ९ रामायणावर समालोचनात्मक सुंदर निबंध (सु. त. पप्पु).

मित्र, डॉ. राजेंद्रलाल जनमेजय—(जन्म स. १८२४–मृत्यु स. १८९१) आंतरराष्ट्रीय कीर्तीचे बंगाली प्राच्यविद्यापंडित व संशोधक.

बंगालमधील सूर हें गांव यांचें जन्मस्थान. यांची जात कायस्थ. प्रथम वैद्यकी व नंतर वकिली शिक्षणाबाबत केलेले प्रयत्न अनेक कारणांनीं फिसकटल्यानंतर बंगालच्या रॉयल एशियॅटिक सोसायटीनें आपले लायब्रेरियन व असि. सेक्रेटरी म्हणून यांची नेमणूक केली (१८४६-५६). यानंतर 'वार्ड्स इन्स्टिट्यूट' या मुलांच्या वसतीगृहाचे यांना डायरेक्टर नेमण्यांत आलें. पुढें ती संस्था बंद झाल्यानंतर हे सेवानिवृत्त झाले (१८८०). 'हिंदु पेट्रियट' हें पत्र चालविण्यांत सोसाव्या लागणाऱ्या आर्थिक झळीमुळें अत्यंत निकृष्ट अवस्थेंत हे मरण पावले.

Antiquities of Orissa (दोन खंड) हा यांचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ होय. रॉयल सोसायटी ऑफ आर्ट्सनें हिंदी कलाकौशल्याचे नमुने जमविण्यासाठी दिलेल्या पैशांतून बंगाल सरकारनें ओरिसांतील भुवनेश्वराला यांच्या नेतृत्त्वाखालीं एक संशोधकांचें पथक पाठविलें व त्यांतून निष्पन्न झालेला इतिहास यांनीं या ग्रंथांत सादर केला. नकाशे, मोजमापें, फोटो, शिलालेखाच्या मूळ प्रति वगैरेंच्या साहाय्यानें यांनीं जितकी तंतोतंत माहिती मिळेल तितकी गोळा करण्याचा प्रयत्न केला आहे. ओरिसामधील विशेष महत्त्वाच्या ठिकाणीं

उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक साधनांवरून यांनीं त्या प्रांताचा सुसंगत कलात्मक, धार्मिक व सामाजिक इतिहास सादर केला आहे. त्यांतहि त्या वेळीं रूढ असणाऱ्या निरनिराळ्या धार्मिक मतप्रणालींचे ओरिसा प्रांतांतील कलेवर झालेले यांनीं शोधून काढलेले परिणाम विशेष महत्त्वाचे आहेत.

यांच्या एकशें चवदा निबंधांच्या प्रसिद्ध झालेल्या संग्रहांपैकीं 'The Representation of Foreigners in Ajantha Frescoes' हा निबंध विशेष महत्त्वाचा मानला जातो. अठराशें ते दोन हजार वर्षांपूर्वीच्या हिंदी जीवनाचें प्रतिबिंब अजिंठा लेण्यावर पडलें असून ग्रीक-कलेशीं त्याचा कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं, असा सिद्धान्त यांनीं या निबंधांत मांडला. आपल्या 'रॉक-कट टेम्पल्स इन इंडिया' (१८४३) या ग्रंथांत अजिंठा लेण्यांतील ग्रीक परमृतत्वाची तरफदारी करणाऱ्या जेम्स फर्ग्युसन व हे यांमध्यें याबाबत फार जोराचा वादविवाद झाला.

Archeology in India, History of Indian and Eastern Architecture या आपल्या ग्रंथांत व इंडियन ॲन्टिक्वेरीमध्यें अनेक वेळां जेम्स फर्ग्युसन यांनीं यांच्या या म्हणण्याला विरोध करूनहि यांनीं आपलें म्हणणें मागें घेतलें नाहीं. 'ग्रीक लोकांचेकडून हिंदी लोक प्रथम दगड कोरण्याची कला शिकले.' या फर्ग्युसन यांचे म्हणण्याला यांनीं Indian Architecture या लेखांत व Buddha Gaya या आपल्या ग्रंथांत यांनीं नव्यानव्या मुद्द्यांनिशीं विरोध केला व Antiquities of Orissa या आपल्या पुस्तकांत त्याच लेखाचें पुनर्मुद्रण करून आपलें म्हणणें यांनीं इतर संशोधकांस मान्य करावयास लावलें. या वादविवादांत जेम्स फर्ग्युसन यांची यांना शिव्या देण्यापर्यंत मजल आली असतां यांनीं दाखवलेली शांत वृत्ति विशेष उल्लेखनीय आहे.

'Buddha-Gaya, the Hermitage of Sakyamuni' या ग्रंथासाठीं हे नेपाळ वगैरे प्रांतांत फिरले व नंतर यांनीं अनेक जुने बौद्ध ग्रंथ संपादून प्रसिद्ध केले. त्यांपैकीं 'ललित-विस्तार' हा ग्रंथ विशेष महत्त्वाचा असून 'प्राज्ञ-परनिथ' हा यांचा अपूर्ण ग्रंथहि असाच महत्त्वाचा आहे.

यांचे महत्त्वाचे ग्रंथ—(1) Indo-Aryans (दोन खंड, एकवीस संशोधनपर निबंधांचा संग्रह), (2) The Sanskrit Buddhist Literature of Nepal, (3) Antiquities of Orissa (1869, दोन खंड), (4) Buddha-Gaya, the Hermitage of Sakyamuni, (5) The Parsees of Bombay.

याशिवाय भांडारकरांच्या हस्तलिखितांच्या मालेंत व बंगाल रॉयल एशियाटिक सोसायटीच्या बिब्लिओथिका इंडिकासाठीं संपादलेले अनेक ग्रंथ.

यांचे महत्त्वाचे निबंध—(1) Spirituous Drinks in Ancient India, (2) The Greek Art and Leprosy in India, (3) On some Græco-Bactrian-Relics from Rawalpindi (1862) इत्यादि.

यांचीं पत्रें—(१) विविधार्थसंग्रह (बंगाली मासिक १८५०-५७), (२) The Hindu Patriot.

मिनेजीस, ब्रागांस सि. लुईजद्—(जन्म स. १८७८–मृत्यु स. १९३८ जुलै १०) पोर्तुगीज भाषेंतील निष्णात लेखक, वर्तमानपत्रकार व निर्भय पुढारी.

यांचा जन्म गोवा प्रान्तांत चांदर गांवीं ख्रिस्ती क्षत्रिय कुळांत झाला. हे गर्भश्रीमंत असल्यानें यांची राहणी भारदस्त व डौलदार असे. राजवाड्यासारखें घर, सुसज्ज ग्रंथालय आणि अद्ययावत् वाचन यांमुळें यांना आन्तरराष्ट्रीय प्रसिद्धि मिळाली होती. हे ख्रिस्ती धर्म पाळीत नसत. शिवाय आपल्या तिखट लेखणीनें त्यांतील अनेक दोष नि पोरकटपणा हे जाहीर करीत. हे 'उ एव्हाल्द'चे संस्थापक होते. नंतर यांनीं 'देबात' नांवाचें वर्तमानपत्र काढलें. गावड्यांच्या शुद्धीच्या वेळीं निघालेल्या 'प्रकाश' पत्रांत हे लिहीत. यांच्या क्रान्तिकारक लेखांमुळें तें प्रकाश पत्र सरकारला बंद करावें लागलें. सरकारशीं सहकार्य करणारे हे गृहस्थ पुढें सरकार-विरोधी बनले. कोणताच विधि न करितां आपलें प्रेत गरिबांच्या जागेंत पुरण्यांत यावें अशी यांनीं इच्छा व्यक्त केली होती त्याप्रमाणें यांचें प्रेत पुरण्यांत आलें.

मिर्झा, मुहम्मद इस्माइल—(जन्म स. १८८३ आक्टो. २३) सुप्रसिद्ध राजकारणी मुत्सद्दी व म्हैसूर, जयपूर नि हैदराबाद राज्यांचे विख्यात दिवाण.

म्हैसूरच्या राजेसाहेबांबरोबर बंगलोरच्या वसलाइन मिशन हायस्कूल व सेंट्रल कॉलेजमध्यें कांहीं दिवस शिक्षण घेतल्यानंतर हे म्हैसूर संस्थानच्या नोकरींत दाखल झाले (१९०५). प्रथम यांचा हुद्दा जरी सुपरिंटेंडेन्ट ऑफ पोलीसचा असला तरी आपल्या कर्तबगारीनें हे

राजेसाहेबांचे असि. सेक्रेटरी, हुजुर सेक्रेटरी, प्रायव्हेट सेक्रेटरी (१९२२), अशा पायऱ्या चढत जाऊन अखेर त्या संस्थानाचे दिवाण बनले (१९२६-४१). द. हिंदुस्थानांत प्रमुख गणल्या जाणाऱ्या म्हैसूरसारख्या संस्थानांतील यांची ही दीर्घकालीन कारकीर्द यांच्या राजकारणी योजकतेची द्योतक आहे. एम्. विश्वेश्वरय्या, टी. माधवराव यांच्यासारख्या पहिल्या दर्जाच्या राजकारणतज्ज्ञांची परंपरा यांनीं व्यवस्थितपणें चालविली हें यांच्या या कार्याचें मुख्य स्वरूप आहे.

१९३० च्या राउंड टेबल कॉन्फरन्सला हे दक्षिण हिंदुस्थानांतील संस्थानचे प्रतिनिधि म्हणून तर दुसऱ्या राउंड टेबल कॉन्फरन्सला म्हैसूर, जोधपूर व जयपूर संस्थानचे प्रतिनिधि म्हणून हजर होते. या सभेच्या तिसऱ्या अधिवेशनच्या जॉईंट सिलेक्ट कमेटीलाहि हे हजर होते. या सभांतील कन्सल्टेटिव्ह कमेट्यांमधूनहि यांची नेमणूक झाली होती.

जावामधील बंदोएंग येथें भरलेल्या ईंटर गव्हर्नमेंटल कॉन्फरन्स फार ईस्टर्न कंट्रीजला गेलेल्या हिंदी प्रतिनिधि मंडळाचे हे प्रमुख होते (१९३७). अन्नामलाई, मद्रास, कलकत्ता, पाटणा व ढाका येथील युनिव्हर्सिट्यांच्या पदवीदान समारंभाच्या अध्यक्षपदाचा लाभ यांना झाला आहे.

१९४२ सालापासून यांनीं आपल्या म्हैसूर संस्थानांतील नोकरीचा त्याग केला असून जयपूर संस्थानच्या मुख्य दिवाणाच्या जागीं काम केल्यावर यांना हैदराबाद संस्थानचें दिवाणपद प्राप्त झालें.

मिश्र, प्रतापनारायण संकटाप्रसाद—(जन्म स. १८५५–मृत्यु स. १८९४) हिन्दी भाषेंतील प्रसिद्ध लेखक व कवि.

जन्मस्थान कानपूर. कान्यकुब्ज ब्राह्मण. उर्दू, फारसी व संस्कृत या भाषा यांना चांगल्या येत. कविता व विशेषतः लावण्या करण्याचा व ऐकण्याचा यांना फार नाद असे. प्रख्यात लावणीबाज 'बनारसी' त्या वेळीं कानपुरांतच राहत असे. यांनीं ब्राह्मण मासिक स. १८८३ पासून दहा वर्षें चालविलें. १८८९ मध्यें हे कालाकंकरच्या हिन्दोस्थान पत्राचे सहसंपादक झाले. परंतु आपल्या स्वच्छंदी स्वभावानें हे तेथें फार दिवस राहूं शकले नाहींत. प्रेम एव परो धर्मः हा यांचा सिद्धान्त असे. हे नाटकांत आपलें काम फार खुबीनें व सुंदर करीत. हे राष्ट्रसभाभक्त होते. यांनीं भाषान्तरें व स्वतंत्र वीस अशीं बत्तीस पुस्तकें लिहिलीं.

नाटकें—१ कलिप्रभाव, २ हठी हमीर, ३ गोसङ्कट, ४ जुआरी-खुआरी, इतर–५ प्रेमपुष्पावली, ६ शृङ्गारविलास, ७ तृत्त्यन्ताम्, ८ भारतदुर्दशा, ९ प्रतापसंग्रह, १० मानसविनोद, ११ शिशुविज्ञान, १२ स्वास्थ्यरक्षा, १३ लोकोक्तिशतक इ.

मिश्रबंधु-गणेशबिहारी—(जन्म स. १८६५), **श्यामबिहारी**—(जन्म स. १८७४) व **शुकदेव**—(जन्म स. १८७९) मिश्रबंधु या नांवानें हिन्दी साहित्याची सेवा करणारे तिघे बंधु.

जात कान्यकुब्ज ब्राह्मण. यांचें घराणें पूर्वी पत्योजाचे द्विवेदी म्हणून ओळखलें जाई. पण यांचे पूर्वज पंडित राममिश्र यांच्या विद्वत्तेमुळें हे घराणें मिश्र या अधिक विद्वत्तादर्शक नांवानें ओळखलें जाऊं लागलें. यांचा बाल्यकाळ इटौजा येथें गेला. हे बंधु अनेक खेळांत व धनुर्विद्या व अचूक नेम मारण्यांत कुशल आहेत. पहिले अनेक भाषाभिज्ञ व मोठे विद्यारसिक, दुसरे एम्. ए. होऊन को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांचे डे. रजिस्ट्रार वगैरे हुद्यांचीं कामें करून सेवानिवृत्त झाले. तिसरे बी. ए. होऊन छत्रपूरचे दिवाण होते. हिन्दी नवरत्न या ग्रंथांत तुलशीदास, सूरदास, देव, बिहारी, भूषण वगैरे नऊ प्रसिद्ध कवींच्या काव्याची समालोचना यांनीं केली आहे. अशा पद्धतीचा ग्रंथ हिन्दींत हा पहिलाच आहे.

मिश्र बंधुविनोदमध्यें चार हजार कवि व १२ हजारपेक्षां जास्त पुस्तकांचा उल्लेख आहे. या परिश्रमपूर्वक लिहिलेल्या ग्रंथानें यांचें नांव श्रेष्ठ ग्रंथकारांत मोडतें.

यांचें वाङ्मय विपुल असून कोणता भाग कोणीं लिहिला हें सांगतां येत नाहीं.

यांचें वाङ्मय—१ लवकुशचरित्र, २ हिन्दी नवरत्न, ३ मिश्रबंधुविनोद, ४ नेत्रोन्मीलन (नाटक), ५ पूर्वभारत (नाटक), ६ वीरमणि (कादंबरी), ७ हिन्दुइझम (इंग्रजी), ८ भारतवर्षका इतिहास, भारतविजय (पद्य) वगैरे.

मिराबेन—(जन्म स. १९०० सुमार) गांधीवादाच्या परदेशी उपासक.

यांचें नांव मॅडेलाइन स्लेड. या एका ब्रिटिश ॲडमिरलच्या कन्या. यांनीं इंग्लंडमधील आपलें ऐश्वर्याचे

जीवन सोडलें व मिराबेन हें नांव धारण करून म. गांधींच्या या अनन्य उपासक बनल्या. म. गांधींच्या अतिविश्वासांतील सहकाऱ्यांत यांची गणना होत असून गांधीजी तुरुंगांत गेले असतां त्यांच्या 'यंग इंडिया'चें संपादन या करीत (१९३०). राउंड टेबल कॉन्फरन्सच्या वेळींहि या गांधीजींच्या बरोबर इंग्लंडला गेल्या. मध्यंतरीं 'हिंदी प्रश्ना'ची पाश्चात्य जगाला ओळख करून देण्यासाठीं यांनीं इंग्लंड-अमेरिकेंत एक दौराहि काढला होता (१९३४-३५).

मिंटो, लॉर्ड गिल्बर्ट जॉन—(जन्म स.१८४५-कारकीर्द स. १९०५ आगस्ट-१९१०) हिंदुस्थानचे व्हाइसरॉय.

केंब्रिज येथें शिक्षण घेऊन हे बी. ए. झाले. लॉर्ड कर्झननंतर हे व्हाइसरॉय म्हणून हिंदुस्थानांत आले. त्यापूर्वी कॉनडांत यांनीं तें काम केलें होतें.

बंगालच्या फाळणीमुळें देशांत अराजक चळवळ वाढली. त्याला तोंड देण्याकरितां यांनीं मुद्रणनियंत्रणाचा कायदा केला. लो. टिळकांसारखे लोक तुरुंगांत गेले. यांनीं मोर्लेमिंटो सुधारणा जाहीर करून कायदेमंडळाची वाढ, प्रातिनिधिकत्व, शिफारसवजा ठराव करण्याचा व उपप्रश्न विचारण्याचा अधिकार, कार्यकारी मंडळांत बिनसरकारी माणसांचा प्रवेश वगैरे गोष्टी केल्या. मात्र अल्पसंख्याकांना वेगळे प्रतिनिधि देऊन जातवारीच्या अराष्ट्रीय वृत्तीला उत्तेजन दिलें.

मीर, अमीरअली सय्यद—(जन्म स. १८७३-मृत्यु स. ?) सुप्रसिद्ध हिन्दी कवि, लेखक व सार्वजनिक कार्यकर्ते.

जन्मस्थान सागर, मध्यप्रान्त. हे व्ह. फा. व ट्रेंड शिक्षक होऊन अंजुमेन इस्लामिया हायस्कूलमध्यें ड्राइंग शिक्षक म्हणून काम करीत. पुढें डोळ्याच्या आजारामुळें देवरी गांवीं चुलत्याच्या दुकानाची व्यवस्था पाहूं लागले. तेथें समस्यापूर्ति करण्याकरितां कविता करीत. यांच्या कविता उत्तम होऊं लागल्या व यांच्या शिष्यपरंपरेंत उत्कृष्ट कवि निर्माण झाले. लक्ष्मी मासिक व जैनमित्र पत्राचे हे संपादक होते. ह्लेगांत लोकांची सेवा व गोरक्षण हे यांचें आवडते विषय आहेत. हिन्दी राष्ट्रभाषा व्हावी असें यांचे मत असून तुळशीदासाचें रामायण हा ग्रंथ हे गृहजीवनाचा आदर्श मानतात. मध्यप्रान्तांतील उदयपूर संस्थानांत यांना मॅजिस्ट्रेट नेमण्यांत आलें. हिन्दी लेखनाबद्दल पदव्या व पारितोषिकें मिळून यांचा अनेकदां बहुमान झाला आहे. बूढे का ब्याह, नीतिदर्पणकी भाषाटीका, सदाचारी बालक वगैरे यांचीं पुस्तकें प्रसिद्ध आहेत.

मुकर्जी, सर आशुतोष—(जन्म स. १८६४ जून २९-मृत्यु स. १९२४ मे २५) कलकत्ता विश्वविद्यालयाचे निर्माते व बंगालमधील सुप्रसिद्ध कार्यकर्ते.

जन्मस्थान कलकत्ता. यांचें शिक्षण पूर्ण झाल्यावर गणितांतील संशोधनाचें कार्य यांनीं हातीं घेतलें. पण प्रतिकूल परिस्थितीमुळें यांना वकिलीचा धंदा करणें भाग पडलें. वयाच्या तिसाव्या वर्षी यांना डॉक्टर ऑफ लॉ पदवी मिळाली आणि चाळिसाव्या वर्षी हे कलकत्ता हायकोर्टाचे न्यायाधीश झाले. त्या जागेवर यांनीं वीस वर्षें काम केलें. त्याशिवाय कलकत्ता कार्पोरेशन, प्रान्तिक व मध्यवर्ति कायदेमंडळ यांतहि सभासद म्हणून यांनीं कामगिरी केली.

तथापि कलकत्ता विश्वविद्यालयांत यांनीं सतत तीस वर्षें केलेलें कार्य अत्यंत महत्त्वाचें आहे. यांच्या कर्तृत्वानें तिचें केवळ परीक्षा घेण्याचें रूप नाहींसें होऊन ती पूर्व हिंदुस्थानांतील प्रचंड शिक्षणसंस्था बनली. तिचें चालकत्वहि हिन्दी लोकांच्या हातांत राहिलें. पुस्तकी ज्ञानापेक्षां संशोधनाला महत्त्व देणें, ग्रंथालय, प्रयोगशाळा व इमारती तयार करणें, त्यांत उपकरणें व साहित्य आणून अभ्यासक, शिक्षक व शोधक निवडून त्यांना हाताशीं धरणें वगैरे सतत श्रमाचीं व हुषारीचीं कामें यांनीं मोठ्या यशस्वीपणें पार पाडलीं. सर्व हिंदुस्थानला भूषणभूत असणारी 'युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ सायन्स ॲन्ड टेक्नालजी' ही संस्था यांच्या या खटपटींतून निघाली. त्याकरितां यांनीं हिन्दी तरुण परदेशीं पाठविले आणि तिकडचे तज्ज्ञ इकडे आणून हुषार हिन्दी शिक्षक व विद्यार्थी यांशीं परिचय घडवून आणला.

१९२० मध्यें यांनीं आपल्या कलकत्ता युनिव्हर्सिटीमध्यें Anthropology Department उघडलें. हा विषय अभ्यासक्रमांत नेमून त्याचें अध्ययन व संशोधन करण्याकरतां अधिकृत चालना देण्याचें काम हिंदुस्थानांत यांनीं प्रथम केलें.

यांनीं बंगाली भाषेला माध्यम म्हणून माध्यमिक अभ्यासक्रमांत स्थान मिळवून दिलें व उच्च अभ्यासक्रमांत स्थान उत्पन्न होईल अशी व्यवस्था केली. सर्व

देश स्वतंत्र व वरचढ बुद्धीचा व्हावा आणि शिक्षण सार्वत्रिक व्हावें असा यांचा प्रयत्न असे. स्वतंत्र नव्या संस्था निर्माण करून चालविण्याची आणि यांच्याजवळ जाणाऱ्या माणसांतील कर्तृत्वशक्ति जागृत करण्याची यांच्यांत विलक्षण शक्ति होती.

मुकर्जी, श्यामाप्रसाद—(जन्म स. १९०१ जुलै) बंगालमधील सुप्रसिद्ध हिंदुसभा कार्यकर्ते व शिक्षणतज्ज्ञ.

कलकत्ता युनिव्हर्सिटीचे संवर्धक आशुतोष मुकर्जी यांचे हे चिरंजीव. कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांतून एम्. ए. झाल्यानंतर हे इंग्लंडहून बॅरिस्टर होऊन परत आले (१९२७). बंगालमधील प्रमुख कायदेपंडितांत यांची गणना होते.

बंगाल लेजिस्लेटिव्ह असेंब्लीत निवडून येऊन यांनी सार्वजनिक कार्यांत भाग घेण्यास सुरुवात केली व कलकत्ता युनिव्हर्सिटीचे व्हा. चॅन्सेलर (१९३४-३८), अर्थमंत्री (१९४१-४२) इत्यादि ठिकाणीं यांनीं केलेल्या कार्यांनीं सार्वजनिक पुढारीपणाची माळ यांच्या सहजच गळ्यांत पडली. १९४६ च्या असेंब्लीच्या निवडणुकींत तर हे बिनविरोध निवडून आले. हिंदी घटना-समितीवर यांची राष्ट्रसभेतर्फे निवडणूक झाली.

अशा तऱ्हेनें काँग्रेसच्या राजकारणांत सहज सामावूं शकणाऱ्या या माणसानें हिंदुसभेचें कार्य स्वीकारण्यांत फार मोठा त्याग केला आहे. समाजांतील मान, मान्यता, पुढारीपण प्रत्यक्ष डोळ्यांसमोर दिसत असतांना हिंदु-हिताकडे लक्ष देऊन हिंदुसभेच्या पुढारीपणाचें यांनीं स्वीकारलेलें असिधाराव्रत निःसंशय अभिनंदनीय आहे. १९४३ मध्यें भरलेल्या हिंदुसभेच्या बंगालच्या अधिवेशनाचें व रॉयल एशियॅटिक सोसायटीचें अध्यक्षस्थानहि यांना देण्यांत आलें.

मुकर्जी, सर राजेन्द्रनाथ—(जन्म स. १८५४–मृत्यु स. १९३६ मे १५) बंगाल्यांतील औद्योगिक क्षेत्रांतील प्रसिद्ध गृहस्थ.

यांना कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांतील एंजिनियरिंग क्लासमधून शिक्षण सोडावें लागलें. एक वर्ष शिक्षकाची नोकरी केल्यावर यांनीं कलकत्ता कार्पोरेशनमधील वॉटरवर्क्सचें कॉंट्रॅक्ट घेतलें आणि यशस्वी होत 'मेसर्स मुकर्जी अॅन्ड को' या नांवानें बंगालच्या बाहेर संयुक्त प्रान्तांत यांनीं कामें घेतलीं. नंतर यांनीं सर ॲक्किन मार्टिन हे कलकत्त्यास आले असतां त्यांच्या सहकार्यानें धंदा सुरू केला. हिंदुस्थानच्या बहुतेक भागांत यांच्या धंद्याचा पसारा वाढला असून सर मार्टिनच्या मृत्यूनंतर हे कंपनीचे मुख्य झाले. पुढें बर्न कंपनी यांनीं आपल्यांत मिळवून घेतल्यानंतर पूर्वभागांतील मोठ्या लोकांत यांचा समावेश झाला. सरकारनें यांना सर ही पदवी दिली, व अनेक महत्त्वाच्या कमेट्यांवर यांना नेमलें. हिन्दी चलन व जमाबंदीवरील रॉयल कमिशनचे हे सभासद होते. भारतीय एंजिनियर्स असोसिएशनच्या व इंडियन सायन्स काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान यांना देण्यांत आला होता (१९२२). अगदीं अकिंचन स्थितींतून जागतिक महत्त्व मिळविणारे हे गृहस्थ होत.

मुकर्जी, डॉ. राधाकुमुद गोपालचंद्र—(जन्म स. १८८९ नवं.) हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास व संस्कृति यांचे सुप्रसिद्ध अभ्यासक, लेखक व वक्ते.

ब्रह्मपूर (बंगाल) येथें आपलें प्राथमिक शिक्षण संपवून हे उच्च शिक्षणाकरितां कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें दाखल झाले. अत्यंत उज्वल तऱ्हेनें कॉलेज-मधील सर्व अभ्यासक्रम संपवून हे एम्. ए., पीएच्. डी. झाले (१९०१-१५). मध्यंतरीं परीक्षा देऊन कलकत्ता युनिव्हर्सिटीची ७००० रु. किंमतीची 'प्रेमचंद रायचंद' शिष्यवृत्ति मिळवण्याचा विक्रमहि यांनीं केला (१९०५).

प्राचीन इतिहासाच्या यांच्या गाढ्या अध्ययनामुळें रिपन कॉलेज व बिशप कॉलेज कलकत्ता (१९०३), नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन व बंगाल नॅशनल कॉलेज (१९०६), बनारस हिंदु युनिव्हर्सिटी (१९१६) व लखनौ युनिव्हर्सिटींत यांना प्राध्यापक होण्याचा मान मिळाला. बंगाल लेजिस्लेटिव्ह असेंब्लीतहि हे अनेक वर्षें सभासद होते.

यांच्या या विद्वत्तेच्या सन्मानार्थ बडोदा सरकारनें यांना ७००० रुपयांचें सयाजीराव गायकवाड पारितोषिक इतिहासशिरोमणि या पदवीनिशीं बहाल केलें.

यांचे ग्रंथ—(1) A History of Indian Shipping and Maritime Activity from the Earliest Times (१९१२, ब्रिजेंद्रनाथ सील यांचे प्रस्तावनेसह), (2) The Fundamental Unity of India (From Hindu Sources, 1914), (3) Local Government in Ancient India, (4) Nationalism in Hindu Culture (Asian Library Series), (5) Men and Thought in

Ancient India, (6) Harsha (कलकत्ता युनिव्हर्सिटीमधील व्याख्यानें), (7) Ashok (गायकवाड व्याख्यानें), (8) Hindu Civilization, (9) Ancient Indian Education, (10) Early Indian Art, (11) Asokan Inscriptions, (12) Chandragupta Maurya and His Time (मद्रास युनिव्हर्सिटीतील सर विल्यम मेयर व्याख्यानें), (13) India's Land System: Ancient, Mediæval and Modern (बंगाल सरकार व बंगाल लँड रेव्हेन्यु फ्लौड कमिशनच्या रिपोर्टचा दुसरा भाग म्हणून प्रसिद्ध), (14) A New Approach to the Communal Problem, (15) Gupta Empire.

यांचे चहाते व विद्यार्थी यांनीं Bharat Kaumudi या नांवाचा एक ऐतिहासिक लेखसंग्रह यांना अर्पण केला (१९४५).

मुकर्जी, ज्ञानेन्द्रनाथ—(जन्म स. १८९५ सुमार) सुप्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ व संशोधक.

यांचे डॉ. जे. सी. घोष वगैरे सहाध्यायी होत. यांचें संशोधनसुद्धां आचार्य प्रफुल्लचंद्र रे यांच्या देखरेखीखालींच सुरू झालें. स. १९१९ मध्यें यांनीं इंग्लंडास प्रयाण केलें व पदवी मिळविली. तेथून आल्यावर यांनीं कलकत्ता विश्वविद्यालयांत कलिलाचार्यांची जागा स्वीकारली. 'इंडियन केमिकल सोसायटी' स्थापण्याच्या कल्पनेचे हेच प्रवर्तक होत. कलकत्त्याला आल्यापासून यांचें कलिलरसायनांतील संशोधन चालू असून सत्यप्रसाद रायचौधरी, सरोजकुमार दासगुप्ता, आशुतोष चतर्जी इत्यादि विद्यार्थी यांचेबरोबर सहकार्य करीत आहेत.

हिंदुस्थानांत कलिलरसायनांत संशोधन करण्याचा उपक्रम अगदीं प्रथम स. १९१५ मध्यें यांनीं केला. तेव्हांपासून आजपर्यंत यांनीं याच एका विषयास आपणास वाहून घेतलें आहे. कलिलाचें विद्युत्संश्लेषण हा यांचा पहिला लेख. त्यानंतर डॉ. पाया कान्स्टनटीनो यांबरोबर यांनीं स्मोलुहास्कीच्या सिद्धान्ताची प्रायोगिक सत्यता आजमावून पाहिली. या विषयांतील अत्यंत महत्त्वाचें यांचें कार्य म्हणजे कलिलाणूचा संभार मोजण्याच्या पद्धतींत यांनीं केलेली सुधारणा हें होय.

मुजुमदार, अंबिकाचरण—(जन्म स. १८५१-मृत्यु स. १९२२) सुप्रसिद्ध वक्ते व राष्ट्रसभेचे अध्यक्ष.

हे एम्. ए., एलएल्. बी. होते. स. १९१६ साली लखनौ काँग्रेसचे हे अध्यक्ष होते. यांची वक्तृत्वाची भरारी असामान्य होती. इंडियन नॅशनल इव्होल्यूशन या सुंदर व सुप्रसिद्ध पुस्तकाचे हे कर्ते होत. पद्दाभी व अनी बेझंट यांच्या पुस्तकांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या यांच्या या पुस्तकाचें विशेष महत्त्व आहे.

मुजुमदार, सरदार-गंगाधरराव नारायणराव ऊर्फ आबासाहेब—(जन्म स. १८८६ फेब्रु. १) पुण्यांतील सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक, संगीतशास्त्रज्ञ व सार्वजनिक कार्यकर्ते.

यांच्या घराण्याचें मूळ उपनाम प्रभुणे. पण श्रीशाहू महाराजांच्या वेळेपासून यांच्या घराण्याकडे मज्मू म्हणजे जमाबंदीचें काम असल्यानें हें घराणें मुजुमदार या नांवानें प्रसिद्ध आहे. यांचें मूळ नांव श्रीधर पांडुरंग प्रभुणे, पण दत्तक आल्यानें यांना वरील नांव प्राप्त झालें. रामशास्त्री प्रभुणे यांचें घराणें वासिष्ठगोत्री होतें. यांचें घराणें अगस्त्य (प्रवर अगस्ति, दार्ढच्युत, इध्मवाह) गोत्री आहे. मात्र दोन्ही घराणीं दे. ऋ. आश्वलायनच. डेक्कन कॉलेजांतून यांचें शिक्षण सुटल्यावर निरनिराळ्या क्षेत्रांतील सुमारें १०८ सार्वजनिक संस्थांशीं यांचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त, कार्यवाह वगैरे नात्यांनीं संबंध आला. डेक्कन सरदार व इनामदार मतदार संघातर्फे मुंबई कायदेमंडळांत हे दोनदां निवडून आले (१९२३ व १९२६). तसेंच दिल्लीच्या कायदेमंडळांतहि याच वर्गातर्फे हे बिनविरोध निवडून गेले (१९३१-३४). तेथील अनुभवामुळें आणि सूक्ष्म अभ्यास करण्याच्या संवयीमुळें वतन, इनाम, सरंजाम वगैरे जमीनसत्ताप्रकाराच्या बाबतींत हे तज्ज्ञ समजले जातात.

हे प्रथम दक्षिणेंतील दुसऱ्या वर्गाचे सरदार होते. पण पुढें यांना पहिल्या वर्गाचे करण्यांत आलें (१९२८) व अत्यंत बहुमानाची सी. आय. ई. ही पदवीहि प्राप्त झाली (१९३५).

पुण्याच्या भारत-इतिहास-संशोधक मंडळाचे हे १९४६ पर्यंत २४ वर्षें सतत चिटणीस म्हणून काम करीत आहेत. त्या संस्थेच्या सर्वांगीण वाढींत यांच्यासारख्या सर्वांच्या विश्वासास पात्र असणाऱ्या व्यक्तीचा फार मोठा वांटा आहे. त्याकरितां यांनीं फारसी भाषेचाहि व्यासंग केला.

तंतु वाद्यवादनादि कला व संगीतशास्त्राचाहि यांचा व्यासंग चौरस असून गवई लोकांच्या घराण्यांतील जुन्या हिंदी चीजा संग्रहीत करण्याचें प्रचंड काम यांनीं केलें आहे. यांच्या या कामाला चीजांचा सटीप ज्ञानकोश म्हणणें यथार्थ होईल. यांच्यासारखा निरपेक्षपणें लोकसेवेचें व्रत अखंड चालविणारा गृहस्थ विरळा.

मुजुमदार, दत्तात्रेय चिंतामण—(जन्म स. १८८२ आक्टो. १३) व्यायामाचे सुप्रसिद्ध प्रचारक व व्यायामकोशाचे कर्ते.

यांचा जन्म पुणें येथें झाला. हे बडोदें येथील दरखदार घराण्यांतील होत. चित्पावन ब्राह्मण. मूळ उपनांव करंदीकर. पुण्याचे प्रसिद्ध लोकहितवादी यांचे मातामह होत. हे बडोदें कॉलेजांतून बी. ए. एलएल. बी. झाले. कॉलेजांत असतांच हे नारायणगुरु देवधर यांचे मल्लविद्येंतील शिष्य बनले आणि त्यांच्या नांवची तालीम व चिंतामण हौद बांधून यांनीं तो लोकांच्या उपयोगाकरितां दिला.

१९०८ सालीं हे बडोदें राज्यांत मुन्सफ म्हणून दाखल झाले. १९१३ सालीं यांना सहा महिने बडोदे-सरकारनें युरोपांतील लोकस्थिति पाहण्याकरितां धाडलें. १९१५ सालीं यांनीं मराठी व गुजराथी व्यायाम मासिक सुरू केलें. १९२७ सालीं हिन्दी व इंग्रजी भाषांतून त्याची सुरुवात केली; पण इंग्रजी मासिक आश्रयाभावीं बंद करावें लागलें. व्यायाममाला, व्यायामचरित्रसंग्रह वगैरेसारखीं ५० पेक्षां अधिक पुस्तकें यांनीं प्रसिद्ध केलीं आहेत. १९३१ सालीं असिस्टंट अकाउंटन्ट जनरलच्या जागेवरून हे सेवानिवृत्त झाले.

१९३५ सालीं यांनीं व्यायामज्ञानकोश प्रसिद्ध करण्याची प्रचंड योजना हातीं घेतली आणि त्याप्रमाणें प्रत्येकीं चारशें-पांचशें पृष्ठांचे व आठशें-नऊशें चित्रांचे आठ खंड यांनीं प्रसिद्ध केले. शिवाय विदेशी शर्यती व मेहनती दोन खंड प्रसिद्ध करण्याचा यांचा संकल्प आहे. मराठीप्रमाणें गुजराथी व हिन्दी खंड काढावयाचें यांनीं ठरविलें असून गुजराथीचे दोन व हिन्दीचा एक खंड प्रसिद्ध झाला आहे. इंग्रजींत देशी व्यायामाचा एक खंड काढावयाचा आहे.

या यांच्या प्रचंड कार्यामुळें यांना अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषद पुणें (१९२५) व उज्जयनी (१९३६) अशा दोन ठिकाणीं अध्यक्षपद देण्यांत आलें. यांच्या वयाला साठ वर्षें झालीं तेव्हां यांचा महाराष्ट्रांत सर्वत्र हीरकमहोत्सव साजरा करण्यांत आला. व्यायामप्रसाराच्या कार्याकरितां श्रीरामविजय छापखाना, व श्रीराम प्रोसेस वर्क्स यांनीं सुरू केला. यांचे श्वशुर प्रसिद्ध मल्लविद्याविशारद कै. सर गंगाधरराव पटवर्धन राजे संस्थान मिरज यांचें यांना या कामीं चांगलें साहाय्य होतें. तसेंच यांचे दत्तक पुत्र नारायणराव व पत्नी सौ. लक्ष्मीबाई यांचेंहि यांना सहकार्य असतें.

मुजुमदार, नानी गोपाळ—(जन्म स. १८९७–मृत्यु स. १९३५) सुप्रसिद्ध पुरातत्त्वसंशोधक व शिल्पकलाभिज्ञ.

प्रथम शिलालेखांचे अभ्यासक म्हणून हे पुढें आले व मोहेन-जो-दडो संस्कृतीच्या शोधानंतर शेंकडो मैल प्रवास करून यांनीं त्या संस्कृतीशीं संलग्न असणारीं अनेक स्थळें शोधून काढलीं. अमरी येथील उत्खननांत यांना मोहेन-जो-दडोच्याहि पूर्वीचे (३५०० ख्रिस्तपूर्व सुमार) कांहीं अवशेष सांपडले. यांनीं केलेलें मातीच्या भांड्यांचें वर्गीकरण प्रमाणभूत मानलें जातें. दादू येथें उत्खनन करीत असतां हूरांच्या टोळीकडून हे मारले गेले.

कलकत्त्याच्या इंडियन म्यूझियमचे क्युरेटर असतां प्राचीन शिल्पकलांचें अध्ययन करून यांनीं त्यांच्या अनेक मार्गदर्शिका लिहिल्या. पुरातत्त्व खात्याचे हे अनेक वर्षें सुपरिंटेंडेंटहि होते.

यांचे ग्रंथ—(1) Inscriptions from Bengal (३ खंड), (2) Guides to Early Inscriptions in the Indian Museum (२ खंड), (3) Explorations in Sind.

मुजुमदार, शंकर बापूजी—(जन्म स. १८६२–मृत्यु स. १९३८ नवं. २८) किर्लोस्कर नाटक मंडळींतील प्रारंभीचे प्रसिद्ध नट, त्या मंडळाचे दीर्घकाल व्यवस्थापक व मराठी लेखक.

यांचा जन्म पुणें येथें झाला. जात दे. ऋ. ब्राह्मण. यांचें शिक्षण पुणें न्यू इंग्लिश स्कूलमध्यें झालें. हे अण्णासाहेब किर्लोस्करांच्या वेळीं अगदीं पहिल्या खेळापासून त्या मंडळींत स्त्रीभूमिका करणारे म्हणून दाखल झाले. पुण्यांतील पहिल्या शाकुन्तलाच्या प्रयोगांत यांनीं शकुन्तलेची भूमिका केली होती. सौभद्रांतील रुक्मिणीची भूमिका हे उत्कृष्ट करीत. यांना गायन येत नसे.

पुढें हे त्या मंडळींचे व्यवस्थापक म्हणून अखेरपर्यंत (१८९३-१९२४) काम करीत होते. यांनीं अण्णासाहेबांच्या स्मरणार्थ पुण्याचें किर्लोस्कर नाटक गृह बांधलें. यांनीं मंडळींत भारदस्त व खानदानी स्वरूप कायम ठेवून नव्यानव्या गुणी लोकांचा संग्रह करण्याचा प्रयत्न शेवटपर्यंत केला. बालगंधर्व वगैरेंनीं मंडळी सोडल्यावर हिन्दी व उर्दू नाटकें बसवून किर्लोस्कर मंडळीला यांनीं हिंदुस्थानभर हिंडवून आणलें. पण शेवटीं यांच्या हयातींतच ती मंडळी बंद झाली. यांनीं रेनाल्ड्सच्या कांहीं कादंबऱ्यांचें मराठींत भाषान्तर केलें. अण्णासाहेब किर्लोस्कर, ग्यारिक व भाऊराव कोल्हटकर यांचीं स्वतंत्र चरित्रें लिहिलीं. रंगभूमि हें मासिक बारा वर्षे चालविलें (१९०५-१७) व नट, नाटककार व नाट्य यांसंबंधीं विपुल वाङ्मय प्रसिद्ध केलें.

मुदलियार, सर ए. रामस्वामी—(जन्म स. १८८७) व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे उपाध्यक्ष.

मद्रास प्रेसिडन्सी कॉलेज व लॉ कॉलेजांत आपलें शिक्षण संपवून यांनीं मद्रास हायकोर्टांत ॲडव्होकेट म्हणून नांव दाखल केलें. याच सुमारास हे मद्रासच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत निवडून आले (१९२०-२६) आणि कौन्सिल ऑफ स्टेट (१९३०), इंडियन लेजिस्लेटिव्ह असेंब्ली (१९३१-३४), राउंड टेबल कॉन्फरन्स येथें यांनीं केलेल्या कार्यांनीं हिंदुस्थान सरकारच्या पूर्ण विश्वासाचा लाभ यांना झाला. यानंतर कोणत्याहि जबाबदारीच्या जागेवर हिंदी माणसाची नेमणूक करावयाची सरकारवर पाळी येतांच यांची नेमणूक होऊं लागली.

राउंड टेबल कॉन्फरन्सच्या फेडरल स्ट्रक्चर कमेटी, इंडियन फ्रॅन्चाइज् कमेटी, इंडियन रिझर्व बँक कमेटी, स्पेशल टेक्स्टाइल टॅरिफ बोर्ड, इंडिया कौन्सिल, इकॉनमिक कमेटी, लीग ऑफ नेशन्स, इंपीरियल इकॉनमिक कमेटी अशा असंख्य ठिकाणीं यांनीं सभासदाचीं कामें केलीं. टोरंटो येथें भरलेल्या ब्रि. कॉमनवेल्थ रिलेशन्स कॉन्फरन्सला गेलेल्या हिंदी शिष्टमंडळाचे यांना पुढारी व ब्रुसेल्स नाइन पॉवर कॉन्फरन्सचे यांना हिंदी प्रतिनिधि निवडण्यांत आलें. इंपीरियल वॉर कबिनेट व पॅसिफिक वॉर कौन्सिलमध्यें हिंदुस्थानसरकारचे प्रतिनिधि म्हणून यांची युद्धकालांत नेमणूक झाली.

१९३९ सालीं यांना प्रथमच व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाच्या व्यापारखात्याचे मंत्रि नेमण्यांत आलें. त्यानंतर १९४३ सालीं पुरवठा मंत्रि व नंतर त्या मंडळाचे उपाध्यक्ष म्हणूनहि यांची नेमणूक झाली. यु. एन्. ओ.च्या प्रिपरेटरी कमिशनवरहि यांची हिंदी प्रतिनिधि म्हणून नेमणूक झाली आहे.

सान्फ्रान्सिस्को परिषदेंत हिंदुस्थानसरकारचे प्रतिनिधि म्हणून यांची नेमणूक झाली होती. तेथें यांनीं अनेक कमिट्यांवर सभासद व अध्यक्ष म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली.

युद्धकालांत यांनीं केलेल्या कामगिरीबद्दल ऑक्सफर्ड विश्वविद्यालयानें 'डॉक्टर ऑफ सिव्हिल लॉ' ही पदवी देऊन यांचा गौरव केला. हिंदुस्थानांत आल्यानंतर यांनीं व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव कौन्सिलमध्यें काम करण्यास सुरुवात केली. सर अर्देसर दलाल यांनीं युद्धोत्तर पुनर्घटना खात्याचा राजीनामा दिल्यानंतर तें काम यांच्याकडे आलें (जाने. १९४६).

मुधोळकर, रंगनाथ नरसिंह—(जन्म स. १८५७–मृत्यु स. १९२१) बऱ्हाडमधील सुप्रसिद्ध पुढारी व राष्ट्रसभेचे अध्यक्ष.

यांचें शिक्षण मुंबईस झालें आणि हे वकिली उमरावतीस करीत. त्या वेळच्या अत्यंत कष्टाळु राष्ट्रसभाभक्तांत यांची बरोबरी कोणीच करूं शकणार नाहीं. अलाहाबादच्या (१८८८) अधिवेशनांत यांनीं पोलीस खात्याच्या सुधारणांसंबंधीच्या ठरावावर भाषण केलें होतें. मध्यल्या काळांत शेतकऱ्याची कर्जमुक्तता व विशेषतः औद्योगिक शिक्षण या विषयांचा यांचा विशेष अभ्यास असे. १९१२ च्या बांकीपूर राष्ट्रसभेचे हे अध्यक्ष होते. त्या वेळीं हे नेमस्तांपैकीं प्रमुख समजले जात. यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत 'सामाजिक प्रगतीशिवाय राजकीयच काय पण नैतिक व आध्यात्मिक पुनरुज्जीवनहि होणार नाहीं' असा संदेश दिला.

मुनशी, कन्हैय्यालाल माणेकलाल—(जन्म स. १८८७ डिसें. २९) गुजराथी भाषेंतील सुप्रसिद्ध साहित्तिक व सार्वजनिक कार्यकर्ते.

जन्मस्थान भडोच. जात भार्गव ब्राह्मण. यांचें घराणें सरकारी नोकरींत मोठ्या हुद्यावर कामें केलेलें हुषार व मुत्सद्दी म्हणून प्रसिद्ध आहे. यांनींहि बी. ए. एलएल. बी. ॲडव्होकेट होऊन वकिलीबरोबर इतरहि अनेक कार्यांत भाग घेण्यास सुरुवात केली. 'पाटणनी प्रभुता' ही ऐतिहासिक कादंबरी लिहून यांनीं गुजराथच्या गौरवाबद्दल लोकांत एक विशेष प्रकारची भावना निर्माण

केली. यांतील व विशेषतः यानंतरच्या 'गुजरातनो नाथ' मधील मुंजालचें पात्र रंगविण्यांत यांनीं अत्यंत कुशलता प्रगट केली आहे. तेव्हांपासून गुजराथीमधील उत्कृष्ट कादंबरीकार असा लौकिक यांना लाभला. यानंतर यांनीं कितीतरी कादंबऱ्या, कथा व नाटकें लिहिलीं आणि तीं सरस वठलीं आहेत. गुजरातच्या अस्मितेचे हे जबरदस्त पुरस्कर्ते आहेत.

याशिवाय 'नवजीवन अने सत्य' मासिक, 'यंग इंडिया' साप्ताहिक, ज्ञाति वार्षिक 'गुजराथी' पत्र, 'बीसमी सदी' मासिक वगैरेमुळें यांची विशेष प्रसिद्धि झाली असून गुजराथी साहित्यांत यांना अढळ पद प्राप्त झालें आहे. गुजराथी साहित्य परिषदेंत यांना प्रमुख स्थान प्राप्त झालें. त्याप्रमाणें जुने रिवाज तोडून जैन ज्ञातीच्या लीलावतीबाईंच्या बरोबर पुनर्विवाह करून कर्त्या सुधारकांत यांनीं आपलें नांव दाखल केलें. लीलावतीबाईंचा पहिला विवाह वयाच्या चौदाव्या वर्षी एका अतिप्रौढ लालभाई भिकमलाल नांवाच्या विधुराबरोबर झाला होता. त्याहि गुजराथी लेखक आहेत.

बारडोलीच्या व सत्याग्रहाच्या चळवळींत भाग घेऊन यांनीं अनेक वेळां तुरुंगवास पत्करला. १९३७ सालीं हे निवडून येऊन मुंबई प्रान्तांतील गृहमंत्रि होते. १९४२ च्या लढ्यांत मात्र यांनीं भाग घेतला नाहीं. बाहेर राहून यांनीं अखंड हिंदुस्थानविषयक कामगिरी केली. मुंबईचे भारतीभवन यांच्याच परिश्रमानें उदयास येत आहे. यांचें वक्तृत्व परिणामकारक असतें. यांचा 'गुजरात ॲण्ड इट्स् लिटरेचर' हा ग्रंथ गुजराथी वाङ्मयाचा इंग्रजींतून परिचय करून घेण्याचें उत्तम साधन होय.

यांचें गुजराथी वाङ्मय—कादंबऱ्या-(१) पृथ्वीवल्लभ, (२) पाटणनी प्रभुता, (३) गुजरातनो नाथ, (४) राजाधिराज, (५) भगवान् कौटिल्य, (६) वेरनी वसुलात, (७) स्वप्नद्रष्टा, (८) कोनो वांक, (९) मारी कमला, (१०) अने बीजी वातो, (११) लोपामुद्रा (४ भाग).

पौराणिक नाटकें—(१) पुरंदरपराजय, (२) अविभक्त आत्मा, (३) काकानी शशी, (४) ध्रुवस्वामिनी देवी.

सामाजिक नाटकें—(१) वव शेंठनु स्वातंत्र्य, (२) बे खराब जान, (३) अग्नांकित, (४) ब्रह्मचर्याश्रम, (५) आदिवचनो.

इंग्रजी ग्रंथ—(1) Gujeratha and its Literature, (2) I Follow the Mahatma, (3) Akhand Bharat, (4) Glory that was Gurjer Desh, (5) Imperial Gurjeras, (6) Indian Deadlock इत्यादि.

मुल्ला, नेक ना. सर दिनशा फारदुनजी—(जन्म स. १८६८ एप्रिल) जगप्रसिद्ध कायदेपंडित व ग्रंथकार.

यांचा जन्म व शिक्षण मुंबई येथें झालें. मुंबई विश्वविद्यालयाचे माजी फेलो, ट्रायब्युनल ऑफ अपील बॉबे या संस्थेचे अध्यक्ष, मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ति (१९१९-१९२१), व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळांतील कायदेमंत्रि, प्रिव्ही कौन्सिलांतील न्यायमूर्ति वगैरे महत्त्वाच्या जागा यांनीं भूषित केल्या. अनेक कायद्यांवर यांनीं महत्त्वाचे ग्रंथ लिहिले आहेत. यांचे कायद्याचे ग्रंथ वाचल्याशिवाय कायद्याचें ज्ञान कधींहि सांगोपांग होऊं शकणार नाहीं. १९३१ सालीं मुंबई विद्यापीठानें यांना एल्एल्. डी. ही पदवी दिली.

मुहम्मद, डॉ. सय्यद—(जन्म स. १८८९) बिहारमधील सुप्रसिद्ध कॉंग्रेस कार्यकर्ते.

अलिगड, केम्ब्रिज व जर्मनी येथें आपलें शिक्षण संपवून हे बॅरिस्टर व पीएच्. डी. (जर्मनी) झाले. यानंतर यांनीं कॉंग्रेसच्या राजकारणांत भाग घेण्यास सुरुवात केली व यांना ऑल इंडिया कॉंग्रेस कमेटीचे सेक्रेटरी नेमण्यांत आलें (१९२३, १९३०-३६). वार्किंग कमेटीचेहि हे अनेक वर्षे सभासद होते.

परंतु यापेक्षांहि सार्वत्रिक शिक्षणाचा प्रचार करणारे एक शिक्षणतज्ज्ञ या नात्यानें यांची योग्यता विशेष मानण्यांत येते. कॉंग्रेसच्या अधिकारस्वीकारानंतर यांनीं शिक्षणमंत्रि या नात्यानें बिहारमध्यें सुरू केलेली प्राथमिक शिक्षण योजना सुप्रसिद्ध आहे (१९३७-३९, ४६).

यांचे ग्रंथ—(1) Khilafat and England, (2) A Plan of Provincial Reconstruction.

मुहम्मदअली—(जन्म स.१८७१-मृत्यु स.१९३१) प्रसिद्ध मुसलमान पुढारी, इंग्रजी भाषेतील वक्ते आणि राजकारणी मुत्सद्दी.

हे मूळचे मुरादाबादचे राहणारे. यांचे वडील अबदुल-

अलीखान हे दोन वर्षांचे असतांच वारले. यांचे बंधु शौकतअली. हे बंधु एकमतानें वागत व अलीबंधु या नांवानें प्रसिद्ध असत. हे अलीगढ युनिव्हर्सिटीच्या परीक्षा देऊन इंग्लंडला गेले आणि आय्. सी. एस्.मध्यें अनुत्तीर्ण होऊन परत आले (१९०२). बडोदें सरकारांत नोकरी पत्करिली. तेथून कलकत्त्यास जाऊन यांनीं कॉम्रेड नांवाचें इंग्रजी साप्ताहिक सुरू केलें. हिंदुस्थान सरकारची राजधानी कलकत्त्याहून दिल्लीस जातांच यांनीं आपली संपादकीय कचेरी दिल्लीस हलविली. तेथें पुढें 'हमदर्द' हें उर्दू पत्र सुरू केलें.

१९०६ मध्यें स्थापन झालेल्या मुस्लीमलीगच्या प्रमुख संस्थापकांत यांची गणना होते. हक्कसंरक्षण हा जरी प्रथम उद्देश होता तरी १९१३ सालीं त्यांत स्वराज्य दाखल करण्यांत आलें.

कानपूर म्युनिसिपालिटीनें तेथील मशिदीचा रस्त्यांत येणारा भाग पाडण्याचें ठरवितांच यांनीं अशी खळबळ उडवून दिली कीं तेथें प्रत्यक्ष व्हाइसरॉयला यावें लागलें व यांना अनुकूल निकाल द्यावा लागला. लोकांशीं समरस होण्याची आणि सरकारशीं तंडत बसण्याच्या वृत्तीनें यांना विलक्षण लोकप्रियता प्राप्त होई. बाल्कन युद्धाच्या वेळीं यांनीं तुर्कांना प्रत्यक्ष मदत केली होती. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं तुर्कस्थान व इंग्लंड यांचें युद्ध सुरू होतांच लंडन टाइम्सनें तुर्कस्थानची बदनामी सुरू करतांच यांनीं आपल्या कॉम्रेडमधून तुर्कांचेवर झालेल्या अन्यायांची लांबलचक यादी प्रसिद्ध करून सणसणीत उत्तरें सुरू करतांच प्रथम जामीन मागून नंतर यांना स्थानबद्ध करण्यांत आलें. १९१७ मध्यें माफी मागण्याची सूचना यांनीं नाकारली. पुढें १९१९ मध्यें यांची सुटका झाली.

महायुद्धांत मुख्य प्रधान लॉइड जॉर्ज यांच्या आश्वासनावरून हिंदी मुसलमानांनीं आपल्या जातभाईंविरुद्ध हत्यार चालविलें. पण युद्ध संपतांच मेसापोटेमिया, अरबस्थान, सिरिया व पलेस्टाइन हे प्रदेश मुसलमानी पवित्र क्षेत्रांसह खलिपाच्या ताब्यांत देण्याऐवजीं दोस्तांनीं आपसांत वांटून घेतले. या वचनभंगामुळें अमृतसर येथें जमून खिलापत चळवळ सुरू करण्यांत आली.

पण त्याचा कांहीं उपयोग न होतां शिष्टमंडळास तिकडे जाण्यास पासपोर्ट नाकारण्यांत आला. तेव्हां हे इंग्लंडला गेले. तिकडे मुस्लीम आउटलुक हें इंग्रजी व एको-डी-इस्लाम हें फ्रेंच पत्र पॅरिसमध्यें यांनीं सुरू केलें. पण सर्वत्र निराशा पदरांत आली. हिंदुस्थानांत आल्यावर यांनीं हिंदुमुसलमानांच्या ऐक्यावर जोर देऊन त्यामुळें सर्व प्रश्न सुटतील असें हे प्रतिपादन करूं लागले व यांनीं म. गांधींशीं सहकार्य करून असहकारांत पुढाकार घेतला. अलीगढ युनिव्हर्सिटी नॅशनल मुस्लीम युनिव्हर्सिटी करण्याचा प्रयत्न करून तिचे हे प्रिंसिपल झाले. पण चळवळीचें क्षेत्र विस्तृत होत चाललें. यांचे भाषणावर अत्याचारप्रवर्तक असा शेरा बसून म. गांधींनीं यांच्याकडून माफी मागविली. पण लवकरच राजद्रोह व सैन्य फितवणें या आरोपांवरून यांना कराची येथें दोन वर्षांची शिक्षा झाली. १९२३ सालीं सुटून आल्यावर दिल्लीच्या विशेष अधिवेशनाचे प्रसंगीं यांनीं कौन्सिल प्रवेशावर जोर दिला. कोकोनाडा राष्ट्रसभेचे यांना अध्यक्ष करण्यांत आलें (१९२३). या वेळेपासून हे जातिवादाकडे झुकले.

भरसभेंत अतुलनीय धैर्यानें उत्तर देण्याची यांची हातोटी हिंदी इतिहासांत केव्हांहि चिरस्मरणीय राहील. "Are you going to murder them" (English people) या ॲनी बेझंट यांनीं विचारलेल्या प्रश्नाला "No, madam, I am going to kill them in the open streets of Calcutta," हें आज आपणांस नुसतें वाचावयास भयप्रद वाटणारें उत्तर अर्ध्या शतकापूर्वी देणें ही सामान्य धैर्याची गोष्ट आहे काय ?

हे पहिल्या गोलमेज परिषदेला लंडन येथें हजर होते. तेथेंच यांचें देहावसान झालें. शेवटीं यांच्या इच्छेप्रमाणें यांचें दफन जेरुसलेम येथें करण्यांत आलें.

मुळे, कृष्णराव गणेश—(जन्म स. १८६३-मृत्यु स. १९४४) प्रसिद्ध बीनकार व संगीतसंशोधक.

यांचे गुरु ग्वाल्हेरचे कै. गणपतराव कृष्ण आपटे हे होत. त्यांच्याजवळ सुमारें अठरा वर्षे यांनीं गायन व बीन यांचें अध्ययन केलें. त्यांच्याशिवाय बंदेअलीचा बीन व चुन्ना व रहिमतखा इत्यादींचीं भरपूर गाणीं ऐकिलीं. त्यामुळें प्रतिपादनाप्रमाणें हे गाऊंहि शकत.

३२ वर्षेपर्यंत यांनीं माधवजी धरमसी मिलमध्यें सुपरिंटेंडेंटची नोकरी केली. कै. देवल, क्रेमेंट, बर्वे, आचरेकर यांच्यासारख्या विद्वान् पुरुषांच्या सहवासानें यांच्या अभ्यासाला उत्तेजन मिळालें व संशोधनाकडे यांचें लक्ष वेधलें. एकट्या भरताच्या नाट्यशास्त्रांतील संगीतावरील अध्यायांचें (२८, २९, ३०) यांनीं वीस

वर्षे अध्ययन केलें. वैदिक सामगायनाचाहि अभ्यास करून त्यांचा आतांच्या गायनाशीं कसा संबंध पोंचतो हें यांनीं निश्चित केलें व अनेक गूढ गोष्टींवर नवा प्रकाश उत्पन्न केला. ही सर्व माहिती यांनीं आपल्या 'भारतीय संगीत' या ग्रंथांत मांडली आहे.

मुंजे, डॉ. बाळकृष्ण शिवराम—(जन्म स. १८७२ एप्रिल) सुप्रसिद्ध राजकारणी मुत्सद्दी व हिंदुमहासभेचे कार्यकर्ते.

यांचें शिक्षण विलासपूर, रायपूर, नागपूर व मुंबई येथें होऊन हे एल्. एम्. ॲन्ड एस्. झाले. यांनीं मुंबई, कार्पोरेशनमध्यें प्लेग अधिकारी म्हणून कांहीं दिवस नोकरी केल्यावर हे बोअर युद्धाच्या वेळीं डॉक्टर म्हणून दक्षिण आफ्रिकेंत गेले. तिकडे दरबान येथें हे म. गांधी यांचे कांहीं दिवस पाहुणे होते. तिकडची कामगिरी यांनीं चांगल्या प्रकारें संपविली आणि हे नागपूर येथें डॉक्टरी करूं लागले (१९०१ जाने.). तेथें डोळ्यांवर शस्त्रक्रिया करणारे कुशल डॉक्टर म्हणून यांची ख्याति असे. स्मिथ ऑपरेशन या नांवानें प्रसिद्ध असणारी मोती बिन्दूच्या ऑपरेशनची नवी रीत यांनीं शोधून काढली.

सुरत राष्ट्रसभेच्या वेळेपासून हे राजकारणांत भाग घेऊं लागले आणि लो. टिळकांच्या पक्षांत सामील झाले. असहकारितेची चळवळ सुरू झाल्यानंतर स्वराज्यपक्षातर्फे नागपूर कायदेमंडळांत हे निवडून गेले. नागपूर कायदेमंडळांतील स्वराज्यपक्षानें केलेल्या यशस्वी अडवणुकींत यांच्या कर्तृत्वाचा व मुत्सद्दीपणाचा फार मोठा भाग होता. पुढें हे मध्यवर्ति कायदेमंडळांत निवडून गेले (१९२६) आणि तेथें सरकारच्या लष्करी खात्याचे टीकाकार म्हणून यांनीं नांव कमाविलें. म. गांधींच्या दांडीयात्रेच्या वेळीं यांनीं मध्यवर्ति कायदेमंडळाचा राजीनामा दिला (१९३०) आणि हे वऱ्हाडांतील जंगल सत्याग्रहांत सामील झाले. तेव्हां यांना दोनदां शिक्षा झाल्या. नंतर हिंदुमहासभेचे प्रतिनिधि म्हणून गोलमेज परिषदेवर यांची नेमणूक झाली. येथें डॉ. आंबेडकर यांनीं मुसलमानांप्रमाणें स्वतंत्र मतदारसंघाचा हट्ट धरला असतां यांनीं रा. ब. एम्. सी. राजा यांच्याबरोबर थोडे अधिक प्रतिनिधि देऊं करून संयुक्त मतदारसंघाच्या पायावर राजा-मुंजे करार घडवून आणला. तींच गोष्ट पुढें म. गांधीना येरवडा तुरुंगांत उपवास करून घडवून आणावी लागली.

हे हिंदुमहासभेतर्फे डेप्युटेशन घेऊन जॉइंट पार्लमेंटरी कमेटीपुढें साक्ष देण्यास इंग्लंडला गेले (१९३३).

हे लष्करी शिक्षणाचे पुरस्कर्ते असून त्याशिवाय देशाला तरणोपाय नाहीं अशी यांची खात्री आहे. त्या दृष्टीनें यांनीं नागपूर येथें प्रान्तिक रायफल असोसिएशन काढली आणि सेंट्रल हिंदु मिलिटरी सोसायटी काढून तिच्यातर्फे नाशिक भोसला मिलिटरी स्कूल सुरू केलें.

मूलर, फ्रेडरिक मॅक्स—(जन्म स. १८२३ डिसें. ६–मृत्यु स. १९०० ऑक्टो. २८) जगप्रसिद्ध वेदाभ्यासक, सायणभाष्ययुक्त ऋग्वेदाच्या चिकित्सक प्रतीचे संपादक व भाषाशास्त्रज्ञ.

जर्मन भाषेंतील सुप्रसिद्ध कवि विल्हेम मूलर यांचे हे पुत्र. लिपझिक युनिव्हर्सिटीचे बी. ए. झाल्यानंतर यांनीं बर्लिननंतर पॅरिस युनिव्हर्सिटींत बर्नाफ, बॉप, स्केलिंग इत्यादि विख्यात पंडितांजवळ संस्कृत भाषेचा विशेष अभ्यास केला व हे ऑक्सफर्डला आले (१८४८). तेथें प्रथम युरोपीय भाषांचे व नंतर तौलनिक भाषाशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केल्यावर हे सेवानिवृत्त झाले. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटींत संस्कृत भाषेचे प्राध्यापक होण्याची यांची इच्छा मात्र अपूर्णच राहिली.

तौलनिक भाषाशास्त्राचें अध्ययन करीत असतां संस्कृत भाषेचें विशेष महत्त्व यांच्या ध्यानीं आलें. अनेक प्रकारच्या क्रान्त्यांत संस्कृतचें भारतीय महत्त्व कायमच राहिलें याचें यांना कौतुक वाटलें व वेदांच्या अध्ययनानंतर तर हे संस्कृतचे अभिमानी बनले.

तौलनिक धर्मशास्त्राच्या अध्ययनांतहि वैदिक धर्माचें श्रेष्ठत्व यांच्या ध्यानांत आलें. निरनिराळ्या धर्माचा अभ्यास करीत असतां राष्ट्राच्या जीवनांत एकरूप झालेला दुसरा धर्म यांना आढळला नाहीं. विवाहापासून प्रत्येक गोष्ट वेदाला धरून करण्याची पद्धत यांना अगदीं नवी वाटली. भक्त, पंडित व भिकारी या सर्वांच्या जीवनावर सारख्याच प्रकारें दिसणारी वैदिक धर्माची छाप यांना नमुनेदार आढळली. देव न्यायाधीश आणि मनुष्य गुन्हेगार या ख्रिस्ती कल्पनेपेक्षां प्रत्येकाला कर्मानुसार गति मिळते, ईश्वरालासुद्धां त्यांत बदल करितां येत नाहीं हा वैदिक सिद्धान्त यांना नमुनेदार वाटला.

यामुळें हिंदुस्थान, तेथील लोक व संस्कृति यांबद्दल यांच्या मनांत अत्यंत आपलेपणा उत्पन्न झाला. तिकडे मेटणाऱ्या हिन्दी लोकांची हे मनापासून वास्तपूस्त करीत. इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानांत पुनर्जन्म घेण्याची कल्पनाहि हे अनेक वेळेला बोलून दाखवीत. लो. टिळकांसारख्या वैदिक पंडिताला राजद्रोहाच्या आरोपावरून शिक्षा झाली तेव्हां यांनीं त्यांच्या शिक्षेची मुदत भरण्यापूर्वी त्यांना सोडविण्याच्या कामांत पुढाकार घेतला. स्वामी विवेकानंदांनीं यांच्या हिंदुस्थानच्या प्रेमाबद्दलच्या आठवणी लिहिल्या असून प्राचीन ऋषिमुनींची आठवण करून देणारें यांचें व्यक्तित्व असल्याची कबूली दिली आहे. त्यांनींच पुरविलेल्या माहितीचा उपयोग करून यांनीं Ramakrishna, his Life and Sayings हा आपला सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिला.

यांचें कामहि मोठें पद्धतशीर असे. ऋग्वेदाची आवृत्ति काढण्यापूर्वी यांनीं ऋक्प्रातिशाख्याचा सूक्ष्म अभ्यास करून त्याचें जर्मन भाषेंत भाषान्तर केलें आणि त्याची भरपूर चिकित्सा केली. ऋग्वेदाची सायणभाष्यासह चिकित्सक आवृत्ति काढण्याकरितां यांनीं अत्यंत मेहनत घेतली व त्या प्रतीवर 'ऋग्वेदसंहिता-शार्मण्यदेशोत्पन्नेनेग्लण्ड देश निवासिना मोक्षमूलरभट्टेन संशोधिता गोतीर्थाभिधाने नगरे' असें संस्कृतमध्यें लिहिलें. यांतील शार्मण्य = जर्मन, स्वतःच्या नांवाला लावलेलें भट्ट व ऑक्सफर्ड = गोतीर्थ हें ध्यानांत घेण्यासारखें आहे.

ऋग्वेद प्रकाशनाकरितां यांनीं ईस्ट इंडिया कंपनी व विजयनगरचे महाराज यांच्याकडून आर्थिक साहाय्य मिळविलें होतें. यांच्या वेळेपर्यंत जर्मनींत जर्मन भाषेंत वेदादि वाङ्मयाचा पुष्कळ पद्धतशीर अभ्यास झाला होता. त्यामुळें आणि यांच्या लोकप्रिय इंग्रजी भाषेमुळें यांच्याकडे जगाचें लक्ष वेधलें व वेदादि वाङ्मयाची जगाला गोडी लावण्याचा मान यांना मिळाला.

यांचे ग्रंथ—भाषाशास्त्र-(1) The Science of Language, (2) Last Essays (पहिला खंड), (3) The Silesian Horseherd (भाषा व विचार यांचे संबंध) इत्यादि.

धर्मशास्त्र-(1) Origin and Growth of Religion, (2) Introduction to the Science of Religion, (3) Natural Religion, (4) Physical Religion, (5) Anthropological Religion, (6) Psychological Religion इत्यादि.

हिंदुस्थानसंबंधीं-(1) History of Ancient Sanskrit Literature, (2) India, What can she teach us, (3) Three Lectures on Vedanta, (4) The Six Systems of Indian Philosophy इत्यादि.

इतर-(1) My Autobiography, (2) Deutsche Liebe (जर्मन प्रेम, आत्मचरित्रपर), (3) Chips from a German Workshop, (4) Auld Lang Syne (तीन खंड), (5) The Science of Thought, (6) The Science of Mythology इत्यादि.

संपादन-Sacred Books of the East (५१ खंड).

मेघाणी, झवेरचंद कालीदास—(जन्म स. १८९७) गुजराथेंतील लोकप्रिय साहित्यसेवक, कवि व लोक वाङ्मयाचे उद्धारक.

हे जातीनें दशा श्रीमाली वाणी असून धर्मानें जैन आहेत. हे बी. ए. झाल्यावर कलकत्त्यास अल्युमिनियमच्या कारखान्यांत कामास लागले. पण स्वभावाला प्रतिकूल असणारें तें काम सोडून हे काठेवाडांत पुनः परत आले. तेथें अमृतलालशेठनीं यांना सौराष्ट्र कार्यालयांत कामास घेऊन यांना साहित्यक्षेत्रांत दाखल केलें. यांनीं आपल्या लेखनकौशल्यानें तेथें आपलें स्वतंत्र स्थान उत्पन्न केलें. गुजराथेंतील लोकसाहित्य, लोकगीतें व लोकवार्ता संकलित करून प्रसिद्ध करण्याच्या बाबतींत यांनीं फार मोलाची कामगिरी केली आहे. यांनीं हें साहित्य केवळ प्रसिद्ध केलें नाहीं तर तें लोकप्रियहि केलें. त्याबद्दल रणजीतरामस्मारक समितीनें यांना सुवर्णपदक अर्पण केलें. याशिवाय यांचें गद्य व पद्य लेखन अत्यंत स्फूर्तिपद असतें. यांच्या 'सिंधुडा' ग्रंथानें तर अनेकांना स्फूर्ति दिली. हे आपल्या कविता अत्यंत लोकप्रिय पद्धतीनें म्हणतात. यांचें लेखन विपुल असून यांच्या वाङ्मयावर जुन्या चारणी वाङ्मयाची छाप आहे. यांची सोहिनी मेहेर ही प्रेमकथा उत्कृष्ट मानिली जाते. ती अत्यंत लोकप्रिय आहे. त्यामुळें तिच्या अनेक आवृत्त्या निघाल्या.

मेनका—(जन्म स. ?) सुप्रसिद्ध नृत्यविशारद.

यांचें नांव लीला सोखे. मुंबईच्या हॉफकीन्स इन्स्टिटयूटचे डायरेक्टर कर्नल एस्. एम्. सोखे, आय्. एम्. एस्. यांच्या या पत्नी. यांचा पिता बंगाल्यांतील

ब्राह्मण जमिनदार पी. एल्. राय. यांचें शिक्षण इंग्लंडमध्यें झालें. तेथें या फिडलवादक म्हणून प्रसिद्ध होत्या. उत्तर हिंदुस्थानांतील दासी आतम व दक्षिणेंतील कथाकली या दोनहि प्रकारच्या नृत्यांचा यांनीं सूक्ष्म अभ्यास केला आहे. हिन्दी नृत्यांतील ताल, शरीराची हालचाल व चेहऱ्यावरील भाव व्यक्त करण्याचें महत्त्व या पूर्णपणें ओळखतात. यांनीं पुष्कळ नृत्यांतील हावभाव अमरावती वगैरे ठिकाणच्या शिल्पांतून घेतले आहेत. यांचें 'उषा' नृत्य बर्लिनच्या आन्तरराष्ट्रीय चढाओढींत पहिल्या प्रतीचें ठरलें (१९३६). त्याबद्दल यांना जगांतील पहिल्या क्रमाचें पारितोषिक मिळालें. जगांतील सतरा देशांतील लोकांत यांना व यांच्यापैकीं रामनारायण व गौरीशंकर यांना पहिलीं तीन बक्षिसें मिळालीं.

यांच्या मंडळींत सुमारें अठरा लोक असत. प्रवासांत यांचा खर्च वीस हजार रुपये व एरवी चार हजार रुपये दरमहा असे. युरोपांत नृत्यमंडळी घेऊन जाणारी ही पहिली हिन्दी स्त्री होय. १९३६ सालीं या दोन वर्षें युरोपभर हिंडल्या.

विश्वामित्रमेनका, कृष्णलीला, लक्ष्मीजन्म, विरहविलाप, उषादेवविजय, अजिंठादर्शन, नागकन्या, भक्तिभाव, देवविजय वगैरे यांचीं नृत्यें प्रमुख होत.

मुंबईची 'नृत्यालयम्' ही संस्था यांच्या नेतृत्वाखालीं चालते.

मेहेता, नंदशंकर तुलजाशंकर—(जन्म स. १८३५–मृत्यु स. १९०५) गुजराथी भाषेंतील कादंबरी वाङ्मयाचे जनक.

जन्मस्थान सुरत. जात नागर ब्राह्मण. यांचें गुजराथी व इंग्रजी शिक्षण झाल्यावर हे कारकून, शिक्षक, मुख्य शिक्षक, ट्रेनिंग कॉलेजचे प्रिंसिपल अशा क्रमानें चढत गेले. पुढें यांची मुल्की खात्यांत बदली झाली (१८६७). तेथेंहि असिस्टंट पोलिटिकल एजन्ट, अडमिनिस्ट्रेटर व शेवटीं कच्छचे हे दिवाण झाले. तथापि हे मास्तरसाहेब या नांवानें साहित्यिकांत प्रसिद्ध होते.

यांनीं गुजराथी भाषेंत 'करण घेलो' ही एकच कादंबरी लिहिली. पण ती अत्यंत लोकप्रिय झाली. घटना व रसपरिपोष या दृष्टीनें ती चांगली साधली आहे. शिवाय गुजराथींतील ही पहिलीच कादंबरी होय. तिच्या गुजराथीत अनेक आवृत्त्या निघाल्या व मराठी वगैरे भाषांत तिचीं भाषान्तरेंहि झालीं.

बडोदा व बिकानेर येथील सुप्रसिद्ध दिवाण सर मनुभाई मेहेता व युक्तप्रान्ताचे शिक्षणमंत्री, माजी विनायकराय मेहेता, आय. सी. एस., हे यांचे पुत्र होत.

मेहेता, सर मनुभाई नन्दशंकर—(जन्म स. १८६८ जुलै २२) सुप्रसिद्ध राजकारणी मुत्सद्दी व दिवाण.

यांचें शिक्षण मुंबईस झालें. हे एम्. ए. एल्एल्. बी. आहेत. जात नागर ब्राह्मण. बडोदें कॉलेजांत प्रथम प्राध्यापकाचें काम केलें. नंतर बडोदें सरकारच्या नोकरींत शिरून शेवटीं मुख्य प्रधान झाले (१९१६-२७). तिन्ही गोलमेजपरिषदांचे हे सभासद होते (१९३०, १९३१, १९३२). नंतर हे जयपूर व बिकानेर राज्यांचे मुख्य प्रधान झाले.

यांचे ग्रंथ—इंग्रजी–ॲनल्स ऑफ नेटिव्ह स्टेटस् ऑफ इंडिया.

गुजराथी–प्रिंसिपल्स ऑफ दि लॉ ऑफ एव्हिडन्स.

मेहेता, सर फेरोजशहा मेरबानजी—(जन्म स. १८४५ आगस्ट ४–मृत्यु स. १९१५ नवं. ५) मुंबईचे सिंह या नांवानें प्रसिद्ध असणारे, बाणेदार हिन्दी पुढारी व राष्ट्रसभेचे अध्यक्ष.

यांचा जन्म व शिक्षण श्रीमंतींत झालें. हे एम्. ए. झाले (१८६४) आणि बॅरिस्टर होण्याकरितां इंग्लंडला गेले. तेथें जमशेदजी टाटा, बद्रुद्दिन तय्यबजी, उमेशचंद्र बानर्जी वगैरे यांचे सहचर होते. तेथील दादाभाई नवरोजींच्या सहवासाचा यांना फार उपयोग झाला. तेथें असतां यांनीं 'दि एज्युकेशन सिस्टिम ऑफ बॉम्बे' हा निबंध ईस्ट इंडिया असोसिएशनपुढें वाचून चांगला लौकिक मिळविला. १८६८ मध्यें हे बॅरिस्टर होऊन परत आले. या वेळीं मुंबईस बॅरिस्टरी करणाऱ्या युरोपियन लोकांशीं यांना तोंड द्यावें लागलें. पण लवकरच यांचा चांगला जम बसला. पारसी टावर्स ऑफ सायलेन्स केस, सुरत रायट केस वगैरेमुळें यांना कीर्ति व पैसा यांचा भरपूर लाभ झाला. हायकोर्टांत काळागोरा हा भेद फारच बोकाळला होता तो यांनीं वर्तमानपत्रांत लेख लिहून उघड केला. यांच्या जहाल मतांना विचाराची बैठक असल्यानें त्यांचें सर्वत्र कौतुक होई.

यांचें नांव सर्वतोमुखीं होण्यास मुंबई कार्पोरेशनमधील यांची चाळीस वर्षांची कामगिरी कारण झाली. तेथें हे करतील ती पूर्वदिशा व सांगतील तो निर्णय मान्य केला जाई. सध्यांची लोकतंत्र असणारी कार्पोरेशनची घटना हें यांच्याच प्रयत्नाचें फल होय. तेथें यांना चार वेळां मेयर पदाचा मान देण्यांत आला (१८८४, १८८५, १९०५, १९११).

१८७४ सालीं मुंबईत पारशी-मुसलमान दंगा झाला असतां हे निर्भयपणें दंग्याच्या भागांत फिरले. गव्हर्नर सर फिलिप वुडहाउस यांच्या बेजबाबदारपणाविरुद्ध यांनीं चळवळ करून सरकारास चौकशी करण्यास भाग पाडलें. त्यामुळें यांची लोकप्रियता कळसास पोंचली. रशियन परचक्राच्या भीतीनें युरोपियनांचें स्वयंसेवक-पथक उभारण्यास मुंबईचे नागरिक म्हणून यांनीं केलेला विरोध, प्रेस ॲक्ट विरोध, खुल्या व्यापाराचे मिषानें लँकेशायरला दिलेल्या दोन लक्षांच्या सुटीला विरोध, सर रिचर्ड टेंपल या गव्हर्नरचा पुतळा उभारण्यास विरोध, इल्बर्ट बिलाला विरोध वगैरे लोकमत स्पष्ट करणारीं कार्यें करून हे लोकांचे पुढारी झाले.

अशा चळवळी करण्याकरितां यांनीं बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशन काढली. त्याबाबत यांना तेलंग व तय्यबजी यांचा पूर्ण पाठिंबा असे. १८८८ मध्यें यांनीं अडव्होकेट ऑफ इंडिया हें पत्र जहांगीर मर्झबान यांच्या भागीनें विकत घेतलें. तें व गुजराथी पत्र यांच्या साहाय्यानें यांनीं मतप्रचाराचें काम सुरू केलें. १८९२ त झालेल्या कायद्याप्रमाणें हे कार्पोरेशनचे प्रतिनिधि म्हणून कायदे-मंडळांत व पुढल्या वर्षी इंपीरियल कौन्सिलमध्यें प्रविष्ट झाले (१८९३). या दोन्ही ठिकाणीं अखेरपर्यंत हे आपलें कठोर टीकाकाराचें काम करीत असत. तथापि सरकारनें यांना सी. आय. इ., के. सी. आय. इ. व सर या पदव्या देऊन गौरविलें.

हे राष्ट्रसभेंत अगदीं प्रारंभापासून होते. कलकत्त्याच्या पांचव्या अधिवेशनाचे यांना अध्यक्ष निवडण्यांत आलें (१८९०). १९०७ सालीं सुरत येथील राष्ट्रसभेंत दुफळी झाली व फेंकलेला जोडा यांना चाटून गेला. १९०९ च्या लाहोरच्या राष्ट्रसभेचे यांना पुनः अध्यक्ष निवडण्यांत आलें होतें; पण त्यापूर्वी सहाच दिवस यांनीं तो मान नाकारला. जातवार मतदारसंघाशिवाय मोर्लेमिंटो सुधारणांवर यांच्या मताची छाप होती. १९१० सालीं विलायतला जाऊन आल्यावर हे मुंबई विश्वविद्यालयाचे व्हा. चान्सलर झाले. यांना डॉक्टर ऑफ लॉज ही पदवी देण्यांत आली. १९१३ मार्च २ रोजीं यांनीं बॉंबे क्रानिकल हें दैनिक काढलें, तेव्हां बेंझामिन गाय हार्निमन हे संपादक होते. यापूर्वी दोन वर्षें यांनीं सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही बँक काढली.

मुंबई कार्पोरेशनपुढें ऐंशी हजार रुपये खर्चून यांचा पुतळा उभारला आहे. सर एच. पी. मोदी यांनीं यांचें चरित्र दोन भागांत इंग्रजींत लिहिलें आहे.

मुंबई कार्पोरेशन, कॉंग्रेस व कायदेमंडळ या सर्व ठिकाणीं विलक्षण दरारा ठेवून हे काम करीत. यांच्या दणकेबाज वक्तृत्वानें व मनांत येईल ती गोष्ट पार पाडण्याच्या धडाडीनें यांना लोक व सरकार वचकत असत. लार्ड कर्झन यांच्या स्वागताला विरोध करून आणि मुंबई टाइम बदलण्यास मध्यवर्ति सरकारास विरोध करून यांनीं आपली मुंबईची सिंह पदवी सार्थ केली होती. यांच्या या स्वभावामुळें यांना कार्पोरेशनच्या निवडणुकींत पराजित करण्याकरितां कांहीं युरोपियन्स लोकांनीं कॉक्स-कट केला व खुद्द कॉंग्रेसमध्येंहि दुफळी झाली. तथापि हे स्वाभिमानी व कर्तव्यनिष्ठ वृत्तीपासून कधीं ढळले नाहींत. सरकार वचनभंग करीत असतां ना. गोखले यांनीं प्रेस ॲक्टला संमति दिल्याबद्दल हे त्यांच्यावर नाराज झाले.

मेहेता, सर लल्लुभाई सामळदास—(जन्म स. १८६३ आक्टो.–मृत्यु स. १९३६) मुंबई प्रांतांतील सुप्रसिद्ध अर्थशास्त्रविशारद व उद्योगतज्ज्ञ.

भावनगर हायस्कूल व एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें कांहीं दिवस शिक्षण घेतल्यानंतर यांनीं भावनगर संस्थानांत नोकरी पत्करली. प्रथम महाराजांचे अंडर सेक्रेटरी व नंतर रेव्हेन्यु कमिशनर अशीं कामें करीत असतांच यांना लॅन्ड रेव्हेन्यु सिस्टीम, रेल्वे कंपनीची व्यवस्था व राज-कीय किंवा कायद्याचे प्रश्न कोणालाहि न दुखवतां सोडवण्यासंबंधींचे विविध क्षेत्रांतील अनुभव मिळाले. अशा तऱ्हेनें सतत अठरा वर्षें संस्थानांत नोकरी केल्या-नंतर यांनीं आपलें तेथील बस्तान हलविलें व हे मुंबईस आले (१९००).

मुंबईला आल्याबरोबर यांनीं आपल्या नवीन धोरणा-प्रमाणें मुंबईच्या सर्व व्यापारी हालचालींत भाग घेण्यास सुरुवात केली आणि आपल्या नव्या शैलीनें हे जेथें गेले तेथें यशस्वी झाले. बॉम्बे सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक,

बँक ऑफ बरोडा, इंडियन सीमेंट कंपनी, सिंदिया स्टीम नेव्हिगेशन कंपनी लि. यांसारख्या बहुविध क्षेत्रांतील औद्योगिक धाडसांत, कोठें उत्पादक तर कोठें सुधारक अशा अनेक नात्यांनीं कार्य केल्यानें यांच्या नांवाला हिंदी बाजारपेठांत एक विशिष्ट किंमत उत्पन्न झाली. लल्लुभाई सामळदास म्हणजे दूरदृष्टि व धाडस अशी सांगड लोक घालूं लागले व देशांतील कोणताहि नवा धंदा यांच्या सहकार्याबांचून उभारणें अशक्य होऊन बसलें.

याबरोबरच मुंबईतील को-ऑपरेटिव्ह चळवळीचे जनक, मॅक्-क्लॅगन कमेटीचे सभासद व म्हैसूर सरकारनें सहकारी पेढ्यांसंबंधीं नेमलेल्या कमेटीचे अध्यक्ष या नात्यांनीं कामें करून यांनीं कार्याच्या आखणींतील आपलें चातुर्य प्रगट केलें.

इंडियन मर्चेन्ट्स चेंबरच्या स्थापनेंत यांनीं केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठीं यांना १९१८ सालीं त्या संस्थेचें अध्यक्षस्थान देण्यांत आलें होतें. त्याप्रमाणेंच ऑल इंडिया इन्डस्ट्रियल कॉन्फरन्स (कराची, १९१३) व इंडियन इकॉनमिक कॉन्फरन्स (बनारस, १९२५)चें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें. इकॉनमिक कॉन्फरन्सच्या अध्यक्षस्थानावरून यांनीं 'Observation of Indian Economic Problems' या विषयावर दिलेल्या व्याख्यानाची त्या वेळीं सर्वत्र तारीफ झाली होती.

युनिव्हर्सिटीची पदवी वगैरे मानमान्यता मिळवण्याचें कोणतेंहि हुकमी साधन जवळ नसतां केवळ अंतर्मुख दृष्टि व साफ विचारपद्धति यांमुळें हे इतकें कार्य करूं शकले. सर्वसाधारण जगसुद्धां एक मोठी शाळा असल्याचा दाखला यांच्यासारख्या कार्यकर्त्याचें जीवन पाहून खरा वाटतो.

यांचे ग्रंथ—My Impressions of Japan.

मेहता, वैकुंठलाल लल्लुभाई—(जन्म स. १८९१) मुंबई इलाख्यांतील को-ऑपरेटिव्ह चळवळीचे पुढारी व कार्यकर्ते.

मुंबईच्या न्यू हायस्कूल व एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें आपलें शिक्षण संपवून हे बी. ए. झाले. त्या परीक्षेंत यांना एलिस स्कॉलरशिप मिळाली होती. लवकरच बॉम्बे सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मॅनेजरच्या जागीं यांनीं काम करण्यास सुरुवात केली व १९२२ सालीं त्या संस्थेचे हे मॅनेजिंग डायरेक्टर झाले.

मुंबईतील को-ऑपरेटिव्ह चळवळीचे हे सुरुवातीपासूनच अध्वर्यु आहेत. बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, बॉम्बे प्रॉव्हिन्शियल बँकिंग इन्क्वायरी कमेटी (१९२९), टेक्स्टाइल लेबर इन्क्वायरी कमेटी (१९३७-४०), बॉम्बे प्रॉव्हिन्शियल बोर्ड इत्यादि ठिकाणी कामें करून यांनीं आपलें हें व्रत सतत चालविलें आहे. ऑल इंडिया व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशन व हरिजनसेवक संघांतीलहि हे प्रमुख कार्यकर्ते आहेत.

यांच्या या निरलस कार्यपद्धतीमुळें १९४६ सालीं स्थापन झालेल्या मुंबईच्या खेर मंत्रि मंडळांतील अर्थमंत्र्याची जागा यांना देण्यांत आली.

सोशल सर्व्हिस क्वार्टर्ली व बॉम्बे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्लीच्या संपादकमंडळांत हे आहेत.

यांचे ग्रंथ—(1) The Co-operative Movement (1915), (2) The Co-operative Movement in India (1918), (3) Studies in Co-operative Finance (1927) इत्यादि.

मेहता, सर होरमसजी माणेकजी—(जन्म स. १८७१ एप्रिल १) मुंबईचे सुप्रसिद्ध कारखानदार व धनिक.

मुंबईस कांहीं दिवस शिक्षण घेतल्यानंतर यांनीं मुंबईच्या टाकसाळींत नोकरी करण्यास सुरुवात केली (१८८८). परंतु १८९६ त यांनीं ही नोकरी सोडली व स्वतंत्रपणें धंदा करण्यास सुरुवात केली. १९०४ मध्यें यांची व्हिक्टोरिया मिल्स सुरू झाली व ज्युबिली मिल्स (१९१४), गायकवाड मिल्स (१९२९), नवसरी कॉटन अॅन्ड सिल्क मिल्स इत्यादि गिरण्यांची स्थापना करून यांनीं स्वतःचा असा मोठा कापडाचा व्यापार करण्यास सुरुवात केली. झेनिथ लाइफ इन्शुअरन्स कं. लि., ब्रिटिश इंडिया लाइफ इन्शुअरन्स कं. लि., ध्रान्गध्रा केमिकल वर्क्स (१९३९), ग्वाल्हेर शुगर वर्क्स या यांनीं स्थापलेल्या इतर व्यापारी संस्था होत.

परंतु यापेक्षांहि इलेक्ट्रिसिटीचा पद्धतशीरपणें पुरवठा करणाऱ्या इलेक्ट्रिक सप्लाय कंपन्यांची स्थापना हें यांचें महत्त्वाचें कार्य आहे. अशा प्रकारें यांनीं स्थापन केलेल्या पुणें (१९१६), नवसरी (१९२२), नाशिक देवळाली (१९३०) येथील संस्था अत्यंत भरभराटीस आलेल्या यांच्या उद्योगधंद्यांत प्रमुख आहेत.

कौन्सिल ऑफ स्टेटचे हे कांहीं दिवस सभासद होते (१९३०-३४).

बिहार ओरिसाच्या फाळणीसंबंधीं नेमलेल्या कमेटीचेहि हे सभासद असून १९३६ मध्यें भरलेल्या इंटरनॅशनल लेबर कॉन्फरन्सला हे हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून हजर राहिले होते. रिझर्व बँकेचेहि हे कित्येक दिवस डायरेक्टर आहेत.

अलीकडे हे बडोदा संस्थानच्या युद्धोत्तर योजनामंडळाचे अध्यक्ष होते.

मेहेरअली, युसुफ जे.—(जन्म स. १९०६ सप्टें. २३) मुंबईतील तरुणांच्या चळवळींचे सुप्रसिद्ध संघटक व लेखक.

मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेज व गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्यें आपलें शिक्षण संपवून हे बी. ए., एल्एल्. बी. झाले. यानंतर लवकरच यांनीं काँग्रेसच्या व त्यांतहि विशेषेंकरून तरुणांच्या चळवळींत भाग घेण्यास सुरुवात केली. बॉबे यूथ लीग (१९२८), इंडियन नॅशनल मिलिटिया (१९३०), काँग्रेस सोशॅलिस्ट पक्ष यांसारख्या संस्थांच्या स्थापनेंत महत्त्वाचा भाग घेऊन यांनीं तरुणांची चळवळ सारखी प्रगतिपथावर ठेवली. १९३८ सालीं न्यूयॉर्क येथें भरलेल्या वर्ल्ड यूथ काँग्रेसला गेलेल्या हिंदी तरुणांच्या शिष्टमंडळाचे हे पुढारी होते. १९४१ सालीं भरलेल्या ऑल इंडिया स्टुडंट्स् कॉन्फरन्सचे यांना अध्यक्ष निवडण्यांत आलें. काँग्रेस चळवळीकरितां तर हे कित्येक वेळां तुरुंगांत गेले. मुंबईच्या व्हॅनगार्ड या पत्राचे हे कांहीं दिवस संपादक होते.

यांचे ग्रंथ—(1) Youth Movement in Bombay Presidency, (2) What to read-a study Syllabus, (3) Leaders of India, (4) Trip to Pakistan, (5) मुंबईच्या पद्मा प्रकाशनच्या Men and Letters Series इत्यादि ग्रंथमालांचें संपादन.

मोडक, अच्युतराय-रावजी विश्वनाथ—(जन्म स. १७७८-समाधि स. १८३३) संस्कृत भाषेंतील सुप्रसिद्ध कवि व ग्रंथकार.

हे रघुनाथभटाचे शिष्य. हे नाशिक येथें राहत. यांनीं तरुण वयांत असतांना संन्यास घेतला. यांनीं काव्यें, नाटकें, चंपू, भाण व तत्त्वज्ञानात्मक अनेक प्रबंध व अनेक ग्रंथांवर संस्कृतमध्यें टीका लिहिल्या. नाशिक येथें कपालेश्वराच्या मंदिरांत यांची समाधि आहे. यांचा वेदान्तावरील टीका ग्रंथ आनंदाश्रमांत मुद्रित आहे. साहित्यसार हा ग्रंथ निर्णयसागर छापखान्यांत छापला असून शिक्षणक्रमांत आला आहे.

मोडक, कॅप्टन गणेश वासुदेव—(जन्म स. १८८७ ऑगस्ट २७-मृत्यु स. १९४१ डिसें. १७) हिंदुस्थानांतील लष्करी शिक्षणाचे पुरस्कर्ते व प्रसारक.

जन्मस्थान पुणें. डेक्कन कॉलेजांत शिकत असतां अचानक पलायन करून हे ग्वाल्हेर आर्मीत दाखल झाले. तेथून पहिल्या महायुद्धांत आघाडीवर दाखल होऊन यांनीं किंग्ज कमिशन मिळविलें.

यांचें 'इंडियन डिफेन्स प्रॉब्लेम' हें इंग्रजी पुस्तक अत्यंत महत्त्वाचें आहे. 'हिंदुस्थान ब्रिटिश सैन्याच्या मदतीशिवाय आत्मसंरक्षण करूं शकेल, हिंदुस्थानांत लढाऊ बिनलढाऊ असे वर्ग राज्यकर्त्यांच्या आपलपोट्या स्वार्थामुळें पाडले जातात, राष्ट्रीय सैन्याकरितां हिन्दी अधिकारी पाहिजेत, राष्ट्रीय सैन्य निर्माण झाल्यानें कोट्यवधि रुपयांची बचत होईल' इत्यादि सिद्धान्त त्यांत प्रमाणासह मांडले आहेत. इतरहि अनेक राष्ट्रीय प्रश्नांचें समर्थन त्यांत पुराव्यानें केलें आहे.

यांनीं आपल्याकडील विद्यापीठांनीं पदवी परीक्षेकरितां युद्धशास्त्र हा विषय मान्य करावा म्हणून चिकाटीनें प्रयत्न केला. त्यांत यांना आग्रा, बनारस, पंजाब व बहार या विद्यापीठांत अत्यल्प यश प्राप्त झालें.

यांचें 'प्रतापगडचें युद्ध' हें हिंदुस्थानाच्या इतिहासवाङ्मयांतील युद्धशास्त्रावर लिहिलेलें पहिलेंच पुस्तक होय. अशीं अनेक महत्त्वाच्या लढायांचीं पुस्तकें प्रकाशित करून हिंदुस्थानचा लष्करी म्हणजे युद्धशास्त्राचा इतिहास रचण्याचा व त्या द्वारें हिंदी लष्करी डावपेचाच्या श्रेष्ठतेचें सप्रमाण दिग्दर्शन करण्याचा यांचा उद्देश होता. हें पुस्तक इंग्लंड-अमेरिकेतील प्रकाशकांच्या तोडीचें प्रसिद्ध व्हावें म्हणून यांनीं त्यावर शक्तीबाहेर खर्च केला.

यांच्या लष्करी पात्रतेमुळेंच यांना इंडियन सँडर्स्ट कमेटी अथवा स्कीन कमेटी (१९२५-२७) पुढें साक्ष देण्याचा मान मिळाला. यांची ती साक्ष अत्यंत माहित-

गारीची व म्हणूनच खळबळ उडवणारी झाली. यांच्या सडेतोडपणामुळेंच यांना मुदतीच्या पूर्वीच पेन्शन घेणें भाग पडलें (१९३२). यांचें अलीकडील लोकांच्या नजरेसमोरील काम म्हणजे मुंबई इलाख्यांतील राष्ट्रसभा-मंत्रिमंडळानें नेमलेल्या शारीरिक शिक्षणसमितीवरील सभासद म्हणून झालेलें काम.

यांचें वाङ्मय—१ मस्केट्री लेक्चर्स (हिन्दी), २ प्रतापगडचें युद्ध-मिलिटरी हिस्टरी, ३ Indian Defence Problem (इंग्रजी); पत्रकें–सैन्याची संघटना व कारभार, ऑफिसर्स ट्रेनिंग कोअर (मराठी), व्हिज्युअल ट्रेनिंग (हिंदी).

मोडक, नारायण विनायक—(जन्म स.१८८० डिसें. १३) मुंबई कार्पोरेशनचे म्युनिसिपल कमिशनर व सुप्रसिद्ध स्थापत्यविशारद.

पुण्याच्या एंजिनियरिंग कॉलेजमधून बी.ई. (सिव्हिल) झाल्यानंतर यांनीं मुंबई सरकारच्या सॅनिटरी एंजिनियरचे सब-डिव्हिजनल ऑफिसर म्हणून काम करण्यास सुरुवात केली (१९१२-१८). परंतु यानंतर सॅनिटरी व म्युनिसिपल एंजिनियरिंगचें विशेष अध्ययन करण्यासाठीं यांना स्टेट टेक्निकल स्कॉलरशिप देण्यांत आली. त्याप्रमाणें एक वर्षपर्यंत हिंदुस्थानांत काम केल्यानंतर यांना इंग्लंडला पाठविण्यांत आलें. त्या ठिकाणीं हेस्टिंग्जच्या कार्पोरेशनमध्यें असि. एंजिनियरचें काम करून हे हिंदुस्थानला परत आले (१९१९-२२). आल्यानंतर यांची इंडियन सर्व्हिस ऑफ रेल्वे एंजिनियर्सचे एक्झिक्युटिव्ह एंजिनियर या नात्यानें जी. आय. पी. रेल्वेचे सॅनिटरी एंजिनियर म्हणून नेमणूक झाली (१९२२-३०). हे काम करीत असतांच यांनीं बी. बी. सी. आय. रेल्वेच्या दोहद स्टेशनसाठीं मैला वाहतुकीची योजना तयार करण्यांत मदत केली.

रेल्वेवरील या दीर्घकालीन कार्यानंतर यांनीं मुंबईच्या म्युनिसिपालिटींत काम करण्यास सुरुवात केली. प्रथम डे. सिटी एंजिनियर, हायड्रॉलिक एंजिनियर, सिटी एंजिनियर अशीं कामें करीत करीत यू. एम्. मिरचंदानी यांचे जागीं म्युनिसिपल कमिशनरच्या जागीं यांची नेमणूक झाली (१९४६).

मुंबई बेटाच्या उत्तरभागांत ॲक्टिव्हेटेड स्लज प्रोसेसनें तयार केलेल्या स्युएज प्युरिफिकेशन वर्क्सची आंखणी व उभारणी यांनीं कलेली असून हिंदुस्थानांतील मोठ्यांतमोठ्या स्युएज वर्क्समध्यें त्याची गणना केली जाते. ह्या योजनेंतून उत्पन्न होणाऱ्या गॅस व खत यांच्या उत्पन्नांतून हें सर्व चालविलें जात असून मुंबईच्या नागरिकांना त्याबद्दल कोणत्याहि प्रकारचा कर द्यावा लागत नाहीं.

बॉंबे एंजिनियरिंग कॉंग्रेस (१९३८), इन्स्टिट्यूशन ऑफ एंजिनियर्स इंडिया (१९४१-४२), इंडियन सायन्स कॉंग्रेस असोसिएशनचें स्थापत्यखातें (१९४२) इत्यादि संस्थांचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें. इंडियन रोड्स कॉंग्रेसचें स्वागताध्यक्षपदहि यांना देण्यांत आलें होतें. मुंबई युनिव्हर्सिटीच्या फॅकल्टी ऑफ टेक्नॉलजीचे डीन, पुण्याच्या एंजिनियरिंग कॉलेजचे सल्लागार व मुंबईच्या व्ही. जे. टी. इन्स्टिट्यूटच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य या नात्यानें यांनीं केलेलें कार्यहि असेंच महत्त्वाचें आहे.

१९३८ सालीं जगांतील नगररचनेचे नवे प्रकार अभ्यासण्यासाठीं यांना मुंबई कार्पोरेशननें आपले प्रतिनिधि म्हणून परदेशला पाठविलें. या वेळीं यांनीं सादर केलेल्या तीन रिपोर्ट्सपैकीं मैला वाहतुकीवरील रिपोर्ट आतां प्रकाशित झाला आहे.

मोडक, बाळाजी प्रभाकर—(जन्म स.१८४७–मृत्यु स. १९०६) शास्त्रीय विषयावरील मराठींतील पहिले ग्रंथकार, जंत्रीकार व राजाराम कॉलेजमधील रसायनशास्त्राचे प्राध्यापक.

यांचा जन्म आचरें (ता. मालवण, जि. रत्नागिरी) येथें झाला. हे सांगलीकरांच्या शिष्यवृत्तीमुळें बेळगांव हायस्कूलमधून मॅट्रिक झाले (१८६५). बी. ए.च्या वर्गात असतां अत्यंत आजारी पडले तेव्हां राजाराम हायस्कूल कोल्हापूर येथें नोकरी पत्करली (१८६९).

कोल्हापुरास आल्यापासून तीन चार वर्षांतच यांनीं रसायनशास्त्रावर एक सार्वजनिक सप्रयोग व्याख्यानमाला सुरू केली. त्याकरितां केलेलीं टिपणें एकत्र करून तीं शिळाप्रेसवर छापून काढलीं (१८७५). पुढें चार महिन्यांची रजा घेऊन मुद्दाम पुण्याच्या प्रयोगशाळेंत राहून डॉ. कुक यांच्या सहवासांत सृष्टिशास्त्र व रसायनशास्त्र वगैरेंचे अनेक प्रयोग करून यांनीं 'निरिंद्रिय रसायनशास्त्र, अधातुरूप तत्त्वें' हा ग्रंथ प्रसिद्ध केला (१८७६). हा मराठींतील या विषयावरील पहिलाच ग्रंथ होय. वेळोवेळीं नवेनवे प्रयोग करणें, ते प्रदर्शना-

दिकांमध्यें लोकांना दाखविणें आणि सप्रयोग झालेलें ज्ञान लिहून काढून ग्रंथरूपानें प्रसिद्ध करणें हा यांचा नित्यक्रमच होऊन बसला. निबंधमालाकारांनीं यांची सुबोध भाषा, विषयाची मांडणी व यांचें सखोल ज्ञान यांची प्रशंसा केली आहे.

राजाराम कॉलेजांतील प्रयोगशाळा १८७०-१९०० पर्यंत यांचेच ताब्यांत होती. पुढें पेन्शन घेतल्यावर प्रयोगशाळेंत काम करण्याची परवानगी दरबारकडून यांनीं घेतली होती. मराठी भाषेंतून शिक्षणाची व्यवस्था न झाल्यानें यांच्या पुस्तकांचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. शास्त्रीय प्रयोग व उपकरणें या बाबतींत श्रीमंत आबासाहेब कागलकर व श्रीमंत बाळासाहेब (गं. ग.) मिरजकर यांचें यांना फार साहाय्य होत असे. बहुतेक सरदारांच्या मुलांशीं यांचा संबंध येई. दक्षिणेंतील सरदारांच्या वर्गाला हे इतिहास शिकवीत व त्यांचे सुपरिंटेंडेंट हे असत. त्यामुळें इतिहासाचे ग्रंथहि यांच्या हातून तयार झाले.

मुंबई मराठी ग्रंथालयाच्या १९०४ च्या वार्षिकोत्सव-प्रसंगीं हे अध्यक्ष होते. तेव्हां मराठीच्या द्वारा उच्च शिक्षण देण्याची आवश्यकता यांनीं प्रतिपादिली.

मोडक, महादेव हरि—(जन्म स. १८६३-मृत्यु स. १९०४) मराठींतील सुप्रसिद्ध लेखक व विद्या-व्यासंगी गृहस्थ.

प्राथमिक शिक्षण रोहें येथें व पुढील शिक्षण पुणें येथें होऊन हे बी. ए. झाले (१८८७). कायद्याचा अभ्यासहि केला. पुढें अनेक ठिकाणीं शिक्षकाचें काम केलें. हे अहमदनगर येथील सोसायटीच्या हायस्कुलांत सुमारें दहा वर्षें शिक्षक व कांहीं दिवस मुख्य शिक्षकहि होते. पण शिवाजीवरील व्याख्यानामुळें यांना शाळा सोडावी लागली (१८९८). यांचे कांहीं ग्रंथ विश्वविद्यालयानें पदवी परीक्षेला नेमले होते.

यांचे ग्रंथ—१ दि. ब. लक्ष्मण रामचंद्र वैद्य, एम्.ए., एल्एल्. बी. यांनीं गोपाळ नारायण कंपनीसाठीं केलेल्या संस्कृत-इंग्लिशकोशाचा तिसरा भाग, २ महाभारताच्या कांहीं पर्वांचें व हरिवंशाचें भाषान्तर (प्रकाशक-ग. वि. चिपळुणकर), ३ खडे तात्त्विक बोल (१-४ भाग), ४ सुख आणि शान्ति (लार्ड ॲव्हबरी-पीस अँड हॅपिनेस), ५ नाट्यमकरंद (लँब्ज् टेल्सचें भाषान्तर), ६ अध्यात्मपर व्याकरण (अप्रसिद्ध).

मोडक, वामन आबाजी—(जन्म स. १८३६ सप्टें. २१-मृत्यु स. १८९७ आगस्ट २८) प्रार्थना-समाजाचे सुप्रसिद्ध अनुयायी व समाजसुधारक.

यांचें प्राथमिक शिक्षण आडें व हर्णै येथें झालें. विश्रामबाग हायस्कूलांत शिक्षक म्हणून नेमले गेल्यावर हे एम्. ए. झाले (१८६४). अनेक ठिकाणीं मुख्याध्यापक म्हणून काम केल्यावर हे सेवानिवृत्त झाले (१८९७). त्यानंतर यांना सी. आय. ई. ही पदवी मिळाली (१८९६). मुंबई विश्वविद्यालयाचे सदस्य, सिंडिक व जे. पी. वगैरे मानहि यांना मिळाले.

यांचा जुन्या मराठी कवींचा व्यासंग चांगला असे. हे स्वतःहि मराठी कविता करीत व आख्यानें रचून कीर्तनें करीत. यांचीं व्याख्यानें वक्तृत्व व विचार या दृष्टीनें महत्त्वाचीं असत. हे विधवापुनर्विवाहाचे कट्टे पुरस्कर्ते होते. देशभाषांना विश्वविद्यालयाच्या शिक्षणांत स्थान मिळावें म्हणून यांनीं केलेले प्रयत्न अपेशी ठरले.

यांचें वाङ्मय—१ उत्तरनैषधचरित नाटक, २ व्याख्यानें-धर्मपर व नीतिपर लेख (१९०८).

मोनियर विल्यम्स, मोनियर—(जन्म स. १८१९-मृत्यु स. १८९९) हिंदी धर्म व संस्कृति यांचे सुप्रसिद्ध अभ्यासक व संशोधक.

यांचा जन्म जरी मुंबईला झाला तरी यांचें सर्व शिक्षण लंडनच्या क्वीन्स कॉलेज व ऑक्सफर्डच्या बॅलिओल कॉलेजमध्यें पार पाडण्यांत आलें. यानंतर ऑक्सफर्डच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमध्यें कांहीं दिवस 'बोडन संस्कृत स्कॉलर' म्हणून काम केल्यानंतर यांची हेलबरी येथें संस्कृत, फारशी व हिंदुस्थानी भाषांचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली (१८४४-५८). यानंतर ऑक्सफर्डला कांहीं दिवस बोडन प्रोफेसर म्हणून काम केल्यानंतर हे सेवानिवृत्त झाले.

Buddhism हा यांचा विशेष महत्त्वाचा ग्रंथ होय. बुद्धाचें चरित्र, त्याची मतप्रणाली, हिंदुधर्मावर कांहीं काळ त्या धर्माने मिळवलेला विजय व त्याचीं कारणें व शेवटीं त्या धर्माच्या अस्ताचीं कारणें असा बुद्ध धर्माचा सुसंगत इतिहास या ग्रंथांत दिला आहे. प्रचार करावयाचा कडक ब्रह्मचर्याचा, पण स्वतः निर्ढुंनाच मुलें झालेलीं असावयाचीं, दैवी शक्तींचा इन्कार करावयाचा पण धर्म व बुद्ध यांची उपासना मात्र देवाप्रमाणें करावयाची, मूर्तिपूजा नको असें म्हणावयाचें व हातानें

मात्र बुद्धाची मूर्ति व त्याचीं कवनें यांची पूजा करावयाची अशा असंबद्ध वागणुकीनें बौद्ध धर्म वैष्णव व शैव पंथांत विलीन झाल्याचें यांनीं लिहिलें.

Indian Wisdom हा यांचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ होय. वेदांपासून सुरुवात करून उपनिषदें, सहा सूत्रें, स्मृति, वेदांगें व रामायण, महाभारतासारखीं काव्यें यांचा परिचय या ग्रंथांत करून देण्यांत आला आहे.

हिंदी संस्कृति, इतिहास किंवा भाषांचा परिचय घ्यावयाचा असेल तर प्रथम संस्कृत भाषेचें अध्ययन करावयास पाहिजे, ही गोष्ट लक्षांत आलेले हे पहिले पाश्चात्य संशोधक होत. पाश्चात्य देशांत जें महत्त्व ग्रीक भाषेला, तें महत्त्व संस्कृत भाषेला पौर्वात्य देशांत आहे. म्हणूनच जगाच्या एका महत्त्वाच्या संशोधनक्षेत्राचा परिचय करून घेण्यासाठीं संस्कृत भाषेकडे पाश्चात्य पंडितांनीं लक्ष दिलेंच पाहिजे, या कल्पनेनें भारून जाऊन यांनीं आपल्या ग्रंथाच्या द्वारा त्या भाषेचे निरनिराळे पैलु पाश्चात्यांच्या नजरेस आणण्याचा प्रयत्न केला. ऑक्सफर्डला यांनीं स्थापन केलेल्या इंडियन इन्स्टिट्यूटचा प्रमुख हेतुहि हाच होता.

परंतु ज्या काळांत यांनीं हें कार्य केलें त्याची छाया यांच्या विचारसरणीवर पडल्याशिवाय राहिली नाहीं. बौद्धधर्म व ख्रिस्तीधर्म, हिंदु तत्त्वज्ञान व पाश्चात्य तत्त्वप्रणाली यांच्या तुलनेंत यांनीं अकारण हिंदुस्थानच्या तत्त्वज्ञानावर तोंडसुख घेतलें आहे. 'गूढ भाषेचें आवरण, अवास्तव कल्पना, ओढूनताणून केलेले अलंकार यांमुळें उपनिषदांच्या वाचकांचा विरस होतो; उपनिषदें किंवा त्यांचेवर आधारलेले इतर ग्रंथ यांचा मुख्य हेतु सत्यशोधन नव्हता, तर मागच्या, चालू व पुढच्या जन्मांत आपल्या हातून होणाऱ्या कृत्यांचे परिमार्जनाकडे त्यांचें लक्ष लागलें होतें.' हीं यांचीं मतप्रदर्शनें विचार व सहानुभूति यांचे अभावांतून उत्पन्न झालेलीं आहेत.

यांचे महत्त्वाचे ग्रंथ—(1) Sanskrit-English Dictionary, (2) Hinduism, (3) Modern India, (4) Religious Thought in India, (5) Indian Wisdom आणि शाकुंतल व नलोपाख्यान यांचे अनुवाद.

मोमिन—(जन्म स. १७९९–मृत्यु स. १८५०) सुप्रसिद्ध उर्दू कवि.

यांचे नांव मोमिनखाँ. पित्याचें नांव हकीम गुलाम नबीखाँ. स्थान दिल्ली.

मोगल राज्यांत यांचे पूर्वज काश्मीराकडून येऊन राहिले. शाहअलमच्या वेळीं यांच्या पूर्वजांना नारनोल परगण्यांत जहागीर मिळाली होती. पण इंग्रजी अमलांत ती जहागीर गेली, तेव्हां यांना पेन्शन मिळत असे. यांचें साधारण शिक्षण झाल्यावर यांनीं अरबीचा अभ्यास सुरू केला. त्यानंतर यांनीं आपले वडील व चुलते यांच्यापाशीं वैद्यकीचा अभ्यास केला व त्यांच्याच दवाखान्यांत हे काम करूं लागले. वैद्यक, ज्योतिष, बुद्धिबळें वगैरे खेळ व कविता करणें वगैरे नाद यांना होते. प्रथम शाह नसीरला आपल्या कविता हे दाखवीत. पण पुढें तेंहि बंद झालें. स्वभाव व राहणी अत्यंत रंगेल व हौशी होती. यांचा रंगेलपणा कवितेंत चांगला उतरला आहे. यांची कविता म्हणण्याची ऐटहि कांहीं निराळीच होती.

यांच्या कवितांचा संग्रह मिळतो. त्यांत गझल, कसीदें, मसनवी व पहेलि वगैरेंचा संग्रह उत्तम आहे.

मोरमकर, रा. सा. रामकृष्ण रघुनाथ—(मृत्यु स. १९२३ आक्टो.) 'विविधज्ञानविस्तार' या मराठींतील विख्यात मासिकाचे चालक व मराठी साहित्याचे एकनिष्ठ उपासक.

स. १८९८ सालीं गुंजीकर वारले, तेव्हां यांचे मामा पुरुषोत्तमपंत नाडकर्णी यांनीं विस्ताराची व्यवस्था आपल्याकडे घेतली. तेव्हांपासून यांचा संबंध विस्ताराशीं आला. तेव्हांपासून विस्ताराला आलेल्या व्यापक अभ्यासूपणाचें श्रेय यांच्याकडे आहे. यांनीं सतत पंचवीस वर्षे वार्षिक आठशें रुपयांचें नुकसान सोसून विस्तार सारखें मासिक उच्च पातळीवरून चालविलें व मराठी वाङ्मयाला वळण लावण्याचा प्रयत्न केला. स्वतः अभिप्राय लिहिण्यापेक्षां हे विशेष लेखन करीत नसले तरी लेखकांना उत्तेजन देऊन नवे विचार व अभ्यासूपणा यांची कदर राखण्याचें काम यांनीं केलें. मराठींत निबंधमालेनंतर पण निबंधमालेपेक्षां व्यापक धोरणावर मासिक चालविण्याचें श्रेय यांना दिलें पाहिजे.

मोरे, गणपत विठोबाशेट—(जन्म स. १८८३ सप्टें. ४–मृत्यु स. १९३३ जाने. १०) राष्ट्रीय वृत्तीचे ज्ञातिकार्य करणारे त्यागी गृहस्थ.

यांचा जन्म व इंग्रजी पांच इयत्तांपर्यंतचें शिक्षण मुंबईस झालें. हे जातीनें संगमेश्वरी वैश्य समाजांतील

होते. या समाजांतील सर्व संस्कार वैदिक पद्धतीनें व्हावेत यावर यांचा कटाक्ष असे. याच दृष्टीनें हे ज्ञाति-कार्याकडे लक्ष घालूं लागले आणि यांनीं समाजांतील कुमारांचीं सार्वजनिक रीत्या उपनयनें लावण्याचा उपक्रम केला. 'दर दुकानास दररोज एक पैसा' या पद्धतीनें निधि गोळा करून समाजाकरितां महाजनवाडी बांधली (१९१७) आणि स. १८८७ सालीं स्थापन झालेल्या कोंकणस्थ वैश्यज्ञाति फंड मुंबई या संस्थेच्या कार्यांत हे लक्ष घालूं लागले. समाजकार्य करीत असतां शिक्षणाचें महत्त्व यांच्या ध्यानीं आलें. पण त्याबरोबरच प्रचलित सरकारी शिक्षणानें वैश्यसमाजाचा व्यापारी पेशा व धर्मनिष्ठा टिकणार नाहीं अशी यांची खात्री झाली. कै. अण्णासाहेब विजापूरकर यांचे विचार ऐकून यांचें हें मत ठाम झालें आणि यांनीं वैश्यविद्याश्रम, सासवनें या राष्ट्रीय शिक्षण संस्थेची योजना समाजापुढें मांडली आणि तें प्रत्यक्ष सुरू केलें (१९२१). या संस्थेच्या वाढीकरितां यांनीं पन्नास हजार रुपये दिले. या देणगीप्रमाणें आपलीं व आपल्या आप्तेष्टांचीं मुलें सरकारी शाळांतून काढून या संस्थेंत घातलीं. हे या संस्थांचे कार्यवाह, विश्वस्त वगैरे होते.

मोहनसिंग, कॅप्टन—(जन्म स. ?) सिंगापूर येथें स्थापन झालेल्या पहिल्या 'आझाद हिंद सेने'चे (इंडियन नॅशनल आर्मी) सेनापति.

जपान्यांचे हस्तक म्हणून आझाद हिंद सेनेचा उपयोग होऊं नये असा यांनीं प्रयत्न करतांच जपान्यांनीं यांना अटक केली (डिसें. १९४३). नंतर सुभाष बोस यांच्या नेतृत्वाखालीं दुसरी आझाद हिंद सेना उभारण्यांत आली. तिचें नेतृत्व कर्नल जगन्नाथराव भोसले यांनीं स्वीकारलें. लढाई संपल्यावर सुटका होऊन हे इकडे आले आणि स्वातंत्र्याकरितां सर्वांत अधिक प्रयत्न करतो असें स्वतःला वाटणाऱ्या कॉंग्रेस सोशालिस्ट पक्षांत शिरले.

म्हस्के, गंगारामभाऊ—(जन्म स. १८३१–मृत्यु स. १९०१) मराठा समाजाचे पुढारी व प्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते.

यांचें जन्मस्थान रंगरावचें ओढें (जि. नाशिक). यांचें शिक्षण 'मिशन स्कूल'मध्यें झालें. १८५५ पर्यंत हे नोकरींत होते. वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षी यांनीं वकिलीची परीक्षा दिली. यांनीं पुढील महत्त्वाचीं कार्यें केलीं. १ पुणें लष्करांत–प्राथमिक शिक्षणाची सोय, २ सार्वजनिक बाग, ३ आल्बर्ट एडवर्ड वाचनालय (१८७५), ४ स. १८७७ सालीं सत्तावीस हजार दुष्काळ फंड, ५ डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनची स्थापना व निधि सुरू (१८८५), ६ टाउन हॉल कमेटीतर्फे हिराबाग खरेदी, ७ कँप एज्युकेशन सोसायटीची स्थापना, ८ बादशाह पंचम जॉर्ज यांचे बंधु प्रिन्स आल्बर्ट व्हिक्टर पुण्यास आले तेव्हां त्यांचे स्वागत सेक्रेटरी, ९ सर कावसजी दिनशा एडनवाला हॉल (वाचनालयाशेजारीं), १० लष्कर स्मशान धर्मशाळा. या बहुतेक कार्यांत यांनीं सेक्रेटरी म्हणून काम करून या सर्व कार्यांना विधायक रूप देऊन संस्था-स्वरूपांत परिणत केलें. त्यामुळें यांनीं सुरू केलेलीं कार्यें आजहि चालू असलेलीं दिसतात. डे. म. ए. असोसिएशनचा सुवर्णमहोत्सव होऊन त्या वेळीं प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत त्या संस्थेनें दोन हजार विद्यार्थ्यांकरितां दोन लक्षांपेक्षां अधिक रक्कम खर्च केल्याचें लिहिलें आहे.

म्हैसूरचे महाराज सर-कृष्णराज वोडियार–(जन्म स. १८८४ जून ४–मृत्यु स. १९४० ऑगस्ट ३) म्हैसूर राज्याचे सुप्रसिद्ध प्रगतिप्रिय अधिपति.

म्हैसूरचें मूळ राजघराणें नामशेष करून हैदरअली व टिपू सुलतान यांनीं त्या संस्थानचा कारभार आपल्या हातीं घेतला. पुढें श्रीरंगपट्टणच्या लढाईत टिपू मारला गेल्यानंतर इंग्रजांनीं यांच्या घराण्यांतील तिसऱ्या श्रीकृष्णराजांना गादीवर बसविलें. परंतु पुढें त्यांच्या प्रमादामुळें लॉर्ड बेंटिंक यांनीं तें राज्य खालसा केलें व १८३१-८१ पर्यंत तेथील कारभार ब्रि. सरकारतर्फे चालून पन्नास वर्षांनंतर श्री. चामरेंद्र वोडियार यांना गादीवर बसविण्यांत आलें. म्हैसूर संस्थानांतील नव्या युगांची सुरुवात चामरेंद्र वोडियार यांनीं आपले दिवाण सर के. शेषाद्री अय्यर यांचे सहकार्यानें केली व त्याची परिपूर्णता यांनीं आपल्या कारकीर्दीत केली. देशी राज्यांत लोकसंख्या, क्षेत्रफळ इत्यादि दृष्टीनें या राज्याचा क्रम दुसरा लागत असला तरी औद्योगिक प्रगतीच्या बाबतींत या संस्थाननें इंग्रजी राज्यासहि मागें टाकलें आहे.

सर स्टुअर्ट फ्रेझर यांच्या हाताखालीं शिक्षण घेत असतांच वयाच्या अकराव्या वर्षी हे गादीवर आले (१८९५ फेब्रु. १) व १८९५-१९०२ पर्यंत यांच्या

मातोश्रींनीं रीजन्ट म्हणून कारभार पाहिल्यानंतर यांनीं राज्याचीं सर्व सूत्रें आपल्या ताब्यांत घेतलीं. सर व्ही. पी. माधवराव, सर एम्. विश्वेश्वरय्या, सर अल्बियन बानर्जी, सर मिर्झा मुहम्मद इस्माईल यांसारख्या पहिल्या दर्जाच्या राजकारणतज्ज्ञांच्या सहकार्यानें हे म्हैसूर संस्थानची औद्योगिक पुनर्घटना करण्यांत यशस्वी झाले.

१९१३ सालीं यांनीं आपल्या संस्थानांत प्रथमच औद्योगिक खात्याची स्थापना केली. लोकांच्या खाजगी धंद्यांना व व्यावसायिक साहसांना सरकारी तज्ज्ञांचें साहाय्य देण्याची प्रथा यांनीं सुरू केली व ती परिणामीं अति यशस्वी ठरली. गव्हर्नमेंट सोप फॅक्टरी, गव्हर्नमेंट पोर्सेलिन फॅक्टरी, गव्हर्नमेंट सिल्क वीव्हिंग फॅक्टरी, गव्हर्नमेंट इलेक्ट्रिक फॅक्टरी, इम्प्लेमेंट फॅक्टरी, गव्हर्नमेंट लॅक ॲन्ड पेन्ट वर्क्स, सेन्ट्रल इंडस्ट्रियल वर्कशॉप, गव्हर्नमेंट इंडस्ट्रियल ॲन्ड टेस्टिंग लेबॉरटरी इत्यादि सरकारी संस्थांशिवाय श्रीराम सिल्क मिल्स, किर्लोस्कर इत्यादि अनेक संस्था यांच्या साहाय्यानें भरभराटीस आल्या. चंदनाच्या तेलाच्या यांनीं प्रायोगिक म्हणून स्थापन केलेल्या कारखान्यानें आतां धंदेवाईक रूप धारण केलें आहे.

परंतु यापेक्षांहि संस्थानांत उत्पन्न होणाऱ्या रेशमाच्या प्रचंड उत्पादनाचा यांनीं डिपार्टमेंट ऑफ सेरिकल्चर स्थापन करून योग्य विनियोग केला. निर्दोष बी पुरविण्याची सोय या खात्यानें केली असून रेशमाचें आदर्श कापड तयार करण्यासाठीं संस्थाननें एक सिल्क वीव्हिंग फॅक्टरी व डायिंग ॲन्ड फिनिशिंग वर्क्स सुरू केलें. भद्रावती येथील लोखंडाचा कारखानाहि अशाच मोठ्या प्रमाणावर चालविला जातो.

कोलार येथील सोन्याच्या खाणी व म्हैसूर शहर यांना इलेक्ट्रिसिटी पुरविण्याच्या दृष्टीनें यांनीं शिवसमुद्रम् येथील नैसर्गिक धबधब्याचा प्रथमच उपयोग केला (१९०२). पुढें ही मांगणी वाढतांच यांनीं जास्त इलेक्ट्रिसिटी तयार करण्याच्या दृष्टीनें 'कृष्णराज रिझर्वायर' या प्रचंड योजनेची आंखणी केली. शेचाळीस हजार हॉर्सपॉवर्सपेक्षां जास्त इलेक्ट्रिसिटीचा लाभ तर या योजनेनें करून दिलाच, परंतु त्याबरोबरच सव्वा लक्ष एकरांपेक्षां अधिक जमीन भिजवण्याचें श्रेय यांना मिळालें. सध्यां संस्थानांत कालव्यांचें एकच जाळें झालें असून 'आयर्विन कॅनॉल' हा या सर्वांचा मुख्य आहे.

म्हैसूर युनिव्हर्सिटीची स्थापना १ जुलै १९१६ ला करण्यांत आली. मेडिकल, कॉमर्स, एंजिनियरिंग अशा सर्व ज्ञानशाखांच्या अध्ययनाची येथें सोय असून उस्मानिया युनिव्हर्सिटीशिवाय इतकी प्रगत युनिव्हर्सिटी हिंदुस्थानांतील कोणत्याहि संस्थानांत नाहीं.

यांच्या या नव्या सुधारणांनी यांचें संस्थान सर्वत्र आदर्शभूत होऊन राहिलें. एम्. विश्वेश्वरय्यांचे सहकार्यानें यांनीं औद्योगिक व स्थापत्य दृष्ट्या प्रगति केली तर मिर्झा मुहम्मद इस्माईल यांचे सहकार्यानें राज्याच्या घटनेंत सुधारणा केल्या.

यांपैकीं सर एम्. विश्वेश्वरअय्या यांनीं तर योजनापूर्वक आराखडा तयार करून वेळापत्रकाप्रमाणें तो पार पाडला. बांध, कारखाने, पाटबंधारे व धरणें यांच्या प्रचंड योजना त्यांच्या होत. शिक्षणसंस्थांची वाढहि त्यांच्याच वेळीं झाली. सर मिर्झा इस्माईल १९२६ सालीं दिवाणपदावर आले. त्यांनीं साम्राज्य सरकारशीं वाटाघाटी करून लॉर्ड आयर्विन यांच्या वेळीं चवतीस लक्षांची खंडणी साडेदहा लक्षांवर आणून तीहि माफ होण्याचा संभव उत्पन्न केला. विधिमंडळ व लोक प्रतिनिधिमंडळ यांची वाढ केली.

गांधीजींनीं यांच्या संस्थानला दिलेली 'रामराज्य' ही पदवी हें सर्व पाहिल्यानंतर सार्थ वाटूं लागते. प्रभातचा तुकाराम हा चित्रपट आणि त्यांतील तुकारामाची भूमिका यांना अत्यंत आवडली. ती भूमिका करणारे पागनीस यांना बोलावून यांनीं त्यांचा मुद्दाम सत्कार केला.

य

यंदे, दामोदर सावळाराम—(जन्म स.१८६१–मृत्यु स. १९४४ नवं. २७) महाराष्ट्रांतील प्रसिद्ध छापखानदार व प्रकाशक.

स. १८७८ च्या सुमारास मुंबईत ट्राम्वे कंपनी सुरू झाली. तीमध्यें दरमहा २५ रु.वर यांनीं नोकरी पत्करली. कै. जोतिराव फुले वगैरेंचीं व्याख्यानें ऐकून यांचें वर्तमानपत्र काढण्याकडे लक्ष वेधलें. आवटे यांच्या सहकार्यानें हे कामें करीत. पुढें आवटे बडोद्यास गेले व त्यांनीं यांनाहि बडोद्यास नेलें (१८८३ सुमार). पुढें दोघांचा बेबनाव होऊन यांनीं सयाजीविजय पत्र सुरू केलें. ते एके काळीं केसरीच्या खालोखाल लोकप्रिय होतें. पण १८९९ मध्यें यांना बडोदें सोडून मुंबईस यावें लागलें व इंदुप्रकाश पत्राची जबाबदारी घ्यावी लागली. पण इंदुप्रकाशची मालकी बदलत गेली व तें पत्र व सयाजीविजय बंद पडलें. यांनीं दामोदर सावळाराम आणि मंडळी व आर्यधर्मग्रंथमाला काढून अनेक महत्त्वाचे ग्रंथ प्रसिद्ध केले.

यांचीं वर्तमानपत्रें—१ सृष्टिदर्पण (साप्ताहिक), २ शेतकऱ्यांचा कैवारी (आवटे यांच्या सहकार्यानें), ३ बडोदावत्सल (आवटे यांच्या सहकार्यानें, मराठी-गुजराथी), ४ सयाजीविजय (मराठी, इंग्रजी व गुजराथी प्रथम साप्ताहिक नंतर अर्धसाप्ताहिक), ५ इंदुप्रकाश दैनिक, (१८९९) नंतर ६ श्रीशिवाजी (साप्ताहिक).

कादंबरी– वीरमती (४ आवृत्त्या-शिवाय गुजराथी व हिंदी भाषान्तर). या कादंबरीच्या कथानकावर नेपाळकरांनीं एक नाटकहि लिहिलें होतें.

येडुरकर, वेदाचार्य सखारामभट्ट बाळकृष्णभट्ट—(जन्म स. १८८७ सप्टें. २३) सुप्रसिद्ध दशग्रंथी वैदिक व विलक्षण स्मरणशक्तीचे गृहस्थ.

जन्मस्थान येडूर (ता. चिकोडी). हे कुरुंदवाडास राहत. यांचे अजोबा सखारामशास्त्री व मामा नारायणशास्त्री एकसंबेकर नामांकित वैदिक होते. हे ऋग्वेदसंहिता वडिलांच्यापाशीं शिकले. पण पुढें दशग्रंथ नरसोबाच्या वाडीचे बाळंभट दत्तंभट दामले यांच्यापाशीं शिकले. शके १८४३ सालीं पुणें वेदशास्त्रोत्तेजक सभेंत दशग्रंथाची परीक्षा दिली. त्या वेळीं यांना दोनशें-पैकीं एकशेंएक्याण्णव गुण मिळाले.

यांची स्मरणशक्ति विलक्षण आहे. हे ऋग्वेदसंहिता सरळ तर बिनचूक म्हणतातच, पण उलट, एकान्तरित, वेगळाल्या अष्टकांतील सूक्तें एकाच वेळीं पहिला, दुसरा, तिसरा अशा मंत्रक्रमानें, आंकड्यांवरून मंत्र, मंत्रावरून आंकडे वगैरे प्रकारें सहज म्हणतात. या यांच्या स्मरणशक्तीमुळें यांना महाराष्ट्रांतील अनेक शहरांतून मानपत्रें मिळालीं असून श्रीजगद्गुरु शंकराचार्य मठ संकेश्वर यांनीं यांस वेदाचार्य अशी पदवी दिली आहे.

जटाघनाचीं पारायणें यांनीं अनेक केलीं आहेत. औंधचें स्वाध्यायमंडळ व पुण्याचे वैदिकसंशोधनमंडलास ऋग्वेदाची शुद्ध प्रत छापण्यास यांचा फार उपयोग झाला

र

रणजीतसिंहजी, विभासिंहजी—(जन्म स. १८७७ सप्टें. १०–मृत्यु स. १९३३ एप्रिल २) 'रणजी' या नांवानें सर्वपरिचित असणारे जगप्रसिद्ध हिंदी क्रिकेटपटु व नव्या हिंदी क्रिकेटचे जनक.

नवानगर संस्थानांतील सरोदर हें गांव यांचें जन्मस्थान. यांच्या वडिलांचें नांव जीवनसिंहजी. नवानगरचे जामसाहेब विभासिंहजी यांना हे दत्तक गेले. १९ मार्च १९०७ ला हे नवानगरच्या गादीवर बसले. यांच्या मागून यांचे पुतणे दिग्विजयसिंहजी गादीवर आले.

राजकोटच्या राजकुमार कॉलेजांत कांहीं दिवस शिक्षण घेतल्यानंतर हे उच्च शिक्षणासाठीं केम्ब्रिजला गेले (१८८९). हिंदुस्थानांत असते वेळेपासूनच यांना

क्रिकेटचा नाद असे. परंतु एक नव्या वळणाचें क्रिकेट खेळण्याची सुरुवात मात्र यांनीं इंग्लंडमध्यें गेल्यानंतरच केली. दिवसेंदिवस यांची लोकप्रियता वाढत गेली व पुढें रणजीतसिंहजी हें लांबलचक नांव लुप्त होऊन हे 'रणजी' या नांवानें सर्वपरिचित झाले.

ससेक्स कंट्री टीमचे सुरुवातीला स्किपर व नंतर आधारस्तंभ या नात्यानें यांनीं अनेक विक्रम केले. १८९९-१९०४ या सहा वर्षांत यांनीं तेरा हजार सातशें नव्याण्णव धांवा व त्रेचाळीस शतकें काढलीं. या काळांत धावांच्या दृष्टीनें यांचा इंग्लंडमध्यें पहिला नंबर दोनदां, दुसरा दोनदां व तिसरा दोनदां लागला. याशिवाय एका महिन्यांत हजार धांवा काढण्याचा विक्रमहि यांनीं तीनदां केला.

ससेक्स टीमची मुख्य भिस्तहि यांचेवरच असे. पंचवीस तीस धांवांत इतक्या नांवाजलेल्या टीमचे दोन गडी बाद केल्याच्या खुशींत ससेक्स टीमचे विरोधक येतात तों हे मैदानांत प्रवेश करीत व मग चारशें धांवा झाल्यानंतरहि बाद झालेल्या गड्यांची मूळ संख्या कायम पाहून त्या टीमच्या बळाचें खरें गमक सर्वांच्या ध्यानांत येई.

चेंडूच्या निरीक्षणाबाबतचा यांचा जलदपणा अतुल असे. मात्र चेंडू अगदीं पायाला भिडेपर्यंत हे मारीत नसत. आउट झाले अशा अपेक्षेनें प्रेक्षक माना उंच करून पाहूं लागतात तों अगदीं शेवटच्या क्षणीं यांचें शरीर पुढच्या पायावर वांकें, बॅट प्रकाशांत चमकल्यासारखी वाटे व अक्षरशः वाऱ्याच्या वेगानें यांचा चेंडु षटकारावर धडक खाई.

नव्या वळणाच्या इंग्लिश व हिंदी क्रिकेटचें जनकत्व यांचेकडे दिलें जातें. चेंडू टाकणारानें चेंडू टाकावयाचा व तो मारणारानें तितक्याच सरळपणानें मारावयाचा असें 'चेंडुफळी'च्या खेळाचें स्वरूप असलेल्या क्रिकेटला यांनीं आधुनिक स्वरूप प्राप्त करून दिलें. सरळ आलेल्या चेंडूला मनगटाच्या लहानशा झटक्यानें यांनीं षटकाराची जागा दाखविण्यास सुरुवात केली. यांची Leg-Theory व Body Line Bowling अजूनहि अतुल समजण्यांत येते.

नरेंद्रमंडळाचे व्हाइस चॅन्सेलर असतां (१९३२) नरेंद्रमंडळाचा वृत्तान्त वाचण्याच्या वेळीं यांच्या फेडरेशन विरोधाबद्दल खुद्द व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांनीं हरकत घेऊन यांच्या भाषणाला अडथळा आणला. तेव्हां आपलें वृत्तान्त वाचनाचें काम तेथेंच थांबवून हे दिल्लीहून निघून आले. ही गोष्ट यांच्या मनाला पुढें अनेक दिवस लागून राहिली होती. नंतर लवकरच हे मृत्यु पावले.

पतियाळाचे महाराजांनीं यांच्या नांवानें सुरू केलेली 'रणजी ट्रॉफी' हें यांचें क्रीडाक्षेत्रांतील अत्युच्च स्मारक होय (१९३४). त्यासाठीं दरवर्षी हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांत मोठ्या हिरिरीनें होणारे सामने यांची नव्यानें आठवण करून देतात.

यांचे ग्रंथ—The Jubilee Book of Cricket (1897).

रविवर्मा, राजा—(जन्म स. १८४८ एप्रिल २९–मृत्यु स. १९०६ ऑक्टो. २) पौर्वात्य चित्रें पाश्चात्य पद्धतीनें काढणारे जगप्रसिद्ध चित्रकार.

जन्मस्थान विलिमनूर (त्रावणकोर संस्थान). जात मल्याळी क्षत्रिय. हें गांव यांच्या घराण्याला लष्करी पेशांतील कामगिरीबद्दल इनाम मिळालें होतें. यांचें घराणें सुसंस्कृत व संस्कृतज्ञ असे. यांनाहि संस्कृत चांगलें येई. यांच्या चौदाव्या वर्षीच त्रावणकोरच्या महाराजांची भेट होऊन त्यांनीं यांच्या चित्रकलेच्या नादाला उत्तेजन दिलें. पुढें तर त्यांच्या थोरल्या बहिणीशीं यांचें लग्न झालें (१८६६). त्रावणकोरचे महाराज केरळवर्मा यांच्याकडे थिओडॉर जॉन्सन हा चित्रकार आला. त्याचें अनुकरण करण्याचा यांनीं प्रयत्न केला. प्रथम कित्येक वर्षे हे जलरंग चित्रलेखनाचा अभ्यास करीत. नंतर हे तैलचित्रांनीं विख्यात झाले. मद्रासच्या चित्रकला प्रदर्शनांत एका नायर स्त्रीच्या चित्राबद्दल सुवर्णपदक मिळून यांची सर्वत्र वाहवा झाली (१८७३). यांचें छत्तीस रंगांतील शकुंतलापत्रलेखन हें चित्र ड्यूक ऑफ बकिंगहॅम यांनीं विकत घेऊन स्वतःचें चित्रहि यांच्याकडून काढून घेतलें (१८७८).

नंतर बडोदें, भावनगर, म्हैसूर वगैरे सरकारांनीं यांच्याकडून चित्रें काढून घेतलीं. जुन्या संस्कृत काव्यांचा अभ्यास यांचा होताच. आतां जुन्या पोषाख वगैरेचा अभ्यास करण्याकरितां यांनीं प्रमुख ठिकाणीं प्रवास केला आणि बडोदें सरकारच्या नव्या राजवाड्यांत रामायण महाभारतांतील चित्रें काढलीं. या चित्रांच्या मुद्रणाकरितां यांना रविवर्मा प्रेस मुंबईस काढणें भाग पडलें. तो आतां मळवली स्टेशनजवळ आहे. यांचीं चित्रे

घरोघर पोंचण्यास यांच्या या रंगचित्रमुद्रणालयाचा अत्यंत उपयोग झाला.

हिंदुस्थानच्या प्रत्येक राजवाड्यांत व हिंदुस्थानांतल्या प्रत्येक घरांत यांचें चित्र पोंचलें आहे असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाहीं. यांच्या एका नग्न स्त्रीच्या चित्रावरून यांच्यावर खटला झाला होता. पण तें चित्र मनावर नीतिविघातक परिणाम करीत नाहीं असें ठरलें.

हे स्वतः मल्याळी असूनहि यांच्या सर्व चित्राला महाराष्ट्रांतील पोषाख असतो. 'चित्रास इतका योग्य पोषाख दुसऱ्या प्रान्तांत नाहीं. या लोकांच्या लुगडें नेसण्याच्या विशेष पद्धतीमुळें स्त्रियांचें सौंदर्य विशेष खुलून दिसतें. शिवाय त्यांत सुटसुटीतपणा आहे' असें हे त्याचें कारण देत.

यांच्या चित्रांत स्त्रियांचीं चित्रें इंग्लिश वळणावर धिप्पाड व अधिक प्रौढ वाटतात. मात्र चेहऱ्यावरील भावनिदर्शनांत यांचा हातखंडा असे. तसेंच स्मृतिचित्रेंहि हे उत्कृष्ट काढीत.

वैचित्र्य, समप्रमाणत्व, साधेपणा, व्यवस्थितपणा, आकृतीची मृदुता, पावित्र्य, उज्वलता, आकर्षकपणा इत्यादि चित्रांत आवश्यक असणारे गुण यांच्यांत भरपूर आढळत. यांच्या चित्रांत अनेक सूक्ष्म भावना हळुवारपणें ग्रथित करण्याचा प्रयत्न आढळतो.

लहानशाच चित्रामध्यें मानवी स्वभावाच्या विविध भावना प्रकट करणारीं अनेक व्यक्तिचित्रें रेखाटण्यांत यांचा हातखंडा आहे. 'कृष्णशिष्टाई' हें यांचें चित्र या दृष्टीनें नमुनेदार आहे. एक तसूभरहि जमीन देणार नाहीं अशा अभिनिवेशानें हातांत तलवार घेऊन ताठ उभा राहिलेला दुर्योधन, हाताची जुडी करून असहाय बसलेला धृतराष्ट्र, नाइलाज होऊन मान खालीं घालून बसलेले भीष्माचार्य, बावरून जाऊन एकमेकांच्या कानांत कुजबुजणारा नोकर वर्ग व या सर्व निकराच्या पार्श्वभूमीवर आत्मविश्वासानें व शांतपणें बसलेला कृष्ण ही सजावट निश्चितपणें कौशल्यपूर्ण आहे.

रहिमतखाँ—(मृत्यु स. १९२२ जून) विख्यात गवई.

ग्वाल्हेरच्या मिया हद्दूखांचे हे कनिष्ठ पुत्र. वडिलांच्या पाशीं यांनीं गायनाचा अभ्यास केला. निसारहुसेन व विष्णुपंत छत्रे यांचे हे सहाध्यायी. वडिलांच्यामागें यांना अफूचें व्यसन लागलें. काशीमध्यें अगदीं हीन स्थितींत भीक मागतांना विष्णुपंत छत्रे यांना हे आढळले. त्यांनीं गुरुबंधु म्हणून यांचें शेवटपर्यंत योग्य संगोपन केलें. यांच्या बहिणीचा नवरा इनायतखां हा नेपाळच्या दरबारांत गवई होता. तेथें झालेल्या भारतीय गवयांच्या जलशांत यांना पहिल्या प्रतीचें बक्षीस मिळालें (१९००). यांचा आवाज मधुर, गोड, खणखणीत, सुरेल, सहज आणि विलक्षण तयारीचा होता. हे शेवटीं कुरंदवाड येथें वारले. हे गातांना अगदीं सहज गात. यांना गायनाचे बादशाह म्हणत.

राजगोपालाचारी, चक्रवर्ति—(जन्म स. १८७९) काँग्रेसमधील सुप्रसिद्ध राजकारणी मुत्सद्दी व तामीळ भाषेतील सुप्रसिद्ध लेखक.

यांचा जन्म मद्रास प्रान्तांतील होसुर गांवीं तामीळ ब्राह्मणाच्या घराण्यांत झाला. यांचें घराणें धर्मभोळेपणा व विद्याव्यासंग यांबद्दल प्रसिद्ध आहे. बंगलोर व मद्रास येथें शिक्षण संपवून हे बी. ए., एल्एल्. बी. झाले. कुशाग्र बुद्धीचे वकील म्हणून यांची सर्वत्र ख्याति असे. १९१७ सालीं हे सालेम म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष झाले आणि दोन वर्षांच्या कारकीर्दीत यांच्या कर्तृत्वाची कल्पना लोकांना आली. म. गांधींच्या असहकार चळवळींत शिरून यांनीं आपली वकिली सोडली व तेव्हांपासून हे बहुतेक चळवळींत तुरुंगांत गेले.

अखिल भारतीय काँग्रेस कमेटीचे मुख्य सेक्रेटरी असतां (१९२१-१९२२) व यंग इंडियाचे संपादक असतां गांधीवादाचा पुरस्कार करून व गया राष्ट्रसभेंत कौन्सिल प्रवेशाला विरोध करून यांनीं आपल्या बुद्धिवादाची व गांधीनिष्ठेची चुणूक दाखविली.

यांनीं सूत काढणें वगैरे लहान उद्योग व अज्ञान जनतेला अस्पृश्यता, दारू पिणें वगैरेचे दुष्परिणाम पटवून देण्याकरितां सालेमपासून जवळच असणाऱ्या त्रिचेनगोडी या गांवीं गांधीआश्रम नांवाची संस्था स्थापन केली आणि लोकांचा विश्वास संपादन केला. तामीळनाड प्रॉव्हिन्शियल काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष असतांच दक्षिण भारत हिन्दी प्रचार संघ वगैरे संस्थांच्या अधिकारपदांवरून यांनीं फार महत्त्वाची कामगिरी केली.

पुढें राष्ट्रसभेंत असतांना राष्ट्रसभेचा कायदेमंडळावर बहिष्कार होता तरी यांची कायदेशीर दृष्टि अस्पृश्यतानिवारणाकरितां कायद्याच्या सामर्थ्यावर केन्द्रित झाली होती. मध्यवर्ति कायदेमंडळांत तसा कायदा घडविण्याचा

यांनीं प्रयत्न केला (१९३३) आणि इतर प्रान्तांत न झालेला अस्पृश्यतानिवारणाचा कायदा स्वतः मुख्य प्रधान असतां पास करून घेतला आणि मदुरेच्या मीनाक्षीची पूजा अस्पृश्यांकडून करविली.

गांधीवादाचा पुरस्कार करून खुद्द म. गांधींनाहि त्यांच्या तत्त्वज्ञानाबद्दल चार शब्द सुनावणारे हे गृहस्थ शेवटीं गांधीवाद व राष्ट्रसभा यांच्यांतून बाहेर पडले आणि यांनीं आपणास राष्ट्रकल्याणाच्या दृष्टीनें योग्य वाटेल तें बोलण्याचा अधिकार प्राप्त करून घेतला.

मंत्रिमंडळाचा स्वीकार करावा, राजीनामे देऊं नयेत आणि मुसलमानांशीं पाकिस्तान मान्य करूनहि तडजोड करावी वगैरे अनेक योजनांचा पुरस्कार करण्याचें १९३७ पासून यांचें धोरण आहे. १९३७ सालीं मंत्रिमंडळें स्वीकारतांना ब्रि. गव्हर्नमेंटकडून आश्वासन मागून कांहीं महिने राष्ट्रसभेनें मंत्रिमंडळें लोंबत ठेविलीं. तसेंच युद्धनिमित्तानें मंत्रिपदें सोडलीं, क्रिप्स योजना नाकारली, १९४२ आगस्ट ८ ला 'चले जाव' चळवळ सुरू केली वगैरे सर्व गोष्टी आपल्याला अमान्य असल्याचा यांनीं उघडच प्रचार केला. त्यामुळें सरकारनें यांना पकडलें नाहीं. बाहेर राहून यांनीं जिना व सरकार यांशीं जुळतें धोरण कसें स्वीकारतां येईल याचाच पाठपुरावा केला. जिनांशीं तडजोड करण्याचा व ४२च्या चळवळीला नवीन वळण देण्याचा यांनीं प्रयत्न केला. त्यामुळें म. गांधी सुटल्यानंतर प्रथम जिनांना भेटले.

अशा प्रकारें बाहेर राहून राजकारण करणारे हे गृहस्थ राष्ट्रसभेचे चार आणे सभासदहि नव्हते. तथापि यांना वार्किंग कमेटींत घेण्यांत आलें व पुनः मुख्य प्रधान करण्याचाहि म. गांधी वगैरेंनीं प्रयत्न केला; तेव्हां मद्रास प्रान्तांतून त्याला सक्त विरोध झाला व टी. प्रकाशम् यांना मुख्य प्रधान निवडण्यांत आलें.

युद्धानंतर होणाऱ्या नव्या घटनांत हिंदुस्थानचें भाग्य दुसऱ्याच्या हातीं देऊन १९१९ किंवा १९३० प्रमाणें केवळ लढ्यांत राष्ट्राचें सामर्थ्य खर्ची घालणें यांना पसंत नाहीं. सदोष कां असेना, पण लाभेल त्या राज्यघटनेंत भाग घेऊन ती राबविण्यानें राष्ट्राचें सामर्थ्य वाढविता येईल, अशा दृष्टीनें १९३५ नंतरच्या यांच्या हालचाली चालू आहेत. उद्योगधंदे, शेती वगैरे क्रान्तिकारक व सामर्थ्यवर्धक कार्यें करण्यांत इतर राष्ट्रें गुंतलीं असतां आपण मात्र केवळ लढ्यांत राष्ट्राचें महत्त्वाचें सामर्थ्य खर्ची घालण्यापासून फायद्यापेक्षां तोटेच अधिक आहेत अशी यांची खात्री आहे. म्हणून या सडेतोड व सूक्ष्म बुद्धीच्या आशावादी गृहस्थानें लोकनिन्दा सहन करूनहि निर्भयपणें घटनात्मक राजकारण करण्याच्या धोरणानें मुलाखती, वाटाघाटी, चर्चा वगैरेंचें चक्र सतत चालू ठेवले आहे.

यांचे ग्रंथ—इंग्रजी-(1) The Way Out (1943), (2) Jail Diary, (3) Fatal Cart and other Stories, (4) Reconciliation Why and How, (5) Nation's Voice (गांधीजींचीं व्याख्यानें).

तामीळ वाङ्मयाचे हे सूक्ष्म अभ्यासक असून यांचें लघुकथा वगैरे ललित वाङ्मय अत्यंत लोकप्रिय आहे. यांच्या कांहीं लघुकथांचें इंग्रजी भाषान्तर यांचे चिरंजीव डॉ. सी. रामस्वामी यांनीं करून तें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें आहे.

यांची मुलगी म. गांधी यांची सून–श्री. देवीदास गांधी यांची पत्नी होय.

राजवाडे, कृष्णशास्त्री केशवराव—(जन्म स. १८१५–मृत्यु स. १९०१) संस्कृत पंडित व मराठी ग्रंथकार.

यांचें शिक्षण पुणें विश्रामबाग पाठशाळेंत झालें. तेथेंच यांची उपगुरु म्हणून नेमणूक झाली. ती पाठशाळा बंद झाल्यावर हे गुजराथी संस्कृत पाठशाळेंत मुख्य शिक्षक होते. पुण्यांत अधिक मासांतील भागवत सप्ताह सुरू करणाऱ्यांपैकीं हे एक होत. हे अनेक वेळा वेदशास्त्रोत्तेजकसभेचे परीक्षक व समारंभाचे अध्यक्ष होते. शेवटीं यांनीं संन्यास घेतला होता.

यांचीं पुस्तकें—संस्कृतचीं मराठी–१ मुद्राराक्षस, २ मालतीमाधव, ३ शाकुन्तल, ४ हरिमीडेस्तोत्र; स्वतंत्र पद्यात्मक–५ उत्सवप्रकाश, ६ ऋतुवर्णन.

राजवाडे, रावराजे सर दिनकरराव रघुनाथ—(जन्म स. १८१९–मृत्यु स. १८९६) ग्वाल्हेरचे सुप्रसिद्ध दिवाण व राजकारणी पुरुष.

यांचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील निवें. गोत्र शांडिल्य. ऋग्वेदी चित्पावन ब्राह्मण. यांच्या पूर्वजांना ऐतिहासिक काळीं जोशी या उपनांवाऐवजीं राजवाडे हें नांव प्राप्त झालें. यांचे वडील विंचुरकरांच्या आश्रयानें ग्वाल्हेरास आले. यांच्या वडिलांच्या मागें तवरघारच्या सुभ्याचें काम यांच्याकडे आलें. तें काम यांनीं उत्तम बजावल्यामुळें देवराव जाधवांच्या नंतर ग्वाल्हेर

राज्याची दिवाणगिरी यांच्याकडे आली (१८५२). महाराज जयाजीराव शिंदे अल्पवयी असल्यानें कौन्सिल-मार्फत कारभार चाले. यांनीं जमाखर्चाचा मेळ बसविण्याकरितां पांच हजारांऐवजीं दोन हजार पगार घेण्यास सुरुवात करून स्वतःपासून काटकसरीला सुरुवात केली. सर्वत्र सुधारणा, कायद्याची लिपिबद्धता, खात्यांची विभागणी वगैरे करून आपल्या कारभाराकडे सर्वांचें लक्ष वेधून घेतलें.

सत्तावन सालच्या बंडाचा परिणाम ग्वाल्हेरपासून तीन कोसांवर असणाऱ्या मुरारच्या छावणींत बेदिलीच्या रूपानें दिसला. निमचचें बंड मोडण्याकरितां पाठविलेल्या सैन्यानें लढण्याचें नाकारल्यानें त्याला परत आणावें लागलें (१० जून १८५७). ग्वाल्हेरचा राजवाडा सुरक्षित वाटेना म्हणून युरोपियन लोक आग्र्याकडे गेले. काल्पीवरून बंडवाले ग्वाल्हेरवर चालून आले. सैन्य फितूर असल्यानें हे महाराजांसह आग्र्यास निघून गेले. सर ह्यू रोजच्या नेतृत्वानें बंडवाल्यांचा मोड करून महाराज जयाजीरावांना पुनः गादीवर बसविण्यांत आलें (जून १८५७). यांनीं पुढें दिवाणगिरी सोडली (१८५९).

१८६१ च्या कायद्याप्रमाणें अस्तित्वांत आलेल्या कायदेमंडळांत हे सभासद होते. धोलपूर, रीवा आणि देवास येथील राजांनीं यांच्याकडून आपल्या राज्याची व्यवस्था लावून घेतली. महाराज मल्हारराव गायकवाड, बडोदा यांच्यावरील विषप्रयोग केल्याच्या आरोपाची चवकशी करण्याकरितां नेमलेल्या हाय कमिशनमध्यें हे होते.

हे नेहमीं गंगेचें पाणी पीत. व्हाइसरॉयना भेटून परत गाडीत बसतांना हे गंगेच्या पाण्यानें हात धूत. लॉर्ड लिटन यांनीं त्याबद्दल विचारलें असतां यांनीं त्याचें कारण स्पष्ट सांगितलें. यांनीं इंग्रजांकडून ग्वाल्हेर राज्याकरितां पुष्कळ सवलती मिळविल्या. सत्तावन सालच्या बंडांत हे सामील झाले असते तर इंग्रजांना हिंदुस्थानांतून पायच काढावा लागला असता; पण केवळ यांच्यामुळें त्या वेळीं अलाहाबादच्या किल्ल्यांत ग. ज. कॅनिंग सुप्तपणें राहूं शकला व ग्वाल्हेरची शिबंदी बंडवाल्यांस मिळाली नाहीं.

राजवाडे, इतिहासाचार्य-विश्वनाथ काशीनाथ—(जन्म स. १८६३-मृत्यु स. १९२६ डिसें. ३१) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध वाङ्मयसेवक, अभ्यासक, इतिहास-संशोधक व नवसिद्धान्त प्रतिपादक.

जन्मस्थान कोंकणांत वरसई. हे १८८२ साली मॅट्रिक व १८९० सालीं बी. ए. झाले. यांचें सर्व शिक्षण पुणें येथें झालें. यांनीं आपले 'कनिष्ठ, मध्यम व उच्च शाळांतील अनुभव' एका लेखांत नमूद केले आहेत (ग्रंथमाला, ले. १७). कांहीं वर्षे यांनीं न्यू इंग्लिश स्कूल, पुणें येथें शिक्षकाचें काम केलें; पण तरुणपणींच पत्नी वारल्यानें (१८९० सुमार) यांच्या ध्येयवादी जीवनाला अगदीं स्वतंत्र वळण लागलें. निबंधमाला, काव्येतिहास-संग्रह व नवनीत वगैरेनीं देश, इतिहास व मराठी भाषा यांविषयींच्या यांच्या अभिमानाला चालना मिळाली. वेदाचे अभ्यासक कै. प्रि. वैजनाथ काशीनाथ राजवाडे यांचे हे धाकटे बंधु.

यांनीं अगदीं प्रारंभीं इंग्रजी भाषेंतील उत्कृष्ट ग्रंथ मराठींत आणण्याकरितां भाषान्तर नांवाचें मासिक काढलें. त्यांत प्लेटोच्या 'रिपब्लिक'चें भाषान्तर देण्यांत आलें होतें. १८९६ मध्यें प्रो. काथवटे यांच्या सांगण्यावरून हे वाईस गेले आणि तेथील एरंडे यांच्या दप्तराचा पानपत विषयक भाग यांनीं छापण्यास सुरुवात केली. पण विठ्ठल छापखाना जळाल्यानें त्यांत तें सर्व मुद्रित भस्मसात् झालें. लगोलग तोच भाग 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड पहिला' म्हणून वाईस मोदवृत्त छापखान्यांतून भाऊशास्त्री लेले यांनीं प्रसिद्ध केला (१८९८). त्याच्या प्रस्तावनेंत इंग्रज लेखक व बखरी यांपेक्षां समकालीन अस्सल कागदपत्रांवरून इतिहास लिहिण्याचें महत्त्व प्रतिपादून पानपत युद्धाची यांनीं अगदीं साग्र नवी माहिती अस्सल पत्रांच्या आधारें लोकांपुढें मांडून आपणांकडे सर्वांचें लक्ष वेधून घेतलें. त्यानंतर म. इ. सा. खंड २ ते ६ व ८ हे ग्रंथमालेंत आणि १६-१९ हे 'इतिहाससंग्रहां'त व बाकीचे इतरत्र मिळून यांनीं साधनांचे २२ खंड प्रसिद्ध केले.

पण संपादन, संकलन व संशोधन यांपेक्षांहि मिळालेल्या साधनांवरून नवेनवे सिद्धान्त प्रतिपादण्यांत यांचा तळखपणा विशेष प्रगट होतो. आपल्या इतिहासाचीं साधनें घरोघर विखुरलेलीं असून त्यांच्या द्वारा आपण इतिहासांत मोलाची भर घालूं शकतों असा विश्वास उत्पन्न करून यांनीं लोकांना कार्यप्रवृत्त केलें. महाराष्ट्राचा इतिहास येथील लोकांच्या हातूनच निर्माण झाला पाहिजे, अशी भावना यांनीं लोकांत उत्पन्न केली.

येथील लोकांचा अभ्यास ध्यानांत घेतल्याशिवाय आपलें काम पूर्ण होत नाहीं अशी जाणीव यांनीं बाहेरच्या लोकांना करून दिली.

साधनें प्रसिद्ध करण्याचें काम वाढीस लागल्यानंतर त्याला संघटित रूप देण्याकरितां यांनीं पुणें भारत इतिहास संशोधक मंडळ स्थापन केलें (१९१०) आणि त्याला एक प्रकारची शिस्त लावून दिली. पहिलीं सात वर्षे हे या मंडळांत अत्यंत लक्ष घालीत. तसेंच भा.इ.सं. मंडळांतून महानुभावांच्या गुप्त संकेताचा उलगडा यांनींच प्रथम केला व तें वाङ्मयाचें दालन खुलें केलें. पण पुढें पुढें यांचें लक्ष भाषा, व्याकरण व समाज वगैरेकडे विशेष जाऊं लागलें. यांना एकनाथपूर्व ज्ञानेश्वरीचा शोध लागला आणि यांनीं तिचें मुद्रण करून व्याकरण लिहून अगदीं नव्या प्रकाशानें लोकांचे डोळे दिपवून टाकले. यांचें व्याकरणविषयक सर्वच लिखाण अगदीं नव्या विचारांनीं भरलेलें व मौलिक स्वरूपाचें आहे. यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेला यांचा मराठी धातुकोश हा ग्रंथहि अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र आधारापेक्षां प्रतिभेवर यांचा विशेष भर असतो.

शिवाय यांनीं आरोग्यमंडळ, समाजविचारमंडळ वगैरे मंडळें काढलीं, अनेक प्रस्तावना लिहिल्या व लेखहि पुष्कळ लिहिले. या प्रत्येक ठिकाणीं यांच्या स्वतंत्र बुद्धीचा साक्षात्कार होतो. फार काय, कांहीं नवें सांगावयाचें असल्याशिवाय हे कार्यप्रवृत्तच होत नाहींत. यांच्या प्रत्येक लेखांत देशाभिमान, कळकळ आणि महाराष्ट्राच्या भवितव्याबद्दलची चिन्ता स्पष्ट प्रतीत होते आणि यांचा आत्मविश्वासहि इतका दांडगा आहे कीं यांनीं आपलीं मतें आणि आदेश आग्रहपूर्वक प्रतिपादिलीं आहेत. यांच्या रामदास या निबंधानें स्वामींच्या कार्यकर्तृत्वाचा ठसा जसा वाचकांवर उठतो तसेंच त्यांच्याप्रमाणें त्यागपूर्वक देशकार्य करणारी पिढी निर्माण करण्याचें सामर्थ्यहि अनुभवास येतें. हे जन्मभर अकिंचन, फिरते आणि असंग्रही होते. पूर्व वयांत यांनीं शरीर उत्तम कमविलें होतें. यांनीं तत्त्व म्हणून आपलें सर्व लेखन मराठींतच केलें आणि आपला स्वभाव अत्यंत विक्षिप्त, तुसट व फटकळ असतांनाहि काम पुढें चालविणारा व चाहता वर्ग निर्माण केला. यांच्या चाहत्यांनीं यांच्या स्मरणार्थ धुळें येथें राजवाडे संशोधक मंडळ स्थापन केलें. १९२७ त पुणें येथें भरलेल्या पहिल्या 'शारदोपासकसंमेलना'चें अध्यक्षस्थान यांस देण्यांत आलेलें होतें.

यांचें वाङ्मय—ऐतिहासिक कागदपत्रें–१-२२ खंड–'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' (१८९८-१९१७); संशोधित ग्रंथ–२३ एकनाथपूर्वकालीन ज्ञानेश्वरी, २४ राधामाधवविलासचंपू, २५ महीकावतीची बखर; व्याकरण–२६ सुबन्तविचार, २७तिङन्तविचार, २८मराठी भाषेचा उलगडा, २९ ज्ञानेश्वरीचें व्याकरण; कोश–३० राजवाडे मराठी धातुकोश (तीस हजार धातूंवरून मराठी शब्दांची सिद्धि, संपादक–प्रा. कृ. पां. कुलकर्णी).

पुनर्मुद्रित लेखसंग्रह—१ ऐतिहासिक प्रस्तावना (फक्त साधन खंडांच्या), २ संकीर्ण लेखसंग्रह (ग्रंथमाला), ३-४ राजवाडे संकीर्ण निबंध (२-३ भाग). यांपैकीं १, ३, ४ हे शं. ना. जोशी यांनीं एकत्र केले आणि चित्रशाळेनें प्रसिद्ध केले, ५ रामदास व कादंबरी; मासिक–भाषान्तर (१८९५, विठ्ठल छापखान्यांच्या आगींत नष्ट, सुमारें दोन वर्षे चाललें).

राजा, एम्. सी.—(जन्म स. १८८३–मृत्यु स. १९४३ आगस्ट) हरिजन समाजाचे सुप्रसिद्ध पुढारी व मद्रास प्रान्तांतील मंत्री.

यांचें शिक्षण वेस्ले कॉलेज, मद्रास, ख्रिश्चन कॉलेज, टीचर्स कॉलेज (सैद पेठ) इत्यादि ठिकाणीं झालें. १९२४ सालीं शिक्षक म्हणून यांची नेमणूक झाली. मद्रास युनिव्हर्सिटीच्या सेनेटमध्यें हे निवडले गेल्यावर अस्पृश्यांकरितां मोफत वसतिगृहाची यांनीं स्थापना केली. स्काउटच्या चळवळींत हे पुढाकार घेत. १९१६ सालीं मद्रास, आदिद्रविड महाजन सभेचे हे कार्यवाह व अनेक शिष्टमंडळांचे पुढारी होते. १९१९ पासून मद्रासचे ऑननरी प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट व मद्रास कौन्सिलमध्यें यांची नेमणूक झाली. १९२६ सालीं ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशन मद्रासचे व १९२८ सालीं सिलोनचे हे अध्यक्ष होते. नंतर इंडियन सेंट्रल कमेटीवर यांची नेमणूक झाली. मद्रासच्या जस्टिज पार्टीचे हे एक प्रमुख असून यांना रावबहादूर ही पदवी होती. हे गोलमेज परिषदेचे सभासद असून संयुक्त मतदार संघाच्या कल्पनेवर उभारलेला यांचा राजा-मुंजे करार प्रसिद्ध आहे. पुढें पुणें करार यांच्याच साह्यानें झाला. हे मद्रास प्रान्तांतील कॉंग्रेस मंत्रिमंडळांत होते.

राजेंद्रप्रसाद, डॉ.—(जन्म स. १८८४ डिसें. ३) बिहार प्रांतांतील सुप्रसिद्ध कॉंग्रेस कार्यकर्ते व पुढारी.

सारन जिल्ह्यांतील (बिहार) जिरदाई हें गांव यांचें

जन्मस्थान. यांच्या वडिलांचें नांव मुन्शी महादेव. जात कायस्थ. यांचें सर्व बालपण चापरा येथें गेलें. मॅट्रिक ते एम्. एल्. पर्यंतच्या सर्व परीक्षा पहिल्या नंबरानें पास झाल्यानंतर यांनीं कलकत्त्याला वकिली करण्यास सुरुवात केली. यानंतर पाटणा येथें हायकोर्टाची स्थापना होतांच हे पाटण्याला गेले. उत्कृष्ट कायदेपंडित म्हणून यांची अजूनहि प्रसिद्धि आहे.

१९१७ सालीं चंपारण्याच्या सत्याग्रहाचे वेळीं यांची गांधीजींशीं गांठ पडली व हे गांधीवादाचे निःसीम उपासक बनले. १९२० च्या असहकाराच्या चळवळींत यांनीं आपल्या वकिलीचा व पाटणा युनिव्हर्सिटीच्या उपकुलगुरूपदाचा त्याग केला व हे पाटणा राष्ट्रीय विद्यालयाचे प्रमुख झाले. परंतु पुढें तें विद्यालय सरकारच्या अवकृपेला बळी पडलें.

तेव्हांपासून बिहार प्रांतांतील कॉंग्रेस चळवळीचें नेतृत्व यांचेकडे आलें. बिहार प्रांतिक कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्ष व कॉंग्रेसच्या वार्किंग कमेटीचे सभासद या नात्यानें यांनीं बिहार प्रांतांत केलेली तरुणांची संघटना व बिहार भूकंप फंडाची कामगिरी विशेष महत्त्वाची आहे.

१९२८ सालीं हे ब्रह्मदेशांतील शेतकऱ्यांचीं गाऱ्हाणीं समजावून घेण्यासाठीं ब्रह्मदेशला गेले. त्यानंतर कांहीं कायद्याचे कामासाठीं इंग्लंडला गेले असतां हे इंटरनॅशनल ॲन्टी-वॉर कॉन्फरन्सला हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून हजर राहिले. ऑस्ट्रियांत गेले असतां हे फॅसिस्ट लोकांच्या हल्ल्यांत सांपडले व मोठ्या शर्थीनें यांची सुटका झाली. वर्ल्ड यूथ कॉन्फरन्सलाहि हे हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून हजर राहिले होते.

१९२२ सालच्या गया कॉंग्रेसचें स्वागताध्यक्षपद व १९३४ सालीं वरळी (मुंबई) येथें भरलेल्या कॉंग्रेसचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें. तसेंच १९३९ सालीं श्री. सुभाषचंद्र बोस यांनीं अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतरहि यांनींच बदली अध्यक्ष म्हणून काम केलें. १९२३ सालीं मद्रास येथें भरलेल्या हिंदी साहित्य संमेलनाचे हे अध्यक्ष होते.

नऊ ऑगस्ट चळवळींत बिहारमधील हजारीबागच्या तुरुंगांत स्थानबद्ध असतां यांनीं लिहिलेला 'India Divided' हा ग्रंथ यांचे सुटकेनंतर प्रसिद्ध झाला. पाकिस्तानवरील सर्वोत्कृष्ट ग्रंथ अशी मान्यता आतां त्यास मिळाली आहे. आपलें मत न देतां पाकिस्तानची कल्पना व तिचे परिणाम यांचें साधार चित्र यांनीं वाचकांसमोर उभें केलें आहे. विभागणी होऊन संस्कृति, राजकारण अशा सर्वच दृष्टीनें खचीं झालेला हिंदुस्थान व एकत्र राहून लहान जातींना संरक्षण देऊन उत्कर्ष पावणारा हिंदुस्थान अशीं चित्रें उभीं करून निवडीचें काम यांनीं वाचकांवर सोंपविलें आहे.

गांधीवादाचें अनुयायित्व स्वीकारूनहि यांनीं त्यागी व बुद्धिमान लोकसेवक असें आपलें स्वतंत्र व्यक्तित्व कायम राखलें आहे. यांच्यासारख्या साध्या राहणीच्या व सेवावृत्तीच्या कष्टाळु कार्यकर्त्यांवरच राष्ट्रसभेचें प्रचंड बळ आपणांस दिसत आहे.

यांचे ग्रंथ—(1) India Divided (1946).

राधाकृष्णन्, सर सर्वपल्ली—(जन्म स.१८८८) पूर्व व पश्चिम संस्कृतीचा मेळ घालणारे हिंदी जगप्रसिद्ध तत्त्वज्ञ व पंडित.

मद्रास प्रांतांतील तिरूतनी हें गांव यांचें जन्मस्थान. जर्मन मिशन स्कूल, तिरुपति व मद्रास ख्रिश्चन कॉलेज येथें आपलें शिक्षण संपवून हे एम्. ए. झाले. त्यानंतर मद्रासचें प्रेसिडेन्सी कॉलेज (१९११-१६), म्हैसूर युनिव्हर्सिटी (१९१८-२१), कलकत्ता युनिव्हर्सिटी (१९२१-३१) अशा अनेक ठिकाणीं तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकाचीं कामें केल्यानंतर यांची आंध्र युनिव्हर्सिटीच्या उपकुलगुरूच्या जागीं नेमणूक झाली (१९३१).

मध्यंतरीं इंटरनॅशनल कॉंग्रेस ऑफ फिलॉसफीच्या लंडनच्या अधिवेशनाला हे कलकत्ता युनिव्हर्सिटीचे प्रतिनिधि म्हणून हजर राहिले असतां यांना ऑक्सफर्ड येथें Hindu View of Life या विषयावर 'अप्टन लेक्चर्स' देण्यासाठीं पाचारण करण्यांत आलें. यांचीं हीं व्याख्यानें विचारांच्या दृष्टीनें इतकीं नवीन ठरलीं कीं यांना हिबर्ट, हास्केल अशा अनेक व्याख्यानमाला गुंफण्याची संधी देण्यांत आली व शेवटीं तर यांना ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटींत स्पाल्डिंग प्रोफेसर नेमण्यांत आलें (१९३६). यानंतर लवकरच युद्ध सुरू झालें व पासपोर्टच्या अभावीं यांना युद्धकाल हिंदुस्थानांतच घालवावा लागला. त्या वेळीं बनारस हिंदु विश्वविद्यालयाच्या उपकुलगुरूचें काम यांनीं केलें.

स्वामी विवेकानंद व रामतीर्थ यांच्यानंतर यांनींच परिणामकारक पद्धतीनें हिंदु धर्माचें उज्वल स्वरूप

पाश्चात्यांच्या नजरेस आणून दिलें. 'आधिभौतिक सुधारणा कितीहि झाल्या तरी सृष्टीचें गूढ उकलण्याच्या कामीं शेवटीं अध्यात्मालाच शरण जावें लागतें; व्यक्तिगत भावना किंवा आकांक्षा यांच्या दृष्टीनें या सर्व वस्तूंची किंमत शून्य ठरते; धर्माचा संबंध आयुष्यांतील प्रत्येक क्षणाशीं असून तो लेखन किंवा विचार यांचा विषय नसून आचाराचा विषय आहे; हिंदुस्थानांतील खालच्यांतील खालच्या माणसांत सामान्य नीतिनियमाप्रमाणें धर्माचे नियम व्यवहारांत उतरविण्याचा प्रयत्न आढळतो;'–अशा पद्धतीनें आधुनिक चिकित्सक व्यासपीठावरून हिंदु धर्माचें स्पष्टीकरण करण्याचें काम यांनीं आपल्या परिणामकारक इंग्रजी वक्तृत्वानें उत्कृष्ट बजावलें असून जगांतील विद्वानांत स्वतःला मानाचें स्थान मिळविलें आहे.

यांचे ग्रंथ—(1) The Philosophy of Rabindranath Tagore (1918), (2) The Reign of Religion in Contemporary Philosophy (1920), (3) Indian Philosophy (लायब्ररी ऑफ फिलॉसफी ग्रंथमालेंत, दोन खंड, १९२३), (4) The Hindu View of Life (१९२७, चौथी आवृत्ती १९३७), (5) The Religion we need (1928), (6) Kalki or the Future of Civilization (1929), (7) An Idealist View of Life (1932), (8) East and West in Religion (1933), (9) The Heart of Hindustan (1932), (10) Freedom and Culture (1936). (11) The World's Unborn Soul (1936), (12) My Search for Truth (Religion in Transition या प्रातिनिधिक ग्रंथांतील प्रमुख लेख), (13) The Philosophy of the Upanishadas, (14) The Vedanta according to Samkara and Ramanuja, (15) Contemporary Indian Philosophy (प्रातिनिधिक हिंदी तत्त्वज्ञांचा लेखसंग्रह), (16) Mahtma Gandhi (महात्माजींच्या सत्तरीनिमित्त सर्व जगांतील लेखकांचा प्रातिनिधिक लेखसंग्रह).

इंग्लंडमधील सुप्रसिद्ध नवविचारप्रवर्तक पंडित सी. ई. एम्. जोड यांनीं यांच्या तत्त्वज्ञानाचें विवेचन करणारा Counter-Attack from the East हा ग्रंथ लिहिला आहे.

रानडे, न्यायमूर्ति-माधव गोविंद—(जन्म स. १८४२ जाने. १८–मृत्यु स. १९०१ जाने. १६) हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध समाजसुधारक, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, दूर दृष्टीचे विवेचक व स्वतंत्र भारताचे द्रष्टे.

यांचें घराणें भारद्वाजगोत्री चित्पावन ब्राह्मण. जन्मस्थान निफाड. यांचें प्राथमिक शिक्षण कोल्हापुरास व पुढील शिक्षण मुंबईस होऊन हे एम्. ए., एलएल्. बी. झाले (१८६६). नंतर यांनीं ॲडव्होकेटची परीक्षा दिली (१८७१).

हे शाळा खात्यांत ॲक्टिंग मराठी ट्रान्स्लेटर (१८६६-६७), अक्कलकोटचे कारभारी व कोल्हापूरचे न्यायाधीश, मुंबईस प्राध्यापक, मुंबई हायकोर्टांत असिस्टंट रिपोर्टर, सब्जज, स्मालकॉज जज्ज, फायनान्स कमेटीचे सभासद व शेवटीं हायकोर्टचे जज्ज झाले (१८९३). १८८७ मध्यें सी. आय. ई. ही पदवी मिळून मुंबई सरकारकडून यांची तीन वेळां कौन्सिलर म्हणून नेमणूक झाली.

राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक व आर्थिक चळवळींचें मार्गदर्शकत्व यांनीं अशा दूर दृष्टीनें व विचारीपणानें केलें कीं कालान्तरानें यांच्या विचारीपणाबद्दल अधिकच खात्री पटत चालली आहे.

यांना हिन्दी अर्थशास्त्राचे जनक मानण्यांत येतें. इंग्रजी राज्य येतांच वहातुक सुलभ करण्यांत आली आणि परदेशांतील मुबलक माल खेड्यांपर्यंत पोंचविण्यांत येऊन इकडचे लोक बेकार झाले व शेतीवर वाजवीपेक्षां जास्त भार पडून आर्थिक व्यवस्था गडगडली. दादाभाई नवरोजी प्रभृतींनीं हें आर्थिक शोषण पद्धतशीरपणें दाखविलें तरी इंग्रजांच्या खुल्या व्यापाऱ्याच्या गोंडस तत्त्वावर यांनीं पहिला जोराचा हल्ला केला आणि संरक्षक व्यापाराचें तत्त्वच हिंदुस्थानला तारक होईल हें तत्त्व चालू प्रवाहाच्या विरुद्ध बोलण्याचें धैर्य करून पद्धतशीरपणें पुढें मांडलें. सतत पंधरा वर्षें (१८७८-१८९३) पुणें सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत यांचे या विषयावर लेख येत. रा. ब. ग. व्यं. जोशी व गो. कृ. गोखले यांच्यासारख्या थोर लोकांवर यांच्या त्या लेखांची छाप असे. दीर्घकालानंतर यांचें हें म्हणणें बरोबर असल्याचें लोकांच्या प्रत्ययास येत आहे.

यांच्या वेळेपर्यंत, मुसलमानांनंतर राज्य इंग्रजांचें, मध्यें मराठ्यांची राजवट झालीच नाहीं अशा स्वरूपांत हिंदुस्थानचा इतिहास लिहिला जाई. पण ही समजूत

चुकीची आहे, हिंदुस्थानचा इतिहास अभ्यासणारास मराठ्यांची राजवटहि विशेष लक्ष घालून अभ्यासण्यासारखी आहे, बाबर वगैरेंनीं उभारलेल्या राज्यापेक्षां शिवाजी महाराजांच्या राज्याबद्दल लोकांना विशेष आपलेपणा वाटे, हें यांनीं प्रथम सिद्ध केलें. शिवाजीची कैद, संभाजीचा वध, जिंजीचा वेढा, पानपतचा पराभव व नारायणरावाचा वध वगैरे प्रसंगांतून मराठेशाही निभावून गेली याचे मुळाशीं या सत्तेच्याबद्दल लोकांच्या मनांतील कमालीची आत्मीयता आणि समर्थ पुरुषांची परंपरा होय, ही कल्पना यांनीं आपल्या 'मराठेशाहीचा उदय' या आपल्या इंग्रजी ग्रंथांत सिद्धान्तरूपानें प्रथम मांडली. मराठी सत्तेचा अपकर्षहि लिहिण्याचें यांचे मनांत होतें, पण ती गोष्ट यांच्या मृत्यूमुळें अपुरी राहिली. पण त्याचें दिग्दर्शन यांनीं 'पेशवे दप्तरांतील निवडक उतारे' या वाडांच्या ग्रंथाला ३८ पृष्ठांची इंग्रजी प्रस्तावना लिहून केलें आहे.

'मुसलमान व ख्रिस्ती यांच्याशीं आलेल्या संबंधांचे परिणाम आपणांस कधींच टाळतां येणार नाहींत; आपली जुनी समाजरचना कधींच अपरिवर्तनीय नव्हती व नाहीं; जगाच्या घडामोडींत योग्य स्थान मिळविण्याकरितां सर्वांना समान संधि देणारी आणि समता व न्याय यांवर उभारलेली समाजरचना आपणांस स्वीकारली पाहिजे;' अशा व्यापक दृष्टिकोनांतून हे समाजसुधारणेचा पुरस्कार करीत.

यांच्या वेळीं राष्ट्रापुढें आलेल्या अशा प्रकारच्या अनेक विवाद्य प्रश्नांच्या सर्व बाजू ध्यानांत घेऊन राष्ट्राच्या उत्कर्षाला पोषक असा सल्ला देण्याचें धैर्य यांनीं दाखविलें म्हणून यांना 'स्वतंत्र भारताचे द्रष्टे' असें संबोधण्यांत येतें. यांच्या निर्णयाला यांच्या समतोल विवेचनानें विशेष महत्त्व येई.

संधि आली असतां घरांतील लोकांच्या मर्जीविरुद्ध पुनर्विवाह केला नाहीं आणि सार्वजनिक सभा आपल्याविरुद्ध मताच्या लोकांच्या हातांत जातांच यांनीं स्वतंत्र लिबरल क्लबची स्थापना केली असे दोन आरोप यांच्यावर आहेत.

यांचीं विस्तृत चरित्रें प्रा. न. र. फाटक व प्रा. द. गो. कर्वे यांनीं लिहिलीं. यांपैकीं यांच्या जन्मशताब्दीनिमित्त प्रसिद्ध झालेला कर्वे यांचा चरित्र ग्रंथ मूळ इंग्रजी भाषेंत असून त्याचा मराठी अनुवाद श्री. गो. म. कुलकर्णी यांनीं केला. याशिवाय यांच्या खाजगी जीवनावर प्रकाश टाकणारें 'आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी' हें यांच्या पत्नी रमाबाई रानडे यांनीं लिहिलेलें पुस्तक त्यांतील जिव्हाळ्यामुळें विशेष प्रसिद्ध आहे. वा. वा. ठाकूर, इंदूर यांनींहि यांचे एक मराठी चरित्र लिहिलें आहे.

यांचे ग्रंथ—(1) Essays on Indian Economics, (2) The Rise of the Maratha Power (1900), (3) Indian Economics, (4) The Wisdom of a Modern Rishi (Selections, 1942). मराठी–धर्मपर व्याख्यानें.

रानडे, प्रा. रामचंद्र दत्तात्रेय—(जन्म स. १८८५ सुमार) सुप्रसिद्ध तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, ग्रंथलेखक व अलाहाबाद विद्यापीठाचे उपकुलगुरु.

यांनीं जमखिंडी हायस्कुलांतून मॅट्रिकची परीक्षा दिली (१९०२). मॅट्रिक परीक्षेंत सर्वांत दुसरा आणि संस्कृतांत पहिला क्रम आल्यानें यांना जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति मिळाली. बी. ए.च्या परीक्षेंत यांना 'भाऊदाजी' पारितोषिक मिळालें. पुढें एम्. ए. करितां तत्त्वज्ञान हा विषय घेऊन चान्सलर मेडल मिळविलें (१९१६). तेव्हांपासून आठ वर्षें फर्ग्युसन व विलिंग्डन कॉलेजांत तत्त्वज्ञानाचें प्राध्यापन करून आन्तरराष्ट्रीय पंडित अशी कीर्ति मिळवून देणारा आपला उपनिषदावरील इंग्रजी ग्रंथ यांनीं प्रसिद्ध केला. १९२७ सालीं अलाहाबाद विद्यापीठांत तत्त्वाज्ञानाचे प्रमुख प्राध्यापक म्हणून यांची नेमणूक झाली. १९३० सालीं यांना तेथें 'डीन ऑफ दि फॅकल्टी ऑफ आर्ट्स' निवडलें आणि १९४५ सालीं यांना तेथें उपकुलगुरु नेमण्यांत आलें. तत्त्वज्ञान व धर्म या विषयाला वाहिलेलें एक नियतकालिकहि यांच्या संपादकत्वाखालीं निघत असतें.

यांचें वाङ्मय—इंग्रजी–(1) Mysticism in Maharashtra, (2) A Constructive Survey of Upanishadic Philosophy (१९२६ मराठी उपनिषद्रहस्य–अनुवादक कृ. वें. गजेंद्रगडकर, यांनीं त्यांत अधिक भरहि घातली आहे).

मराठी–संतवचनामृत–१ ज्ञानेश्वर, २ एकनाथ, ३ रामदास, ४ तुकाराम.

रॉबर्ट, ग्रँट-सर—(जन्म स. १७७९–मृत्यु स. १८३८ जुलै ९) मुंबईचे गव्हर्नर व मुंबईस मेडिकल कॉलेज काढण्याच्या कल्पनेचे जनक.

यांच्या पित्याचें नांव चार्ल्स ग्रँट. जन्म बंगाल्यांत

झाला. हे इंग्लंडला गेले व केम्ब्रिज येथें यांचें शिक्षण झालें. हे तेथले तिसरे रँगलर असून यांना चान्सलर मेडल मिळालें व फेलो नेमिलें होतें. हे पार्लमेंटचे सभासद होते (१८१८-१८३४). यांना मुंबईचे गव्हर्नर नेमलें (१८३५ मार्च १७).

मुंबईत १८३७ सालीं एक मेडिकल सोसायटी स्थापन झाली. तिच्या कार्यकारी मंडळाचें लक्ष पाश्चात्य वैद्यकाचें शिक्षण एतद्देशीयांना देण्याकडे वळलें. मुंबईतील त्यापूर्वीचें कामचलाऊ मेडिकल स्कूल बंद करून अद्ययावत् उपकरणांनीं सुसज्ज असें वैद्यविद्यालय काढण्याची योजना सरकारपुढें ठेवण्यांत आली. यांनीं ती योजना मंजुरीकरितां कलकत्त्यास धाडली. मंजुरी येण्यापूर्वीच हे वारले. तथापि यांच्या दुःखप्रदर्शनाच्या समेंत यांच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देऊन संस्था स्थापन करण्याचें व त्या संस्थेला यांचें नांव देण्याचें ठरलें.

या ग्रँट मेडिकल कॉलेजच्या इमारतीकरितां ४४८०० रु. वर्गणी जमली. कोर्ट ऑफ डायरेक्टर्सनीं या योजनेला मान्यता देऊन शिवाय रु. ४५१०६-४-२ इतकी रक्कम इमारतीकरितां दिली. कलकत्त्याचे लार्ड बिशप यांनीं या इमारतीच्या पायाचा दगड बसविला (१८४३ मार्च ३०). ऑक्टोबरमध्यें काम पुरें होऊन १८४५ नवंबर ३ ला प्रत्यक्ष काम सुरू झालें. या मेडिकल कॉलेजच्या जोडीला सर जमशेदजी जिजीभाई यांनीं १९३८ च्या प्रारंभीं दिलेल्या एक लाख रुपयांच्या उदार देणगींतून नेटिव्ह जनरल हॉस्पिटल उभारण्यांत आलें. तेंच सध्याचें सुप्रसिद्ध जे. जे. हॉस्पिटल होय. १८४५ च्या मे महिन्यांत यांत रोग्यांना प्रवेश मिळूं लागला. या हॉस्पिटलच्या चालू खर्चाकरितां कंपनी-सरकारनें एक लाख रुपयांची देणगी दिली. या हॉस्पिटलचा पाया डॉ. जेम्स बर्नेस यांनीं बसविला. इमारतीला आलेल्या खर्चापैकीं सुमारें निम्मे म्हणजे पन्नास हजार रुपये सर जीजीभाईंनीं व बाकीचे सरकारनें दिले.

रामकृष्ण परमहंस—(जन्म स. १८३६ फेब्रु.१८– समाधि स. १८८६ ऑगस्ट १५) बंगालमधील जगप्रसिद्ध सिद्धपुरुष व वेदान्तप्रतिपादक.

बंगाल्यांत हुगळी जिल्ह्यांत ' कामारपुकुर ' नांवाच्या एका अप्रसिद्ध गांवांत यांचा जन्म झाला. यांचें मूळ नांव गदाधर चट्टोपाध्याय. यांचे आई-वडील अत्यंत धार्मिक व सनातनी वृत्तीचे ब्राह्मण होते. स.१८५३ मध्यें हे आपले वडील बंधु रामकुमार यांचेबरोबर कलकत्त्यास आले. स. १८५६ मध्यें राणी रासमणीनें यांच्या वडील भावाला कलकत्त्याजवळील कालीच्या दक्षिणेश्वरमंदिराचे मुख्य पुजारी नेमिलें. तेथें त्यांना हे मदत करीत. तेथील यांचें त्यागमय जीवन आणि तपस्या यांचा विशेष उल्लेख करण्यासारखा आहे. या वेळीं तोतापुरी नांवाच्या एका संन्यासानें यांना संन्यास देऊन यांचें नांव ' रामकृष्ण परमहंस ' असें ठेविलें. परंतु दक्षिणेश्वरच्या यांच्या कायम वासामुळें दक्षिणेश्वरचे संत म्हणून हे सर्वत्र प्रसिद्ध असत.

नंतर यांनीं ख्रिश्चन व मुसलमान धर्मांची त्या त्या धर्मांतील अनुयायांप्रमाणें उपासना केली. तसेंच निरनिराळे संप्रदाय व मतमतान्तरें यांचा आस्तिकपणानें अभ्यास करून तदनुसार यांनीं कांहीं दिवस साधनाहि केली आणि सिद्धि मिळवून जगाला त्याचा उपदेश केला. यांचे सर्व विचार ईश्वराधिष्ठित असून ते अत्यंत साधे व शुद्ध असत. यांच्या विचारसरणीचा पौर्वात्य किंवा पाश्चिमात्य यांच्यावर सारखाच परिणाम होतो. यांचें चरित्र व उपदेश इतके अलौकिक व चमत्कारपूर्ण आहेत कीं जगांतील विद्वानांवर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीं. यांचे शिष्य स्वामी विवेकानंद होत. त्यांनीं यांचा संदेश जगभर लोकप्रिय करून सोडला आणि रामकृष्णांच्या उपदेशाचीं जगांतल्या बहुतेक भाषांत भाषान्तरें झालीं.

वयाच्या चौथ्या वर्षापासूनच यांची समाधि लागे. वारंवार देहभान विसरून हे ब्रह्मस्वरूपांत लीन होत. आधुनिक भारताची अध्यात्म परंपरा थेट वैदिक परंपरेशीं संलग्न ठेवण्याचें काम यांनीं केलें. बंगाल्यांतील ब्राह्म वगैरे समाजांतील लोकांचें प्रतिपादनहि यांच्यापुढें फिकें पडून ते लोक यांच्याकडे आकर्षिले गेले.

यांचें प्रतिपादन तर्कशुद्ध, स्पष्ट आणि थोडक्यांत असे. कांहीं प्रसंगीं यांच्या बोलण्यांत गूढता येई. हे त्या त्या देवतेची उपासना करतांना तिच्याशीं पूर्ण एकरूप होत. कालीची उपासना करतांना, हे विटाळशी होत व सर्व व्यवहार आपण स्त्री आहोंत अशा भावनेनें करीत.

आत्मशुद्धि करण्याकरितां यांनीं नाना प्रकार केले. अंत्यजांपेक्षां आपण वरचढ आहोंत ही भावना नष्ट करण्याकरितां यांनीं अंत्यजांच्या घरचा केर आपल्या जटांनीं काढला. द्रव्यविषयक तुच्छताहि यांनीं झोंपेत-

सुद्धां शरीराला द्रव्याचा स्पर्श झाला असतां अंगावर शहारे यावे इतकी भिनवली होती.

यांचें नेहमींचें वर्तन एखाद्या मुलाप्रमाणें निष्पाप, खेळकर व भोळें असे. यांनीं आपल्या आध्यात्मिक ज्ञानाचा निरनिराळ्या धर्मांशीं एकरूप होऊन कस घेण्यांत उपयोग केला. शेवटीं सर्व धर्माच्या मुळाशीं एकच तत्त्व असल्याची यांची खात्री झाली. सर्व धर्म सारख्या योग्यतेचे मानून वैदिक अध्यात्माचा संदेश जगभर पोंचविणाऱ्या विवेकानंदांच्या पाठीशीं यांचा हा अनुभव होता.

नास्तिक्याकडे झुकलेल्या, गांगरलेल्या आणि स्वत्व विसरलेल्या हिंदुस्थानला यांचा संदेश नवचैतन्य देणारा ठरला. जुन्याला उजळा देणाऱ्या व नवीन कालाला शोभणाऱ्या यांच्या तत्त्वज्ञानाची घरोघर मोठ्या श्रद्धेनें पूजा होऊं लागली.

अन्तस्थ तीव्र भावनेमुळें घसा दुखेतोंपर्यंत वेळीं अवेळीं अनुभवकथन व उपदेश करण्यानें यांना शेवटीं घशाचा कॅन्सर झाला. मात्र दुसऱ्याचे रोग स्वतःच्या अंगावर घेण्याच्या यांच्या नित्यक्रमांतून या रोगाची उत्पत्ति झाली अशी समजूत यांच्या शिष्यशाखेंत रूढ आहे.

यांच्या नांवानें रामकृष्ण मिशन नांवाची संस्था स्थापून त्या संस्थेनें वेदान्तप्रचाराला लोकसेवेची जोड दिली. तिच्या शाखा जगभर आहेत. यांचा शतसांवत्सरिक जन्मदिन मोठ्या समारंभानें साजरा करण्यांत आला. यांची प्रेक्षणीय समाधि बेलूर येथें ७ लक्ष रुपये खर्च करून बांधण्यांत आली. यांचें चरित्र व शिकवण सुंदर भाषेंत अनेक भाषांत भाषान्तरित झाली आहेत. त्यांपैकीं महेंद्रनाथ गुप्त ऊर्फ एम्. यांनीं लिहिलेला The Gospel of Ramakrishna हा यांच्या आठवणींचा ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे. यांची जन्मशताब्दी सर्व हिंदुस्थानांत मोठ्या समारंभानें साजरी करण्यांत येऊन The Heritage of India हा चतुःखंडात्मक ग्रंथ तिचें स्मारक म्हणून काढण्यांत आला.

रामकृष्णशेठ हरजीमल दालमिया—(जन्म स. १८९० सुमार) हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध व्यापारी व निरनिराळ्या औद्योगिक क्षेत्रांतील 'दालमिया-जैन' साहसाचे जनक.

पंजाब जिल्ह्यांतील दालमा या गांवाहून यांचे पूर्वज जयपूरला आले म्हणून यांच्या घराण्याचें नांव दालमिया पडलें. जातीचे मारवाडी असणारें यांचें घराणें पूर्वीपासूनच अतिश्रीमंत म्हणून प्रसिद्ध असे. आपले बंधु जयदयाल व जांवई शांतिप्रसाद जैन यांचे सहकार्यानें यांनीं आपल्या व्यापाराचा पसारा वाढविला आहे.

विश्वविद्यालयीन शिक्षणाचा लाभ झाला नसूनहि अनुभवानें संपादन केलेल्या अर्थशास्त्राच्या व व्यापाराच्या सूक्ष्म ज्ञानामुळें हे हिंदुस्थानांतील पहिल्या दर्जाचे उद्योगसम्राट् बनले. वयाच्या बाराव्या वर्षी दहा रुपये पगारावर व्यापारांत शिरलेला हा मनुष्य आज सिमेंट, साखर, कागद यांचा हिंदुस्थानांतील मोठा व्यापारी बनला आहे. ज्या ठिकाणीं इतर कारखानदार कच खातात तेथेंच जाऊन यशस्वी होण्याचा विक्रम यांनीं अनेक वेळां करून दाखविला आहे. यांच्या सिमेंटच्या कारखान्यांना तर सुरुवातीला अनेक देशी व परदेशी कारखान्यांना तोंड द्यावें लागलें. परंतु आतां हिंदुस्थानांतील सिमेंटचें सर्व मार्केट काबीज करण्याचा मान दालमिया सिमेंटला मिळाला आहे.

दालमियानगर (बिहार), दालमियापुरम् (दक्षिण हिंदुस्थान), दालमिया दद्रि (पंजाब) व शांतिनगर (कराची) अशीं यांचीं कारखान्याचीं अनेक केंद्रें असलीं तरी सिमेंट, साखर, कागद, वनस्पती तूप, सल्फ्युरिक ॲसिड, ब्लीचिंग पॉवडर, कॉस्टिक सोडा, डिस्टेंपर वगैरेसारख्या महत्त्वाच्या वस्तूंचें उत्पादन दालमियानगरमध्येंच होतें.

१९४२ सालीं यांनीं काढलेल्या भारत बँक लि. या संस्थेनें हिंदुस्थानच्या विमाजगांत अक्षरशः क्रांति घडवून आणली. वीस कोटी भांडवल व त्यांतील पंधरा कोटी विक्रीस काढलेलें, इतकी मोठी विमा संस्था यांचे आधीं निघाली नव्हती. खेड्यांतील लहानसहान मागसालाहि बँक-माईंडेड बनवून देशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याचा आपला हेतु यांनीं या बँकेच्या स्थापनेच्या वेळीं बोलून दाखविला. आतां भारत इन्शुअरन्स कंपनी व भारत फायर ॲन्ड इन्शुअरन्स लि.चीहि स्थापना करण्यांत आली आहे.

परंतु यापेक्षांहि मोठा धक्का हिंदी व्यापारी जगाला यांनीं १९४६ सालीं दिला. टाइम्स ऑफ इंडिया या पूर्वेकडील सर्वांत मोठ्या संस्थेचे पासस्ट टक्के शेअर्स यांनीं दीड कोट रुपयांना विकत घेतले. अशा तऱ्हेनें हिंदुस्था-

नांतील एका मोठ्या परदेशी संस्थेच्या हिंदीकरणाचा मान यांनीं मिळविला.

रामतीर्थ, स्वामी—(जन्म स.१८७३ ऑक्टो.२२–जलसमाधि स. १९०६ ऑक्टो. १७) आंतरराष्ट्रीय कीर्तीचे हिंदी साक्षात्कारी सत्पुरुष, तत्त्वज्ञानी व कवि.

यांचें मूळ नांव तीर्थराम. यांनीं तें संन्यास घेतल्यानंतर बदलून रामतीर्थ केलें. पंजाब प्रांतांतील गुजराणवाला जिल्ह्यांतील मुरलीवाला हें गांव यांचें जन्मस्थान. यांच्या वडिलांचें नांव गोस्वामी हिरानंद. तुलसीदासाचे अव्वल वंशज म्हणून यांच्या घराण्याची त्या प्रांतांत प्रसिद्धि असून वायव्य प्रांतांतील हिंदूंचे गुरु म्हणून यांचे वडील काम करीत.

गुजराणवाला हायस्कूल, लाहोर फॉर्मन ख्रिश्चन कॉलेज व गव्हर्नमेंट कॉलेज लाहोर येथें आपलें शिक्षण संपवून हे गणिताचे एम्. ए. झाले (१८९५). सांपत्तिक हलाखीमुळें यांचे हे सर्व दिवस मोठे कष्टाचे गेले. एम्.ए. झाल्यानंतर यांनीं प्रथम सियालकोटच्या मिशन हायस्कूलमध्यें व नंतर लाहोरच्या आपल्या मिशन कॉलेजांत गणिताच्या प्राध्यापकाचें काम करण्यास सुरुवात केली. परंतु यांच्या मनांतील वादत्या अध्यात्मिकतेला ही नोकरी सोसेना म्हणून यांनीं ती सोडून दिली. रँगलर होण्याकरितां मिळालेल्या शिष्यवृत्तीचाहि यांनीं त्याग केला. याच वेळीं स्वामी विवेकानंदांचीं वेदांतावरील व्याख्यानें यांनीं ऐकली व हे सर्वसंगपरित्याग करून हिमालयाला निघाले व यांनीं संन्यास घेतला. मध्यंतरींच टोकियोला भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय धर्मपरिषदेची बातमी यांना कळली व टेहरीच्या महाराजांच्या विनंतीवरून हे जपानला गेले (१९०२ ऑगस्ट).

जपानच्या या परिषदेची माहिती तेथें गेल्यानंतर खोटी ठरली. परंतु यांच्या एका नव्या आयुष्याची सुरुवात तेथें झाली. उर्दू, फारशी व इंग्लिश भाषांचें पांडित्य व उत्कृष्ट कवित्व यांना यांच्या वेदान्ताच्या अध्ययनाची जोड मिळाली व यांचीं व्याख्यानें लोकप्रिय होऊं लागलीं.

जपाननंतर हे अमेरिकेला गेले. तेथें विवेकानंदांइतकें प्रचंड स्वागत यांचेंच झालें. गौरवर्ण, उंचीपुरी मूर्ति यांमुळें तेथील लोकांना हे अमेरिकनच वाटत. अमेरिकेहून हिंदुस्थानला आल्यानंतर यांचा सर्व काळ आपल्या शिष्यांना उपदेश करण्यांत जाऊं लागला.

अशाच वेळीं हे गंगेला स्नानाला गेले असतां यांच्या पायाखालचा दगड निसटला व हे बुडून मरण पावले. मात्र याच वेळीं यांनीं लिहिलेला सुप्रसिद्ध मृत्युलेख यांच्या शिष्यांना यांच्या टेबलावर सांपडला. यांच्या कवित्वशक्तीचा अत्युच्च नमुना म्हणून त्याची प्रसिद्धि असून त्यांत मृत्यूला उद्देशून 'माझें शरीर तूं खुशाल घेऊन जा, चंद्राच्या किरणाच्या रूपानें, पहाडी नदी-निर्झराच्या वेषानें, समुद्राच्या लाटांच्या मिषानें मी जगांत वावरूं शकेन. मी सर्व ठिकाणीं गेलों, परंतु बरोबर कांहींच ठेवलें नाहीं व कोणाच्याच हातीं सांपडलों नाहीं' असे उद्गार आहेत. हृषीकेशजवळ ब्रह्मपुरी येथें यांच्या स्मरणार्थ सुंदर ग्रंथसंग्रहालय चालविण्यांत येतें.

यांनीं आपल्या पूर्वायुष्यांत अनेक ग्रंथ लिहिले होते; परंतु एकदां निराशेच्या भरांत यांनीं ते सर्व गंगेंत टाकून दिले. त्यामुळें अमेरिकेंत किंवा हिंदुस्थानांत यांनीं दिलेल्या व्याख्यानांच्या टिपणांखेरीज यांचा स्वतंत्र असा ग्रंथ उपलब्ध नाहीं. लखनौच्या रामतीर्थ पब्लिकेशन लीगनें हिंदी भाषेंत व लाल अमीरचंद यांनीं इंग्रजींत व नारायण वासुदेव गुणाजी (काका कालेलकरांच्या सहकार्यानें) व भा. वि. फडके (रा. वा. बर्वे यांच्या सहकार्यानें) यांनीं मराठींत यांचीं व्याख्यानें व पत्रव्यवहार अनेक खंडांत छापलीं. त्यांपैकीं 'राष्ट्रीय धर्म', 'हिंदुस्थानपुढील प्रश्न' हीं यांचीं व्याख्यानें विशेष प्रसिद्ध आहेत.

यांच्या मृत्यूनंतर रामतीर्थ पब्लिकेशन लीगनें संपादून प्रसिद्ध केलेले यांचे इंग्रजी लेखसंग्रह—(1) In Woods of God Realisation (आठ खंड), (2) Rama's Note Books (दोन खंड), (3) Heart of Rama, (4) Poems of Rama (सी. एफ. ॲंड्रूज यांचे प्रस्तावनेसह), (5) Parables of Rama इत्यादि.

रामन, सर-चंद्रशेखर व्यंकट—(जन्म स. १८८८ नवं. ७) आंतरराष्ट्रीय कीर्तीचे हिंदी विज्ञानाचार्य व जगप्रसिद्ध 'रामन् इफेक्ट'चे जनक.

यांचें समग्र नांव व्यंकटरमण चंद्रशेखर अय्यर. यांचे वडील आर. चंद्रशेखर अय्यर हे विज्ञगापट्टम्च्या मिसेस ए. व्ही. एम्. कॉलेजांत गणित व विज्ञान यांचे प्राध्यापक होते. यांचा जन्म त्रिचनापल्लीला झाला. वयाच्या बाराव्या वर्षीच हे मॅट्रिकची परीक्षा पास झाले व मद्रा-

सच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांतून 'विज्ञान' घेऊन हे एम्.ए. झाले. याच सुमारास लंडनच्या फिलॉसफिकल मॅगझीननें 'The Unsymmetrical Diffraction Bands due to a Rectangular Aperture' हा यांचा पहिला संशोधनपर निबंध प्रसिद्ध केला (१९०६ नवं.).

प्रकृति-अस्वास्थ्यामुळें पुढील शिक्षणासाठीं परदेशीं जाण्याचें रद्द करून हे इंपीरियल गव्हर्नमेंट सर्व्हिसमध्यें शिरले. तेथें यांनीं फिनान्ससची परीक्षा दिली व डेप्युटी अकाउंटंटचें काम करण्यास सुरुवात केली. हें काम करीत असतां कलकत्त्याच्या इंडियन असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्सच्या अमृतलाल सरकाराशीं यांची गांठ पडली व फिनान्स खात्यांतील नोकरी सांभाळून यांनीं त्या संस्थेच्या लेबॉरटरींत आपल्या संशोधनास सुरुवात केली. याच सुमारास श्री. तारकनाथ पालीत यांच्या देणगीनें निघालेल्या 'युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ सायन्स'मधील विज्ञानाच्या प्राध्यापकाच्या जागेवर श्री. आशुतोष मुकर्जी यांनीं यांची नेमणूक केली (१९१७). अशा तऱ्हेनें युनिव्हर्सिटी कॉलेजमध्यें अध्यापन व इंडियन असोसिएशनमध्यें संशोधन असा यांचा कार्यक्रम सुरू झाला, तो हे त्या जागेवरून निवृत्त होईपर्यंत चालू राहिला (१९३२). यांचें विशेष महत्त्वाचें संशोधन याच काळांत झालें.

यानंतर यांनीं टाटाच्या बंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्चच्या डायरेक्टरचें काम करण्यास सुरुवात केली. परंतु पुढें यांनीं या जागेचा राजीनामा दिला व हे फक्त विज्ञानाचे प्राध्यापक राहिले. या काळांत यांनीं हिऱ्यांच्या गुणधर्मासंबंधीं केलेलें संशोधन विशेष महत्त्वाचें मानलें जातें.

परंतु यापेक्षांहि संशोधनाच्या अगदीं सुरवातीच्या काळांत यांनीं 'रामन् इफेक्ट' या नांवानें केलेल्या संशोधनानें यांचें नांव सर्वतोमुखीं झालें. विझगापट्टमला असतांनाच जमिनीच्या साहचर्यानें समुद्राचे रंग बदलतात ही गोष्ट यांच्या ध्यानांत आली व १९२१ च्या युरोपच्या प्रवासांत भूमध्य समुद्राचें निळें पाणी पाहून यांची ही कल्पना दृढ झाली. प्रकाशकिरण व स्वच्छ पाणी यांच्या संयोगानें पाण्याला निळा रंग प्राप्त होतो, प्रकाश इतर पारदर्शक पदार्थांशीं मिश्र होते वेळींहि आपला रंग बदलतो, प्रकाशाची ही क्रिया जगांतील सर्व पारदर्शक पदार्थांवर घडते असे सिद्धान्त क्रमाक्रमानें सिद्ध करीत शेवटीं हे आपल्या रामन् इफेक्टवर आले.

मर्क्युरी व्हेपरलॅम्पमध्यें मिळणाऱ्या प्रकाशाकडे आपण एखाद्या प्रिझममधून पाहिलें तर तो आपणांस निरनिराळ्या रंगांच्या पट्ट्यांत विभागलेला दिसतो; परंतु तोच प्रकाश ज्या वेळीं बर्फ किंवा पाणी यांमधून जातो त्या वेळीं प्रिझममधून आपणांस दिसणाऱ्या रंगीत पट्ट्यांत आपणांस आधीं न दिसलेल्या प्रकाशरेषा दिसतात. याच नव्या प्रकाशरेषांना रामन् लाइन्स किंवा बॅन्ड्स, त्या प्रकाशपट्ट्याला रामन् स्पेक्ट्रा व यांच्या या शोधाला 'रामन् इफेक्ट' अशीं नांवें पुढें देण्यांत आलीं.

प्रकाश कणमय आहे ही कल्पना प्रथम न्यूटनें मांडली व क्ष किरणाबाबतच्या कॉम्टन परिणामानें व रिचर्डसन व आइन्स्टाइन यांच्या प्रकाशविकीरण-परिणामांनीं त्यास प्रायोगिक पाठबळ दिलें. या सर्व प्रयोगांत विकीरण पावलेल्या विद्युत्किरणांची आवृत्ति संख्या मूळपेक्षां कमी असे.

यांनीं या संशोधकांच्याच पुढें जाऊन विकीरण पावलेल्या किरणांची लहरलांबी मूळ किरणांपेक्षां वाढते येवढेंच नव्हे तर ती कधींकधीं कमीहि होते हें दृश्य प्रकाशाच्या साहाय्यानें सिद्ध केलें. प्रकाशकण परमाणूंवर आदळल्यानंतर कित्येक वेळेला ते परमाणूंना शक्ती देतात तर कित्येक वेळेला ती काढून घेतात. शक्तीच्या या देवघेवीवरच विकीरण प्रकाशाची कमीजास्त लांबी अवलंबून असते. रामन्परिणामांत आढळणारे प्रकाशाचे हे दोन प्रकार क्ष किरणांत आढळत नाहींत.

परमाणू व अणु यांच्या रचनेवर यांच्या या संशोधनानें बराच नवा प्रकाश टाकला. निरनिराळ्या परमाणूंचे अणु तयार होत असतां त्यांचे दुवे कांहीं ठराविक पद्धतीनेंच जोडले जातात. ही दुवे जोडण्याची पद्धति, दुव्यांची बळकटी, त्यांचे एकमेकांवर घडून येणारे परिणाम यांसंबंधींचें एक अगदीं नवें विचारक्षेत्र यांच्या संशोधनानें उत्पन्न केलें. न्यूटनच्या डायनेमिक्सच्या बदली नवें क्वॅन्टम मेकॅनिक्स उपयोगिण्याची एक नवी रीत गणितज्ञांना यांच्या या संशोधनानें करून दिली.

यांच्या या संशोधनाचें जगांतील सर्व शास्त्रज्ञांत सहर्ष स्वागत झालें. जगांतील महत्त्वाच्या नियतकालिकांतून यांचें संशोधन व त्याचे दूरगामी परिणाम यांसंबंधीं लेख लिहिले गेले. सर्व महत्त्वाच्या प्रयोगशालांतून यांच्या प्रयोगाची सत्यता अजमावण्यासाठीं निरनिराळ्या पारदर्शक पदार्थांवर प्रयोग करण्यांत आले व त्यांचा

यथायोग्य प्रत्यय येतांच यांचेवर मानसन्मानांचा वर्षाव झाला. १९३० सालचें विज्ञानशाखेंतील नोबेल प्राइझ यांना स्वीडनचे राजेसाहेबांच्या हस्तें स्टॉकहोम (स्वीडन) येथें अर्पण करण्यांत आलें (१९३० डिसें. ६). याशिवाय याच संशोधनाबद्दल लंडनच्या रॉयल सोसायटीनें यांना 'ह्यूघ' पदक (१९३०), इटालियन सोसायटीनें मॅच्युकी पदक (१९२९) व न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीनें यांना अत्युच्च फ्रँकलीन पदक (१९४१) दिलें. इंडियन सायन्स काँग्रेसचें अध्यक्षस्थानहि यांना देण्यांत आलें.

कलकत्त्याची इंडियन असोसिएशन व नंतर बंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूटमध्यें काम करीत असतां यांनीं होतकरू शास्त्रज्ञांची एक नवीच पिढी तयार केली. कलकत्त्याच्या संस्थेचे हे सेक्रेटरी असतां यांनीं अडीच लाख रुपये जमवून त्या संस्थेस उत्कृष्ट रिसर्च लेबॉरटरी तयार करून दिली. या संस्थेंत होणारें संशोधन हे प्रथम बुलेटिन्स व नंतर प्रोसिडिंग्ज ऑफ इंडियन सोसायटींत प्रसिद्ध करीत. परंतु १९२६ नंतर त्या पत्राचें The Indian Journal of Physics असें नामांतर करण्यांत आलें. यांत यांच्या शिष्यांनीं लिहिलेल्या संशोधनपर लेखांची संख्या सहाशेपेक्षां जास्त असून बंगलोरला येईपर्यंत हे त्या पत्राचे संपादक होते.

१९३४ च्या सुरवातीला यांनीं बंगलोरला इंडियन ॲकेडमी ऑफ सायन्स ही संस्था सुरू केली. त्या संस्थेतर्फे दर महिन्याला 'प्रोसिडिंग्ज' प्रसिद्ध करण्यांत येतात. हिंदुस्थानांत चाललेलें प्रातिनिधिक संशोधन यांत सादर करण्यावर यांचा कटाक्ष असतो.

पाश्चात्य प्रयोगशाळांतून काम करण्याची संधि न मिळूनहि केवळ स्वतःची ज्ञानलालसा व संशोधनबुद्धि यांचे साहाय्यानें यांनीं मिळवलेलें यश अपूर्व आहे.

यांचे ग्रंथ—(1) Experimental Investigations on Vibrations, (2) Theory of Bowed Instruments, (3) Molecular Diffraction of Light, (4) Music Instruments, (5) Ray Studies इत्यादि.

यांच्या प्रमुख शिष्यांत अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे विज्ञानाधिकारी असणारे डॉ. के. एस्. कृष्णन् हे प्रमुख आहेत. International Conference of Photo Luminescence च्या वारसॉ येथील अधिवेशनाला ते खास आमंत्रणावरून हजर राहिले. लंडनच्या रॉयल सोसायटीचे ते फेलो असून इंडियन सायन्स काँग्रेसच्या मद्रासच्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान त्यांना देण्यांत आलें (१९३७).

रामानुजन् श्रीनिवासन्—(जन्म स. १८८७ डिसें.-१९२० एप्रिल २६) आंतरराष्ट्रीय कीर्तीचे हिंदी गणिती.

दक्षिण हिंदुस्थानांतील इरोड हें गांव यांचें जन्मस्थान. कुंभकोणच्या टाउन हायस्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर यांनीं तेथील गव्हर्नमेंट कॉलेजमध्यें स्कॉलरशिप मिळवली. परंतु यांच्या कच्चा इंग्रजीमुळें ती यांना नाकारण्यांत आली. त्यामुळें कॉलेजमध्यें न जातां यांना आपलें गणिताचें अध्ययन घरींच पुरें करावें लागलें.

अविभाज्य संख्येच्या बाबतींत उपलब्ध संख्येपेक्षां अधिक संख्या काढतां येत नाहीं असें विधान मि. जी. एच्. हार्डी यांनीं आपल्या एका निबंधांत केलें. यांनीं ताबडतोब आपण मूळ संख्येशीं जुळणाऱ्या अधिक संख्या शोधून काढल्याचें त्या संशोधनविषयक सिद्धान्तासह त्यांच्या निदर्शनास आणलें. यांच्या संशोधनांतील नाविन्य व पुढील संशोधनासाठीं पुरेसें अन्न देण्याच्या यांच्या विनंतीतील कारुण्य मि. हार्डी यांना इतकें जाणवलें कीं त्यांनीं अनेक प्रयत्न करून यांच्या अन्नाचीच नव्हे तर केम्ब्रिजच्या शिक्षणाचीहि व्यवस्था केली (१९१४).

आंकडेशास्त्राबद्दल यांना सुरवातीपासूनच प्रेम होतें. इंग्लंडमध्यें गेल्यानंतर यांनीं त्याच शास्त्राचा विशेष अभ्यास करून Highly Composite Numbers इत्यादि महत्त्वाचे निबंध लिहिले. याच यांच्या संशोधनाबद्दल यांना फेलो ऑफ दि रॉयल सोसायटी व फेलो ऑफ दि ट्रिनिटी कॉलेज निवडण्यांत आलें (१९१८). रॉयल सोसायटीचे फेलो होण्याचा मान मिळवणारे हे पहिले हिंदी संशोधक होत. पहिलें महायुद्ध संपतांच हे हिंदुस्थानांत परत आले, परंतु थोड्याच दिवसांत मद्रास येथें क्षयाच्या विकारानें मृत्यु पावले.

बीजगणिताचे सिद्धान्त, इन्फिनिटी सिरीज इत्यादि मधील यांचें अपूर्ण संशोधन अजूनहि कोणास पुरें करतां आलें नाहीं. याच कारणानें यूलर, जॅकोबीसारख्या गणितज्ञांशीं यांची तुलना करण्यांत येते.

यांचे महत्त्वाचे ग्रंथ—(1) Modular Equations and Approximations to Pi, (2) Highly

Composite Numbers, (3) On Certain Arithmetical Functions, (4) On Certain Trigonometrical Sums and their applications in the Theory of Numbers.

यांच्या महत्त्वाच्या निबंधांचा संग्रह यांच्या मृत्यूनंतर केम्ब्रिज युनिव्हर्सिटी प्रेसनें प्रसिद्ध केला (१९२८). त्या पुस्तकाच्या छपाईचा खर्च मद्रास युनिव्हर्सिटी, रॉयल सोसायटी (लंडन) व ट्रिनिटी कॉलेज (केम्ब्रिज) या तीन संस्थांनीं मिळून केला. दि. ब. रामचंद्रराव, पी. व्ही. शेषु अय्यर व मि. जी. एच. हार्डी यांनीं या ग्रंथांत यांचीं व्यक्तिचित्रें काढलीं आहेत.

राय, कृष्णदास—(जन्म स. १८९२) सुप्रसिद्ध हिंदी गद्यगीत लेखक, लघुकथा लेखक, समालोचक व चित्रादि वस्तूंचे संग्राहक.

हे काशीचे अग्रवाल. राय हें यांच्या घराण्याला अकबर बादशहाच्या वेळीं मिळालेलें सन्मानदर्शक उपपद आहे.

यांनीं चित्रकला व शिल्प यांच्या विविध वस्तूंचा लाख रुपये किंमतीचा संग्रह काशीच्या 'भारत कलाभवन' या संस्थेला अर्पण केला. हें भारत कलाभवन नागरी-प्रचारिणी सभेच्या ताब्यांत असून त्याचे हे क्युरेटर होते. १९२१ मध्यें यांनीं भारतीय कलापरिषदेची स्थापना केली. तिचे अध्यक्ष व उपाध्यक्ष अनुक्रमें रवीन्द्रनाथ टागोर व अवनीन्द्रनाथ टागोर होते. या संस्थेच्या द्वारा यांनीं काशींत भारतीय चित्रकला व संगीत यांसंबंधीं नवीन दृष्टि निर्माण केली.

यांनीं १९१६ सालीं रवीन्द्रनाथांच्या गीताञ्जलीच्या धर्तीवर साधना नांवाचें गद्य पुस्तक लिहिलें. हें हिंदींतील उत्कृष्ट पुस्तक समजलें जातें. यांच्या लघुकथा अत्यंत भावपूर्ण व नमुनेदार असतात. यांचा चित्रकलेचा व्यासंग उत्कृष्ट असून यांनीं भारतीय चित्रकलेवर पाटणा विश्वविद्यालयातर्फे एक व्याख्यानमाला गुंफली (१९४४). यांची भारतीय चित्रकला व मूर्तिकला यांवरील दोन्ही पुस्तकें हिन्दींतच काय पण देशी भाषांत अपूर्व आहेत. सुप्रसिद्ध कलामीमांसक एन्. सी. मेहेता, आय्. सी. एस्. हे यांचे शिष्य होत. रामप्रसादचीं चित्रें असलेलीं उमर खय्याम व मेघदूत यांनीं भारतकलाभवनतर्फे प्रकाशित केलीं. हे संगीत कलेचे मर्मज्ञ असून उत्कृष्ट हिन्दी कविता करतात. अशी यांची प्रतिभा बहुमुखी आहे.

यांचे ग्रंथ—१ साधना (गद्यगीत), २ छायापथ (गद्यगीत), ३ प्रवाल (गद्यगीत), ४ सुधांशु (लघुकथासंग्रह), ५ अनाख्या (लघुकथासंग्रह), ६ संलाप (संवादसंग्रह), ७ भारतीय चित्रकला (विवेचनात्मक), ८ भारतीय मूर्तिकला (विवेचनात्मक).

राय, देवीप्रसाद 'पूर्ण'—(जन्म स. १८६८-मृत्यु स. १९१५) हिन्दी भाषेंतील सुप्रसिद्ध लेखक व कवि.

यांचा जन्म व शिक्षण जबलपूर येथें झालें व एलएल्. बी. झाल्यानंतर तेथेंच उत्कृष्ट दिवाणी वकील म्हणून यांची ख्याति झाली. हे जुन्या पद्धतीचे व्रजभाषेंतील कवि समजले जातात. हे सनातन धर्माचे अभिमानी होते.

१९२५ सालीं गोरखपूर येथें भरलेल्या प्रान्तिक हिन्दी संमेलनाचे हे अध्यक्ष होते. याशिवाय अनेक संस्थांशीं यांचा संबंध असे.

यांचे ग्रंथ—कवितासंग्रह–१ पूर्ण-संग्रह, २ धाराधर-धावन (मेघदूताचा अनुवाद); नाटक–३ चंद्रकला-भानुकुमार; संपादक–४ रसिकवाटिका व धर्मकुसुमाकर मासिक (व्रजभाषेंतील कविता प्रसिद्ध करणारे).

राय, मानवेन्द्रनाथ—(जन्म स. १८९३) श्रेष्ठ साम्यवादी व स्वतंत्र विचाराचे क्रान्तिकारक पुरुष.

यांचें मूळ नांव नरेन्द्र भट्टाचार्य. पण तें बदलून यांनीं हें नांव स्वीकारलें. यांचें शिक्षण धड मॅट्रिक-पर्यंतहि झालेलें नाहीं. अगदीं कोवळ्या वयांत हे दहशत-वाद्यांच्या गटांत शिरले व पोलिसांचा ससेमिरा यांच्या मागें लागला. पोलिसांना चुकवीत हे जावा-सुमात्रा बेटांत हिंडत असतां एका अमेरिकन बोटींतील कोळ-शाच्या कोठारांत लपून हे अमेरिकेंत पोंचले. तेथें हे दहशतवाद सोडून मार्क्सवादी बनले आणि मेक्सिकोंतील क्रान्तींत सामील होऊन आघाडीवर चमकले. त्या वेळीं यांना आन्तरराष्ट्रीय कीर्ति प्राप्त झाली. तेव्हां साम्यवादी चळवळीच्या संघटनेसाठीं 'थर्ड इन्टरनॅशनल' या संस्थेची स्थापना करून लेनिननें त्या संस्थेंत यांना ओढलें. १९२७ सालीं चीनमध्यें क्रान्ति झाली तेव्हांहि यांना तिकडे पाठविण्यांत आलें होतें. पण सर्वत्र यांचा मतभेद होई. त्यामुळें यांना स्टलिननें हद्दपार केलें. जर्मनींत असतां यांच्यावर विषप्रयोगहि झाला असें म्हणतात. पुढें हे हिंदुस्थांतील कायदेभंगाचीं वर्णनें

वाचून क्रान्तीची वेळ आली असें समजून हिंदुस्थानांत मुंबईस आले. पण येथें यांना डॉ. महमूद असें नांव धारण करून वावरावें लागलें. शेवटीं खटला होऊन शिक्षा भोगल्यावर हे वीस वर्षांनंतर कायदेशीर रीतीनें उघड वावरण्यास मोकळे झाले (२० नवं. १९३६).

प्रथम राष्ट्रसभेचा पुरस्कार करणारे हे गृहस्थ पुढें राष्ट्रसभेचे विरोधक बनले आणि यांनीं आपला रॅडिकल डेमोक्रॅट नांवाचा स्वतंत्र पक्ष काढला. राष्ट्रसभेला विरोध करण्यानें त्याला सरकारचा आश्रय लाभला, पण लोकांची अनुकूलता अगदींच मिळवतां आली नाहीं.

यांची कीर्ति वक्ते म्हणून नसून संघटक म्हणून आहे. तथापि आजपर्यंतचें यांचें संघटनाचातुर्यहि अपेशी ठरलेलें आहे. यांच्या विचारांत नवीनपणा असतो ही गोष्ट मात्र खरी. यांचें लेखन विपुल आणि विविध विषयांवर आहे.

यांचे ग्रंथ—(1) India in Transition (1922), (2) The Revolution and Counter-revolution in China, (3) The Spiritualist West, (4) The Philosophy of Fascism, (5) The Autobiography of a Cat, (6) आइन्स्टाइनच्या सापेक्षतावादावरील शहासुलेमान यांचें मत खोडणारा एक निबंध.

राय, राजा राममोहन—(जन्म स. १७७२ मे २२–मृत्यु स. १८३३ सप्टें. २७) हिंदुस्थानांतील पहिले समाजसुधारक, ब्राह्मसमाजाचे संस्थापक, राजकारणी मुत्सद्दी व नवयुगप्रवर्तक.

यांचें जन्मस्थान बंगाल्यांतील हुगळी जिल्ह्यांतील राधानगर. जात कुलीन ब्राह्मण. मातेचें नांव तारिणीदेवी (फुलठाकुराणी). पित्याचें नांव रमाकान्त. यांचे आजे व पणजे बंगालच्या नबाबाच्या दरबारीं नोकरीस होते. त्या वेळीं यांच्या घराण्याला राय हा किताब मिळाला. यांचें घराणें वैष्णवाचें असून मातृकुल शाक्त होतें. यांनीं पाटणा येथें राहून अरबी व फारसी भाषांचा अभ्यास केला. तेव्हांच यांच्यावर सुफी पंथाचा परिणाम झाला आणि हे मूर्तिपूजेच्या विरुद्ध झाले. तेव्हां यांना घरांतून हाकून देण्यांत आलें. पुनः हे घरीं आले तेव्हां यांनीं आजारीपणांत मांसरस घेतला; तेव्हां यांना पुन्हा घरांतून बाहेर घालविण्यांत आलें व कोर्टमार्फत बेवारस ठरविण्यांत आलें.

यांना घरांतून घालवितांच मूर्तिपूजेसंबंधीं बौद्धमताचा अभ्यास करण्याकरितां हे हिमालयांतून पायीं तिबेटांत गेले (१७९७). पण तेथें यांना मूर्तिपूजेच्या विकृत स्वरूपाचा अनुभव आला. तेथून परत आल्यावर हे काशी येथें सहकुटुंब राहिले (१८०१). तेथें यांनीं संस्कृत विद्या आणि धर्मशास्त्र यांचा अभ्यास करण्यांत बरींच वर्षे घालविलीं. नंतर हे मुर्शिदाबादला आले व तेथें यांचा तुहफत-उल-मुवाहउद्दीन 'एकेश्वरीवाद्यास देणगी' हा फारशी ग्रंथ प्रसिद्ध झाला. या ग्रंथांत श्रद्धा हें मूळ असून इतर धार्मिक पसारा व्यर्थ असल्याचें प्रतिपादन आहे.

पुढें यांनीं कलेक्टरची शिरस्तेदारी पत्करून नोकरी करतांना इंग्रजी भाषेचें ज्ञानहि संपादन केलें. सुमारें दहा वर्षांनंतर नोकरी सोडून हे कलकत्त्यास येऊन राहिले (१८१४). तेथें यांनीं आत्मीय सभा स्थापून धर्मचर्चा सुरू केली (१८१५). याच वेळीं यांनीं इंग्रजी, बंगाली व हिन्दी भाषेंत ईशादि उपनिषदें व वेदान्तसूत्रें भाषान्तरित करून प्रसिद्ध केलीं.

यांनीं प्रथम सती जाण्याविरुद्ध चळवळ केली (१८१८) आणि ती सतीविरुद्ध कायदा झाल्यानें यशस्वी झाली. यापूर्वीच मूर्तिपूजेविरुद्ध यांनीं हल्ला चढविला होता. हिंदू लोकांप्रमाणें पिता, पुत्र व पवित्र आत्मा ही त्रयी मानणाऱ्या ख्रिस्ती लोकांनाहि यांनीं मूर्तिपूजक ठरवून त्यांचाहि निषेध केला. तेव्हां हिंदु व ख्रिस्ती अशा सर्वच लोकांशीं यांचीं कडाक्याचीं वाग्युद्धें झडलीं. तेव्हां यांनीं एकेश्वरी समाज स्थापन करून आपला नवा मार्ग काढला (१८२१). सरकार एक लक्ष रुपये खर्चून जुन्या विद्येचें एक कॉलेज काढणार होतें; पण भौतिक ज्ञानाचें महत्त्व प्रतिपादून यांनीं जुन्या शास्त्राच्या शिक्षणाला विरोध केला आणि यांनीं पुढाकार घेऊन आणि झीज सोसून हिंदु कॉलेज काढलें. त्यांत शिक्षक म्हणून यांना मिशनरी मिळवावे लागले व अभ्यासक्रम आखण्यापासून कामें करावीं लागलीं. त्याबरोबर जुन्या शास्त्रांचें शिक्षण देणारें वेदान्त कॉलेजहि काढण्यास हे विसरले नाहींत (१८१९). पण पुढें शिक्षण, सुधारणा, मूर्तिपूजाविरोध, एकेश्वरवाद या सर्वांचा संग्रह करून हिंदु संस्कृतीचा पुरस्कार करणारा ब्राह्मसमाज यांना काढावा लागला (१८३८ ऑगस्ट २५).

हे दिल्लीचा मोगल बादशाह दुसरा अकबर याच्या मसनदीच्या हक्काची दाद लावण्याकरितां वकील म्हणून

इंग्लंडला गेले (१८३१ एप्रिल). त्यांनींच यांना राजा हा किताब दिला. तेथें हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचा सुधारणाकायदा घडत होता. त्यांत इष्ट सुधारणा व्हाव्या म्हणून यांनीं प्रयत्न केला. एकेश्वरीपंथाचे संस्थापक म्हणून यांचा तिकडे गौरव झाला. तिकडे यांनीं आपल्याबरोबर ब्राह्मण व दुभत्या गाई नेल्या होत्या. ईस्ट इंडिया कंपनीचे डायरेक्टर व फ्रान्सचा राजा लुई फिलिप यांनीं मेजवानी दिली असतां तेथें फक्त भात व पाणी यांना यांनीं स्पर्श केला. शेवटीं युरोपियन स्त्री-पुरुषांच्या परिवारांत ब्रिस्टल येथें यांचें देहावसान झालें. देहावसान होतांना यांनीं ओंकाराचा उच्चार केला. यांच्या गळ्यांत शेवटीं जानवें आढळलें. तेथें रामरतन यांनीं यांचें हिंदु रिवाजाप्रमाणें और्ध्वदेहिक केलें. पुढें यांच्या आस्थींवर कानोंव्हेल येथें यांची हिंदु पद्धतीची भव्य समाधि बांधण्यांत आली.

यांना बंगाली गद्याचे आद्यप्रवर्तक मानण्यांत येतें. यांचीं बंगाली प्रार्थनागीतें ब्राह्मसमाजांत अत्यंत लोकप्रिय आहेत. यांचें 'संवादकौमुदी' हें बंगाली भाषेंतील पहिलें पत्र होय. याशिवाय मिरत-अलअखबार, ब्रॅह्मॅनिकल मॅगॅझीन, बंगाली हेरल्ड अशीं निरनिराळ्या भाषेंत हे नियतकालिकें चालवीत. यांना अनेक भाषा येत. यांनीं अनेक भाषांत ग्रंथरचना केली.

हिंदुस्थानच्या पारतंत्र्याबद्दल यांच्या मनांत कमालीचें असमाधान होतें. अत्यंत तळमळीनें समाजसुधारणा, शिक्षण व ज्ञानप्रसार हीं कामें यांनीं केलीं. इंग्लंडला जातांना केप ऑफ गुडहोपला पोंचल्यावर फ्रेंच बोटींतून प्रवास करण्याचा यांनीं आग्रह धरला. बोटीवर चढतांच बोटीवरील स्वातंत्र्याच्या ध्वजाचा यांनीं मनापासून जयजयकार केला. तेथें यांनीं मोंगल बादशहाच्या वकिलीबरोबर हिंदुस्थानची वकिलीहि केली. सारावसूली, आर्थिक स्थिति यांवर तीन निबंध सादर केले. १८३२ सालीं पार्लमेंटपुढें चार्टर ॲक्टसंबंधीं चर्चा चालू असतां हें बिल पास झालें तर आपण ब्रिटिश साम्राज्याचा त्याग करून अमेरिकेचा आश्रय करूं अशी प्रतिज्ञा यांनीं केली.

यांनीं सरकार, परंपरा व लोक यांचा विरोध पत्करून मनांत येणारे विचार निर्भयपणें व तडफेनें प्रतिपादण्यास सुरुवात केली. त्याकरितां लेखन, भाषण, वादविवाद, वर्तमानपत्रें, ग्रंथ, संस्था वगैरे सुरू करून प्रत्यक्ष कार्य आरंभिलें. आपल्या प्रभावी व्यक्तित्वानें व निस्वार्थी कार्यपद्धतीनें सर्वांना भारून टाकलें. महर्षि देवेन्द्रनाथ टागोर व केशवचंद्र सेन यांच्यासारखे थोर अनुयायी मिळवून आपल्या मार्गेहि अर्धशतकभर आपलें कार्य गाजत ठेवणाऱ्या या माणसाचें कर्तृत्व असामान्य होतें यांत बिलकूल शंका नाहीं.

यांचे ग्रंथ—(1) Precepts of Jesus (1820), (2) The Guide to Peace and Happiness, (3) Final Appeal, (4) The English Works (तीन भाग, संपादक–जे. सी. घोष १९०१).

पत्रें—The Brahamanical Magazine वगैरे.

राव, ना. डॉ. राघवेन्द्र—(जन्म स. १८९०–मृत्यु स. १९४२ जून १५) मध्यप्रान्तांतील सुप्रसिद्ध राजकारणी मुत्सद्दी, स्वराज्यपक्षाचे पुढारी, मंत्री, हंगामी गव्हर्नर, भारतमंत्र्याचे सल्लागार व हिंदुस्थान सरकारचे शिक्षणमंत्री.

इंदूर व जयपूर राज्यांची दिवाणगिरी नाकारून यांनीं इंडिया ऑफिसांतील कमी पगाराची नोकरी स्वीकारली. भारतमंत्र्याचे सल्लागार म्हणून काम करीत असतां लंडनच्या सतत बाँबहल्ल्यानें यांची प्रकृति बिघडली व क्रिप्स योजनेच्या वेळीं घेतलेल्या परिश्रमानें यांची प्रकृति अधिक ढासळली.

राशिवडेकर, विद्यावाचस्पति अप्पाशास्त्री—(जन्म स.१८६२ सुमार–मृत्यु स. १९१३ ऑक्टो. २५) सुप्रसिद्ध संस्कृत पंडित, संस्कृत भाषेंतील लेखक व वक्ते.

यांचें शिक्षण जुन्या पद्धतीनें झालें होतें. यांचें संस्कृत भाषेवरील प्रभुत्व वाखाणण्यासारखें असे. हे प्रचलित विषयांवरील आपले विचार मोठ्या ललितमधुर भाषेंत सहज व्यक्त करीत. त्यामुळें कलकत्त्याच्या संस्कृतचंद्रिका या संस्कृत भाषेंत निघणाऱ्या मासिकाचें मुख्य संपादकत्व यांच्याकडे आलें. तें मासिक यांनीं पुष्कळ वर्षे उत्कृष्ट चालविलें. यांनीं सुनृतवादिनी नांवाचें संस्कृत भाषेंतील साप्ताहिकहि पुष्कळ वर्षे चालविलें व लोकप्रिय केलें. याशिवाय संस्कृत भाषेंत कादंबऱ्या, लघुकथा, काव्यें व वेणीसंहार, विक्रमोर्वशीय वगैरे अनेक नाटकांवर संस्कृत टीका लिहिल्या. शेवटीं पुण्याच्या भावे हायस्कूलमध्यें हे संस्कृतचे शिक्षक होते. केवळ संस्कृत भाषेवरील असाधारण प्रभुत्वामुळें यांनीं अखिल भारतीय कीर्ति संपादन केली होती.

राहुल, सांकृत्यायन—(जन्म स. १८९३) जगप्रसिद्ध महापंडित, पुरातत्त्वसंशोधक, अभ्यासक व कम्युनिस्ट.

जन्मस्थान पन्दाहा (संयुक्तप्रान्त, जि. अझमगड). मूळ नांव केदारनाथ पांडे. बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यावर यांनीं हें सध्याचें नांव धारण केलें. प्राथमिक शिक्षण संपवून हे कलकत्त्यास गेले. पुढें यांनीं कलकत्त्यास एका दुकानांत गुमास्ता म्हणून काम केलें. तेथें अनेक वेदान्त्यांशीं यांची भेट होऊन हे पुढें कायमचे घराबाहेर पडले. बनारस येथें राहून यांनीं काव्य–व्याकरणाचा परिचय करून घेतला व हे १९१२ मध्यें बिहारमध्यें छापडा जिल्ह्यांतील एका मठांत वैष्णव साधु बनले. तेथून पुढें १९१५ सालीं आर्य्यसमाजी झाले. त्याच्या प्रचारांत हे आरबी भाषा शिकले. यांनीं एक प्रचारकांची शाळा उघडली. पुढें हे राजकारणाकडे ओढले गेले आणि हे बौद्ध धर्माकडे खेचले जाऊं लागले. दक्षिणेंतून प्रवास करून हे खांडवा येथें आले. तेथें असहकारितेंतील राजकीय भाषणावरून यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. तेव्हां बक्सारचे तुरुंगांत यांनीं आपला 'बाइसमी सदी' हा ग्रंथ पुरा केला. त्यांत यांनीं १९२४ पासून दोनशें वर्षे झोपलेल्या नालंद्याच्या अध्यापक विश्वबंधूची कथा लिहिली आहे. १९२३ मध्यें चौरीचुराप्रकरणांत जहाल भाषणाबद्दल यांना दोन वर्षांची शिक्षा झाली. तेथें यांनीं शैतानकी आख, विस्मृतीके गर्भमें, जादूका मुल्ख, सोनेकी ढाल वगैरे अनुवादित कादंबऱ्या लिहिल्या. हे पुढें राजकारणांत फेरवादी झाले आणि लंकेंतील विद्यालंकार कॉलेजमध्यें संस्कृतचे प्राध्यापक म्हणून गेले. तेथें पाली भाषेंतील संस्कृत ग्रंथांचें अध्ययन करून यांनीं त्रिपिटकाचार्य ही पदवी मिळविली. नंतर बौद्धांचे प्राचीन ग्रंथ शोधण्याकरितां हे तिबेटांत गेले (१९२९). तेथें जाण्याकरितां यांना नेपाळांतील शिवरात्रीच्या यात्रेचा आश्रय घेऊन वेषान्तर करून तिबेटांत पोंचावें लागलें. तेथें सव्वा वर्ष राहून बावीस खेचरांवर हस्तलिखित ग्रंथ घेऊन हे लंकेस निघाले. वाटेंत पाटणा म्युझियममध्यें राहुल सेक्शन उघडून त्यांत यांनीं तिकडे मिळविलेलीं ऐतिहासिक चित्रें ठेवलीं. पुस्तकें बिहार ओरिसा रिसर्च सोसायटीला दिलीं. लंकेंत पोंचल्यावर यांनीं बौद्ध धर्माची दीक्षा घेतली व हे हिंदुस्थानांत आले (१९३०).

तिबेटांतून आणलेल्या हस्तलिखित ग्रंथांचा अभ्यास करून यांनीं वसुबंधूंचा अभिधर्मकोश स्वकृत राहुलभाष्यासह व बुद्धचर्या नांवाचें गौतमबुद्धाचें संशोधित चरित्र प्रसिद्ध केलें. १९३१ च्या उत्तरार्धांत लंकेच्या बौद्ध मिशनतर्फे हे युरोपला गेले, पण यांना रशियाला पोंचतां आलें नाहीं. दुसऱ्या खेपेस हे तिबेटांत गेले आणि यांनीं तेथून महत्त्वाचे ग्रंथ आणून प्रसिद्ध केले; त्याबद्दल युरोपांत यांची सर्वत्र वाहवा झाली. १९३५ मध्यें यांनीं जपानमार्गें मास्कोला जाऊन हे इराणमार्गें परत आले. १९३७ सालीं सोविएट रशियाकडून लेनिनग्राडच्या प्राच्यविद्यामंदिरांत संशोधन करण्याकरितां यांना निमंत्रण आलें. तिकडे गेले असतां लेनिनग्राड युनिव्हर्सिटीतील प्रोफेसर एल्येना नार्बेतोवूना या रशियन स्त्रीशीं यांनीं विवाह केला. यांना इगोर राहुलविच नांवाचा मुलगा आहे. पण चार-पांच महिन्यांतच तिबेटांतील ग्रंथांचे फोटो घेण्याकरितां यांना राष्ट्रसभा-मंत्रिमंडळानें पाठविलें. या खेपेस राजमार्गानें जाऊन यांनीं धर्मकीर्ति, पद्माकरगुप्त, ज्ञानश्री, नागार्जुन, आसंग, वसुबंधु, रत्नाकरशान्ति वगैरेंच्या सत्तर ग्रंथांतील दीड लक्ष श्लोक, कित्येक हिन्दी काव्यें व चित्रें यांनीं आणलीं.

१९३८ सालीं हे कम्युनिस्ट पक्षाचे सभासद झाले. शेतकऱ्यांची संघटना हें यांनीं आपलें ध्येय ठरविलें. शेतकऱ्यांच्या चळवळींत यांना दोनदां शिक्षा झाल्या असतां यांनीं पंधरा-पंधरा दिवसांचे यशस्वी उपास केले. १९४० सालीं यांना ओरिसांतील किसानसभेचे अध्यक्ष निवडण्यांत आलें. पण त्यापूर्वीच यांना भा. सं. कायद्याखालीं पकडण्यांत आलें.

यांचें लेखन सतत चालू असतें. यांचीं साठांपेक्षां अधिक पुस्तकें प्रसिद्ध आहेत. त्यांत प्रवासवर्णनें ८, कादंबऱ्या ८, नाटकें भोजपुरीभाषेंत ८, सिलोनी भाषा, तिबेटी भाषेचें व्याकरण, मेरी जीवनयात्रा (आत्मचरित्र), नये भारतके नये नेते, व्होल्गा ते गंगा इत्यादि प्रमुख होत. यांचें भाषाज्ञान अद्वितीय असून यांना सुमारें तीस भाषा येतात.

रे, सर प्रफुल्लचन्द्र—(जन्म स. १८६१ ऑगस्ट २–मृत्यु स. १९४४ जून २६) बंगालमधील महान् संशोधक, रसायनशास्त्रज्ञ व देशभक्त.

यांचा जन्म बंगाल्यांतील राख्ली नांवाच्या खेड्यांत झाला व तेथेंच वडील शिक्षक असल्यानें प्राथमिक शिक्षण झालें. जात ब्राह्मण. यांचे वडील हरिश्चंद्र यांनीं १८७० सालीं मुलाच्या शिक्षणासाठीं कलकत्त्यास प्रयाण केलें. तेथें यांनीं वास्तव व रसायनशास्त्रांचें शिक्षण पूर्ण करून

गिलख्रिस्त शिष्यवृत्ति मिळवून हे इंग्लंडला गेले (१८८२). तेथें हे रसायन या आवडत्या विषयाचे डी. एस्सी. झाले (१८८८). नंतर एडिंबरो केमिकल सोसायटीचे यांना उपाध्यक्ष निवडण्यांत आलें. इंग्लंडमध्यें असतां 'बंडापूर्वीचा आणि नंतरचा हिंदुस्थान' या विषयावरील यांचा चढाओढींत मान्य झालेला निबंध जप्त करण्यांत आला व इंडियन एज्युकेशनल सर्व्हिसला यांना अयोग्य ठरविण्यांत आलें.

परत आल्यावर हे कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांत रसायनाचे प्राध्यापक म्हणून काम करूं लागले (१८८९). तरुण विद्यार्थ्यांत संशोधनबुद्धि निर्माण करण्याचें ध्येय यांनीं ठेवलें. १८९६ मध्यें यांनीं मरक्युरस नायट्राइट या काम्पाउंडचा शोध लावला व तो स्थिर राहतो असें सिद्ध केलें. नंतर निरनिराळे नायट्राइट्स् शोधून काढणें व स्थिर करणें यांकडे यांचें लक्ष वेधलें. १९०४ मध्यें बंगाल सरकारनें यांना पाश्चात्य देशांतील प्रयोगशाळा पाहण्यास पाठविलें. या वेळीं साम्राज्यांतील विश्वविद्यालयाच्या परिषदेस कलकत्ता विश्वविद्यालयाचे प्रतिनिधि म्हणून हे उपस्थित होते. १९१६ सालीं हे सेवानिवृत्त झाले आणि कलकत्ता विश्वविद्यालयाच्या 'कॉलेज ऑफ सायन्स' चे मुख्याध्यापक झाले (१९२१-१९३६). तेथील आपला पगार प्रयोगशाळा व संशोधन या कार्यांत यांनीं खर्च केला.

इंडियन स्कूल ऑफ केमिस्ट्री व इंडियन केमिकल सोसायटी या महत्त्वाच्या संस्था यांनीं काढल्या आणि हिस्टरी ऑफ हिंदु केमिस्ट्री या नांवाचा महत्त्वाचा ग्रंथ दोन भागांत लिहिला. गतकालांत हिंदुस्थान देशानें रसायनशास्त्रांत काय काय कामगिरी केली याची साधार व सविस्तर माहिती या ग्रंथांत दिली आहे. अनेक थोर शास्त्रज्ञांनीं या ग्रंथाची मुक्तकंठानें प्रशंसा केली आहे. या ग्रंथामुळें यांना सर ही पदवी मिळाली व अनेक परदेशी विश्वविद्यालयांनीं यांचा गौरव केला.

हिंदुस्थानांतील अर्वाचीन रसायनशास्त्राच्या जनकत्वाचा मान यांनाच दिला पाहिजे. यांच्यापूर्वी कलकत्ता प्रेसिडेन्सी कॉलेजांतील सर अलेक्झांडर पेडलर व अलाहाबाद मूर कॉलेजांतील प्रा. इ. जी. हिल वगैरेनीं संशोधनाचा उपक्रम केला; पण तीं माणसें परकी होतीं. शिवाय यांनीं हिन्दी संशोधकांची एक परंपरा निर्माण केली. हिंदुस्थानांतील आज कोणताहि नांवाजलेला रसायनशास्त्रज्ञ घेतल्यास त्याची परंपरा यांच्याकडे जाऊन पोंचते.

रसायनाच्या अनर्व, अर्व आणि वास्तव या तीन शाखांपैकीं अनर्व रसायनांत संशोधन सुरू करण्याचा मान यांचाच आहे. या संशोधनास स. १८९५ मध्यें मरक्युरस नायट्राइटनें सुरुवात झाली. मरक्युरिक नायट्राइट तयार करतांना एक पिवळा खाळ पदार्थहि तयार होई. हा पदार्थ काय आहे याच्या शोधास हे लागले व शेवटीं अजून पावेतों अज्ञात असलेला मरक्युरस नायट्राइट तो हाच होय असें सिद्ध झालें. या शोधानें शास्त्रीय जगांत मोठी खळबळ उडवून दिली व हिंदी शास्त्रज्ञाचें नांव याच वेळीं अगदीं प्रथम सर्वतोमुखी झालें. बर्थेलॉट, व्हिक्टरमेयर, व्होलार्ड, रास्को इत्यादि पाश्चात्य शास्त्रज्ञांनीं यांची मुक्तकंठानें प्रशंसा केली. या संशोधनानंतर त्यांनीं इतर नाइट्राइट्सवर कार्य सुरू केलें. स. १९१८ पर्यंत या विषयावर यांचे ऐंशीच्यावर लेख प्रसिद्ध झाले आहेत. यावरून हें कार्य किती चिकाटीनें व उत्साहानें चाललें होतें याचा अदमास करतां येतो. या कालांत अतुलचंद्र घोष, एस. सी. बानर्जी, जितेंद्रनाथ रक्षित, रसिकलाल दत्त इत्यादि विद्यार्थ्यांनीं यांच्याबरोबर संशोधन करून नायट्राइट्स्, हायपो नायट्राइट्स्, अमिनो नायट्राइट्स् वगैरे अनेक नत्रसंयुग तयार केले. यांच्याशिवाय हिंदुस्थानांत अनर्व रसायनांत प्रत्यक्ष असें फारसें कार्य झालेलें नाहीं.

बेंगाल केमिकल अॅन्ड फार्मास्युटिकल वर्क्स लि. हा कारखाना यांनींच काढला. पगारांतून सांठविलेल्या दोनचारशें रुपयांवर यांनीं सुरुवात केली व १९०२ सालीं दोन लक्ष भांडवलाची ही कंपनी भागीदारीच्या तत्त्वावर नोंदण्यांत आली. वाढत वाढत या कारखान्याची यंत्रसामग्री आतां आशिया खंडांत पहिल्या प्रतीची झाली आहे. यांनीं आपल्या शेअरच्या नफ्यांतून हायस्कूल व सार्वजनिक कार्य चालविण्याकरितां ट्रस्ट केला होता. आपल्या पगारांतून साठविलेल्या अकरा लाख रुपयांची देणगी यांनीं कलकत्ता युनिव्हर्सिटीला दिली.

यांचें राजकारणाकडे व देशाकडे भरपूर लक्ष असे. हे शुद्ध खादी वापरत व खादीचा प्रचारहि यांनीं केला. स्वराज्याशिवाय देशाचें अत्यंत नुकसान होत असल्याचें यांनीं अनेक वेळां घोषित केलें. १९२२ च्या उत्तर बंगालमधील जलप्रलयांत सरकारला करितां आलें नाहीं तें यांनीं करून दाखविलें. त्या वेळीं यांनीं एका हाकेसरशीं सहा लाख रुपये गोळा केले. यांची शिष्यशाखा म्हणजे हुकमी सेना असल्याचें तेव्हां प्रत्ययास आलें. यांचा सत्तरावा वाढदिवस जगांतील शास्त्रज्ञांनीं लेख

लिहून साजरा केला. यांनीं आत्मचरित्र लिहिलें आहे (१९३२).

यांचे ग्रंथ—(1) History of Hindu Chemistry (दोन खंड), (2) Life and Times of C. R. Das (1927), (3) Life and Experiences of a Bengali Chemist (आत्मचरित्र १९३२).

यांचीं प्रमुख संशोधनें—(1) Mercurous Nitrite and its various Derivatives, (2) Nitrites of Alkylammonium Series, (3) Nitrites of the Mercurialkyl and Mercurialkyl-aryl-ammonium Series, (4) Determination of Conductivity of Nitrites, (5) Dimercury ammonium halides, (6) Preparation of Bi-Sulphonium Compounds इत्यादि.

रेड्डी, सर रामलिंग—(जन्म स. १८८०) आंध्र युनिव्हर्सिटीचे उपकुलगुरु व सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ.

यांच्या वडिलांचें नांव सी. रामस्वामी रेड्डी. केम्ब्रिजच्या सेंट जॉर्ज कॉलेजमध्यें आपलें शिक्षण संपवून हे परत आले. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया स्कॉलर म्हणून हे इंग्लंडला गेले व इतिहासांत यांनीं विशेष प्रावीण्य मिळविलें.

सुरुवातीला कांहीं दिवस बडोदा कॉलेजचे व्हाइस-प्रिन्सिपल म्हणून काम केल्यानंतर म्हैसूरच्या महाराजा कॉलेजाचे प्रिन्सिपल म्हणून यांची नेमणूक झाली (१९१६). यानंतर कांहीं दिवस हे म्हैसूर संस्थानांतील प्रमुख शिक्षण तपासनीस होते. आंध्र युनिव्हर्सिटीची स्थापना झाल्यानंतर यांना तिचे उपकुलगुरु निवडण्यांत आलें (१९२६-३०, १९३६).

दक्षिण हिंदुस्थानांतील प्रमुख शिक्षणतज्ज्ञ म्हणून यांची प्रसिद्धि असून ऑल इंडिया बोर्ड ऑफ एज्युकेशन यासारख्या शिक्षण संस्थांचे हे सभासद होते (१९२१-४०). युनायटेड नॅशनॅलिस्ट पक्षाचे हे कांहीं दिवस उपप्रमुख व संयोजक होते (१९२४).

यांचे ग्रंथ—(1) Congress in Office and Constitutional issues that have arisen.

तेलगु—(1) Enguiry into the Principles of Telgu, (2) Political Economy (मद्रास युनिव्हर्सिटीनें पारितोषिक दिलेला युनिव्हर्सिटी सुधारणांवरील व्याख्यानांचा संग्रह).

ल

लजपतराय, लाला—(जन्म स. १८६५–मृत्यु स. १९२८ नवं. १७) पंजाबांतील सुप्रसिद्ध राजकारणी मुत्सद्दी, वर्तमानपत्रकार, लेखक, वक्ते व सार्वजनिक कार्यकर्ते.

पंजाबांतील लुधियाना जिल्ह्यांतील जगराण हें गांव यांचें जन्मस्थान. उर्दूतील सुप्रसिद्ध लेखक मुनशी राधाकृष्णलाल हे यांचे पिताजी. १८८५ साला यांनीं कायद्याची परीक्षा दिली व वयाला वीस वर्षें पुरीं होण्याच्या आंतच हे वकिली करूं लागले. १८७७ सालीं स्वामी दयानंद पंजाबांत गेले. तेथें त्यांना जे निष्ठावन्त अनुयायी भेटले त्यांत यांची गणना होते. १८८६ जून १ ला लाहोर येथें दयानंद अँग्लो-वैदिक कॉलेजची स्थापना झाली. त्या कॉलेजचे हे सेक्रेटरी झाले व पंजाबभर हिंडून त्या कॉलेजकरितां यांनीं पांच लाख रुपये जमा केले. तेथें मधूनमधून हे इतिहासहि शिकवीत.

आर्यसमाजानें चालविलेल्या स्त्रिया, अनाथ, विधवा, भूकंप, दुष्काळनिवारण वगैरे लोकसेवेच्या कामांत हे पुढाकार घेत. व्यापक-दृष्टिकोण हा यांचा विशेष होय. धर्म व समाज यांच्या कार्याप्रमाणें हे राजकारणांत पुढारीपणा स्वीकारीत. १८८८ पासून हे राष्ट्रसभेंत हजर राहत. तेव्हांपासून हे राष्ट्रसभेंत भाषणें करीत. असामान्य वक्ते व राष्ट्रीय मताचे पुरस्कर्ते म्हणून यांची लवकरच हिंदुस्थानभर ख्याति झाली. १९०५ सालीं राष्ट्रसभेतर्फे यांना प्रचाराकरितां इंग्लंडला धाडण्यांत आलें. यांच्या प्रवासाकरितां पंजाब प्रान्तिक कमेटीनें मंजूर केलेले तीन हजार रुपये यांनीं आर्यसमाजाला देऊन टाकिले.

परत आल्यानंतर शेतकऱ्यांना चिथावणी देतात म्हणून यांना अजितसिंहांसह मंडाले येथें हद्दपार करण्यांत आलें (१९०७). सहा महिन्यांनंतर यांना सोडून देण्यांत आलें. सुरत काँग्रेसचें अध्यक्षपद यांनीं नाकारिलें. पुढें गुप्त पोलिसांच्या त्रासामुळें पहिल्या महायुद्धाचे वेळीं हे अमेरिकेस जाऊन राहिले. तेथें यंग इंडिया पत्र व लीग काढली व यांनीं सतत परिणामकारक काम केलें.

मातृभूमीच्या आठ वर्षांच्या वियोगानंतर हे हिंदुस्थानांत परत आले. तेव्हां असहकारितेचें युग सुरू झालें होतें. कलकत्ता राष्ट्रसभेचे यांना अध्यक्ष निवडण्यांत आलें (१९२० सप्टें.). असहकारितेचा ठराव यांच्या अध्यक्षतेखालीं पास झाला, पण यांनीं त्याच्या विरुद्ध मत दिलें. खुद्द पंजाबांत यांच्या विरुद्ध असहकारी तरुणांचा नवा गट उत्पन्न झाला. यांना मनापासून ही चळवळ पटत नव्हती तरी हे सर्व राष्ट्राबरोबर त्या चळवळींत सामील झाले व तुरुंगांत गेले. तुरुंगांतून बाहेर आले तों स्वराज्यपक्ष उदयास आला आणि हे त्यातर्फे मध्यवर्ति कायदेमंडळांत निवडून गेले आणि तेथें यांनीं उत्कृष्ट कामगिरी केली. सायमनकमिशनवर बहिष्काराचा ठराव विशेषतः यांच्यामुळेंच पास झाला.

पीपल हें इंग्रजी पत्र, पीपल असोसिएशन, टिळक स्कूल ऑफ पॉलिटिक्स या संस्था हे चालवीत. यांनीं या संस्थांना आपलें सर्वस्व देऊन टाकलें.

हिंदु धर्माचे हे कट्टे पुरस्कर्ते होते. हिंदु लोक बलवान् व्हावेत म्हणून यांनीं अविश्रान्त परिश्रम केले. हिन्दी, उर्दू व इंग्रजी या भाषांत यांचीं भाषणें सारखींच परिणामकारक होत. मॅझिनी, गॅरिबॉल्डी, श्रीकृष्ण, शिवाजी इत्यादींचीं स्फूर्तिदायक चरित्रें व आत्मचरित्र यांनीं लिहिलें आहे.

३० ऑक्टो. १९२८ रोजीं सायमन कमिशन लाहोरला गेलें. तेथें यांच्या नेतृत्वाखालीं हजारों तरुण काळीं निशाणें दाखवीत असतां पोलिसांकडून ठोसे व दंडुके यांचा मार यांना सहन करावा लागला. त्यामुळें यांच्या छातीस तीन इंच लांबरुंद जखम झाली व त्यामुळें हे मृत्यु पावले.

ब्रिटिश सरकारनें यांचा खून केला अशा समजुतीनें भगतसिंग, राजगुरु वगैरे क्रान्तिकारक क्षुब्ध झाले आणि त्यांनीं यांच्या मृत्यूपासून एक महिन्याच्या आंत यांच्या मृत्यूस कारण झालेल्या पोलिस अधिकाऱ्याचा खून करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांतून भगतसिंग प्रकरण उत्पन्न झालें.

यांचे ग्रंथ—(1) Unhappy India, (2) The Voice of Truth, (3) The Message of the East, (4) The Young India, (5) The Nationalist Movement, इत्यादि.

लठ्ठे, दि. ब. अण्णा बाबाजी—(जन्म स. १८७८) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध राजकारणी मुत्सद्दी व सार्वजनिक कार्यकर्ते.

यांचें जन्मस्थान कुरुंदवाड. हे धर्मानें जैन असून सांगली, कोल्हापूर व पुणें येथें शिक्षण घेऊन एम्. ए. झाले (१९०३).

यांनीं दक्षिण महाराष्ट्र जैन सभेची स्थापना करून जैनांची संघटना करण्यास सुरुवात केली. या संस्थेचे व कर्नाटक ब्राह्मणेतर लीगचे हे अध्यक्ष होते. नंतर छत्रपति शाहू महाराजांच्या कृपेनें कोल्हापुरीं राजाराम कॉलेजांत इंग्रजीचे प्राध्यापक, एज्युकेशनल इन्स्पेक्टर वगैरे कामें यांच्याकडे आलीं. त्या वेळीं ब्राह्मणेतर चळवळीला पोषक अशी लेखनभाषणद्वारा यांनीं बरीच कामगिरी केली. पण लवकरच यांना कोल्हापूर सोडावें लागलें. तेव्हां यांनीं एल्एल्. बी. ची परीक्षा दिली आणि हे बेळगांवीं वकिली करूं लागले. तेथें यांनीं रयतसंस्था सुरू करून 'डेक्कन रयत' हें इंग्रजी साप्ताहिक सुरू केलें. १९२० सालीं राष्ट्रसभेचा बहिष्कार असतां हे असेंब्लींत निवडून आले. मॉंटफोर्ड सुधारणांनंतर अस्तित्वांत आलेल्या मुंबई कौन्सिलांत राष्ट्रसभा व मराठा यांच्या विरोधामुळें हे निवडून येऊं शकले नाहींत (१९२६). हे कोल्हापूरचे दिवाण नेमले होते (१९२६-३०). त्या वेळीं यांचें क्षेत्र संस्थानापुरतें मर्यादित होतें तरी यांच्या कर्तृत्वाचा परिचय तेथें मिळाला. यांच्या वाङ्मयसेवेमुळें बेळगांवच्या महाराष्ट्रसाहित्य-संमेलनाचे स्वागताध्यक्ष यांना निवडण्यांत आलें (१९२९). राष्ट्रसभेच्यातर्फे हे निवडून येऊन काँग्रेस मंत्रिमंडळांत अर्थमंत्र्याच्या जागीं होते. पण १९४२ च्या चळवळीचे वेळीं काँग्रेसच्या सर्वच कार्यक्रमावर विश्वास नाहीं असें म्हणून हे तुरुंगाबाहेर आल्यामुळें १९४५ च्या निवडणुकींत राष्ट्रसभेतर्फे यांना स्थान देण्यांत आलें तरी मंत्रिमंडळांत घेतलें नाहीं.

यांचें वाङ्मय—मराठी–१ हिंदुस्थानांतील ब्रिटिश-

साम्राज्याचा उदय, २ शाहू महाराजांचें चरित्र व आठवणी.

इंग्रजी–१ इन्ट्रोडक्शन टु जैनिझम, २ प्रॉब्लेम ऑफ इंडिया.

लक्ष्मय्या परशुराम जार्जी—(जन्म स. १८६७) गुलबर्ग्याचे प्रमुख व्यापारी व प्रसिद्ध नागरिक.

जन्मस्थान हुमणाबाद. यांचें लिहिण्यावाचण्याचें शिक्षण गुलबर्गा येथें झालें. बाराव्या वर्षापासून यांनीं आपलें लक्ष व्यापारांत घातलें. प्रथम यांच्याकडे रोकड वही लिहिण्याचें काम आलें. सकाळीं सहा वाजतां दुकान उघडून झाडलोट करून रात्रीं आठ वाजेपर्यंत हे वडिलांच्याबरोबर काम करीत. काष्ठौषधीच्या दुकानांत पुड्या बांधण्याचें काम यांना करावें लागे. वडील यांच्या बत्तिसाव्या वर्षी वारले. तेव्हां यांनीं आपल्या नांवानें दुकान सुरू केलें. आतां त्याचीं निरनिराळ्या मालाचीं सात दुकानें झालीं आहेत. शिवाय शहाबाद, तांडूर, रायचूर, यादगीर, लातूर वगैरे ठिकाणीं यांचीं दुकानें आहेत. १९४५ सालीं ५०० मुनीम यांच्याकडे काम करीत असत. मुंबई, मद्रास, बंगाल, पंजाब वगैरे प्रान्तांशीं यांचा आवक-जावक व्यवहार फार मोठ्या प्रमाणांत चालतो.

आंध्र वैश्य समाजाच्या उत्कर्षाकरितां यांनीं पुष्कळ प्रयत्न केले. आर्य वैश्य कर्नाटक कान्फरन्सचे हे स्वागताध्यक्ष होते. मच्छलीपट्टण येथें भरलेल्या वैश्य कान्फरन्समध्यें यांना 'वैश्यकुलशेखर' अशी पदवी देण्यांत आली. हे वैदिक धर्माचे अत्यंत अभिमानी असून सर्व वैश्यांनीं वैदिक आचार पाळावेत असा यांचा प्रयत्न असतो. त्याकरितां यांनीं वैश्य वेदोक्तविचार व क्षत्रिय वैश्य सद्भावमंडन इत्यादि पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. यांनीं आजपर्यंत आपल्या जातीच्या संस्था, मंदिरें, तीर्थयात्रा वगैरेकरितां पुष्कळ दानधर्म केला असून यांची परंपरा यांचे चि. शिवय्या, रामचंद्रय्या व वासुदेवराव पुढें चालवीत आहेत.

लक्ष्मी, कॅ.—(जन्म स. १९१४) अझाद हिंद सेनेच्या 'झांशीची राणी' या स्त्रीपथकाच्या प्रमुख.

यांचें समग्र नांव लक्ष्मी एस्. स्वामीनाथन्. मध्यवर्ति असेंब्लींत मद्रास प्रांतातर्फे निवडून गेलेल्या अम्मु स्वामीनाथन् यांच्या या कन्या. यांचा पहिला विवाह टाटा एअर सर्व्हिसमधील वैमानिक बी. के. नजगुंदराव यांच्याशीं झाला (१९३६). परंतु थोड्याच दिवसांत यांनीं त्यांच्याशीं घटस्फोट घेतला व या मद्रास युनिव्हर्सिटीच्या एम्. बी. बी. एस्. झाल्या.

यानंतर यांनीं ब्रि. आर्मीतील इब्राहिम या मुसलमान तरुणाशीं विवाह केला. इब्राहिम सिंगापूरला लढाईसाठीं जातांच याहि तेथेंच गेल्या व यांनीं तेथें मोफत दवाखाना सुरू केला. याच सुमारास सिंगापूरला जपान्यांचा हल्ला आला. सिंगापूर सोडून जावयाचा हुकूम मोडून या तेथेंच राहिल्या व हिंदी स्वातंत्र्य संघाच्या सदस्य बनल्या.

याच संस्थेच्या अझाद हिंद सेनेनें पुढें सुरू केलेल्या झांशीची राणी सेनेचें प्रमुखपद यांना देण्यांत आलें (१९४३ ऑक्टो. २२). या वेळीं स्त्रियांची संख्या एकशेंपंच्याऐंशी होती ती यांनीं दोन हजारांपर्यंत वाढविली. पिस्तूल, बंदूक, मशिनगन्स यांसारखीं शस्त्रें वापरण्याचें शिक्षण या स्त्रियांना दिलें जाई.

सुरुवातीला या स्त्रियांना शुश्रूषापथकांत काम दिलें जाई; परंतु पुढें यांच्या विनंतीवरून सुभाषबाबूंनीं झांशीची राणी सेनेंतील दोन पथकांना अघाडीवर कूच करण्याचा हुकूम दिला व हिंदुस्थान व ब्रह्मदेश यांच्या अघाडीवर झालेल्या पहिल्याच लढाईंत या स्त्रियांनीं ब्रिटिशांविरुद्ध विजय मिळविला. पुढें मौलमीन येथें अझाद हिंद फौज माघार घेत असतां यांच्या फौजेनें निकराचा सामना देऊन सुभाषबाबूंना निसटून जाण्याची संधि दिली व मग या ब्रिटिशांच्या स्वाधीन झाल्या.

महायुद्धाच्या अखेरच्या दिवसांत लष्करी कामाऐवजीं घायाळ सैनिकांची या शुश्रूषा करीत होत्या, या मुद्द्यावर यांचेवर खटला न भरतां यांना सोडून देण्यांत आलें (१९४६).

लक्ष्मीनारायण डी.—(जन्म स. १८७६ जाने. १२–मृत्यु स. १९३० सप्टें. ३०) नागपूरचे सुप्रसिद्ध व्यापारी व दानशूर गृहस्थ.

यांचें घराणें आन्ध्र प्रान्तांतील तेलंगी ब्राह्मण असून मूळ गोदातीरच्या मंथन गांवचें राहणारें. यांचे वडील डी. पुल्लया गारु हे बालपणींच नागपूरजवळील कामठी गांवीं भिक्षुकी करीत. यांचें जन्मस्थान कामठी. यांच्या मातेचें नांव रामबाई. यांचे वडील हे इंग्रजी पांचवींत असतां वारले. तेव्हां यांचें शिक्षण वाय्. काकोलम् यांनीं

पुढें चालविलें. पण लवकरच हे त्यांच्या कौलाविटांच्या कारखान्यांत काम करूं लागले. पुढें मँगेनीजचा व्यवसाय करणाऱ्या 'सी. पी. प्रास्पेक्टिंग सिंडिकेट'मध्यें काम करूं लागले व पुढें तर खाणींतून मँगेनीज काढण्याचा व विकण्याचा परवाना यांनी मिळविला. १९०५-१९२५ पर्यंत यांनीं या व्यवसायांत विपुल संपत्ति मिळविली. विशेषतः १९१४-१८ या युद्धकालांत तर यांचा परदेशाशीं व्यवहार वाढला. १९२७ सालीं यांनीं अनेक ठिकाणच्या आपल्या खाणी विकून हे कन्हान येथें आपल्या भव्य बंगल्यांत राहून सार्वजनिक कार्यांत लक्ष घालूं लागले.

यांनीं १९१३-१९२० पर्यंत अनेक महत्त्वाच्या विषयांवर जे लेख लिहिले व भाषणें केलीं त्यांचें संकलन 'स्पीचेस् ॲन्ड राइटिंग्ज' या ग्रंथांत केलें आहे. मध्यप्रान्त कायदेमंडळांत हे निवडून आले होते (१९१६-२०).

हे कामठी कँन्टोनमेंट कमेटीचे सभासद असून तेथें नगरपालिका स्थापून तिचे पहिले अध्यक्ष हेच होते (१९२७). नागपूर डिस्ट्रिक्ट कौन्सिलचे अध्यक्ष म्हणून काम करीत असतां शिक्षणार्थ यांनीं चाळीस हजारांच्या देणग्या दिल्या (१९२७-३०). नंतर कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें यांची निवड झाली.

मृत्यूपूर्वी ३ मे १९३० रोजीं यांनीं आपल्या बायको वगैरे आप्तांना देऊन शिल्लक राहिलेली पस्तीस लक्ष रुपयांची मिळकत नागपूर प्रान्तांत सहा वर्षे रहिवाशी असलेल्या हिंदु विद्यार्थ्यांना औद्योगिक शिक्षण देण्याकरितां नागपूर युनिव्हर्सिटीच्या ताब्यांत दिली. यासाठीं नेमलेल्या खास कमेटीनें भारतीय तज्ज्ञांनीं सुचविलेल्या योजना लक्षांत घेऊन 'लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' ही संस्था स्थापन केली (१९४३). याप्रमाणेंच आन्ध्र युनिव्हर्सिटीला यांनीं आपला बहुमोल ग्रंथसंग्रह अर्पण केला. तसेंच नागपूरच्या भारत-सेवक-समाजाच्या शाखेला यांनीं एक लक्ष रुपये दिले.

यांनीं संतति नसल्यानें दत्तक घेण्याच्या फंदांत न पडतां आपली संपत्ति राष्ट्रकार्याला अर्पण करून आपलें नांव अजरामर करून ठेवलें. यांच्या पत्नी गोविंदराव आंधारे यांची कन्या बहिणाबाई.

लाड, डॉ. भाऊ दाजी—(जन्म स. १८२१-मृत्यु स. १८७४) सुप्रसिद्ध प्राच्यविद्यापंडित, संशोधक व परोपकारी गृहस्थ.

यांचें मूळ नांव रामकृष्ण विठ्ठल लाड. पण हे भाऊ दाजी या नांवानें प्रसिद्ध होते. जन्मस्थान गोव्यांतील मांजरें हें गांव. जात सारस्वत ब्राह्मण. यांचे वडील नशीब काढण्याकरितां मुंबईस आले. तेथें त्यांचीं मातीचीं चित्रें व यांचें बुद्धिबळकौशल्य यांवर यांचें शिक्षण सुरू झालें. एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्यें शिक्षण संपवून हे तेथेंच शिक्षक झाले (१८४३). ग्रँट मेडिकल कॉलेज निघतांच यांनीं तेथें आपलें नांव दाखल केलें (१८४५). त्या वेळीं युनिव्हर्सिटी नसल्यानें 'बोर्ड ऑफ एज्युकेशन'नें यांना हायकोर्ट जजाच्या हस्तें जी. जी. एम्. सी. ही पदवी दिली (१८५१). सब असिस्टंट सर्जनच्या जागा निर्माण करून त्यावर यांना नेमण्यांत आलें. पण नोकरी न करितां यांनीं स्वतंत्रपणें धंदा सुरू केला आणि लोकांकडून 'अश्विनीकुमार, धन्वन्तरी' अशा शब्दांत गौरव प्राप्त केला. यांचें रक्तपित्तावरील औषध रामबाण समजण्यांत येतें.

संस्कृत वाङ्मयांतील यांच्या संशोधनाची सुरुवात कालिदासाच्या कालनिर्णयापासून झाली. नंतर शकाच्या हल्लधाशीं संबंध असणाऱ्या कालकाचार्याची जैन कथा, जैन धर्माचार्यांची परंपरा, जैन पट्टावलीचा कालानुक्रम, हेमाद्रीचा काल वगैरे संशोधनांनीं हे विख्यात झाले. कालनिर्णयावर यांचीं बरींच टिप्पणें आहेत.

शिलालेखवाचनाच्या बाबतींतील यांचें कार्य महत्त्वाचें आहे. गिरनार पर्वतावरील रुद्रदामन्चा व त्याच पर्वतावरील गुप्तांचे शिलालेख यांनीं प्रथम वाचले. गुप्त-शिलालेख वाचतांना गुप्तशकाचा सार्वत्रिक प्रचार यांच्या ध्यानीं आला व ते सर्व शिलालेख गुप्तकालांतील असल्याचें यांनीं ठरविलें. शक, गुप्त व वल्लभ यांचे शक आणि घराण्यांसंबंधीं यांनीं ठरविलेले सिद्धान्त दीर्घकाल अबाधित राहिले.

याशिवाय यांनीं किती तरी शिलालेख पद्धतशीरपणें वाचन व भाषान्तर करून प्रथमच लोकांच्या पुढें आणले. मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे हे पहिले हिन्दी सभासद होत. यांनीं अगदीं आरंभीच्या काळांत या क्षेत्रांत पाऊल टाकून प्रतिकूल परिस्थितींत महत्त्वाची कामगिरी बजावली. भगवानलाल इंद्रजी हीं यांची संशोधनशाखेला महत्त्वाची देणगी होय. ग्रँट मेडिकल

कॉलेजांत ले. क. एस्. आर. मुळगांवकर यांच्या हस्तें यांच्या तैल चित्राचें अनावरण करण्यांत आलें.

लिमये, दत्तात्रेय बाळकृष्ण—(जन्म स.१८८७ जुलै ३१) सुप्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ व संशोधक.

कपिगोत्री चित्पावन ब्राह्मण. अजोळी हावनूर येथें सात इयत्ता कानडी शिक्षण झालें. नंतर बी. ए., बी. एस्सी., एम्. ए. झाले. बी. ए.च्या वर्गांत असतांच यांनीं बाळकृष्ण रसशाळेची स्थापना केली (१९०८). एम्. ए. परीक्षेंत यांचा पहिला नंतर आला (१९११). यांना आपलें शिक्षण स्वावलंबनानें करावें लागलें.

पुणें येथील रानडे इन्स्टिट्यूटमध्यें प्रथम असिस्टंट डायरेक्टर (१९१२) व डायरेक्टरचें काम हे करूं लागले (१९३०). तेथें यांच्या हाताखालीं अनेकांनीं संशोधन करून एम्. एस्सी. व पीएच्. डी. या पदव्या संपादन केल्या. यांनीं 'रसायननिधी'ची स्थापना करून (१९३०) बाळकृष्ण रसशाळेचा रजतोत्सव साजरा केला (१९३३). रसायन-निधींतून पहिला संशोधन-विषयक निबंध 'फ्युरोकुमारिन' संघटनासंबंधींचा होय. तो १९३२ त जर्मन केमिकल सोसायटीचे मुखपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आला. त्यायोगें संत्र्याचे जातीच्या एका फळाचे सालींत मिळणाऱ्या 'बर्गॅप्टेन' सदृश पदार्थाची पहिली संघटनात्मक सिद्धि झाली. पूर्वीचे शास्त्रज्ञांनीं एतदर्थ केलेले प्रयत्न विफल झाले होते.

त्यानंतरचा दुसरा महत्त्वाचा यांचा निबंध 'निधोन पद्धति' वरचा होय. तोहि जर्मन केमिकल सोसायटीतच प्रसिद्ध झाला (१९३४). या निबंधाचे योगानें रसायन-निधींचें कार्य चिरंतन राहील यांत शंका नाहीं. वरील दोनहि शोधांच्यामुळें पूर्वी उपलब्ध नसलेले पदार्थ करितां येऊं लागल्यानें संशोधनास अतिशय वाव मिळाला आहे. केवळ आपलेकडेच नव्हे तर परदेशांतहि या संशोधनाचा उपयोग अनेक शास्त्रज्ञांनीं केला आणि या पद्धतीचें श्रेय यांना दिलें आहे.

असिटोनच्या जातीचे म्हणजे केटोन वर्गाचे पदार्थ बनविण्याची यांनीं शोधलेली पद्धति ही निधोनपद्धति होय. या पद्धतीनें झालेला 'रामाल' व 'रंजाल' विषयक नवीन रासायनिक शोधाची सर चंद्रशेखर रामन् यांनीं प्रशंसा केली आहे.

यांच्या 'रसायनम्' नांवाच्या कालिकाचा प्रकाशन समारंभ मुंबईच्या रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे प्रिन्सिपल डॉ. व्हीलर यांच्या हस्तें झाला. यांनीं संशोधनात्मक अनेक निबंध प्रसिद्ध केले आहेत. करंजेलां-तून करंजिन्, वावडिंगांतून विडंगिन्, पांगळा वनस्पतीपासून पांगळी कापूर इत्यादि पदार्थ यांनीं शोधून काढले.

रासायनिक संघटनात्मक विषयावर यांचे प्रमुख निबंध पुढील होत.

(1) Coumarul-4 acetic acid, (2) B-Aryl-glutaconic acids, (3) Furo-coumarins, (4) r-Resorcytic aldehyde, (5) Total Synthesis of Karanjol and Karanjie acid इत्यादि.

लेखराम, पंडित—(खून स. १८९७ मार्च) सुप्रसिद्ध आर्यसमाजी प्रचारक व दयानंद सरस्वतीचे परमभक्त.

हे सरहद्द प्रान्तांतील उर्दू उत्तम लिहीत. शिवाय यांना आरबी व फारसी भाषा चांगल्या येत. प्रथम पोलीस खात्यांत नोकरीस होते, नंतर आर्यसमाजाच्या प्रचाराला यांनीं आपणास वाहून घेतलें. पोलिस खात्यांतील यांचा स्वभाव धार्मिक कार्यांत पडल्यावर बदलला नाहीं. हे आग्रही होते; तरी मूळ शोधण्याचा व न्याय करण्याचा गुण यांच्यांत होता. यांनीं मुसलमान व ख्रिस्ती धर्मांचें सडेतोड खंडन करून हिंदु धर्माची चांगली सेवा केली. हे त्या धर्माच्या कमकुवत भागांवर त्यांच्याच आधारांनीं हल्ला करून त्यांच्या मताचे तुकडे उडवीत. यांचीं पुस्तकें याच पद्धतीचीं आहेत. बचावाच्या दृष्टीनें ही पद्धत उपयुक्त असली तरी निर्णयाच्या दृष्टीनें ही पद्धत घातक असते.

हिंदूंच्या संरक्षणाची व नवमुस्लीमांना शुद्ध करून घेण्याची यांची कामगिरी निःसंशय महत्त्वाची आहे. पण प्रचाराच्या पद्धतीमुळें मुसलमान यांच्याविरुद्ध झाले, यांना धमक्या दिल्या गेल्या व यांच्याकडे शुद्ध होण्याकरितां आलेल्या एका मुसलमानानें यांच्या घरीं राहून यांच्या पोटांत सुरा खुपसून यांचा खून केला. त्याचा पुढें पत्ता लागला नाहीं.

यांच्या या मृत्यूनें यांना कमालीची लोकप्रियता प्राप्त झाली. त्यामुळें आर्यसमाजांतील दुही कांहीं काळ मिटली.

लेट्बीटर, चार्लस् वेब्स्टर—(जन्म स.१८४७–मृत्यु स. १९३४) मृत्यु, परलोक वगैरे अतींद्रिय विद्यांचे अभ्यासक व ग्रंथकर्ते.

यांचे वडील चार्लस् हे सनातनी ख्रिस्ती मताचे असून त्यांना गूढविद्येचा नाद होता. हे आपले धाकटे बंधु जिराल्ड व वडील यांचेबरोबर द. अमेरिकेंत गेले. तेथें रेल्वेचा रस्ता बांधण्याचें काम चालू असतां रेड इंडियन लोकांची बंडाळी सुरू झाली. तींत जिराल्ड मारला गेला व हे कसेबसे सुटून आले. इंग्लंडांत परत आल्यावर बँक बुडाल्यानें यांना शिक्षण सोडून उपाध्यायाची नोकरी करावी लागली. १८८३ मध्यें हे थिऑसॉफिकल सोसायटींत शिरले. पुढें हे मद्रासला आले व सिलोनमधील बौद्ध शाळा तपाशीत असतां जिनराजदासांची व यांची गांठ पडली. त्यांना घेऊन हे इंग्लंडला गेले. तेथें यांची बेझंटबाईशीं गांठ पडली. तेथून पुढें दोघांनीं अतींद्रिय संशोधनाचें कार्य केलें.

यांचा पहिला ग्रंथ ॲस्ट्रल प्लेन (भुवर्लोक) आणि दुसरा ग्रंथ देवखानिक प्लेन (स्वर्ग). हे परलोकांतील तपशीलवार माहिती सुलभ भाषेंत व पटेल अशा पद्धतीनें देण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. त्याला आधार यांचें निरीक्षण असून तें आधुनिक शास्त्रीय परिभाषेंत लिहिलें आहे. तसेंच मृत्यु हा शरीराला असतो; मन, बुद्धि व आत्मा यांना नसतो हेंहि यांचें प्रतिपादन महत्त्वाचें आहे. हे शिक्षणाचे तज्ज्ञ असल्यानें अनेक लोक आपलीं मुलें यांच्यापाशीं ठेवीत. त्या मुलांना हे अनीतिकारक गोष्टी करावयास लावतात म्हणून यांच्याविरुद्ध वादळ उत्पन्न झालें तेव्हां यांनीं सोसायटी सोडली. पण पुढें तो गैरसमज दूर झाल्यावर हे पुनः सोसायटींत आले. १९०९-१३ अड्यार येथें राहून बेझंटबाईंच्या सहकार्यानें यांनीं अनेक ग्रंथ लिहिले. पुढें हे आस्ट्रेलियांत गेले. तेथें मेनॉर नांवाची थिऑसॉफीय लोकांची यांनीं वसाहत काढली. लिबरल कॅथोलिक चर्च, कोमेसनरी वगैरे संस्थांत प्रमुख म्हणून काम केल्यावर इकडे येऊन सूर्योपासनेबद्दल संशोधन करून भारतसमाज व त्याचें अड्यार येथील देवालय यांसंबंधीं यांनीं लेख लिहिले.

लेले, काशीनाथ वामन ऊर्फ भाऊशास्त्री—(जन्म स. १८६३–मृत्यु स. १९१८) सुप्रसिद्ध शास्त्री, मराठींतील लेखक व ग्रंथकार.

जन्मस्थान वाई. हे वाईचे राहणारे व तेथेंच यांचें जुन्या पद्धतीनें शिक्षण झालें. इंग्रजी शिकल्यावर संस्कृत ग्रंथाचें सुंदर मराठी भाषान्तर करणारे म्हणून यांची प्रसिद्धि होती. तथापि यांनीं भाषान्तर करावयास घेतलेल्या ग्रंथांपैकीं फार थोडे तडीस गेले. व्यावहारिक धोरणानें हे महत्त्वाकांक्षी गृहस्थ अनेक कामें एका वेळीं सुरू करीत आणि आर्थिक पेचांत येऊन यांना आपलें लक्ष तिसऱ्याच ठिकाणीं केन्द्रित करावें लागे.

यांनीं अनेक नियतकालिकें चालविलीं आणि विविध विषयांवर विपुल लेखन केलें. राजकीय कारणाकरितां यांना तुरुंगवासहि भोगावा लागला. यांनीं दुसरें लग्न केलें व त्याच्या समर्थनार्थ अग्निहोत्र घेऊन सोमयागासारखे यज्ञहि केले. पुढें हे आयुर्वेदाचा अभ्यास करून वैद्यकी करूं लागले.

लेवी, सिल्व्हन लुईस—(जन्म स. १८६३ मार्च २८–मृत्यु स. १९३६) फ्रान्समधील सुप्रसिद्ध प्राच्यविद्यापंडित व इतिहाससंशोधक.

यांचा जन्म पॅरिसला झाला व १८९० सालीं हे डॉक्टर ऑफ लेटर्सची परीक्षा पास झालें. सुप्रसिद्ध फ्रेंच संस्कृत पंडित अबेल बर्ग्ने यांच्या सहवासानें यांना संस्कृत भाषा व बौद्ध धर्म यांच्या अध्ययनांत गोडी लागली व बर्ग्ने यांच्या मृत्यूनंतर फ्रेंच एशियाटिक सोसायटीच्या कौन्सिलवर त्यांच्या जागीं यांची नेमणूक होतांच यांनीं आपल्या प्राच्यविद्याविषयक कार्यास सुरुवात केली. Ecole des Hautes Etudes व नंतर College de France मध्यें संस्कृत भाषेचे प्राध्यापक म्हणून यांची नेमणूक झाल्यानें (१९०४) यांच्या या कार्यास विशेष जोर प्राप्त झाला.

हिंदु नाट्यासंबंधीं यांनीं लिहिलेल्या प्रबंधानें यांच्या या कार्यास सुरुवात झाली. यांनीं चिनी, तिबेटी, पाली, संस्कृत इत्यादि भाषांचे वर्ग सुरू केले. हिंदी संस्कृतीचें अध्ययन करण्याच्या हेतूनें यांनीं Ecole Francaise d'Extreme Orient या संस्थेची स्थापना केली.

यांचे शिष्य पेलियट यांनीं मध्यआशियांत प्रवास करून शोधून आणलेल्या हस्तलिखितांच्या वाचनासाठी यांनीं एक संस्था स्थापन केली. मध्यआशियांतील तोखारि व कौटचि भाषांसंबंधीं यांनीं केलेल्या संशोधनाला पुढें ऑरेल स्टाइन यांच्या संशोधनानें आधार मिळाल्यानें यांची सर्वत्र वाहवा झाली.

१९२२ सालीं रवींद्रनाथ टागोरांच्या खास विनंतीवरून यांनीं त्यांच्या विश्वभारतीला भेट दिली.

Bergaigne and Indianism या निबंधांत हिंदुस्थान प्रत्यक्ष पाहण्याची प्रगट केलेली कल्पना आज सत्यसृष्टींत उतरल्याबद्दल यांना फारच समाधान वाटलें.

बुद्ध धर्म व संस्कृत भाषा यांचा एकाच वेळीं व्यासंग करण्याबद्दल यांची प्रसिद्धि आहे. सकाळीं हे शाकुन्तलावर व्याख्यान देतील तर दुपारीं संस्कृत व चिनी भाषांतील धम्मपदाची चर्चा करतील. एकीकडे संस्कृत, तिबेटी, चिनी भाषांतील कोटीकर्णवादनाचा तर दुसरीकडे महाभारताचा अशा सव्यसाची व्यासंगामुळें यांना मानाचें स्थान प्राप्त झालें.

समुद्र व पर्वत यांमुळें सर्व जगापासून वेगळी झालेली रानटी जात, ही हिंदु लोकांबद्दलची कल्पना बदलून टाकणाऱ्या पाश्चात्य संशोधकांत हे प्रमुख आहेत. जावा, कॅम्बोडिया, सुमात्रा, बोर्निया या दूर देशांत हिंदु लोकांनीं प्रस्थापित केलेलीं साम्राज्यें व सिलोन, ब्रह्मदेश, सयाम, कॅम्बोडिया, चंपा, जावा इत्यादि देशांतील लिपि, भाषा, वाङ्मय, शास्त्र या सर्व ज्ञानशाखांवर हिंदु-मग ते ब्राह्मण असोत किंवा बौद्ध असोत-लोकांनीं गाजवलेलें वर्चस्व प्रथम उजेडांत आणण्याचें श्रेय यांच्या परंपरेला दिलें पाहिजे. मुसलमान लोकांनीं खूप प्रयत्न करूनहि तिकडील हिंदु प्रभुत्व नाहींसें करतां आलेलें नाहीं.

यांचे ग्रंथ—फ्रेंच-(1) Le Théâtre Indien (1890), (2) La Doctrine du Sacrifice dans les Brahamanas (1898), (3) Le Népal (1905), (4) Annales Musee Guimet, (5) India (La Grande Encyclopēdic मध्यें), (6) याशिवाय Revue Critique, Journel T'oung-Pao, Journel Asiatique, Ecole Francoyse d'Extreme Orient च्या bulletine मध्यें संशोधनपर लेख.

इंग्रजी-(1) What about Greece Ancient Indian Monuments Conserved, (2) Studies in Buddha Charitra, (3) Doctrine of Sacrifice in Brahmanas.

संपादित-(1) Sutralankara of Asanga, (2) La Grande Encyclopēdie (सहकार्यानें).

लोहिया, राममनोहर—(जन्म स. १९१०सुमार) काँग्रेस सोशॅलिस्ट पक्षाचे सुप्रसिद्ध कार्यकर्ते व पुढारी.

कलकत्ता, मुंबई व बर्लिन येथें आपलें शिक्षण संपवून हे पी. एच्‌डी. झाले व यांनीं काँग्रेसच्या चळवळींत भाग घेण्यास सुरवात केली. काँग्रेस सोशॅलिस्ट पक्षाची तात्त्विक बाजू घडविण्याचें बरेंच श्रेय यांचेकडे जातें. १९४२ च्या 'चले जाव' चळवळींतील प्रतिकारसामर्थ्याचें जनकत्व यांना दिलें जातें. त्या चळवळींत सुरू झालेल्या काँग्रेसच्या गुप्त रेडिओंतील सर्व भाषणें हे लिहून देत असल्याचें आतां उघडकीस आलें आहे. यांच्या भाषेंतील उपरोधिकपणा व विशिष्ट व्यक्तींचें किंवा घटनेचें पृथक्करण करतांना दिसणारा तर्ककठोरपणा विशेष प्रसिद्ध आहे. गोव्यांतील पोर्तुगीज भागांत राजकीय चळवळीला तोंड लावण्याचें काम यांनीं प्रथम केलें. हे मारवाडी समाजांतील असल्यानें त्यांनीं यांना सार्वजनिक कार्य मोकळेपणानें करितां यावें म्हणून लाख रुपयांची थैली अर्पण केली.

यांचा ग्रंथ—Mystery of Sir Stafford Cripps.

व

वझे, संगीताचार्य-रामकृष्णबुवा—(जन्म स. १८७१-मृत्यु स. १९४३ मे ५) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध गायनाचार्य.

यांचे गायनविद्येंतील प्रमुख गुरु निसार हुसेनखाँ हे होत. यांचें तरुणपण जम्मू, जालंदर, काश्मीर, नेपाळ वगैरे प्रदेशांत गेलें. शिवाय सर्व हिंदुस्थानांत यांचा संचार असे. मोठाल्या लोकांच्या चिजांचा व आठवणींचा संग्रह यांच्याइतका इतरत्र क्वचितच असेल आणि त्या आठवणी रंगेलपणानें सांगण्याची हातोटीहि यांच्यापाशीं होती. प्रसिद्ध गायक व नट केशवराव भोसले यांच्याशीं यांचा विशेष संबंध असे. यांनीं आपल्या

अखेरच्या आयुष्यांत ग्रामोफोन रेकॉर्डस् दिल्या व रेडिओंतहि हे कार्यक्रम करीत.

वझे, शिल्पकलानिधि-कृष्णाजी विनायक— (जन्म स. १८६९ डिसें. १६-मृत्यु स. १९२९ मार्च ३१) सुप्रसिद्ध स्थापत्यविशारद, स्थापत्यविषयक प्राचीन ग्रंथांचे संशोधक, धर्म, समाज वगैरेंचे अभ्यासक व लेखक.

हे एल्. सी. ई. झाले व यांनीं सरकारी नोकरी करून रावसाहेब ही पदवी मिळविली.

यांनीं 'धर्मशिक्षणाचा ओनामा' (१-८ भाग) ही पुस्तकमाला लिहून जुन्या आचारविचारांचा नव्या दृष्टीनें उलगडा करून दाखविला. तसेंच शिल्पविषयक जुन्या संस्कृत वाङ्मयाचा शोध करून अनेक हस्तलिखितें मिळविलीं व तीं प्रकाशांत आणण्याचा प्रयत्न केला. याशिवाय यांनीं अनेक विषयांवर आपले महत्त्वाचे विचार प्रदर्शित केले. यांच्या व्याख्यानाची मांडणीहि मोठी मनोरंजक व नवी असे.

यांचे ग्रंथ—शिल्प-१ आर्य शिल्प-हिन्दी यन्त्रशास्त्र, २ प्राचीन हिन्दी शिल्पशास्त्र ४ भाग, ३ प्राचीन हिन्दी शिल्पशास्त्रसार, ४ शिल्प शिक्षणाचें महत्त्व; चित्र-५ आर्य शिल्प-चित्रविद्या अथवा चित्रलेखनशास्त्र; युद्ध-६ प्राचीन युद्धविद्या; स्वराज्य-७ आजच्या स्वराज्यसंस्था (म्युनिसिपालिटी वगैरे प्राचीनपासून आजतागायत); व्यापार-८ व्यापारी शिक्षणमाला पुस्तक १ लें, ९ व्यापारीमित्र. यांशिवाय काश्यपशिल्पम् वगैरे संस्कृत ग्रंथ शोधून यांनीं प्रसिद्ध केले.

वरेरकर, भार्गवराम विठ्ठल ऊर्फ मामा— (जन्म स.१८८३) मराठी भाषेंतील सुप्रसिद्ध नाटककार, लघुकथालेखक व कादंबरीकार.

यांचा जन्म चिपळूण येथें झाला व शिक्षण मालवण, दापोली व रत्नागिरी येथें झालें. मॅट्रिक होण्यापूर्वीच यांना पोष्ट खात्यांत नोकरी पत्करावी लागली (१८९९). मराठींत 'कुंजविहारी' हें गोड नाटक लिहून हे प्रथम लोकांच्या पुढें आले (१९०७). हाच मुलाचा बाप, संन्याशाचा संसार वगैरे उत्कृष्ट नाटकांनीं यांचें स्थान पक्कें झालें. चालू चळवळीवर ताबडतोब नाटचरचना करून त्या प्रश्नाची पुरोगामी बाजू मांडण्यांत यांचा हातखंडा आहे. यांच्या नाटकांत, लघुकथांत किंवा कादंबऱ्यांतसुद्धां यांचा सुधारणाचा पुरस्कार व नवतंत्राचा अवलंब करण्याची वृत्ति दिसून येते. यांनीं शरच्चंद्राच्या समग्र कथांचें मराठी भाषान्तरहि तन्मय होऊन केलें आहे. हे धुळें मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते (१९४५).

वाच्छा, सर दिनशा एदलजी—(जन्म स. १८४४-मृत्यु स. १९३६) राष्ट्रसभेचे अध्यक्ष, सुप्रसिद्ध आंकडेशास्त्रज्ञ, इंपीरियल बँकेचे गव्हर्नर व व्यापारी.

यांचा जन्म व शिक्षण मुंबई येथें झालें. १८७४ पासून मुंबईस हे कापसाचे व्यापारी म्हणून प्रसिद्ध होते. मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशनचे हे ३० वर्षें सभासद व एकदां अध्यक्षहि होते (१९०१). मुंबई कायदेमंडळ, मध्यवर्ति कायदेमंडळ व कौन्सिल ऑफ स्टेटचे हे सभासद व बऱ्याचशा सरकारी कमेट्यांवर व बऱ्याचशा व्यापारी कंपन्यांशीं यांचा निकटचा संबंध होता.

यांनीं हिंदी वसूल, चलन, अर्थशास्त्र, शेती, रेल्वे, लष्करी खर्च इत्यादि विषयांवर शेंकडों लेख लिहिले व अनेक कमेट्यांवर काम केलें व साक्षी दिल्या.

अगदीं पहिल्या राष्ट्रसभेपासून हे तेथें भाषणें करीत. यांचीं भाषणें अत्यंत माहितीपूर्ण व आंकड्यांनीं युक्त असत. लष्करी खर्च व दारिद्र्य हे यांचे आवडते विषय असत. यांची टीका अत्यंत कडक असल्यानें यांना मुंबईचे 'जळतें कोलीत' म्हणत. हे राष्ट्रसभेचे अध्यक्ष (कलकत्ता, १९०१), स्वागताध्यक्ष (मुंबई, १९१५). तसेंच १८९६-१९१३ मध्यें जाईंट सेक्रेटरी होते. पुढें सर पदवी घेऊन हे सरकारच्या अगदीं विश्वासांतील गृहस्थ बनले.

यांचे ग्रंथ—(1) Life of J. N. Tata, (2) Shells from the Sands of Bombay (1920), (3) Life of Premchand Roychand, (4) The Rise and Growth of Bombay Municipal Government इत्यादि.

वाजपेयी, सर गिरिजाशंकर—(जन्म स. १८८१ एप्रिल) हिंदुस्थान सरकारचे सुप्रसिद्ध परदेशी वकील.

यांचा अभ्यास अलाहाबाद व आक्सफर्ड येथें होऊन हे आय्. सी. एस्. झाले व सरकारी नोकरींत शिरले. हे दुय्यम न्यायाधीशाच्या जागेपासून चढत चढत येथें

व परदेशीं यांनीं अनेक महत्त्वाच्या जागीं कामें केलीं. नंतर १९४० सालीं यांना व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव कौन्सिलचे सभासद निवडण्यांत आलें. यांच्या ताब्यांत आरोग्य, शिक्षण व जमीन हीं खातीं देण्यांत आलीं. इंपीरियल अग्रिकल्चरल रिसर्च कौन्सिलचे हे सरकार-नियुक्त चेअरमन होते. यांचा हिन्दी शेतकीशीं घनिष्ट संबंध आहे. हे अमेरिकेंत हिंदुस्थानसरकारचे एजन्ट जनरल होते आणि तेथें यांना मिनिस्टरचा दर्जा मिळून वाशिंग्टन येथील ब्रिटिश वकिलातीला हे जोडले होते.

वालचंद हिराचंद दोशी—(जन्म स. १८८२) औद्योगिक क्षेत्रांतील सुप्रसिद्ध पुरुष.

यांचा जन्म सोलापूर येथें झाला. यांना बी. ए. चा अभ्यास सोडावा लागला आणि सोलापुरीं वडिलांच्या सूतकामाचे दुकानांत मदत करण्याकरितां यावें लागलें. हजरतखान नांवाच्या गिरणींतील फायरमनला लांकडाचें टेंडर पुरें करण्याकरितां यांनीं कर्जाऊ रक्कम दिली आणि बार्शी लाइट रेल्वेचा येडशी ते तडवळ हा सात मैलांचा रेल्वे रस्ता तयार करण्याचें कंट्राक्ट घेतलेल्या श्री. ल. ब. फाटक यांच्याशीं सहकार्य करून यांनीं तें काम पार पाडलें. त्यानंतर दहा वर्षांनीं १९१५ सालीं यांनीं फाटक ॲन्ड वालचंद कंपनी स्थापिली. बोरघाटांतील प्रचंड बोगद्याच्या कामानें यांचें नांव सर्वतोमुखीं झालें.

१९१८ नंतर मुंबईच्या पुनर्घटनेचा प्रश्न निघाला असतां हीं सर्व कामें देशी लोकांच्या तज्ज्ञांकडून व्हावींत म्हणून वर्तमानपत्रांत यांनीं पत्रव्यवहार केला. टाटांच्या सहकार्यानें टाटा कन्स्ट्रक्शन लि. ही कंपनी काढून मॅनेजिंग डायरेक्टरचें काम यांच्याकडे आलें. पुढें टाटांनीं या कंपनीतून आपलें अंग काढून घेतलें तेव्हां यांनीं प्रिमियर कन्स्ट्रक्शन नांवाची कंपनी काढून नर्मदा नदीवरील जी. आय. पी. चा, सिंधूवरील काळ-बागचा व मंडालेनजीक इरावतीवरचा हे पूल बांधले. प्रिमियरच्या संचालकत्वाखालीं हिंदुस्थान बिल्डिंग व ऑल इंडिया कन्स्ट्रक्शन या संस्थांचा कारभार, हिन्दी ह्यूम पाइप तयार करण्याचा कारखान्यांसारखे कितीतरी उद्योग यांच्या नेतृत्वाखालीं चालत.

नाशिक जिल्ह्यांतील खळगांव व कळंब येथील आधुनिक पद्धतीची ऊंस, कापूस, तंबाखू, मिरची यांची लागवड व दोन साखरेचे कारखाने यांनीं चालविले असून शेतकी कमिशनपुढें यांनीं अत्यंत महत्त्वाची साक्ष दिली (१९२६).

यांनीं शिंदे सरकारचें एस. एस. लॉयल्टी नांवाचें जहाज खरेदी करून सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीची उभारणी केली (१९१९). त्यानंतर यांनीं अनेक वाफारे खरेदी केले व परदेशी लोकांच्या स्पर्धेतून यशस्वीपणें काम चालविलें. सिंदिया हाउसचा उद्घाटन समारंभ १९३९ सालीं सरदार वल्लभभाई पटेल यांच्या हस्तें साजरा झाला. वहातुकीच्या या कामाबरोबर जहाजें बांधण्याचें कामसुद्धां यांनीं सुरू केलें. विजगापट्टम् येथें बाबू राजेन्द्रप्रसाद यांच्या हस्तें हिंदी जहाजांच्या पहिल्या गोदीचा कोनशिलासमारंभ साजरा करण्यांत आला (१९४१ जून २१).

फोर्डशीं सहकार्य करून मोटार कारखाना, विमानाचा कारखाना, टाटा केमिकल्स लि., असोसिएटेड सीमेंट कं. लि. वगैरे कंपन्यांशीं यांचा निकटचा संबंध असून पॅरिस, इंटरनॅशनल कॉन्फरन्सचे हे अध्यक्ष आहेत.

हे कारखानदार, व्यापारी व राष्ट्रीय दृष्टीचे चिकित्सक असल्यानें यांचीं लेखन व भाषणें माहिती पूर्ण, स्पष्ट व नवा प्रकाश देणारीं असतात.

वासुदेवय्या, च.—(जन्म स. १८४४–मृत्यु स. १९४३) अर्वाचीन कानडी गद्याचे जनक व सुप्रसिद्ध कानडी साहित्यिक.

'बालबोध' हा यांचा ग्रंथ म्हैसूर संस्थानांतील गद्याचा आदिग्रंथ मानण्यांत येत असून 'आर्यकीर्ति', 'भीष्मचरित' इत्यादि यांचे इतर ग्रंथहि सुप्रसिद्ध आहेत.

विजयराघवाचार्य सी.—(जन्म स. १८५२–मृत्यु स. १९४३) राष्ट्रसभा व हिंदुसभा यांचे अध्यक्ष.

सालेमचे हे वकील. राष्ट्रसभेची घटना ठरविण्या-करितां नेमलेल्या कमेटीचे हे सभासद होते (१८८७). सुरतेच्या फुटीनंतर हे राष्ट्रसभेपासून अलग राहणारां-पैकीं होत. १९१६ सालीं हे लखनौ राष्ट्रसभेंत पुनः आले. तेव्हांपासून हे राष्ट्रसभेंत मनापासून भाग घेत. नागपूर राष्ट्रसभेचें अध्यक्षपद यांना देण्यांत आलें (१९२०). यांना म. गांधींची असहकारिता मान्य नव्हती. हे पुढें हिंदुसभेंत सामील झाल व एका अधि-वेशनाचे अध्यक्षहि होते.

विजय, रेव्हरंड—(मृत्यु स. १९२९ सप्टें. १९) ब्रह्मदेशांतील एक राजकारणी बौद्ध भिक्षु.

२१ महिन्यांची सक्तमजुरी भोगल्यावर यांची सुटका झाली (१९२९ फेब्रु. २८). पण लवकरच यांना पुनः अटक होऊन राजद्रोहाच्या आरोपावरून सहा वर्षे काळेपाण्याची शिक्षा झाली. ती पुढें तीन वर्षांची करण्यांत आली. पण तुरुंगांत चांगलें वागविलें जावें व कांहीं विशिष्ट दिवशीं भिक्षूचा पिवळा झगा वापरण्यास मिळावा म्हणून यांनीं अन्नसत्याग्रह केला व त्यांत १६४ व्या दिवशीं यांना मृत्यु आला.

विजापूरकर, प्रा. विष्णु गोविंद—(जन्म स. १८६३–मृत्यु स. १९२६ ऑगस्ट १) मराठी वाङ्मय, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व सदाचार यांचे निःसीम पुरस्कर्ते व समर्थ विद्यालयाचे संस्थापक.

जन्मस्थान कोल्हापूर. हे माध्व वैष्णव सांप्रदायाचे दे. कऱ्हाडे ब्राह्मण होते. यांच्यावर उपनिषदें व समर्थ सांप्रदाय यांची विशेष छाप असे. हे कोल्हापूर व पुणें येथें शिक्षण घेऊन एम्. ए. झाले (१८९७). अहमदाबाद कॉलेजांत फेलो व राजाराम कॉलेज कोल्हापूर येथें हे संस्कृत व इंग्रजी या विषयांचे प्राध्यापक होते.

यांनीं प्रथम ग्रंथमाला हें मासिक (१८९६), नंतर समर्थ साप्ताहिक (सुरुवात १८९८ जुलै) व नंतर विश्ववृत्त हें मासिक सुरू केलें आणि तद्द्वारा स्थानिक, प्रान्तिक व देश यांतील सर्व प्रकारच्या हालचालींचा हे परामर्श घेऊं लागले. तेव्हां राजकीय कारणावरून यांना प्राध्यापकाच्या जागेवरून काढून टाकण्यांत आलें.

नंतर यांनीं समर्थ विद्यालय सुरू केलें (१९०६ जून). एक वर्षानंतर प्लेगमुळें चार महिने मिरजेस ठेवून नंतर तें तळेगांवीं आणण्यांत आलें. विश्ववृत्तांतील 'वैदिक धर्माची तेजस्विता' या श्री. श्री. दा. सातवळेकर यांच्या लेखावरून संपादक म्हणून यांना तीन वर्षांची साधी कैद झाली (१९०८ ऑक्टो.). हे तुरुंगांत असतां सरकारी कायद्यामुळें समर्थ विद्यालय बंद करणें भाग पडलें. हे सुटून आल्यानंतर यांनीं सर महादेव चौबळ यांना संस्थेचे अध्यक्ष करून 'नवीन' असें नांव घेऊन तें विद्यालय पुनः सुरू केलें (१९१८). तें सुरू करतांना सर महादेव म्हणाले–'प्रो. विजापूरकरांची धर्मनिष्ठ व सात्विकतेची प्रत्यक्ष मूर्ति डोळ्यांपुढें असतां मी तरी जास्त काय सांगणार? साधी राहणी व उच्च विचारसरणी यांचा असा नमुना इतरत्र क्वचितच पाहावयास मिळेल.'

यांनीं अनेक ग्रंथ लिहिले व भाषान्तरें केलीं. पण 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' हें न्या. रानड्यांच्या पुस्तकाचें यांचें भाषान्तर महत्त्वाचें होय.

वियोगी हरि—(जन्म स. १८९७) सुप्रसिद्ध कृष्णभक्त हिन्दी कवि व लेखक.

यांचें नांव हरिप्रसाद द्विवेदी. पिता बलदेवप्रसाद. वडील लहानपणींच वारले तेव्हां अजोळीं घरीं संस्कृत व हिन्दी भाषांचें शिक्षण घेतल्यावर हे मॅट्रिक झाले (१९१५). श्रीतुळशीदासजींची विनयपत्रिका व श्रीभागवत यांना प्रारंभापासून प्रिय असे. पुढें छत्रपूर नरेशांच्या धर्मपत्नी श्रीमती कमलकुमारी देवी माध्व संप्रदायी वैष्णव असल्यानें हे द्वैतवादी झाले. वयाच्या अठराव्या वर्षी यांनीं प्रेमशतक, प्रेमपथिक, प्रेमाञ्जलि व प्रेमपरिषद नांवाचीं पुस्तकें लिहिलीं व आजन्म ब्रह्मचारी राहण्याचा निश्चय केला. आपल्या गुरुदेव महाराणी दिवंगत झाल्यावर त्यांच्या आज्ञेनुसार यांनीं संन्यास घेतला. यांचा आश्रम श्रीहरितीर्थ नांवानें ओळखला जातो. पण यांनीं आपल्या सर्वस्वाच्या वियोगामुळें आपलें नांव वियोगी हरि असें घेतलें.

यांनीं पुरुषोत्तमदास टंडन यांच्या सांगण्यावरून संमेलनपत्रिका व सूरसागर यांचें संपादन केलें (१९१९).

यांचें वाङ्मय—१ श्रीछद्मयोगिनी नाटिका, साहित्यविहार (भक्तिरसपूर्ण लेखसंग्रह), २ कवि कीर्तन (१०० कवींचा पद्यात्मक परिचय), ३ अनुरागवाटिका (व्रजभाषेंतील १०० पदें), ४ वीर हरदौल (नाटक), ५ शुकदेव (खंडकाव्य), ६ मेवाड केशरी (काव्य), ७ व्रजमाधुरीसार (व्रजभाषेंतील भक्तिपूर्ण कवितांचा संग्रह).

म. गांधी, त्यांची चळवळ, चरखा, विनोबा भावे व त्यांचे विचार वगैरे वरील यांचीं पुस्तकें महत्त्वाचीं आहेत.

विरजानंद सरस्वती—(जन्म स. १७९८–मृत्यु स. १८६८) स्वामी दयानन्दसरस्वतींचे गुरु व एक विक्षिप्त संन्यासी.

जन्मस्थान पंजाबांत गंगापूर. जात सारस्वत ब्राह्मण.

पांचव्या वर्षी देवीनें डोळे गेले. आईबापहि वारले. तेव्हां हे घरांतून पळाले. हृषीकेशास जाऊन गायत्रीपुरश्चरण करून संन्यास घेतला. व्याकरणवेदान्तांचें अध्ययन करून 'प्रज्ञाचक्षु' असा लौकिक मिळविला. नंतर मथुरेस संस्कृतपाठशाळा काढली. एखाद्या साध्या शब्दाबद्दल हे निकरानें वाद खेळत. एकदां एका वैष्णवानें यांना वादांत हरविलें, तेव्हांपासून वैष्णवांचा हे तिरस्कार करीत व त्यांचा भागवत ग्रंथ खाटेच्या पायाखालीं ठेवीत. भट्टोजी दीक्षिताच्या व्याकरण ग्रंथाची हे खेटरानें संभावना करीत. महाभारतोत्तर वाङ्मयाचा हे मनस्वी तिटकारा करीत. यांच्या तामसी स्वभावाचा सर्वांत हुषार विद्यार्थ्याला विशेष उपद्रव होई. दयानन्द सरस्वतींवर यांची विशेष छाप होती. त्यांना यांनीं गुरुदक्षिणा म्हणून दांभिकांचा दंभस्फोट करण्याचा आणि सच्छास्त्राचा प्रचार करून लोकांना ज्ञानी करण्याचा आदेश दिला.

विवेकानन्द स्वामी—(जन्म स. १८६२ जाने.९– समाधि स. १९०२ जुलै ४) हिंदु तत्त्वज्ञानाचा जगभर प्रसार करणारे थोर पुरुष व उत्कृष्ट वक्ते.

यांचें मूळ नांव नरेन्द्रनाथ दत्त. यांच्या पित्याचें नांव विश्वनाथ दत्त. जात कायस्थ. जन्मस्थान कलकत्त्याजवळ सिमूलिया. कलकत्त्याच्या ख्रिश्चन कॉलेजमधून हे बी. ए. झाले. कॉलेजांत असतांनाच यांनीं भारतीय व पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. यांच्यावर प्रथम बुद्धिवादाची विलक्षण छाप होती. कांहीं काळ ब्राह्मसमाजाकडेहि यांचें लक्ष वेधलें. पण तेथील भावनात्मक पण तत्त्वज्ञानशून्य एकेश्वरवादाला आणि रोज बदलणाऱ्या नीतितत्त्वांना हे लवकरच विटले. यांच्या मनाची तळमळ अखेरीस रामकृष्ण परमहंस या ब्राह्मण संन्याशाच्या एकवार दर्शनानें आकस्मिक रीतीनें दूर झाली. यांना त्यांनीं ईश्वरसाक्षात्काराची खात्री दिली आणि त्याचक्षणी यांच्या जीवनांत परिवर्तन झालें.

ईश्वरसाक्षात्कार म्हणजे धर्म अशी यांनीं धर्माची व्याख्या केली. प्रथम संन्यास, नंतर सर्व धर्मांविषयीं ऐक्यबुद्धि आणि नंतर ईश्वरप्राप्ति असा यांचा साधनक्रम असून रामकृष्ण परमहंस हे ईश्वरावतार आहेत असा यांचा विश्वास होता. ते समाधिस्थ झाले (१८८६ ऑगस्ट ६) तेव्हां यांनीं त्यांच्या शिष्यांचा एक संघ स्थापन केला व स्वतः विवेकानन्द हें नांव घेऊन हे त्याचे प्रमुख झाले. नंतर हे सहा वर्षे हिंदुस्थानांत फिरले. त्यांपैकीं कांहीं काळ हिमालयांत व तिबेटांतहि यांनीं घालविला. नंतर ३१ मे १८९३ रोजीं मद्रासहून जपानद्वारें हे चिकागोला जाण्यास निघाले. तेथें भरलेल्या जागतिक धर्मपरिषदेंतील यांच्या भाषणानें अमेरिकन लोकांच्या घरांतील हे एक आदरणीय पाहुणे होऊन बसले. तेथें हे १८९५ पर्यंत राहिले. तेथें यांनीं संन्यास, सर्व धर्म ऐक्य व ईश्वरप्राप्ति या विषयांवरील व्याख्यानांनीं अमेरिका खंड हलवून सोडलें व अगणित शिष्य मिळविले. यांचा जगप्रसिद्ध राजयोग हा ग्रंथ तिकडेच लिहिला गेला. थोरामोठ्यांचें लक्ष गेलें तसेंच कांहीं भुरट्या लोकांनीं यांच्या त्यागी संन्यस्त वृत्तीचा फायदा घेऊन यांच्या व्याख्यानांच्या कार्यक्रमावर पैसे मिळविण्याचा धंदा केला.

अमेरिकेहून हे इंग्लंडला गेले. तेथें मॅक्स मूलर वगैरेशीं यांचा परिचय झाला व भगिनी निवेदितासारख्या शिष्या यांना लाभल्या. १८९७ मध्यें हे अनेक शिष्यांसमवेत कोलंबोहून मद्रासमार्गे कलकत्त्यास आले. तेव्हां यांचें जागोजागीं प्रचंड स्वागत झालें.

मद्रास येथें यांनीं एक व्यापक कार्यक्रम जाहीर करून, जनतेला अन्न, वस्त्र व शिक्षण मिळण्याची आवश्यकता प्रतिपादून, तसें करण्याकरितां मद्रास व कलकत्ता येथें केन्द्रें निर्माण करण्याचें जाहीर केलें. नंतर लौकरच यांनीं रामकृष्ण मठाची स्थापना केली. यांनीं परत येतांना आपल्या वेदान्ताला जनसेवेची जोड दिली.

पण यांचें हें लोकसेवेचें कार्य संन्यास धर्माला व रामकृष्ण परमहंसांच्या आदेशाला अनुसरून नाहीं या सबबीवर यांचा व रामकृष्णांच्या इतर शिष्यांचा बेबनाव झाला. नंतर यांनीं कलकत्त्याजवळ बेलूरला व हिमालयांत अल्मोराजवळ मायावतीला असे दोन मठ स्थापिले. तेथें प्लेग, दुष्काळ वगैरेंत मदत करण्याचें काम चाले व गीता वगैरेंचा प्रचारहि होई. दरिद्रनारायणाची सेवा हा यांचा त्या वेळीं मुख्य संदेश होता. म. गांधींनीं यांच्या या दरिद्रनारायण शब्दाला विशेष प्रसिद्धि दिली.

१८९९ च्या सुमारास हे पुनः अमेरिकेस जाण्यास निघाले. पण शरीर मधुमेहानें पोखरलेलें, पूर्वीचा उत्साह ओसरलेला व भाषणांतहि पूर्वीचें तेज प्रगट होईना. तेव्हां मधूनच सिलोनपासून हे परत फिरले व लवकरच समाधिस्थ झाले. बेलूर येथें रामकृष्ण परमहंसांच्या शेजारीं यांची समाधि आहे. तेथें हे

राहत असलेली खोली जशीच्या तशीच राखण्यांत आली असून तेथें यांच्या निजण्याची गादी, फेटा, अलखल्ला (कफनी), कानटोपी, कमंडलू, हुक्का वगैरे जिनसा जशाच्या तशा राखल्या आहेत.

यांनीं बुद्धिवाद्यांचें बंड मोडलें आणि बुद्धीच्या पलीकडे असलेल्या अध्यात्माची जगाला ओळख करून दिली. बुद्धिवादानें मनुष्य प्रकृतीचा गुलाम बनतो आणि अध्यात्मानें प्रकृति मनुष्याची गुलाम बनते, हा सिद्धान्त यांनीं जुन्या परंपरेला धरून पण नव्या पद्धतीनें लोकांपुढें मांडला. जुन्या काळांत शंकराचार्यांनीं जें कार्य केलें तेंच अर्वाचीन कालांत जागतिक दृष्टीनें यांनीं केलें.

इंग्रजी राज्य प्रस्थापित झाल्यावर भारताच्या आधुनिक युगास या गुरुशिष्यांनीं सुरुवात केली. राजकारणाला आध्यात्मिक करण्याची पहिली घोषणा यांचीच. तिचाच पुनरुच्चार ना. गोखले व म. गांधी यांनीं केला. सनातन वैदिक धर्मांतील उज्वल तत्त्वांचें समर्थन करीत आणि स्वाभिमानाला चालना देत यांनीं अध्यात्माचें उज्वल स्वरूप जगाच्या निदर्शनास आणलें. सेवा आणि सर्वधर्मैक्य हा यांचा महत्त्वाचा संदेश होय.

रामकृष्ण वेदांत मठ बेलूर (कलकत्ता) या संस्थेची यांनीं रामकृष्णांच्या तत्त्वाचा प्रसार करण्यासाठीं स्थापना केली (१८९९ जाने. २). परंतु पुढें यांच्या मृत्यूनंतर शिष्यशाखा तयार करणें व प्रचार करणें हीं दोन्ही कार्यें एकाच संस्थेकडून होणें कठीण जाऊं लागलें. तेव्हां तत्त्वप्रचाराच्या दृष्टीनें 'रामकृष्ण मिशन' या निराळ्या संस्थेची स्थापना करण्यांत आली (१९०९ मे ४).

या दोन संस्थांशिवाय सर्व जगभर यांच्या वेदान्तविषयक तत्त्वज्ञानाचा प्रसार करणाऱ्या संस्था स्थापन झाल्या. त्यांपैकीं हिमालयांतील अलमोऱ्याजवळील मायावती येथें असणारी 'अद्वैताश्रम' ही संस्था प्रमुख होय. यांचीं लहानमोठीं व्याख्यानें, प्रवचनें यांचा संग्रह त्यांनीं Complete Works of Swami Vivekananda या नांवानें सात खंडांत प्रसिद्ध केला असून त्याशिवाय हे व रामकृष्ण यांचे निरनिराळ्या लेखकांनीं विविध दृष्टिकोनांतून लिहिलेले अनेक चरित्रग्रंथ त्यांनीं प्रसिद्ध केले आहेत. त्या संस्थेतर्फे 'प्रबुद्ध भारत' हें इंग्रजी मासिकहि चालविलें जातें (सुरुवात १८९६).

यांशिवाय वेदान्त केसरी (मासिक, मद्रास), मॉर्निंग स्टार (साप्ताहिक, पाटणा) या इंग्रजी व उद्बोधन, विश्ववाणी (बंगाली), समायन (हिंदी), श्रीरामकृष्ण-विहाय (तामीळ), प्रबुद्धकेरळम् (मल्याळम्) या देशी पत्रांमार्फत यांच्या तत्त्वाचा प्रचार हिंदुस्थानांतील निरनिराळ्या ठिकाणांहून केला जातो. याशिवाय The Voice of Truth (मलाया), The Message of the East (अमेरिका), Work (ब्राझील), Thought (पोर्तुगाल) असा आंतरराष्ट्रीय पसारा यांच्या वेदान्ताच्या प्रचारानें व्यापला आहे. सिलोनमधील विवेकानंद सोसायटीतर्फे नवांपेक्षां अधिक शाळा व ब्रह्मदेशांतील सोसायटीतर्फे हॉस्पिटल्स चालविलीं जातात. अमेरिकेंतहि सानफ्रान्सिस्को, क्रेसन्टा, सॅन ॲन्टन व्हॅली, पोर्टलॅन्ड, बोस्टन, न्यूयॉर्क इत्यादि ठिकाणीं यांच्या सोसायटीच्या शाखा आहेत. पोर्तुगालमध्येंहि यांची चळवळ जोरांत असून तेथील लोकांनीं The Gospel of Shri Ramkrishna व यांचा राजयोग इत्यादि ग्रंथांचा पोर्तुगीजमध्यें अनुवाद केला आहे. The Circle of the Communication of Thought या अनेक हजारांनां सभासद असणाऱ्या संस्थेंतहि वेदान्ताचा अभ्यास मोठ्या आस्थेनें केला जातो.

यांचे ग्रंथ—(1) Raja-Yoga, (2) Jnana Yoga, (3) Karma-Yoga, (4) Bhakti-Yoga, (5) Chicago Addresses, (6) Essentials of Hinduism, (7) My Master, (8) In Defence of Hinduism, (9) The Modern India, (10) The East and the West, (11) Practical Vedanta, (12) Discourses on Jnana-Yoga, (13) Vedanta Philosophy, (14) Lectures from Colombo to Almora, (15) Six Lectures on Raja-Yoga, (16) Religion of Love, (17) A Study of Religion, (18) Realization and its Methods, (19) याशिवाय पत्रें, खाजगी भाषणें इत्यादींचे विविधसंग्रह.

Complete Works of Swami Vivekananda चें संपूर्ण मराठींत भाषांतर मुंबईच्या कर्नाटक पब्लिशिंग हाउसनें प्रसिद्ध केलें आहे.

विश्वेश्वरय्या, सर मोक्षगुंडम्—(जन्म इ. स. १८६१ सप्टें. १५) सुप्रसिद्ध स्थापत्यविशारद, औद्योगिक युगाचे अग्रदूत व अभिनव कल्पनांचे जनक.

म्हैसूरजवळील कोलार हें यांचें जन्मस्थान. जात ब्राह्मण. यांचे आईबाप गरीब पण अत्यंत धार्मिक होते. १८८१ सालीं बंगलोरच्या सेंट्रल कॉलेजांतून यांनीं पदवी घेतली व म्हैसूर सरकारच्या शिष्यवृत्तीनें हे पुण्याच्या एंजिनियरिंग कॉलेजातून एल्. सी. ई. परीक्षेंत पहिले आले.

प्रथम मुंबई इलाख्याच्या पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटच्या असि. एक्झिक्युटिव्ह एंजिनियरची जागा यांना देण्यांत आली. इकडील जिल्ह्यांत कालव्यांच्या कामाचा अनुभव घेत हे मुंबई सरकारचे सॅनिटरी एंजिनियर झाले. सिमला इरिगेशन कॉन्फरन्स (१९०४)मध्यें हे मुंबई इलाख्याचे प्रतिनिधि होते. पुढें एडन शहराचा पाणीपुरवठा व सफाई यांची योजना यांनीं तयार केली (१९०७).

पुण्यानजीक खडकवासल्याच्या धरणाला लावलेले आपोआप उघडणारे कळसूत्री दरवाजे यांनीं प्रथम तयार केले. आतां त्या कल्पनेचा उपयोग पनामा कालव्यांतसुद्धां करण्यांत आला आहे. नीरा कालव्यांत उपयोजिलेल्या ब्लॉक सिस्टिमची मूळ कल्पनासुद्धां यांचीच असून सर जॉन मॅकेंझीसारख्यांनीं यांच्या या कार्यांतील श्रेयास मान्यता दिली आहे. महाराष्ट्रांत काम करीत असतां न्या. रानडे, ना. गोखले व न. चिं. केळकर यांशीं यांचा विशेष परिचय झाला. सेवानिवृत्त झाल्यावर हैदराबाद राज्यांत सल्लागार म्हणून काम केल्यावर म्हैसूर राज्यांत मुख्य एंजिनियर म्हणून यांची नेमणूक झाली (१९०९).

तीन वर्षांनंतर यांना म्हैसूर राज्याचे मुख्य दिवाण नेमण्यांत आलें. आपल्या कारकीर्दींत संस्थानांतील प्रत्येक खात्यांत यांनीं बदल घडवून आणला आणि नवचैतन्य उत्पन्न केलें. म्हैसूरचें अर्थशास्त्रीय पुनरुज्जीवन हें यांच्या तेथील कर्तृत्वाचें सार आहे. नव्या प्रचंड योजना पद्धतशीर आंखून त्या व्यवहारांत उतरविण्यांत यांचें विशेष कौशल्य दिसून येतें. यांनीं तेथें १ उद्योग-धंदे व व्यापार यांची वाढ, २ आर्थिक कुचंबणा नष्ट करणें, ३ शिक्षणप्रसार व आत्मविश्वास यांची वाढ, ४ संघटन, संशोधन व उत्कर्ष करण्याकडे प्रवृत्ति वाढविणें, अशीं अनेक कामें केलीं. हें करण्याकरितां यांनीं योजना आंखल्या आणि त्या वेळापत्रकाप्रमाणें पार पाडल्या. राज्याच्या प्रत्येक खात्यावर आपल्या लष्करी शिस्तीचा आणि चोख वर्तनाचा ठसा यांनीं उमटविला. बंगलोर कॅन्टोन्मेन्टच्या शिलकी उत्पन्नापैकीं तीन लक्षांचें उत्पन्न यांच्या मध्यस्थीनें म्हैसूर सरकारला मिळालें. १८८१ मध्यें हिंदुस्थान सरकारशीं झालेला अपमानकारक तह यांच्याच मध्यस्थीनें दुरुस्त झाला.

यांनीं कावेरी नदीचा बंधारा वाढवून कृष्णराजसागर तलावाला प्रचंड स्वरूप दिलें. दोन कोट रुपये खर्च करून काढलेल्या कालव्यांनी दीड लक्ष एकर जमीन भिजती केली. पूर्वीपेक्षां शिवसमुद्र धबधब्यांतून दसपट पाणी पडण्याची व्यवस्था करून विजेचा पुरवठा भरपूर केला आणि त्याच्या शेजारीं 'वृंदावन' उद्यान उभारलें. यांनीं खोदलेल्या कालव्यांमुळें म्हैसूरच्या पठाराला सर्वत्र पाणीपुरवठा होऊन म्हैसूर व बंगलोर हीं शहरें उद्यान-नगरें बनलीं.

नवी राज्यघटना, सडका, वीज, विद्यापीठ, चामराज राजेन्द्र टेक्निकल व मेकॅनिकल एंजिनियरिंग स्कूल, साबण, तेलें, कागद वगैरेंचे कारखाने आणि भद्रावती आयर्न वर्क्स नांवाचा लोखंडी सामानाचा कारखाना इत्यादि अनेक योजना आंखून त्या प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याचें काम यांनीं केलें व तदनुषंगानें इतर अनेक व्यवसाय सुरू केले.

दिवाण रंगाचार्लूनीं म्हैसूरला राज्यघटनेचे धडे दिले, के. शेषाद्रि अय्यरनीं तिला स्थैर्य आणलें व यांनीं तिचें रूपान्तर आदर्श राज्यघटनेंत केलें, असें म्हणतात तें यथार्थ आहे.

यांच्या या विशेष प्रकारच्या दृष्टीमुळें व यशस्वी योजकतेमुळें हिंदुस्थान सरकारच्या व हिंदुस्थानांतील बहुतेक अर्थशास्त्रीय व औद्योगिक घटना यांच्या सल्ल्याशिवाय पार पडत नाहींत. या दृष्टीनें यांना जगप्रसिद्ध असें यथार्थतेनें म्हणतां येईल.

यांचे ग्रंथ—(1) Reconstructing India (1912), (2) Planned Economy for India (1934), (3) Unemployment in India, (4) Nation-building, (5) District Developement Scheme, (6) Prosperity through Industry, इत्यादि.

विष्णुदास महाराज माहुरकर—(जन्म स. १८४४-समाधि स. १९१७) मराठवाड्यांतील प्रसिद्ध सत्पुरुष व कवि.

यांचा जन्म सातारा येथील धांदरफळे घराण्यांत झाला. विवाह झाल्यावर एक वर्षानें हे दत्तदर्शनार्थ

घरांतून निघून गेले. यांना बासर येथील श्रीसरस्वतीचा प्रसाद झाल्यावर काव्यस्फूर्ति झाली. यांना रेणुकामाता नेहमीं ओ देत असे व सगुणदर्शन देई, असे उल्लेख यांच्या काव्यांत सर्वत्र आहेत. यांची कविता भक्ति, प्रेम यांनीं भरलेली व ज्ञानोत्तर भक्तिपर आहे. यांनीं लावण्याहि अप्रतिम केल्या आहेत. यांचें चरित्र व कवितेचे दोन खंड नरहरशास्त्री खरशीकर यांनीं प्रसिद्ध केले आहेत.

विष्णुबुवा ब्रह्मचारी—(जन्म स. १८२५–मृत्यु स. १८७१) ख्रिस्ती मिशनऱ्यांना प्रारंभीं तोंड देणारे हिंदुमिशनरी व स्वतंत्र विचाराचे गृहस्थ.

यांचें समग्र नांव विष्णु भिकाजी गोखले. यांचें गांव शिरवली (ता. राजापुरी, जि. ठाणें, पेटा निजामपूर). हे वडिलांचें दहावें अपत्य. वडील पांचवे वर्षी वारले. थोडें घरगुती शिक्षण झाल्यावर गुरें चारणें, दुकान, जकातनाकें वगैरे ठिकाणीं नोकरी केल्यावर विसावे वर्षी उपरति होऊन यांनीं सप्तशृंगीच्या डोंगरावर तपश्चर्या केली. 'पाखंड मतांचें खंडन करून वैदिक धर्माची पुनः स्थापना करण्याचा आदेश' यांना मिळाला (वेदोक्तधर्मप्रकाश पा. ७३८). हा ईश्वरी प्रसाद झाल्यावर पंढरपुरीं विठ्ठलाच्या मंडपांत यांनीं भावार्थ-रामायणाचीं तीन पारायणें केलीं, भावार्थसिंधु हा ओंवीबद्ध ग्रंथ प्रसिद्ध केला (१८५६) व महाराष्ट्रभर व्याख्यानें देऊन हे मुंबईस आले.

तेथें ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या आक्षेपाला उत्तर देण्याकरितां दर शनवारीं प्रभु लोकांच्या विद्यालयांत व्याख्यानें देण्यास यांनीं सुरवात केली व इतर अनेक ठिकाणीं वादविवाद केले. तेथें एक आणा दर ठेवूनहि पोलिस बंदोबस्त ठेवण्याइतपत गर्दी होई. बंदिस्त जागेंत अस्पृश्य व ख्रिस्ती यांना येण्यास हरकत होते, असें पाहून यांनीं समुद्रकिनाऱ्यावर व्याख्यानें देण्यास सुरवात केली. ५७ च्या बंडांत यांना व्याख्यानें देण्यास बंदी झाली तेव्हां यांनीं आपला वेदोक्तधर्मप्रकाश हा ग्रंथ प्रसिद्ध केला. पुढें हे मद्रास, कलकत्ता वगैरेकडे हिंडले. हे मुसलमान, ख्रिस्ती वगैरे कोणाच्याहि हातचें उघडपणें खात. यांनीं आपलें म्हणणें सर्वत्र भाषण, लेखन, मुद्रण वगैरे द्वारां पोंचविण्याचा प्रयत्न केला; पण स्वतंत्र संस्था मात्र काढलेली नाहीं.

हे गौर, धडधाकट व प्रसन्न मुद्रेचे गृहस्थ मोठे लहरी होते. तथापि सर जमशेदजी जिजीभाई, जनार्दन रामचंद्रजी वगैरे पुष्कळ लोक यांचे चहाते असत. पुढें भगवद्गीतेवरील सेतुबंधनी टीकेचा अठरावा अध्याय लिहिण्याचें काम चालू असतां हे काळपुळींनें मृत्यु पावले.

वेडरबर्न, विल्यम—(जन्म स. १८३६ मार्च २५–मृत्यु स. १९१८ मार्च २५) राष्ट्रसभेचे अध्यक्ष व हिंदुस्थानचे हितेच्छु.

इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधील आपली नोकरी सोडून हे सार्वजनिक कार्यांत शिरले. मि. ह्यूम यांना यांनीं कॉंग्रेस स्थापण्यांत बरीच मदत केली. इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या ब्रिटिश कमेटीशींहि यांचा संबंध होता. १८८९ (मुंबई) व १९१० (अलाहाबाद) कॉंग्रेसचे हे अध्यक्ष होते. मि. ह्यूम यांच्या चरित्राशिवाय अग्रिकल्चरल बँकस, ग्रामपंचायत इत्यादि हिंदी प्रश्नांबद्दल यांनीं बरेच ग्रंथ लिहिले आहेत. आपल्या कार्यनिवृत्तीनंतर हे दरवर्षी एक हजार पौंड हिंदी कार्यासाठीं हिंदुस्थानला पाठवीत.

वेब, अल्फ्रेड—(मृत्यु स. १९०८) सुप्रसिद्ध आयरिश पुढारी व हिंदुस्थानच्या राष्ट्रसभेचे अध्यक्ष.

हे पार्लमेंटचे सभासद होते. सर उमेशचंद्र बानर्जी व दादाभाई नवरोजी यांचे पार्लमेंटमधील प्रचारानें हिंदी प्रश्नाकडे यांचें लक्ष वेधलें. १८९८ सालच्या मद्रास कॉंग्रेसचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें.

वैद्य, गजानन भास्कर—(जन्म स. १८६७–मृत्यु स. १९२१) मुंबईच्या हिंदुमिशनरी सोसायटीचे संस्थापक, आद्य हिंदुमिशनरी, शुद्धीचे पुरस्कर्ते व वक्ते.

जात प्रभु. यांचें शिक्षण मुंबईस झालें. हे बी. ए. होते (१८९३). हे १८९८ पासून मुंबईस थिऑसाफीचा प्रचार करीत. यांचें वक्तृत्व प्रभावी असे. मुंबईचे बातमीदार म्हणून अनंत नीळकंठ पिटकर व हे केसरींत 'अनंत' या सहीनें प्रचलित विषयांसंबंधीं लिहीत. त्यामुळें हे अत्यंत लोकप्रिय झाले. दादाभाई नवरोजी वगैरे मंडळींनीं काढलेल्या स्टुडन्ट लिटररी व सायन्टिफिक सोसायटीच्या विद्यालयांत हे अध्यापकाचें काम करीत (१९०४-१९२१). तेथें यांची व कु. कमलाबाई कीर्तिकर यांची ओळख झाली व तिचें विवाहांत रूपान्तर झालें (१९०५). मुंबई, मराठी ग्रंथसंग्रहालयाचे हे २१ वर्षें अध्यक्ष होते (१८९९-१९२०).

शंकराचार्य वगैरे लोक विनंति करूनहि पुढाकार घेईनात, तेव्हां यांनीं हिंदुधर्मांत शुद्ध करून लोक घेतां यावेत म्हणून हिंदुमिशनरी सोसायटीची स्थापना केली (१९१७ जुलै ५), हिंदु मिशनरी हें साप्ताहिक काढलें आणि परधर्मांत गेलेले आणि परधर्मात जन्मलेले शंभर स्त्रीपुरुष शुद्ध करून हिंदुधर्मांत घेतले. तेव्हांपासून महाराष्ट्रांत या कार्याला चांगलें प्रोत्साहन मिळालें. वि. कों. ओक यांच्यानंतर बालबोध मासिकाचें संपादकत्व पत्करून पंचावन्न अंक काढले. हे मोठे वादविवादकुशल होते. यांच्या लिहिण्याबोलण्यांत मोठा मार्मिकपणा असून तें परिणामकारक असे. 'देवा जगीं वाढवि हिंदुधर्म' या पालुपदाचे यांचे श्लोक प्रसिद्ध आहेत.

यांचे ग्रंथ—१ रेखात्मक यथादर्शन चित्रविद्या, २ प्रश्नोपनिषद, ३ देहदान मीमांसा, ४ विष्णूचे अवतार (बेझंटबाईंच्या अवतार या व्याख्यानाचें भाषान्तर), ५ हितोपदेशकथा, ६ विक्रमोर्वशीयम्, ७ सनातनधर्म-विचार, ८ सनातनधर्मसंवाद, ९ आश्रम व आश्रमधर्म, १० उपनयनविधि, ११ वैदिक विवाहविधि वगैरे.

वैद्य, भारताचार्य चिंतामण विनायक—(जन्म स. १८६१–मृत्यु स. १९३८ एप्रिल २०) सुप्रसिद्ध पंडित, मराठी व इंग्रजी भाषेंतील लेखक, इतिहाससंशोधक व अभ्यासक.

यांचा जन्म कल्याण येथें व शिक्षण मुंबई येथें होऊन अनेक पारितोषिकें व शिष्यवृत्त्या मिळवीत हे एम्. ए., एलएल्. बी. झाले. यांनीं प्रथम पुण्यास वकील, नंतर उज्जयनीस जज्ज (१८८७), पुढें ग्वाल्हेर येथें हायकोर्टातील मुख्य न्यायमूर्ति म्हणून काम केलें (१८९६-१९०५).

यांचा विद्याव्यासंग सतत चालू असे. यांनीं मराठी व इंग्रजी भाषेंत फुटकळ व ग्रंथरूपानें पुष्कळ लेखन केलें आहे. भारत इतिहास संशोधक मंडळाचे अनेक वर्षे अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष (१९०८, पुणें) व टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु व कुलपति होते. यांना या विद्यापीठानें विद्वत्कुलशेखर ही पदवी दिली होती. तसेंच पुण्याच्या वैदिक संशोधन मंडळाचे हे संस्थापक व अध्यक्ष होते.

यांच्या ग्रंथांशिवाय इतस्ततः प्रसिद्ध झालेल्या कांहीं निबंधांचें संकलित पुनर्मुद्रणहि झालें आहे.

यांचे ग्रंथ—मराठी–१ श्रीरामचरित्र, २ श्रीकृष्ण-चरित्र, ३ महाभारताचा उपसंहार, ४ मध्ययुगीन भारत (भाग १-३); कादंबरी–दुर्दैवी रंगू; नाटक–संयोगिता, धार्मिक हिंदु-धर्माचें स्वरूप.

इंग्रजी–(1) History of Sanskrit Literature (वैदिक काल), (2) Riddle of the Ramayana, (3) History of Medieaval Hindu India (4) Mahabharata a Criticism, (5) Epic India, (6) Shivaji, the Founder of Maratha Swaraj इत्यादि.

व्यास, नारायण गणेश—(जन्म स. १९०२) सुप्रसिद्ध गवई.

जन्मस्थान कोल्हापूर. जात दे. ऋ. ब्राह्मण. यांनीं पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांचे हाताखालीं गायन, वादन व नृत्यकला यांचें शिक्षण घेतलें. १९२३ पासून यांनीं जलसे करण्यास सुरवात करून परप्रान्तांत श्रेष्ठ प्रतीचा मान मिळविण्यास सुरवात केली. प्रथम अहमदाबाद येथें संगीत विद्यालय काढलें व १९२७ सालीं हे मुंबईस आले.

यांचा आवाज बारीक, सुरेल, मधुर व सहज कंप असलेला आहे. आवाजावर यांचा ताबा असून यांचा दम चांगला टिकतो. हे ख्याल, ध्रुपदें, ठुंबऱ्या, तराणे व भजनें गात असले तरी यांची गायकी मधुर व पल्लेदार तानांनीं अत्यंत लोकप्रिय झालेली आहे.

व्हिक्टोरिया, महाराणी—(जन्म स. १८१९ मे २४–मृत्यु स.१९०१ जाने. २२, कारकीर्द स. १८५८-१९०१) हिंदुस्थानची दैवशाली महाराणी.

ही तिसऱ्या जॉर्जच्या चवथ्या मुलाची मुलगी. हिला नऊ अपत्यें झालीं. हिनें १८५७ सालच्या बंडानंतर सुप्रसिद्ध राणीचा जाहीरनामा काढून धर्मांत ढवळाढवळ न करण्याचें आश्वासन दिलें व हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें हातांत घेतलीं (१८५८). १८७६ सालीं या बादशाह झाल्या. यांची प्रेमळ व निर्मळ मनाची महाराज्ञी अशी ख्याति होती.

श

शाहसुलेमान, सर मुहम्मद—(जन्म स. १८८६–मृत्यु स. १९४१ मार्च १२) जगप्रसिद्ध गणितज्ञ व संशोधक.

यांचें जन्मस्थान जोनपूर. अलाहाबाद युनिव्हर्सिटीच्या बी. ए. परीक्षेंत पहिले आल्यामुळें यांना शिष्यवृत्ति मिळून इंग्लंडला जातां आलें. केम्ब्रिजच्या ख्राइस्ट चर्च कॉलेजमध्यें गेल्यावर यांना ट्रायपास मिळाला व हे डॉक्टर ऑफ लॉ झाले. १९११ मध्यें हिंदुस्थानांत येऊन यांनीं वकिलीचा धंदा केला (१९१२-२०). नंतरचीं बारा वर्षें हे निरनिराळ्या प्रमुख ठिकाणीं न्यायाधीश होते.

अलाहाबाद हायकोर्टाचे प्रमुख (१९३२-३७) व फेडरल कोर्टाचे न्यायाधीश होण्याचा मानहि यांना मिळाला (१९३७).

यांना सरकारनें सर ही पदवी देऊन गौरविलें (१९२९). अलीगढ मॉस्लेम युनिव्हर्सिटीचे व्हाइस-चान्सेलर व नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्स ऑफ इंडियाचे अध्यक्ष (१९३८-१९४०) वगैरे अनेक मान यांना मिळाले. बुद्धिबळें खेळण्यांत हे अत्यंत निष्णात असून यांना केम्ब्रिजविरुद्ध ऑक्सफर्ड सामन्यांत हाफ ब्ल्यू मिळालें होतें.

प्रथमपासूनच गणित व फिजिक्स या विषयांची यांना आवड असे. पुढें आइन्स्टाइनच्या सापेक्षता सिद्धान्ताकडे यांचें लक्ष लागलें. तदनुसार यांनीं गणितशास्त्रांतील 'न्यू रिलेटिव्हिटी' या तत्त्वाचा शोध लावला. या महत्त्वाच्या शोधावर इंग्लंडमध्यें यांचीं व्याख्यानें झालीं (१९३९). तेथील गणितज्ञांनीं यांच्या या शोधाचें अत्यंत कौतुक केलें.

न्यूटनचे गणितविषयक सिद्धान्त व मतें सुप्रसिद्ध जर्मन ज्यू गणितज्ञ आइन्स्टाइन यांच्या शोधामुळें सदोष व अपुरीं ठरलीं. त्याच्या रिलेटिव्हिटीच्या सिद्धान्तानें न्यूटनच्या मेक्यानिकसची जागा घेतली व शास्त्रज्ञांच्या अवकाश (space), काळ (time) आणि गति (motion) यांच्या कल्पनेंत क्रान्ति घडवून आणली. हे सिद्धान्त प्रत्यक्ष प्रयोगानेंच पुढें मांडल्यामुळें जगाला मान्यच करावे लागले. गुरुत्वाकर्षणाची क्रिया स्थिर आहे कीं गतिमान् आहे हें समजण्याचा न्यूटनच्या सिद्धान्ता-प्रमाणें कांहींच उपयोग नसे. शास्त्रीय भाषेंत गुरुत्वाकर्षणाची गति अनन्त (infinite) आहे, असें समजून समाधान मानावें लागे.

परंतु यांनीं ही गति अमर्याद मानण्याचे कांहींच कारण नसल्याचें सिद्ध केलें. गुरुत्वाकर्षणाच्या न्यूटनच्या समीकरणांत यांनीं थोडा फरक सुचवून तें समीकरण दुरुस्त केलें. Retarded Potential च्या तत्त्वाचें प्रमाण न्यूटनच्या सिद्धान्ताला लावून यांनीं नवीन समीकरण तयार केलें आणि तें आइन्स्टाइनच्या सूर्याच्या ग्रहमालेच्या (System of Solar Planets) समीकरणाशीं यांनीं जमवून दाखविलें.

प्रवाही पदार्थांतून जाणाऱ्या प्रकाशकिरणांच्या गतीचें जें मूल्य आइन्स्टाइननें काढलें तेंच यांनीं आपल्या नवीन सिद्धान्तानुसार न्यूटनच्या सिद्धान्तांतून काढून दाखविलें. परंतु प्रकाशाप्रमाणें अत्यंत गतिमान् असणाऱ्या वस्तूबाबत यांचें समीकरण आइन्स्टाइनपेक्षां थोडें निराळें आहे. या थोड्या फरकामुळें प्रत्यक्ष परिणामांत मात्र अत्यंत फेर दिसून येतो. सूर्याच्या गुरुत्वाकर्षणाचा प्रकाशाच्या गतीवर बराच परिणाम घडतो. १९ जून १९३६ च्या ग्रहणापूर्वी आइन्स्टाइनच्या गणितापेक्षां प्रकाशाच्या गतीचें मूल्य अधिक येणार असल्याचें यांनीं छातीठोकपणें जाहीर केलें होतें.

सूर्याच्या कडांजवळ असलेल्या ताऱ्यांचे प्रकाशकिरण सूर्याच्या आकर्षणानें किंचित् बाकदार होतात. हा बाक सूर्यग्रहणाच्या वेळींच दिसणें शक्य असतें व तेव्हांच त्यासंबंधीं प्रयोग करण्यास अवसर मिळतो. हा बाक न्यूटनपेक्षां आइन्स्टाइनच्या गणिताप्रमाणें दुप्पट व यांच्या गणितानें त्यापेक्षांहि $\frac{1}{7}$ नें जास्त आहे. पूर्वी हा पाहण्यांतला दोष आहे, असें समजलें जात असे.

१९३६ च्या ग्रहणापूर्वी यांनीं आपले गणित आगाऊ प्रसिद्ध केल्यानें जपानमधून दिसणारें तें ग्रहण पाहण्यासाठीं तिकडे हिंदुस्थानसरकारनें शास्त्रज्ञ रवाना केले. गुरुत्वाकर्षणालाहि कांहीं गति असते, या यांच्या शोधामुळें न्यूटनच्या सिद्धान्ताच्या पुढील संशोधनाला उपयुक्त असें पाऊल पडलें आहे.

शांताराम, व्ही.—(जन्म स. १९०० सुमार) हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक व संकलक.

यांचें नांव शांताराम राजाराम वणकुद्रे. हे मूळचे कोल्हापूरचे. श्री. बाबुराव पेंढारकर, भालजी पेंढारकर, विनायक, व्ही. अवधूत ही आज चित्रपटसृष्टीशीं निगडित झालेली मंडळी यांची निकटचे नातेवाईक आहेत.

बाबुराव पेंटर यांच्या हाताखालीं शिक्षण घेऊन जीं माणसें पुढें आलीं त्यांत हे व कै. विष्णुपंत दामले, शेख फत्तेलाल, केशवराव धायबर ही मंडळी प्रमुख होत. याच लोकांनीं पुढें श्री. कुलकर्णी यांच्या आर्थिक सहकार्यानें प्रभात फिल्म कंपनीची स्थापना केली (१९२९). कै. विष्णुपंत दामले ध्वनिलेखन, शेख फत्तेलाल कलादिग्दर्शन, केशवराव धायबर छायाचित्रण व हे दिग्दर्शन व संकलन अशी यांची तेथील कामाची वांटणी असे.

मूकपटाच्या शेवटच्या व बोलपटाच्या सुरवातीच्या जमान्यांत अयोध्येचा राजा (१९३२), सिंहगड (१९३३), अमृतमंथन (१९३४) हे त्या वेळीं यशस्वी झालेले चित्रपट प्रभातनें तयार केले तरी संत तुकारामनें प्रभातमध्यें एक नवें युग सुरू झालें (१९३८). यांचेकडे सामाजिक व दामले, फत्तेलाल यांचेकडे पौराणिक अशी प्रभातची दुहेरी आघाडी सुरू झाली व यानंतरचीं प्रभातचीं पांचसहा वर्षें अतिभरभराटीचीं गेलीं.

कुंकू, माणूस व शेजारी हे यांचे प्रमुख सामाजिक चित्रपट होत. कथा व तंत्र यांचा अद्ययावतपणा व यांचें रेखीव व प्रतीकात्मक दिग्दर्शन यांमुळें हे तीनहि चित्रपट अतियशस्वी ठरले. कुंकूंतील मोडकें घड्याळ, माणुसमधील दोनशें पंचावन हा आंकडा किंवा शेजारींतील हुक्का, अडकित्ता हीं यांनीं योजलेलीं प्रतीकें परिणामकारक होतीं.

सामाजिक चित्रपटाइतकेंच यश प्रभातच्या संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर किंवा रामशास्त्री या ऐतिहासिक चित्रपटांनीं मिळविलें. महाराष्ट्रांतील संतांच्या स्मृतीला व त्यांच्या अभंगांना उजाळा देण्याचें काम या चित्रांनीं केलें. बुद्धी व भावना यांच्या या चित्रांतील मिश्रणामुळें न्यू थिएटर्स, तेलगु कंपन्या व पुढें यांच्याच पाउलावर पाऊल टाकून काढण्यांत आलेल्या संतपटांपेक्षां प्रभातचे चित्रपट वेगळेच राहिले.

हिंदी चित्रपटांना एक नवें वैशिष्ट्यपूर्ण वळण लावण्याचें काम प्रभातनें केलें. पाश्चात्य चित्रतंत्राला हिंदी ध्येयवादाची जोड दिल्यानें यांचे चित्रपट सर्वत्र लोकप्रिय झाले. समाजांतील विवाद्य प्रश्न परिणामकारक रीतीनें मांडण्यासाठीं यांनींच प्रथम चित्रपटमाध्यमाचा उपयोग केला. कुंकुमधील अन्यायप्रतिकाराचा, शेजारीमधील हिंदुमुसलमान ऐक्याचा किंवा संत ज्ञानेश्वरमधील मानवधर्माचा प्रचार स्पष्ट पण कलेला बाध न आणणारा आहे.

१९४१ सालीं यांनीं प्रभात फिल्म कंपनी सोडली व मुंबईला राजकमल कलामंदिराची स्थापना केली.

तेथें यांनीं शकुंतला, डॉ. कोटनीस वगैरे चित्रपट तयार केले. यांपैकीं डॉ. कोटनीसमध्यें तर हे व यांच्या पत्नी जयश्री यांनीं नायकनायिकेच्या भूमिका पार पाडल्या.

शिवाजीमहाराज, तंजावर—(जन्म स.१८३३–मृत्यु स. १८५५ आक्टो. २९) तंजावरच्या भोसले घराण्यांतील शेवटचे राजपुरुष.

स. १७९९ च्या तहान्वयें नेमणुकीदाखल व वसुलाच्या ५ व्या हिश्शाबद्दल यांना सालीना दहा लक्ष, ऐंशी हजार, नऊशें त्र्याण्णव रुपये मिळत. हे उदार दाते असल्यानें यांना लोक 'कर्ण' म्हणत. यांनीं पुत्रप्राप्तीकरितां वीस लग्नें केलीं; पण निपुत्रिक वारल्यानें डलहौसीनें यांचें राज्य खालसा केलें. यांच्या मुलीची मुलगी सयाजीराव गायकवाडांची पत्नी. तिचे नातू प्रतापसिंह हे बडोद्याचे महाराज होत. यांचें राज्य खालसा झालें तरी तंजावर येथें दत्तकवंश चालू आहे.

शिंदे, जनरल-नानासाहेब गणपतराव—(जन्म स. १८७६) सुप्रसिद्ध युद्धशास्त्रतज्ज्ञ व मराठी लेखक.

जन्मस्थान पेडांबें (ता. चिपळूण). यांचें घराणें बडोद्यास स्थायिक झालेलें आहे. बडोदें फौजेंत लेफ्टनंट म्हणून कायम झाल्यावर चढत जाऊन हे जनरल होऊन सेवानिवृत्त झाले. संस्थानतर्फे ए. डी. सी., पोषाख, सोन्याचें घड्याळ व राजरत्नसुवर्णपदक यांना मिळालें. यांनीं अनेक कमिट्यांवर कामें केलीं. श्रीसयाजीराव मराठा स्कॉलरशिप कमेटीचे हे सेक्रेटरी होते. मराठींत यांचें फुटकळ लेखनहि पुष्कळ आहे. तलवार आणि लेखणी सारख्याच लीलेनें खेळविणारे म्हणून यांची प्रसिद्धि आहे.

यांचे ग्रंथ—इंग्रजी–१ बडोदा आर्मी डिसिप्लीन ॲक्ट, २ रूल्स, ३ बडोदा आर्मी रेग्युलेशन व्हा. १-२, ४ औटपोस्ट, अडव्हान्स, रियरगार्ड्स फॉर इन्फन्ट्री, ५ गार्ड्स् फॉर कॅव्हलरी (हिंदी).

मराठी–१ शिस्त, २ हिंदुस्थानचा लष्करी इतिहास, ३ मराठ्यांच्या प्रसिद्ध लढाया, ४ सुविचाररत्नमाला, ५ पानपतच्या घनघोर संग्रामासंबंधीं युद्धशास्त्रदृष्ट्या विचार, ६ बाना आणि फरीगदगा, आत्मचरित्र–७ एका शिपायाचें आत्मवृत्त.

शिंदे, महर्षि विठ्ठल रामजी—(जन्म स. १८७३–मृत्यु स. १९४४ जाने. २) सुप्रसिद्ध अस्पृश्यता-निवारक, समाजशास्त्रज्ञ, भाषाशास्त्रज्ञ व ध्येयवादी त्यागी गृहस्थ.

यांचा जन्म जमखिंडी येथें मराठा कुलांत झाला. जमखिंडी हायस्कुलांतून मॅट्रिक (१८९१) व पुणें फर्ग्युसन कॉलेजांत अभ्यास करून हे बी. ए. झाले (१८९८). फर्स्ट एल्एल्. बी. झाल्यावर यांचा ओढा प्रार्थनासमाजाकडे वळून हे त्या संस्थेचे प्रचारक झाले. पुढें याच कार्यासाठीं 'युनिटेरियन' शिष्यवृत्ति यांना मिळून हे ऑक्सफोर्ड येथील मँचेस्टर कॉलेजांत तुलनात्मक धर्माचें अध्ययन करण्यासाठीं तिकडे गेले (१९०१). लिव्हरपूल व ॲमस्टरडॅम (हॉलंड) येथें भरलेल्या युनिटेरियन परिषदेस हे हजर होते. त्या वेळीं यांनीं 'लिबरल रिलिजन इन इंडिया' हा प्रबंध तेथें वाचला (१९०३). तेथून परत आल्यावर प्रार्थना समाजाच्या प्रचाराकरितां यांनीं तीन वेळां आसेतुहिमाचल व एकदां ब्रह्मदेशमध्यें प्रवास केला (१९०३-१९०६).

पुढें यांचें लक्ष अस्पृश्यांच्या प्रश्नाकडे वेधलें आणि यांनीं 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया उर्फ भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळी' या संस्थेची स्थापना केली (१९०६). यांनीं त्या संस्थेच्या शाखा हिंदुस्थानभर उघडल्या. सर तुकोजीराव होळकर इंदूर व मुंबई सरकार यांच्या मदतीनें लाख रुपये खर्चून पुणें येथें विद्यार्थि वसतिगृह वगैरे करितां अहल्याश्रम नांवाच्या इमारती उभारल्या. सभा, जाहीरनामे, शाळा, ग्रंथ वगैरे सतत कार्य केलें आणि १९२३ सालीं हे त्या संस्थेंतून निवृत्त झाले.

हे पक्के राष्ट्रीय बाण्याचे होते. म. गांधींनीं नागपूर काँग्रेसनंतर यांना वर्किंग कमिटींत घेतलें होतें. यांनीं निवडणुकीच्या दृष्टीनें राष्ट्रीय मराठा पक्ष काढला होता तो पुढें ब्राह्मणेतर पक्षांत विलीन झाला. १९३० सालीं राष्ट्रसभेच्या चळवळींत भाग घेतल्याबद्दल यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. हे अनेक सामाजिक व शेतकरी परिषदांचे अध्यक्ष झाले. श्रीमंत सयाजीराव गायकवाड बडोदें यांचें यांना विद्यार्थिदशेपासून साहाय्य असे. जन्मभर लोकांना अप्रिय असणारें समाजसेवेचें काम केल्याबद्दल यांना त्यांनीं शेवटीं बाविसशें रुपयांचे पारितोषिक दिलें.

यांचें तात्पुरत्या समाजसुधारणेनें समाधान होण्यासारखें नव्हतें. यांना समाजांत आमूलाग्र सुधारणा पाहिजे होती. तसा हे प्रचार करीत व स्वतः आचारहि करीत. त्यामुळें यांना बहुजन समाजाचा पाठिंबा मिळणें दुर्घट होई. तथापि निष्ठेनें हे आपलें अंगीकृत कार्य करीत. अस्पृश्यतानिवारण हा यांचा हेतु, पण अस्पृश्यता ही अस्पृश्य लोक राजकीय भांडवलासारखी वापरूं लागले तेव्हां यांना त्याहि कार्यांतून अंग काढून घ्यावें लागलें. अस्पृश्यतानिवारणासंबंधीं कमालीची तळमळ, त्याकरितां त्यांच्यांत मिळूनमिसळून राहणें, अस्पृश्यता ही भांडवलासारखी वापरून त्याच्या जोरावर नोकऱ्या व हक्क मिळविण्याबद्दल निषेध वगैरे बाबत म. गांधींशीं यांचें विलक्षण साम्य आहे. यांनीं १९०० सालीं हा कार्यक्रम वर्तनांत आणला याला तर विशेष महत्त्व आहे. यांच्या या ध्येयवादी त्यागी वृत्तीमुळें यांना लोक महर्षि म्हणत. यांच्या प्रतिपादनानें सत्यशोधक समाजाला तात्त्विक बैठक मिळे.

इतिहास व भाषा यांतील यांचा व्यासंगहि नमुनेदार, मूलगामी व मार्मिक असे. यांच्या लिहिण्याबोलण्यांत माहितीचा सूक्ष्मपणा व ठसकेदारपणा आढळे. यांनीं आपलें आत्मचरित्र लिहिलें आहे. त्यावरून यांच्या वृत्तीचा चांगला परिचय होतो.

शिंदे, महाराज जनकोजीराव दौलतराव—(जन्म स. १८१६–मृत्यु स.१८४३, कारकीर्द स.१८२७ मार्च ११–१८४३ फेब्रु. ७) ग्वाल्हेर राज्याचे अधिपति.

हे दौलतरावांच्या पत्नी रखमाबाई यांच्या मांडीवर दत्तक येऊन मुगुटरावाचे जनकोजीराव झाले (१८२७). हे अल्पवयी असल्यानें दौलतरावांच्या मृत्युपत्रान्वयें बायजाबाईसाहेब आपले बंधु हिंदुराव घाटगे यांच्या मदतीनें राज्यकारभार पाहत. पण हे त्यांच्या कारभाराला कंटाळून पळाले आणि गव्हर्नर जनरल लॉर्ड

बेंटिंक यांच्याकडे गेले (१९३२ आक्टो.). त्यांनीं तडजोड करून दिली ती सातआठ महिन्यांपेक्षां अधिक टिकली नाहीं. शेवटीं सहा लक्षांची नेमणूक देऊन बायजाबाईसाहेबांना राज्यकारभारांतून मुक्त करण्यांत आलें. हे हयात असेपर्यंत त्यांनीं आपले बहुतेक दिवस दक्षिणेंत काढले.

यांचे जवळ दहा हजार पायदळ, पंधरा हजार स्वार व अडीचशें तोफा होत्या.

शिंदे, महाराज जयाजीराव जनकोजीराव— (जन्म स. १८३४–मृत्यु स.१८८६, कारकीर्द स.१८५३ जाने. १९–१८८६ जून ६) ग्वाल्हेर राज्याचे अधिपति.

जनकोजीरावांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी ताराबाई-साहेब यांनीं यांना दत्तक घेतलें आणि भगीरथरावाचें जयाजीराव असें नांव ठेविलें. यांचे नांवें कारभार सुरू झाला तेव्हां कारभार जनकोजीरावांचे मामा, मामासाहेब कदम हे पाहत होते. त्यांना प्रतिस्पर्धी दादा खासगीवाले उत्पन्न झाले. त्या दोघांचा हातघाईवर आलेला तंटा गव्हर्नर जनरलनें सैन्याच्या जोरावर मिटविला. तेव्हां रामराव फाळके यांच्या नेतृत्वाखालीं कारभार चालावा, अठरा लक्षांचा मुलूख इंग्रजांना द्यावा, त्यांचें सैन्य राज्यांत ठेवावें व स्वतःचें सैन्य ठराविक मर्यादेपेक्षां अधिक ठेवूं नये असें ठरून शिंदे सरकार इंग्रजांचे मांडलिक झाले. १८५७ च्या बंडांत हे केवळ रावराजे दिनकरराव राजवाडे यांच्यामुळें सामील झाले नाहींत. हे युद्धशास्त्राचे प्रेमी व शूर होते.

बडोद्याचे महाराज मल्हारराव गायकवाड यांच्यावर आलेल्या विषप्रयोगाच्या चौकशी कमिशनमध्यें हे होते. यांनीं त्यांना निर्दोषी ठरविलें. हे मोठे स्वाभिमानी आणि लोकप्रिय होते. यांचे पुत्र माधवराव.

शिंदे, महाराज माधवराव जयाजीराव— (जन्म स. १८७६ आक्टो. २०–मृत्यु स. १९२५ जून ५, कारकीर्द स. १८९४–१९२५) ग्वाल्हेर राज्याचे सुप्रसिद्ध अधिपति.

हे ग्वाल्हेरचे महाराज जयाजीराव यांचे एकुलते एक औरस पुत्र. यांच्या मातेचें नांव सख्याराजे. त्यांना जीजामहाराज या नांवानें लोक ओळखीत. यांचें शिक्षण प्रायः खासगी रीतीनें झालें.

हे राज्यकारभारांत जातीनें लक्ष घालीत. मुख्य प्रधान नेमून त्यावर राज्याकारभार सोपविण्याची यांची पद्धति नव्हती. हे तज्ज्ञ माणसें जवळ करीत, पण अखेरचा निर्णय स्वतःकडे राखून ठेवीत. दिवसांतून चवदाचवदा तास काम करण्याबद्दल यांची प्रसिद्धि असे.

प्रत्येक काम रेखीव व्हावें अशी यांची इच्छा असे. बारीकसारीक गोष्टीपासून महत्त्वाच्या कामापर्यंत स्वतः लक्ष घालण्याची यांची पद्धत असे आणि आपल्या मागेंहि आपल्या धोरणानें व रेखीव पद्धतीनें कारभार व खासगी व्यवहार चालावेत म्हणून यांनीं आपलें धोरण अनेक भागांत लिहून व छापून ठेवलें आहे.

यांना आपल्या पूर्वजांप्रमाणें युद्धशास्त्राची विशेष आवड असे. यामुळें यांच्या राज्याच्या वार्षिक खर्चांत युद्ध खात्यावर होणाऱ्या खर्चाची रक्कम सर्वांत जास्त असे. आपल्या संस्थानांतील सैन्य सर्व दृष्टीनें ब्रिटिश सैन्याच्या तोडीचें ठेवण्याबाबत हे दक्षता ठेवीत. १९०० सालीं चीनमध्यें व १९१४ सालीं पहिल्या महायुद्धाच्या आघाडीवर फ्रान्समध्यें हे स्वतः दाखल झाले होते. पण महत्त्वाच्या प्रसंगीं मागें ठेवण्याच्या आणि आवश्यक व पहिल्या दर्जाचीं शस्त्रास्त्रें न पुरविण्याच्या ब्रिटिश धोरणामुळें यांना मनस्ताप होई.

हे मराठी साम्राज्याचा व आपल्या घराण्याचा अभिमान बाळगणारे असून समाजसुधारणेच्या नांवाखालीं आपल्या पूर्वपरंपरेला धक्का लागेल असें कोणतेंहि कृत्य यांनीं केलें नाहीं. आपले विख्यात पूर्वज महादजी शिंदे यांच्या पुणें येथील छत्रीला प्रेक्षणीय स्वरूप यांनींच दिलें.

पुण्याच्या शिवस्मारकास जातीय स्वरूप देण्यास यांनीं विरोध केला आणि राष्ट्रपुरुष म्हणून छत्रपति शिवाजी महाराजांचें स्मारक उभारण्यांत पुढाकार घेऊन प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्तें त्या स्मारकाची स्थापना केली. कोल्हापूरच्या छत्रपति राजाराम महाराजांना त्या कामीं पुढाकार देऊन यांनीं त्या वेळीं मोठा मुत्सद्दीपणा व्यक्त केला. तसेंच आपल्या घराण्याचें पाटिलकीचें वतन लक्षांत घेऊन हे पुण्यास भरलेल्या पाटील परिषदेचे अध्यक्ष झाले आणि सर्वांत खेळीमेळीनें वागून यांनीं लोकप्रियता संपादन केली आणि लोकांचा स्वाभिमान जागृत केला.

यांना दोन स्त्रिया होत्या. पहिल्या महाराणी चिंकू-

राजे (मृत्यु स. १९३१ नवं. २३ मुंबई). दुसऱ्या महाराणी गजराराजे. या गोव्याकडील राणे उपनांवाच्या घराण्यांतील होत्या. १९१३ सालीं त्यांचा माधवराव महाराजांशीं विवाह झाला. यांना एक मुलगी व एक मुलगा अशीं दोन अपत्यें झालीं. मुलगी अक्कलकोटच्या राजेसाहेबांस दिली होती ती लग्नानंतर लवकरच दिवंगत झाली. दुसरें अपत्य महाराज जीवाजीराव होत. ते यांच्यानंतर गादीवर आले.

शेवटीं फ्रान्समध्यें गेले असतां पॅरिसजवळ तीन मैलांवर चाटो-डी-मड्रिड येथें यांना मृत्यु आला. तेथें यांचें दहन करण्यांत आलें. त्यांपैकीं कांहीं अस्थींचें ग्वाल्हेरजवळ शिवपुरी येथें दहन करून यांच्या अस्थि प्रयाग येथें गंगेंत विसर्जित केल्या.

यांचें विस्तृत चरित्र सर कैलासनारायण हाक्सर C. I. E. यांनीं इंग्रजींत लिहून यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध केलें. ते यांच्या राज्यांत पुष्कळ वर्षे प्रायव्हेट सेक्रेटरी, फॉरेन आणि पोलिटिकल मेंबरच्या जागेवर असल्यानें आणि बिकानेर, काश्मीर वगैरे संस्थानांत त्यांनीं दिवाणाचीं कामें केल्यामुळें त्यांनीं यांच्या कर्तृत्वावर व व्यक्तित्वावर चांगला प्रकाश पाडला.

शिंदे, महाराज सर जीवाजीराव—(जन्म स. १९१६ जून २६) ग्वाल्हेर राज्याचे अधिपति.

आपली माता गजराराजे यांचे हाताखालीं व नंतर ग्वाल्हेरच्या व्हिक्टोरिया कॉलेजांत यांनीं एक वर्ष शिक्षण घेतलें आणि नंतर हे गादीवर आले (१९२५ जून ५). पुढें १९३६ नवं. २ ला यांना अधिकार प्राप्त झाला. मध्यन्तरीं यांनीं लायलपूर (पंजाब), मुंबई व पुणें येथें करवसुली, राज्याची व्यवस्था व लष्करी शिक्षण घेतलें. यांचा विवाह नेपाळच्या राजघराण्यांतील राजपुत्र खड्गसमशेरजंग कमांडर चीफ यांची नात लेखा दिव्येश्वरी देवी यांच्याशीं झाला (१९४१ फेब्रु. २१). लग्न झाल्यानंतर त्यांचें नांव विजयाराजे ठेवण्यांत आलें. त्यांना १ पद्माराजे, २ उषाराजे व ३ माधवराव (१९४५ मार्च १० जन्मदिन) अशीं तीन अपत्यें आहेत.

यांच्या राज्याचा विस्तार २६३६७ चौ. मैल, वार्षिक उत्पन्न अंदाजानें ३॥ कोटी रु. लोकवस्ती (१९३१) ३५२३०७०, सलामी २१ तोफा. गांवें ११०००. पक्की सडक २५०० मैल व रेल्वे (Scindia State Ry.) २५३ मैल आहे.

शुक्ल, रामचन्द्र चन्द्रबली—(जन्म स. १८८४–मृत्यु स. १९४१) हिन्दी भाषेंतील सुप्रसिद्ध लेखक व कवि.

यांचें जन्मस्थान बस्ती जिल्ह्यांतील अगोना गांव. यांचे वडील राठ (जि. हमीरपुर) येथें पाटील होते. हे मिर्जापूर मिशन स्कूलमधून प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण होऊन (१९०१) तेथेंच शिक्षक झाले. १९०८ सालीं हिन्दी कोशाचे सहसंपादक म्हणून हे नागरी प्रचारिणी सभेच्या बोलावण्यावरून बनारसला गेले. तेथें त्या सभेच्या पत्रिकेचें संपादनहि यांनीं बरींच वर्षे केलें. पुढें हिंदुविश्वविद्यालयांत हे हिन्दीचे प्राध्यापक झाले.

हिन्दी भाषेंतील उत्तम कवि, मार्मिक समालोचक आणि विचारप्रधान लेखकांत यांची गणना होते. यांच्या ग्रंथाशिवाय यांनीं वेळोवेळीं लिहिलेले लेखहि महत्त्वाचे आहेत. यांच्या लेखनाचा हिन्दी उच्च शिक्षणासाठीं चांगला उपयोग होतो. काव्यांत करुणरस आळविण्यांत यांचा हातखंडा आहे.

यांनीं क्रोध, करुणा वगैरे मनोविकारांवर लिहिलेल्या लेखांचा संग्रह चिंतामणि नांवानें प्रसिद्ध झाला. त्याला हिन्दी साहित्य संमेलनानें बाराशें रुपयांचें मंगलाप्रसाद पारितोषिक दिलें. यांच्या 'हिन्दी साहित्य का इतिहास' या महत्त्वाच्या ग्रंथालाहि हिन्दुस्थानी अक्याडमी, प्रयागकडून पांचशें रुपयांचा पुरस्कार मिळाला.

यांचें वाङ्मय—१ हास्यविनोद (नाटक), २ कल्पनाका आनन्द ('एसे ऑन दि इमॅजिनेशन'चा अनुवाद), ३ मेगास्थिनीजका भारतवर्षीय विवरण (अनुवाद), ४ राज्य प्रबन्ध शिक्षा (सर टी. माधवरावांच्या मायनर हिन्टस्चा अनुवाद), ५ राधाकृष्णदासका जीवनचरित्र, ६ आदर्शजीवन, ७ विश्वप्रपञ्च, ८ शशाङ्क, ९ बुद्धचरित काव्य (लाइट ऑफ एशियाच्या आधारें टीकात्मक), १० मलिक मुहम्मद जायसी, ११ गोस्वामी तुळसीदास, १२ महाकवि सूरदास, इतिहास–१३ हिन्दी साहित्यका इतिहास; काव्य–१४ शिशिर पथिक, १५ वसन्त, १६ तुळसीदास, १७ प्रकृतिप्रबोध इत्यादि.

श्यामजी कृष्णवर्मा पंडित—(जन्म स. १८५७ ऑक्टो. ४–मृत्यु स. १९३० एप्रिल) इंग्लंडमध्यें हिंदी

राजकारणाचा प्रचार करणारे सुप्रसिद्ध राजकारणी व क्रान्तिकारक.

काठेवाडमधील मांडवी हें गांव यांचें जन्मस्थान. यांची जात भनसाळी. मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें व खाजगी रीतीनें संस्कृत भाषेचें शिक्षण घेतल्यानंतर हे इंग्लंडला गेले. तेथें मोनियर विल्यम्स यांचे शिफारशीनें यांना कच्छ संस्थानची शिष्यवृत्ति मिळाली व हे बॅरिस्टर होऊन हिंदुस्थानला. परत आले. इंग्लंडमध्यें असतां तेथील रॉयल एशियाटिक सोसायटीपुढें यांनीं भारतांतील लेखनकलेचा उदय हा निबंध वाचला. तसेंच बर्लिन (१८८१) व लंडन (१८८३) येथील प्राच्यविद्यापरिषदांनाहि हे भारतमंत्र्याचे विनंतीवरून हिंदी प्रतिनिधि म्हणून हजर राहिले.

हिंदुस्थानांत आल्यावर लोकहितवादी गो. ह. देशमुखांच्या शिफारशीनें रतलाम संस्थानचे दिवाण म्हणून यांची नेमणूक झाली (१८८५). यानंतर उदेपूर, जुनागड इत्यादि ठिकाणीं दिवाणाचीं कामें केल्यानंतर हे निवृत्त झाले व जहाल राजकारणाकडे वळले. त्या दृष्टीनें इंग्लंड जास्त सुरक्षित आहे असें ध्यानांत आल्यानंतर हे इंग्लंडला राहावयास गेले (१८९७).

शिष्यवृत्त्यांची व्यवस्था करून जास्तीत जास्त हिंदी विद्यार्थ्यांना इंग्लंडमध्यें प्रवेश करून द्यावयाचा असें यांचें धोरण असे. हर्बर्ट स्पेन्सर ट्रूहलिंग फेलोशिप व दयानंद शिष्यवृत्ति या आपल्या व राणाप्रताप व शिवाजी या श्री. सरदारसिंग राणा यांच्या शिष्यवृत्त्यांनीं यांनीं आपल्या कार्यास सुरवात केली. सुप्रसिद्ध विनायक दामोदर सावरकर हे यांपैकीं शिष्यवृत्ति मिळवूनच इंग्लंडला गेले होते.

१९०५ सालीं यांनीं 'इंडियन सोशॅलिस्ट' हें पत्र सुरू केलें व इंडियन होमरूल लीगची स्थापना (फेब्रु. १८) केली. यानेंहि पुढें जाऊन इंग्लंडमध्यें आलेल्या हिंदी विद्यार्थ्यांची राहण्याची सोय करण्याच्या व त्यांच्या विचारांना वळण लावण्याच्या दृष्टीनें 'इंडिया हाउस'ची स्थापना केली (१९०५ जुलै १). लंडनमधील हायगेट विभागांत यासाठीं यांनीं एक इमारत खरेदी केली व त्यांत पंचवीस विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय केली. खालच्या मजल्यावर वाचनालय, सभागृह व वर दोन मजल्यांत राहण्याची सोय अशी व्यवस्था असे. महेशचरणसिंह हे व्यवस्थापकाचें काम पाहत. या वेळीं इंडिया हाउसमध्यें राहणाऱ्या लोकांत परमानंद, धर्मवीर, लाला हरदयाळ, मिसेस कामा, सेनापति बापट, श्यामचंद वर्मा, सावरकर ही मंडळी प्रमुख असून त्यांच्या हालचालीमुळें त्या वेळीं इंडिया हाउसला क्रांतिगृहाचें स्वरूप आलें होतें. मतप्रचाराच्या दृष्टीनें Gaelic Republican या न्यू यॉर्कच्या आयरिश रिपब्लिकन पत्राचाहि हे उपयोग करीत.

अशा तऱ्हेनें हिंदी विद्यार्थ्यांना क्रांतीचे धडे देण्याचें काम अव्याहत दहा वर्षेपर्यंत केल्यानंतर हे पॅरिसला राहावयास गेले.

पुढें धिंग्रा प्रकरण उपस्थित झाल्यानंतर सावरकर इंडिया हाउस सोडून गेले. त्यामुळें इंडिया हाउसची जरूर नाहीं असें वाटून यांनीं ती संस्था बंद केली व तिची इमारतहि विकून टाकली.

परदेशांशीं संबंध असणाऱ्या ज्या क्रांतिकारकांच्या हालचाली हिंदुस्थानांत झाल्या त्यांचीं सर्व सूत्रें इंडिया हाउसमधून हालविलीं जात. प्रत्यक्ष इंग्लंडमध्येंहि धिंग्रा प्रकरण वगैरेच्या मुळाशीं इंडिया हाउसचा हात होता. क्रांतिकारकांच्या ज्या चळवळीनें त्या काळीं हिंदुस्थान तापून गेला होता त्याचाच प्रतिध्वनि यांच्या या कार्यामुळें इंग्लंडमध्यें उत्पन्न झाला.

राजकीय कारणानें इंग्लंड व फ्रान्स येथें राहणें अशक्य झाल्यानें हे स्वित्झर्लंडमध्यें राहण्यास गेले व तेथें जिनीव्हा येथें मृत्यु पावले.

श्यामशास्त्री म. म. आर.—(जन्म स. १८६८–मृत्यु स. १९४४) सुप्रसिद्ध अर्थशास्त्रविशारद व इतिहाससंशोधक.

यांचा जन्म कावेरी नदीच्या तीरावर रुद्रपाटन गांवीं झाला. यांचें शिक्षण महाराजा संस्कृत कॉलेज, म्हैसूर येथें झालें. नंतर हे इंग्रजी शिकून बी. ए. झाले (१८९९). म्हैसूरचे दिवाण सर के. शेषाद्रि अय्यर यांचे वाचक, म्हैसूर गव्हर्नमेंटचे लायब्रेरियन म्हणून कागद व ताडपत्र यांवरील हस्तलिखितांचा क्याटलाग करण्याचें काम करीत असतां यांना कौटिलीय अर्थशास्त्राची एक प्रत सांपडली. यांनीं त्या ग्रंथांतील राजकारण, अर्थशास्त्र, कायदा वगैरेंचा अभ्यास करून तो ग्रंथ म्हैसूर ओ. लायब्ररी सीरीजमध्यें प्रसिद्ध केला आणि त्याचें इंग्रजींत भाषान्तर केलें (१९२१). त्यामुळें व त्यावर लिहिलेल्या अनेक लेखांमुळें यांची सर्वत्र ख्याति झाली. बंगलोरच्या गव्हर्न-

मेंट कॉलेजचे प्रिंसिपल, म्हैसूरच्या ओरिएन्टल लायब्ररीचे क्युरेटर, कलकत्ता युनिव्हर्सिटीचे परीक्षक व तेथून बहुमानिक पीएच्. डी. ही पदवी मिळविणारे व कलकत्ता विश्वविद्यालयांतील हिंदी राजनीति या विषयावरील व्याख्यानें देणारे वगैरे अनेक नात्यांनीं यांची ओळख देतां येईल. यांना सरकारनें महामहोपाध्याय ही पदवी देऊन गौरविलें होतें. यांचा संशोधनाच्या बाबतींतील उत्साह विशेष प्रकारचा होता. यांनीं विविध विषयांवर अगदीं नवे शोध प्रकट करणारे अनेक लेख लिहिले. अगदीं म्हातारपणीं संशोधनाकरितां हे ग्रीक भाषासुद्धां शिकले.

यांचे ग्रंथ—(1) Cycle of Eclipses in the Vedas, (2) Eclipse Cult, (3) Vedic Gods, (4) South Indian Inscriptions च्या नव्वदाव्या भागाचें संपादन, इत्यादि.

श्यामसुंदरदास—(जन्म स. १८८५–मृत्यु स. १९४५ आगस्ट ८) बनारसच्या नागरी प्रचारिणी सभेचे एक संस्थापक, बनारस हिंदु विश्वविद्यालयांतील हिन्दी विभागाचे अध्यक्ष व हिन्दी भाषा नि देवनागरी लिपि यांचे एकनिष्ठ पुरस्कर्ते.

यांचा जन्म काशी येथें प्रसिद्ध खत्री घराण्यांत झाला. यांच्या पित्याचें नांव लाला आत्माराम. बी. ए. झाल्यानंतर छापखाना व शाळा वगैरे ठिकाणीं काम केल्यावर विश्वविद्यालयांत हिन्दी विभागाचे यांना अध्यक्ष नेमण्यांत आलें. तेथें १९३७ जुलै पर्यंत यांनीं काम केलें. तेथें यांनीं अभ्यासक्रम आखण्यापासून इंग्रजीऐवजीं हिन्दी माध्यम स्वीकारून हिन्दी भाषेंत शिकविण्यायोग्य पुस्तकें तयार करविलीं. भाषा, विज्ञान व समालोचना या विषयांत यांचे ग्रंथ सर्वश्रेष्ठ मानले जातात.

नागरी प्रचारिणी सभेच्या द्वारां झालेल्या प्राचीन ग्रंथाच्या संशोधनांत यांचा भाग फार मोठा होता.

यांचें वाङ्मय—१ साहित्यालोचन, २ रूपकरहस्य, ३ भाषाविज्ञान, ४ मेरी आत्मकथा (आत्मचरित्र), ५ गोस्वामी तुलसीदास, ६ हिन्दी भाषा और साहित्य, ७ भारतेन्दु हरिश्चन्द्र; संपादक–हिन्दी शब्दसागर व हिन्दी वैज्ञानिक कोष.

यांना रायसाहेब, रायबहादुर व हिन्दी साहित्य संमेलनानें 'वाचस्पति' ही पदवी दिली. तसेंच हिन्दी साहित्य संमेलनाचें अध्यक्षपदहि यांना देण्यांत आलें होतें. हे नुसते लेखकच नव्हते, तर, अनेक लोकांना स्फूर्ति देऊन हिन्दी भाषेची सेवा करावयास लावण्याचें सामर्थ्य यांच्यांत होतें. मैथिलीशरण गुप्तांनीं यांच्या मृत्यूनंतर पुढील उद्गार काढले 'मातृभाषाके हुये जो विगत वर्ष पचास। नाम उनका एक ही है श्यामसुन्दरदास'.

श्रद्धानंद स्वामी—(जन्म स. १८५६–खून स.१९२६ डिसें. २३) सुप्रसिद्ध गुरुकुल विश्वविद्यालयाचे संस्थापक व हिंदुसमाजाच्या उपेक्षित भागाकडे लक्ष वेधविणारे थोर गृहस्थ.

यांचा जन्म पंजाबांत जालंदरजवळ तळवन गांवीं क्षत्रिय कुलांत झाला. यांचें नांव मुनशीराम आणि पित्याचें नांव नानकचंद. रिवाजाप्रमाणें यांचा यज्ञोपवीत संस्कार झाला (१९२३). वडील पोलीस खात्यांत फिरतीवर असत. पण आईच्या काशीवासाच्या इच्छेमुळें यांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण काशीस झालें. पण दयानंद सरस्वतीच्या निर्भय व सडेतोड व्याख्यानांनीं यांची नास्तिकता आणि व्यसनीपणा नष्ट झाला व हे पक्के आर्यसमाजी बनले (१८८५). नंतर हे लाहोर येथें वकिली करूं लागले. वकिली करीत असतां यांचें हिंदूंच्या उपेक्षित असणाऱ्या विविध अंगांकडे विशेष लक्ष वेधलें. आटाफंड, रद्दीफंड वगैरे सुरू करून यांनीं सद्धर्मप्रचारक साप्ताहिक उर्दूत सुरू केलें. त्यांत प्रथम उर्दू लिपींत हिन्दी लिहिण्यास सुरवात करून तेंच पुढें देवनागरींत काढण्यास यांनीं सुरवात केली. स्त्रीशिक्षणाकरितां लेखमाला लिहून जालंदर कन्याशाळा सुरू केली (१८९०). विधवाविवाह व अनाथसंरक्षण वगैरे प्रश्नहि यांनीं लोकांपुढें मांडून प्रत्यक्ष कार्याची दिशा दाखविली. याच सुमारास यांची पत्नी वारली (१८९१). मुलांच्या संगोपनाची जबाबदारी यांच्यावर पडली. तथापि पुनः विवाह करण्याचें यांनीं मनांतहि आणलें नाहीं. येथून पुढें यांचा वानप्रस्थाश्रम सुरु झाला.

आर्यसमाजांत मांसाशनाला अनुकूल व प्रतिकूल असे दोन तट पडले. त्यांपैकीं मांसाशनपक्षाच्या लोकांनीं शिक्षणप्रसाराकरितां दयानंद आंग्लो वैदिक कॉलेज काढून आधुनिक शिक्षणाच्या प्रसारास सुरवात केली त्यांत हे प्रथम होते. पण यांनीं त्या संस्थेंतून बाहेर पडून, प्राचीन गुरुकुल पद्धतीच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. त्याकरितां तीस हजार रुपये जमा केल्याशिवाय घरीं परत येणार नाहीं अशी प्रतिज्ञा करून हे तितके रुपये जमा करून परत फिरले आणि हरिद्वारजवळ

गंगेच्या किनाऱ्यावर प्रथम झोपड्या बांधून यांनीं गुरुकुलाच्या प्रत्यक्ष कार्यास सुरुवात केली (१९०२ मार्च). अगदीं नव्या पद्धतीचा अभ्यासक्रम आंखून विद्यार्थी तयार करण्याचा यांनीं उपक्रम केला. सरकार व लोक यांच्या विरोधांतून मार्ग काढून अगदीं नव्या पद्धतीची ही संस्था यांनीं यशस्वी करून दाखविली. या संस्थेच्या अनेक शाखा निघून त्याला विश्वविद्यालयाचें स्वरूप प्राप्त झाल्यावर यांनीं संन्यास घेतला (१९१७). यापूर्वीच यांना महात्मा ही पदवी प्राप्त झाली होती.

रौलट ॲक्टच्या विरोधी चळवळींत भाग घेऊन दिल्ली येथें गुरखा पोलिसांनीं जमावावर बंदुका झाडण्यास सुरवात केली असतां, यांनीं पुढें होऊन त्यांना रोखलें आणि यांच्यावर बंदुका रोखल्या असतां हे निर्भयपणें त्यांच्या अनेक बंदुकांपुढें उभे राहिले. या वेळीं दिल्लीच्या जुम्मा मशिदीनें यांना आपली प्रार्थना चालविण्याचा मान दिला. हिंदूला असा मान दिल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे असें म्हणतात.

बादशाही अमलांत मुसलमान झालेल्या पण आचार-विचारांनीं हिंदूच असणाऱ्या दिल्लीच्या आसपासच्या हजारों मलकाना रजपुतांना यांनीं शुद्ध करून हिंदुधर्मांत घेतलें आणि त्यांच्याशीं रजपुतांना रोटीबेटी व्यवहार करावयास लावून शुद्धीकृतांना आत्मसात् करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. मलबारांत मोपल्यांनीं बंड करून हिंदूंना बाटविल्याची व अत्याचार केल्याची बातमी यांना कळतांच हे मलबारांत धांवून गेले आणि तेथें यांनीं शुद्धि, अनाथसंरक्षण वगैरे कामें केलीं.

मुसलमानी समाजावर याचा परिणाम होऊन यांना अनेक धमक्या देणारीं पत्रें आलीं आणि दिल्ली येथें आजारांतून बरे होत असतां अबदुल रशीद नांवाच्या एका मुसलमानानें यांच्या येथें चर्चा करण्याच्या निमित्तानें प्रवेश करून घेतला आणि रुग्णशय्येवर पडलेल्या या वृद्ध संन्याशाचा गोळी घालून खून केला.

यांच्या अशा प्रकारच्या या मृत्यूनें हिंदुस्थानांच्या कानाकोपऱ्यापर्यंत एक जबरदस्त धक्का बसला आणि यांच्या नांवें जागोजाग अनाथ व महिला यांच्याकरितां आश्रम निघाले व यांनीं सुरू केलेल्या कार्याला विलक्षण विधायक स्वरूप प्राप्त झालें.

श्रीकंठय्या, बी. एम्.—(जन्म स. १८८३–मृत्यु स. १९४६ जाने. ६) कर्नाटक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, कानडी भाषा व संस्कृति यांचे एकनिष्ठ उपासक व त्यागी गृहस्थ.

हे म्हैसूर राज्यांतील रहिवासी. श्रीरंगपट्टण, बंगलोर व मद्रास या ठिकाणीं यांचा विद्याभ्यास झाला. मद्रास विश्वविद्यालयाचे बी. ए., एलएल्. बी. झाल्यानंतर म्हैसूरच्या 'महाराजा कॉलेज'मध्यें इंग्लिशचे लेक्चरर म्हणून यांची नेमणूक झाली (१९०९). नंतर प्राध्यापक वगैरे जागांवरून चढत हे म्हैसूर विश्वविद्यालयाचे रजिस्ट्रार झाले (१९२६-१९३०). सेवानिवृत्त होईपर्यंत म्हैसूर राज्याच्या शिक्षण खात्यांत हे होते (१९४१).

वेगळाल्या शास्त्रीय विषयावर अभ्यासपूर्वक लहान लहान कानडी पुस्तकें प्रसिद्ध करून तीं अगदीं अल्प किंमतींत वाचकांच्या हातीं देण्याची म्हैसूर विश्वविद्यालयाची लोकप्रिय प्रथा यांच्याच योजनेचें फळ होय. म्हैसूर विद्यापीठाचे उपकुलगुरु असतां यांनीं केलेल्या अशा कामामुळें तेथील दरबारनें यांना राजसेवासक्त ही पदवी दिली. यांनीं लोकांना कानडींत लिहावयास शिकविलें असें गौरवानें यांच्याबद्दल लोक बोलत.

सेवानिवृत्तीनंतर यांनीं अनेक मोह बाजूस सारून एका नवोदित शिक्षण संस्थेस आपलें आयुष्य अर्पण केलें. त्या संस्थेच्या धारवाड आर्टस् कॉलेजचे प्रिंसिपल असतां रक्तदाबाच्या विकारानें हे मृत्यु पावले.

शेक्सपीयरच्या वाङ्मयाचे अधिकारी विवेचक, आधुनिक सुटसुटीत व आकर्षक कानडीचे जनक, छन्दःशास्त्राचे पंडित, नाटककार, चिकित्सक टीकाकार वगैरे अनेक नात्यांनीं यांना मान असे. सेवानिवृत्तीनंतरच्या आपल्या वेतनाचा अर्धा भाग साहित्य परिषदेच्या कार्यासाठीं व कांहीं काळ स्वतः संपादिलेल्या 'कन्नडनुडि'च्या प्रकाशनासाठीं यांनीं अव्याहत दिला. गुलबर्ग्याच्या कर्नाटक साहित्य संमेलनाचे हे अध्यक्ष होते आणि कानडी भाषेविषयीं चाललेल्या सर्व चळवळींशीं यांचा अत्यंत निकटचा संबंध असून कर्नाटक एकीकरणाचे हे मोठे पुरस्कर्ते होते. साहित्य परिषदेंतील उत्तर-दक्षिण वाद टाळण्याची कामगिरी यांनीं बजावली.

'कन्नडद बाहुटा' या ध्वजगीताचे द्रष्टे हेच होत. अनेक भेदांच्या गलबल्यांत सांस्कृतिक ऐक्याचा यांचा संदेश कर्नाटकांत स्वागतार्ह समजला जाई.

श्रीकृष्णसिंह—(जन्म स. १८८८ आक्टो. २१) राष्ट्रसभेच्या राजवटींतील बिहारओरिसाचे मुख्य प्रधान.

मोंघीर जिल्ह्यांतील एक लहानसें गांव यांचें जन्मस्थान. जात ब्राह्मण. १९२६ मध्यें हे बॅरिस्टर होऊन आले आणि लवकरच मोंघीरचे सुप्रसिद्ध बॅरिस्टर म्हणून हे प्रसिद्धीस आले. त्यापूर्वी १९२० च्या असहकाराच्या चळवळीपासून हे राजकारणांत भाग घेऊं लागले व १९२१ मध्यें हे स्थानबद्धहि झाले होते. १९२६ सालीं हे तेथील कायदेमंडळांत निवडून आले व स्वराज्यपक्षाचें नेतृत्व यांना प्राप्त झालें. कराची राष्ट्रसभेच्या आदेशाप्रमाणें यांनीं आपल्या कायदेमंडळांतील सभासदत्वाचा त्याग केला. जवाहरदिन पाळण्याबद्दल यांना १९३० सालीं अटक करण्यांत आली होती. यांना तुरुंगवास किती तरी वेळां प्राप्त झाला. बिहारच्या भूकंपांत यांनीं लोकांना कमालीचें साहाय्य केलें. जन्मतःच पुढारीपणाची देणगी असणारे हे गृहस्थ हातीं घेतलेल्या कामीं विलक्षण छाप ठेवून असतात.

श्रीनिवासशास्त्री, व्ही. एस्.—(जन्म स. १८६९ सप्टें. २२–मृत्यु स. १९४६ एप्रिल) पुण्याच्या भारतसेवक समाजाचे अध्यक्ष, जगप्रसिद्ध इंग्रजी वक्ते, राज्यघटनाशास्त्रज्ञ व सूक्ष्म बुद्धीचे राजकारणी मुत्सद्दी.

यांचा जन्म तामीळ ब्राह्मणाच्या घराण्यांत झाला व कुंभकोण येथें शिक्षण संपादून हे बी. ए. झाले (१८८८). देशीपरदेशी खेळांतील प्रावीण्य आणि सर्व परीक्षांत पहिला वर्ग या दोन्ही गोष्टी यांना उत्तम साधल्या. नंतर एकदोन हायस्कुलांत शिक्षकाचें काम केल्यावर १८९९सालीं त्रिप्लिकेन येथील हिंदु हायस्कुलचे हे हेडमास्तर झाले. तेथें काम करीत असतांच ना. गोखले यांच्याशीं यांचा परिचय झाला व १९०७ च्या आरंभीं हे भारतसेवक समाजाचे सभासद झाले. मद्रास विश्वविद्यालयाचे फेलो (१९१०-१९२०), मद्रास कायदेमंडळांतील सरकारनियुक्त सभासद (१९१३-१९१५), ना. गोखले यांच्या मृत्यूनंतर भारतसेवक समाजाचे अध्यक्ष म्हणून एकमतानें निवड (१९१५-१९२७), मद्रास कायदेमंडळातर्फे वरिष्ठ कायदेमंडळांत निवड व तेथें रौलट ॲक्टविरुद्ध केलेलीं भाषणें यांमुळें यांची सर्वत्र विलक्षण छाप बसली.

होमरूलची चळवळ व लखनौ करार यांत यांनीं भाग घेतला. लखनौकराराचें तर यांनीं एक लहानसें पुस्तक लिहून स्पष्टीकरण केलें. याशिवाय साम्राज्यान्तर्गत स्वराज्यावर यांनीं एक स्वतंत्र निबंधहि प्रसिद्ध केला. मॉंटफर्ड सुधारणांबाबत यांनीं अनुकूलतेचें धोरण स्वीकारून असहकारितेला यांनीं जोराचा विरोध केला. तेव्हांपासून प्रागतिक लोक राष्ट्रसभेंतून अलग झाले. तथापि अशा प्रतिकूल परिस्थितींतहि यांचें कार्य गंभीरपणें चालू होतें. कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें यांनीं दडपशाहीचे अनेक कायदे रद्द करून घेण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

पण यांचें नांव सर्वतोमुखी होण्यास यांची परदेशांतील कामगिरीच विशेष कारण झाली. साम्राज्यपरिषद, राष्ट्रसंघ, वसाहतींतील दौरा, वाशिंग्टनपरिषद, द. आफ्रिकेंत एजन्ट व तीनहि गोलमेजपरिषदा, यांतील यांचें काम विशेष प्रकारचें गणलें जातें.

१९३५ च्या सुधारणा कायद्यानें प्राप्त होणाऱ्या फेडरेशनला यांनीं विरोध केला. राष्ट्रसभेच्या १९४२ च्या लढ्यांत म. गांधी वगैरे लोकच राष्ट्राचे खरे प्रतिनिधि असून सरकारनें त्यांच्याशींच बोलणें केलें पाहिजे हें यांचें निपक्षपाती प्रतिपादन, भारताच्या अखंडत्वाचा यांचा पुरस्कार आणि 'महायुद्धानंतरच्या शांतता परिषदेंत म. गांधी, जवाहरलाल वगैरे न जातां चर्चिल वगैरे हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून बसलेले पाहण्याचा योग येण्यापेक्षां मरण पत्करलें' हे यांचे संतापाचे उद्गार यांच्या राष्ट्रविषयक तळमळीवर प्रकाश पाडणारे आहेत.

यांची जन्मभाषा तामीळ होती. त्या भाषेंत यांनीं आपलें आत्मचरित्र लिहिलें आहे. वेळीअवेळीं वाल्मिकीचें रामायण मूळ संस्कृतमधून वाचण्याचा यांना नाद होता. रामायणावर कांहीं लिहिण्याची यांची इच्छा होती. 'जन्मभर राजकारण करीत बसलों, पण निष्पन्न कांहींच झालें नाहीं, यापेक्षां देशांत रामायणाचा प्रचार केला असता तर मी देशाचें अधिक कल्याण करूं शकलों असतों. देशांतील लोक जर चारित्र्यसंपन्न होतील तर देशाचें कल्याण होण्यास वेळ लागणार नाहीं,' अशी यांची अखेरीस वृत्ति झाली होती.

यांचें राजकारण तत्त्वनिष्ठ होतें, त्यामुळें सर्व पक्षांत यांच्याबद्दल विशेष प्रकारचा आदर व विश्वास असे. यांच्या वक्तृत्वाची तऱ्हाहि अशीच अलौकिक होती.

हे अत्यंत सफाईदार बोलत पण आपल्या मुद्याकडे सर्वांचें लक्ष केन्द्रित करीत. योग्य वेळी महत्त्वाचा मुद्दा निर्भयपणें मांडण्याचें कसब यांच्यांत होतें.

परंतु यापेक्षांहि परिणामकारक व प्रमाणबद्ध वक्तृत्त्वाबद्दल यांचा विशेष प्रसिद्धि होती. गोखल्यांच्या जीवनावरील किंवा हिंदी नागरिकांच्या हक्कांसंबंधी यांनीं दिलेल्या व्याख्यानांत साधेपणा व सरळपणा यांचें उत्कृष्ट मीलन आढळतें. अगदीं सावकाश परंतु आत्मविश्वासानें केलेला उपन्यास, पर्खड परंतु कोणाला न दुखवता केलेलें मतप्रतिपादन व परिणामकारक शेवट यांमुळें यांच्या सर्वसाधारण भाषणाला स्फटिकाचें पावित्र्य व स्वच्छता प्राप्त होई. यांच्या वक्तृत्वाची राजकारणी लोकांत विशेष छाप असे. एनसायक्लोपिडीया ब्रिटानिकानेंहि यांचें सर्वश्रेष्ठ हिंदी वक्ते म्हणून वर्णन केलें आहे.

यांचे ग्रंथ—(1) Rights and Duties of Indian Citizen, (2) Life of Gokhale, (3) Birthright (1940), (4) Life and Times of Phirozeshah Mehta (1945).

स

सत्यमूर्ति, एस्.—(जन्म स. १८८७ ऑग.१९– मृत्यु स. १९४३) मद्रास प्रांतांतील सुप्रसिद्ध कॉंग्रेस कार्यकर्ते व वक्ते.

पदुकोटा संस्थानांतील तिरुमयम् हें गांव यांचें जन्मस्थान. यांचे वडील डी. सुंदर शास्त्रीगल् हे वकील होते. हेहि पदुकोटाचें महाराजा कॉलेज व मद्रास लॉ कॉलेज येथें आपलें शिक्षण संपवून वकील झाले. मद्रासमधील प्रमुख वकीलांत यांची गणना होई.

तामीळनाड प्रांतांतील राजकीय चळवळीचे उत्थापक व कुशल संघटक म्हणून यांची प्रसिद्धि असे. त्यासाठीं यांनीं त्या प्रांतांतील लहानलहान खेड्यांत दौरे काढून व बारीकसारीक चळवळींतहि भाग घेऊन जागृति करण्याचा प्रयत्न केला. तामीळनाड कॉंग्रेस कमेटीचे हे कित्येक वर्षें अध्यक्ष असून तामीळनाड पोलिटिकल कॉन्फरन्सचें अध्यक्षस्थानहि यांना देण्यांत आलें. १९१९ व १९२५ सालीं इंग्लंडला गेलेल्या कॉंग्रेस शिष्टमंडळाचे हे सभासद होते.

मद्रासच्या सगुणविलाससभेशीं नट म्हणून यांचा संबंध असून यांच्या या कलाभिरुचीबद्दल मुंबईच्या हिंदी चित्रपटाच्या रौप्यमहोत्सवाचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें.

सप्रू, नेकनामदार सर तेजबहादुर अंबिकाप्रसाद—(जन्म स. १८७५ डिसें. ८) हिंदुस्थानांतील नामांकित कायदेपंडित व राज्यघटनाशास्त्रज्ञ.

अलीगड हें यांचें जन्मस्थान. मथुरा व आग्रा येथें शिक्षण संपवून हे एम्. ए., एल्एल्. बी. झाले. कांहीं दिवस मुरादाबाद येथें वकिली केल्यावर यांनीं ऑनर्स इन लॉ, डॉक्टर ऑफ लॉ वगैरे परीक्षा दिल्या व अलाहाबाद येथें ॲडव्होकेट म्हणून हे काम करूं लागले (१८९८).

लवकरच उत्तम वकीलांत यांची गणना होऊं लागली आणि कलकत्ता, पाटणा, नागपूर, लाहोर, हैदराबाद वगैरे ठिकाणीं चालणाऱ्या महत्त्वाच्या खटल्यांत यांना जाण्याचा प्रसंग येऊं लागला. व्यवहारांत अत्यंत मृदु असणारे हे गृहस्थ कोर्टाच्या कामांत मोठे कठोर बनतात. यांनीं आपल्या वकिली कौशल्याला नैतिक अधिष्ठान मिळविलें असून उच्च पातळीवरून काम करण्याच्या या पद्धतीनें यांना विशेष लौकिक प्राप्त झाला.

वकिलीच्या सुरवातीपासून राजकारणांत हे भाग घेत. परंतु पक्षनिष्ठ राजकारणापेक्षां घटनात्मक राजकारणाकडे यांचें विशेष लक्ष असे. 'हिंदुस्थान रिव्ह्यू'मध्यें हे सतत लिहीत व 'अलाहाबाद लॉ जर्नल'चीं सूत्रेंहि यांनीं पुढें आपल्याकडे घेतलीं (१९०४-१९१७). प्रान्तिक (१९१३) व मध्यवर्ति (१९१६) कायदेमंडळांत हे प्रथम निवडले गेले आणि हिंदुस्थान सरकारचे दोन वर्षे

हे कायदेमंत्रीहि झाले (१९२०). प्रथम राष्ट्रसभेत कांहीं दिवस काम केल्यानंतर हे प्रागतिकपक्षांत गेले. लिबरल फेडरेशचे हे दोनदां अध्यक्षहि होते (१९२३ पुणें, १९२७). पण पुढें यांनीं प्रागतिकांशींहि संबंध सोडला (१९३१).

तीनहि गोलमेज परिषदांत यांनीं महत्त्वाचें काम केलें. जॉइंट पार्लमेंटरी कमेटींतहि यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा चांगला उपयोग झाला. साउथबरो, फ्रँचाइस वगैरे अनेक कमेट्यांचे हे सभासद होते. पुढें तर यांना प्रिव्ही कौन्सिलांतील न्यायाधीश नेमण्यांत आलें (१९३४). वेळोवेळीं पक्षातीत लोकांची संघटना करून राज्यघटना तयार करण्याच्या बाबत सरकारला व लोकांना यांनीं उत्तम मार्गदर्शन केलें आहे.

याशिवाय उर्दू व फारशी भाषांचे हे उत्कृष्ट पंडित आहेत. उर्दू भाषेच्या उद्धारार्थ यांनीं 'रह-इ-अदब' या संस्थेची स्थापना केली. दिल्लीच्या अन्जुमान-इ-तरक्की-इ-उर्दू या संस्थेचे हे अध्यक्ष असून तिच्या इमारतीकरितां यांनीं एक निधि उभारला होता. यांच्या कायदा व राजकारणविषयक ग्रंथसंग्रहाचीहि सर्वत्र फार ख्याति आहे.

हिंदुस्थानच्या राजकारणाची प्रगति खुंटलेली पाहतांच यांनीं पक्षातीत पण घटनाशास्त्रज्ञ नेक ना. मुकंदराव जयकर, सर एन्. गोपालस्वामी आयंगार व सर जगदीशप्रसाद यांच्या सहकार्यानें सप्रू कमेटीचा वृत्तान्त प्रसिद्ध केला. त्यांत समप्रतिनिधित्वाला मान्यता दिली असून हिंदुस्थानचे तुकडे पाडण्याला विरोध करण्यांत आला आहे. हिंदुस्थानच्या राज्यघटनेसंबंधीं अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञांनासुद्धां मार्गदर्शन करण्याची शक्ति यांच्या या वृत्तान्तांत आहे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां चाललेल्या प्रयत्नांत यांच्या सारख्यांच्या या प्रयत्नांचें महत्त्व केव्हांच विसरतां येणार नाहीं.

सयानी, रहिमतुल्ला एम्.—(जन्म स. १८४७ एप्रिल ५–मृत्यु स. १९०२ जून ४) सुप्रसिद्ध काँग्रेस पुढारी.

हे एम्. ए., एलएल्. बी. झाले व यांनीं सार्वजनिक कार्यांत भाग घेण्यास सुरुवात केली. कडक जातीय विरोधाला तोंड देत इंपीरियल लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत एपिडेमिक डिसिझेस ॲक्ट, सिडीशस मीटिंग्ज ॲक्ट इत्यादि विषयांवर यांनीं दिलेलीं व्याख्यानें त्या वेळीं फारच गाजलीं. १८९६ च्या कलकत्ता काँग्रेसचे हे अध्यक्ष होते.

सय्यद अहमदखान, सर—(जन्म स. १८१७–मृत्यु स. १८९८) मुसलमान समाजाचे सुप्रसिद्ध पुढारी व अलीगढ मॉस्लेम युनिव्हर्सिटीच्या कल्पनेचे जनक.

यांचा जन्म दिल्लीस झाला. प्राथमिक शिक्षण घेतल्यावर शिरस्तेदार व मुन्सफ म्हणून यांनीं निजनूर, गाझीपूर, अलीगढ, बनारस वगैरे ठिकाणीं कामें केल्यावर हे सेवानिवृत्त झाले (१८७६).

१८५७ सालच्या बंडांत बिजनूर येथील इंग्लिश लोकांच्या सुटकेस मदत केल्यानें यांची बऱ्याच इंग्रज लोकांशीं ओळख झाली. बंडाच्या कारणपरंपरेचा विचार करितां यांना इंग्रज व हिंदी लोक यांमधील गैरसमज दूर करण्यास शिक्षणाशिवाय दुसरा उपाय सुचेना. त्या दृष्टीनें यांनीं मुरादाबाद येथें पहिली अर्वाचीन इतिहासाचें शिक्षण देणारी शाळा उघडली. तसेंच उत्तमोत्तम इंग्रजी ग्रंथांचा उर्दू अनुवाद करणारी संस्था यांनीं गाझीपूर येथें स्थापिली. पुढें अलीगढ मॉस्लेम युनिव्हर्सिटी स्थापिल्यावर त्या संस्थेचें सायन्टिफिक सोसायटी ऑफ अलीगढ या संस्थेंत रूपान्तर करण्यांत आलें. यांच्या या कार्याचा गौरव करण्यासाठीं १८६६ सालीं त्या वेळचे गव्हर्नर जनरल लार्ड लारेन्स यांनीं सुवर्णपदक व मेकॉलेचे ग्रंथ यांना अर्पण केले.

पाश्चात्य शिक्षणपद्धतीचें अध्ययन करण्याच्या हेतूनें हे आपलीं मुलें सय्यद महमूद व सय्यद हमीद यांचेसह इंग्लंडला गेले (१८६९). तेथें असतां मुलांना पाश्चात्य शिक्षण व धार्मिक शिक्षण देणाऱ्या व राहण्याची व्यवस्था असलेल्या संस्थेची कल्पना यांच्या मनांत आली आणि हिंदुस्थानांत येतांच मॉहमेडन अँग्लो-ओरिएंटल कॉलेज फंडाला यांनीं सुरवात केली (१८७२). सर विल्यम मूर यांच्या हस्तें या संस्थेच्या शाळेस सुरवात झाली. लवकरच कॉलेजहि उघडलें (१८७७). पुढें या संस्थेस व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न झाला आणि माहमेडन एज्युकेशनल कॉन्फरन्सच्या स्थापनेनें या कार्यास जोर चढला व पुढें तेथेंच अलीगढ मॉस्लेम युनिव्हर्सिटी स्थापन झाली (१९२०).

याशिवाय मुसलमान समाजांतील श्रेष्ठ समाजसुधारक,

उर्दूतील उत्कृष्ट लेखक व वक्ते अशी यांची प्रसिद्धि होती. स्वतःला इंग्रजी येत नसतांहि आपल्या धर्मबांधवांना जागतिक ज्ञानाचे दरवाजे खुले करणारा महात्मा ही यांची खरी भूमिका आहे.

राष्ट्रसभेच्या स्थापनेच्या वेळी यांनीं तिला विरोध करून आपल्या बांधवांना तीमध्यें जाण्यास विरोध केला. तथापि यांचाहि शेवटीं ब्रिटिशांवरील विश्वास डळमळला. सध्यांच्या हिंदुमुसलमान प्रश्नाचें जनकत्व यांच्याकडे जातें. यांचे उर्दू ग्रंथ अत्यंत लोकप्रिय असून त्यांचीं अनेक युरोपीय भाषांत भाषान्तरें झालीं आहेत.

यांचे ग्रंथ—उर्दू-(1) असर-इ-सनदीद, (2) An Inquiry into the Causes of Indian Revolt, (3) Commentary on Bible and Essays on Islam, (4) Life of the Prophet Mahomed, (5) Essays on Life of Mahomed इत्यादि.

पत्रें—तहझीबुल अखलाक् (सामाजिक सुधारक).

सरकार, नलिनीरंजन—(जन्म स. १८८८) बंगालमधील सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते.

१९०६ सालीं यांनीं आपलें अध्ययन सोडलें व स्वदेशीच्या चळवळींत व नॅशनल कौन्सल ऑफ एज्युकेशनमध्यें यांनीं भाग घेण्यास सुरवात केली. यानंतर हिंदुस्थान को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स कं.त हे शिरले व लवकरच हे तिचे मॅनेजर झाले. इंडियन सेन्ट्रल बँकिंग इन्क्वायरी कमेटीचे व फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सचें (१९३३) हे अध्यक्ष होते. १९३५ सालच्या बंगाल सरकारचे हे अर्थमंत्री असून व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचेहि हे सभासद होते. गांधींच्या उपवास-प्रकरणीं यांनीं या जागेचा राजीनामा दिला.

दासांच्या स्वराज्यपार्टीचे हे व्हिप असून (१९२३) बंगाल नॅशनल चेंबरचेहि हे दोनदां अध्यक्ष होते (१९३२-३३).

सरकार, भूपेंद्रनाथ—(जन्म स. १८९० सुमार) कलकत्त्याच्या 'न्यू थिएटर्स' या सुप्रसिद्ध चित्रपटसंस्थेचे चालक.

हिंदी चित्रपटसृष्टीचा उदय महाराष्ट्रांत झाला असला तरी त्या व्यवसायशाखेंत बंगालनें जें कार्य केलें त्याचें प्रातिनिधिक स्वरूप यांच्या 'न्यू थिएटर्स'मध्यें पाहावयास मिळतें. नव्या कल्पना, नवे विचार, नवे लोक यांच्या साहाय्यानें यांनीं त्या संस्थेस जो दर्जा आणून दिला त्यामुळें कांहीं काळ हिंदी चित्रपटसृष्टीच्या नेतृत्वाचा मान तिजकडे सहजच आला.

या दृष्टीनें न्यू थिएटर्सनें ठेवलेल्या व्यापक धोरणांस विशेष महत्त्व आहे. पाश्चात्य धर्तीवर टीमवर्कची योजना न्यू थिएटर्सनें प्रथमच हिंदुस्थानांत सुरू केली. कोणत्याहि चित्रपटाच्या अंगोपांगांवर एकच मनुष्य नजर ठेवूं शकत नाहीं. अशा स्थितींत एकाच तंत्रविशारदावर सर्व चित्रपटाची जबाबदारी सोंपविण्यापेक्षां निरनिराळ्या तज्ज्ञांच्या सहकार्यानें काम केल्यास चित्रपटांतील नीटनेटकापणा वाढतो हें यांचें तत्त्व यशस्वी ठरलें. चित्रपटांतील समाधानकारकता तर यामुळें वाढलींच, परंतु त्याबरोबरच तंत्रविशारद व त्यांचें तंत्र यांत सुधारणा होण्यास मदत झाली.

या दृष्टीनें चित्रपटसंगीतांत न्यू थिएटर्सनें केलेल्या प्रगतीचें श्रेय रायचंद बोराल व पंकज मलीक या दोन संगीतविशारदांस द्यावें लागेल. संगीत हें चित्रपटाचें एक अंग बनलें पाहिजे, चित्रपटाची परिणामकारकता वाढविण्याच्या दृष्टीनें त्याचा उपयोग झाला पाहिजे, अशा कल्पनेनें रायचंद बोराल यांनीं देवकी बोस यांच्या पूरणभक्त या चित्रपटांत आपल्या नव्या संगीताचा व पार्श्वसंगीताचा उपयोग केला. त्यांत पूर्व हिंदुस्थानांतील खानदानी संगीत व बंगालमधील वैष्णवपंथीय संगीत यांचें मीलन करण्यांत आलें. पुढें पंकज मलीक यांनीं या मिश्रणांत परदेशी संगीताचाहि अंतर्भाव केला. हा प्रयत्न इतका यशस्वी ठरला कीं हिंदुस्थानांतील प्रत्येक ठिकाणीं या पद्धतीचें अनुकरण झालें. फार काय महाराष्ट्रांतसुद्धां श्री. केशवराव भोळे यांनीं खानदानी संगीत व लोकगीतें यांचें मिश्रण करून महाराष्ट्रीय संगीताची रचना केली.

पहिल्या दर्जाचीं माणसें निवडण्यावर यांचा कटाक्ष असे. देवकी बोस, नीतिन बोस, बारुआ, हेमचंद्र यांसारखे दिग्दर्शक, मुकुल बोस, तिमिर बरन, युसुफ मूळजी यांसारखे तंत्रविशारद, नझरुल इस्लाम, शरच्चंद्र चतर्जी, अर्झू लखनवी यांसारखे लेखक अशा त्या त्या क्षेत्रांतील अघाडीवरील व्यक्तींची यांनीं निवड केली व काननबाला, सैगल, उमा शशी, जमुना, पृथ्वीराज अशा कलावंतांच्या सहकार्यानें पूरणभक्त, चंडीदास, देवदास, धूपछांव, प्रेसिडेंट, मुक्ती, विद्यापति, अधिकार,

बडी दीदी, डॉक्टर, काशीनाथ यांसारख्या पहिल्या दर्जाच्या चित्रपटांची निर्मिती केली.

सरकार, डॉ. महेंद्रलाल—(जन्म स. १८३३ नवं. २–मृत्यु स. १९०४ फेब्रु. २३) बंगालमधील सुप्रसिद्ध डॉक्टर व संशोधक.

बंगालमधील पकिपारा हें गांव यांचें जन्मस्थान. १८६३ सालीं हे एम्. डी.ची परीक्षा पास झाले व होमिओपाथीकडे यांचें लक्ष वेधलें. याच औषधपद्धतीचे प्रचारार्थ यांनीं Calcutta Journal of Medicine सुरू केलें (१८६८).

परंतु यापेक्षांहि इंडियन असोसिएशन फॉर दि कल्टिव्हेशन ऑफ सायन्स या आतां जगप्रसिद्ध झालेल्या संस्थेची स्थापना हें यांचें प्रमुख कार्य होय. शास्त्रीय अध्ययनाच्या हेतूनें स्थापन झालेली ही हिंदुस्थानांतील पहिली संस्था होय. यांच्या मृत्यूनंतरहि ही संस्था यांचे चिरंजीव अमृतलाल सरकार यांनीं चालविली व केवळ तीमुळें चंद्रशेखर रामन यांना आपलें रामन इफेक्टचें संशोधन पुरें करतां आलें.

सरकार, सर जदुनाथ—(जन्म स. १८७० डिसें. १०) बंगालमधील सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक व लेखक.

सुप्रसिद्ध व धनाढ्य घराण्यांत यांचा जन्म झाला. कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांतून हे एम्. ए. झाले व बनारस हिंदु विश्वविद्यालयांत यांनीं मॉडर्न इंडियन हिस्टरीच्या प्राध्यापकाचें काम करण्यास सुरवात केली (१९१७). यानंतर इंडियन एज्युकेशनल सर्व्हिस, पाटणा युनिव्हर्सिटी, कलकत्ता युनिव्हर्सिटी (उपकुलगुरु १९२६-२८) अशा अनेक ठिकाणीं कामें केल्यानंतर हे निवृत्त झाले.

एम्. ए.च्या परीक्षेच्या वेळीं यांना मिळालेल्या प्रेमचंद रायचंद शिष्यवृत्तींतील अटींप्रमाणें यांनीं इतिहासाच्या अध्ययनास सुरवात केली व पुढें हाच विषय यांचा जीवितसर्वस्व झाला. त्यासाठीं हे फारसी, लॅटिन, संस्कृत इत्यादि अनेक भाषा शिकले. मोंगल इतिहासावरील व त्यांतहि औरंगजेबाच्या कारकीर्दीचा यांचा अभ्यास विशेष प्रसिद्ध असून औरंगजेबाचें पांच खंडांत असलेलें एक विस्तृत चरित्रहि यांनीं लिहिलें आहे. इतिहासांतील एकेका विषयाचीं जास्तींत जास्त साधनें शोधून व तपासून ग्रथित करण्याची एक नवी पद्धति यांच्या या ग्रंथानें हिंदुस्थानांतील संशोधकांत सुरू केली.

औरंगजेब व शिवाजी यांच्या विशेष अभ्यासामुळें यांचें मराठींतील ऐतिहासिक असंल साहित्याकडे लक्ष वेधलें व हे त्याकरितां मराठी भाषासुद्धां शिकले. पेशवे दप्तरांचें संशोधन होण्यास रियासतकार सरदेसाईंना यांनीं केलेल्या मदतीमुळें यांचें नांव महाराष्ट्रांत विशेष परिचित झालें. उर्दूप्रमाणेंच मोडींतहि कांहीं अक्षरें सारखीं दिसतात, तीं घोटाळा नाहींसा करण्याचें काम यांनीं केलें.

यांची काम करण्याची व लिहिण्याची पद्धत मोठी व्यवस्थित असते. बारीक व वळणदार अक्षर, प्रत्येक पानाखालीं आधार, बाजूच्या कोऱ्या जागेंत त्या परिच्छेदाचा विषय, महत्त्वाच्या मजकुराखालीं लाल पेन्सिलच्या खुणा व प्रारंभीं अनुक्रमणिका इतक्या पाश्चात्य संशोधकांना साजेशा कार्यपद्धतीनें यांचें संशोधनाचें काम चालविलें जातें.

इंग्लंडच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचें व इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्ड्स कमिशनचें सभासदत्व, कॅम्बेल गोल्ड मेडल, लंडनच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे फेलो, वंगीय साहित्यपरिषदेचे अध्यक्ष इत्यादि मानहि यांना मिळाले.

यांचे ग्रंथ—(1) India of Aurangzeb, (2) Statistics, Topography and Roads, (3) History of Aurangzeb (५ खंड), (4) Shivaji and His Times, (5) Mughul Administration, (6) Studies in Mughal India, (7) Anecdotes of Aurangzeb, (8) Chaitanya : His Life and Teachings, (9) Economics of British India, (10) India Through the Ages, (11) Fall of the Moghul Empire (२ खंड), (12) डब्ल्यू. आयर्विनच्या Later Mughals च्या दोन खंडांचें संपादन.

सरदेसाई, रा. ब. गोविंद सखाराम—(जन्म स. १८६५) इतिहासाचे सुप्रसिद्ध अभ्यासक, संशोधक व लेखक.

सुप्रसिद्ध मावळंकर सरदेसाई घराण्यांत यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण शिपोशीस झाल्यावर रत्नागिरी, पुणें व मुंबई येथें शिक्षण घेऊन हे बी. ए. झाले

(१८८८). बडोदें येथें श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचे वाचक व फतेसिंगराव गायकवाड यांचे शिक्षक म्हणून काम करीत असतां यांना युरोपच्या पांच सफरी घडल्या. यांनीं शिकविण्याकरितां केलेल्या टिपणांतून यांच्या रियासती जन्मास आल्या. यांच्या सदतीस वर्षांच्या नोकरींत हे पंचवीस वर्षे मास्तर होते. नवीजुनीं साधनें लक्षांत घेऊन मराठ्यांचा इतिहास पद्धतशीरपणें लिहिण्याचा यांनीं प्रथम मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केला. यांच्या लिखाणामुळेंच मराठ्यांच्या इतिहासाचा भव्यपणा महाराष्ट्रीयांच्या सुद्धां लक्षांत आला.

पेशवेदप्तराचें काम संपल्यावर सातारकरांनीं यांचा सन्मान करून छत्रपतींच्या हस्तें यांना साडेतीन वस्त्रें व चांदीचें तबक अर्पण केलें (१९३४). तसेंच राजवाडे संशोधनमंडळ, धुळें या संस्थेनें इतिहासमार्तंड ही पदवी व मानपत्र देऊन यांचा गौरव केला (१९४५).

यांचें वाङ्मय—ऐतिहासिक साधनें, मराठी–१-४५ खंड, पेशवेदप्तर, महादजी शिंदे यांचीं कागदपत्रें, इंग्रजी–१-६ रेसिडेन्सी रेकार्ड्स्, इतिहास–१-८ मराठी रियासत, मुसलमानी रियासत २ खंड, ब्रिटिश रियासत २ खंड. चरित्रें–शहाजी, शिवाजी, संभाजी, राजाराम, वगैरे; इंग्रजी–पाटणा युनिव्हर्सिटीतील व्याख्यानें, नागपूर युनिव्हर्सिटीतील व्याख्यानें (अव्वल मराठेशाहीचें अन्तःस्वरूप), याशिवाय शालोपयोगी भारतवर्ष वगैरे.

सरैया, शेठ चुनीलाल—(जन्म स. ? – मृत्यु स. १९१३ नवं. २९) मुंबईच्या स्पीसी बँकेचे आधारस्तंभ, बँकेच्या धंद्याचे प्रवर्तक व जगांतील सर्व चांदी खरेदी करणारे धाडसी व्यापारी.

हे एल्. एम्. ॲन्ड एस्.च्या परीक्षेंत पहिल्या क्रमाङ्कांत उत्तीर्ण होऊन बँकेच्या धंद्यांत पडले आणि तेथेंहि जगांतील सर्व चांदी खरेदी करून सरकारलाहि आपल्याकडून चांदी घेणें यांनीं भाग पाडलें. असे हे धाडसी गृहस्थ वांद्रें येथें एकाएकीं मृत्यु पावले.

सलाउद्दीन खुदाबक्ष—(जन्म स. १८७५– मृत्यु स. १९३१) इस्लामी वाङ्मयाचे सुप्रसिद्ध अभ्यासक व शिक्षणतज्ज्ञ.

हे बिहारमध्यें राहत. यांना इंग्लिश, जर्मन, अरबी, फारशी व हिन्दी भाषा उत्कृष्ट येत. कलकत्ता विश्वविद्यालयांत सभासद व प्राध्यापक म्हणून यांनीं महत्त्वाची कामगिरी केली. जर्मन भाषेंतील अरबी संस्कृतीवरील ग्रंथांचीं यांनीं केलेलीं इंग्रजी भाषान्तरें विशेष मान्यता पावलीं आहेत. तसेंच यांचें स्वतंत्र लेखनहि बरेंच आहे. मुसलमान लोकांत असलेल्या अनेक रूढि विचारावर उभारलेल्या नसून गतानुगतिकत्वावर उभारल्या आहेत असें यांचें मत होतें. हिंदुमुसलमानांचे संबंध अलगपणाचे नाहींत असें हे प्रतिपादीत. यांनीं एका इंग्लिश बाईशीं लग्न केलें होतें.

यांचे ग्रंथ—(1) Essays-Indian and Islamic, (2) Studies-Indian and Islamic, (3) Contribution to the History of Islamic Civilization (१९३०, कलकत्ता युनिव्हर्सिटी).

सहजानंद सरस्वती—(जन्म स. १८८६) बिहार प्रान्तांतील कुशल शेतकरी संघटक व सार्वजनिक कार्यकर्ते.

मूळ नांव नौरंगराय बेनीराय. जात भूमिहार ब्राह्मण. गांव देवा (जि. गाजीपूर, बुन्देलखंड). गाजीपूरला जाऊन मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेतलें व काशीस जाऊन संन्यास घेतला व व्याकरण मीमांसादिकांचें अध्ययन केलें. भूमिहार ब्राह्मणांच्या महासभेंत यांच्या वक्तृत्वाला आरंभ झाला व यांनीं भूमिहारपरिचय व ब्रह्मर्षिवंशविस्तार हे ग्रंथ लिहून प्रसिद्ध केले. पण आपणच फक्त खरे ब्राह्मण असें समजणारे सरयुपारीण व कान्यकुब्ज ब्राह्मणांनीं त्यावर आक्षेप घेण्यास सुरवात केली. ही चळवळ यांना पांच वर्षे पुरली. नंतर हे असहकरितेच्या चळवळींत पडले व यांनीं तुरुंगवास भोगला. पण १९२७ पासून यांना राष्ट्रसभेची चळवळ अपुरी वाटूं लागली व हे शेतकऱ्यांच्या संघटनेच्या मार्गाला लागले. १९३४ पासून हे राष्ट्रसभेंतून अलग झाले. पण राष्ट्रसभेलासुद्धां यांच्या शेतकऱ्यांच्या मागण्यांना मान्यता द्यावी लागली. शेतकऱ्यांची यांनीं जबरदस्त संघटना केली खरी, पण काँग्रेसविरोधामुळें यांच्या कार्याबद्दल लोकांत संशय उत्पन्न झाला.

सहानी, डॉ. बिरबल रुचिराम—(जन्म स. १८९१ नवं. १४) पंजाबमधील सुप्रसिद्ध वनस्पतिशास्त्रज्ञ.

लाहोरचें गव्हर्नमेंट कॉलेज व केम्ब्रिज येथें आपलें शिक्षण संपवून हे लखनौ युनिव्हर्सिटींत वनस्पतिशास्त्राचे प्राध्यापक झाले. लखनौ युनिव्हर्सिटीच्या फॅकल्टी ऑफ सायन्सचे हे कित्येक वर्षे डीन आहेत.

हिंदुस्थानांतील प्रमुख वनस्पतिशास्त्रज्ञांत यांची गणना होत असून पॅरिसच्या नॅचरल हिस्टरी सोसायटीच्या

तिसऱ्या दशवार्षिक समारंभाला हे हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून हजर राहिले होते (१९३५). १९३७-३८ या काळांत हे नॅशनल ॲकॅडेमी ऑफ सायन्सेसचे अध्यक्ष होते. लंडनच्या रॉयल सोसायटीचे फेलो होण्याचाहि मान यांना मिळाला (१९३६).

फॉसिल बॉटनीचे हे विशेष तज्ज्ञ आहेत. केम्ब्रिज व ॲमस्टरडॅम येथील त्या विषयाच्या जागतिक परिषदांचे हे उपाध्यक्ष होते. हिंदुस्थानांतील अनेक ठिकाणच्या अवशेषभूत व अश्मीभूत वनस्पति नि दक्षिण देशांतील खडकांचें वय इत्यादि यांचें संशोधन प्रसिद्ध आहे.

यांचे ग्रंथ—(1) Recent Advances in Indian Paleobotany, (2) Text Book of Botany (प्रा. लोसन यांचे सहकार्यानें).

सहा, मेघनाद—(जन्म स. १८९३) जगप्रसिद्ध हिंदी विज्ञानाचार्य व संशोधक.

जन्मस्थान बंगाल्यांतील डाक्का जिल्ह्यांतील सिओराताली हें गांव. आरंभापासून लोकाश्रयावर व शिष्यवृत्ति मिळवून विशेष गुण मिळवीत हे एम्. एस्सी. झाले. जगदीशचंद्र बोस व प्रफुल्लचंद्र रे हे दोघे यांचे तेव्हां गुरु होते. यांनीं 'सापेक्षतेच्या द्वारा विद्युत्प्रक्रिया सिद्धान्ताची मांडणी' व 'विकिरणदाबाचें मापन' या विषयांवर निबंध लिहून डॉक्टर पदवी मिळविली. दहा हजार रुपयांचें प्रेमचंद रायचंद बक्षिस व शिष्यवृत्ति मिळवून हे इंग्लंडला गेले (१९२१ सप्टें.). तेथें फाउलरच्या शाळेंत संशोधन करून 'तारकांच्या किरणचित्रांचा वास्तव सिद्धान्त' हा अद्वितीय लेख लिहिला (१९२२ जाने.).

या वेळीं यांच्या नाक्षत्र भौतिकांतील संशोधनामुळें शास्त्रज्ञांत एकच खळबळ उडाली. बर्लिन, म्युनिच व केम्ब्रिज येथील शास्त्रज्ञांनीं यांच्या या कार्याबद्दल प्रशंसा केली व कांहीं ठिकाणीं तर यांना व्याख्यानाकरितां बोलावण्यांत आलें. वयाच्या अवघ्या तेहेतिसाव्या वर्षी इंग्लंडच्या रॉयल सोसायटीचे यांना सभासद निवडण्यांत आलें (१९२६). त्या वेळीं हे हिंदुस्थानांत हा मान मिळालेले चवथे शास्त्रज्ञ होते. रामानुजम व्यतिरिक्त इतक्या अल्पवयांत हा मान मिळालेले हिंदुस्थानांतील हे पहिलेच शास्त्रज्ञ होत. परत आल्यावर एक वर्ष कलकत्ता विश्वविद्यालयांत काम केल्यावर अलाहाबाद विश्वविद्यालयांत यांना वास्तवाचार्यांची जागा देण्यांत आली. संयुक्त प्रान्ताचें सरकार यांना दरसाल पांच हजार रु. संशोधनार्थ देतें. यांनीं शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारार्थ 'यू. पी. ॲकेडमी ऑफ सायन्सेस'ची स्थापना केली (१९३१).

यांनीं १९१७ सालीं संशोधनास सुरवात करून विद्युत्सिद्धान्ताबाबत कार्य केलें. नंतर चक्रवर्तिबरोबर 'प्रकाशाच्या दाबा'संबंधीं प्रयोग केले (१९१८). यांचा महत्त्वाचा शोध 'Thermal Ionization of Stars' म्हणून सुप्रसिद्ध आहे. एकंदर ब्याण्णव मूलतत्त्वें असतांना सूर्यांत फक्त सत्तावन मूलतत्त्वांचाच शोध लागला आहे. तेव्हां बाकीचीं तत्त्वें सूर्यांत नाहींत का? असा प्रश्न उपस्थित होतो. यांच्या सिद्धान्ताप्रमाणें सूर्याचा तापक्रम फार असल्यानें या मूळ तत्त्वांचें विदलन होतें. म्हणून त्यांचें रेखाचित्र किंवा वर्णाली 'अल्ट्राव्हायलेट' भागांत येते. पण या किरणांचें शोषण वायूंत होत असल्यानें हीं तत्त्वें सूर्यांत नाहींत असा आपला गैरसमज होतो. यांनीं परमाणूंची रचना, किरणोत्सर्गी विघटन यांवर संशोधन केलें असून त्यांच्या 'लवणांचे भिन्न रंग व त्यांची उपपत्ति' हा महत्त्वाचा शोध १९३१ सालीं प्रसिद्ध झाला. १९४४ सालीं इंग्लंड वगैरे देशांत कांहीं हिन्दी शास्त्रज्ञ पाठविले त्यांत हे होते. तसें रशियांत ज्युबिलीनिमित्त यांना बोलाविलें तेव्हां हे तिकडे गेले (१९४५ जून).

यांचे महत्त्वाचे निबंध—(1) Theory of Thermal Ionisation of Gases, (2) Theory of Selective Radiation Pressure.

यांचे ग्रंथ—(1) Principles of Relativity, (2) Six Lectures on Atomic Physics, (3) Treatise on Heat, (4) Treatise on Modern Physics (सहकार्यानें) इत्यादि.

सातवळेकर, श्रीपाद दामोदर—(जन्म स. १८७२) वेदांचे अभ्यासक, प्रकाशक, प्रचारक तसेंच हिन्दी-मराठी लेखक, वक्ते व चित्रकार.

यांचा जन्म सावंतवाडीजवळील खेड्यांत कऱ्हाडे ब्राह्मणाचे कुलांत झाला. यांनीं घरींच वेदशास्त्राचें शिक्षण घेतलें. प्रथम निजाम हैदराबादेस फोटोग्राफर व चित्रकार म्हणून गेले. तेथें सार्वजनिक कार्यांत भाग घेत असतां हद्दपार होण्याचा योग दिसतांच हे कांगडी गुरुकुलांत चित्रकलेचे शिक्षक म्हणून गेले. तेथें असतां 'वैदिक धर्माची तेजस्विता' या यांच्या विश्ववृत्त मासिकांतील लेखावरून यांना एक वर्ष कारावास भोगावा लागला

(१९१०). नंतर हे लाहोर येथें कांहीं वर्षें काढून महाराष्ट्रांत औंध येथें येऊन स्थायिक झाले. वेदांच्या सूक्ष्म अध्ययनामुळें आणि मार्मिक वक्तृत्वामुळें यांच्याकडे आर्यसमाजाचें विशेष लक्ष वेधत असलें तरी यांचा स्वतंत्रपणा त्यांना झेंपत नाहीं. पुरुषार्थ (मराठी), वैदिक धर्म (हिन्दी), हीं मासिकें, भगवद्गीतेवरील पुरुषार्थ बोधिनी, दैवत संहिता, अथर्ववेदाचें हिन्दी भाषान्तर वगैरे यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

वेदांप्रमाणेंच रामायण व महाभारत या सांस्कृतिक ग्रंथांवरहि यांचा भर असून यांचें लेखन ध्येयप्रधान असतें.

सालरजंग, सर—(जन्म स. १८२९ जाने. २–मृत्यु स. १८८३ फेब्रु. ८) हैदराबाद संस्थानचे सुप्रसिद्ध दिवाण.

यांचें नांव मीर तुरब अलीखान. आपले काका सिराज-उल्मुल्क यांच्यानंतर हे हैदराबाद संस्थानच्या दिवाण-पदावर आले व १८५७ सालच्या बंडापासून हैदराबादला अलग राखण्यासाठीं केलेल्या पद्धतशीर कार्यामुळें यांनीं सर्वांचें लक्ष आपणाकडे वेधून घेतलें.

या कार्यामुळें निर्माण झालेल्या संस्थानांतील असंतोषानें यांचे अनेक वेळा खुनाचे प्रयत्न झाले; परंतु पुढें हैदराबाद संस्थानामध्यें यांनीं केलेल्या सर्वांगीण सुधारणांमुळें यांना अपार लोकप्रियतेचा लाभ झाला. जमाबंदीची व्यवस्था, सेंट्रल ट्रेझरीची स्थापना, त्या त्या खात्याच्या प्रधानाला मदत करण्यासाठीं चार मौन-उल-महानची योजना, पोलीस खात्याची पुनर्घटना, शिक्षणखात्याची सुधारणा, हैदराबाद-वाडी रेल्वेची स्थापना अशा एकापेक्षां एक सरस सुधारणांनीं यांचें नांव सर्वतोमुखी झालें. १८६९ सालीं तीन वर्षें वयाचे मेहबूब अलीखान निझाम झाल्यानंतर हेच त्या संस्थानचे प्रमुख रीजंट बनले.

निजामला वऱ्हाड मिळवून देण्यासाठीं यांनीं केलेलें कार्यहि महत्त्वाचें आहे. हे दिवाण होण्यापूर्वी दोनच आठवडे आधीं खंडणीसाठीं तो प्रांत निजामनें इंग्रज सरकारला लिहून दिला. यांनीं तितकें व्याज येणारी बारा कोटी रुपयांची रक्कम सरकारच्या स्वाधीन करून तो प्रांत परत मिळवण्याचा प्रयत्न केला. परंतु निजाम अज्ञानावस्थेंत आहे तोंपर्यंत या प्रश्नाचा निकाल लावण्याचें त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड लिटन यांनीं नाकारलें. पुढें यांच्या मृत्यूनंतर तो प्रांत निजामच्या स्वाधीन करण्यांत आला.

त्या वेळीं उत्तम पोषाख करणारांत यांची गणना होई. यांची वागण्याची पद्धतीहि दरबारी थाटाची असे. याचकारणानें यांनीं केलेल्या युरोपच्या प्रवासांत यांचें सर्वत्र प्रचंड प्रमाणांत स्वागत करण्यांत आलें.

हे कॉलऱ्यानें मरण पावले. परंतु यांना विषप्रयोग झाला अशी त्या वेळीं सर्वत्र समजूत होती.

सावंतवाडीकर, महाराज बापुसाहेब सावंत—(जन्म स. १८९७–मृत्यु स. १९३७; कारकीर्द स. १९२४ आक्टो. २९–१९३७) सांवतवाडीचे सुप्रसिद्ध चारित्र्यसंपन्न व सुविद्य महाराज.

यांचें शिक्षण पुण्याजवळ खडकी येथें एका युरोपियन ख्रीजवळ व कोल्हापुरांत ले. जे. सी. टेट यांजपाशीं झालें. १९१२ साली हे पुढील शिक्षणाकरितां इंग्लंडला गेले. १९१७ सालीं केम्ब्रिज येथील 'ऑफिसर्स कॅडेट बॅटेलियन ट्रेनिंग स्कूल'मधील शिक्षण संपवून सेकंड लेफ्टनंटच्या हुद्यावर हे मेसापोटेमियांत गेले. तेथील युद्धांत काम करून परत आल्यावर यांचा विवाह बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांची नात लक्ष्मीदेवी यांच्याशीं झाला. यांचा कारभार अत्यंत लोकप्रिय झाला. नीतिमत्ता, धर्मनिष्ठा व स्वदेशप्रीति हे यांचे मुख्य गुण होत. यांच्या राज्याला म. गांधीनीं रामराज्याची उपमा दिली.

सावरकर, विनायक दामोदर—(जन्म स. १८८३ मे २८) सुप्रसिद्ध क्रान्तिकारक, प्रभावी वक्ते, हिंदुसभेचे पुरस्कर्ते व सार्वजनिक कार्यकर्ते.

जात चित्पावन ब्राह्मण. यांचें जन्मस्थान नाशिक जवळचें भगूर. तेथें यांनीं प्राथमिक व नाशिक येथें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण घेतलें. श्वशुर रामचंद्र त्र्यंबक चिपळुणकर यांच्या मदतीनें पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांतून हे बी. ए. झाले (१९०५). नंतर मुंबईस एल्एल्. बी. चा अभ्यास करीत असतां श्यामजी कृष्णवर्मा यांच्या शिष्यवृत्तीनें हे इंग्लंडला गेले (१९०६ जून). तेथें इंडिया हाउसमध्यें राहून हे कायद्याचा अभ्यास करीत. तेथें सत्तावन सालच्या स्वातंत्र्य-युद्धाचा वाढदिवस, शिवाजीउत्सव वगैरेंत हे पुढाकार घेत. कर्झन वायलीचा खून करणाऱ्या मदनलाल धिंग्राच्या निषेधाला विरोध करण्यानें हे क्रान्तिकारक म्हणून तिकडे विख्यात झाले. त्यामुळें यांना बार-ॲट-लॉची डिग्री नाकारण्यांत आली.

इकडे यांचे ज्येष्ठ बंधु गणेशपंत तथा बाबा यांना अभिनव भारतच्या मित्र मेळ्याच्या पद्यावलीवरून जन्मठेपेची शिक्षा झाली (१९०९). पुढें नाशिक येथें जॅक्सनचा खून झाला (१९०९ डिसें. २१). त्यानंतर हे पॅरिसहून लंडन येथें आले असतां यांना स्टेशनवर अटक करण्यांत आली (१९१० मार्च १३). नंतर यांना हिंदुस्थानांत रवाना करण्यांत आलें (१९१० जुलै १). कांहीं दिवस प्रवास झाल्यानंतर मार्सेलिस बंदरांत बोट आली (१९१० जुलै ८) आणि यांनीं संडासाच्या पोर्टहोलमधून उडी झोकली आणि पोहत जाऊन फ्रान्सचा किनारा गांठला. हे पळत 'गाडी गाडी' म्हणून ओरडत असतां फ्रेंच पोलिसांनीं यांना पकडलें व पाठलाग करीत आलेल्या हिंदी पोलिसांच्या स्वाधीन केलें. नंतर हे मुंबईस (२२-७-१०) व तेथून नाशिकला येऊन पोंचले.

फ्रेंच सरकारच्या आश्रयार्थ गेलेल्या यांना फ्रेंचांच्या ताब्यांत देण्याचा प्रश्न हेगच्या आन्तरराष्ट्रीय न्यायकोर्टाकडे सोंपविण्यांत आला; पण तेथें यांना फ्रेंचांच्या ताब्यांत देऊं नये असा निर्णय लागला. तो निकाल हातीं येण्यापूर्वीच जक्सन खून कटाला पिस्तूल पुरविणारे व मदत करणारे म्हणून यांच्यावर खटले चालून यांना वेगवेगळ्या भोगावयाच्या दोन जन्मठेपीच्या शिक्षा देण्यांत आल्या व यांची व यांच्या सासऱ्याची मिळकत जप्त करण्यांत आली.

नंतर यांना डोंगरी, भायखळा, ठाणें व मद्रास अशा क्रमानें अंदमानला नेण्यांत आलें. अंदमानमधील आपल्या चवदा वर्षांच्या तुरुंगवासाची रोमांचकारी हकीगत यांनीं आपल्या 'जन्मठेप' या पुस्तकांत एखाद्या कादंबरीप्रमाणें नमूद केली आहे. तें पुस्तक जप्त झालें होतें. पुढें ते जप्तींतून मुक्त झालें. हिंदुस्थानांत तीन वर्षें अलीपूर व रत्नागिरी या ठिकाणीं काढल्यावर यांना येरवड्याहून रत्नागिरी येथें स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें (१९२४ जाने. ६). तेथें असतां यांनीं विपुल लेखन केलें. अस्पृश्यतानिवारणाकरितां सहभोजन, पतितपावनमंदिरस्थापना वगैरे कामें करून यांनीं हिंदुसभेच्या कार्याला नवें वळण देण्याचा प्रयत्न केला आणि भाषाशुद्धीसारख्या अनेक प्रश्नांत लक्ष घातून आपल्याकडे सर्वांचें लक्ष वेधून घेतलें.

पुढें यांच्यावरील निर्बंध काढून घेण्यांत आल्यावर हे मुंबईस राहूं लागले (१९३७ मे). यांनीं राष्ट्रसभेंत सामील न होतां हिंदुसभेच्या कार्यांत भाग घेण्यास सुरवात केली. अहमदाबाद अधिवेशनाचें अध्यक्षपद यांना देण्यांत आलें (१९३७). तेथें यांनीं हिंदुसभेचें अर्ध राजकीय व अर्ध सामाजिक रूप होतें तें नष्ट करून तिला पूर्ण राजकीय स्वरूप दिलें आणि राष्ट्रसभेची प्रतिस्पर्धी संस्था करण्याची घोषणा केली. त्यानंतर यांनीं हिंदुस्थानाच्या बहुतेक भागांत प्रभावी दौरे काढून विलक्षण जागृति घडवून आणली. त्यामुळें यांना नागपूर, कलकत्ता, मदुरा, भागलपूर व कानपूर या ठिकाणीं ओळीनें अध्यक्षपद देण्यांत आलें. शेवटीं केवळ प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें यांनीं त्या पदाचा त्याग केला.

स्वातंत्र्य मिळविणें व राखणें यांबाबत सैनिकी विद्या व सैन्यांत असणारे लोक यांचा प्रभाव पडल्याशिवाय राहत नाहीं हे जाणून हिंदूंना दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं सैन्यांत शिरण्यास यांनीं प्रोत्साहन दिलें.

यांनीं ब्रिटिश सरकार पक्षपात करून हिंदूंच्या हिताला विरोधी वर्तन करीत आहे आणि ऐक्याच्या नादीं लागून राष्ट्रसभाहि त्याला साहाय्य करिते ही भावना राष्ट्रांत स्पष्टपणें उत्पन्न केली आणि शुद्ध राष्ट्रीय भावनेचा प्रचार केला. लोकसंख्येनुसार सर्वांना प्रतिनिधि मिळावेत आणि हिंदूंच्या न्याय्य हक्कांचा कोणत्याहि सबबीवर अपहार होऊं नये अशी यांची विचारसरणी असे. शेवटीं अनुनयाची परमावधि करूनहि मुसलमानांचें समाधान होत नाहीं असें दिसून येतांच पाकिस्तानाला आणि समप्रतिनिधित्वाच्या घातुक तत्त्वाला विरोध करून राष्ट्रसभेला यांच्याच विचारसरणीला अनुसरावें लागलें.

यांनीं वैनायक नांवानें स्वतःच बसविलेला छंदःप्रकारहि उपयोगांत आणलेला आहे. यांचें बरेंचसें वाङ्मय तुरुंगांत असतां निर्माण झालें आहे.

यांचें इंग्रजी व मराठी वाङ्मय—काव्य–१ गोमान्तक महाकाव्य, २ कमला (प्रायः अनुष्टुभ् वृत्तांत), ३ सावरकर व त्यांची कविता; नाटकें–४ खड्गसंन्यास, ५ उःशाप, ६ उत्तरक्रिया; कादंबऱ्या–७ मला काय त्याचें (मोपल्याच्या बंडावर); हिंदुविषयक–८ हिंदुत्व (इंग्रजी १९२१, प्रसिद्धि काल १९२३); आत्मचरित्र–९ माझी जन्मठेप (दुसरी आवृत्ति १९४२); भाषा–१० भाषाशुद्धि; ऐतिहासिक–११ हिंदुपदपादशाही, १२ सत्तावन सालच्या बंडाचा इतिहास (इंग्रजी); चरित्रें–१३ मॅझिनी, १४ सावरकर साहित्य (१-५ खंड) वगैरे.

सिकंदर, हयातखान—(जन्म स. १८९२

जून ५-मृत्यु स. १९४३) पंजाबमधील सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते, मुख्य प्रधान व गव्हर्नर.

अलिगडचें एम्. ए. ओ. कॉलेज व लंडनचें युनिव्हर्सिटी कॉलेज येथें शिक्षण संपवून हे लष्करांत शिरले. तेथें ऐन अघाडीवर कंपनीवर हुकमत चालविण्याची संधि यांना देण्यांत आली. हे इंग्लंडमध्यें वि. दा. सावरकर यांच्या स्नेहांत होते.

पंजाबमधील अनेक औद्योगिक संस्थांचे हे प्रमुख असून रिझर्व्ह बँकेचे लंडन येथील प्रतिनिधि होण्याचा मानहि यांना मिळाला. १९३० सालीं हे पंजाबचे अर्थमंत्री होते. हे कांहीं दिवस (१९३२-१९३४) पंजाबचे गव्हर्नरहि होते.

पुढे यांचे बंधु खिजर हयातखान तिवाना हे पंजाब प्रान्ताचे मुख्य प्रधान झाले.

सिंघानिया, सर पद्मपत—(जन्म स. १९०५) संयुक्त प्रांतांतील जे. के. इंडस्ट्रीज या सुप्रसिद्ध व्यापारी संघटनेचे प्रमुख.

जे. के. (जुगीलाल कमलपत) इंडस्ट्रीजचे मूळ संस्थापक लाला कमलपत सिंघानिया यांचे हे थोरले चिरंजीव. यांचें घराणें मूळ मारवाडांतील असलें तरी संयुक्त प्रांत, विशेषतः कानपूर येथेंच यांच्या सर्व उद्योगधंद्यांचे जाळें विणलें गेलें.

वयाच्या दहाव्या वर्षीच हे आपल्या वडिलांचे धंद्यांत शिरले. प्रथम सर्व युरोपभर फिरून निरनिराळ्या उद्योगधंद्यांचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यानंतर यांनीं जे. के. इंडस्ट्रीजची वाढ करण्यास सुरवात केली व आज या संस्थेच्या व्यवस्थेखालीं कापड, लोखंड, ॲल्युमिनियम, कांच, औषधें, दारूगोळा, साखर, ज्यूट इत्यादींच्या बेचाळीस गिरण्या चालू आहेत. आपले बंधु कैलासपत व लक्ष्मीपत यांच्या सहकार्यानें यांनीं संयुक्त प्रांताच्याच नव्हे तर हिंदुस्थानच्या औद्योगीकरणास मदत केली आहे.

पहिल्या दर्जाच्या इमारती बांधण्याचा यांना छंद असून कमल टॉवर (जे. के. इंडस्ट्रीजचें ऑफिस), कमल रिट्रीट, गंगाकुटी या इमारती यांच्या कलात्मक दृष्टीच्या द्योतक आहेत.

संयुक्त प्रांताच्या मर्चंटस् चेंबरचे हे संस्थापक असून फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीच्या १९३५ च्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें. संयुक्त प्रांतांतील काँग्रेस उमेदवाराचा पराभव करून हे घटनासमितीवर निवडून आले.

सिंह, सच्चिदानंद—(जन्म स. १८७१ नवं. १०) बिहार प्रांतांतील सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते व लेखक.

पाटणा कॉलेज व सिटी कॉलेज कलकत्ता, येथें आपलें शिक्षण संपवून हे इंग्लंडला गेले व बॅरिस्टर होऊन परत आले. कलकत्ता, अलाहाबाद व पाटणा येथें यांची उत्कृष्ट वकील म्हणून प्रसिद्धि आहे.

१८९९ सालीं यांनीं 'हिंदुस्थान रिव्ह्यू' हें बिहारमधील सुप्रसिद्ध मासिक सुरू केलें (पाटणा) व तें अनेक वर्षें अत्यंत यशस्वीपणानें चालविलें. १९३१ सालीं हे पाटणाच्या 'इंडियन नेशन' पत्राचे मॅनेजिंग डायरेक्टर झाले.

१९२७ सालीं द्विदलराज्यपद्धति या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या राज्यपद्धतीच्या घटनेमध्यें यांनीं व्याख्यान व लेखरूपानें दिलेल्या सूचनांचा उपयोग करण्यांत आला. १९३३ सालींहि हिंदी सुधारणासंबंधींच्या जॉइंट पार्लमेंटरी कमेटीसमोर साक्ष देण्यासाठीं यांना इंग्लंडमध्यें बोलवण्यांत आलें. इंडियन लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे पहिले उपाध्यक्ष व बिहार-ओरिसा प्रांताचे पहिले अर्थमंत्री होण्याचा मानहि यांना देण्यांत आला.

आपल्या पत्नी राधिकादेवी यांच्या स्मरणार्थ यांनीं पाटणा येथें बांधलेल्या राधिका इन्स्टिट्यूटची पाटणामधील मोठें सभागृह म्हणून प्रसिद्धि असून तेथील सच्चिदानंद सिंह लायब्ररींतील इंग्रजी ग्रंथांचा संग्रह पहिल्या दर्जाचा मानण्यांत येतो.

यांचे ग्रंथ—(1) The Partition of Bengal or Separation of Behar, (2) Some Eminent Behar Contemporaries, (3) Speeches and Writings of Sacchidanand Sinh इत्यादि.

सिंह, लॉर्ड सत्येंद्रप्रसन्न—(जन्म स. १८६४ जून-मृत्यु स. १९२८ मार्च ५) बंगालमधील सुप्रसिद्ध कायदेपंडित व पहिले हिन्दी गव्हर्नर.

१८८१ त हे घरांतून इंग्लंडला पळाले व स्कॉलरशिपच्या मदतीनें बॅरिस्टर होऊन परतले (१८८६). हिंदुस्थानांत परतल्याबरोबर यांनीं आपल्या वकिलीस सुरवात केली.

हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न सामोपचारानें मिटण्याजोगा आहे अशी यांची प्रथमपासून खात्री असल्यानें हे काँग्रेसपेक्षां सरकारलाच अधिक चिकटून असत. या कारणानें ॲडव्होकेट जनरल (१९०८), व्हाइसरॉयच्या कौन्सिलचे लॉ मेंबर (१९०९), इंपीरियल व वॉर कौन्सिलचे हिंदी प्रतिनिधि, प्रिव्ही कौन्सिलच्या ज्युडिशियल कमेटीचे सभासद, उपभारतमंत्री व बिहार-ओरिसाचे गव्हर्नर (१९११) अशा मानाच्या जागा यांना भूषविणें शक्य झालें. यांपैकीं कित्येक जागीं नेमणूक झालेले हे पहिलेच हिंदी गृहस्थ होते. यांचेनंतर यांना रायपूरचे लॉर्ड करण्यांत आलें. प्रेस ॲक्ट व गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट हे दोन कायदे हे सुद्धां यांच्या लॉर्ड सभेच्या सभासदत्वाचें फळ आहे.

यांच्या सरकारमान्यतेमुळें काँग्रेसमध्येंहि यांना महत्त्व असे. संस्थानिकांच्या चौकशीशिवाय होणाऱ्या पदच्युतीसंबंधीं हे प्रथमतः काँग्रेसमध्यें बोलले (१८९६, कलकत्ता). यानंतर मुंबई येथें भरलेल्या काँग्रेसचें अध्यक्षस्थानहि यांना देण्यांत आलें (१९१५). प्रतिकारशक्तिशून्य असणारा सध्यांचा हिंदुस्थान स्वतंत्र झाला तर त्याला इतर राष्ट्रांशीं तोंड देण्यांत अपयश पत्करावें लागेल, त्यामुळें प्रथम प्रतिकारशक्ति वाढवून नंतर स्वातंत्र्याचा लढा करणें इष्ट होईल, अशी यांच्या अध्यक्षीय भाषणाची विचारपरंपरा होती.

सुब्बाराव, प्रा. एन्. एस्.—(जन्म स.१८८५) सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व म्हैसूर विद्यापीठाचे उपकुलगुरु.

म्हैसूर, मद्रास व केम्ब्रिज येथें शिक्षण संपादून इतिहास व अर्थशास्त्र या विषयांत हे निष्णात झाले. म्हैसूर येथें युनिव्हर्सिटींत अर्थशास्त्राचे प्राध्यापक, महाराजा कॉलेजांत प्रिंसिपल व डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन वगैरे जागीं यांनीं कामें केलीं. इंडियन टारिफ बोर्डाचे सभासद, ऑल इंडिया एज्युकेशनल कान्फरन्सचे अध्यक्ष (१९३१), इंटर-युनिव्हर्सिटी बोर्डाचे कार्यवाह व पुढें अध्यक्ष वगैरे विविध क्षेत्रांत हे वावरले. म्हैसूरच्या ऑल इंडिया इकॉनॉमिक कॉन्फरन्सचे स्वागताध्यक्ष (१९४०) व अलाहाबाद येथें अध्यक्ष होते (१९२९).

यांचे महत्त्वाचे ग्रंथ—१ इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल कन्डिशन्स इन एन्शन्ट इंडिया, २ व्होकेशनल एज्युकेशन, ३ सम आस्पेक्ट्स ऑफ इकॉनमिक प्लॅनिंग (मद्रास युनिव्हर्सिटींतील व्याख्यानांचा संग्रह) इ. इ.

सुभेदार, मनु—(जन्म स. १८९० सुमार) सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ.

मुंबईचें न्यू हायस्कूल व एल्फिन्स्टन कॉलेज येथें आपलें शिक्षण संपवून हे इंग्लंडला गेले. बॅरिस्टर (१९१४) व लंडन स्कूल ऑफ इकॉनमिक्समधून बँकिंग व करन्सी या विषयांत विशेष प्राविण्य दाखवून बी. एस्सी. होऊन हे परत आले (१९१४). हिंदुस्थानांत आल्यानंतर यांनीं मुंबई युनिव्हर्सिटी, कलकत्ता युनिव्हर्सिटी इत्यादि ठिकाणीं अर्थशास्त्राच्या प्राध्यापकाचीं कामें केलीं.

हिंदुस्थानांतील नामांकित अर्थशास्त्रज्ञ म्हणून यांची प्रसिद्धि असून इंग्लंडमधील बिबिंग्टन स्मिथ कमेटीसमोर साक्ष देण्याकरितां हिंदी व्यापारी वर्गाचे प्रतिनिधि म्हणून हिंदुस्थानसरकारनें यांची निवड केली. इंडियन मर्चेन्ट्स् चेम्बरचेहि हे प्रमुख कार्यकर्ते असून बॉम्बे इंप्रुव्हमेंट ट्रस्ट कमेटी, डेव्हलपमेंट खात्याचें सल्लागार मंडळ इत्यादि ठिकाणीं यांनीं त्या संस्थेचे प्रतिनिधि म्हणून काम केलें. म्हैसूर, जुनागड, कच्छ, जोधपूर इत्यादि संस्थानांचे हे कित्येक वर्षें आर्थिक सल्लागार आहेत.

हे गुजराथी असून मराठी संत वाङ्मयावर यांचें विशेष प्रेम आहे. यांनीं ज्ञानेश्वरीचें इंग्रजी भाषांतरहि प्रसिद्ध केलें आहे. तसेंच हिंदुस्थानांतील शास्त्रीय वाङ्मयाची अनवस्था दूर करण्यासाठीं शास्त्रीय व औद्योगिक विषयांवर प्रत्येकी शंभर पृष्ठांच्या व चार आणे किंमतीच्या ग्रंथमालेची योजनाहि यांनीं तयार केली.

यांचे ग्रंथ—(1) Gita Explained by Dnyaneshwar Maharaj, (2) Separate Minority Report on the Indian Central Banking Enquiry Committee.

सुंदराबाई 'स्वरदेवता'—(जन्म स. १८९० सुमार) प्रसिद्ध गायिका.

या राहणाऱ्या पुण्याच्या. यांचे गायनगुरु पुण्याचे ठाकुरदासबोवा. लावणी म्हणण्यास साताऱ्याकडील एका प्रख्यात लावणी गाणाऱ्याजवळ शिकल्या. लावणी, गझल, कवाली, ठुंबरी, भजनें, होरी, कजर या गाण्यांत या कुशल आहेत. हैदराबादेस निजामसाहेबांनीं यांचा गौरव केला. यांची उर्दू जबान अगदीं अस्सल व सची आहे. त्यामुळेंच निजामसाहेब खुष होऊन केव्हां केव्हां उद्गार काढतात ' हिंदवानी होके क्या साफ उर्दु बोल

रही है.' रेडिओंत गायला लागल्यापासून काश्मीर ते मद्रासपर्यंत यांच्या वाणीनें वेड लागलें आहे.

यांचे दुसरे वस्तादजी खासाहेब गुलाम रसूलखा. त्यांच्याजवळील ठुंबरी, गझल, कवाली, होरीचें गायन यांनीं घेतलें. चिजा शिकत असतांना ती बरोबर आहे कीं नाहीं हें पाहण्याची व तिचा अर्थ समजून गाण्याची यांची पद्धत आहे. कोणत्याहि अलंकाराचा रसपरिपोषाकडे उपयोग करण्याची कल्पकता व योजनाचातुर्य यांना साध्य झालें आहे. महाराष्ट्राचें खास गाणें लावणी होय. त्याचें सौंदर्य व रसवत्ता यांनीं व्यक्त केली.

सेक्सारिया, गोविंदराम—(जन्म स. १८८६–मृत्यु स. १९४६) मुंबईचे सुप्रसिद्ध कापसाचे व्यापारी व उदार धनिक.

जयपूर संस्थानांतील नवलगढ हें गांव यांचें जन्मस्थान. वयाच्या सोळाव्या वर्षी हे आपल्या वडिलांच्या बरोबर मुंबईला आले व थोड्याच दिवसांत यांची हुशार व्यापारी म्हणून सर्वत्र प्रसिद्धि झाली. इंडियन कॉटन असोसिएशन, बुलियन एक्सचेंज, मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स, ग्रेन ॲन्ड सीड्स असोसिएशन, न्यूयॉर्क कॉटन असोसिएशन अशा अनेक देशीविदेशी व्यापारी संस्थांशीं यांचा निकटचा संबंध असे. याशिवाय सोनें, चांदी, शेंगदाणे, एरंडी इत्यादींचा यांचा मोठा व्यापार असे.

परंतु यापेक्षांहि एक उदार धनिक म्हणून यांची विशेष प्रसिद्धि असे. शिक्षण व औषधयोजना यांसाठीं यांनीं केलेला एक कोटी रु.चा ट्रस्ट सुप्रसिद्ध असून असाच एक पन्नास लाखांचा ट्रस्ट यांनीं मृत्यूपूर्वी केला. हरिद्वार येथील सेक्सारिया धर्मशाळा व अन्नछत्र हीं यांचीं चिरकाल टिकणारीं स्मारकें होत. वर्ध्याच्या कॉमर्स कॉलेजला व सावंतवाडीच्या महाराणी कॉलेजलाहि यांनीं प्रत्येकीं पंधरा लाखांच्या देणग्या दिल्या आहेत.

अक्षरशः लोळ्याच्या भांडवलावर धंद्यास सुरवात करून जीं माणसें पुढें कोट्यधीश झालीं त्यांत यांची गणना होते. वायद्याच्या व्यापारांत व सौदे करण्यांत तर यांचा इतका हातखंडा असे कीं यांच्या सभोंवार वावरणारीं माणसेंसुद्धां पुढें त्या धंद्यावर लक्षाधीश झालीं.

साधें आंखूड धोतर, खादीचा अंगरखा, मारवाडी फेटा व पायांत ओबडधोबड चढाव असा साधा वेष असणारी यांची मूर्ति विशेष डोळ्यांत भरत नसली तरी अचूक निर्णय व मोजके बोलण्यानें यशस्वी व्यापारी म्हणून गाजली आणि मिळविलेल्या संपत्तीचा उदारपणें व्यय करून अजरामर झाली.

सेटलवाड, डॉ. सर चिमणलाल हरिलाल–(जन्म स. १८६४ जुलै) मुंबईचे सुप्रसिद्ध वकील व प्रागतिक पक्षाचे पुढारी.

यांचा जन्म भडोच येथें झाला. यांचें शिक्षण अहमदाबाद व मुंबई येथें होऊन ह एल्एल्. बी. झाले व मुंबईस वकिली करूं लागले (१८८७).

खालील ठिकाणीं यांनीं महत्त्वाचीं कामें केलीं. मुंबई कार्पोरेशन (१८९२-१९१७), मुंबई कायदेमंडळ, ना. गोखल्यांच्या मृत्यूनंतर इंपीरियल कौन्सिल, साउथबरो कमेटी (१९१८), जालियनवालाबाग चौकशीकरितां नेमलेली हंटर कमेटी (१९१९), तेथें यांनीं भिन्नमतपत्रिका लिहिली. सायमनकमिशन बहिष्काराच्या वेळीं हे लोकांचे पुढारी म्हणून चमकले. गोलमेज परिषदेच्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनांत यांनीं भाग घेतला. तेथें यांनीं फेडरेशनला विरोध केला. मुंबई युनिव्हर्सिटीचे हे बारा वर्षें व्हाइस चान्सेलर होते. युनिव्हर्सिटी रिफार्म्स कमेटीचे अध्यक्ष म्हणून यांनीं काम केलें व तिची घटना व्यापक केली. यांना युनिव्हर्सिटीनें एल्एल्. डी. पदवी देऊन गौरविलें. यांनीं आपलें आत्मचरित्र रिफ्लेक्शन्स ॲंड रिकलेक्शन्स (१९४६) या नांवानें प्रसिद्ध केलें आहे. त्यांत गेल्या पन्नास वर्षांच्या राजकारणांतील अनेक महत्त्वाचे तपशील उपलब्ध होतात. हे अक्कलकोटच्या स्वामींचे निःसीम भक्त आहेत.

सेन, केशवचंद्र—(जन्म स. १८३८–मृत्यु स. १८८४ जाने. ८) ब्राह्म समाजांतील थोर पुरुष, उत्कृष्ट वक्ते, कल्पक कार्यकर्ते आणि लोकसेवक.

यांचा जन्म बंगाल्यांत प्रसिद्ध असणाऱ्या वैद्य नांवाच्या जातींत झाला. यांचें घराणें कट्टें वैष्णव होतें. यांचे आजे राजकमल व वडील प्यारीमोहन. माता शारदासुंदरी. यांचें पालनपोषण मातेनें केलें. एकदां हे परीक्षेला बसले असतां शेजारच्या विद्यार्थ्याशीं बोलले म्हणून यांना परीक्षेंतून उठवून लावण्यांत आलें. या विषादाच्या कालांत बायबलसारख्या ग्रंथाचा यांच्या मनावर विशेष परिणाम झाला. यांनीं ब्राह्म समाजाची दीक्षा घेतली (१८५७) व आपल्या कुलांतील परंपरेप्रमाणें वैष्णव सांप्रदायाची दीक्षा घेण्याचें नाकारिलें.

आपल्या तडफदार कार्यपद्धतीनें वर्णव्यवस्था मोडणें, यज्ञोपवीताचा त्याग, कुलगुरूकडून दीक्षा न घेणें, मूर्तिपूजकांच्याकडे कोणत्याहि समारंभास न जाणें, नाचरंगतमाशांना आळा, स्त्रियांना समानता, कडक नीतिनिर्बंध वगैरेंचा जोराचा प्रचार करून ब्राह्मधर्माच्या प्रचाराकरितां यांनीं मिशनरी तयार केले व यांच कार्याला स्वतःला वाहून घेतलें. इंडियन मिरर नांवाचें इंग्रजी साप्ताहिकहि सुरू केलें. देवेन्द्रनाथ टागोरांनीं यांना आपल्या जागीं ब्राह्मसमाजाचे ब्रह्मानंद अशी पदवी देऊन आचार्य नेमलें (१८६२). घरच्या जुन्या लोकांकडून यांच्यावर बहिष्कार पुकारला गेला तो यांच्या समवयस्क व समविचारी लोकांत प्रतिष्ठेचाच विषय झाला. यांनीं बंगालच्या बाहेर आपल्या मताचा प्रचार करण्याच्या उद्देशानें मुंबई मद्रासकडे दौरा काढला आणि तो यांच्या प्रभावी इंग्रजी वक्तृत्वानें यशस्वी झाला (१८६४).

पण दिवसेंदिवस देवेन्द्रनाथ टागोरांशीं वाढता मतभेद, अतिरिक्त समाजसुधारणेकडील ओढा, ख्रिस्ती धर्माची प्रशंसा व स्वकीयांची निन्दा यामुळें यांना ब्राह्मसमाजांतून फुटून स्वतःचा भारतवर्षीय ब्राह्मसमाज काढावा लागला (१८६६ नवं. ११). त्याकरितां यांनीं भव्य इमारतहि उभारली (१८६९ आगस्ट २२). याच वेळीं यांचे पुरस्कर्ते हिंदुस्थानच्या सर्व भागांत यशस्वी प्रचार करून आले आणि नंतर हे स्वतः लवकरच इंग्लंडला गेले. तिकडे यांचा ख्रिस्ती धर्माचे पुरस्कर्ते व समाजसुधारक म्हणून अत्यंत गौरव झाला. इकडे परत आल्यावर यांनीं समाजाची सुधारणा करणाऱ्या अनेक स्त्रीपुरुषांच्या संस्था काढल्या व 'सुलभ समाचार' यासारखीं नियतकालिकें काढलीं. ब्राह्मविवाह कायदेशीर ठरविणें, ब्राह्म झाल्यामुळें बहिष्कृत होणारांना एकत्र कुटुंब पद्धतीनें राहण्याकरितां काढलेल्या भारताश्रम संस्थेतून उद्भवलेल्या नैतिक भानगडी सोडविणें वगैरेमुळें हे त्रस्त झाले. तेव्हां यांनीं ध्यानधारणेकरितां वैराग्यवृत्तीनें राहता यावें म्हणून 'साधनकानन' नांवाची बाग तयार केली. योग, भक्ति व प्रार्थना यांच्या साहाय्यानें यांचें कार्य चालू होतें. पण याच सुमारास यांच्या तेरा वर्षांच्या मुलीचा विवाह पंधरा वर्षांच्या कुचबिहारच्या बाळराजाशीं झाला आणि हा बालविवाह ब्राह्मविधीनें न होतां जुन्या हिंदु धर्म शास्त्राप्रमाणें झाल्यानें तर यांच्याविरुद्ध अत्यंत गहजब झाला. यामुळें यांच्यापैकी पुष्कळ लोक फुटून त्यांनीं 'साधारण ब्राह्मसमाज' नांवाचा वेगळा समाज काढला (१८७८ मे १५).

या आघाताचा परिणाम यांच्यावर झाला आणि, रामकृष्ण परमहंस यांच्या भेटीमुळेंहि कदाचित् असेल, यांनीं 'नवविधान' नांवाच्या एका पंथाची स्थापना केली (१८८१ जाने. २४) आणि आपल्या आकर्षक पद्धतीनें व्याख्यानादि द्वारा त्याचा प्रचार हे करूं लागले. हें सर्व आपण ईश्वरी प्रेरणेनें करतों, असें हे म्हणत. यांच्याइतका प्रचंड व्याप करणारा, रोज नव्या कल्पना काढणारा, नव्या संस्था काढून त्यांच्याकडून कामें करून घेणारा समाजसुधारक अलीकडच्या काळांत क्वचितच सांपडेल.

यांचे महत्त्वाचे ग्रंथ—१ जीवनवेद (आत्मचरित्र), २ ब्राह्म धर्मानुष्ठान.

सेन, महामहोपाध्याय डॉ. गणनाथ—(जन्म स. १८६६–मृत्यु स. १९४४ आक्टो. २५) कलकत्त्याचे सुप्रसिद्ध आयुर्वेदाभिमानी डॉक्टर व प्रत्यक्ष शारीर वगैरे ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिणारे पंडित.

यांचें घराणें पिढीजात वैद्य असून कुंजविहारी-विश्वनाथ-गणनाथ असा यांचा वंश आहे. प्रथम जुन्या पद्धतीनें संस्कृत शिकून नंतर हे एल्. एम्. एस्. व एम्. ए. झाले. शेवटीं आयुर्वेदाच्या विशेष अभिमानामुळें यांना एम्. डी. होण्याचा नाद सोडावा लागला. हे आयुर्वेद पद्धतीनें चिकित्सा करीत असूनहि यांचा धंदा फार मोठा होता. प्रयाग (१९११), इंदूर (१९२०) व म्हैसूर (१९३१) अशा तीन ठिकाणीं यांना अ. भा. आयुर्वेद संमेलनाचे अध्यक्ष निवडण्यांत आलें. बनारस हिंदु विश्वविद्यालयांत हे आयुर्वेदशाखेचे प्रमुख होते. यांच्या म्हैसूरच्या भाषणांतील 'दुसरें हृदय मस्तिष्कांत असल्याचा शोध' नवा मानण्यांत येतो.

यांनीं आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ विश्वनाथ आयुर्वेद विद्यालय काढलें व कल्पतरु आयुर्वेद वर्क्स नांवाचा औषधाचा कारखाना चालविला. आयुर्वेदाचा अभ्यास करणारांना प्रत्यक्ष शारीर हा यांचा आधुनिक दृष्टीनें लिहिलेला ग्रंथ अत्यंत उपयुक्त मानण्यांत येतो. हा ग्रंथ संस्कृतमध्यें असल्यानें त्याचा प्रसार हिंदुस्थानच्या सर्व भागांत झाला आहे व तो आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमांत दाखल झाला आहे.

यांचे ग्रंथ—१ प्रत्यक्ष शारीरम् (मूळ संस्कृत व

पुढें इंग्रजी व अनेक भाषांत भाषान्तरित), २ सिद्धान्त-निदानम् (१९११).

सोखे, कर्नेल एस्. एम्.—(जन्म स. १८९० सुमार) मुंबईच्या हॉपकिन्स इन्स्टिटयूटचे प्रमुख.

सर्पदंशावर यांनीं शोधून काढलेली लस सर्पविषावरील सर्वांत परिणामकारक इलाज मानला जातो. त्या औषधाच्या इतर गुणांबरोबरच पाण्यांत लवकर विरघळण्याचा त्याचा गुणधर्म महत्त्वाचा आहे. औषधाची पावडर व डिस्टिल्ड वॉटरची कुपी एकाखालीं एक ठेवण्याची व्यवस्था यांचे या योजनेंत करण्यांत आली असून सर्पविषावर ताबडतोब इलाज करणें यामुळें शक्य होतें. या पूर्वीच्या लसींना पाण्यांत विरघळण्यास वेळ लागत असल्यानें महत्त्वाच्या वेळेस त्याचा उपयोग होत नसे.

याशिवाय यांनी डॉ. दीक्षित यांचे सहकार्यानें प्लेगवर 'सल्फाथायॉझॉल' हें औषध तयार केलें.

जगप्रसिद्ध नृत्यकलाविशारद मेनका या यांच्या पत्नी होत.

स्टाइन, सर मार्क ऑरेल—(जन्म स. १८६२ नवं. २–मृत्यु स. १९४३) सुप्रसिद्ध पुराणवस्तुसंशोधक, संग्राहक व लेखक.

यांचा जन्म हंगेरींत व शिक्षण बुडापेस्ट, व्हिएन्ना, लिप्झीक, ऑक्सफर्ड व लंडन येथें झालें. संस्कृत भाषा व सव्हें यांचें शिक्षण घेतल्यावर प्रथम लाहोर, ओरिएन्टल कॉलेजचे प्रिन्सिपल व नंतर पंजाब युनिव्हर्सिटीचे हे रजिस्ट्रार झाले. याच वेळीं दहा वर्षे परिश्रम करून यांनीं राजतरंगिणीची सटीप व भाषान्तरित आवृत्ति काढली.

प्रथम बूनेर फील्डफोर्सबरोबर (१८९८) व नंतर आशिया खंडांत यांनीं अनेक सफरी काढल्या (१९००, १९०६-१९०८, १९१३-१९१६). या सफरी करितांना मध्ययुगीन फाहियान, सूंगयून, युआनचांग (ह्यु.एन्. संग) इत्यादि व अर्वाचीन बोनिन, पी. पेलिओ, स्वेन हेडिन (१८९६) वगैरेंच्या प्रवासवृत्तांचा यांनीं उपयोग केला.

यांना तुर्फानच्या परिसरांत सांपडलेल्या अवशेषांचीं शंभर खोकीं वाहण्यास पन्नास उंट लागले. तुनह्युआंग येथील सहस्रगुंफेंत मिळालेलीं हस्तलिखितें व चित्रें यांनीं चवतीस पेटारे भरले. दुसऱ्या सफरींत ऐंशीं उंटांवर एकशेंब्यायशीं खोकीं यांनीं आणलीं. यांनीं आणलेल्या अवशेषांनीं दिल्लीतील सेन्ट्रल एशियन ॲन्टिक्विटीज म्युझियमचे दोनहि भाग व्यापले आहेत. तसेंच युरोपांतील म्युझियममध्यें यांनीं आणलेल्या विपुल अवशेषांपैकीं पुष्कळ विखुरलेले आहेत. त्यांत हजारों प्रकारच्या वस्तु आहेत. यांतील लिपि व भाषा आज नष्ट झाल्या असून त्या समजावून घेण्याचा प्रयत्न चालू आहे. हें सर्व साहित्य इ. स. पूर्व २ ते इ. स. च्या ११ व्या शतकापर्यंतचें आहे.

याकरितां यांना पुष्कळ ठिकाणीं उत्खनन करावें लागलें. तें बर्फ व वाळूचीं वादळें टाळून करावें लागे. पुढें पुढें यांच्या या प्रचंड हव्यासास स्थानिक लोकांचा विरोध होऊं लागला व घेतलेल्या वस्तुहि परत कराव्या लागल्या. पुराणवस्तूंचें राष्ट्रीय महत्त्व लक्षांत घेऊन चीन सरकारनें यांच्या मंगोलियांतील सफरीस तर बंदी केली. यांनीं आपले सफरीवरील ग्रंथ शास्त्रीय व लोकप्रिय अशा दोनहि प्रकारच्या भाषेंत लिहिले आहेत.

१९४० मध्यें यांनीं वैदिक संस्कृतीचें माहेरघर असलेल्या, सरस्वतीच्या खोऱ्यांत संचार केला. ती नदी आज अंशतः लुप्त असून प्रदेश वालुकामय आहे. नदीचें नांव घग्गर किंवा हकडा असें आहे. त्या बिकानेर, जेसलमीर वगैरे भागांत यांना वैदिक अवशेष सांपडले नाहींत.

सिंधु नदीचें खोरें व लासबेला संस्थान (सिंधुनद, अरबी समुद्र व बलुचिस्थान यांमधील प्रदेश) या भागांत संचार केला (१९४१-४२) व अफगाणिस्थानांत गेले असतां तिकडे हे मृत्यु पावले.

यांचे ग्रंथ—(1) Sand-buried Ruins of Khotan, (2) Ancient Khotan (२ खंड 1908), (3) Ruins of Desert Cathay (२ खंड 1912), (4) Serindia (५ खंड 1921), (5) The Thousand Buddhas, (6) Memoir on Maps of Chinese Turkestan and Kansu (२ खंड), (7) Innermost Asia (४ खंड 1928), (8) On Alexander's Track to the Indus, (9) On Central-Asian Track (1933), (10) Old Routes of Western Iran. यांशिवाय गेड्रोशिया, वझिरीस्थान, बलुचिस्थान येथील सफरींचीं प्रवासवृत्तें.

संपादित ग्रंथः—१ Chronicles of the King

of Kashmir (कल्हणकृत, संस्कृत ग्रंथ १८९२, अनुवाद १९००), २ राजतरंगिणी, ३ हातिम्स टेल्स, ४ संस्कृत इंग्रजी डिक्शनरी इत्यादि.

स्वेन हेडिन—(जन्म स. १८६५–मृत्यु स. ?) कैलासपर्वत व मानससरोवर येथें फिरलेले सुप्रसिद्ध संशोधक प्रवासी.

या स्वीडन देशांतील गृहस्थानें प्रथम इराक व इराण (१८८५), नंतर खुरासान, तुर्कस्थान व काशगर प्रान्त येथें प्रवास केला (१८९१). पुढें पामीर पठार व तिबेट यांतून प्रवास करून पेकिंग गांठलें (१८९३-९७). पण स. १८९९ मध्यें परवानगी न मिळाल्यानें यांची निराशा झाली तरी स. १९०६ मध्यें मानससरोवर पाहण्याची यांची इच्छा सफल झाली. पुढें मांगोलिया, रशिया व अमेरिका या विचित्र मार्गानें यांनीं पृथ्वीप्रदक्षिणा केली (१९२३).

यांचा प्रवास अभ्यासूपणानें संशोधनार्थ केलेला असे. पुराणवस्तुसंशोधनाप्रमाणें दुर्गम स्थळें पाहण्याकरितां धाडसानें जाऊन तेथील वस्तुस्थिति ग्रंथरूपानें लोकांच्या पुढें ठेवण्याचाहि यांनीं प्रयत्न केला. त्यामुळें यांचीं प्रवासवृत्तें अत्यंत माहितीपूर्ण आणि प्रासादिक झालेलीं आहेत. जगांतील संशोधनात्मक वाङ्मयांतहि त्या वृत्तान्तांना कायमचें महत्त्व प्राप्त होईल अशी त्या ग्रंथांची रचना आहे.

मानससरोवराचें शास्त्रीयदृष्ट्या संशोधन, सतलज, सिंधु व ब्रह्मपुत्रा या नद्यांच्या उगमांचा शोध, मानससरोवर व नजीकचें राक्षसताल-रावणहृद सरोवर यांचा भूमिगत संयोग हे यांचे आश्चर्यकारक शोध होत. हिमालय पर्वतापलीकडील तिबेट पठारावरील २४००० फूट उंचीची पर्वतश्रेणी आतां 'हेडिन रांग' या नांवानें प्रसिद्ध आहे.

ह

हकीम, अजमलखान—(जन्म स. १८६५–मृत्यु स. १९२७) अहमदाबाद राष्ट्रसभेचे अध्यक्ष.

हे दिल्लीचे पिढीजात हकीमांपैकीं असून परदेशांतूनहि यांना वैद्यकीय सल्लाकरितां बोलावणी येत. यांनीं युरोपमध्यें प्रवास केला होता व तिकडील रुग्णालयें पाहिलीं होतीं. हे प्रथम मुस्लीम लीगचे उपाध्यक्ष होते. पण खिलाफत प्रकरणानंतर हे राष्ट्रसभेंत आले व हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याचे कट्टे पुरस्कर्ते बनले. १९२१ च्या अहमदाबाद राष्ट्रसभेचे नियोजित अध्यक्ष चित्तरंजन दास यांना अटक झाल्यामुळें तें पद यांना देण्यांत आलें. १९२२ च्या सिव्हिल डिसओबिडियन्स कमेटीचे हे अध्यक्ष व राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीचे सभासद होते.

हक्क, मझरुल—(जन्म स. १८६६–मृत्यु स. १९३०) बिहारमधील सुप्रसिद्ध कायदेपंडित व सार्वजनिक कार्यकर्ते.

हे बॅरिस्टर होऊन आल्यानंतर कांहीं दिवस मुन्सफ म्हणून काम केल्यावर चाप्रा व पाटणा येथें वकिली करूं लागले. यांनीं इंग्लंडमध्यें असतां 'अन्जुमान इस्लामिया' ही संस्था काढली. तीमध्यें मुसलमानेतरांचाहि समावेश असे. यांनीं राष्ट्रीय बाण्याची मुस्लीम लीग काढली (१९०६). हे मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ मागण्याच्या तीव्र विरोधी होते व आपले हे विचार बिहार प्रान्तिक सभेंत यांनीं स्पष्ट मांडले (१९०८). तिचे हे प्रथम कार्यवाह होते. मुंबईच्या अधिवेशनाचे हे पुढें अध्यक्ष झाले (१९१५). जुन्या इम्पीरियल कायदेमंडळांत हे दोनदां निवडून आले व बांकीपूरच्या राष्ट्रसभेचे हे स्वागताध्यक्ष होते (१९१२). तिच्या शिष्टमंडळांत हे इंग्लंडला गेले होते. चंपारण्याच्या सत्याग्रहाचे वेळीं म. गांधींना यांनीं अत्यंत मदत केली (१९१७) व पुढें तर हे वकिली सोडून पक्के असहकारी झाले (१९२०).

यांपूर्वी हिंदुस्थानांतील उत्कृष्ट पोषाख करणाऱ्या पांचांत यांची गणना असे. असहकारितेंत जिनांखेरीज गांधी, नेहरू, दीपनारायणसिंह व हे या चारांनींहि आपले पोषाख बदलले. यांना राजकीय कारणानें

शिक्षा झाली होती. मदरलँड, सर्चलाइट वगैरेंत हे लिहीत.

हरि औंध-अयोध्यासिंह उपाध्याय—(जन्म स. १८६५) हिन्दी भाषेंतील सुप्रसिद्ध कवि व गद्यलेखक.

हे अगस्त्यगोत्री शुक्ल यजुर्वेदी सनाढ्य ब्राह्मण. हे अजमगडजवळ निजामाबाद येथील राहणारे. हे बनारसच्या क्वीन्स कॉलेजांत इंग्रजी शिकत, पण पुढें प्रकृति बिघडल्यानें घरीं उर्दू, फारसी व संस्कृत यांचा अभ्यास करून शिक्षक झाले. नंतर हे पाटिलकीची परीक्षा देऊन पाटिलकी करीत. त्या जागेवरून हे सेवानिवृत्त झाले (१९२३ नवं. १). नंतर हे बनारस हिंदुविश्वविद्यालयांत हिन्दीचे प्राध्यापक झाले. यांचें 'ठेठ हिन्दीका ठाठ' हें पुस्तक सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेस नेमिलें आहे.

आजमगडच्या संस्कृतपाठशाळा व सनातन धर्मसभा यांच्या चालकांपैकीं हे एक असले तरी विधवाविवाह, पतितोद्धार व हिन्दुधर्मप्रचार यांना यांची मान्यता आहे.

वर्तमान हिन्दी कवींत यांचें स्थान फार श्रेष्ठ मानलें जातें. अवघड व सुलभ अशा दोन्ही प्रकारच्या रचनेंत हे कुशल आहेत. हे प्रथम व्रजभाषेंत लिहीत, पण आतां खड्या बोलींत लिहितात. प्रियप्रवास हें यांचें महाकाव्य अत्यंत लोकप्रिय आहे. त्यांत श्रीकृष्ण हा गोकुळाचा पुढारी म्हणून वर्णिला आहे. वैदेहीवनवास या महाकाव्यांत रामायणांत ज्यांच्या चरित्राचें चित्रण अपूर्ण झालें आहे त्याची पूर्णता करण्याचा यांनी प्रयत्न केला आहे. 'चुभते चौपदे' व 'चोखे चौपदे' या काव्यांत यांनीं हिन्दी वाक्प्रचारांचा सुंदर उपयोग केला आहे. हे पुष्कळ वेळां संस्कृतप्रचुरहि रचना करीत.

हरिश्चन्द्र 'भारतेन्दु'—(जन्म स. १८५० सप्टें. ९–मृत्यु स. १८८५ जाने. ६) हिन्दी भाषेंतील नवयुगप्रवर्तक वाङ्मयसेवक व आधुनिक हिन्दी भाषेचे जनक.

यांचा जन्म काशी येथील संपन्न वैश्य कुलांत झाला. हे बंगालमधील इतिहासप्रसिद्ध उमीचंदाच्या घराण्यांतील होत. उमीचंद-फतहचंद-हरखचंद-गोपालचन्द्र-हरिश्चन्द्र असा यांचा वंशक्रम आहे. यांचे वडील गोपाळचन्द्र यांनीं हिन्दींत चाळीस ग्रंथ लिहिले. वडील यांच्या नवव्या वर्षी वारले. चवदाव्या वर्षी अपल्या आईबरोबर हे जगन्नाथाच्या यात्रेस गेले (१८६४). तेव्हां बंगाली साहित्याची विविध अंगांनीं झालेली प्रगति यांच्या ध्यानांत आली.

इंग्रजी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाहीं असें ध्यानांत येतांच घरीं परत आल्यावर स्वतःच्या शिक्षणाकरितां घरीं यांनीं एक शाळा उघडली. ती वाढतवाढत हरिश्चन्द्र हायस्कूल या भव्य स्वरूपाला प्राप्त झाली.

नंतर कविवचनसुधा नांवाचें मासिक काढून यांनीं त्यांत प्रथम जुन्या कवींचीं अप्रसिद्ध काव्यें प्रसिद्ध करण्यास सुरवात केली. त्याला क्रमानें पाक्षिक व साप्ताहिक रूप देण्यांत आलें. त्यांत राजनीति व समाजसुधारणाविषयक लेखहि येऊं लागले. पुढें यांनीं 'हरिश्चन्द मॅगेझीन'चे आठ अंक काढले व त्याला 'हरिश्चन्द्रचन्द्रिका' मासिकाचें रूप दिलें. या मासिकांत प्रथम लोकांना आधुनिक हिन्दी भाषेचा परिचय झाला (१८७३). हे स्वतः तर या मासिकांत लिहीतच, पण शिवाय यांनीं अनेक लोकांना उत्तेजन देऊन लिहिण्यास भाग पाडलें. यानंतर यांनीं केवळ स्त्रियांच्या करितां बालाबोधिनी नांवाचें मासिक काढलें. या सुमारास यांचें 'वैदिकी हिंसा हिंसा न भवति' नांवाचें प्रचलित समजुतीवर टीका करणारें प्रहसन प्रसिद्ध झालें.

यांनीं वाङ्मयाच्या सर्व प्रान्तांत संचार करून विपुल वाङ्मय निर्माण केलें आणि आधुनिक हिन्दी भाषेला जन्म दिला. तसेंच अनेक वाङ्मय निर्मात्यांना उत्तेजन देऊन हिन्दी भाषेचें वैभव वाढविलें. हे अत्यंत उदार असल्यानें शेवटीं कर्जबाजारी झाले.

हे अत्यंत जलद लिहिणारे सिद्धहस्त लेखक होते. नाटकें, आख्यायिका, उपन्यास, काव्यें, स्तोत्र, अनुवाद, परिहास, धर्म, इतिहास, माहात्म्य, राजभक्ति, स्फुट व सम्पादित असें विपुल वाङ्मय निर्माण करून हिन्दी भाषेंत यांनीं अनेक नवीं दालनें उघडलीं. हिन्दी भाषेच्या इतिहासांत भारतेन्दुयुग नांवाचा एक कालखंडच नमूद करावा लागतो. इतकें यांचें कार्य महत्त्वाचें मानलें जातें.

हल्याळकर, दत्तोपंत—(जन्म स. १८७५ जाने. २९–मृत्यु स. १९१६ फेब्रु. १८) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध संगीत नट.

यांचें समग्र नांव दत्तात्रेय वैकुंठ देशपांडे. यांचें गायन

भाऊराव कोल्हटकरांच्यासारखें असे व यांना शरीरहि डौलदार लाभलें होतें. हे रंगभूमीवर येतांच प्रेक्षक टाळ्यांचा कडकडाट करून यांचें स्वागत करीत. मराठी रंगभूमीवर असा मान भाऊराव कोल्हटकर व गणपतराव जोशी यांना लाभला. हेहि दोन्ही हात जोडून या स्वागताचा स्वीकार करीत. केवळ यांच्या जिवावर श्रीमहालक्ष्मीप्रासादिक नाटक मंडळी चाले. स्पष्ट शब्दोच्चार, सहज अभिनय आणि गोड व हृदयाची पकड घेणारें संगीत यांमुळें मराठी रंगभूमीवर दीर्घकाल यांची छाप होती. हे स्त्री व पुरुष अशा दोन्ही भूमिका करीत. बेळगांव येथें बालगंधर्वांच्या अध्यक्षतेखालीं यांचा स्मारकोत्सव करण्यांत आला (१९४४).

हंसराज, महात्मा लाला—(जन्म स. १८६४ एप्रिल १९–मृत्यु स. १९३८ नवं. १५) पंजाबमधील दयानंद अँग्लो-वैदिक सोसायटीचे आधारस्तंभ, शिक्षण संस्थाचे चालक व हिंदुसमाजाच्या उपेक्षित भागाकडे लक्ष देणारे त्यागी कार्यकर्ते.

हे बी. ए. झाले आणि यांनीं आपलें जीवन स्वामी दयानंदांच्या स्मरणार्थ निघणाऱ्या शिक्षण संस्थेला अर्पण केलें. क्रमानें शाळा कॉलेजे काढून शिक्षक, मुख्याध्यापक व प्रिंसिपल वगैरे महत्त्वाचीं कामें केलीं आणि त्या संस्थेचा अनेक शाखांत प्रचंड विस्तार झाल्यानंतर हे सेवानिवृत्त झाले (१८८६-१९११). यानंतर आर्यसमाजाच्या प्रचाराला व्यवस्थित रूप देण्यांत हे विशेष लक्ष घालूं लागले. शिवाय कॉलेज कमेटीचें अध्यक्षपद यांच्याकडे असे. अनाथ, विधवा, अस्पृश्य, दुष्काळ, भूकंप, पूर, दंगे वगैरेंत मदत करण्याला हे कर्तव्यबुद्धीनें पुढें सरसावत व संघटित रूपानें अशा कार्यांत काम करण्याचें वळण लोकांना देत. यांनीं अशा कामाकरितां लोक तयार करण्याकरितां अनेक संस्था काढल्या. यामुळें यांना लोक महात्मा म्हणत.

यांच्या स्मरणार्थ अनेक संस्था काढण्यांत आल्या असल्या तरी दोन लाख रुपये जमवून बाबा गुरुमुखसिंह यांनीं काढलेली 'महात्मा हंसराज वेदप्रचार निधि' ही संस्था महत्त्वाची आहे.

हाली—(जन्म स. १८३९–मृत्यु स. १९१३) उर्दू कवि.

नांव शम्सुलउल्म मौलाना अल्ताफ हुसेन, पिता खाजा ईजदबक्ष, स्थान पानिपत.

प्रथम यांनीं कुराण पाठ केलें. नंतर फार्सी व अरबीचें यांनीं शिक्षण घेतलें. गालिब यांचा कवितागुरु होय. लाहोर येथील कविसमेंत १ बरखा रुत, २ निशाते उम्मीद, ३ मुनाजरा रहमी इन्साफ, ४ हुब्ब वतन या यांनीं म्हटलेल्या कवितांनीं यांची प्रसिद्धि झाली.

'मुसद्दस' हें यांचें उत्कृष्ट काव्य होय. त्याचा पुरतु व सिधी मध्येंहि अनुवाद झाला आहे. उर्दू कवितेच्या सुधारणेविषयीं 'शेर और शायरी', सर सय्यद अहमद यांच्या चरित्रपर 'हयाते जावेद' व गुरु गालिबच्या आठवणी 'यादगारे गालिब' या नांवानें यांनीं लिहिल्या आहेत.

याशिवाय यांनीं शेख सादी व हर्कीम नासिर खुसरो यांचें जीवनचरित्र लिहिलें आहे.

यांच्या 'मुनोजाते बेबी'चें दहा भाषांत भाषान्तर झालें आहे. फार काय संस्कृतमध्येंहि त्याचें भाषान्तर झालें आहे. यावरून त्या ग्रंथाची लोकप्रियता दिसून येते.

यांनीं उर्दू कवितेंत भाषा आणि भाव या दोन्ही दृष्टीनें युगान्तर निर्माण केलें. नैतिक कविता लिहिण्यांत हे शेख सादीचे जोडीदार होते. यांना पंजाबसरकारनें शम्सुलउल्मा अशी पदवी दिली होती.

हिगिनबॉटम, डॉ. सॅम—(जन्म स. १८७४) कृषितज्ज्ञ व परोपकारी अमेरिकन गृहस्थ.

यांचा जन्म इंग्लंडांत मँचेस्टर येथें झाला. अमेरिकेंत हे बी. ए. झाले (१९०३) व संयुक्त प्रान्तांत मिशनरी म्हणून आले आणि अलाहाबादच्या जमना कॉलेजांत अर्थशास्त्राचे प्राध्यापक झाले. हे विद्यार्थ्यांना घेऊन खेड्यांत जात. तेथील आर्थिक हलाखी पाहून यांनीं अमेरिकेला जाऊन शेतीचें शिक्षण घेतलें आणि तिकडच्या देणग्यांवर अलाहाबाद येथें अग्रिकल्चर इन्स्टिट्यूट काढलें (१९११). हे देशी भाषेंतून शिक्षण देत व मॅट्रिकहि न झालेले विद्यार्थी घेत. त्यामुळें विश्वविद्यालयाची मान्यता यांना पहिलीं बीस वर्षे मिळाली नाहीं. याला जोडून यांनीं कुष्ठरुग्णालय चालविलें. यांची संस्था केवळ शिक्षण देणारी नसून प्रत्यक्ष शेती करणारी आहे. यांच्या सहाशें एकर जमिनींत सर्व आधुनिक उपकरणें सज्ज असून तेथें १९४५ पर्यंत अर्धा कोटी रुपये खर्च झाला आहे. तेथें नमुनेदार दुग्धालय, वाहवा व शाबास नांवाचे नांगर, विविध उपयुक्त वर्ग,

प्रयोग वगैरे अनेक कार्ये सतत चालू असतात. लहानशा जागेंत सुरू झालेल्या ग्रंथालयानें सुद्धां साठ एकर जागा व्यापिली आहे. अमेरिकेंतील अनेक विश्वविद्यालयांनीं यांच्या या कार्याचा अनेक मानाच्या पदव्या देऊन गौरव केला. यांच्या सत्तराव्या वाढदिवसानिमित्त हिंदुस्थानांत पांच लक्ष व अमेरिकेंत पांच लक्ष असे दहा लक्ष रुपये यांना देण्यांत आले. ते हिन्दी शेतकीच्या सेवेकरितां खर्च होणार आहेत. यांचें लेखन पुष्कळ असलें तरी 'दि गॉस्पेल अँड दि प्लाउ' हा ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे. यांनीं आपल्या मिशनरी कार्याला अगदीं वेगळें वळण लावलें असून यांच्या अमेरिकन पत्नीचेंहि यांना साहाय्य असतें.

हिरास, फा र हेन्री—(जन्म स. १८८८ सप्टें. ११) सुप्रसिद्ध इतिहासाचे प्राध्यापक, संशोधक व स्पॅनिश मिशनरी.

स्पेनमध्यें यांचें शिक्षण झाल्यावर हिंदुस्थानच्या इतिहासाचे प्राध्यापक म्हणून हे मुंबईच्या सेंट झेवियर कॉलेज मध्यें आले. इंडियन हिस्टारिकल रिसर्च इन्स्टिटयूटचे हे डायरेक्टरहि आहेत. यांनीं दक्षिण हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासावर प्रकाश टाकणारे अनेक संशोधनात्मक लेख लिहिण्याचा व वस्तु वगैरे जमा करण्याचा नाद असून यांनीं अफगाणिस्थान वगैरे भागांतून अनेक वस्तु संग्रहित केल्या आहेत. यांच्या मताप्रमाणें द्रविड संस्कृति अत्यंत प्राचीन पण सुधारणेच्या शिखराला पोंचलेली असून आर्य हे मागासलेले रानटी होते. यांचा सर्वांत महत्त्वाचा शोध म्हणजे मोहेंजोदाडो येथील उत्खननांत सांपडलेल्या लिपीचा उलगडा करून तिचें यांनीं वाचन केलें हा होय.

यांचे इंग्रजी ग्रंथ—१ हिस्टरी ऑफ मन्चु डिन्यास्टी ऑफ चायना (३ व्हा.), २ दि अरविंदु डिन्यास्टी, ३ दि रायटिंग ऑफ हिस्टरी वगैरे. याशिवाय स्पॅनिश भाषेंतहि यांचें लेखन आहे.

हेडगेवार, डॉ. केशव बळीराम—(जन्म स. १८९०–मृत्यु स. १९४० जून २०) 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या सुप्रसिद्ध संघटनेचे जनक व संवर्धक.

नागपूरच्या एका गरीब भिक्षुक ब्राह्मण घराण्यांत यांचा जन्म झाला. नागपूरच्या नील सिटी हायस्कूल, यवतमाळच्या व पुण्याच्या राष्ट्रीय शाळेंत आपलें शिक्षण संपविल्यानंतर हे कलकत्त्याच्या नॅशनल मेडिकल कॉलेजमधून एल्. एम्. ॲन्ड एस्.चीं परीक्षा पास झाले. परंतु यांनीं डॉक्टरीचा व्यवसाय कधींच केला नाहीं.

यांनीं १९२०-२१ च्या असहकाराच्या चळवळींत भाग घेतला असला तरी यांच्या खऱ्या सार्वजनिक आयुष्याची सुरुवात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेनें (१९२५) झाली. या संघटनेची मूळ कल्पना यांचे मनांत बरेच आधींपासून घोळत असून सध्यां त्या संस्थेला प्राप्त झालेलें बळ अविवाहित राहून निष्ठेनें का करीत राहण्याच्या यांच्या कार्यपद्धतींतून निर्माण झाल आहे.

शके १८४७ च्या विजयादशमीला नागपूर येथील मोहित्यांच्या जुन्या वाड्यांत संघाच्या कार्यास सुरुवात झाली व लवकरच प्रथम महाराष्ट्रांत व नंतर सर्व हिंदुस्थानांत त्याच्या कार्याची व्याप्ती पसरली. १९३२ सालीं मध्यप्रांत सरकारनें गुप्त सर्क्युलर काढून सरकारी नोकरांना संघाच्या कार्यांत भाग घेण्याची बंदी करूनहि यांची ही प्रगति चालूच राहिली व पुढें कौन्सिमध्यें झालेल्या या सर्क्युलरच्या चर्चेवरूनच त्या वेळचें शरीफ प्रकरण उद्भवलें व मंत्रिमंडळ गडगडलें. दहा लाखांपेक्षां जास्त स्वयंसेवक व हजारांपेक्षां जास्त शाखा इतकें प्रचंड स्वरूप यांच्या या कार्यानें आतां धारण केलें आहे.

'स्वतः आपल्या इच्छेनें राष्ट्राची सेवा करण्यासाठी पुढें येणाऱ्या लोकांची एक संघटना' असा यांचा संघस्थापनेंतील सुरवातीचा आराखडा होता. भगवा ध्वज, लष्करी शिस्त, बौद्धिक वर्ग, हिंदूंचा हिंदुस्थान हा संघाचा कार्यक्रमहि यांनीं हिंदुसमाजाला स्वतःचें कल्याण स्वतः करण्यास समर्थ करण्याच्या दृष्टीनेंच आंखला. संघांतील यांचा हुद्दा 'सरसंघ चालक' असा असे.

जातीय प्रश्नानें ज्या वेळीं हिंदुस्थानांत अतिगंभिर स्वरूप धारण केलें होतें अशा वेळीं 'हिंदूंसाठीं हिंदुस्थान' हा प्रचार यांच्या नेतृत्त्वाखालीं निघालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघानें केला व जाहिरातबाजी, गाजावाजा, अशा हुल्लडीच्या राजकारणापासून अलिप्त राहून केवळ तत्त्वनिष्ठेच्या बळावर अजोड यश मिळविलें.

यांच्या मृत्यूनंतर संघाचें कार्य गुरुजी या नांवानें सर्वपरिचित असणाऱ्या माधवराव सखाराम गोळवलकरांनीं चालविलें आहे.

हैदरी, सर अकबर, पी. सी.—(जन्म स. १८६९ नवं. ८–मृत्यु स. १९४०) सुप्रसिद्ध राजकारणी मुत्सद्दी व आधुनिक हैदराबाद राज्याचे निर्माते.

हे जम्मात सुलेमानी बोहरा जातीचे धार्मिक मुसलमान होते. यांचे वडील मुंबईस व्यापारी असून त्यांनीं चीनला सहा फेऱ्या केल्या होत्या. यांचें शिक्षण मुंबईच्या सेंट झेवियर कॉलेजमध्यें झालें. बद्रुद्दिन तय्यबजी हे यांचे चुलते होत. यांची पत्नी अमीना तय्यबजी (१८९३). चुलत्याप्रमाणें यांना न्यायाधीश व्हावयाचें होतें. पण हे परीक्षेंत पहिले येऊन वसुली खात्यांत शिरले आणि वाढतां वाढतां सेंट्रल ट्रेझरीचे कंट्रोलर झाले. हिन्दी लोकांना न मिळालेल्या अनेक महत्त्वाच्या जागांवर कामें केल्यावर यांना हैदराबाद राज्यांत नोकरीवर घेण्यांत आलें (१९०५).

तेथें अकौन्टन्ट (१९०५), महसूल मंत्रि (१९०७), होम डिपार्टमेन्टचे सेक्रेटरी (१९११) अशा क्रमानें चढत यांचा कार्यकारी कौन्सिलमध्यें प्रवेश झाला (१९२१) व पुढें हे त्याचे अध्यक्ष व मुख्य प्रधान झाले.

हैदराबाद राज्यांत आल्यानंतर यांच्या कर्तृत्वाला विशेष वाव मिळाला. तेथें यांनीं प्रथम खाते विभागणीची पद्धत सुरू करून कोणत्या खात्याला किती रक्कम खर्च करावयाची याची व्यवस्था ठरवून दिली. वारंवार पडणाऱ्या दुष्काळाकरितां आगाऊ तरतूद सुरू केली. उस्मानिया विश्वविद्यालयाची स्थापना व तेथें उर्दू या राजभाषेला उच्च शिक्षणांतहि माध्यमाचें स्थान देण्याचें हिंदुस्थानांतील अभिनव साहस, पुराणवस्तुसंशोधन खात्याची स्थापना, कार्यकारी मंडळाची स्थापना व त्या द्वारा राज्यकारभार चालविणें वगैरे महत्त्वाच्या कार्यांत यांचा विशेष हात होता. तेथें राज्याची आर्थिक स्थिति सुधारण्याचें महत्त्वाचें कार्य यांनीं केलें.

ऑल इंडिया मॉहमेडन एज्युकेशनल कॉन्फरन्स, कलकत्ता (१९१७) येथें हे अध्यक्ष होते. तेथें यांनीं 'हिंदुमुसलमानांना परस्परांच्या ऐतिहासिक परंपरा, थोर पुरुष व शिल्पादि कला यांचा अभिमान वाटत नसेल तर ती राष्ट्रीय भावनांची वाढ नसून मरण आहे' आशा तीव्र शब्दांत हिंदुमुसलमानांच्या ऐक्याची आवश्यकता प्रतिपादिली. १९२१ सालीं अलीगड युनिव्हर्सिटीला असहकारितेच्या चळवळींत ओढण्याचे अलीबंधूंचे प्रयत्न यांनीं हाणून पाडले. गोलमेज परिषदेच्या तीनहि अधिवेशनांत राजकारणी म्हणून हे विशेष चमकले. यांनीं तिकडे फेडरेशनचा पुरस्कार केला, तथापि संस्थानिकांच्या सार्वभौमत्वालाहि बाध येऊं नये असा इषारा दिला. पण पुढें हे फेडरेशनचे विरोधी झाले. वऱ्हाडावरील निजामांचें सार्वभौमत्व मान्य करून घेण्यांतहि यांची चिकाटी व राजकारणपटुत्व चांगलें व्यक्त झालें. पुण्याच्या ऑल इंडिया मुस्लीम कॉन्फरन्समध्यें यांनीं राष्ट्रभाषा म्हणून उर्दूचा पुरस्कार केला (१९३२).

हे सूक्ष्म मुत्सद्देगिरींत निष्णात होते. भावनेपेक्षां व्यवहारावर यांचा जोर असे. त्यामुळें यांचे निर्णय अत्यंत महत्त्वाचे समजले जात. यांची गणना अत्यंत थोर राजकारणी पुरुषांत केली जाते.

ह्यूम, अलेन ऑक्टेव्हियन—(जन्म स.१८२९–मृत्यु स. १९१२ जुलै ३१) सुप्रसिद्ध थिऑसाफिस्ट, पक्ष्यांचे अभ्यासक आणि इंडियन नॅशनल काँग्रेसचे प्रमुख संस्थापक.

आय. सी. एस. अधिकारी म्हणून हे सरकारी नोकरींत दाखल झाले. सत्तावन सालच्या बंडाच्या वेळीं बंडवाल्यांविरुद्ध यांनीं इटावा येथें हत्यार चालविलें व हिंदुस्थान ब्रिटिशांच्या हातचें गमावूं दिलें नाहीं. शांतता प्रस्थापित झाल्यावर शिक्षण प्रसाराच्या कामास यांनीं हात घातला. पोलीस व न्याय या खात्यांत फारकत व्हावी म्हणून यांनीं पोलीस खात्यांत सुधारणा केली. अबकारी खात्यांतून मिळालेला पैसा हा पापाचा पैसा आहे असें यांचें मत होतें. १८५९ च्या अखेरीस जनमित्र नांवाचें देशी भाषेंतील वर्तमानपत्र काढण्याचे कामीं यांनीं खटपट केली. या पत्राच्या सहाशें प्रती संयुक्त प्रान्त सरकार घेत असे. १८६३ सालीं गुन्हेगार मुलांना शिक्षण देण्याकरितां ज्युव्हेनाइल रेफर्मेटरी स्थापन करण्याचा सरकारला यांनीं आग्रह केला. शेतकरी कर्जमुक्तता व ग्रामपंचायत यांच्या योजना यांनीं आंखल्या होत्या. १८७०-७९ पर्यंत हे हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी होते, पण यांच्या प्रामाणिक व स्वतंत्र वृत्तीमुळें यांना त्या जागेवरून कमी करण्यांत आलें. ले. नव्हर्नरची जागा यांनीं नाकारली व हे सेवानिवृत्त झाले (१८८२).

हिंदुस्थानांत ज्योतिषशास्त्राचें म्युझियम स्थापन करण्याकरितां यांनीं वीस हजार पौंड खर्च केले. कॅप्टन सी. एच. टी. मार्शल यांच्या सहकार्यानें यांनीं लिहिलेला 'गेम बर्डस् ऑफ इंडिया' हा १४४ चित्रांचा व तीन

खंडांत विभागलेला यांचा ग्रंथ खेळाडु जगांत अत्यंत वाखाणला गेला.

हे एक प्रसिद्ध थिऑसाफिस्ट होते. थिऑसाफिकल सोसायटीच्या पाठीशीं असणाऱ्या ज्ञानी लोकांशीं यांचा पत्रव्यवहार होता. त्यांपैकीं अनेक पत्रें थिऑसाफिकल वाङ्मयांत प्रसिद्ध झालीं आहेत.

पक्ष्यांचें संशोधन व अध्ययन हा यांचा अत्यंत आवडता विषय होता. हे स्वतः व यांनीं तयार केलेले लोक नेहमीं संशोधनार्थ जात. यांनीं पंचवीस वर्षांच्या प्रयत्नानंतर आशियांतील ब्रिटिश साम्राज्यांतून त्रेसष्ट हजार पक्षांचीं कातडीं व एकोणीस हजार पक्ष्यांचीं अंडीं जमविलीं. तीं ठेवण्याकरितां सिमला येथें रॉथने कॅसल बांधला व त्याकरितां पंधरा हजार पौंड खर्च केले. १८८४ सालीं तेथील यांची ग्रंथसामग्री व टिपणें चोरीस गेलीं. मग १८८५ सालीं यांनीं ब्यायशी हजार पक्षांचीं कातडीं व अंडीं इंग्लंडमधील ब्रिटिश म्युझियम ऑफ नॅचरल हिस्टरी या संस्थेस दिलीं. त्यांपैकीं अंडीचशें पक्षी शास्त्रज्ञांना अगदीं नवे होते. हा यांचा संग्रह तेथील ऑरिथॉलाजिकल डिपार्टमेंटचे प्रमुख डॉ. बौडलर शार्प हे स्वतः हिंदुस्थानांत येऊन घेऊन गेले. १८७२ पासून कलकत्ता येथें 'स्ट्रे फेदर्स' नांवाचें या विषयांवरील त्रैमासिक काढण्यास यांनीं सुरवात केली. १८९९ सालीं हे इंग्लंडला गेल्यानें योग्य संपादकाच्या अभावीं तें बंद पडलें. १८७३ मध्यें यांनीं 'नेस्ट्स अँड एग्ज ऑफ इंडिया बर्डस्' हें यांनीं आपलें उत्कृष्ट पुस्तक प्रसिद्ध केलें. या पुस्तकाची नवी आवृत्ति ब्रह्मदेशांतील पक्षितज्ज्ञ मि. युग्ने ओट्स् यांनीं काढली (१८९०). ब्रिटिश म्युझियमच्या नॅचरल हिस्टरी शाखेला यांनीं दिलेलीं हिन्दी प्राण्यांचीं तोंडें व शिंगेसुद्धां महत्त्वाचीं आहेत. आपल्या मृत्युपत्रानें यांनीं आपला मूल्यवान् संग्रह असाच वांटून दिलेला आहे.

लॉर्ड लिटनच्या कारकीर्दीत येथें बंड होण्याची वेळ अगदीं जवळ आली होती. यांना त्यासंबंधीं भक्कम पुरावा मिळाला होता. मुंबई इलाख्यांतील शेतकऱ्यांचे दंगे याच सुमारास झाले. कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पदवीधरांना यांनीं हृदय हलवून सोडणारें एक अनावृत पत्र लिहिलें (१ मार्च १८८३). त्यांत 'लोकसत्ताक राज्यपद्धतिकरितां वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपासून अलिप्तपणा व श्रेष्ठ दर्जाच्या लोकांनीं लोकसेवेकरितां आपलें आयुष्य खर्च करण्याची आवश्यकता' प्रतिपादून सुख व ऐषआराम सोडून देशकार्याकरितां पुढें येण्याविषयीं तरुणांना आवाहन केलें होतें. शेवटीं लोकांच्या राजकीय विचारांना कोठें तरी मोकळेपणानें बोलण्यास वाव मिळावा, राज्यक्रान्तीकरितां बंड करण्याची लोकांची प्रवृत्ति कमी व्हावी व तशी प्रवृत्ति कोठें आहे याचा ब्रिटिश सरकारला सुगावा लागावा या हेतूंनीं यांनीं इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना केली. प्रारंभापासून सतत पंचवीस वर्षे हे त्या संस्थेचे मुख्य चिटणीस होते (१८८५-१९०९). यांच्यानंतर यांच्या जागीं वाच्छा आले.

व्यक्तिसूचि

(मोठा आंकडा स्वतंत्र चरित्राचा व लहान आंकडा उल्लेखाचा)

अक्कलकोटचे स्वामी १, ५७०.
अखंडानंद १.
अच्युतानंद स्वामी २, ३६७.
अजमदअली शहा २.
अझाद, मौ. अबुलकलम २, ११.
अणे, मा. श्री. २, ५.
अतल डॉ. १५५, १५६.
अत्रे, आचार्य प्र. के. ५.
अधिकारी, भाई गं. मो. ६.
अनगारिक धर्मपाल, धर्मपाल देवमित्र पाहा.
अनंततनय ७.
ॲना पॅव्होलोव्हा २३, ७४.
अनिल कवि-देशपांडे आ. रा. ३६८.
अन्सारी, डॉ. ७, ३, ३०४.
अप्रबुद्ध ३९०.
ॲबट. रे. जस्टिन् एडवर्ड ७.
अबदुल करीमखाँ १०, १३७, १४८, ४४७.
अबदुल गफारखान १०, ३, ११, १७०.
अबदुल रहिमान ११.
अभेदानंद १२.
अभ्यंकर, भास्करशास्त्री १४, २१५.
अभ्यंकर, वासुदेवशास्त्री १४.
अमरसिंग लाला १५.
अमृतलाल शेठ १५, ५०७.
अय्यर, सर टी. मुथुस्वामी १६.
अय्यर, सर रामस्वामी १७, ८८.
अय्यर, सर पी. एस्. शिवस्वामी १७.
अय्यर, सर शेषाद्री १८.
अय्यर, जी. (गनपथि दिक्षितार) सुब्रह्मण्य १८, ३८४.
अय्यर, सर एस्. सुब्रह्मण्य १९.
ॲरंडेल, डॉ. जॉर्ज २०.
ॲरंडेल, श्री. रुक्मिणीदेवी २३.
ॲर्नाल्ड, सर एडविन २४.
ॲलन, बोनर मिस् ७४.
अलादियाखाँ २५, ४४६.
अली पैलवान ३६७.
अलीनगरचा फकीर २६.
अल्लाबक्ष २७.
अल्लामा मश्रीकी २७.
अल्लीबंधु, मुहमदअली पाहा.
अष्टपुत्रे, काशीनाथशास्त्री २२८.
ॲड्रयूज, दीनबंधु सी. एफ्. २९, ४१४.
ॲबर्स्ट लार्ड ३१, १७९.
आगरकर, गो. ग. ३२, ५६, २०७, ३२२, ४०७.
आगाखान दु. ३४; तिसरे ३४.
आगामीर ३९६.
आगाशे, ग. कृ. ३५; ग. ज. ३५.
आगासकर, शं. पु. ३५.
आघारकर, शं. पु. ३६.
आचरेकर, प्रा. गं. भि. ३७.
आचार्य, कृ. वि. ३८; एम्. के. ३९; त्रि. गो. ३९; या. त्रि. ३९, १०६.
आजरेकर, श्री. ल. ४१.
आठल्ये, कृ. ना. ४२.
आनंदाचार्लू, पी. ४३.
आपटे, गो. वि. ४३; गो. स. ४३; द. वि. ४३; ना. ह. ४४; म. चि. ४५; वा. शि. ४६; वा. गो. ४६, २३६; वि. गो. ४७; ह. ना. ४७, ५७.
आयर्विन लार्ड ४८, ४९.
आर्यगार, कस्तुरीरंग ४९; कृष्णस्वामी ४९, १०७; सर गोपालस्वामी ५६१; श्रीनिवास ५१.
आरू, रा. रा. ५२.
आलूर, व्यं. भी. ५२.
ऑल्कॉट, कर्नल ५३.
आसी ५५.
आळतेकर, अ. स. ५६; मा. दा. ५६; स. खं. ५६.
आंबेकर, बा. मा. ५६.
आंबेडकर, डॉ. भी. रा. ५७, १५३, ५०६.
इकबाल, सर मुहम्मद ६१, ३५५.
इचलकरंजीकर, घोरपडे केशवराव ६४; नारायणराव गोविंदराव ६४; बाळकृष्णबुवा ६५.
इप्पीचा फकीर अली हाजी २६.
इमाम, सर अली ६६, १२१, ३९७.
इमामबक्ष २०५.
इस्लाम, काझी नझरुल ६८.
इस्लामपूर, वामनशास्त्री ६९.
इर्स्किन, लॉर्ड ४२.
इंद्रजी, डॉ. भगवानलाल ६९, ८९, ५३९.
ईश्वरचंद्र विद्यासागर ७१.
उजगरे, भा. कृ. ७३.
उटगीकर, ना. बा. ७३.
उत्तमचंद मिलोतरा ४७०.
उत्तम भिक्षु ७३, ३८१.
उदयशंकर ७४.
उदास, य. आ. ७७.
उपाध्याय, रामचरित ७७.
उपाध्ये, जयकृष्ण ९७.
उपासनीमहाराज ७८.
उमरीकर, बाबाम. ७९.
उमाजी नाईक ७२.
उमीचंद ५७४.

एकबोटे, कृ. अ. ८२; विठ्ठलदेव ८३.
एडवर्ड सातवे ८३, १८५.
एडवर्ड्स रे ८.
एडिंगटन, आर्थर ३९५.
एल्विन व्हेरियर ८३, ११.
एल्जिन लार्ड ८५.
एल्फिन्स्टन ३९०.
एल्येना नार्बेतोवूना ५३४.
ऐनापुरे, वासुदेवशास्त्री ८६.
ओक, ज. वि. ८६; म. पां. ८६; वा. दा. ८७; वि. कों. ८७.
ओकाकुरा ३०८.
ओंकारनाथ ठाकूर ४१७.
ओगले, गु. प्र. ८७; गो. अ. ८८; श्री. प्र. ८९, ८८.
ओझा, गौरीशंकर ८९; सुखरामदास ९०.
ओटो रायफील्ड ९७.
ओड्लमने, आत्मारामशास्त्री ९०.
ओहलीन प्रा. १५७.
औरंगजेब ५६३.
औटरॅम १८२.
औंधकर, वि. ह. ९१.
औंधचे राजे ९२, १५७.
कझिन्स, डॉ. जेम्स हेन्री ९४; मार्गारेट ९५.
कत्रे, डॉ. सु. मं. २१७.
कनिंग लॉर्ड ९६.
कनिंगहॅम, सर अलेक्झांडर ९७, ७०.
कपिलेश्वरी १०.
कब्बूर, माधवराव १६४.
कॅम्बेल ७१, १०७, २९९, ४४५.
करमरकर, वि. पां. ९७.
करसनदास मूळजी ९७.
करंदीकर, ज. स. ९९; बा. शं. १००; र. पां. १००; वि. ज. १००.
कर्झन, लॉर्ड १००, १८४, २०९, २३३, ५०९.
कर्न, डॉ. ७१.
कर्नाल, सदाशिवराव १६४.
कर्वे, डॉ. इरावती १०२; द. गो. ५२५; दि. धों. १०२; धों. के. १०२, ३३१, ४२२; र. धों. १०३.
कऱ्हाडकर, गोपाळाचार्य अण्णा १०४, ४१९; वासुदेवशास्त्री ८६.
कलापी गोहेल, सूर्यसिंहजी जगत्सिंहजी २२०.
कवडे, कृष्णशास्त्री १०५.
कॅन्डी, मेजर टॉमस १०६, ३४२.
कंबळी, सर सिद्धप्पा तोतप्पा १०६.
कॉटन, सर हेन्री १०६.
काननबाला ५६२.
काणे, म. म. पां. वा. १०७.
काथवटे, आ. वि. १०८, ५२१.
कादरबक्ष सारंगीवाला १०८.
कानिटकर, बाळुकाका १०९; गो. वा. १०८; ना. बा. १०८; ना. वि. १०९; वा. बा. १०९.
कानुगा, नित्यानंद ११०.
कान्स्टनटीनो, डॉ. पाया ५०१.
कान्हेरे, अ. ल. ११०, २६८; सदाशिवशास्त्री ११०.
काप्रेकर, डी. आर. २४५.
कामण्णा, डॉ. २३५.
कामत, रा. बा. ११०.
कामा, ख. रु. ११०; भि. रु. १११; मं. हो. १११.
कॉयस, फादर जेन ११२.
कालेलकर, काका ११४, ४३७.
काळीकमळीवाले महात्मा ११५.
काळे, त्र्यं. गु. ११५; या. मा. ११५; रा. रा. ११६, ४२४; प्रा. वा. गो. ११७; सत्यभामाबाई ११६; रा. ब. ११६.
किबे, सरदार मा. वि. ११७.
किरात, टिकेकर ३२०.
किर्लोस्कर, अण्णासाहेब ११८, ३४६, ४२३, ५०२, ५०३; ल. का. १२०; किर्लोस्करबंधु ८८.
किशनप्रसाद महाराजा १२१, २४३, ३९६.
किशोरीदत्तशास्त्री १२१.
किंकेड चार्लस् ऑगस्टस १२२, ३८२, ४२८.
कीथ, डॉ. आर्थर १२२.
कीर्तने, रा. ब. ४२; नी. ज. १२४.
कीर्तिकर, कान्होबा १२५; वासुदेव २७३.
कीलहार्न, डॉ. फ्रॅन्झ १२५, २५९.
कुक, डॉ. ५१२.
कुप्पुस्वामीशास्त्री एस्. १२६.
कुमठेकर, म. के. १२७.
कुमारप्पा, प्रा. जे. सी. १२७.
कुर्तकोटी, डॉ. १२८.
कुर्बान, फज्ल इलाहि १३०.
कुळकर्णी, कृ. पां. ५२२; दि. गो. १३३; पां. ज्ञा. १३४; रा. के. १३५.
कुवलयानंद स्वामी १३१.
कुंझरू पं. अयोध्यानाथ १३५; हृदयनाथ १३६, २१०.
कुंटे, म. मो. १३७.
कुंवरसिंग १३७.
कृपलानी, आचार्य जे. बी. १३८, १९०.
कृष्णन्, डॉ. के. एस्. ५३०.
कृष्णमाचारी, सर १३८, १८६.
कृष्णमूर्ति, जे. १३८, २८६.
कृष्णराज वोडीयार १४१.
कृष्णराव मा. १४१.
केडगांवकर नारायणम. १४२.
केतकर, वें. बा. १४३; डॉ. श्री. व्यं. १४४; शीलवती १४७.
केदार, तु. ज. १४८.
केरकर, केसरबाई १४८, २५.
केरळवर्मा ५१८.
केवलानंद सरस्वती १४९.
केशवराव, न्यायमूर्ति १४९.
केशवसुत १५०, ४०७.

केळकर, न. चिं. १५०, १७९; वा. ब. २९५.
केलुसकर, कृ. अ. १५३.
कोकटनूर, जी. रामचंद्र १५३; डॉ. वा. रा. १५४.
कोकडेकर, डॉ. ल. जा. १५४.
कोझेत्सु नोसु ३८१.
कोटणीस, डॉ. द्वा. शां. १५५.
कोट्टूर, जी. एल्. १५६.
कोठ्याळकर, ब. रा. १५६.
कोयाजी, ज. कुं. १५७.
कोरेकल, कविसम्राट् १५७.
कोलब्रुक, सर हेन्री १५८.
कोल्हटकर, अच्युतराव १५९; श्री. कृ. १६०; भाऊराव १६१, ५७५.
कौजलगी, ह. श्री. १६३.
कौल, पं. राजा हरिकिसन १६४.
क्रिप्स, सर स्टॅफर्ड १९४, ५४२.
खत्री, बाबू कार्तिकप्रसाद १६४.
खरे, ग. स. १६४; ग. ह. १६५; दा. आ. १६५; ना. भा. १६६; वा. वा. १६७.
खाडिलकर, कृ. प्र. १६७.
खानखोजे, पां. स. १६९.
खानसाहेब डॉ. १७०, ११.
खानापुरकर, वि. स. १७०.
खापर्डे, ग. कृ. १७०, ७९.
खांडेकर, वि. स. १७२.
खांबेटे, म. ल. १७३.
खिजरहयातखान २६८.
खुदाबक्ष १७३.
खेर, बा. गं. १७३.
गजेन्द्रगडकर, अ. ना. १७५; कृ. वें. ५२५; ना. रा. १७५; प्र. बा. १७६; बा. अ. १७५; रा. वें. १७४.
गज्जर, त्रि. क. १७६.
गझनवी, अबदुल करीम १७७.
गडकरी, रा. ग. १७७, २२५.
गणपत कृष्णाजी १७८.
गणपुले, प. ब. १७८.
गंगाधर कविराज १७९.
ग्रँट, सर रॉबर्ट ५२५.
गाझीउद्दीन हैदर १७९, ३९६.
गाडगीळ, ध. रा. १८०, ११६; न. वि. १८१; व्ही. आर. ११६.
गामा १८१, २०५, ४४१; कल्लू १८१.
गालिब ५७५.
गायकवाड, जमनाबाई ४२; सयाजीराव गोविंद १८१; मल्हारराव १८३, १८२, १८४, ३५७, ३९६, ४०८, ५२१; गणपतराव स. १८२; खंडेराव स. १८२; सयाजीराव खंडेराव १८४, ५८, ७६, १०८, १४५, १८३, ३३३, ४९२, ५६३, ५६४; फत्तेसिंगराव ५६४; सी. रा. १८७.
गांगुली, सुप्रकाश १८७; सुरेन्द्रनाथ १८८, ३०८.
गांधी, मंगळदास १८८; महात्मा मोहनदास करमचंद १८८, ३, ४, ११, ३०, ४९, ५२, ५९, ६१, ८४, १३८, २१०, २३५, २८७, ३०५, ३३७, ३४९, ३७५, ३९४, ४०९, ४१०, ४११, ४१६, ४२४, ४२६, ४०४, ४३८, ४३९, ४४७, ४५०, ४७०, ४८०, ४८८, ४९९, ५१९, ५२०, ५४४, ५६३, ५७३; प्रमुख फंड व उपवास १९५; मोतीलाल नेहरूशी तुलना ४०३; जवाहरलालशी तुलना ४०४; चित्रे ३७४; विरोध ३०८; कस्तुरबा १९४, ३७५; देवीदास ५२०; मगनलाल १९७.
गिडने, सर हेन्री १९७.
गिरोलीकरमहाराज, प्र. अ. १९७.
गिलार्डी, सिनॉर ३०८.
गिल्डर, डॉ. १९८.
गुणे, वै. गंगाधरशास्त्री १९८; डॉ. त्र्यं. र. १९९; डॉ. पां. दा. १९९.
गुत्तासिंग २०५.
गुप्त, बालमुकुंद १९९, २४१; महेन्द्रलाल ऊर्फ एम्. ५२७; मैथिलीशरण २००, ५५७.
गुरु, पं. कामताप्रसाद २०१.
गुरुदत्त विद्यार्थी २०२.
गुर्जर, सी. ३५०.
गुलामहाराज २०२.
गुलाबरावमहाराज २०३.
गुलाम, अलिया २०५; रसूलखाँ ५७०.
गुंगा २०५.
गुंजीकर, रा. भि. २०६.
गोकाक, वि. कृ. २०६.
गोखले, कृ. के. २०७, ३५७; रा. ज. २१०; शं. ल. २११; ना. गो. कृ. २०८, १९०, १९६, २०७, ३५७, ४०३, ४०७, ४१६, ५०९, ५२४.
गोगटे, ग. वा. २१२; रा. वि. २१२.
गोडबोले, कोंडभट २, ३६७; कृष्णशास्त्री २१३; के. वि. ४०१; न. ना. २१३; प. ब. २१४, ५७; र. भा. २१५; रामशास्त्री २१५; ३८१.
गोडे, प. कृ. २१६.
गोपालाचार्लू, पं. डी. २१८.
गोरे, भाई ना. ग. ४८८.
गोविंद कवि २१८.
गोविंदबुवा १.
गोविंददास जीवनदास २१८.
गोस्वामी, किशोरीलाल २१९.
गोस्वामी, नरेन्द्र ३४९, ४६५.
गोहरजान २२०.
गोळवलकर, माधवराव; गुरुजी ५७६.

गोळे, म. शि. २२१.
गोंडलनरेश २९२.
गोंदवलेकरमहाराज २२१.
गौड, रामप्रसाद २२२.
गौर, सर हरिसिंग २१९.
गौरीशंकरजी ३९.
ग्रँट, डफ ३९०.
ग्रिअरसन, सर जार्ज २२३, ४३१.
ग्रिफिथ, राल्फ २२३, ३४८.
घाटगे, जयसिंगराव २२४; विठ्ठलराव २२४.
घाटे, द. कों. २२४, २४४; भट्टजीशास्त्री २२५, २२७; वि. द. २२४; वि. स. २२५.
घुर्ये, डॉ. गो. स. २२६.
घुले, कृष्णशास्त्री २२७; भाऊशास्त्री २२७; सदाशिवभट्ट २२८.
घोले, डॉ. वि. रा. २२८.
घोष, अतुल २३५; अरविंद २२९, १८५, २२९, २३२, २३६, ४२९; गिरीश २३२; डॉ. जे. सी. ५०१, ५३३; तुषारकान्ति २३३; डॉ. धर्मदास २३२; प्रफुल्ल ४३९; मनमोहन २३२; मोतीलाल २३३, १८; राशबिहारी २३४, ३६, ३२४, ३७४; लालमोहन २३४; शिशिरकुमार २३३; डॉ. एस्. ३८०; ज्ञानेंद्रचंद्र २३४; शिष्य २३५.
चकबस्त पं. ब्रजनारायण २३५.
चक्रवर्ति ५६५; हारणचंद्र १७९.
चट्टोपाध्याय, कमलादेवी २३५; हरीन्द्रनाथ २३५.
चतर्जी, आशुतोष ५०१; बंकीमचंद्र २३६; रामानंद २३७; डॉ. शरचंद्र २३८, ५४३.
चतुर्वेदी, जगन्नाथप्रसाद २४१; माखनलाल २४१, २६१.
चमूपति २४२.
चंदावरकर, सर नारायण २४२, ४२२; सर विठ्ठल २४३.
चंदूलाल राजा २४३, १२१.
चंद्रचूड, गंगोबा तात्या २४३; न. बा. २४३.
चंद्रशेखर २४३.
चंद्रात्रेय, प्रा. मो. ल. २४५; ल. ना. २४४.
चापेकर, दा. ह. २४५; बा. ह. २४५; वा. ह. २४५; बंधु ३२३, ३७७; ना. गो. २४६.
चाफळकर चित्रकार ९३.
चावरे, नीळकंठराव २४६.
चांदभाट २१८.
चांदवडकर, ब्रह्मगिरिबुवा २६८.
चांदोरकर, गो. का. २४७.
चांदोरीकर, त्र्यं. अ. २४७.
चिटणवीस, सर गंगाधर २४८.
चिटणीस, मा. गं. २४८; म. खं. २४८.
चित्राव, सि. वि. २४८.
चिदंबर दीक्षित १.
चिनॉय, सर सुलतान २५०.
चिपळुणकर, कृष्णशास्त्री २५०,२५२, ३३६, ४१९; ग. वि. २५०; गो. म. २५१; वा. त्र्यं. ५६६; ल. कृ. २५१; वा. ल. २५१; विष्णुशास्त्री २५१, ३६४, ३९३; वि. गो. २५३.
चिमाबाई ७२.
चिरमुले, वा. ग. २५३.
चिंतामणि, सर सी. वाय. २५३, १८, ४८८.
चिंतामणिपेठकर, पां. व्यं. २५५.
चुनेकर, श्रीनिवासशास्त्री २४८.
चेट्टियार, राजा अन्नमलाई २५५; सर मुठिआ २५६.
चेट्टी, गुझलुलक्ष्मी २५६; फिलॉमेना थम्बू २५७; सर षण्मुखम् २५७.
चेम्सफर्ड, लॉर्ड २५७.
चोभे, भि. अ. २५८.
चोरघडे, प्रा. वा. कृ. ११४.
चोळकर, डॉ. एम्. १५५.
चौकर, वि. ब. २५८.
चौधराणी, सरला २६०, २३७.
चौधरी, जा. दा. २५९; तुकाराम जा.; पांडुरंग जा. २५९; बदरीनारायण २५९; रामभुजदत्त २६०.
चौबळ, सर महादेव २६०.
चौहान, सुभद्राकुमारी २६१.
चौंडेमहाराज २६१.
छत्रपति, राजाराम २६३, २६५, ४४३; शहाजी २६२; शाहू २६३, २५, २२४, २४६, ४२४, ५३७, ५३८.
छत्तारीचे नबाब ३८५.
छत्रे, प्रा. केरूनाना २६६, १४३; विष्णुपंत २६६, ३०३, ३६८, ५१९.
छोटूराम सर २६७, ४४२.
छोटूसिंग ३८७.
जॅक्सन, ए. एम्. टी. २६८, २४४, ५६७.
जगतनारायण २५५.
जगताप बा. ग. २६९.
जगदीशप्रसाद सर ५६१.
जगन्नाथदास 'रत्नाकर' २७०.
जगन्नाथप्रसाद 'भानु' २७०.
जगन्नाथ शंकरशेठ २७१.
जमनाबाई १८२.
जमशेदजी जिजीभाई २७२, ४४९.
जमालुद्दीन २.
जयकर, मुकुंदराव २७३, ४, १९३, ५६१; रा. बा. २७९.
जयचंद्र विद्यालंकार २८०.
जयतिलक, सर डॉन २८०.
जयदेवशर्मा विद्यालंकार २८०.
जयप्रकाश नारायण २८१.
जयशंकर प्रसाद २८१.
जवळकर, दिनकरराव २९३.
जव्हेरी, कृष्णलाल २८२.

जहांगिर कांवसजी २८२.
जाधव, नामदेवराव २८३; भा. वि. २८३.
जायसवाल, डॉ. का. २८४.
जालवणकर, श्री. ना. २८५.
जांभेकर, बाळ गं. २८५, ३६४, २६७.
जिनराजदास सी. २८६.
जिनविजयजी मुनि २८७.
जिना, मुहमदअल्ली २८७, ३, २९, १९४, २६८, ४०३, ४१०, ५२०.
जिन्सीवाले, प्रा. श्री. ग. २९१.
जीवराम कालीदास २९२.
जुम्मामिया २९२, ३६७.
जेधे, के. मा. २९३.
जोग, १३४; रा. श्री. २४४; विष्णुबुवा २९४.
जोगाराव ३०४.
जोड, सी. ई. एम्. ५२३.
जोशी, आनंदीबाई २९४; उमाशंकर ११५; कृ. ब. २९५; ग. कृ. २९४, ५७५; कृ. वा. २९५; ग. व्यं. २९६, ५२४; गंगाधरशास्त्री २९७; गो. म २९७; चिंतामणशास्त्री ३६९; न. स. २९७; ना. म. २९८, १६४; ना. वि. २९९; पु. वा. २९९; पूरनचंद्र २९९; म. म. ३००; सर मोरोपंत ३००, ६६; य. गो. ४६४; लक्ष्मणशास्त्री ३००; वा. ग. ३०२; वा. गो. ३०२; वा. म. ३०१; शं. पु. ३०३; श्री. स. ३०३.
जौक ३०४.
झकीर हुसेन ३०४.
झळकीकर, म. म. भीमाचार्य ३०५.
झंडुभट्ट शंकरप्रसाद ३०५.
झा, अमरनाथ; गंगानाथ ३०६, १०७.
झिनोस्की १८१.
टक्केजमाल ३६७.
टन्नन, प्रा. मोहनलाल ३०६.
टर्नर, जॉर्ज ३०७.
टंडन, पुरुषोत्तमदास ३०७.
टागोर, अवनीन्द्रनाथ ३०८, ५३१; गगनेन्द्रनाथ ३०९; महर्षि देवेन्द्रनाथ ३०९, ५३३, ५७१; रवीन्द्रनाथ ३१०, २९, ६८,६९, ७६, २३०, २३८, २६०, ३९४, ४१०, ४६७, ५३१.
टाटा, जमशेदजी ३१४, ५४३,५४४; जे. आर. डी. ३१९; सर दोराबजी ३१९; सर रतन ३२०.
टॉड, क. जेम्स ३२०, ९०, ४४३.
टिळक, लो. बाळ गंगाधर ३२२, ४, ३१, ५२, १४४, १५१, १५२, २३१, २३८, २९३, ३२२-२५, ३९३, ४०८, ४०९ ४१०, ४११, ४२१, ४३६, ४४४, ४५६, ४७७, ४८०. ४८४; टिळक-आगरकर ४४४; रे. ना. वा. ३२१, १५०; लक्ष्मीबाई ३२२.
टेकाडे, आ. कृ. ३२५.
टेसिटोरी डॉ. ३२५.
टेंबे, गो. स. ३२६, ४५६; डॉ. भा. म. ३२७; टेंबेस्वामी ३२८, ११०.
टोपे, तात्या ३२८, ४३६.
ठकार, बाळकोबा २५१; शं. वि. ३३०.
ठक्करबाप्पा अमृतलाल ३३१, १९३, २१०.
ठाकरसी, वि. दा. ३३२, ४२२.
ठाकुरदत्तशर्मा ३३३.
ठाकुरदासबुवा ५६९.
डफ, अलेक्झांडर ३०९; ग्रँट १२४, ४४३.
डफरीन लार्ड ३३४, २९१.
डॉयसेन, पॉल ३३५, १३.
डालिंग, सर माल्कम ३३६.
डावरे, गो. ना. ३३६; वि. ब. ३३७.
डांगे, श्री. अ. ३३७.
डे, रामदुलाल २३२.
डेव्हिड्स, टी. डब्ल्यू. व्हीस ३३८; मिसेस् सी. ए. एफ्. ३३९.
डोनन प्रा. ३०३.
डोगरे, अ. प. ३३९; पं. रमाबाई ३४०.
ढकणे, प्रि. बा. ना. ३४१.
तय्यबजी बद्रुद्दिन ३४१, ४२९.
तर्खड, आ. पां. ७२.
तर्खडकर, दा. पां. ३४१. २७९; द्वा. रा. ३४२.
तळवलकर, गोपीनाथ ४७.
तळेकर, श्री. र. ३४२.
ताम्हन, म. म. केशवराव २२५.
ताम्हणे, वि. आ. ३४२.
तांबे, काका ३४३; भास्करराव ३४३; श्री. ब. ३४३, २५४.
तिवारी, दु. आ. ३४४.
तुळजापुरकर, द. अ. १६०.
तेरसी, लक्ष्मीदास ३४४.
तेलंग, का. त्र्यं. ३४४; गंगाधरशास्त्री ३४५, १३४.
त्रावणकोरचे महाराज २५७, ५१८.
त्रिपाठी, गोवर्धनराम ४९५; पं. रामचरित ३४५, ७७; सूर्यकान्त ३४६.
त्रिलोकेकर, सो. बा. ३४६.
त्रिवेदी, जे. पी. ३४७; सर चंदूलाल ३४७.
थत्ते, मल्हारराव ३४७.
थापा, सुभेदार लाल ३४८.
थिबो, जॉर्ज ३४८, ३०६.
दत्त, उल्हासकर ४६५; कन्हय्यालाल ३४९, ४६५; कल्पना ३४९; तोरु ३४९; बटुकेश्वर ३६१, ४७३; मायकेल ३४९; रमेशचंद्र

३५०, १८६, २२९, २९७, ३२४; रसिकलाल ५३५.
दप्तरदार, वि. अ. ३५१.
दप्तरी डॉ. भाऊजी ३५१.
दबीर, ३५२.
दयानंद सरस्वती ३५२, ५४०.
दयाराम ३५४, ५३५.
दलाल, सर अर्देसर ३५५, ५०३.
दवे, काशीराम ३९२; न. ला. ३५४.
दाग ३५५, ६१.
दातार, गं. ३५५.
दाते, य. रा. ३५६; शं. ग. ३५६; शं. रा. ३५६.
दादाभाई नवरोजी ३५७, १११, २८८, ४२७, ४४०; चरित्र ग्रंथ ४८८, ५०८.
दामले, मो. के. ३५८; वि. गो. ४३७, ५५२; सी. के. ३५८.
दालमिया, रामकृष्ण ५२७.
दाबर, कां. ना. ४३६.
दास, चित्तरंजन ३५९, ३, २३०, २३९, ४०२, ५६२; जतीन्द्र ३६१; हेमचंद्र ४६५.
दास गणू ३५८.
दासगुप्ता स. ५०१.
दास्ताने, वा. वि. ३६५.
दांडेकर, मि. शं. वा. २९४.
दिघे, र. वा. ४६४.
दिनकर, ग. ब. ३६१.
दिवाकर, गर्गे शं. का. १७८, १५०; रं. रा. ३६२, ४६३.
दिवेकरशास्त्री, म. वा. ३५२.
दीक्षित, शं. बा. ३६३, १४४, २१३, २५५.
दीपनारायणसिंग ३६२, ५७३.
देव, डॉ. १९०; बा. ना. ३६४; शं. द. ३६४; शं. श्री. ३६५, १९०.
देवकीनंदन नारायण ३६५.
देवगिरीकर, त्र्यं. र. ३६५.
देवधर, गो. कृ. ३३६, २०९, ३१३; दि. ब. ३६७; बाळंभट दादा ३६७, २.
देवराज लाला ३६७.
देवल, गो. ब. ३६७; त्र्यं. ३६८; बंधु २६७.
देशपांडे, अ. श्री. ३६८; कुसुमावती ३६९; केशवराव ३६९; गं. के. ३६९; गं. बा. ३६९, ३०२; गु. ह. ३६९; गो. अ. ३६५; द. वै. ५७४; पु. य. ३७०; य. खु. ३७०; र. श्री. ३७०; वा. ना. ३७१; वा. ना. ३७१; स. वा. ३७१; सू. आ. ३७१.
देशमुख, डॉ. गोपाळराव ४८८; गो. ह. लोकहितवादी ३७२; चिं. द्वा. ३७३; डॉ. नानासाहेब ४३३; बॅ. रामराव ३७३, ४; वासुदेवराव २९४; त्र्यं. ह. ३७३.
देसाई, कनु ३७४; भुलाभाई ३७४; महादेव ३७५, १९४, ४५८; रमणलाल ३७५; डॉ. वा. ग. ३९६; ३९; शां. अ. ३७६.
देहलवी, सर अली ३७६.
द्रविड; न. अ. २०९; भि. त्र्यं. ३७७; लक्ष्मणशास्त्री ३७७; राजेश्वरशास्त्री ३७७, ११०; बंधु ३७७, २४५.
द्विवेदी, मन्नन मा. ३७७; महावीर ३७८; सुधाकर ३७८.
धनवटे, द. रा. ३७९.
धर, नीलरतन ३७९.
धर्मपाल देवमित्र ३८०.
धामणस्कर, दि. ब. रा. वि. ३८१.
धार, पं. बिशन ३८१.
धारुरकर, पं. भगवानशास्त्री ३८२; विठ्ठलशास्त्री ३८१.
धिंग्रा, मदनलाल ३८२.
धुरंधर, रा. ब. म. वि. ३८२, ९३.
धुलीपसिंग ३८३, ३९३.
धूमकेतु ३८३.
ध्यानचंद ३८३.
ध्रुव, आ. बा. ३८३; के. ह. ३८३.
नटराजन् के. ३८४, १८; एस्. ३८५.
नटेसन जी. ए. ३८५.
नथ्थनखाँ ४४६.
नबाब मुनिरुलमुलक २४३; सर मुहम्मद ३८५; मुहम्मद हमिदुल्ला ३८६, सय्यद ३८६.
नरगुंदकर भावे भास्कर ३८७.
नरसिंहसरस्वती १.
नरसिंहाचार्य आर. ३८७.
नरिमन के. एफ. ३८७.
नरेन्द्रदेव २८१.
नरेन्द्रनाथ राजा ३८८.
नर्मद–दवे नर्मदाशंकर पाहा.
नवाथे, वि. गो. ३८९.
नसीम ३८८.
नाईक वामन ३८८, ११०; वि. ब. ३८९; बॅ. श्रीधर ३८९.
नागेश्वरराव के. ३८९.
नाटेकर, बाळकोबा १२०.
नातू, बा. ना. ३९०; बंधु ३२३.
नाथमाधव ३९०.
नानल, पु. ग. ३९१, १०६.
नानालाल दलपतराम ३९२.
नामजोशी, म. ब. ३९२, ४०८.
नायडू, सी. के. ३९३; सरोजिनी ३९३, १५५, ४१०, ४१८.
नायर, सर सी. शंकरन् ३९४, २८४.
नारळीकर, वि. वा. ३९५.
नारंग, सर गोकुळ ३९६.
नार्टन, जॉन ब्रूस २५७.
नार्थब्रुक थॉमस ३९६.
नासिरुद्दिन है. ३९६.
निजाम सरकार २५७.
निजामुल्मुल्क मेहबूब ३९६, ५६६; उस्मान ३९७, १२१.
निफाडकर, ए. या. ३३४.

नियोगी मच्छीराज ४००, ३७०.
निरंजन रघुनाथ ३९८.
निवेदिता भगिनी ३९९.
नीलकंठ, लेडी विद्या ४०१.
नून, सर फिरोझ ४०१, ४४२.
नूलकर, कृ. ल. ४०२.
नेहरू, जवाहर ४०३, ४, १६, ७६, २८१, ४१८, ४२०; मोतीलाल ४०२, ४, ५२, ४०३, ४१०, ४२०, ५७३; रामेश्वरी ३८८; श्रीधर ४०५.
नोसु कोझेत्सु ३८१.
पटवर्धन, भाई अच्युतराव ४०५, ब्रह्मर्षि अण्णासाहेब ६०८, १०५, २९७, ३९०; सर गंगाधर ५०२; चिंतामणराव ४८१; सर परशुराम ४०६; पां. न. ४०६; बाबासाहेब २६६; रा. वि. १६०, ४०८; वा. ब. ४०७, १७९; वि. ना. ४०७, ४१७, ४४६.
पटेल, वल्लभभाई ४०८, ४१०, ५४४; विठ्ठलभाई ४१०, ३०८, ४०९.
पट्टणी, प्रभाशंकर ४११.
पट्टाभिसीतारामय्या ४११, १४५.
पतियाळाचे म. भूपेन्द्र ४१२, ५१८; म. यादवेन्द्र ४१२, १५.
पदे, शं. दा. ४१२, १०५.
पद्मसिंहशर्मा ४१३.
परमानंद भाई ४१३, १११.
परांजपे, प्रि. गो. रा. ४१५; न. शि. ४१४; म. रा. ४१५; र. पु. ४१५, २०७; शि. म. ४१६.
पलुस्कर, पं. वि. दि. ४१७, १४२, ४०७, ४४६.
पवार, शि. ग. ४१७.
पंडित, र. सी. ४१८; विजयालक्ष्मी ४१८; वि. प. ४१९, ७२; शं. पां. ४१८, १२४, ४१५; सी. ना. ४१८.
पंत, अप्पासाहेब ९२; गो. ब. ४१९; सुमित्रानंदन ४२०.
पंतलु, सुब्बाराव ४२०.
पागनीस, वि. द. ५२१, ५१६.
पाटकर; सर सीताराम ४२२.
पाटणकर, प. ना. ४२२; मा. ना. ४२२; ना. रा. ४८९.
पाटील नाना ४२३; भाऊराव ४२४, ११६.
पाठक, का. बा. ४२५, ४४५; बा. अ. ४०; श्रीधर ४२६; श्री. त्र्यं. ४२६.
पाठारे, आ. मो. ४२६.
पादशहा बी. जे. ४२७.
पाध्ये, माधव ८९.
पारख, ब. खं. ४२७.
पारसनीस, द. ब. ४२७, ३९, १२२.
पाल, ख्रिस्तोदास ४२८; बिपिनचंद्र ४२९.
पालित, तारकनाथ ५२९.
पांगारकर, ल. रा. ४३०, १; २२२, २४३.
पांडेय, रूपनारायण ४३०; लोचन-प्रसाद ४३०.
पिले, डॉमिनिक ४३१.
पिंगळे, वि. ग. ४३२, ४६८.
पीटरसन १८१.
पीटरसन, प्रो. पीटर ४३२.
पुणतांबेकर, अं. गो. ४३३.
पुराणिक, नानासाहेब ४३४; वा. रा. ४३३; विष्णुशास्त्री ४३३.
पुरंदरे, कृ. वा. ४३४.
पुरुषोत्तमदास ठाकुरदास ४३५.
पूर्णाश्रम २४७.
पेटिट, सर जहांगिर २५४; सर दि. मा. ४३५.
पेलिओ पी. ५७२.
पेलियट ५४१.
पेशवे, नानासाहेब ४३६, ३२८, ३९०.
पेंटर, बाबुराव ४३६, ४३७; रामचंद्र २.
पेंडसे, प्रा. शं. दा. १३४.
पेंढारकर, अनंतशास्त्री १२५.
पैगंबर १८२.
पोतदार, द. वा. ४३७.
पोद्दार, क. ज. ४३७.
पोपट प्रभुराय ४३७, ८६.
प्रकाशम् टी. ४३८, ५२०.
प्रतापशेट ४३८.
प्रतिहार ९०.
प्रज्ञानंदस्वामी ४३९.
प्रेमचंद ४३९.
प्रेमचंद रॉयचंद ५४३, ५६५.
प्रेमघन २५९.
फडके, ना. सी. ४४०; वा. ब. ४४१.
फत्तेलाल एस. ४३७, ५५२.
फरूक ४४१.
फलटणकर, नारायण ४४१.
फलटणचे राजे मालोजीराव ४००.
फाउलर ५६५.
फाजल-इ-हसन ४४२, २६८.
फाटक, प्रा. न. र. ५२५.
फाहियान ५७२.
फाळके, दादासाहेब ४४३, ४३७.
फुले, ज्योतिबा ४४३, ५१७.
फोर्ड हेन्री २४६.
फोर्ब्स आर्थर ४४३, ६९.
फोस्टर मेरी ३८१.
फ्लीट, डॉ. जॉन ४४९, ३६३, ४२५.
बखले, भा. र. ४४६, २५, १४१, १४२; र. रा. २१०, २५४.
बजाज, जमनालाल ब. ४४६.
बडोदेकर, सौ. हिरा ४४७.
बर्जेस, जेम्स ४४७, ७१.
बर्वे, रा. ब. २६३.
बसू, भूपेन्द्रनाथ ४४८; विजयकुमार १५५.
बहादुरी, शिशिर-२४०.
बहादूरशहा ४४८, ३२८, ४३६.
बंगटस्वामी २९४.

बंगाली, सो. शा. ४८८.
बाके डाक्टर ४०१.
बानर्जी, कालीचरण ४२९; प्रमथनाथ ४४९; राखलदास ४४९, ४९३; सुरेन्द्रनाथ ४४९, ६६, २९७, ४२९; एस्. सी. ५३५.
बापट, धुं. ग. ४५०; पां. म. ४५१; पु. वि. ४५१; वा. स. ३२३; वि. वा. ४५२; स. वि. ३२५.
बापना, सर सि. ४५२.
बापुदेवशास्त्री ४५२, ३४७.
बाबा पदमनजी ४५३, २८०, ४८९.
बाबा राघवदास ४५३.
बाबाशास्त्री २४७.
बारीन्द्रकुमार ४५४.
बारुआ आनंदराम ४५५.
बार्डोलाय गोपीनाथ ४५५.
बालकवि–ठोंबरे ३३३.
बालगंधर्व ४५६, १२०, १३७, १४२, ३६८.
बालाप्रसाद २४३.
बाळकृष्ण डॉ. ४५६.
बाळू, पी. १५.
बिकानेरचे महाराज गंगासिंहजी ४५७.
बिन्यन लॉरेन्स २३३.
बिर्ला, घनश्यामदास ४५७, १९३; जुगलकिशोर ४५७; बंधु ८८, ४५८.
बिलग्रामी, डॉ. सय्यद ४५८.
बीडकर, न. रा. ४५८.
बूलर, डॉ. ४५९, ७०, ७१, ८९, १२६, ४८२.
बेझंट, डॉ. ॲनी ४६०, २१, ४९, ५१, ९५, ३२३, ३६०, ४७२, ४७३, ५०५.
बेल, ना. आर. डी. १३५.
बेलवलकर, रा. ब. डॉ. श्री. कृ. ४६१.
बेवूर, सर गुरुनाथ ४६२.
बेंडॉल, सेसिल ४६३.
बेंद्रे, द. रा. ४६३.
बैरामजी जिजिभाई ४६४.
बोकील, वि. वि. ४६४.
बोराल, रायचंद ५६२.
बोस, आनंदमोहन ४६४; काली ४६४; खुदीराम ४६५; सर जगदीश ४६५, ५६५; देवकी ५६२; नंदलाल ४६७, ३०८, ४६६; प्रमथनाथ ४६७, ४२७, राशबिहारी ४६८, ४३२; शरचंद्र ४६९, ४७१; सत्येन्द्रनाथ ४६५; सुभाषचंद्र ४६९, ५२, ४१२, ४४८, ४६९, ५२३, ५३८.
ब्रह्मचारी, सर उपेन्द्रनाथ ४७१.
ब्लॅव्हॅटस्की, मॅडम ४७२, ५३, ५४.
भगत, प्रेमेन्द्र ४७३.
भगतसिंग ४७३, ३६१, ५३७.
भगवानदास ४७३.
भगवानदीन ४७३.
भट गुरु २.
भट, रा. म. ४०९.
भटनागर, सर शांतिस्वरूप ४७४, ३०३.
भट्ट, मणिशंकर र. ४७५.
भडकमकर, डॉ. रा. ह. ४७५.
भाऊदाजी लाड, भा. दा. पाहा.
भागवत, राजारामशास्त्री ४७५, ४१; वा. वि. ३७९.
भाटवडेकर, सर भालचंद्र ४२, २५३.
भाटिया, क. सोहनलाल ४७६, ४७५.
भाटे, गो. चि. ४७६.
भातखंडे, वि. ना. ४७६.
भानू, प्रा. चि. गं. ४७७.
भाभा, होमी ज. ४७७.
भारती सुब्रह्मण्य ४७८.
'भारतेन्दु' हरिश्चन्द्र पाहा.
भारदे, शि. ए. ४०.
भारद्वाज भारदे व भालेराव पाहा.
भालेराव, श्री. ग. ४७९.
भावे, वि. ल. ४७९, ७९; विनोबा ४८०, १९४; विष्णुदास ४८०; सदाशिवशास्त्री १०५.
भांडारकर, डॉ. दे. रा. ४८३, ३७, १०७; सर रामकृष्ण ४८१, ३२३, ४०७, ४१९.
भिडे, बा. अ. ४८३, ४१; भाऊसाहेब ३९३; मा. गो. ४८४; स. गो. ४८४.
भिसे, डॉ. शं. अ. ४८४.
भिंगारकर, श्रीपतबुवा ४१.
भोपटकर, ल. ब. ४८५.
भोपाळचे नबाब ४८६.
भोरचे राजे–पंतसचीव ४२१.
भोळे, केशवराव ५६२.
भोसले, के. वि. ४८५, ५४२; जगन्नाथराव ४८५, ५१५.
भोंडे, गो. वि. ४८५.
मॅके ४९३.
मॅक्डोनेल, प्रा. आर्थर ४८६, १०७, ११२; रॅम्से ४९, ३८१, २९०.
मॅक्स्वनी टेरेन्स ३६१.
मणूरकर, रा. ह. ५२.
मॅथाय, डॉ. जॉन ४८६.
मॅन, हॅरोल्ड ४८७.
मनोवरउद्दौला २.
मनोहरलाल सर ४८७.
मन्सफील्ड ८०.
मर्चंट, विजय ३९३.
मर्झबान जहांगिर ५०९.
मलबारी, शेठ बेहराम ४८७, ३८४.
मश्रुवाला, किशोरीलाल ४८७, १९४.
मसानी, मिनु ४८८, १६; सर रुस्तुम ४८८.
मसूद, डॉ. रास ३९७.
महाजन, भाऊ ४८९, २६७, २७९.
महाजनि, डॉ. ग. स. ४८९; वि. मो. १५०.
महाराष्ट्रिय ४८९.
महेमान, सर मदस्थल ३८६.

महेंद्रप्रताप राजा ४८९.
मंडलिक, वि. ना. ४६०.
माटे, प्रा. श्री. म. १७.
माडखोलकर, ग. त्र्यं. ४९०, २४४.
माणिकप्रभु ४९१.
माणिकराव ४९१, २९३.
माताप्रसाद डॉ. ४७५.
माथुर, डॉ. के. एन्. ४७५.
माधव ज्युलियन–पटवर्धन मा. त्र्यं. ४०६, ४९९.
माधवराव, सर टी. ४९२, १६, ४२, १८६, २५७, ४३२; व्ही. पी. ४९१, १८६.
मायदेव, प्रा. वा. गो. ३४३.
मारिस सिस्टर २५७.
मार्शल, सर जॉन ४९३, १०७.
मालवीय, पं. मदनमोहन ४९३, ४, ५, ४०, २००, ३९५, ४१४.
मावजी, पु. वि. ४९५, ४२८.
मावळंकर, ग. वा. ४९५.
मास्ति, वें. आ. ४९६.
मित्र, रा. ज. ४९६, ३४५.
मिनेजीस, ब्रांगास ४९७.
मिरचंदानी, यू. एम्. ५१२.
मिर्झा, एम्. इस्माइल ४९७, ५१६.
मिराबेन ४९८.
मिश्रबंधु ४९८.
मिंटो, लॉर्ड ४९९.
मीर आलम २४३.
मीर अमीरअली ४९९.
मुकर्जी, आशुतोष ४९९, ५२९; डॉ. बी. के. ३७९; सर राजेन्द्रनाथ ५००; डॉ. राधाकुमुद ५००; श्यामाप्रसाद ५००; ज्ञानेन्द्रनाथ ५०१.
मुकुंदरा औलिया ३९६.
मुजुमदार, अंबिकाचरण ५०१; सरदार गं. ना. ५०१; द. चिं. ५०२; नानी गोपाळ ५०२; शं. बा. ५०२, १२०.
मुडिमन, सर अले. ३८५.
मुदलियार, सर राम. ५०३.
मुधोळकर, रं. न. ५०३, ६६, २५४.
मुनशी, के. एम्. ५०३; लीलावती ५०४.
मुन्नाजान ३९६.
मुल्ला, सर दिनशा ५०२, ३७४.
मुहम्मद, डॉ. सय्यद ५०४.
मुहमदअली ५०४, ३.
मुळगांवकर, कर्नल एस. आर. ५४०.
मुळावेकर, रा. या. २४४.
मुळे, कृ. ग. ५०५.
मुंजे, डॉ. बा. शि. ५०६.
मूर, सर विल्यम ५६१.
मूलर, मॅक्स ५०६, १३, ३२३, ३४८, ४५९.
मेकाले ५६१.
मेघाणी, झ. का. ५०७.
मेनका ५०७, ५७२.
मेनन, करुणाकर १८.
मेहेता, जीवराज १५५; नंदशंकर ५०८; बाळूभाई १२८; सर मनुभाई ५०८, १८६; सर फेरोजशाह ५०८, २४२, ५०९; सर लल्लुभाई ५०९, ३३२, ३८५; वैकुंठलाल ५१०; सर होरमसजी ५१०.
मेहेरअली युसुफ ५११.
महेंदी अलीखान ३९६.
मोडक, अच्युत रा. वि. ५११. कॅ. ग. वा. ५११; ज. बा. ८७; ना. वि. ५१२; बा. प्र. ५१२; म. ह. ५१२; वा. अ. ५१३.
मोदी, एच. पी. ५०९.
मोनियर विल्यम ५१३.
मोमिन ५१४.
मोरमकर, रा. र. ५१४.
मोरे, ग. वि. ५१४.
मोवींचे महाराज १७९.
मोहनसिंग कॅ. ५१५.
मोहोळकर, वा. ना. २.
म्हसकर, कृ. श्री. ११३, २१०.
म्हस्के, गंगाराम भाऊ ५१५.
म्हैसूरचे महाराज ५१५, १४१, २५७, ४२२.
यदुनाथजी महाराज ९८.
यंदे, दा. सा. ५१७, ५७.
यिट्स, ए. इ. ९४.
यीट्स, डब्ल्यू. बी. ३९४.
यूल, सर जॉर्ज ६६.
येडूरकर, स. बा. ५१७.
रघुनाथ जनार्दन ७२.
रघुपति २२२.
रणजीतसिंहजी ५१७, ३८३, ३९३.
रमाबाई पंडिता डोंगरे रमाबाई पाहा.
रविवर्मा राजा ५१८, ४२३.
रहिमतखाँ ५१९, २६७.
रहिमान आबालाल ३८२.
रक्षित जितेंद्र ५३५.
रॅन्ड २४५.
राजकोटचे राजे ३९२.
राजगुरु, शि. द. ४७३, ५३७.
राजगोपालाचारी सी. ५१९, ४३८, ४७८.
राजलिंगम् ३९३.
राजवाडे, कृ. के. ५२०; रावराजे दिनकर ५२ ; वि. का. ५२१; ४२८, ४३७; वै. का. ५२१.
राजहंस, ना. श्री. बालगंधर्व पाहा.
राजा, एम्. सी. ५२२.
राजेन्द्रप्रसाद ५२२, १९०, २८०, ५४४.
रॉथफिल्ड, प्रि. ओटो ९७.
राधाकृष्णन् एस. ५२३, ४९४, १९०, १२०.
रानडे, मा. गो. ५२४, ३५, २१०, २५९, २९७, ३२१, ३८५, ४१९; बाळशास्त्री ३४५; रमाबाई ३६६, ५२५; मा. रा. द. ५२५, २१७.
रामकृष्ण परमहंस ५२६, ५७१.

रामतर्थि स्वामी ५२८, ३०३, ५२३.
रामदीनसिंग ९०.
रामन, सर चंद्रशेखर ५२८, ५२८, ५४०, ५६३.
रामानुजम् श्रीनिवासन् ५३०, ५६५.
रॉय कृष्णदास ५३१; चौधरी सत्य. ५०१; देवीप्रसाद ५३१; डॉ. बिधनचंद्र १५५; मानवेन्द्रनाथ ५३१; राममोहन ५३२, ७२, १९०, ३०९.
राव, ना. राघवेन्द्र ५३३, ४.
राशिवडेकर, अप्पाशास्त्री ५३३.
रॉस, सर डेनिसन २१७.
रास्ते, खंडेराव ३९०.
राहुल, सांकृत्यायन ५३४.
रिचर्ड, टेंपल ५०९; मॉरिस ३९०.
रीडिंग लॉर्ड ४९.
रुडॉल्क व्हॅलो ७६.
रे, सर प्रफुल्लचंद्र ५३४, ५६५.
रेड्डी, सर रामलिंग ५३६.
रेंदाळकर, ए. बा. १५०.
रोथेन्स्टाइन, सर ७४.
रौषनउद्दौला ३९६.
व्हीस डेव्हिडस ३३८.
लक्ष्मीचंद ईश्वरदास १०८.
लजपतराय लाला ५३६, ४, १११, २०२, ४१४, ४७३.
लठ्ठे, अ. बा. ५३७.
लल्लुभाई सामळदास, मेहेता, ल. सा. पाहा.
लक्ष्मणराव के. व्ही. १४५.
लक्ष्मण्या परशुराम्या ५३८.
लक्ष्मी कॅ. ५३८.
लक्ष्मीबाई झांशी ३२८.
लक्ष्मीनारायण डी. ५३८.
लाखाजी राजे सर ३९२.
लागवणकर, बाळशास्त्री १०५, ३९१.
लाड, पु. मं. ४६३; डॉ. भाऊ दाजी ५३९, ६९, ७१, ५२५.
लॉरेन्स लार्ड ५६१.
लार्मर, जोसेफ ३९५.
लाल, पाल बाल ४२९.
लालनाथ स्वामी १९३.
लिटन लार्ड २०९, ५७८.
लिनलिथगो लार्ड ४७३.
लिमये, द. बा. ५४०.
लिंकन, इब्राहिम ५३.
लेखराम पं. ५४०.
लेट्बीटर चार्ल्स वे. ५४१, १३९.
लेथब्रिज ७७.
लेले, का. वा. ५४१; वि. भा. २२९.
लेवी, सिल्वन ५४१.
लेसेप्स फर्डिनांड ३९६.
लोहिया, राममो. ५४२.
वझे, कृ. वि. ५४३; रामकृष्णबुवा ५४२, १४२, ४४६; मास्तर २.
वरेरकर, मामा ५४३.
वल्लभदास मुरली २६२.
वाघोलीकर मोरोबा ११९, १२०.
वाच्छा डी. ई. ५४३.
वाजपेयी, सर गिरिजा ५४३.
वाडेकर, प्रा. रं. द. ४५२.
वाडेगांवकर, नारायण २२५.
वालचंद हिराचंद ५४४.
वासुदेवय्या, च. ५४४.
विजय, रे. ५४५.
विजयनगरचे महाराज ५०७.
विजयराघवाचार्य ५४४.
विजापूरकर, वि. गो. ५४५, २६१, ४७९, ५१५.
वियोगी हरि ५४५.
विरजानंद सरस्वती ५४५.
विलिंडन लार्ड ५१८.
विवेकानंद स्वामी ५४६, १३, १४, २१२, ३९९, ५०७, ५२३.
विश्वेश्वरय्या, सर एम्. ५४७, २४७, ४९८, ५१६.
विष्णुदास माहुरकर ५४८.
विष्णुबुवा ब्रह्मचारी ५४९.
विंटर निट्झ १४७.
वेडरबर्न विल्यम ५४९, २८८.
वेब, अल्फ्रेड ५४९.
वेबर, डॉ. ३४५.
वेताळ, पं. विनायकशास्त्री ८९.
वेंकटप्पा के. ३०८.
वैद्य, ग. भा. ५४९; चिं. वि. ५५०.
वोडियार, चामरेन्द्र ५१५; कृष्णराज २५७.
व्यास, ना. ग. ५५०, ४४६; ना. गो. ४१७.
व्हिक्टर रोझेन्याल १०४.
व्हिक्टोरिया राणी २२०, ५५०, ३३४.
शर्मा, नीलमणि ४३१.
शहाबुद्दिन काजी १८६, ४४२.
शंकराचार्य कुर्तकोटी पाहा.
शाहसुलेमान सर मुह. ५५१, ५३२, ३९६; अबदुल लतीफ १३८.
शाळिग्राम, वि. सी. ८३.
शांताराम, व्ही, ५५१, ५३७.
शिराळी विष्णुदास ७५.
शिवरानी देवी ४४०; तंजावर शिवाजी महाराज ५५२.
शिंदे, ग. वि. २६९; ज. दौ. ५५३; ज. ज. ५५४, ३४७, ५२१; जि. मा. ५५५; ना. ग. ५५२; मा. ज. ५५४, ३४१, ४२३; वि. रा. ५५३, ३३१.
शुक्ल, रामचंद्र चं. ५५५.
शेरअली ३९६.
शौकतअली–मुहमदअली पाहा.
श्यामजी कृष्णवर्मा ५५५, १८५, ४५१, ५६६.
श्यामशास्त्री, डॉ. म. म. आर. ५५६, १०७.
श्यामसुंदरदास ५५७.
श्रद्धानंदस्वामी ५५७, ४१४.
श्रीकंठय्या, बी. एम्. ५५८.
श्रीकृष्णसिंह ५५८.
श्रीगोंदेकर, कृष्णबुवा १३४.

श्रीधराणी, कृष्णलाल ११५.
श्रीनिवासन् के. १६.
श्रीनिवासशास्त्री, व्ही. एस. ५५९, २१०.
श्रीशचंद्र विद्यारत्न ७२.
सत्तु रामोशी ७९, ८०.
सत्यप्रकाश डॉ. ३८०.
सत्यमूर्ति एस. ५६०.
सद्रोपाल ४१४.
सप्रू, सर तेज. ५६०, ६०, १९३.
सप्रे, माधवराव २४१.
सयानी, रहिमतुल्ला ५६१, २९७.
सय्यद, अहमदखान ५६१, ५७५; महमूद ५६१; हमीद ५६१.
सय्यदैन, प्रा. ख्वाजा. ३०५.
सरकार, अमृतलाल ५६३; नलिनीरंजन ५६२; भूपेन्द्रनाथ ५६२; महेन्द्रलाल ५६३; सर जदुनाथ ५६३.
सरदेसाई, गो. स. ५६३, २८०, ४३४, ५६३.
सरहद्द गांधी–अबदुल गफारखान पाहा.
सर्फराजखान ३९६.
सलाउद्दीन खुदाबक्ष ५६४.
सवाई गंधर्व १३७, १०१.
सहकारी कृष्ण ८२.
सहजानंद सरस्वती ५६४.
सहानी, प्रा. बिरबल ५६४.
सहा, मेघनाद ५६५.
संडरलंड, डॉ. जे. टी. २३८, ४६८.
सँडो २०५.
साईबाबा ७२, ३५९.
साखरे, नानामहाराज १३४, २९४.
साठे, अप्पाशास्त्री २४८.
सातवळेकर, पं. श्री. दा. ५६५, ३०.
साने, का. ना. २५२.
सायमन, सर जॉन ४९, ३९५; बारबेरी ७५.
सालरजंग सर ५६६, ३९७, ४०८.
सावरकर, वि. दा. ५६६, १११, २१८, २६८, २६९, ५६८; ग. दा. ऊर्फ बाबा ५६६.
सावंतवाडीकर ताराबाबा ४२; बापुसाहेब सावंत ५६६.
सांगलीचे राजे ४८१.
सिकंदर हयातखान ५६७, २६८, ४४२.
सिमकी ७५.
सिमन्स, आर्थर ३९४.
सिंघानिया, सर पद्म ५६८; बंधु ५६८.
सिंह सच्चिदानंद ५६८; लार्ड सत्येन्द्रप्रसन्न ५६८, ६७.
सीतारामशास्त्री एस. ३०६.
सुखटणकर, डॉ. वि. सी. २१७.
सुखदेव ४७३.
सुब्बाराव, प्रा. एन्. एस्. ५६९.
सुंदराबाई ५६९.
सूर्यनारायणराव आर. २१०.
सूंगयूग ५७२.
सेवसारिया, गोविंदराम ५७०.
सेटलवाट, सर चिमण. ५७०.
सेन, केशवचंद्र ५७०, ७२, ४२९, ५३३; डॉ. के. सी. ३८०; गणनाथ ५७१, ४०, २९७; द्वारकानाथ १७९.
सोखे, कर्नल एस. एम्. ५७२; लीला मेनका पाहा.
स्मट्स जनरल १८९.
स्मिथ, व्हिन्सेन्ट आर्थर २८४.
स्टाइन, सर ऑरेल ५७२, ४९३, ५४१.
स्वेन हेडिन ५७३, ५७२.
हकीम, अजमलखान ५७३, ३६०; नासिर खुसरो ५७५; रामनारायणजी ३९.
हक्क, मझरुल ५७३.
हद्दुखा २६७.
हरदयाळ लाला २८४.
हरि औध ५७४.
हरिप्रपन्नशर्मा ४०.
हरिश्चन्द्र 'भारतेन्दु' ५७४.
हलधर असितकुमार ३०८.
हल्याळकर, दत्तोपंत ५७४.
हळदणकर चित्रकार ९३.
हळदीपूर सुबराव १६४.
हंसराज, महात्मा लाला ५७५, २०२, ४१३.
हाक्सर सर कैलास. ५५५.
हार्निमन बेंजामिन गाय २८९, ५०९.
हार्डी, जी. एच. ५३१.
हार्डिज लार्ड २८८.
हाली ५७५.
हिगिन बॉटम, डॉ. सॅम ५७५.
हिवाळे, शामराव ८४.
हिरास, फादर हेन्री ५७६.
हू. एन्. संग ५७२.
हेडगेवार डॉ. के. ब. ५७६.
हेमचंद्र ५६२.
हेमराजशर्मा ४०.
हेलन ग्रेबर १५४.
हैदरी, सर अकबर ५७७, १२१, ३९७.
होरा, डॉ. सुंदर २६.
ह्यूम, ए. ओ. ५७७, ५४, ४७२.

विषयसूचि

आंकडा पानाचा

ॲटोमिडीन औषध ४८४.
अध्यक्ष, मराठी साहित्य सं. ३, ५, ३५, ४७, ९२, १००, १०८, ११७, १२५, १४४, १५०, १६०, १६७, १७२, १८४, २४६, ३०१, ४०६, ४१६, ४३७, ४४०, ४९०, ५२०, ५२४, ५४३, ५५०.
राष्ट्रसभा २, ७, ४३, ५१, १०६, १८८, २०८, २३४, २४२, ३४१, ३४९, ३५०, ३५७, ३५९, ३८१, ३८६, ३९३, ४०२, ४०३, ४०८, ४४८, ४४९, ४६०, ४६४, ४६९, ४९३, ५०१, ५०३, ५०८, ५२२, ५३६, ५४४, ५४९, ५६१, ५६८, ५७३, ५७७.
अध्यापनाचे व्रत २१५; चित्रें ५.
अध्यात्माचें महत्त्व ५२४, ५२७, ५२८, ५४६.
अफगाणिस्थानचे अमीर ११.
अर्थशास्त्र ११७, १५७, १८०, २०८, २९६, ३०६, ३०७, ३३६, ३५०, ३५७, ४३५, ४४९, ४८६, ४८७, ४८८, ५०९, ५१०, ५२४, ५४७, ५६९; हिंदीचे जनक ५२४.
अश्वशिक्षणपटु २३७.
आदर, स्त्रियांनीं केसाच्या पायघड्या ७३.
आदिवासी ८४; चा अभ्यास ८३; अगारिया; घोटल; बैगा; मुरिया; सोहार ८५; सेवामंडळ ३३२; भिल्ल ३३०, ३३१; साधु २०२; अस्पृश्य ५८, ६०, ५५३; भूमिजन ८४; हरिजन ३३२, ५२२; आदि द्रविड ५२२.
आनंदाश्रम संस्था ४५.
आयुष्याची गुरुकिल्ली २४५.
आंध्र ४२०.
इतिहास शास्त्रशुद्ध ४४, ९०; शास्त्रज्ञ २८०; राजकारण २८४; आद्य टीकाकार १२४; प्रेरणात्मक ५२२.
इमारतीचे गुण ११०.
इंग्रजी लेखक २४, २४२; कवि २३२, ३३७, २३५, ३५०, ३९३.
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, राष्ट्रसभा पाहा.
उन्माद अवस्था ७७.
उपनिषदांचा अभ्यास ३०६, ३३५, ३५१, ५२५; ओढा ३१०, ४५२.
उपवास म. गांधींचे १९५; तेवीस व चवसष्ट दिवस ३६१, ४७७, ४८४; एकशे चवसष्ट दिवस ५४५.
उपासना प्रत्येक धर्माच्या पद्धतीनें ५२८.
उर्दू लेखक व कवि १२१, १५७, १५८, २२२, २३५, २४२, ३०४, ३५५, ३८८, ३९१, ३९८, ५२८, ५४०, ५७५; चा उच्च शिक्षणांत माध्यम ३९७; ५७७; जगप्रसिद्ध कवि ६१; संस्था ५६१.
ओरिसा मंत्री १००, ११०; कवि ४३०.
औद्योगिक परंपरेचे जनक ३१७, ३१८, ५४४.
करार उमाजी नाईक–ब्रिटिश ८१; गांधी–आयर्विन ४, ४९, ४७३; अस्पृश्याबद्दल–येरवडा १९३, ५९१; राजा–मुंजे ५०६; हिंदु–मुसलमान देसाई लिकायत ३०८, ३७५; राजाजी ३०८; लखनौ २५४, २८९, २९१, ३२४, ३८७, ५५९.
कलावशेषांचा अभ्यास १८७.
कविता व्याख्या ३४३; गुण २४४; श्रेष्ठत्व ६८; नमुने ६४, ६८, ७९, २०५, २३७, ३१४, ३२७, ३७०, ४७८.
कांच कारखाना ८८.
कादंबरी ४५, ४७, १७२, २३६, २४०, ३७६, ३८३, ४४०, ५०३; वैचित्र्य ३९१; विषय व स्वभाव २४०; प्रसिद्धि २३०; प्रिय २४१.
कानडी ५२, १२९, १४१, १६३, २०६, ३६२, ४६३, ४९६, ५४४, ५५८.
कामाची पद्धत २९८.
कापसाच्या जाती १५६.
कायदे पंडित १३२, १६५, १७०, २२५, २३४, २७३, ३७४, ३८०, ४०३, ५६०.
कायदेबाज ३३७.
कायदेभंग व त्याचा परिणाम ४९.
कायद्याची पूर्णता ५०४.
कायाकल्प ४९५.
कीर्तन ९३, ३५९.
कुंडनिर्माणशास्त्र २४४.
कृष्णयजुर्वेदी असून ऋग्वेदी ३.
केशव दैवज्ञ अभिनव ३५२.
कोश इंग्रजी मराठी ३४२; पाली ३३९; सिंहली २८०; इंग्रजी १०६; संस्कृत-इंग्रजी ४६; संस्कृत–मराठी ८६;

फारसी–मराठी ४०६; मराठी वाङ्मय ग्रंथ ३५६; चरित्र २४८; पोर्तुगीज ३७२; शब्द ३५६; व्यायाम ५०२; व्यक्ति स्थळ वगैरे २१५; ज्ञान १४४.

क्रान्तिकारक ७९, २४५, ३२८; स्त्री ३४९, ३८२, ४३२, ४४१, ४४८, ४५४, ४६५, ४६८, ४६९, ४७३, ४८९, ५६६; वाद ४०३, ४२४; गीतकाराला श्रमवेतन ६८; क्या जबानी चापेकरांची २४६; तात्या टोपेची ३२९; धिंग्राची ३८२; भगतसिंगाची ४७३; सुरवात चापेकर प्रकरण ३२३.

क्रान्तीचे प्रयत्न अझाद हिंद सेना ४७०; उमाजी नाईक ७९; पत्री सरकार ४२३; वा. ब. फडके ४४१; सुरवात ७९; दक्षिण वाचण्याचे कारण १८२; मिरत केस १३०, ३३८; सत्तावन साल ३२८, ३३०; भावे ३८७, ५२१; कानपूरची लढाई ३२९; धिंग्रा ५५६; पुतळ्याला डांबर १७६, २६५, ३३६; भगतसिंग ४७३.

क्रॉफर्ड प्रकरण ३२२.

क्रिकेट १५, ३६७, ३८३, ३९३, ४१२, ५१७, ५१८; कप्तान गुण व मुळें पदव्या ३९३; नव्या खेळाचे जनक–रणजी ५१८; रणजी ट्राफी १५, ३६७, ५१८.

खडकाचे वय ५; महाराष्ट्राचा २९८.

खंडणी चिठ्ठ्या व जाहीरनामे उमाजीचे ८०.

खाकसार चळवळ २८.

खादी दुय्यम कार्य २३८; प्रचार ५३५.

खाद्यपेयप्रचारक ३४३.

खुदाबक्ष लायब्ररी १७३.

ख्रिस्त सेवा संघ ८४.

ख्रिस्तसेवेचें कारण ७३.

ख्रिस्ती साधु ४९.

ख्रिस्ती मिशनरी २९; अविश्वास ८४; विरोध २५६; मराठी सन्त वाङ्मयाचे अभिमानी ७.

गणितज्ञ व ज्योतिषी ४३, १४३, १६१, १७०, २१३, ३७८, २४५, २६६, ३५१, ३८९, ३९५, ४१७, ४७७, ४८९, ५३०, ५५१.

गर्भ अठरा वर्षे २४४.

गव्हर्नर हिन्दी ३४३; ५३३ (मध्यप्रान्त); ३४७ (ओरिसा); ३८५ (सं.प्रा.); ५६७ (पंजाब); ५६८ (बिहार); ३४७ (मद्रास); रिझर्व बँक ३७३.

गायक १०, २५, ६५, १३७, १४१, ४४१, ४४६, ४८५, ५०५, ५१९, ५४२, ५५०.

गायिका १४८, २२०, २६०, ४४७, ५६९.

गायनाचे संशोधक ४७६, ५०१, ५०५; ची पदवी ९५.

गुजराथचा इतिहास ४४३.

गुजराथी लेखक व कवि १५, ६९, ९७, ११४, १८८, २८२, ३४४, ३४७, ३५४, ३७५, ३८३, ३८४, ३९२; (युगप्रवर्तक नानालाल) ४०१, ४४८, ४७५; (कान्त कवि) ४८७, ४८८, ४९५, ५०३; (मुनशी) ५०७, ५०८; भाषेचे सौंदर्य ११५; स्वरूप ३८३; शिक्षणजनक २८२; इंग्रजींत इतिहास २८२.

गुणीजन २६७.

गुन्ह्याचें पृथक्करण ८५.

गुरुकुल ५५८.

गूढविद्या २१०, ४७२.

ग्रंथप्रकाशक २५०, २५१.

ग्रामसेवक ४३९; अ. भा. ग्रामोद्योग संघ १९४, १९७; महत्त्व ३६९; तेथें राहण्याची जरूरी २४६.

घटनाशास्त्रज्ञ ४, २२, १३६, २१२, २७३, ३०२, ५१९; ५६०, ५६८.

चमत्कार कडू गोड करणें १; पाण्याचें तूप ८३; पाणी उत्पन्न करणें १४३; मूर्तिमन्त २०३; अनेक २२२; देवतेनीं ओ देणे ५४९; सिद्धांचीं पत्रें ४७२, ५७८.

चमत्कारिक वर्तन-पाडण्याच्या दिवशीं संक्रान्त व पायखान्याची पूजा ७८.

चित्रकार ३५, ९२, ९७, १५६, ३०८, ३१३, ३७९, ३८२, ४३६, ५६५; चा नर्तक ७४; विशेष १५७; स्त्री सृष्टि ३८२; प्रदर्शन ९५, १८७; अजिंठा पद्धत १८८, ४६७; वर्णनें नहुष १८८; ताजमहाल ३०८; बुद्धप्रत्यागमन ३७४; बुद्धचरित्र ३८१; शिवविलाप ४६७; कृष्णशिष्टाई ५१९.

चित्रपट व्यवसाय ४४३; प्रभात ४२२; न्यू थिएटर्स ५६२; विचाराक्रान्त राम ३७४.

छंदशास्त्रज्ञ २७१,४०६,४५५; मात्रिक व सम अक्षरें नि नामकरण ३९१; नव्या छंदाचे प्रचारक ४२६; वैनायक ५६७.

छापखाना आर्यभूषण २५२; निर्णयसागर २५९; सुधारक ५२, १७८, ३५६.

जगद्गुरुत्व नाकारणें १४१.

जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ति २७२.

जरदुष्ट्र १११.

जंतुशास्त्रज्ञ २६, २९९, ४८७.

जंत्री ४४, १६४, ४३१, ५१२.

जात ब्राह्मण अनाविल ३७४, ३७५; एक सहस्र औदिच्य ८९; कर्नाटक दे. ९०; कान्यकुब्ज ५६४;

काश्मिरी १३५; गोरवाल ८९; गौड ३९१; गौड सारस्वत ११०; दैवज्ञ ३९०; प्रभोरानागर ६९; बावीस स्थान ८९; भनसाळी५५६; माध्व वैष्णव १५६; शरयूपारीण ७७; श्रीमाळी ३९२; सनाढ्य ५७४; गोंड ८४; जाट २६७; रामोशी ७९; शिंपी ९०; हरिजन १९५.

जातिसंस्था निर्माते २४३, ३६१, ५१४.

जामिया मिलिया इस्लामिया संस्था ३०४.

जैन धर्माचें प्राचीनत्व १५९; काळ ४६०; साधु व पंडित २८७; ग्रंथ ४२५; शिलालेख ४२५; अभ्यासक ४८२, ५३७.

टीका व चिकित्सा १६०, २३६, ३२६, ४१६, ४९०.

तत्त्वज्ञान १२, १३८; नवे-व्यक्तिमत्त्वाचा पुरस्कार १४१, २२९, ३१०; मनुष्यधर्म ३१२; सुकृतवाद ४७९; सुखी जग ४९०; सर्वधर्मैक्य ५२६; जर्मन अभ्यासक ३३५; शांकर मताला पुष्टि ३३५.

ताई महाराज प्रकरण ३२४.

तामीळ भाषा ४३१, ४७८, ५१९, ५५९; राष्ट्रगीत ४७८; कालनिर्णय ४३१; आत्मचरित्र ५५९.

तुकाराम अभंग बंगालींत ३१०; नाटक इंग्लंडांत २३६; चर्चा ४०७; तुकारामाची भूमिका २९५, ४२२.

तुलसीदासवंश ५२८.

त्रिदोष म्हणजे तीन रस ४१४.

थिऑसाफी शब्द ५४.

दत्तक व मोर्चेल अधिकार १८२.

दरिद्रनारायण शब्द ५४६.

दक्षिणेश्वरचे सन्त ५२६.

दानधर्म ११६, २१९, २४३, २७१, २७३, ३१४, ३३२, ३८१, ३८९, ४६४; प्रकार ३९६; पद्धति ९२,४५७, ५५६, ५७०; टाटांची ३१९.

दाशराज्ञ युद्ध २४९.

दिगंबर ७७.

दिनक्रम २०८.

दिल्लीचा बादशाह ४४८.

दुष्टप्रचार ४०८.

दुष्काळावर उपाय १०१.

दैनिकाचे लोकप्रियत्व १६०.

धडफळे घराण्यांतील पुरुष ४३४.

धर्म उज्वल स्वरूप ५०६, ५२४, ५२८, ५४६; सर्वमान्य तत्त्वें ७३; ऐक्य ५२७; शास्त्राभ्यास १०७, २२५, २९७, ३००; बुद्धिवादी ३५२, ५४७, ५७०; रोज नव्या कल्पना ५७१.

नकलाकार ४८५.

नजराणा बंदुकांचा ३९६.

नट ९०, १६१, २९४, ४५६, ४८५, ५७४; अभिनयकुशल २९४; अभिनय वैशिष्ट्य २९५; लोकप्रियतेचें कारण १६१, ५७५; हॅम्लेटचें काम २९५; गंधर्वयुग ४५६; तुकारामाचें काम व अभंग गायक २९५, ४२२; रागाची भूमिका ४२३.

नबाब २, १७९, ३८५, ३८६, ३९६.

नवविचारप्रवर्तक १४५, १८८, २९७, ३००, ३५२, ३७२, ४४३, ४७५, ४७९, ४८०, ५२१.

नवस मागसास ३९६.

नाटक पौराणिक दशावतारी ११९; प्राथमिक ४८१; सुधारणा ११९; पुनः स्थित्यन्तर ४२३; गुणदोष ९१, १०७, १०८, ११९, १२५, १६१, १६७, ३६८, ४२६, ४८१, ५४३; कालेकर २९५; शाहूनगरवासी २९५; शिवराज ३२६; किर्लोस्कर १२०, ३२६, ४२७, ४४६; गंधर्व ३२६, ४०७, ४५६; यशवंत ३२६; श्रीमहालक्ष्मी प्रासादिक ५७५; स्वदेशहितचिंतक व ललित ४८५; गुजराथी ३७५, ३७६; हिन्दी २१८, २८१, ४१९; बंगाली ३१४, ३४९.

नाटिकल अल्मनाक २५५, २६६.

निबंधमाला २६२; स्फूर्ति ४७,५२१.

नीतिमत्तेमुळें वजन ३२, ७२, १८८.

नृत्य महत्त्व २३, ७६; मुद्राभिनय ७५; प्रकार भारतनाट्य २३; जानपद व विदग्ध(कथ्थक)४६५; दासीआतम व कथाकली ५०८; संस्था कलाक्षेत्र २३; उदयशंकर आर्टस् स्कूल ७५; नृत्यालयम् ५०८; विशारद ७४, ४६४, स्त्रिया २३, ५०७.

नेपाळच्या इतिहासाचे मार्गदर्शक ७०.

नोबल प्राइझ २८, ३११, ५३०.

न्यायमूर्ति फेडरल कोर्ट ५५१; प्रिव्ही कौन्सिल २७३, ५६०; हायकोर्ट १६, १९, १४९, १७६, २४२, २६०, ३४४, ३९४, ४००, ४२२, ४३३, ५४४, ५५०.

परतंत्र राष्ट्र नेहेमीं युध्यमान ३८२.

परदेशाला मदत १५६.

परमहंसमंडळ २७०.

परराष्ट्रीय वकील २३२, ५४३.

परोपकारी वृत्ति ३०५.

पहेलवान व पंडित यांचे चाहते १८२.

पक्ष व चळवळी अझाद हिंद सेना ४६९, ४७०, ४७१, ५१५; बचाव ३७५, ३८८; काँग्रेस डेमॉक्रेटिक ३२४; सोशालिस्ट २८१, ४०५, ५४२; खिलाफत

२५८, ५०५; खुदा-इ-खिदमतगार ११; खाकसार फावडे ही खूण २८; चलेजाव ४१८, ५४२; फार्वर्ड ब्लाक ४७०; मुस्लीमलीग ३८५, ५०५; रॅडिकल डेमोक्रॅट ५३२; स्वराज्य पक्ष २८८, ३६०, ४०२; हिंदुसभा ४१४, ५४४; होमरूललीग ७, ३२४, ४२९; पहिली ५५६.

पक्ष पडण्याचें कारण मांसाहार५५७; शाकाहार संघ ९५.

पक्ष सोडणें ५६१.

पंचांग पटवर्धनी २६६; केतकी व वैजयन्ती १४४.

पाऊस व सूर्यावरील डाग २६६.

पाकशास्त्राचें विद्यालय ३४३.

पक्ष्यांचा अभ्यास ५७८.

पाकिस्तान १८०, २९०, ४०२, ५२३; मूळ ३३४.

पारशी धर्म व संस्कृति यांचे अभ्यासक १११.

पाली भाषाभ्यासक १६२, ३०७, ३३९, ४५१, ५३४, ५४१.

पुराण वस्तु संशोधन खाते १०१.

पुराण वस्तु संशोधनाचे जनक ९६.

पुरुषास स्त्रीत्वाची भावना ७८, ५२६.

पुस्तकपरीक्षण ८७; खप २४, ७२, ४०२.

पृथक्करण तज्ज्ञ २१४.

पेशवे दप्तर ४२७, ५६४.

पोलो खिलाडू ३८६.

पोषाखाबद्दल प्रसिद्धि ६०, १७२, २०८, ३१२, ३३२, ३६२, ४९४, ५७३; –महाराष्ट्र ५१८.

प्रचंड कार्यक्रम व व्यवस्था १४३.

प्रचंड सावकारी ३९०.

प्रतिपादनाचा आकर्षकपणा ५२६.

प्रतिसहकार ४, २४३.

प्रथम राष्ट्र नंतर जात ३८६.

प्रागतिक राजकारणाचा नाश १०२.

प्राणिशास्त्र ३६.

प्रामाणिकपणा ३०९, ३५९.

प्रेताची व्यवस्था ९, १७३, ४६१, ४९७.

प्रेषिताची भूमिका ३११.

फर्ग्युसन कॉलेज ३२२.

फंड अंडूयूज ३१, १९५; कस्तुरबा १९५; खादी १९५; गुरुकुल ५५७; चित्तरंजनदास १९५, ३६१; जलप्रलय ५३५; टिळक-स्वराज्य १९२, १९५, ४१४; टिळक ज्युबिली १५३; पचेयप्पा २५७; भोपटकर ४८५; रतनटाटा ३२०; शेतकी ५७६; शुद्धि २४९; हरिजन सेबक १९५; हिंदुविश्वविद्यालय ४९४.

फिजिकल फिटनेसचा नवा फार्म्युला १५५.

फितुरी ८२.

बॅरिस्टर पहिले २३२.

बर्वे प्रकरण ३२२.

बंगाल फाळणी २०१; चे रानडे ४६४; वीररसजनक ३४९; लेखक व कवि ६१, ६८, २३५, २३६, २३८, ३०८-१०, ३४९, ३५०, ३५९, ४२९, ५००, ५०१, ५६६.

बंडखोर १३७, ३८७.

बायकांना साड्या नेसण्यास शिकविणें ३८०.

बायबल विरोध २५६, ३३७.

बालबोध मासिक ८७, ५५०.

बालशिक्षण १३५.

बुद्धधर्म १६२, ३८०; वैष्णवांत लीन ५१३; राष्ट्राशी संबंध ३८०, ४५४, ५३४.

बेबंदशाही नाटक ९०.

ब्रह्मगुप्त भाषान्तर १५९.

ब्राह्मणब्राह्मणेतरवाद उगम ३९०, २६५, ४२४, ५३७; पुढारी १०६, २८३.

ब्राह्मण व त्यांची विद्या २२१.

ब्राह्मसमाज ३०९; मिशनरी ३०९.

ब्रिटिशराज्याचे स्वरूप ३४१.

भक्तिसंप्रदाय २४३.

भागवत धर्म प्रचारक २९४.

भारत सेवक समाज २०९.

भाषांचे अभ्यासक १९९, २२३, २२४, ४५५, ५४१, ५०६; ज्ञान व वैशिष्ट्य २८५, २८६; राजस्थानी व डिंगल ३२५; सिंहली ३०७; मान्यता २४१; स्वरूप ६९, ८७, १९६, २९०, ३२१, ३२६.

भास्कराचार्यांच्या ग्रंथाचे मराठी भाषान्तर १७०; इंग्रजी १५९.

भांडवल शेअरनें ३९३; कोट्यवधि ५२७; विनियोगाची पद्धत ३१९.

भूगर्भशास्त्रज्ञ ४६७.

मॅट्रिकचे पेपर रद्दींत ३९२.

मराठी ध्येयवादी पण उपयुक्त ४४; विचारवादी ४५; काव्यमर्मज्ञ २१४; विचार मांडण्याची कला ४५; बालवाङ्मयनिर्माते ४६; कौशल्य व आस्था ४७; खिस्ती लोकांत प्रचार ७३; आधुनिक कवितेचे जनक १००; नवा नमुना १३७; शिवाजी२५३; तत्त्व म्हणून लेखन ५२२; वैद्यक ग्रंथ ४७.

मराठी लेखक व कवि ३, ५, ७ (अनंततनय); १४, ८७, १०८, १२४, १२५, १३०, १३३,

१३४, १४१, १४४, १५०, १५३, १५७ (कोरेकल); १५९, १६७ (खरे); १७२, १७७ (गडकरी); १८१, २०३, २०६, २०७, २१४, २१८, २४३, २५०, २५१, २५३, २५५, २६७, २९९, ३०१, ३०२, ३२०, ३२१ (टिळक कवि); ३२२, ३२५ (टेकाडे); ३२६ (टेंबे); ३३३ (ठोंबरे); ३४०, ३४१, ३४३ (तांबे); ३४४ (तिवारी); ३४६ (त्रिलोकेकर); ३५१, ३६२, ३६४, ३६५, ३६७, ३६८ (अनिल); ३६९, ३७०, ३७१, ३७२, ३७६, ३९०, ४०६, ४०७, ४१६, ४१९, ४२२, ४२५, ४२६, ४४०, ४४३, ४५१, ४५३, ४६४, ४७६, ४७७, ४७९, ४८०, ४८३, ४८४, ४८५, ४८९, ४९०, ५०२, ५१३, ५२०, ५२५, ५३७, ५४१, ५४३, ५४५, ५४८, ५४९, ५५०; नवयुग प्रवर्तक २५३; नाट्यछटा १७८; अभिमानी ख्रिस्ती मिशनरी ७; व्याकरणकार ३५८.

मराठ्यांनीं ख्रिश्चन व्हावें ४१.

मराठ्यांची संघटना ३८१.

मल्याळी भाषा २५५.

मल्ल २, १८१, १८२, २०५, २४७, २९२, २९४, ३६७, ४४१, ४४५, ५०२; पदवीधर १५४.

मल्लखांब २; चे उत्पादक व प्रचारक ३६७.

महर्षि ३०९, ३५२, ५५३; ब्रह्मर्षि ४०८.

महात्मा पदवी गांधी १९०; फुले ४४३; श्रद्धानंद ५५८; हंसराज ५७५.

महानुभावांच्या गुप्त संकेताचा उलगडा ५२२.

महाबोधि सोसायटी ३८१.

महाराजा लायबल केस ९८.

महाराष्ट्र कविचरित्र ४१; कुटुंबशिक्षणमाला ८२; नाटकमंडळी ९१; पत्र ८८; च्या इतिहासाचीं साधनें २५८; नाट्याचें श्रेष्ठत्व १२०; इतिहासलेखन ५२१.

महारोग्याची शुश्रूषा ८४, ५७५; औषध ५३९.

मातीच्या भांड्याचें वर्गीकरण ५०२.

मातृभक्ति ७२, ३३३.

मानववंशशास्त्र १०२, २२६, ३३१.

मानसशास्त्र घाडसाचे १८८, २४५, ३३७.

मीमांसा जैमिनिकृत सूत्राचे इंग्रजी भाषान्तर ३०६; प्रभाकरमताचे ग्रंथ १२६; बादरायणकृत सूत्रांचे इंग्रजी भाषान्तर ४४८.

मीरतकेस १३०, १३८.

मुकुंदराजाच्या विवेकसिंधूचें लेखनस्थळ ७९.

मुलें संभाळणें २४६.

मूर्तिकार ९७.

मृगशीर्ष-ओरायन ३२५.

मोत्याची चादर कबरीकरितां १८२.

मोहनजोदडो ११८, ४४९, ४९३, ५०२, ५७६.

मौर्य ९०.

म्युझियम ९३, ५७२.

यंत्रामुळें तोटे १२८.

यादव ९०.

योगशास्त्र १३१, १३२, १३३.

यौधेय ९०.

योजना-कर्झन १०१; कॉमनवेल्थ ऑफ इंडिया ४६१; क्रिप्स २९०; गोलमेजपरिषद् ४११; चवदा मागण्या २८९; नेहरू रिपोर्ट २९०, ४०३; मॉन्ट फोर्ड २४२, २५८, ४२०; मोर्लेमिंटो ४९९, ५०९; वेव्हेल १९४, २९०; सप्रु कमेटी ५६१; सायमन कमिशन ३३८, ५३७.

रत्नपारखी १७३.

रशियाशीं राजकारण ३९२, ४०१.

रसायनशास्त्रज्ञ ११५, २११, २१३, २३४, ३०३, ३७९, ४७७, ५४०, ५६५.

रहस्यवाद ३१३.

रहस्योद्घाटक २३३.

राजकवि २४४.

राजकारण ११७, १३५, १३८, २८७, २९१, २९६, ३०३, ३१३, ३८५, ३९०; विधायक २७३; प्रतिसृष्टिकर्ता २९१, ३९०, ५६६.

राजगृह ६०.

राजद्रोहाचा पहिला खटला ३२३, ३२४.

राजपुतान्याचा इतिहास ९०, ३२०.

राजवाडे सांप्रदाय ४४.

राजे, महाराजे, बादशाद व प्रधान औंध ९२; कोचीन २५७; कोल्हापूर २६२, २६३; ग्वाल्हेर ५५३, ५५५; जमखिंडी ४०६; नवानगर ३८३, ५१७; पतियाळा ४१२; फलटण ४००; बडोदे १८१, १८४; बिकानेर ४५७; भोंगाळ ३८६; भोर ४२१; म्हैसूर १४१, ५१५; हैदराबाद ३९६, ३९७; बादशाह ८३, ५५०; —प्रधान इंदूर २४२, ४९२; कच्छ ४०२; काश्मीर १६४; कोचीन २५७;

कोल्हापूर ५३७; ग्वाल्हेर ५२०; जम्मू १६४; जयपूर ५०८; जुनागड, कच्छ, रतलाम, उदेपूर ५५६; त्रावणकोर १७, ४९१; पतियाळा १६४; बडोदे १३८, ३५०, ३८१, ४९२, ५०८; बिकानेर ४९७, ५०८; भरतपूर १६४; म्हैसूर १८, ४९१, ४९७; सांगली १२७; हैदराबाद ६६, १२१, २४३, ३८८, ५६६, ५७७; –राष्ट्रसभेचे १६६, १७०, १७३, ४१९, ४३८, ४५५, ५१९, ५५८; –इतर-मुंबई-प्रान्त १०६, २८३, ३७६, ४१५; पंजाब ५६७.

राज्य लोकांचे ९२; जमिनीचा मोबदला १८२.

रामकृष्णमिशन ५२७.

रामनामपुरश्चरण ७७.

रामायणाचें प्राचीनत्व ३४५, ३५१; महत्त्व ५५९.

रामावताराचे खेळु ४८१.

राहणी ३२८.

राष्ट्रगीतें आंध्र १४५; उर्दू ६४; बंगाली ३१४; वंदेमातरम् २३७; संकोचविकास २३७, २६०; भारतीकृत तामीळ ४७८.

राष्ट्रमत ८८.

राष्ट्रसभाविरोध ३४४.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ५७६.

रोग काळा आजार ४७१; प्लेग १७६, ५७२; वर्तन २४७; घेणें ५२७.

रौलट कमेटी रिपोर्ट ४६८.

लघुकथेची किंमत २४०.

लष्करी शिक्षण २४५, ५११, ५५२, ५५४, ५६७.

लावणी म्हणणे ५६९.

लिपि व अक्षरें यांचें ज्ञान ६९; प्राचीन ८९; ग्रंथ ८९, ४६०; उलगडा ५७६; अज्ञात ५७२.

लेखन लोकप्रियता व शैली ४१, ३९२; देशी भाषेंत लिहिल्याचा परिणाम ७२; सांधा २३६, २३७; तात्कालिक २४१; सफाई २५९; विचार प्रेरक २८३, ३०२; ध्येय ३९१.

लोकभ्रमनिवारण २१०.

लोकशाळा ४१५.

वक्तृत्व ४१, १३७ (मराठी); २०८ (इंग्रजी); २३५, २७३, २८५, २८६, २८७, ४०३, ४१६ (मराठी); ४५० (इंग्रजी); ४९५, ५२४; कारण २०१; जगप्रसिद्ध ३९४; सर्वश्रेष्ठ ५५९-६०; वाद-विवादनैपुण्य ४०३.

वनस्पति नव्या ४२; रोग ४१; प्राणिजीवन ४६६.

वनस्पतिशास्त्रज्ञ ३६, ४१, ३७६, ४६५, ५६४.

वर्धाशिक्षण योजना ३०५.

वंशांचा निर्देश ९०.

वाङ्मय कानडी ५४४; गुजराथी ३५४; तामीळ ५२०; बंगाली ५३३; हिन्दी ४२०; लोकप्रियता ६; कौटुम्बिक ८२.

वाद्यवादन ३७, १०८, २५७; सारंगी १०८; पेटी ३२६.

विधवाविवाह ४४४; प्रचार ७२, ४१९; वाद १०४.

विमा २५३.

विवाह मुसलमान –वैष्णव ६८; सत्तावीस मुलींशीं ७८; प्रवचन-कार-इंग्रज स्त्री ११०; बंगाली-इंग्रज ३४९; दासी-विवाह २२०.

विश्वकुटुंबवाद ३३८.

विश्वविद्यालयाचे संस्थापक २५५, ४९३, ५६१.

वीराष्टमी २६०.

वृत्तपत्र मराठी पहिलें २८५; नमुनेदार २५३; आर्थिक ४९१.

वृत्तपत्रकार व संपादक १५, १८, ८८, १५०, १५९, २३२, २३३, २३७, २५३, २५५, ३२२, ३८४.

वेताळ पंचविशी बंगाली ७१.

वेदाचार्य ५१७.

वेदाभ्यासक आर्य १४४, २२७, २४८, ३२२, ३६३, ३९६, ४५०; आंग्ल १२२, १५८, २२३, ४८६, ५०६.

वेदावरील जुना निबंध १५९.

वेदाचें भाषान्तर मराठी ऋग्वेद १६०; उलट क्रमानें २४९; अध्यात्मिक अर्थ २३१; शुक्ल यजुर्वेद २२७, २४४, ४२६, ४५१; हिन्दी अथर्व ५६६; चारहि वेद २८०; इंग्रजी २२३; बंगाली ३५१.

वेदोक्त धर्मकृत्यें २६४.

वेध घेणें ३९, ४३.

वेधशाळा ग्रिनिच ३९५.

वैदिक इंडेक्स १२३.

वैद्य आर्य ३९, ८६, ९०, १०५, १२१, १२५, १७९, १९८, २१८, २४७, २९२, २९७, ३०५, ३३३, ३९१, ४१२, ४१४, ४३३; आंग्ल ११२, १२५, १५३, १५४, १५५, १६६, १७०, १९७, १९८, १९९, २२८, २५३, ४३४, ४३७, ४७१, ४७५, ४७६, ५६३, ५७६.

वैद्यककोश शब्दकल्पद्रुम १६४; मराठींत प्रथ २५८; युनानी ५७३.
वैष्णवपंथाची प्राचीनता ४८२.
व्यक्तिवर्णन ३१२, ४०३.
व्यापारी व कारखानदार ८७, १११, १२०, १७६, १७८, १८२, २५०, २५५, २७२, २८२, ३१४, ३३२, ३५५, ३७३, ३७७, ३७९, ३९२, ४३५, ४३७, ४३८, ४४६, ४५७, ५००, ५०९, ५१०, ५३८, ५४४, ५६४, ५६८, ५७०.
व्यायाम सूर्यनमस्कार ९३; दीर्घायुष्य २९२; चे डॉक्टर १५५; जोर व बैठका २०५.
व्रजभाषा कवींची २५९.
व्हॉइसराय ३१, ४२, ४८, ९५, ९६, १००, २५७, ३३४, ४९९.
व्हिक्टोरिया क्रॉस २२४, २८३, ३४८, ४७३.
व्हिजिट फी २४७.
शनवारवाडयावर इंग्रज निशाण ३९०.
शस्त्रक्रियानिपुण २२८.
शास्त्रज्ञ १२५, १२६, १५४, २११, २१३, २२६, २३४.
शास्त्रीय संस्था, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ३१५; इंडियन केमिकल सोसायटी २३५; बोस रिसर्च इन्स्टिट्यूट ४६६.
शास्त्रीय विषय सुलभ करणें ३८९.
शांतता प्रस्थापक ८३.
शान्तिनिकेतन व विश्वभारती ३१०.
शिकार १८२.
शिलालेखतज्ज्ञ ६९, ८९, २८४, ४४३, ४४५, ४४७, ४६३, ४८२.
शिल्प ९६, ९७, ५४३.
शिवस्मारक चळवळ ५५४.
शिक्षणतज्ज्ञ ५, २१, १३१, १८८, २६९, ३०४, ३१०, ४१५, ४४२.
शिक्षणसंस्था लोकांच्या २७१; प्रौढांच्या ४१५.
शिस्त ४६.
शुक्लयजुर्वेद ८९.
शेती तज्ज्ञ ३४२, ५७५; पावसाचे पाणी, मगदूर, माती, बांध १०९; जमिनीची पाहणी १३४; बियाणाबाबत जननशास्त्राचा उपयोग १५६; मैलापाणी व लोणा जमीन १३३; दुर्जलकृषि १६९; खतें पाने व साल २९९; जिवंत पाला ४८७; पिकाची वाढ व रोग ३६; बीज ४०५; राब भाजण्याची पद्धत ४८७; आर्थिक पाहणी ४८७.
शैवांची प्राचीनता ४८२.
सती गुणग्रहण १५९; बंदी चळवळ ५३२; संस्थानांत ४०२.
सत्यशोधक मूळ ३९०; चळवळ ४२४, तात्त्विक बैठक ५५३; कार्यकर्ते २६३, २८३, ४२४.
सत्याग्रह सदाग्रह १९७; जंगल ४; मशिदीवरून वाद्यें २४८; मीठ गाळणें व विकणें ३८७; मुळशी ९९, ३६५, ४५१; सशस्त्र ४५१.
सनदा बादशहाकडून वैष्णव गुरूंना २८२.
समाजरचना नवीन ३१४.
समाजशास्त्रज्ञ १०२, १४४, २२६, ३०४.
समाजसत्तावादी १३०, २३५, २९९.
समाजसुधारक ३२, ९२, ९७, २७९, २८३, २८५, ३४१, ३८४, ३८५, ४१९, ५३२; अस्पृश्यता ९२; शास्त्रांत नसल्याचा जाहीरनामा १९३; निवारणार्थ शैवदीक्षा ४९४, ५१९, ५५३; सहभोजन ९२; संमति ३२२, ३२३, ४८७; ध्येय पूर्वपश्चिमऐक्य ३११, ३९४.
समाधि चवथ्या वर्षापासून ५२६; चा खर्च सात लाख ५२७.
सर्कस २६७.
सर्पदंशावर औषध ५७२; दाढेतील विष काढण्याचें यंत्र ११२.
सस्तु साहित्य १.
संततिनियमन १०४.
संन्यास ४६, ३५६, ३९०, ५४६, ५५८.
संपन्नतेची तुलना ३९८.
संशोधक –उत्खनन ११८, ४४९, ४९३, ५०२, ५७६; जैन ४२५, ४५९; नाणीं ४४९; पुराणवस्तु व प्राचीन इतिहास ४९, ११५, ११८, १४५, १६५, २१६, २८४, २८५, २९९, ३२०, ३२२, ४४९, ४६३, ५०२, ५७६; प्रवासी ५७२, ५७३; प्राच्यविद्या १२६, १५८, ३२२, ३३८, ३४४, ३६३, ४५९, ४६१, ५५६, ५६४; बौद्ध १६२, ३०७, ३८०, ५३४; भाषा ४४५, ४५८; –इतिहास मराठी ४३, ११५, १६५, १६७, ३०३, ४०६, ४२७, ४३४, ४३७, ४५६, ४७७, ४७९, ४८३, ४९५, ५०१, ५५३; मोगल ५६३; रजपूत ८९, ३२०, ३२५; वेद ३२२,

४५९, ५०६, ५६५; वैद्यक-आर्य २९७; आंग्ल ५७१; संगीत ४७६, ५०१, ५०५; -आधुनिक ३२६; -नवे संशोधन अन्न गवतापासून १७०; -औषध ॲटोमिडिन ४८४; प्लेग २१८, ५७२; काळाआजार ४७१; सर्पदंशावर ११२, ५७२; -गणित अविभाज्य संख्या ५३०; डेम्लो नंबर्स २४५, ३९५; -कालनिर्णय कृष्ण, भगवद्गीता व वैष्णव ३४५, ४८२; ख्रिस्त ४३१; महाभाष्य ४८१; रामायण ३४५, वेद २४९, ३२५; शंकराचार्य ३४५; -जंतु २६, २९९; -ज्योतिष नवीन तारे २५५; रीत ५५१; -मराठी इतिहास उलट्या 'न' चा अर्थ ४३४; पुरंदरे रोजनिशींचें कर्तृत्व ४३४; -प्राणि ३६; -मराठी वाङ्मय एकनाथी भागवत व गुरुचरित्र ११०; महानुभावांचे गुप्तसंकेत ५२२; -यंत्र कळसूत्री दरवाजे व ब्लाकसिस्टिम ५४८; वंडरफुल रेंज फाइंडर ३४८; सापाचे विष काढण्याचें ११२; -रसायन गतितंत्र ३९५; गोखले लॉ २१२; निधोनपद्धति ५४०; प्रकाशाचा रासायनिक परिणाम ३७९; मोत्याचें तेज आणणें १७६; -रामन इफेक्ट ५२९; लवणाचे रंग व त्यांची उपपत्ति ५६५; लिसिगॅग चक्र ३८०; शाईचा कागद १८७; शेणापासून दिवे २९९; सूर्यप्रकाश व कलिल रसायन ३०३, ३८०, ४७४, ५०१; -लिपि प्राचीन नष्ट लिपि ५७२; त्यांचें ज्ञान ५७६; -वनस्पति ४२; वनस्पतिजीवन ४६५; अश्मीभूत ५६५; वाद्य-श्रुतिमंडळ मंजूषा पेटी ३८; -शिलालेखांतील संख्या ७०; -संस्कृत वाङ्मय लुप्त कारिका ३२६; जैमिनीच्या सूत्राचा अर्थ ३५१; कौटिलीय अर्थशास्त्र ५५६; अज्ञात इतिहास १८४.

संस्कृत पंडित-हिंदु-जुनी पद्धत १४, १०४, ११०, १२७, १२८, १३४, १७४, १७५, २१५, २२५, २२७, २२८, ३००, ३०५, ३७७, ३८१, ४५५, ५३३, ५३४; नवे १०७, ३२२, ४६१, ४८१; हिंदी ख्रिस्ती स्त्री ३४०; इंग्रज ख्रिस्ती स्त्री ३३९, ३९९; मुसलमान ४५८; इंग्रज १२२, १५८, ४४५, ४४६, ५१३; जर्मन १२५, ३३५, ३४८, ४५९, ५०६; इटली ३२५; स्पेन ५७६; हंगेरी ५७२; स्वीडन ५७३; फ्रेंच ५४१.

संस्कृत भाषा-कवि व लेखक १४, ८६, १२९, १४४, ३२८, ३४५, ३५१, ३५२, ३८१, ४२६, ५११, ५३३; -टीका चक्रपाणि डल्हण मधुकोष ३९; प्रेम २७२; महत्त्व ५१४; ग्रंथांना भारतीय मान्यता ४३, १४३, ५७१.

संस्कृतींचें एकीकरण ३३१.

सागरसंगीत ३५९.

साधुसन्त १, ७९, ११५, १४२, १९७, २०३, २२१, २६१ (चौंडे), २८५, २८७ (जैन), ३२८, ३५८ (दासगणू), ३९८, ४९१, ५२६ (रामकृष्ण परम.), ५२८ (रामतीर्थ), ५४८.

सायनमत ३६४, ३८८.

सार्वजनिक काका २९५.

साक्षात्कार ८३, ३११, ५२८.

सिलोन ३०७.

सुधारक पत्र व पक्ष ३३.

सूक्ष्म अभ्यासक ९९.

सेनापति ३२८.

स्त्रिया -कवि व लेखक मराठी ३२२; हिन्दी २६१; इंग्रजी ३४९, ३९३, ४६०; कार्यकर्त्या ९५, ४०१; क्रान्तिकारक १११, ३४९; ख्रिश्चन मिशनरी ३४०; गायिका १४८, २२०, ४४७; डॉक्टरीण २९४; नर्तकी २३, ५०७; तत्त्वज्ञानी ४६०, ४७२; पाली पंडिता ३३९; प्रधान ४१८; राजकारणी २३५, २६०, ३९३, ४६०, ४१८; वक्त्री ४६०; वादक २५७; शास्त्रज्ञ १०२; संस्कृत पंडिता ३४०; हिंदु संस्कृतीची पुरस्कर्ती ३९९.

स्त्रियांना मतदानाचा हक्क ४९; चा दर्जा ३९४.

स्त्रीशिक्षण १०२; परिणति १०३, ३२१, ३३२, ३६६, ३६७, ४४४; पुरस्कारकर्ता शास्त्री ३३९.

स्थापत्य विशारद ९६, २४६, २९७, ३७०, ५४७.

स्मरणशक्ति २८५.

स्मशानयात्रा गायत्रीमंत्र म्हणत ३८८.

स्युएज प्युरिफिकेशन वर्क्स ५१२.

स्वदेशीचा प्रचार २९६.

स्वाभिमान ३९४.

स्वावलंबन २४६.

हक्क ज्युरींत बसण्याचा २७२.

हॉकींचे जादूगार ३८३.

हिन्दी भाषा-लेखक कवि ७७, ११७, १६४, १९९, २००, २०१, २१८, २१९, २२२, २४१,

२४२, २५९, २६१, २७०, २८०, २८१, ३७७, ३७८, ३९१, ४९८, ५३१, ५३४, ५५५, ५७४; इतिहास लेखन ८९, २८०; चा पुरस्कार ३०७; आधुनिक हिन्दीचे जनक ३७८; रवीन्द्र २८२; जयदेव ४२६; दोन प्रकार खडी बोली व व्रजभाषा २७०; व्रजभाषा हीं कविभाषा २५९; ला राष्ट्रभाषा करणारे ३५२.

हिन्दीकरण ५२८.

हिन्दी लोकांचा दर्जा ४३, १०२.

हिन्दु धर्म २३१, ४६१, ५०६, ५२४, ५३७, ५४२; स्वीकार ९५; मलकांना रजपुतांची व मलबारांतील शुद्धि ५५८.

हिंदुनाट्यं ५४१.

हिन्दु मिशनरी १२८, ५२७, ५४९, ५५७, ५७५.

हिंदु मिशनरी सोसायटी ५५०.

हिंदु संस्कृतीचा पुरस्कार ३९९, ४५७.

हिंदु मुस्लीम प्रश्न २८९; चे जनक ३३४, ५६२, राष्ट्रसभेचें धोरण २६८; लखनौ करार २९१; चिकित्सा २५४; खिलापत २८९; नेहरू रिपोर्ट २९०; कोरा चेक २९०; राजाजी योजना ५२०; सप्रू योजना ५६१; परिणाम १९६; लीगचें धोरण–स्वतंत्र मतदार संघ २८९; चवदा मागण्या २८९; पाकिस्तान २९०; पन्नास टक्के २९१; वेव्हेल योजनेला नकार २९०; –सरकारी पक्षपात डफरिन २९१, ३३४; रम्से मॅक्डोनाल्ड २९०; मिंटो ४९९; क्रिप्स योजना २९०; वेव्हेल योजना १९४; भयानकता ४१४.

क्षत्रिय ख्रिस्ती ४९७.

क्षयरोग आयुर्वेद दवणालय ३९२.

ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान १३४.

ज्ञानेश्वरीचा कर्ता कोण ४१; एकनाथ पूर्व ५२२.

ज्ञानेश्वरीचे भाषान्तर संस्कृत ८६; इंग्रजी ५६९.

आधार ग्रंथ

मराठी

अण्णासाहेब किर्लोस्कर यांचें चरित्र—शं. बा. मुजुमदार.
अर्घ्यप्रदान—त्र्यं. वि. पर्वते.
अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक १-२—गं. दे. खानोलकर.
आजकालचा महाराष्ट्र—पाध्ये, टिकेकर.
आधुनिक भारत—शं. दा. जावडेकर.
कलावंताच्या सहवासांत—धनंजय.
केसरी प्रबोध—
खान बंधू—महादेव देसाई.
गांधी चरित्र—दा. न. शिखरे.
ग्रह आणि तारे—सत्यग्राही.
टिळक चरित्र—न. चिं. केळकर.
नवयुगधर्म—स. कृ. फडके.
प्रार्थना समाजाचा इतिहास—द्वा. वैद्य.
बहुजन समाजांतील कर्मवीर—द. स. दरेकर.
भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास—शं. बा. दीक्षित.
मराठी ग्रंथसूचि—शं. ग. दाते.
मराठी गद्याचा इंग्रजी अवतार—द. वा. पोतदार.
मराठी रिसायत उत्तर वि. भाग ३—गो. स. सरदेसाई.
मराठवाडयांतील अर्वाचीन मराठी वाङ्मय—
चिं. नी. जोशी.

महाराष्ट्र संत चरित्रें—पांगारकर.
महाराष्ट्राची रंगभूमि—अप्पाजी विष्णु कुलकर्णी.
महाराष्ट्रीय सांवत्सरिक १९३३-१९३४—श्री. म. माटे.
माझा संगीताचा व्यासंग—गो. टेंबे.
माझे आवडते गायक—एकलव्य.
माझे आवडते लेखक—माडखोलकर.
माधव गोविंद रानडे चरित्र—कर्वे.
व्यायाम ज्ञानकोश चरित्रविभाग—द. चिं. मुजुमदार.
व्यक्ति आणि वाङ्मय—श्री. के. क्षीरसागर.
व्यक्तिरेखा—माडखोलकर.
राष्ट्रीय सभेचा इतिहास—पट्टाभिसीतारामय्या,
—अनु. भाई गोरे.

सावरकर चरित्र—शि. ल. करंदीकर.
सुवर्णतुला—श्री. के. क्षीरसागर.
विष्णुशास्त्री चिपळुणकर—माडखोलकर-बनहट्टी.
शास्त्रकार आणि कलावंत—ल. द. जोशी.
शाहूमहाराजांचें चरित्र—अ. बा. लठ्ठे.
हैदराबाद व देशी संस्थाने—राघवेन्द्र शर्मा.
हिंदुमुसलमान ऐक्य—शं. दा. जावडेकर.

हिंदी

कविताकौमुदी-खंड १-७—समनरेश त्रिपाठी.
नये भारतके नये नेता-खंड १—राहुल सांकृत्यायन.
हिंदी साहित्य निर्माता—प्रेमनारायण टंडन.
हिंदी साहित्यका इतिहास—रामचंद्र शुक्ल.
प्राच्यदर्शनसमीक्षा—स्वामी शांतीनाथ.
जय हिंद—सत्यदेव विद्यालंकार.
महात्मा हंसराज—खुशहालचंद.
आत्मचरित्र—लाला लजपतराय.
महावीरप्रसाद द्विवेदी ग्रंथ.
गौरीशंकर ओझा ग्रंथ.

गुजराथी

अर्वाचीन गुजराथनु रेखादर्शन.
ग्रंथ अने ग्रंथकार १-८ भाग.
गुजराथनो महाजनो.

इंग्रजी

And One did not come back—K. A. Abbas.
Autobiography—Jawaharlal Nehru.
Congress Caravan—R. P. Aiyar and
L. S. Bhandare.
Dadabhai Naoroji—Sir Rustum Masani.
Dictionary of Indian Biography—Buchland.
Emienent Orientalists—Natesan & Co.
Famous Historic Trials—K. L. Gauba.
Gandhi and Gandhism—B. Pattabhi
Sitaramayya.
Gospel of Sri Ramakrishna—'M'.
Great Leader—S. Abdul Lateef.
Great Men of India—Home Library Club.
Gujeratha and its Literature—K. M.
Munshi.
Haripura Congress Sovernier—Y. G.
Krishnamurti.

History of Modern Marathi Literature—G. C. Bhate.
Indian Contribution to English Literature—K. R. Shrinivasa Iyengar.
Indian Scientists—Natesan and Co.
Indian Year-book and Who's Who (1945-46) Times of India Press.
India Divided—Babu Rajendraprasad.
Indian War of Independance—Bejoy Banerjee.
Indian Womanhood, Today—Margaret Cousins.
Iqbal, his art and Thoughts—S. A. Vahid.
Indian Who's Who—Waman P. Kabadi.
Journalism—C. L. R. Shastri.
Lallubhai Samaldas—S. Natarajan.
Leaders of India—Yusuf Meherally.
Life and Experiences of the Bengali Chemist—Sir P. C. Ray.
Life of Gokhale—V. S. Shrinivasa Shastri.
Life of J. C. Bose—
Life of J. N. Tata—Dinsha Wacha.
Life and Times of C. R. Das—Sir P. C. Ray.
Life of Ramakrishna and Vivekananda—Roman Rolla.
M. Vishweshwarayya, a study—Y. G. Krishnamurti.
Madhavrao Schindia—Kailasnarayan Hacksar.
Men and Supermen of Hindustan—J. Alva.
My Experiments with Truth—Gandhiji.
My Reminiscences—Devendranath Tagore.
Nation in making—Surendranath Banerji.
Our Leader Jinnah—
Pioneer Women of India—Padmini Sengupta.
Punjab's Emienent Hindus—N. B. Sen.
Ranji—Roland Wild.
Religion in Transition—S. Radhakrishnan.
Representative Men of Southern India (1896)—G. Purshuraman Pillali.
Sapru Commitee Report—Tejbahaddur Sapru.
Sedition Commitee Report—Edited by Rowlat.
Sharat Chatterjee—Humyun Kabir.
Some Emienent Behar Contemporories—Sachchidananda Sinha.
Sovernier of the Silver Jubilee Session of Indian Economic conferance.
Story of My Life—Bhai Paramananda.
Way Out—C. Rajgopalachari.
What I Owe to Christ—C. F. Andrews.

याशिवाय मराठी, गुजराथी, हिन्दी, बंगाली व इंग्रजी या भाषांतील अनेक नियतकालिकें, प्रासंगिकें व व्यक्तिशः मिळविलेली माहिती.

Stock Verified 2000-01

Stock Verified 99-2000